# संपूर्ण गडकरी



# संपूर्ण
# ॥ गडकरी ॥

## खंड – पहिला

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

प्रथम पुनर्मुद्रण : मे, १९८४

द्वितीय पुनर्मुद्रण : डिसेंबर, २०११

मुखपृष्ठ : सतीश भावसार

प्रकाशक : सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई–४०० ०२५.

मुद्रक : व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
पुणे - ४११ ००१.

किंमत : रुपये २२८/-

*माझे परमपूज्य लेखनगुरु,*

स्वतंत्र शक्तीचे नाटककार, प्रतिभासंपन्न कवि
मार्मिक टीकाकार, कुशल विनोदपंडित व विद्वान् निबंधकार

## रा. रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

बी. एल्एल्. बी.; वकील, खामगांव.

संगीत वीरतनय, मूकनायक, गुप्तमंजूष,
मतिविकार, प्रेमशोधन व वधूपरीक्षा या नाटकांचे
व 'सुदाम्याचे पोहे' या लेखसंग्रहाचे कर्ते यांस :

गुरुवर्य तात्यासाहेब,

माझ्यासारख्या विषम स्थितींतल्या आणि असदृश योग्यतेच्या मनुष्याला आपण आज इतकीं वर्षे उदार हृदयानें, बरोबरीच्या मित्रपणाचा थोर मान देत आलां; वेळोवेळीं माझ्या चुकल्या बालबुद्धीला वडीलपणानें सदुपदेश करीत आलां; कधींमधीं उच्छृंखलपणानें माझ्याकडून आपला उपमर्द झाला असतां त्याचीही बंधुप्रेमानें क्षमाच करीत आलां; आजवर मीं लिहिलेल्या वेड्यावांकड्या शब्दांचें पितृतुल्य प्रेमानें प्रोत्साहनपर कौतुकच करीत आलां; याप्रमाणें, एक ना दोन, हजारों उपकारांचें आज एकसमयावच्छेदें करून स्मरण होऊन, अंतःकरण कृतज्ञतेनें उचंबळून येत आहे! आणि त्या कृतज्ञतेचे अश्रूच आज मी सानंद भक्तिभावानें आपल्या परमपूज्य चरणीं वाहत आहें.

# कृतज्ञतेचे अश्रु

माझ्या सबंध पुस्तकाची आपण लिहिलेल्या एखाद्या शब्दा-इतकीसुद्धां किंमत नाहीं हें मी जाणून आहें; पण हा प्रश्न योग्यतेचा नाहीं. गोपाळबाळानें भक्तिभावानें वाहिलेल्या फत्तराचीं फुलें झालीं. या कथेंत ऐतिहासिक सत्य मात्र खास आहे; तोच प्रकार कृतज्ञतेचाही !

आपलेच लेख वाचून मला हे चार शब्द लिहितां आले; तेव्हां यांत जें चांगलें असेल तें आपलेंच आहे, त्याचा आपण स्वीकार करालच; आणि जें वाईट आहे त्याचें तरी क्षमापूर्ण उदारतेनें कौतुक आपल्या इतकें दुसरें कोण करणार ?

ता. २० डिसेंबर १९१२ — आपला कृपाभिलाषी
फर्ग्युसन कॉलेज, पुणें. — राम गणेश गडकरी

## निवेदन–

नाटककार, विनोदी लेखक आणि कवी म्हणून ख्यातनाम असलेले राम गणेश गडकरी (गोविंदाग्रज) यांचे सर्व साहित्य मराठी वाङ्मयाचे भूषण मानले जाते. गेली जवळजवळ शंभर वर्षे या थोर साहित्यकाराच्या प्रतिभेतून निर्माण झालेले वाङ्मय महाराष्ट्राने शिरोधार्य मानलेले आहे. आजही त्यांच्या साहित्याची लोकप्रियता अणूमात्र कमी झालेली नाही. त्यामुळे गडकरी यांचे समग्र वाङ्मय, ज्याला आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांची प्रदीर्घ अशी विश्लेषक व आस्वादक समीक्षा प्रस्तावनेच्यारुपाने लाभली आहे, ते गडकरी जन्मशताब्दीच्या निमित्ताने पुनर्मुद्रित करावे असे तत्कालीन मंडळाच्या अध्यक्षांनी व सदस्यांनी ठरविले व १९८४ मध्ये '**संपूर्ण गडकरी**' हा ग्रंथ दोन भागामध्ये प्रकाशित करण्यात आला. ही पुनर्मुद्रित आवृत्ती यथाकाल संपली. महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या या महान साहित्यिकाचे पुन:स्मरण करावे या हेतूने गडकऱ्यांच्या समग्र साहित्याच्या दोन्ही खंडाचे पुन्हा एकवार मुद्रण करून ते महाराष्ट्राच्या नव्या पिढीला उपलब्ध करून द्यावे, असे विद्यमान मंडळाने ठरवले. त्यानुसार आज गडकरी वाङ्मयाचे दोन्ही खंड मराठी वाचकांना सादर करताना मला आनंद होत आहे.

**(मधु मंगेश कर्णिक)**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि
संस्कृती मंडळ, मुंबई.

मुंबई,
१४ नोव्हेंबर, २०११

## निवेदन—

महाराष्ट्राचे थोर नाटककार, विनोदी लेखक आणि कवी राम गणेश गडकरी यांची जन्मशताब्दी यावर्षी महाराष्ट्रात आणि देशातील इतरत्र भागात मोठ्या उत्साहाने साजरी होत आहे. महाराष्ट्र शासनाने ही शताब्दी योग्य तऱ्हेने साजरी करण्यासाठी शिक्षण-मंत्री श्री. सुधाकरराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीच्या बैठकीत काही वर्षांपूर्वी प्रकाशित झालेल्या आणि आता उपलब्ध नसलेल्या "संपूर्ण गडकरी" या ग्रंथाचे पुनर्मुद्रण करावे आणि हे काम साहित्य संस्कृती मंडळाने करावे असा निर्णय घेतला गेला. राम गणेश गडकरी यांच्या वाङ्मयाची असामान्य लोकप्रियता लक्षात घेता आचार्य अत्रे यांची प्रदीर्घ प्रस्तावना असणारा हा ग्रंथ दोन खंडात अत्यंत कमी किंमतीत प्रकाशित केल्यास महाराष्ट्रातील शाळा कॉलेजांतील आणि अन्य महत्वाच्या शहरातील वाचनालयात हे पुस्तक जाईल आणि शताब्दी महोत्सवाच्या दृष्टीने एक अत्यंत विधायक कार्य मंडळाकडून होईल. या दृष्टीने मंडळाने हे काम अंगिकारले. या ग्रंथाची जाहिरात वृत्तपत्रात प्रकाशित होताच त्याला सर्वसामान्य वाचकांकडून जो प्रचंड प्रतिसाद मिळाला त्यावरून गडकरी वाङ्मयाची जनमानसावरील मोहिनी अजूनही कायम आहे याचा प्रत्यय आला.

मराठी भाषेतील अन्य थोर लेखकांचे साहित्य सर्वसामान्य वाचकांना अशाच तऱ्हेने उपलब्ध करून देण्याची आमची योजना आहे आणि योजनेचा शुभारंभ गडकरी वाङ्मय प्रकाशनाच्या निमित्ताने होत आहे याचा मला आनंद होत आहे. आचार्य अत्रे यांची प्रदीर्घ प्रस्तावना या ग्रंथात अंतर्भूत करण्याची परवानगी दिल्याबद्दल सौ. शिरीष पै आणि सौ. मीना देशपांडे यांचे मी मनः-

पूर्वक आभार मानतो. डॉ. रा. शं. वाळिंबे यांच्याबद्दलही कृतज्ञता व्यक्त करणे आवश्यक आहे. डॉक्टर वाळिंबे हे गडकरी साहित्याच्या रसात डुबलेले. गडकरी साहित्याची सर्व हस्तलिखिते त्यांच्या संग्रही आहेत. त्यातून निवडून त्यांनी हस्तलिखितांची, एकच प्याला, वाग्वैजयंती इत्यादींची काही मूळ पाने, आम्हाला मुद्रित करण्यास दिलि हे त्यांचे न फिटणारे ऋण आहे.

अवघ्या तीस दिवसात हे पुस्तक छापून देण्याचा विक्रम केल्याबद्दल मायक्रो ग्राफ प्रिंटर्सचे श्री. चिंतामणी आणि प्रभाकर देसाई यांचेही साहित्य संस्कृती मंडळ व व्यक्तीशः मी आभारी आहोत.

सुरेंद्र बारलिंगे
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ
मुंबई.

यशोधन,
मुंबई–२०.
२६–५–१९८४

अनुक्रम


| | |
|---|---|
| प्रेमसंन्यास | १ |
| पुण्यप्रभाव | १३७ |
| राजसंन्यास | २८७ |
| एकच प्याला | ३४७ |

# प्रदीर्घ प्रस्तावना

आचार्य प्रल्हाद केशव अत्रे

# प्रस्तावना

मराठी साहित्यांत राम गणेश गडकरी ह्यांना जेवढी कीर्ति आणि लोकप्रियता मिळाली, तेवढी महाराष्ट्रामधल्या या शतकांतल्या फारच थोड्या लेखकांच्या वांट्याला आली असेल. महाराष्ट्रानें त्यांच्या गुणांचें जेवढें कोडकौतुक केलें तेवढें कोणत्याहि मराठी लेखकाचें केलेलें नाहीं. काव्य, नाट्य आणि विनोद ह्या तीनहि क्षेत्रांत ते सारख्याच वैभवानें आणि तेजानें तळपले. ह्यापैकीं केवळ एकाद्याच क्षेत्रांत ते वावरले असते तरी त्यांनीं तेवढेंच यश मिळविलें असतें. पण साहित्यामधल्या अत्यंत अवघड म्हणून समजल्या जाणाऱ्या त्या तीनहि क्षेत्रांमध्यें एकाच वेळीं त्यांनीं असामान्य प्रभुत्व मिळविलें, म्हणूनच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाभोंवतीं अद्‌भुततेचें विलक्षण वलय निर्माण झालें. त्यांच्या काव्यानें, नाट्यानें आणि विनोदानें महाराष्ट्राला अक्षरशः वेड लावलें.

विष्णुशास्त्री चिपळूणकरांप्रमाणेंच गडकऱ्यांना ऐन तारुण्यांत मृत्यु आला. मरण-समयीं ते अवघे चौतीस वर्षांचे होते. गडकऱ्यांचें कर्तृत्व जसें अलौकिक, तसें त्यांचें व्यक्तिमत्त्वहि लोकविलक्षण. म्हणून अवघ्या चौतीस वर्षांच्या आयुष्यांत एवढा दिग्विजय मिळवून ते गेले. त्यांचा एकंदर लेखनकाल दहाअकरा वर्षांचाच होता. पण एवढ्या थोड्या काळांत त्यांनीं वाङ्मयांत जी विलक्षण कामगिरी करून ठेवली आहे, ती बुद्धीला अक्षरशः स्तिमित करून टाकणारी आहे. त्यांना जाऊन इतकीं वर्षें झालीं तरी देखील त्यांची कीर्ति पहिल्याइतकीच प्रफुल्लित आणि टवटवीत आहे. किंबहुना त्यांच्या अव-सानानंतर जशीं जशीं जास्त वर्षें लोटताहेत, तसतसें यांच्याबद्दलचें आकर्षण जास्त जास्त वाढत चाललें आहे.

काव्यांत ते स्वतःला केशवसुतांचे सच्चे चेले म्हणवीत. तर नाट्यविनोदांत श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे त्यांचे गुरु होते. आपल्या ह्या दोन्ही गुरूंपासून त्यांनीं निःसंशय लेखनस्फूर्ति घेतली. कांहीं मर्यादेपर्यंत त्यांनीं त्यांचें अनुकरणहि केलें. पण असें असूनहि गडकऱ्यांची प्रज्ञा आणि प्रतिभा उभय गुरूंपेक्षां अधिक स्वतंत्र होती.

म्हणूनच त्यांच्यापेक्षां जास्त लौकिक आणि प्रसिद्धि ते मिळवूं शकले.

केशवसुतांची जीवनदृष्टि गडकऱ्यांपेक्षां अधिक विशाल होती. केशवसुत द्रष्टे होते. पण गडकरी हे स्रष्टे होते. कोल्हटकर हे गडकऱ्यांपेक्षां अधिक तर्कनिष्ठ आणि मार्मिक होते. पण गडकऱ्यांचें लालित्य त्यांच्याजवळ नव्हतें. केशवसुत आणि कोल्हटकर ह्यांच्यापेक्षां गडकरी हे अधिक कलात्मक आणि रसिक होते. कवित्व आणि विनोद ह्या प्रतिभेच्या दोन वेगवेगळया शक्ति आहेत. त्या एकाच व्यक्तिमत्त्वांत तितक्या प्रभावानें क्वचित् संभवतात. पण तो अपूर्व योग गडकऱ्यांच्या ठायीं जमून आलेला होता. म्हणून इतर लेखकांना मिळूं न शकलेली लोकप्रियता अगदीं थोड्या अवधींत त्यांना लाभली.

विष्णुशास्त्र्यांनंतर मराठी गद्यावर आपल्या लेखनाचा प्रभाव पाडणारा आणि त्याला निश्चित वळण लावणारा गडकऱ्यांसारखा शैलीदार लेखक अलीकडच्या काळांत तरी दुसरा झालेला नाहीं. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं मराठी भाषेला सामर्थ्य दिलें. तर गडकऱ्यांनीं मराठी भाषेला सौंदर्य दिलें. त्यांच्या देदीप्यमान भाषेनें आणि वैशिष्ट्य-पूर्ण शैलीनें शारदेच्या अंगावर नवे नवे अलंकार चढवले आणि मराठी साहित्यांत नवें युग सुरू केलें. मराठी साहित्यांत गडकऱ्यांच्या इतकें अनुकरण दुसऱ्या कोणत्याहि लेखकाचें झालेलें नाहीं. गडकऱ्यांनंतर निर्माण झालेल्या बहुतेक सर्व ललित वाङ्मया-वर कमीजास्त प्रमाणानें गडकऱ्यांच्या साहित्याचा, भाषेचा नि शैलीचा ठसा उमटलेला आढळतो. ह्यांतच गडकऱ्यांच्या अलौकिकत्वाचें नि महत्त्वाचें वैशिष्ट्य आहे.

आपल्या वाङ्मयीन जीवनाला जरी गडकऱ्यांनीं काव्यलेखनानें प्रारंभ केला, तरी काव्यापेक्षां नाट्याचें आकर्षण गडकऱ्यांना अधिक होतें, ह्याचें कारण वयाच्या एक-विसाव्या वर्षी किर्लोस्कर नाटक मंडळीशीं त्यांचा संबंध जमून आला. वयाच्या एकोणि-साव्या वर्षी ते मॅट्रिकची परीक्षा पास झाले. त्यानंतर ते फर्ग्युसन कॉलेजांत पहिल्या वर्गांत दाखल झाले. त्या वर्गांत एक वर्ष काढूनसुद्धां ते ती परीक्षा कांहीं पास होऊं शकले नाहींत. त्यानंतर ते सरळ किर्लोस्कर मंडळींत मुलांचे मास्तर म्हणून राहिले. त्यांचें ' मास्तर ' हें नांव तेव्हांपासूनच पडलें.

किर्लोस्कर मंडळींत आल्यानंतर साहजिकच मंडळीचे नाटककार श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ह्यांच्याशीं त्यांचा परिचय झाला. आणि त्यामुळें कोल्हटकरांच्या नाटकांची, भाषाशैलीची आणि कोटीबाज विनोदाची त्यांच्यावर विलक्षण छाप पडली. तेव्हांपासून ते कोल्हटकरांना आपले लेखनगुरु मानूं लागले. कोल्हटकरांच्या नाटकांचा त्यांनीं किती सूक्ष्मपणें अभ्यास केलेला होता, हें त्यांनीं त्या काळीं प्रसिद्ध केलेल्या ' कोल्हट-करांच्या नाटकांतील सुंदर उतारे ' या छोट्याशा पुस्तकांत दिसून येण्यासारखें आहे. किर्लोस्कर नाटक मंडळीचे व्यवस्थापक शंकर बापूजी मुजुमदार हे त्या काळीं 'रंगभूमि' नांवाचें एक मासिक प्रसिद्ध करीत होते. ह्या मासिकांत ' नाटक कसें लिहावें, ' ' नाटक कसें पहावें, ' ' प्रमादपंचदशी ' असे कांहीं स्फुट विनोदी लेख ' सवाई नाटकी ' ह्या

टोपणनांवानें त्यांनीं प्रसिद्ध केले होते.

वस्तुतः, ते जरी किर्लोस्कर मंडळींत मास्तर असले, तरी नाट्यतंत्राचे आणि नाट्यलेखनाचे पहिले धडे त्यांना देणारी किर्लोस्कर मंडळी हीच त्यांची खरी मास्तर होती. दिवसा मुलांना शिकवायचें नि रात्रीं किर्लोस्करांचीं नाटकें पहावयाचीं हाच त्यांचा त्यावेळीं व्यवसाय होता. त्यामुळें प्रयोगाच्या दृष्टीनें नाटक कसें यशस्वी आणि परिणामकारक करावें ह्याचें प्रात्यक्षिकच त्यांना तेथें वारंवार पहावयाला मिळालें. कोणत्या वाक्यांना टाळ्या पडतात, हंशा कसा नि कुठें निर्माण करावयाचा, प्रेक्षकांच्या काळजांना कसा हात घालावयाचा नि त्यांच्या चित्तवृत्ति कशा थरारून सोडावयाच्या हें सर्व शास्त्र बारीकसारीक तपशिलासह गडकरी किर्लोस्कर नाटक मंडळींतच शिकले.

ह्या सर्व गोष्टींचा व्हायचा तोच परिणाम झाला. गडकऱ्यांनीं, 'किर्लोस्कर मंडळीं'त असतांना बाविसाव्या तेविसाव्या वर्षी 'वेड्यांचा बाजार' आणि 'गर्व-निर्वाण' हीं नाटकें लिहिलीं. 'वेड्यांचा बाजार' हें त्यांचें पहिलें नाटक. त्या नाटकाची बैठक विनोदी आहे हें त्याच्या नांवावरूनच उघड होतें. त्याचे फक्त दोन अंकच त्यांनीं पूर्ण केले. नाटकांचें वेड लागलेल्या तरुणांचें विडंबन चितारण्याचा प्रयत्न गडकऱ्यांनीं ह्या नाटकांत केलेला आहे. हें नाटक जर त्यांनीं पूर्ण केलें असतें, तर रंगभूमीवर तें चांगलेंच गाजलें असतें. 'गर्वनिर्वाण' हें पौराणिक नाटक प्रल्हाद–हिरण्यकश्यपूच्या कथाभागावर आधारलेलें होतें. तें लिहून पूर्ण झालेलें होतें. पण तो १९०८ चा काळ होता. लो. टिळकांना सहा वर्षें हद्दपारीची शिक्षा झाली होती नाशिकचे कलेक्टर जॅक्सन ह्यांचा खून किर्लोस्कर नाटक मंडळीचें नाटक चालू असतां भर नाटकगृहांत झालेला होता. खाडिलकरांचें 'कीचकवध' नाटक सरकारनें त्यावेळीं बंद केलें होतें. अशा वातावरणांत 'गर्वनिर्वाण' हें नाटक राजकीय स्वरूपाचें आहे अशी त्यावर तोहमत येण्याची शक्यता आहे, ह्या भीतीनें गडकऱ्यांनीं तें नाटक आपल्या हातांनीं जाळून टाकलें असें म्हणतात.

'किर्लोस्कर नाटक मंडळी'शीं कांहीं मतभेद होऊन त्यांनीं त्यानंतर मंडळी सोडली. मध्यंतरींच्या काळांत त्यांनीं उपजीविकेसाठीं शिक्षकाची नोकरी केली. पण कुठेंहि त्यांचें पटेना. त्या काळांत त्यांची अत्यंत हलाखीची स्थिति होती. तथापि, तशाहि अवस्थेंत त्यांनीं रसिकांचीं मनें आकर्षित करणारीं अनेक काव्यें लिहून 'मासिक मनोरंजनां'त प्रसिद्ध केलीं. 'गोविंदाग्रज' हें काव्यासाठीं त्यांनीं धारण केलेलें टोपणनांव महाराष्ट्रांत ज्याच्या त्याच्या तोंडीं खेळूं लागलें. १९१० ते १२ चा हा कालखंड होता. त्यांच्या काव्यप्रतिभेला त्यावेळीं विलक्षण बहर आलेला होता. त्याच मनस्थितींत त्यांनीं 'प्रेमसंन्यास' नाटक लिहून पूर्ण केलें. आणि तें लेखन चालू

असतांनाच त्यांनीं ' फर्ग्युसन कॉलेज 'मध्यें पुन्हां नांव घालून आपल्या उच्च शिक्षणाला प्रारंभ केला. १९१२ सालीं ते पहिल्या वर्षाची परीक्षा पास झाले नि त्याच सुमारास त्यांचें 'प्रेमसंन्यास' नाटक रंगभूमीवर आलें. त्या नाटकाच्या 'अर्पणपत्रिके'च्या तळाशीं 'फर्ग्युसन कॉलेज' असा त्यांनीं स्थळनिर्देश केलेला आहे. खेरीज, त्या नाटकाला फर्ग्युसन कॉलेजमधील तर्कशास्त्राचे प्राध्यापक, त्यावेळच्या महाराष्ट्रांतले एक ख्यातनाम सुधारक आणि गडकऱ्यांचे विद्यागुरु गोविंद चिमणाजी भाटे ह्यांनीं प्रस्तावना लिहिलेली आहे. आपण पदवीधर नसलों तरी ' फर्ग्युसन कॉलेज 'शीं आपला कसातरी संबंध आहे हें दाखविण्याचा गडकऱ्यांचा तो प्रयत्न पाहून मौज वाटते.

राजकीय दृष्ट्या त्या वेळच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे गडकरी हे 'मवाळ' होते. जहालांची राजकीय विचारसरणी त्यांच्या स्वभावाला पचण्यासारखी नव्हती. टिळकांचें नांव उच्चारण्याचें सुद्धां त्यांना धैर्य नव्हतें. ते त्यांचा 'बी. जी.' अशा सांकेतिक अक्षरांनीं उल्लेख करीत. सामाजिक दृष्ट्या सुद्धां ते संपूर्णपणें सुधारणावादी होते असें म्हणतां येणार नाहीं. किंबहुना आचारविचारानें ते सनातनी, भाविक–नव्हे अगदीं देवभोळे होते. गडकऱ्यांच्या उशागती श्रीशंकराच्या नि श्रीविठ्ठलाच्या दोन चिमुकल्या तसबिरी अहर्निश असत. पुण्याच्या रस्त्यावरुन जातांना देव दिसला कीं त्यांचे हात नमस्कारासाठीं आपोआप वर जात. ते एकादशी पाळीत. हिंदु संस्कृतींत जें जें म्हणून कांहीं मंगल आणि पवित्र आहे त्यावर त्यांचा संपूर्ण विश्वास होता. म्हणून त्यांनीं आपल्या पहिल्या नाटकासाठीं विधवा–पुनर्विवाहासारखा सामाजिक सुधारणेचा विषय कसा निवडला ह्याचें आश्चर्य वाटतें. शिवाय, त्यांचे गुरु कोल्हटकर ह्यांनीं त्याच विषयावर लिहिलेलें 'मतिविकार' हें नाटक रंगभूमीवर मुळींच यशस्वी झालें नव्हतें.

आज जरी पुनर्विवाह रूढ झाला असला तरी एका काळीं महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनांत ह्या प्रश्नानें विलक्षण खळबळ माजविलेली होती, हें ऐतिहासिक सत्य विसरून चालणार नाहीं. त्यामुळें कोल्हटकरांचें 'मतिविकार' हें पुनर्विवाहावर आधारलेलें नाटक १९०७ सालीं रंगभूमीवर येण्यापूर्वीं किती तरी वर्षांआधींपासून ह्या विषयावर अनेक नाटकें लिहिण्यांत आलीं होतीं. त्यांपैकीं पुनर्विवाह–दुःखदर्शन (१८८५), स्वैरसकेशा (१८७१), मनोरमा (१८७१), रूढिदिग्विजय (१८८५), सौभाग्य रमा (१८८५), इंदिरा-माधव (१८९५), आणि रूढिविनाश (१८९७) हीं नाटकें उल्लेखनीय आहेत. पण हीं सर्व नाटकें कलेच्या नि तंत्राच्या दृष्टीनें अगदीं सामान्य होतीं. त्या दृष्टीनें कोल्हटकरांचें 'मतिविकार' हें करुणगंभीर नाटक हा प्रभावी नाट्यतंत्राचा नि परिणामकारक वाङ्मयीन लेखनाचा एक विक्रमच होता. तथापि, असें असूनहि हें नाटक लोकप्रिय होऊं शकलें नाहीं. कारण, 'प्रेमसंन्यासां'त जो पुनर्विवाह रंगभूमीवर गडकरी दाखवूं शकले नाहींत, तो कोल्हटकरांनीं 'मतिविकारां'त

प्रत्यक्ष दाखविलेला आहे. त्यामुळेंच त्या नाटकाला त्या काळीं लोकाश्रय मिळाला नसावा.

'मतिविकार' यशस्वी होऊं शकलें नाहीं हें शल्य गडकऱ्यांना फार लागून राहिलें. म्हणून त्याच विषयावर नवें नाटक लिहून आपण तें यशस्वी करून दाखवितों, ह्या जिद्दीनें गडकऱ्यांनीं 'प्रेमसंन्यास' नाटक लिहिण्याचा संकल्प केला असावा. तथापि, 'मतिविकारा'वर मात करण्याचा निर्धार करूनहि 'मतिविकारा'च्या अनुकरणामधून कांहीं गडकरी बाहेर पडूं शकले नाहींत. 'मतिविकारां'तलीं पात्रेंच्या पात्रें गडकऱ्यांनीं 'प्रेमसंन्यासां'त उचललेलीं आहेत. चकोर–चंद्रिकेवरून लीला–जयंत घेतलेलीं आहेत. 'प्रेमसंन्यासां'तला जयंत नाटकाच्या अखेर संन्यास घेतो, तर 'मतिविकारां'तला चकोर तिसऱ्या अंकाच्या दुसऱ्या प्रवेशांतच तापसाचा वेष अंगावर चढवितो. वेणूवरून द्रुमन घेतली आहे. आणि कमलाकर तर हरिहरशास्त्र्याची हुबेहूब नक्कलच आहे. कमलाकरला शेवटीं दरोडेखोर ठार मारतो, तर हरिहरशास्त्री विष घेऊन मरतो. दोघांच्याहि जवळ विषाची सोय सारखीच असते. सनातनी हिंदुसमाजांतील रूढीच्या अन्यायावर नि विषमतेवर 'प्रेमसंन्यासा'मध्यें जयंतानें जे कोरडे ओढलेले आहेत, त्यांतले पुष्कळसे विचार नि युक्तिवाद 'मतिविकारां'तल्या चकोराच्या भाषणांत व्यक्त झालेले आहेत.

त्या काळीं 'विधवा पुनर्विवाहाला' तात्त्विकदृष्ट्या फारसा कोणाचा विरोध नव्हता. पुण्यांत अधूनमधून असे पुनर्विवाह होत. पण अशा दांपत्यांना सर्वसामान्य समाजांत विशेष मान नसे. 'शारदा' नाटकानें जरठकुमारी विवाहांना आळा बसला आणि 'पण लक्षांत कोण घेतो' या कादंबरीनें विधवांच्या वपनाविरुद्ध लोकमत तयार झालें. अशा रीतीनें पांढरपेशा समाजांतल्या अन्यायमूलक आणि अनिष्ट रूढींची हळूहळू पीछेहाट होत चाललेली होती. तथापि, जसजशी लोकजागृति होईल तसतशा ह्या सुधारणा आपोआप होत जातील. त्यासाठीं मुद्दाम कोणी कांहीं प्रचार किंवा प्रयत्न करण्याची आवश्यकता नाहीं असें समाजांतील स्थिरबुद्धीच्या समंजस लोकांना वाटत होतें. विधवाविवाहाच्या प्रश्नावर कोल्हटकरांनीं लिहिलेलें 'मतिविकार' यशस्वी झालें असतें, तर कदाचित् गडकऱ्यांनीं आपल्या पहिल्या नाटकासाठीं तो विषय निवडला नसता. कोल्हटकरांचें 'सहचारिणी' नाटक अपेशी ठरल्यानंतर तशाच तऱ्हेच्या विचारांतून 'भावबंधन' लिहिण्याची प्रेरणा गडकऱ्यांना झाली नाहीं काय? गडकऱ्यांच्या सर्वच नाटकांचें मूळ कोल्हटकरांच्या नाटकांतून आढळतें. 'पुण्यप्रभावा'चें 'प्रेमशोधन' मध्यें आणि 'एकच प्याल्या'चें किंचित्सें 'मूकनायक' मध्यें.

---

'प्रेमसंन्यास' नाटक मी गडकऱ्यांच्या हयातींतच पाहिलें. 'महाराष्ट्र नाटक

मंडळी ' तें करीत असे. त्या प्रयोगांत जयंताचें काम केशवराव दाते ह्यांनीं केलें होतें. कमलाकराचें काम अण्णासाहेब कारखानीसांनीं आणि गोकुळचें काम शिवराम परांजपे ह्यांनीं. दाते ह्यांची काव्य नि कारुण्य ह्यांनीं ओथंबलेली भूमिका मनाला फारच चटका लावीत असे. परांजपे ह्यांचें विनोदी काम अविस्मरणीय होतें. कारखानीस एवढे मोठे कंपनीचे मालक. पण त्यांची कमलाकराची खलनायकाची भूमिका फारच सामान्य होती. ' प्रेमसंन्यास ' ह्या पहिल्याच नाटकानें नाटककार म्हणून गडकऱ्यांना चांगलीच प्रतिष्ठा मिळवून दिली. कारण, हृदयाला पीळ पाडणारा करुणरस, बुद्धीला चकित करणारें कल्पनारम्य काव्य आणि मनाला पराकाष्ठेचा रिझवणारा विनोद ह्यांचा एवढा जबरदस्त समन्वय तोंपर्यंत कोणत्याहि मराठी नाटकांत पहावयाला मिळाला नव्हता. खाडिलकर तर तें नाटक वाचून थक्क झाले. ते गडकऱ्यांना म्हणाले कीं, " चार नाटकांचा मालमसाला तुम्ही एका नाटकांत ठांसून भरलेला आहे. "

तथापि, हें नाटक रंगभूमीवर यशस्वी झालें असें म्हणतां येणार नाहीं. त्या नाटकांतील जयंत, गोकुळ अन् मथुरा एवढीं पात्रें काय तीं लक्षांत राहतात. बाकीचें नाटक केव्हांच काळाच्या पडद्याआड लोपून गेलें आहे. गेल्या चाळीस वर्षांत क्वचितच त्या नाटकाचा प्रयोग कोणी केलेला असेल. आज हें नाटक आहे तसें रंगभूमीवर आलें तर तें पाहवणारहि नाहीं. परंतु, गडकऱ्यांचें पहिलेंच नाटक म्हणून त्याचें विशेष महत्त्व आहे. कारण, ज्या अलौकिक नाट्यगुणांच्या सामर्थ्यावर गडकऱ्यांनीं मराठी नाट्यक्षेत्रांत अढळ स्थान मिळविलें, त्या सर्व नाट्यगुणांचा तेजस्वी उगम ह्या नाटकांत पहावयाला मिळतो. गडकऱ्यांनीं शेक्सपीअर, मोलिअर आणि इब्सेन ह्या पाश्चात्त्य नाटककारांच्या नाटकांचा अभ्यास केलेला होता हें जरी खरें असलें, तरी इब्सेनपेक्षां शेक्सपीअरच्याच नाट्यतंत्राचा त्यांच्या लेखनावर जास्त परिणाम झालेला दिसून येतो. त्यांचे गुरु कोल्हटकर ह्यांच्याहि नाट्यप्रतिभेला शेक्सपीअरचेंच आकर्षण सगळ्यांत जास्त होतें. म्हणून त्यांच्या सामाजिक नाटकांतहि वास्तववादापेक्षां अद्‌भुतरम्यतेचें प्रमाण वाजवी-पेक्षां अधिक स्वरूपांत आढळून येतें. त्यामुळें आज ' प्रेमसंन्यास ' जर आपण वाचूं लागलों तर आधुनिक नाट्यतंत्राच्या दृष्टीनें तें फारच तोकडें पडतें. कथानकाची रचनाहि अतिशय शिथिल वाटते. आणि शक्यतेच्या नि संभवनीयतेच्या दृष्टीनें तर त्यांत जागोजाग अनेक ढोबळ दोष आढळून येतात.

त्या काळांत पुण्यासारख्या शहरामध्यें एकाद्या सुशिक्षित घरांत आधुनिक सुधा-रणेसंबंधीं सर्वसामान्यपणें जे साधकबाधक वादविवाद चालत असत, तसलेंच वातावरण गडकऱ्यांनीं ह्या नाटकाच्या कथानकासाठीं निवडलेलें आहे. बाबासाहेब आणि तात्या-साहेब हे दोघे बंधू. बाबासाहेब जुन्या विचाराचे तर तात्यासाहेब आधुनिक विचाराचे. बाबासाहेबांच्या लीला आणि सुशीला ह्या दोन्ही मुली विधवा. लीला बालविधवा; तर सुशीला वयानें आणि विचारानें तिच्यापेक्षां प्रौढ. समुद्राच्या अपघातांत तिचा पति

नाहींसा झालेला होता. तात्यासाहेबांची मुलगी वीणा ही विलायती वसंतरावांच्या नादानें एकदमच वाहवलेली छचोर मुलगी. वसंतरावांची बहीण द्रमन हीहि एक भोळसर बालविधवा. बाबासाहेबांचा भाचा जयंत हा तर लीलेचा बाळपणापासूनचा मित्र. लहान वयापासूनच उभयतां एकमेकांवर अनुरक्त. पण त्यांचीं तीं स्वप्नें वाऱ्यावरच कुठल्या कुठें विरून गेलीं. जयंताच्या काव्यमय नि स्वप्नाळू स्वभावाशीं विसदृश असलेल्या रुक्ष नि तापट मनोरमेशीं त्याचें लग्न झालें. अन् लीलेचा कोणा तरी अन्य माणसाशीं विवाह होऊन ती बालविधवा झाली. जयंताचा मित्र विद्याधर—हा वस्तुतः सुशीलेचा नवरा गुणाकर असतो. तो समुद्राच्या अपघातांतून वांचलेला असतो. ह्या दहा पात्रांमध्यें विसराळू गोकुळ नि त्याची कजाग अन् कुरूप बायको मथुरा ह्यांची भर पडलेली. आणि सर्वांच्या सुखांत आणि आनंदांत विष कालवण्यासाठीं संभावितपणें त्या घरांत हिंडत असलेला राक्षसी खलपुरुष कमलाकर. असा सारा 'प्रेमसंन्यासा' चा पात्रप्रपंच आहे.

विधवाविवाह हा केवळ एकच प्रश्न ह्या नाटकांत नाहीं. पण त्याच्या जोडीला बालविवाह, विषम विवाह आणि प्रेमविवाह हे प्रश्न देखील गडकऱ्यांनीं ह्या नाटकांत घेतलेले आहेत. पात्रांची काटकसर (economy) गडकऱ्यांच्या कोणत्याहि नाटकांत आढळत नाहीं. तोच दोष याहि नाटकांत दिसून येतो. बाबासाहेब, द्रुमन्, वसंत, वीणा, सुशीला नि विद्याधर ह्या पात्रांची ह्या नाटकाला काडीमात्र जरुरी नाहीं. गडकऱ्यांचीं उपकथानकें नेहमींच सैल आणि अनावश्यक असतात. सुशीला नि विद्याधराचें उपकथानक तसल्याचपैकीं आहे. नाट्यवस्तूच्या विकासाला आणि प्रगतीला त्याची कांहींहि आवश्यकता नाहीं. लीला, जयंत, मनोरमा, कमलाकर, गोकुळ नि मथुरा आणि फार झालें तर तात्यासाहेब ह्या सात पात्रांवर ह्या नाटकाच्या सर्व कथानकाची उभारणी उत्तम तऱ्हेनें करतां आली असती. आणि त्यांतील कारुण्य नि विनोद ह्या दोन प्रधान रसांचा उत्तम रीतीनें आविष्कार करतां आला असता.

—

आतां ह्या नाटकांतल्या खटकणाऱ्या कांहीं गोष्टींचा विचार करूं. लीला ही जयंताची मामेबहीण. दोघांचेंहि बाळपण एकमेकांवर प्रेम करण्यांत गेलें. दोघेंहि एकमेकांना अनुरूप. असें असतांना त्यांचें लग्न कां होऊं शकलें नाहीं ? मामेबहिणीशीं लग्न होतें. बाबासाहेब हे जरी जुन्या विचारांचे असले तरी ते समंजस होते. आपला भाचा आपल्या मुलीला अनुरूप वर घरांतल्या घरांत असतांना त्याला सोडून तिच्यासाठीं त्यांना बाहेरचें स्थळ शोधण्याची कांहीं जरुरी नव्हती. आणि जयंतसारख्या सुशिक्षित आणि भावनाप्रधान तरुणाच्या गळ्यांत तरी त्यांनीं मनोरमेसारखी अशिक्षित आणि वेडगळ बायको कां बांधावी ? सारांश, लीलेचें वैधव्य नि जयंताचा विषमविवाह ह्या दोन्हीहि



एच २७३

गोष्टी नाटकामध्यें ओढूनताणून घुसडलेल्या वाटत ता

विद्याधराचीहि गोष्ट अशीच लंगडी वाटते. सुशीलेशीं त्याचें लग्न लागल्यानंतर लहानशा जहागिरीच्या आशेनें त्याच्या काकांनीं त्याला समुद्रांत ढकलून दिलें. पण एका नाखव्यानें त्याचा प्राण वांचविला. नंतर काकाच्या भयानें नि 'साहेबा' च्या संमतीनें तो उत्तर हिंदुस्थानांत पळाला. ( हा साहेब कोण ? ) तिकडे विद्याभ्यास पुरा करून—म्हणजे वकील होऊन तो परत सुशीलेच्या घरीं आला. इतक्या वर्षांत आपण जिवंत आहांत ही गोष्ट त्यानें सुशीलेला कळवूं नये आणि तिला वैधव्याच्या आगींत होरपळत ठेवावें हें अमानुष वाटतें. बरें, इतक्या वर्षांनीं जो सुशीलेच्या घरीं परत आला तो जयंताचा मित्र म्हणून. जयंताची व त्याची मैत्री कशी झाली ? बरें, झाली असेल कशी तरी. पण जयंतानें त्याला ओळखलें कसें नाहीं ? त्याच्या लग्नांत जयंत हजर असलाच पाहिजे. जयंतानें नाहीं ओळखलें तर नाहीं, पण निदान सुशीलेच्या मनाची तरी त्याला बघून कांहीं तरी चलबिचल व्हावयाला पाहिजे होती. पण पहिल्यानें त्याला बघून ती किंवा तिला बघून तो अक्षरसुद्धां उच्चारीत नाहींत. किंबहुना दुमनलाच बघून विद्याधर तिची प्रथम चौकशी करतो, 'बरें, या कोण ?' तेंच त्याचें ह्या नाटकांतलें पहिलें वाक्य. सुशीलेच्या पुनर्विवाहाचें ऐकून जेव्हां विद्याधर विचारतो, 'काय सुशीलाबाईच्या पुनर्विवाहाचें घाटत आहे ?' तेव्हां 'हा एक घटकेचा पाहुणा हें ऐकून इतका कां बरें गांगरून गेला ? घटकेच्या स्नेहाच्या मानानें ही चलबिचल अंमळ फाजीलच म्हणायची !' या कमलाकराच्या स्वगत उद्‌गारावरून विद्याधराचें सुशीलेकडे लक्ष असावें असा प्रेक्षकांना ओझरता संशय येतो.

दुसऱ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत रात्रीच्या वेळीं विद्याधर सुशीलेच्या खोलींत चोरून शिरतो. तेव्हां 'परमेश्वरा, या साहसांत मला यश देऊं नकोस !' असें सुरुवातीला तो उद्‌गारतो. ते उद्‌गार सूचक असले तरी त्यांनीं प्रेक्षकांना काय बोध होणार ? ते उलट बुचकळ्यांतच पडतात. ती जागी झाल्यावर विद्याधर तिला पुनर्विवाहाची मागणी घालतो. तिला ती नकार देते. तेव्हां ' 'पुनर्विवाह नको तर निदान गुप्तपणें माझा स्वीकार कर !' असें तो तिला सुचवितो. तेव्हां 'माझ्या बाल-पतिराजाच्या हक्काचा अभिलाष करणाऱ्या राक्षसा, चल नीघ येथून' असें ती त्याला संतापून सांगते. विद्याधरला जर आपल्या पत्नीच्या शीलाचीच परीक्षा करावयाची होती, तर तिचे ते उद्‌गार ऐकून त्यानें आपल्या स्वगत भाषणांत तरी तिला धन्यवाद द्याव-याला हवे होते. म्हणजे तो तिचा पति आहे अशी सूचना प्रेक्षकांना मिळाली असती. तिसऱ्या अंकांत दरोडेखोर सुशीलेला पळवून नेत असतां विद्याधर त्यांच्या हातून तिला वांचवितो. तेव्हां 'प्राणांच्या मोबदल्यांत माझ्या पातिव्रत्याची अपेक्षा करतां ?' असें म्हणून सुशीला त्याला झिडकारते. तेव्हां 'शाबास, सुशीले, अशा प्रसंगीं सुद्धां आपल्या कर्तव्याला तूं विसरत नाहींस !' असें विद्याधर स्वगत म्हणतो. पण त्यावरून

उभयतांच्या पूर्वसंबंधाचा कांहींहि बोध होत नाहीं. सगळ्यांत आश्चर्याची गोष्ट ही कीं, पांचव्या अंकांत तुरुंगांत जयंताला फांशी द्यावयाच्या ठिकाणीं स्थळकाळाचा विचार न करतां विद्याधर आपण सुशीलेचे पति 'गुणाकर' आहोंत असा रहस्यस्फोट प्रथम तिच्याजवळ करतो. आपल्या हातावरच्या 'डागा' ची खूणहि तिला तो पटवून देतो. तेव्हां सुशीलेला त्याची एकदम ओळख पटते आणि ती त्याला आलिंगन देते. आपल्याला इतके दिवस कां फसविलें असें सुशीला त्याला विचारते, तेव्हां 'तुमच्या घरीं चालणाऱ्या फाजील सुधारणेचा किती परिणाम तुझ्यावर झाला आहे, त्याची परीक्षा पाहिल्यावांचून मला स्वीकार करवेना!' असा तो खुलासा करतो. मृत पतीचें स्मरण करीत विधवेनें जन्मभर त्याच्याशीं एकनिष्ठेनें राहिलें पाहिजे हें मत मांडण्यासाठीं का गडकऱ्यांनीं सुशीलेचें पात्र रंगविलें आहे? तसें असेल, तर पुनर्विवाहाचें समर्थन करण्यासाठीं लिहिलेल्या नाटकांत ह्या पात्राला किंवा ह्या विचाराला सुतराम् स्थान मिळूं शकत नाहीं.

—

'पुण्यप्रभावां' तला वृंदावन आणि 'भावबंधन'मधला घनश्याम हे गडकऱ्यांचे दोन खलनायक चांगलेच गाजलेले आहेत. त्या मानानें 'प्रेमसंन्यास' मधला कमलाकर हा त्यांचा खलपुरुष फारच ढोबळ आणि प्राथमिक वाटतो. त्याच्या दुष्टपणाला कांहीं कारणच नसतें. 'माझ्या विषारी श्वासानें फुलें कोमेजून जातील, ज्वालामय दृष्टीनें तारका जळून त्यांचा काळोखाचा कोळसा होईल' असें तो मोठ्या अभिमानानें सांगतो. निसर्गाकडे आणि पुराणाकडे तो अत्यंत विकृत दृष्टीनें पहात असतो. जगांत कोणतीहि गोष्ट त्याला चांगली म्हणून दिसत नाहीं. पापपुण्याच्या कल्पना त्याला मान्य नसतात. ईश्वराला तो ओळखत नाहीं. ह्या नाटकांतल्या प्रत्येक स्त्रीबद्दल त्याला पापी अभिलाषा वाटत असते.

लीलेच्या पाठीमागें तर तो हात धुऊन लागलेला असतोच. शेवटीं ती आपल्याला मिळत नाहीं असें महातांच तिला तो विष देऊन ठार मारतो. विषाची पुडी जणू कांहीं त्याच्या खिशांत कायमची ठेवलेलीच असते. सुशीलेला दरोडेखोराकडून पळवून नेऊन भ्रष्ट करण्याचें कारस्थान तो रचतो; दुमनशीं त्याचा अनैतिक संबंध असतो; त्यापासून तिला मूल होतें. तें ती ठार मारते. तरी देखील ती पुन्हां कमलाकराच्या कचाट्यांत सांपडतेच. कमलाकरानें आपला नाश केला हें माहीत असूनहि दुमन दुसऱ्यांदां त्याच्या तावडींत कशी सांपडते हें एक न उलगडणारें कोडें आहे. कमलाकराच्या बंदींत असतांना दुमन आत्महत्या करते. तिचें प्रेत बघून त्याचें चुंबन घेण्याचा सुद्धां त्याला मोह होतो. जयंताची बायको मनोरमा हिला थाप मारून कमलाकर तिला आगगाडींतून मुंबईला घेऊन जात असतां, खंडाळ्याच्या घाटांत तिच्यावर बलात्कार

करण्याचा प्रयत्न करूं लागतो. तेव्हां ती डब्यांतून खालीं पुलावर उडी मारते. एका नाटकामधल्या चार स्त्रियांशीं संबंध जोडूं पहाणारा कमलाकरासारखा भयंकर खलनायक क्वचित्च कोणत्याहि नाटकांत आढळून येईल.

जयंताला खुनाच्या खटल्यांत अडकविठांना कमलाकरानें जें कारस्थान रचलेलें आहे त्यांत शक्याशक्यतेचा सर्व विचार शिंक्यावर टांगून गडकऱ्यांनीं अद्भुतरम्यतेचा अगदीं कळस केलेला आहे. तेव्हां तो किस्सा विस्तारानें सांगतों. द्रुमनचे दिवस भरत आलेले असतात. अगदीं सातवा आठवा महिना लागला असतो तरी ती गोष्ट तिच्या जवळ वावरणाऱ्या कोणाहि माणसाच्या ध्यानांत येत नाहीं. फक्त गोकुळची बायको मथुरा हिला ' द्रुमनला कांहीं दिवस गेल्याचा ' संशय असतो. पुढें द्रुमनशीं पुनर्विवाह करण्याची थाप मारून कमलाकर तिला घराबाहेर काढतो. एकाच आगगाडीमध्यें मनोरमेला नि द्रुमनला निरनिराळ्या डब्यांत बसवून तो पळवून नेतो. मनोरमेवर बलात्कार करण्याचा प्रयत्न करतो. ती डब्याबाहेर उडी मारते. तेव्हां कमलाकर तिची पेटी—कारण त्या पेटीचा त्याला पुढें उपयोग करावयाचा असतो—घेऊन आणि द्रुमनला तशीच गाडींत सोडून परत येतो.

द्रुमन घाटपायथ्याच्या दवाखान्यांत जाऊन बाळंत होते. आणि आपलें मूल मारून टाकते. इकडे मनोरमेचें काय झालें तें पहा. पुलावर आगगाडी उभी असतांना ती डब्यांतून बाहेर उडी घेते. पण पुलावरून खालीं न पडतां पुलाच्या तारांतच अडकून रहाते. थोड्या वेळानें कामावरचे लोक येऊन तिला काढतात. आणि घाटपायथ्याच्या दवाखान्यांत आणून पोहोंचवतात. तसें मनोरमेला कांहीं मुळींच लागलेलें नसतें. तिची अन् द्रुमनची तेथें गांठ पडते. त्यांच्या चांगल्या गप्पागोष्टी होतात. आपल्याला फसवणारा राक्षस कमलाकरच आहे हें एकमेकांशीं बोलतांना दोघींच्या लक्षांत येतें. त्यानंतर कमलाकराच्या कचाट्यांत पुन्हां सांपडण्यासाठीं द्रुमन निघून जाते. पुढें पहावें तर मनोरमा मरणोन्मुख अवस्थेंत पडलेली आहे असें दिसतें. आणि ती लागलीच मरण पावते.

मनोरमा जर तारेवर पडली, कामावरच्या लोकांनी तिला दवाखान्यांत आणून पोहोंचवली, द्रुमनशीं ती चांगली बोलली चालली, त्यावेळीं तर तिची प्रकृति उत्तमच होती, तशी तिच्या शरीराला कांहींच दुखापत झाली नव्हती, मग तिला एकदम तडकाफडकीं मरायला काय झालें ? त्याचें कारण पुढें सांगतों. मात्र मरण्यापूर्वी विद्याधराची नि मनोरमेची गांठ पडते. ती मेल्यानंतर तो तिच्या मृत्यूचा दाखला पोलिसाकडून घेतो. विद्याधर तेथें येतो कसा नि तो तिच्या मृत्यूचा दाखला घेतो कशासाठीं ? तेंहि पुढेंच सांगतों.

' भूतमहाल ' नांवाचें एक अजब मकाण आपलीं सारीं कृष्णकृत्यें करण्यासाठीं कमलाकरानें गांवाबाहेर घेतलेलें असतें. तेथें द्रुमनला तो कैदेंत ठेवतो. आणि तेथेंच ती

आत्महत्या करते, पण मरण्यापूर्वी ती एक पत्र लिहून ठेवते. पत्र लिहिण्यासाठीं द्रुमन त्या भूतमहालांत शाई, लेखणी नि कागद कोठून आणते कोणास ठाऊक ? तें पत्र तिच्या मेलेल्या हातांत असतें. कमलाकराला तें पत्र सांपडतें. वस्तुतः तें पत्र त्यानें त्याच वेळीं फाडून टाकायचें. पण तसें न करतां तें तो आपल्या पैशाच्या पाकिटांत ठेवून देतो. कथासाठीं तें पहा पुढें. द्रुमनच्या प्रेताचे तुकडे करून ते तो मनोरमेच्या पेटींत भरतो. तिचें मुंडकें निराळें कापून तें तो आपल्या हातांत घेतो. आणि रात्रीच्या वेळीं दरोडे-खोराकरवीं ती पेटी आणून तो जयंत जेथें रहातो त्या बाबासाहेबांच्या घराच्या मागें असलेल्या विहिरीजवळ ठेवून देतो. त्या कामगिरीबद्दल कमलाकर दरोडेखोराला आपल्या पैशाच्या पाकिटांतून शंभर रुपयांची नोट बक्षिस देतो. पण नोटेच्या ऐवजी तो चुकून द्रुमनचें पत्र त्याला देतो. त्या पेटीवर कमलाकर नंतर मुंडकें ठेवतो. त्याच वेळीं नि त्याच ठिकाणीं जयंत आणि लीला ह्यांची भेट होण्याची व्यवस्था कमलाकरानें केलेली असते. त्याप्रमाणें जयंत येतो. त्यावेळीं कमलाकर विहिरींत एक धोंडा टाकतो. जयंतला वाटतें कीं अंधारांतून येतां येतां लीला विहिरींत पडली असावी. तेव्हां तो विहिरीजवळ जातो, तोंच त्याला ती पेटी लागते अन् त्यावर द्रुमनचें केसाळ मुंडकें त्याच्या हातांत येतें. त्याच वेळीं शिपाई तेथें येतात. कारण कमलाकरानें दरोडेखोराला पोलीस पाठवून द्यावयास सांगितलेलें असतें. एवढ्यांत वीज चमकते. मुंडकें स्पष्टपणें दिसतें. आणि खुनाच्या आरोपावरून पोलीस जयंताला पकडतात ! वाचकहो, वास्तववादी सामाजिक नाटकांत इतक्या पराकाष्ठेच्या अशक्य आणि असंभवनीय गोष्टी खच्चून कोंबलेल्या तुम्ही कधीं पाहिल्या आहेत काय ? पण हें तर कांहींच नाहीं. पुढें बघा.

बाबासाहेबांच्या घरामध्यें फार भानगडी चालल्या आहेत म्हणून विद्याधर तें घर सोडतो आणि कमलाकराच्या सल्ल्यानुसार तो 'भूतमहाल'मध्यें रहावयाला येतो. भूतमहालमध्यें 'बोर्डिंग लॉजिंग'ची काय व्यवस्था होती तें भूतनाथ श्रीशंकरच जाणे. विद्याधर तेथें रहात असतांना, ज्या दरोडेखोरानें कमलाकराच्या सांगण्यावरून प्रेताची पेटी बाबासाहेबांच्या घराच्या बागेंत त्या रात्रीं ठेवली होती, तो एक दिवस आला. आणि विद्याधर हाच कमलाकर आहे असें समजून त्याला म्हणाला, "साहेब, त्या रात्रीं तुम्ही मला शंभराची नोट द्यावयाच्या ऐवजीं हें पत्र दिलें." विद्याधर तें पत्र वाचून पहातो तों तें द्रुमननें मरण्यापूर्वी लिहिलेलें पत्र होतें, जें कमलाकरानें आपल्या पैशाच्या पाकिटांत ठेवलेलें होतें. तें वाचल्यावर विद्याधराच्या आनंदाला पारावारच राहिला नाहीं. तो त्या आनंदाच्या भरांत त्या दरोडेखोराला शंभराच्या दोन नोटा देतो. आतां गंमत ही बघा कीं, कमलाकर अन् दरोडेखोर ह्यांची एवढी जानपछान असतांना, तो विद्याधरालाच कमलाकर कसा काय समजतो ? बरें, शंभराच्या नोटा कमलाकरानें

जशा हाताळल्या होत्या, तशा त्या दरोडेखोरानें सुद्धां हाताळल्या असतील. असें असतां द्रुमननें लिहिलेलें साध्या विसविशीत कागदावरचें पत्र शंभराची नोट म्हणून अमावास्येच्या काळ्या अंधारांत सुद्धां तो दरोडेखोर पत्करणें शक्य नव्हतें.

बरें, तें राहू द्या. द्रुमननें त्या पत्रांत काय लिहिलें होतें तें पहा. विद्याधर म्हणतो, " अहाहा, परमेश्वरा, तूं निरपराधाचा खरा साह्यकारी आहेस. ह्या कागदाच्या सहाय्यानें जयंत एका क्षणांत दोषमुक्त होईल. द्रुमननें आत्महत्या केली. तिचें प्रेत कमलाकरानें पेटींत भरून त्या विहिरीवर नेलें. लीलेला भेटण्यासाठीं आलेला जयंत आयताच या हरामखोराच्या जाळ्यांत सांपडला. आणि मनोरमा घाटपायथ्याच्या दवाखान्यांत मरत पडली आहे. द्रुमननें स्पष्ट लिहून ठेवलें आहे सारें. द्रुमन, मरतां मरतां केवढा उपकार करून गेलीस ! " विद्याधराचे हे उद्गार ऐकून हंसावें का रडावें हें कळत नाहीं. आपण आत्महत्या करतों आहोंत येथपर्यंत द्रुमनच्या पत्रांतला मजकूर ठीक आहे. पण आपण मेल्यानंतर आपलें प्रेत कमलाकर ( मनोरमेच्या ) पेटींत भरून विहिरीवर नेणार आणि लीलेला भेटण्यासाठीं आलेला जयंत त्या खुनाच्या जाळ्यांत अडकणार हा मजकूर मरण्यापूर्वी आपल्या पत्रांत लिहावयाला द्रुमन ही काय त्रिकालदर्शी भविष्यवादिनी होती ? आणि मनोरमा मरत पडली आहे हें तरी द्रुमनला काय माहीत ? त्यांची गांठ पडली तेव्हां तर तिची प्रकृति चांगलीच होती.

तें पत्र वाचून विद्याधर घाईघाईनें मनोरमा ज्या दवाखान्यांत आजारी आहे तेथें जातो. वस्तुतः जयंतवर खुनाचा खटला चालू असतांना आणि त्यांत आरोपीतर्फे विद्याधर हा एक वकील असतांना मध्येंच तो खटला सोडून विद्याधरनें जाणें योग्य नव्हतें. पण मनोरमा केव्हां मरेल तें माहीत नसल्यानें त्याला तांतडीनें जाणें मुळीं भागच पडलें. पण जाण्यापूर्वी खटल्याची दहा दिवस तहकुबी मागण्यासाठीं त्यानें तात्यासाहेबांना तार पाठविली. ती कमलाकरानें मधल्यामध्येंच दाबून टाकली. वस्तुतः, विद्याधर वकील होता. तहकुबीची तार सरळ कोर्टाकडे करण्याऐवजीं ती तात्यासाहेबांना करण्याचें त्याला कारणच काय मुळीं ? त्याचा परिणाम असा झाला कीं मनोरमेच्या मृत्यूचा दाखला घेऊन तो परत येण्यापूर्वी जयंतला फांशीची शिक्षा होऊन तुरुंगांत तिची अंमलबजावणीहि चाललेली होती. म्हणून विद्याधराला तो दाखला घेऊन धांवत धांवत परस्पर तुरुंगांत जावें लागलें.

गडकऱ्यांचें फौजदारी कायद्याचें नि कोर्टाच्या एकंदर कारभाराचें ज्ञानहि फारच तुटपुंजें होतें. त्यामुळें ' प्रेमसंन्यास ' नाटकांत त्यांच्या हातून कायद्याच्या ढोबळ चुका झालेल्या आहेत. द्रुमनच्या प्रेताचे तुकडे मनोरमेच्या पेटींत कमलाकरानें भरले. त्या पेटींत मनोरमेचे कांहीं दागिने नि कागदपत्रें होतीं. अंधारांत पेटीच्या वर द्रुमनचें मुंडकें ठेवलें होतें. जयंतच्या तें चुकून हाताला लागलें. एवढ्यांत पोलीस आले नि वीज चमकली. यावरून मनोरमेचा खून जयंतनें केला हें कसें काय सिद्ध होतें ? न्यायाधीश

निकाल देतांना म्हणतात कीं प्रेताचे तुकडे विहिरींत टाकतांना शिपायांनीं जयंतला पुराव्यानिशीं पकडलें. साफ खोटी गोष्ट होती ही. जयंतनें पेटी देखील उघडली नव्हती. वर ठेवलेल्या मुंडक्याला नुसता हात लावला होता. त्याचप्रमाणें न्यायाधीश पुढें म्हणतात कीं लीला नि सुशीला ह्यांच्या साक्षीवरून तें प्रेत मनोरमेचें होतें असें सिद्ध झालें.

द्रुमनचें मुंडकें किंवा पेटींतले तिच्या प्रेताचे तुकडे पाहून तें प्रेत मनोरमेचें होतें अशी साक्ष द्यावयाला लीला–सुशीला ह्यांना काय वेड लागलें होतें ? द्रुमन आणि मनोरमा ह्या काय जुळ्या बहिणी होत्या ? कीं एकींचें प्रेत दुसरीसारखें दिसणें शक्य होतें ? बरें, समजा, तें प्रेत मनोरमेचें आहे अशी लीला–सुशीला ह्यांची खात्री झालेली असली, तरी त्या जयंताच्या विरुद्ध साक्षी देणें हें कालत्रयीं तरी शक्य होतें काय ? त्या काय सरकार पक्षाच्या साक्षीदार होत्या ? त्यांनीं सरळ सांगितलें असतें कीं, "हें प्रेत कोणाचें आहे हें आम्हांला मुळींच माहीत नाहीं !" कमलाकर तर बोलून चालून खलपुरुष. लीलेच्या दोस्तीवरून जयंताचा नि मनोरमेचा तंटा झाला अशी आरोपी पक्षातर्फे त्यांनीं विरुद्ध साक्ष द्यावी, हें त्याच्या हलकटपणाला शोभण्यासारखें होतें. आम्हांला आश्चर्य वाटतें तें हें कीं आरोपीचे साक्षीदार त्याच्याविरुद्ध उघड उघड अशा साक्षी देत असतांना आरोपीचे वकील काय करीत होते ? साक्षीदार उलटले म्हणून त्यांनीं त्यांच्या साक्षी तेथल्या तेथें रद्द करून घ्यावयाला हव्या होत्या. पण तें कांहीं त्यांनीं केलें नाहीं. जयंताला फांशीवर चढवण्याला न्यायदेवतेपेक्षां स्वतः गडकरीच जास्त उत्सुक होते.

आणि आरोपी जयंताच्या बाजूनें सर्वांत शेवटची साक्ष गोकुळची. गोकुळसारख्या मूर्ख, अजागळ आणि बिसराळू माणसाची साक्ष काय म्हणून काढण्यांत आली ? लीलेच्या नांवानें बनावट पत्र कमलाकरानें जयंताला उद्देशून लिहिलें नि तें गोकुळकडून त्याला पोहोंचविण्याची व्यवस्था केली, तें सिद्ध करण्यासाठीं ? पण त्यांची काय जरुरी होती ? लीलेच्या साक्षींतच तें पत्र आपण लिहिलेलें नाहीं हें सिद्ध करून घेतां आलें असतें. आणि लीलेचें अक्षर जयंत काय ओळखत नव्हता ? तिचें बनावट पत्र वाचून तिची शेवटची भेट घ्यावयाला जयंत रात्रीच्या वेळीं बागेमधल्या विहिरीजवळ आला कसा हें एक निरालेंच कोडें आहे. खुनाच्या आरोपावरून जयंत फांशी जातो आहे, का काळ्या पाण्यावर जातो आहे अशी गंभीर परिस्थिति असतांना केवळ 'दरखास्त, कैफियत, जप्ती, मुकद्दमा, हुकूमनामा, फैसला' ह्या शब्दांवर विनोद निर्माण करून हंशा पिकवितां यावा म्हणून कोर्टाच्या शेवटच्या दृश्यांत गडकऱ्यांनीं गोकुळसारख्या विनोदी पात्राची योजना करावी ही गोष्ट अत्यंत अमानुष आहे. प्रेक्षकांच्या काळजांना पीळ पडत असतांना, त्यांना 'खो–खो' हंसविण्याचा प्रयत्न करणें ही नाट्यनीतीची शुद्ध विटंबना आहे.

बरें चल, आतां पुढें जाऊ. जयंतला फांशीची शिक्षा झाल्यानंतर त्याला काय चारदोन दिवसांच्या आंत फांसावर चढवणें शक्य होतें काय ? फांशीच्या शिक्षेविरुद्ध कांहीं अपील बिपील ? त्याला चारसहा महिने तरी लागणार ? पुढें गव्हर्नरकडे दयेचा अर्ज ? त्यालाहि निदान तेवढीच मुदत ! म्हणजे कोर्टानें फांशीची शिक्षा दिल्यापासून तो आरोपी प्रत्यक्ष फांशी जावयाला निदान वर्षाची तरी मुदत लागते. पण गडकऱ्यांना त्याची काय परवा ? त्यांना नाटक संपवायचें होतें ना ! वर्षभर वाट पहावयाला त्यांना कुठं धीर होता ?

आतां आपण फांशीच्या देखाव्याकडे जाऊं ! त्या ठिकाणीं जयंताचें फांशीचें दृश्य पहाण्यासाठीं जयंताचे सारेच आप्त--लीला, सुशीला, तात्यासाहेब अन् कमलाकर जमलेले होते. फांशीची शिक्षा म्हणजे सर्वांनीं पहावयाचें नाटक असतें ? आणि सगळ्यांत गंमत म्हणजे ज्यानें जयंताला फांशीची शिक्षा दिलेली होती, ते न्यायाधीशहि आपण दिलेल्या शिक्षेची अंमलबजावणी कशी काय होते आहे, हें ' सुपरव्हाईज ' करावयाला स्वतः जातीनें त्या ठिकाणीं हजर होते. तुरुंगांत फांशीची शिक्षा कशी देतात ह्याची सामान्य माहिती सुद्धां गडकऱ्यांना असूं नये ह्याचें आश्चर्य वाटतें. फांशी जाण्यापूर्वी लीला--जयंत हे एकमेकांच्या गळ्यांना मिठ्या मारून प्रेमाचीं भाषणें करीत असतात, तेव्हां दुष्ट कमलाकराला तें पाहवत नाहीं. म्हणून तो तात्यासाहेबांना सुचवितो, " थांबवा हें आतां, सरकारी माणसांची खोटी करणें गुन्हा होईल ! " म्हणजे सरकारी माणसें त्या ठिकाणीं प्रत्यक्ष हजर असतांना त्यांना आपल्या ' कामाची खोटी ' झाली असें वाटत नाहीं, तें कमलाकराला वाटावें म्हणजे कमाल आहे कीं नाहीं !

जयंत फांसाच्या फलाटावर चढतो, तोंच विद्याधर धांवत धांवत त्या स्थळीं येतो. त्याला तुरुंगामधल्या फांशीच्या आवारांत कोणी सोडलें हें फक्त गडकरीच जाणे. तेथें येतांक्षणींच मनोरमा जिवंत असल्याचे दोन दाखले तो न्यायाधीशांच्या हातीं देतो नि ' मित्रा जयंता, खालीं ये तूं ! ' अशी न्यायाधीशाच्या अधिकारावर आक्रमण करून तो फांशीच्या फलाटांतून उतरण्याची जयंताला बेधडक आज्ञा करतो. मनोरमेचा खून झालेला नसून ती ' काल एका भलत्याच गांवीं वारली ' याबद्दलचे दोन दाखले आणि मरण्यापूर्वी द्रुमननें लिहिलेलें पत्र विद्याधर न्यायाधीशाला दाखवतो. तेव्हां न्यायाधीशाची खात्री होते कीं ' जयंत निर्दोष आहे ! ' म्हणून. कायदेशीर पुरावा कसा दाखल करून घ्यायचा ह्याचा परिक्रम ( Procedure ) Evidence Act नें सांगून ठेवला आहे. त्याचा ह्या ठिकाणीं सपशेल मुडदाच पाडण्यांत आलेला आहे. जयंताची फांशीची शिक्षा तीन चिठोऱ्यांच्या आधारावर तहकूब करून जामिनावर सोडवण्यासाठीं स्वतः न्यायाधीश त्याला सरन्यायाधीशांच्या कचेरींत घेऊन जातो. जणुं कांहीं जयंताच्या वकिलापेक्षांहि त्याला जामिनावर सोडण्याबाबत न्यायाधीशालाच बेट्याला जास्त उत्साह वाटत होता.

फांशींतून जयंताची मुक्तता होणार असा रंग दिसतांच कमलाकर तेथून पसार झाला. त्याला पुढचें सारें चित्र दिसलें. मनोरमा मेल्यानें आतां जयंताला लीलेबरोबर पुनर्विवाह करावयाला कांहींच आडकाठी राहिली नव्हती. ( तेवढ्यासाठींच तर मनोरमेला कसलीहि दुखापत झालेली नसतांना लेखकानें मारून मुटकून मरावयाला लावलें होतें. ) बाबासाहेबांनींहि आतां लीलेच्या पुनर्विवाहाला परवानगी दिलेली होती. तेव्हां लीला–जयंताचा पुनर्विवाह होणार. सुशीला–विद्याधराचें तर पुनर्मीलन झालेंच होतें. सर्व सुखी होणार, अन् द्रुमनच्या आत्महत्येबद्दल आपल्याला मात्र तुरुंगांत जावें लागणार, हेंहि कमलाकराला कळून चुकलें होतें. म्हणून जयंतावर सूड उगवण्यासाठीं लीलेला ठार मारण्याच्या हेतूनें तो घाईघाईनें तिच्या घरीं येतो.

तोंच जयंत मरण पावल्याच्या समजुतीनें लीला आत्महत्या करण्याच्या मानसिक अवस्थेंत आहे असें पाहून कमलाकर तिला विष देतो. जयंत मोठ्या आशेनें नि आनंदानें फुलांची माळ घेऊन लीलेला भेटावयाला येतो तोंच लीलेनें विष घेतल्याचें त्याला कळतें. ' लीलाशून्य जगांत मी कसा राहूं ? ' असें म्हणून तोहि आत्महत्या करूं पहातो, पण ' माझी करुण कथा सर्व जगाला सांगा. माझ्यासारख्या हजारों बालविधवा हृदयांत मेलेल्या आशेच्या समाधीवर अश्रूंचीं फुलें वहात असतील त्यांचा उद्धार करा ' असें लीला, त्याला सांगते. तिचा तो आदेश शिरोधार्य मानून जयंत ' प्रेमसंन्यासी ' होतो नि तिच्या आदेशानुसार आपलें उर्वरित आयुष्य घालवतो. लीलेवर विषप्रयोग केल्यानंतर कमलाकर भूतमहालांत जातो. तेथें दरोडेखोराची नि त्याची गांठ पडते. कमलाकरामुळें आपण कांहीं तरी संकटांत सांपडणार आहोंत ह्याची कल्पना येतांच,' दरोडेखोर त्याचा गळा दाबून प्राण घेतो. कमलाकराचीं दुष्कृत्यें जशीं भयानक तसें त्याचें मरणहि पण भयंकरच !

' प्रेमसंन्यास ' नाटक सुखान्त दाखविलें असतें तर तें कांहीं कमी परिणामकारक झालें असतें असें वाटत नाहीं. पण त्या वेळच्या सनातनी वातावरणांत रंगभूमीवर राजरोसपणें विधवाविवाह होतो आहे आणि आनंदीआनंदांत नाटक समाप्त होतें आहे असें दाखविल्यानें, त्याला विरोध होईल, आपल्यावर टीकेचा भडिमार होईल अशा भयानें गडकऱ्यांनीं त्या नाटकाचा शेवट ओढूनताणून शोकान्त केलेला आहे. नाटकाचें पर्यवसान हें त्याच्या कथानकांतून अपरिहार्यपणें निर्माण व्हावयाला हवें. जयंताशीं पुनर्विवाह करणें आपल्याला सर्वस्वीं अशक्य आहे ह्या जाणीवेनें लीलेनें आत्महत्या केली असती तर तो शोकान्त समजण्यासारखा होता. किंवा जयंत फांसावर चढतो आहे नि लीला तेथून निघून जाते आहे एवढेंच तें दृश्य दाखवून पुढें लीला घरीं येऊन आत्महत्या करणार तोंच विद्याधर जयंताला सोडवून तेथें घेऊन येतो नि

उभयतांचें पुनर्मीलन घडतें, अशी जर त्या नाटकाला सुखदायी कलाटणी दिली असती तर नाटक फारच परिणामकारक झालें असतें. जयंत येण्यापूर्वीच कमलाकरानें लीलेला विष देऊन तिचा घाईघाईनें मृत्यू घडवून आणणें, कमलाकराला दरोडेखोरानें मारणें, आणि शेवटीं स्मशानांत लीलेच्या जळत्या चितेसमोर हृदयभेदक शब्दांत जयंतानें आपल्या भावना प्रकट करणें हीं तिन्ही दृश्यें नाट्याच्या दृष्टीनें परिणामकारक वाटत असलीं तरी कलेच्या दृष्टीनें फारच ढोबळ वाटतात.

वस्तुतः, विधवाविवाहासारख्या सामाजिक आणि वास्तववादी नाटकांत एवढ्या अद्‌भुत, चमत्कारिक अन् असंभाव्य गोष्टी एकत्रित करण्याचें लेखकाला मुळींच कारण नव्हतें. पण कोल्हटकरांच्या अद्‌भुतरम्यतेच्या वेडानें गडकऱ्यांनाहि चांगलेंच झपाटलेलें होतें. आणि त्या वेळच्या प्रेक्षकांनाहि रंगभूमीवर अशा गोष्टी पहाण्याची संवय झाली होती. प्रत्येक असंभाव्य नि चमत्कारिक गोष्ट म्हणजेच नाटक असा त्यांनीं आपल्या मनाशीं ठोकताळा बांधून ठेवला होता. कथानकाच्या नि रचनेच्या दृष्टीनें एवढे दोष असूनहि ह्या नाटकानें प्रेक्षकांच्या मनाची त्यावेळीं कां पकड घेतली ? ह्याचें कारण करुणरसाचा आणि हास्यरसाचा परिपोष करण्याचें गडकऱ्यांच्या काव्यमय भाषेचें जबरदस्त सामर्थ्य हेंच होय.

रंगभूमीवर असलें काव्य नि असला विनोद ऐकण्याची प्रेक्षकांना तोंपर्यंत संवय नव्हती. त्यामुळें आकाशांत उडणाऱ्या एकेका अग्निबाणाप्रमाणें गडकऱ्यांच्या नाट्य-प्रतिभेतून उचंबळणाऱ्या त्यांच्या कल्पना आणि उत्प्रेक्षा पाहून प्रेक्षकांचीं मनें दिपून गेलीं आणि हा कोणी तरी विलक्षण प्रतिभेचा नाटककार मराठी रंगभूमीवर अवतरला आहे असा त्यांना साक्षात्कार झाला. आपल्या घराच्या बागेंत पहांटेच्या वेळीं लीला-जयंत बोलत बसले आहेत हा दुसऱ्या अंकांतला पांचवा प्रवेश, जयंत कारागृहांत असतांना लीलेनें त्याला पाठवलेलें आपल्या अश्रूंनीं लिहिलेलें कोरें पत्र तो वाचीत आहे हा चवथ्या अंकांतला पांचवा प्रवेश आणि लीलेच्या चितेसमोर जयंत शोक करतो आहे हा पांचव्या अंकांतला पांचवा प्रवेश, हे तीन प्रवेश म्हणजे गडकऱ्यांच्या भाषावैभवाचे नि कविकल्पनांचे देदीप्यमान उच्चांक आहेत! महाराष्ट्राला मंत्रमुग्ध करणाऱ्या गडकऱ्यांच्या वैशिष्टयपूर्ण भाषाशैलीचें पहिलें दर्शन ह्याच प्रवेशांत प्रथम होतें. त्यामुळें ते प्रवेश नि त्यांतलीं भाषणें वाजवीपेक्षां दीर्घ असलीं तरी तीं ऐकतांना प्रेक्षकांच्या अंतःकरणांत रसाचा नि भावनांचा असा कांहीं कल्लोळ उडतो कीं ते आपलें देहभान विसरून जातात. ह्यांतच गडकऱ्यांच्या नाटकाचें यश आहे.

'प्रेमसंन्यास' च्या लोकप्रियतेचें दुसरें कारण म्हणजे त्यांतला विनोद. गड-कऱ्यांनीं गोकुळ हा विनोदाचा एक निराळाच नमुना ह्या नाटकांत निर्माण केलेला

आहे. इतका निर्मळ आणि निरागस विनोद त्यापूर्वी मराठी रंगभूमीवर आलेला नव्हता. कजाग आणि भांडकुदळ बायकोमुळें त्याच्या स्वभावांत निर्माण झालेला विसरभोळेपणा अगदीं साहजिकच वाटतो. आणि त्या विसरभोळेपणाला सनातनी विचाराची जोड दिल्यानें तर त्याच्या विनोदाची लज्जत आणखीनच वाढते. 'आपल्याला कोणी महार म्हटलेलें चालेल, पण सुधारक म्हटलेलं नाहीं खपायचें!' हा त्यांच्या वर्णाश्रमधर्माचा जाज्वल्य अभिमान पाहून उद्धारक आणि सुधारक दोघेहि पोट धरधरून हंसतील. प्रारंभीं 'भीमरूपी महारुद्रा वज्र हनुमान मारुती' असें मारुतीचें स्तोत्र म्हणत मथुरेपुढें लोटांगण घालणारा गोकुळ, ती बापाच्या घरून कानपिचक्या खाऊन आणि सुतासारखी सरळ होऊन परत आल्यानंतर जेव्हां अखेर आपला कायद्याच्या ज्ञानाचा कचका तिला दाखवतो नि भेदरवून सोडतो, तेव्हां प्रेक्षकांच्या हंसतां हंसतां मुरकुंड्या वळतात. बायकोला घाबरणारा नवरा जेव्हां शेवटीं तिलाच वठणीवर आणतो, तेव्हां आपोआपच विनोद निर्माण होतो, हें विनोदाचें रहस्य गडकऱ्यांनीं उत्तम ओळखलें होतें.

बालविधवेच्या प्रश्नावर लिहिलेल्या ह्या नाटकांत सनातनी हिंदुसमाजांत बालविधवेचा जो छळ होतो आणि तिला ज्या यातना सहन कराव्या लागतात त्यांचें प्रत्यक्ष चित्रण पहावयाला मिळत नाहीं असा एक आक्षेप ह्या नाटकावर घेतला जातो. सून बालविधवा असली तर घरांत सासूसासरा तिचा जो उठल्याबसल्या छळ करतात तसलें कांहीं दृश्य या नाटकांत दाखविलें नाहीं हें खरें. ह्या नाटकाच्या कथानकाच्या मर्यादेंत तसें कांहीं बसूं शकत नाहीं. पण 'ताई, प्रकाश काय असतो असें ज्याप्रमाणें आंधळा मुलगा विचारतो, त्याप्रमाणें सुख काय असतें हें सुद्धां बालविधवेला दुसऱ्याच्या सांगीवरून समजतें' हे लीलेचे उद्‌गार प्रेक्षकांचीं काळजें कापीत जातात. पुढें ती म्हणते, 'वरातीच्या मिरवणुकी पाहून दृष्टि भांबावून जाते. मंगलवाद्यांचा आवाज ऐकला म्हणजे पोटांत भडभडून येतें. सुखाचीं वर्णनें वाचलीं म्हणजे अंगावर शहारे येतात. आणि देवीच्याजवळ असलेल्या देवाच्या मूर्ति पाहिल्या म्हणजे तिरस्कार येतो. सर्व दिवस अगदीं एकसारखे वाटून आयुष्य म्हणजे एकाच दुःखदायक दिवस-रात्रीचें चक्र वाटतें!' विधवेच्या मनःस्थितीचें ह्यापेक्षां अधिक करुण आणि हृदयभेदक चित्र कोणी रंगवलें आहे?

पुढें जयंताशीं बोलतांना 'अनाथ विधवेला दुःखमुक्त होण्यासाठीं समाजानें मरणाखेरीज एक तरी मार्ग मोकळा ठेवला आहे काय?' असें जेव्हां लीला म्हणते तेव्हां 'विधवांच्या माना मुरगळण्यांत पुरुषार्थ मानणारा, शिक्षणापासून स्त्रियांना दूर ठेवून केवळ पशुवृत्तीनें त्यांची पायमल्ली करणारा समाज वंदनीय कसा होणार? संसारांतील जोडी फुटली तर विधवेच्या मस्तकावरचा केशकलाप नाहींसा होतो, आणि विधुराच्या मस्तकाला बाशिंग बांधण्यांत येतें. विधवेला स्वतःच्या दाराबाहेर पडण्याची

चोरी, तर विधुराला परदारागमनापर्यंत आणि विश्वदारागमनापर्यंत मोकळीक ! ' हे जयंतानें काढलेले जळजळीत उद्‌गार सनातनी समाजाच्या जिव्हारीं लागल्यावांचून रहात नाहींत. विधवा दुमन जेव्हां भ्रूणहत्या करते तेव्हां सनातनी बाबासाहेबांचे डोळे खाडकन् उघडतात आणि बालविधवांच्या पुनर्विवाहाला प्रतिबंध करणाऱ्या प्रतिगामी धर्माला उद्देशून ते कडाडतात, " धिक्कार असो अशा या धर्माला, अशा समाजाला नि अशा रूढीला. भूतदया हाच साऱ्या धर्मांचा धर्म. भूतदयेला थारा देत नाहीं, पतितांचें समाधान करीत नाहीं, दुःखितांचें दुःख जाणत नाहीं, तो धर्म कशाचा ? " सनातनी समाजाच्या पश्चात्तापाचें नि जागृतीचें हें एक प्रातिनिधिक चित्रच नव्हे काय ?

अखेर प्रेमविवाहाचें समर्थन हाच या नाटकाचा निष्कर्ष आहे. नाटकाचा नायक जयंत शेवटीं सांगतो, " बाळपणीं बीजारोपण झाल्यामुळें तारुण्यांत हृदयाच्या तळापर्यंत दूरवर मुळें पसरणारा प्रेमवृक्ष एकदम समूळ उपटतांना हृदयाच्या चिंधड्या होतात, हें लक्षांत ठेवा ! विवाहसंबंधानें एक स्वर्ग तरी हातीं येतो, नाहीं तर पाताळांत पडावें लागतें ! "

एकट्या ' प्रेमसंन्यास ' नाटकाचेंच काय, पण गडकऱ्यांच्या इतर नाटकांचें सर्वांत अविस्मरणीय आणि प्रभावी वैशिष्ट्य हें कीं, स्त्रियांचें पावित्र्य नि पातिव्रत्य हा भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे ह्या सिद्धांतावर असलेला त्यांचा अढळ विश्वास. दुसऱ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत विद्याधर जेव्हां सुशीलेच्या खोलींत चोरट्यानें शिरतो तेव्हां ती त्याला सांगते, " आत्मविश्वास हेंच संरक्षणाचें साधन आहे. उत्कट पातिव्रत्याच्या अलोट शक्तीवर माझा फारच भरंवसा आहे. पापांचें पारिपत्य करण्यासाठीं अणुरेणूंत भरून उरलेला परमेश्वर पतिव्रतेचा पाठिराखा असतो. " ह्याच तत्त्वाच्या आधारावर गडकऱ्यांनीं पुढें ' पुण्यप्रभाव ' ची उभारणी केलेली आहे. स्त्रीच्या पावित्र्याची नि मांगल्याची विटंबना होईल असें एक अक्षरहि गडकऱ्यांच्या वाङ्मयांत तुम्हांला कुठें आढळणार नाहीं. जयंत ज्याप्रमाणें म्हणतो की, ' प्रीतीच्या साम्राज्यांत जेवढें दिव्य, मंगल, पवित्र असेल तेवढ्याचाच काय तो समावेश होतो, ' त्याप्रमाणें ' गडकऱ्यांच्या वाङ्मयांत जेवढें दिव्य, मंगल, पवित्र असेल तेवढ्याचाच काय तो समावेश होतो ' असें मोठ्या अभिमानानें आपल्याला म्हणतां येईल. सर्वसामान्य प्रेक्षकांना गडकऱ्यांचें जें सर्वांत मोठें आकर्षण वाटतें, तें ह्याचमुळें !

' प्रेमसंन्यासा 'तल्या सुशीलेचें चित्र चितारतांनाच पतिव्रतेच्या पुण्यप्रभावाचा विचार गडकऱ्यांच्या मनांत खेळूं लागला असला पाहिजे. ' परमेश्वर पतिव्रतेचा पाठिराखा असतो ' ह्या सुशीलेच्या वाक्याचा आतांच वर उल्लेख केलेला आहे. तो ' पुण्यप्रभावा 'चा पहिला विचार होय. त्याप्रमाणें ' प्रेमसंन्यासा 'च्या पांचव्या अंकांतील

पहिल्या प्रवेशांत विद्याधर तिला म्हणतो, ‘ सुशीला, तुझ्या पातिव्रत्याच्या शक्तीची तुला कल्पना नाहीं. मी जर परपुरुष असतों तर पतिव्रते, त्या दिवशीं तुझ्या खोलींत पाऊल टाकतांच जळून भस्म झालों असतों. ’ ही त्या पहिल्या विचाराची दुसरी पायरी होय. ईश्वरासंबंधीं वृंदावन जी तुच्छतेची भाषा वापरतो, तिचा उगम तुरळकपणें कमलाकराच्या उद्‌गारांतहि आढळतो. आणि वसुंधरेसाठीं प्रेमसंन्यासी झालेला ‘ ईश्वर ’ हा देखील ‘ प्रेमसंन्यासां ’तल्या जयंताचाच अवतार वाटतो. त्याखेरीज ‘ पुण्यप्रभावा ’च्या पहिल्याच वाक्यांत ‘ ईश्वरा ’च्या तोंडून गडकऱ्यांनीं कबुली दिलेली आहे कीं ‘ माझ्या प्रेमसंन्यासानें मला हा पुण्यप्रभावाचा मार्ग अचूक दाखवला नसता तर अजूनहि मन त्या वेड्यांच्या बाजारांत रमत राहिलें असतें. ’

रचनेच्या आणि कथानकाच्या दृष्टीनें ‘ पुण्यप्रभाव ’ हें नाटक ‘ प्रेमसंन्यास ’ पेक्षांहि जास्त विस्कळीत आणि बेडौल आहे. त्याचा सहा अंकी विस्तारहि अवाढव्य आहे. त्या काळांत सुद्धा हें नाटक संपूर्णपणें रंगभूमीवर करतां येत नसे. गडकऱ्यांची प्रतिभा एवढी अनावर असे कीं एकदां ते लिहावयाला बसले, म्हणजे पात्रांच्या भाषणाच्या नि प्रवेशाच्या लांबीरुंदीचा ते क्वचित् विचार करीत असत. लीला–जयंताचीं काव्यमय भाषणें एकदां लिहावयाला सुरुवात झाली म्हणजे मग जेवढ्या काव्यमय कल्पना आणि उत्प्रेक्षा त्यांना सुचत असत त्या सगळ्यांची नोंद ते कटाक्षानें त्या भाषणांमध्यें करीत. जें लीला–जयंताच्या बाबतींत तेंच भूपाल, वसुंधरा नि वृंदावनच्या बाबतींत. आणि जें गंभीर प्रवेशांत तेंच विनोदी प्रवेशांत. नाटक हें वाचण्यासाठीं नसून प्रयोगासाठीं आहे ह्याचा त्यांना जणूं कांहीं विसरच पडल्यासारखें वाटे. पूर्वीच्या सर्वच नाटककारांसंबंधीं कमीजास्त प्रमाणामध्यें हेंच म्हणावें लागेल. भाषणांत काय किंवा गाण्यांत काय कुठेंहि आटोपशीरपणाच नसे. कोणी किती बोलायचें आणि किती गायचें ह्याला मुळीं कांहीं सुमारच नसे.

‘ प्रेमसंन्यास ’ नाटक १९१३ सालीं रंगभूमीवर आलें. त्याच वेळेपासून ‘ पुण्यप्रभावा ’च्या लेखनाला गडकऱ्यांनीं प्रारंभ केलेला होता. पण तें प्रत्यक्ष रंगभूमीवर आलें १ जुलै १९१६ ला मुंबईच्या ‘ रिपन थिएटर ’मध्यें. तथापि, हें नाटक मुंबईमध्यें फारसें रंगलें नाहीं. नटांनीं नकलाच मुळीं पाठ केल्या नव्हत्या. त्याचें एक कारण असें कीं, मुळांत ‘ पुण्यप्रभाव ’ नाटक हें गडकऱ्यांना ‘ गंधर्व नाटक मंडळी ’ला द्यावयाचें होतें. पण तें जमलें नाहीं. म्हणून नाइलाजानें त्यांनीं तें नाटक ‘ किर्लोस्कर मंडळी ’ला दिलें. पण त्या कंपनीकडून आपलें नाटक घेऊन गडकरी केव्हां दुसरीकडे जातील, ह्याची कंपनीला खात्री नसल्यामुळें नटांनीं आपापल्या नकला मन लावून पाठ केल्या नाहींत. पण १८ ऑगस्ट १९१६ ला त्या नाटकाचा पहिला प्रयोग जेव्हां

पुण्याला झाला, तेव्हां तो कमालीचा रंगला. आणि पुणेकरांनीं ह्या नाटकाचें प्रचंड स्वागत केलें. त्या प्रयोगाला मी उपस्थित होतों.

'पुण्यप्रभावा'च्या एकंदर रचनेवर त्या काळीं अत्यंत लोकप्रिय असलेल्या उर्दू नाटकांचा परिणाम झालेला आहे असें सांगणारे सांगतात. कोणास ठाऊक, त्या नाटकांतले बुरख्याचे, पेटाऱ्यांत लपण्याचे, तळघराचे नि मूल मारण्याचे देखावे कदाचित् त्यांना उर्दू नाटकांवरून सुचलेले असावेत. कारण, मराठी रंगभूमीवर असली चमत्कारिक उलाढाल तोंपर्यंत कोणीहि केली नव्हती. तथापि, माझ्या माहितीप्रमाणें मॉरिस मेटरलिंक ह्या सुप्रसिद्ध फ्रेंच नाटककाराच्या 'मोना व्हेना' ह्या नाटकांत 'देशाचें स्वातंत्र्य का पातिव्रत्य' अशी जी एक विलक्षण समस्या उपस्थित करण्यांत आलेली आहे, तिच्यापासून 'पुण्यप्रभावां'तली मूलभूत कल्पना त्यांना सुचलेली असावी. भारतीय परिस्थितीला अनुसरून गडकऱ्यांनीं मोना व्हेनाच्या त्या समस्येला 'पत्नीचें पातिव्रत्य का स्वतःचे प्राण' असें वेगळें रूप देऊन ती भूपालच्या मुखानें मांडली आहे. कोल्हटकरांच्या 'प्रेमशोधन' नाटकाचाहि 'पुण्यप्रभावा'वर परिणाम झालेला स्पष्टच दिसतो. 'कन्दन'वरून त्यांना 'वृंदावन' सुचलेला असावा. कारण कंदन हा आधीं खलपुरुष असतो. आणि अखेर त्याचें रूपांतर सत्पुरुषांत होतें. वृंदावनचा नोकर कंकण ही तर कंदनचा सेवक तडाग ह्याची सही सही नक्कल आहे. दोघेहि 'शिपाईगडी' असून विरोधकांचे 'एक घाव दोन तुकडे' करावयाला दोघेहि एका पायावर तयार असतात. 'प्रेमसंन्यास' नाटकापूर्वी गडकऱ्यांनीं 'गर्वनिर्वाण' नाटक लिहिलें होतें. त्यांतील 'हिरण्यकश्यपू' आणि 'कयाधू' ह्यांचे पुष्कळसे संवाद त्यांनीं 'वृंदावन–कालिंदी'च्या तोंडीं पुन्हा वापरलेले आहेत.

'प्रेमसंन्यासा'त अवघीं दोनच विनोदी पात्रें होतीं. त्यामुळें नाटकांतील गंभीर नि करुण वातावरणाला त्याचा फारसा उपसर्ग होत नाहीं. पण 'पुण्यप्रभावां'त ही संख्या एकदम पांचावर गेली. 'लग्नाच्या जोडप्याखेरीज कोणतींहि स्त्री-पुरुषें कुठेंहि आणि कांहींहि बोलतांना आढळली तर तेथें कांहीं तरी दगलबाजी असावयाची' असलें लोकशास्त्र उराशीं कवटाळून बसणारा गांवकुटाळ नुपूर, 'स्त्री जात तेवढी हरामखोर' हें पालुपद अष्टौप्रहर मनाशीं घोकणारा संशयी सुदाम, 'बायकांना बेहोष करण्यासाठींच आपला अवतार आहे. माझ्याकडे पाहून मला सुद्धां जी बाई बघणार नाहीं ती पतिव्रता म्हणून खुशाल समजावें' अशी स्वतःच्या सौंदर्याची घमेंड असलेला आडदांड कंकण, स्वतःच्या अंगावर भरपूर दागिन्यांचा साजशृंगार घालतां यावा म्हणून किमयावाल्यांच्या सतत शोधांत असलेली दामिनी आणि उठण्यांत, बसण्यांत, चालण्यांत, बोलण्यांत आपल्या धनिणीची नक्कल करून स्वतःचें लग्न जमविण्याच्या खटपटींत असलेली किंकिणी अशीं हीं विविध रंगाचीं नि ढंगाचीं पांच पात्रें 'पुण्यप्रभावा'मधून स्वैर संचार करतांना आढळतात.

‘ प्रेमसंन्यासा ’त गोकुळ हा कांहीं इतका विसंगत वाटत नाहीं. कारण तो सनातनी विचारांचा असून स्त्रीस्वातंत्र्याला आणि विधवाविवाहाला विरोध करणारा आहे. पण, ‘ पुण्यप्रभावा ’तल्या या पांचहि पात्रांचा नाटकांतल्या मुख्य विषयाच्या अनुसंधानानें कांहींहि उपयोग नाहीं आणि नाट्यवस्तूशीं त्यांचा जो संबंध जुळवून आणलेला आहे, तोहि अगदींच दुबळ आणि ओढून ताणून असा आहे. त्यामुळें ‘ पुण्यप्रभावा ’तला सर्वच विनोद हा अस्थानीं नि विसंगत वाटतो. एक गंभीर प्रवेश झाल्यानंतर प्रेक्षकांचें मनोरंजन करण्यासाठीं एक वेगळाच विनोदी प्रवेश घालण्याचा उर्दू नाटकांमध्यें परिपाठ आहे असें म्हणतात. कदाचित् त्याचें हें अनुकरण असावें. वसुंधरा, भूपाल, वृंदावन आणि कालिंदी एवढींच ह्या नाटकांतलीं खरीं महत्त्वाचीं पात्रें होत. ईश्वर, राजा नि युवराज हीं तीन पात्रें देखील विनोदी पात्रांप्रमाणेंच अनावश्यक पात्रें आहेत.

‘ प्रेमसंन्यासा ’ प्रमाणेंच ‘ पुण्यप्रभावा ’चा प्रारंभ अत्यंत मामुली नि सामान्य आहे. ईश्वराची लांबलचक नि कंटाळवाणी बडबड ऐकून प्रेक्षक अगदीं जेरीस येतात. ‘ आयुष्याच्या नाटकांतल्या पहिल्या प्रवेशांत मला जितकें काम मिळालें तितकें पुढें कधींच मिळावयाचें नाहीं ’ या जाणीवेनें तो पहिल्या प्रवेशांत जेवढें बोलतां येईल तेवढें बोलून घेऊन प्रेक्षकांवर अक्षरशः सूड उगवतो. ‘ विषण्ण अर्थाचा एकांतांतला कलकलाट नुसत्या नादानें भरलेल्या गर्दींतल्या गडबडीपेक्षां हजारपटीच्या कडवटपणानें कानठळ्या बसवूं लागतो. ’ असलीं त्याचीं जडजंबाली वाक्यें समजणारे कोण भाग्यशाली श्रोते नाटकगृहांत बसले असतील ते असोत. ईश्वराचें प्रेम वसुंधरेवर होतें. पण वसुंधरेच्या पित्याला त्याचें स्थळ अयोग्य वाटल्यामुळें त्यांनीं तिला भूपालला दिलें. तेव्हां हृदयभंग होऊन ईश्वर प्रेमसंन्यासी झाला, हा आशय अर्ध्या पानांत व्यक्त करतां आला असता. तेवढ्यासाठीं पंचवीस पानें खर्च करण्याची काय जरूरी होती ?

तथापि, ईश्वराच्या ह्या कंटाळवाण्या तात्त्विक प्रवचनांतून गडकऱ्यांच्या वाङ्मयीन प्रतिभेचे शीतल उन्मेष प्रेक्षकांच्या अंगावर हर्षाचे रोमांच कसे उभे करतात पहा :

( १ ) आयुष्यांतल्या आदिमध्यांताच्या तीन अत्यंत महत्त्वाच्या दिवसांपैकीं, जन्ममरणाच्या टोंकावरच्या दिवसांची कमकुवत मनुष्यबुद्धीला आठवण नसते. पहिल्या वेळीं आठवणीचा जन्म झालेला नसतो. मरणकाळापूर्वी आठवणीचें मरण घडून येतें. म्हणून, लग्न-दिवसाची आठवण तिप्पट ताकदीनें जीव धरून रहाते. वसुंधरे, तुझ्या लग्नदिवसानें माझ्या जन्मदिवसाला निष्फळ ठरवून मला मरणदिवसाची अपेक्षा करावयाला लाविलें. त्या दिवशीं तुझ्या खऱ्याखुऱ्या सुखाचा जन्म झाला आणि माझें जन्माचें सुख नाहींसें झालें.

( २ ) खऱ्या सुखाच्या निराशेनंतर हें कशाचें सुख आणि कशाचें समाधान ! गजान्तलक्ष्मीच्या राजवैभवांत मिरवणूक काढण्यासाठीं आणलेल्या हत्तीच्या मढ्यावर हस्तिदंती सामानाचें दुकान काढण्याचा प्रसंग आला तर त्यांत समाधान कोण मानील ?

ह्याच प्रवेशांत नाटकाची नायिका वसुंधरा निघून गेल्यानंतर ईश्वरासारखा सत्पुरुष सुदाम आणि नुपूर ह्या दोघां आचरट कुटाळखोरांच्या तडाख्यांत सांपडून अक्षरशः हैराण होतो. सुदाम तर त्याला 'राखुंडींतला रामोशी' अशी उघड उघड शिवीगाळी करतो. सुदाम आणि नुपूर ह्यांच्या भडक विनोदाला उठाव देण्यासाठीं ईश्वरासारख्या सज्जनाला वळी देण्याचें मुळींच कारण नव्हतें. त्यानंतरच्या दुसऱ्या प्रवेशांत कालिंदी आणि वृंदावन ह्यांचें संभाषण अतिशय लांबलचक नि कंटाळवाणें आहे. एकमेकांशीं बोलण्यापेक्षां ते स्वगतच अधिक बोलतात. आणि जेव्हां प्रकट बोलतात तेव्हां एकमेकांच्या अभिनयामध्यें ज्या भावनांचा आविष्कार होत असतो, त्याचेंच ते तपशीलवार वर्णन करीत असतात. भाषासौंदर्यानें ओथंबलेलीं 'मृत्यूनेंच जगाला मनोहर केलेलें आहे. मरणामुळेंच माणसाला मोल येतें' असलीं अमर सुभाषितें ह्या संभाषणांत असलीं तरी तीं बाकीच्या शाब्दिक बडबडींत कोठल्या कोठें लोपून जातात.

वसुंधरेची आपल्याला प्राप्ति झाली नाहीं म्हणून तिच्यावर सूड उगविण्यासाठीं वृंदावन भूपालच्या विरुद्ध जें कारस्थान रचतो, त्यांत कंकणसारख्या मूर्ख माणसाकडे वृंदावनसारख्या दीर्घद्वेषी आणि पाताळयंत्री पुरुषानें कांहीं कामगिरी सोंपवावी ही गोष्ट अत्यंत हास्यास्पद वाटते. आणि त्याच्याकडे कामगिरी तरी कोणती सोंपविली आहे ? कंकण म्हणतो, "बस, हेंच काम ? नुसतें मारेकऱ्याचें सोंग आणायचें. थोडेंसें खोटें बोलायचें. शेवटीं महाराजांचे पाय धरायचे. आणि भरपूर रडायचें !" पण ह्यापैकीं एकहि गोष्ट कंकणाला पुढें नाटकांत करावी लागली नाहीं. किंकिणीपुढें म्हणावयाचा प्रेमपाठ आणि महाराजांपुढें म्हणावयाचें रडगाणें ह्यांची गल्लत होऊन 'प्रेमसंन्यास'मधील गोकुळाच्या साक्षीप्रमाणें हंशा पिकत असेल, पण त्यावरून युवराजांच्या खुनाचा खोटा आरोप भूपालवर शाबीत करण्याच्या कामीं कंकण हा किती नालायक होता हेंच सिद्ध होतें. खरोखरच, कंकणानें राजापुढें साक्ष दिली असती तर त्या कारस्थानाच्या आरोपांतून भूपालची सुटका झाली असती आणि वृंदावनाची मानच नेमकी अडकली असती.

ह्या ठिकाणीं गडकऱ्यांच्या हातून एरव्हीं कधींहि न घडणाऱ्या स्त्रीविषयक अनौचित्याचा एक अत्यंत अप्रिय उल्लेख करणें भाग आहे. वृंदावनानें सोंपविलेली कामगिरी कंकणानें मान्य केल्यानंतर त्यांचा हा पुढील संवाद वाचण्यासारखा आहे.

**कंकण :** अरेरे, असल्या उदार पुरुषाच्या ( म्हणजे, वृंदावनाच्या ) ठिकाणीं त्याच्या बायकोची ( म्हणजे, कालिंदीची ) निष्ठा अढळ राहूं नये ही केवढी नामुष्कीची गोष्ट आहे.

वृंदावन : काय म्हणालास कंकणा ? कालिंदीची निष्ठा अढळ नाहीं ?

कंकण : कसूर माफ करा, धनीसाहेब. त्यांची निष्ठा आपल्या या एकनिष्ठ सेवकाच्या ठिकाणीं जरा चळली आहे खरी !

वृंदावन : काय मूर्ख आहेस ? तुझ्या ठिकाणीं ? ( हंसतो. )

कंकण : धनीसाहेब, ह्यांत हंसण्यासारखें कांहींच नाहीं. चाकराच्या वांट्याला धन्याचीं जुनींपानीं वस्त्रें, अंगवस्त्रें, अर्धा—

वृंदावन : बेवकूफ, तुझी जीभ फारच लांब व्हायला लागली !

कंकण : धनीसाहेब, माफ करा. पण धनी-नोकरामध्यें बोलण्याची फाजील लगट जियें होते तियें नोकराची जीभ लांबत नसून—बहुतकरून धन्याचे कानच लांब झालेले असतात.

वृंदावन : ( स्वगत ) माझ्यापेक्षां उंच दर्जाच्या भूपालला, याच्या हातानें खालीं लोटण्यासाठीं थोडा वेळ तरी याला असें डोक्यावर बसवून घेणें भाग आहे.

हा सर्व संवाद म्हणजे ' पुण्यप्रभावा 'च्या पावित्र्यावरचा एक हिडीस डाग आहे. वृंदावनासारख्या श्रेष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्याला जेव्हां दीडदमडीचा कंकण तोंडावर सांगतो कीं, ' तुमची बायको माझ्यावर आषक आहे ' तेव्हां त्याच्या श्रीमुखांत काडकन् भडकावण्याऐवजीं वृंदावन नुसता हंसतो. ह्यावरून तो किती बेशरम नि नालायक आहे हें सिद्ध होतें. त्याहि पुढें जाऊन कंकण त्याला सांगतो कीं, ' धन्यांचीं जुनींपानीं वस्त्रें चाकराच्या वांट्याला येणारच ! ' तेव्हां तर कहरच होतो. ' भूपालवर सूड घेण्यासाठीं ह्या मूर्खाला असें डोक्यावर बसवून घ्यायलाच पाहिजे ! ' अशा नपुंसक युक्तिवादानें जेव्हां वृंदावन आपलें समाधान करून घेतो, तेव्हां गडकऱ्यांनीं वृंदावनाला त्याच ठिकाणीं खलास करून टाकलेला आहे.

—

भूपालविरुद्ध वृंदावनानें रचलेलें कारस्थान अत्यंत गलथानपणाचें आहे. ' इंद्रनाथाच्या बंडाळीच्या बंदोबस्तासाठीं मोहिमेवर जा ' म्हणून राजानें भूपालला आज्ञा केल्यानंतर भूपाल त्याला कां नकार देतो ? तो म्हणतो, ' आपल्याला अतिशय आश्चर्य वाटेल. कदाचित् रागहि येईल. परंतु सध्या मोहिमेवर जाण्याची माझ्या मनाची तयारीच नाहीं ! ' कोणता सेनापति आपल्या राजाला असें उत्तर देईल ? त्यानें हा नकार कां दिला ह्याचा खुलासा गडकऱ्यांनीं ह्या नाटकांत कुठेंहि केलेला आढळत नाहीं. तो नकार देऊन भूपाल राजासमोरून निघून जातांच युवराजाचा वध करून राजपद मिळविण्याच्या भूपालाच्या कारस्थानाचा गौप्यस्फोट वृंदावन राजाच्या कानांत करतो. राजा त्यावर ताबडतोब विश्वास ठेवतो. रात्रीच्या वेळीं आपल्या बागेंत भूपाल आणि वसुंधर विश्रब्ध मनानें सुखसंवाद करीत बसलेले असतात.

ह्या सुखसंवादांतलीं भूपालचीं दोन वाक्यें नमुन्यासाठीं येथें देतों.

(१) या कारंजाच्या शीतस्पर्श तुषारांनीं गारठल्यामुळें या वयांतलीं अंगांचीं शिथिल संधिबंधनें संकोच पावून, आमच्या तृप्त आलिंगनांतहि पहिल्या आतुरतेची उत्कट दृढता उत्पन्न होत आहे. देहस्थितीच्या एकतानतेनें मनहि बाल्यचपल वृत्तींत तरंगत आहे. पुन्हा लाभलेल्या या अल्लडपणाच्या आनंदी भरांना माझ्याकडून नकळत झालेल्या एकाद्या विभ्रमप्रमादाबद्दल तुझी परिचयप्रगल्भतेमुळेंच सलज्ज झालेली स्मित दृष्टि अपराधी मनाच्या ओशाळलेल्या शोधक वृत्तीला मात्र दिसण्याइतक्या सूक्ष्म भ्रूभंगानें माझा निषेध करीत आहे.

(२) म्हणून, वंध्यातृप्तीच्या निराश सुखासाठीं–निःश्रेयसासाठीं आमच्या अगाध ज्ञानसागराची, जीवात्म्याच्या जाणीवेवांचून परमस्वरूपांत विलय करून टाकण्याची कल्पना साध्य नसली किंवा सत्यहि नसली तरी कल्पना-शक्य मात्र वाटते.

शृंगाराच्या नि प्रेमाच्या एकांतांत असलें गंभीर तत्त्वज्ञान अत्यंत क्लिष्ट आणि किचकट शब्दांत आपल्या पत्नीशीं करीत बसलेल्या भूपालच्या अंगांत या वेळी बहुधा योगवसिष्ठांचा संचार झालेला दिसतो आहे. त्याचें हें पांडित्यपूर्ण प्रवचन प्रेक्षकांना तर राहूं द्याच, पण वसुंधरेला तरी कसें कळणार ? नटांनाहि उच्चारावयास नि अभिनयास कठिण अन् प्रेक्षकांनाहि सहजासहजीं आकलन करावयास अवघड असले दुर्गम नि दुर्बोध संवाद लिहिण्यांत गडकऱ्यांचा काय हेतु असावा हें त्यांचें त्यांनाच ठाऊक !

हा प्रवेश संपतां संपतां वृंदावन घाईघाईनें येतो आणि युवराजाचे प्राण संकटांत आहेत असें सांगून तो भूपालला बरोबर घेऊन जातो, तों थेट युवराजांच्या शयन-मंदिरांत, युवराजांच्या पलंगामागें मच्छरदाणीच्या आड राजा उभा आहे. एका बाजूनें भूपाल तलवार उपसून प्रवेश करतो. मच्छरदाणीच्या आड उभी असलेली आकृति ही मारेकऱ्याची आहे, अशा समजुतीनें युवराजांच्या अंगावरून त्या आकृतीवर तो तल्वार उगारतो. तोंच राजा 'थांब, चांडाळा, थांब' असें ओरडून त्याला हटकतो आणि भूपालला यापुढें तळघरांत कोंडून ठेवायचा नि त्याच्या घरादाराची वाटेल ती व्यवस्था करावयाची वृंदावनाला आज्ञा देतो. वसुंधरेसंबंधींचा आपला पातकी हेतु साध्य करण्या-साठीं भूपालला आणि वसुंधरेला वेगवेगळ्या तळघरांत कोंडून ठेवण्यासाठीं वृंदावनानें भूपालच्या विरुद्ध हें जें मारून मुटकून कारस्थान रचलें आहे, तें अत्यंत हास्यास्पद आहे.

राजवाड्यांत रक्षकांचा कडेकोट बंदोबस्त असतांना युवराजांचे प्राण आधीं संक-टांत पडतीलच कसे ! आणि त्या संकटांतून एकटा भूपाल त्यांचें कसें काय रक्षण करणार ? अन् युवराजांना स्वतः वांचवायचें सोडून त्यासाठीं आपल्याला बोलवायला वृंदावन मुळीं घाईघाईनें येतोच कसा, असा संशय भूपालला आला कसा नाहीं ? बरें, युवराजांच्या शयनमंदिरांत त्यांच्या मच्छरदाणीच्या मागें जी आकृति उभी होती, ती जर युवराजांच्या मारेकऱ्याची होती असें भूपालला वाटलें, तर त्याच्या मनांत हा

विचार त्याच क्षणीं यावयाला पाहिजे होता, की तो मारेकरी त्या ठिकाणीं नुस्ता स्वस्थ कां उभा राहिला होता ? भूपाल येण्यापूर्वी युवराजाला मारून त्याला कधींच पसार होतां आलें असतें. का, तो भूपाल येण्याची वाट पहात उभा होता ?

आणि वृंदावनानें आपला विश्वासघात करून युवराजाच्या वधाच्या कारस्थानांत आपला गळा गुंतवलेला आहे हें लक्षांत आल्याबरोबर भूपालनें वृंदावनाच्या अंगावर धांवून जाऊन त्याचीं खांडोळीं करावयाला पाहिजे होतीं. निदान आकाशपाताळ एक करून राजाची तरी तशी खात्री करून द्यावयाला हवी होती. पण 'वनशंकरीच्या शिकारींत चवताळलेल्या वाघिणीनें युवराजांवर अचानक झडप घातली, त्यावेळीं त्यांच्यापुढें होऊन जंगलच्या राणीच्या तोंडांत आपलें मस्तक द्यावयाला तयार होणारा नि वीरावतीच्या रणकंदनांत युवराजांच्या रोखानें जेव्हां इंद्रनाथाच्या लोकांनीं चाल केली तेव्हां त्यांना पाठीशीं घालून स्वतःच्या देहाच्या चिंधड्या करून घेणारा' हा रणबहादूर झुंझार भूपाल राजापुढें आणि वृंदावनापुढें अक्षरशः 'शेपूट घालून' बसतो अन् कपाळाला हात लावून राजाला म्हणतो कीं, 'या अकल्पित प्रकारानें माझें मस्तक इतकें सुन्न होऊन गेलें आहे कीं कोणत्या शब्दांनीं सत्य आपल्यापुढें मांडावें हेंच सुचत नाहीं.' सर्व मांडलिकांवर अधिकार चालविण्यासाठीं ज्याला राजांनीं 'मंडलेश्वर' ही महान् पदवी दिली, तो भूपाल मंडलेश्वर तर नाहींच नाहीं, पण नुसता 'बंडलेश्वर' दिसतो आहे.

भूपालला त्या राज्यांत कवडीचीहि किंमत दिसत नाहीं. एवढ्या मोठ्या मंडलेश्वराला नि युवराजांच्या पालकाला राजानें बंदिवान करून ठेवलें, म्हणून त्याला सोडविण्यासाठीं प्रजाजन बाहेरून कांहींच उठाव करीत नाहींत. बरें, कैदेंतून बाहेर पडण्यासाठीं हा नरवीर भूपाल तरी कांहीं प्रयत्न करतो आहे का ? नांव नको ! तळघराच्या अंधारांत बसून तो इतका मेल्याहून मेला झालेला असतो कीं, त्याच्या बायकोची–वसुंधरेची–मागणी प्रत्यक्ष त्याच्या तोंडावर वृंदावनानें केली तरी त्याच्या सर्वांगाचा भडका उडत नाहीं ! 'अरेरे, काय बोल्लास हें !' ह्यापेक्षां अधिक कडक भाषा त्याच्या तोंडून निघत नाहीं.

राजाज्ञेवरून वृंदावननें भूपालला तळघरांत कैद करून ठेवलें ही गोष्ट समजण्यासारखीच आहे. पण वसुंधरेला तिच्या मुलासह तळघरांत जी बंदिस्त करून ठेवण्यांत आली त्याचें कारण काय ? वसुंधरेनें काय गुन्हा केला ? भूपालच्या घरादाराची काय वाटेल ती व्यवस्था करा असा राजानें वृंदावनाला सरधोपट हुकूम दिला असला, तरी त्याचा अर्थ वसुंधरेला तिच्या अर्भकासह तळघरांत कोंडा असा होतो कीं काय ? आणि तळघरांत तिच्यावर देखरेख करावयाला बुरखा घेतलेली दामिनी कशाला ? संशयखोर सुदामानें दामिनीवर जबरदस्तीनें बुरखा लादला असला, तरी तळघरांत वसुंधरेवर पहारा करतांना दामिनीनें बुरखा घेण्याची काय जरुरी होती ? तेथें काय वसुंधरेचा

आठ महिन्यांचा दीनार तिचा हात पकडणार होता ? केवळ दामिनीच्या जागीं पुढें कालिंदीची तिच्या केतनासह बदली करावयाची होती, म्हणून गडकऱ्यांनीं हा तळ-घरांतल्या बुरख्याचा सर्व खटाटोप केला, दुसरें काय ?

वृंदावन हा एक अत्यंत भेकड आणि ठिसूळ स्वभावाचा खलपुरुष असतो. तळ-घरांतल्या अंधुक उजेडांत भूपालाला तोंड दाखविण्याची शरम वाटल्यामुळें तो संध्याकाळीं वेळ साधून तेथें जातो. वसुंधरेशीं बोलतांना तर त्याची गाळणच उडते. इतकी कीं ती वसुंधरेच्यासुद्धां लक्षांत येते. ती स्वगत म्हणते, 'आज चार दिवस पहातें आहें, वृंदावन बोलतांना मधून मधून माझ्याकडे पहाण्याचें कां बरें टाळतात ? बोलतांना मध्येंच अडखळतात कां ? हें सारें उसनें अवसान तर नाहीं ?' आणि वसुंधरेला 'भ्रष्ट' करण्याच्या छातीठोक गोष्टी तिच्या तोंडावर बोलून अखेर 'तिनें माझ्या गळयांत, नुसता हार घातला तरी माझें समाधान होईल!' एवढ्यावर तडजोड करण्यापर्यंत त्याची घसरगुंडी होते. असें असतां, असल्या अवसानघातकी अन् कचखाऊ खलपुरुषानें वसुंधरेच्या डोळ्यादेखत तिच्या दीनाराचा बळी घेण्याच्या गोष्टी कराव्यात—अन् पुढें तिच्या अर्भकाच्या छातींत खरोखरच स्वतः कट्यार खुपसावी ही गोष्ट सर्वथैव असंभवनीय वाटते.

चौथ्या अंकापासून कारस्थानाची गुंतागुंत आणखी किचकट होत जाते. आपला नवरा वृंदावन वसुंधरेच्या दीनाराला ठार मारण्याच्या प्रयत्नांत आहे, ही गोष्ट कालिंदीला त्याच्या झोपेंतल्या बडबडीवरून कळून येते. तेव्हां ती त्याच्या पायांशीं लोटांगण घालते. पण तो तिला लाथेनें उडवून 'दीडदमडीची रां—' अशी शिवी देतो. आणि तिला आपल्या बागेंतल्या बंगल्यांत कोंडून ठेवायला कंकणाला सांगतांना म्हणतो कीं, 'कंकण, चहूंकडे जाऊन सांग, कीं बायको बदचालीची दिसली म्हणून वृंदावनानें तिला कोंडून ठेवली आहे. पुढें किंकिणीच्या वशिल्यानें कालिंदी कंकणाच्या नजरकैदेंतून बाहेर पडते नि आपल्या केतनाला घेऊन दामिनीच्या जागीं बुरखा घेऊन वसुंधरेवर पहारा करावयाला तळघरांत जाऊन बसते. तथापि, मौज ही आहे कीं, दामिनीच्या ऐवजीं बुरख्यांत कालिंदी बसलेली आहे ही गोष्ट वसुंधरेला कधींहि उमगत नाहीं. दोघींच्या आवाजांत नि हालचालींत तिला कांहीं एक फरक वाटत नाहीं. ज्या दिवशीं वृंदावन दीनाराला मारणार असतो त्या दिवशीं वसुंधरा तर त्याला जवळच मुळीं घेत नाहीं. म्हणून दीनाराच्या ऐवजीं केतन बदलून आलेला आहे, ही गोष्ट तिला समजत नाही !

अखेर तोंड बाजूला करून उजव्या हातानें वृंदावन 'दीनारा' च्या पोटांत कट्यार खुपसतो. आणि डाव्या हातानें डोळे पुसतो. मरण्यापूर्वी दीनार किंचाळतहि

नाहीं ह्याचें निदान वसुंधरेला तरी आश्चर्य वाटावयाला हवें होतें. कालिंदीला तसें आश्चर्य वाटणें शक्यच नव्हतें. कारण, तिनें दीनाराऐवजी ज्या आपल्या केतनला घेतलें याला गुंगी येण्यासाठीं आधींच अफूची बाळगोळी दिलेली असते. आपल्या दीनाराला कातरवेळेला दृष्ट लागूं नये म्हणून जी त्याला जपत असते किंवा त्याला कोणी आपल्या मांडीवरून उचलला तरी जिला मनापासून राग येई त्या आपल्या बाळाच्या पोटांत वृंदावनानें कट्यार खुपसली तरी जिच्या घशांतून अस्पष्ट हुंदका सुद्धां येत नाहीं, किंवा जी हूं का चू सुद्धां करीत नाहीं, ती वृंदावन डोळे पुसत असतेले मात्र अगदीं न चुकतां पहाते नि स्वगत म्हणते, "वृंदावन डोळे कां पुसताहेत ? अहाहा, देवा, देवा असाच, असाच मला धीर दे !" आपलें लाडकें मूल मेल्यानंतर वसुंधरेला देवाकडून आतां कसला धीर पाहिजे !

पांचव्या अंकांतील 'पत्नीचें पातिव्रत्य का स्वतःचे प्राण' हें जें स्वगत भूपाल तळघरांत म्हणतो, तें ऐकून हंसावें का रडावें हें कळत नाहीं. 'प्राणहानीचे परिणाम बुद्धिगम्य आहेत आणि पातिव्रत्याचा नाश ही संस्कारहानि आहे,' असा जो शब्दांचा काथ्याकूट तो करीत बसतो, त्यावरून तो कोठल्याहि संकटांत सांपडलेला नसून केवळ 'प्राणनाश का पातिव्रत्यनाश' ह्या विषयावर तो एखाद्या स्पर्धेतील निबंधाच्या मुद्द्याचा विचार करीत असावा असें वाटतें. वृंदावन वसुंधरेला भेटावयाला त्याला तिच्या तळघरांत घेऊन जातो. तेथेंहि वृंदावनाचा कचखाऊपणा भरपूर दिसून येतो. 'वसुंधरेचें पातिव्रत्य का तुझे प्राण' असा सवाल वृंदावन भूपालला करतो तेव्हां भूपाल म्हणतो, 'हे पहा माझे प्राण तुझ्या स्वाधीन आहेत !' त्याबरोबर वृंदावन मनांतल्या मनांत मंडलेश्वर भूपालला धन्यवाद देतो.

पुढें भूपाल वसुंधरेचा निरोप घेतांना 'माते' म्हणून तिला जेव्हां वंदन करतो, त्यावेळीं वृंदावन एकदम तोंड फिरवतो; तेव्हां वसुंधरा स्वगत म्हणते, "काय पाहिलें मी ? डोळ्यांत तरंगणारा अश्रुबिंदु लपविण्यासाठीं वृंदावनांनीं तोंड फिरवलें ! खास, वृंदावनांचें अंतःकरण पुरतें मेलें नाहीं. त्यांची ही राक्षसवृत्ति वरवरची आहे. ते माझ्याकडे आणि माझ्या पतीच्या तोंडाकडे पहात नाहींत. क्रूर निश्चयाचे शब्द उच्चारतांना ते घुटक्या गिळतात. त्यांच्या पापण्या जलदीनें उघडझाप करतात. मघाशीं नाथांच्या आवेशाकडे ते दचकून सादर दृष्टीनें पहात होते. आतां नाथांनीं मला वंदन करतांच, त्यांच्या डोळ्यांत पाणी आलें. वृंदावन या एकाच अश्रूंत तुमच्या अन्यायांच्या कोटी उजळून निघतील." वृंदावनाचें पाणी त्याच वेळीं वसुंधरेनें जोखलें नि आपल्या स्वतःच्या शृंगारमंदिरांत वृंदावनाच्या गळ्यांत हार घालावयाचें तिनें कबूल केलें. प्रेक्षकांनाहि ह्याच वेळीं समजून येतें कीं कचखाऊ काळजाच्या ह्या खलपुरुषाचा वसुंधरेपुढें फारसा निभाव लागायचा नाहीं.

सहाव्या अंकांतला चौथा प्रवेश हा या नाटकांतला शिखर प्रवेश आहे. सबंध

नाटकांतलें कथानक केवळ ह्या एका प्रवेशासाठीं नाटककारांनीं पहिल्यापासून बांधीत आणलेलें आहे. म्हणून हा प्रवेश गडकऱ्यांच्या नेहेमींच्याच पद्धतीप्रमाणें वाजवीपेक्षां जास्त लांबलचक असला, तरी विलक्षण काव्यमय भाषा आणि प्रभावी युक्तिवाद ह्यांची त्यांनीं ह्या प्रवेशांत परमोच्च सीमा गांठलेली आहे. वसुंधरा आणि वृंदावन ह्यांनीं एक-मेकांवर मात करण्यासाठीं जे तेजस्वी कोटिक्रम केले आहेत, ते पाहून प्रेक्षकांचे डोळे अक्षरशः दिपतात यांत मुळींच शंका नाहीं.

ईश्वरावर असलेल्या आत्यंतिक निष्ठेच्या सामर्थ्यावर वसुंधरेनें आपलें पातिव्रत्य कसोटीला लावावयाचें ठरविलेलें असतें. 'पातिव्रत्य ही बायकांजवळ ईश्वरी अंशाची ठेव आहे तेव्हां ती सांभाळण्याची सारी लाज त्याला ! तेव्हां कोणत्याहि परिस्थितींत ईश्वर माझ्या सहाय्यासाठीं अवतार घेईल !' असें जेव्हां वसुंधरा सांगते, तेव्हां वृंदावन विचारतो, 'कोणता ईश्वर येथें येणार ?' तेव्हां वसुंधरा ताडकन् त्याला सांगते कीं, 'वृंदावन, तुमच्या हृदयांतला ईश्वर !' त्याबरोबर वृंदावन कच खातो आणि दचकून स्वतःशीं म्हणतो, "हा, हृदया, वृंदावनाच्या हृदया, असें चरकूं नकोस ! भीतीनें असें दचकूं नकोस !"

तथापि, त्याच क्षणीं वृंदावनच्या हृदयांतला परमेश्वर आपल्या अस्तित्वाचें स्पंदन करूं लागतो. पुढें परमेश्वराच्या अद्भुत आणि अतर्क्य सामर्थ्याचें एवढें प्रभावी चित्र वसुंधरा वृंदावनाच्या डोळ्यांसमोर उभी करते, कीं त्यामुळें तो 'नाहीं नाहीं' म्हणत असतांना वृंदावनाच्या शरीरांतल्या अणुरेणूंत परमेश्वराचा संचार होतो आणि त्यामुळें अखेर तो तिचा हात धरण्याऐवजीं तिचे 'माते' म्हणून एकदम पाय धरतो नि पति-व्रते, हाच तुझा 'पुण्यप्रभाव !' असें मान्य करतो. प्रेक्षकांच्या काळजांना हात घालणारें जबरदस्त नाट्य ह्या घटनेंत आहे ह्यांत शंका नाहीं.

तथापि, ही घटना घडल्यानंतर आपण दीनाराच्या जागीं केतनाला आणण्याची व्यवस्था केली होती नि केतनच्या जागीं एक मेलेलें मूल आणून ठेवलें होतें असा जो ईश्वर खुलासा करतो अन् वसुंधरा-कालिंदीचे जीवंत दीनार केतन त्यांच्या स्वाधीन करतो, तो सर्व प्रकार हास्यास्पद आहे. कालिंदीला आपल्या हातांतलें मूल हें आपलें मूल नसून तें कोणाचें तरी एक मेलेलें मूल आहे, हें शेवटपर्यंत उमगूं नये, स्मशानांत जळत्या चितेच्या प्रकाशांतहि त्याचा चेहरा तिला ओळखतां येऊं नये, अगदीं त्याचें चुंबन घेतांनाहि त्याच्या ओठाचा स्पर्श तिला समजूं नये ही गोष्ट पराकाष्ठेची अशक्य वाटते. शिवाय ईश्वरानें तरी हें मेलेलें मूल कोठून पैदा केलें होतें हा प्रश्नच आहे. त्यानें तें कांहीं चोरून आणलेलें नसावें. कोणाकडून तरी मागून आणलेलें असावें. पण स्वतःचें मूल दुसऱ्याला कांहीं काळ वापरण्यासाठीं देणारे ते आईबाप म्हणजे अजब्च असावेत !

--

ह्या नाटकामध्यें अगदीं शेवटपर्यंत काळाचा नि वेळेचा विचार न करतां विनोदी पात्रांनीं जो धांगडधिंगा घातलेला आहे, तो तापदायक वाटतो. हे विनोदी प्रवेश लिहितांना कित्येक ठिकाणीं रचनेच्या दृष्टीनें तर इतक्या ढोबळ चुका झाल्या आहेत कीं कांहीं विचारूं नका. उदाहरणार्थ, दुसऱ्या अंकांतला पहिला प्रवेश घ्या. दामिनी घरांत एकटी बसलेली असते. तिला वाटतें आपला नवरा सुदाम बाहेर गेलेला असतो. पण तो घरांतल्या घरांत एका पेटाऱ्यांत दडून बसलेला असतो. वस्तुतः, दामिनीनें घराच्या दाराची कडी आंतून लावलेली असली पाहिजे. असें असतां नूपुर दार उघडून – कसा तें कोणास ठाऊक – आंत येतो. त्यानंतर दरवाजावर चार वेळां थाप वाजते. ही थाप कोण वाजवतें ? सुदाम तर घरांतच आहे. ती थाप ऐकून दामिनी घाबरते ? तिला वाटतें आपला नवरा आला. आणि ती नूपुरला पेटाऱ्यांत लपावयाला सांगून बाहेर कडी काढायला जाते ! पेटाऱ्यांत नूपुर नि सुदाम ह्यांची गाठ पडते. नंतर नूपुर निघून जातो – कोणत्या दारानें कोणास ठाऊक ! दामिनी दारापर्यंत जाऊन परत येते तों तिला सुदाम दिसतो. पण सुदाम बाहेर गेला हें जर तिला ठाऊक होतें, तर सुदाम घरांत आला कोठून आणि केव्हां ह्याबद्दल ती चुकून त्याला अक्षरानें विचारीत नाहीं. ह्या प्रवेश वाचकांनीं मुद्दाम वाचून पहावा. म्हणजे त्यांत पात्रप्रवेशाचा केवढा घोटाळा झाला आहे हें त्यांच्या लक्षांत येईल.

पांचव्या अंकांतल्या तिसऱ्या प्रवेशांतला अग्निदिव्याचा विनोद हा तर अत्यंत औचित्यशून्य नि हास्यास्पद आहे. कोणतीही नाटक मंडळी तो प्रवेश करीत नाहीं म्हणूनच गडकऱ्यांची शोभा शाबूत राहिली आहे. नूपुर आणि कंकण ह्यांनीं केलेल्या किंकिणीच्या प्रियाराधनेंतून गडकऱ्यांनीं निर्माण केलेला विनोद चमत्कृतिपूर्ण असला, तरी या नाटकामध्यें तो सर्वस्वीं विसंगत आहे.

स्फुट काव्यांत अनेक अद्भुत चमत्कार केलेल्या 'गोविंदाग्रजां' च्या प्रतिभेचें तेज ह्या नाटकांत कां लोपावें हें कळत नाहीं. नाटकांतलीं पदें गडकऱ्यांना मुळीं कधीं साधलींच नाहींत. 'पुण्यप्रभावां' तलीं त्यांचीं बहुतेक सारीं पदें रुक्ष आणि दुर्बोध आहेत. 'वाजिव रे बाळा वेल्हाळा,' 'नाचत ना गगनांत नाथा' 'बोल ब्रिजलाला रे,' 'निज बाळा रे गाणें गाते आई', 'नीज गुणी बाळ क्षणीं', आणि 'निरोप द्यावा आतां बाळा' एवढीं सहा पदें काव्य म्हणून गडकऱ्यांच्या कीर्तीला शोभण्याइतकीं सुंदर आहेत. पण नाटकांतलीं गाणीं म्हणून तीं कधींच लोकप्रिय होऊं शकलीं नाहींत.

पण ह्या नाटकांत दोन गाणीं अशीं आहेत कीं जीं गडकऱ्यांनीं स्वतः रचलेलीं नाहींत आणि जीं जवळ जवळ गद्यासारखीं म्हटलीं जातात – तीं ह्या नाटकांतल्या बाकीच्या साऱ्या काव्यावर मात करून जातात. चवथ्या अंकांतल्या पांचव्या प्रवेशांत वृंदावन दीनाराला मारण्यापूर्वी वसुंधरा दामिनीला ( कालिंदीला ) 'अभिमन्यूचें गाणें' म्हणावयाला सांगते. आणि दीनाराच्या पोटांत वृंदावन प्रत्यक्ष कट्यार खुपसतो, तेव्हां

स्वतः वसुंधरा 'शिवलीलामृतां 'तला रुद्राध्यायाचा पाठ म्हणते. ह्या अभिमन्यूच्या गाण्यानें नि रुद्राध्यायाच्या पाठानें दीनाराच्या मृत्यूच्या घटनेला जो कांहीं करुणरसाचा विलक्षण उठाव मिळतो त्याचें वर्णन करावयाला मजजवळ शब्द नाहींत. सारा प्रवेशचा प्रवेश काव्यांत विरघळून जातो.

कथानकाच्या आणि रचनेच्या दृष्टीनें 'पुण्यप्रभाव ' नाटकांत जे अनेक दोष आहेत, त्यांचें आतांपर्यंत दिग्दर्शन केलें. आकाराच्या दृष्टीनें हें नाटक अतिशय बेडौल आहे. आटोपशीरपणा आणि बांधेसूदपणा या नाटकांत कोठें औषधाला पहावयाला मिळणार नाहीं. एवढें असूनहि प्रयोगाच्या दृष्टीनें हें नाटक कमालीचें प्रभावी आहे आणि एका काळीं महाराष्ट्रांत ह्या नाटकानें लोकप्रियतेचा उच्चांक गांठला होता ह्यांत काय शंका ? मी जेव्हां हें नाटक प्रथम पाहिलें, तेव्हां त्याच्या वैभवानें माझे डोळे दिपून गेले होते. आणि मी देहभान विसरून गेलों होतों. 'पुण्यप्रभावा 'च्या ह्या यशाचें रहस्य काय ?

ईश्वराचें आस्तिक्य आणि स्त्रियांचें पातिव्रत्य हे भारतीय संस्कृतीचे दोन प्राणबिंदु आहेत. आपल्या पातिव्रत्याच्या संरक्षणासाठीं स्वतःच्या, पुत्राच्या अन् पतीच्या प्राणांवर पाणी सोडावयाला सिद्ध होणारी स्त्री ही भारतीय संस्कृतीमध्यें आदर्श स्त्री मानलेली आहे. परमेश्वर हा पतिव्रतेचा पाठिराखा असल्यानें तो ऐनवेळीं कोणत्या ना कोणत्या तरी रीतीनें प्रकट होऊन तिच्या पातिव्रत्याचें रक्षण करतो अशीं अनेक उदाहरणें 'महाभारतां 'त आणि 'रामायणां 'त आढळतात. भारतीय संस्कृतीचा गाभा असलेला असा 'पतिव्रतेचा पुण्यप्रभाव ' हा विषय ह्या नाटकासाठीं निवडून गडकऱ्यांनीं त्याचें अर्धे यश आधींच जिंकून ठेवलेलें आहे. बुद्धिवादाच्या कसोटीला अर्थातच हें नाटक उतरणार नाहीं आणि त्या दृष्टीनें तें कोणी बघूंहि नये. या जगांत ईश्वर आहे, भक्तांची लाज राखण्यासाठीं तो ऐन वेळीं धांवून येतो आणि नरपशूंना नारायणस्वरूपी करतो, ह्या गोष्टींवर ज्यांचा विश्वास आहे. त्यांच्याच मनावर ह्या नाटकाचा परिणाम होईल. बहुसंख्य हिंदुसमाज ह्याच मनोवृत्तीचा असल्यानें ह्या नाटकानें त्यांच्या काळजाला हात घालावा, हें साहजिकच होतें.

भारतीय स्त्री, भारतीय जीवन आणि भारतीय संस्कृति ह्यांच्याबद्दल गडकऱ्यांना वाटणारा अपरंपार जिव्हाळा त्यांच्या रसवंतीच्या कारंजांतून उचंबळणाऱ्या पावित्र्याच्या अन् मांगल्याच्या धारांतून ह्या नाटकांतल्या वाक्यावाक्यांतून आणि पानांपानांतून शिंपडलेला असल्यानें त्याच्या स्वर्गीय परिमळानें हें नाटक आरंभापासून अखेरपर्यंत दरवळून गेलेलें आहे. या नाटकांत गडकऱ्यांच्या वाग्वैभवाचा प्रकट झालेला दिमाख अक्षरशः डोळे दिपवणारा आहे. उपनिषदांतील मंत्रांशीं ज्यांची तुलना होऊं शकेल अशा अनेक सुभाषितांचा सुगंधी सडा ह्या नाटकांत सर्वत्र सांडलेला आहे.

पुराणांतले वेंचक नि समर्पक दाखले योग्य प्रसंगीं हळुवार काव्यमय भाषेंत कसे द्यावयाचे आणि प्रेक्षकांच्या काळजांना कसा स्पर्श करावयाचा ह्या कलेंत गडकऱ्यांचा

हात धरणारा लेखक आजतागायत मराठी भाषेंत झालेला नाहीं. तिसऱ्या अंकांतल्या सातव्या प्रवेशांत वसुंधरा दीनाराशीं बोलत आहे, ते तिचे काव्यमय बोल ऐका : " राधेसाठीं गोकुळींचा कान्हा लहानाचा मोठा आणि मोठ्याचा लहान झाला. द्रौपदीसाठीं त्यानें अदृश्य रूपानें उभें राहून तिची लाज राखली. बाळा, त्या भिन्न प्रेमाची आज एका मातृप्रेमांत मिळवणी करून कृष्णासारखा माझ्या धांवण्या धांवशील ना ? अहाहा, अशी मूठ वळवलीस ? एकाएकीं देवानें का तुझ्या मनांत ही प्रेरणा केली ? भरसभेंत दुःशासनानें पदर ओढल्याबरोबर भीमसेनांनीं दशसहस्र नागांच्या बळानें वळविलेल्या वज्रमुष्टीकडे पाहून द्रौपदीदेवीला वाटला नसेल एवढा धीर तुझ्या गोजिरवाण्या बाळमुठीनें माझ्या हृदयांत दाटला आहे. "

वृंदावनानें दीनाराला ठार मारल्यानंतर वसुंधरेनें आपल्यासमोर जे उद्गार काढले आहेत, ते वाचा : " आपल्या प्रेमाची—माझ्या उज्ज्वल शीलाची साक्ष देण्यासाठीं—तुमच्या नांवाची द्वाही फिरविण्यासाठीं आपल्या पहिल्या प्रीतीचा साक्षीदार देवाच्या दरबारीं निघून गेला. आईच्या अब्रूसाठीं आपला चिमणा शिपाई लढतां लढतां गारद झाला ! संसाराच्या सारीपटांतला प्रेमाचा पहिला डाव देव गजाननाला दिला. देवाचें देणें देवाघरीं पावतें झालें. जड जगाचा देह मात्र दीनार मेला. देवाचा आत्मस्वरूप दीनार या पाळण्यांत खेळत आहे. "

शेवटच्या अंकांतल्या अखेरच्या प्रवेशांत तर गडकऱ्यांच्या रसवंतीला अग्निपुष्पांचा बहार आलेला होता. वसुंधरेच्या तोंडून स्त्रीजातीच्या महात्म्याचें जें अमर उपनिषद् प्रकट झालेलें आहे, तें प्रत्येक पुरुषानें मुखोद्गत केलें पाहिजे. " वृंदावन, मातृरूपानें तुम्हांला जन्म देणाऱ्या, पत्नीरूपानें तुमची जन्माची सोबतीण होणाऱ्या, कन्यारूपानें तुमच्या उदरीं जन्म घेणाऱ्या—तुमच्या आयुष्यांतल्या तिन्ही अवस्थांत तुम्हांला कोवळ्या प्रेमाची साक्ष पटवून पुत्र, पति आणि पिता ह्या चढत्या पदवींना नेणाऱ्या स्त्रीजातीची किंमत इतकी कमी समजूं नका ! विश्वांतल्या प्रेमाच्या, मांगल्याच्या, कोमलतेच्या, सौंदर्याच्या आणि पावित्र्याच्या सारभूत सर्वस्वाची स्त्री ही एकरूप विजयपताका आहे. स्त्रीनें तेजाला कोमलतेची जोड दिली आहे आणि स्त्रीनें सत्यावर सौंदर्याचा साज चढविलेला आहे. स्त्रियांसाठीं पर्वत समुद्राच्या पाठीवर नाचले आहेत. साक्षात् परमेश्वरानें स्त्रियांसाठीं स्त्रीरूप घेतलेलें आहे. वृंदावन, भक्त-भगवंताच्या उच्चतम भावनांचा स्त्रीच्या ठायीं प्रीतिसंगम झालेला आहे. एका स्त्रीदेहांत पुरुष आणि परमेश्वर आपापल्या उत्कट गुणांच्या एकरूपानें वास करतात. पुरुष परमेश्वराची कीर्ति आहे; पण स्त्री परमेश्वराची मूर्ति आहे ! "

असले अमृतानें ओथंबलेले नि भावनेनें रसरसलेले संवाद गडकरी लिहूं शकतात म्हणून त्यांचे इतर दोष विसरून प्रेक्षक त्यांच्या पायांवर लोटांगणें घालतात.

नुसत्या एकाद्या शब्दानें, वाक्यानें किंवा कृतीनें अद्भुत नाट्य निर्माण करण्याचें वा संवादांना एकदम कलाटणी देण्याचें विलक्षण सामर्थ्य गडकऱ्यांच्या वाणींत आहे. हीं दोनच उदाहरणें पहा.

**कालिंदी :** बायको म्हणजे पायांची दासी !

**वृंदावन :** मग तिनें बाहेरच्या घडामोडी करण्याचें कारण नाहीं. पायांपुरतें. पाहिलें म्हणजे झालें !

**कालिंदी :** ( त्याचे पाय पकडून ) आणि म्हणूनच हें पाऊल मी कधींहि वांकडें पडूं देणार नाहीं. अशी मिठी घालून बसेन.

त्याबरोबर साऱ्या नाटकगृहांतून टाळ्यांचा प्रचंड कडकडाट होतो.

शेवटच्या प्रवेशांत–

**वसुंधरा :** वृंदावन कबूल करा अगर न करा. तुमच्या हृदयांतला ईश्वर आतां जागा झालेला आहे.

**वृंदावन :** जागा झाला असला तरी त्याला पायांखालीं तुडवून जमीनदोस्त करून टाकीन !

**वसुंधरा :** आपलें हृदय आपल्या स्वतःच्या पायांनीं केव्हांहि तुडवितां येत नाहीं. भोंवतालीं पसरलेल्या वस्तुमात्रांतला ईश्वर एकाद्या पतितानें पायांखालीं तुडवून टाकला तरी त्याच्या हृदयांतला ईश्वर जिवंत रहावा, म्हणून विधात्यानें हृदयाची उभारणी पायांवर केली आहे.

सारे प्रेक्षक ह्या ठिकाणीं अक्षरशः कोलमडून पडतात. आणि गडकऱ्यांच्या नाट्यप्रतिभेच्या झगझगाटानें त्यांचे डोळे दिपून जातात. भाषेच्या असामान्य सामर्थ्यावर गडकऱ्यांनीं नाट्यसृष्टींत एकापेक्षांहि एक विलक्षण चमत्कार करून दाखविले आणि मराठी नाटककारांमध्ये अभूतपूर्व स्थान मिळविलें.

अनुप्रासाचें मराठी भाषेंतलें जें नवें वैशिष्ट्य गडकऱ्यांनीं आपल्या ' प्रेमसंन्यासां 'त प्रथम सुरू केलें होतें, तें पुण्यप्रभावांत भलत्याच थराला गेलें होतें. ' प्रेमसंन्यासा ' मधल्या जयंताची मजल ' चित्तभेदक चितेचें चित्र ', ' मेलेले मनोरथ ' ' प्रेमाचे प्रेतप्राय प्रलाप ', ' करपलेल्या कल्पना ', ' मुक्या मनाच्या मातींत मिसळलेल्या महत्त्वाकांक्षा ' येथपर्यंत जाऊन पोहोंचली होती. पण पुण्यप्रभावां 'त तिनें आणखी पुढचा पल्ला गांठला.

**ईश्वर :** विश्ववैभवाची वैजयंती लक्ष्मीवल्लभासारख्या लोकैक पुरुषाच्या कंठीं पडली तर तिच्याकडे आशेनें पहाणाऱ्या भणंगानें आपल्या भिकारी भाग्यदेवतेला बोल लावावा. आकाशांतून उतरलेल्या हिमवंतीनें फुलत्या फुलाच्या हृदयांत ठाव घेतल्याबद्दल जमिनीशीं जखडलेल्या दगडानें दुर्दैवाला दोष देत बसावें.

**वृंदावन :** ( १ ) झुळझुळत्या झऱ्याच्या नाजुक झरणीनें काळ्याकभिन्न कड्यालाहि कंगोरा पडतो. ( २ ) संसारांतली सुरेल सतार मांडीवर बसविली, छातीवर ठस-

विली, हृदयाशीं हंसवली तरी तिच्या जिवाच्या तारा पिळून काढल्यावाचून मनासारखे सूर निघत नाहींत ते नाहींत. ( ३ ) पतिव्रते, हा तुझा पुण्यप्रभाव. पतिव्रतांची पुण्याई पातकी पुरुषालाहि परमेश्वराच्या पदवीला पोहोंचविते आणि नरपशूला नारायणस्वरूप करते. पतिव्रतेच्या पुण्याईपुढें पाप पांगळें पडून तिच्या पायाशीं अशी लोळण घेतें.

गडकऱ्यानंतर अनुप्रास हा वाङ्मयीन अलंकार तेवढ्या रुबाबानें मराठी भाषेंत कोणालाच वापरतां आला नाहीं. ज्यांनीं तो वापरण्याचा प्रयत्न केला त्यांच्या तो शिव-धनुष्यासारखा गळ्यांतच आला.

---

१९१४ सालीं केव्हांतरी गडकरी हे मालवणचा सिंधुदुर्ग पाहण्याकरितां गेले होते. त्या किल्ल्याच्या तटावरून ते हिंडत असतां एका बुरुजावर ते थांबले आणि तेथून खवळलेल्या समुद्राचा विलक्षण रोमहर्षक देखावा त्यांनीं पाहिला. त्याच क्षणीं ' राजसंन्यास ' नाटकाच्या नांदीची नि पहिल्या प्रवेशाची कल्पना त्यांच्या मनांत एक-दम विजेसारखी लखाकून गेली. सिंधुदुर्गाच्या उसळत्या लाटांवर मराठी रियासतीभोंवतीं जागत्या डोळ्यांनीं पहारा करीत असलेल्या पांच देवी शिवनेरीच्या बाळाला निज-वण्यासाठीं ' पाळणा ' गात आहेत, ह्या नांदीनें, नाटकाला सुरुवात करावयाची नि नंतर समुद्रांत बुडणाऱ्या तुळशीला वांचविण्यासाठीं संभाजी राजे सिंधुदुर्गाच्या बुरुजावरून उडी मारीत आहेत या प्रवेशानें नाटकाला सुरुवात करावयाची. त्या प्रवेशामधलीं कांहीं वाक्यें तेथल्या तेथेंच घाईघाईनें कागदावर टिपून त्यांनीं त्या नाटकाच्या लेख-नाचा मुहूर्तहि करून टाकला. ही हकीगत स्वतः गडकऱ्यांनीं मला १९१५ मध्यें केव्हां-तरी सांगितली.

त्यावेळीं ' पांच देवींचा पाळणा ' त्यांनीं लिहिलासुद्धां होता. मला तें नांवच मोठें रोमहर्षक वाटलें. म्हणून त्यासंबंधीं मी त्यांना विचारलें. तेव्हां ते म्हणाले, " हरएक रियासतीच्या राखणीसाठीं कोणतें तरी एक दैवत जागृत असतें. इंग्लंड-भोंवतीं सेंट जॉर्ज, स्कॉटलंडभोंवतीं सेंट ॲण्ड्र्यूज आणि आयर्लंडभोंवतीं सेंट पॅट्रिक. त्याप्रमाणें तुळजापूरची तुळाई, सातारची मंगळाई, प्रतापगडची भवानी आई, पुण्याची पर्वती आणि पाराची वरदायी अशा पांच देवी मराठेशाहीच्या संरक्षक होत्या अशी माझी भावना आहे. "

तथापि, ' राजसंन्यास ' नाटकाच्या प्रत्यक्ष लेखनास त्यांनीं पुढें दोन वर्षांनीं सुरुवात केली. कारण, तोंपर्यंत त्या नाटकाचें कथानक संपूर्णपणें शिजून त्यांच्या डोक्यांत तयार होत होतें. यांत्रिक जगांत ज्याप्रमाणें एकाद्या यंत्राचे सर्व बारीकसारीक घटक आधीं तयार केले जातात आणि मग ते एकत्र भराभर जोडून पूर्णावस्थेंत तें यंत्र तयार करण्यांत येतें, तशा तऱ्हेनें गडकरी आपली कलाकृति तयार करीत असत. एखादें

नाटक लिहिण्याचा त्यांनीं निर्धार केला, म्हणजे तें नाटक संपूर्णपणें त्यांच्या डोक्यांत शिजल्याखेरीज आणि त्याचें सर्व आराखडे आणि नकाशे Blue prints कागदावर काढून तयार झाल्याखेरीज ते प्रत्यक्ष लेखनास आरंभ करीत नसत.

त्या नाटकांतले अनेक संवाद, त्यामधल्या कोट्या, सुभाषितें, टाळ्यांचीं वाक्यें हीं सर्व त्यांनीं आधींच कागदावर नोंदून ठेवलेलीं असत. त्यामुळें प्रत्यक्ष लेखनाला ते वाटेल त्या अंकापासून किंवा त्यांतल्या कोणत्याही प्रवेशापासून सुरुवात करीत. उदाहरणार्थ, ' राजसंन्यास ' नाटकाच्या शेवटच्या अंकाचा पांचवा म्हणजे शेवटचा प्रवेश त्यांनीं २३ जून १९१६ रोजीं सायंकाळीं मुंबई येथें लिहिला. त्याच अंकांतले पहिले चार प्रवेश त्यांनीं ८ नि १० सप्टेंबर १९१६ रोजीं पुणें येथें लिहिले. त्यानंतर पहिल्या अंकांतला पहिला प्रवेश ५ नोव्हेंबर १९१६ रोजीं नाशिक येथें आणि दुसरा प्रवेश ७ जानेवारी १९१७ रोजीं जळगांव येथें त्यांनीं लिहिला. असें हें गडकऱ्यांच्या नाट्यलेखनाचें विक्षिप्त त्रांगडें होतें. शेवटचा अंक पहिल्यानें लिहावयाचा अन् पहिला अंक शेवटून लिहावयाचा, असला ' आधीं कळस मग पाया रे ' चमत्कार केवळ मराठी वाङ्मयांतच नव्हे तर माझ्या माहितीप्रमाणें जगाच्या वाङ्मयांत दुसऱ्या कोणत्याहि नाटककारानें केला असेल असें मला नाहीं वाटत.

' राजसंन्यास ' नाटकांतील मूळ पुस्तकाच्या प्रारंभीं अकरा पानांचा जो मजकूर जोडलेला आहे तो गडकऱ्यांनीं लिहून ठेवलेल्या टिपणांवरून मीच तयार केलेला आहे. ' राजसंन्यास ' नाटकाच्या अपूर्ण भागांतील कांहीं मुख्य प्रवेशांची साधारण कल्पना या मथळ्याखालीं जो पांच प्रवेशांचा स्थूलमानानें सारांश दिलेला आहे तो मात्र मी स्वतः माझ्या आठवणींवरून त्यावेळीं तयार केलेला आहे. निरनिराळ्या वेळीं ह्या नाटकामधल्या संकल्पित प्रवेशाबद्दल गडकरी आपल्या निकटवर्ती मित्रांजवळ बोलत असत. त्यांतला जेवढा भाग मला आठवला तेवढा मी त्यांत समाविष्ट केलेला आहे.

एकादा पूल किंवा इमारत बांधण्यापूर्वी स्थापत्यशास्त्रज्ञ ज्याप्रमाणें शेंकडो आराखडे तयार करतो, त्याप्रमाणें नाटकांतील कथानकाची मांडणी करतांना त्यांतील पात्रांच्या स्वभावाचे प्राकृतिक भेदाभेद आणि त्यामधील निरनिराळ्या घटनांचा कार्यकारणभाव निश्चित करतांना गडकरी किती सूक्ष्म तऱ्हेने निरनिराळ्या योजना आंखीत असत, तें त्यांनीं लिहून ठेवलेल्या ह्या त्रोटक टिपणांवरून कोणाच्याहि लक्षांत येईल. नाट्यलेखनाची ही शास्त्रीय दृष्टि त्यांना मोल्टन ह्या सुप्रसिद्ध आंग्ल नाट्यटीकाकाराच्या ग्रंथावरून आलेली असावी. आम्ही कॉलेजमध्यें असतांना शेक्सपीअरचा अधिकारी टीकाकार म्हणून मोल्टनचें नांव सर्वतोमुखी होतें. गडकऱ्यांनीं मोल्टन अतिशय काळजीपूर्वक वाचलेला होता, आणि त्यामुळें नाट्यरचनेचे मूलभूत सिद्धांत त्यांना चांगलेच

अवगत होतें. मोल्टनने घालून दिलेल्या नाट्यपरीक्षणाच्या अनुमान पद्धती ( Inductive Method ) चाहि त्यांनीं चांगलाच अभ्यास केलेला होता, हें मला प्रत्यक्ष माहीत आहे. मोल्टननें विशद केलेल्या शेक्सपीअरच्या नाटयतंत्राचा जास्तींत जास्त उपयोग आपल्या ' राजसंन्यास ' मध्यें करावयाचा असें गडकऱ्यांनीं आपल्या मनाशीं ठरविलेलें होतें. त्यामुळें झालें काय तर त्या नाटकाचें लेखन एकदां जें रेंगाळत पडलें तें पडलेंच. मरण्यापूर्वी त्यांचा शेवटचा विचार हा ' राजसंन्यास ' पूर्ण करण्यासंबंधींचाच होता. ' भावबंधना 'चा शेवटचा प्रवेश लिहून झाल्यानंतर त्यांनीं आपल्या लेखकाला सांगितलें कीं, ' उद्यांपासून आपण ' राजसंन्यास ' च्या लेखनाला प्रारंभ करूं या. ' पण दुर्दैवाने ती ' उद्यां ' कधींच उगवली नाहीं. आणि ' राजसंन्यास ' चा संगमरवरी ' ताजमहाल ' तसाच अपूर्ण राहिला.

' राजसंन्यास ' ही कांहीं तरी एक अभूतपूर्व कलाकृति निर्माण करावयाची असें गडकऱ्यांचें सुवर्णस्वप्न होतें. त्या नाटकामध्यें एकापेक्षांहि एक विचित्र घटना निर्माण करावयाचें त्यांनीं ठरविलें होतें. त्यांनीं मला सांगितलेली एक कल्पना ह्या ठिकाणीं आठवते. थोरले आबासाहेब ( म्हणजे राजे शिवाजी ) कसे होते अशी बाळराजे शाहू ह्यांना जिज्ञासा होती. तेव्हां औरंगझेबाच्या दरबारांत राणी येसूबाई नि शाहूराजे बसले असतांना औरंगझेबानें त्याच्या एरव्हीच्या स्वभावाला न शोभेल असें कांहीं औदार्याचें कृत्य केलें. त्यावेळीं राणी येसूबाई बाळराजे शाहू ह्यांना सांगतात, " असे होते आबासाहेब ! " औरंगझेबाच्या ठायीं शिवाजीमहाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचा भास उत्पन्न करून दाखवायचा असला धाडसी चमत्कार गडकऱ्यांखेरीज कोण करणार ?

१९१५ च्या मेमध्यें लो. टिळकांचें ' गीतारहस्य ' पुण्यांत प्रथम प्रसिद्ध झालें. त्याची एक प्रत विकत घेऊन आणि ती काखोटीला मारून एकाद्या शिष्टासारखा मी गडकऱ्यांच्या घरीं गेलों. गडकऱ्यांनीं माझ्या हातून तो ग्रंथ घेऊन त्याची प्रस्तावना घाईघाईनें चाळली. आणि हळहळल्यासारख्या स्वरांत ते उद्गारले, " अरेरे, टिळकांनीं आमची एक कल्पना चोरली ! " तेव्हां मला आश्चर्याचा धक्का बसला. मी म्हणालों, " असें काय बोलतां ? " तेव्हां त्यांनी टिळकांच्या प्रस्तावनेमधल्या शेवटच्या प्याऱ्यांतलें पहिलें वाक्य मला वाचून दाखविलें. " प्रस्तावना संपली. आतां ज्या विषयाच्या विचारांत आज पुष्कळ वर्षें घालविलीं व ज्याच्या नित्य सहवासानें व चिंतनानें मनाचें समाधान होऊन आनंद होत गेला, तो विषय ग्रंथरूपानें हातानिराळा होणार म्हणून वाईट वाटत असलें तरी–" आणि मला म्हणाले, " राजसंन्यासच्या, प्रस्तावनेमध्यें अगदीं हाच, हाच विचार ह्याच भाषेमध्यें मी मांडणार होतों. पण आतां कांहीं तो विचार मला लिहितां येणार नाहीं. नाहींतर टिळकांची कल्पना मी चोरली असा माझ्यावर आरोप यावयाचा ! " " म्हणून, तुम्हीच त्यांच्यावर चोरीचा आरोप करतां कीं काय ? " मी हंसत म्हणालों.

'राजसंन्यास' च्या विचारांत गडकरी किती व्यग्र असत ह्याचें आणखी एक उदाहरण त्यांनीं मला जें सांगितलें तें सांगतां. ते म्हणाले, "पुष्कळदां मी माझ्या माडीच्या मोकळ्या भागांतून 'राजसंन्यास' चा विचार करीत फेऱ्या मारीत असतां. अशा वेळीं माझी एवढी तंद्री लागते कीं समोरून प्रत्यक्ष आबासाहेब ( शिवाजी ) येताहेत असा मला भास होतो. आणि त्यांच्या अंगाला आपलें अंग लागूं नये म्हणून मी अंग चोरून बाजूला होतों नि त्यांना वाट देतों."

गडकऱ्यांची वैशिष्ट्यपूर्ण भाषा हें त्यांच्या सर्वच नाटकांचें सौंदर्य नि सामर्थ्य आहे. पण त्यांच्या सर्व नाटकांत 'राजसंन्यास' मधली जोमदार मराठमोळ्या घाटाची आणि बालेघाटी थाटाची शाहिरी भाषा म्हणजे मराठी भाषेला एक भावभेटीचें अहेव लेणें होय. ही भाषा कमावण्यासाठीं त्यांनीं साऱ्या शिवकालीन बखरी, पत्रें आणि वाङ्मय अक्षरशः मुखोद्गत करून टाकलें होतें. आणि ती भाषा प्रत्यक्षांत कशी वापरतां येते हें पाहण्यासाठीं त्यांनीं 'कृष्णा कांठीं कुंडल' हें शाहिरी काव्य लिहिण्याचा प्रयोगहि पण केला होता.

'राजसंन्यास' नाटकासारखी त्याची 'अर्पणपत्रिका'हि पण अद्भुत होती. तें नाटक त्यांनीं कोणाला अर्पण केलें असावें बरें? आपलें 'तोड-ही-माळ' हें संकल्पित नाटक ज्याप्रमाणें त्यांनीं 'केवड्याच्या बनांत दडलेल्या नागिणीला' अर्पण करावयाचें ठरविलें होतें, त्याप्रमाणें 'राजसंन्यास' हें नाटक श्रीशिवरायांच्या जळत्या चितेंत उडी मारणाऱ्या त्यांच्या आवडत्या 'मोत्या' कुत्र्याला अर्पण करण्याची त्यांची इच्छा होती. त्या 'अर्पणपत्रिकें'त ते लिहितात, "( शिव ) प्रभूचें शुभावसान झाल्याबरोबर त्या मुक्या इमानानेंहि त्यांना स्वर्गापर्यंत सोबत केली. आज रायगडावर त्याची भाग्यशाली समाधि राजांच्या शेजारीं मांडीला मांडी लावून बसलेली तिन्ही लोक डोळ्यांनीं पाहात आहेत. त्या समाधीवर त्या चतुष्पाद पशूची पूजा बांधण्यासाठीं नरदेहाचा नसता अभिमान सोडून माझ्या या 'राजसंन्यासा'च्या पामर बोलांची-डोंगरपठारीवरच्या या रासवट रानफुलांची पांखरण करून ठेवीत आहें."

एकदां गडकरी 'राजसंन्यासां'तल्या पहिल्या अंकांतला पहिला प्रवेश वाचून दाखवीत होते. ऐकणारांत दोघेतिघे होते. त्यांत मी एक होतों. एवढ्यांत खालून अच्युतराव कोल्हटकरांची हांक आली. गडकरी लगबगीनें जिन्याजवळ गेले आणि वरून म्हणाले, "आमचा जिना अरुंद आहे. जरा जपून या!" तेव्हां अच्युतराव जिना चढतां चढतां खालूनच ओरडले, "Narrow is the way that leads to heaven!" ( स्वर्गाची वाट अरुंदच असते. ) नंतर अच्युतराव वर आले. बसले. तेव्हां गडकरी म्हणाले, "Now it is heaven." ( तुम्ही आल्यानें आतां हा स्वर्ग झाला! ) उभय महापुरुषांची एवढी विनोदी सलामी झाल्यानंतर गडकरी म्हणाले, "बरें, वेळेवर आलांत. मी 'राजसंन्यास'चा एक प्रवेश वाचून दाखवतां." गडकऱ्यांचें

वाचन चालू असतां अच्युतराव अगदीं मंत्रमुग्ध होऊन बसले होते. वाचन संपतांच भावनाविवश स्वरांत अच्युतराव म्हणाले, " मी जर कधीं काळीं या मुंबई इलाख्याचा गव्हर्नर झालों तर प्रत्येक शाळेंत ' राजसंन्यास ' हें पाठ्यपुस्तक नेमीन ! "

' राजसंन्यास ' नाटकांतल्या पहिल्या अंकाचे दोन प्रवेश पूर्ण, तिसरा अर्धवट, तिसऱ्या अंकांतल्या पहिल्या प्रवेशांतलें एकच गाणें आणि पांचव्या अंकांतले पांचहि प्रवेश पूर्ण असा एकंदर सदुसष्ट पानांचा छापील मजकूर आहे. शेवटचा अंक ३९ पानांचा आहे. पहिले चार अंक पस्तीस पस्तीस पानांचे धरले तर, सबंध नाटक गडकऱ्यांनीं पूर्ण केलें असतें तर तें एकंदर छापील १८० पानांचें झालें असतें. म्हणजे गडकऱ्यांच्या इतर नाटकांप्रमाणेंच तें वाजवीपेक्षां जास्त लांब झालें असतें.

' राजसंन्यास ' हें एक तत्त्वप्रधान नाटक आहे. गडकऱ्यांनीं आरंभींच्या टिपणांत लिहून ठेवलें आहे कीं, It is a principle Play. The Principle to underlie the plot is that of राजसंन्यास which exactly would mean सार्वजनिक मनुष्य आणि खासगी मनुष्य ह्यांच्या लढ्यांत जसजशी जबाबदारी मोठी असेल तसतशी इच्छा मरत जाऊन कर्तव्यमय रुक्ष आयुष्य–निरिच्छ आयुष्य–निष्काम क्रिया विजयिनी व्हावयास पाहिजे. सर्वात्मक परमेश्वर निर्विकार आहे. राजा हें परमेश्वराचें जड दृष्टीला दिसणारें स्थूल व व्यापकतम स्वरूप आहे. म्हणून राजा ह्या जगाचा इच्छाविरहित उपभोगशून्य स्वामी आहे. " This theory to be clearly explained to संभाजी by साबाजी in the fourth scene of the first act, and to be actually practised by येसूबाई in the next scene. "

संभाजीच्या जीवनावर शेवटचा पडदा पाडतांना त्याच्या पश्चात्तप्त अंतःकरणांतून अखेरीला हेंच तत्त्वज्ञान बाहेर पडतें, " राजा म्हणजे जगाचा उपभोगशून्य स्वामी. राज्य-उपभोग म्हणजेच राजसंन्यास. " ' ह्या सुंदर तत्त्वाचा प्रमाणबद्ध विकास अपूर्ण राजसंन्यासांत आढळत नाहीं. एवढेंच नव्हे तर संकल्पित प्रवेशांचीं जीं टांचणें राजसंन्यासाच्या आरंभीं आढळतात, त्यांवरूनहि प्रतिपाद्य विषय स्पष्ट होईल अशा रीतीनें त्यांनीं नाटकाची आंखणी केली होती असें वाटत नाहीं ' अशा तऱ्हेची तक्रार श्री. वि. स. खांडेकर ह्यांनीं आपल्या ' गडकरी ' ह्या ग्रंथांत केलेली आहे. ती त्यांची तक्रार किती खोटी आहे हें दाखविण्यासाठीं ' राजसंन्यासां ' तील तत्त्वज्ञानाचा निर्देश त्यांनीं आपल्या ज्या टांचणांत केलेला आहे, तें मीं वर दिलेलें आहे. ह्या तत्त्वज्ञानाचें निरूपण पहिल्या अंकाच्या चौथ्या प्रवेशांत साबाजी संभाजीला करतो आणि पुढच्या प्रवेशांत त्या तत्त्वज्ञानाचें प्रात्यक्षिक येसूबाई आपल्या कृतीनें दाखवते अशी स्पष्ट योजना गडकऱ्यांनीं आपल्या टांचणांत केलेली असतांना, त्यांनीं ' आपल्या टांचणांत

तशी आंखणी केलेली नाहीं ' अशा तऱ्हेचें खोटें विधान खांडेकरांनीं ठोकून द्यावें ह्याचें आश्चर्य वाटतें.

आग्रा हा ' ताजमहाला 'साठीं प्रसिद्ध आहे; पण त्याच आग्र्यामध्यें राधा-दयाळजी पंथानें अनेक वर्षांपासून एक संगमरवरी दगडाचें प्रचंड मंदिर बांधण्याचा प्रयत्न चालविलेला आहे. ह्या मंदिराचें स्थापत्य नि शिल्प ह्यांचें सौंदर्य एवढें सुंदर आहे कीं, त्याच्या भिंतीवर, स्तंभांवर नि गवाक्षांवर प्रकट झालेल्या कलेच्या दर्शनानें प्रेक्षक अक्षरशः तोंडांत बोट घालतो. ही अद्‌भुतरम्य इमारत कधीं, कोणत्या काळीं पूर्ण होईल हें कांहीं सांगतां येणार नाहीं. बांधकाम वर्षानुवर्षें अखंड नि अष्टौप्रहर चालू आहे. ती इमारत पूर्ण झाल्यानंतर ' कुतुबमिनार'एवढी उंच होईल असें सांगण्यांत येतें. बारा वर्षांपूर्वी आम्हीं जेव्हां त्या इमारतींत पाऊल ठेवलें तेव्हां तिचे तीन का चार मजले पूर्ण झालेले होते. हें सर्व एवढ्या विस्तारानें सांगावयाचें कारण हें कीं, गड-कऱ्यांच्या ' राजसंन्यास ' ह्या नाटकाचा जेव्हां मी विचार करतों, तेव्हां मला आग्र्या-मधल्या त्या अपूर्ण नि अद्‌भुतरम्य संगमरवरी मंदिराची आठवण होते.

' राजसंन्यास ' मधलीं पात्रें, त्यांचा स्वभावपरिपोष, त्यांची भाषा, ' राजा हा जगाचा उपभोगशून्य स्वामी आहे ' ह्या तत्त्वज्ञानानुसार त्यांपैकीं प्रत्येकानें केलेला पराकाष्ठेचा आत्मयज्ञ आणि नाटकांतल्या प्रत्येक प्रवेशाची रचना ह्या सर्व गोष्टी इतक्या कलासुंदर आहेत कीं, त्यांचें कितीहि अवलोकन आणि रसग्रहण केलें तरी मनाचें समाधान होत नाहीं. शिवाजीमहाराजांना ज्यांनीं अंगाखांद्यावर खेळवलेलें असतें ते साबाजी शिर्के आणि हिरोजी फर्जंद हे ऐशीं ऐशीं वर्षांचे मराठशाहीचे दोन एकनिष्ठ सेवक म्हणजे गडकऱ्यांच्या कल्पनाशक्तीचा चमत्कार होय. शिवाजीमहाराजांनीं आपल्या-भोंवतीं जमा केलेलीं अगदीं सामान्य माणसें देखील केवढीं डोंगराएवढ्या छातीचीं आणि उंचीचीं होतीं ह्याचे हे दोन चालतेबोलते जिवंत नमुने गडकऱ्यांनीं ह्या नाटकांत उभे केलेले आहेत. साबाजीचा मुलगा दौलतराव हा मराठ्यांचा दर्यासारंग असतो. याची बायको तुळशी ही हिरोजीची मुलगी असते. तीच संभाजीच्या अधःपाताला कारणीभूत होते. ' राजसंन्यासा ' च्या पहिल्या प्रवेशांत संभाजी आणि तुळशी एक-मेकांवर कशीं आषक होतात ह्याचें विलक्षण अद्‌भुतरम्य दृश्य गडकऱ्यांनीं चितारलेलें आहे. हा पहिला प्रवेश म्हणजे ह्या नाटकाचा सुवर्णकळस होय. आपण पृथ्वीतलावरील एखाद्या नाटकांतला प्रवेश पाहात नसून एकादें स्वर्गीय स्वप्न पाहात आहोंत किंवा काय असा भास होतो. कोणत्याहि नाटकाची अशी सुरम्य मनोहर सुरुवात झालेली मला माहीत नाहीं. अर्थात् हें दृश्य नाटकापेक्षां चित्रपटांतच जास्त यथार्थतेनें दाखवितां आलें असतें.

मालवणच्या सिंधुदुर्गाच्या बुरुजावर संभाजीराजे, दर्यासारंग दौलतराव आणि इतर अधिकारी असतात. समुद्र तुफान खवळलेला असतो. तशा दरियांतून आपलें जहाज हांकारण्याची राजांना इच्छा असते. बुरुजाखालीं घाटावर दौलतरावांची बायको तुळशी आपल्या लहानशा होडींत पाय टाकीत असते. तशा तुफान समुद्रांत होडी टाकणें धोक्याचें असतें, असा इशारा तुळशीची दासी मंजुळा तिला देते; पण बेफाम मनोवृत्तीची तुळशी तिचें सांगणें धुडकावून लावते. ती म्हणते, " मी अशा सांगितल्या बुद्धीची नाहीं. पांख मोडल्यावर मैना कसली? गळा दाबल्यावर कोयल कसली? दांत पडल्यावर नागीण नाहीं नि डोळे फोडल्यावर वाघीण नाहीं!" राजसंन्यासमधल्या गडकऱ्यांच्या भाषेचा सर्रास असा थाट आहे. म्हणूनच त्याच्या झगझगाटानें प्रेक्षकांचे नि वाचकांचे डोळे दिपतात.

तुळशी आपली होडी समुद्रांत घालते. कांहीं वेळानें तिची होडी उलटते. आणि ती दिसेनाशी होते. तेव्हां मंजुळा 'धांवा, धांवा!' म्हणून ओरडूं लागते. आपल्या बायकोला वांचविण्यासाठीं समुद्रांत उडी घ्यायला संभाजीराजे दौलतरावाला सांगतात. दौलतराव बेपर्वाईनें बोलतो कीं, " अष्टौप्रहर काळाच्या कडेवर खेळणाऱ्या या बेमुर्वत बायकोसाठीं जिवाचें मोल ठरविण्याइतका मी मूर्ख नाहीं." तेव्हां " नवऱ्यानें बायको बुडविली तरी राजानें प्रजा तारली पाहिजे." असें म्हणून 'रायगडचा परमेश्वर' संभाजी तुळशीला वांचवण्यासाठीं समुद्रांत उडी घेतो.

बुडत असलेल्या तुळशीला संभाजी राजे वाचवितात अन् मग दोघेहि एकमेकां-वर आषक होऊन प्रेमसागराच्या लाटांवर हेलकावे खात खात बोलूं लागतात :

तुळशी : आपल्याकडे पहातांना नजरेची ज्योत पापणीनें मालवली—उरींची लाज पदरानें पालवली—आज जवानमर्दीच्या बादशहाने माझ्या जीवनवंतीला कांटेरी भूषणें बहाल केलीं— सह्याद्रीच्या राजसिंहा, सिंधुदुर्गाच्या वाघिणीची आज गाय झाली—

संभाजी : प्यारी, मानवलोकींचीं लग्नं रद्द करून रायगडचा राजा आज पुन्हां तुझ्याशीं लग्न करीत आहे. मस्तकावरून सुटणाऱ्या ह्या थेंबांची-सौंदर्याच्या या मोत्यांची बिनसराची मुंडावळ तुझ्या कपाळीं शोभते आहे. समोर संध्याकाळचा होम पेटला आहे. तुफान दरियांत मरणाचा नेम नसल्यामुळें काळाचा एकच पाश आपल्या दोघांच्या कंठांत आहे. त्याचीच लगीनमाळ करून डोंगरलाटेच्या बोहल्यावर मावळत्या देवाच्या साक्षीनें मरणाचा मुहूर्त साधून रायगडचा राजा मनाच्या मुक्या मंत्रानें तुळशी, तुझ्याशीं लग्न लावीत आहे.

त्यानंतर संभाजीराजे तुळशीला घेऊन तिच्याबरोबर रायगडावर उघडपणें राहूं लागतात. एक दिवस ते गंगासागरांत तुळशीसमवेत जलविहाराला गेले असतां परत कांठावर येतांच राजांना ओवाळण्यासाठीं येसूबाई पंचारती घेऊन उभ्या असलेल्या त्यांना दिसतात. तें पाहून ते विचारतात, 'पंचारतीचें कारण?' येसूबाई उत्तरतात, 'अद्‌भुत

पराक्रम गाजवून परत घरीं येणाऱ्या वीराला पंचारतीनें ओवाळण्याचा भोंसल्यांच्या कुळांत रिवाज आहे. काशीची गंगा व रामेश्वरचा सागर एकत्र करून थोरल्या महाराजांनीं गंगासागर हें राष्ट्रतीर्थ रायगडावर निर्माण केलें. तें आपल्या पराक्रमानें आपण पावन केलेंत. म्हणून मी आपल्याला ओवाळतें आहें !' हें जलाल अंजन डोळ्यांत पडतांच संभाजी राजे शुद्धीवर येतात आणि ते तुळशीला हाकून देतात. हा प्रवेश गडकऱ्यांनीं लिहिलेला नाहीं.

आपल्या बायकोला रखेली बनवून आपल्या संसाराची राखरांगोळी केल्याबद्दल दौलतराव संभाजीवर भयंकर चिडतो. आणि म्हणून त्याच्यावर सूड उगवण्यासाठीं दर्यासारंगपदावर लाथ मारून दौलतराव मोगलांना मिळावयाला जात असतांना वाटेंत त्याचे वडील साबाजी त्याला भेटतात आणि अडवतात.

**साबाजी :** राजाकडून व्यक्तिस्वरूपांत घडलेल्या अपराधाबद्दल त्याच्या सार्वजनिक स्वरूपाला अपाय करण्यांत अर्थ नाहीं. स्वतःच्या संसाराची राखरांगोळी झाली तरी बेहेत्तर पण अख्ख मराठेशाहीचा संसार शाबूत राखण्यासाठीं मराठ्यांनीं आपलें इमान पणाला लावलें पाहिजे.

**दौलतराव :** केवळ मराठेशाहीच्या इमानाचाच काय, पण मी महाराष्ट्र धर्माचा सुद्धां संन्यास करीन. पण संभाजीचा सूड उगविल्याविना रहाणार नाहीं—

**साबाजी :** ' महाराष्ट्र धर्माचा संन्यास करीन ' असे बोल जातिवंत मराठा, जीव गेला तरी ओठाबाहेर काढणार नाहीं. मराठेशाही मातीला मिळवण्यासाठीं ज्या अर्थी असे शब्द उच्चारून शिर्क्यांच्या आजपर्यंतच्या इमानी अब्रूवर काळोखी आणीत आहेस, त्या अर्थी असली अवलाद जिवंत ठेवणें पाप आहे.

असें म्हणून साबाजी आपल्या पुत्रावर स्वतःच्या हातांनीं वार करतो. एवढ्यांत संभाजीराजांनीं हाकून दिलेली तुळशी राणी येसूबाईवर कसा सूड घ्यावा, ह्याचा विचार करीत करीत तेथें येते. तोंच आपला नवरा दौलतराव शेवटची घटका मोजीत त्या ठिकाणीं पडलेला तिला दिसतो. तुळशीचें व्यभिचारित पतिप्रेम पुन्हां जागृत होतें. आणि ' मराठेशाही मातीला मिळवून मराठ्यांच्या महाराणीला गाय करीन आणि तुमची प्रतिज्ञा पूर्ण करीन ' असें ती आपल्या नवऱ्याला वचन देते. तेव्हां दौलतराव सुखानें प्राण सोडतो. दौलतरावाच्या रक्तानें रंगलेला एक दगड त्याच्या क्रियाकर्मासाठीं जीवखडा म्हणून तुळशी आपल्या पदरीं बांधून घेते. हाहि प्रवेश गडकऱ्यांनीं लिहिलेला नाहीं. तो त्यांनीं मला जसा सांगितला तसा मी सारांशानें लिहिला आहे.

पुढें संभाजीराजे मोंगलांचे कैदी होतात. मोऱ्यांची सेना राणी येसूबाईंना गिरफदार करते. तुळशीची प्रतिज्ञा पूर्ण होते. हर्षोन्मादानें बेफाम होऊन ती राणी येसूबाईच्या पायांतल्या सोन्याच्या साखळ्या आपल्या पायांत घालूं लागते. तोंच तिचे वडील हिरोजी फर्जंद तल्वार उपसून तिच्या अंगावर धावतात आणि ' आई भवानीच्या भंडाराला '

पाय लावून फर्जंदाच्या कुळाला बट्टा लावणाऱ्या त्या कमअस्सल अवलादीला तलवारीच्या एका घावानें ठार करतात. संभाजीराजांचें नांव घेत घेत तुळशी प्राण सोडते. मराठेशाहीशीं बेइमान झालेल्या आपल्या पुत्राला नि कन्येला स्वतःच्या हातांनीं कंठस्नान घालणारे साबाजी शिर्के नि हिरोजी फर्जंद हे ऐशीं वर्षे वयाचे म्हातारे म्हणजे मराठ्यांच्या इमानाचे आणि त्यागाचे जणू कांहीं रायगडाचे दोन अक्राळविक्राळ कडेच होते. असलीं खडकासारखीं बुलंद माणसें छत्रपतींनीं पदरीं बाळगलीं म्हणूनच महाराष्ट्रांत स्वराज्याचा झेंडा फडकला.

'अमृताशीं आळी करणारी ज्ञानोबाची मराठी वाणी आणि अमृताला औषध चारणारी शिवबांची मराठी करणी' ह्यांनीं अवघें भूमंडळ जें गाजविलें त्यानें मंतरलेलीं अन् भारलेलीं सामान्य मराठी माणसें त्या काळीं कोणत्या उंचीपर्यंत जाऊं शकत त्याचे दोन ऊर्जस्वल नमुने साबाजी–हिरोजी ह्यांच्या रूपांनीं, गडकऱ्यांनीं मराठी रंगभूमीवर उभे केलेले आहेत. त्यांचें कौतुक करावयाला मराठी वाणी अपुरी पडेल!

साबाजी नि हिरोजी हे दोघे बाळपणापासूनचे मित्र नि त्यानंतरचे व्याही. पण त्यांनीं एकमेकांवर जें प्रेम केलें त्यालाहि तुलना नाहीं. तुळशीला ठार मारल्यानंतर मोऱ्यांचे लोक हिरोजीवर तुटून पडतात. त्या झटापटींत हिरोजी मारला जातो. एवढ्यांत साबाजी त्या ठिकाणीं येतो. उभय मित्रांची गांठ पडते. 'राजाचें नांव, मोळा भाव, सिद्दीस पाव' असें म्हणत हिरोजी प्राण सोडतो. आणि 'उज हातानें राजांच्या रुजवातीला निघून जातो.'

आपल्या आधीं आपल्याला सोडून गेलेल्या हिरोजीसाठीं साबाजीनें जो शोक केला आहे आणि शेवटीं त्याचा जो निरोप घेतलेला आहे तो पाहिल्यावर फत्तराचा दिल देखील दुभंग होईल. त्याच्या त्या शोकविव्हल अंतःकरणांतून बाहेर पडलेलीं कांहीं वाक्ये देतों :

"हिरू, आजवर जगाकडे चार डोळ्यांनीं पाहिलें. आज या माझ्या दोनच डोळ्यांना इकडेतिकडे पहाण्याची भीति वाटते. अरेरे, हिरकणी, तुझ्या रक्ताला माती कीं रे लागली ही! त्या मातीमोल मोऱ्यांनीं असा हिऱ्यासारखा हिरा मातीला मिळवला. हिरू, काय करूं रे, शंभूदेवाला सोडवण्यासाठीं मला जायचें आहे. माझा हात रिकामा असता तर तुझ्याबद्दलचा सूड पुरतेपणीं घेतला असता. मोऱ्यांच्या मागच्या बेचाळिशीचे गाडलेले मुडदे उकरून, त्यांच्या हाडांच्या हिरक्यांनीं तुझें सरण रचलें असतें. आजच्या मोऱ्यांच्या हाडांचीं काडें काढून तुझी तिरडी तयार केली असती. मोऱ्यांच्या पुढच्या बेचाळिशीच्या कोवळ्या नाळवारांनीं तुझ्या ताटीसाठीं नाड्या केल्या असत्या. या मोऱ्यांचें मुंडकें छाटून त्याची रक्ताळलेली शिंकाळी या हातांत घेऊन राजांच्या नांवानें गर्जत गाजत तुझ्या देहाच्या मिरवणुकीपुढें त्रिखंड नाचत सुटलों असतों."

हिरोजीचा निरोप घेतांना साबाजीनें त्याच्या मृतमुखाचें अखेरचें चुंबन घेतलें. त्यावेळीं तो म्हणतो, "आजवर पित्या बाळाचा मुका घेतल्यामुळें आईच्या ओंठाला तिचं दूध लागलें असेल. तरुणाचे ओठ तरुणीच्या चुंबनानें प्रेमाच्या कल्पनेमुळें अमृतानें न्हाऊन निघाले असतील; पण अशा म्हातारड्या मुक्यानें आपल्या जिव्हाळ्याच्या रक्तानें आपले ओठ अजून कुणी रंगविले नसतील." काळजाला पीळ घालणारे असे एकेक विलक्षण प्रसंग गडकऱ्यांनीं ह्या नाटकांत चितारलेले आहेत.

नरवीर तानाजी मालुसऱ्यांचा पुत्र रायाजी मालुसरे हा संभाजी राजांच्या वेळीं मराठ्यांचा सेनासागर असतो. 'आधीं कोंडाण्याचें लगीन लावीन अन् मग माझ्या रायाजीचं!' असं म्हणून तानाजी मालुसरे 'रायाजीचं लगीन' थांबवून तातडीनें 'कोंडाण्याचं लगीन' लावायला धांवले, पण लढतां लढतां धारातीर्थी पतन पावले. 'गड आला पण सिंह गेला.' तें सगळें झालें. पण रायाजीचें लग्न त्यावेळीं जें राहिलें तें तसेंच राहिलें. त्यानंतर त्यानें पुढें लग्न केलें नाहीं. पुढे तो स्वारीवर गेला असतांना त्याला शिवांगी नांवाची एक सुंदर तरुणी अकस्मात् भेटली. दोघेहि प्रथमदर्शनींच एकमेकांवर आषक झाले. पण त्यानंतर त्यांची जी ताटातूट झाली ती जणूं कांहीं कायमची! दोघेहि परस्परांचें अष्टौप्रहर चिंतन करीत एकमेकांचा शोध करीत होते. रायाजी मराठ्यांचा एवढा मोठा सेनासागर पण शिवांगीच्या प्रेमापुढें त्याला कशाचीहि दिक्कत वाटत नाहीं. असला प्रेमपागल सेनासागर संभाजीराजांनीं आपल्या सेवेंत कसा काय राहूं दिला ह्याचें आश्चर्य वाटतें. पण जेथें स्वतः राजेच इष्काच्या आहारीं जाऊन आपला राजधर्म विसरले होते, तेथें आपल्या सेवकांकडे लक्ष द्यावयाचा त्यांना कुठें होष होता? प्रेमवेड्या रायाजीची शिवांगीबद्दलची प्रारंभींची सर्व बडबड. नाटकाच्या वातावरणाशीं अगदीं विसंगत वाटते. हें वेडें पात्र ह्या नाटकांत गडकऱ्यांनीं कां घातलें असा प्रश्न उत्पन्न होतो. पण प्रारंभीं गैरलागू वाटणाऱ्या रायाजीचा नि शिवांगीचा दुवा नाटकाच्या कथानकाशीं पुढें इतका बेमालूम जुळवून घेतला आहे कीं, त्यामुळें त्या दोन्ही पात्रांबद्दल प्रेक्षकांना विलक्षण जिव्हाळा वाटूं लागतो.

पांचव्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत तुळशी आणि हिरोजी मरतात. मोऱ्यांनीं संभाजीराजांना गिरफदार केलेलें असतें. येसूबाईच्या डोक्यावरचें अक्षरशः आभाळ फाटलेलें असतें. वख्त मोठा बाका असतो. अशा वेळीं संभाजीराजांच्या कुमकेला धांवून जाणें हें सेनासागर रायाजीचें कर्तव्य असतें. पण तशा परिस्थितींतहि त्याच्या डोक्यांतली प्रेमाची धुंदी कांहीं उतरत नाहीं. मग साबाजी संतापतो नि त्याला अशा सणसणीत कानपिचक्या देतो कीं, त्याचे डोळे खाडकन् उघडतात.

**साबाजी :** नादान मुला, मालुसऱ्याच्या घराण्यांत जन्माला येऊन आल्या कामाला अशी कुचराई करतोस? तुझ्याकडे पाहून वरच्या दरबारांत सुभेदारांचा सिंहाचा जबडा चिमणीसारखा झाला असेल. अरेरे, क्रियानष्टा, देवकळा दवडून दगड होण्याची ही

हौस तुला कुठून आठवली ? बिरवाडीच्या बहाद्दराच्या बीजाला बाट लावलास तर उद्यां तुझ्या नांवानें बायकापोरी कीं रे बोटें मोडतील! सारा जनलोक तोंडावर थुंकेल!

तेव्हां रायाजी एकदम शुद्धीवर येतो आणि संभाजीराजांच्या मदतीला तीराच्या तडफेनें धांवत जातो.

पुढें रायाजी येसूबाईंना घेऊन तळकोंकणाच्या मार्गानें घाटमाथ्यावर जातो. तिथें एका आंबराईला त्यांचा मुक्काम असतांना अखेर त्याची शिवांगी त्याला अचानक भेटते. पण त्यांची भेट होते न होते तोंच मान्यांच्या लोकांनीं त्या आंबराईला चौगर्द घेरा घातल्याची बातमी येते. आतां त्यांच्या तडाख्यांतून राणी येसूबाईंना कसें वाचवावयाचें ? तेव्हां रायाजीच्या डोक्यांत एक भयंकर कल्पना येते. मान्याच्या लोकांनीं येसूबाईंना कांहीं पाहिलेलं नसतें. तेव्हां येसूबाईच्या सोन्याच्या साखळ्या शिवांगीच्या पायांत घालून तीच येसूबाई आहे असें नाटक केलें तर मान्याचे लोक शिवांगीलाच येसूबाई समजून पकडून नेतील अन् येसूबाई सहीसलामत वाचतील! रायाजीनें ही आपली कल्पना शिवांगीला सांगितली. ती तिनें तात्काळ मान्य केली. आपल्या प्रेमासाठीं वाटेल तो त्याग करावयाची तिची तयारी असते. राणी येसूबाई त्या तरुण प्रेमिकांची ती आत्यंतिक त्यागबुद्धि पाहून हतबुद्ध होतात. पण प्रसंगच असा विपरीत होता कीं, मराठेशाहीच्या रक्षणासाठीं येसूबाईंना तें दुःखाचं सारें विष उघड्या डोळ्यांनीं गिळावें लागतें.

मराठ्यांच्या महाराणीच्या पायांतल्या सोन्याच्या साखळ्यांना पाय लावण्याचें जो महापातक करील त्याला किंवा तिला देहान्त प्रायश्चित्त ही एकच शिक्षा होती. तुळशीनें तें पातक केलें, ती आपल्या बापाच्या हातून मेली. आतां शिवांगीनें तें पाप कितीहि श्रेष्ठ उद्देशानें केलेलं असलं तरी मराठेशाहीची भाग्यदेवता त्या पापाबद्दल तिला कशी क्षमा करणार ? तिच्या कपाळींचं मरण चुकणें आतां शक्यच नव्हतें.

शिवांगीला राणी येसूबाई समजून मान्यांचे शिपाई पकडून नेतात. रायाजी कृतार्थ होतो. 'प्रेमाच्या पोरखेळांतली रायाजीची राणी मरणाचें मोल देऊन मराठ्यांची महाराणी झाली. माझी शिवगंगा श्री महाराष्ट्रगंगा झाली!' त्यानंतर 'रक्तामांसाचा रायाजी मेला. समशेरीपुरता सेनासागर काय तो शिल्लक राहिला.' राजसंन्यासांतली रायाजी–शिवांगीची प्रेमकहाणी त्यांच्या अखेरच्या आत्यंतिक हौतात्म्यानें उजळून निघाली. मराठेशाहीसाठीं जास्तींत जास्त बलिदान कोण करतो ह्याची 'राजसंन्यास' नाटकांतल्या प्रमुख व्यक्तींमध्यें एक प्रकारची चढाओढ लागून राहिलेली दिसते. तेंच ह्या नाटकांतलें प्रधान सूत्र आहे असें समजावयाला हरकत नाहीं.

—

गडकऱ्यांच्या सर्व नाटकांमध्यें 'एकच प्याला'नंतर ह्याच नाटकांतला विनोद

कथानकाशीं सुसंबद्ध आणि सुसंगत आहे. जिवाजीपंत कलमदाने आणि देहू दसरी हीं दोन पात्रें म्हणजे गडकऱ्यांच्या विनोदी प्रतिभेचे दोन इरसाल नमुने आहेत. आपल्या कानावर ठेवलेल्या कारकुनी लेखणीच्या करामतीनें आपल्याला सात पिढ्यांचा सत्यानाश करतां येतो ह्या अभिमानानें कलमदान्यांच्या घराण्यांमधले आपण शिवाजीसारखेच शककर्ते पुरुष आहोंत अशी ह्या जिवाजीला घमेंड असते. कारकुनी कसबाच्या जोरावर वाटेल त्याच्या हातचें अक्षरी वळण काढून त्याला नेस्तनाबूद करणें हा जिवाजीच्या शाईभरल्या हातचा नुसता मळ असतो. म्हणूनच भवानीच्या जोरावर शिवाजीनें रायगडाची दौलत जी मिळविली ती आपल्या 'कलमेश्वरी 'च्या करामतीवर जिवाजीनें आपल्या घरीं पळविली. संभाजी राजाचा मुख्य प्रधान जो कलुशा कबजी त्याच्या हाताखालचा जिवाजी हा कारकून असल्यामुळें त्याच्या पाजी सद्दीचा जोर भलताच वाढलेला आहे.

ह्या जिवाजीची नजर 'चांदणी' नांवाच्या एका पोरीवर बसते. तिच्याशीं संधान जुळवण्यासाठीं तिच्या जिवाभावाचा मैत्र जो देहू पहिलवान त्याला तो आपल्या हाताखालीं 'दसरी' म्हणून गुंतवून टाकतो. ताकदीच्या जोरावर मुलुखांत पुंडाई करून शिवाजीराजा होण्याचें देहू दसरीला वेड लागलेलें असतें. शिवाजीराजा होण्याचा तो कोणत्या रीतीनें प्रयत्न करीत असतो, त्याचें वर्णन त्याच्याच तोंडून ऐका :

"एवढ्यासाठीं मी आडदांड लोकांची संगत करून ठेवलेली आहे. पुंडाई चालू आहेच. हमरस्त्यांत मारामारीशिवाय पाऊल टाकीत नाहीं पुढें. आतां चार गड घ्यायचे. कुठें तरी कुणाच्या अटकेंत गवसायचें. बुरडी पेटाऱ्यांतून पसार व्हायचें. नांवाचीं नाणीं ठोकायचीं. अन् सोन्याचा पुतळा लुटवायचा. कीं एकदम बजरंग बलीकी ! रोज सकाळीं ओढ ओढून नाकाला गरुडाच्या चोचीसारखी मी अणकुची आणतों, वाघनखें नाहींत म्हणून तूर्तास मी मांजरीच्या नखांवरच भागवून नेत आहें. मरतांना गुडघा मोडून घ्यायला सुद्धां मी एका पायावर तयार आहें."

कोणताहि महापुरुष झाला तरी त्याच्या बाह्यांगाची नक्कल करून त्याचा मोठेपणा मिळवण्याची खटपट करणारीं देहूसारखीं फडतूस माणसें जशीं शिवकालांत होतीं, तशीं तीं आजच्या टिळक-गांधी-नेहरूंच्या काळांतहि आढळून येतात. असल्याच उपटसुंभ प्रवृत्तीचें गडकऱ्यांनीं हें फर्मास विडंबन केलेलें आहे. त्याचप्रमाणें महापुरुषांचें महत्त्व केवळ त्यांच्या बाह्यांगावरच आहे असें समजून तेवढ्याच भांडवलावर त्यांची टवाळी करणारे जिवाजीसारखे पाजी लोक प्रत्येक कालखंडांत असतात.

जिवाजी देहूला सांगतो, "अरे शिवाजी, शिवाजी काय घेऊन बसला आहेस ! अरे, शिवाजी म्हणजे मूठ दाबल्या हातीं साडेतीन हात उंचीचा, नाकीं डोळीं नीटस, काळगेल्या रंगाचा, राकटलेल्या अंगाचा, हरहुन्नरी ढंगाचा, लिहिणें पुसणें बेतास बात, गुडघ्यांत अंमळ अधू, असा एक इसम होऊन गेला. त्याची काय मातब्बरी सांगतोस

एवढी ? ”

असें जर होतें तर मग ‘ राजांनीं आपल्या नांवाचा एवढा ग्रंथ कसा केला ’ अशी रास्त शंका साहजिकच देहूच्या मनांत येते. तेव्हां ‘ शिवबांनीं जो एवढा ग्रंथ केला त्याचीं एकूणएक पानें समर्थांनीं खरडलेली होतीं ’ असें सांगून समर्थांनीं ज्याप्रमाणें शिवाजीसाठीं ‘ दासबोध ’ लिहिला त्याप्रमाणें आपणहि तुझ्यासाठीं ‘ कलमबोध ’ लिहूं असें जिवाजी देहूला आश्वासन देतो, तेव्हां देहू हर्षभरित होऊन पहिलवानी उड्या मारूं लागतो.

जिवाजी आणि देहू ह्यांचा पहिल्या अंकांतला हा दुसरा प्रवेश अनेक विनोदी कल्पना-चमत्कृतींनीं बहरलेला आहे. ’ ‘ एकच प्याल्यांत गडकऱ्यांनीं जशी दारूच्या उत्पत्तीची विलक्षण उपपत्ति सांगितलेली आहे... “ उभयतांच्या या अपमानामुळें अग्नि आणि पाणी ह्यांनीं आपापलें नैसर्गिक वैर विसरून सजीव सृष्टीच्या संहाराचा विचार केला. खवळलेले सप्तसमुद्र सूडाच्या बुद्धीनं इवल्याशा टीचभर प्याल्यांत सामावून बसले. आणि आदित्यानं आपली जाळण्याची आग त्याच्या मदतीला दिली. मनुष्याच्या दृष्टीला भूल पाडणारा मोहकपणा आणण्यासाठीं तरण्याताठ्या विधवांच्या कपाळाचं कुंकू कालवून या बुडत्या आगीला लाल तजेला आणला. या एकाच प्याल्यांत इतकी कडू अवलादीची दारू भरलेली आहे ! ” तशीच शाई नि लेखणी ह्यांच्या उत्पत्तीची कथा जिवाजीच्या तोंडून गडकऱ्यांनीं या प्रवेशांत वदविली आहे :

“ अष्टौप्रहर कानावर बसून ही (कानावरची नागीण ) कानीं पडेल तें ऐकून घेते आणि मग प्रसंग सांपडतांच शाईच्या विषानें तें ओकायला लागते. आणि एकदां बहकली कीं, बेसुमार ! वारा प्यालेलें वासरूं आवरतां येईल, पण शाई प्यालेलें कलम कळीकाळाला आवरायचें नाहीं. शाईची निशा कारकुनी मनाच्याच काय ती पचनीं पडेल. ही शाई म्हणजे साक्षात् कालकूट विषाची कन्या आहे. अन्नाचा कोळसा करून शिरें बनवावयाचें आणि तेजाच्या काळोखीचें काजळ त्यांत मिसळायचें, अशी अनन्वित शाईची पैदास आहे. आणि तिखट पात्याच्या धारेच्या पोटीं लेखणीचा जन्म. शाईचा सोमरस आणि लेखणीची समिधा करून एकाद्याची आहुति घेण्यासाठीं कारकुनानें एक ओळ खरडली कीं, ती वेदवाक्य ! ”

‘ राजसंन्यास ’ मधला एवढा एकच विनोदी प्रवेश गडकरी लिहूं शकले. पुढें ज्या लेखणीच्या दुरुपयोगानें जिवाजी चढतो आणि ज्या चांदणीच्या लोभानें तो चळतो त्यांच्याचमुळें तो मान्यांच्या लोकांच्या हातून अखेर अज्ञानानें शिवांगीप्रमाणें मारला जातो, असा त्याचा शेवट गडकऱ्यांनीं योजलेला होता. संभाजीच्या गंभीर शोकनाट्यांत वस्तुतः विनोदाला काय स्थान होतें ? पण तेवढ्यांतल्या तेवढ्यांत नाट्यवस्तूचें अनुसंधान न सोडतां किंवा केवळ हंसवण्यासाठीं विनोदाची योजना न करतां कथानकाच्या प्रवाहांत जिवाजी–देहूचा विनोद अत्यंत कुशल हातांनीं गडकऱ्यांनीं सोडून दिलेला

आहे. त्याबद्दल त्यांचें जेवढें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे.

--

आतां ह्या नाटकांतल्या शेवटच्या प्रवेशाचाच काय तो विचार करावयाचा बाकी राहिलेला आहे. तुळापूरच्या मोगल छावणींतल्या तुरुंगांत संभाजी राजे अगदीं मरणोन्मुख मनस्थितींत बसले असतांना त्यांना त्या तुरुंगांतून सोडविण्यासाठीं बुरखा पांघरुन ऐंशी वर्षांचा साबाजी येतो. त्यानें आपल्याबरोबर बेगमेच्या शिक्क्याचा परवाना आणलेला असतो. तो दाखवला तर कोणीहि मज्जाव करणार नाहीं; म्हणून तो घेऊन आणि आपला बुरखा पांघरुन संभाजी राजांनीं त्या तुरुंगांतून बाहेर पडावें, अशी साबाजीची योजना असते.

**संभाजी :** आणि तूं ?

**साबाजी :** तुला इथें राहून जें करावें लागणार तें मी करीन.

**संभाजी :** स्वर्गाला कंटाळलेले देव का रे तुमच्या मनींमानसीं वसतीला उतारा करतात ? अमृताच्या चुळा टाकीत का रे तुमची रसवंती अवतरत असते ? साबाजी, मेलेल्याला मारण्यांत काय मौज आहे बरें ? तुझ्या पवित्र प्राणांच्या मोबदल्यानें या कवडीमोल शरीराचा सांभाळ करूं ?

**साबाजी :** लाख मरोत, पण लाखांचा पोशिंदा न मरो ! तुझ्या मूर्तीकडे सारी मराठेशाही डोळे लावून बसली आहे. तुझ्याविणें आई भवानीची पूजा थांबली आहे.

**संभाजी :** तो संभाजी मरणावांचून मेला. आणि हा संभाजी जिवावाचून जगत आहे. जिवांत जीवपणा नाहीं. देहांत देहपण नाहीं. नुसतें संभाजी हें नांव राहिलें.

**साबाजी :** राजा, जें तुझ्या नुसत्या नावीं आहे तें आमच्या गांवींसुद्धां नाहीं—

**संभाजी :** गांव वाहून गेलें. नांव राहून गेलें.

**साबाजी :** तुझें नांव ? रामनामानें नुसते डोंगर तरले. पण राजा तुझ्या नांवानें— मराठेशाहीच्या छत्रपतींच्या नांवानें–नऊ खंड पृथ्वी उद्धरून जाईल. राजा तुझें नांव नीट ऐक. गोब्राह्मणप्रतिपालक हिंदुपदपादशहा श्रीमंत छत्रपति संभाजी महाराज !

**संभाजी :** नाहीं, साबाजी ही माझी किताबत नाहीं. हा संभाजी म्हणजे केवळ रंडीबाज छाकटा. काशीची गंगा आणि रामेश्वरचा सागर एकवटून छत्रपतींनीं बांधलेल्या राष्ट्रतीर्थाची—श्रीगंगासागराची ज्यानें व्यभिचाराच्या दिवाणखान्यांतली मोरी बनविली तो हा संभाजी. वैराग्याच्या वेगानें फडफडणाऱ्या भगव्या झेंड्याला दारूबाजाचें तोंड पुसण्याचा दस्तीरुमाल केला ! महाराष्ट्रलक्ष्मीच्या वैभवाचा जरीपटका फाडून त्याची रांडेसाठीं काचोळी केली !

लाव्हारसांत लेखणी बुडवून हे सारे ज्वलंत संवाद गडकऱ्यांनीं लिहिले असा-वेत असें वाटतें. त्यानंतर ज्या बाळाजी आवजी चिटणिसांना संभाजी राजांनी हत्तीच्य

पायाखालीं दिलें, आणि ज्या मातोश्री सोयराबाईंना जितेपणीं भिंतीमध्यें चिणून मारलें अन् ज्या शिरक्यांचीं शिरें आकाशांत उडविलीं, त्यांचे आत्मे आपलीं पूर्वींचीं रूपें घेऊन आपल्यावर सूड घेण्यासाठीं तळमळताहेत असा संभाजी राजांना भास होतो. त्यानंतर छत्रपति शिवाजी राजांची आणि श्रीसमर्थांची मूर्ति आपल्याकडे रागानें पहात आहे, असें त्यांना दिसूं लागतें. त्याच वेळीं 'राजसंन्यासा' ची प्रेरणा संभाजी राजांच्या मनांत निर्माण होते. त्याबरोबर आपल्या डोक्यावरचा मराठेशाहीचा जिरेटोप 'श्रीसमर्थांच्या साक्षीनें आबासाहेबांच्या डोळ्यांदेखत छत्रपतींच्या मस्तकस्पर्शानें पवित्र झालेल्या साबाजीच्या तीर्थस्वरूप चरणांवर' अर्पण करून तो त्यांना 'उद्याच्या श्री राजाराम महाराजांच्या मस्तकावर' नेऊन ठेवावयाला संभाजी राजे सांगतात. आणि 'राजा म्हणजे जगाचा उपभोगशून्य स्वामी, राज्य उपभोग म्हणजे राजसंन्यास' ह्या राजसंन्यासाच्या महामंत्राची घोषणा करतात. येथें नाटक संपतें.

राजसंन्यास हा गडकऱ्यांचा एक महान् वाग्यज्ञ आहे. मराठी इतिहासाची, मराठी संस्कृतीची, मराठी भाषेची, मराठी शौर्याची आणि मराठी इमानाची ही एक अमर गाथा आहे. ऊर्जस्वल भावनांची आणि देदीप्यमान विचारांची मराठी साहित्यावर उठलेली ही एक उत्तुंग लाट आहे. शिवकालामधला एकादा रायगडासारखा वा सिंहगडासारखा प्रचंड किल्ला पहात असतांना सद्यःकालातलें त्याचें उद्ध्वस्त स्वरूप बघून आपल्या मनाची जी स्थिति होते, तशीच गडकऱ्यांचें हें अपूर्णावस्थेंतलें 'राजसंन्यास' वाचीत असतांना आपली स्थिति होते. त्याच्या अपूर्ण स्वरूपांतच त्याची भव्यता आणि सौंदर्य ह्यांचा खरा साक्षात्कार होतो.

गडकऱ्यांनीं आपलें 'एकच प्याला' हें तिसरें नाटक १९१७ च्या नोव्हेंबरमध्यें लिहून पुरें केलें. तथापि, तें नाटक 'गंधर्व नाटक मंडळी' च्या रंगभूमीवर गडकऱ्यांच्या मृत्यूनंतर दहाअकरा महिन्यांनीं आलें. सदर नाटकाचीं बरींचशीं पदें गडकऱ्यांचे 'बंधुतुल्य' मित्र विठ्ठल सीताराम गुर्जर ह्यांनीं लिहिलीं. आणि त्या नाटकाची 'प्रस्तावना' लिहिण्याचें काम सुद्धां त्यांच्याकडेच आलें.

त्या प्रस्तावनेंत 'एकच प्याल्या' ची उभारणी गडकऱ्यांनीं आपल्या 'खऱ्याखुऱ्या अनुभवावर केली' असें अतिरिक्त विधान करून गडकऱ्यांच्या ह्या बंधुतुल्य मित्र गुर्जरानीं आपल्या कैलासवासी बंधूचा गळा ह्या कानापासून त्या कानापर्यंत सफशेल कापला आणि गडकरी हे एक अट्टल दारूबाज होते अशी साऱ्या महाराष्ट्रांत त्यांनीं त्यांची कारण नसतां बदनामी केली. किंबहुना, 'एकच प्याला' हें नाटक म्हणजे

सुधाकरचें चित्र नसून तें गडकऱ्यांचें स्वतःचेंच चरित्र होय असें म्हणण्यापर्यंत कांहीं लोकांची मजल गेली. मद्यपानाच्या व्यसनांत खोलवर बुडालेले गडकरी हे एक कट्टर मद्यपी होते, असा त्यांच्याबद्दल जो सार्वत्रिक समज आजपर्यंत फैलावलेला आहे, त्याला 'एकच प्याला' नाटकाला लिहिलेली गुर्जरांची ही प्रस्तावनाच कारणीभूत आहे. गडकऱ्यांबद्दलची ही समजूत कितपत सत्यास धरून होती ह्याचें विवेचन मीं अन्यत्र केलेलें आहे.

गडकऱ्यांनीं मद्यपाननिषेधावर नाटक लिहिण्यासाठीं 'मूकनायक' नाटकाचा सांचा घेतला असें वरेरकर म्हणतात, ह्या कल्पनेचा विस्तार करतांना ते पुढें म्हणतात कीं, "'मूकनायकां'तली रोहिणी माहेरीं गेल्यावेळीं विकंठ शरच्चंद्र राजाला दारूचें व्यसन लावतो. शरच्चंद्र दारू पिऊन बेहोष असतांना विकंठाच्या चिथावणीनें रोहिणीचा वीणारवा ( विक्रांता )शीं संबंध असल्याचा संशय घेतो, त्याचप्रमाणें 'एकच प्याला' नाटकांत सुधाकर तळीरामाच्या चिथावणीनें सिंधूचा संबंध रामलालशीं असल्याचा संशय घेतो. हा सबंध प्रवेश पुष्कळसा 'मूकनायक' नाटकांतील प्रवेशासारखा आहे. सुधाकर आणि शरच्चंद्र हीं नांवें देखील चंद्राचींच आहेत. 'एकच प्याल्यां'तील सिंधू ही तत्त्वतः 'मूकनायकां'तील रोहिणीचीच प्रतिकृति आहे." वरेरकरांचा हा सर्व युक्तिवाद असत्य आणि भ्रामक आहे. सिंधूचें माहेरीं जाणें आणि रोहिणीचें बापाच्या मृत्यूनंतर त्याच्या घरीं जाणें ह्यांत कांहीं साम्य नाहीं. केवळ ती गेल्यामुळें शरच्चंद्राला विकंठानें दारूचें व्यसन लावलें ह्याचा 'मूकनायक' नाटकांत कुठें उल्लेखहि नाहीं. रोहिणीचा वीणारवाशीं संबंध आहे अशी विकंठ शरच्चंद्राला चिथावणी देतो हें वरेरकरांचें म्हणणें खोटें आहे. शरच्चंद्र दारू पिऊन बेहोष झाल्यावर आपण होऊनच आपल्या डोक्यांतून तें तर्कट काढतो. विकंठ त्या वेळीं कांहींहि बोलत नाहीं. असें असतां त्या प्रवेशाचें, सुधाकर सिंधूचा रामलालशीं संबंध असल्याचा संशय घेतो, या प्रवेशाशीं 'पुष्कळसें' साम्य आहे असें वरेरकरांनीं म्हणावें ही असत्यकथनाची पराकाष्ठा आहे. 'मूकनायकां'त दारू हा जरी विषय असला तरी तो नांवापुरताच. विक्रांताच्या नि सरोजिनीच्या प्रेमांत आणि शृंगारांत तो विषय कोठल्या कोठें वाहून जातो. शिवाय, माणसाला दारूचें व्यसन कां लागतें आणि तें सुटणें कसें दुरापास्त असतें ह्याचें मानसशास्त्रीय विश्लेषण कोल्हटकरांनीं त्या सबंध नाटकांत कुठेंहि केलेलें नाहीं. दारूच्या दुष्परिणामाचें केवळ ढोबळ अन् बटबटीत दिग्दर्शन त्यांनीं केलें आहे.

अर्थात्, गडकऱ्यांच्या आधीं मद्यासंबंधानें लिहिलेल्या 'मूकनायक' आणि 'विद्याहरण' ह्या नाटकांवरून त्याच विषयावर नवीन नाटक लिहिण्याची कल्पना गडकऱ्यांना सुचली नसेल असें मी म्हणत नाहीं; पण 'एकच प्याला' हें नांव, त्यांतील मुख्य तत्त्वज्ञान आणि कथानकाचा सांचा ह्यांच्या कल्पनांचा उगम दुसरीकडे आहे.

'एकच प्याला' हें नाटक गडकऱ्यांना शेक्सपीअरच्या ऑथेल्लोवरून सुचलें असें

जर मी सांगितलें तर कोणी त्यावर विश्वास ठेवील काय ? पण ती खरी गोष्ट आहे. ऑथेल्लो म्हणजे सुधाकर, डेस्डिमोना म्हणजे सिंधु, आयागो म्हणजे तळीराम आणि एमिलीया म्हणजे गीता. हीं चार पात्रें डोळ्यांसमोर कल्पून आणि 'संशया'चें रूपांतर 'मद्यपानां'त करून 'ऑथेल्लो'ची आणि 'एकच प्याल्या'ची जर तुलना केली तर त्या दोन्ही नाटकांमधील साम्य लक्षांत येईल. एवढेंच नव्हे, तर 'एकच प्याला' हें नांव देखील गडकऱ्यांना 'ऑथेल्लो' वरूनच सुचलेलें आहे.

तुर्की आरमाराचा ऑथेल्लोनें पराभव केल्यानंतर त्या विजयाच्या आनंदानें त्याच्या छावणींतले सारे सैनिक आधींच बेहोष होतात. आणि मग त्या बेहोषींत मद्याची भर पडल्यानंतर त्यांनीं त्या रात्रीं काय जल्लोष केला असेल ह्याची कल्पनाहि करतां येणार नाहीं. ऑथेल्लोचा दुय्यम सहाय्यक कॅशियो म्हणून होता. त्याला दारू फार चढे. म्हणून त्यानें त्या रात्रीं फक्त 'एकच प्याला' (One cup only) घेतला होता. पण त्याला दारू पाजून बेहोष करण्याच्या उद्देशानें त्या नाटकांतला खलपुरुष आयागो त्याला फक्त 'एकच प्याला' आणखी पिण्याचा आग्रह करतो. तो त्यांच्यामधला संवाद असा :

**आयागो** : चल, ऑथेल्लोच्या आरोग्यासाठीं आपण आज दारू पिऊं या—

**कॅशियो** : नको रे, आज रात्रीं नको. मला दारू मुळींच सहन होत नाहीं. आनंद व्यक्त करण्याचें दुसरें एकादें साधन नाहीं का ?

**आयागो** : But one cup only (अरे, एकच प्याला !)

**कॅशियो** : अरे, एकच प्याला मी आज रात्रीं घेतला आहे, तो देखील इतका हात राखून, तरी देखील त्यानें माझी काय दशा करून टाकली ती पहा !

**आयागो** : (स्वगत) याला जर मला आणखी एकच प्याला पाजतां आला तर काय मौज होईल ! मग काय हा माझ्या मालकिणीच्या कुत्र्यासारखा पिसाळेल अन् सर्वांना चावत सुटेल !

सारांश, माणसाची पिण्याची जी ठराविक मर्यादा असते, तिच्यांत आणखी 'एकच प्याल्या'ची भर पडली तर तो पशू होतो, ही जी शेक्सपीअरची कल्पना आहे, ती गडकऱ्यांनीं सुधाकराच्या तोंडून चौथ्या अंकांत वदविली आहे. "या संशयावस्थेच्या शेवटच्या दिवसांत तर हें प्रमाण वाढत वाढत इतक्या नाजुक मर्यादेवर येऊन ठेपलेलें असतें कीं बैठक संपल्यानंतर एकच प्याला अधिक घेतला तर तो अतिरेकाचा झाल्यावांचून राहूं नये. संमोहावस्था जाऊन उन्मादावस्था पहिल्यानें सुरू करणारा असा हा एकच प्याला. बरळणं, तोल सोडणं, ताल सोडणं, कुठें तरी पडणं, कांहीं तरी करणं, या गोष्टी अतिरेकामुळें त्याच्याकडून घडूं लागतात."

'एकच प्याल्या'चा मूळ सिद्धांत आणि पात्र चौकट गडकऱ्यांना शेक्सपीअरच्या 'ऑथेल्लो' वरून सुचली असली तरी 'एकच प्याल्या'चें मूळ कथानक गडकऱ्यांनीं

हरि नारायण आपटे ह्यांच्या ' अल्प—चुकीचा घोर परिणाम ' ह्या दीर्घकथेवरून घेतलेलें असलें पाहिजे ह्याविषयीं माझ्या मनांत तिळमात्र शंका नाहीं.

हरिभाऊंच्या त्या गोष्टीचा सारांश असा : विष्णुपंत आणि लक्ष्मीबाई नांवाचें एक सुखी दांपत्य असतें. लक्ष्मीबाई बाळंतपणाकरतां माहेरीं जाते. आणि तिची पाठ फिर-लेली पहातांच दारूच्या रूपानें अवदसा तिच्या घरांत प्रवेश करते. पत्नी माहेरीं गेल्यावर विष्णुपंत खाणावळींत जेवत असे. पण त्या अन्नाला कंटाळून पुढें तो गंगाधर-पंत नांवाच्या एका स्नेह्याच्या घरीं जेवूं लागला. हे गंगाधरपंत चांगलेच दारूबाज होते. एकदां विष्णुपंतांचें पोट दुखूं लागलें तेव्हां गंगाधरपंतांनीं त्यांना मद्यपानाची दीक्षा दिली. बायको माहेराहून परत येईपर्यंत विष्णुपंतांनीं त्या विद्येंत झपाट्यानें प्रगति केली. घरांतून दारापर्यंत आणि दारांतून गटारापर्यंत त्यांनीं मजल गांठली. लक्ष्मीबाईंच्या दुःखाला कांहीं अंतच राहिला नाहीं. त्यांचा भाऊ त्यांना माहेरीं घेऊन जावयाला तयार होता. पण ती साध्वी त्याच्याबरोबर गेली नाहीं. मोलमजुरी करण्यापर्यंत तिची पाळी आली. दारू पिऊन कचेरींतल्या कामाचे कागद खराब केल्याबद्दल विष्णुपंतांची नोक-रीहि गेली. तरी विष्णुपंतांचे डोळे उघडले नाहींत. शेवटीं दोषी तापानें विष्णुपंत आजारी पडले. त्यांच्या त्या आजारांत लक्ष्मीबाईंनीं रक्ताचें पाणी करून विष्णुपंतांना काळाच्या दाढेंतून बाहेर आणलें. तिच्या त्या अलौकिक भक्तीनें विष्णुपंत शुद्धीवर आले आणि दारूच्या व्यसनांतून त्यांनीं आपली सुटका करून घेतली. ह्या गोष्टीचा शेवट सुखान्त आहे. तेवढें वजा केल्यास तिच्यांत आणि ' एकच प्याल्या ' च्या कथानकांत पुष्कळसें साम्य आहे असें सहज दिसून येतें. आणखी एकच साम्य दाखवून देतों. ' एकच प्याला ' नाटकांत मरणोन्मुख तळीरामाला एकाच वेळीं वैद्यानें आणि डॉक्टरानें तपासण्याची जी विनोदी घटना गडकऱ्यांनीं चितारली आहे ती त्यांनीं सुप्रसिद्ध फ्रेंच नाटककार मोलिअरच्या ' ला मूर मेदेसिन ' ( प्रेम हाच खरा वैद्य ) या नाटकाच्या दुसऱ्या अंकामधल्या चवथ्या प्रवेशामधून घेतलेली आहे. एवढें सगळें सांगून झालें तरी ' एकच प्याला ' हें नाटक केवळ गडकऱ्यांच्या अलौकिक आणि देदीप्यमान प्रतिभेचा स्वतंत्र विलास आहे ह्यांत काय शंका ?

' प्रेमसंन्यास ' आणि ' पुण्यप्रभाव ' ह्या दोन नाटकांपेक्षां तंत्राच्या, भाषेच्या नि परिणामकारकतेच्या दृष्टीनें ' एकच प्याला ' हें नाटक सर्वस्वीं वेगळें आणि वरचढ आहे. ' एकच प्याला ' ह्या नुसत्या नावानेंच ह्या नाटकाची लढाई निम्मी जिंकलेली आहे. इतकें सूचक, प्रभावी नि सुंदर नांव कोणत्याहि मराठी नाटकाला त्यापूर्वी मिळा-लेलें नव्हतें. ' मतिविकार ' ' प्रेमशोधन ' ' प्रेमसंन्यास ' किंवा ' पुण्यप्रभाव ' हीं काय नाटकांचीं नांवें आहेत ? ' एकच प्याला ' हें नांव उच्चारतांच सर्व जगाचा नाश करणारा

तो दारूचा राक्षसी एकच प्याला आपल्या डोळ्यांपुढें उभा रहावो आणि नाटकाच्या स्वरूपाची प्रेक्षकांना तात्काळ कल्पना येते. 'प्रेमसंन्यासा 'ची नि 'पुण्यप्रभावा' ची भाषा कांहीं म्हटलें तरी नटवी, कृत्रिम आणि दीर्घसूत्री होती. संवाद लांबलचक आणि कंटाळवाणे होते. पण त्याचा लवलेश देखील 'एकच प्याला' नाटकांत कोठें आढळणार नाहीं. मराठी भाषेच्या अत्यंत सुबोध, सोज्वळ आणि सात्त्विक स्वरूपाचें ह्या नाटकांत सर्वत्र दर्शन होतें. कोल्हटकरांचें 'मतिविकार' किंवा गडकऱ्यांचें 'प्रेमसंन्यास' ह्यांना सामाजिक नाटकें असें म्हटलें जातें. पण त्यांत समाजाच्या वास्तव स्वरूपाचें क्वचित्‌च दर्शन होतें. किंबहुना, त्यांच्यामध्यें अद्‌भुततेचें एवढें मिश्रण केलेलें आहे कीं वास्तववादाची नि त्यांची फारकतच झालेली आहे असें वाटतें.

'एकच प्याला' बद्दल तसें कोणालाहि म्हणतां येणार नाहीं. तें नाटक पाहतांना रोजच्या रोज तुमच्या डोळ्याला दिसणारें एक भयानक सत्य त्याच्या नागड्याउघड्या वास्तववादी स्वरूपांत नाटककारानें तुमच्यापुढें उभें केलेलें आहे, असाच क्षणोक्षणीं तुम्हांला प्रत्यय येईल. अद्‌भुत आणि काल्पनिक अशी एकहि गोष्ट तुम्हांला त्यांत कोठेंहि आढळणार नाहीं.

दारूच्या व्यसनामुळें सुधाकरासारखा एक बुद्धिमान्, तेजस्वी आणि स्वाभिमानी माणूस आपला स्वतःचा, आपल्या साध्वी पत्नीचा आणि आपल्या संसाराचा कसा नाश करून घेतो ही भयानक गोष्ट गडकऱ्यांनीं अत्यंत प्रभावी भाषेंतून नि रोमांचकारी घटनांमधून प्रेक्षकांना विलक्षण परिणामकारक रीतीनें सांगितलेली आहे. ती गोष्ट पहात असतांना प्रेक्षकांच्या काळजांना पावलोंपावलीं पीळ पडतो आणि पाहून झाल्यानंतर त्यांचा मेंदू कांहीं काळ तरी सुन्न होतो. प्रेक्षकांच्या भावना टेंचून आणि भरडून काढणारें एवढें प्रभावी नाटक मराठी भाषेंत तर दुसरें नाहींच. पण इतर भाषांत असेल कीं नाहीं हें ठाऊक नाहीं. मद्यपानाविरुद्ध निरनिराळ्या देशांतील वाङ्मयांत गोष्ट, कादंबऱ्या किंवा नाटकें काय कमी निर्माण झालीं असतील? पण आम्हांला नाहीं वाटत कीं, 'एकच प्याल्या'च्या तोडीची अपूर्व कलाकृति जगांतल्या कोठल्याहि वाङ्मयांत निर्माण झाली असेल! मद्यपानाविरुद्ध एवढा जबरदस्त प्रचार कोणत्याहि समाजधुरीणांनीं वा धर्मगुरूंनीं आपल्या प्रवचनांतून केला असेल! त्याचें कारण मद्यपानाच्या व्यसनाची अत्यंत मूलभूत आणि शास्त्रीय मीमांसा गडकऱ्यांनीं अत्यंत लालित्यपूर्ण आणि नाट्यपूर्ण भाषेंत ह्या नाटकामध्यें केलेली आहे. त्यामुळें प्रेक्षकांच्या काळजाचा तें ताबडतोब कब्जा घेऊं शकतें.

नाटकांत 'नाट्य' पाहिजे. बाकीचें नसलें तरी चालेल. 'play is the thing' असें शेक्सपीअर म्हणतो. तसलें नाट्य 'एकच प्याला' नाटकांत कांठोकांठ भरून सांडतें आहे. आणि तें नाट्य भीषण (Tragic) असल्यानें त्याचा आघात प्रेक्षकांच्या मनावर जास्त होतो. 'महापुरुषांचा अधःपात' हा भीषण नाट्याचा नेहमींचाच



ग्र-२७०३

विषय असतो. पण महापुरुषांचा एकट्याचाच अधःपात कधीं होत नाहीं त्यांच्याबरोबर त्यांच्याशीं निगडित असलेल्या निरपराध व्यक्तींचाहि निष्कारण नाश होतो. त्यामुळें त्या भीषण नाट्याची तीव्रता पराकाष्ठेनें जाणवते. हॅम्लेटमुळें ऑफिलियाला नि ऑथेल्लो-मुळें डेस्डिमोनाला मृत्यु येतो. एक आत्महत्या करते, तर दुसरीचा खून होतो. त्याप्रमाणें सुधाकराच्या व्यसनाच्या वणव्यांत सिंधूच्या सुखाची, सर्वस्वाची नि प्राणाची राखरांगोळी होते.

'पुण्यप्रभाव' हें नाटक लिहून झाल्यानंतरहि पातिव्रत्य हा विषय कांहीं गडकऱ्यांच्या डोक्यांतून निघून गेलेला नव्हता. तो 'एकच प्याला' नाटकामधून निराळ्या स्वरूपांत प्रकट झाला. 'पुण्यप्रभावा' नें पतिव्रतेच्या पुण्याईच्या सामर्थ्याचें उदात्त दर्शन घडविलेलें आहे, तर 'एकच प्याला' नें पतिव्रतेच्या आत्यंतिक त्यागाचें नि बलिदानाचें देदीप्यमान चित्र रंगविलेलें आहे. दोन्हीहि ठिकाणीं भारतीय संस्कृतीच्या आदर्श मूल्यांचा महान् साक्षात्कार होतो. 'एकच प्याला' ही कथा केवळ भारतीय जीवनांतच शक्य आहे. पाश्चात्त्य समाजांत ही गोष्ट मुळीं संभवतच नाहीं. त्याचा अर्थ असा नव्हे कीं पाश्चात्त्य देशांत मद्यपी नवरे नसतात. असतात, मद्यपानांत सुधाकरावरहि ताण करणारे विवाहित पुरुष पाश्चात्त्य समाजांत शेकडों आढळतील. पण नवऱ्याचें व्यसन दुःसाध्य झाल्यानंतर किंवा प्रमाणाबाहेर गेल्यानंतर त्याच्याशीं निष्ठेनें राहून स्वतःचें जीवन उद्ध्वस्त करावयास पाश्चात्त्य समाजांतली स्त्री क्वचित्च तयार होईल. एकादी तशी निघाल्यास तो दुर्मिळ अपवाद होईल. पतीचें व्यसन आणि पत्नीची निष्ठा ह्यांच्या संघर्षातून 'एकच प्याला' चें शोकनाट्य निर्माण होतें.

आणि लक्षांत ठेवा, कीं हा संघर्ष म्हणजे कांहीं सामान्य व्यसन आणि सामान्य निष्ठा ह्यांच्यामधला नाहीं. पतीची पराकाष्ठेची व्यसनासक्ति आणि पत्नीची पराकोटीची पतिभक्ति ह्यांच्यामधला हा संघर्ष आहे. भीषण नाटकाला नेहमीं असेच अतिरेकी विषय निवडावे लागतात. त्याखेरीज प्रेक्षकांच्या काळजांना वेढे कसे पडूं शकतील? असे सामान्य नवरे पुष्कळ असतील कीं जे मद्यपि असतील, पण सुधाकराएवढा आपल्या संसाराचा सत्यानाश ज्यांनीं करून घेतला नसेल. आणि अशाहि सामान्य बायका पुष्कळ असतील की ज्यांनीं आपल्या पतीच्या मद्यपानाची विशेष पर्वा न करतांना त्याच्याशीं सुखानें संसार केला असेल. पण अशा पतिपत्नीचें जीवन हा नाटकाचा विषय होऊं शकत नाहीं आणि त्यांचीं चित्रें कोणी नाटकांत रेखाटलीं तर तें नाटक पुस्तक असलें तरी कोणी पहायला जाणार नाहीं. अतिरेक आणि अतिशयोक्ति हा सर्वच रसांचा आधारस्तंभ आहे. त्याखेरीज परिणामकारक रसपरिपोष निर्माण होत नाहीं. मद्यपानाचे दुष्परिणामच जर रेखाटावयाचे असतील, तर जेवढ्या भडकपणें आणि भीषणपणें रेखाटतां येतील तेवढा प्रेक्षकांच्या मनावर त्याचा परिणाम खोल होणार; मग त्यासाठीं वास्तवता आणि शक्याशक्यता ह्यांचा बळी द्यावा लागला तरी चालेल.

'एकच प्याला' नाटकांत गडकऱ्यांनीं तेंच केलें आहे. वस्तुतः, ज्यांनीं उभ्या आयुष्यांत मद्याच्या थेंबाला स्पर्श केलेला नाहीं, तो सुधाकर सहा महिन्यांच्या अवधींत एवढा भयंकर दारूबाज कसा काय झाला; ह्याचा खरोखर विचार करण्यासारखा आहे. एवढ्या थोड्या वेळांत इतका दारूच्या आधीन तो कसा काय झाला? त्याला एकच उत्तर. तें हें कीं, सुधाकराच्या स्वभावांतच मुळीं अतिरेक होता. तो त्याचा देहस्वभाव होता. कोणत्याहि क्षेत्रांत त्यानें प्रवेश केला तर त्यामध्यें शेवटच्या सीमेपर्यंत जायचें त्याखेरीज त्याच्या अंतःकरणाचें समाधान मुळीं व्हायचेंच नाहीं अशी त्याच्या मनाची ठेवण होती. ज्याप्रमाणें कांहीं माणसें मितआहार करतात, कांहींचा आहार अपरिमित असतो, तसे कांहीं मद्यपीहि आढळतील कीं जन्मभर ते 'एकच प्याला' पीत रहातील. सुधाकर हा त्या वर्गांतला नव्हता. जोंपर्यंत तो पीत नव्हता, तोंपर्यंत तो मुळींच पीत नव्हता. पण एकदां प्यायला सुरुवात केली रे केली कीं त्यानें पिण्याचा उच्चांक गांठला.

त्याच्या पिण्याच्या अतिरेकाला सिंधूच्या पातिव्रत्याच्या अतिरेकाची साथ मिळाली. मग त्याच्या संसाराचा भडका उडावयाला कितीसा वेळ लागणार! हिंदु समाजांत पतिव्रता बायका काय कमी आहेत? पण सिंधूची जातच मुळीं वेगळी. आत्मनाशाच्या दरींत सुधाकर झपाट्यानें घसरत चाललेला आहे हें तिच्या डोळ्यांना प्रत्यक्ष दिसत असतांना, ती त्याला एका अक्षरानें उणें किंवा वावगें बोलत नाहीं. चुकून कधींहि म्हणत नाहीं कीं, 'तुम्ही हें व्यसन सोडा!' बायका कितीहि सहनशील आणि सोशिक झाल्या तरी नवऱ्याच्या दुर्वर्तनाविरुद्ध सौम्य शब्दांत का होईना, पण एकादें तरी अक्षर त्या बोलणार नाहींत असें कसें होईल? पण सिंधूचें पातिव्रत्यच मुळीं अतिरेकी स्वरूपाचें, तिथें ती काय करणार? चवथ्या अंकाच्या दुसऱ्या प्रवेशांत 'मी आजपासून दारू पिणं सोडलं! कायमचं सोडलं!' असें सुधाकर आपण होऊन म्हणतो तेव्हां ती, 'अहाहा, असं झालं तर देवच पावला! असें म्हणून त्याच्या पायांवर डोकें ठेवते. बस् इतकेंच! तिचा भाऊ पद्माकर सुधाकराला 'दिवाणा दारूबाज' अशी शिवी देतो, त्याबरोबरच सिंधूच्या अंगाचा भडका उडतो. ती कडाडते, "हां, दादा, या घरांत-या पायांसमोर—माझ्यासमोर असं अमंगल मी तुला बोलूं देणार नाहीं. आ—बाप, भाऊ माझे या जगांत कोणी नाहीं! पतिव्रतेला नातीं नसतात. ती बापाची मुलगी नसते. भावाची बहीण नसते. मुलाची आई नसते. देवाब्राह्मणांनीं दिलेल्या नवऱ्याची ती बायको असते." एवढें बोलून ती थांबते म्हणतां कीं काय? ती प्रतिज्ञा करते, "सिंधूचा सगळ्या जगाशीं संबंध सुटला. आपल्या दोघांच्या कष्टाविरहित सगळ्या जगांतली धनदौलत आजपासून मला शिवनिर्माल्य आहे!" आणि आपण होऊन ती दारिद्र्याच्या गळ्यांत मिठी मारते. सारांश, अतिरेकी दारूबाजी आणि अतिरेकी पातिव्रत्य ह्यांच्या संघर्षांतून 'एकच प्याल्या'चें भीषण नाट्य निर्माण झालेलें आहे.

अशा नाटकांत सत्यासत्यतेचा मुळीं विचार करायचा नसतो. जोंपर्यंत नाटककार आपल्या उद्दिष्ट रसाचा नि नाट्याचा परिपोष प्रभावी रीतीनें करीत आहे, तोंपर्यंत कांहीं तरी आगंतुक आक्षेप काढून या रसाची हानि करणें योग्य नाहीं. ' एकच प्याल्या ' वर तसे आक्षेप किती तरी घेतां येतील ! वस्तुतः सुधाकर हा आर्थिकदृष्ट्या, इतका दरिद्री होता असें वाटत नाहीं. रामलाल जरी म्हणतो कीं, ' हा सुधाकर म्हणजे जनसमुद्राच्या गरीब तळाशीं सांपडलेलं एक अमूल्य रत्न आहे ' तरी ते त्याचे शब्द अक्षरशः खरे मानण्याचें कारण नाहीं.

वयाच्या सोळाव्या वर्षी वडील वारल्यानंतर ' पैशांचं पाठबळ नाहीं. आप्तेष्टांचा आधार नाहीं. आईबापांवेगळीं आम्ही दोन पोरकीं मुलं ! अशा वेळीं रामलाल देवा-सारखा पुढं उभा राहिला ! ' अशी कबुली सुधाकरानें पहिल्या अंकाच्या पहिल्याच प्रवेशांत जरी दिलेली असली, तरी केवळ दुसऱ्याच्या मदतीवरच स्वतःची कशीबशी गुजराण करण्याएवढी कांहीं त्याची अन्नान्नदशा झालेली नसावी. सिंधूचा बाप हा कांहीं केलें तरी गिरणीमालक होता. तो कांहीं आपली मुलगी भणंग भिकाऱ्याला देणें शक्य नाहीं. आणि सुधाकर खरोखर तसा असता तर त्यानें लग्नाच्या वेळीं सुधाकराला वीस पंचवीस हजार रुपयांचा हुंडा दिला असता आणि मुलीचें सालंकृत कन्यादान केलें असतें. पण सबंध नाटकांत सिंधूच्या अंगावर एकहि दागिना दिसत नाहीं. एवढी ' लंकेची पार्वती ' ती कशी काय असूं शकेल ?

आणि सुधाकर एकंदर सहा महिन्यांत दारू पिऊन पिऊन किती प्याला असेल ? रोज समजा, तो तीन व्हिस्कीच्या बाटल्या पीत असला— तेंहि अशक्यच होतें— तर त्याचा रोजचा खर्च–त्या वेळीं बाटलीची किंमत पांच रुपये होती त्या हिशोबानें पंधरा रुपयांचा होता. म्हणजे सहा महिन्यांत त्याचा एकंदर खर्च तीन हजारांच्या आंत-बाहेरच असेल. मग, एवढ्या तीन हजारांच्या खर्चामुळें महिना पंधरा रुपयांची पट्टे-वाल्याची किंवा हमालाची नोकरी धुंडाळण्याची पाळी त्याच्यावर कशी काय येऊं शकते ? त्याला काय जुगाराचें, शर्यतीचें किंवा बाहेरख्यालीपणाचें व्यसन होतें ? का, तळीराम त्याच्या खिशांतून पैसे चोरीत होता किंवा दारूच्या नशेंत त्याच्याकडून चेकवर सह्या करून घेत होता ? पण ह्या सर्व शंका खऱ्या असल्या तरी देवळाबाहेर जसे आपण जोडे ठेवतों त्याप्रमाणें ह्या शंका नाटकगृहाबाहेर ठेवूनच आपल्याला तें नाटक पाहा-वयाला पाहिजे. नाटकाची व्याख्या ' Willing suspension of disbelief ' अशी एकानें केली आहे. अविश्वासाची प्रवृत्ति आपण होऊन शिंक्यावर टांगायची अन् मग नाटकगृहांत शिरावयाचें. त्याखेरीज नाटकांतल्या रसाचा आस्वाद प्रेक्षकांना घेतां येणार नाहीं, असा या व्याख्येचा अर्थ आहे.

दारूच्या व्यसनामुळें सुधाकरावर जास्तींत जास्त संकटें किती आणतां येतील ह्याची नाटककारांनीं ह्या नाटकांत पराकाष्ठा केली आहे. मग तीं संकटें खरीं असोत

वा खोटीं असोत. सुधाकरासारखा बुद्धिमान वकील कोर्टात कितीहि प्रक्षुब्ध झाला तरी तो काय न्यायाधीशाला आईमाईवरून शिव्या देईल? कोर्टाचा नि त्याचा वादविवाद कितीहि गरमागरम झाला तरी कोर्टाची अमर्यादा करण्याचा गुन्हा त्याच्यासारख्या हुषार वकिलाच्या हातून होणें सर्वस्वीं अशक्य होतें. 'दादासाहेबांचा सुमार सुटला. मुन्सफाला होय नव्हे वाटेल तें बोलू लागले.' हें तळीरामानें त्या दोघांच्या बाचाबाचीचें केलेलें वर्णन खरें असणें मुळीं शक्यच नाहीं. बरें तें असो. त्यानंतर मुन्सफांनीं काय केलें तर सुधाकराची सनद तेथल्या तेथें सहा महिन्यांसाठीं रद्द करून टाकली. गडकऱ्यांना कोर्ट–कायद्याचें फारसें ज्ञान नव्हतें हें 'प्रेमसंन्यास' नाटकांतच उघडकीस आलें आहे. त्याचीच ही पुनरावृत्ति. वकिलाची सनद रद्द करण्याचा मुन्सफाला अधिकार नसतो, एवढी साधी गोष्ट गडकऱ्यांना कशी माहीत असू नये? वकिलाची सनद दोन कारणांमुळें रद्द होते. एक, त्यानें आपल्या व्यवसायाला लांछन आणणारें (unprofessional) वर्तन केलें तर आणि दुसरें, त्याला फौजदारी गुन्ह्यांत वा नैतिक वर्तनावरून शिक्षा झाली तर! पण गडकरी ह्या गोष्टीचा कशाला विचार करतात? त्यांना काय वाटेल तें करून सुधाकराची सनद रद्द करून टाकायची होती.

बरें, ही सनद परत मिळविण्यासाठीं सुधाकर काय प्रयत्न करतो? कांहीं नाहीं. उलट, तो सिंधूला सांगतो, 'सनदेच्या कामासाठीं खटपट करायची असते चारचौघांकडे जाऊन, तेव्हां हिंडावें लागतें सारखें!' पण ही शुद्ध थाप आहे. चारचौघांकडे जाऊन कशी काय सनद परत मिळणार? पण कोर्टांतलें त्याचें 'प्रॅक्टिस' कमी झालें, तरी त्याचें 'आर्य मदिरा मंडळां' तलें 'प्रॅक्टिस' जोरांत वाढतें आणि एक दिवस तो चिकार दारू पिऊन कोर्टांत जातो. तेथें काय झालें. त्याचें वर्णन भगीरथाच्या तोंडून ऐका: "माईसाहेब, अनर्थ झाला. सुधाकर मद्यपान करून कचेरींत गेला. वाटेल त्याला वाटेल तें बोलूं लागला व मुन्सफांनीं त्याची सनद कायमची रद्द केली." वकील कितीहि दारूबाज झाला तरी दारूच्या आत्यंतिक धुंदींत तो कोर्टांत जाईल आणि अशा तऱ्हेचें वर्तन करील ही गोष्ट सर्वस्वीं असंभवनीय आहे. मग सुधाकरासारख्या असामान्य कायदेपंडिताच्या बाबतींत तर तो गोष्ट मुळीं अशक्यच आहे. आमच्या माहितीचे जुन्या पिढींतले पुण्यामधले चार दोन वकील तर अगदीं पट्टीचे दारूबाज होते. पण उभ्या आयुष्यांत कोर्टामध्यें त्यांच्या हातून वावगें वर्तन कधीं घडलें नाहीं. कोर्टांत ते एकाद्या बाप्पाच्या रुबाबानें हिंडत. घरीं आल्यावर मग त्यांचें काय 'बकरें' व्हायचें तें होईल. पण गडकऱ्यांना त्या गोष्टीशीं कांहीं कर्तव्य नव्हतें. सुधाकराला सनद मिळण्याची शेवटची आशा त्यांना समूळ नष्ट करून टाकायची होती! केवळ एवढ्यानें सुधाकर–सिंधु दारिद्र्याच्या वणव्यांत पुरेशीं भाजून निघणार नाहींत, म्हणून कीं काय आपल्या श्रीमंत भावाकडून अन् बापाकडून एका कपर्दिकेचीहि मदत आपण यापुढें घेणार नाहीं अशी सिंधु प्रतिज्ञा करते आणि कागदाच्या घड्या पाडून त्यावर मिळणाऱ्या आण्या-

दोन आण्यांवर ती आपली गुजराण करूं लागते. कुठं कोणाचं दळण मिळेल कीं काय याची ती चौकशी करूं लागते. सिंधूची उपासमार पाहून अमृतेश्वरीं चाललेल्या सदावर्तांत जाऊन गोडधोडाचे दोन घांस खाऊन यावयाची सूचना गीता सिंधूला करते. तथापि सिंधूचा स्वाभिमान अद्याप शिल्लक असतो. फाटक्या लुगड्याचं निमित्त पुढं करून ती गीतेची सूचना अमान्य करते. करुणरसाचा येथं परमोत्कर्ष होतो. सुधाकराला पश्चात्ताप होतो. आणि ' सिंधु, आजपासून मी दारू सोडली ! ' अशी आपल्या बाळाची शपथ घेऊन तो प्रतिज्ञा करतो. येथून नाटक पलटी खातं कीं काय आणि सिंधु–सुधाकराच्या जीवनावरचीं सारीं मलिन अभ्रें मावळून सुखाचा सूर्योदय पुन्हां त्यांच्या संसारांत उगवतो कीं काय, असें वाटूं लागतं.

कदाचित् सुधाकराला नोकरी मिळाली असती तर एकादे वेळीं त्याची दारू सुटलीहि असती. पण सुधाकराला नोकरी मुळीं मिळूनच द्यायची नाहीं असा गडकऱ्यांनीं चंग बांधलेला होता. तिथं काय करायचं ? नाहींतर पंधरा रुपये पगाराची नोकरी मिळविण्यासाठीं सुधाकराला दोन तीन मैल तंगड्या तोडीत त्यांनीं बंडगार्डनला कशाला पाठविलें असतें ? बंडगार्डनला नोकऱ्या मिळतात हा शोध गडकऱ्यांनीं कोठून लावला ? पूर्वीं पुण्यांत बुधवारबागेच्या बाहेर बेकार लोक नोकऱ्या मिळवण्यासाठीं झुंडीनें उभे असत; आणि गरजू मालक त्यांच्या शोधासाठीं तेथें जात. पण गांवांतले लोक आपल्याला ओळखतील, म्हणून सुधाकर त्या ठिकाणीं जाणें शक्यच नव्हतं. पण मुख्य प्रश्न असा आहे कीं, सुधाकराला पंधरा रुपये पगाराची नोकरी मिळविणें एवढें का दुरापास्त होतें ? त्याच्यासारख्या बुद्धिमान बी. ए., एलएल. बी. वकिलानें कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या दोन शिकवण्या केल्या असत्या, किंवा एकादा इंग्रजी शिकवण्याचा वर्ग उघडला असता तर त्याला रोजचे तास दोन तास काम करून महिन्याचे शंभर रुपये सहज मिळवतां आले असते. आणि कोर्टांत जरी त्याची बदनामी झालेली असली तरी शहरांतील कोणाहि हुषार वकिलानें त्याला आपल्या हाताखालीं शंभर रुपये महिन्यावर फिर्यादीचे कच्चे खर्डे लिहिण्याच्या कामासाठीं ( Drafting ) सहज नेमलें असतें. पण ते सर्व पर्याय गडकऱ्यांनीं मुळीं विचारांतच घेण्याचें नाकारलें. कारण, सुधाकरावर बेकारी लादल्याखेरीज आत्मनाशाची त्याची शेवटची अवस्था मुळीं सुरूच होऊं शकली नसती. दारूबाज दोस्तांनीं त्याला नोकरी तर दिली नाहींच, पण त्याची मानहानि करून पुन्हा त्याला दारूच्या बाटलीकडे दुप्पट वेगानें धांवायला लावलं. तेव्हां मग ' मुलासकट माणुसकीला, सिंधूसकट संसाराला, सद्‌गुणासकट सुखाला, जगासकट जगदीश्वराला ' निर्वाणीच्या निराशेतला शेवटचा प्रणाम करून ' आतां यापुढें दारू—प्राण जाईपर्यंत दारू—शेवटपर्यंत दारू ' असा निर्धार करून दारूची बाटली हातांत घेण्यावांचून सुधाकराला मुळीं गत्यंतरच राहिलें नाहीं.

यानंतर आत्मनाशाखेरीज सुधाकराच्या जीवनाला दुसरा पर्यायच रहात नाहीं.

त्याचें उरलेलें जीवन चित्त्याच्या चालीनें भीषण नाट्याच्या दरीकडे झपाट्यानें उड्या मारीत धांव घेऊं लागतें. एके दिवशीं ' बाळा 'च्या दुधासाठीं जमवलेले पैसे सुधाकराला दारू पिण्यासाठीं हवे असतात. पण ते आधींच सिंधूनें गीतेला दूध आणण्यासाठीं दिलेले असतात. तेव्हां सुधाकराच्या अंगांतला सैतान त्याच्या उरल्यासुरल्या माणुसकीचा गळा दाबून बाहेर पडतो. आपलें मूल हें ' रामलालचें कार्टें ' आहे असें सिंधूच्या पातिव्रत्यावर डांबर फांसून तो आपल्या मुलाच्या डोक्यांत काठी घालून तें मारून टाकतो. त्यानंतर सिंधूला जगणें मुळीं शक्यच नव्हतें. लाडकें मूल नवऱ्यानें आपल्या डोळ्यांपुढें मारलें, ज्या पातिव्रत्याच्या पुण्याईवर अनेक संकटांना तोंड देऊन तोंपर्यंत तिनें तग धरला त्याचा, पतीनें संशय घेतला, मग जगायचें कशासाठीं ? तरी मरतां मरतां नवऱ्यानें आपल्या मुलाला मारलें नाहीं, आपल्याच अंगाखालीं तें चेंगरून मेलें अशी पोलिसांपुढें खोटी जबानी देऊन ती आपल्या पतीचे प्राण वांचवते आणि स्वतःचे प्राण सोडते. तेव्हां मग सुधाकराचे डोळे उघडतात. पण ते कायमचे मिटण्यासाठीं. दारूंत रसकापरासारखें जलाल विष मिसळून तो अखेरचा एकच प्याला घेतो. अन् सिंधूच्या पायांवर डोकें ठेवून मरतो. रिकामा प्याला हातांत घेऊन रामलाल त्याकडे पहात शोक करतो, " एक-दम तीन जीवांच्या तीन परी झाल्या. मूल गेलं, सिंधू गेली, सुधाकर गेला, या जगांत आतां सुधाकराचं काय राहिलं ? सर्वस्वासह हे तीन जीव ज्याच्यांत बुडाले तो तेवढा दारूचा एकच प्याला ! " ' एकच प्याल्या 'चें भीषण नाट्य येथें संपतें.

दारूचें व्यसन मनुष्याला एकदां लागलें कीं त्याच्यापायीं त्याचा नि त्याच्या संसाराचा केवढा भयंकर विध्वंस होतो, एवढें एकच चित्र गडकऱ्यांना जास्तींत जास्त भयानक, विदारक आणि थरारक रीतीनें या नाटकांत चितारावयाचें होतें. तेवढ्यासाठीं त्यांना आवश्यक आणि पोषक असलेला जेवढा कांहीं मालमसाला मिळवतां आला—मग तो शक्य असो अशक्य असो, संभाव्य असो असंभाव्य असो—तो त्यांनी ह्या नाटका-मध्यें ठांसून भरलेला आहे. एकदां मदिरेनें सुधाकराचा कब्जा घेतल्यावर त्याची सनद रद्द होणें, कायमची रद्द होणें, त्याला नोकरी न मिळणें, अठरा विश्वे दारिद्र्य हात धुऊन त्याच्यामागें लागणें, पत्नीच्या शीलाचा त्याला संशय येणें आणि त्याच्या हातून स्वतःच्या मुलाचा खून होणें ह्या संकटरूपी सर्व डाकिणी सुधाकराच्या मुसक्या बांधून त्याला धक्के मारीत आणि खेंचीत खेंचीत आत्महत्येच्या मुक्कामावर नेऊन पोहोंचवितात. एवढ्या मोठ्या माणसाचा तो क्रूर अधःपात प्रेक्षकांना आपले श्वास अवरोधून बघावा लागतो. तोहि त्यांनीं एकादे वेळीं बघितला असता. पण सुधाकराच्या घरादारावरून विध्वंसाचा जो भेसुर रणगाडा फिरूं लागतो त्याच्याखालीं सिंधूसारख्या एका निरपराध नि देवतातुल्य साध्वीच्या शरीराचा जो नाहक चुराडा होतो, तो मात्र प्रेक्षकांना बघवत

नाहीं. करुण रसाला त्यामुळें उधाण येतें. आणि सर्वत्र हुंदक्यांचा हल्कल्लोळ उडतो. भीषण रसाचा नि करुण रसाचा हा जो मुख्य प्रवाह महापूर आलेल्या नदीच्या लोंढ्याप्रमाणें नाटकामधून फुंफाटत जातो, त्याचा वेग किंवा विस्तार कमी करण्याच्या दृष्टीनें गडकऱ्यांनी कोठेंहि ह्या नाटकांत अपप्रयत्न केलेला नाहीं हेंच त्याचें सर्वांत मोठें यश! नाहीं म्हणायला गडकऱ्यांनी आपल्या नेहमींच्या स्वभावाप्रमाणें ह्या नाटकाला रामलाल, भगीरथ नि शरद् ह्यांचें जें उपकथानक जोडलें आहे तें अनावश्यक, गैरलागू आणि अपकर्षकारक आहे. पण हा संबंध भाग गाळला–आणि तो नेहेमीं गाळलाच जातो–तरी त्याचा मुख्य कथानकाला कांहींच उपसर्ग होत नाहीं, रामलाल हें ह्या नाटकांतलें सर्वांत शहाणें आणि समंजस पात्र, पण सुधाकराचा अधःपात थांबविण्यासाठीं निकराचा प्रयत्न रामलाल ह्या नाटकांत कुठेंहि करीत नाहीं. उलट एकादी वाईट घटना घडली कीं बाजूला उभें राहून आंबट चेहऱ्यानें तो त्या घटनेवर लांबलचक व्याख्यान झोडतो आणि 'हें असें कां झालें?' त्याचें तात्पर्य सांगतो. भगीरथाला सुधारण्यासाठीं रामलाल जितका आटापिटा करतो त्याच्या एक शतांशहि तो सुधाकराच्या बाबतींत करीत नाहीं.

तसेंच 'एकच प्याल्या'च्या उपपत्तीशीं 'एकच स्पर्शा'च्या उपपत्तीची सांगड घालण्याचा गडकऱ्यांनीं जो अट्टाहास केलेला आहे, तो हास्यास्पद आहे. 'एकच प्याल्या'च्या रंगीत 'एकच स्पर्शा'ची कल्पना मुळीं बसूंच शकत नाहीं. आतां भगीरथाचा प्रेमभंग झाला म्हणून तो दारू पिऊं लागला. पण पुढें तो ताळ्यावर आला आणि दारू पिणें त्यानें कायमचें सोडून दिलें. यामुळें 'एकच प्याल्या'च्या मूळ कल्पनेला बाध येत नाहीं काय, असें कोणी विचारतात. त्यांना माझें एवढेंच उत्तर आहे कीं, भगीरथ हा एक सामान्य माणूस आहे. तो दारू प्याला काय किंवा न प्याला काय, त्यामुळें त्याच्या स्वतःखेरीज इतरांचें काय नुकसान होणार आहे? सुधाकराची गोष्ट निराळी होती. तो समाजाचा एक जबाबदार घटक होता. अशा माणसानें एकच प्याल्यापासून दूर राहिलें पाहिजे यावर गडकऱ्यांचा खरा कटाक्ष होता.

सुधाकराची सनद रद्द झाल्यानंतर भगीरथानें शरद्ला 'निबंधमाले' मधला 'लोकभ्रम' हा निबंध शांतपणें शिकवत बसावें, अन् हिंदुसमाजांत विधवांची जी विटंबना होते आहे त्याबद्दल तिच्याशीं चर्चा करीत बसावें आणि मागून रामलालनें तेथें येऊन सार्वजनिक शिक्षणावर लांबलचक प्रवचन झोडावें ही नाट्यशून्य विषयांतराची पराकाष्ठा होय. त्याहिपेक्षां तिसऱ्या अंकाच्या अखेरीस नाट्याचा परमोत्कर्ष झाला असतांना चवथ्या अंकाचा प्रारंभ रामलाल शरद्ला रघुवंशांतला एक सर्ग शिकवीत बसला आहे, असल्या मुर्दाड प्रवेशानें गडकऱ्यांनीं करावा म्हणजे अरसिकतेचा अगदीं कळस होय! हेंहि परवडलें, पण चवथ्या अंकांत 'प्राण जाईपर्यंत दारू पिण्याची' सुधाकरानें प्रतिज्ञा केल्यानंतर मग आजारी तळीरामाची प्रकृति तपासतांना वैद्य नि डॉक्टर ह्यांनीं त्याची केलेली विनोदी परवड अगदीं असह्य होते! आणि चवथ्या

अंकांत सुधाकरानें आपलें मूल मारल्यानंतर पांचव्या अंकाच्या सुरवातीला भगीरथ नि शरद् ह्यांचा प्रवेश, त्यानंतर मेलेल्या तळीरामाचें स्मारक करण्यासंबंधींचा 'आर्य मदिरा मंडळा 'चा प्रवेश आणि त्यापुढचा भगीरथ नि शरद् ह्यांचा पुनर्विवाह रामलाल लावून देतो तो प्रवेश, हे तीनहि प्रवेश म्हणजे 'एकच प्याला' ला जोडलेलीं अनावश्यक अशीं तीन ठिगळें होत. गडकऱ्यांच्या हातून असली अक्षम्य चूक कशी व्हावी हेंच आम्हांला कळत नाहीं. पांचव्या अंकांतला चवथा प्रवेश हा फक्त एकच महत्त्वाचा प्रवेश आहे. पहिले तिन्ही प्रवेश गाळून ह्याच प्रवेशापासून पांचवा अंक सुरू करावयाला पाहिजे. आणि तोच परिपाठ नाटक मंडळ्या अनुसरतात.

ह्या नाटकांत 'आर्य मदिरा मंडळ' निष्कारण घुसडण्यांत आलेलें आहे. असा त्यावर आक्षेप घेण्यांत येतो. पण तो तितकासा बरोबर नाहीं. सुधाकराच्या जीवनामधलें भीषण नाट्य तीन अंकांनंतर सुरू होतें. तोंपर्यंत 'आर्य मदिरा मंडळ' हें सुसह्य वाटतें. समाजांतील मध्यम वर्गामधल्या कोणकोणत्या घटकापर्यंत दारू जाऊन पोहोंचली आहे आणि तिनें त्यांच्या जीवनाला केवढें ओंगळ आणि बीभत्स स्वरूप दिलेलें आहे त्याचें अत्यंत हृदयद्रावक चित्र ह्या 'आर्य मदिरा मंडळा 'च्या प्रवेशांत पहावयाला मिळतें. आणि सुधाकराचा अधःपात कोणत्या थरापर्यंत जाऊन पोहोंचणार आहे ह्याची देखील त्यावरून प्रेक्षकांना कल्पना येऊं शकते. चौथ्या अंकांतल्या चौथ्या प्रवेशांत तळीराम आसन्नमरण असल्याकारणानें 'आर्य मदिरा मंडळा' ची बैठक त्याच्या घरीं त्याच्या उशागतीच भरलेली आहे. त्या प्रवेशाचा प्रारंभीचा भाग गैरलागू आहे. तो गाळून 'प्राण जाईपर्यंत दारू' पिण्याचा निर्धार करून सुधाकर तेथें येऊन ठेपतो, तेथूनच तो प्रवेश सुरू व्हावयाला हवा. पांचव्या अंकांतला, तळीराम मेल्यानंतर त्याचें स्मारक करण्याचा सर्वच्या सर्वच प्रवेश सपशेल कटाप करून टाकण्यासारखा आहे.

सुधाकर आणि सिंधु ह्यांच्यानंतर ह्या नाटकांतलीं अत्यंत महत्त्वाचीं पात्रें म्हणजे तळीराम आणि गीता. तळीराम हा गडकऱ्यांनीं आपल्या अवलोकनामधून आणि कल्पनाशक्तीमधून निर्माण केलेला मनुष्यस्वभावाचा एक अत्यंत विलक्षण नमुना होय. अशीं इरसाल व्यसनी माणसें समाजाच्या खालच्या थरांतून अगदीं चोरपावलांनीं वावरत असतात. त्यांचा अगदीं जवळच्या माणसांना सुद्धां पत्ता लागत नाहीं. खांडेकर विचारतात कीं, 'तळीराम इतका दारूबाज होता तर त्याच्या तोंडाची घाण सुधाकराला केव्हांच येऊं नये ही नवलाची गोष्ट नव्हे काय ? सुधाकराच्या घरीं येतांना तळीराम चिपटें मापटें बडिशेप खाऊन अगर शेरभर मर्जी उठवून येत असे, असें मानलें तरी त्याच्या तारवटलेल्या डोळ्यांवरून अथवा बहकणाऱ्या बुद्धीवरून ही गोष्ट सुधाकराच्या सहज लक्षांत आली असती.' खांडेकरांच्या या शंकेवरून तळीराम ही वल्ली त्यांना मुळीं

समजलीच नाहीं. तळीराम जरी अट्टल दारूबाज असला तरी त्यानें दारू पुरेपूर पचविली होती. दारू पिऊनहि तिचीं चिन्हें तोंडावर न दिसतील आणि बुद्धीचा तोल न ढळेल अशी सावधगिरी बाळगण्यांत तो तरबेज होता. तो काय चोवीस तास थोडाच दारूबाज होता ? सुधाकराच्या घरांतलें किंवा कोर्टांत काम करीत असतांना तो थोडाच झिंगून जात होता ? त्याला घरीं किंवा बाहेर दोस्तांच्या खाजगी बैठकींत जो काय धांगडधिंगा घालावयाचा असे, तो घालतांना त्याची चारचौघांत वाच्यता व्हावयाचें काय कारण ? सगळींच अट्टल व्यसनी माणसं आपल्या व्यसनाचा तमाशा साऱ्या जगासमोर मांडीत नाहींत. फार धूर्त असतात तीं. स्वतःच्या व्यसनाचा बभ्रा होऊं नये नि आपल्या अब्रूचें पितळ उघडें पडूं नये म्हणून तीं डोळ्यांत तेल घालून काळजी घेत असतात. आयुष्यांतील एका दुर्बल क्षणीं सुधाकर जर तळीरामाच्या आहारीं गेला नसता, तर तळीरामानें दारूविषयीं सुधाकराकडे चकार शब्दसुद्धां कधीं काढला नसता आणि मग तळीरामाच्या दारूबाजीची गंधवार्ताहि कधीं सुधाकराला लागली नसती.

सुधाकराच्या कर्तृत्वाबद्दल तळीरामाच्या मनांत आदर होता. त्याचा तापट स्वभाव त्याला माहीत होता. म्हणून तो एरव्हीं त्याच्या वाऱ्याला कधीं उभा राहिला नाहीं. पण वेळ कधीं सांगून येत नाहीं म्हणतात ना, योग तसा जमून आला. आणि तळीराम सुधाकराच्या इतका जवळ आला, कीं त्याच्या सर्वस्वाचा विध्वंस करून तो आरपार गेला. सनद रद्द झाली नसती, मानहानीच्या यातना असह्य झाल्या नसत्या, रामलाल परदेशीं गेला नसता आणि सिंधू शरद्‌ला घेऊन माहेरीं गेली नसती, तर सुधाकराच्या आयुष्यांत शिरावयाची तळीरामाला मुळीं संधीच मिळाली नसती. दारूच्या व्यसनांत सुधाकरासारख्या थोर पुरुषाला गुंतवायचें म्हणजे काय सोपी गोष्ट होती ! पण एकादा विषारी डांस जसा माणसाला इतक्या सूक्ष्मतेनें दंश करतो कीं त्याचा त्याला पत्ता लागत नाहीं, त्याप्रमाणें दारूचा पहिला प्याला तळीरामानें सुधाकराच्या हातांत इतक्या नाजुक सफाईनें ठेवला कीं आपण कोणत्या संकटांत उतरतों आहोंत, ह्याचा सुधाकराच्या मनाला ओझरता स्पर्शहि झाला नाहीं. पहिला ' एकच प्याला ' सुधाकराच्या ओठांत गेला रे गेला अन् तळीरामाचें काम संपलें. मग तो प्याला सुधाकराच्या पोटांत पुढें आपोआप वाट चालूं लागला.

तळीराम हा अत्यंत चलाख बुद्धीचा आणि बहुरूपी स्वभावाचा माणूस होता. कोणाशीं कुठें कसें वागावें ह्याचें व्यवहारज्ञान त्याला चांगलें होतें. मित्रमंडळींत तो मोठा गमत्या आणि हजरजबाबी होता. मात्र बायकोशीं वागतांना तो सैतान होता. आणि सुधाकराशीं वागतांना जास्तींत जास्त अदबीचें आणि नम्रतेचें नाटक तो करी. पण कोठपर्यंत ? सुधाकराचा अधःपात होईपर्यंत आणि आर्य मदिरा मंडळाच्या बैठकींत तळीरामाच्या मांडीला मांडी लावून तो बसेपर्यंत. पुढें मग सुधाकराशीं किती सलगी करावयाची ह्याचा त्याला सुमारच राहिला नाहीं.

'दारू' या विषयावर तळीरामानें फार मूलग्राही विचार केलेला होता. दारूबद्दल बडबडणाऱ्यांना दारू ही काय चीज आहे हें मुळीं माहीतच नसतें. दारू एकदां घेतली म्हणजे सुटत नाहीं म्हणून काय झालें? पदवी आणि बायको एकदां चिकटली म्हणजे कुठें सुटते? मद्यपान नीतिमत्तेला फार पोषक आहे. हे त्याचे विचार मोठे गमतीचे आहेत. मद्यपान हें बहुतांशीं हलक्या लोकांच्या हातीं गेल्यामुळें संभावित समाजाकडून दारूची जी हेटाळणी होते, ती बंद व्हावी, मद्यपानाच्या व्यसनाला सभ्य स्वरूप यावें एवढ्यासाठीं त्यांनीं 'आर्य मदिरा मंडळ' काढलेलें असतें. एरव्हीं असें गमतीदार बोलणारा तळीराम दारू पिण्यासाठीं आपल्या बायकोच्या गळ्यांतलें मंगळसूत्र काढून त्यांतले सोन्याचे मणी तोडायला कमी करीत नाहीं. दारू पिऊन कोर्टांत जाण्याची चिथावणी तळीरामानेंच सुधाकराला दिली. दोघेहि एकाच बैठकींत दारू पिऊन कोर्टांत गेले. तेथें सुधाकरानें तमाशा केला आणि कायमची सनद गमावली. पण तळीराम अगदीं शांत होता. जसा कांहीं तो त्या गांवचाच नव्हता. सुधाकराच्या झोकांड्या जात होत्या. त्याला चालतां येत नव्हतें. पण तळीरामानें त्याला नीट सांवरून घरीं आणून बिछान्यावर झोंपवलें.

सुधाकराशीं एवढी दोस्ती झाल्यावर मग तळीरामानें त्याच्या कानांत हळूहळू विष ओतावयाला सुरुवात केली. 'तुम्हांला आपल्या घरांत किंमत नाहीं, हें घर राम-लालचें आहे, आम्हांला त्यांनीं ह्या घरांत येण्याची बंदी केली आहे, तुमची सनद गेली तेव्हां रामलालनें सिंधूला मिठी मारली!' वगैरे वगैरे. मग काय विचारतां? सुधाकर आधींच प्यालेला. त्यांत आणखी ह्या विषाची भर! त्यानें तळीरामला सिंधूच्या गळ्यांतलें मंगळसूत्र तोडायला सांगितलें. शरद् विधवा आहे ह्याचें देखील त्याला विसरण पडलें. तिच्याहि गळ्यांतलें मंगळसूत्र तोडायला तो तळीरामाला सांगतो. ऐनवेळीं पद्माकर येऊन त्यानें तळीरामाला लाथेनें उडविला नसता तर त्यानें त्या दोघींची विटंबना करावयाला कमी केलें नसतें. तळीरामाच्या स्वभावाचा हा हिडीस पैलू त्या वेळीं प्रथम प्रकट होतो. आणि तेथेंच तळीरामाचें ह्या नाटकांतलें काम संपतें. पुढें तो आजारी पडतो नि मरतो. ते दोन प्रवेश नाटकाच्या दृष्टीनें अनावश्यक आहेत. सुधा-कराला दारूच्या व्यसनांत गुंतवणारा तळीराम हा एक इरसाल दारूबाज होता एवढेंच त्याचें चित्रण गडकऱ्यांनीं केलें असतें आणि सिंधू नि रामलाल ह्यांच्याबद्दल सुधाकराच्या मनांत विष कालवण्याचें खलकृत्य त्याच्या हातून करविलें नसतें तर काय झालें असतें, हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. तळीराम किती जरी दारूबाज असला तरी सुधाकराच्या घरांत बसून त्याच्यासमोर त्याच्या बायकोची बेअब्रू करण्यापर्यंत त्याची मजल जाईल असें वाटत नाहीं. 'मद्यपी कधीं खोटं बोलत नाहीं. मद्यपानानें नीतिमत्ता सुधारते' हें जें दारूबद्दलचें तत्त्वज्ञान तळीराम पूर्वीं सांगतो त्याच्याशीं त्याचें हें वर्तन विसंगत वाटतें आणि खरेंच, दारूबाज हा दुष्ट होऊं शकेल, हिंसहि होऊं शकेल, पण

तो 'खलपुरुष ' ( Villain ) क्वचित्च असूं शकतो. अशा तऱ्हेचें त्याचें चित्रण कोणी नाटककारानें केल्याचें मला स्मरत नाहीं.

त्यानंतर तळीरामाची बायको गीता ही एक ह्या नाटकामधली अत्यंत निर्दोष, तेजस्वी आणि प्रभावी अशी भूमिका गडकऱ्यांनीं निर्माण केलेली आहे. तोंडानें जितकी फटकळ तितकीच मनानें निर्मळ. पण दारूबाज नवऱ्याशीं जन्माची गांठ पडल्यानें तिच्या चांगुलपणाचा अगदीं कोंडमारा होऊन बसला होता. म्हणून तिचा सात्त्विक संताप अधून-मधून एकाद्या ज्वालामुखीच्या स्फोटाप्रमाणें उफाळून बाहेर पडे. "नवरे म्हणे देव! हे हो कसले देव! शेंदूरकमी देव! मला कोणी राज्य दिलं तर मी साऱ्या बायकांना सांगून ठेवीन कीं नवरा दारू पिऊन आला तर खुशाल त्याला दाऱ्यादोरखंडानं गोठ्यांत नेऊन बांधीत जा. दारू पितो तो कसला हो नवरा!" पण तळीराम समोर दिसला कीं तिच्या मनांतले हे सारे मांडे मनांतल्या मनांतच विरत. तळीरामानें तिच्या गळ्यांतलें मंगळसूत्र तोडलें तरी ती त्याच्या अंगाला बोटदेखील लावीत नाहीं.

सिंधु आणि गीता हे जुन्या हिंदु समाजांतील सोज्वल गृहिणींचे दोन करुणरम्य नमुने आहेत. दोघींचेंहि पातिव्रत्य बावनकशी. फक्त गीता मनांतलें दुःख ओकून टाकी. आणि सिंधु मनांतल्या मनांत तें गिळत असे. आपण तर बोलून चालून कमनशिबी आहोत. आपण चार दिवस कसे तरी काढूं. पण सिंधूसारख्या एका धनसंपन्नाच्या कन्येच्या आणि ज्ञानसंपन्नाच्या पत्नीच्या संसाराची नवऱ्याच्या दारूबाजीमुळें अशी धुळधाण व्हावी हें पाहून गीतेचा अंतरात्मा अक्षरशः जळत होता. मोलमजुरीचीं निकष्टाचीं कामें करून सिंधु रोजचा दिवस कसा तरी कंठीत होती. पण त्यामुळें जी उपासमार होत होती ती पाहून गीतेचीं आंतडीं तुटत होतीं. म्हणून तिनें सिंधूच्या भावना न ओळखतां तिला सदावर्तांत जाऊन गोडधोड खाऊन येण्याची सूचना केली. एवढेंच नव्हे तर सिंधूजवळ नेसूं लुगडें नव्हतें तर तिला आपलें पातळ सुद्धां देऊं केलें. 'त्या भोळ्या जिवाला तर हंसण्यारडण्यावर आपलं स्वतःचं सुद्धां सुखदुःख लागत नाहीं.' असें सुधाकरानें पूर्वी तिच्या स्वभावाचें वर्णन केलेलें असतें. गीतेचें हें भोळें-भाबडें आणि मायाळू चित्र सिंधूच्या पार्श्वभूमीला उभें करून गडकऱ्यांनीं नाटकांतल्या करुणरसामध्यें एक विलक्षण जिव्हाळा निर्माण केला आहे.

रामलाल हें ह्या नाटकांतलें सर्वांत सौम्य आणि मवाळ पात्र आहे. आईबापामागें त्यांनीं सुधाकर आणि शरद् ह्यांना वाढवलें आणि 'हे सोन्याचे दिवस दाखविले!' पण त्यानंतर दारूबाजीच्या प्राणांतिक संकटांत जेव्हां सुधाकर सांपडला तेव्हां त्याला

वाचविण्यासाठीं त्यानें नुसता उपदेश करण्यापलीकडे काडीमात्र प्रयत्न केला नाहीं. विलायतेला जाण्यापूर्वी सुधाकराला सिंधूनें कसें सांभाळावें ह्याचा तो तिला लांबलचक उपदेश करतो. पण पुढें ती पाळी, त्याच्या स्वतःवर जेव्हां येते, तेव्हां तो हातपाय गाळतो. रामलाल हा जर रागीट, आग्रही नि आक्रमक वृत्तीचा गडकऱ्यांनीं चितारला असता तर काय झालें असतें ? तर मग रामलालनें सुधाकराच्या चार थोबाडींत मारून आत्म-नाशापासून त्याला वांचवलें असतें. पण गडकऱ्यांना तें नको होतें. सुधाकराच्या अधः-पाताला प्रतिरोध करणारी कोणतीहि शक्ति त्यांना ह्या नाटकांत नको होती. म्हणून त्यांनीं रामलालला जाणूनबुजून शेळपट बनविलेलें आहे. तळीरामपेक्षां मला रामलाल-चाच जास्त संताप येतो. सुधाकर दारू प्यायला लागला आहे ही बातमी प्रथम गीता जेव्हां रामलालला सांगते तेव्हां त्याची पहिली प्रतिक्रिया काय होती ? तर '( निश्वास टाकून ) रघुवीर ! श्रीहरि ! '

रामलाल हा डॉक्टर होता. कसला डॉक्टर होता कोणास ठाऊक ! चार सहा महिने इंग्लंडला राहून तो शेवटच्या परीक्षेसाठीं जर्मनींत जाणार होता. पण लढाई सुरू झाली म्हणून जर्मनीला जाण्याचा बेत त्यानें रद्द केला. पाश्चात्त्य देशांत अशी एकहि वैद्यकीय पदवी नाहीं कीं तिच्या अभ्यासाचा प्रारंभ इंग्लंडमध्यें चार सहा महिने राहून करतां येतो आणि मग शेवटची परीक्षा जर्मनींत देतां येते. गडकऱ्यांनीं ही अद्‌भुत परीक्षा कोठून शोधून काढली कोणास ठाऊक ? विलायतेहून तो परत आला तोंच सुधाकरानें दारूच्या व्यसनांत चांगलीच प्रगति केलेली. एका रात्रीं भगीरथाच्या बरोबर तो ' आर्य मदिरा मंडळां ' त जातो. दारू पीत बसलेल्या सुधाकराला तो आपल्या डोळ्यांनीं पहातो. आणि उपदेशाचा एक पानभर डोस पाजतो. कोणाला ? तर भगीरथाला ! "भगीरथ, हीनहीन, पंगू, अनाथ अशी ही आपली भारतमाता तुम्हां तरुणांच्या तोंडाकडे आशेनें पहात आहे. पाणिग्रहणावांचून रिकामा असलेला तुझा हात—चुकलेल्या बाळा, जन्मदात्री स्त्रीजात गुलामगिरींत पडलेली आहे, लक्षावधि निरक्षर शूद्र ज्ञानप्राप्तीसाठीं तळमळत आहेत, साडेसहा कोटी माणसं नुसत्या हस्तस्पर्शासाठीं तळमळत आहेत, या बुडत्यापैकीं कोणाला तरी जाऊन हात दे ! " आणि ह्या उपदेशाचा इष्ट तो परिणाम भगीरथावर होऊन तो हातांतला दारूचा प्याला ताडकन् जमिनीवर फेंकून देतो आणि ' जन्मांत पुन्हां दारूला स्पर्श करणार नाहीं ! ' अशी प्रतिज्ञा करतो.

नुसत्या एका व्याख्यानानें जर एकाद्या मद्यप्याला मद्यापासून परावृत्त करण्याचें रामलालच्या वाणींत सामर्थ्य होतें, तर तसें त्या आपल्या प्रभावी वाणीचें सामर्थ्य भगी-रथापेक्षां अनेक पटींनीं जवळ असलेल्या सुधाकराला सुधारण्यासाठीं त्यांनीं करूं नये हें या नाटकांतलें सर्वांत मोठें आश्चर्य आहे ! तिकडे दारू पिऊन सुधाकर कोर्टात जातो. त्याची सनद कायमची रद्द होते, तरी हा महामूर्ख रामलाल जसें कांहींच झालें नाहीं, अशा निर्विकार मनानें भगीरथाशीं लोककल्याणाच्या मार्गाची तात्त्विक चिकित्सा शांत-

पणें करीत बसलेला असतो. आपल्या सांगण्याचा सुधाकराच्या मनावर कांहीं एक परिणाम होत नाहीं असा स्वतःच्या तोंडानें रामलाल आपला पराभव कबूल करतो नि सिंधूच्या भावाला अन् बापाला तार करून बोलवायला भगीरथाला सांगतो.

'प्राण जाईपर्यंत दारू पिण्याचा' निर्धार करून सुधाकर जेव्हां एकामागून एक प्याले फस्त करूं लागतो, तेव्हां एकादें बकरें केंकाटावें तितक्या दुबळेपणानें रामलाल अधूनमधून पुटपुटत असतो, "सोड, सुधा, अजून तरी ही दारू सोड रे–सुधा, सुधा, तूं मनांत आणल्यावर तुला काय करतां येणार नाहीं!–सुधा, सुधा, काय करतो आहेस हें तूं—सुधाकर डोळ्यांनीं हें पाप पहावत नाहीं रे!" त्यावेळीं सुधाकरापेक्षां रामलालचीच अधिक कींव वाटूं लागते. आणि सगळ्यांत विनोद हा कीं, सर्व जगाला मद्यपानापासून परावृत्त करण्याचें 'मिशन' शेवटीं सुधाकर ह्या असल्या नालायक रामलालकडे सोंपवितो. "जा, साऱ्या जगांत तुझ्या वैभवशाली वाणीनं हें मूर्तिमंत चित्र—हा विराट् स्वरूप एकच प्याला—अशा उग्र स्वरूपांत प्राणिमात्राच्या डोळ्यांपुढं उभा कर!" रामलालची वाणी ही 'वैभवशाली वाणी' आहे हें कशाच्या आधारावर सुधाकर त्याला 'सर्टिफिकेट' देतो? सबंध नाटकांत रामलालचा एकच उपयोग आहे. तो हा कीं, सुधाकरानें पानेंच्या पानें सांगितलेलें दारूचें भयानक तत्त्वज्ञान आणि दारूबाजीच्या तीन अवस्थांचें केलेलें विश्लेषण शांतपणें ऐकून घ्यावयाला त्याला एकादा थंड डोक्याचा श्रोता पाहिजे होता. तें श्रोत्याचें काम रामलालनें उत्तम तऱ्हेनें बजावलेलें आहे ह्यांत कांहीं शंका नाहीं. शेवटच्या अंकांत प्रेतांची विल्हेवाट लावण्याची कामगिरी साहजिकच रामलालकडे येते. तेंहि काम त्यानें यथाविधि केलेलें असावें.

ह्या नाटकाच्या यशाचें सर्वांत मोठें सामर्थ्य म्हणजे सुधाकर आणि सिंधू ह्यांच्या स्वभावांचें वैशिष्ट्यपूर्ण चित्रण आणि काळजाला हात घालणारे विलक्षण प्रभावी संवाद. त्या बाबतींत आपल्या इतर नाटकांपेक्षां गडकऱ्यांनीं स्वतःवरच येथें मात केलेली आहे. त्यांच्या भाषेचा नेहमींचा नटवेपणा आणि अलंकारिकपणा ह्या नाटकांत क्वचित्च दिसून येतो आणि तिच्यांत शुद्ध मराठमोळ्या शैलीची प्रसन्नता आणि जिव्हाळा ठायीं ठायीं प्रकट होतो. स्वतःच्या संसारांत सुखी असलेल्या सुधाकराचें प्रारंभीचें आनंदी, निष्काळजी आणि थट्टेखोर स्वरूप पहातांना एका भयानक आपत्तीचीं अभ्रें लौकरच त्याच्या डोक्यावर जमा होणार आहेत ह्याची प्रेक्षकांना कल्पनाहि होत नाहीं. अर्थात् त्यांची छाया पहिल्या प्रवेशांत गडकऱ्यांनीं कौशल्यानें सुचित केलेली आहे.

पहिल्या अंकानंतर आणि विशेषतः दुसऱ्या अंकानंतर नाटकाचा सारा रंगच बदलून जातो. दुःखाच्या नि कारुण्याच्या सांवल्या हळूंहळूं नाटकाच्या वातावरणांत उतरूं लागतात. दूध पितांना दांडगाई करणाऱ्या आपल्या बाळाला, 'वन्सं मांमाळा

बाई तुमचं रत्न हें ! तुमचीं माणसंच भारी अचपळ ! ' असें म्हणून सिंधू त्याला शरद्च्या हातीं देते, त्याच वेळीं सिंधूच्या मनांत कसले तरी वेडेविद्रे विचार यावयाला सुरुवात झालेली असते. ती म्हणते, ' आपदा चंद्रासूर्यासारख्या वेळा सांगून का येत असतात ? बरं व्हायचं तें जपातपानं होतं आणि वाईट मात्र झाल्यावर कळायला लागतं। फळ पिकण्यापूर्वी पाडानं रंगून जातं. पण पुरतेपणीं कुजल्याखेरीज त्याला कधीं बाण सुटलं आहे ना ? '

नेमकी त्याच वेळीं मद्यपान करून कोर्टांत गेल्याबद्दल मुन्सफानें सुधाकराची सनद कायमची रद्द केलेली असते.

मदिरेनें एकाद्या कैदाशिणीप्रमाणें तिच्या संसाराचा कबजा घेतल्यानंतर सिंधू हातपाय गाळून मुळूमुळू रडत बसत नाहीं; तिची प्रखर पतिनिष्ठा आणि तेजस्वी स्वाभिमान त्या क्षणीं प्रकट होतो. आणि तिच्या मुखांतून त्या आवेगांत जें ज्वलन्त वाङ्मय बाहेर पडतें तें ऐकून डोळे दिपतात :

" हा नरक ! हे पाय जिथं आहेत तिथं नरक ! वेड्या; हे पाय जिथं असतील तिथंच माझा स्वर्ग; तिथंच माझं वैकुंठ आणि तिथंच माझा कैलास ! "

" पतिव्रतेला नातीं नसतात. ती बापाची मुलगी नसते. भावाची बहीण नसते. मुलाची आई नसते. देवाब्राह्मणांनीं दिलेल्या नवऱ्याची ती बायको असते. मुलीचं लग्न म्हणजे तिची उत्तरक्रिया. बाबा, कन्यादानासाठीं इकडच्या हातांवर तुम्ही जें उदक सोडलंत त्यानंच माझ्या माहेरच्या नांवाला तिलांजलि दिलीत ! "

" सिंधूचा सगळ्या जगाशीं संबंध सुटला ! आपल्या दोघांच्या कष्टाविरहितची एक कपर्दिका देखील घरांत आणीन तर आपल्या पायाचीच शपथ आहे ! "

तिसऱ्या अंकांतला हा शेवटचा प्रवेश म्हणजे सिंधूच्या पातिव्रत्याच्या तेजाचा उच्चांक आहे. तिच्या व्यक्तिमत्त्वाचें विदारक आणि दाहक स्वरूप पाहून प्रेक्षकांच्या काळजाचें पाणी पाणी होतें आणि आपलीं अंतःकरणें ते सिंधूवरून ओवाळून टाकतात. सिंधूचें असें देदीप्यमान स्वरूप पुन्हां ह्या नाटकांत पुढें पहावयाला सांपडत नाहीं. ' पुण्यप्रभावां ' तल्या वसुंधरेलादेखील ती या प्रवेशांत फिकी पाडते.

त्यानंतर दारिद्र्याशीं झगडत असलेल्या हीनदीन सिंधूचें केविलवाणें दर्शन आपल्याला घडतें. ' अर्ध्या डावावरून लक्ष्मी उठून गेली आणि हातीं कवड्या राहिल्या ' अशी तिची स्थिती झालेली असते. घरांतली उपासमारी टाळण्यासाठीं सदावर्तामध्यें जाण्याची जेव्हां सिंधूला पाळी येते, तेव्हां सुधाकराला पश्चात्तापाचा जबर झटका येतो आणि ' सिंधू, आजपासून मी दारू सोडली-कायमची सोडली ! ' अशी सुधाकर शपथ घेतो. त्यावेळीं सिंधूच्या आनंदाला केवढें भरतें आलें म्हणतां, " अहाहा असं झालं तर अमृतेश्वराला लक्ष वाती लावून–लक्ष वातीचशी काय–पण पंचप्राणांची पंचारती पाजळून ओवाळणी करीन ! " आणि त्या आनंदाच्या भरांत सिंधू तशीच धांवत जाऊन

आपल्या लाडक्या बाळाच्या चिमुकल्या कानांतच ती गोड गोष्ट सांगूं लागते. पत्नीच्या आनंदाचें नि मातेच्या वात्सल्याचें इतकें हृदयस्पर्शी दृश्य कुठल्या मराठी नाटकांत तुम्हांला पहायला मिळेल ? अशा स्थळीं गडकऱ्यांच्या प्रतिभेचा खरा साक्षात्कार होतो. हें दृश्य पहात असतांना आधल्याच अंकांत सिंधूबरोबर रडणारे प्रेक्षक पुन्हां तिच्याबरोबर आनंदानें नाचूं लागतात– डोलूं लागतात.

त्यानंतर नोकरीच्या शोधासाठीं गेलेल्या सुधाकराला जेव्हां त्याचे दारूबाज दोस्त ठोकरतात तेव्हां दुर्दैवाचे दशावतार पाहण्याची त्याची ताकद संपुष्टांत येते.

" बेवकूफ बाप – नालायक नवरा – मातीमोलाचा मनुष्य – दीडदमडीचा दारूबाज- देवा – देवा, कशाला या सुधाकराला जन्माला घातलंस ? मी काय करूं ? कुठं जाऊं ? या जगांतून बाहेर कसा जाऊं ? कोणत्या रूपांत मृत्यूच्या गळ्यांत मगरमिठी मारूं ? "

अशा मनःस्थितीनं जिवावर उदार होऊन सुधाकर तळीरामाच्या घरीं येतो आणि दारूला अखेरची प्राणांतिक मिठी मारतो.

" ये, मदिरे, ये, तूं देवता नाहींस, हें सांगावयाला जगांतल्या पंडितांचा तांडा कशाला हवा ? तूं एक राक्षसी आहेस ! पण तूं प्रामाणिक राक्षसी आहेस ! गळा कापीन म्हणून म्हटल्यावर तूं गळाच कापीत आलेली आहेस. चल मदिरे, आपल्या अघोर घातुक शक्तीनें सुधाकराच्या गळ्याला मिठी मार ! मग ह्या कंठालिंगनानें सुधाकराचे प्राण कंठाशीं आले तरी बेहेत्तर ! "

त्यानंतर दारूच्या सामर्थ्याचें, तिच्या तीन अवस्थांचें, दारूच्या उत्पत्तीचें नि दारूच्या रिकाम्या प्याल्यांत दिसलेल्या विश्वदर्शनाचें जें विलक्षण प्रतिभाशाली नि ओजस्वी वर्णन सुधाकरानें केलेलें आहे तें एक 'मदिरोपनिषद्'च आहे असें म्हणा- वयाला हरकत नाहीं. गडकऱ्यांच्या कल्पनाशक्तीचा हा सुवर्णकळस होय. वाङ्मयीन प्रतिभेचा असा चमत्कार जगामधल्या कोणत्याहि साहित्यांत आढळणार नाहीं ! ज्वाला- मुखींतून बाहेर पडणाऱ्या लाव्हा रसाच्या रसरशीत लोटाप्रमाणें हा जो शब्दांचा अंगार सुधाकराचें काळीज फाडून त्याच्या ओठांतून बाहेर पडतो, तो पाहून शेक्सपीअरचेहि डोळे खचित दिपले असते. त्यापुढें सिंधूच्या करुणरसाची गंगा दुथडी भरून वाहूं लागते. स्वतःच्या बाळाला दूधदेखील तिला देतां येत नाहीं म्हणून तिच्या मातृत्वाची जी धडपड चालू असते, ती पाहून प्रेक्षकांचा शोक अनावर होतो.

'चंद्र चवथीचा । रामाच्या ग बागेमध्यें चाफा नवतीचा' ही ओवी करुण स्वरांत गात सिंधू दळीत बसते, तोंच बाळ उठतें.

" अगबाई, बाळ उठला वाटतं ! आज चवथीची ही चिमुकली चंद्रकोर लवकर कां बरं उगवली ? चतुर्थीचा उपास लागला वाटतं चिमण्या चंद्राला ? आतां गीताबाई दूध घेऊन येतील बरं. मागितल्यावेळीं दूध मिळायचे दिवस, राजसा, आतां आपले नाहींत रे ! आपल्या लेखीं गोकुळींच्या गोठणी ओस पडल्या ! "

" बाळा, मी रडते म्हणून तूं सुद्धां असा रडणारच का ? मी रडूं नको तर काय करूं ? वाटलं, आज देवाला दया आली म्हणून! पण आपलं दैव आड आलं! आतां बाळा, संसाराला तुझाच काय तो आधार! बाळ, लवकर मोठे व्हा आणि आपल्या गोजिऱ्या हातांनीं माझीं आसवं पुसून टाका!"

" देवा लक्ष्मी नारायणा, ' कुबेर तुझा भांडारी, आम्हां फिरविशी दारोदारीं. ' पूर्वजन्मीं केलं तें कपाळीं उमटलं, त्याला तूं काय करणार! मागल्या जन्मीं ब्राह्मण ताटावरून उठवला असेल म्हणून आतां अन्नासाठीं दाही दिशा पाहणं आलं. अतीत-अभ्यागताला रित्या हातीं दवडलं असेल म्हणून घरची लक्ष्मी पारखी झाली. हिरव्या कुरणांतून गाईगुजीला हाकललं असेल, तेव्हां आज बाळाला दूध मिळत नसेल!"

मराठी वाणी ही अमृताशीं पैजा जिंकणारी वाणी आहे, ही ज्ञानेश्वराच्या दाव्याची सत्यता गडकऱ्यांचे हे संवाद वाचतांना पटते. पण ह्या करुण वत्सल प्रवेशाचा शेवट कसा झाला म्हणतां ? बाळाला दूध तर मिळालें नाहींच. पण दारूनें बेहोष झालेल्या सुधाकरानें त्याच्या डोक्यांत काठी मारून त्याचा खून केला.

सिंधूच्या डोक्यांतहि काठीचा एक जबर तडाखा लागून ती आसन्नमरण स्थितींत पडते. पण तशाहि स्थितींत तिच्या पातिव्रत्याचा देदीप्यमान उन्मेष प्रकट होतो. ' मूल आपल्या अंगाखालीं चिरडून मरण पावलं ' असं ' दिव्य असत्य ' ती पोलिसांना सांगते. ' दिव्य असत्य ' हे शब्द आमचे नाहींत. ' एकच प्याला 'च्या पहिल्या प्रयोगाच्या प्रसंगीं मुंबईतले एक रसिक विद्वान् हें दृश्य पहातांच आपल्या खुर्चीवरून ताडकन् उठून ओरडले, " Oh, what a divine lie!"

सिंधू खोटें बोलते आहे असें तिचा भाऊ पोलिसांना जीव तोडून सांगत होता. त्याला ती म्हणते, " दादा, लहानपणीं माझ्या कुंकवाला तजेला यावा म्हणून तूं माझ्या करंड्यांत मृगाचीं इवलालीं पांखरें आणून ठेवीत होतास, आवठतं का ? मग आतां ती माया कुठें गेली ?"

मरतांनाहि सिंधूची शेवटची चिंता सुधाकराच्या कल्याणाची होती.

" भरल्या हातीं हळदीकुंकवानं आपल्या मांडीवर मला मरण आलं. याहून आणखी कोणतं भाग्य हवं मला! आपण मनाला त्रास घेऊं नये. आधींच प्रकृति अशी झालेली. उन्हाच्या वेळीं संतापानं डोकं तापलं तर सुंठ उगाळून द्यायला सुद्धां कोणी नाहीं. आतां आपल्या जीवाला जपणारं कुणी नाहीं. लोकं सारीं ज्याचीं त्याला असतात. आपण आतां एकटे राहिलां—माझ्या रक्ताची शपथ आहे—ऐकायचं ना माझं एवढं—एका थेंबाला सुद्धां शिवायचं नाहीं—"

नवरा राक्षस असला तरी त्याच्यावर प्रेम करावें—प्राण जाईपर्यंत प्रेम करावें- हें ध्येय कोणाला बरें वाटो, वाईट वाटो—कसेंहि वाटो-पण तें प्रत्यक्ष आचरणांत आणणाऱ्या महान् पतिव्रता यापूर्वीं भारतवर्षांत होऊन गेल्या आणि आजहि तशा असतील.

भारतीय संस्कृतीचा तो अवघड आदर्श सिंधूच्या रूपानें गडकऱ्यांनीं या नाटकांत चितारून ठेवला आहे, यांत कांहीं शंका नाहीं. सबंध नाटकांत तिनें आपल्या पतीच्या व्यसनाचा—दारूचा—शब्दानें सुद्धां उल्लेख केला नाहीं. सिंधूचा आदेश झिडकारून सुधाकर दारूचा फक्त 'एकच प्याला' आणखी घेतो, पण त्यांत रसकापरासारखें जलाल विष घालून तो आपलें जीवन अखेर संपवितो.

या नाटकांतल्या रसपरिपोषाला ज्या कांहीं पदांनीं विलक्षण सहाय्य केलं आहे, तीं रचणारे विठ्ठल सीताराम गुर्जर आणि आपल्या अलौकिक अभिनयानें सिंधूला अमर करणारे बालगंधर्व ह्यांचा उल्लेख येथें करणें जरूर आहे.

'एकच प्याला'चीं गडकऱ्यांनीं मांडलेलीं उपपत्ति खरीं असोत किंवा चुकीचीं असोत. पण त्या उपपत्तीच्या एका लहानशा पायावर गडकऱ्यांनीं 'एकच प्याला' ह्या भीषण नाटकाचा जो उत्तुंग इमला उभारला आहे, तो मानवी बुद्धीचा एक महान चमत्कार आहे ह्यांत काय शंका? एवढें एकच नाटक गडकऱ्यांनीं लिहिलें असतें तरी तें मराठी साहित्यांत अमर झालें असतें.

परवां एक प्रथितयश मराठी विद्वान म्हणाले कीं, 'जागतिक वाङ्मयांत ज्याचा समावेश होईल असें मराठी भाषेंत एकहि नाटक नाहीं!'

कदाचित, त्यांच्या हातांत 'एकच प्याला' असावा म्हणून गडकऱ्यांच्या अमर एकच प्याल्या'चा त्यांना विसर पडलेला असावा!

१९१७ सालच्या अखेरीला गडकऱ्यांनीं 'भावबंधन' नाटक लिहावयाला घेतलें. त्यावेळेपासून त्यांची प्रकृति बिघडावयाला प्रारंभ झालेला होता. त्याच्या आधीं कोल्हटकरांचें 'सहचारिणी' हें नाटक 'गंधर्वा'च्या रंगभूमीवर आलें होतें. तें साफ पडलें. तेव्हा असलें भिकार नाटक लिहिल्याबद्दल गडकऱ्यांनीं आपल्या गुरूची खूपच टर उडवली. गडकरी तात्यांना म्हणाले, "तात्या, 'प्रेमसंन्यास' नाटक जेव्हां मी तुमच्या पायांवर अर्पण केलें, तेव्हां त्या नाटकांतले माझे दोषहि मी तुमच्या पायांवर अर्पण केले. असें असतां ते सारे दोष तुमच्या पायापासून डोक्यापर्यंत वर कसे चढत गेले कांहीं कळत नाही!" एवढेंच नव्हे तर 'विनोदी नाटक कसें लिहावयाचें असतें तें मी तुम्हांला दाखवतों' असा पैजेचा विडा त्यांनीं गुरुसमोर उचलला.

'भावबंधन'च्या जन्माची हकीगत विठ्ठल सीताराम गुर्जर सांगत ती अशी : 'सहचारिणी' वाचून गडकरी त्यांना म्हणाले, "छे, छे, तात्यांनीं या रंगरावला आणि व्हिलनला अगदीं भलतेंच वळण दिलें. त्यामुळें नाटक रंगदार होणार नाहीं

अशी मला भीति वाटते. ह्या दोन्ही पात्रांना निराळ्याच तऱ्हेनें रंगवायला पाहिजे होतें तात्यांनीं ! " त्याच क्षणीं गडकऱ्यांना स्फूर्तीचा झटका आला. अंग थरारल्यासारखें करून गडकरी गुर्जरांना म्हणाले, " थांबा, माझ्या मनांत या क्षणीं एका नव्या प्लॉटचा ' जर्म ' ( अंकुर ) पडला आहे. मीच त्यावर एक नाटक लिहितों. एका पक्क्या व्हिलनच्या तावडींत एक भाबडा म्हातारा सांपडलेला आहे, या कल्पनेवर एक सुंदर आणि चटकदार ' कॉमेडी ' लिहितां येईल असें मला वाटतें. "

१९१८ च्या एप्रिल अखेरपर्यंत ' भावबंधना 'चे तीन अंक पूर्ण करून त्यांनीं चौथा अंक लिहावयास प्रारंभ केला होता. तें कोल्हटकरांना समजतांच गडकऱ्यांनीं पूर्वी ' सहचारिणी ' नाटकाबाबत आपली टर उडविली होती ही गोष्ट अजिबात विसरून त्यांनीं गडकऱ्यांना खामगांवहून अभिनंदनाचें पत्र लिहिलें : " आपण भावबंधन लिहिल्याचें व तें अत्यंत सुंदर झाल्याचें वर्तमान रा. गुर्जरांकडून कळलें. फार आनंद झाला. अशीं आणखी कितीतरी नाटकें आपल्या लेखणींतून बाहेर पडण्याची अपेक्षा आपल्या स्नेह्यांस व मराठी भाषेच्या अभिमान्यांस आहे. स्वतःकरितां नाहीं तर निदान त्यांजकरितां तरी आपल्या प्रकृतीस जपणें आपलें कर्तव्य आहे. तें आपण पार पाडावें अशी माझी अंतःकरणपूर्वक इच्छा आहे. "

तात्यांच्या ' सहचारिणी 'वर मात करण्याच्या जिद्दीनें जरी गडकऱ्यांनीं ' भावबंधन ' नाटक लिहिलें असलें तरी त्या नाटकाच्या प्रारंभीं आपल्या गुरूला कृतज्ञतेनं अभिवादन करावयाला मात्र ते मुळींच विसरले नाहींत.

" कृपाचि ज्यांची कारण केवळ
मम पामर वचनातें ।
वंदुनि त्या ' श्रीपाद ' पदाप्रति
या या यश कार्यातें ।
नवनाटक रचना । सादर करितां ।
रसिक जना । "

' एकच प्याल्या 'च्या नांवाचा नि सिद्धांताचा उगम जसा ' ऑथेल्लो 'त आढळतो त्याप्रमाणें ' भावबंधन ' मधल्या फटकळ लतिकेची कल्पना त्यांना शेक्सपीअरच्या बोलभांड ' त्राटिके 'वरून सुचलेली असावी असें वाटतें. दोघींच्या तोंडाचा झपाटा सारखाच आहे. ह्या आमच्या कल्पनेला दुसराहि दुजोरा असा मिळतो कीं, ' त्राटिका ' नाटकांतल्या धनाजीरावांच्या घरांत त्याच्या मुलीची प्रेमयाचना करण्यास रंभाजी हा ' विद्याधरशास्त्री पुराणिका 'चें सोंग घेऊन शिरतो, तर राणोजी हा ' बूमय्या रायलू ' या मद्रासी गवयाचें सोंग घेऊन तेथें राहतो. ही विनोदी घटना गडकऱ्यांनीं आपल्या ' भावबंधन 'मध्यें सही सही उचललेली आहे.

राणोजीचें हें मद्रासी बोलणें पहा, " आमी तेना मणाले, ते वी-वीणाचा कुंटी

असा पिळावा. तो तेनी आमची कान पिळले. आमाला शिव्या दिले. कूप मारले. अय्याय्यो, सारा अंगात दुःक भरले." आतां गडकऱ्यांच्या प्रभाकराचें हें कानडी बोरणें वाचा. "हे पत्र एक लोक देतो. मोरेश्वर गृहस्थ आगगाडीचे डबींत भेटलो. सर्व बोल्तो हे हकीगत. आम्ही कळलो. तर पत्र घेतला." ह्या साम्यावर अधिक भाष्य करण्याची काय आवश्यकता आहे ?

१९१८ च्या अखेरीस गडकऱ्यांची प्रकृति फारच विकोपाला गेली. तेव्हां तें वर्ष संपतां संपतां गडकऱ्यांचे थोरले बंधू त्यांना घेऊन नागपूरजवळ असलेल्या सावनेर या गांवीं गेले. अखेर २३ जानेवारी १९१९ ची काळरात्र उगवली. मृत्यु आपले पाश घेऊन त्यांच्या उशाशीं उभा होताच. रात्रौ दहा वाजता 'भावबंधन' नाटकाचा शेवटचा प्रवेश लिहवून घेतल्यावर, थोड्याच वेळानें त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. सारांश, हें सर्व नाटक गडकऱ्यांनीं आपल्या शेवटच्या आजारांतच लिहिलें आणि मरण्याआधीं कसेंबसें पुरें केलें.

या अभूतपूर्व घटनेबद्दल तात्यासाहेब कोल्हटकर 'भावबंधन'च्या प्रस्तावनेंत लिहितात, "गडकऱ्यांच्या या अखेरच्या नाटकांतील तो अखेरचा प्रवेश त्यांच्या आयुष्यांतील अखेरच्या दिवशीं व अखेरच्या प्रहरांत लिहिला गेला, या एका गोष्टीमुळे त्या प्रवेशास व त्याबरोबर संपूर्ण नाटकास–त्याच नव्हे तर एकंदर मराठी किंबहुना जगाच्या वाङ्मयांत अपूर्व महत्त्व आलें आहे. नाटकाचा व कर्त्याचा शेवट बरोबरच झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. एका घटकेस नाटकाचें जनन व दुसऱ्या घटकेस कर्त्याचें मरण घडून आलें. नाटकाचा प्रवेश रंगभूमीच्या जगांत होतो न होतो, तोंच जगाच्या रंगभूमीवरून कर्त्याचें निष्क्रमण झालें. अपत्याला आयुर्दान करून चिरंजीव करणाऱ्या बाबर बादशहाप्रमाणें कर्त्यानें आपल्या कृतींत जीवन ओतलें. ती कृतीहि स्वतः जरा पत्करून पित्यास तरुण करणाऱ्या पुरुराजाप्रमाणें स्वतः वैगुण्य स्वीकारून व पित्याचा कीर्तिरूप देह सतेज करून पितृऋण फेडील अशी खात्री आहे. लढतां लढतां धारातीर्थी पतन पावण्याचें भाग्य अनेक वीरांच्या ललाटीं असतें. परंतु लिहितां लिहितां मृत्युमुखीं पडण्याचें व विधिलेखाबरोबरच स्वतःचा लेख संपविण्याचें सद्भाग्य फारच थोडया ग्रंथकारांच्या वांट्यास येत असेल!"

'भावबंधन' नाटक हें 'सहचारिणी' पेक्षां श्रेष्ठ ठरलें. प्रयोगाच्या दृष्टीनें त्यानें त्या काळीं पराकाष्ठेचें यश मिळविलें–अजूनहि त्याची लोकप्रियता पुष्कळच टिकून आहे, पण 'एकच प्याला' नाटकांत गडकऱ्यांच्या नाट्यप्रतिभेचा जो गगनचुंबी विलास पहावयाला सांपडतो त्याचा कोटेंहि या नाटकांत प्रत्यय येत नाहीं. 'पुण्यप्रभाव' किंवा 'एकच प्याला' ह्या नाटकांच्या पाठीवर जन्माला आलेलें हें अपत्य चेहऱ्या-

मोहन्यानें वा अंगाविंडानें त्या नाटकांचें भावंड म्हणून तर मुळींच शोभत नाहीं. शोभलेंच तर तें 'प्रेमसंन्यास'चें भावंड शोभेल. कथानकाचा नि रचनेचा सैलपणा नि विस्कळीतपणा दोन्ही नाटकांत सारखाच आढळून येतो.

'भावबंधन' ह्या नांवाचा नि नाटकाचा कांहीं एक संबंध नाहीं. हें नांव कोणत्याहि प्रेमविषयक नाटकाला देतां येण्यासारखें आहे. ह्या नाटकांत तशी कोणत्याहि सामाजिक स्वरूपाची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष समस्या नाहीं. केवळ विनोदी नाटक म्हणावें तर तसेंहि ह्याला म्हणतां येणार नाहीं; कारण त्यांत गंभीर आणि करुणरसात्मक भागहि पुष्कळच आहे. 'एकच प्याला' नाटक वजा केलें तर गडकऱ्यांचीं बाकीचीं त्रोटक नाटकें विलक्षण लांबलचक आहेत. भावबंधन नाटक जेव्हां छापून प्रसिद्ध झालें तेव्हां त्याचीं १७९ पानें होतीं. तरी पांचव्या अंकांत त्यांनीं अवघे दोनच प्रवेश लिहिले. ह्याला काय नाटक म्हणायचें ? आजकाल पाऊणशें ते शंभर पानांच्या आंत नाटकाचा कारभार संपतो. पण गडकऱ्यांचें असें होतें कीं, एकदां ते लिहावयाला बसले, म्हणजे जेवढें सुचेल तेवढें ते लिहीत असत. प्रयोगाच्या सोयीच्या दृष्टीनं ते आपल्या लेखनाचा कधींहि विचार करीत नसत. त्यामुळें त्यांचं नाटक निम्म्याहून अधिक कापल्या खेरीज तें मुळीं रंगभूमीवर करणेंच अशक्य होतें. ज्यांचा सारा जन्म नाटक कंपनीमध्यें गेला त्यांनीं प्रयोगाच्या दृष्टीनें आपलीं नाटकें लिहूं नयेत, याचें सर्वांत आश्चर्य वाटतें.

खरें पाहिलें तर 'भावबंधना' मधला खलनायक घनश्याम हाच ह्या नाटकाचा नायक आहे. कारण ह्या नाटकाच्या कथानकाचा सर्व डोलारा तोच आपल्या कारस्थानामधून उभारतो. आणि त्याच्या समाप्तीबरोबर हें नाटक संपतें. तसें पाहिलें तर ह्या नाटकाला मुळीं कथानकच नाहीं. धुंडीराज हा एक भोळाभाबडा शब्दवेल्हाळ म्हातारा आहे. त्याची मुलगी मालती आणि त्यानें बाळगलेला तरुण प्रभाकर. धनेश्वर हा दुसरा म्हातारा–धंदा सावकारीचा आणि वृत्तीनें बदमाष. त्याची मुलगी लतिका आणि त्यानेंहि बाळगलेला एक तरुण मनोहर. मालतीचें प्रेम मनोहरवर असतें आणि लतिकेचें प्रेम प्रभाकरवर बसलेलें असतें. इतकें हें साधें नि सरळ कथानक. ह्यांतून नाटक कसें निर्माण व्हावयाचें ! मालतीचें लग्न मनोहरशीं व्हावयाला कोणाचीहि आडकाठी नव्हती. तथापि धनेश्वर आपली मुलगी लतिका प्रभाकराला देऊं इच्छीत नव्हता. कारण, आपल्या भागीदाराला फसविण्यासाठीं त्यांनीं खोटे दस्तऐवज केले होते. त्यामधून स्वतःचा गळा सोडविण्यासाठीं तो आपल्या लतिकेला त्या भागीदाराच्या मोरेश्वर नांवाच्या एका वेड्या मुलाला देऊं इच्छीत होता. पण तेवढ्याहि एका विरोधाच्या पायावर हें नाटक उभारतां आलें नसतें. म्हणून घनश्यामाच्या करवीं ह्या नाटकाचें सर्व कथानक गडकऱ्यांना रचावें लागलें.

घनश्याम हा धनेश्वराचा मुनीम असतो मालकाइतकाच तो पाजी असतो. घनश्याम हा वृंदावनाचा थोरला आणि कमलाकराचा धाकटा भाऊ शोभतो. गडकऱ्यांचे सर्वच खलनायक अत्यंत ढोबळ आणि बटबटीत आहेत. 'भावबंधन' मध्यें घनश्याम आणि धनेश्वर हीं दोनच दुष्ट पात्रें. आपण दुष्ट आणि पातकी असल्याची कबुली ते स्वतःच्या तोंडानेंच प्रेक्षकांना देतात. 'आपण ह्या नाटकांतले व्हिलन आहोंत हें पहिल्याच अंकांत घनश्याम सांगून टाकतो. तर त्याच्या अगोदरच आपल्या पातकी-पणाचा कबुलीजबाब धनेश्वरहि देऊन टाकतो. स्वतःच्या दुष्टपणाची इतक्या उघडपणें कबुली देणारीं पात्रें गडकऱ्यांखेरीज दुसऱ्या कोणाहि नाटककारानें निर्माण केलीं असतील असें नाहीं मला वाटत. आतां नाटकाकडे वळूं.

पहिल्या अंकांतल्या पहिल्या प्रवेशांत घनश्याम धुंडीराजला रस्त्यावर भेटतो. आणि त्याच्या मुलीला–मालतीला मागणी घालतो. एवढ्या एका लहानशा गोष्टीसाठीं गडकऱ्यांनीं बारा पानें खर्ची टाकलीं आहेत. कारण काय, तर धुंडीराज हा एक बडबड्या म्हातारा आहे. त्याच्या जिभेची टकळी एकदा सुरू झाली कीं ती थांबतां थांबत नाहीं. एका विषयावरून दुसरा विषय, दुसऱ्यावरून तिसरा, तिसऱ्यावरून चौथा असा त्याच्या विषयांतराचा एकदां झपाटा सुरू झाला कीं, तो शेवटीं इतक्या विकोपाला जातो कीं, त्यांत श्रोता कोठल्या कोटें वाहवत जातो. व्यवसायानें हा धुंडीराज विमा-एजंट आहे, असें दाखविलें आहे. वस्तुतः त्या धंद्याला धुंडीराजसारखीं माणसें सर्वस्वी नालायक. का या म्हाताऱ्याच्या कचाट्यांतून सुटण्यासाठीं लोक आपले विमे उतरतील, अशी गडकऱ्यांची कल्पना होती ? धुंडीराजसारखें तेंच तें फिरून फिरून आळवून आळवून बोलणारे प्रेमळ आणि भाबडे म्हातारे पूर्वीच्या काळीं आढळत. त्यांच्यापैकीं एक निवडक नमुना गडकऱ्यांनीं ह्या नाटकांत मोठ्या जिव्हाळ्यानें मांडलेला आहे ह्याबद्दल त्यांच्या कल्पनाचातुर्याचें जेवढें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे. 'भाव-बंधन'मधला हा पहिला प्रवेश गडकऱ्यांचा एक उत्कृष्ट प्रवेश आहे असें समजलें जातें. पण हा जर त्यांनीं थोडक्यांत लिहिला असता तर त्यांच्या परिणामकारकतेला तुलना नसती. पण धुंडीराजाच्या बडबडीचा गडकऱ्यांनीं ह्या प्रवेशांत इतका अतिरेक केला आहे कीं, प्रेक्षकांना अगदीं वेड लागायची पाळी येते. आणि सगळ्यांत गंमत ही कीं, नाटकांतल्या सर्व पात्रांची ओळख त्यांनीं ह्या म्हाताऱ्याच्या बडबडींतून करून दिलेली आहे. असल्या जुनाट नाट्यतंत्राचा अवलंब गडकऱ्यांनीं करावा ह्याचें आश्चर्य वाटतें.

दुसऱ्या प्रवेशांत धुंडिराज घनश्यामाला घेऊन आपल्या घरीं येतो. तेथें नाटकां-तलीं महत्त्वाचीं पात्रें बुद्धिबळें खेळत बसलीं आहेत. पण बुद्धिबळें रहातात बाजूला. नि लतिका अन् प्रभाकर एवढी बडबड करतात कीं, जणू कांहीं त्यांच्या अंगीं धुंडिराजाचा संचार झालेला आहे. लतिकेच्या सौंदर्याची तपशीलवार स्तुति करतांना प्रभाकर इतकी

वायफळ बडबड करतो कीं कांहीं विचारूं नका. भाषणांत नाट्य असेल तर तें कितीहि लांब असलें तरी प्रेक्षक सहन करतील. पण नुसत्या वर्णनांनीं खच्चून भरलेलीं लांबलचक भाषणें कोण ऐकून घेणार ? नाट्याचें हें महत्त्वाचें तंत्र गडकऱ्यांना कधींच उमगलें नाहीं.

नंतर सर्वांसमोरच घनश्याम मालतीला मागणी घालतो. आपल्या वडिलांच्या एका यःकश्चित् मुनिमानें आपल्या मैत्रिणीला मागणी घालावी हें पाहून लतिका चिडते आणि संतापून त्याच्यावर वाटेल तसें तोंड टाकते.

"का हो घनश्याम, मालतीची मागणी म्हणजे मालती का भिक्षा आहे, का जोगवा आहे, का गोग्रास आहे ? आज मालतीला मागणी घातलीत. उद्यां माझ्याशीं लग्न करायला तयार व्हाल. वेड नाहीं ना लागलं तुम्हांला ! जा, मालतीच्या लग्नाच्या वेळीं तुम्हांला हजर रहावें लागेल, तें नवरदेव म्हणून नव्हे, तर लग्नाच्या सामानाची यादी करण्यासाठीं !" केवळ ह्या एका वाक्यांतून नुसत्या लतिकेवरच नव्हे तर मालतीवर, धुंडिराजावर आणि धनेश्वरावर सूड घेण्याचा भयानक भस्मासुर घनश्यामाच्या अंतःकरणांत परत निर्माण होतो. आणि आपल्या कारस्थानांत तो कोणाकोणाला कसें अडकवणार हें प्रेक्षकांनाहि सांगून टाकतो. .

"लतिके, एकट्या तुझ्या लग्नाचेच धिंडवडे काढून माझें समाधान व्हायचें नाहीं. तुझ्याबरोबर मालतीहि दुःखांत पडायला पाहिजे. पहिल्या प्रतीच्या मानी लतिकेला जसा पहिल्या प्रतीचा मी, तसा मालतीसाठीं दुय्यम बदमाष कोण शोधून काढूं ? अर्थात् , लतिकेचा पाजी आणि रंगेल बाप धनेश्वर. अनोळखी महेश्वराची ओळख लादून धुंडिराजाला चोरीसारख्या गुन्ह्यांत गुंतवतों म्हणजे झालें ! लतिकेसाठीं मालती, आणि मालतीसाठीं धुंडिराज अशी ही दावण मला बांधावीच लागणार !" घनश्यामाच्या या कारस्थानावर सगळें नाटक आधारलेलें आहे.

मध्यंतरीं धनेश्वराच्या घरांत एक घटना घडते. बापाच्या सांगण्याप्रमाणें लतिका भोरेश्वराशीं लग्न करावयाला साफ नकार देते. त्यामुळें शिक्षणाला आणि मराठी भाषेला धनेश्वर आपल्या घरांत बंदी करतो. धनेश्वरानें आपल्या घरांत मराठीला बंदी करावी हा शुद्ध पोरकटपणा आहे. पण तसें नसतें केलें तर मग पुढें त्या घरांत कानडी गवयाचें नि मद्रासी पंडिताचें सोंग घेऊन महेश्वर नि प्रभाकर ह्यांना वावरायला कशी संधि मिळाली असती !

---

आतां घनश्यामानें आपल्या कारस्थानाला कशी सुरुवात केली तें पहा. लग्नासाठीं वेडा झालेला त्याचा एक महेश्वर नांवाचा मूर्ख मित्र असतो. लतिकेशीं तुझें लग्न लावून देतों अशी आशा त्याला दाखवून आंधळ्या कानडी गवयाचें सोंग घेऊन धनेश्वराच्या

घरांत रहावयास घनश्याम त्याला प्रवृत्त करतो. धनेश्वरानें जे खोटे दस्तऐवज तयार केलेले असतात ते त्याच्या कपाटांतून चोरण्यासाठीं महेश्वराची त्या घरांत घनश्यामानें योजना केलेली असते. महेश्वरासारख्या एका पागल आणि फाजील इसमाकडे धनेश्वराच्या घरांतले कागद चोरण्याचें काम घनश्यामानें सोंपवावें यावरून ह्या खलपुरुषाच्या अकलेचा मगदूर केवढा असावा याची कल्पना येते.

त्यानंतर घनश्यामचें पुढचें काम म्हणजे धुंडिराजाला चोरीच्या गुन्ह्यांत अडकवण्याचें. एका रेल्वे स्टेशनावरल्या वेटिंग रूममध्यें धुंडिराज बसला असतांना ( कुठें जावयाला कोणास ठाऊक ? ) आपण 'मोरेश्वर' आहोंत, अशी बतावणी करून महेश्वर खोट्या दागिन्यांचें गाठोडें धुंडिराजला सांभाळावयाला सांगतो. नंतर फौजदाराचें सोंग घेऊन आणि खऱ्या मोरेश्वराला घेऊन घनश्याम तेथें येतो. आणि एका उतारूचे दागिने चोरल्याबद्दल धुंडिराजला अटक करतो. धुंडिराजवर आभाळच कोसळतें. तो घनश्यामचे पाय धरतो. चोरी केल्याचा कबुलीजबाब आपखुषीनें लिहून देशील तर संशयाचा फायदा तुला देतों असें घनश्याम त्याला दरडावतो. त्याप्रमाणें धुंडिराज कबुलीजबाब लिहून देतो. मोरेश्वर त्यावर साक्ष घालतो. घनश्याम तो कागद खिशांत घालून चालता होतो. येथें पहिला अंक संपतो.

धुंडिराजला चोरीच्या गुन्ह्यांत अडकवण्यासाठीं गडकऱ्यांनीं हें जें कपटनाटक योजलें आहे, तें इतकें पोरकट आणि हास्यास्पद आहे कीं कांहीं विचारूं नका. धुंडिराजसारखीं जुनीं माणसें कितीहि भोळीभाबडीं, विसराळू, बडबडीं आणि पापभीरू असलीं तरी तीं व्यवहारांत पक्कीं असत. असल्या बनावानें तीं कधींहि लटपटायचीं नाहींत. दुसऱ्या धुंडिराजनें सरळ घनश्यामाला उलट खडसावलें असतें, "वा, फौजदार, बरेच गमती आहांत की तुम्ही ! ज्यानं जन्मांत कोणाच्या तनसडीला हात लावला नाहीं त्या माझ्यावर असल्या चोरीचा आरोप घालतां ! वेड तर नाहीं लागलं तुम्हांला चला पोलीस चौकीवर ! माझा शंभू माझा पाठीराखा आहे ! कसा हा चोरीचा आरोप तुम्ही माझ्यावर सिद्ध करतां तें पहातों !" असा जमदग्नीचा अवतार धुंडिराजानें दाखवला असता तर घनश्यामला पळतां भुई थोडी झाली असती. आपण अधूनमधून जमदग्नीचा अवतार दाखवतों असें धुंडिराजानें पहिल्याच अंकांत सांगितलें आहे. तसा अवतार त्यानें सबंध नाटकांत कुठें दाखवलेला नाहीं; तों दाखविण्याची त्याला हीच संधि होती. पण तें रागाचें अवसान जर त्यानें ह्यावेळीं दाखविलें असतें तर मग चोरीचा कबुलीजबाब नाटककारांना धुंडिराजकडून जो लिहवून घ्यावयाचा होता तो कसा घेतां आला असता ?

दुसऱ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत मालतीशीं लग्न करण्याची मान्यता घनश्याम धनेश्वराकडून घेतो आणि पुढच्या प्रवेशांत तो गुन्ह्याचा कबुलीजबाब घेऊन सरळ धुंडिराजाकडे जातो आणि माल्ती धनेश्वराला दिली नाहीं तर तुझीं शंभर वर्षे भरलीं

असा घनश्याम त्याला सरळ दम देतो. जमदग्नीचा अवतार दाखवण्याची धुंडिराजाला ती दुसरी संधि मिळते. पण धुंडिराज एकाद्या बुद्दू किंवा बेवकूफ माणसाप्रमाणें घनश्यामाच्या पायावर लोळण घेतो आणि त्याचें म्हणणें मान्य करतो.

धनेश्वराचे खोटे दस्तऐवज चोरण्यासाठीं नि लतिकेशीं लग्न लावण्याच्या आशेनें आंधळ्या कानडी गवयाचें सोंग घेऊन महेश्वर त्या घरांत राहिलेला असतो खरा, पण तेथें तो इंदू नि बिंदू ह्या दोन काळ्या अन् कुरूप कार्ट्यांच्या तडाख्यांत सांपडतो, त्यामुळें त्याची भलतीच तिरपीट उडते. तथापि एक दिवस महेश्वर धनेश्वराच्या कपाटांतले ते दस्तऐवज चोरतो. कसे ते गडकऱ्यांनाच माहीत! धनेश्वरांसारखा अट्टल आणि बदमाष सावकार काय आपले खोटे दस्तऐवज – कीं ज्यावर त्याचें जीवनमरण अवलंबून आहे – इतक्या मोकळ्यावर ठेवतो कीं, घरांत शिरलेल्या महेश्वरासारख्या एका उडाणटप्पू उपऱ्याला ते सहज कपाटांतून काढतां येतील? कथानकांतला हा दुवा अत्यंत खिळखिळा आहे.

महेश्वर ते चोरलेले कागद नंतर घनश्यामच्या स्वाधीन करतो. बरें, घनश्यामनें तरी ते कागद कुठें पुरावेत? तर स्मशानांत. कां, स्मशानांत कां? तर ज्या महेश्वरानें धनेश्वराकडून ते कागद चोरले त्याला स्मशानांत जावयाची भयंकर भीति वाटते. जणुं कांहीं घनश्यामानें ते कागद आपल्या घरांत पुरून ठेवले असते तर ते महेश्वर चोरूनच नेणार होता! आणि महेश्वराला त्या कागदांचा उपयोग काय? तो कशाला ते कागद चोरणार? त्या कागदांना खरें भय होतें धनेश्वराचें! एका जस्ताच्या डब्यांत घनश्यामानें ते कागद घातले; त्याबरोबर धुंडिराजाचा कबुलीजबाबहि घातला आणि स्मशानांत एक खड्डा खांदून घनश्यामानें तो डबा त्यांत पुरला नि खुणेसाठीं वर हिरवा दगड ठेवला. धनेश्वराचे कागदपत्र महेश्वराच्या भीतीनें घनश्यामानें स्मशानांत नेऊन पुरावेत हा कथानकाच्या ओढाताणीचा अतिरेक होय. पण एवढ्यानेंच काय झालें आहे! थोडे थांबा.

लतिका माल्तीसाठीं आपल्या वडिलांची मनधरणी करते. त्यांचे पाय धरून ती ओक्साबोक्शी रडते तेव्हां धनेश्वर विरघळतो. आणि आपल्या मुलीच्या गळ्याची शपथ घेऊन सांगतो कीं ' माल्तीशीं काय, पण कुणाशींच मी लग्न करणार नाहीं!' या ठिकाणीं नाटक पुन्हा पलटी खातें कीं काय अशी कल्पना प्रेक्षकांच्या अंतःकरणाला चाटून जाते.

धनेश्वराच्या कपाटांतले कागद महेश्वरनें दुसऱ्या अंकांतल्या पांचव्या प्रवेशांत चोरलेले असतात. पण त्या गोष्टीचा पत्ता धनेश्वराला तिसऱ्या अंकाच्या सातव्या प्रवेशांत लागतो. एवढ्या महत्त्वाच्या कागदांबद्दल धनेश्वरसारखा निढावलेला सावकार इतका निष्काळजी राहील ही गोष्ट पटत नाहीं. आपले कागद चोरीला गेले असें ज्या क्षणीं धनेश्वराच्या ध्यानांत येतें त्याच क्षणीं ते कागद हातांत घेऊन घनश्याम त्याच्या मागें

उभा रहातो आणि ' हे कागद मी आपल्या घरांतून चोरले ' असें निर्लज्जपणें त्याला सांगतो. ते कागद होते तरी काय ? तर खोट्या हुंड्या आणि खोटे दस्तऐवज. खोट्या हुंड्या म्हणजे काय ? धनेश्वरानें दुसऱ्यांना लिहून दिलेल्या का धनेश्वरानें दुसऱ्याकडून लिहून घेतलेल्या ? कांहींहि असलें तरी त्या हुंड्या ठराविक मुदतीच्या असतात. त्या योग्य वेळीं वटवावयालाच हव्यात. मग त्या धनेश्वराच्या दप्तरीं पडून कशा राहिल्या ? अन् खोट्या हुंड्या ह्या शब्दाला मुळीं अर्थच नाहीं. तसेंच खोटे दस्तऐवज. त्यांचें स्वरूप काय होतें ? हें फक्त गडकरीच जाणोत. गडकऱ्यांना कायदा जसा कळत नव्हता तसा सावकारी व्यवहारहि फारसा माहीत नसावा. त्यांना फक्त प्रेक्षकांना एवढेंच भासवावयाचें होतें कीं धनेश्वराला फौजदारी गुन्ह्यांत अडकवणारे ते कांहीं तरी भयंकर कागद होते. ते कागद धनेश्वराच्या छाताडावर पिस्तुलासारखे धरून घनश्याम त्याला दरडावतो, " बोला, मालतीशीं लग्न केव्हां लावतां आणि तुमची लतिका मला केव्हां देतां ? " तेव्हां धनेश्वराला घनश्यामचे पाय धरण्यावांचून गत्यंतर उरत नाहीं. मालतीशीं लग्न न करण्याचा निश्चय त्याला पुन्हां बदलावा लागतो. आणि ' घनश्यामशीं तुला तीन दिवसांच्या आंत लग्न लावावें लागेल ! ' असें तो लतिकेला सांगतो.

घनश्याम हा कागदासाठीं वारंवार स्मशानांत फेऱ्या मारीत असतो. तेव्हां त्याजवर पाळत ठेवावयाला प्रभाकर मनोहराला सांगतो. मनोहराच्या प्रेमाचें ' स्मशान ' झालेलें असतें. तेव्हां स्मशानांत जाऊन बसावयाला त्याला कांहीं फारसें अवघड वाटत नाहीं. स्मशानांत गेल्यावर इतर दगडांपेक्षा वेगळा म्हणून त्या हिरव्या दगडाकडे मनोहराचें लक्ष जातें. आणि दगडाच्या वैशिष्ट्याकडे त्याचें लक्ष कां आकर्षित होतें ह्याला सबळ कारण दाखविण्यासाठीं गडकऱ्यांनीं मनोहराला पहिल्यापासून ' भूस्तर शास्त्रज्ञ ' ( Geologist ) दाखविलेलें आहे. वडाची साल पिंपळाला म्हणतात ती अशी. हिरवा दगड उकरून काढतांना मनोहराला तो घनश्यामानें पुरून ठेवलेला जस्ती डबा सांपडतो. आणि त्यांत त्याला मुद्द्याचे सगळे दस्तऐवज सांपडतात. अशा रीतीनें केवळ योगायोगानेंच घनश्यामाच्या कारस्थानाचा ऐन प्राणच मनोहराच्या हातीं येतो. नाट्यरचनेच्या शैथिल्याचा ह्याच्यापेक्षां जास्त काय पुरावा द्यावा ?

आपल्यामुळें मालती आणि लतिका प्राणांतिक संकटांत सांपडताहेत ह्या जाणीवेनें धनेश्वराला पश्चात्ताप होतो. तो चौथ्या अंकाच्या सुरुवातीलाच आत्महत्या करवयाचें ठरवतो. त्यानंतर नाटकांतल्या कथानकामधला संदेह ढासळूं लागतो आणि प्रेक्षकांच्या जिज्ञासेचे ताण सैल होऊं लागतात. आंधळ्या गवयाच्या सोंगाला महेश्वर कंटाळतो. आणि लतिका त्याच्या त्या रहस्याचा बुडबुडाच फोडते. तेव्हां महेश्वराला कळून चुकतें कीं आपलें नि लतिकेचें लग्न घनश्याम जमवीत नसून तो स्वतःच तिच्याशीं लग्न करणार आहे म्हणून. त्याबरोबर महेश्वर एकदम पलटी खातो नि घनश्यामाविरुद्ध सर्व माहिती तो सरळ लतिकेला पुरवतो. त्यानंतर महेश्वराचा विनोदी

अवतार आपोआपच समाप्त होतो. आणि घनश्यामाला गुन्ह्याच्या जाळ्यांत कसें अडकवावयाचें ह्या कारस्थानांत महेश्वर दाखल होतो. घनश्यामानें धुंडिराजाकडूनहि एक बनावट कागद लिहून घेतला असल्याचें महेश्वर सांगतो. धनेश्वर आत्महत्या करणार असल्याची बातमी मालती सांगते. तेव्हां धनेश्वराची आत्महत्या थांबविण्यासाठीं घनश्यामालाच आपण खोट्या पोलिसांच्या सोंगांत आणण्याचें महेश्वर कबूल करतो. खोट्या पोलिसाच्या सोंगांत घनश्याम आला कीं त्याला खऱ्या पोलिसाच्या ताब्यांत द्यायचें असें तें कारस्थान असतें. आणि आत्महत्येच्या प्रयत्नांत धनेश्वर सांपडूं नये म्हणून त्याच्या कपाटांतली विषाची कुपी काढून तेथें सरबताची कुपी ठेवण्याची योजना होते. एवढ्यांत घनश्यामनें चोरलेलीं नि स्मशानांत पुरलेलीं सगळीं कागदपत्रें घेऊन मनोहर येतो. मग काय घनश्यामची नांगीच त्याच्या हातीं सांपडते. अशा रीतीनें चौथ्या अंकामध्यें एकंदरच कारस्थानाचा जो उलगडा होतो, तो इतका निर्जीवपणें होतो कीं, त्यामुळें तो अंक अतिशयच ढिला पडतो. तीन अंकांत नाटक इतकें चढवीत चढवीत नेल्यानंतर आणि प्रेक्षकांच्या जिज्ञासेला एवढे ताण दिल्यानंतर चौथ्या अंकांत नाटक एकदम कोसळल्यासारखें वाटतें. पांचवा अंक लिहावयाला गडकऱ्यांना मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्यच मुळीं मिळालें नाहीं. त्यांत फक्त दोनच प्रवेश आहेत. आणि दुसरा प्रवेश तर त्यांनीं मरणाच्या फक्त दहा मिनिटें आधीं लिहिला. घनश्यामला खऱ्या फौजदारानें ठरल्याप्रमाणें पकडलें. धुंडिराजकडून त्यांनीं लिहवून घेतलेला गुन्ह्याचा खोटा कबुलीजबाबाचा कागद त्याच्यापुढें करून फौजदार त्याला दरडावतो कीं, ' बोला, आतां सांपडलांत कीं नाहीं ? ' पण धुंडिराज तो कागद आपण होऊन आपल्या हातानें फाडून टाकतो. तेव्हा ' ही खरी निरपेक्ष दया ! ' असें म्हणून घनश्याम धुंडिराजाच्या पायावर लोळण घेतो नि नाटक संपतें.

घनश्यामनें धुंडिराज आणि धनेश्वर ह्यांना अडकवण्यासाठीं एकाकडून गुन्ह्याचा कबुलीजबाब घेण्याचें आणि दुसऱ्याचे दस्तऐवज चोरण्याचें जें कारस्थान रचलें तें जितकें ढोबळ होतें, त्याहूनहि घनश्यामला पोलिसांच्या कचाट्यांत अडकविण्याचें प्रभाकर, महेश्वर, लतिका वगैरे मंडळींचें कारस्थान लेचेंपेचें होतें. केवळ योगायोगानेंच मुद्देमालाचे कागदपत्र त्यांच्या हातीं आले. नाहीं तर काय झालें असतें ? धुंडिराज-कडून लिहवून घेतलेला गुन्ह्याचा कबुलीजबाब हा घनश्यामच्या विरुद्ध कसा काय पुरावा होऊं शकतो ? तो धुंडिराजनें स्वतःच्या हस्ताक्षरांत लिहिलेला असतो. त्यावर घन-श्यामची थोडीच सही असते ? मग तो कागद धुंडिराजनें स्वहस्तानें फाडून टाकण्यानें घनश्याम हा कसा काय दोषमुक्त होतो तें फक्त नाटककारालाच ठाऊक ! शेवटीं ' निरपेक्ष दया ' दाखवल्यामुळें घनश्यामचा उद्धार होतो, हें सर्व ठीक. पण घनश्यामानें

नाटकांतल्या सर्व पात्रांचा इतका अमानुष आणि क्रूर छळ केलेला आहे कीं वस्तुतः त्याला जन्माची अद्दल घडेल अशी कांहीं तरी भयंकर शिक्षा मिळावयाला पाहिजे होती. किंवा ती मिळण्याची शक्यता तरी नाटककारानें ह्या नाटकाच्या उत्तरार्धात निर्माण करावयाला पाहिजे होती; त्याखेरीज नाटकांतील बाकीच्या पात्रांना न्याय ( Poetic justice ) मिळाला असें कसें म्हणतां येईल ? धुंडिराज, धनेश्वर, मालती नि लतिका ह्यांना पकडण्यासाठीं घनश्यामानें जो सांपळा निर्माण केलेला होता, त्यांत तो स्वतः आपल्या कर्मानें अडकतो अशी कांहीं एकादी घटना जर नाटककारानें निर्माण केली असती तर मग तशा प्रकारचा न्याय मिळाल्याचें कांहीं समाधान प्रेक्षकांना झालें असतें. पण घनश्याम नुसत्या माफीवर सुटला. आणि तीहि माफी त्याला मागण्याचें कांहींच कारण नव्हतें. कारण त्याला अडकविण्यासारखा बिनतोड पुरावा पोलिसांच्या किंवा प्रतिपक्षाच्या हातीं मुळींच सांपडला नव्हता.

'भावबंधन' हें एक विनोदी नाटक आहे अशी सर्वसामान्य समजूत आहे. कोल्हटकरांच्या 'सहचारिणी' या प्रहसनात्मक नाटकावर मात करण्यासाठीं मुळीं गडकऱ्यांनीं तें नाटक मुळांत लिहिलें होतें. ह्या नाटकांत केवळ विनोद निर्माण करण्यासाठीं तीन पात्रें घालण्यांत आलेलीं आहेत. एक महेश्वर उर्फ कामण्णा नि इंदू-बिंदू या दोघी काळ्या कुरूप बहिणी. धुंडिराजाच्या गळ्यांत दागिन्यांचें घोंगडें अडकविण्यासाठीं आणि धनेश्वराचे कागद त्याच्या कपाटांतून चोरण्यासाठींच मुख्यत्वेंकरून महेश्वराचा या नाटकांत उपयोग करून घेण्यांत आलेला आहे. पहिलें काम तो पहिल्या अंकाच्या शेवटीं करतो आणि दुसरें काम करण्यासाठीं आंधळ्या कानडी गवयाचें सोंग घेऊन तो दुसऱ्या अंकाच्या पहिल्या प्रवेशांत धनेश्वराच्या घरांत शिरतो. आणि पांचव्या प्रवेशांत तें कागद चोरतो. त्यानंतर तिसऱ्या, चवथ्या किंवा पांचव्या अंकांत त्याला मुळीं कामच शिल्लक रहात नाहीं. अजागळस्तनाप्रमाणें हें पात्र त्या अंकात नुसतेंच लोंबत रहातें. इंदू-बिंदू ह्या दोघा काळ्या कुरूप बहिणींचा ह्या नाटकाच्या कथानकाशीं काडीमात्र संबंध नाहीं. केवळ हास्यनिर्मितीसाठीं हा काळा माल गडकऱ्यांनीं ह्या नाटकांत दडपून कोंबला आहे झालें. काळ्या नि कुरूप माणसांवर विनोद करण्याचा गडकऱ्यांना फार आवड होती. 'प्रेमसंन्यासा'त मथुरा, रिकामपणच्या कामगिरींत 'ठकी' त्याप्रमाणें 'भावबंधना'तल्या ह्या इंदू-बिंदू होत. माणसाच्या व्यंगांना किंवा कुरूपपणाला खर्ची टाकून हास्य निर्माण करावें कीं नाहीं हा एक वादाचा विषय आहे. त्याचा विचार इथें अनावश्यक आहे. पण कोणताहि विषय हास्यनिर्मितीसाठीं गडकऱ्यांनीं एकदां निवडला म्हणजे त्यासंबंधीं नंतर कांहींही लिहावयाचें तें बाकी ठेवीत नाहींत. इंदू बिंदूच्या काळेपणावर जेवढा म्हणून विनोद

निर्माण करतां येईल तेवढा करून गडकऱ्यांनीं प्रेक्षकांना जास्तींत जास्त हसविलें आहे. आतां ह्यानंतर काळेपणावर हास्यनिर्मिती करावयास गडकऱ्यांनीं इतरांना फारसा 'काळा' मालमसाला शिल्लक ठेवला आहे, असें वाटत नाहीं.

महेश्वर 'कामण्णा'चें सोंग घेऊन धनेश्वराच्या घरीं जातांच तो या दोन काळ्या पोरींच्या तडाख्यांत सांपडतो ही घटना अव्वल दर्जाची विनोदी आहे. दोन्हीहि पोरी ऋद्धिसिद्धीसारख्या त्याच्या सेवेला ठेवण्यांत आलेल्या आहेत. आणि दोन्हीहि स्वतःचें लग्न ठरवण्यासाठीं अगदीं हातघाईला आलेल्या असतात. प्रथम इंदू त्याला पकडते. तिला वाटतें कीं कामण्णा आंधळा असल्यामुळें त्याला आपलें रूप दिसणार नाहीं. म्हणून तो आपल्याला सहज पत्करील. इंदू एकदम मागून येऊन त्याला हटकते, तेव्हां तो अनवधानानें मराठींत एकदम बोलून जातो. तेव्हां तो कानडी नसून मराठी आहे हें त्याचें रहस्य इंदूला आपोआपच कळून चुकतें. त्याचा फायदा घेऊन इंदू त्याला सरळ दम देते कीं, "तुम्ही मला लग्नाचें वचन आतांच्या आता दिलें नाहीं तर ही तुमची मानगड मी आतां धनेश्वरकाकांना जाऊन सांगतें." तेव्हां महेश्वर मोठ्या पेचांत सांपडतो. तो तिचा हात हातांत घेऊन शपथ घेतो कीं, "हे स्वर्गस्थ देवांनो आणि स्वर्गाखेरीज दुसरीकडे खितपत पडलेल्या पितरांनो, तुमच्या साक्षीनें मी इंदूला लग्नाचें वचन देतों." इंदू लाजते नि आपल्या गालावर गुलाबी रंग चढला असल्याचें सांगते. तेव्हां 'दृष्टीलाच कळणारे हे शृंगारिक फेरफार वेळोवेळीं आपल्याला शब्दांनीं कळवीत जा' असें कामण्णा तिला सांगतो.

ह्या संकटांतून महेश्वर कसाबसा निभावतो आहे, तोंच धनेश्वराच्या कपाटांतले मराठी कागद डोळे उघडून तो तपासीत बसलेला असतांना, बिंदू मागून येते. कामण्णा हा आंधळा नसून चांगला डोळस आहे आणि त्याला मराठी समजतें, ही गोष्ट ताबड-तोब तिच्या लक्षांत येते. त्यावर 'धनेश्वर काकां'ना ती हाका मारूं लागते. तेव्हां कामण्णा तिचे पाय धरून क्षमेची याचना करतो. क्षमेच्या मोबदल्यांत बिंदू त्याच्या-कडून इंदूप्रमाणें लग्नाचें वचन मागते. तेव्हां आपण इंदूला लग्नाचें वचन दिलें आहे, असें तो सांगतो. बिंदू म्हणते, "तें वचन मोडा नाहींतर आम्हां दोघींशीं लग्न करा." महेश्वरला कळत नाहीं कीं एका बयेच्या तडाख्यांतून आपण निसटलों अन् दुसऱ्या अवदसेच्या कचाट्यांत सांपडतों काय? आपल्या नशिबाला झालं आहे तरी काय? का आपल्या लग्नकुंडलींतले सगळे शुभग्रह प्लेगमुळें बाहेरगांवीं रहावयाला गेले आहेत.

इंदूबिंदूच्या काळ्या रंगाचें विनोदी वर्णन करतांना महेश्वर एकापेक्षांहि एक टोलेजंग कल्पना लढवतो, त्या वेळीं हास्यरसाच्या महापुरांत श्रोते गटांगळ्या खाऊं लागतात.

महेश्वर म्हणतो, "गोरेपणामुळें मस्तानीच्या गळ्यांतून पिक उतरतांना दिसत असे. त्याप्रमाणें इंदूबिंदूंनीं जर डांबराचा रस गिळला तर तो त्यांच्या काळ्या गळ्यांतून

उतरतांना खालीं दिसेल. ह्या दोघी जर टवकारून पाहूं लागल्या तर आरशांचीं भिंगं तडकतील अन् घड्याळाचे कांटेसुद्धा जागच्या जागीं थबकतील. दोघींच्या तोंडावरच्या देवीच्या वणांची संख्या मोजतांना दशांश स्थळाचा उपयोग करावा लागेल. दोघींना पांढरीं पातळें नेसवून उन्हातान्हांतून घाम येईपर्यंत फिरवून आणलें तर तीं पातळें चंद्र-कळा म्हणून खुशाल विकतां येतील. ' श्वेत समुद्रां 'त ह्यांनीं दोनच बुड्या मारल्या तर त्याचा ' काळा समुद्र ' होऊन जाईल. " वगैरे वगैरे.

पुढें महेश्वर इंदू–बिंदूच्या तडाख्यांत एकाच वेळीं सांपडतो. तेव्हां तर हास्य-रसाला उधाण येते. इंदूला ठाऊक असतें कीं कामण्णाला मराठी येतें अन् बिंदूला ठाऊक असतें कीं तो आंधळा नाहीं म्हणून. तेव्हां दोघींना माहीत असतील तेवढींच रहस्यें त्यांच्याजवळ शाबूत राखून एकाच वेळीं दोघींशीं बोलायचें ही हास्यरसाची भलतीच कसरत होय. जी. आय्. पी. आणि बी. बी. ह्यांच्या दुहेरी धुमधडाक्यांत सापडलेल्या मुंबई शहरासारखी कामण्णाची स्थिती होते. पण त्यांतून तो सहीसलामत निसटतो. महेश्वर अन् इंदू–बिंदू ह्यांचा मुख्य नाटकाशीं विशेष संबंध नसतांना हीं तीन पात्रें साऱ्या नाटकांत भलताच भाव खाऊन जातात. आणि त्यांनीं निर्माण केलेल्या हास्याच्या धबधब्यांत नाटकांतला करुणरस कोठल्या कोठें वाहून जातो.

धुंडिराज हें या नाटकांतलें अत्यंत महत्त्वाचें पात्र आहे. त्याची बोलण्याची पद्धति, मूळ मुद्दा सोडून एकसारखें विषयांतर करण्याची त्याची प्रवृत्ति, एकाच शब्दाला अनेक प्रतिशब्द देण्याची त्याची शैली आणि ह्या सर्वांच्या जोडीला त्याचा भोळा-भाबडा आणि विसराळू स्वभाव ह्या सर्व वैशिष्ट्यांमुळें प्रेक्षकांना सदैव आवडणारा असा अविस्मरणीय नमुना मराठी रंगभूमीवर निर्माण झालेला आहे. त्याचें बोलणें ऐकतांना प्रेक्षकांना खळखळून हंसूं येतें. पण त्यांना हंसूं यावें म्हणून बोलणें नसतें. म्हणून तें एक विनोदी पात्र आहे असा कोणी गैरसमज करून घेऊं नये.

मोरेश्वराच्या लहानपणीं त्याची आजी वारल्याची गोष्ट सांगतां सांगतां धुंडिराज दुसरीकडेच वाहवत जातो. तेव्हा घनश्यामाला त्याला आठवण करून द्यावी लागते कीं, ' मोरेश्वराची आजी तिकडे मरून पडली आहे. तिचें काय झालें ? ' घनश्यामच्या कोटिबाज बोलण्याची स्तुति करतांना धुंडिराज म्हणतो, " असा कोटिक्रम हवा बोलण्यांत. हें आमच्यांत नाहीं. आमचें बोलणें सर्रास अघळपघळ. म्हणजे काय पांचपेच नाहीं. आपला ऐसपैस कारखाना. तुमचें बोलणें म्हणजे खुबीदार, प्रासयुक्त. असेंच पाहिजे बोलणें माणसाचें. उगीच गबाळग्रंथी फापटपसारा नाहीं कामाचा. या बोलण्यांत म्हणजे गंमत आहे. मौज आहे. अन् मजाहि आहे. "

मालतीला मागणी घालण्यासाठीं घनश्याम जेव्हां धुंडिराजबरोबर त्याच्या घरीं

येतो, तेव्हा धुंडिराज त्याला सांगतो, " हां, घनश्याम, तुम्हांला काय मागणी घालायची ती बोला. ही मालती. आमची फुल परमिशन आहे. हां, आमचा संकोच वाटेल नाहीं का तुम्हांला ? आतां जो कण्वासारखा इष्टीला म्हणून जातों, तो एकदम पाठविणेचे वेळीं आशीर्वादाला हजर. अण्णा किर्लोस्करांच्या शाकुंतलांतली गंमत बरं का ही ! अण्णाला बघितलें नसेल तुम्ही ! जबर पुण्याईचा मनुष्य. आणि हा एकेक दंड ! " अशा धुंडिराजाच्या बोलण्याच्या कितीतरी गंमती सांगण्यासारख्या आहेत.

पण वात्सल्य हा धुंडिराजाच्या स्वभावाचा खरा स्थायी भाव आहे. आपल्या मुलांबाळांवर त्याचें पराकाष्ठेचें प्रेम आहे.

" बाळगोपाळांच्या बोलण्याचा ज्याला राग आला, तो थेरडा म्हणजे चळलाच म्हणून समजा बेलाशक. म्हातारपणीं मन म्हणजे काय पाहिजे ? बोलण्याचा राग म्हणजे काय बोलणें आहे ? "

" घनश्याम, थकून भागून संध्याकाळीं घरीं असं येऊन पडावें. अन् भोंवताली या आनंदी पांखराची एकदां गोड गजबज सुरू झाली, म्हणजे सारा शीणभाग हरून जातो अगदीं. जीव कीं प्राण आहेत माझीं मुलें मला. आवतींभोंवती अशी किलबिल करूं लागलीं, म्हणजे जिवाला गार वाऱ्यावर चांदण्यांत पडल्यासारखें वाटतें. "

ह्याच वात्सल्याच्या जिवंत जिव्हाळ्यामधून पुढें करुणरसाचीं कारंजीं उचंबळलेलीं आहेत. मालतीच्या कन्यादानाच्या विचारानें धुंडिराजचें काळीज अगदीं गलबलून येतें. " काय सांगावें घनश्याम ! नदीला सासरीं पाठवितांना पर्वताचेंसुद्धां पाषाणहृदय फुटल्याखेरीज रहात नाहीं. ही पोरीची जात फार दुःखदायक. आनंदानें नटवितांना सुद्धां दुःखदायक. नथीच्या शोभेचा आनंद पहाण्यासाठीं आधीं कोवळें नाक टोचावें लागतें. कानाला कर्णफुलें लाभण्यापूर्वी आनंदानें ते वेधून काढावे लागतात. पतिरूपी खरा अलंकार कुंकवाच्या सौभाग्यानें नांवानिशीं रेखाटण्यासाठीं आधीं कपाळाचें मातापितरांचें सुख पुसून काढावें लागतें. "

चोरीच्या कबुलीजबाबाचा कागद धुंडिराजासमोर धरून जेव्हां घनश्याम त्याला सरळ धमकी देतो कीं, ' धनेश्वरला मालती द्या नाहीं तर तुमच्या जन्माची माती करून टाकतों. ' त्यावेळेला धुंडिराजाची जी व्याकुळ मनःस्थिति होते, तिचें अत्यंत हृदयविदारक चित्र त्याच्या नंतरच्या संवादांतून बाहेर पडतें. रक्तबंबाळ काळीज आंतल्याआत दाबून धरून आणि तोंडावर हास्याचें नि समाधानाचे खोटें आवरण ओढून मालतीचें लग्न आपण धनेश्वराशीं ठरविलें आहे असें धुंडिराज जेव्हां आपल्या घरांत सांगतो, तेव्हां प्रेक्षकांच्या काळजाचें पाणी पाणी होतें. येथून पुढें धुंडिराजाचें जुनें मोठेंमाबडें आणि शब्दवेल्हाळ व्यक्तिमत्त्व आमूलाग्र बदलून जातें. मूर्तिमंत करुणरसच जणुं कांहीं त्याच्या रुपानें नाटकांत वावरूं लागतो.

कोणत्या परिस्थितींत धनेश्वराशीं मालतीचें लग्न लावायला आपण तयार झालों

हें रहस्य जेव्हा धुंडिराज मालतीला सांगतो, तेव्हां ती पितृभक्त कन्या आपण होऊन त्या लग्नाला तयार होते नि धुंडिराजाचा आशीर्वाद मागते. धुंडिराजानें दिलेला तो आशीर्वाद म्हणजे करुण रसाची परिसीमा होय.

" मालती हा घे माझा आशीर्वाद !

शास्त्राभ्यास नको, श्रुती पढुं नको, तीर्थास जाऊं नको,
योगाभ्यास नको, व्रतें मख नको, तीव्रें तपें तीं नको
काळाचें भय मानसीं धरूं नको, दुष्टासि शंकूं नको.
ज्याचीया स्मरणें पतीत तरती तो शंभु सोडूं नको.

बेटा मालती, अष्टपुत्रा सौभाग्यवती भव. जा, म्हाताऱ्या धनेश्वराशीं लग्न कर, नाहीं तर एकाद्या प्रेताशीं लग्न लाव. तुझा संसार सुखानें साजरा होईल ! "

' जा, प्रेताशीं लग्न लाव. तुझें सौभाग्य अभंग राहील ! ' असा आशीर्वाद कोणता बाप आपल्या मुलीला देईल ! पण अशा अमंगळ आशीर्वादांतहि पितृप्रेमाचें मांगल्य नि पावित्र्य इतकें अपरंपार भरलें आहे कीं, त्याच्या उत्कटतेनें प्रेक्षक दिपून आणि भारावून जातात. नाट्यपूर्ण विरोधाभासाचे असले चमत्कार गडकऱ्यांनींच करून दाखवावेत !

धुंडिराजाबद्दल यापेक्षां अधिक काय सांगणार ? तें सांगणें ठीक नाहीं. बरें नाहीं. उचित नाहीं. अन् आवश्यकहि पण नाहीं.

ह्या नाटकांतली करुणरसाची दुसरी अधिष्ठात्री देवता म्हणजे धुंडिराजाची कन्या मालती. तिचं ज्या तरुणावर प्रेम असतें तो मनोहर. हा ' भूस्तरशास्त्रा 'चा तज्ज्ञ आहे. वस्तुतः मनोहराला ह्या नाटकांत सुतराम स्थान नाहीं. तो हॅम्लेटच्या बापाच्या भुतासारखा विनाकारण ह्या नाटकामधून वावरतो आहे. स्मशानामध्यें ज्या हिरव्या दगडाखालीं घनश्यामनें धनेश्वराचे कागदपत्र पुरले आहेत, तो हिरवा दगड ओळखण्यापलीकडे मनोहराला ह्या नाटकामध्यें दुसरें कांहींच काम नाहीं. मालतीला ह्या नाटकांत महत्त्वाची भूमिका आहे, म्हणूनच नाटककाराला मनोहर हें पात्र निर्माण करावें लागलें. त्यामुळें झालें आहे काय कीं मनोहरचा ह्या नाटकांत त्रिशंकु झालेला आहे. गडकऱ्यांचे उपनायक बहुधा असेच लोंबकळे असतात. विद्याधर घ्या किंवा रामलाल घ्या. मनोहर हा त्यांच्याच रांगेंत बसण्याच्या लायकीचा आहे. धुंडिराज अन् मनोहर ह्यांच्याबरोबर मालतीचे जे जे प्रवेश आहेत, ते ते सर्व मालतीच्या कारुण्यानें कमालीचे ओथंबलेले आहेत. मालतीची धाकटी बहीण कुमुद आपलें विसकटलेलें कुंकू नीट करून घ्यायला मालतीकडे येते. तेव्हां मालती आपल्या कपाळाचें कुंकू तिच्या कपाळीं लावते. ती म्हणते, " विसकटलेल्या कुंकवानेंच आतां माझें सौभाग्य शृंगारावयाचें आहे. " ही घटना अगदीं लहानच आहे. पण ती इतकी नाज़ुक नि हृदयस्पर्शी आहे

कीं ती पहात असतांना कोणी तरी आपल्या काळजाचा पापुद्रा सोलतें आहे असें वाटतें.

लतिका ही या नाटकाची नायिका आहे. ती तोंडानें फटकळ आहे. आणि तितकीच भावनाप्रधान आहे. लहान मुलासारखा तिचा स्वभाव आहे. बोलतां बोलतां कधीं ती भांडेल अन् 'गट्टी फू' करील आणि कधीं मनमोकळेपणानें खदखदा हंसू लागेल तें सांगतां येणार नाहीं. तिच्यावर प्रेम करणारा प्रभाकर हा मोठा रसिक आणि रंगेल आहे. लतिका नि प्रभाकर ह्यांचे ह्या नाटकांतले प्रणयसंवाद शृंगार आणि विनोद ह्यांच्या सुगंधानें दरवळलेले आहेत. लतिकेच्या गालावरच्या तिळाचें वर्णन करतांना प्रभाकर म्हणतो, "सौंदर्याचें हें चालतेंबोलतें काव्य सर्वांगपरिपूर्ण केल्यावर काव्य-रसाची सीमा झाली हें दाखविण्यासाठीं विधात्यानें या तिळाचा गालावर, हा सुंदर पूर्णविरामच देऊन ठेवला आहे." गडकऱ्यांच्या नाटकांतून 'गोविंदाग्रजा'चें अमर काव्य असें अधूनमधून प्रकट होतें म्हणूनच त्यांना एवढें अहेव सौंदर्य प्राप्त झालेलें आहे. प्रभाकराच्या भाषणांतुन सुंदर सुभाषितांची जागोजाग सुवासिक पखरण सांडलेली दिसते. 'सुंदर विषयावर सुंदर कोण बोलणार नाहीं?' 'मूर्ख मनुष्याची कोटी आणि कुरूप पोरीचा लडिवाळपणा अशी वेढब जोडी आमच्या हिंदु समाजांत सुद्धां सांपडा-यची नाही.' 'प्रीति कधीं जिभेनें बोलत नाहीं. ती ओंठावर थरथरते, गालावर रंगते आणखी डोळ्यांतून तरंगते.' 'चार पैशांच्या फुलांचा पुडा आणला तर त्यांत बावन्न गुलाब व छप्पन कमळें येतात.' 'अरे, मानली तर सारी बागशाई, नाहीं तर कोण्या झाडाचा पाला?'

'भावबंधन' नाटक हें केवळ लतिकेच्या फटकळ बोलण्यांतून निर्माण झालें, तिच्या ह्या बेफाद बोलण्यामुळें तिनें आपल्यावर काय काय आपदा ओढवून घेतल्या ह्याचें इत्थंभूत वर्णन करतांना मालतीनें चांगलीं तीन पानें लतिकेची कानउघाडणी केलेली आहे. त्याचा उपसंहार करतांना अखेर ती म्हणते, 'आज तुझ्या बोलण्यामुळें तुझ्या स्वतःच्या संसारांत दुःखाचा शिरकाव झाला. तुझ्या बाबांना जीव देण्याची पाळी आली. तुझें घनश्यामाशीं लग्न लावण्याची वेळ आली. एक नुसतें बोलणें. लतिकाबाई, बेजबाबदारपणाचें बोलणें नडतें आहे हें सारें!' लतिकेच्या बोलण्याचा हा जो बभ्रा नाटककारानें आणि नाटकांतल्या इतर पात्रांनीं केला आहे, तो शुद्ध राईचा पर्वत आहे. इतकी कांहीं ती अविचारी आणि बेजबाबदार नाहीं. असलीच तर त्या गोष्टीचा ह्या नाटकांत फारसा पुरावा आढळत नाहीं. आपल्या जिवाभावाच्या मैत्रिणीला—मालतीला जर मागणी घालावयाला घनश्यामासारखा आपल्या वडिलांचा यःकश्चित् मुनीम आला तर लतिकेचें डोकें फिरून कां जाऊं नये? आणि असें मुलखावेगळें घनश्यामाला ती म्हणाली तरी काय? हेंच ना, कीं, "घनश्याम, मालतीची मागणी



एच-२७३

म्हणजे मालती का भिक्षा आहे, का जोगवा आहे, का गोग्रास आहे ? आज मालतीला मागणी घातलीत, उद्यां माझ्याशीं लग्न करावयाला तयार व्हाल, वेड नाहीं ना लागलें तुम्हांला ? मालतीच्या लग्नाच्या वेळीं तुम्हांला हजर रहावें लागेल तें नवरदेव म्हणून नव्हे, तर लग्नाच्या सामानाची यादी करण्याकरितां ! " बस, एवढेंच ! आत्यंतिक आपत्तीचा भयंकर डोंगर कोसळावा असा भयानक दारुगोळा काय भरलेला आहे या भाषणांत ? व्यवहारांत असली परखड भाषा वारंवार आपल्याला ऐकूं येते. पण त्यानें नाहीं बोलणाराच्या हृदयांच्या चिंधड्या होत ? अन् त्यांचें जीवन उद्ध्वस्त होत तें ? बेजबाबदार बोलण्याचें वाजवीपेक्षां जास्त खापर लतिकेच्या डोक्यावर फोडण्यांत आलेलें आहे. तिच्यासारखी धनसंपन्नाची सुशिक्षित, स्वाभिमानी आणि तडफदार कन्या असेंच बोलणार. त्यांत लोकविलक्षण असें काय होतें ?

असें जर आहे तर लतिकेच्या ह्या बोलण्यानें घनश्यामाच्या संतापाचा ज्वालामुखी एवढा कां भडकला आणि त्यांतून सूडाचा सैतान एवढा कां प्रकट झाला ? त्याचें कारण घनश्यामचा जन्मजात स्वभाव. तो पराकोटीचा दुष्ट आणि हीन आहे असेंच नाटककारानें पहिल्यापासून त्याचें चित्र रंगवलें आहे. 'नाटकांतले आपण व्हिलन आहोंत' असें मिटक्या मारीत तो स्वतःच्या तोंडानें कबूल करतो. त्याचा मालक धनेश्वर तर त्याच्या तोंडावर त्याला 'पाजी' म्हणतो. " घनश्याम, भाविक अजागळापेक्षां तुमच्यासारखीं पाजी मनाचीं माणसेंच मला फार आवडतात. " घनश्याम हा एक पाजी माणूस होता, हें जर धनेश्वरला पहिल्यापासून माहीत होतें तर त्यानें त्याला उघड्या डोळ्यांनीं आपल्या पेढीवर मुनीमाच्या नोकरीवर कां ठेवलें ? आपल्या नीच मनोवृत्तीवर घनश्याम बेहद्द खुष आहे. तो म्हणतो, " मी असें दुष्ट कां होऊं नये ? नाटकांतल्या नीच पात्रांच्या धूर्त बुद्धिमत्तेनें आपले बेत कां रचीत बसूं नये ? त्या धनेश्वराच्या उर्मट पोरीनें ( लतिकेनें ) माझें मानी मन आपल्याकडे ओढून घेतलें आहे. एकदां मला असें ओढल्यावर पुढें माझ्या मगरमिठींतून मी कुणाला अजून सुटूं दिलें नाहीं. नुसत्या कल्पनेनेंच मी ब्रह्मानंदांत रंगून गेलों आहे. कर्तबगार बुद्धीच्या नीच वृत्तीची निशा और आहे. "

धनेश्वराचे कागद आपण सरळ सरळ त्याच्या कपाटांतून चोरले असें हंसत हंसत त्याच्या तोंडावर जेव्हां घनश्याम सांगतो, तेव्हां धनेश्वर त्याला विचारतो, " चांडाळा, काय करण्याचें योजलें आहेस मनांत तूं ? " त्यावर घनश्याम त्याला छातीठोकपणें सांगतो, " आपण जाणतच आहां कीं मी पाजी मनाचा मनुष्य आहें म्हणून-बेचाळीस पिढ्यांसकट आपल्याला मातींत मिळवणार आहें मी ! "

लतिका जेव्हां घनश्यामाशीं लग्न करावयाला तयार होते तेव्हां तिच्याशीं

जास्तींत जास्त क्रौर्यानें आणि दुष्टपणानें बोलण्याचा उच्चांक घनश्याम मोडतो.

घनश्याम : असा काय अपराध केला होता मी आपला ? मी हलक्या दर्जाचा असेन. सर्पाप्रमाणें दुष्ट असेन. किंवा वाघाप्रमाणें क्रूर असेन. पण म्हणून मला सुखदुःख, मनोवृत्ति ही कांहींच नसतील का ?

लतिका : इतकें आर्जवून जीव तोडून सांगितलें तरी दयामाया कशी हो येत नाहीं !

घनश्याम : काय संबंध दयामाया येण्याचा ? कोणी कधीं माझ्यावर दयामाया केली आहे, म्हणून मोबदल्याखातर मी दुसऱ्यावर दया करूं ? कोणत्या मनुष्यानें माझ्यावर निरपेक्ष शुद्ध असंबद्ध दया केली आहे ? टीचभर उघड्यानागड्या देहाच्या देणगीखेरीज मानवजातीनें आजवर या एकलकोंड्या घनश्यामावर काय उपकार केले आहेत ? जिथें तिथें मला अनादर, तिरस्कार, सहाय्यशून्यता आणि परकेपणा यांचाच अनुभव येत गेला आहे. ( तेव्हां लतिका त्याचे पाय धरते ). आपला नुसता हात धरल्यानें आपलें हृदय ज्याप्रमाणें माझ्या हातीं लागण्यासारखें नाहीं, त्याप्रमाणें नुसते माझे पाय धरल्यामुळें आपल्याला माझें मस्तकहि मिळायचें नाही. ( आपलें हृदय आपल्या मस्तकांत आहे, असा घनश्यामचा दावा असतो. ) कारण हातापासून हृदय दोनच हात दूर असतें, तर पायापासून डोकें साडेतीन हात अंतरावर असतें.

घनश्याम जो साऱ्या जगावर चिडला आहे, त्याचें कारण आपल्या टीचभर नागड्याउघड्या देहाला जन्म देण्यापलीकडे मानव जातीनें आपल्यावर कांहीं एक उपकार केले नाहींत आणि उभ्या आयुष्यांत कधीं कोणी आपल्यावर निरपेक्ष दया अशी केली नाहीं. म्हणून आपण कोणाचें कांहीं एक लागत नाहीं. तेवढ्यासाठीं तो कोणाच्याही सुखसर्वस्वाला आणि संसाराला आग लावण्यासाठीं हातांत अष्टौप्रहर विस्तव घेऊन हिंडत असतो. घनश्यामचा जगावरचा हा राग अनाठायीं आहे. तो उघड्यानागड्या देहानें जन्माला आला हें समजलें. मग त्याचें पालनपोषण किंवा जें कांहीं शिक्षण झालें असेल तें कोणी केलें ? शकुंतलेला ज्याप्रमाणें रानांतल्या शकुंत पक्ष्यांनीं वाढविलें, त्याप्रमाणें रस्त्यावर पडलेल्या नागड्याउघड्या घनश्यामला काय कावळ्यांनीं आणि गिधाडांनीं वाढविलें नि मोठें केलें ? उभ्या आयुष्यांत आपल्यावर कोणीही निःस्वार्थी किंवा निर्व्याज दया केलेली नाहीं हा घनश्यामचा सरधोपट दावा विश्वसनीय वाटत नाहीं. कारण तो जर खरा असता तर उभ्या नाटकांत मोहरमच्या वाघाप्रमाणें धांगडधिंगा घालणारा हा घनश्याम शेवटीं धुंडिराजनें आपल्या कबुली-जबाबाचा नुसता कागद फाडल्याबरोबर 'निरपेक्ष दया-निरपेक्ष दया !' म्हणून त्याच्या पायापाशीं कोलमडून उताणा पडला नसता.

कसली निरपेक्ष दया दाखवली हो धुंडिराजने घनश्यामवर ? तो कबुलीजबाबाचा कागद फाडून टाकला ही ? अगोदर त्या कागदानें घनश्याम गुन्हेगार मुळीं ठरतच नव्हता. घनश्यामला स्वतःला ही गोष्ट पुरेपूर माहीत असलीच पाहिजे. शेवटीं फौजदार

जेव्हां घनश्यामला तो कागद दाखवून म्हणाला कीं, " धुंडिराजपंताची ही लेखी साक्ष तुमच्याविरुद्ध असतांना तुमचें काय चालणार ? " तेव्हां घनश्यामनें तुच्छतेनें हंसून त्याला सांगावयाला पाहिजे होतें कीं, " फौजदारसाहेब, हा कागद घेऊन त्याचं लोणचं घाला ! ह्या कागदानें माझा गुन्हा सिद्ध होतो हें कोणत्या गाढवानें तुम्हांला सांगितलें हो ? " पण घनश्यामसारखा पहिल्या नंबरचा बुद्धिमान् आणि डांबीस माणूस नेमका याच वेळीं आपली जीभ, टाळ्याला चिकटवतो !

तेवढ्यांत धुंडिराज तो कागद फाडतो आणि घनश्याम त्याचे पाय पकडतो. प्रेक्षक कडाकडा टाळ्या वाजवतात. जादूगार ज्याप्रमाणें हातचलाखी करून प्रेक्षकांच्या डोळ्यांत धूळ टाकतो, त्याप्रमाणें ' निरपेक्ष दये ' ची ही ' ट्रिक ' करून गडकऱ्यांनीं प्रेक्षकांना सपशेल चकवलें आहे.

घनश्याम हा फारच भडक रंगांत रंगवलेला खलनायक आहे. जगांत त्याच्या-पेक्षांहि दुष्ट माणसें एकापेक्षां एक भयंकर आढळतील. पण समाजाच्या दैनंदिन जीव-नांत तीं वावरत असतांना त्यांना ओळखणें फार कठीण असतें. आणि इथें तर घन-श्यामनें ' मी व्हिलन आहें ' अशी डोक्यावर पाटी लावायचें तेवढें काय तें बाकी ठेवलेलें आहे. कमलाकर झाला काय, वृंदावन झाला काय किंवा घनश्याम झाला काय, सर्व खलपुरुषांचे तोंडवळे जवळ जवळ सारखेच, एकूण काय, तर गडकऱ्यांना खलपुरुष मुळीं साधलेच नाहींत असें म्हणावें लागतें.

' भावबंधन 'मधलीं थोडीं पदें गडकऱ्यांचीं आणि बाकीचीं सर्व पदें त्यांचे गुरु श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचीं आहेत. कोणाचीं का असेनात, पण ह्या नाटकांतलीं एकूण एक पदें भिकार आहेत, ह्यांत शंका नाहीं.

' भावबंधन ' हें विनोदी नाटक आहे का गंभीर नाटक आहे असा शेवटीं प्रश्न उरतो. विनोदी नाटक म्हणून गडकरी तें लिहावयाला बसले खरे. पण धुंडिराज, मालती नि लतिका ह्यांच्या अश्रूंनीं भिजून चिंब झालेलें पराकाष्ठेचें करुणगंभीर नाटक शेवटीं त्यांच्या हातून लिहून तयार झालें. गंमत ही कीं, प्रेक्षकांना त्याची आठवणच रहात नाहीं. ' भावबंधन ' म्हटलें कीं त्यांना फक्त कामण्णा नि इंदू–बिंदू आठवतात. अय्यायो, ह्या कर्माला काय करावयाचें म्हटलें ?

गडकऱ्यांच्या पांच नाटकांवरील विवेचन येथें संपलें. गडकऱ्यांच्या नाट्यप्रतिभे-बद्दल संपूर्ण आदरभाव मनांत बाळगून त्यांच्या नाटकांतल्या विविध दोषांचें मी प्रांजळपणें दिग्दर्शन केलें आहे. हे दोष असूनहि त्यांच्या नाटकांना अभूतपूर्व यश कां मिळालें आणि जवळ जवळ अर्धशतकपर्यंत त्यांनीं महाराष्ट्राला मंत्रमुग्ध कां केलें

त्याचीहि कारणमीमांसा मी त्याबरोबर केलेली आहे. आज काळ बदललेला आहे. नाट्यतंत्र फार पुढें गेलें आहे, सामाजिक समस्येचें नि नाटकांच्या विषयांचें स्वरूपहि आज वेगळें झालें आहे. त्या दृष्टीनें पहावां गडकऱ्यांचीं नाटकें आज जुनीं वाटतील. तथापि, गडकऱ्यांच्या भाषेचा लखलखाट त्यांच्या काव्यमय कल्पनांचा आणि उत्प्रेक्षांचा झगझगाट आजहि पहिल्याप्रमाणें वाचकांचे डोळे दिपवल्याखेरीज राहणार नाहीं. हास्यरसाचा नि करुणरसाचा परिपोष करण्याचें गडकऱ्यांच्या भाषेचें सामर्थ्य आजहि पहिल्याइतकेंच प्रभावी वाटतें. भारतीय संस्कृतीमधलें नि प्राचीन साहित्यांतलें जें जें म्हणून कांहीं मंगल नि ऊर्जस्वल आहे, तें तें देदीप्यमान स्वरूपांत गडकऱ्यांनीं आपल्या नाटकांत मांडलेलें आहे. म्हणूनच नाट्यसृष्टींतलें गडकऱ्यांचें कार्य युगप्रवर्तक नि मराठी रंगभूमीवरील त्यांचें स्थान अढळ आहे !

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे आधुनिक मराठी वाङ्मयांतील विनोदाचे जनक होत. म्हणून मराठी भाषेंतील ' विनोदपीठाचे आद्य शंकराचार्य ' असा आम्हीं त्यांचा मागें उल्लेख केला होता. विनोदाचें भाग्य थोर कीं त्यांना राम गणेश गडकऱ्यांसारखा तुल्यबळ शिष्य त्यांच्या हयातींतच लाभला. रंगभूमीवर आलेलें आपलें पहिलेंच ' प्रेमसंन्यासचा ' हें नाटक श्रीपाद कृष्णांना अर्पण करतांना 'माझे परमपूज्य लेखन गुरु ' असा गडकऱ्यांनी उल्लेख केलेला आहे. एवढेंच नव्हे तर कोल्हटकरांचेच लेख वाचून आपल्याला ' चार शब्द ' लिहितां आले अशी कृतज्ञतेची कबुलीहि त्यांनीं त्या ' अर्पणपत्रिकेंत ' दिलेली आहे. ह्या त्यांच्या कबुलींत औपचारिक असें कांहीं नाहीं. गडकऱ्यांच्या सर्वच लिखाणावर कोल्हटकरांची गडद छाया पडली आहे. आतां, काव्याच्या नि नाट्याच्या प्रांतांत आपल्या गुरूवर शिष्यानें निःसंशय मात करून त्यांच्या डोळ्यांसमोर त्यांना निष्प्रभ करून टाकलें हें खरें आहे. तथापि, विनोदाच्या क्षेत्रांत गडकऱ्यांच्या स्वतंत्र प्रतिभेचा फारसा आविष्कार होऊं शकला नाहीं.

नाटकांच्या लोकप्रियतेमुळें गडकऱ्यांच्या विनोदाचा कोल्हटकरांच्या विनोदापेक्षां अधिक बोलबाला झाला; पण कोल्हटकरांच्या मार्मिक विनोदाची झेंप आणि विविधता कांहीं गडकऱ्यांना आपल्या विनोदांत आणतां आली नाहीं. ह्याचें कारण कोल्हटकरांनीं सामाजिक तत्त्वज्ञानाचा खोलवर विचार केला होता. म्हणून सामाजिक दोषांचें विदारक विश्लेषण ते पुरोगामी भूमिकेवरून करूं शकले. गडकऱ्यांचा सामाजिक विचार तुटपुंजा होता आणि वृत्तीनें तर ते सनातनीच होते. गडकऱ्यांचीं नाटकें नि कविता वाचतांना कोल्हटकरांची विशेष आठवण होत नाहीं; पण त्यांचा विनोद वाचतांना मात्र पावलो-पावलीं कोल्हटकरांचें स्मरण होतें. कोल्हटकरांच्या छायेंतून फारच थोड्या ठिकाणीं गडकरी बाहेर पडलेले आढळतात.

कोल्हटकरांनीं आपल्या विनोदाचें एक स्वतंत्र तंत्र निर्माण केलें होतें. त्याचेंच पुष्कळसें अनुकरण गडकऱ्यांनीं केलें. कोल्हटकरांच्या टांकसाळींत निर्माण झालेली त्यांची विशिष्ट भाषा, वाक्यांची ढब, शब्दांचे श्लेष अगदीं त्यांच्या क्लिष्टतेपर्यंत गडकऱ्यांनीं सही सही उचललें. कोल्हटकरांनीं आपल्या विनोदी लेखनाची सुरुवात ज्याप्रमाणें निबंधांनीं केली, त्याप्रमाणें गडकऱ्यांचें प्रारंभींचें सर्व विनोदी लेखन निबंधात्मक स्वरूपाचेंच होतें. कोल्हटकरांचे 'सुदाम्याचे पोहे 'च त्यांच्या डोळ्यांसमोर असले पाहिजेत. वयाच्या बाविसाव्या वर्षी गडकऱ्यांनीं आपल्या विनोदी लेखनाला सुरुवात केली.

ज्या नाट्यसृष्टीमध्यें ते त्या वेळीं वावरत होते, तिच्यांत विनोदाचा मालमसाला मिळावयाला त्यांना भरपूर वाव होता. म्हणून साहजिकच त्यांच्या विनोदाची झेंप पहिल्यानें नाट्यविषयावर पडली. ' सवाई नाटकी ' ह्या टोपण नांवानें त्यांनीं ' नाटक कसें लिहावें, ' ' नाटक कसें पाहावें ' ' प्रमादपंचदशी ' ह्या मथळ्याखालीं ' रंगभूमि ' मासिकांतून कांहीं स्फुट लेख लिहिले. हे लेख इतके सामान्य आहेत कीं, ते गडकऱ्यांच्या लेखणींतून उतरले आहेत असें कांहीं आज वाटत नाहीं. इतकी त्यांची विनोदाची प्रतिभा त्या वेळीं अपक्व अवस्थेंत होती.

' नाटक कसें लिहावें ' ह्या लेखांत एक दोन स्थळेंच मनोरंजक सांपडतील, बाकीचा भाग अगदीं मामुली आहे. एका नाटकमंडळींतील सूत्रधाराच्या आणि गणपतीच्या पात्राचें वांकडें होतें. पण नाटकाच्या प्रारंभीं सूत्रधाराला गणपतीच्या पायां पडावें लागत असे. ही आपली मोठी मानहानि आहे असें सूत्रधाराला वाटे. एक दिवस गणपतीला चांगला हात दाखविण्यासाठीं त्याच्या पायां पडतेवेळीं सूत्रधार त्याच्या पायाच्या आंगठ्याला कडकडून चावला. त्याबरोबर ' विघ्नहर्त्या ' गणपतीनें तें विघ्न टाळण्यासाठीं आपली सोंड उपटून सूत्रधाराच्या पाठीवर आदळली. त्यामुळें नाटकगृहांत खूपच दंगा झाला आणि तें नाटक थांबलें. त्यानंतर सूत्रधाराच्या प्रवेशांतल्या कांहीं मौजा गडकऱ्यांनीं वर्णन केल्या आहेत.

सूत्रधाराचें मंगलाचरण संपल्यानंतर दोन्ही पारिपार्श्वक दोन्ही बाजूंनीं निघून जातांच एकदम सूत्रधार उद्गारतो, " पुरे, पुरे. हा सभाजनांचा रसभंग करणारा खटाटोप पाहिजे कशाला ? " त्याला उद्देशून गडकरी लिहितात कीं, एकाच क्षणापूर्वी भक्तिभावानें ईश्वराला आळवणारा माणूस हा नाटकाचीं सूत्रें हातीं येतांच एवढा मस्तवाल होतो कीं, ईश्वराच्या स्तुतीला तो ' सभाजनांचा रसभंग करणारा खटाटोप ' असें म्हणून पार मोकळा होतो, हें आश्चर्य नव्हे काय ? त्यानंतर नाट्यप्रयोगाला ' भार्येचें अनुमोदन ' घेण्यासाठीं ' वेषसिद्ध झाली असल्यास बाहेर ये ' म्हणून तो विचारतो. आतां वेषसिद्धि झाल्यावर हमेशा आपला नवरा आपल्याला बाहेर बोलावतो, हें जर नटीला ठाऊक असतें, तर ती दर प्रयोगाच्या वेळीं त्याच्या बोलावण्याची वाट कां पाहात बसते ? आणि बाहेर आल्यावर ' काय आज्ञा आहे ? ' म्हणून मूर्खासारखें कां विचारते ?

नवऱ्याचा पोषाख, दिव्यांचा चकचकाट, प्रेक्षकांची दाटी, तबलजी – पेटीवाला हा सर्व देखावा पाहून आज नाटक आहे, हें समजण्याची देखील तिला अक्कल नसावी काय ? आपला नवरा नाटक करणार आहे असें त्याच्या तोंडून समजतांच ती अतिशय रागावते. नाना प्रकारें त्याला बोध करून पहाते; पण तिचें म्हणणें सूत्रधाराला कधींहि पटत नाहीं आणि पटूनहि उपयोग काय ? कारण नाटकाच्या जाहिराती निदान चोवीस तास तरी आधीं लागलेल्या असतात. त्यानंतर तें एकमेकांना शाबासक्या देतात, मुलीच्या लग्नाच्या बाटाघाटी करतात, एकमेकांच्या करमणुकीसाठीं गातात आणि सरतेशेवटीं कोणाची तरी चाहूल लागतांच सूत्रधार एखाद्या भुरट्या चोराप्रमाणें नटीसह पळून जातो. सूत्रधाराच्या मुलीचें सुद्धां लग्न कां होत नाहीं हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. गडकरी लिहितात, " कार्तिकस्वामी आणि सूत्रधाराची मुलगी यांचें कौमार्य अक्षय्य आहे. सूत्रधाराची मुलगी ही सदैव उपवर असते. काळाचा हिच्या वयावर परिणाम होत नाहीं किंवा हिला कोणी नवराहि मिळत नाहीं. हिच्यांत कांहीं तरी खोड असल्यामुळें म्हणा किंवा ही नाटकवाल्याची मुलगी असल्यामुळें म्हणा, हिला पत्करावयाला कोणीहि तयार होत नाहीं. हिचा बापहि या बाबतींत मोठा बेफिकीर राहातो. प्रेक्षकांच्या मनोरंजनासारख्या साध्या कर्तव्याबाबत प्रयत्नवादी असणारा हा माणूस आपल्या कन्येच्या लग्नासारख्या महत्त्वाच्या कर्तव्याबद्दल देवावर भरंवसा टाकून पूर्ण दैववादी बनतो. रोजचा हा प्रकार ऐकून कंटाळलेल्या प्रेक्षकांमधून एखादा परोपकारशील 'कोदंड' उत्पन्न होऊन, ह्या मुलीचें पाणिग्रहण करील तरच बाकीच्या प्रेक्षकांच्या मागची ही पुराणश्रवणाची कटकट चुकण्याचा संभव आहे. " एवढा भाग वजा केला तर बाकीचा हा सर्व लेख सामान्य आहे. त्यांत विनोदनिर्मितीची पुष्कळ खटपट आहे; पण ती यशस्वी झालेली नाहीं.

'नाटक कसें पाहावें' हा लेखहि पूर्वोक्त लेखाप्रमाणेंच विनोदसिद्धीच्या बाबतींत अयशस्वी झालेला आहे. साम–दाम–दंड–भेद इत्यादि साधनांचा उपयोग करून फुकट नाटकें पाहणाऱ्या प्रेक्षकांचें वर्णन अगदीं बारीकसारीक तपशिलानें त्यांत देण्यांत आलें आहे; पण तें कित्येकदां फारच नीरस झालेलें आहे. नाटककंपनीशीं बादरायण संबंध जोडून फुकट नाटक पाहूं इच्छिणाऱ्या एका उपद्व्यापी माणसाची हकीगत मात्र फारच मनोरंजक आहे. " कांहीं दिवसांमागें आमच्या नाटकमंडळींत एक माकड बाळगलें होतें. एक दिवस एक गृहस्थ डार्विनसाहेबांचें 'ओरिजिन ऑफ स्पीसीज' हें पुस्तक घेऊन दरवाजावर आले. त्या पुस्तकांतलें अक्षर दाखवून त्यांनीं त्या माकडापासून आपली उत्पत्ति आहे, हें सिद्ध करून दाखविलें आणि त्या नात्याच्या जोरावर फुकट नाटक पाहण्याची परवानगी ते मागूं लागले. त्यांच्या कांहीं अंगविक्षेपांवरून त्यांच्या म्हणण्याला दुजोरा मिळाला आणि आमच्या मंडळींतील एका प्राण्याचे आप्त म्हणून आम्हीं त्यांना नाटकास फुकट सोडलें. मात्र दुसऱ्या प्रयोगाच्या दिवशीं

त्या माकडाचा वंशवृक्ष इतका फोफावला कीं, त्याच्या शाखांवरून उड्या मारण्यासाठीं त्या माकडास कायमचें सोडून देणें आम्हांस भाग पडलें. "

पूर्वीच्या काळीं प्रत्येक नाटक मंडळी बहुधा दर मुक्कामास ' विद्यार्थ्यांसाठीं निम्म्या दरानें ' एक खेळ लावीत असे. त्याचें वर्णन गडकऱ्यांनीं अत्यंत मार्मिकपणें केलें आहे : "त्या दिवशीं अगदीं गांवगुंडाला सुद्धां विद्यादेवीच्या भक्तीचा उमाळा येतो. चारचार विद्यार्थ्यांचे बापसुद्धां त्या दिवशीं टोपी घालून विद्यार्थी बनतात. आपल्या ' भुजंगनाथी ' चेहेऱ्याकडे शारदादेवी ढुंकूनहि पाहणार नाहीं किंवा आपल्या ओठावरच्या केरसुण्या शाळेची झाडलोट करण्यासाठीं मात्र योग्य आहेत, असल्या विरोधक गोष्टींबद्दल ते अगदीं बेदरकार असतात. डोक्यांत विद्या नसली तरी चालेल; पण डोक्यावर टोपी असली कीं झाला विद्यार्थी. अशा रीतीनें आधीं स्वतः टोपी घालून मग नाटकवाल्यांना टोपी घालावयास तयार होणारे विद्यार्थी बहुधा प्रत्येक गांवीं आढळतात. विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यासाठीं सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासारख्या फंदांत पडण्यापेक्षां सरकारनें सव नाटकवाल्यांना प्रत्येक खेळ ' विद्यार्थ्यांसाठीं निम्म्या दरानें ' लावण्याचा हुकूम केल्यास जास्त यश येण्याचा संभव आहे.

ह्या वर्णनाला गडकऱ्यांनीं जी पुढें पुस्ती जोडली आहे ती बहारीची आहे : " फुकट नाटक पाहण्यासाठीं गांवगुंड जसे चांगल्या वर्गात शिरूं पाहतात, तसेच चांगले लोकहि वाईट वर्गात शिरतील कीं काय या प्रश्नाचा निकाल लावण्यासाठीं निव्वळ ' हलकट लोकांसाठीं ' निम्म्या दरानें एखादें नाटक लावण्याची मीं एकदां आमच्या मॅनेजरांस विनंती केली होती; परंतु आमच्या मॅनेजरांचें माझ्याबद्दल फारसें चांगलें मत नसल्यानें मी आपल्या मित्रमंडळीसाठीं ही तजवीज करतों आहें अशी त्यांची समजूत झाली आणि त्यांनीं माझ्या विनंतीकडे दुर्लक्ष केलें. "

"'प्रमादपंचदशी' हा लेख अपूर्ण आहे. त्यांत फक्त चारच प्रमादांचा उल्लेख केलेला आहे; पण त्यांत विशेष हास्यकारक असें कांहीं नाहीं. ह्यांत त्या काळामधल्या नटांच्या चित्रविचित्र रंगभूषेची जी थट्टा केलेली आहे ती विशेष मनोरंजक वाटते. ' नाटकी सृष्टींत काळ्या रंगानें काळेंच केलें आहे. राजा पाहावा तो गोरा. त्याचा हुजऱ्या पाहावा तोहि तितकाच गोरा. चारुदत्त जितका गोरा तितकाच त्याला मारावयाल तयार झालेला मांगहि गोरा. ऋषीचें सांग असलें म्हणजे ह्या रंगीत कामांत भाणखी भस्माची भर. कोणी हें सारवण सर्वांगभर करतो तर कोणी नुसते पट्टेच ओढून थांबतो. शकुंतलेला पोहोंचविण्यासाठीं भिन्न रीतीनें रंगून तयार झालेले हे ऋषिकुमार पाहिले कीं, त्यांच्यांतही तरसाप्रमाणें पट्ट्यांचे, ठिपक्यांचे प्रकार होते कीं काय असें वाटतें. सर्वांग रंगलेले ऋषि एखाद्या पिठाच्या गिरणीमधून नुकत्याच बाहेर पडलेल्या मजुरांसारखे दिसतात. खड्ड्यांतून निघालेल्या गोरखनाथानें आपल्या अंगावर भस्माचा थर इतका जाड चढविला होता कीं, बारा चौदा वर्षे खड्ड्यांत पडून राहिल्यामुळें त्यांच्या-

वर कदाचित् बुरशी चढून त्याची अशी दशा झाली असेल अशी आम्हीं समजूत करून घेतली. ”

तथापि, याच कालखंडांत ‘जगूचा रिपोर्ट’ म्हणून अवघा पंचवीस ओळींचाच जो विनोदी लेख गडकऱ्यांनीं लिहिलेला आहे, तो इतका सुंदर आहे कीं, त्याची जेवढी प्रशंसा करावी तेवढी थोडीच आहे. जन्मापासून नाटकमंडळीच्या वातावरणांत वाढलेला जगू नांवाचा एक लहानसा मुलगा लग्नसमारंभाला जातो आणि त्याचा रिपोर्ट आपल्या समवयस्क मित्रांना देतो. त्यांतला कांहीं भाग येथें देतों :

“ स्टेज मातीचें होतें, पण फारच लहान होतें. खेळाचे ‘पास’ फुकट वांटले होते. कुलीन स्त्रियांसाठीं स्टेजजवळ जागा राखून ठेवली होती; पण वेश्यांसाठीं मुळींच जागा नव्हती आणि त्या आल्याहि नव्हत्या. पेटी-तबल्याबवळ सनया आणि ताशे ठेवले होते; पण त्या लोकांचीं कामें केव्हां होतीं हें त्यांचें त्यांना सुद्धां ठाऊक नव्हतें. म्हणून त्यांना ‘वाजवा रे वाजवा’ असें मधून मधून सांगावें लागत होतें. स्टेजवर मुख्य पुरुषपार्टी, मुख्य स्त्रीपार्टी व भटाचें सोंग घेतलेला एक मनुष्य ह्यांचीं कामें चाललीं होतीं. भटाची नक्कल चोख होती, पण मुख्य पार्ट्यांच्या नकला मुळींच पाठ नव्हत्या. म्हणून भट त्यांना स्टेजवरच ‘प्रॉम्ट’ करीत होता. तें प्रॉम्टिंग ऑडिअन्सला ऐकूं येत होतें. स्त्रीपार्ट्याचें काम पहिलेंच असावें. कारण तो फार घाबरून मान खालीं घालून बसला होता. शेवटीं त्या दोघांचें लग्न लागलें. सात-आठ जणांनीं कोरस म्हटला आणि खेळ आटोपला. राजाराणी कोरसांत म्हणत नव्हतीं. ” गडकऱ्यांच्या विनोदी प्रतिभेचें पहिलें तेजस्वी दर्शन ह्या चिमुकल्या लेखांत होतें.

नाटकमंडळींतलें गडकऱ्यांचें वास्तव्य संपल्यानंतर साहजिकच ‘ सवाई नाटकी ’ पडद्यामागें कायमचाच अंतर्धान पावला. त्यानंतर बऱ्याच वर्षांनीं बाळकराम ह्या नव्या टोपण नांवाखालीं गडकऱ्यांचा प्रगल्भ विनोदी अवतार ‘ मासिक मनोरंजना ’ मधून प्रकट झाला. ह्या नांवानें त्यांनीं अवघे पाचच विनोदी लेख लिहिले; पण तेवढ्या थोड्याशा भांडवलावर साऱ्या महाराष्ट्राला गडकऱ्यांनीं चकित करून ‘श्रेष्ठ प्रतिभेचे विनोदी लेखक’ म्हणून महाराष्ट्रांत आपला लौकिक प्रस्थापित केला. हे पांच लेख ‘ रिकामपणाची कामगिरी’ ह्या मथळ्याखालीं प्रथम प्रसिद्ध झाले. त्यांपैकीं ‘ वरसंशोधन ’ ‘ लग्नाच्या मोहिमेची पूर्वतयारी ’ आणि ‘ लग्न मोडण्याचीं कारणें ’ ह्या तीन लेखांत मुलीचें लग्न जमवतांना तिच्या पित्याला आपल्या समाजांत ज्या अनंत अडचणी येतात, त्यांचें अत्यंत विनोदी पण विदारक चित्र गडकऱ्यांनीं रेखाटलेलें आहे.

तथापि, ही लेखमाला दुर्दैवानें अपूर्ण राहिलेली आहे. चौथा लेख ‘ स्वयंपाक-घरांतील गोष्टी ’ हा आहे. त्या काळीं पुष्कळशा नियतकालिकांतून ‘ स्वयंपाकघरांतल्या

गोष्टी ' हें सदर प्रसिद्ध होत असे; त्याचें अत्यंत मार्मिक आणि हास्यकारक विडंबन गडकऱ्यांनीं केलेलें आहे. गडकऱ्यांच्या स्वतंत्र विनोदी प्रतिभेचा हा एक अमर नमुना आहे. पांचवा लेख ' कवींचा कारखाना ' हा आहे. केशवसुतांनीं मराठी साहित्यांत आधुनिक कवितेचें नवें युग सुरू केल्यानंतर महाराष्ट्रांत कवींचें एक भरमसाट पीक आलें होतें, त्याचें विडंबन गडकऱ्यांनीं या लेखांत केलेलें आहे.

कोल्हटकरांचा विनोद हा प्रामुख्यानें सामाजिक स्वरूपाचा होता. रूढ परंपरेनें समाजाच्या हाडींमाशीं खिळलेले जुने दोष आणि नव्या जमान्यांत निर्माण झालेलीं नवीं खुळें आणि ढोंगें हीं वेशीवर टांगण्यासाठीं कोल्हटकरांनीं आपल्या विनोदाचा उपयोग केला. गडकऱ्यांनीं सामाजिक समस्यांचा इतका खोलवर विचार केला नव्हता, याचा ओझरता उल्लेख प्रारंभींच आम्हीं केला. त्यामुळें ठकीच्या लग्नासंबंधींचे तीन लेख वजा केले तर समाजाचे दोष आणि ढोंगें चव्हाट्यावर आणण्यासाठीं त्यांनीं आपल्या विनोदाचा विशेष वापर केलेला आढळत नाहीं. ठकीच्या लग्नासंबंधींच्या तीन लेखांवर कोल्हटकरांच्या विनोदी लेखांतून कधींच प्रकट न झालेलें कारुण्य गडकऱ्यांच्या या विनोदी लेखांतून जागोजाग प्रकट झालेलें असल्यानें, हास्य आणि कारुण्य ह्यांचा एक दुर्मिळ समन्वय होऊन उदात्त विनोदाचें हृदयंगम दर्शन मराठी वाचकांना प्रथमच घडलेलें आहे. सुप्रसिद्ध विनोदपंडित मार्क ट्वेनच्या ' टॉम सॉयर' ह्या विनोदी कादंबरींत अशा स्वरूपाचा विनोद पाहावयाला मिळतो.

मुलीचें लग्न जमवणें हा विषयच मुळीं असा आहे कीं, कित्येक प्रसंगीं मुलीच्या बापाला नि आप्तांना हंसावें कीं रडावें हेंच मुळीं कळत नाहीं. मग प्रत्यक्ष मुलीच्या मनाची आणि भावनेची काय स्थिति होत असेल ह्याची कल्पनाहि करवत नाहीं. लग्ना-सारख्या गंभीर प्रश्नाची जितकी अमानुष थट्टा हिंदु समाजांत होते, तितकी दुसऱ्या समाजांत क्वचितच होत असेल. गडकऱ्यांच्या विनोदी प्रतिभेचें लक्ष ह्या विषयाकडे गेलें, ह्यांतच तिच्या अर्ध्या यशाचें श्रेय आहे.

ठकीचें लग्न जमवण्याच्या नाटकांत तिंबूनाना, आबाभटजी आणि बाळकराम हीं तीन प्रमुख पात्रें आहेत. कोल्हटकरांच्या विनोदी लेखनाच्या प्रपंचांतहि पांडूनाना, बंडूतात्या आणि सुदाम अशीं तीनच पात्रें आहेत. विनोदसिद्धीसाठीं तीन माणसांचें भांडवल जमविण्याची ही मूळ कल्पना जेरॉम के. जेरॉम या सुप्रसिद्ध इंग्रज विनोदी लेखकाची. त्याचें Three men in a Boat ( not to say of the dog ) हें विनोदी पुस्तक सुप्रसिद्धच आहे.

ठकी ही तिंबूनानांची उपवर मुलगी. तिचें लग्न जमवण्याच्या खटपटीवर गड-कऱ्याची ही विनोदी लेखमाला आधारलेली आहे. ठकी ही एक अत्यंत कुरूप मुलगी असल्यानें तिचें लग्न जमवण्याच्या कामीं अनन्वित अडथळे निर्माण व्हावेत हें साहजिक आहे. बरें, ठकी ही कांहीं अशीतशी मुलगी नव्हती. ' लाखामध्यें एक ' असेंच त्या

दृष्टीनें तिच्या रूपाचें गडकऱ्यांनीं केलेलें हें वर्णन पहा :

"ठकीची अंगकांति सुवर्णरंगाची होती. मात्र ही सुवर्णरचना सोनेरी किंवा तांबड्या शाईनें करून मागावयाचें नाहीं. या रंगामुळें ठकीच्या बहुतांशीं गैरहाजीर भोंवयांची उणीव किंवा घांदरटपणें डोळ्यांबाहेर येऊन भोंवतालच्या प्रदेशांत बागडणाऱ्या काजळाचा फाजीलपणा तिऱ्हाइतांच्या चटकन् लक्षांत येत नसे. महाकवि कालिदासानें शकुंतलेच्या सौन्दर्यसर्वस्वाची तुलना जी लतिकेशीं केली आहे, तीच ठकीच्या बाबतींत सत्याला न सोडतां करून दाखवितां येईल. इतकेंच नव्हे तर एखाद्य लतेशीं पूर्ण सदृश न व्हावयाला शकुंतलेच्या ठिकाणीं जी मोठी उणीव होती, ती सुद्धां ठकीच्या वर्णनांत भरून निघाली आहे. कारण शकुंतलेप्रमाणेंच ठकीचे 'बाहू दापे लतिकेचे कर पल्लव साचे' असून शिवाय एखाद्या लतिकेप्रमाणें ठकीच्या एका डोळ्यांत 'फूल' हि होतें.

"त्याचप्रमाणें सुंदर स्त्रीला 'देवी' या संबोधनानें पाचारण्याचा प्रघात आहे. या दृष्टीनें पाहिलें तरी ठकीच्या तोंडाकडे पाहातांच हजारों देवींचें दर्शन घेतल्याचा साक्षात्कार होऊन शिवाय भाविक वारकऱ्याला तर आळंदीच्या वांकड्या विठोबाची आठवण होत असे. कारण ठकीची मान स्वभावतःच उजव्या बाजूकडे जराशी कलती असल्यामुळें नीट उभी राहिली असतांना ती समोरून पाहाणारास परेड करतांना 'आईझ राईट' च्या पवित्र्यांत उभ्या असलेल्या शिपायासारखी दिसत असे. एखादे वेळीं कंबर कसून अशा लष्करी पेशांत ठाण मांडलेल्या ठकीकडे पाहिलें म्हणजे उजव्या सोंडेचा गणपति किंवा डाव्या तोंडाचा मारुती यांसारख्या दुर्मिळ देवतेप्रमाणें तिचें अपूर्व कौतुक करावेंसें वाटल्यावांचून राहात नसे.

सर्वसामान्यपणें कोणाहि साधारण स्वरूपाच्या मुलीचें लग्न जमविणें आपल्या समाजांत किती कठिण आहे ह्याचें वास्तववादी चित्र ज्याला रेखाटावयाचें आहे, त्याला ठकीसारखी पराकाष्ठेची कुरूप मुलगी आपल्या कल्पनेंतून मुद्दाम निर्माण करण्याची काय आवश्यकता होती? काळ्याकुट्ट रंगाची, तोंडावर शेंकडों देवीचे वण असलेली, एका डोळ्यांत फूल पडलेली आणि वांकड्या मानेची अशी भयंकर मुलगी असली, तर साक्षात् ब्रह्मदेव या पृथ्वीतलावर उतरला तरी तिचें लग्न कसें काय जमणार? अशा मुलीचें लग्न जमलें नाहीं म्हणून आपल्याला समाजाला दोष कसा देतां येईल? सारांश, मुलीच्या विवाहाच्या बाबतींत वधूपित्यांना ज्या अडचणी येतात आणि ज्या विटंबना सहन कराव्या लागतात, त्यांची खरी कल्पना वाचकांना आणून देण्यासाठीं ठकीच्या कुरूपतेचा एवढा अतिरेक करण्याची मुळींच जरुरी नव्हती. त्यामुळें गडकऱ्यांच्या या विनोदाची बैठकच मुळीं चुकलेली आहे.

ठकी दहा जणींसारखी एक मुलगी आहे एवढेंच सांगितलें असतें, तर केवळ 'ठकी' ह्या नांवानेंच तिच्या बावळटपणाची आणि वेंधळेपणाची कल्पना येऊं शकली

असती. तथापि, ठकीच्या कुरूपतेची अतिशयोक्ति अनुचित आहे असें मानलें तरी शकुंतलेपेक्षांहि लतिकेशीं ठकीचें साम्य अधिक आहे असें सांगतांना ठकीच्या डोळ्यांतल्या ' फुलांवर ' गडकऱ्यांनीं जी कोटी साधली आहे, ती कांहीं सामान्य कोटींतली नाहीं हें कबूल केलें पाहिजे. वस्तुतः ठकीचें लग्न जमविण्याच्या या मोहिमेंत कांहीं कांहीं प्रसंग सहजगत्या इतके कमालीचे विनोदी झाले आहेत कीं, खरें पाहातां अतिशयोक्तीचा अवलंब करण्याची त्यामध्यें मुळींच आवश्यकता नव्हती. उदाहरणार्थ, ' यंदा आम्हांला कर्तव्य नाहीं ' असें स्वतःचा भाव चढविण्यासाठीं सकृद्दर्शनीं सांगण्याचा ढोंगी वरपित्यांचा नेहमींचा शिरस्ता असतो. त्याचा अतिरेक कधीं कधीं किती हास्यास्पद होऊं शकतो ह्याचा एक अत्यंत मनोरंजक नमुना गडकऱ्यांनीं या लेखमालेंत सांगितलेला आहे. तो पाहा :

" एका गरीब गृहस्थाच्या घरीं त्याच्या उपवधू भावाबद्दल गळ घालण्याकरितां मी व तिंबूनाना उभयतां गेलों होतों. नमस्कार-चमत्कार होऊन हवापाणी वगैरे अनावश्यक बाबतींबद्दल बरेंच बोलणें होईपर्यंत तो गृहस्थ माझ्याशीं अतिशय अदबीनें व आर्जवानें बोलत होता; पण मीं आमच्या येण्याचें कारण सांगितलें मात्र आणि सारा मनु एकदम पालटला. त्या गृहस्थाचा मूळचा माटीसारखा गोल चेहेरा महत्त्वनिदर्शनासाठीं लागलीच नाना फडणिसाच्या चेहेऱ्यासारखा लंबोत्तर झाला. तो विचारानें ओथंबलेले जड निःश्वास टाकूं लागला. फाटकी सतरंजी, वळकटीची बेबंदशाही, मोडकी खुर्ची, अंगठे तुटलेल्या वहाणा, स्वतःचें काळें मिचकूट धोतर, घरांत मावेनासें झालेलें दारिद्य वगैरे ऐहिक गोष्टींचा क्षणैक विसर पडून तो उच्च विचारांत भराऱ्या मारूं लागला.

" अखेर त्याला मृत्युलोकाच्या वस्तीची आठवण करून देण्यासाठीं मी विचारलें, ' काय मानस आहे तुमचा ? ' फारच मोठा सुस्कारा टाकून, चिरमुटलेल्या व काळ्याकुट्ट ओठांचें वर्तुळ करून, भुंवया आडव्या उडवून व मान किंचित् उजवीकडे कलती करून तो प्राणी प्रत्येक शब्दानंतर विसावा घेत घेत म्हणाला, ' या जन्मीं आम्हांस कर्तव्य नाहीं ! ' " ह्यांत लेखकाची एका अक्षराची अतिशयोक्ति नाहीं. उलट,वधूपक्षाची याचकवृत्ति पाहून वरपक्षाच्या डोक्यांत किती कमालीचा उन्माद चढतो आणि मग त्याच्या तोंडून कधीं कधीं जीं विलक्षण मुक्ताफळें बाहेर पडतात, त्यांचें हें हुबेहूब चित्रण आहे. तें वाचून वाचकाच्या हंसतां हंसतां मुरकुंड्या वळल्याच पाहिजेत.

मुलीचें लग्न ठरविण्यासाठीं काय काय आपदा सहन कराव्या लागतात त्यांची आपल्या समाजांतील सर्व जाणत्या नि प्रौढ माणसांना पूर्ण कल्पना असल्यानें एखाद्या बापाला मुलगी होणें किंवा एखाद्या स्त्रीला मुली होवोत असा आशीर्वाद देणें, हें केवढें विलक्षण संकट म्हणून समजलें जातें ह्याचेंहि मोठें मार्मिक चित्रण गडकऱ्यांनीं केलें आहे.

ठकीच्या लग्नाची ही खटपट चालू असतां तिंबूनाना आणि बाळकरामाचे परम

मित्र भांबूराव ह्यांची एक दिवस त्यांना तार येऊन धडकते. भांबूरावांच्या 'मंडळीचें' पहिलेंच बाळंतपण त्या सुमारास होणार असल्यानें त्या बाळंतपणांत भांबूरावांची पत्नी दगावली असली पाहिजे, अशी साहजिकच तिंबूनानांची आणि बाळकरामाची कल्पना झाली. 'अरेरे, बिचाऱ्या भांबूरावांवर प्रसंग कोसळला. एकुलती एक बायको आणि तिचा असा शेवट व्हावा.' असें म्हणून बाळकराम ओक्साबोक्शीं रडूं लागला.

पण तिंबूनाना गंभीर चेहेरा करुन म्हणाले, "बाळक्या, प्रसंग येऊं नये पण आला. आतां आपणच भांबूला धीर दिला पाहिजे. उद्यांच्या उद्यां भांबूला तार ठोक. म्हणावें, 'भिऊं नको, ठकी आहे.' माझी ठकी मी त्याला देईन. मी आणि भांबू कांहीं दोन नाहीं. प्रसंगीं उपयोगी पडत नाहीं तो मित्र कशाचा?"

दुसऱ्या दिवशीं बाळकराम तार करावयास जाणार तोंच भांबूरावांचें पत्र त्याच्या हातीं पडलें.

'काल रात्रौ सौ. ची सुखरूप सुटका झाली. बाळंतीण खुशाल आहे, पण मुलगी झाली आहे. तिंबूनाना आज तीन वर्षें आपल्या मुलीचें लग्न ठरविण्यासाठीं ज्या वनवासांत दिवस काढीत आहेत त्याची आठवण झाली म्हणजे धीर खचतो,' इ०

तें पत्र वाचून बाळकराम – तिंबूनानांना फारच वाईट वाटलें. तिंबूनानांना तर विशेषच खेद वाटला. त्याच दिवशीं भांबूरावाला दुखवट्याचीं पत्रें, सहानुभूतिपर तारा वगैरे पाठवून ते दोघे आपल्या कर्तव्यांतून मोकळे झाले.

कन्याजन्माचें दुःख किती जबरदस्त आहे ह्याची दुसरी एक विलक्षण घटना गडकऱ्यांनीं वर्णन केली आहे. तिंबूनाना अन् बाळकराम एकदां एका स्नेह्याकडे वरातीला गेले. वडीलधाऱ्या मंडळीला नवीन जोडप्याच्या हातून साखर देण्याची वहिवाट असते. त्याप्रमाणें तिंबूनानांना वधूहस्तें साखर देववण्यांत आली. ठकीच्या लग्नाबाबत त्या सकाळीं एका ठिकाणीं 'अष्टवर्षा भवेत् कन्या' या सूत्राबद्दल वाद झाला होता. तो तिंबूनानांच्या डोक्यांत असल्यानें, त्या नादांत नववधूला आशीर्वाद देतांना त्यांच्या तोंडून 'अष्टकन्या सौभाग्यवती भव' असे शब्द चुकून गेले. आशीर्वाद कसला, शापच तो! त्यामुळें भयंकर गोंधळ माजला. वधूवरांचे सारे आप्त चवताळून तिंबूनानांच्या अंगावर धावले नि त्यांनीं तिंबूनानांची कणिक यथेच्छ तिंबून काढली. एवढेंच नव्हे तर असा आशीर्वाद दिल्याबद्दल तिंबूनानांवर खटला भरण्यांत आला. स्वतः न्यायाधीश हाहि मुलीचा बाप असल्यानें तिंबूनानांचा आशीर्वाद किती भयंकर आहे ह्याची बरोबर किंमत त्याला ठरवितां आली आणि म्हणून त्यांनीं तिंबूनानांना दोषी ठरवून पुढीलप्रमाणें शिक्षा ठोठावली :

"आरोपी तिंबूनाना, तुमच्यावर आरोप शाबीत झाला आहे. म्हणून मी तुम्हांला 'विविधज्ञानविस्तारां'तील 'क्रीतो व फिदो' हा लेख, 'ज्ञानप्रकाशां'तील सहकारी

पतपेढ्यांसंबंधींचे सारे अग्रलेख आणि 'ब्रह्मज्ञानप्रदीप' हें आध्यात्मिक गद्यनाटक वाचण्याची व 'मानापमान' नाटकांतील प्रत्येक पदाचा अन्वयार्थ लावण्याची शिक्षा फर्मावतों. हें सर्व वाचन होईपर्यंत तुम्हांला पुण्यांतल्या खाणावळींत जेवावें लागेल आणि दर आठवड्यास 'वीकेंड' तिकीट काढून 'सदर्न मराठा रेल्वे'च्या तिसऱ्या वर्गांतून पुण्याहून मिरजेपर्यंत प्रवास करावा लागेल. यापेक्षां कमी शिक्षा तुम्हांला करतांच येत नाहीं." बिचारे तिंबूनाना खटल्याचा हा निकाल ऐकतांच डोळे पांढरे करून बेशुद्धच पडले.

तिंबूनानांना जी शिक्षा देण्यांत आली तिची मौज ज्या काळांत गडकऱ्यांनीं ही लेखमाला लिहिली, त्या काळांतल्या वाचकांना समजण्यासारखी असल्यामुळें, ती वाचून त्यांची त्या वेळीं फारच करमणूक झाली. 'अष्टकन्या सौभाग्यवती भव' ह्या आशीर्वादांतून निर्माण झालेली दंगल आणि कोर्टांतला खटला जरी अतिशयोक्तिपूर्ण वाटला तरी अभिप्रेत विषय परिणामकारक करण्याच्या दृष्टीनें ती अतिशयोक्ति योग्य वाटते.

दुसरा एक प्रसंग असाच विनोदी आहे. ठकीची पत्रिका जमत असूनहि 'मुलगी पसंत नाहीं' या क्षुल्लक कारणावरून एका टारगट सुधारकानें ठकीला नाकारली. पुढें एके दिवशीं हा सुधारक एका इराण्याच्या दुकानांत राजरोसपणें चहा घेतांना तिंबू-नानांच्या आणि बाळकरामाच्या दृष्टीस पडला. कारण सदरहू दुकानामध्यें ते दोघे सुद्धां एका कोपऱ्यांत चहा पीत बसले होते. बशींतल्या ऊन चहावर फुंकर टाकण्याच्या मिषानें तिंबूनाना त्या पापभ्रष्ट सुधारकाबद्दल निराशेचे दीर्घ निःश्वास टाकूं लागले. बाळकराम म्हणाला, "नाना, बरें झालें, ह्या कर्मनष्याच्या गळ्यांत आपण ठकी बांधली नाहीं. अशा सुधारकाला पोर देणें म्हणजे पोरीचा पुनर्विवाह लावण्यासारखेंच मी समजतों. मग धडधडीत एखाद्या गुत्त्यांत नेऊन पोरीला दारूच्या पिंपांत कां लोटूं नये? (सुधारक या शब्दानें तिंबूनानांना दारू व पुनर्विवाह याखेरीज कसलाहि बोध होत नसे.) नाना, स्वारीची जरा उडवतोंच आतां" असें म्हणून बाळकराम मोठ्यानें त्या सुधारकाला उद्देशून म्हणाला, "अरे, चांगले हिंदु म्हणवितां आणि इराण्याच्या दुकानांत चहा पितां? आपले वडील हिंदूच होते ना?"

प्रश्नाचें उत्तर दिल्यावांचून स्वारी तेथून चालती झाली. प्रश्नांत खोंच होती. तिनें स्वारी वरमली. दुसरें काय? शेजारच्या बांकावरचे दोनचार मुसल्मान या वेळीं हंसावयाला लागले. ते उघड उघड हिंदूंच्या धर्मग्लानीलाच हंसत असावेत. परस्पर विरोधावर आणि विसंगतीवर आधारलेला हा विनोद बहारीचा आहे.

ठकीला स्थळ पाहण्यासाठीं पुण्यांतून मोहीम काढायची म्हणजे चांगला पोषाख घालून जावयाला पाहिजे. तेवढ्यासाठीं तिंबूनाना अन् बाळकराम ह्या दोघांच्या पोषाखाचें 'एस्टिमेट' काढण्यांत आलें. तें पाऊणशें रुपयांच्या घरांत आलें; पण तो

आंकडा ऐकून नानांना गुदमरल्यासारखें झालें. तेव्हां बाळकराम म्हणाला, ' नाना, आतां पाऊणशें रुपयांचा पोषाख घ्यावयाला कचरतां, मग उद्यां जावयासाठीं पोषाख करतेवेळीं काय करणार तुम्ही ?

नाना गंभीरपणें म्हणाले, ' बाळक्या, वेड्या, जावयासाठीं पोषाखखर्च केला तर तो बुडीत होत नाहीं. कारण, तो पोषाखाबरोबर ठकीलाहि पत्करील. तुझ्या पोषाखाचा खर्च म्हणजे निव्वळ बुडीत. त्यापेक्षां तूं असंच कर—ठकीलाच पत्कर ना—'

या वाक्याचा बाळकरामाच्या मनावर काय परिणाम झाला त्याचें वर्णनहि अतिशयोक्तिपूर्ण असलें तरी कमालीचें विनोदी आणि चमत्कृतिजनक आहे.

' ठकीला पत्कर ' असें म्हणतांक्षणींच बाळकराम जो बेशुद्ध पडला, तो चार दिवसांनीं सावध झाला. त्यानें जेव्हां डोळे उघडले तेव्हां आपण एका इस्पितळांत असून आपल्यावर शस्त्रकर्म करण्यासाठीं तज्ज्ञांची एक कमिटी बसलेली त्याला आढळली. ठकीच्या लग्नाच्या खटपटीसाठीं तिंबूनानांबरोबर बाळकरामाला अजून पुष्कळच हिंडावयाचें होतें. थट्टेच्या बोलण्यांनीं त्याच्या हृदयाला धक्के बसून तो जर असा बेशुद्ध पडूं लागला तर एकंदर कामांत व्यत्यय यावयाचा. म्हणून त्याचें ' नाजुक हृदय ' काढून टाकून त्याच्या ऐवजीं कोणत्याहि प्रसंगाला टक्कर देण्याजोगें दणकट हृदय बसवून घेण्यासाठीं नानांनीं चार साधे डॉक्टर, तीन देशी वैद्य, एक गुरांचा डॉक्टर, दोन वैदू, एक खाटीक आणि एक चांभार एवढ्यांची एक कमिटी बसविली.

त्या दिवशीं दवाखान्यांत एका शास्त्र्याचें, एका तरुण सुधारकाचें आणि एका दरोडेखोराचें अशीं तीन प्रेतें येऊन पडलीं होतीं. तिघांचींहि प्रेतें फाडून पाहातां असें आढळून आलें कीं, सुधारकाचें हृदय फारच कमकुवत आहे. शास्त्रीबुवांना मुळीं हृदयच नव्हतें. दरोडेखोराचें हृदय उरफाटें होतें. तेव्हां त्याचेंच हृदय कापून तें सुलटें करण्यांत आलें आणि बाळकरामाच्या हृदयाच्या जागीं बसवण्यांत आलें आणि त्याची अव्याहत क्रिया चालण्यासाठीं कायमच्या किल्लीचें ' लिव्हर वॉच ' त्याला जोडण्यांत आलें आणि अशा रीतीनें ऑपरेशन सुखरूपपणें पार पाडलें.

बाळकरामाचें हृदय काढून तेथें काय बसवावें याबद्दल तज्ज्ञांच्या कमिटीमधील निरनिराळ्या सभासदांचा सल्ला नि सुधारक-शास्त्रीबुवांना बाजूला सारून शेवटीं दरोडेखोराचेंच हृदय कां पसंत करण्यांत आलें ह्याबद्दलचीं कारणें इतकीं विनोदी आणि अर्थपूर्ण आहेत कीं, तीं मुळांतूनच वाचलीं पाहिजेत.

तिंबूनाना हे विधुर होते. त्यामुळें मुलाला ' सासू ' नाहीं या कारणानें एका वरपक्षानें मुलीला नकार दिला होता. म्हणून तिंबूनानांनीं पहिल्याच मुहूर्तावर स्वतःला चतुर्भुज करून घेतलें. ह्या तिंबूनानांच्या नव्या बायकोमुळें केवढा घोटाळा झाला आणि ठकीचें एक जमलेलें लग्न कसें, फिसकटलें तो प्रसंग फारच बहारीचा आहे.

एका ठिकाणीं मुलगी पाहण्याचा प्रसंग निर्विघ्नपणें पार पडला. मुलीला आई

असल्याची साक्ष पटविण्यासाठीं तिंबूनानांच्या नूतनपरिणीत पत्नी त्या प्रसंगीं हजर होत्या. मुलगी पसंत पडली आणि उभय पक्षांची तयारी होऊन 'सीमान्तपूजना'चा समारंभहि उरकला. सदर समारंभाच्या वेळीं सौ. तिंबूनाना विहिणीच्या नात्यानें हजर होत्या. त्यांना पाहून व्याह्यांनीं संशययुक्त मुद्रेनें त्यांच्या तेथें येण्याच्या कारणांची चौकशी केली. 'चहूंकडेच अशी चाल आहे' असें उत्तर देऊन वधूपक्षानें वेळ निभावून नेली. पुढें शेवटीं वाङ्निश्चयाच्या समारंभासाठीं जेव्हां वरपक्षाची मंडळी वधूच्या घरीं आली तेव्हां सारें कोडें उलगडलें.

वधूच्या जागीं ठकीला व विहिणीच्या जागीं सौ. तिंबूनानांना बसलेल्या पाहातांच व्याही ताडकन् उठून उभे राहिले व विचारूं लागले, "ह्या दोहोंतली तुमची मुलगी ती कोणती ?" आम्हीं ठकीकडे बोट केलें. त्यावर सौ. तिंबूनानांकडे बोट दाखवून ते म्हणाले, "असें काय ? मग आम्ही ह्यांनाच वधू समजलों. मुलगी पाहावयाच्या वेळीं तुम्हीं हें स्पष्ट सांगावयास हवें होतें. तिंबूनानांच्या कुटुंबाला नवरीमुलगी समजून आम्हीं रुकार दिला. आतां या मुलीशीं आम्हांला लग्न कर्तव्य नाहीं." असें सणसणीत उत्तर देऊन व्याहीमंडळीनें घरचा रस्ता धरला.

'मुला'च्या शोधासाठीं फिरत असतां एकदां तिंबूनाना आणि मंडळी वेड्याच्या इस्पितळांत सुद्धां शिरली. तेथें त्यांच्या येण्याचें कारण समजतांच दवाखान्याच्या अधिकाऱ्यांनीं त्यांना तेथें पकडून ठेवलें नि त्यांचे मेंदू तपासण्यासाठीं त्यांना वरिष्ठ डॉक्टरांकडे पाठविलें. सदर डॉक्टर नानांचा मेंदू तपाशीत असतां त्यांचें डोकें एका तरुण हिंदु विद्यार्थ्यानें धरून ठेवलें होतें. तेवढ्यांत नानांनीं त्या तरुणाचे पाय धरून 'पोरी'ला पदरांत घेण्याची विनंती करावयास सुरुवात केली; पण बाळकरामानें डोळ्यांच्या खुणेनें नानांना दटावलें, म्हणून तेवढ्यावरच तें थांबलें. अखेर नानांचा मेंदू शाबूत आहे असें ठरवून त्यांना सोडून देण्यांत आलें. सतत तीन वर्षें मुलीच्या लग्नाच्या विवंचनेंत असूनहि आपण खरोखर वेडे कसे ठरलों नाहीं याबद्दल आश्चर्य करीत ते घराकडे वळले. त्यानंतर डॉक्टरां विषयींचा त्यांचा विश्वासच पार उडाला.

मंगळवारीं जन्मलेल्या मुलालाच काय तो मंगळ असतो अशी बाळकरामाची प्रथम कल्पना होती. एके ठिकाणीं सर्व गोष्टी बिनबोभाट पटून मुलगा अ-मंगळ असल्यामुळें मुलीला मंगळ नसल्यास ती पत्करण्याचें आश्वासन त्याच्या बापानें दिलें. दुसरे दिवशीं तिंबूनाना आणि बाळकराम ह्यांनीं ठकीची एक बनावट जन्मपत्रिका तयार करून तिच्यांतून मंगळाला अजिबात अर्धचंद्र दिला आणि ती मुलाच्या बापाच्या स्वाधीन केली. पत्रिकेकडे बराच वेळ निरखून पाहून अखेर मंगळाचा उल्लेख करावयाचा चुकून राहिल्याबद्दल त्यांनीं शंका प्रदर्शित करतांच, बाळकराम अजाण बालकाच्या निर्दोष हास्यमुद्रेनें म्हणाला, 'चुकून राहिला नाहीं. मुलीला मुळीं मंगळच नाहीं. मग पत्रिकेंत कोठून येणार ?'

हें उत्तर ऐकतांच त्या गृहस्थानें संतापानें पत्रिका जमिनीवर फेकून दिली. त्याच्या तांबड्यालाल डोळ्यांच्या जागीं एक सोडून दोन मंगळ दिसूं लागले. अशा मंगल दृष्टीनें तो गृहस्थ तिंबूनाना-बाळकरामांकडे पाहूं लागतांच ते शनीसारखे काळेठिक्कर पडले. अखेरीस त्यांनीं मगळाची जी दशा केली तीच दशा त्या गृहस्थानें त्यांची केली.

प्रसंगनिष्ठ विनोदाचे ह्या लेखमालेतले हे निवडक नमुने दिले आहेत. त्या-खेरीज लग्न जमविण्याच्या खटपटींत मनुष्यस्वभावाचे जे चमत्कारिक नमुने आढळतात, जे मासलेवाईक अनुभव येतात आणि त्या संकटांतून बाहेर पडण्यासाठीं वधूपक्षाला ज्या नाना तऱ्हेच्या लटपटी कराव्या लागतात, त्यांचीं फारच खुमासदार वर्णनें गड-कऱ्यांनीं आपल्या वैशिष्ट्यपूर्ण विनोदी भाषेत केलेलीं आहेत.

( १ ) वसंतऋतूंत सृष्टीमध्यें केवढाले फेरफार घडून येतात ? झाडांना पालवी फुटते. आंब्याला मोहोर येतो. वेलींना फुलें येतात. वक्त्यांना शब्द फुटतात. पांढऱ्या सशांना पोरें होतात. छऱ्यांवर नवे अभ्रे चढतात. शहरांत खेडेगांवच्या पाहुण्यांना ऊत येतो. त्याप्रमाणें नवऱ्यामुलांचीं व त्यांच्या आईबापांचीं माथीं फिरतात. पिसाळलेलें कुत्रें चावलेला मनुष्य ज्याप्रमाणें आगोटीच्या मेघांचा गडगडाट ऐकून पुन्हां पिसाळतो, त्याप्रमाणें मुंजीच्या वाजंत्र्यांचा कडकडाट ऐकून उपवधू मुलांच्या व त्यांच्या वाडवडि-लांच्या अंगीं भिनलेलें अहंपणाचें विषहि तडाक्यासरशीं उचल खात असतें.

( २ ) या सुमारास 'नवरबापा' चें मन थोर थोर ऐतिहासिक पुरुषांच्या गुणविशेषांचें प्रदर्शनच बनून जातें. महंमद् गिजनीच्या धनलोभानें तो स्वार्थपरायण होतो. नेपोलियनच्या महत्त्वाकांक्षेनें तो आपल्या मुलाकडे पाहातो. नाना फडणविसांच्या व्यव-हारकौशल्यानें तो मुलाची किंमत ठरवतो. शिवछत्रपतींच्या धाडसानें वाटेल त्या विजापुरकरावर तो त्या रकमेचा मारा करतो आणि नादिरशहाच्या क्रूरपणानें ही रकम वसूल करून घेतो.

( ३ ) उपवर वधूंच्या बापांना वरसंशोधनासाठीं ज्या येरझारा घालाव्या लागतात, त्याला 'जोडे फाडणें' ही लाक्षणिक संज्ञा दिलेली आहे. पयःप्राप्ति होण्यासाठीं प्रथम गाईच्या सडांना लावण्यासाठीं थोडें पय ( पक्षीं : पाणी ) खर्चीं घालावें लागतें, त्या-प्रमाणें एक जोडा जमविण्यासाठीं आधीं एक जोडा ( पक्षीं : खेटर ) फाडावा लागतो हेंच यांत लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

( ४ ) जन्मवेळेची नोंद घेण्यांत एका क्षणाची चुकामूक झाल्यास पत्रिकेंत जमीनअस्मानाचे फरक घडून येतात आणि आमच्याकडे तर मुलाच्या जन्मकाळासंबंधीं जन्मवर्षच काय तें साधारणतः बरोबर सांगतां येतें. कांहीं आईबापें मुलांचा जन्ममास सुद्धां एखादे वेळीं नेमका सांगतात; परंतु हें केवळ अपवादात्मक आहे. 'गाई गोठणी-वर आल्या असतील' 'गड्यांची न्याहरी गेली नव्हती' किंवा 'मामंजी असे पोथी वाचून उठले असतील' यासारख्या वारेमाप गोष्टींच्या नियमितपणावरुनच बाबूची

किंवा ' बगी ' ची पत्रिका तयार करावी लागते. आमच्या गांवच्या म्हाळसाकाकूंच्या ' नान्या ' ची जन्मवेळ विचारली, म्हणजे त्या म्हणतात कीं, ' खालच्या ओळींतल्या रखमाकाकूंच्या गोंद्याची पांचवी होती, त्या दिवशीं असा पडल्या प्रहरीं माझा नान्या झाला. ' आणि रखमाकाकूंना विचारलें तर त्या म्हाळसाकाकूंच्या नान्याचा हवाला देतात.

( ५ ) एक मुलगा झाल्याबरोबर त्याचीं आईबापें हुंड्याच्या रकमेवर काय काय गोष्टी करावयाच्या, याचा विचार करूं लागतात. हल्लींप्रमाणें प्रमाणाबाहेर हुंडा घेण्याची चाल पौराणिक काळींहि प्रचलित असती तर भारतीय युद्धासारखा प्रचंड अनर्थ बिन-बोभाट टळला असता. कारण, शंभर राजबिंड्या मुलांचा हुंडा येण्याची खात्री असल्यावर हस्तिनापूरच्या टीचभर राज्यासाठीं असल्या कुलक्षयकर युद्धास धृतराष्ट्रानें कधींहि संमति दिली नसती. तेवढ्या हुंड्यावर त्यानें तसलीं छप्पन्न फरोक्त खरीद केलीं असतीं.

( ६ ) नानांनीं स्वतःसाठीं जुन्या दक्षिणी तऱ्हेचा गुडघ्याशीं गोष्टी सांगणारा मलमलीचा अंगरखा बरोबर आणला होता. त्याचे हात चुण्याचे असून त्यापैकीं एकेकाची लांबी इतकी होती कीं नाना अंगरखा घालून ' विदाउट तिकीट ' प्रवास करीत असतां बोरीबंदर स्टेशनावर तिकिटकलेक्टरला ' पास ' असें सांगून ते झटक्यासरशीं बाहेर येतांना त्यानें आपला हात धरल्याचें गिरगांवांत येईपर्यंत नानांना कळलें नाहीं. थोडक्या वेळांत चुण्यांच्या हातावरून पत्ता काढीत येऊन तिकीटकलेक्टरानें नानांकडून योग्य ते पैसे वसूल करून घेतले.

( ७ ) ' बाळकराम आणि मंडळी 'ची बैलगाडी ठकीला ' स्थळ ' शोधण्यासाठीं पुणें शहरांतून हिंडूं लागली. एखाद्या शाळेच्या दाराशीं ही गाडी उभी राहातांच सर्व शाळाभर शुकशुकाट होऊन इन्स्पेक्टरची तपासणी आल्याप्रमाणें शाळेंत शांतता होत असे. कित्येक कच्च्या दिलाचे तरुण तर रात्रीं-अपरात्रीं दडपल्यासारखे होऊन बरळत दचकून उठत. एकदां तर नदींत डुंबत असलेल्या एका तरुणानें घाटावर गाडी उभी राहिलेली पाहातांच तोंड चुकविण्यासाठीं तळाशीं बुडी मारून कायमची जलसमाधि घेतली.

( ८ ) एखादें लग्न जमविण्यांना विघ्नांचें बाहुल्य किती असतें ! पत्रिकांच्या भानगडींत एखाद्या वेळीं मंगळ आडवा पडे, तर एखाद्या वेळीं शनीची साडेसाती भोंवे. या ठिकाणीं ग्रहांचें षडाष्टक निघावें, तों त्या ठिकाणीं माणसांचें खडाष्टक व्हावें. कोठें देवगणाचा राक्षसगणाशीं सामना जुंपे, तर कोठें राक्षसगण मनुष्याला गिळावयाला तयार होई. एके ठिकाणीं काय म्हणे ' वरणभात ' होता, तर दुसरीकडे बादरायण-संबंधानें ' परत वेल ' होते. मुलगी बसली म्हणजे तिचे मोकळे केस जमिनीला लागतात आणि हें लक्षण माहेरकरांना वाईट असतें, या कारणामुळें एके ठिकाणीं लग्न मोडलें मुलीची जीभ नाकाला लागते किंवा मधलें बोट वांकविलें तर मनगटाला लागतें यासाठीं

सुद्धां लग्नं फिसकटल्याचीं उदाहरणें एक दोन जागीं आढळून आलीं. एकदां मुलाच्या मामाच्या मोलकरणीच्या मुलीची व आमच्या गाडीवाल्याच्या दत्तक बापाची एकनाड जमल्यामुळें लग्न जमेना, तर दुसऱ्यांदां प्रत्यक्ष मुलाच्या बापाची व आमच्या गाडीच्या पोवळ्या बैलाची एक रास जमल्यामुळें हातचें स्थळ दवडावें लागलें. अखेर अखेर तर आबाभटजींच्या कानांत अतिशय केंस असल्यामुळें आणि माझ्या एका बुटाला धोत-राच्या कांठाचा लेस लावल्यामुळें हातांतलें स्थळ ज.तें आहे कीं काय अशी आम्हांला भीति वाटूं लागली.

गडकऱ्यांची सदर लेखमाला अपूर्ण राहिल्यामुळें ठकीचें लग्न अखेर जमलें नाहींच. 'कांहीं एक आकस्मिक कारणामुळें तें कसें अचानक जमून आलें' तें सांगण्याचा त्यांचा संकल्प होता; पण तो संकल्प अपूर्णच राहिला. ठकीसारख्या 'सौंदर्यवती' मुलीचें लग्न खरोखरच जमलें असतें का हा एक प्रश्न आहे. तथापि, प्रत्यक्ष मुलगी पसंत पडण्यापेक्षां तिचें लग्न जमवण्याच्या मार्गांत प्रारंभींच अनंत अडचणींचा जो प्रचंड डोंगर आहे तो ओलांडणें किती दुरापास्त आहे ह्याची यथार्थ कल्पना वाचकांना आणून देण्याच्या कामीं गडकऱ्यांची ही लेखमाला यशस्वी झाली आहे, यांत कांहीं शंका नाहीं.

म्हणून देवलांच्या 'शारदा' नाटकांत वल्लरी जशी म्हणते कीं 'देवा, नको रे हा मेला पोरीचा जन्म!' त्याप्रमाणें 'मेला' हा शब्द वापरण्याची पुरुषांना सवलत दिली तर प्रत्येक उपवर मुलीचा बाप 'देवा, नको रे हा मेला पोरीच्या बापाचा जन्म' असें अट्टाहासानें म्हणेल,' हा जो गडकऱ्यांनीं अखेर निष्कर्ष काढला आहे त्यांत एका अक्षराचीहि अतिशयोक्ति नाहीं, अशी वाचकांची खात्री होते.

"कवींचा कारखाना" हा लेख एखाद्या कारखान्याप्रमाणेंच रुक्ष, बकाली आणि अस्ताव्यस्त वाटतो. ह्यांत कांहीं थोड्या-फार गमती आहेत, नाहीं असें नाहीं; पण भाषेच्या आत्यंतिक क्लिष्टतेमुळें त्यांतला विनोद खालीं दडपला गेला आहे. तो हुडकून बाहेर काढणें तितकेंसें सोपें नाहीं. कवितेच्या व्याख्या करणें किती अवघड आहे आणि तिच्या विषयव्यापकतेचा पसारा किती अवाढव्य आहे हें सांगतांना गडकरी म्हणतात, त्रिकालदर्शी व सर्वतोगामी ऋषीच्या गंभीरतेनें जिनें दिक्कालाच्या अनंत ब्रह्मांडांत भराऱ्या मारल्या आहेत, तीच लहान मुलाच्या उत्सुकतेनें इतिहासांतल्या सनावळी किंवा मुंबई इलाख्यांतल्या तालुक्यांची यादी गात बसली आहे. एकीकडे ती अनुरूप वधू-वरांच्या विवाहासाठीं मंगलाष्टकें म्हणत आहे, तर दुसरीकडे खेळांतल्या बिझिकाचीं गुलाम - राण्यांचीं विजोड जोडपीं जमवण्यासाठीं 'फुल्वर राणी पहा बदामाला' असे नियम ठरवून देत आहे. घटकेंत एकान्तांतल्या योगाभ्यासी जनाला ती समाधीचें रहस्य

सांगते, तर घटकेंत बडोद्याच्या जुम्मादादाच्या तालमींतल्या बालगोपाळांना ' जंपिंग म्हणजे उडी मारावी; जोडी मुद्गलाची फिरवा सेक्शन सहा मोजुनी पहा ' असा कसरतीचा उपदेश करीत आहे.

हिमालयाच्या वर्णनानंतर तिनें चव बदलण्यासाठीं ग्रांटरोड वर्णन केलें आहे. सहस्रदलकमलापासून दगडफुलापर्यंत, सीतेसारख्या साध्वीपासून साळवीसारख्या गांव-गौरीपर्यंत, क्षीरसागरांतील पारिजात पुष्पापासून डबक्यांतल्या फुलापर्यंत, चवरीपासून केरसुणीपर्यंत, सहस्राक्ष इंद्रापासून आंधळ्या मुलापर्यंत, सप्तद्वीपांच्या नामावळीपासून जी. आय. पी. स्टेशनच्या शिरगणतीपर्यंत, भास्कराचार्यांच्या लीलावतीपासून तात्या पंतोजींच्या तोंडच्या हिशेबाच्या चालीपर्यंत, पुराणपुरुषांच्या सहस्रनामांपासून आधुनिक कवींच्या खानेसुमारीपर्यंत, फार काय सांगावें, तुळशीच्या बुंधापासून रामाच्या शेंडीपर्यंत सर्वत्र कवितेनें आपलें एकछत्री साम्राज्य पसरून ठेविलें आहे.

गडकऱ्यांनीं कवींचे दोन वर्ग कल्पिलेले आहेत. एक सत्कवींचा; आणि दुसरा नुसत्या कवींचा. सत्कवींना त्यांनीं आपल्या थट्टेमधून वगळलें आहे. ' कवि ' ह्या सदरांत जे ' गणदास ' किंवा ' प्रासपुत्र ' पडतात ते त्यांच्या विनोदाचा विषय झाले आहेत. सत्कवि किंवा महाकवि आणि गणदास ह्यांच्यांतला फरक वर्णन करतांना गड-कऱ्यांनीं एक उत्कृष्ट कोटी केली आहे, ती अविस्मरणीय आहे. ते म्हणतात, ' महा-कवि आणि प्रासपुत्र-कवि ह्यांच्यांत विशेष अंतर नाहीं. केवळ दोन बोटांइतकें. महाकवि अगदीं स्वर्गांत भराऱ्या मारीत असतात आणि प्रासपुत्रांना स्वर्ग केवळ दोन बोटें उरलेला असतो. '

कवींच्या आयुष्यांतील निरनिराळ्या कालखंडाचें वर्णन करतांना गडकरी सांगतात कीं, " कवीचें बालपण मात्र अत्यंत सुखांत गेलेलें असतें. मोठमोठ्या कवींनीं ' बाळ-पणाचा काळ सुखाचा ' ' रम्य तें बाळपण देई देवा फिरुनी ' किंवा ' बाळपणींच्या नाना तऱ्हा ' असे बाळपणाचे पोवाडे गायले आहेत. अहाहा, तें बाळपण आणि त्या लीला. तें अर्ध्या तिकिटानें प्रवास करणें, तें निम्म्या दरानें नाटक पाहणें, तें सर्वांनीं कौतुक करणें, माझ्या लहानपणीं शेजारपाजारच्या बायकांनीं पटापट चुंबनें घेऊन माझे लाड पुरवावेत, पण तेंच आतां—बाळपणींचें सुख अवर्णनीय आहे. "

पण कवीचें बालपण जितक्या सुखांत गेलेलें असतें तितकेंच त्याचें तारुण्य मात्र दुःखःपूर्ण असतें. त्याच्या अंतरीं कसली तरी आग भडकलेली असते. तो रानावनांतून, डोंगरावरून, जलाशयाच्या तटावरून किंवा बागबगीचांतून नेहमीं फिरत असतो. आनं-दांत निमग्न असणें, रडणें, तंद्रींत पडणें, किंकाळ्या मारणें, आलोचन जागरणें करणें, स्वप्नें पाहणें, भ्रान्तिष्टासारखें भटकणें, अश्रूंच्या पुरांत वाहून जाणें, फुलपांखरांच्या मागें लागणें, जगावर लाथ मारणें यांसारख्या करमणुकीच्या प्रकारांत हा आपला फावला वेळ घालवीत असतो.

कवीचा मुख्य आहार म्हणजे अमृत. तें आणण्यासाठीं हा हरघडी स्वर्गापर्यंत येरझारा घालीत असतो. वर्णनावरून पाहातां अमृताचा रंग ताडीसारखा पांढरा असावा. कवीच्या वस्त्रप्रावरणाबद्दल बहुतेक कोठेंहि उल्लेख केलेला नाहीं. 'अरसिकेषु कवित्व निवेदनं ' ' निरंकुशाः कवयः ' ' तान्प्रति नैष यत्नः ' आणि ' कवि हे शब्दसृष्टीचे ईश्वर ' या चार बुरुजांच्या किल्ल्यांत याचें वास्तव असतें. कवीचें लग्न जरी एकदांच होत असतें तरी त्याला दोन स्त्रिया असतात. एक संसारकामांत राबणारी बायको आणि दुसरी कवितेध्यें नाचणारी प्रिया. बायको घरांत काबाडकष्ट करून पोराबाळांच्या खस्ता खात असते, तर प्रिया कवीला गुंगारा देऊन कोठें तरी दडून बसलेली असते. तिला आळवण्यासाठीं हा परोपरीनें रडत असतो. कधीं कधीं हा छातीवर फुलें ठेवून पडलेला असतो. याच्या डोळ्यांतून अलोट पूर वाहात असतात. आगीसाठीं बंब ठेवण्यापेक्षां म्युनिसिपालिटीनें विरहावस्थेंतले कवि ठेवावेत.

कवीच्या ज्ञानाबद्दल तर कांहीं विचारावयालाच नको. त्यांनीं आपल्या काव्यांतून केलेल्या वस्तुविपर्यासाची कांहीं मजेदार माहिती गडकऱ्यांनीं दिलेली आहे. दुसऱ्याला आश्विन मासाचे दिवस विलक्षण शांतीचे वाटून जमीन हिरव्या कुरणांनीं मंडित झालेली दिसली आहे. तिसऱ्यानें बोरघाटांत हंसांची वसाहत करून ठेवली आहे. कोणी फुल्यांखराचें गाणें ऐकलें आहे. कोणी काकड कुंभ्याला सकाळीं सूर्याला सामोरें जाऊन स्वागतपर गातांना पाहिलें आहे. एका कवीनें आपण ' बोलून चालून स्पष्ट रोडकेच असलों ' तरी आपला तिरस्कार न करण्याबद्दल आपल्या प्रियेला विनवणी केली आहे. जणुं कांहीं सुंदर स्त्रियांच्या डोळ्यांत भरण्यासाठीं तरुणांच्या अंगीं गलेलठ्ठपणा हा गुण अवश्यच आहे.

कवीला कविता करण्याइतकाच आपल्या कविता दुसऱ्याला वाचून दाखवण्याचा फार हव्यास असतो. कांहीं कवि आपलें बाड बरोबर घेऊन हिंडतात. तर कांहींना आपल्या साऱ्या कविता तोंडपाठ असतात. गडकऱ्यांना एक कवि बुधवार चौकांत भेटला आणि त्यानें तेथें आपल्या कविता तालासुरावर त्यांना म्हणून दाखवण्यास सुरुवात केली. एवढेंच नव्हे, तर मधून मधून तो आपल्या कवितांवर गद्यांत मल्लिनाथीहि करी. त्याचा हा नमुना बघा.

तो : लक्षांत नाहीं आलें तुमच्या. ही या चरणांतील मुख्य मख्खी आहे.

गडकरी : फारच मार्मिकपणें तुम्हीं हें वर्णिलें आहे.

तो : हाच तर माझा विशेष. सृष्टीचें सूक्ष्म अवलोकन. अंतःकरण सृष्टीशीं एक-जीव झालें पाहिजे. बस्स. कवीला हृदय पाहिजे. डोक्याची जरुरी नाहीं.

गडकरी : बरोबर. कवींना विधात्यानें जें डोकें दिलें आहे तें उपयोगासाठीं नसून मनुष्यदेहाची परंपरा सांभाळण्यासाठींच असावें.

तो : अगदीं खरें. माझें हृदय मऊ नसतें तर अशी कविता होती काय ? अहो,

माझें हृदयच काय, माझा हात पाहा. कविता लिहून लिहून किती मऊ झाला आहे बघा.

गडकरी पुढें सांगतात कीं, ' त्यानंतर तो एक शोकपर्यवसायी काव्य गाऊं लागला आणि शोकानें ओक्साबोक्शीं रडूं लागला. तो रडूं लागतांच मीहि किंकाळ्या मारायला लागलों आणि शेवटीं दुःखावेगाच्या भरांत बेशुद्ध झाल्याचें सोंग करून धाडकन् धरणीवर अंग टाकलें; पण मला सावध करण्याऐवजीं तो माझ्यावर कविता करूं लागला; पण बराच वेळ जसा मी बेशुद्ध पडून राहिलों, तसा आपल्यावर कांहीं तरी किटाळ येईल, या भीतीनें तो आपलें चंबुगवाळें आवरून घाईघाईनें निघून गेला. तेव्हां मी त्याच्या कचाट्यांतून सुटलों. ' सबंध लेखांत हा एवढाच प्रसंग बहारदार आहे.

' स्वयंपाकघरांतील गोष्टी ' हा गडकऱ्यांचा सर्वांत उत्कृष्ट विनोदी लेख आहे. त्यांच्या स्वतंत्र प्रतिभेचा हा आल्हादकारक विलास होय. मराठी भाषेंतील पुष्कळसे वाक्संप्रदाय हे खाद्यवस्तूंवर आधारलेले आहेत, ह्याची पहिली आश्चर्यकारक जाणीव विलक्षण मनोरंजक रीतीनें जर कोणी करून दिली असेल तर ती गडकऱ्यांनीं. त्यांच्या ' स्वयंपाकघरांतल्या गोष्टी ' चे हे कांहीं नमुने बघा.

धम्मक लाडू : स्वतःच्याखेरीज दुसऱ्याची चांगलीशी पाठ घ्यावी. हाताची भक्कम मूठ करून खूप जोरानें त्या उघड्या पाठीवर आपटावी. याच पदार्थाला कोठें कोठें मुष्टिमोदक म्हणतात. हे दोन्ही पदार्थ वेळीं-अवेळी मुलांना द्यावयाला चांगले असतात.

घरादाराचें खोबरें : ' तिकडे ' बाटलाबाईच्या सारखें एखादें व्यसन लागलेलें पहातांच, आपण वैतागानें चाकरमाणसावर घर टाकून माहेरची वाट धरावी. वर्षसहा महिन्यांत साऱ्या घरादाराचें खोबरें होतें. हा पदार्थ जन्मांत एखाद्या वेळेला करतां येतो.

अकलेचा कांदा : आपलें चांगलें आठदहा वर्षांचें पोर घ्यावें. त्याची तिन्ही त्रिकाळ सारखी वाखाणणी करावी. त्याचे भलभलते लाड मनापासून पुरवावेत. वर्षादोन वर्षांत पोराचा चांगला अकलेचा कांदा तयार होतो. पुढें याला बाहेरच्या लोकांनीं चांगला फोडून काढतांना पाहिलें, म्हणजे मात्र खरोखरीच डोळ्यांना पाणी येतें.

स्वयंपाकघरांतल्या गोष्टींची प्रस्तावना ही त्या गोष्टींइतकीच लज्जतदार आहे. हा नमुना बघा. " स्वयंपाकघरांतल्या बऱ्याच गोष्टींतून ' मोहन ' हा नायक असावा असें वाटतें. 'दह्याची भाजी' ' कांद्याच्या करंज्या ' ' तिखटमिठाच्या मेसूरवड्या ' हीं स्वयंपाकघरांतल्या काव्यशास्त्रांतलीं विरोधाभास अलंकाराचीं उदाहरणें असून ' भोपळ्यांच्या बियांचे अनारसे ' अद्‌भुत रसाच्या कोटींत जमा होतात. ' अलिजा बहाद्दूर हें पक्वान्न वीररसाचें एकलकोंडें उदाहरण असून ' फजिता ' हास्यरसाचें अपत्य असावें. ' मुरक्की ' ' सुरळी होळंगी ' हीं पात्रें परभाषावाचक असून संगीत-मृच्छकटिकां-

तल्या बौद्ध भिक्षूप्रमाणें किंवा ' शारदें ' तल्या मुसलमान शिपायाप्रमाणें हास्यरसाचा उठाव करणारीं आहेत.

ह्यानंतर गडकऱ्यांच्या स्फुट विनोदी लेखांत ज्यांचा उल्लेख करणें जरूर आहे अशीं तीनच छोटींशीं प्रकरणें आहेत. ' सकाळचा अभ्यास ' हा आठ नऊ पानी नाट्य-प्रवेश शाळेच्या विद्यार्थ्यांसाठीं गडकऱ्यांनीं लिहिला होता. मुलांच्या स्वभावाचें त्यांचें अवलोकन किती सूक्ष्म आणि मार्मिक होतें तें ह्यावरून दिसून येतें.

दामू आणि दिनू या दोन भावंडांचें रोज सकाळच्या अभ्यासाचें मोठें मासले-वाईक चित्र गडकऱ्यांनीं रेखाटलें आहे. महाराष्ट्रांतल्या बहुधा प्रत्येक घरांत असें चित्र पाहावयास मिळेल. दामू एका बाजूला कोशांतून शब्द काढीत बसला आहे. दिनू खानदेश जिल्ह्यांतील तालुक्यांचीं नांवें पाठ करीत बसला आहे. अभ्यास करतां करतां दोघांचीं भांडणें नि बारीकसारीक मारामाऱ्या चालूच आहेत. मधून मधून ' आई 'च्या नांवाने ते आरोळ्या ठोकीत आहेत. ह्या भांडाभांडींत अनेक गफलती आणि तोडफोड होत आहे. पेन्सिली मोडतात, पाट्या फुटतात, पिशवीचे बंद तुटतात, पुस्तकें हरवतात, दौती सांडतात, बिछान्यांत कपडे गुंडाळले जातात. तेवढ्यांत बाहेर रस्त्यावरून कुत्र्यांची भुंकाभुंकी ऐकूं येते. त्यांचीहि ते दखल घेतात.

अशा हलकल्लोळाच्या पार्श्वभूमीवर चाललेल्या उभयतांच्या घोकंपट्टीला पुढें पुढें इतकें विकृत आणि हास्यकारक स्वरूप येतें कीं, एक-धुळे-अंमळनेर म्हणून गुरासारखा ओरडत सुटतो, तर दुसरा ' ऑक्सफर्ड—केंब्रिज 'चा विपर्यास ' चास्कर आणि खेपरी ' असा करून टाकतो. अशा थाटांत ' सकाळचा अभ्यास ' पुरा करून हे बाळलोक अंगावर शाई सांडलेली आहे, कपड्यांची नि पुस्तकांची अदलाबदल झाली आहे अशा थाटांत घाईघाईनें इन्स्पेक्शनसाठीं शाळेंत जातात. लहान विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनाचें इतकें विनोदी आणि वास्तववादी चित्र मराठी भाषेंत दुसऱ्या कोणी रेखाटलेलें असेल, असें वाटत नाहीं.

' दीडशहाणा ' ह्या नांवानें ' संगीत मूकनायक ' आणि ' दीडपानी ' नाटक अशीं दोन त्रोटक नाट्यचित्रें गडकऱ्यांनीं लिहिलेलीं आहेत तीं त्यांच्या विनोदी प्रति-भेचीं प्रभावी दर्शनें होत. इतक्या थोड्या अवकाशांत एवढा गंभीर आशय इतक्या आकर्षक आणि मनोरंजक रीतीनें व्यक्त करणें ही कांहीं सामान्य कला नव्हे. 'मूकनायक' हें हिंदु समाजांत जन्माला आलेल्या सर्वसामान्य माणसाचें एक अत्यंत विदारक विडंबन आहे. हा माणूस उभ्या आयुष्यांत नैमित्तिक देहधर्मापलीकडे दुसरें कांहीं करीत नाहीं. —तो बोलत नाहीं. चालत नाहीं. हालत नाहीं. एवढें कशाला ? तो आईच्या उदरांतून देखील न रडतांच बाहेर येतो. लहानपणीं शाळेंत तो जातो; पण इतर पोरांकडून एक-सारखा मार खातो. आपल्या भेकड आणि परतुकड्या पोराचें पुढें बाप 'लगीन' लावून देतो. वार्षिक परीक्षेंत दिपोटी विचारतात त्यांपैकी एकाहि प्रश्नाला तो उत्तरें देऊं शकत

नाहीं. तेव्हां त्याचा निकाल दुसरा काय लागणार ? एवढ्या गडबडींत बायको वयांत आल्यानें एक दिवस 'जें' व्हायचें तें होतें. नंतर वडलांच्या वशिल्यानें मामलेदार त्याला कुठें तरी कारकून म्हणून चिकटवून देतात.

यानंतर पुढें त्याच्या आयुष्यांत काय होणार ? दर वर्षी त्याची बायको बाळंत होत असते. घरांत पोरवडा एकसारखा वाढत असतो. आणि हा तेलाच्या घाण्याला जुंपलेल्या बैलासारखा वर्षानुवर्षे हपिसांतल्या कागदांत तोंड खुपसून जो बसतो, तो थेट अगदीं पेन्शनींत येईपर्यंत. पेन्शन घेतल्यानंतर तो एक दिवस मरतो. स्मशानांत सरणावर त्याचें प्रेत जळत असतें, त्याला पोहोंचवायला आलेली मंडळी त्याच्या आयुष्याचें 'तात्पर्य' काढतात तें असें : 'एक चांगला मनुष्य गेला. संपला त्याचा आपला ऋणानुबंध. कोणाच्या अध्यांत ना मध्यांत. कधीं खटखट नाहीं कीं ठकठक नाहीं. उभ्या जन्मांत याच्या हातून चारचौघांनीं नांवें ठेवण्यासारखें कांहीं झालें नाहीं—तेवढ्या आठ मुलांखेरीज—ह्यानंतर चिता धडकते आणि तिच्या जाळानें पेटून पडदा जळतो आणि 'मूकनायका'चा खेळ खलास होतो. सारा हिंदुसमाज असल्या मूकनायकांनीं भरलेला आहे हीच त्याची शोककथा होय.

'दाइयानी नाटकांत' तर्कालंकार चूडामणि प्रोफेसर कोटिवुद्धे नांवाचे एक प्रकांडपंडित अतिविद्वत्तेमुळें संसारांतल्या सामान्य समंजसपणाला आणि व्यवहारज्ञानाला कसे पारखे झाले आहेत ह्याचें थोडक्यांत पण फारच विनोदी बहारीचें चित्र गडकऱ्यांनीं रेखाटलें आहे आणि रात्रीच्या वेळीं त्यांचा आठदहा महिन्यांचा 'बाबू' भोकांड पसरून रडत आहे. आणि प्रो. कोटिवुद्धे त्याला शांत करण्याचा आटोकाट प्रयत्न करीत आहेत. ते म्हणतात, "हें दीर्घक्रंदन आरोग्यशास्त्राच्या दृष्टीनें प्रकृतीला अपायकारक आहे. त्यामुळें शरिरांतील रुधिराभिसरणक्रिया बंद होण्याचा संभव आहे. भगवंतांनीं अर्जुनाला देखील 'तूं शोक करूं नकोस' असेंच सांगितलें आहे." पण बाबूचें रडणें कांहीं थांबत नाहीं. उलट तो जास्तच रडूं लागतो. मग प्रा. कोटिवुद्धे त्याला आकाशांतील नक्षत्रें दाखवून खगोलशास्त्राचे कांहीं सिद्धान्त समजावून सांगतात. त्यामुळें बाबूच्या रडण्याचा सूर जागच्याजागींच वाढतो.

शेवटीं त्यांची दहाबारा वर्षांची मुलगी घरांतून धांवत येते आणि 'चांदोबा, चांदोबा भागलास कां ?' असें गाणें म्हणून बाबूचें रडणें तत्काळ थांबवते आणि त्याला खेळायला लावते. त्याबरोबर टाळक्याला हात लावून प्रो. कोटिवुद्धे मटकन् खालीं बसतात आणि आपल्या डायरींत पुढील निष्कर्ष लिहितात. "आमच्या स्त्रीवर्गाच्या तोंडीं बसलेलीं हीं अर्थशून्य, विसंगत व वेडीवाकडीं गाणीं ऐकलीं म्हणजे माणूस व्यग्र झाल्यावांचून राहात नाहीं. गीता व उपनिषदें यांचे पाठ या केव्हां म्हणणार—इ. इ."

लोकवाङ्मय का शास्त्रीय वाङ्मय हा जो वाद कांहीं वर्षांपूर्वी महाराष्ट्रांतल्या ललित लेखकांत आणि विद्वानांत मोठ्या हिरीरीनें चालू होता, त्याला उद्देशून

गडकऱ्यांनीं हें मार्मिक विडंबन लिहिलें होतें. येथपर्यंत गडकऱ्यांच्या स्फुटलेखनांतील विनोदाचें विवेचन केलें. 'संपूर्ण बाळकराम' या विनोदी लेखसंग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तींत पाऊणशें पानांचा नवा मजकूर जोडण्यांत आलेला आहे. त्यांत त्यांचे अप्रकाशित आणि अपूर्ण लेख दिलेले आहेत; पण त्यांतला विनोद फारच सामान्य आणि अपरिपक्व आहे. म्हणून त्याकडे दुर्लक्ष करून आतां आपण गडकऱ्यांच्या नाटकांतील विनोदाकडे वळूं.

'वेड्याचा बाजार' हें गडकऱ्यांचें पहिलें नाटक. 'किर्लोस्कर नाटक मंडळीं'त मुलांचे शिक्षक असतांना वयाच्या विसाव्या वर्षी त्यांनी तें लिहिलें. त्याचे फक्त दोनच अंक त्यांनीं पूर्ण केले. ते 'रंगभूमि' मासिकांत क्रमशः प्रसिद्ध झाले. ह्या नाटकाची बैठक विनोदी आहे हें त्याच्या नांवावरूनच उघड होतें. अनेक वेडांनीं पछाडलेली छंदिष्ट मंडळी या नाटकांत वावरताहेत. 'बलवंत प्रासादिक नाटक मंडळी' मधल्या देशपांडे नांवाच्या एका नाटकाला नुसत्या शब्दावर कोट्या करण्याचें वेड लागलें आहे. 'मी केसांना भांग पाडून येतों.' असें कोणी म्हणालें कीं, 'भांग का गांजा' अशी कोटी देशपांड्यानें केलीच. 'वडील मंडळी आपल्याला पूज्य आहेत' असें कोणी उद्गारलें की, 'पूज्य का शून्य' ही कोटीबाज मखलाशी देशपांड्यानें त्यावर केलीच. सुरुवातीला या कोट्यांची मौज वाटते; पण पुढें पुढें त्यांतलें नावीन्य नष्ट झाल्यामुळें त्यांनीं हंसू येण्याऐवजीं कंटाळाच येतो.

ह्याच कंपनींतलें बाळाभाऊ नांवाचें एक संगीत पात्र आहे. निरनिराळ्या नाटकांतल्या नायक-नायिकांचे वेगवेगळे प्रेमाचे प्रकार पाहून ह्याचें डोकें फिरलेलें असतें. त्यामुळें नाटक हें संसाराचें चित्र नसून, संसार हेंच मुळीं नाटकाचें चित्र आहे अशी त्याची भावना झालेली असते आणि तो स्वतःला कोठल्या तरी नाटकाचा नायक समजतो. वेणू नांवाच्या मुलीला पाहण्यासाठीं त्याला त्याच्या मित्रानें बोलावलेलें असतें. पण तो वेणूच्या घरांत सामान्य माणसाच्या शिरस्त्याप्रमाणें शिरत नाहीं. 'मोहनतारा' नाटकांतल्या मोहनप्रमाणें आपल्या प्रियेची बागेंत चोरून भेट घेण्यासाठीं त्या घराच्या भिंताडावरून उडी मारून तो आंत येतो आणि स्वतःचें ढोपर फोडून घेतो.

तेवढ्यांत वेणू केर टाकण्यासाठीं म्हणून मागील दारीं येते. बाळाभाऊला कळत नाहीं की ही आपली 'नायिका' आहे का तिची 'मोलकरीण' आहे. कारण कोणत्याहि नाटकांत, काव्यांत वा कादंबरींत नायिका केर टाकण्यासाठीं आल्याचें आढळत नाहीं; पण मागाहून तिला त्यानें निरखून पाहिल्यानंतर त्याची खात्री होते कीं हीच आपली प्रिया असावी. त्याबरोबर तिच्या केरसुणीवर सांठवलेल्या केराकडे पाहात तो म्हणतो, 'बा केरा, धन्य आहेस तूं. हा केर ज्या उकिरड्यावर पडेल तो उकिरडा धन्य.

त्याच्यावर लोळणारा गाढवसुद्धां धन्य. त्या केरांतला कागदाचा फाटका तुकडा मला प्रणयपत्रिकेसारखा वाटतो. '

एवढ्यांत वेणूच्या तोंडावर एक माशी येते. शकुन्तलेला त्रास देणाऱ्या भुंग्यापासून तिला वांचविण्यासाठीं ज्याप्रमाणें दुष्यंत पुढें येतो, त्याप्रमाणें वेणूच्या तोंडावरची माशी हांकलण्यासाठीं बाळाभाऊ एकदम पुढें येतो आणि म्हणतो, ' सुंदरी ' भिऊं नकोस. काय ही तुझी स्थिति ? ' गद्य संभाषण करीत असतांना मधून मधून तो नाटकांतलीं पदेंहि म्हणतो. वेणू त्याला विचारते कीं, ' तुम्हांला माझ्या घरांत जर यावयाचें होतें तर नीट सरळ रस्त्यानें यावयाचें सोडून देऊन ह्या भलत्या मार्गानें तुम्ही कां आलांत ?'

त्यावर बाळाभाऊ म्हणतो, ' प्रणयी जनांची पहिली भेट अरण्यांत...निदान एखाद्या बागेंत तरी पडावी असा सिद्धान्तच आहे. अर्जुन सुभद्रेला भेटला तो अरण्यांत. मोहननें तारेला पाहिलें तेंहि बागेंत. दुष्यंत–शकुन्तलेची भेट पाहा अरण्यांतच. कामसेन रसिकेला भेटला बागेंतच. एवढी जहांबाज त्राटिका; पण प्रतापरावाला ती भेटली बागेंतच.'

या वेड्या माणसाशीं फार बोलण्यांत अर्थ नाहीं म्हणून वेणू जाऊं लागते. तोंच तिला अडवून बाळाभाऊ तिचा हात धरतो. तेव्हां वेणू ओरडते, ' खबरदार, अंगाला हात लावाल तर. ' ते तिचे शब्द ऐकून बाळाभाऊ मनांत विस्मित होतो. तो स्वगत म्हणतो, " मला वाटलें कीं, सुभद्रेप्रमाणें ही मला आलिंगन देऊन ' बहुत छळियेले ' हें पद म्हणायला लागेल; पण नाटकांतल्या मुख्य खुब्या हिला माहीत नसाव्यात असें दिसतें." वेणूला रागावलेली बघून तो ' नच सुंदरि करुं कोपा ' हें पद म्हणूं लागतो. बाळाभाऊचें नाटकी वेड पुढें इतकें वाढतें कीं, तो तिचें चुंबन घेण्याचा प्रयत्न करतो. तेव्हां ती मोठ्यामोठ्यानें घरांतल्या माणसांना हांका मारूं लागते.

तेव्हां बाळाभाऊला नाटकी पश्चात्ताप होतो. तो म्हणतो ' अरेरे, काय अविचार करीत होतों मी ? कोणत्याहि नायकानें अजून असा अत्याचार केलेला नाहीं. प्रणयिनीनें धिक्कार केला तर फार झालें तर मूर्च्छित पडायचें ' त्यानंतर तो वेणूला सांगतो, ' जा वेणू , जा. नाटकाच्या नियमाबरहुकूम मला आतां मूर्च्छित पडलेंच पाहिजे. मग वेणू गेल्यानंतर ' पाषाणापरि मस्तक झालें, स्पष्ट दिसे ना कांहीं ' ही साकी उंच सुरांत म्हणत म्हणत बाळाभाऊ मूर्च्छित पडतो.

' वेड्यांच्या बाजारांतला ' बाळाभाऊचा हा प्रवेश म्हणजे हास्यरसाचा कळस आहे. त्या पात्राची मूळ कल्पनाच मुळीं विनोदी आहे. त्याला नायक करून जर गडकऱ्यांनी हें नाटक पूर्ण केलें असतें, तर तें एक मराठी भाषेंतलें उत्कृष्ट विनोदी नाटक झालें असतें; पण पुढे लिहिलेल्या भागांत बाळाभाऊला मागें सारून दुसऱ्याच पात्रांना त्यांनीं महत्त्व दिलेलें दिसतें.

बाळाभाऊखेरीज दुसरींहि छंदिष्ट पात्रें ह्या नाटकांत आहेत. अण्णासाहेबांना

आपली प्रकृति कोणत्या ना कोणत्या तरी रोगानें बिघडली असल्याचा एकसारखा भास होत असतो. त्यामुळें उठल्याबसल्या चूर्णें, मात्रा, अरिष्टें, काढे ह्याखेरीज ते दुसरी भाषा बोलत नाहींत. केवळ स्वतःच्या शरिरावर औषधांचा मारा करून त्यांचें समाधान होत नाहीं तर कुटुंबांतल्या प्रत्येक माणसानें रोज कांहीं ना कांहीं तरी औषध घेतलेंच पाहिजे असा त्यांचा सर्वांच्या मागें लकडा असतो.

अण्णासाहेबांचें औषधवेड किती विकोपाला गेलें आहे, हें त्यांच्या पुढील भाषणावरून कळून येईल. ते म्हणतात, " सणासुदीच्या दिवशीं औषधें खायचें सोडून गोड पक्वान्नें खाण्याची चाल कोणत्या शहाण्यानें पाडली असेल ती राम जाणे. असा एक तरी सण आहे का कीं त्या दिवशीं घरांतलीं सारीं माणसें एका ठिकाणीं बसून चूर्ण खाताहेत किंवा मात्रा घेताहेत. उलट दसरा आला, करा गोड, दिवाळी आली करा गोड. शिवें वनभोजनाला जायचें. तिथें तरी कांहीं वनस्पति औषधि खातील म्हणावें, तर तिथेंहि आपलें गोड आहेच. यज्ञकर्माच्या वेळीं प्राचीन ऋषी सोम पीत असत. मला वाटतें तो सोमरस म्हणजे अष्टमांश काढाच असला पाहिजे. त्याशिवाय रानांवनांत त्यांच्या प्रकृत्या धडधाकट कशा राहिल्या असत्या ? आजकाल सकाळीं चहा पिण्याची पद्धत सुरू झाली आहे. चहाऐवजीं एखादा काढा सकाळच्या प्रहरीं प्याला तर काहीं बिघडेल काय ? "

अण्णासाहेबांप्रमाणेंच माधवराव नांवाचें दुसरें एक पात्र या नाटकांत आहे. उपनिषदें, गीता, वेदान्त वाचून त्यांचें डोकें फिरलेलें आहे. आत्मा अमर आहे, बहीण–भाऊ, आईबाप हा सर्व भ्रम आहे, का ते कांता, कस्ते पुत्रः, अहं ब्रह्मास्मि, मी ब्रह्म, तूं ब्रह्म, तात्या ब्रह्म, अण्णा ब्रह्म असा ' ब्रह्म ' घोटाळा माधवरावांच्या डोक्यांत निर्माण झालेला आहे.

' वेड्यांचा बाजार ' हें नाटक तसें पाहिलें तर फारच अपरिपक्व अवस्थेंत गडकऱ्यांनीं लिहिलें आहे; पण रंगभूमीवर पराकाष्ठेचीं विनोदी पात्रें निर्माण करण्याच्या बाबतींत गडकऱ्यांनीं पुढें जो उच्चांक गांठला, त्याचा प्रारंभ ' वेड्यांच्या बाजारांत ' झाला असल्याचीं निःसंदिग्ध चिन्हें त्या नाटकांत जागोजाग आढळतात.

त्यानंतर ' प्रेमसंन्यास ' हें मराठी रंगभूमीवर आलेलें गडकऱ्यांचें पहिलें नाटक होय. तेरा सालीं ह्याचा पहिल्यानें प्रयोग झाला. हिंदुसमाजांतील बालविधवेच्या हृदयद्रावक जीवनाची ही करुण कहाणी होय; पण तिच्यांत विषमविवाह, प्रेमविवाह, आणि पुनर्विवाह हे प्रश्नहि अनुषंगानें आलेले आहेत. नाटकाचें सर्व वातावरण गंभीर असून, त्यांत करुणरसाचा विशेष परिपोष केलेला आहे. नाटकाचा शेवट फारच भयानक रीतीनें शोककारक झालेला आहे. अशा वातावरणांत वस्तुतः विनोदाला कोठून वाव असणार ? पण स्मशानांत एका बाजूला उगवलेल्या एखाद्या सुंदर फुलाप्रमाणें ह्या

शोकान्त नाटकांतला गडकऱ्यांचा निरागस विनोद प्रेक्षकांच्या मनाला मोहिनी घातल्या-बांचून राहात नाहीं.

विसराळू स्वभावाचें गोकुळ नांवाचें जें पात्र गडकऱ्यांनीं ह्या नाटकांत चितारलेलें आहे तो त्यांच्या स्वतंत्र विनोदी प्रतिभेचा एक अविस्मरणीय आणि आल्हाददायक नमुना होय. ज्या विनोदामुळें प्रेक्षकांच्या किंवा वाचकांच्या मनांत सहानुभूति निर्माण होते तो विनोद किंवा तें हास्य सर्वांत उत्तम असें यापूर्वीच आम्हीं सांगितलेलें आहे. त्या कसोटीला गोकुळ हें पात्र सर्वस्वीं उतरणारें आहे. गोकुळच्या भोळसर आणि विसराळू स्वभावाचे एकेक नमुने पाहिले म्हणजे प्रेक्षक पोट धरधरून हंसतो.

कोणकोणतीं कामें करावयाचीं ह्याची आठवण राहण्यासाठीं तो आपल्या उपरण्याला सतराशेंसाठ गांठी मारून त्या उपरण्याची अक्षरशः सुतपुतळी करून टाकतो; पण कोणत्या गोष्टीसाठीं कोणती गाठ मारली आहे हें मागून त्याच्या ध्यानांतच राहात नाहीं. शेरभर साखर आणि तोळाभर केशर आणण्यासाठीं म्हणून तो घरांतून बाहेर पडतो खरा; पण वाण्याच्या दुकानांत आल्यानंतर त्याला साखर शेरभर घ्यायची का तोळाभर घ्यायची आणि केशर तोळाभर घ्यायचें का शेरभर घ्यायचें याचें विस्मरण होतें आणि मग तो तसाच कांहीं न घेतल्यावांचून मोकळ्या हातांनीं घरीं परततो.

पावसांत भिजत असतांना छत्री उघडण्याचेंहि स्मरण त्याला राहात नाहीं. उपरण्याला गांठी मारून आठवण राहात नाहीं, म्हणून तो पुढें स्मरणवही ठेवतो; पण कित्येक गोष्टींचें टांचण करण्याची त्याला जशी आठवण होत नाहीं, तसें टाचण ठेवलेल्या गोष्टी पाहाण्याचें स्मरण त्याला होत नाहीं. आणि कांहीं वेळां स्मरणवही कुठें ठेवली हेंच मुळीं त्याला स्मरत नाहीं. त्यामुळें ब्रह्मदेव आपल्याला स्मरणशक्ति द्यावयाला अजिबात विसरला कीं काय अशी त्याला जबरदस्त शंका येते.

जयंतावर झालेल्या खुनाच्या खटल्यांत आरोपीच्या बाजूनें गोकुळची साक्ष काढण्यांत येते; पण वयाच्या बाबतींत आपली स्मरणशक्ति दगा देणार अशी भीति वाटल्यामुळें, गोकुळ वृन्दावन विसरभोळे ह्या आपल्या नांवांतल्या बारा अक्षरांना दोन्ही बाजूंच्या दोन वकिलांनीं गुणून त्यांत एक न्यायाधीश मिळवायचा म्हणजे पंचवीस हा आपल्या वयाचा बरोबर आकडा येतो, असा त्याने आडाखा बसवून ठेवला.

पण ऐन वेळीं कोर्टांत साक्ष देतांना विसराळूपणानें त्यानें आपल्या नांवाच्या बारा अक्षरांना न्यायाधीशानें गुणून त्यांत दोन वकील मिळवले आणि आपलें वय चौदा म्हणून उत्तर दिलें. त्यामुळें कोर्टांत हंशा पिकला. तेव्हां त्यानें आपली चूक दुरुस्त करून मूळ ठरविलेल्या आकड्याप्रमाणें आपलें वय 'पंचवीस' असें सांगितलें.

तेव्हां सरकारी वकिलानें त्याला विचारलें, 'मग पहिल्यानें चौदा कशीं सांगितलीं?' तेव्हां गोकुळानें त्याला उत्तर दिलें, 'पहिल्यानें फुकट गेलेलीं वर्षें जमेस धरलीं नव्हतीं.'

गोकुळ हा एक वेडगळ माणूस आहे ही गोष्ट न्यायाधिशाच्या लक्षांत याव याला कांहीं फारसा वेळ लागला नाहीं. त्यांनीं त्याला नालायक साक्षीदार ठरवून त्याची साक्ष काढून टाकली. तेव्हां 'शहाण्यानें कोर्टाची पायरी चढूं नये म्हणून वाड-वडीलहि म्हणत आले तें कांहीं खोटें नाहीं' असें पुटपुटत गोकुळ साक्षीदाराच्या पिंजऱ्यांतून बाहेर पडतो.

साक्षीच्या निमित्तानें कोर्टाच्या वातावरणाशीं आणि भाषेशीं जेव्हां गोकुळचा संबंध येतो, तेव्हां दरखास्त, सुनावणी, कैफियत, हुकूमनामा, जातमुचलका आणि फैसला ह्या शब्दांचा गोकुळच्या मनावर विलक्षण परिणाम होतो. हे शब्द उच्चार-तांना अंगांत विलक्षण अवसान भरल्याचा त्याला भास होतो. आपल्याला पुढेंमागें जर मुलें झालीं तर दरखास्त, कैफियत अन् जप्ती हीं मुलींचीं नांवें आणि मुकादमा, हुकूमनामा आणि फैसला हीं मुलांचीं नांवें ठेवण्याचा आणि शक्य तर स्वतः मुखत्यार वकील होण्याचा तो निर्धार करतो.

विसराळू गोकुळबद्दल प्रेक्षकांना जी सहानुभूति वाटते तिचें आणखी एक कारण आहे. तें म्हणजे त्याची भांडखोर आणि जहांबाज बायको मथुरा. गोकुळ सुरुवातीलाच म्हणतो, 'हा विसराळूपणा आणि ही कजाग बायको या दोहींनीं माझ्या जन्माचं इथेंच सार्थक झालें आहे.' तथापि, मानसशास्त्रदृष्ट्या विचार केला म्हणजे गोकुळ मूळचा जरी थोडासा विसराळू असला तरी त्याचा विसरभोळेपणा इतका पराकाष्ठेचा वाढायला त्याच्या बायकोचा कजागपणाच कारणीभूत झालेला असावा हें सहज कळून येतें. आपल्या बायकोबद्दल मनांत साठलेलें सारें हार्द कोणापुढें तरी ओकून टाकावें म्हणून बायकोच्या गैरहजिरींत गोकुळ विद्याधराला बोलावतो; पण विसराळूपणामुळें तो मागलें दारच बंद करावयाला विसरतो. त्यामुळें गोकुळचें स्वपत्नी-निंदापुराण ऐन रंगांत आलें असतां मथुरा हळूच मागून येते आणि गोकुळची अशी कांहीं फजिती उडवते कीं प्रेक्षकांच्या हंसतां हंसतां मुरकुंड्या वळतात.

गोकुळसारखा भोळा, अजागळ, विसरभोळा माणूस हा सनातनी धर्माचा जाज्वल्य अभिमानी आणि आधुनिक सुधारणांचा कट्टर विरोधक असावा हें बघून आपल्याला त्याचें जास्तच हंसूं येतें. आपल्याला कोणी महार म्हटलें तरी चालेल, पण सुधारक म्हटलेलें खपायचें नाहीं असें तो मोठ्या अभिनिवेशानें सांगतो. त्याचा धर्माभिमान इतका प्रखर असतो कीं, सिंहस्थांत पत्त्यांतल्या राजाराण्यांचीसुद्धां तो लग्नं लावीत नाहीं. स्त्री-पुरुषांनीं मोकळेपणानें समाजांत एकत्र मिसळावयाला त्याचा सक्त विरोध आहे. स्त्री-पुरुषांच्या तसबिरीसुद्धां भिंतीवर एकत्र लावण्याची त्याला भीति वाटत असते.

त्याचा स्वभाव किती संशयी आहे ह्याचा एक अत्यंत विनोदी मासला म्हणजे जेव्हां वृद्ध तात्यासाहेबांच्या घरांतल्या द्रुमन्, वीणा वगैरे तरुण मुली पळून जातात तेव्हां गोकुळ म्हणतो, कीं, "बायकांना पाय फुटण्याचा हा हंगाम दिसतो. द्रुमन् गेली,

वीणाताई गेली, लीलाताई गेल्यासारखीच आहे. आमच्या घरांतलीसुद्धां गेली आत मी तर प्रत्यक्ष तात्यासाहेब आणि स्वयंपाकीण आजीबाई या दुकलीवरहि आपली दुरून टेहेळणी करणार आहे." गोकुळच्या तोंडचें हें वाक्य ऐकल्यावर नाटकगृहांतल्या प्रेक्षकांच्या हंसतां हंसतां कशा दामट्या वळतात हे आम्हीं आपल्या डोळ्यांनीं स्वतः पाहिलें आहे.

गोकुळच्या या स्वाभाविक आणि सहजगत विनोदाखेरीज शाब्दिक कोट्यांचीहि ह्या नाटकांत पुष्कळ रेलचेल आहे. उदाहरणार्थ, 'अंगवस्त्राच्या गांठीपेक्षां लग्नगांठच बरी म्हणायची.' 'नवऱ्याला डोकें नसलें म्हणजेच बायका डोक्यावर बसतात.' 'विजापूरच्या मुलुखमैदान तोफेच्या आवाजानें गर्भिणीचे गर्भपात झाले असें म्हणतात. पण हिच्या तोंडाची तोफ सुरू झाली म्हणजे माझ्यासारखा पुरुषदेखील गर्भगलित होतो.' मथुरा म्हणते, 'इतकीं माणसें असतात आपल्या बाबांच्या खाणावळींत; पण माझ्याखेरीज पान हालत नाहीं' तेव्हां गोकुळ म्हणतो, 'खाणावळींतलीं दोन दोनशें पानें हालवायला तुझ्यासारखी खंबीर बायकोच पाहिजे.'

मथुरेचा बाप किती चिक्कू असतो, त्याचें गोकुळनें केलेलें हें वर्णन वाचा. 'पक्का चिक्कू आहे तो. दसऱ्याचें सोनें सुद्धां त्याच्या हातून सुटत नाहीं. कोणी निरोप सांगितला एखादा तर त्यांतले देखील चार शब्द तो दलालीदाखल ठेवून घेईल.'

'पुण्यप्रभाव' नाटक हा गडकऱ्यांच्या परिपक्व प्रतिभेचा पहिला, देदीप्यमान विलास होय. त्यांच्या नाट्याचें, काव्याचें नि विनोदाचें अत्यंत प्रगल्भ आणि आल्हाद-कारक दर्शन ह्या नाटकांत प्रथम घडतें. काव्याच्या आणि विनोदाच्या दृष्टींनीं 'प्रेम-संन्यास' नाटक उत्कृष्टच आहे. पण त्यांत नाट्य अजिबात नाहीं; असें म्हटलें तरी चालेल. त्या दृष्टीनें 'पुण्यप्रभावां'त गडकऱ्यांच्या प्रतिभेनें प्रगतीचा फार मोठा पल्ला गांठला आहे ह्यांत संशय नाहीं. उदात्त ध्येयवाद आणि भावमधुर कारुण्य ह्यांच्या बरोबरीनं उदात्त हास्यरस आणून बसविण्याचा त्यांनीं या नाटकांत महत्त्वाकांक्षी प्रयत्न केला आहे. ईश्वर, भूपाळ, वृंदावन, वसुंधरा आणि कालिंदी हीं ह्या नाटकामध्यें पांच प्रमुख गंभीर पात्रें तर नूपुर, सुदाम, कंकण, किंकिणी आणि दामिनी हीं तितकींच विनोदी पात्रें गडकऱ्यांनीं त्यांच्या समोर आणून उभीं केलीं आहेत.

हीं पांचहि विनोदी पात्रें पांच मानवी स्वभावांचे निरनिराळे मासले आहेत. नूपुरला दुसऱ्याचीं खाजगी रहस्यें जाणून घेण्याचा हव्यास असतो, तर सुदामला स्वतः-च्याच काय पण एकुण एक स्त्रियांच्या एकनिष्ठेबद्दल अविश्वास असतो. कंकणाला साऱ्या स्त्रिया आपल्यावर फिदा असल्याची घमेंड असते. दामिनीला दागिन्यांचें वेड असतें, तर किंकिणीला आपल्या मालकिणीचें अनुकरण करण्याचा नाद जडलेला असतो. गंभीर

पात्रांत स्त्रीस्वभावाचें गडकऱ्यांचें चित्रण जसें परिणामकारक वठतें, तसें त्यांचे खलपुरुष वजा केले तर पुरुषांचें चित्रण गडकऱ्यांना साधलेलें नाहीं. त्याच्या उलट गडकऱ्यांचीं विनोदी पुरुषपात्रें जितकीं यशस्वी वठतात तितकीं त्यांचीं स्त्रीपात्रें वठत नाहींत. नूपुर, सुदाम आणि कंकण ह्यांच्या विनोदापुढें किंकिणी आणि दामिनी फारच फिक्या पडतात.

'पुण्यप्रभाव' नाटकाच्या पहिल्याच प्रवेशांत गडकऱ्यांनीं आपल्या विनोदाचें सारें बारदान उघडें केलें आहे. त्यामुळें कंकण, नूपुर आणि सुदाम ह्यांचीं स्वभाववैशिष्ट्यें अगदीं प्रारंभापासून प्रेक्षकांना समजून येतात. वसुंधरा आणि दामिनी देवदर्शनासाठीं शिवालयांत येतात व वसुंधरेनें भूपाळशीं लग्न केल्यामुळें तिच्यासाठीं प्रेमसंन्यास घेतलेला ईश्वर तिला त्या ठिकाणीं भेटतो. वसुंधरेचें आणि त्याचें पूर्वायुष्याबद्दल पुष्कळच बोलणें होतें. नूपुरच्या मनांत साहजिकच संशय येतो. वसुंधरेसारख्या थोरामोठ्यांच्या स्त्रीनें एका सामान्य बैराग्याशीं अशा तऱ्हेनें चव्हाट्यावर गप्पा माराव्या म्हणजे काय ? त्या अर्थी त्या ठिकाणीं कांहीं तरी भानगड असली पाहिजे, असा तो निष्कर्ष काढतो. कारण लग्नाच्या जोडप्याखेरीज कोणतींहि स्त्री-पुरुषें कुठेंहि आणि कांहींहि बोलतांना आढळलीं, तर तेथें कांहीं तरी दगलबाजी असायचीच हा लोकशास्त्राचा सिद्धान्त नूपुरला तोंडपाठ असतो.

दामिनी ही सुदामची पत्नी. तेव्हां तो स्वतः तिच्या पाळतीवर असतोच. कारण 'स्त्रीजात तेवढी निमकहराम' हें ब्रीदवाक्य त्यानें आपल्या उराशीं बाळगलेलें असतें. ईश्वरासारख्या बैराग्याशीं वसुंधरा चव्हाट्या पिटीत बसली असतां आपली बायको दामिनी तिथें ज्याअर्थीं जवळपास रेंगाळत होती त्या अर्थीं तिच्यावर त्या गोसावड्यानें मोहिनी टाकली असलीच पाहिजे, असा साहजिकच सुदामला संशय येतो. आपल्या बायकोवर तर त्याचा विश्वास नव्हताच; पण बैरागी लोक तितके बदमाष अशी त्यानें आपल्या मनाशीं खूणगांठ बांधलेली असते. बैराग्याच्या एकेक माळेगणिक लग्नाची किमान पक्षीं हजार हजार माळ तरी तुटत असली पाहिजे. म्हणून बैराग्याची स्मरणी म्हणजे त्याच्या बदफैलीची मोजदादच असली पाहिजे असा त्याचा ठाम सिद्धान्त असतो.

ईश्वराच्या मागावर नूपुर आणि सुदाम हे दोघेहि असतात. तेव्हां ईश्वर निघून गेल्यावर साहजिकच त्या दोघांची गांठ पडते. एकमेकांची ओळख करुन घेण्यासाठीं दोघेहि उत्सुक असतात; पण दोघेहि पडले पट्टीचे इरसाल. ते काय ताकास तूर लागून देणार ?

सुदामनें विचारलें, 'काय हो, आपलें नांव काय ?' नूपुर उत्तरला, 'माझ्या बारशापूर्वींच माझे आईबाप मेले. तेव्हां माझें नांव ठेवायचें तसेंच राहून गेलें. बरें, तुमचें नांव काय ?' सुदामनें त्याच्यावर कडी केली. तो म्हणाला, 'रोज मला लोक इतकीं नांवें ठेवतात कीं त्यांतलें कोणतें सांगावें ह्याचा मलाच घोटाळा पडतो.'

दामिनी सुदामची बायको आहे हें नृपुरला ठाऊक नसतें. आपल्या बायकोबद्दल नृपुरच्या भावना काय आहेत हें सुदामलाहि समजावून घ्यायचें होतें. अशा मनःस्थितींत दोघांचा झालेला मासलेवाईक संवाद वाचण्यासारखा आहे.

सुदाम : रंगीबेरंगी पांखरू जातांना दिसलें का एखादें ?

नृपुर : चिटपांखरूंसुद्धा नाहीं.

सुदाम : काय थापा मारतां हो ?

नृपुर : हं, हं, त्या गमतीबद्दल बोल्तां होय ? तें पांखरूं म्हणजे अजब चीज आहे.

सुदाम : कोण वसुंधरा का तिची दासी ?

नृपुर : वसुंधरेबद्दल कशाला बोला ? मोठ्या नदींत बारमहा पाणी असायचेंच. मी त्या गांवगंगेबद्दल बोल्तों; पोरसवदाच आहे. पण अशी बाजिंदी अन् छटेल आहे.

सुदाम : ( स्वगत ) बाजिंदी—छटेल—आमच्या पतिव्रतेनें कमाई तर खूप करून ठेवली आहे.

गांवगुंडांच्या पाचकळ बोलण्याचा असा इरसाल नमुना दुसरीकडे वाचावयाला मिळणार नाहीं.

स्वतःच्या स्त्रीबद्दल आधींच सुदामचा भयंकर संशय. त्यांत नृपुर आणखीनच तेल ओततो. तो सांगतो, ' कपड्यालत्त्यांत छानछोकी, बोलण्यांत एवढासा मोकळेपणा, नजरेंत एवढीशी लोभी फिरकी, जराशी हसऱ्या डोळ्यांची आणि दाबलेल्या ओठांची, निलाजरा लाजाळूपणा हीं दिसलीं कीं हजार हिश्शांनीं तिथें लगीनगांठ सैल आहे अशी खूणगांठ बांधून ठेवा. नृपुरच्या ह्या बोलण्यानें सुदामच्या अगदीं वर्मावर डाग बसले. शेवटीं, दामिनीच्या भानगडी शोधून काढण्याच्या कामीं दोघांनींहि खटपटीस लागावयाचें असा उभयतांचा करार ठरला.

त्याप्रमाणें एक दिवस नृपुर दामिनीच्या घरांत शिरला. तिचें दागिन्यांचें वेड त्याला माहीत होतें. तेव्हां त्या बाबतींत एका साधूचा निरोप घेऊन आपण आलों आहोंत, अशी बेधडक थाप त्यानें तिला मारली. तेवढ्यांत दरवाजावर थाप वाजते, तेव्हां आपला नवरा बाहेरून आला असावा या समजुतीनें दामिनी नृपुरला एका पेटाऱ्यांत लपविते आणि कडी काढावयाला बाहेर जाते.

त्या पेटाऱ्यांत सुदाम आधींच लपून बसलेला असतो. त्यामुळें नृपुर त्या पेटाऱ्यांत शिरतांच दोघेहि एकमेकांचे कान पकडून परस्परांवर गुरगुरत त्या पेटाऱ्यांतून बाहेर पडतात. ही घटना कृत्रिम असली तरी रंगभूमीवर ती खूप रंगते आणि हंशा पिकतो.

सुदाम : कसा आलास या घरांत ?

नृपुर : तुमच्यासारखाच.

सुदाम : पाजी मनुष्या, मी हिचा नवरा आहें.

नूपुर : पति हा स्त्रीचा अलंकार म्हणतात म्हणून तिनें तुम्हांला या पेटींत जपून ठेवलें होतें वाटतें ? काल संध्याकाळीं तिची तुमची ओळखहि नव्हती अन् आज अगदीं नवरा-बायकोचें नातें जोडून पार मोकळे !

तेव्हां सुदामला वाटलें कीं इतक्यांत आपण आपली खरी ओळख नूपुरला देतां कामा नये. आपण केवळ थट्टेनें तसें बोललों अशी थाप मारुन तो नूपुरला बाहेर कुठें तरी भेटायला सांगतो.

नूपुर गेल्यावर दामिनीचे तो असे वाभाडे काढतो म्हणतां 'यापुढें अष्टोप्रहर नखशिखान्त डोक्यावर बुरखा घेऊनच तुला हिंडावें लागेल' असें तो तिला फर्मावितो.

दामिनी : मेला स्वभावच भारी संशयी. परवां माझ्या माहेरचा एक माणूस आला, तर त्याचा देखील तुम्ही संशय घेतलांत. आतां त्यानें माझ्याकडे पाहून काणा डोळा केला म्हणून बरें.

सुदाम : जो तो तुझ्याकडे पाहून असा काणा डोळा करतो म्हणून तर ही आटाआट.

आतां नूपुर, सुदाम आणि दामिनी ह्या विनोदी पात्रांचा सांधा गडकऱ्यांनीं कंकण आणि किंकिणीशीं कसा जोडला आहे तें पाहा. कंकण हा राजपुत्राचा संरक्षक आणि एका लष्करी पथकाच्या प्रमुखपदीं असलेला राजदरबारचा सरदार जो वृंदावन, त्याच्या कालिंदी नामक बायकोची किंकिणी ही दासी.

ही किंकिणी मोठी छटेल आणि नखरेल दासी असते. आपल्या मालकिणीप्रमाणें छानछोकीचे कपडे आणि चांगले चांगले दागिने अंगावर घालून आपण चोहींकडे मिरवावें हें वेड तिच्या डोक्यांत शिरलेलें असतें. शिवाय स्वतःचें लग्न जमविण्याच्याहि ती नादांत असते.

कंकण आणि नूपुर हे तिच्या मागावर असतात; पण नूपुरला ती पहिल्याच तडाख्याला सांगते कीं, 'तुमचें न् माझें मुळींच पटायचें नाहीं !' तेव्हां नूपुर तिला म्हणतो कीं, 'आतां तरुणपणीं पटणार नाहीं कदाचित्; पण म्हातारपणीं तर पटेल ? तीन आणि सहांचे निर्जीव आंकडे ऐन छत्तिशीच्या भरांत एकमेकांचीं तोंडें पाहात नाहींत; पण साठी उलटून गेल्यानंतर तेच परस्परांचे पक्के स्नेही होतात कीं नाहीं ?'

एकदां नूपुर आणि कंकण ह्या दोघांचीहि किंकिणीच्या घरीं गांठ पडते अन दोघांचीहि खूप खडाजंगी उडते. कंकण तरवार उपसतो अन् नूपुर किंकिणीच्या आड जाऊन दडतो.

नूपुर : बायकांच्या मागें दडलेल्या वीरावर हत्यार चालवतोस ?

कंकण : मग असा पुढें ये !

नूपुर : प्रेमासाठीं प्रतिस्पर्धा म्हणजे तुझ्यासारख्या रेड्याबरोबर साठमारी नव्हे !

सांग, तुझ्या अंगांत काय गुण आहेत ते किंकिणीला.

कंकण : किंकिणी, मी पिढीजात लढवय्या आहें. माझ्या एकाहि पूर्वजानें लढाईत कधीं माघार घेतली नाहीं.

नूपुर : एकाहि पूर्वजाशीं तिला लग्न करायचें नाहीं. दरोबस्त बापांप्रमाणें जर प्रत्येक बेटा निपजूं लागला, तर जगाच्या इतिहासांत नांवें बदलण्यापलीकडे कांहींच फेर-फार करण्याची जरूर राहणार नाहीं.

कंकण : लाथ मारीन तिथें पाणी काढीन अशी धमक आहे माझ्या अंगांत—

नूपुर : हो, बायकोला लाथ मारून तिच्या डोळ्यांतून पाणी काढशील

शेवटीं, उभयतांमध्यें तडजोड होऊन प्रेमशास्त्रान्वयें किंकिणीची प्रेमयाचना करण्याचा त्या दोघांचा करार होतो. किंकिणीचा निरोप घेण्यापूर्वी आपल्या वाढत्या वैभवाची बातमी सांगण्यासाठीं कंकण तिला एकांतांत नेतो त्या वेळीं नूपुरचा खरा स्वभाव प्रकट होतो. तो म्हणतो, 'कंकण हिच्याशीं काय बोलणार आहे तें कळण्यासाठीं मी हिच्या प्रेमावरहि पाणी सोडायला तयार आहें.'

त्यानंतर युवराजाचा खून करण्याचा खोटा आळ भूपाळवर घालून 'त्याला कारागृहांत घालावयाचें कारस्थान' वृन्दावन रचतो. तसें झालें म्हणजे वसुंधरेला तळघरांत कोंडून आपली पातकी इच्छा तिच्यावर लादतां येईल अशी वृन्दावनाची कल्पना असते. ह्या कारस्थानांत कंकण हा माफीचा साक्षीदार होणार असतो. वसुंधरेला तळघरांत ठेवली म्हणजे तिच्यावर पहारा करण्यासाठीं एक स्त्री हवी असते. त्या कामीं सुदामची बायको दामिनी चांगली उपयोगी पडेल ह्या दृष्टीनें कंकण सुदामच्या घरीं जातो. त्याच वेळीं अष्टौप्रहर बुरखा पांघरून हिंडण्याची शिक्षा सुदामनें आपल्या बायकोला फर्मावलेली असते.

कंकणला तो प्रकार शुद्ध वेडगळपणाचा वाटतो. तेव्हां स्त्रिया जात्याच कशा बद-फैली असतात आणि त्यांना पुरुषांचें वारेंसुद्धां कसें लागूं देतां कामा नये ह्याबद्दलचें आपलें तत्त्वज्ञान सुदाम त्याला पटवून देतो.

'माझी बायको आरशांतल्या माझ्या प्रतिबिंबाशेजारीं फाजील सलगीनें उभी राहिली तरी सुद्धां मला दुजाभाव वाटतो. कृपण लोकांनीं द्रव्य जमिनींत पुरण्याऐवजीं बायकांनाच जिवंतपणीं सुरक्षित गाडून ठेवण्याची एखादी युक्ति शोधून काढायला हवी होती. बायकांचा नटवेपणा फार वाईट. त्यांनीं डोक्याला सुवासिक तेल लावलें, तर नवऱ्यानें डोळ्यांत तेल घालून तिला जपलें पाहिजे. बायकांचा वांकडा भांग म्हणजे वांकड्या मार्गाच्या अंदाजाची आखणीच!'

कंकणला आपल्या स्वरूपाचा फारच गर्व असतो. तो सुदामला सांगतो, 'तुझी बायको वाईट चालीची आहे कीं नाहीं ह्याची परीक्षा मी करतों. माझ्याकडे पाहून मला सुद्धां जी बाई बघणार नाहीं, ती पतिव्रता म्हणून खुशाल समजावें.' सुदाम त्या गोष्टीला

तयार होतो. त्याचप्रमाणें किंकिणीवर प्रेम करण्यासाठीं कंकणला प्रेमशास्त्राचें अध्ययन करावयाचें असतें. त्या बाबतींत त्याला एखादा शास्त्री-पंडित गांठून देण्याचें सुदाम मान्य करतो.

भूपाळच्या विरुद्ध राजापुढें माफीची साक्ष देणें आणि किंकिणीच्या पुढें जाऊन तिची प्रेमयाचना करणें ह्या दोन घडयांची उजळणी जेव्हां कंकण प्रत्यक्ष करूं लागतो तेव्हां त्याच्या डोक्यांत त्या दोन्ही घडयांची गमतीदार गल्लत होते. राजापुढें गुडघे मोडून त्याला 'प्राणदात्या' असें संबोधावयाचें असतें अन् किंकिणीपुढें गुडघा मोडून तिला 'प्राणेश्वरी' म्हणावयाचें असतें. पण त्या दोन्ही गोष्टींची तालीम करीत असतांना कंकण कसा गोंधळ करतो तें पाहा.

"दोन्ही गुडघे मोडून आणि दोन्ही हात जोडून हे प्राणेश्वरी किंवा प्राणदात्या, माझ्या घोर प्रेमामुळें माझ्या तोंडून शब्दहि निघत नाहीं, या अपराधानें मी रात्रंदिवस विरहव्याकुळ होऊन आपली करुणा भाकतों. पुन्हां असें अघोर प्रेम केलें तर राजाधिराज, मला आपल्या हृदयमंदिरांत स्थळ दे." गडकऱ्यांच्या विनोदी कल्पकतेचा हा सर्वोत्कृष्ट नमुना आहे.

त्याचप्रमाणें किंकिणीची शास्त्रोक्त प्रेमयाचना करण्यासाठीं जेव्हां कंकण तिच्या घरीं येतो तेव्हां तिच्या रूपाच्या वर्णनाचे जे कपटे त्यानें लिहून बरोबर आणलेले असतात, त्यांचा अनुक्रम गडबडींत खालचा वर अन् वरचा खालीं होतो. त्यामुळें फारच बहारीचा विनोद निर्माण होतो.

कंकण आपल्या प्रेयसीला म्हणतो, 'हे सुंदरी, तुझीं नखें भुंग्यासारखीं आहेत. चरण पोवळ्याप्रमाणें आहेत. कंबर हत्तीसारखी आहे. छाती सिंहाप्रमाणें आहे. ओठांची शोभा कोकिळेसारखी आहे. दंतांची मजा धनुष्याप्रमाणें. नाक गुलाबासारखें. डोळे पिकलेल्या तोंडल्यासारखे आहेत. इ० इ०' ह्या विनोदांतहि गडकऱ्यांची स्वतंत्र प्रतिभा दिसून येते.

नूपुर हा बाणभट्टाच्या लांबलचक संस्कृतप्रचुर समासांच्या शैलीनें आपलें प्रेम प्रकट करतो. 'हे चारुगात्री, तुझ्या ललित - ललित—मधु—मधुर—रूप—सौंदर्यानें या दासानुदासाचें मृदु—मृदुल—हृदयोन्मीलन होऊन कोमल—सरसलीला—विलासांनीं जगदारविंद सुगंधमकरंद—रस—निमग्न झाले आहे. हे कंबुकंठि, ललना—ललामभूत लतिकावलि—मृदुल–हृदये, मला ब्रह्मांड आठवतें. ब्रह्मांड प्रेमसोल्हसित हर्षित—वृत्तिशून्य झालें. प्रेमाचें ब्रह्मांड विलयून ब्रह्मांडाचें प्रेम झालें. इ०' तथापि, नूपुरच्या ह्या भारदस्त आणि सुसंस्कृत प्रेमापेक्षां किंकिणीला कंकणचें रानदांडगें प्रेमच अधिक आवडतें.

वृंदावनानें कालिंदीला कोंडून ठेवलेलें असतें. तेव्हां तिची सुटका करण्याचा एखादा उपाय असला तर तो विचारण्यासाठीं किंकिणी दामिनीकडे येते. दामिनी आपला बुरखा किंकिणीच्या अंगावर घालून त्याबाबत ईश्वराची सल्लामसलत विचारायला

घराबाहेर जाते. एवढ्यांत कंकण तेथें येतो. दामिनी ही बदचालीची बायको आहे किंवा नाहीं याची परीक्षा घेण्याचें त्यानें सुदामला अश्वासन दिलेलें असतें.

कंकणला ठाऊक नसतें कीं, बुरखा पांघरलेली स्त्री दामिनी असुन आपली प्रेयसी किंकिणी आहे. तो तिला दामिनी समजून तिची प्रेमयाचना करतो; पण किंकिणी तोंडावरचा बुरखा काढून जेव्हां प्रकट होते, तेव्हा कंकणची अशी कांहीं फटफजिती होते. दामिनीची परीक्षा पहाण्यासाठीं सुदामच्या सांगण्यावरून आपण हें सारें प्रेमाचें नाटक करीत होतों असें समजावण्याचा कंकण खूप प्रयत्न करतो; पण किंकिणीचें समाधान होत नाहीं. शेवटीं, वृंदावनला न कळत कालिंदीची अन् ईश्वराची भेट घडवून आणण्याचें कंकण जेव्हां वचन देतो तेव्हां किंकिणीचें समाधान होतें. किंकिणी आणि दामिनी त्या कामासाठीं निघून जातात.

नूपुर ह्या मंडळींच्या पाळतीवर बाहेर घिरट्या घालीत असतोच. ती मंडळी घरांतून बाहेर पडल्यानंतर तो आंत शिरतो. घरांत आतां कोणीच नसतें. दामिनीचा तेथें पडलेला बुरखा पांघरून तो तेथेंच बसतो. सुदाम घराच्या भुयारांत आधींपासून लपून बसलेला असतो. तोहि बुरखा पांघरून कांहीं वेळानें दामिनी काय करते आहे हें पाहण्यास बाहेर येतो. बुरख्यांत बसलेली व्यक्ति दामिनी आहे असें समजून तिला फसवण्यासाठीं सुदाम आवाज बदलतो आणि आपण ईश्वर आहोंत अशी बतावणी करतो. नूपुरहि बुरख्यां तून दामिनीसारखा बायकी आवाज काढून त्या खोट्या 'ईश्वरा'चें मोठ्या प्रेमानें स्वागत करतो. त्यामुळें सुदामाच्या अंगाचा तीळपापड उडतो. शेवटीं दोघेंहि एकमेकांच्या तोंडावरचे बुरखे काढतात आणि वरमतात. येथपर्यंत नाटकाचा चौथा अंक संपतो.

या प्रवेशापासून ह्या नाटकांतला गडकऱ्यांचा विनोद ढासळावयाला सुरुवात होते आणि पांचव्या अंकांतला 'अग्निदिव्या' चा प्रवेश तर अनुचित विनोदाची अगदीं परमावधि होय.

दागिन्यांच्या प्राप्तीसाठीं दामिनी ईश्वराला भेटावयाला जाते आणि रात्रभर घराबाहेर जाते, हें सुदामच्या दृष्टीनें महत्पाप होय. तेव्हां सीतेप्रमाणें अग्नीत उडी टाकून आपलें पावित्र्य सिद्ध करण्याचें तो तिला आव्हान देतो. एवढेंच नव्हे, तर अंगणांत अग्निकुंड पेटवून तो तिला फरफर ओढीत तेथें आणतो. दामिनी ओरडूं लागते. तेवढ्यांत एका बाजूनें कंकण येतो आणि दुसऱ्या बाजूनें नूपुर आणि किंकिणी येतात. तेव्हां किंकिणीबाबत सुदामाचीहि नजर साफ नाहीं ह्या आरोपावरून त्यालाहि अग्निदिव्याचें आव्हान दामिनी देते. त्यावर दामिनीबाबत कंकणचा आपल्याला संशय आल्यामुळें त्यानेंहि अग्निदिव्य करावें असा किंकिणी आग्रह धरते. तेव्हां किंकिणी आणि सुदाम ह्यांची कांहीं तरी मानगड असावी असें नूपुरनें सांगितलें असल्यानें आपलें पावित्र्य सिद्ध करण्यासाठीं किंकिणीनें आगटींत उडी मारावी असा कंकण आग्रह धरतो.

हें आगींत उडी मारण्याचें कारण आपल्या अंगावर शेकणार असें पाहतांच नूपुर तेथून निसटूं लागतो; पण कंकण त्याला पकडतो आणि 'तुझ्यामुळें ह्या माझ्या साऱ्या भानगडी झाल्या, म्हणून तूंहि आमच्याबरोबर आगींत उडी टाकली पाहिजेस' असें म्हणून कंकण त्याला अग्निकुंडापुढें आणून उभें करतो.

आगींत उडी टाकण्याला कोणीच तयार नसतें. म्हणून एकामागून एक अशा क्रमानें आगींत उड्या मारायच्या, का सर्वांनीं डोळे मिटून अग्निकुंडांत एकदम उड्या टाकून जाळून घ्यायचें असल्या वायफळ चर्चेंत ते बराच वेळ घालवतात. उडी टाकण्यापूर्वी मृत्यूचें भय वाटूं नये म्हणून एक वीररसाचें 'कविल' कंकण म्हणून दाखवतो. शेवटीं सारेजण डोळे मिटतात अन् जागच्या जागेवर पाय आपटून आगींत उड्या मारल्याची बतावणी करतात. एवढेंच नव्हे, तर आपल्या सर्वांगाला चटके लागल्याचें सोंग करून सारे ओरडूं लागतात

नूपुर म्हणतो, 'मी तोंडाकडून पेटलों रे' कंकण विचारतो, 'मग तूं हें बोलतोस कसें ?' नूपुर उत्तर देतो, 'मी पडजिभेनें बोलतों आहे रे.'

ह्या प्रवेशांत शब्दांचा नि कल्पनेचा पुष्कळ विनोद आहे, नाहीं असें नाहीं; पण तो सर्व प्रवेश इतका कृत्रिम, गैरलागू आणि अनावश्यक आहे कीं तो प्रयोगांत गाळतात म्हणूनच या नाटकांतल्या विनोदाची कांहीं तरी प्रतिष्ठा राहाते. पांच विनोदी पात्रें घेऊन आणि त्यांच्यांत नाना तऱ्हेच्या गुंतागुंती निर्माण करून तब्बल सहा अंकभर हास्य निर्माण करण्याचा गडकऱ्यांनीं या नाटकांत जो मोठा व्यूह रचला होता, तो शेवटपर्यंत कांहीं त्यांच्या आवाक्यांत राहूं शकला नाहीं.

विनोदाच्या दृष्टीनें पहिले तीन अंक उत्तमच आहेत, यांत कांहीं शंका नाहीं. पण मग पेटारे, भुयारें अन् बुरखे असल्या कृत्रिम आणि तकलादू मांडवलावर जेव्हां गडकरी विनोदाचे मजले एकावर एक चढवण्याचा प्रयत्न करूं लागतात तेव्हां त्यांच्या विनोदाची स्थिति वाजवीपेक्षां उंच बांधलेल्या मोहरममधल्या ताबुतासारखी होते. त्याचा तोल सगळा डळमळूं लागतो. विनोदाची मर्यादा सुटली कीं त्यानें हास्य निर्माण होण्याऐवजीं त्याचें हंसूं होतें, या मूलभूत सिद्धान्ताचा गडकऱ्यांसारख्या श्रेष्ठ दर्जाच्या विनोदपंडिताला या नाटकांत विसर पडावा याचें नवल वाटतें.

'एकच प्याला' हें गडकऱ्यांचें अत्यंत लोकप्रिय आणि यशस्वी नाटक. एवढें परिणामकारी शोकान्त नाटक मराठी भाषेंत दुसरें नाहीं. वस्तुतः, शोकान्त नाटकांत हास्याला फारसा वाव नसावा. पण कारुण्याच्या पुराबरोबर हास्याचीं कारंजीं उडवणें हें गडकऱ्यांच्या प्रतिभेचें वैशिष्ट्य होतें. तें पूर्वीच्या दोन्ही नाटकांत प्रकर्षानें प्रकट झालेलें आहे. 'प्रेमसंन्यास' नाटकांतील विनोद हा त्या नाटकांतील मुख्य विषयाशीं

सुसंबद्ध नाहीं. ती दुरुस्ती गडकऱ्यांनीं आपल्या ' पुण्यप्रभावां ' त पुढें केली. स्त्रियांचें पावित्र्य आणि त्यांच्या पातिव्रत्याचा प्रभाव यावर नाटकाच्या मूळ कथानकाची उभारणी झालेली आहे. तेव्हां त्यामधल्या विनोदाची रचना त्याच अनुषंगानें करण्यांत आलेली आहे.

वस्तुतः ' एकच प्याला ' ही कांहीं दारूच्या दुष्परिणामाची शोककथा नव्हे. ती मानवी स्वभावाच्या अतिरेकाची शोककथा आहे. दारूचा ' एकच प्याला ' घेतला रे घेतला कीं माणसाचा ' सुधाकर ' होऊन त्याचा सत्यानाश झालाच पाहिजे, ह्या गोष्टीवर स्वतः गडकऱ्यांचा सुद्धां विश्वास नसावा; नाहीं तर ' एकच प्याला ' घेऊन दोन अंकांच्या आंत त्याच्या मोहांतून सहीसलामत सुटलेला भगीरथ त्यांनीं त्या नाटकांत चितारलाच नसता.

दारूचा एकच किंवा अधिक प्याले रोज नियमितपणें घेऊन संसारांत सुखी, यशस्वी आणि दीर्घायुषी झालेलीं अनेक माणसें जगांत दाखवितां येतील. पण कांहीं कांहीं माणसांच्या स्वभावाची प्राकृतिक रचनाच अशी असते कीं, तीं अतिरेकाच्या पराकोटीला जाऊन पोहोंचतात. अर्धेमर्धे थांबतच नाहींत. मग तीं दारू पिवोत नाहीं तर अमृत ढोसोत. शेवटीं त्या अतिरेकामुळेंच त्यांचा नाश होतो.

सुधाकराचा नमुना त्यांपैकीं होता. आणि त्याच्या दुर्दैवानें त्याला बायकोहि अशी मिळाली होती कीं, जिच्या पातिव्रत्याच्या कल्पनाहि पराकाष्ठेच्या अतिरेकी होत्या. पतीला व्यसनापासून मुक्त करण्याचा एकदांहि कधीं ती प्रयत्न करीत नाहीं. अशा अतिरेकी स्वभावाच्या दोन माणसांची एकत्र सांगड बसल्यानंतर त्यांचा नाश न व्हावा तर दुसरें काय व्हावें ? पण ही चर्चा ह्या ठिकाणीं अप्रस्तुत आहे. दारू पिणें निराळें आणि दारूबाजी (alchoholism) निराळी. वैद्यकीय दृष्ट्या तो एक रोगच समजला जातो. ' एकच प्याल्यां ' त दारूबाजीचे दुष्परिणाम दर्शविणें हा गडकऱ्यांचा उद्देश होता आणि त्या दृष्टीनेंच त्यांनीं मुख्य पात्रांची कल्पना आणि योजना केलेली आहे.

' पुण्यप्रभावा 'प्रमाणें ह्या नाटकांतला विनोदहि त्यांतील मुख्य विषयाशीं संबद्ध असाच आहे. सुधाकराची वकिलीची सनद मुन्सफांनीं सहा महिन्यांसाठीं रद्द केल्या-नंतर त्याला त्या अपमानाच्या जांचण्या असह्य होतात. त्या दुःखाचा विसर पडावा म्हणून त्याचा कारकून तळीराम त्याला दारूचा ' एकच प्याला ' देतो. तेथून सुधा-कराच्या अधःपाताला प्रारंभ होतो. सारांश, सुधाकराला दारूच्या व्यसनांत गुंतवायला तळीराम हाच कारणीभूत झालेला आहे.

तळीराम हा कांहीं नुसताच दारू पिणारा नसतो. तो अट्टल दारूबाज असतो. तो त्या व्यसनाच्या ' तळीं 'इतका खोल गेलेला असतो कीं त्यांतून त्याची सुटका होणें सर्वस्वी अशक्यच असतें. ही त्याची अवस्था लक्षांत घेतली म्हणजे मग त्याच्या स्वभावाचें रहस्य उमगतें. समाजांत दारू हें अत्यंत निंद्य आणि भयंकर व्यसन समजलें

जावें ह्याची तळीरामाला साहजिकच चीड असते. म्हणून दारूबाबत सामान्यतः समाजांत जे गैरसमज पसरलेले आहेत, ते दूर करून दारू पिण्याला समाजांत प्रतिष्ठा प्राप्त व्हावी ह्याच्या प्रयत्नांत तो असतो.

ह्या दृष्टीनें कोणीहि चांगला मनुष्य नव्यानें आपल्या पंथांत आला तर त्याला तो हवाच असतो. म्हणजे भगीरथाला किंवा सुधाकराला दारू पिण्याचा त्यानें जो नाद लावला, तो कांहीं त्यांचा नाश करण्याच्या दुष्ट हेतूनें नव्हे, हें यावरून लक्षांत येईल. व्यसनी माणूस स्वतःच्या व्यसनाचें समर्थन करण्याचा जो हास्यास्पद प्रयत्न करतो त्या विरोधाभासावर तळीरामाचा विनोद आधारलेला आहे.

तळीराम दारू पिण्याचें समर्थन जें करतो तें मोठें मासलेवाईक आहे. तो म्हणतो, "म्हणे दारू एकदां घेतली म्हणजे ती सुटत नाहीं. पण तेवढ्यानें दारू वाईट कशी ठरते? विश्वविद्यालयाची एकदां पदवी मिळवली म्हणजे ती जन्माची चिकटते. एकदां नुसती माळ घातली कीं बायको कायमची चिकटते. मग पदवीला न् बायकोला जर लोक वाईट समजत नाहींत तर दारूलाच तेवढें लोक वाईट कां समजतात? प्रेमाचे दुष्परिणाम तर दारूपेक्षां वाईट असून सुद्धां प्रेमाला जगांत भाव आला आहे! प्रेमांत राजा सुद्धां गुलाम होतो. पण मदिरेंत गुलामाला आपण राजा आहोंत असें वाटतें. प्रेमामुळें कांहीं सुचेनासें होतें. तर मदिरेमुळें कल्पनाशक्ति अनिवार वाढते. लोक म्हणतात, मद्यपान हें अनीतिकारक आहे. साफ खोटें. मद्यपान नीतिमत्तेला फार पोषक आहे. मद्यपी कधीं खोटें बोलत नाहीं. कारण खोटें रचून त्याला सांगतांच येत नाहीं. तो कधीं कोणाचा विश्वासघात करीत नाहीं. कारण त्यावर कोणी विश्वास ठेवीत नाहीं. चोरीच्या बाबतींत तर तो अजाण असतो. एखादी लहानशी गोष्टसुद्धां त्याला दुसऱ्याजवळून चोरून ठेवतां येत नाहीं."

त्यावर भगीरथ तळीरामाला विचारतो, "दारू जर इतकी चांगली आहे असें तुम्ही म्हणतां, तर मग तिची जगांत एवढी निंदा कां होते?"

त्याला तळीराम उत्तर देतो कीं, "मद्यपान हें बहुतांशीं हलक्या लोकांच्या हातीं गेल्यामुळें संभावित समाजाकडून त्याची हेटाळणी होत असते, ती बंद व्हावी आणि मद्यपानाच्या व्यसनाला सभ्य स्वरूप यावें, एवढ्यासाठीं सर्व धर्मांच्या, सर्व जातींच्या आणि पोटजातींच्या दारू पिणाऱ्यांचें एक 'आर्य मदिरा मंडळ' काढण्याचें आपण ठरविलेलें आहे."

दारू पिण्याच्या बाबतींत समाजांत केवढें ढोंग माजलेलें असतें, त्याचें आविष्करण करण्यासाठीं गडकऱ्यांनीं 'आर्य मदिरा मंडळा' ची योजना केलेली आहे. खेरीज कित्येक राजकीय आणि सामाजिक ढोंगांचीहि बंभेरी प्रसंगोपात्त ह्या मंडळांतील सभासदांच्या संभाषणांतून मोठ्या कौशल्यानें त्यांनीं वाजविलेली आहे. या मंडळाच्या नांवाबद्दल आणि उद्देशाबद्दल, तळीरामानें जें टांचण केलेलें आहे त्यांतला उपरोध

आणि उपहास अतिशय मार्मिक आहे.

"मद्यपानाच्या व्यसनाला सभ्य स्वरूप यावें एवढ्यासाठीं संस्थेच्या नांवांत 'आर्य' हा शब्द घालण्यांत आलेला आहे. मंडळाचा प्रत्येक सभासद रोज दारू पिणारा आणि आपण दारू पितों हें चारचौघांत बोलून दाखविणारा असा पाहिजे. मांसाहाराला हें मंडळ उत्तेजन देतें. साडेआठाला दारूचीं दुकानें बंद होतात, तो कायदा मोडून सर्रास अहोरात्र तीं दुकानें उघडीं ठेवावीत एवढ्यासाठीं हें मंडळ सरकारला सारख्या विनवण्या करीत राहणार. बिनवासाची प्यायची दारू शोधून काढण्यासाठीं हें मंडळ शिष्यवृत्त्या देऊन विद्यार्थ्यांना परदेशीं पाठवणार. प्रत्येक सभासदानें नवीन सभासद मिळवून मद्य-पानाचा जारीनें प्रसार करावयाला हवा. त्याप्रमाणें व्यसनें सोडण्याचें आजकाल समा-जांत जें खूळ बोकाळलें आहे; कोणी चहा सोडतो, कोणी विडा सोडतो; त्या खुळाला या मंडळानें आळा घातला पाहिजे." हा विनोद वाचतांना कोल्हटकरांच्या 'चोरांच्या संमेलना'ची आठवण होणें अपरिहार्य आहे.

'आर्य मदिरा मंडळा'चा सभासद झाल्यानंतर सुधाकर राजरोसपणें जाऊन तेथें दारू पिऊं लागतो, तसा त्या मंडळाचा मूळचा विनोदी रंग पालटून त्याला निव्वळ दारूबाजाच्या अड्ड्याचें स्वरूप प्राप्त होतें, आणि त्यांतली गंमत निघून जाते. 'मंडळा'च्या बैठकीचे हे प्रवेश गडकऱ्यांनीं फारच संयमानें रंगवायला पाहिजे होते पण तो विवेक कांहीं त्यांना राहिला नाहीं.

सुधाकराच्या व्यसनाचा जसा जसा अतिरेक होऊं लागला, तसतसा 'आर्य मदिरा मंडळा'च्या विनोदाचाहि अतिरेक होत चालला. दारू हा विषय पुष्कळदां बाजूला राहून सुधारक–दुर्धारक, जहाल–मवाळ, सभा–संमेलनें–ठराव ह्यांचीच टर ह्या मंडळाच्या प्रवेशांतून होऊं लागली. अर्थात्, हा विनोद आणि उपहास अतिशय मर्मभेदक आहे ह्यांत संशय नाहीं. पण त्याची ह्या नाटकांत एवढी आवश्यकता होती असें वाटत नाहीं.

शास्त्रीबुवा आणि खुदाबक्ष ह्यांच्या स्वभाव–विसंगतीचा हा प्रातिनिधिक नमुना बघा :

**शास्त्री :** सुधारणेचें नांव सांगून उद्यां तुम्ही जर अपेयपान करूं लागलांत, अभक्ष्य-भक्षण करूं लागलांत, सुधारक म्हणून मांसाहार करूं लागलांत–खुदाबक्ष, आज मटन चांगलं शिजलं आहे नाहीं ?—तुम्ही जर खाण्यापिण्याचा ताळ सोडूं लागलांत–तर तें आम्हां जुन्या लोकांना कधीं खपायचें नाहीं. मांसाहार आम्हांला कधीं खपायचा नाहीं. अरे हुसेन, आणखी थोडं मटण आण. आगरकरांचा तिटकारा येतो तो या कारणानें. टिळकांबद्दल आम्हांला आदर वाटतो तो या कारणामुळें—

**सोन्याबापू :** मग टिळकांच्या गीतारहस्याबद्दल एवढी आरडाओरड कां ?

**खुदाबक्ष :** त्याचं कारण असं. एरव्हीं टिळकांबद्दल आम्हांला आदर आहे. पण

गीतारहस्यांत टिळकांनीं श्रीमंत शंकराचार्यांना छेडलें आहे. त्यांनीं आर्यधर्माच्या ऐन गड्डयाला हात घातला आहे. सनातन धर्माची ही हानी आहे—

**शास्त्री :** भले शाबास–खुदाबक्ष, आज तूं सनातन आर्यधर्माची बाजू राखलीस. ( त्याला मिठी मारतो. आणि पगड्यांची अदलाबदल करतो. )

अतिरिक्त दारूबाजीनं तळीराम आसन्नमरण होतो. तेव्हां त्याची प्रकृति तपासायला शास्त्रीबुवा एका वैद्याला घेऊन येतात आणि सोन्याबापू एका डॉक्टरला आणतात. दोघेहि नांवाचेच वैद्य अन् डॉक्टर असतात. तथापि दोघांच्याहि संभाषणांतून वैद्य आणि डॉक्टर ह्यांच्या व्यवसायामधील कांहीं दोषांची चांगलीच रेवडी उडवण्यांत आलेली आहे.

वैद्यांनीं आपल्या पोतडींतून निरनिराळीं भस्में जेव्हां बाहेर काढलीं तेव्हां 'एका देहाचं भस्म करण्यासाठीं एवढीं भस्में' असे उद्गार काढून तळीराम डॉक्टराला विचारतो, 'काय हो डॉक्टर, वैद्यावर नाहीं का औषध ?' त्यानंतरचा संवाद फारच बहारीचा आहे.

**वैद्य :** असं म्हणूं नये. वैद्य हाच रोग्याचा खरा जिवलग मित्र.

**तळीराम :** एरव्ही, रोग्याच्या जिवाशीं इतकी लगट कोण करणार ?

**डॉक्टर :** वैद्याच्या औषधानें कुठें रोग बरे होतात ? बापानें औषध घ्यावें तेव्हां मुलाच्या पिढीला गुण.

**वैद्य :** तरी पुष्कळ आहे. वैद्याच्या औषधानें मुलगा जिवंत तरी राहातो–डॉक्टराच्या बाबतींत बाप औषधानें मरायचा अन् मुलगा बिलांच्या हप्त्यांनीं—

**डॉक्टर :** राहूं द्या. आमच्या औषधानें अवघ्या तीन दिवसांत रोग्याच्या स्थितींत जमीन अस्मानाचें अंतर पडतें.

**वैद्य :** म्हणजे, जो रोगी जमिनीवर असतो तो तीन दिवसांत अस्मानांत जातो असेंच ना ?

तेव्हां तळीराम त्यांना सांगतो, अरे, 'असें आपापसांत भांडून जर तुम्ही एकमेकांचा जीव घेऊं लागलांत, तर मग माझा जीव कोण घेईल ?' त्यानंतर डॉक्टर आणि वैद्य दोघेहि एकदम तळीरामाची प्रकृति तपासूं लागतात. दोघांचेंहि निदान परस्परविरोधी. एक म्हणतो, 'नाडी फार मंद चालते' दुसरा म्हणतो, 'नाडी फार जलद चालते. 'तापानं अंगाला हात लाववत नाहीं.' एक म्हणतो, 'रोग प्रयत्नसाध्य आहे. जीव गेला तरी रोगी मरायचा नाहीं.' दुसरा म्हणतो, 'रोग अगदीं असाध्य आहे. तीन दिवसांत रोग्याचा मुडदा पाडून दाखवतों.'

तळीराम शास्त्रीबुवांना विचारतो, 'यांपैकी एकट्याच्या हातून मी मरण्याजोगा नव्हतों, म्हणून का या दोघांना एकदम आणलंत ? शेवटीं तळीराम दोघांनाहि हाकलून देतो. आणि म्हणतो, 'काय नशिबाचा खेळ आहे पहा. औषधासाठीं दारू प्यायला

सुरुवात केली, तों दारूसाठीं औषध पिण्यावर मजल येऊन ठेपली. '

हा सर्व प्रवेश विलक्षण हास्यकारक आहे. पण त्याची पार्श्वभूमि इतकी भीषण आहे, कीं मुक्त मनानें त्याची मौज मुळीं उपभोगतांच येत नाहीं. एकाद्या खेळकर वातावरणाच्या नाटकांत हा विनोद कमालीचा रंगला असता. दुसरी गोष्ट अशी कीं, वैद्य आणि डॉक्टरानें रोग्याला एकाच वेळीं तपासण्याची ही कल्पना गडकऱ्यांची स्वतःची नाहीं. ती त्यांनीं मलेरी याच्या 'लामूर मेदेसिन' (प्रेम हाच खरा वैद्य) ह्या नाटकांतून (अंक २, प्रवेश ४) घेतलेली आहे.

तळीरामाच्या मृत्यूचा शेवटचा प्रवेश 'पुण्यप्रभावां' तील 'अग्निदिव्या' च्या प्रवेशाप्रमाणेंच कमालीचा कृत्रिम आणि अनावश्यक म्हणून गाळण्यांत येतो. तथापि, ह्या प्रवेशांतील कांहीं गंमती रंगभूमीवर पाहण्यासारख्या नसल्या तरी वाचण्यासारख्या आहेत.

आपलें मरण जवळ आलेलें पाहून तळीराम आपल्या सोबत्यांना सांगतो, 'मरतांना मला थोडीशी दारू पाजा. तुळशीपत्राऐवजीं तोंडावर एक बूच ठेवा. म्हणजे ठसका लागला तरी तोंडांतली दारू सांडणार नाहीं. भगीरथाला सांगा, तळीराम अखेर दारू पितां पितां मेला. मी मेल्यावर माझ्या स्मरणार्थ माझ्या घरांत 'तळिराम मोफत मद्यालय' उघडून आल्यागेल्यांना, गोरगरिबांना, गोब्राह्मणांना फुकट दारू पाजा. विद्यार्थ्यांना निम्मे दरानें विका. माझ्या वर्षश्राद्धाच्या दिवशीं एकाद्या सत्पात्र ब्राह्मणाला सडकून दारू पाजा.' असें म्हणून तो शेवटीं 'एकच प्याला' घेतो आणि प्राण सोडतो.

तळीरामाच्या मृत्यूनंतर त्याचे सोबती तिथेंच दारू पीत पीत दुःखप्रदर्शनार्थ सभा भरवून स्मारकाची योजना आंखतात. ह्या सभेंतलीं भाषणें मोठीं मासलेवाईक आहेत. निरनिराळ्या मंडळींचे हे उद्‌गार बघा :

"अरेरे, दारूच्या या जिवंत गुत्त्याचे एकदम साडेआठ वाजले. मदिरेचा खरा कैवारी मेला. आर्य मदिरा मंडळाचा आयुर्आधार तुटला. मदिरे, मदिरे, तुझी धुंदी उतरली. खरा महात्मा दारूबाज आज आम्हांला सोडून गेला. पितांना त्यानें कधीं दिवस पाहिला नाहीं कीं रात्र पाहिली नाहीं. तपस्वीच तो. 'बोले तैसा चाले, त्याचीं वंदावीं पाउलें.' बारा वर्षें अडखळत बोल्ला, आणि अडखळत चालला."

तळीरामाची प्रेतयात्रा कशी काढावी याबद्दल सभेंत भांडणें सुरू होतात. तेव्हां खुदाबक्ष म्हणतो, 'भांडून सभेंत बखेडा घालायला ही काय देशांतल्या दोन्ही पक्षांमधल्या विद्वानांची सभा आहे?' पुढें तळीराम स्मारक फंड कमिटी स्थापन करून वर्गणीच्या आकड्यांची मागणी करण्यांत येते. तेव्हां सारेजण आंबट चेहरे करतात. त्यावर शास्त्रीबुवा म्हणतात, 'आजवर कोणत्या स्मारक सभेनें आंकडे वसूल करून स्मारक केल्याचें कोणाच्या स्मरणांत आहे? त्या वेळेपुरते हे दर्शनी आंकडे टाकायचे असतात. पुढं सर्वांनाच त्या आंकड्यांसकट स्मारकाचाहि विसर पडत जातो.'

हा सर्व विनोद एकाद्या निबंधांत वा गोष्टींत चांगला शोभून दिसला असता. पण नाटकांत इतका बारकाव्यानें किसून काढलेला विनोद कंटाळवाणा होतो. आणि शोकान्त नाटकांमध्यें अन् त्यांहूनहि त्यांतलें करुण नाट्य आपल्या भीषण नियतीकडे झपाट्यानें धांवत चाललें असतांना हा विनोद अत्यंत रसभंग करणारा वाटतो.

तळीरामाची बायको गीता ही सिंधूची नेमकी उलटी बाजू आहे. 'असे पति देवचि ललनांना' हें नवऱ्याबद्दलचें सिंधूचें तत्त्वज्ञान, तर 'असले नवरे काय जाळायचे आहेत? हे म्हणे देव! या देवांची नित्यनेमानें खेटरांनीं पूजा करावयाला हवी. हे हो कसले देव? शेंदूर कमी देव, निव्वळ दगडधोंडे! नवरा दारू पिऊन घरीं आला तर खुशाल त्याला दाव्यादोरखंडानं गोठ्यांत नेऊन बांधीत जा. नवरा म्हणे देवासारखा. अशानं तर नवरेपणाचे देव्हारे माजले. दारू पितो तो कसला हो नवरा? माणसांत देखील जमा व्हायची नाहीं त्याची.' हें गीतेचें त्या तत्त्वज्ञानावरील भाष्य!

गीता ही नवऱ्यांना देव मानावयाला तर तयार नाहींच, पण खुद्द देवाच्या देवपणाची देखील तिला खात्री वाटत नाहीं. ती म्हणते, 'तो देव मेला दडी मारून कुठं बसला आहे, का दारू बिरूच प्यायला आहे–देवानेंच मुळीं आतांशा लाज सोडल्या-सारखी दिसते!'

दारूबाज नवऱ्याच्या त्रासानें आणि छळानें वैतागून गेलेल्या गीतेची ही झणझणीत भाषा आणि हा चिडखोर स्वभाव पाहून प्रेक्षकांना हंसूं आल्यावांचून रहात नाहीं. तथापि, तो कांहीं केवळ विनोद नव्हे. उलट, स्वतःच्या कपाळावरचें कुंकू पुसून ती जेव्हां तळीरामाला सांगते कीं, 'हें एकदांचं घ्या अन् त्या कलालाच्या कपाळाला लावून घ्या शेवटचा घोट बायकोच्या आणि संसाराच्या नांवानें; म्हणजे तुम्ही सुटलांत आणि मी सुटलें.' त्यावेळीं प्रेक्षकांच्या काळजाला पीळ पडल्याखेरीज रहात नाहीं.

'एकच प्याला' नाटकाच्या एका प्राध्यापक टीकाकारानें तळीराम हा खलपुरुष आहे किंवा काय, असा एक वाद उपस्थित केला आहे. गडकऱ्यांनीं 'खलपुरुष' म्हणून त्याची योजना केलेली नाहीं हें त्यांना मान्य आहे. तरी देखील, सुधाकरला दारूच्या भयंकर व्यसनांत बुडवून त्याचा सर्वस्वी नाश करण्याची कामगिरी तळीरामनें हेतुपुरस्सर केली आहे, असा सदर टीकाकाराचा तळीरामावर आक्षेप आहे. तळीराम हा सद्गुणद्रोही आहे, जन्मजात हलकट आहे, मनुष्यद्वेष्टा आहे; परपीडनासक्त आहे, अकारणवैरदारुण आहे, एवढेंच नव्हे तर 'ते के न जानीमहे' ह्या कोटींतला एक नरराक्षस आहे, असें ह्या प्राध्यापक मजकुरांचें तळीरामाबद्दलचें निदान आहे.

'या घरांत तुमची काय किंमत आहे?', 'हें घर रामलालचं आहे', 'पद्मा-कर तुमचा खर्च चालवतो', 'तुमची सनद गेली त्यावेळीं रामलालनं बाईसाहेबांना मिठी मारली' असें सांगून तळीराम सिंधूबद्दल सुधाकराचें मन कलुषित करण्याचा प्रयत्न

करतो, हें जरी खरें असलें तरी त्यामुळें कांहीं तळीराम खलपुरुष आणि मानव-राक्षस ठरू शकत नाहीं. कारण हें सर्व तळीराम दारू पिऊन बोलतो आणि तें ऐकत असतांना सुधाकरहि चांगला प्यालेला असतो. दारू पिऊन बेहोष झालेल्या माणसांना कोणत्याच गोष्टीचें पावित्र्य कसें वाटत नाहीं आणि त्या धुंदींत तीं वाटेल ती गलिच्छ बडबड कशी करतात एवढाच तर्क फार झालें तर ह्यावरून निघूं शकतो. खलपुरुष होण्यास दारूबाज हा सर्वथैव अपात्र असतो हें काय प्राध्यापकांसारख्यांना कोणी सांगावयास पाहिजे ?

तळीराम हा मूळचा मोठा हुषार आणि हिमर्दा माणूस होता. पण अतिरिक्त दारूबाजीमुळें त्याच्या उपजत गुणांचा नि कर्तृत्वाचा अधःपात होऊन अशा माणसांच्या अंगीं सर्वसामान्यपणें जे दुर्गुण आढळतात, ते सर्व त्याच्या ठिकाणीं एकत्रित झाले होते. त्यामुळें त्याचें व्यक्तिमत्व तिरस्करणीय वाटतें हें खरें; पण त्याच्याबद्दल तिरस्कार उत्पन्न व्हावा म्हणून कांहीं गडकऱ्यांनीं या नाटकांत त्याची योजना केलेली नाहीं. दारूचें व्यसन कांहीं सुटत नाहीं अन् तरी देखील लोकांनीं आपल्याला प्रतिष्ठित म्हणावें हा जो दारूबाजांच्या व्यक्तिमत्त्वांत पुष्कळदां हास्यकारक संघर्ष उत्पन्न होतो, त्याचें विनोदी चित्रण गडकऱ्यांनीं तळीरामाच्या द्वारा या नाटकांत केलेलें आहे. म्हणून तळीराम हें हास्यनिर्मिति करण्याच्या उद्देशानेंच संकल्पिलेलें विनोदी पात्र आहे असाच शेवटीं निष्कर्ष काढावा लागतो.

मृत्यूपूर्वी अवघें अर्धा तास आधीं पुरें केलेलें गडकऱ्यांचें 'भावबंधन' हें तर बोलून चालून खेळकर आनंदपर्यवसायी नाटक आहे. 'त्यांतील विपुल हास्यरस हजारों प्रेक्षकांना हंसवून त्यांच्या मुरकुंड्या वळवील' असा निर्वाळा तात्यासाहेब कोल्हटकरांनीं त्या नाटकाच्या प्रस्तावनेंत देऊन ठेवलेला आहे. या नाटकांत मनोहर, मालती, धनेश्वर आणि घनश्याम हीं संपूर्णतया गंभीर पात्रें आहेत. धुंडिराज हा आपल्या भडभड्या आणि बडबड्या स्वभावामुळें प्रारंभीं हास्यरस निर्माण करतो खरा. पण त्याचा उपयोग वात्सल्याचा नि कारुण्याचा परिपोष करण्यासाठींच गडकऱ्यांनीं केला आहे.

लतिका आणि प्रभाकर हे परस्परांवर अनुरक्त झालेले तरुण आणि आनंदी प्रेमिक. कसलाहि आडपडदा न ठेवतां तीं मनमोकळेपणानें बोलतात. प्रभाकर कोटिबाज आणि लतिका फटकळ. त्यामुळें दोघांच्याहि बोलण्यानें मुबलक विनोद पिकतो. तथापि, केवळ हास्यनिर्मितीसाठीं म्हणून गडकऱ्यांनी महेश्वर उर्फ कामण्णा, इंदू, बिंदू आणि मोरू हीं चार विनोदी पात्रें निर्माण केलेलीं आहेत. महेश्वर हा त्यांचा म्होरक्या. 'या कपटनाटकांत चांगला उपयोग करून घेण्यासाठींच महेश्वर या विनोदी पात्राची मी योजना केली आहे' असें घनश्यामच्या मुखांतून गडकऱ्यांनीं स्पष्टपणें सांगितलें आहे.

( अंक १ : प्रवेश ४ ).

स्वतःच्या गांवीं महेश्वरचें कोठें लग्नच जमत नाहीं. तसें म्हटलें तर त्याला घर आहे. दार आहे. स्वतः तो आहे. त्याच्या पत्रिका आहेत. पण त्याच्या लग्नाला मात्र ठिकाणा नसतो. म्हणून आपलें लग्न जमविण्यासाठीं तो आपला जिगरदोस्त जो घनश्याम त्याच्याकडे मोठ्या आशेनें येतो. पत्र पाठवून घनश्यामनेंच मुळीं त्याला बोलावून घेतलेलें असतें. भेटतांक्षणींच घनश्यामच्या गळ्यांत हात घालून तो मोठ्या अजीजीनें म्हणतो, ' मित्रा, या संकटांत मला हात दे. आणि एकाद्या तरुणीचा हात माझ्या हातांत दे. '

' वेड्याच्या बाजारां 'तील बाळाभाऊची छाप महेश्वरवर पडलेली दिसते. प्रेयसीच्या प्राप्तीसाठीं वाटेल तीं पातकें करण्याची महेश्वराची तयारी असते. तो घनश्यामला म्हणतो, ' प्रेमाच्या सृष्टींत कसलें आलें आहे पाप ? प्रेम सदासर्वकाळ पवित्र असतें. प्रणयी पुरुषांनीं कोणतीं पापें करायचीं बाकी ठेवलीं आहेत ? सांग, मी मकरंदाप्रमाणें वेषांतर करूं, शर्विलकाप्रमाणें चोरी करूं, का दुष्यंताप्रमाणें मृगबालिकांचा खाटीक बनूं ? का बागेंत बसून भुंगेमाश्या मारूं ? '

घनश्यामला महेश्वराची दोन कामांमध्यें मदत हवी असते. पहिलें काम, त्याच्या मदतीनें धुंडिराजाला चोरीच्या गुन्ह्यांत गुंतवण्याची त्याची इच्छा असते. आणि दुसरें काम—धनेश्वराच्या घरांतून खोटे दस्तऐवज चोरण्याचें काम महेश्वराकडून त्याला करावयाचें असतें. तेवढ्यासाठीं ' लतिकेशीं तुझें लग्न लावून देतों ' असें मधाचें बोट त्याच्या तोंडाला लावून घनश्याम त्याला कानडी गवयाचें सोंग देतो आणि धनेश्वराच्या घरांत ठेवतो. स्वतःचें लग्न जमविण्याच्या निमित्तानें का होईना, पण धुंडिराजासारख्या देवमाणसाला चोरीच्या गुन्ह्यांत अडकवण्याला आणि धनेश्वराच्या घरांतून त्याचे दस्तऐवज चोरण्याला महेश्वरासारख्या विनोदी पात्रानें प्रवृत्त होणें ही गोष्ट त्याच्या विनोदी स्वभावाची हानी करणारी आहे. विनोदी पात्राचा अशा कामासाठीं उपयोग करणें उचित नाहीं.

लतिकेचे आपण फाजील लाड केले आणि तिला इंग्रजी शिक्षण दिलें म्हणून ती एवढी उच्छृंखल झाली आणि आपलें ऐकेनाशी झाली एवढयासाठीं धनेश्वरानें तिची घरांत नाकेबंदी करावयाचें ठरविलें. बाहेरच्या जगाशीं लतिकेचा संबंध तोडण्यासाठीं आणि घरांत धार्मिक वातावरण निर्माण करण्यासाठीं मराठी भाषिकांची—पुस्तकांची घरांतून हाकलपट्टी करण्याचा त्यांनीं निर्धार केला. त्याचा फायदा लतिकेचा प्रियकर प्रभाकर हा ' महामहोपाध्याय गिरसप्पा ' ह्या कानडी पंडिताचें सोंग घेऊन ज्याप्रमाणें धनेश्वराच्या घरांत शिरतो, त्याप्रमाणें भक्तिरसात्मक भजनें म्हणण्यासाठीं ' कामण्णा ' हें आंधळ्या कानडी गवयाचें सोंग देऊन महेश्वराला घनश्याम त्याच घरांत आणून घुसडतो.

गिरसप्याचें सोंग घेऊन प्रभाकर जेव्हां येतो तेव्हां धनेश्वर त्याला विचारतो, 'मराठी येतें का ?' प्रभाकर उत्तर देतो, 'लोक थोडें बोलतो, तो समजतो. हिंदुस्थानी थोडे. जन्मलो कन्नड. पुढें काशी गुरूशास्त्र शिकलो. षड्शास्त्र वेदवेदान्त वाचलो. फार पारंगत. केवळ मुखोद्गत.'

नंतर 'तरुणांच्या दृष्टीनें अत्यंत नीरस आणि अवघड संस्कृत शास्त्रग्रंथ कोणता ?' या धनेश्वराच्या प्रश्नाला 'योगवासिष्ठ–बृहद् योगवासिष्ठ- –बहोतही बडा ग्रंथ षष्ठलक्ष ग्रंथ—नीरस. व्हेरी मच एक पंडित काशीघाट पारायण केली, तर तीन तरुण लोक गंगेत जीव दिले, दोन लोक जागेवर मेलो, कंटाळला.' असें प्रभाकर उत्तर देतो.

ह्याच वेळीं महेश्वर आंधळ्या कामण्णा गवयाचें सोंग घेऊन प्रविष्ट होतो. तोहि कानडीच. तेव्हां धनेश्वर गिरसप्याला कामण्णाचें नांव कानडींत विचारावयाला सांगतात. आतां मोठा पेंचप्रसंगच आला. गिरसप्यानें मनाचा हिय्या करून विचारलें, 'रुंडु गुंड्ड कुंड्ड ?' महेश्वर अदमासानें सांगतो, 'कामण्णा.' त्यामुळें वेळ निभावली जाते.

धनेश्वराच्या घरांत इंदू आणि बिंदू या अत्यंत काळ्या आणि कुरूप अशा दोन मुली असतात. स्वतःचें लग्न कुणाशीं तरी जुळवण्याच्या खटपटींत त्या असतात. त्यांच्या तडाख्यांत महेश्वर ऊर्फ कामण्णा सांपडतो. हें नाटकांतल्या विनोदाचें मुख्य भांडवल आहे. इंदू–बिंदू या 'रिकामपणाच्या कामगिरीं' तील ठकीच्या किंवा 'प्रेम-संन्यास' मधील मथुरेच्या सुधारून अधिक कुरूप केलेल्या आवृत्ति होत.

शारीरिक व्यंगावर विनोद करण्याची गडकऱ्यांना विलक्षण हौस. ही गोष्ट बरी आहे कीं चांगली आहे हा इथें प्रश्न नाहीं. काळ्या रंगाची आणि कुरूपतेची थट्टा करण्याकडे साऱ्या जगाचीच नैसर्गिक प्रवृत्ति असते. त्या दृष्टीनें अशा विनोदाचें समर्थन होऊं शकेल. गडकऱ्यांनीं या थट्टेला वाङ्मयीन स्वरूप दिलें इतकेंच काय तें. पण इंदू–बिंदूच्या रंगावर गडकऱ्यांनीं रचलेला विनोद म्हणजे काळ्या रंगावर केलेल्या उपहासाचा उच्चांक होय.

इंदू–बिंदूच्या थट्टेला प्रभाकरानेंच प्रारंभ केला आहे. प्रभाकरानें मालती आणि लतिका ह्यांना सुंदर म्हटलें तेव्हां इंदू–बिंदूंना साहजिकच वाईट वाटलें. प्रभाकरानें त्या वर्णनामधून आपल्याला कां वगळलें म्हणून त्या विचारतात. तेव्हां प्रभाकर स्वगत म्हणतो, 'मदनाच्या सुंदर सैन्याशीं तोंड देतां देतां अखेर बाजारबुणग्यांशीं गांठ पडली. नयनाच्या बाणांतून निभावलों, पण वांकड्यातिकड्या भिवयांच्या विळ्याकोयत्यांतून पसार होणें कठीण आहे.'

प्रभाकर उत्तर द्यायची टाळाटाळ करतो तेव्हां इंदू त्याच्याशीं लडिवाळपणा करते. तेव्हां 'मूर्ख माणसाची कोटी आणि कुरूप पोरीचा लडिवाळपणा अशी बेढब जोडी जगांत कुठें आढळणार नाहीं' असे सुभाषितवजा उद्गार तो काढतो.

लग्नाच्या आशेनें इंदु-बिंदू जेव्हां आलटून आलटून महेश्वराच्या म्हणजे कामण्णाच्या मागें लागतात, तेव्हां त्याची अशी कांहीं तिरपीट उडते म्हणतां! कारण त्या दोघी त्याच्या तैनातीला ठेवण्यांत आलेल्या असतात. कामण्णानें जरी आंधळ्याचें सोंग घेतलें असलें तरी इंदू-बिंदूच्या रुपारंगाची त्यानें इत्थंभूत पहाणी केलेली असते. म्हणूनच तो म्हणतो, 'काय एकेकीचें रंगरूप आहे पण. स्त्रियांच्या सौंदर्यांतल्या सर्व वैगुण्यांचीं स्मरणासाठीं विधात्यानें ही दोन टांचणें तर करून ठेवलेलीं नसतील कदाचित्! कोणा तरुणाचे गळे कापण्यासाठीं परमेश्वरानें हीं कृष्णकारस्थानें करून ठेविलीं आहेत न कळे!'

कामण्णाला मराठी चांगलें बोलतां येतें हें रहस्य इंदूला प्रथम समजलें. 'तुम्ही माझ्याशीं लग्न केलेंत तरच मी ही गोष्ट धनेश्वराला सांगणार नाहीं' असा इंदूनें जेव्हां त्याला सणसणीत दम भरला, तेव्हां 'घातवार, व्यतिपात, संक्रांत, किंक्रांत, मरिआई, बारावा बृहस्पती, साडेसाती' एकदम सारीं उपटल्याचा कामण्णाला भास झाला. कामण्णानें त्या संकटांतून पळवाट काढण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. तो म्हणाला, 'मी हा असा आंधळा. तूं अशी गरीब. आपला चरितार्थ चालायचा कसा?' इंदू म्हणाली, 'कुठेंही आपण भिक्षा मागून पोट भरूं. तुम्ही आंधळे असल्यानें लोकांना तुमची दया येईल!' त्यावर कामण्णा म्हणतो, 'लोकांना दया यायला आंधळेपणाची काय जरूर? नुस्ता तुझा नवरा या नात्यानें जो पुरुष उभा राहील, त्याची साऱ्या जगाला दया येईल!' शेवटीं इंदू जबरदस्तीनें कामण्णाकडून लग्नाचें वचन घेते आणि तोहि 'स्वर्गस्थ देवांची नि स्वर्गाखेरीज दुसरीकडे खितपत पडलेल्या पितरांची' शपथ घेऊन तिला लग्नाचें वचन देतो.

पुढें धनेश्वराच्या खोलींत चोरट्यानें शिरून त्याचे दस्तऐवज जेव्हां कामण्णा धुंडाळू लागतो, तेव्हां तो डोळस असल्याचें बिंदूला आढळून येतें. एवढेंच नव्हे, तर बिंदू जेव्हां मागून जाऊन त्याला एकदम पकडते, तेव्हां त्याला मराठीहि चांगलें बोलतां येतें हें तिला कळून येतें. त्याबरोबर 'माझ्याशीं लग्न करण्याचें वचन द्याल तर धनेश्वरांना मी हें सांगणार नाहीं अशी इंदूप्रमाणें ती त्याला धमकी देते. तेव्हां कामण्णा इतका गांगरून जातो कीं आपण गिरणीच्या धुराड्यांत पडतों आहोंत, का आगगाडीच्या रुळाखालीं चेंगरतों आहोंत हेंच त्याला कळत नाहीं.

**कामण्णा :** बिंदूताई, तुम्ही कधीं आरशांत डोकावलें आहे का?

**बिंदू :** इंदूला लग्नाचें वचन दिलें, तेव्हां तुमचे डोळे फुटले होते का? इंदूताई-पेक्षां मी रूपानें का वाईट आहे?

**कामण्णा :** तुम्हां दोघांत सरस-निरस कसें ठरवितां येणार? तुम्ही दोघी टवकारून पाहूं लागल्यावर तरुणांची तर गोष्टच नको, पण निर्जीव आरशांचीं भिंगें तडकतील आणि घड्याळाचे कांटे सुद्धां जागच्या जागीं थबकतील. पण मी इंदूला

लग्नाचें वचन दिलें आहे ना !

बिंदू : तें वचन मोडा. नाहींतर दोघींशीं लग्न करा.

कामण्णा : छान. बाकी दोघींशीं लग्न केल्यावर तुमच्या काळ्या रंगाच्या आधारावर जन्माचें गुजराण करायला हरकत नाहीं. पांढरीं पातळं नेसवून उन्हातान्हांतून तुम्हांला घाम येईपर्यंत फिरवून आणावें आणि तीं पातळें खुशाल काळ्या चंद्रकळा म्हणून विकीत सुटावें !

शेवटीं देवाब्राह्मणाची शपथ घेऊन कामण्णा बिंदूला लग्नाचें वचन देतो. यावेळीं कामण्णाला आपल्या लग्नकुंडलींतले सगळे शुभग्रह प्लेगामुळें बाहेरगांवीं राहायला गेले आहेत कीं काय, असा संशय आल्यावांचून रहात नाहीं.

दोघां बहिणींना लग्नाचीं निरनिराळीं वचनें दिल्यानंतर पुढें दोघींच्या कचाट्यांत एकाच वेळीं जेव्हां कामण्णा सांपडतो, तेव्हां या नाटकांतील सर्वोत्कृष्ट विनोदी घटना निर्माण होते. कामण्णाला मराठी येतें, हें दोघींनाहि माहिती असतें, पण तो आंधळा आहे असें इंदूला वाटतें, तर तो डोळस आहे हें बिंदूला ठाऊक असतें. तेव्हां एकाच वेळीं एकीशीं डोळे उघडून बोलायचें आणि दुसरीशीं बोलतांना आंधळेपणाची बतावणी करायची, अशा भलत्याच संकटांत सांपडलेला कामण्णा जेव्हां त्यांतूनहि स्वतःला सहीसलामत निभावून नेण्याचा प्रयत्न करतो, तेव्हां हास्यरसाला महापूर येतो.

दोन्ही बाजूंनीं जेव्हां त्या दोघी कामण्णावर झडप घालतात, तेव्हां जी. आय्. पी. आणि बी. बी. यांच्या दुहेरी धूमधडाक्यांत सांपडलेल्या मुंबई शहरासारखी कामण्णाची स्थिति होते. त्यांना बघून विधात्यानें आधीं शूर्पणखा, हिडिंबा, कुब्जा, हीं विद्रूप वळणें गिरवून त्या कसलेल्या हातांनीं परीक्षेसाठीं या दोन पुस्त्या तर काढल्या नाहींत अशी शंका त्याच्या मनांत येते. आईबाप आणि कुणीतरी दोन तरुण अशा चौघांच्या मुळावर या दोन पोरी जन्माला आल्या असाव्यात, अशी मात्र त्याची खात्री होते.

त्या दोघी जेव्हां निकराला येऊन त्याची ओढाताण करूं लागतात, तेव्हां कामण्णा अगदीं रडकुंडीला येऊन त्यांना म्हणतो, ' बायांनो, माझी अशी दैना करायला मी एकीचाहि नवरा झालों नाहीं अजून. लग्न होईतोंपर्यंत कुंवारपणाला न शोभण्याजोगें मी कुणाला कांहीं करूं देणार नाहीं ! '

हा प्रवेश म्हणजे ' भावबंधन ' नाटकांतल्या विनोदाचा कळस होय. पुढें कामण्णाहि कोसळतो आणि नाटकांतला विनोदहि ढांसळतो. कामण्णा हा डोळस असून त्याला मराठी चांगलें येतें, हें रहस्य लतिकेला इंदू–बिंदूकडून ज्या क्षणीं समजतें, त्या क्षणीं आपल्या तोंडावरचा ' कामण्णा 'चा हास्योत्पादक मुखवटा खालीं उतरून, महेश्वर हें या नाटकांतलें एक सामान्य पात्र बनतें. घनस्यामची दगलबाजी त्याला समजून येते. लतिकेला फसवल्याबद्दल त्याला पश्चात्ताप होतो. आणि अखेर ' पेशवाईत '

त्रिंबकजी डेंगळ्यानेंसुद्धां जितका घोटाळा माजवला नसेल, तितका आपण माजवला याबद्दल तो घनेश्वरची क्षमा मागतो.

घनश्याम धुंडिराजच्या जेव्हां पाया पडतो तेव्हां ' अरेरे, आमचा विठ्ठल पार पडला ' असे जे उद्‌गार महेश्वर काढतो, ते खुद्द त्याच्या स्वतःच्या विनोदी भूमिकेलाहि लागू पडण्यासारखे आहेत.

गडकऱ्यांच्या या नाटकावर ' त्राटिका ' नाटकाची दाट छाया पडली आहे. त्राटिका आणि लतिका किंवा प्रतापराव आणि घनश्याम ह्यांच्या स्वभावांची तुलना करून पाहण्यासारखी आहे. पण तो कांहीं येथें आमचा विषय नाहीं. विनोदापुरतेंच बोलायचें झाल्यास ' त्राटिका ' नाटकांतल्या धनाजीरावाच्या घरांत त्याच्या मुलीची प्रेमयाचना करण्यास रंभाजी हा ' विद्याधरशास्त्री पुराणिक 'चें सोंग घेऊन शिरतो, तर राणोजी हा ' बूमय्या रायलु ' ह्या मद्राशी गवयाचें सोंग घेऊन रहातो. ही विनोदी घटना गडकऱ्यांनीं ' भावबंधन ' मध्यें सही सही उचललेली आहे.

राणोजीचें हें मद्रासी बोलणें पहा. ' आमी तेना मणाले ते वी–वीणाचा कुंटी असा पिळावा. तो तेनी आमची कान पिळले. आमाला शिव्या दिले. कूप मारले. अय्ययो, सारा अंगांत दुःक भरले. ' आतां गडकऱ्यांच्या प्रभाकराचें हें कानडी बोलणें वाचा. ' हे पत्र एक लोक देतो. मोरेश्वर गृहस्थ आगगाडीचे डबींत भेटलो. सर्व बोल्तो हे हकीगत. आम्ही कळलो. तर पत्र घेतला. ' ह्या साम्यावर अधिक भाष्य करण्याची आवश्यकता नाहीं.

कामण्णानंतर ह्या नाटकांतला पुष्कळसा कोटीबाज विनोद प्रभाकराच्या तोंडीं आढळतो. त्याचा आणि लतिकेचा जो अनेकदां संघर्ष होतो, त्यामध्यें अशा कोटिक्रमाची खैरात झालेली आहे. ' नवयौवनाची तरल लीला नाजुक विनोदावांचून वर्णन करतां येणार नाहीं ' अशी प्रभाकरची मुळीं विचारसरणीच आहे. ' आतां तोंडाला तोंड दिलेंस तरी मुक्याचें व्रत सोडणार नाहीं ' किंवा ' तुझ्याजवळ बोलण्याची मुळीं सोयच नाहीं—अन् तुमच्याजवळ सोयीचें मुळीं बोलणेंच नाहीं ' असले खटके त्यांच्या बोलाचालींत जागोजाग आढळतात.

तथापि, नवयौवनाच्या लीलांचें रसभरित वर्णन करतांना प्रभाकराला नाजुक विनोदाचें पथ्य नेहेमींच कांहीं सांभाळतां आलेलें नाहीं. ' यौवनाच्या नव्या देणग्या त्यांचें मोल कळल्यामुळें दृष्टीआड करण्याची प्रौढ सावधगिरी या वयांत आलेली नसते ' हा विनोद कसा तरी निभतो. पण ' एका मूर्तीला स्पर्श न केल्यामुळें मत्सरानें कंप सुटत आहे, तर दुसरीकडे स्पर्शाच्या कल्पनेमुळें–कीं लतिके, अस्पर्श्य वृत्तीच्या कल्पनेमुळें...? ' येथपर्यंत जेव्हां प्रभाकराच्या विनोदाची मजल जाते, तेव्हां मनोहराच्या मुखानें प्रेक्षकच त्याला बजावतात, ' सरस्वतीच्या तरुण उपासका, तुझ्या देवीच्या मंदिरांत हा भ्रष्टाकार होत आहे. '

धुंडिराज हें कांहीं विनोदी पात्र नव्हे. पण त्याच्या बोलण्याच्या गबाळ्या पद्धतींत मात्र वैशिष्ट्यपूर्ण मौज आहे. अशा तऱ्हेनें बोलणारे म्हातारे लोक समाजांत पुष्कळ आढळतात. ' या बोलण्यांत म्हणजे गंमत आहे, मौज आहे, अन् मजाहि आहे ' किंवा ' फार बोलणें अन् तेंहि म्हटलें म्हणजे उगाच वाढवून बोलणें हे उचित नाहीं, रास्त नाहीं अन् योग्य नाहीं--शिवाय तें ठीकहि नाहीं ' ही धुंडिराजची बोलण्याची लकब किंवा अण्णा किर्लोस्करांच्या ' शाकुंतलां ' तील गंमत सांगत असतांना ' शाकुंतला ' पेक्षांहि अण्णांच्या ' ह्या एकेक दंडांचें ' त्यांना वाटणारें कौतुक ह्यामुळें फारच हृदयंगम विनोद निर्माण होतो ह्यांत कांहीं शंका नाहीं.

' झालें, त्याला बघितलें विचारून नुसतें. अनमानधपक्यानें–मनांत म्हटलें, बघू तर खरें–हो, गंमतच करायची घटकाभर म्हटलें, का हो बुवा, अमुक अमुक ते आपणच का ? झालें बुवा, विचारून तर गेलों. त्यानें म्हटलें होय. म्हणजे काय, सर्दच झालों ना एकदम. खरोखरीच, तो म्हणजे तोच. झटक्यास ओळख पटली ना. मग हडसून खडसून सांगितलें–हो, त्यानेंच कबूल केलें. मग काय हो ! म्हटलें, गोमाजी तिमाजी ते आपणच का ? अमक्याचे तुम्ही अमुक. त्याला मुळीं होयच म्हणणें आलें ना. बरें, गंमत ही त्यांत–तुम्ही म्हणाल नांव नेमकें सांगितलें म्हणून आमचें त्यांचें संघष्ण विशेष असेल–नाहीं. तसें म्हटलें तर परिचय नाहीं. ओळख नाहीं. जानपछान नाहीं. न लेवा न देवा. "

मानवी स्वभावाचें गडकऱ्यांचें अवलोकन किती मार्मिक आणि त्यांची विनोदबुद्धि किती सूक्ष्म होती. त्याचें ह्याच्यापेक्षां अधिक परिणामकारक उदाहरण देतां येईल असें वाटत नाहीं.

' राजसंन्यास ' हें गडकऱ्यांचें अपूर्ण ऐतिहासिक नाटक. गडकऱ्यांच्या नाट्यप्रतिभेचें एक विलक्षण ओजस्वी दर्शन अपूर्ण अवस्थेमध्यें असतांनाहि ह्या नाटकांत होतें. संभाजी महाराजांच्या भागावर आधारलेल्या ह्या नाटकांत विनोदाला कोठून वाव असणार ? पण अशाहि वातावरणांत कथानकाशीं सुसंबद्ध असलेला एक वेगळ्याच ढंगाचा विनोद निर्माण करण्याचा गडकऱ्यांनीं यशस्वी प्रयत्न केलेला आहे. अर्थात् ह्या नाटकामधला जो एकच विनोदी प्रवेश उपलब्ध आहे, त्याच्याच आधारानें हें विधान आम्हीं करीत आहोंत.

शिवाजी महाराजांसंबंधीं त्या काळीं—अन् अद्यापहि विरोधकांचे जे अपसमज आहेत, आणि त्यांचें महात्म्य हिणकस ठरवण्याचा ह्या मंडळीकडून जो पद्धतशीर प्रचार चालू असतो, त्याचें खरपूस विडंबन ह्या नाटकांतल्या विनोदांत गडकऱ्यांनीं केलेलें आहे. त्याचप्रमाणें या देशांतल्या फडतूस लेखकांनीं शालेय इतिहासाच्या पुस्तकांत

शिवाजी महाराजांचें जें मामुली वर्णन करून बालकांचा आणि अज्ञ जनांचा महाराजांबद्दल गैरसमज करण्याचा जो प्रयत्न केलेला आहे, त्याचीहि गडकऱ्यांनीं खूपच टर उडवलेली आहे.

जिवाजी कलमदाने हा कलुशा कब्जीच्या पदरींचा एक महा इब्लिस आणि बदमाष कारकून होता. मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात, ह्या म्हणीप्रमाणें अगदीं बाळपणापासून त्याच्या अंगीं हे ' गुण ' प्रकट होऊं लागले होते. वडील वारल्यावर त्याच्या मातोश्रीनें जेव्हां मंगळसूत्र तोडून टाकलें तेव्हां त्याच्यांतला टीचभर दोरा त्यानें वावडीसाठीं बाजूला काढून ठेवला.

कलुशा कबजी अत्तरविक्या म्हणून जेव्हां महाराष्ट्रांत प्रथम फेरेकरी म्हणून आला, तेव्हां त्याच्या पेटींतली एक अत्तराची कुपी ' खरेदीवांचून खपली ' ती जिवाजीच्या घरांत. सईबाई राणीसाहेब जेव्हां वारल्या तेव्हां त्यांच्या अंत्यसंस्कारासाठीं सवाखंडी चंदनाचा हुकूम झाला. पण ' सवा शेर चंदनाच्या उटीनें सव्वा खंडी बाभळीचें चैत्री हळदीकुंकू उरकून ' या बहाद्दरानें पंधरा मोहरांची बचत केली. ज्या कलमदान्यांच्या घराण्यांत ह्या स्वारीचा जन्म झाला, तें घराणें म्हणजे पिढीजाद कारकुनाचें. ' एकटांकी, एकचाकी अन् एकराखी ' हें ह्या घराण्याचें ब्रीद. (म्हणजे प्रत्येक) कलमदान्याला किमान पक्षी एकेक ' राख ' ( पक्षीं : रखेली ) ही असायचीच.

' लेखणी ' ही या घराण्याची आराध्य देवता. म्हणून तिला ते ' कलमेश्वरी ' म्हणतात. ह्या कलमेश्वरीचें महात्म्य जिवाजीच्याच शब्दांत ऐकायला हवें. " वारुळांतल्या दोन जिभांची पिवळी नागीण चावली तर एकाच पिढीचा घात होतो. पण कारकुनी कानावरची ही दोन जिभांची नागीण डसली तर सात पिढ्यांचा सत्यानाश करते. ह्या लेखणींतून निघालेलीं लपेटदार अक्षरें, एक वेळ वडारणीचे केंस उकलतां येतील, पण कोणाला उकलायचीं नाहींत. जादूगाराच्या नळकांड्याप्रमाणें या टीचभर कलमामध्यें काय काय इल्मा खेंचून भरल्या आहेत म्हणतां ! तरवारबहाद्दरांचा तांडा अंगावर चालून येत असला तर घोडदौडीच्या दणदणाटानें इशारत मिळून दडी मारायला तरी अवसर मिळतो. पण कलमबहाद्दर एकाद्याच्या घरादारावरून आपले कागदी घोडे नाचवायाला लागला तर टापांची चाहूल देखील लागणार नाहीं. "

' एकच प्याल्या ' मध्यें दारूचें जें विश्वदर्शन गडकऱ्यांनीं घडवलेलें आहे, त्याच चालीवर ' शाई ' च्या अनन्वित पराक्रमाचें ह्या नाटकांतलें त्याचें हें ' स्तोत्र ' वाचा :

" अष्टौप्रहर कानावर बसून कानीं पडेल तें ही नागीण ऐकून घेते. आणि मग प्रसंग पडतांच शाईच्या विषानें तें ओकायला लागते. एकदां बहकली कीं बेसुमार. वारा प्यालेलें वांसरूं आवरतां येईल, पण शाई प्यालेलें कलम कळिकाळाला आवरायचें नाहीं. ही शाई म्हणजे साक्षात् कालकूट विषाची कन्या आहे. अन्नाचा कोळसा करून शिरें बनवायचें आणि तेजाच्या काळोखाचें काजळ त्यांत मिसळावयाचें, अशी

शाईची अनन्वित पैदास आहे. अन् तिखट पात्याच्या धारेपोटीं लेखणीचा जन्म. शाईचा सोमरस आणि लेखणीची समिधा करून एकाग्राची आहुती घेण्यासाठीं कारकुनानें एक ओळ खरडली कीं ती वेदवाक्य. ललाटीचें ब्रह्मलिखित टळेल, पण कारकुनी लिखितें अढळ. ''

असल्या ह्या इरसाल वल्लीला पहिल्वान देहू भेटतो. ' शालेय इतिहासाचीं पुस्तकें ' वाचून आजकालच्या विद्यार्थ्यांची शिवाजी महाराजांबद्दल सामान्यपणें जी कल्पना झालेली असते तशीच, देहूची कल्पना होती. ती अशी कीं, ' शिवाजी सोळा वर्षांचा झाला नाहीं तोंच त्यानें आडदांड लोकांची संगत धरून मुलखांत पुंडाई आरंभली. आणि ह्याच पुंडाईच्या भांडवलावर शिवाजी राजा झाला. ' म्हणून शिवाजीच्या पावलावर पाऊल टाकून ' राजा ' होण्याची देहूची महत्त्वाकांक्षा असते.

त्यासाठीं त्यांनीं जो कार्यक्रम आंखलेला असतो त्याचें वर्णन त्यांच्याच शब्दांत सांगितलेलें बरें.

" आडदांड लोकांची संगत करून ठेवली आहे. पुंडाई चालू आहेच. हमरस्त्यांत मारामारीशिवाय पाऊल टाकीत नाहीं पुढें. आतां चार गड घ्यायचे. कुठें तरी कोणाच्या अटकेंत गवसायचें. बुरडी पेटाऱ्यांतून पसार व्हायचें. नांवाची नाणीं ठोकायचीं अन् सोन्याचा पुतळा लुटवायचा. धिमे धिमे मी थेट थोरल्या राजांची छबी सुद्धां वठवून देतों बघा. रोज सकाळीं ओढओढून नाकाला गरुडाच्या चोंचीसारखी अणकुची आणतों. राजासारखी केंसाळ ऐट साधण्यासाठीं डोकीभर संजाब देखील ठेवून दिला आहे. जिरेटोपाला जोड देण्यासाठीं वडलांच्या चक्री पागोट्यांतून कोकी काढायचें तेवढें बाकी उरलेलें आहे. वाघनखें नाहींत म्हणून मी तूर्तास मांजरीच्या नख्यांवरून भागवून नेत आहें. आणि मरतांना गुडघा मोडून घ्यायला सुद्धां मी एका पायावर तयार आहें. "

आतां शिवाजी महाराजांबद्दल जिवाजी कलमदाने ह्याच्या तोंडून जीं मुक्ताफळें बाहेर पडलीं तीं पहा. म्हणजे त्याच्या मुखांतून कोण बोलतें आहे, त्याची यथार्थ कल्पना येईल.

" अरे, शिवाजी म्हणजे मूठदाबल्या हातीं साडेतीन हात उंचीचा. नाकींडोळीं नीटस, काळगेल्या रंगाचा, राकटलेल्या अंगाचा, हरहुन्नरी ढंगाचा, लिहिणेंपुसणें वेतास बात, गुडघ्यांत अंमळ अधू, असा एक इसम होऊन गेला. त्याची काय मातब्बरी सांगतोस एवढी ? केलें काय रे शिवाजीनें असें ? मोगलाईत हुकमती केसांची टोळी दाढीखालीं लोंबत होती ती मराठेशाहींत कवटीवर चढली एवढाच लाभ ना ? "

नुसत्या अंगमस्तीनें कोणी शिवाजी होऊं शकत नाहीं. छत्रपति व्हायला त्याच्या मागें कलमाचें बळ असावें लागतें. रामदासांनीं दासबोध ग्रंथ लिहिला नसता, तर शिवबाचा एवढा ग्रंथ कदाकाळीं होताच ना. शिवाजीच्या नांवांत रामदासाइतका राम

होता काय ? तेव्हां देहूला जर शिवाजी होण्याची इच्छा असेल तर त्यानें आपल्या-सारखा एकादा ' रामदास ' गांठला पाहिजे असा सल्ला जिवाजीनें त्याला दिला.

देहूनें त्याला विचारलें कीं " तुमची आणि रामदासाची कशी तुलना होऊं शकेल ? तुम्ही कुटुंबवत्सल अन् रामदास बालब्रह्मचारी ! "

त्यावर जिवाजी त्याला सांगतो कीं, ' मी देखील बालपणीं म्हणजे सुमारें सात वर्षेपर्यंत बालब्रह्मचारीच होतो. पुढें मात्र शेजारीपाजारी—'

अखेर, आपल्या हातांतील सोन्याचीं सलकडीं जिवाजीच्या ' झोळींत ' टाकून देहू त्याचा शिष्य होतो. आणि त्याच्या उद्धारासाठीं समर्थांच्या ' दासबोधा ' प्रमाणें ' कल्मबोध ' लिहिण्याचें जिवाजी मान्य करतो. या एका प्रवेशांत कोट्या आणि विनोद ह्यांची गडकऱ्यांनीं वारेमाप खैरात केली आहे. ' चांदणी ' नांवाची देहूची एक चटकदार मैत्रीण होती. तिला लंवे करण्याचा जिवाजीचा बेत होता. पण तो मौजेचा भाग नाटक अपूर्ण राहिल्यामुळें अलिखित राहिला ही दुःखाची गोष्ट आहे.

गडकऱ्यांच्या निबंधात्मक आणि नाटकांतील विनोदाचें येथवर विश्लेषण झालें. आतां फक्त त्यांच्या कविता राहिल्या. त्यांच्या ' वाग्वैजयंती ' मध्यें एकंदर दीडशें कवितांचा संग्रह करण्यांत आलेला आहे. त्यापैकीं ' काय करावें ', ' सांग कसे बसलों ', ' चिंतातुर जन्तु ' ' हुकमेहुकूम, ' ' विहिणीचा कलकलाट ' आणि ' रांगोळी घातलेली पाहून ' एवढ्या सहाच कविता विनोदी आहेत. शेवटीं गडकऱ्यांनीं स्वतःचा ' मृत्युलेख ' एक एप्रिलच्या दिवशीं लिहून आपला सर्व काव्यप्रपंच हा ' एप्रिल फूल ' चा उपद्व्याप असें सुचवितांना असें म्हटलें आहे कीं, ' मी कोण आहे हें मला स्वतःला उमगत नाहीं, आप्तांना कळलें नाहीं, मित्रांना समजलें नाहीं, मग भविष्य-काळाला कसें कळणार ? जाऊं द्या झालें. कोठें तरी आणि कधींतरी होऊन गेलेला मी एक कोणीतरी आहें, एवढा माझा मृत्युलेख लिहिला गेला तरी त्यांत मला समा-धान आहे. '

' काय करावें ' या कवितेंत जगामध्यें प्रत्येक गोष्टीला उपाय असतात. तोफ अंगा-वर सुटली तरी चटकन् बाजूला होतां येतें, म्हैस समोरून आली तरी समोर छत्री धरून तिला पळवतां येतें, पण तोंडाळ बायको कडकडून आपल्या अंगावर धांवून आली तर काय करावें हें समजत नाहीं म्हणून कवि हतबुद्ध झालेला दिसतो. ' सांग कसें बसलों ? ' या कवितेंत प्रियतमेची प्रथम भेट झाली तेव्हां ' दूर–दूर–बसलों, ' ' चार दिवसांच्या परिचयानें जवळ–जरा–आलों ' आणि कांहीं महिने गेल्यानंतर ' सांग कसें बसलों ? ' असा प्रश्न विचारून बहारीचा शृंगारिक विनोद साधलेला आहे.

' चिंतातुर जन्तु ' मध्यें एका रिकामटेकड्या ' जन्तू ' चें विनोदी शब्दचित्र रंग-

विलें आहे. सारें जग झोपल्यानंतर आभाळांत चांदण्या कशाला ? झाडावरचीं पानें जर अखेर मातींत गळून पडतात, तर तीं पानें झाडावर उगवतात तरी कशाला ? असल्या फाल्तू चौकसपणाला काय उत्तर द्यायचें ? पुरांत इतकें पाणी फुकट वाहून चाललें आहे, काय करावें कांहीं कळत नाहीं, ह्या त्याच्या प्रश्नाला कवि उत्तर देतों कीं, ' मग त्या पुरांत तूं उडी कां नाहींस टाकीत ? ' जगांत इतकीं माणसें जन्माला घालून देव मूर्खांची भरती कशाला करतो, ह्या त्याच्या प्रश्नाला कवि जबाब देतो कीं, ' तुझीच तर त्यांत अधिक भर आहे ! ' शेवटीं, कवि परमेश्वराला विनंती करतो कीं, ' देवा, तुमचें विश्वसंसाराचें कार्य क्षणभर बाजूला ठेवून, ह्या चोंबड्या चिंतातुर जन्तूंच्या आत्म्यांना एकदां शांति द्या पाहूं ! '

' हुकमेहुकूम ' मध्यें कवीनें एका वसंत अंकासाठीं झटपट कविता कशी लिहून दिली ह्याचें वर्णन आहे. ' विहिणीचा कल्कलाट ' हें मुक्तेश्वरी काव्याचें सुंदर विडंबन आहे.

रणवाद्यांचा दणदणाट । हत्यारांचा खणखणाट
विजयघंटांचा घणघणाट । एका जागीं मिळविले
प्रलयमेघांचा गडगडाट । आणि विजांचा कडकडाट,
भूमिभंगाचा तडतडाट । भरतीस हे घातले.

तरी देखील लग्नांत विहिणी जो कल्कलाट करतात त्याची त्यांना सर येणार नाहीं, असा निष्कर्ष कवीनें अखेर काढला आहे.

' रांगोळी घातलेली पाहून ' ही कविता केशवसुतांच्या त्याच नांवाच्या कवितेचें विडंबन नसली तरी मूळ कवितेंतील ' साध्याहि विषयांत आशय कधीं मोठा किती आढळे ' या ओळीवर एक मनोरंजक कोटिक्रम गडकऱ्यांनीं या कवितेंत केलेला आहे. चैत्राच्या महिन्यांत कोठल्याहि घरापुढें रांगोळी घातलेली दिसली रे दिसली, कीं त्या घरांतल्या मंडळींशीं आपलें नातें, स्नेह किंवा ओळख असो वा नसो, तेथलें आमंत्रण आपल्याला मिळो वा न मिळो, आपण बेधडक त्या घरांत घुसून तैलंगी वृत्तीनें तेथल्या कुंकवांतले बत्तासे, खोबरें अन् हरबरे लुटून आणावे असा सल्ला कवीनें महिलावर्गाला दिलेला आहे. ' रांगोळी बघुनी इतःपर तरी होणें तरी शाहणे ' ह्या केशवसुतांनीं एका निराळ्या संदर्भानें लिहिलेल्या ओळीचा अशा तऱ्हेनें गंमतीदार विपर्यास करून त्यांतून गडकऱ्यांनीं बहारीचा विनोद काढलेला आहे.

नाटकांतल्या आणि निबंधांतल्या विनोदाच्या तुलनेनें गडकऱ्यांचा कवितेमधला विनोद अत्यंत सौम्य आणि सामान्य वाटतो. त्यावरून विनोदसिद्धीसाठीं गद्याचें माध्यम वापरण्याच्या कामीं गडकऱ्यांनीं जेवढें प्रभुत्व मिळविलें होतें, तेवढें पद्यामध्यें त्यांनीं मिळवलें नव्हतें असें दिसतें. काव्यांतील विनोदाचा विडंबन हाच सर्वांत मोठा राजमार्ग

असतो. त्या मार्गानें गडकऱ्यांना जातां आलें नसतें असें कोणीहि म्हणूं शकणार नाहीं. पण तिकडे त्यांनीं दुर्लक्षच केलें.

विनोदाची प्रेरणा आणि तंत्र गडकऱ्यांनीं कोल्हटकरांपासून जरी घेतलें असलं, आणि सामाजिक आशयाच्या दृष्टीनें कोल्हटकरांचा कोटिबाज विनोद गडकऱ्यांच्यापेक्षां जरी जास्त पुरोगामी असला, तरी विविधतेच्या, विस्ताराच्या आणि परिणामांच्या दृष्टीनें गडकऱ्यांनीं कोल्हटकरांच्या पुढें फार मोठी मजल मारली यांत कांहीं शंका नाहीं. गडकऱ्यांचा निबंधात्मक विनोद त्या मानानें त्रोटक वाटतो. पण दोन अपूर्ण आणि चार पूर्ण नाटकांमधून गडकऱ्यांनीं विनोदाची आणि कोट्यांची एवढी प्रचंड खैरात उधळली आहे, कीं कोल्हटकरांच्या साऱ्या नाटकांतला विनोद एकत्र केला तरी तो त्याच्या पासंगालाहि पुरणार नाहीं. त्यामुळें महाराष्ट्राच्या जीवनांत विनोदाला जास्तींत जास्त लोकप्रिय आणि सुप्रतिष्ठित करण्याच्या कामीं गुरूला जें यश मिळवितां आलें नाहीं तें शिष्यानें मिळवून गुरूवर मात केली यांत संशय नाहीं.

एकादा शब्द किंवा विषय निवडला कीं त्याच्यावर जास्तींत जास्त कोट्या किंवा विनोद किती करतां येईल तो करून पाहण्याचा गडकऱ्यांना विलक्षण हव्यास होता. त्या शब्दावर किंवा विषयावर विनोद करावयाला दुसऱ्या विनोदकाराला कांहींही मालमसाला मुळीं शिल्लकच ठेवायचा नाहीं, असा त्यांनीं जणुं कांहीं विडाच उचलला होता.

उदाहरणार्थ, 'तोंड' हा शब्द घ्या. 'तोंडा' वर त्यांनीं ठिकठिकाणीं किती तोंडसुख घेतलें आहे तें पाहण्यासारखें आहे.

(अ) **विद्याधर :** गोकुळ, स्त्रियांच्या सौंदर्यावर असें तोंड टाकणें चांगलें नाहीं.

**गोकुळ :** कां बरें, तिच्या गालावर तोंडसुख घेण्याचा माझा अधिकार नाहीं काय ?

(ब) **गोकुळ :** जयंतानीं मला विचारलें कीं हें बोलणें चोरून ऐकून तुझ्या बायकोनें तुझ्यावर तोंड टाकलें तर काय करशील ? मीहि जोरानें म्हणालों, कीं तिनें तोंड टाकलें तर मी अस्सें इकडचें तोंड तिकडे करून टाकीन.

( क ) **गोकुळ :** पाठीमागें कोण काय बोलतें ह्याची मी मुळींच पर्वा करीत नाहीं.

**मथुरा :** : ( स्वगत ) आणि तोंडावर बोलूं लागलें तर तोंड देत नाहीं.

( ड ) **लतिका :** मग तोंड दुखेपर्यंत माझ्या तोंडाची तारीफ करीत होतां ती कां ?

**प्रभाकर :** तोंडापुरतें बोलायला मला काय हरकत आहे ? लतिके, तूं सुंदर असशील, पण तुझें तोंड सुद्धां पाहूं नये.

(ई) लतिका : खबरदार, मलतें सलतें बडबडाल तर. तोंड सुद्धां बघूं नये तुमचें.

प्रभाकर : काय त्रास आहे पहा. जसें कांहीं हिला तोंड दाखविलें नाहीं तर मग जगांत तोंड दाखवायला जागाच उरणार नाहीं.

लतिका : आतां जर तोंड दाखविलेंत, तर तोंड पहाणार नाहीं तुमचें !

अगदीं तोंड दुखेपर्यंत गडकऱ्यांनीं तोंडावर कोट्या केलेल्या आहेत. असेच आणखी अनेक नमुने दाखवतां येतील. दातांचा उल्लेख आला कीं 'दंतकथा' आलीच पाहिजे. कपोलाचा संबंध आला कीं, 'कपोलकल्पित कादंबरी' रचलीच पाहिजे, हे गडकऱ्यांच्या कोट्यांचे सर्व आडाखे अगदीं ठरून गेल्यासारखे झाले आहेत. त्याचप्रमाणें 'दिव्याचा धूर अन् धुराचे दिवे', 'सुखाचा जन्म आणि जन्माचें सुख' किंवा 'औषधासाठीं दारू नि दारूसाठीं औषध' असा शब्दांच्या आलटापालटीदर कोटिक्रम करणें हेंही त्यांच्या विनोदाचें एक ठराविक वैशिष्ट्य आहे.

विषयाच्या बाबतींत गडकऱ्यांची हीच पद्धती आहे. 'विसराळूपणा' हा विषय घेतला, तर त्यामधून जेवढा कांहीं विनोद खोदून काढतां येईल, तेवढा काढायला ते कधीं विसरणार नाहींत. 'एकच प्याला' नाटकांत तर 'दारू' वर करतां येण्यासारखा जेवढा कांहीं विनोद आहे, तो सारा त्यांनीं संपवून टाकला आहे. इतका कीं, इतरांना त्या बाबतींत एक थेंबहि त्यांनीं शिल्लक ठेवलेला नाहीं. काळेपणा आणि कुरूपपणा ह्यांच्यावर त्यांनीं विनोदाचा कहर केला आहे. सारांश एकादा कोशकार ज्याप्रमाणें शब्दाचे किंवा विषयाचे यच्चयावत् पर्याय सांगून टाकतो, त्याप्रमाणें विनोद विषयाचे जेवढे म्हणून पर्याय संभवतील तेवढे सांगून गडकरी मोकळे होतात. त्यामुळें त्यांच्या विनोदांत पुष्कळदां अतिरेक आणि प्रमाणबाह्यता हे दोष आढळून येतात.

तथापि, हे दोष मान्य करूनहि गडकऱ्यांचा विनोद इतका विविध, अद्‌भुत आणि परिणामकारक आहे, कीं त्या क्षेत्रांत त्यांनीं केलेल्या एकेका विक्रमानें पाश्चात्त्य वाङ्मयांतील विनोदकारांवरहि मात केलेली आहे. मानवी स्वभावांतील आणि समाजांतील दोषांवर अन् विसंगतींवर त्यांनीं जागोजाग उपहासगर्भ विनोद केला आहे, तो तर अविस्मरणीयच आहे. पण गोकुळ, नूपुर, सुदाम, कंकण, तळीराम, कामण्णा आणि देहू हे मानवी स्वभावाचे जे विविध आणि वैशिष्ट्यपूर्ण विनोदी नमुने त्यांनीं निर्माण करून ठेवले आहेत, ते महाराष्ट्रभाषा असेपर्यंत मराठी जनतेच्या हंसून हंसून मुरकुंड्या वळवतील यांत काय शंका ?

आतां आपण गडकऱ्यांच्या काव्याकडे वळूं.

गडकऱ्यांनीं आपल्या वाङ्मयीन जीवनाला काव्यलेखनानें प्रारंभ केला. 'मनो-

रंजन ' हें त्यावेळचें महाराष्ट्रांतलें एकमेव लोकप्रिय मासिक होतें. ह्या मासिकांत ' गोविंदाग्रज ' ह्या नांवानें त्यांच्या नाविन्यपूर्ण कविता जेव्हां एकामागून एक प्रसिद्ध होऊं लागल्या, तेव्हां साऱ्या महाराष्ट्राचें लक्ष त्यांच्याकडे एकदम वेधलें गेलें. आणि ' राजहंस माझा निजला ' हें आंतड्यांना पीळ पाडणारें त्यांचें शोकगीत जेव्हां ' मनो-रंजनां 'त प्रथम छापून आलें, तेव्हां काव्यक्षेत्रांतलें अग्रस्थान मराठी रसिकांनीं एक-मतानें त्यांना देऊन टाकलें. कोणाहि कवीच्या एका कवितेचा एवढा बोलबाला झालेला माझ्या ऐकिवांत नाहीं. महाराष्ट्रांत घरोघर या कवितेचीं अक्षरशः पारायणें झालीं.

' राजहंसा ' नंतर त्यांच्या ' मुरली ' लाहि तेवढीच लोकप्रियता लाभली. अकरा सालापासून तों पंधरा सालापर्यंत जवळ जवळ पांच वर्षें ' गोविंदाग्रजां ' च्या काव्य-प्रतिभेला विलक्षण बहर आला. नाट्यलेखनाकडे जसे ते वळले आणि नाटककार म्हणून त्यांची जशी कीर्ति होऊं लागली, तसा त्यांच्या काव्यनिर्मितीला खळ पडला. अर्थात् त्यांचीं नाटकें म्हणजे जवळ जवळ गद्यकाव्येंच होतीं. माझ्या मतें तर त्यांचें गद्यकाव्य जेवढें तेजस्वी आणि प्रभावी आहे, तेवढें त्यांचें पद्य–काव्य नाहीं.

गडकऱ्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या समग्र काव्यांचा संग्रह ' वाग्वैजयन्ती ' या नांवानें प्रसिद्ध झाला. ह्या संग्रहांत त्यांच्या अदमासें दीडशें कविता समाविष्ट केलेल्या आहेत. या संग्रहाला नरसिंह चिंतामण केळकर ह्यांनीं प्रस्तावना लिहिलेली असून ' गडकरी यांचें कविचरित्र एखाद्या धूमकेतूप्रमाणें अकल्पित व तेजस्वी होऊन गेलें. पण धूमकेतूच्या तेजापेक्षां गडकऱ्यांची काव्यकीर्ति त्यांच्या पश्चात् अधिक काळ टिकेल ' असा गडकऱ्यांच्या काव्याचा त्यांनीं तिच्यांत मुक्तकंठानें गौरव केला आहे. चव्वेचाळीस सालीं गडकऱ्यांच्या मृत्यूला पंचवीस वर्षें पूर्ण झालीं. त्या प्रसंगीं माझ्या ' शिक्षक ' मासिकाचा मी जो खास ' गडकरी अंक ' काढला त्यांत गडकऱ्यांच्या अप्रका-शित आणि अपूर्ण कविता मी त्यांच्या कागदपत्रांमधून संशोधून प्रसिद्ध केल्या. ह्या-व्यतिरिक्त आणखी त्यांच्या कांहीं अप्रकाशित कविता असतील असें मला वाटत नाहीं.

विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठीं ' वाग्वैजयंती ' मधल्या कांहीं निवडक कविता एकत्रित करून ' राजहंस ' हा संग्रह तयार करण्यांत आला आहे. कवितांची विषयवार मांडणी करण्यांत आली आहे, हें ह्या संग्रहाचें वैशिष्ट्य आहे. गडकऱ्यांच्या सर्वच उत्तमोत्तम कविता या संग्रहांत आल्या असल्यानें त्यांच्या काव्यप्रतिभेच्या विविध पैलूंची ओळख अगदीं थोडया अवकाशांत या संग्रहानें होण्यासारखी आहे.

गडकऱ्यांच्या कवितांमध्यें प्रेमकाव्यांची आणि भावकाव्यांची संख्या अधिक आहे हें त्यांचा समग्र काव्यसंग्रह नुसता वर वर चाळला तरी लक्षांत येण्यासारखें आहे. म्हणून त्यांना ' प्रेमाचे शाहीर ' असें म्हणतात. पण त्यांचीं हीं बहुतेक प्रेमकाव्यें भावनोत्कट असलीं तरी गेय नाहींत. कित्येक तात्त्विकच आहेत. म्हणून त्यांना ' प्रेम-

गीतें ' म्हणतां येणार नाहीं. मराठी भाषेंतलें लावणी वाङ्मय म्हणजे प्रेमगीतांचें जिवंत भांडारच आहे. जगांतल्या कोणत्याहि भाषेंत अशीं उन्मादक प्रेमगीतें नसतील. गडकऱ्यांनीं लावण्यांचा फार रसिकतेनें अभ्यास केला होता. असें असूनहि भास्करराव तांबे ह्यांच्याप्रमाणें ते प्रभावी प्रेमगीतें कां लिहूं शकले नाहींत ह्याचें मला आश्चर्य वाटतें.

गडकऱ्यांचीं पुष्कळशीं प्रेमकाव्यें गद्य नि कृत्रिम वाटतात. त्यांच्या बहुतेक प्रेम-काव्यांवर निराशेची छटा पडलेली दिसते. ' जुन्या कवितांची आठवण ', ' फणसाचें पान ', ' शेवटचें प्रेमगीत ' ह्या प्रेमकाव्यांत तर प्रेमकविता आत्मचरित्रात्मक असून स्वतःच्या आयुष्यांत झालेल्या प्रेमनिराशेची धूसर छाया त्यांच्यावर पडलेली आहे, असा निष्कर्ष काढण्याचा साहजिकच वाचकांना मोह होतो. गडकऱ्यांच्या काव्याचे दोन टीकाकार डॉ. हर्षे आणि प्रा. वाळिंबे ह्यांनीं ह्या गोष्टीचा अगदीं निःसंदिग्धपणें उल्लेख केलेला आहे.

प्रा. वाळिंबे ह्यांनीं तर ' गडकऱ्यांच्या अंतरंगां ' त खोल बुडी मारून त्यांचें हें प्रेमरहस्य उजेडांत आणण्याचा ' विक्रम ' केला आहे. गडकऱ्यांच्या गद्य व पद्य वाङ्-मयांत ' तारा ' आणि ' तारका ' ह्या शब्दांचा जेथें जेथें उल्लेख झालेला आहे, ते सर्व उल्लेख तपशीलवार एकत्र करून प्रा. वाळिंबे ह्यांनीं असा शोध लावला आहे कीं, गड-कऱ्यांना आयुष्यांत निराश करणाऱ्या त्यांच्या त्या प्रणयिनीचें नांव ' तारा ' हें असलें पाहिजे. बायरन किंवा शेले ह्यांच्या जीवनांत अनेक स्त्रिया आल्या आणि त्यांच्यामुळें त्यांच्या आयुष्यांत अनेक प्रक्षोभक प्रसंग निर्माण झाले. त्यांच्या चरित्रांतली ही प्रण-याची पार्श्वभूमि लक्षांत घेतल्यावांचून त्यांच्या प्रेमकाव्याचेंच नव्हे तर प्रतिभेचेंहि विश्लेक्षण होऊं शकत नाहीं. मराठी कवींच्या बाबतींत हा नियम लागू करणें धोक्याचें होईल.

तरुण वयांत गडकऱ्यांचें मन एखाद्या मुलीनें आकर्षित केलें असलें आणि तें त्यांचें प्रेम पुढें सफळ होऊं शकलें नसलें, म्हणून त्यांचें आयुष्य आणि काव्यप्रेम निराशेनें ग्रासून गेलें होतें असें समजणें वस्तुस्थितीला धरून होणार नाहीं. गड-कऱ्यांच्या ज्या आप्तांनीं प्रा. वाळिंबे ह्यांना त्यांच्या ह्या ' प्रणया ' ची माहिती पुरविली ते त्या वेळीं वयानें इतके लहान होते कीं त्यांना प्रत्यक्ष परिस्थिति माहीत असणें शक्यच नाहीं. ' जुन्या कवितांची आठवण ' ही कविता ज्या मुलीला उद्देशून गड-कऱ्यांनीं रचली आहे, त्या मुलीबद्दल अत्यंत लहान वयांत त्यांना आकर्षण वाटलें असावें असें दिसतें. दोघेहि निर्दोष मनःस्थितींत असतां त्यांनीं ' प्रेमाचा पहिला धडा गिरविला. ' तथापि, ह्या मुलीशीं त्यांचें लग्न होऊं शकलें नाहीं, त्यांचें लग्न त्यांच्या मनाविरुद्ध अगदीं तरुण वयांतच झालें. ही मुलगी अशिक्षित असल्यानें गडकऱ्यांशीं तिचें पटूं शकलें नाहीं. ' प्रेमसंन्यास ' मधील ' मनोरमे ' ची कल्पना त्यांना आपल्या पहिल्या विवाहावरून सुचली असावी.

पुढें ही त्यांची प्रथम पत्नी त्यांना सोडून गेली. त्यामुळें त्यांना फारच धक्का बसला. 'अवेळ तरिही बोल कोकिळे' या कवितेमधील 'हातीं संसाराची माती निष्प्रेमाची शेज सोबती' या उल्लेखांत त्या कालखंडांतील त्यांच्या मनःस्थितीचें चित्र प्रकट झालें आहे. गडकऱ्यांच्या प्रणयिनीचें लग्न दुसऱ्या एका माणसाशीं झालें. पण म्हणून त्यानंतर ते तिच्याबद्दल एकसारखे झुरत बसले होते, आणि तिच्या नांवाचे उल्लेख आपल्या वाङ्मयांत त्यांनीं सर्वत्र विखरून दिले आहेत, हें कांहीं खरें नव्हे. उलट ती मुलगी आणि तिचे यजमान ह्यांच्या जीवनावर 'सोन्याची सलकडी' नांवाची एक कादंबरी लिहिण्याचा त्यांनीं संकल्प केला होता.

मृत्यूपूर्वी अवघीं दोन वर्षे त्यांनीं दुसरें लग्न केलें. पण त्याच सुमाराला त्यांच्या आजाराला प्रारंभ झाला, त्यामुळें त्यांना ह्याहि लग्नापासून सुख लाभलें नाहीं. गडकऱ्यांच्या सर्व प्रेमकविता एकाच व्यक्तीला उद्देशून केल्या आहेत, असें मानणें चुकीचें आहे. कित्येक कवितांमधील 'रमणी' शुद्ध काल्पनिक आहे. भावनेच्या एका विशिष्ट अवस्थेंत कवि निरनिराळ्या कल्पनांचीं जाळीं विणतो आणि त्यांच्याशीं खेळत बसतो. ह्या अवस्थेंत त्यांच्या तोंडून निघालेल्या सर्वच उद्‌गारांचा सत्यस्थितीशीं संबंध असतोच असें नाहीं. गडकऱ्यांच्या चरित्राचे बारीकसारीक धागे त्यांच्या वाङ्मयांत ठिकठिकाणीं आढळतात. सर्वच उत्तम वाङ्मय आत्मचरित्रात्मक असतें. पण त्याचा असा मात्र अर्थ नव्हे कीं लेखक जें यच्चयावत् लिहितो त्यावरून त्याच्या चरित्रावर प्रकाश पडतो.

गडकऱ्यांच्या वाङ्मयावरून त्यांचें चरित्र अजमावण्याचा ज्या टीकाकारांनीं प्रयत्न केला आहे त्यांची फसगत झालेली आहे. प्रा. हर्षे ह्यांना गडकऱ्यांचीं कित्येक प्रेमकाव्यें वैषयिक वाटतात. ते म्हणतात, 'म्हणूनच शिष्ट लोक गोविंदाग्रजांच्या कवितेला नाकें मुरडतात. आपल्या दयितेची 'निर्वाणीची विनवणी करीत' असतां 'चुंबन दे रमणी' ह्याच्या पलीकडे ज्याच्या हेतूचीं मजल जात नाहीं, त्याच्या शुद्ध प्रेमाचा कोणाला विश्वास येणार आहे?' दयितेला चुंबन मागितल्यानें प्रेम अशुद्ध होतें असें ज्याला वाटतें, तो भलताच 'शिष्ट' असला पाहिजे. दयितेकडून 'चुंबन' नाहीं मागायचें तर काय 'तीर्थ' मागायचें?

'अरुण' कवितेवर टीका करतांना माडखोलकरांनीं असें लिहिलें आहे कीं, 'गडकरी नेहमीं उशीरा उठत. त्यांनीं 'अरुण' केव्हां पाहिला?' तेव्हां मी एका व्याख्यानांत त्यांना उलट असा प्रश्न केला कीं, 'गडकरी उशिरा उठत हें तुम्हांला काय माहीत? तुम्हांला काय त्यांचें अंथरुण गुंडाळायच्या कामावर कोणी नेमलें होतें?' दारूच्या दुष्परिणामावर गडकऱ्यांनीं 'एकच प्याला' हें नाटक लिहिलें. त्यावरून टीकाकारांनीं निष्कर्ष काय काढला तर गडकरी हे दारूबाज होते. गडकऱ्यांच्या वाङ्मयावरून त्यांचें चरित्र जाणण्याचा ज्यांनीं प्रयत्न केला त्यांनीं त्यांनीं त्यांच्या बाबतींत

अन्याय केलेला आहे. म्हणून गडकऱ्यांच्या साहित्याचें शुद्ध वाङ्मयीन दृष्टीनेंच मूल्य-मापन व्हावें हें योग्य.

' फूल ना फुलाची पाकळी ' या कवितेमध्यें तर गडकऱ्यांनीं आपल्या भावी टीकाकारांना स्पष्ट इषाराच देऊन ठेवला आहे कीं, " शहाजहानचा ' ताजमहाल ' पहा. त्याची ख्यालीखुशाली पाहूं नका. कालिदासाचें वेश्यागमन विसरून जा. त्याचें ' शाकुंतल ' लक्षांत घ्या. ' वाल्या कोळया 'चे खुनी खड्यानें भरलेले रांजण आठवूं नका. त्याचें ' रामायण ' बघा. कृष्णानें गोकुळांत केलेल्या साऱ्या मौजा विसरा. त्याची ' गीता ' ध्यानीं धरा. "

दूषण वगळुनि भूषणमात्रें
प्रभुपूजन करि काळ असें
तुम्ही आम्ही कष्टि होणें
हा कुठला मग न्याय असे ?

सर्वसामान्य माणसासारखेंच गडकऱ्यांचें जीवन होतें. तें इतरांपेक्षां अधिक वैष-यिक होतें वा व्यसनी होतें या कल्पनेला यत्किंचितहि कोणी आपल्या चित्तांत थारा देऊं नये. आपलें वर्चस्व त्यांनीं वाङ्मयाला वाहिलेलें होतें. वाङ्मयावरील त्यांची निष्ठा संपूर्णतया अव्यभिचारी होती. ही दृष्टी बाळगूनच त्यांचें सर्व वाङ्मय वाचावें.

' फुलें वेंचलीं पण, ' ' फणसाचें पान, ' ' गोफ ' आणि ' प्रेमाखातर ' हीं गड-कऱ्यांचीं चार उत्कृष्ट प्रेमकाव्यें आहेत. त्यांत प्रकट झालेली भावना अत्यंत हृदयस्पर्शी आहे, यांत शंका नाहीं. माणसानें सुंदर सुंदर फुलें जमवावींत अन् तीं जमविल्यानंतर मग एकदम त्याच्यापुढें हा प्रश्न उभा रहावा कीं, ' फुलें वेंचिलीं–पण–आतां हीं द्यावीं कोणालागीं ? ' हा प्रसंगच व्याकुळ करणारा आहे.

कांस्यावरि ह्या कोमल हृदया
टाकुनि देवा क्रूर
कुठें फुलांची धनीण माझी
दिली दवडुनी दूर ?

ह्या ओळींतली आर्तता अंतःकरणाला चटका लावणारी आहे. ' फणसाच्या पानां 'तील ' हतभागी हे जीव जगीं या स्मरणें केवळ जगतीं ' ह्या कल्पनेंत सुद्धां तीच व्यथा व्यक्त झाली आहे. ' गोफ ' या कवितेंत कल्पना आणि भावना ह्यांच्या हृदयंगम संमीलनानें अपूर्व गोडी निर्माण झालेली आहे. प्रणयाचा गोफ गुंफतांना एकमेकांच्या हृदयाचे पदर नकळत परस्परांत गुंतले जावेत अन् त्यामुळें पुन्हां तो गोफ उलगड-ण्याचें काम दुष्कर व्हावें ही कल्पनाच मुळीं अत्यंत भावरम्य आहे.

'प्रेमाखातर' ही कविता म्हणजे प्रेमाचें एक तेजस्वी स्तोत्रच आहे...गोविंदाग्रजांच्या वैशिष्टयपूर्ण शैलीचा दिमाख या कवितेंत पहावयाला मिळतो.

प्रेमासाठीं रामापाठीं सीता वनवासी
वृंदेस्तव हरि स्मशानांतला वृंदावनवासी
का ब्राह्मणपद बादशहाला राणी मस्तानी
का धर्मावर लाथ मारिली पंडितरायांनीं
व्रिजभाषेचा प्रेमवाल्मिकी प्रेतावर तरला
सांग तयाला प्रेमावांचुनि कोणी हात दिला ?

असली ऐट अन् ठसका गोविंदाग्रजांखेरीज दुसऱ्या कोणाच्या काव्यांत येऊं शकणार ?

'ओसाड आडांतील एकच फूल' किंवा 'दिव्य प्रेमाची जाति' ह्या कवितेंत गडकऱ्यांचें व्यक्तिमत्त्व पहावयाला मिळत नाहीं. 'प्रेम आणि मरण,' अन् 'गुलाबी कोर्डे' ह्या कवितेमध्यें मात्र 'गोविंदाग्रजां' च्या प्रतिभेचा वैशिष्ट्यपूर्ण विलास दृष्टीस पडतो. प्रेमासाठीं सर्वस्वाचें बलिदान करणाऱ्या प्रेमिकाच्या आत्यंतिक त्यागाचें रोमहर्षक चित्रण 'प्रेम आणि मरण' ह्या काव्यांत गडकऱ्यांनीं केलेलें आहे. सांसारिक शृंगाराचा जो आल्हादकारक नमुना 'गुलाबी कोड्या' मध्यें अनुभवावयाला मिळतो, तसा क्वचितच कोणत्याहि काव्यांत तो मिळूं शकेल. या कवितेला जवळ जवळ चार तपें आतां पूर्ण होतील पण रसिकांच्या मनावरील त्याची मोहिनी पहिल्याइतकीच प्रभावी आहे.

गडकऱ्यांच्या काळांत सामाजिक सुधारणांचा फारसा शास्त्रीय विचार झालेला नव्हता. विधवा–पुनर्विवाह आणि अस्पृश्यता–निवारण ह्या दोनच सामाजिक सुधारणेच्या प्रमुख बाबी होत्या. पण ह्या सुधारणांकडे पाहण्याची पांढरपेशा वर्गाची दृष्टि केवळ भूतदयावादी होती. गडकऱ्यांचा दृष्टिकोणहि तोच होता. आगरकर, राजारामशास्त्री भागवत किंवा केशवसुत ह्यांच्या सामाजिक विचारांचा त्यांच्या मनावर पगडा होता. जुन्या रूढी आणि परंपरा ह्यांच्याशीं 'नव्या मतांच्या ःलाइतांनीं' टक्कर दिली पाहिजे आणि समाजाच्या प्रगतीचा चोहोंकडे कोंडमारा करणाऱ्या आचारांच्या अकुंचित सीमा ओलांडल्या पाहिजेत, एवढेंच त्यांच्या पुरोगामित्वाचें क्षेत्र होतें.

'दसरा' या कवितेंत त्यांनीं आपल्या सामाजिक सुधारणेचें तत्त्वज्ञान विशद केलें आहे. 'केशवसुतां' च्या 'तुतारी' ची या कवितेवर गडद छाया पडलेली आहे. गडकरी हे स्वतंत्र प्रतिभेचे लेखक होते. पण सामाजिक सुधारणेचा त्यांनीं स्वतः असा विचार केला नसल्यानें, भावनेच्या आणि कल्पनेच्या क्षेत्रांत त्यांची काव्यप्रतिभा जशी दिमाखानें भराऱ्या मारतांना दिसते तशी ती सामाजिक विषयामध्यें मारूं शकत नाहीं. त्यामुळें त्यांच्या सामाजिक विषयावरील कवितेंत त्यांचें वैशिष्ट्यपूर्ण नाविन्य कुठेंहि

आढळून येत नाहीं. गडकरी हे वृत्तीनें भाविक आणि श्रद्धाळू होते. देवादिकांच्या चरित्रांतील कांहीं विसंगतीवर त्यांनीं विनोद केला असला, तरी पुराणांतल्या पुष्कळशा चमत्कारांवर त्यांचा विश्वास होता. गांवांतील कोणत्याहि देवळासमोरून जातांना आंतल्या देवाला रस्त्यावरून का होईना नमस्कार केल्यावांचून ते कधीं पुढें जात नसत. अशा अनेक प्रसंगीं मी त्यांच्या सान्निध्यांत होतों. मला त्यांची 'आस्तिकता' त्या वेळीं तरी अत्यंत हास्यास्पद वाटल्यावांचून राहिली नाहीं. खऱ्या सुधारकाच्या प्रखर बुद्धिवादाचा गडकऱ्यांच्या जवळ अभावच होता असें म्हटलें पाहिजे.

म्हणून त्यांच्या सामाजिक कवितेंत नुसती अस्पष्ट तळमळ दिसून येते. जातिवंत जिव्हाळा असा कुठेंच भासत नाहीं. तरी देखील 'स्मशानांतील गाणें' आणि 'एक समस्या' ह्या कवितेमध्यें त्यांनीं सामाजिक अन्यायाचें अत्यंत प्रखर आणि मार्मिक विडंबन केलेलें आहे. 'स्मशानांतलें गाणें' हा मराठी भाषेंतला भयानक रसाचा एकमेव नमुना आहे. 'प्रेमसंन्यास' नाटकाचा उगम ह्या कवितेंत आढळतो. गडकऱ्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण गद्यशैलीचा आणि विरोधाभासात्मक विनोदाचा तोंडवळा सुद्धां ह्याच कवितेंत पाहायला सांपडतो. 'जगांतल्या मानवापेक्षां स्मशानामधल्या भुतामध्यें जास्त माणुसकी आहे' हा या कवितेचा मध्यवर्ती विषय आहे. तो इतक्या समर्पक दृष्टांतांनीं आणि उदाहरणांनीं त्यांनीं आकर्षक केला आहे कीं, कवितेची कमालीची लांबी यत्किंचित्हि जाणवत नाहीं.

'देवनाम भूताप्रति पळवी। देवांची त्या कळे थोरवी। मानव नवसें परि त्या फसवी,' 'भुतें भुतासच कधीं न खाती। बंधुबंधुच्या रंगत रक्तीं' 'दोन पतींनी विधवा न सती। पतिव्रतेला परि पांच पति।' 'मांजर आडवें कार्य बिघडवी कर्तव्याची हीच थोरवी;' 'सजीव तांवरि लत्ता देती। मरतां घेती खांद्यावरती। उफराटा सन्मान।' असल्या अडाखेबंद सुभाषितवजा कल्पना-चमत्कृतींनीं ही कविता आमूलाग्र ओथंबलेली आहे. भुतांचें गाणें संपल्यानंतर विधवेच्या मृत बालकाच्या तोंडांत उरलेलें दूध चाटून एक कुत्रें कवीकडे बघून हसूं लागलें, ही कल्पना म्हणजे या कवितेंतल्या भयानक रसाचा कळसच होय. हें चित्र नुसतें डोळ्यांपुढें आणलें तर काळजांत भीतीचा शहारा उठल्याखेरीज राहात नाहीं. ज्या विशिष्ट मनःस्थितींत गडकऱ्यांना ही कल्पना सुचली असेल त्याच मनःस्थितींतून द्रमनच्या प्रेताचें चुंबन घेणाऱ्या कमलाकराच्या भयानक स्वभावचित्राचा संभव झाला असावा असें वाटतें.

"एका समस्येंत बोलघेवड्या आणि ढोंगी सुधारकांच्या दांभिक सुधारणाप्रियतेचा मोठा मार्मिक रहस्यस्फोट केलेला आहे. ही कविता एखाद्या सभेपुढें चांगल्या रीतीनें म्हणून दाखविली म्हणजे तिचा श्रोत्यांवर काय परिणाम होतो हें पाहण्यासारखें आहे. 'कवि आणि कैदी' ही कांहीं सामाजिक कविता नाहीं. तें एक आध्यात्मिक रूपक आहे. मायेच्या बंधनांत अडकलेल्या आत्म्याची त्यांतून सुटण्यासाठीं कशी उत्कट धडपड चाल-

लेली असते हें या कवितेंत चित्रित केलें आहे. पण प्रा. हर्षे ह्यांनीं ' मार भरारी । चल तोड बंधनें सारीं । ' ह्या कवितेच्या धृपदाचा अर्थ भलताच केलेला आहे. ते म्हणतात, " वैवाहिक बंधनांनीं पुढें गडकरी जखडले गेल्यानंतर एक वेळ सर्व बंधनें तोडून टाकून स्वैर भरारी मारण्याचाहि विचार त्यांच्या मनांत आलेला होता. " टीकाकार दीडशहाणा असला म्हणजे तो लेखकाच्या कोणत्या लिखाणांतून काय अनर्थ काढील ह्याचा हा एक मासला आहे.

कल्पना हाच गडकऱ्यांच्या काव्याचा प्राण आहे. त्यांच्या एकेक उत्प्रेक्षा म्हणजे कल्पनेच्या आकाशामधल्या चंडोलाच्या उत्तुंग भराऱ्या होत. वीज जशी नाचते तशी त्यांची प्रतिभा तळपते. क्षणांत इथें तर क्षणांत कुठें ? दहा वर्षांच्या एका सुंदर मुलीला बघून आणि बागेंत बागडणाऱ्या एका लहानग्या बाल्काला पाहून त्यांच्या प्रतिभेनें जें लालित्यपूर्ण शब्दांचें नि विलोल कल्पनांचें हास्य केलें आहे तें रसिक मनाला अक्षरशः मुग्ध करून टाकणारें आहे. ती मुलगी म्हणजे स्वर्ग आणि पृथ्वी यांतला जणूं काय सांधाच. तिच्या चिमण्या भुवया म्हणजे रामलक्ष्मणांचीं चिमुकलीं धनुष्येंच. तिच्या डोळ्यांत बालमदनानें आपल्या धनुर्विद्येची जणुं कांहीं ' तालीम ' च सुरू केली आहे. तिच्या गालावरचे गोंदवणाचे ठिपके म्हणजे तिच्या भवितव्याचें ब्रह्मदेवानें मांडलेलें दशांश चिन्हांचें गणितच. शब्दांची शाल न पांघरतां धांवत सुटलेली ही एखाद्या कवीची तरळ कल्पनाच नव्हे काय ? अशा एकापेक्षां एक बहारीच्या कल्पनांची गडकऱ्यांनीं कमाल करून सोडली आहे. ही कविता वाचतांना जाईजुईच्या फुलांनीं बहरलेल्या एखाद्या मांडवाखालीं बसल्यासारखें वाटतें. सर्वांगावर सुगंधी कळ्याफुलांचा जणुं सडाच पडतो आहे.

' बागेंत बागडणाऱ्या लाडक्या लहानग्यास ' या कवितेमध्यें गडकऱ्यांची प्रतिभा कल्पनेच्या अर्धोन्मीलित फुलांवर एखाद्या फुलपांखराप्रमाणें भिरभिरते आहे असें वाटतें. बागेंत दिसणाऱ्या प्रत्येक सुंदर वस्तूमागें मूल अवखळपणें धांवत आहे. तें बघून सृष्टीला आपला जणुं कांहीं हेवा वाटतो आहे आणि म्हणून ती आपल्या बाळाला आपल्या-पासून फसवून दूर नेण्याचाच जणुं कांहीं प्रयत्न करीत आहे असें त्याच्या आईला वाटतें, ही कल्पनाच अतीव काव्यमय आहे. त्या मानानें ' अरुण ' मोहक वाटत नाहीं. बालकवि ठोंबरे ह्यांच्या ' अरुणा ' पुढें तर तो निष्प्रभच वाटतो.

' हाल्त्या पिंपळपानास ' हा गडकऱ्यांच्या कल्पनाप्रधान काव्याचा एक अपूर्व सुंदर नमुना आहे. शेलेच्या कवितेशीं त्याची तुलना करून पाहण्यासारखी आहे. गड-कऱ्यांच्या कल्पनाप्रधान काव्याचें वैशिष्ट्य हें आहे कीं त्यांतून कोमल भावनेचें एखादें अत्यंत सूक्ष्म असें सूत्र जात असतें. त्यामुळें त्यांच्या कल्पनेच्या वैभवानें आपले डोळे दिपताहेत तोंच मध्येंच आपल्या हृदयाची तार ते अशा सफाईनें छेडतात कीं सर्वांगावर कोमल नि सुखद कंप उठतो. ' चिमुकल्या मुली ' ला बघून त्यांच्या मनांत चटकन

विचार येतो कीं हिच्या विशुद्ध मनांत क्षणभर जाऊन आपण आपलें कवित्व पावन करून घेऊं या. या असल्या एका भावनेनें सबंध कविताच एकदम उजळून जाते. चिमुकल्या ' पिंपळपाना ' चा झाडाच्या शेंड्यावर अहर्निश चाललेला नाश बघून कवि एकदम आत्मलक्षी होतो. आणि त्याला विश्वाचीं सूत्रें हालविणाऱ्या अनेक सुप्त शक्तींची जाणीव होते. त्यामुळें जीवनांतील असहाय्यतेचा त्याला प्रत्यय येऊन तो विषण्ण होतो. आपल्यासारखेंच हें पिंपळपानहि दुर्दैवी दिसतें आहे, असा विचार त्याच्या मनांत येतो. आतां ह्याच भावनेंत जर ह्या कवितेचा शेवट झाला असता तर ती हृदयस्पर्शी झाली नसती. पण सर्वांगाचा उकाडा होत असतांना जशी एखादी वाऱ्याची झुळुक एकदम येऊन मनाला आल्हाद देऊन जाते त्याप्रमाणें विचारांनीं कविमन उदास झालें असतांना चटकन् त्याच्यापुढें एक रमणीय कल्पना चमकून जाते. एकाद्या प्रणयमुग्ध बालिकेच्या कपाळावर हालणारें ' पिंपळपान ' त्याच्या अंतःचक्षूंना दिसतें. आणि हा मान जर कोणी ' बाला ' आपल्याला देईल तर जन्मभर आपण तिच्या कपाळावरचें पिंपळपान होऊन राहूं या मधुर विचारांत तो आपली खिन्नता विसरून जातो. ह्या एका श्रृंगारीच्या कल्पनेनें त्या कवितेचा सारा आत्माच बदलून जातो.

' नवबालेच्या शिरावरचें पिंपळपान ' होण्याचा हा विचार इतका कोमल आणि पवित्र आहे कीं त्यांत कवीची वैषयिक भावना दडली आहे असा संशय सुद्धां कोणाला येऊं नये. पण गडकऱ्यांच्या प्रत्येक लेखनांतून त्यांचें चरित्र हुडकून काढण्याच्या वेडामुळें प्रा. वाळिंबे ह्यांनीं या सुंदर भावनेंतून किती विपरीत अर्थ बाहेर काढला आहे तो पहा : ते म्हणतात, ' तरुणीच्या प्रेमाच्या प्राप्तीसाठीं गडकऱ्यांचें मन किती विलक्षण आसावलें होतें व त्या संवेदनेमुळें उत्पन्न होणाऱ्या हृदयाच्या स्पंदनांतील थरथरणारी उत्सुकता अनुभवावयास सांपडावी यासाठीं तें किती तळमळत होतें याचें प्रत्यंतर या ' हल्त्या पिंपळपानां ' त मिळेल. ' कवीच्या कोमल भावनेचा यापेक्षां अधिक कोणता उपमर्द करतां येईल ? '

' राजहंस माझा निजला ' ही गडकऱ्यांची कविता म्हणजे त्यांच्या ' वाग्वैजयंती ' मधला कौस्तुभच होय. मराठी वाङ्मयांत यापेक्षां अधिक प्रभावी करुणरसाची कविता दुसरी नाहीं. हास्यरसाइतकेंच करुणरसावरहि गडकऱ्यांचें प्रभुत्व होतें. या कवितेच्या जन्माची हकीगत गडकऱ्यांच्या धाकट्या बंधूंकडून मला कळली. सकाळीं अकराच्या सुमारास ते आपल्या माडीचें दार बंद करून ही कविता लिहावयास बसले. पाऊण तासांत ही कविता सबंध लिहून पुरी झाली. मध्येंच त्यांच्या बंधूनें त्यांना जेवावयास हांक मारली, तेव्हां ते चिडून त्याच्या अंगावर ओरडले, ' मूर्खा, मराठी भाषेंतील एका अद्‌भुत कवितेला मी इथें जन्म देतों आहे हें तुला ठाऊक नाहीं वाटतें ? '

या कवितेचें मूळ हस्तलिखित मी पाहिलें होतें. पेन्सिलीमध्यें अगदीं घाईघाईनें सर्व कविता लिहिलेली होती. त्यावरून स्फूर्तीच्या एका विशिष्ट अवस्थेंतच ही कविता

लिहिली असावी हें उघड होतें. प्रकाशित कवितेपेक्षां मूळ कवितेमध्यें तीन चार कडवीं जास्त होतीं. ती त्यांनींच स्वतः मागाहून कमी केलीं.

एका स्त्रीचा नवरा वारल्यानंतर थोडया दिवसांच्या आंतच तिचें एकुलतें एक मूल वारलें. त्या दुःखाच्या आघातानें त्या दुर्दैवी आईला वेड कां बरें लागणार नाहीं ? तिला वाटलें आपला 'राजहंस' आपल्या मांडीवर झोपलाच आहे. या मनाच्या स्थितींत तिनें मुलाला उचलावयाला जमणाऱ्या मंडळींना उद्देशून जे उद्गार काढले त्यांत दगडाला पाझर फोडणारें कारुण्य आहे.

'करूं नका गलबला अगदीं । लागली झोप मम बाळा ।। ' या तिच्या तोंडून बाहेर पडणाऱ्या पहिल्याच ओळी ऐकून हृदयाची कालवाकालव व्हावयाला सुरुवात होते. "हें दूध जरासा प्याला, आतांसा कोठें निजला ।" तों इतक्यांत तुम्ही जमलांत ? मी तुम्हांला चांगली ओळखून आहें. मागें माझा हिरा नेलात–अन् आतां ही हिरकणी न्यायला आलांत होय ? माझ्या छक्कड्याबद्दल वाईटसाईट बोलूं नका. "मी गरीब कितीहि असलें, जरि कपाळ माझें फुटलें । बोलणें तरी हें असलें, खपणार नाहिं हो मजला ।। " हें असेंच सांगून मागें, तुम्ही माझ्या जिवाचा राजा नेलांत. पुन्हां दाखविलें सुद्धां नाहींत त्याला आणि आतां माझा हा राजहंस न्यायला आलांत होय ? एवढा का दुष्टावा तुम्ही माझ्याशीं करतां ?

हृदयाला पीळ पाडणाऱ्या या सर्व भाषेची गंमत ही आहे कीं त्यांत प्रत्यक्ष शोक असा कुठेंच नाहीं. त्यामुळें तिचा मनावर जास्त परिणाम होतो. आपलें मूल मरण पावलें आहे, असें आईला कळून तिनें शोक केला असता तर तो इतका प्रभावी झाला नसता. प्रारंभींची एवढी भाषा झाल्यानंतर आई जेव्हां आपल्या 'राजहंसा'च्या सौंदर्याचें आणि गुणांचें वर्णन करूं लागली, 'तेव्हां भोंवतालच्या चार जनां'च्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या असतील. तें दृश्य पाहिल्यावर मग आईच्या डोक्यांतला भ्रम विरघळून गेला आणि मग आपलें मूल खरोखरच मरण पावलें आहे हें तिला उमगलें. त्याबरोबर 'हें असें जाहलें म्हणतां तरि देवचि निजला कां हो ?' ही पहिलीच तिच्या शोकाची ओळ इतकी विलक्षण प्रभावी आहे कीं ती काळजाचा पडदा फोडून आरपार निघून जाते.

'जरि होउं नये तें झालें, तरि सोडणार या नाहीं । पाळणाहि रुततो ज्याला, प्रेमें जरी निजवी आई । तो देह खांचदगडांत, छे नको नको ग बाई ।। ' येथें ह्या शोकाची अगदीं परिसीमा होते. आणि मग ती आई आपल्या मृत बाळाला हृदयाशीं धरून जी निजते, ती पुन्हां उठतच नाहीं. भ्रम, शोक आणि अकस्मात मरण अशा ह्या कवितेच्या तीन अवस्था आहेत, त्या मानसशास्त्राला धरूनच आहेत. कोणत्याहि कवितेचें मूल्यमापन करतांना तिचा मनावर परिणाम काय होतो हें अजमावून पाहावें. कविता ही कांहीं वाचण्याची वस्तु नाहीं. ती मोठ्यानें म्हणून पहावी. गाऊन बघावी.

भावनापूर्ण स्वरांत ' राजहंस ' म्हणावा. म्हणजे श्रोत्यांच्या आणि विशेषतः स्त्रियांच्या मनाची काय स्थिति होते तें प्रत्यक्ष पहावयाला सांपडेल. हातच्या कांकणाला आरसा कशाला पाहिजे ?

असें असूनहि ह्या कवितेवर थोडीशी टीका झाली, ती अशी : रे. नारायण वामन टिळक म्हणाले कीं, " पुत्रमरणाच्या दुःखानें वेडी झालेली आई, ' या माझ्या मानससरसीं ' सारखी संस्कृतप्रचुर आणि रूपकात्मक भाषा वापरील काय ? " हा आक्षेप चुकीचा आहे आणि अयोग्यहि आहे. एक अडाणी स्त्री मुंबईच्या रस्त्यांत मोटारखालीं चिरडून मरण पावलेल्या आपल्या मुलाबद्दल शोक करतांना मी प्रत्यक्षच ऐकली आहे. ती आपल्या मुलावर ' माझ्या हिऱ्या, माझ्या माणका, माझ्या चंद्रा–' अशा विशेषणांचा वर्षाव करीत होती. भावनाप्रक्षोभाच्या प्रसंगीं आपलें नेहमीचें स्वरूप सोडून अलंकारिक होण्याकडे भाषेची मुळीं प्रवृत्तिच असते. आणि दुसरी गोष्ट अशी कीं कोणी कांहींहि म्हटलें तरी वाङ्मयांतील भाषा ही वाङ्मयकाराचीच असते. त्यांतील वर्ण्य व्यक्तीची नसते. वाङ्मयकारांनीं त्या भाषेंत वास्तववादाचा कितीहि आभास निर्माण करण्याचा प्रयत्न केला तरी माध्यमाच्या कांहीं मर्यादा ठरलेल्या आहेत. त्या टीकाकारांनीं ओळखावयाला हव्यात. एखाद्या व्यक्तीचें चित्र किंवा पुतळा कितीहि उत्तम असला तरी तो संपूर्णपणें त्या व्यक्तीसारखा कसा दिसेल ? तसेंच भाषेचेंहि आहे. टिळकांनीं घेतलेला आक्षेप जगांतल्या प्रत्येक वाङ्मयावर घेतां येण्यासारखा आहे. जगांतलीं माणसें जशीं बोलतात तसें लिहिलें तर त्यांतून ' वाङ्मय ' निर्माण होणार नाहीं. त्यांनीं कसें बोलावें असें लेखकाला जें वाटतें, तें वाङ्मय.

प्रा. हर्षे ह्यांनीं आपल्या ' गोविंदाग्रज ' या पुस्तकांत ' राजहंसा ' वर जी पांच-सहा पानांची टीका केली आहे त्यापेक्षां अधिक अडाणीपणाची–अरसिकपणाची टीका मी माझ्या आयुष्यांत वाचली नाहीं. काव्यपरीक्षण कसें करूं नये याचा तो एक नमुना आहे. त्यांतला एक हास्यास्पद मासला येथें देतों. ' राजहंसा ' तली विधवा माता आपल्या मृत पतीच्या चरणीं अर्पण करण्यासाठीं अश्रूंची ' वैजयंति मोहनमाळा ' गुंफीत बसली होती. आपला पुत्र हा त्या अश्रूंच्या माळेंतला ' कौस्तुभमणि ' आहे असें ती म्हणते. त्याला उद्देशून प्रा. हर्षे म्हणतात, ' अश्रूंच्या वैजयंतींत जड शरीरान्वित राजहंस हा कौस्तुभमणि कसा काय बसणार ? त्याच्या भारानें ती मोहनमाळ तुटून नाहीं का पडणार ? हें कोडें कांहीं केल्या उलगडत नाहीं. '

प्रा. हर्षे यांना हें कोडें आयुष्यभर उलगडणार नाहीं. कारण तें कोडें उलगडायला जें ' डोक्या ' चें भांडवल लागतें तेंच त्यांच्याजवळ नाहीं. प्रा. हर्षे ह्यांच्यासारख्या टीकाकारांना उत्तर देणें अशक्य आहे. ' लोकमान्य टिळक हे महाराष्ट्राचे सिंह होते ' असें कोणी म्हटलें कीं प्रा. हर्षे शंका काढायचे, ' लोकमान्यांना आयाळ कुठें आहे ? शेपूट कुठें आहे ? उगाच भलतें काय बोलगांहात किंवा एकादा

बाप आपल्या सुंदर मुलीला हृदयाशीं धरून मोठ्या कौतुकानें म्हणाला, 'माझी पोरगी म्हणजे नुसती बिजली आहे' कीं प्रा. हर्षे त्याला विचारावयाचे, 'मग तुम्ही या बिजलीला आपल्या हृदयाशीं कसें धरतां? तिच्या धक्क्यानें तुम्ही मरत कसे नाहीं?' कल्पना आणि वास्तव ह्यांची गल्लत करण्याचा प्रयत्न असाच हास्यास्पद होतो.

'अवेळीं ओरडणाऱ्या कोकिळेस' हें करुणरम्य भावकाव्य आहे. बाह्य सृष्टी आणि अंतःसृष्टि ह्यांचा सुरेल समन्वय घालण्याचा हा एक अत्यंत कलात्मक प्रयत्न आहे. रचना आणि भावना ह्यांची फारच कोमल गुंफण ह्या काव्यांत केलेली आढळते. 'केशवसुत मेले!' ही एक सामान्य कविता आहे. शिष्यानें आपल्या गुरूच्या चरणीं भक्तिभावानें केलेलें काव्यमय वंदन एवढेंच त्याला महत्त्व आहे. 'वाग्देवीनें स्वर्गांतून जे सुधाकुंभ ओतले ते पृथ्वीवर केशवसुतांनीं आपल्या हृदयामध्यें झेलले आणि आपल्या श्वासाच्या कारंजानें चहूंकडे उधळून दिले' असें या कवितेच्या दुसऱ्या कडव्यांत गोविंदाग्रजांनीं जें रूपक कल्पिलेलें आहे, त्यावर प्रा. हर्षे यांनीं 'राजहंसा प्रमाणेंच जी मासलेवाईक टीका केली आहे ती वाचून दुसरा कांहीं फायदा झाला नाहीं तरी करमणूक मात्र खास होईल.

हर्षे म्हणतात, 'वाग्देवीनें स्वर्गांतून सुधाकुंभ खालीं ओतले खरे, पण त्या सुधेची धार अस्मानांतून नेमकी कवीच्या हृदयांत कशी पडावी? बरें स्वर्गापासून पृथ्वीच्या प्रवासांत त्या धारेंतला बारीकसा एकादा थेंब तरी भक्ताच्या वांट्यास येईल काय? वाटेंत अडचणी किती? सूर्याच्या तापानें ती धार आटून जाईल. नाहींतर हिम-रेषेनें गोठून जाईल. पुन्हां मध्यें मेघांचें छत आहे. त्यांतून ती धार खालीं गळालीच तर वारा तिच्यांतलें कांहीं थेंब लुबाडणार. कांहीं चातकपक्षी पिणार. कांहीं झाडांच्या पानांवर पडणार. मग त्यांच्यातले कितीसे थेंब केशवसुतांच्या हृदयावर पडणार? काव्याचें असलें पोरकट विश्लेषण करणारा दीडशहाणा टीकाकार जगांत कुठें तरी आढळेल काय?

'स्वर्ग, वाग्देवी, सुधाकुंभ, हृदयांत झेलणें' ह्या सर्वच मुळीं कविकल्पना. त्यांच्याशीं उन्ह, हिमरेषा, मेघ, चातक, झाडें ह्या सत्य वस्तूंची गल्लत करून गड-कऱ्यांना हास्यास्पद करण्याचा हर्षे यांनीं जो प्रयत्न केला आहे तो नेमका त्यांच्याच गळ्यांत उलटला आहे. मेघांच्या छतांत सुधेचे थेंब अडकण्याची शक्यता ज्या हर्ष्यांना वाटते, त्यांच्या भौगोलिक ज्ञानाची जेवढी तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. वाग्देवीनें पृथ्वीवर ओतलेल्या सुधाकुंभांतले किती थेंब खालीं पोहोंचले असतील ह्याची प्रा. हर्षे यांना शंका वाटते. अन् मग समुद्रमंथनांतून निर्माण झालेल्या अमृताचा कुंभ जेव्हा श्रीविष्णूनें गरुडावर पळवून नेला तेव्हां त्यांतलें नेमके चार थेंब चार क्षेत्रांच्याच ठिकाणीं पडले ही गोष्ट भारतांतील लक्षावधि लोकांना खरी कशी वाटते? तेवढ्यासाठीं दर बारा वर्षांनीं विराट कुंभयात्रा भरते ना? पुराणांतल्या या कथेबाबत उघडपणें

संशय घेणारा एकहि ' हर्षे ' अद्याप निर्माण झालेला नाहीं.

' घुंगुरवाळा ' हें गडकऱ्यांचें एक अत्यंत श्रवणमधुर आणि भावसुंदर गीत आहे गडकऱ्यांचें फारच थोडें काव्य गेय आहे. त्यांच्या गेय काव्यांत या गीताचा प्रामुख्यानें समावेश करितां येईल. पतिप्रेमाचें जें गूढरम्य संगीत स्त्रीच्या अंतःकरणांत लपलेलें असतें, त्याचे अस्फुट सूर तिला आपल्या बाळाच्या पायाभोंवतीं रुमझुमणाऱ्या घुंगुरवाळ्याच्या नादांत प्रगट होत असलेले ऐकूं येतात, पण आमच्या प्रा. हर्षांना हें गाणें ' अश्लील आणि वैषयिक ' वाटतें. छे, छे, गडकऱ्यांच्या काव्याबद्दल बोलतांना पुन्हां हर्षे ह्यांचें नांव सुद्धां घेणें नको. ' भीमकबाळा ' आणि ' स्मृतिगीत ' या गीतांची गोडी अवर्णनीय आहे. त्यांची रचना इतकी बाळबोध आणि अभिजात आहे कीं कोणा तरी एखाद्या जुन्या कवीचीं वा कवियत्रीचीं तीं गाणीं असावींत असा भास होतो.

समकालीन कवींत बालकवि ठोंबरे ह्यांच्यावर गडकऱ्यांचें अधिक प्रेम होतें. ' बालकवि ' त्यांच्यापेक्षां वयानें लहान होते. पण त्यांच्याबद्दल गडकऱ्यांना अतिशय आदर वाटत असे. गडकऱ्यांसारख्या स्वतंत्र बुद्धीच्या कवीलाहि कित्येकदां ' बालकवि' चें अनुकरण करण्याचा मोह आवरतां आलेला नाहीं. उभयतांचे कित्येक काव्यमय संवाद ऐकण्याचें भाग्य मला लाभलें होतें. बालकवींचा ' नव कवितेच्या जरिपटक्याचा अधिकार ' गडकऱ्यांनीं ह्या कवितेंत मान्य करून त्यांच्या कवितेचा फार मोठा गौरव केलेला आहे. ' बालकवीं 'ना आगगाडीखालीं अपघाती मृत्यु जर आला नसता तर त्यांनीं ' नव कवितेचा जरिपटका ' महाराष्ट्रांत मोठ्या दिमाखानें नाचवला असता ह्यांत काय संशय !

' श्री महाराष्ट्रगीत ' आणि ' कृष्णाकांठीं कुंडल ' या दोन्हीहि अपुऱ्या कविता एकाच मराठमोळ्या धाटणीनें लिहिलेल्या असून त्यांमध्यें प्रकट झालेला गडकऱ्यांचा महाराष्ट्र–अभिमान आणि मराठी बाणा मराठी भाषिकांना निःसंशय आल्हाद देणारा आहे. श्रीमहाराष्ट्रगीत हें वस्तुतः ' गीत ' नव्हे; तो ' महाराष्ट्राचा पोवाडा ' आहे. महाराष्ट्राच्या भूगोलाचें, वाङ्मयाचें आणि इतिहासाचें असें ठसकेबाज आणि काव्यमय वर्णन क्वचितच दुसऱ्या कोणीं केलें असेल.

' कृष्णाकाठीं कुंडल ' ही शिवकालीन वीराची एक शोकान्त प्रणयकथा होती. तिचीं जीं त्रोटक कडवीं गडकऱ्यांनीं रचून ठेवलेलीं आहेत त्यांतून या कथेचा बराच बोध होतो. शिवाजी महाराजांचा एक शूर आणि एकनिष्ठ शिपाई ' रायबागचा राया ' म्हणून होता. त्याचें कुंडल येथें रहाणाऱ्या माने ह्या मराठा घराण्यांतील मैना नांवाच्या मुलीवर प्रेम बसतें. उभयतांची गांठ कृष्णेकांठीं असलेल्या सुंदर राईत पडली असावी. तेथेंच कृष्णाबाईला साक्ष ठेवून दोघेहि विवाहबद्ध झालीं. मैना रायाला म्हणाली, " मला तुमच्याबरोबर घेऊन चला. " राया म्हणाला, " आम्ही शिवरायाचे शिपाई

म्हणजे वाऱ्यावरचे तीर! पळत्या पायावरचा आमचा इमला. रानगांवचे आम्ही राजे. तूं आमच्याबरोबर कुठें येणार? वाघाबरोबर त्याची वाघीण थोडीच हिंडते!" मैना चिडून म्हणाली, "शिवनेरीच्या शिवरायांनीं हीच का पोपटपंची तुम्हांला शिकविली आहे? तुम्ही जाल तिथें प्रीतीच्या पंखांनीं मी उडत उडत येईन." तरी देखील तिला बरोबर घेऊन जायला तो तयार झाला नाहीं.

पुढें राया मुलुखगिरीवर निघून गेला. त्याची पुष्कळ दिवस बातमी आली नाहीं, म्हणून मैना फार दुःखी झाली. झाडावरच्या एका मैनेला आपल्या प्रियकराची बातमी आणावयाला तिनें सांगितलें. ती तिला म्हणाली, "तुझा राघू जसा बेमान झाला असेल, तसाच माझा रायबागचा राघू माझी मान कापून गेला कीं काय कोण जाणे?" पुढें रायाजी लढाईत कामास आला. मैनेच्या गळयांतलें 'मंगळसूत्र' तोडून त्यांतले मणि रायाजीनें शिवरायाच्या शिरपेंचांत खोवले. प्रिय पतीच्या मरणाचें दुःख असह्य होऊन पुढें मैना मरण पावली.

ज्योत ज्योतिला मिळुनी गेली, माती मातीलाही
कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं।

आज कुंडल हें गांव कृष्णाकांठीं नसतांना तें गडकऱ्यांनीं तेथें नेऊन कां बसविलें अशी कांहीं टीकाकारांनीं शंका प्रकट केली आहे. पण त्याचें उत्तर हें खडकाव्य पूर्ण झालें असतें म्हणजे मिळालें असतें. त्यासंबंधीं बोलतांना गडकरी मला त्यावेळीं म्हणाले, "रायाजीच्या मृत्यूची बातमी ऐकून मैनेनें त्यावेळीं एवढा शोक केला कीं तो कृष्णा नदीला ऐकवेना म्हणून ती कुंडल गांवापासून कित्येक मैल दूर हटली." किती काव्यमय कल्पना आहे ही! असल्या धाडसी कल्पना केवळ गडकऱ्यांनींच आपल्या डोक्यांतून काढाव्यात! 'कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं,' तें कां ह्याचें रहस्य हें होतें. 'राजसंन्यासां'त गडकऱ्यांनीं जी शाहिरी मराठी शैली वापरलेली आहे, तिची रंगीत तालीम म्हणजे, 'कृष्णाकांठीं कुंडल' ही कविता होय.

गडकऱ्यांचें गद्य विनोदी लिखाण ज्यांनीं वाचलें असेल त्यांना त्यांची विनोदी कविता फारच आळणी वाटेल. 'ठकीचें लग्न,' 'स्वयंपाकघरांतील गोष्टी,' ह्या लेखांतील हृदयंगम विनोदाच्या पासंगालाहि त्यांच्या काव्यामधला विनोद पुरणार नाहीं. 'चिंतातुर जन्तु' ही कविता विनोदाच्या सदरांत घातली गेली असली तरी तिच्यांत विनोद नाहीं. जळजळीत उपरोध आहे. गडकऱ्यांचा एक मित्र होता. (अजून तो आहेच.) मोठा सत्प्रवृत्त माणूस. पण बुद्धीनें बेतास बात. गडकऱ्यांना तो विनाकारण कांहीं तरी प्रश्न विचारून सतावावयाचा. जगांतल्या सर्वसामान्य अडाणी माणसांचा तो एक प्रातिनिधिक नमुना आहे असें समजून गडकऱ्यांनीं ही कविता लिहिली. परमेश्वराच्या कार्याबद्दल ह्या लोकांच्या मनांत सदैव आपल्या शंका. ह्याचें काय होईल न त्याचें काय होईल? म्हणून गडकरी देवाला विनवतात कीं, "देवा, बाकीचा तुमचा

उद्योग क्षणभर बाजूला ठेवा अन् या चिंतातुर जन्तूच्या मनाचें अगोदर समाधान करा. ”

‘ एखाद्याचें नशीब ’ ही गडकऱ्यांची एक अत्यंत अभिजात कविता आहे. जगांतल्या दुःखितांबद्दल त्यांच्या अंतःकरणांत किती सूक्ष्म सहानुभूति वसत होती, ह्याचा हा एक हृदयस्पर्शी पुरावा आहे. ह्या कवितेचें हस्तलिखित माझ्या संग्रहीं आहे. त्यांत मूळ तिसरा श्लोक असा होता :

मेघार्वाण जलाशया न गुणुनी एकाग्रनिष्ठा धरी
जो जो चातक मागुती जलकणा एकस्थ सौख्या करी,
देतीहि घन त्यास त्यास जल तें होती सुखी सर्व ते
एखाद्यावर मात्र वीज पडुनी सर्वस्व संहारिते।

हा श्लोक नंतर काढून टाकून त्याऐवजीं त्यांनीं पुढील श्लोक रचला—

झाडें जोडुनि पत्रयुग्म फुटलें मेघाप्रती याचती
स्वच्छंदें जलबिंदु तोंच सगळ्या पानावरी नाचती
सारीं पालवतीं फुलें विहरती शोभा वरी लोळते।
एखाद्यावर मात्र वीज पडुनी त्या जाळते पोळते

ह्या दोन श्लोकांतला फरक लक्षांत घेतला म्हणजे आपल्या काव्याची रचना कलात्मक आणि ध्वनिसुंदर करण्याच्या कामीं गडकरी किती जागरूक होते हें कळून येईल.

गडकरी हे अत्यंत भाविक होते. त्यांच्या उशाशीं शंकराच्या आणि विठोबाच्या दोन लहान तसबिरी ठेवलेल्या असून तुकाराम आणि नामदेव ह्यांच्या अभंगांचे ते अहर्निश परिशीलन करीत. एकादशीहि ते करीत असत. दर एकादशीला ते भक्तिभावानें एक अभंग रचीत. अशा एकादश अभंगांचा संग्रह त्यांनीं ‘ अनामिकाचे अभंग ’ ह्या मथळ्यानें प्रसिद्ध केला. ह्यावरून संतांच्याबद्दल त्यांच्या मनांत केवढा आदरभाव वसत असला पाहिजे हें दिसून येतें. संतांच्या क्षेत्रांत पाऊल टाकतांना स्वतःचें नांव उच्चारण्याचें सुद्धां त्यांना भय वाटतें. संतांची वाणी गडकऱ्यांनीं किती आत्मसात केली होती हें ह्या अभंगांवरून दिसून येईल. “ तुझें नांव ज्यांनीं घेतलें त्यांचा देवा, तूं उद्धार केलास. पण तुझा माझा दावा आहे. मी तुझं नांवहि घेत नाहीं. बघूं तूं माझा कसा उद्धार करतोस ! तुझ्या थोरपणाची मी आतां परीक्षाच घेतों. माझें पाप एवढें आहे कीं तुला माझ्याकडे ओढून आणण्याचा तोच माझा अधिकार आहे. ” हें या अभंगांतलें सूत्र मोठें हृदयद्रावक आहे.

‘ विरामचिन्हें ’ ही कविताहि ‘ एखाद्याच्या नशिबा ’ प्रमाणें गडकऱ्यांची एक अविस्मरणीय कविता आहे. गडकऱ्यांच्या तरल कल्पनाशक्तीचा हा एक तेजस्वी नमुना आहे. व्याकरणांतलीं विरामचिन्हें जीवनामध्येंहि जो पाहूं शकतो त्याची प्रतिभा काय सामान्य कोटींतली आहे ? ‘ फूल ना फुलाची पाकळी ’ हें गडकऱ्यांचें आत्म-

समर्थन आहे. त्यांच्या मृत्यूनंतर अलौकिक कीर्ति त्यांना प्राप्त झाली खरी, तथापि त्यांच्या चरित्राची निंदाहि कांहीं कमी झाली नाहीं. तेवढी त्यांच्या हयातींत जरी झाली नसली, तरी त्यांची हेटाळणी करणारी कुत्सित मंडळीहि त्यांच्या काळामध्यें कांहीं कमी नव्हती. त्यांना गडकऱ्यांनीं दिलेलें हें उत्तर आहे. ही कविता लिहून झाल्यानंतर थोड्याच वेळानें मला ती वाचायला मिळाली. त्यामुळें गडकऱ्यांचें त्या कवितेवरील भाष्यहि मला त्यांच्या तोंडून ऐकावयास सांपडलें. ते म्हणाले, "कवि म्हणून मी जनतेसमोर प्रकट होतों, व्यक्ति म्हणून नव्हे. माझ्या काव्यावर टीका करण्याचा जनतेला अधिकार आहे. मग लोक माझ्या व्यक्तिगत जीवनावर कां टीका करतात ?" प्रसिद्ध पुरुषांच्या खाजगी जीवनाकडे कुत्सितपणें पहावयाचें हा महाराष्ट्रांतल्या कांहीं लोकांचा फार जुना धंदा आहे. गडकरी तरी त्याला अपवाद कां असावेत ?

'मुरली' ही 'राजहंसा' एवढी गडकऱ्यांची लोकप्रिय कविता आहे, किंबहुना 'मुरली' आणि 'राजहंस' ह्या दोनच कवितांवर गडकऱ्यांच्या काव्यकीर्तीचा मनोरा उभा आहे. श्रीकृष्णाच्या 'मुरली' वर मराठी भाषेंत प्राचीन काळापासून तों आतांपर्यंत शेकडों काव्यें लिहिलेलीं असतील. पण त्यांपैकीं किती लोकांच्या स्मरणांत असतील ? जुन्या गाण्यांपैकीं तर 'मुरली' वरचें एकच गाणें मला आठवतें :

जळो जळो देवा तुझी मुरली,
तुझ्या मुरलीनें शुद्ध माझी हरली ।
आम्हीं मिळून गौळणी,
जातों यमुना जीवनीं,
तुझ्या मुरलीचा ध्वनी,
मी ऐकीला कानीं,
तेव्हां घागर माझी पाझरली ।

पण सर्व 'मुरली गीतां'त गडकऱ्यांच्या 'मुरली' सारखें नादमधुर आणि हृदयंगम गीत दुसरें नाहीं. तें एक नितांत सुंदर रूपक आहे. ईश्वरी साक्षात्कारासाठीं भक्ताचें हृदय कसें तळमळतें हें श्रीकृष्णाचा मुरलिध्वनि ऐकावयास आतुर झालेल्या राधेच्या व्याकुळ मानसिक अवस्थेचें भावपूर्ण चित्र रेखाटून गडकऱ्यांनीं सांगितलें आहे. ह्या गाण्यांत प्रकट झालेलें गडकऱ्यांच्या कवित्वाचें वैभव अक्षरशः डोळे दिपवून टाकणारें आहे.

पुष्पाविण येई वास
वाऱ्याविण चाले श्वास
हर्षाविण आवां हास
मरणाविण सुटका झाली
शिवा

श्वासें मज हृदयीं भरवी
नादें कीं ओढुनि नेई
चुंबनेंच कीं मज बनवी
तव ओठावरली लाली ।

हा आधुनिक मराठी काव्यांतील प्रतिभेचा निःसंशय उच्चांकच आहे. नदीचें पाणी आल्यानें चढूं लागलेलें जसें डोळ्यांना दिसतें, तसें राधेच्या क्षणोक्षणीं वाढत चाललेल्या उत्कंठेचें आणि उन्मादाचें चित्र प्रत्यक्ष बघावयाला आणि अनुभवायला सांपडतें. 'बावरी राधिका बनली', 'ना तरी राधिका मुकली', 'कुणिकडे राधिका भकलि', 'कृष्णांत राधिका रमली' आणि 'चहुंकडे राधा झुकली' या प्रीति-उत्तानतेच्या पांच पायऱ्या चढत चढत राधा श्रीकृष्णाकडे आपल्या डोळ्यांपुढून चाललेली आहे असें वाटतें आणि डोकें धुंद होतें आणि मग—

उरलें न शीत वा उष्ण
कांहीं न शुभ्र वा कृष्ण
एकरूप राधाकृष्ण
जयनाद गात ही मुरली ।

अशी त्या दिव्य मुरलीच्या संगीतांत आपलीहि समाधि लागते. शुद्ध प्रेमाचें इतकें उन्मादक वर्णन कुठल्याहि भाषेंत कुणा कवीनें केलें नसेल. भावसमाधि लावण्यांत ह्या कवितेइतकें दुसरें प्रभावी साधन भक्तास आढळणार नाहीं.

भोगुनी तापमय उष्णा
मुरलीची लागतां तृष्णा
जग गाइल राधाकृष्णा
ही साक्ष मनोमन मुरली ।

हें कडवें गडकऱ्यांचें अत्यंत आवडतें होतें. तें स्वतःशीं गुणगुणतांना त्यांना मी किती वेळां तरी ऐकलेलें आहे. खरेंच संसाराच्या उष्णतेनें दग्ध झालेल्या जगाला राधाकृष्णाच्या 'मुरली'चें जसें सतत स्मरण होत राहील त्याप्रमाणें जगामधील भावशून्य जीवनानें विटलेल्या आर्त मराठी मनाला गोविंदाग्रजांची 'मुरली' सदैव तृप्ति आणि तुष्टि देत राहील.

'फुटकी तपेली' ही गडकऱ्यांची एक अध्यात्मिक कविता आहे. अध्यात्माची तोंडओळख असल्याखेरीज या कवितेचा अर्थ कळणें जड जाईल. आपल्या डोळ्यांना हें जग दिसतें आहे, तो परमेश्वरानें निर्माण केलेला एक आभास आहे. त्यालाच माया म्हणतात. या मायेच्या आवरणांत परमेश्वर लपलेला आहे. तें आवरण दूर केल्यावांचून जीवात्म्याला परमात्म्याचें दर्शन होणार नाहीं. परमात्म्याची भेट होणें ह्यालाच मोक्षप्राप्ति म्हणतात. मोक्षाच्या वाटेवरचा जीवात्म्याचा हा प्रवास किती जन्मांमधून तरी

करावयाचा आहे ? ' आरंभाच्या शेवटापासून तो शेवटाच्या आरंभापर्यंत ' कैक अनंतें त्याला भराभर ओलांडावयाचीं आहेत. परमात्म्याच्या भेटीची जीवाला एकसारखी तहान लागलेली असते. तो सारखां पाणी पाणी करीत असतो. पण त्याच्याजवळ ' माये 'ची जी तपेली असते ती असते फुटकी. ह्या तपेलींत ' आत्मज्ञाना 'चें पाणी कसें टिकून रहाणार ? तें सारखें गळणारच.

आत्मज्ञानाचें पाणी जोंपर्यंत जीवात्म्याला प्यायला मिळत नाहीं, म्हणजे स्वतःची ओळख स्वतःला जोंपर्यंत होत नाहीं, तोंपर्यंत परमात्मा कसा भेटणार ? अन् मोक्ष तरी कसा मिळणार ? या मायामोहांत जीवात्मा जोंपर्यंत गुरफटून रहातो, तोंपर्यंत मोक्षाच्या वाटेवर त्याची प्रगति होऊं शकत नाहीं. म्हणून ह्या प्रवासांत मला ही मायेची फुटकी तपेली नको, कारण ती जोंपर्यंत आहे तोंपर्यंत आत्मज्ञानाचें पाणी मला प्यायला मिळण्याची आशा नको, असें कवीनें एकसारखें तळमळून सांगितलें आहे. मोक्षाचा प्रवास सोपा नाहीं. त्याचे कायदे फार कडक आहेत. जीवात्म्याच्या हातून जरा कांहीं चूक झाली कीं त्याचा अधःपात होतो आणि पुन्हां पहिल्यापासून त्याला प्रवास करावा लागतो.

मानवजन्म प्राप्त होईपर्यंत जीवात्म्याला किती तरी योनींमधून जावें लागतें. त्याच्याबरोबर प्रारंभापासून प्रवासाला निघालेले दुसरे प्राणी वाटेंतल्या वाटेंत खलास होतात. म्हणजे त्या त्या प्राण्यांची उत्क्रांति थांबते. त्या सर्वांचे संस्कार घेऊन जीवात्मा मानवदेहांत शिरतो. ज्यांच्या ओळखीची कांहीं जरूरी नाहीं अशांच्या ओळखी करून घेण्यांत जीवात्मा गुंगून रहातो आणि स्वतःची ओळख करून घ्यायचें मात्र सपशेल विसरतो. आत्मज्ञानाचें पाणी थोडें जरी प्यायला मिळालें तरी परमात्म्याच्या भेटीची तहान एकसारखी वाढत जाते. अशा वेळीं मायेचा फार उपसर्ग होतो. कारण ती विषयोपभोगाचें खोटें मृगजळ जीवात्म्याला पाजून त्याला परमात्म्याचा विसर पाडवते.

ब्रह्मांडाची तपेली ही खरी तपेली. म्हणजे ' हें विश्वचि माझें घर ' असें जेव्हां जीवात्म्याला आत्मज्ञान होतें, तेव्हां मग परमात्म्याची भेट होऊन जीवात्म्याचा प्रवास संपतो; आणि त्याची तहान पूर्णपणें नष्ट होते. म्हणून आत्मज्ञानाचें पाणी जेव्हां सर्वस्वांत शिरेल आणि भरेल तेव्हां मोक्षाचा लाभ होईल ही ' अंदरकी बात ' आहे. ' फुटक्या तपेली 'चा हा मी जो अर्थ लावला आहे त्याखेरीज तिचा दुसरा अर्थ संभवणार नाहीं असें नाहीं. अध्यात्मिक काव्यांत असें पुष्कळ वेळां होतें कीं कांहीं भाग गूढ असतो आणि त्याच्या अर्थासंबंधीं मतभेद होतो. कल्पनाचमत्कृति ह्या दृष्टीनेंच ' फुटक्या तपेली 'कडे पहावें. अशी रूपकें प्राचीन कवी पुष्कळदां रचीत असत.

कान्हा, तुझी घोंगडी चांगली
आम्हांस दिली कां वांगली ?

हें ज्ञानदेवाचें गाणें असेंच आहे. देवा, तुमची घोंगडी तेवढी चांगली आहे. अन्

मग आम्हांला ही अशी षड्रिपूंनीं भरलेली फाटकी घोंगडी कां बरें दिली ? असें मानवी शरीरावरचं हें रूपकगीत आहे.

'माझा मृत्युलेख' ह्या कवितेचा शोध मलाच लागला. भूमितीच्या पुस्तकांत एका चतकोर वहीच्या कागदावर एका बाजूला कांहीं उदाहरणें सोडविलेलीं होतीं अन् दुसऱ्या बाजूला ही कविता लिहिलेली होती. माझी समजूत आहे कीं एखाद्या इंग्रजी कवितेचें हें रूपांतर असावें. कारण 'कोठें आणि कधीं तरी जगतिं मी होऊन गेलों असे' असा आपला मृत्युलेख 'अज्ञाता'ला लिहिण्याची पाळी येईल एवढे गडकरी स्वतःच्या सामर्थ्याबद्दल अज्ञानी नव्हते.

येथपर्यंत या संग्रहांतील काव्याचें स्थूल विवेचन केल्यानंतर, आतां मराठी वाङ्मयांत कवि म्हणून गडकऱ्यांचें स्थान कोणतें ह्या प्रश्नाचा विचार ओघानेंच येतो. गडकऱ्यांच्या काव्यावर आजपर्यंत अनेक टीकाकारांनीं भाष्यें केलीं. पण गडकऱ्यांच्या काव्यगुणांचें यथार्थ मूल्यमापन करणारा टीकाकार अजूनहि कांहीं मला पहावयाला मिळाला नाहीं. गडकऱ्यांसंबंधीं नाना तऱ्हेचे पूर्वग्रह मनामध्यें बाळगून पुष्कळशा टीकाकारांनीं त्यांच्या काव्याचें परीक्षण केलेलें आहे. गडकऱ्यांच्या काव्याचे पहिले टीकाकार माडखोलकर. पण ते त्यांच्या काव्यावर टीका लिहावयाची सोडून स्वतःचेंच काव्य रचीत बसले. वयानें आणि बुद्धीनें अत्यंत अपरिपक्व असतांना माडखोलकरांनीं 'आधुनिक कविपंचक' हें पुस्तक लिहिलें. म्हणून केवळ कौतुकापलीकडे त्या पुस्तकाकडे अधिक गांभीर्यानें बघण्याचें कारण नाहीं.

त्यानंतर गडकऱ्यांच्या संपूर्ण काव्याचें परीक्षण करण्यासाठीं म्हणून प्रा. रा. ग. हर्षे ह्यांनीं 'गोविंदाग्रज' हें स्वतंत्र पुस्तक लिहिलें. प्रा. हर्षे ह्यांनीं हें पुस्तक लिहितांना पुष्कळच श्रम घेतले आणि गडकऱ्यांच्या काव्याची खूपच उलथापालथ केली. पण काव्य कशाशीं खातात ह्याचें सामान्यज्ञान सुद्धां प्रा. हर्षे ह्यांना नाहीं. काव्याचें विश्लेषण करण्याची त्यांची पद्धति किती हास्यास्पद आणि अडाणीपणाची आहे याचे दोनचार नमुने मागें मीं दिलेच आहेत. गडकऱ्यांच्या काव्याचें परीक्षण करण्याऐवजीं त्यांनीं त्याचा 'पंचनामा' केलेला आहे. काव्यपरीक्षण कसें करूं नये ह्याचा प्रा. हर्षे ह्यांनीं 'गोविंदाग्रज' पुस्तक लिहून एक वस्तुपाठ दिला आहे म्हणाना.

वि. स. खांडेकरांनीं आपल्या 'गडकरी' ह्या तीनशें पानी पुस्तकांत त्यांच्या काव्यावर सोळा-सत्रा पानें खर्ची घातलीं आहेत. तथापि, माडखोलकरांप्रमाणें टीका करण्याऐवजीं खांडेकरांनीं स्वतःचेंच काव्य रचण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'चार बंधूंपैकीं गडकरी नांवानें राम असले तरी अनुक्रमानें लक्ष्मण होते' असल्या शुष्क कोट्या करून का एखाद्या थोर कवीच्या व्यक्तिमत्त्वाचें वा वाङ्मयाचें मूल्यमापन होऊं शकतें ? 'गडकऱ्यांच्या कवितेंत कल्पनाविलासाच्या मानानें रसोत्कटता कमी' हा त्यांचा निष्कर्ष अगदीं सकृद्दर्शनींच एकांगी वाटतो. हा आरोप कोल्हटकरांच्या लेखनावर

फार तर करतां येईल. शृंगार, करुण आणि हास्यरस ज्या गडकऱ्यांच्यापुढें हात जोडून सदैव सिद्ध असत त्यांच्या काव्यांत रसोत्कटता कमी असें म्हणणें कसें वाजवी होईल? गडकऱ्यांच्या स्फुट काव्यांत त्यांचें चरित्र बघूं नये अशी सावधगिरीची सूचना देत देत स्वतः खांडेकरांनीं मात्र त्यांच्या 'वैयक्तिक दोषांबद्दल सहानुभूति वाटते' असें सांगून त्यांची सर्वांत जास्त बदनामी केली आहे.

प्रा. रा. शं. वाळिंबे ह्यांनीं गडकऱ्यांच्या कवितांचें 'रसोद्ग्राही' विवेचन करण्यासाठीं 'गडकऱ्यांचें अंतरंग' हें प्रदीर्घ पुस्तक लिहिलें. प्रा. वाळिंबे ह्यांच्या अंगीं रसिकता आहे आणि काव्याचें वाङ्मयीन मूल्यमापन कसें करावें हें तंत्रहि त्यांना उत्तम अवगत आहे. पण गडकऱ्यांच्या काव्यांतून त्यांच्या चरित्रांतलीं रहस्यें शोधून काढण्याच्या त्यांच्या अतिरिक्त हव्यासामुळें हें त्यांचें विवेचन 'रसोद्ग्राही' व्हाव-याच्या ऐवजीं 'रहस्योद्ग्राही' झालें आहे. त्यांच्या पुस्तकांतलें हें लहानसेंच उदा-हरण घ्या. 'अरुण' कवितेमध्यें गडकऱ्यांनीं कल्पनेचा अतिरेक केला असें सांगतांना प्रा. वाळिंबे म्हणतात, "खाजगी जीवनांतसुद्धां हाच विलक्षण अतिरेक गडकऱ्यांनीं प्रत्येक बाबतींत दाखविला. या अतिरेकी स्वभावामुळें संयम ही गोष्टच गडकऱ्यांना माहीत नव्हती. 'अतिरेक–सर्वत्र अतिरेक' हें गडकऱ्यांच्या जीवनाचें सार आहे."

खाजगी जीवनांत गडकरी अतिरेकी होते, त्यांना संयम माहीतच नव्हता ही गोष्ट प्रा. वाळिंबे ह्यांना कोणीं सांगितली? गडकऱ्यांचें जीवन जणूं कांहीं सारें आपल्या डोळ्यांपुढें घडलें अशा आविर्भावानें वाळिंबे जें बोलतात, त्याचें मला मोठें आश्चर्य वाटतें. गडकरी खाजगी जीवनांत अतिरेकी होते हा त्यांच्या शत्रूंनीं त्यांच्याविरुद्ध केलेला द्वेषमूलक प्रचार होय. त्यावर विश्वास ठेवून वाङ्मयीन निष्कर्ष टीकाकारांनीं काढीत बसावें, हा कोणत्या मुलखाचा शहाणपणा? आणि घटकाभर असें समजलें कीं, गडकरी हे जीवनांत अतिरेकी होते, तरी त्यामुळें आपल्या वाङ्मयांतहि ते अतिरेकी झाले हा निष्कर्ष कसा निघतो? डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर हे खाण्याच्या कामीं अत्यंत अधाशी आणि अविचारी होते. म्हणून काय ते दुर्गुण त्यांच्या लिखनामध्यें प्रतिबिंबित झाले आहेत असें कोणाला म्हणतां येईल काय? सर्वत्र अतिरेक हें गडकऱ्यांच्या जीवनाचें सार हें जें वाळिंब्यांनीं काढलेलें आहे, तें त्यांच्या वैचारिक गोंधळाचें निदर्शक आहे. अतिरेक नव्हे! उत्कटता हें गडकऱ्यांच्या जीवनाचें सार आहे बरें वाळिंबे! (वेटा देहू, भाषा नेहमी वेतशुद्ध असावी!)

माडखोलकर आणि खांडेकर ह्यांच्याप्रमाणेंच टीका करतांना काव्य रचण्याची वाळिंबे ह्यांनाहि पण हुक्की आलेली आहे. हा त्यांच्या लिखनाचा एक नमुना पहा. "गडकऱ्यांच्या करुणासंकुल जीवनावर काळाचा पडदा पडूनहि बत्तीस वर्षें लोटलीं. समुद्राच्या किनाऱ्यावर पाण्याखालीं वाळूचे कण झरझर निघून जातात, त्याप्रमाणें दिवसहि पाहतां पाहतां निघून जातात. 'हाय काय परि त्यानें' या भास्करराव

ताम्ब्यांच्या उक्तींत व्यक्त झालेलें पर्युत्सुकत्व प्रत्येक भावनावश मनाला व्यथित करीत असलें आणि ' निर्मल दंवकण जैसे गेले धरितां धरितां ते उडुनी ' ह्या विचारानें आपण कष्टी होत असलों, तरी गडकऱ्यांनीं कवि व नाटककार या दृष्टीनें मिळविलेलें यश या काळांत प्रतिपदेच्या चंद्राप्रमाणें वाढतच गेलेलें दिसून येईल. "

" गडकऱ्यांना जाऊन बत्तीस वर्षें झालीं तरी कवि व नाटककार ह्या दृष्टीनें त्यांचें यश एकसारखें वाढतच गेलेलें आहे. " एवढें साधें वाक्य लिहिण्याऐवजीं वाळिंब्यांनीं त्यासाठीं दोन अवतरणें आणि दहा वाक्यें खर्ची टाकलीं आहेत. आणि शब्दांचा एवढा अतिरेक करून शेवटीं हे वाळिंबे गडकऱ्यांनाच ' अतिरेकी ' ठरवतात ! हा चांगला न्याय आहे कीं नाहीं ? वाक्यांची वारेमाप उधळपट्टी आणि स्वतःच्या विद्वत्तेचें नि व्यासंगाचें प्रदर्शन करण्यासाठीं सर्वत्र उधळलेलीं अवतरणें ह्यामुळें वाळिंबे ह्यांचें पुस्तक भारी लांबलचक आणि कंटाळवाणें झालें आहे. शंभर पानांत त्यांना जी गोष्ट सांगतां आली असती, तिच्यासाठीं त्यांनीं तीनशें पानें खर्च केलेलीं आहेत.

कवीवर टीका करावयाची झाल्यास ती काव्यमय भाषेंत करावयाला हवी ही मराठी टीकाकारांची कोणी समजत करून दिली आहे कुणास ठाऊक ! ह्या न्यायानें गायनाच्या टीकाकारानें गातगात नि नृत्याच्या टीकाकारानें नाचत नाचत बोलावयाला हवें. गडकऱ्यांचें चारित्र्य संशयास्पद होतें, ते व्यसनी होते, अतिरेकी होते, वैषयिक होते, प्रेमनिराशेनें त्यांचें सर्व जीवन झांकळून गेलें होतें, त्यांचें जीवन कंटकमय, अपेशी व कारुण्यपूर्ण होतें, हे गडकऱ्यांच्या चरित्रासंबंधीं अनेक टीकाकारांनीं काढलेले निष्कर्ष खोटे तर आहेतच, पण त्यांच्या काव्याचें मूल्यमापन करण्याच्या दृष्टीनें ते सर्वस्वी अनावश्यक आहेत. प्रा. माटे ह्यांच्यासारख्या प्रबुद्ध टीकाकारांचा ह्याच पूर्वग्रहामुळें गैरसमज होतो आणि ' मुरली 'सारख्या शुद्ध प्रेमाच्या स्तोत्रांतहि ' इंद्रियसुखांचीं विलासवर्णनें वाचावयास लोभावलेल्यांना मनसोक्त डुंबावयास सांपडेल असा माजोरी रस' त्यांना दिसूं लागतो.

मराठी कवितेमधील गडकऱ्यांचें स्थान निश्चित करतांना केवळ त्यांच्या काव्यांतील गुणदोष विचारांत घ्यावयास हवेत. गडकऱ्यांनीं पुष्कळशीं प्रेमकाव्यें केलेलीं आहेत. म्हणून कांहीं टीकाकारांनीं त्यांना ' प्रेमाचे शाहीर ' ही पदवी बहाल केलेली आहे. पण तेवढ्यानें कांहीं त्यांच्या कवितेचें यथार्थ वर्णन होऊं शकणार नाहीं. गडकरी हे कांहीं केवळ ' प्रीतिदेवीच्या पायांतला घुंगुरवाळा ' नव्हते. आपल्या काव्याचें थोडेंसें वैशिष्ट्य ' नवशब्दांचे घुंगुर बांधुनि रसवंती माझी ' ह्या ओळींत त्यांनीं स्वतःच प्रकट केलेलें आहे. गडकऱ्यांच्या रसवंतीच्या पायांत केवळ नवशब्दांचेच घुंगुर आहेत असें नाहीं, तर तिच्या मस्तकावर नव कल्पनांचा तेजस्वी शिरपेंचहि पण झळकतो आहे, तिकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं.

नवशब्द आणि नवकल्पना हें गडकऱ्यांच्या काव्याचें स्वरूप असलें तरी उत्कट

भावना त्यांच्या काव्याचा आत्मा आहे. त्यामुळें महाराष्ट्रांतल्या इतर सर्व कवींच्या काव्यापेक्षां गडकऱ्यांचें काव्य एकदम उठून दिसतें. केशवसुत, बालकवि, तांबे किंवा चंद्रशेखर ह्यांचें काव्य गुणांच्या दृष्टीनें गडकऱ्यांपेक्षां सुतरामहि कमी नाहीं. किंबहुना कांहीं बाबतींत ते गडकऱ्यांपेक्षांहि उजवे आहेत. तथापि, ह्या सगळ्यांच्या कविता जर एका ओळीनें उभ्या राहिल्या तर रसिकांचें लक्ष प्रथम गोविंदाग्रजांच्या कवितेकडे जाईल यांत काय संशय ? त्यांच्या कवितेचा ढंग, नखरा अन् दिमाखच मुळीं निराळा आहे. नाविन्यानें ओथंबलेलें असें उत्कट काव्य मराठींत कोणीहि लिहिलेलें नाहीं. यामुळें गडकऱ्यांचें मराठी कवितेमधलें स्थान अगदीं स्वतंत्र आहे.

'गुलाबी कोडें', 'राजहंस' किंवा 'मुरली' ह्या कविता गडकऱ्यांच्याखेरीज दुसऱ्या कोणी लिहिल्या असत्या अशी कल्पनाच करवत नाहीं, इतकें गडकऱ्यांच्या प्रतिभेचें वैशिष्टय त्यांत प्रभावीपणें व्यक्त झालेलें आहे. केशवसुतादि कवींच्या काव्यांतलें सौंदर्य अंतर्मुख आहे. त्याचा यथार्थ प्रत्यय प्रथमदर्शनींच येत नाहीं. त्याच्याशीं जसजसा आपला परिचय वाढत जाईल, तसतसा त्याचा अनुभव येतो. त्याच्या उलट गडकऱ्यांच्या काव्याचा परिणाम होतो. प्रथमदर्शनींच आपण त्याच्या प्रेमपाशांत पडतों, एवढें त्याचें सौंदर्य बहिर्मुख आहे. गडकऱ्यांच्या काव्यांत दोष नाहींत असें नाहीं. अर्थात् आजपर्यंत टीकाकारांनीं जे दाखविले त्यापेक्षां ते निराळे आहेत. पण त्यांच्या गुणांच्या झगझगाटांत ते दोष लपून जातात.

गडकऱ्यांचीं कांहीं काव्यें हीं मराठी भाषेचीं तर अमर भूषणें म्हणून आज समजलीं जातात. विविध सामर्थ्याचे आणि प्रतिभेचे अनेक मोठे कवि महाराष्ट्रांत आजपर्यंत होऊन गेले आणि पुढेंहि होतील. पण 'नवनवोन्मेषशाली प्रतिभेचा एकमेव कवि' म्हणून गोविंदाग्रजांची कीर्ति मराठी साहित्यांत चिरकाल टिकून राहील ह्यांत मुळींच संशय नाहीं.

—प्र. के. अत्रे

[illegible]

[illegible]

[illegible]

# प्रेमसंन्यास

# प्रेमसंन्यास

## अंक पहिला

### प्रवेश पहिला

[ बाबासाहेब, तात्यासाहेब व कमलाकर आगगाडीची वाट पहात आहेत. ]

बाबा : तीन घंटा तर झाल्या! ही तिसरीच घंटा ना? पण गाडीचा अजून पत्ता नाहीं. तात्या, गाडीची वेळ तर बदलली नाहीं ना?

तात्या : छे, छे, वेळ बदलली असेल तर घंटा कशाला होतील? हिंदु लोकांच्या गचाळपणाला हंसतां हंसतां साहेबलोकांनींही अखेर तोच मार्ग पत्करिला आहेसें दिसतें. कमलाकर, तपास करा बरें काय झालें आहे त्याचा.

कमलाकर : इथून विचारून जमायचें नाहीं. तात्यासाहेब, आपण आणखी बाबासाहेब इथेंच थांबा कांहीं वेळ. मी त्या बाजूला जाऊन तपास करितों.

[ जातो. ]

बाबा : तात्या, तुझ्याशीं मघांपासून बोलेन बोलेन म्हणतों, पण अजून धीर होत नाहीं; माझें बोलणें ऐकून तुला कदाचित् विषाद वाटेल.

तात्या : विषाद! मला आपल्या बोलण्याचा विषाद कधींच वाटत नाहीं. बाबासाहेब, आपल्यांतल्या सामाजिक मतभेदामुळें आपल्या दोघांच्या विचारांत इतकें अंतर पडत गेलें, पण म्हणून आपल्या बालपणाच्या बंधुभावांत अंतर पडलें आहे का? काय सांगावयाचें असेल तें मोकळ्या मनानें सांगा.

बाबा : त्या मतभेदाबद्दलच मी बोलणार आहें. सुशील आणि लीला यांच्यावर–निदान लीलेवर–सुशीलेबद्दल मला फारसें भय वाटत नाहीं; पण लीला मात्र, तुला ठाऊकच आहे–जरा अल्लड आहे; म्हणून तिच्यावर नीट लक्ष ठेवून—

तात्या : म्हणजे माझ्या वीणेचा पिता या नात्यानें माझी जबाबदारी तरी मला कळत नाहीं किंवा वीणा आणि लीला – सुशीला ह्यांच्यांत मी अंतर तरी करितों असेंच तुमचें म्हणणें दिसतें !

बाबा : पहा ! माझा हेतु न समजतां रागावलास खरा ! अविवाहित वीणेपेक्षां वैधव्यदशेंत पडलेल्या लीला आणि सुशीला ह्यांच्याकडे विशेष लक्ष द्यायला पाहिजे. ह्यांत अंतराचा प्रश्न मुळींच नाहीं. पाश्चिमात्य सुधारणेच्या गोष्टी ऐकून अविवाहित मुलगी फार झालें तर प्रीतिविवाहाचे चार करील – तें सुद्धां वाईटच म्हणा! – पण अल्लड बालविधवा मात्र पुनर्विवाहाबद्दलची सारखी बडबड ऐकून —

तात्या : काय ? बडबड म्हणतां ?

बाबा : नाहीं; केवळ बडबड नाहीं. पण तो प्रश्न पुढच्या पिढीनें सोडवावयाचा आहे. पण आज, दोन विधवा मुली म्हणजे उरावर दोन जळत्या शेगड्या समजणारीं जी विचारीं माणसें आहेत त्यांपैकींच मी आहें; तशांतून आजच जयंत आणि त्याचा मित्र विद्याधर दोघेही यावयाचे आहेत.

तात्या : म्हणजे ? मी नाहीं समजलों आपलें म्हणणें ! जयंत आपला सख्खा भाचा, आणि त्याच्या येण्यानें आपलें मन साशंक व्हावें, हें अगदीं चमत्कारिक आहे ! आणि त्याचा मित्र विद्याधर – केवळ जयंताचा तो मित्र आहे हीच गोष्ट त्याच्या चांगुलपणाची पुरेशी साक्ष आहे.

बाबा : तात्या, किती भलता विपर्यास केलास माझ्या बोलण्याचा ! जयंत आणि विद्याधर यांच्याबद्दल सुद्धां माझ्या मनांत अगदीं आदरच आहे; मी सुद्धां त्यांच्यासाठीं आजचा दिवस इथें रहाणार होतों; पण दवाखान्यांत बरेच नवीन रोगी आले आहेत असें माझ्या हाताखालच्या मनुष्याचें निकडीचें पत्र आल्यामुळें मला राहतां येत नाहीं. शिवाय तेही वकिलीची सनद काढून आतां नेहमींच इथें रहाणार आहेत. माझ्या बोलण्याचा उद्देश अगदीं निराळा होता.

तात्या : कोणता तो ? माझ्या अजून लक्षांत येत नाहीं !

बाबा : पहिल्यानें भलताच तर्क केल्यामुळें तुझ्या विचाराची नसती दिशाभूल झाली. मी एवढेंच म्हणत होतों कीं, तुमच्या घरीं सदैव सुधारणेबद्दल

वादविवाद चालतात, तो वसंतराव, त्याची बहीण ती दुमन, तुझी वीणा, हा कमलाकर, सारेच सुधारक; त्यांत आणखी जयंत आणि विद्याधर ह्यांची भर पडली म्हणजे सुधारणा, पुनर्विवाह यांखेरीज विषय निघणार नाहीं बोलण्यांत! जयंत शहाणा, समजूतदार असला तरी मोठा उतावळा, सहृदय आणि थोडासा अविचारी आहे. तो केव्हां काय बोलेल ह्याचा नेम नाहीं. आणि तशांतून स्त्रीपुरुषांच्या अशा स्वैर संभाषणाला तुझें पूर्ण अनुमोदन! तेव्हां लीला-सुशीला ह्यांच्यावर अशा बोलण्याचा अनिष्ट परिणाम व्हावयाचा!

तात्या : अनिष्ट परिणाम तो कोणता? पुनर्विवाह हाच ना? मग आपल्याला जें अनिष्ट तेंच मला इष्ट वाटतें! त्यांच्यावर पुनर्विवाहाला अनुकूल परिणाम झाला, तर मी उलट त्यांत आनंद मानीन!

बाबा : पण तशा प्रकाराला माझी मुळींच संमति नाहीं! पुनर्विवाहाचा प्रघात नसल्यामुळें समाजाची मोठी हानि होते आहे असें मला मुळींच वाटत नाहीं! मी पुनर्विवाहाला अजून पहिल्याइतकाच विरुद्ध आहें. तूं जरी माझा सख्खा भाऊ असलास तरी आपल्या वयांमध्यें निदान पंधरा वर्षांचें म्हणजे जवळ जवळ एका पिढीचें अंतर आहे, तेंच आपल्या विचारांतही आहे.

तात्या : जरा स्पष्ट बोलतों, रागावूं नका! इंग्रजी ज्ञानाच्या अंजनानें आमच्या पिढीचे जसे डोळे उघडले तसे तुमच्या जुन्या पिढीचे उघडले नाहींत याचें राहून राहून मोठें नवल वाटतें.

बाबा : यांत मुळींच नवल वाटावयाला नको. नव्या मंडळीचे डोळे उघडले खरे; पण ते इतके एकदम उघडले कीं, ते अगदीं वटारल्यासारखे दिसूं लागले; आणि त्या भयानें जुन्या पक्षानें आपले डोळे एकदम मिटून घेतले. नव्या पक्षानें अगदीं विलक्षण आचारभ्रष्टता करून आपल्या सुधारणेचा केवळ अनिष्ट परिणामच दाखविला नसता तर जुन्या पिढीनेंही सुधारणेकडे अशी डोळेझांक केली नसती. पण नव्या लोकांनीं सरसकट 'नवें तें हवें' असा हेका धरिला तेव्हां अर्थातच आघाताइतक्याच नेटाच्या प्रत्याघातामुळें 'जुनें तें सोनें' असा जुन्या लोकांनीं आग्रह धरिला. तीव्र मतभेदामुळें कोठींत गोडी असते ह्याचें कोणालाच भान राहिलें नाहीं. आणि शेवटीं पहिल्या पिढींतल्या सुधारकांच्या स्वैर वर्तनामुळें सुधारणेला अनिष्ट स्वरूप मिळत गेलें.

तात्या : हें मात्र खरें. पहिल्या पिढीच्या पुढाऱ्यांनीं सुधारणेची वेल रूढीच्या कांटेरी कुंपणावरूनच जपून समाजवृक्षावर चढविली असती, तर आज तिला आचाराचीं सुंदर फुलें खास आलीं असतीं. पण अनुकरणाच्या आंधळेपणानें

त्यानीं तिला वऱ्च्यावर टाकून समाजवृक्षावर चढवितांना घाईनें खालीं पाडून मातीला मात्र मिळविली. पण बाबासाहेब, आतां त्या गोष्टीचा आपणांवर परिणाम व्हावयाला नको आहे. पुनर्विवाहासारख्या इष्ट सुधारणेला आपण आड येणें फारच अनिष्ट आहे.

**बाबा :** माझा स्वभाव तुला ठाऊकच आहे. प्रत्यक्ष प्रमाणाच्या पुराव्याखेरीज माझ्या मतांत बदल होणें शक्य नाहीं. पुनर्विवाहावरचे माझे आक्षेप इतक्या घाईनें सांगतां येण्याजोगे नाहींत; पण मी पुनर्विवाहाच्या विरुद्ध आहें, इतकेंच नाहीं तर तुझ्या घरांतल्या ह्या स्त्री-पुरुषांच्या स्वैर संमीलनाच्याही मी विरुद्ध आहें. आणि त्याला कांहीं आळा घालावा एवढ्यासाठींच मी हा विषय मुद्दाम काढला.

**तात्या :** क्षमा करा, स्त्री-पुरुषांच्या निर्दोष संमीलनांत जो दोष दिसतो तो आनुवंशिक दृष्टीचा दोष आहे.

**बाबा :** हें म्हणतांना तूं आमच्या समाजावर दृष्टि टाकली नाहींस. स्त्री-पुरुषांच्या अशा अनियंत्र सहवासानें समाजांत अतिरेकाचे परिणाम झालेले दिसून येत नाहींत का ?

**तात्या :** कुठें कुठें असें होणारच ! कोणताही निर्बंध एकदम मोडायचा म्हटलें म्हणजे थोडासा अतिरेक हा ठरलेलाच ! कोंडलेला नदीचा प्रवाह एकदम सुटतांच प्रथम जोराच्या वेगानें वहायचा ! त्याला आपली तयारी पाहिजे !

**बाबा :** मग ह्या प्रकाराला आळा घालण्याची तुझी तयारी नाहीं म्हणतोस ?

**तात्या :** नाहीं, मुळींच नाहीं; तुमच्याच शब्दांची पुनरुक्ति होईल, पण प्रत्यक्ष प्रमाणाच्या पुराव्यावाचून माझें मत मुळींच बदलावयाचें नाहीं. इतकेंच नाहीं तर इष्ट सुधारणेला संशयाचा सुद्धां मी फायदा देईन. आपल्या मंडळींच्या शुद्धाचरणाबद्दल माझी खात्री आहे, तोपर्यंत मी त्यांच्या एकजागीं उठण्या-बसण्याविरुद्ध एक अक्षरही बोलणार नाहीं. उलट उत्तेजन देईन. पण त्यांपैकीं एकाद्याचें वर्तन जरी काडीइतकें निराळें दिसलें तर मात्र त्यांना एकमेकांशीं एक अक्षरही बोलूं देणार नाहीं.

**बाबा :** बरें, तें कांहीं असो; सध्यां लीला आणि सुशीला यांच्यावर माझ्या दृष्टीनें लक्ष ठेव म्हणजे झालें.

**तात्या :** त्याबद्दल तुम्ही निर्धास्त रहा !

[ कमलाकर हमालासह घाईनें प्रवेश करितो. ]

**कमलाकर :** बाबासाहेब, जरा घोंटाळा झाला ! गाडी आज त्या बाजूला येणार.

आपण दोघे या हमालाबरोबर पुढें व्हा ! तोंपर्यंत मी सामानाजवळ उभा राहतों. (हमालास) हं, उचल तें सामान आणि पुन्हां लवकर ये.

[ हमाल, बाबासाहेब व तात्यासाहेब जातात. ]

कमलाकर : ( स्वगत ) काय दैवयोग पहा ! या बाबासाहेबांची त्या पोरीवरची देखरेख कमी होऊन माझ्या कर्तबगारीला थोडी सवड मिळणार तोंच माझा लहानपणापासूनच प्रत्येक बाबतींत प्रतिस्पर्धी तो जयंत आतांच येणार ! आणि तात्यासाहेबांच्या सुधारणेचा फायदा त्याला मिळणार. या साऱ्या छबेल्या त्याच्यावर कशा आजन्म फिदा झालेल्या दिसतात. त्यामुळें शेवटीं हा जयंत या गोपींनीं भरलेल्या गोकुळांत कृष्णाचे खेळ करणार आणि कृष्णविरहित गोपी आपल्यासाठीं धुंडाळण्याचा निष्फळ प्रयत्न करून थकलेल्या नारदाप्रमाणें मला कलागतीवर भिस्त ठेवावी लागणार ! [ हमाल येतो. ]

हमाल : चला रावसाहेब लौकर; गाडी आली.

[ दुसऱ्या बाजूस गाडी येतांना दिसते. कमलाकर व हमाल घाईघाईनें जातात. पडदा पडतो. ]

## प्रवेश दुसरा

[ गोकुळचें घर. गोकुळ सचिंत उभा आहे. ]

गोकुळ : आतां या विसराळूपणाला काय करावें ! अगदीं घटकेची सुद्धां आठवण रहात नाहीं ! कोणकोणतीं कामें करावयाचीं आहेत त्यांची आठवण राहण्यासाठीं उपरण्याला या गांठी मारून ठेवल्या. पण आतां कोणती गांठ कशासाठीं हेंच विसरलों. मला स्मरणशक्ति द्यावयाला ब्रह्मदेव अजिबात विसरला कीं काय ? चांगला पोषाख घालून कुठें जावयाला निघालों तों कुठें जावयाचें याचाच विसर पडला ! म्हणून तिला तरी विचारून पहावें एवढ्यासाठीं पुन्हां परतून आलों; बाकी ती सांगेल कीं नाहीं याचा संशयच आहे. हा विसराळूपणा आणि ही कजाग बायको या दोहोंनीं माझ्या जन्माचें इथेंच सार्थक झालें आहे. कोणतीही गोष्ट विसरायचें मी विसरत नाहीं ! आणि कोणतीही गोष्ट विसरल्याबद्दल रागवावयाचें ती विसरत नाहीं ! वाहवा ! गोकुळ, धन्य तुझा संसार ! पण अशा विचारांत वेळ घालवून उपयोगी नाहीं. नाहीं तर पुन्हां घरीं कशा-

साठीं आलें याचाच विसर पडेल! त्याची आठवण आहे तोंच तिला हांक मारावी! अग ऐकलेंस का? जरा इकडे ये पाहूं. ऐकलेंस का? ए!

[ पडद्यांत मथुरा ओरडते ' ऐकलें हो. आलें; जरा थांबा. ' ]

गोकुळ : आतां हांका मारण्याचा सपाटा सुरू ठेवावा! नाहीं तर थोडा उशीर झाला म्हणजे तिला कदाचित् येथें येण्याची आठवण राहणार नाहीं. आलीस का? अग ए ऐकलेंस का? अग ए—

[ मथुरा हात पुसीत बाहेर येते. ]

मथुरा : काय, झालें काय एकसारखें ओरडायला! जरा हात धूत होतें तर पन्नास हांका झाल्या. वाघ का पाठीस लागला आहे तुमच्या?

गोकुळ : तशांतला कांहीं प्रकार नाही! तूं अशी सदा हात धुऊन पाठीस लागल्यावर वाघाला सवड कोठून मिळणार? म्हटलें, कामामुळें पहिल्या हांकेची तुला आठवण राहणार नाहीं—

मथुरा : न राहावयाला काय झालें आहे मला? आपल्यासारखेंच का जग आहे सारें?

गोकुळ : बरें, तें असो. काय विचारणार होतों मी तुला?—राहिलेंस, हें असें होतें.

मथुरा : काय हें? आपल्याला आपल्या नांवाचा विसर कसा पडत नाहीं याचें—

गोकुळ : तूं माझ्या नांवानें नेहमीं खडे फोडीत राहिली नसतीस तर खात्रीनें मी नांव सुद्धां विसरलों असतों. आठवण म्हणून कशी ती रहात नाहीं!

मथुरा : आठवण रहात नाहीं तर उपरण्याला खूणगांठ बांधावी एखादी.

गोकुळ : ही बघितलीस खूणगांठींच्या फुग्यांनीं उपरण्याची कशी सुतपुतळी झाली आहे ती!

मथुरा : हें काय? माझी आपली गांठ पडली आहे म्हणूनच आपली अब्रू ठिकाणावर आहे. इतक्या का गांठी देतात कुठें? करायचें तें भारीच! आतां देशमुखांच्या येथें चार माणसें जमणार आणि तेथें असें सोंगासारखें—

गोकुळ : शाबास, हेंच विचारणार होतों! देशमुखांकडे जायला निघालों होतों हेंच वाटेंत विसरलों! एकूण अंगवस्त्राच्या गांठीपेक्षां लग्नगांठच बरी म्हणायची!

[ एक गांठ सोडतो. ]

मथुरा : बरें, मघाशीं तें सामान आणायला सांगितलें त्याचें काय झालें?

गोकुळ : काय व्हायचें! हेंच झालें! वाण्याच्या दुकानापर्यंत गेलों आणि काय आणावयाचें तें विसरलों!

मथुरा : बाई, बाई, बाई, हद्द झाली आतां! शेरभर साखर आणि तोळाभर

केशर एवढेंसुद्धां विसरलां ना ?

गोकुळ : जिनसा लक्षांत होत्या, पण शेरभर साखर आणि तोळाभर केशर, कीं तोळाभर साखर आणि शेरभर केशर ह्याचा निर्णय होईना, तेव्हां टाकलें तें उद्यांवर काम.

मथुरा : तें नाहीं चालायचें; आधीं सामान आणा नाहीं तर आज चूल बंद ! रात्रीं जेवायला कांहीं मिळायचें नाहीं.

गोकुळ : बरी आठवण केलीस ! मला आज देशमुखांकडे पाहुण्यांच्या पंक्तीला बसावयाचें आहे हें मी विसरलोंच होतों ! आतां तुला वाटेल तर ठेव चूल बंद !

मथुरा : मी म्हणतें सामान आधीं आलेंच पाहिजे ! मग जायचें होतें कोठें भीक मागावयाला. आणखी ऊठपाय देशमुखांकडे काय असतें हो तुमचें ?

गोकुळ : काय असतें म्हणजे ? आज लहानपणापासून त्यांनीं मला वाढविला, लिहायला वाचायला शिकविलें, संसार थाटून दिला आणि म्हणे तिथें काय असतें ? मोठी शहाणीच कीं नाहीं तूं ? घरांत काय वाटेल तें कर ! आज तिकडे पाहुणे येणार, चार माणसें जमणार, आणि मी गेलों नाहीं तर–

मथुरा : तर, तर, अडून बसेल त्यांचं अगदीं ! हें पहा, तुम्हांला जर माझा छळ करावयाचा असेल तर मी जातें आपली माहेरीं. माझ्या बापाच्या येथें अन्न-वस्त्राला कांहीं तोटा नाहीं.

गोकुळ : वाः ! तुझा बाप म्हणजे हजारांचा पोशिंदाच कीं नाहीं ! त्याच्या खाणावळींत रोज दोनशें पान जेवून उठतें. तेव्हां अन्नाला कांहीं तोटा नाहीं खरा ! पण सात रुपये महिना तूं कोठून देणार ?

मथुरा : इतकें हिणवायला नको कांहीं; माझी आई खंबीर आहे मला पोसायला ! म्हशीचीं शिंगं म्हशीला कांहीं जड होत नाहींत !

गोकुळ : मग लग्नाची तरी उठाठेव कशाला केली ? म्हणजे त्या म्हशीचीं शिंगें माझ्या डोक्यावर तरी बसलीं नसतीं.

मथुरा : लग्न तरी कुठें करणार होते माझें ! पण हळदकुंकवाला आधार म्हणून–

गोकुळ : म्हणून माझ्या गळ्यांत तुझ्या माळेची तांत बांधली वाटतें ? मग तुला जेजुरीच्या खंडोबाची मुरळी केली असती तर भंडार भरपूर नसता का मिळाला ? पण मग ही ब्याद कशी निघाली असती घरांतून ? म्हणे मी त्यांना जड नाहीं ! इतका उदार तुझा बाप असता तर मग दिवाळसणासाठीं तुला न् मला महिनाभर ठेवून घेऊन अखेर नऊ रुपये दरमहाप्रमाणें दोघांचा अठरा रुपये आकार कां केला असता माझ्यावर ? त्यानें केला दिवाळसण

पण माझें निघालें दिवाळें !

मथुरा : आपल्यासारख्या दिवाळखोराला असेंच पाहिजे. एरवीं मी एकटी गेलें म्हणजे माझा मानपानसुद्धां ठेवतात सारीं माणसें ! इतकीं माणसें असतात आमच्या बाबांच्या खाणावळींत, पण माझ्याखेरीज पान हलत नाहीं.

गोकुळ : खरेंच पान हलत नसेल ! खाणावळींतलीं दोनदोनशें पानें हलवायाला तुझ्यासारखी खंबीर बायकोच पाहिजे. आणि याच गुणामुळें मात्र तुझा बाप तुला अन्न तर देईलच; पण तुझ्या वाटेल त्या गुणावर पांघरूण सुद्धां घालील !

मथुरा : लाज नाहीं वाटत हो तुम्हांला असें बडबडायला ? काय माझे गुण आहेत हो असे ? खाई त्याला खवखवे ! एवढ्यासाठीं मात्र आपण जात असाल उठल्यासुठल्या देशमुखांकडे ! हो, एरवीं काय असणार दुसरें ? त्या घरच्या साळकाया तर आहेतच आणि त्या विलयती वसंतरावाची बहीण द्रुमन का कोणशी, ती एक; बया कपाळी आली पण आईबापांचें कपाळ फुटलें ! तिला तर कांहीं म्हणे दिवस लोटले आहेत ! पोरीनें पाऊल बाहेर टाकल्यापासून बापानें बाहेर पाऊल टाकायचें सोडलें आहे ! मीं सुद्धां काल पाहिलें, चेहरा अगदीं फिकट झालेला—

गोकुळ : तुझ्या तेजानें फिकी पडली असेल बिचारी ! तुझें लावण्यच आहे तसें !

मथुरा : उगीच काय हें बोलणें ? डोळे सुद्धां तिचे खोल गेले आहेत.

गोकुळ : तुला भिऊन मागें सरले असतील कदाचित् .

मथुरा : तुम्हांला त्यांच्याकडे जावें यावें लागतें तेव्हां तुम्ही करा तिची तरफदारी—

गोकुळ : बरें झालें ! मला जायची आठवण करून दिलीस, नाहीं तर —

मथुरा : उगीच तुमच्यासाठीं खोळंबा; हो, राजाची निघाली स्वारी आणि मशालजीचा म्हणे घातवार !

गोकुळ : बरें; मी येईपर्यंत ओटीवर दिवा कां ठेवीत नाहींस ? मी घर विसरून कित्येक वेळां उगीच पुढें जातों ! ठेवीत जा दिवा त्या कोनाड्यांत.

मथुरा : कशाला ? ढणढण जळून धुरानें ओटी काळी करायला ?

गोकुळ : आतां दिव्याचा धूर नको म्हणून धुराचे दिवे आणणारच आहें मी.

मथुरा : दिवे ओवाळा धुराचे दिवे आणणारांवरून ! घरांत अकलेचा उजेड—

गोकुळ : बस्स् ! हा ओवाळणीचा समारंभ आणि मुक्ताफळांचा वर्षाव बाहेर जातांना नको. नवरा परत आल्यावर बायकांनीं मुक्ताफळें उधळून त्याला दिवे

## प्रवेश तिसरा

[ सुशीला व लीला बसल्या आहेत. लीला वाचीत आहे. ]

सुशीला : लीलाताई, इतका वेळ मी इथें येऊन बसलें आहे; पण अजून तूं एक शब्दसुद्धां बोलली नाहींस. माझ्यावर रागावली आहेस वाटतें ?

लीला : काय बोलतेस ताई ! तुझ्यावर, माझ्या सुशीलाताईवर मी रागावेन ? आईच्या मागें तुझ्या लहानपणापासूनच मातृपदाच्या थोरवीनें तूं माझी जोपासना केलीस आणि तुझ्यावर रागावूं ? ताई, या काव्यरत्नावलींतली ही तांब्यांची कविता वाचली नाहींस वाटते तूं ?

सुशीला : कोणती ? ही का ? काय आहे ? " विधवेचें स्वप्न ! " मीं नाहीं वाचली अजून !

लीला ! ताई, मी सुद्धां या अनाथ विधवेशीं तद्रूप झालें होतें; माझें जागतेंपणाचें तें तंद्रीचें स्वप्न हांक मारून तूं घालविलेंस; तेव्हां मला फारच वाईट वाटलें.

सुशीला : लीले, त्या विधवेचें स्वप्नांतलें स्वप्न तें ! तिच्या दुःखमय स्थितींत जाऊन त्या स्वप्नाचा अनुभव घेऊन आपल्याला काय करायचें आहे ? तिच्या-पेक्षां आपलें स्वप्न किती चांगलें आहे !

लीला : आपलें कोणतें स्वप्न तें ?

सुशीला : या संसाराचें ! मायामोहाच्या निद्रेंत आम्याला हें संसाराचें स्वप्नच पडत नाहीं तर काय ? तेव्हां त्या विधवेप्रमाणें सौभाग्याच्या स्वप्नांतून जागें होऊन भयंकर वैधव्याची जागृति भोगीत बसायचें त्यापेक्षां आपलें हे वैधव्याचें स्वप्न संपून ईशज्योतींत एकरूप झालेल्या पतीबरोबर अखंड सौभाग्याची तेजोमय जागृति अनुभवणें किती तरी चांगलें नाही का ? त्या स्वप्नापेक्षां आयुष्याचें स्वप्न जरा लांबलचक मात्र असतें; आणि म्हणूनच त्याच्यापेक्षां याचा खरेपणा जास्त भासतो; बाकी खरें म्हटलें तर दोन्ही स्वप्नेंच ! भक्तिरूप सखीनें ही मायानिद्रा मोडल्यावर जी अक्षय्य सौभाग्यजागृति मिळेल तिच्या मानानें

हीं दोन्हीं स्वप्नें सारखींच.

लीला : ताई, तुला असें बोलतांना ऐकलें म्हणजे मला पुराणांतल्या स्त्रियांची आठवण होते आणि सावित्रीनें सत्यवानाला यमाच्या हातांतून परत आणिलें, सीमंतिनीनें चित्रांगदाचा यमुनाडोहांतून उद्धार केला, तशी तूं सुद्धां आपल्या पतीला त्या समुद्रांतून वर काढशील असें वाटूं लागतें.

सुशीला : वेडी आहेस झालें ! माझ्यावर तुझी ममता फार म्हणून तुला असें वाटतें. त्या थोर देवींची आणि माझी बरोबरी कशी होईल ! जवळचे कांचेचे दिवे आकाशांतल्या दूरच्या तारांपेक्षां जास्त तेजस्वी दिसतात म्हणून त्यांची तुलना कोण करील ? दुःख सहन करण्याचा अभ्यास करीत गेलीस तर तुला सुद्धां माझी स्थिति सहज आणितां येईल.

लीला : ताई, माझ्या स्थितीची गोष्टच बोलायला नको. आई वारल्यानंतर माझी सुशीलाताई जवळ नसती तर या भयाण जगांत माझ्याच्यानें एक क्षणभर सुद्धां राहवलें नसतें. ताई, एका आंधळ्या मुलानें प्रकाश काय असतो असें विचारलें आहे, तसेंच सुख काय असतें हें सुद्धां बालविधवेला दुसऱ्याच्या सांगीवरून कळेल तेवढेंच. ताई, मला सुखदुःखांची भिन्नता कळेनाशी होऊन दुःखाची तीव्रताच काय ती जाणवते. वरातीच्या मिरवणुकी पाहून दृष्टि भांबावून जाते. मंगलवाद्यांचा आवाज ऐकला म्हणजे पोटांत भडभडून येतें. सुखाचीं वर्णनें वाचलीं म्हणजे अंगावर शहारे येतात; आणखी ताई, रागावूं नकोस, देवांच्या मूर्ति पाहिल्या, देवींच्याजवळ असलेल्या देवांच्या मूर्ति पाहिल्या, म्हणजे तिरस्कार येतो. सर्व दिवस अगदीं एकसारखे वाटून आयुष्य म्हणजे एकाच दुःखदायक दिवसरात्रीचें चक्र वाटतें. एकच विचार, एकच स्थिति, एकच दुःख, एकटी मी—आणखी ताई मी एकटीच आहें, नाहींतर काय ? बाळपणींच्या जगांतल्या आनंदाचा आत्मा नाहींसा होऊन त्याचें आज नुसतें चित्रच मी पहात नाहीं का ? प्रत्येक वस्तूंतलें वस्तुपण नाहींसें झालें आहे ! ताई, क्षमा कर; एका गोष्टींत मात्र अजून प्रेम, जिवंत प्रेम, अगदीं या अभागिनीच्या सुद्धां हातीं लागणारें प्रेम अनुभवाला येतें; आणि तें फक्त माझ्या ताईच्या या प्रेमळ आलिंगनांतच ! ताई एकेकदां मला वाटतें कीं, आपल्या आईनें मरतांना तुझ्या देहांत प्रवेश तर केला नसेलना ! अहाहा ! ताई, पडूं दे ती आंसवें माझ्या या करपलेल्या हृदयावर ! आईचे डोळे पाण्यानें भरले म्हणजे अगदीं असेच दिसत असत. ताई, या बाल्वयांत तुझ्या अंगीं इतकें वैराग्य, वैधव्याच्या ब्रह्मचर्यात अशी आईची वत्सलता हीं कुठून

ग आलीं ?

सुशीला : लीले, यांत मीं कांहीं अधिक कां केलें आहे ? वैधव्यदुःखाचा अनुभव घेत असतांना त्याच प्रसंगांत सांपडलेली तूं दिसलीस, त्यामुळें सहजच तुझ्या ठिकाणीं मला हतभागी सुशीलाच दिसूं लागली. आणि माझ्या दुःखाच्या जाणिवेनें मी तुझ्याकडे पाहूं लागलें. तोंच तितक्यांत आईनेंहि आपल्याला सोडलं; तेव्हां तर माझें सारें लक्ष तुझ्याकडेच लागलें. तुझ्या दुःखाचा अनुभव मला तुझ्या अंतःकरणाची स्थिति पटविण्यापुरताच होऊन माझ्यावर आलेल्या जबाबदारीमुळें मन विचाराच्या स्वाधीन झालें. लीले, दुःखमय स्थितींतून परदुःखाची जाणीव झाल्यानं खरें आपलेपण सर्वांठायीं दिसून येतें आणि नसत्या आपलेपणाचा विसर पडतो.

लीला : अहाहा ! ताई, आपण जवळ जवळ एका वयाच्या, पण तूं विचारानें किती दुःखमुक्त झाली आहेस ! माझ्या विचारशक्तीचा उपयोग मला माझ्या दुःखाची तीव्रता कळण्याइतका मात्र होतो.

सुशीला : आणखी म्हणूनच, लीलाताई, तुला मी नेहमीं सांगतें कीं, तूं पुनर्विवाहाला—हूं, असें तोंड वाईट कां करितेस ? मी कांहीं हा तुझा कमीपणा समजत नाहीं. तुझ्यासारखीं अति कोमल मनाचीं माणसें प्रेमाच्या आधारा-वांचून जिवंतच रहावयाचीं नाहींत.

लीला : आतां कशाला हवी प्रेमाची गोष्ट ? पण काय ग ताई, जयंत आणि त्यांचे मित्र विद्याधर अजून कसे बरे आले नाहींत ? आज जयंत किती तरी दिवसांनीं भेटणार !

सुशीला : ( स्वगत ) प्रेमाची गोष्ट काढतांच ही शून्य दृष्टीनें पाहूं लागली आणि हिला एकदम जयंताची आठवण झाली; यावरून माझ्या मनांतला चोरटा तर्क खरा आहे असें वाटूं लागतें. देवा, या निराशेच्या प्रेमाचा खेळ कसा संपविणार आहेस, तुझें तुलाच ठाऊक ! ( उघड ) खरेंच, गाडीची वेळ तर केव्हांच होऊन गेली. बरें, आपली वीणा, त्या वसंतरावांना आणि द्रुमनला आणण्यासाठीं गेली आहे तिचाही अजून पत्ता नाहीं. पण हा पहा गोकुळ आलाच ! [ गोकुळ येतो. ]

लीला : कायरे गोकुळ, आले का जयंत ?

सुशीला : आणखी पाहुणे आहेत का बरोबर ?

गोकुळ : जरा दम खा; आधीं तात्यासाहेबांनीं सांगितलेलें काम करतों आणि मग तुमच्या प्रश्नांचीं उत्तरें देतों. नाहीं तर त्यांचें काम विसरून जाईन आणि

साराच घोंटाळा होईल. जयंत आले आहेत; पाहुणेही आले आहेत! पाहुण्यांचें नांव पहा काय आहे—

**सुशीला :** अरे, तूं पाहुण्यांचें नांव आधीं विसरणार, कीं काकांचें काम आधीं विसरणार ?

**गोकुळ :** झालें! दोन्हीं एकदम विसरलों. आतां दोहींची एकदम आठवण करणार! काय बरें? तात्यासाहेबांचें नांव काय आणि त्या पाहुण्यांचें काम काय? छे बुवा, कोणकोणत्या गोष्टी आपण विसरलों याची माणसाला आठवण राहती किनई तर काय बहार होती! पण आतां आठवणीच्या विचाराला सवड कोठून मिळणार? हे पहा, इकडून हे जयंत आणि पाहुणे आले आणि इकडून या वीणाताई, वसंतराव आणि द्रुमनताई यांना घेऊन आल्या. अगदीं नाटकी योगायोगच हा!

[ एकीकडून जयंत, विद्याधर व कमलाकर व एकीकडून वीणा, द्रुमन् व वसंत हीं येतात. ]

**वसंत :** ( कांहीं वेळ गेल्यावर, जयंतास ) वाः! जयंत, याचा काय अर्थ? पाहुण्यांचा आणि मंडळींचा परिचय अजून करून देत नाहींस याला काय म्हणावें? विलायतेंत अशा दिरंगाईला शिष्टाचार समजत नाहींत! हिंदु, अगदीं हिंदु आहेस तूं.

**जयंत :** ( वसंतास ) माफ कर बुवा, मी आहें खरा हिंदु! तुझे हे विलायती शिष्टाचार मी ताबडतोब विसरतों. विद्याधर, आमचे थोरले मामा बाबासाहेब यांच्या कन्या या सुशीला आणि लीला! यांच्या दुर्दैवाची कहाणी मीं तुम्हांला सांगितलीच आहे. या आमचे धाकटे मामा तात्यासाहेब यांच्या कन्या वीणाताई, या आमच्या घरांतल्या सुधारणेच्या अधिष्ठात्री देवताच आहेत. स्त्रियांनीं लग्न न केल्यापासून त्यांचे किती फायदे आहेत हें शिकण्यासाठीं थोडे दिवसांपूर्वी यांचा विलायतेस जाण्याचा मानस होता; पण मध्यंतरींच हे आमचे वसंतराव विलायतेहून आल्यामुळें वीणाताई यांच्या प्रेमपाशांत सांपडल्या. लौकरच यांचें वसंतरावांशीं हिंदुपद्धतीनेंच लग्न व्हावयाचें आहे.

**विद्याधर :** हिंदुपद्धतीनेंच म्हणजे? नाहीं तर दुसरी कोणती पद्धति?

**जयंत :** इंग्रजी! वसंतराव आणि वीणाताई यांना जें जें इंग्रजी तें तें मनापासून आवडतं! हिंदुजीविताला तीं दोघंही अगदीं कंटाळलीं आहेत. आमच्या शहरांतल्या सुधारणेची सारी मिस्त या वसंतरावांवरच आहे. हे नुकतेच विलायतेहून कायद्याची परीक्षा देऊन आले आहेत.

विद्याधर : विलायतेहून कायद्याची परीक्षा म्हणजे—

जयंत : समजलें; तुमचा तर्क बरोबर आहे. बरा आयताच विषय निघाला. विद्याधर, या आमच्या चिमुकल्या मित्रमंडळानें फार दिवसांपासून असा एक नियमच ठरवून टाकला आहे कीं, होतां होईतों एक भाषा बोलतांना तींत दुसऱ्या भाषेचे शब्दच आणावयाचे नाहींत. त्यांतल्या त्यांत आमच्या वसंतरावांनीं सुद्धां अजून या नियमाला मान दिला आहे हें विशेष!

विद्याधर : वाः! मी तर असा नियम मोठ्या आनंदानें पाळीन! ( द्रुमनकडे पाहून ) बरें, या कोण?

वसंत : पाहिलेंस जयंत, पुन्हां चुकलास! किती हिंदु आहेस रे! माझ्या आधीं द्रुमनताईचीच ओळख करून द्यायला पाहिजे होती! विलायतेंत अग्रपूजेचा मान नेहमीं स्त्रियांनाच द्यावा लागतो! या नियमाच्या उल्लंघनानें शिष्टाचाराच्या राज्यांत तिकडे मोठा गुन्हा केल्यासारखा होतो!

जयंत : याबद्दल मी तुझी पुन्हां क्षमा मागतों. विद्याधर, वसंतरावांच्या भगिनी या द्रुमन. दुर्दैवानें यांच्यावरही वैधव्याचा प्रसंग आलेला आहे. आणि हे आमचे कमलाकर, तात्यासाहेबांच्या शालकांचे चिरंजीव. हेही लहानपणा-पासून इथेंच असतात. असें हें आमचें लहानसें मित्रमंडळ आहे.

गोकुळ : ( स्वगत ) म्हणजे? या सुधारकांचें हें मित्रमंडळ आणि मी जुन्या मताचा म्हणून शत्रुमंडळ वाटतें? मला वाटत होतें कीं, मी एकटाच विस-राळू आहें. पण आज जयंत सुद्धां माझी ओळख करून द्यायची विसरलेच कीं! कांहीं हरकत नाहीं; आपल्याला हे सुधारकी चोचले कशाला हवे? आपणच आपली ओळख करून घ्यावी. पण काय नांव या पाहुण्यांचें? जयंतांनीं आतांच घेतलें कीं! काय बरें? ( आठवतो. )

जयंत : विद्याधर—

गोकुळ : ( एकदम ) हो खरेंच, विद्याधर. अहो विद्याधरसाहेब, ओळख व्हायचा मीच चुकून राहिलों आहें तेवढा! माझें नांव गोकुळ. कृष्णावताराची खूण-गांठ बांधून ठेवा म्हणजे नांव लक्षांत राहील. लहानपणापासून तात्यासाहेबांनींच माझें पालनपोषण केलें, पुढें लग्न करून दिलें—

जयंत : गोकुळ, तुला चुकून विसरलों त्याची क्षमा कर. बाकी विसराळूपणाशीं तुझा तसा निकट संबंध आहे यांत शंका नाहीं. विद्याधर, हा आमचा गोकुळ; अगदीं लहानपणापासूनच आमच्या इथें असतो; मनुष्य मोठा प्रामाणिक, ममताळू आणि गरीब आहे.

गोकुळ : मी उद्धारक मताचा आहे हें सांगावयाला विसरूं नका. नाहीं तर सर्वांबरोबर पाहुणे मलाही सुधारकच समजावयाचे ! हो, मी आहें जरा फटकळ आपल्याला कोणी महार म्हटलें तर चालेल, पण सुधारक म्हटलेलें नाहीं खपायचें !

सुशीला : खरेंच; विद्याधर, आमचा गोकुळ इतका धर्माभिमानी आहे कीं सिंहस्थांत पत्त्यांतल्या राजाराण्यांचीं सुद्धां लग्नें लावीत नाहीं.

वीणा : आणि इकडे पुनर्विवाहाची चाल पाडण्यासाठीं वसंतराव पत्त्यांतल्या राण्यांचीं मुद्दाम दोन दोनदां लग्नें लावितात.

गोकुळ : विद्याधरसाहेब, हा सारा फाजील शिक्षणाचा परिणाम !

वसंत : यांत मात्र शंका नाहीं. या बाबतींत मात्र गोकुळ अक्षरशः बाळबोध वळणाचा आहे.

गोकुळ : असे कुत्सित नजरेनें पाहूं नका, वसंतराव; यांत मला नाहीं कांहीं कमीपणा वाटत ! विद्याधरसाहेब, आमचें घराणें खरोखरीच इतकें बाळबोध वळणाचें कीं, स्त्रीशिक्षण तर आमच्या घरांत नव्हतेंच पण पुरुषांपैकींसुद्धां कित्येकांना तरी लिहितांवाचतां येत नव्हतें.

कमलाकर : पण विद्याधर, गोकुळचा अजून मुख्य गुण राहिलाच आहे. विसरभोळेपणांत गोकुळ केवळ अद्वितीय आहे. पावसांत भिजतांना कधीं कधी त्याला छत्री उघडण्याचा सुद्धां विसर पडतो.

गोकुळ : आणखी अहो–काय आपलें नांव ? पुन्हां विसरलों !

विद्याधर : विद्याधर माझें नांव.

गोकुळ : हो, खरेंच विद्याधर ! विद्याधरसाहेब, इतका कांहीं मी विसराळू नाहीं. पण या कमलाकरांचा मुख्य गुण म्हणजे परनिंदा ! आजपर्यंत सर्वांची निंदा करण्यांतच यांचा सारा वेळ गेल्यामुळें निरुद्योगीपणामुळें हल्लीं हेच सर्वांच्या निंदेला पात्र होऊन बसले आहेत.

सुशीला : गोकुळ, अशा वेळीं आपण जर एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढूं लागलों तर हे पाहुणे काय बरें म्हणतील ? विद्याधर, तुम्हीं आमच्या गोकुळचा आणि वसंतरावांचा वादविवाद ऐकला नाहीं अजून !

वीणा : शास्त्रविहित आचारांचा त्याच्यासारखा पुरस्कर्ता सांपडावयाचा नाहीं !

वसंत : हो, बाप जिवंत असल्यामुळें श्राद्धाचें पुण्यकर्म दवडण्यापेक्षां श्राद्धाचा हक्क मिळविण्यासाठीं बापाचा घात करावा असें हे म्हणतात !

विद्याधर : वाहवा ! अशी प्रखर धर्मजागृति असल्यावर सुधारकांना बींमोड

व्हावयाला कितीसा उशीर लागणार?

जयंत : पण एक दोन बाबतींत मात्र गोकुळ स्वतःच सुधारक मताचा आहे!

लीला : हो, खरेंच, बायकोच्या जाचानें असा विपरीत प्रकार झाला आहे खरा गोकुळचा!

सुरूनू : घरांत स्त्री–पुरुषांना सारखे हक्क असावेत हें सुधारकांचें म्हणणें गोकुळला सर्वस्वीं मान्य आहे; कारण त्याच्या घरांत त्याचा कशावरही हक्क चालत नाहीं!

लीला : आणखी सुधारक आपल्या बायकांना नांवानेंच हांक मारतात तसा गोकुळही नेहमीं बायकोच्या नांवानें हांक मारीत असतो!

विद्याधर : म्हणजे, कजाग आहे वाटतें याचें कुटुंब?

कमलाकर : ती कजाग कशाची! हाच अजागळ आहे झालें! नवऱ्याला डोकें नसलें म्हणजेच बायका डोक्यावर बसतात!

गोकुळ : या म्हणण्यांत काय अर्थ आहे? भगवान् शंकराला एक सोडून पांच डोकीं होतीं तरी गंगामाई डोक्यावर बसल्याच कीं नाहीं अखेर! आधींच बायका तोंडाळ; त्यांतून ही तर इतकी बोलभांड आहे म्हणतां, कीं दिवसभर तर बोलतेच बोलते पण रात्रीं झोंपेंत सुद्धां सारखी बोलत असते आणि ती सुद्धां अगदीं खड्या सुरांत! आवाज असा खणखणीत आहे कीं, लग्नांत विहिणींचा कलकलाट चालला तरी हिचें बोलणें शेजारणीला साफ ऐकूं जातें! बोला आतां.

सुशीला : गोकुळला अव्वाच्या सव्वा गोष्टी सांगण्याचें भारी वेड आहे. अशी कांहीं त्याची बायको मुलुखमैदान नाहीं अगदीं!

गोकुळ : खरेंच नाहीं! सुशीलाताई, आमच्या हिला मुलुखमैदान म्हणून तिची किंमत कोण कमी करील! विजापूरच्या मुलुखमैदान तोफेच्या आवाजानें नुसत्या गर्भिणींचेच गर्भपात झाले म्हणतात! पण हिच्या तोंडाची तोफ सुरू झाली म्हणजे माझ्यासारखा पुरुष सुद्धा गर्भगळित होतो!

वसंत : अरे, अरे! स्त्रिया म्हणजे गृहदेवता, पण आमच्या समाजांत त्यांची कोण हेटाळणी चालते ही! विलायतेस आपल्या बायकोबद्दल असे बोलणाराला खरोखर तोफेच्याच तोंडीं दिलं असतं!

गोकुळ : मग मलाही तिच्या तोंडाच्या तोफेला बळी दिलेलाच नाहीं कां?

कमलाकर : कसलें आलें आहे तोंड? याच्यांतच पाणी नाहीं म्हणून! जरा तोंड करूं लागली कीं, एक श्रीमुखांत देऊन एका तोंडाचीं दोन तोंडें करावींत झालें!

गोकुळ : चांगला उपाय आहे हा ! एका तोंडानेंच सध्यां मीं बेजार झालों आहे; मग दोन तोंडें झाल्यावर काय करावें लागणार न कळे !

वसंत : या गोकुळला असें बोलतांना ऐकला म्हणजे तळपायाची आग मस्तकाला जाते. पण एकट्या गोकुळलाच कां दोष लावावा ? सारा समाजच जेथें स्त्रियांच्या हक्कांची पायमल्ली करीत आहे तेथें एकट्यालाच जबाबदार कोणी धरावा !

गोकुळ : अशी काय पायमल्ली चालली आहे ती कळूं तरी द्या ! येऊन जाऊन पुनर्विवाह म्हणजे पाट लावावयाची मोकळीक नाहीं हेंच ना ?

द्युमन : अमुक एकच गोष्ट कशाला हवी ? पायांपासून डोक्यापर्यंत सारखा अन्याय चालला आहे.

वीणा : एखाद्या बेइमान नवऱ्याच्यासाठीं सुद्धां त्याच्या निर्दोषी स्त्रीला आपल्या सुंदर केशकलापाला मुकावें लागतें, हा केवढा अविचार !

गोकुळ : वीणाताई, वपन केल्यावर सुद्धां जर या बायका मृतपतीचा केसांनीं गळा कापावयाला चुकत नाहींत, तर मग वपन न केलें तर काय होईल ? प्रौढ विधवांना कदाचित् हा केशवपनाचा आळा नसला तर एक वेळ चालेल, पण अल्लड वयाच्या बालविधवांना तर—

सुशीला : हें जुलमाचें नैतिक बंधन पाहिजेच म्हणतोस ?

विद्याधर : अशा गोष्टींचा आमच्या समाजाकडून तीव्र निषेध होत नाहीं ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे ! सामाजिक सुधारणेला पाऊल पुढें टाकावयाला ही किती योग्य जागा आहे !

गोकुळ : याच काय, पण कुठल्याही बाबतींत, जुन्या चालीचा समाज विधवा पुढें आली कीं कधींच पुढें पाऊल टाकणार नाहीं !

जयंत : निषेधाची गोष्ट दूर राहिली, पण उलट हा निर्जीव समाज विधवांचा जिवंतपणींच जीव घेऊन पुरुषांना वाटेल तितकीं लग्नें करण्याची मोकळीक देतो—

वसंत : वेश्यागमनाच्या निंद्य अन्यायाकडे कानाडोळा करतो यापेक्षां दुर्दैवाची सीमा कोणती ?

विद्याधर : खरोखरी, आमच्या पुरुषवर्गाची शिथिल नीतिमत्ता वेश्येच्या रूपानें, समाजांत उजळ माथ्यानें वावरतांना पाहिली म्हणजे उद्विग्न मनाला स्त्रियांना मिळणारे अन्याय द्विगुणित दिसतात आणि अशा क्रूर समाजाबद्दलच्या आपले-पणाचा सुद्धां क्षणभर विसर पडतो !

वीणा : तें कांहीं नाहीं; सुशीलाताई, तुला मी बजावून ठेवितें, आतां पद्माकराकडून

तात्यासाहेबांकडे तुझ्याबद्दलची पुनर्विवाहाची मागणी आली म्हणजे तूं बिन-दिक्कत त्याच्या मागणीला रुकार दे; तसेंच द्रुमन, तूं सुद्धां !

वसंत : द्रुमनताईच्या बाबतींत माझा नाइलाज झाला आहे.

विद्याधर : कां बरें ?

वसंत : आमचे निस्सीम हिंदु हाडाचे वडील द्रुमनताईच्या पुनर्विवाहाची गोष्ट काढतांच, जानव्याचा गळफांस घेण्याची तयारी करितात आणि मातोश्री चुलींत सती जावयाला तयार होतात.

विद्याधर : पण तुमच्या एकंदर बाण्यावरून तर तुमच्या घरीं सुधारणेला इतका मज्जाव असेल असें कोणालाही वाटणार नाहीं.

गोकुळ : दिव्याखालीं अंधार ! यांच्या घरांत हेच काय ते कुलदीपक निपजले आहेत, बाकी चहूंकडे अंधार आहे सारा ! गरीब बिचारे यांचे वडील, द्रुमन-ताईच्या शिक्षणाचें नांव काढल्याबरोबर माथ्यांत राख घालून बसतात ! एकदां तर – कधीं बरें वीणाताई, काय झालें तें—( आठवता.)

वीणा : बरें, आठवण झाली म्हणजे सांग एखादे वेळीं ! विद्याधर, एवढें मात्र खरें कीं, द्रुमनताईना मराठी लिहिणें सुद्धां वसंतरावांनीं अगदीं चोरून मारून शिकविलें आहे. द्रुमनताईना आमच्या इथें यावयाची परवानगी मिळते ती सुद्धां फार दिवसांच्या घरोब्यामुळें ! त्यांच्या पुनर्विवाहाबद्दल तूर्त शब्दच काढावयाला नको ! पण सुशीलाताई, तूं मात्र मागें घेऊं नकोस. पुनर्विवाहाची मुहूर्तमेढ घरांत उभारावयाला तुझ्यासारखी देवताच पुढें व्हावयाला पाहिजे !

विद्याधर : काय, सुशीलाबाईच्या पुनर्विवाहाचें घाटत आहे ?

कमलाकर : ( स्वगत ) हा एक घटकेचा पाहुणा हें ऐकून इतका कां बरें गांगरून गेला ? घटकेच्या स्नेहाच्या मानानें ही चलबिचल अंमळ फाजीलच म्हणावयाची !

वसंत : अहो, मी तुम्हांला सर्व वृत्तांत सांगतों ! विद्याधर, या गांवांत पद्माकर म्हणून एक सधन विधुर आहेत; शिक्षणही श्रीमंतीच्या मानानें बरेंच झालें आहे म्हणायचें ! त्यांचा आमच्या सुशीलाताईशीं पुनर्विवाह लावण्याचा जुना मानस—

विद्याधर : मग तो अजून सिद्धीस कां जात नाहीं ?

गोकुळ : तसें व्हायला सुशीलाताईचीच आडकाठी आहे.

कमलाकर : ( स्वगत ) सुशीलाताईची आडकाठी आहे हें ऐकून हा सात्त्विक महात्मा जरासा प्रसन्न झाल्यासारखा दिसला ! एकूण शुद्ध मित्रत्वापेक्षां जास्त सलगीची महत्त्वाकांक्षा दिसते स्वारीची !

वीणा : आजपर्यंत चालत आलेली रूढी कशी मोडावी याचा सुशीलाताईला मोटा प्रश्न पडलेला आहे.

विद्याधर : कां बरें ? सुशीलाबाईसारख्या सुशिक्षित माणसाला रूढीचें इतकें भय नको आहे. इतर कांहीं कारणें असल्यास गोष्ट निराळी !

सुशीला : इतर कारणांसाठींच पुनर्विवाह मला नको आहे. परोपकाराच्या मार्गानं सुखाची हानि सर्वोपरी भरून येते.

वसंत : सुशीलाताई, काय हें बोलणें ! कसचा कर्माचा परोपकार करीत बसतां आहां ? विलायतेंत कोणतीहि बाई असें बोलायची नाहीं ! परोपकाराचें वेड निव्वळ हिंदूपणाचें आहे ! तुमच्या शिक्षणाचा तुमच्यावर मग काय परिणाम झाला ?

सुशीला : वसंतराव, या गोष्टीची सांगून समज पडावयाची नाहीं ! मला पाहिजे तर वेडी म्हणा, पण पुनर्विवाहाची मला तशी आवश्यकता वाटत नाहीं.

विद्याधर : जयंत, तुमचे सुधारणेबद्दल आजपर्यंतचे उद्गार ऐकून मला वाटत होतें, तुम्हीं तर सुशीलाबाईना पुनर्विवाहाबद्दल सर्वांहून विशेष आग्रह कराल; पण मी मघांपासून पाहतों आहें, तुम्हीं अगदीं मौन धरून बसलां आहां ! जरासें चमत्कारिकच आहे हें !

जयंत : माझ्या मौनाचें कारण हेंच कीं, मलाहि हा पुनर्विवाह इष्ट वाटत नाहीं.

विद्याधर : मग पुनर्विवाहाला तुमची संमति—

जयंत : पूर्ण आहे. पण हा पुनर्विवाह मात्र नको ! पद्माकराच्या दुष्टपणाची ज्याला ज्याला चांगली माहिती आहे तो तो असेंच म्हणेल.

गोकुळ : हें कारण नसतें तरी सुद्धां आपण पुनर्विवाहाच्या आडच आलें पाहिजे ! श्रुतिस्मृतींचा पुनर्विवाहाला मुळींच पाठिंबा नाहीं !

विद्याधर : वा: ! जसें कांहीं बाकीचे सारे प्रकार श्रुतिस्मृतींच्या आधारानेंच चालले आहेत ! ज्या धर्मग्रंथांना आम्ही यच्चयावत् बाबतींत बिनदिक्कत धाब्यावर बसवितों त्यांच्याकडे या एकाच बाबतीसाठीं धाव घेणें म्हणजे निवळ पोरखेळच आहे. अगदीं अनाचार करितांना सुद्धां श्रुतीचें ऐकावयाचें नाहीं आणि स्मृतीची स्मृति होऊं द्यावयाची नाहीं; त्यांच्या न्याय्य आज्ञांना फांटा द्यावयाचा; आणि एका अघोर अन्यायाच्या समर्थनासाठीं मात्र त्यांची कास धरावयाची, हा कोठला न्याय ?

गोकुळ : असें का बरें म्हणतां ? सनातन धर्माच्या पक्क्या पायाची उभारणी श्रुतिस्मृतींच्या जोरावरच झालेली आहे. ज्या ईश्वरदत्त संपत्तीच्या जोरावर

आमच्या पूर्वजांनीं अनार्यांचा नायनाट केला, ज्या जगमान्य महावाक्यांवरून आम्हीं आजपर्यंत साऱ्या जगाला तुच्छ मानीत आलों, ज्यांच्या हृदयांत आम्हां आर्यांचें आर्यत्व आज हजारों वर्षें आम्हीं दडवून ठेविलें आहे—

**वसंत :** आर्यत्व दडवून ठेविलें आहे हें मात्र अगदीं खरें.

**गोकुळ :** थांबा, वसंतराव, मला पुरतेपणीं बोलूं द्या ! आर्यत्व दडवून ठेविलें आहे, ज्या ग्रंथांत विमानें आहेत, आगगाड्या आहेत, तारायंत्रें आहेत, पाश्चिमात्य साऱ्या सुधारणा आहेत, ज्यांत ईश्वराचें अंतःकरण आहे, ज्यांत आर्य ऋषींची वाणी आहे, ज्यांत रूढीचा आत्मा आहे, ज्यांत पापपुण्याची शहानिशा केलेली आहे, ते आमचे वेद, त्या आमच्या श्रुति, त्या आमच्या स्मृति, तीं आमचीं उपनिषदें, तीं ब्राह्मणें—

**वसंत :** तीं तुमचीं ब्राह्मणें, तीं तुमचीं भटें ! भले शाबास ! कुठें पाठ केलें होतें हें सारें ? आज तुझ्या या भाषणानं तूं सुधारकांना अगदीं चीत केलेंस नाहीं ? पापपुण्याच्या मोठ्या बहारीच्या कल्पना आहेत या. पण हे विचारांचे नवकोटनारायण आचाराच्या बाबतींत मात्र सुदाम्यापेक्षां दरिद्री असतात ए कंगाल, या मोठमोठ्या ग्रंथांच्या नुसत्या जोरदार उच्चारानें आजच्या आचरट आचारांचें समर्थन कसें होणार ? रामनाम पवित्र असलें तरी पोपटाला त्याची पवित्रता काय कळणार ?

**गोकुळ :** वसंतराव, आपल्याला उत्तर कोण देणार ? मी थोडाच विलायतेस जाऊन जानवें तोडून शेंडी काढून मोकळा झालों आहें ? मी जर देशी पोपट असेन तर आपण विलायती पोपट आहां इतकेंच ! पण हें पहा—अहो विद्याधर, मी अजून मुद्दाम बोललों नाहीं ! अहो, पुनर्विवाहाचा प्रसार सुरू झाला तर कंटाळलेल्या बायका नावडत्या नवऱ्याला विष देऊन पुनर्विवाहाचा रस्ता मोकळा करतील, समजलां ? धडाधड हत्या होतील हत्या ! !

**वसंत :** वाः ! काय पण कल्पनेची कसरत ही ! हिंदूखेरीज असली कल्पना दुसऱ्याला सुचायचीच नाहीं ! विलायतेंत कोणाला असें बोलतांना मीं कधींच ऐकलें नाहीं ! हा गोकुळ तर हिंदूंतला हिंदु आहे अगदीं ! हें पहा, ए हिंदू, असें होऊं लागलें तर कांहीं वाईट नाहीं ! आज बालहत्या होत आहेत त्या बंद होऊन उद्यां पतिहत्या होतील एवढेंच. एक स्त्री फार झालें तर एकदोन पतींचा नाश करील; पण आज एका विधवेला कितीतरी बालहत्या करितां येतात ! तेव्हां लोकसंख्येच्या दृष्टीनें सुद्धां एकंदरीनें फायदाच होणार ! समजलां ? यापेक्षां या आचरट शंकेचें सरळ समाधान करीत बसण्याचें कारणच नाहीं.



एच २७३

विद्याधर : गोकुळ, तुमची ती भीति निराधार आहे. आज ज्या जातींत पुनर्विवाह प्रचलित आहेत त्यांच्यांत असे अनर्थ कितीसे होत आहेत ? त्यांचीच साक्ष घ्या म्हणजे झालें !

सुशीला : मला या वादविवादाचा आतां इतका कंटाळा आला आहे म्हणतां, कीं काकांना या बाबतींत एकदां कायमचें उत्तर देऊन मी केव्हां मोकळी होईन असें झालें आहे मला !

गोकुळ ! अरे, अरे, अरे ! सुशीलाताई, तात्यासाहेबांनीं सांगितलेलें काम विसरलों म्हणून म्हणत होतों तें हेंच ! हें पहा पद्माकरकडून आलेलें पुनर्विवाहाच्या मागणीचें पत्र ! हें तुमच्याजवळ द्यावयाला तात्यासाहेबांनीं मला सांगितलें होतें. याचें उत्तर आजच द्यावयाला पाहिजे.

सुशीला : त्यांत काय उत्तर द्यावयाचें आहे ? मीच तात्यासाहेबांना जाऊन सांगतें कीं, साफ नकाराचें उत्तर लिहा म्हणून ! चला, सारीं काकांच्या दिवाणखान्यांत जाऊं !

[ सर्व जातात.—जयंत जाऊं लागतो तोंच मनोरमा येते. ]

मनोरमा : अहो, जरा थांबा पाहूं ! आतां तुम्ही चांगले आलां, पण मला भेटायची आठवण होते का तुम्हांला ? मी मघांपासून आपली पाहतें आहें; इतका वेळ झाला तरी तुमचा आपला नेहमींचा बाजार चाललाच आहे ! म्हटलें, आतां चांगले चारसहा महिने मुंबईस होतां; तितक्या वेळांत कांहीं तरी अक्कल आली असेल !

जयंत : ( स्वगत ) अरेरे, आनंदाच्या भरांत इतका वेळ माझ्या दुर्दैवाची मला आठवणच झाली नव्हती ! क्षणभरच कां होईना, मी स्वतःला विसरलों होतों; पण दैवाला तें कोठून रुचणार !

मनोरमा : कांहो, झालां कां गप्प ? मी आल्याबरोबर तुमच्या तोंडाला असें कुलूप बसतें आणि एरवी मोठ्या पंडितासारखे बोलत असतां, असें मीं तुमचें काय घोडें मारलें आहे ?

जयंत : मनोरमे, तूं माझी पत्नी ना ?

मनोरमा : होय बरें ! मला चांगली आठवण आहे हो ! पण आपण असे नेहमीं विसरतां, आणि म्हणूनच मला अशी आठवण करून द्यावी लागते !

जयंत : मनोरमे, मला दुःख द्यावयाला का तूं जन्मली आहेस ?

मनोरमा : काय बाई बोलणें तरी ! माझ्या बोलण्यापासून तुम्हांला त्रास होतो नाहीं ? असें माझें बोलणें असतें तरी काय ? तुम्हांला गोकुळकाल्यांत या

घोड्याएवढ्याल्या पोरींबरोबर उधळूं देत नाहीं हेंच ना ?

जयंत : अरेरे, मनोरमे, काय हे नसते कुतर्क ! एवढ्यासाठीं का मी सुशीला-ताईशीं आणि लीलाताईशीं बोलत असतों ?

मनोरमा : नाहीं तर कशासाठीं ? नेहमीं पाहावें तों तुमचीं संभाषणें चाललेलीं ! दुसरें काय बोलावयाचें असतें हो एवढें ?

जयंत : मनोरमे, शुद्ध प्रेमानें एका मनुष्याला दुसऱ्या मनुष्याशीं, त्यांतून स्त्री-पुरुषांना एकमेकांशीं निष्काम बुद्धीनें बोलतां यावयाचेंच नाहीं, हीच जिथें साऱ्या समाजाची अनुदार दृष्टि, तेथें तुलाच दोष कोणी द्यावा ?

मनोरमा : अहाहा ! मी कांहीं अगदीं बोंडल्यानें दूध पीत नाहीं ! या साळकायांशीं तुम्ही हंसतां खिदळतां आणि माझ्याशींच बोलतांना कां बरें तोंड कडू होतें ? बोला आतां काय तें !

जयंत : काय बोलूं हेंच मला कळत नाहीं ! मनोरमे, तूं माझी पत्नी खरी, पण तुझ्या मनोवृत्तींत हा जो एवढा फरक आहे त्यामुळें काय बोलावयाचें याचाच निर्णय होत नाहीं ! लहानपणापासून कल्पनेच्या काव्यानंदावर तरंगणारा माझा प्रेमात्मा वस्तुस्थितीच्या वणव्यांत पार होरपळून गेला आहे ! भावी आयुष्याच्या कल्पनाकाव्यांत आपल्या लग्नाच्या—

मनोरमा : कवितेचा आणि लग्नाचा काय संबंध ? आमच्या आईला माझ्या-सारखेंच कवितेचें नांवही माहीत नव्हतें; पण बाबांनीं असा त्रागा केला नव्हता ! त्या दोघांनीं चांगला संसार थाटला. आठ मुलगे आणि आम्ही पांच मुली त्यांना झालीं; आणि हें सारें कवितेची एक ओळ सुद्धां म्हटल्यावांचून !

जयंत : तुझा बाप मोठा खंबीर मनाचा ! पण मी तसा नाहीं ! जेथें जिवाचें प्रेम नाहीं, आयुष्याचें एकजीव काव्य नाहीं—

मनोरमा : पुन्हा आपलें तेंच ! अहो, कवितेला काय चुलींत जाळावयाची आहे ! आमटी आळणी झाली तर तेथें कवितेचें आधण ओतून कांहीं होईल का ? निगोड चहांत कवितेचीं दोन पानें बुचकळून गोडी आणतां येईल का ? म्हणे तुला कविता कळत नाहीं ! मग कवितेच्या चोपड्यांची एक रास करून तिच्याशीं कां नाहीं लग्न केलें ? सारीं सोंगें ! म्हणे तुझें माझें हृदय जमत नाहीं ! आणि या बायकांच्या बाजारांत मन रमतें वाटतें ?

जयंत : राक्षसिणी, कां उगीच वाग्बाण सोडतेस ? दुःखित जीवाला दुसऱ्या तशाच दुःखी जीवांना धीर देण्यांत थोडेंसें समाधान वाटतें, आणि एवढ्या-साठींच या अनाथ बालविधवांकडे लक्ष वेधतें !

**मनोरमा :** हो, हो, लक्ष पुष्कळ वेधेल; पण मी वेधूं देईन तेव्हां ना ! हजार रुपये हुंडा आणि शिवाय करणी, मानपान सारें करून बाबांनीं मला येथें ढकलली, ती कांहीं तुमचा हा तमाशा पहावयाला नाहीं !

**जयंत :** चल जा, काय बोलावयाचें असेल तें एकीकडे जाऊन बोल. माझ्या मनाला उगीच संतापवूं नकोस ! जा येथून !

**मनोरम :** जातें बरें ! काय न्याय आहे बघा ! ( स्वगत ) माझ्या आतां चांगलें ध्यानांत येत चाललें आहे सारें ! एकदां स्वारीला चांगलें राजरोस पकडतें आणि मग दाखवतें कसें काय सुख आहे तें ! [ जाते. ]

**जयंत :** ( स्वगत ) हरहर, हेंच का माझें संसारसुख ! जमीन-अस्मानाप्रमाणें एकमेकांपासून दूर राहणाऱ्या दोन भिन्नवृत्ति जीवांना कृत्रिम उपयांनीं एकत्र बांधावयाचें आणि एकजीव झालेल्या, देहमात्र भिन्न, पण एकवृत्ति हृदयांना एकमेकांपासून दूर ठेवावयाचें ! परमेश्वरा, मी बालपणींच काढलेल्या आशेच्या चित्रावर–काव्याच्या आत्म्यानें कल्पनासृष्टींत जवळ जवळ सजीव खेळणाऱ्या भावी चित्रावर–असे निराशेचे काळे डाग टाकून मूळच्या मनोहर स्मृतीमुळें ते अधिक भयंकर केलेंस, त्यापेक्षां बाळपणींच तो चित्रपट फाडून कां टाकला नाहींस ? प्रेमरंगानें भरलेला हृदयाचा पेला तेव्हांच फोडून टाकावयाचा होतास; वर्तमानाचें वातावरण भेदून भविष्याच्या पटावर लीलेनें कल्पनाचित्र काढण्यापूर्वीच आशादृष्टीचें कलम मोडून टाकावयाचें होतेंस. अरेरे ! नीरस, हृदयशून्य, जडवृत्ति मनोरमेची प्राप्ति आणि तीहि काव्यमय, हृदयसर्वस्व लीलेची आशा भग्न झाल्यावर ! पण नको—आतां लीलेचा विचार बंधु-प्रेमाच्या दृष्टीनेंच केला पाहिजे. प्रेम आणि लीला यांची कल्पनेंतली जोडी-सुद्धां जगाच्या दृष्टीनें पापमय ठरेल ! क्रूर कृत्रिम जगता ! अशीं किती हृदयें तुझ्या बोजड नियमाखालीं पार चुरडून गेलीं असतील ! पण जगाचा यांत काय दोष ? लोकदृष्टि कल्पनेच्या क्षितिजानें दूरस्थ आकाशाला जमिनीशीं जोडूं पाहते आणि भूलोकीं प्रत्यक्ष पसरलेल्या स्वर्गसुखाला काल्पनिक स्वर्गाच्या बेसुमार वर्णनानें नरकयातनेचें स्वरूप देते ! देवा ! अद्‌भुतरम्य काव्यसृष्टि जर व्यवहाराच्या वस्तुस्थितींत कधींच उतरण्यासारखी नसेल तर प्रतिभाशाली कवि निर्माण करून त्यांच्या आशापूर्ण भविष्यचित्रांनीं तरुणांना नसता मोह कां पाडितोस ? अहाहा ! ही पहा लीला आली ! आहे, काव्य-सृष्टि खरी आहे ! पण हृदया, आतां बंधुप्रेमाला जागृत कर ! परमेश्वरा, प्रेममय कल्पनांचें माझ्या मनांतून आतां निर्बीज करून टाक. [ लीला येते. ]

लीला : सारी मंडळीं वर गेली आणि तुम्ही मागें राहिलां तेव्हांच मला वाटलें कीं, तुमचें मन स्वस्थ नाहीं आणि म्हणून मी मुद्दाम धांवत इकडे आलें.

जयंत : लीलाताई, मी दुःखांत असतों तर खरोखरीच तुझ्या या मायाळू साद्यानें माझें समाधान झालें असतें. ( हंसून ) पण जेथें दुःखच नाहीं, तेथें या तुझ्या ममतेनें तुझ्या हृदयाची थोरवी मात्र दिसून येते !

लीला : नका, असें हंसून आपलें दुःख लपवूं नका ! भयाण खिन्नतेला झांकावयाला या कृत्रिम हास्याचें विरल आच्छादन कसें पुरणार ? त्यानें उलट खिन्नता जास्त भयाण दिसते.

जयंत : लीले, तूं म्हणतेस तेंच खरें आहे ! काळवंडलेलें प्रेत झिरझिरीत मलमलीखालीं झांकलें तर विशेषच भयंकर दिसतें. पण लीले, दुःख दुसऱ्याला, त्यांतून स्वतःच्या दुःखानें चूर झालेल्या तुझ्यासारख्या जीवाला सांगून काय उपयोग ?

लीला : कां बरें ? तुम्हीं नेहमीं माझें सांत्वन करितां तसें मीहि तुमचें दुःख हलकें करण्याचा यत्न करीन !

जयंत : वेडी नाहीं तर ! चल, मंडळी वर वाट पाहात असेल.

लीला : नका सांगूं वाटेल तर मला आपलें दुःख ! पण मला अगदीं स्पष्ट दिसतें आहे. ( त्याच्याकडे पाहते. )

जयंत : ( स्वगत ) अहाहा ! ही दृष्टि काय बोलत नाहीं ? बोललेलें फक्त कळतें पण न बोललेलें अगदीं हृदयांत भिनतें ! पण या दृष्टीला दृष्टि देऊन उपयोगी नाहीं ! ( तोंड फिरवितो. ) अरे, ही पहा दुसरी नजर ! मनोरमा संशयाच्या दृष्टीनें आमच्याकडे पाहात आहे. आतां येथें उभें राहून मुळींच उपयोगी नाहीं. ( प्रगट ) लीले, चल लौकर, तात्यासाहेब वाट पहात असतील.

[ जातात. ]

## प्रवेश चवथा

[ कमलाकर प्रवेश करतो. ]

कमलाकर : ( स्वतांशीं ) दुनिया एक दिवानोंका बझार है ! परदेशच्या पेढीवर दर्शनी हुंड्या पटतात आणि शेजारच्या दुकानदाराला रोख रुपयाची मोड

मिळत नाहीं! इकडे पाठीवर पाय देऊन आलेला भाऊ पोटावर पाय द्यावयाला सोडीत नाहीं, तर तिकडे शब्दाच्या शपथेखातर ज्यांची पुरतीशी तोंडओळख सुद्धां नाहीं अशीं वधूवरें तोंडाशीं तोंड भिडवायला तयार होतात! स्वर्गसुखाच्या मुदतीच्या हुंडीसाठीं आज हातच्या सुखाच्या रोख रकमेची मनोती कापून द्यावयाची! आंतबट्ट्याच्या या अजागळ सट्टयाला आंधळ्या श्रद्धेची साक्ष आणि अनोळखी ईश्वराची जामीनकी! आणि हा जामीन जगाच्या आरंभापासून सदैव संशयाच्या धुक्याआड दडून बसलेला! जिकडे पहावें तिकडे विसंगतपणा! गळ्यांत पडलेल्या मनोरमेला, ती अशिक्षित आणि कजाग आहे म्हणून टाकून देऊन लहानपणच्या थट्टेंतल्या लग्नाच्या लोभानें जयंत लीलेच्या निराश आशेवर जीव काढतो! अपार सुखभोगासह शरण आलेल्या आणि आजन्म सहवासाचें वचन देणाऱ्या पद्माकराचा सुशीला तिरस्कार करिते आणि लग्नांतल्या क्षणमात्र परिचयाच्या मेलेल्या नवऱ्यासाठीं रडत बसते! लग्न लावणाऱ्या भटासाठीं सुशीलेनें कां रडूं नये याचेंच नवल वाटतें! त्याच्याशीं ती दोन शब्द तरी बोलली होती! तिकडे लीला हक्काची हुकमत हरपली तरी जयंताच्या प्रेमाच्या भाडोत्री भांडवलाचा भरंवसा धरून बसली आहे! दोघी सख्ख्या बहिणी, पण सुशीला जळक्या जिनगीच्या आठवणीची राख जपत बसण्याइतकी कंजूष, तर लीला मनोरमेची मालमत्ता आपली समजण्याइतकी उदार! तशीच मनोरमा! बाह्यांगाकडे डोळेझांक करणाऱ्या जयंतासाठीं अंतरंगाचा होम मांडून बसली आहे! आणि माझ्या प्रेमयाचनेकडे ढुंकूनही पाहात नाहीं! पाठीस लागलेल्या अरबी समुद्राकडे पाठ फिरवून गोदावरीनें हजारो कोसांवरच्या पूर्वसमुद्राकडे धांव घेतली त्यांतलाच प्रकार हा! तशीच वीणा! तिच्या मूळच्या मूर्खपणाला शिक्षणानें निवळ दुजोरा मिळाला आहे! वसंत विलायतेहून जाऊन आला आहे एवढ्यावरूनच त्याच्यावर ती पोरगी फिदा झाली आहे. आणखी दुमन—तिच्या मूर्खपणाला तर पारच नाहीं! ती कायमची कब्जयांत आल्यावर सुद्धां मी तिच्याशीं पुनर्विवाह करीन असें तिला वाटत आहे! वेडे, मकरंद चाखल्यावर भ्रमर कमळाभोंवतीं गुणगुणत रहात नाहीं! पण पांचव्या वर्षीच गोपींशीं बागडणाऱ्या गोपाळाला सोडून पुत्रप्राप्तीच्या आशेनें ब्रह्मचारी बजरंगाभोवतीं घिरट्या घालणाऱ्या बिचाऱ्या बायकांनाच दोष कां द्यावा? जयंत, वसंत, पद्माकर, आणि स्वतः मी, सारे आपापल्या सुखाचीं साधनें अगदीं श्वासाच्या आटोक्यांत असूनही उगाच विवेकाचे प्राणायाम करीत

बसलों आहों ! आणि हें सारें कां ? तर केवळ लग्नसंबंधासाठीं ! प्रत्येक मनुष्य आपल्या मूर्खपणानें फार झालें तर स्वतःच्या कुटुंबाच्या सुखाचा नाश करील; पण ज्या महात्म्यानें ही लग्नबंधनाची कल्पना शोधून काढली त्यानें मात्र अतुल मूर्खत्वानें साऱ्या मानवी कुटुंबाच्या सुखाची धूळधाण करून ठेवली आहे ! वाः ! ही पहा, माझ्या म्हणण्याची मूर्तिमंत साक्ष देण्यासाठीं मनोरमा रडत रडत इकडे येते आहे. तिच्या सुंदर पण रडक्या चेहऱ्यावर तिच्या दुर्दैवाचा आणि जयंताच्या मूर्खपणाचा सारखाच छाप बसलेला आहे. ( मनोरमा येते. ) मनोरमाबाई ! तुम्हांला अशा स्थितींत पाहून माझा जीव अगदीं तिळतिळ तुटत असतो !

**मनोरमा :** मग तुमचा जीव डोंगराएवढा असला तरी त्याचे तिळाएवढाले तुकडे होतील ! कारण माझें दुःख कधींच कमी व्हावयाचें नाहीं.

**कमलाकर :** तुम्ही अशा अगदीं निराश होऊं नका. पुढें मागें जयंताला तुमची दया येणार खास !

**मनोरमा :** त्यांना दया ! अहो, मुसळाला कोठें अंकुर फुटले आहेत का ? या जन्मांत तरी असें होणार नाहीं ! त्या अवदसेनें माझ्या जन्माचें मातेरें केलें हो मातेरें !

**कमलाकर :** अहो, त्यांत त्यांचा वाईट हेतु नसेल सुद्धां ! लीला आणि जयंत नेहमीं कुजबुजत बसतात एवढ्यावरच जाऊं नका ! त्यांची आज लहानपणापासून मैत्री !

**मनोरमा :** मैत्री ! ही कसली मैत्री ? तुमचा स्वभाव भारीच सरळ ! अहो, बायकापुरुषांची कसली ही मैत्री ? अशा मैत्रींत काळेबेरें आपलें असायचेंच !

**कमलाकर :** मग आपण दोघें नाहीं का एकमेकांशीं बोलत ?

**मनोरमा :** म्हणून काय झालें ? तुम्ही माझ्या माहेरच्या ओळखीचे !

**कमलाकर :** आणि जयंत नाहीं का लीलेच्या माहेरचा ? तो तर तिचा सख्खा आतेभाऊ ! मग लोकांनी माझा तरी संशय कां घेऊं नये ?

**मनोरमा :** भलतेंच ! तुमचें बायकांशीं वागणें कुणीकडे ? नाहीं तर त्यांचें वागणें ! बरोबरीच्या बायकांशीं धांगडधिंगा घालीत बसायला यांना लाजा वाटत नाहींत काहो ?

**कमलाकर :** मनोरमाबाई, ही सुधारणा आहे ! तुम्हांला त्यांतलें रहस्य कळत नाहीं.

**मनोरमा :** कपाळाची सुधारणा ! सांवळा गोंधळ सारा ! एकमेकांच्या हातांत

हात घालावयाचा, रात्रीं अपरात्रीं बोलत बसायचें, हंसायचें, खिदळायचें; ही सुधारणा वाटते ? मग बाजारबसव्या मोठ्याच सुधारक म्हणावयाच्या ! इकडे अशी आंधळी कोशिंबीर खेळतांना पाहिलें कीं अंगाची अशी आग होते ! पण काय करावयाचें ? मेला बायकांचा जन्म !

**कमलाकर :** ( स्वगत ) मनोरमे, सुधारणेबद्दलच्या तुझ्या या उडाणटप्पू कल्पनांचा बरोबर फायदा न घेईन तर नांवाचा कमलाकरच नव्हे ! ( उघड ) मनोरमाबाई, विधवांच्या दुःखाची तुम्हांला कल्पनाही नाहीं.

**मनोरमा :** चांगली कल्पना आहे हो ! मला जिवंत नवऱ्याची विधवा, लग्न झालेली कुंवारीण, काय वाटेल तें म्हटलें तरी चालेल !

**कमलाकर :** असें म्हणूं नका ! जगांतले सारे व्यवहार केवळ आपल्या नांवाच्या पतीसाठीं आणि पतीच्या नांवासाठींच करावे लागतात ! पुरुषाला पत आणि स्त्रीला पति !

**मनोरमा :** मी मात्र साऱ्या गोष्टी पतीच्या नांवासाठीं करीत नसून अगदीं नांवाच्या पतीसाठींच करतें आहें. ते खरेखुरे पति आहेत त्या अवदसेचे.

**कमलाकर :** नका ! नका ! अशा बाबतींत एकदम त्यांचें नांव घेऊं नका.

**मनोरमा :** याच काय, कुठल्याच बाबतींत बायकांना नवऱ्याचें नांव घ्यावयाची चोरी. नाहीं तर असा लंडाव खेळतांना पाहून तिकडचा कान धरून विचारलें असतें, कीं हें काय म्हणून ?

**कमलाकर :** काय हें बोलणें ! मनोरमाबाई, पति म्हणजे स्त्रीची सारी शोभा, खरा अलंकार.

**मनोरमा :** अलंकार खरा ! पण गहाणवट पडला आहे ना दुसऱ्याकडे !

**कमलाकर :** मग त्या दुसऱ्याशीं खुशाल उभा दावा धरावा. जयंताकडे यांत कांहीं दोष नाहीं ! त्याचा स्वभाव जरा दयाळू आहे.

**मनोरमा :** दयाळू आहे ? काय बोलतां ? आपल्या बायकोचा गळा कापावयाचा आणि कोणा मेल्या भलतीच्या गळ्यांत गळा घालावयाचा ! ही कोठली दया ? कमलाकर, फुकट हो फुकट बायकांचा जन्म ! मला किनई जीव सुद्धां जड झाला आहे.

**कमलाकर :** मनोरमाबाई, जगांत जीव जड होऊन भागणार नाहीं ! प्रसंगीं दुसऱ्याचा जीव घेऊन मग स्वतःचाही जीव घेऊन पळत सुटण्याची तयारी पाहिजे ! उठा, अशा रडूं नका ! जयंताला लीलेच्या नादांतून सोडविण्यासाठीं अनेक उपाय करितां येतील.

**मनोरमा** : एकूण तुम्हांला सुद्धां असा संशय आहे तर !

**कमलाकर** : मला संशय मुळींच नाहीं; माझी अगदीं खात्री आहे, आणि तिच्या पुराव्यादाखल मला कित्येक गोष्टी माहीत आहेत.

**मनोरमा** : बाई, बाई, तुमच्या सुद्धां या गोष्टी लक्षांत येऊं लागल्या, चारचौघांत बोभाटा होऊं लागला, लोकांत ओरड झाली, तरी सुद्धां यांना लाज नाहीं ना ? कोणत्या त्या गोष्टी ? मला तरी सांगून ठेवा.

**कमलाकर** : मनोरमाबाई, त्या चोरट्या प्रेमाखेरीज करितां यावयाच्या नाहींत, मनोमन साक्ष असल्याखेरीज पटावयाच्या नाहींत, मत्सराच्या तीव्र दृष्टी-खेरीज तिसऱ्याला दिसावयाच्या नाहींत, आणि अनुभवाच्या ज्ञानाखेरीज सांगून समजावयाच्या नाहींत ! एकानें दुसऱ्याकडे उगीच सारखें पहात राहणें, त्याच्याखेरीज दुसऱ्याच्या बोलण्याकडे लक्ष न देणें, आपण कांहीं बोललें तरी दुसऱ्याच्या मनाला तें कितपत रुचतें हें पाहण्यासाठीं सारखें त्याच्याकडे पाहणें, एक उठून गेलें तर दुसऱ्याचा अगदीं विरस होऊन इतर मंडळीबद्दल त्यानें शून्यवृत्ति होणें, एकमेकांच्या बोलण्याला दुजोरा देणें, अगदीं नेणून सुद्धां नेहमीं होतां होईल तों जवळ जवळ बसणें, या साऱ्या चोरट्या प्रणयाच्या खुणा आहेत ! या गोष्टी क्षुल्लक खऱ्या; पण ठळक गोष्टींपेक्षां जास्त महत्त्वाच्या !

**मनोरमा** : खरें, अगदीं खरें ! पाहिलेंत ना ? असा कोंडमारा केला माझा ! याला काय करावें बरें ?

**कमलाकर** : हां, मी सांगतों असें करा. जयंताला तुम्ही एकदां स्पष्ट सांगून पहा आणि माझी हेळसांड केली तर मी विष खाऊन प्राण देईन असें भय घाला !

**मनोरमा** : वाः ! म्हणजे त्यांना बरेंच तें ! सुंठीवांचून खोकला गेला. म्हणतील खुशाल मर ! तेव्हां आणखी या अपमानाचा अनुभव घेण्यापेक्षां—

**कमलाकर** : वेड्या आहांत तुम्ही ! त्याची काय छाती आहे असें म्हणावयाची ? कायद्याच्या किचाटाची त्याला पुरी माहिती आहे. जिवावर उदार झाल्याचें सोंग मात्र सफै आणा ! अगदीं बेफाम झाल्याप्रमाणें त्याला असा त्रास द्याल म्हणतां, कीं स्वारीला जीव नकोसा झाला पाहिजे ! अगदीं खनपटीस बसा कीं आलीच स्वारी ताळ्यावर ! तुम्ही बतावणी मात्र चांगली करा म्हणजे झालें ! सत्यापरता धर्म नाही हें खरें; पण पुष्कळदां सत्यापेक्षां सत्याच्या आविर्भावानेंच जास्त कार्यभाग होत असतो. पहा, मी म्हणतों याचा

तुम्हांला अनुभव येईल.

मनोरमा : बरें, करीन बापडी !

कमलाकर : अहो, एकेक यत्न करून पहावा ! हा नाहीं साधला तर दुसरा. तुम्ही इतक्यांतच निराश होऊं नका ! चला, आतां मीं सांगितलेलें विसरूं नका.

मनोरमा : नाहीं विसरावयाची ! तुम्हांला दिसेलच आतां सारें !

[ मनोरमा जाते. ]

कमलाकर : ( स्वगत ) ठीक, ही विषाची पेरणी सुरेख झाली ! जयंता, आपल्या गोड बोलण्यानें या कमलाकराचा लहानपणापासून जो सारखा पाडाव करीत आलास त्याचीं फळें भोगायला आतां तयार हो. अपमानाचा, द्वेषाचा, तिरस्काराचा जो तीव्र रस आजवर या हृदयांत सांठवून ठेवीत आलों त्याचा आतां कर्तबगारीच्या जोरावर अर्क—हा विषारी अर्क—निर्माण करून तुझ्या सुखाला ठार मारल्यावांचून मी कधीं राहणार नाहीं ! माझ्या आयुष्याचें साफल्य माझ्या सुखानें होणार नसून तुझ्या दुःखानें मात्र होणार आहे. माझ्या या कर्तव्यांत थोडा वेळ जी विश्रांति मिळेल तिलाच मी माझें सुख मानीन.

[ जातो. ]

## प्रवेश पांचवा

[ लीला. स्थळ — नदीतीरावरील अमृतेश्वराचें तुळशीवृंदावन ]

लीला : ( वाचते )

[ चाल — यादवराया भाई या हो ]

आठवतो का सांग सखे तो काळ विवाहाचा ।
बाळपणाचा, मुग्धपणाचा निर्मळ भावाचा ॥
संसाराचें चित्र चिमुकलें, चिमुकलेच जीव
फुललें नव्हतें हृदयांचेंही राजस राजीव ॥
पहात होते तात तदा त्या लीला बाळांच्या ।
जणुं आठवती त्यांसहि लीला त्याच सुकालाच्या ॥

जपति परोपरि प्रसन्नहृदया पुण्यमया माता ।
गेले ते दिन सीते, यापरि हा बघतां बघतां ॥
बाळपणींचे प्रसंग जणुं ते घडति आज फिरुनी ।
चित्रपटा या अश्रुजलानें चल टाकू धुउनी ॥
तूं सीता ती, राम तोच मी, त्याच आज माता ।
परि जे गेले दिन ते आतां येतिल का हाता ॥
कशास आशा आतां नसती; झालें तें गेलें ।
सुकलें फूल न देत वास जरि अश्रूंनीं भिजलें ॥

छेः ! नाहींच जमत हें ! मुळांतला श्लोक एवढासा, पण माझ्या इतक्या ओळी होऊन सुद्धां कांहीं तरी चुकून राहिल्यासारखें वाटतें ! या उत्तररामचरिताचें सारें असेंच आहे ! मनाला जितकें पटतें तितकें शब्दांत वठवून दाखवितां येत नाहीं. पहिल्या अंकांत चित्रपट पहात बसलेल्या सीतारामांच्या मंगलमूर्ति नजरेपुढून हलत नाहींत अगदीं ! त्यांच्या बाळपणाच्चीं चित्रें त्यांच्या डोळ्यांपुढें उभीं राहिलीं यांत काय नवल ? पण हें उत्तरराम वाचतांना आम्हांला सुद्धां तीं चित्रें दिसतात. लग्नकालीं एखाद्या बाहुलीएवढ्या सीतादेवीनें आपल्या गोंडस हातांनीं ती चिमुकली माळ मेघश्याम जगन्नाथाच्या कंठांत— अगबाई, हा काय चमत्कार ! रामचरित्रांतल्या इतर प्रसंगीं डोळ्यांसमोर खेळणारी त्या जानकीजीवनाची श्यामसुंदर मूर्ति विवाहप्रसंगाच्या चित्रांतून नाहींशी होऊन जयंताची लहानपणींची गोजीरवाणी मूर्ति तिच्या जागीं कां बरें दिसायला लागली ? आणखी सीतादेवीच्या जागीं आठ वर्षांची लीला ! देवा, क्षमा कर; मनाचा कितीही धडा केला तरी सुद्धां लीलाजयंताची ही चिमुकली जोडी अशी डोळा चुकवून कल्पनेपुढें उभी राहाते याला मी तरी काय करूं ? अहाहा ! लहाणपणीं सर्वांनीं या आमच्या चित्रासारख्या जोडीचें कौतुक करावें ! आणि आज तेंच मंगलदर्शन जगाच्या दृष्टीनें पापचित्र दिसावें ना ! देवा, तुझ्याही दृष्टीला तें पापचित्र वाटत असेल तर ही पहा मी, निर्दय-पणानें त्या लहानग्या कल्पनाजीवांना या अश्रूंच्या पुरांत बुडवून टाकितें ! ज्या काळाच्या प्रवाहांत आमचीं खरीं बाळरूपें वाहून गेलीं, त्याच्याच ओघांत त्यांच्या चित्रांनाही लोटून देतें ! पण नको ! त्या वेळच्या दहा वर्षांच्या जयंताला आणि आठ वर्षांच्या लीलेला, मायावी जगता, तुझ्या पापविचारांची ओंळख तरी होती का ? मग झालें तर ! या हतभागी लीलेच्या, तिच्या भोंवतीं पसरलेल्या जगाच्या समजुतीसाठीं त्या कल्पनाराज्यांतल्या बाळजीवांचा कशाला विरस

करूं ? त्यांचा आनंद तेव्हांही निर्दोष होता आणि आतांही निर्दोषच आहे. श्रीरामचंद्रा, रावणाला मारल्यावर सीतादेवीला परत आणून, तिच्यासह अयोध्येच्या चौदा चौकड्यांच्या छत्रसिंहासनावर बसवून स्वर्गसुखाच्या ऐन भरांत असतांना सुद्धां, जर आपल्याला बाळपणाचा चित्रपट पाहून वाईट वाटलें, तर मग या भाजलेल्या जिवाला ओलावा मिळण्यासाठीं, बाललीलांच्या अर्कांचा एखादा अश्रू या हृदयावर टाकिला, तर देवाधिदेवा, तूं क्षमा करणार नाहींस का ? अहाहा ! त्या निर्दोष प्रेमचित्राकडे सारखी टक लावून किती वेळ पहात बसूं असें मला झालें आहे. अंतःसाक्षी अमृतेश्वरा ! आज कल्पनेच्या किल्ल्यांत पळून गेलेलें हेंच चित्र एकदां आम्हीं तुला प्रत्यक्ष दाखविलें होतें ना ? शुभ्र मोगऱ्यांच्या कळ्यांची एकच लांबलचक माळ गळ्यांत घालून, याच नदीच्या कांठीं त्या पायरीवर उभें राहून, जयंत व मी किती तरी वेळ आमचें पाण्यांत उमटलेलें प्रतिबिंब पहात होतों. इतक्यांत कमलाकरांनीं हळूच मागें येऊन थट्टेनें ती माळ तोडून टाकिली. तल्लीनतेमुळें आम्हांला गळ्यांतली माळ तुटतांना दिसली नाहीं, पण त्या चलचित्राच्या गळ्यांतली तुटलेली माळ पाहून आम्ही जरा दचकलों. कैलासनाथा, तेंच ना हें चित्र ? कमलाकर, कां बरें त्या वेळीं ती माळ तोडून—( पाहून ) कोण ? कमलाकर ! आज सुद्धां अशाच रीतीनें यांनीं ही सुखविचारांची माळ तोडून टाकिली !

[ कमलाकर येतो. ]

कमलाकर : लीलावती, नेहमीं पहावें तों तूं आपली या जागीं बसलेली असतेस, इतकी काय या जागेंत जादू भरली आहे न कळे !

लीला : जादूच आहे नाहीं तर काय ? संथपणानें वाहणारी ही नदी, आमच्या रक्षणासाठीं या एवढ्याशा देवळांत समावून बसणारा हा कैलासनाथाचा प्रतिनिधि, मावळण्यापूर्वी त्या टेकडीवर भरजरी गालिचा पसरून बसलेला सूर्यनारायण, वाऱ्याच्या एवढ्याशा झुळकीबरोबर सुवास पसरणारी ही पवित्र तुळशी, पलिकडच्या पटांगणांत आनंदानें बागडणारीं मुलें—हंसूं नका, कमलाकर, जगाचा जादूगार याच गोष्टींनीं आपली नजरबंदी करीत नाहीं का ?

कमलाकर : लीलावती, तुझें, जयंताचें, देवभोळेपणाचें वेड अजून गेलें नाहीं याचें मला नेहमीं आश्चर्य वाटतें. ज्या वेळी आपण नव्यानें जगांत आलों तेव्हां प्रत्येक नवाईनें मनाला वेडावून सोडिलें हें ठीक झालें; पण आतां काय त्याचें ? त्याच त्याच गोष्टी पाहून रोज आश्चर्यचकित होणें हें मी मानवी

बुद्धिमत्तेचें कमीपण समजतों!

लीला : कमलाकर, सर्वशक्तिमान् सर्वेश्वराच्या कृतीपुढें मनुष्याच्या बुद्धीचा कमीपणा दिसला तर त्याची आपल्याला लाज कां वाटावी? तुमची दृष्टि लहानपणापासूनच या सृष्टिसौंदर्याच्या बाबतींत बिघडलेली! हेच जयंत असते तर या वेळीं ते सुद्धां माझ्यासारखेच वेडे झाले असते! पहा बरें! या नदीच्या सपाट पाणभुईवर हा निळीचा आणि दुसऱ्या जलवेलींच्या पानांचा हिरवा गालिचा पसरला आहे, याच्यावर घटकाभर कोणाची दृष्टि विसांवणार नाहीं?

कमलाकर : माझी! लीलावती, नदीनें आपलें अंतरंग झांकण्यासाठीं पांघरलेला हा हिरवा शालू फाडून माझी अंतर्भेदी दृष्टि नदीच्या तळाशीं माजलेल्या चिखलावर–साऱ्या शहराच्या घाणीच्या बिछायतीवर–प्रत्यहीं बालविधवांनीं टाकून दिलेल्या मुलांच्या कुजलेल्या देहावर खेळूं लागली म्हणजे या नदीच्या अंतरंगांत आणि एखाद्या नटव्या वेश्येच्या अंतःकरणांत मला कांहींच फरक दिसत नाहीं!

लीला : इश्श! काय घाणेरडे विचार हे! कमलाकर, या अशा संध्याकाळीं, अशा रमणीय जागीं, अगदीं प्रत्यक्ष देवाजवळ असतांना सुद्धां असल्या हिडिस कल्पना तुमच्या डोक्यांत येतात तरी कशा?

कमलाकर : देवांच्या सांनिध्यानें, या दगडी देवांच्या सांनिध्यानें, लीले, माझ्या अशा कल्पना उलट बळावतात! लीलावती, साधे सृष्टचमत्कार पाहून, पूर्वीच्या नेभळट मनुष्यांची बुद्धिमत्ता दिपून, हबकून, जागच्या जागीं मरून टार झाली. आणि ईश्वर हें त्या मेलेल्या बुद्धिमत्तेचें भूत उत्पन्न झालें! पूर्वजांच्या मेलेल्या बुद्धिमत्तेचें हें ईश्वरी भूत आजच्या त्यांच्या नादान पोराबाळांना भेडसावीत आहेत! पण, लीले, खरें म्हटलें तर प्रत्येक दगडी मूर्ति म्हणजे मानवी बुद्धिमत्तेच्या प्रेतावर, तुमच्या भाविकपणावर, बांधलेली समाधि आहे; आणि प्रत्येक देऊळ हें मेलेल्या बुद्धिमत्तेचें स्मशान आहे! तें बघ, लीलावती, पलीकडे तें स्मशान आहे; ऐक–अशी कानांवर हात कां ठेवितेस?–त्या स्मशानांतल्या प्रत्येक राखेच्या ढिगाखालीं, जळून गेलेल्या प्रेताबरोबरच खाक झालेल्या, शेवटपर्यंत आशानिराशा यांच्या कैचीनें कातरलेल्या, सुखदुःखांच्या पेंचांत पिळून निघालेल्या हृदयांतल्या हजारों गूढांचीं, मनुष्याच्या मेलेल्या आशांची जशी राख सांपडेल तशी प्रत्येक देवाच्या मूर्तीखालीं, तर्कवितर्कांच्या पंखांनीं सृष्टीचीं रहस्यें शोधण्यासाठीं धडपडणाऱ्या, पण अखेर

आश्चर्यानें चमकून आणि भयानें भेदरून प्राण सोडणाऱ्या हताश मानवी कल्पनेची राखच सांपडेल.

**लीला :** कमलाकर, नका, नका, असें बोलूं नका ! तुमच्या प्रत्येक शब्दासरशीं माझ्या अंगावर शहारे येत आहेत. त्या मावळत्या सूर्यनारायणाकडे पहा ! मला वाटतें, साक्षात् सर्वसाक्षी परमेश्वराचा हा नेत्र सुद्धां तुमच्या शब्दांमुळें रागानें लाल झाला आहे ! कमलाकर, त्याची करुणा भाका ! तें पहा, त्याच्या कृपाकिरणांनीं पावन झाल्यामुळें, वाऱ्यानें उडालेल्या अगदीं धुळीचेंसुद्धां सोनें झालें आहे ! मग त्याच कृपेनें आम्हां मनुष्यांचें सोनें होणार नाहीं का ?

**कमलाकर :** धुळीचें सोनें ! लीले, रात्रीचे खेळ खेळण्यासाठीं ही सृष्टि तुझ्या देवाच्या डोळ्यांत दिवसाढवळ्या ही धूळ टाकीत आहे, समजलीस !

**लीला :** जाऊं द्या; कमलाकर, मला असल्या हिडिस गोष्टी ऐकायची इच्छा नाहीं ! चांगली संध्याकाळ झाली, सूर्य मावळायला झाला, मनोरमा वहिनीला या तुळशीवृंदावनांत तेवढा दिवा लावून ठेवायला सांगतें !

**कमलाकर :** थांब; लीले, तुझ्या प्रत्येक करणीचें आज मला हंसूं येत आहे ! या तुळशीची सेवा करून तुला कोणता मोक्ष मिळवावयाचा राहिला आहे ?

**लीला :** कोणता म्हणजे ? सुशीलाताईनें मिळविला आहे तोच ! माझ्या सारख्या विधवेनें धर्माचरणानें जर नाहीं तर मग दुसऱ्या कशानें मनाची शांति मिळवावी ? सुशीलाताईनें तरी याच मार्गानें ती मिळविली आहे ना ?

**कमलाकर :** अशी शांति मिळविणारी ती सुशीला एक वेडी, तिच्या पावलावर पाऊल टाकणारी तूं सातवेडी, आणि तुम्हां विधवांना वैराग्य मिळविण्यासाठीं या तुळशीभोंवती आणि देवळाभोंवतीं भटकायला सांगणारी ती धर्माज्ञा शंभरवेडी ! लीलावती, तुमच्या देवांच्या भाकडकथा खऱ्या मानल्या तरी त्यांच्या पारायणानें वैराग्य कसें मिळणार ? ही तुळशी काय सांगते ? सोळा हजार एकशें आठ गोपींचा मेळा भोंवतीं नाचत होता; पण कृष्णानें एका वृंदेच्या शोकामुळें तिच्या स्मशानांत—या तुळशीवृंदावनांत, धांव ठोकिली, हीच गोष्ट तुळशी सांगणार ना ? तुझ्या हातांतलें हें उत्तररामचरित; हें तरी हेंच सांगेल कीं, सुखाच्या वेळीं योगवासिष्ठाच्या गप्पा झोंकणारा राम, सीता जराशी दूर झाल्याबरोबर राज्यपदावर लाथ मारून सारखा रानोमाळ रडत सुटला. तसाच हा नंदिकेश्वर ! दरवाज्याच्या महिरपीवर आपल्या पोराला—त्या गणपतीला—बसवून पार्वतीबरोबर गाभाऱ्यांत बसलेल्या या भोळ्या शंक-

राची दंतकथा ऐकून तर लीले, तुला किळस येईल. सांग पाहूं आतां या असल्या देवांच्या रडगाण्यांनीं भरलेल्या पोथ्यापुराणांनीं कोणत्या विधवेला वैराग्यप्राप्ति होणार ? तीं पहा, सूर्य मावळल्यामुळें घरीं जायला निघालेलीं मुलें देवासमोर हात जोडून उभीं आहेत. तूं आणि जयंत लहानपणीं असेच देवा-समोर हात जोडून वेड्यासारखीं उभीं रहात होतां. तेव्हां तें शोभून गेलें, पण आज जर तुम्ही या फत्तरासमोर—या शून्यवृत्ति पाषाणासमोर तद्रूप शून्यवृत्तीनें फत्तरासारखीं उभीं राहिलां, तर मग वाढत्या वयाचा तुमच्यावर —निदान अकालवैधव्यानें भाजलेल्या तुझ्या मनावर—कांहींच परिणाम झाला नाहीं असें नाहीं का होत ? बावळट बाळपणाला भाबड्या भाविकतेची जोड ठीक होती; पण आज त्या बालवृत्तीची काय किंमत ? त्या मुलांनाच विचार; तीं सुद्धां म्हणतील, हें बाळपण नको; आमची मोठें होण्याची इच्छा आहे.

लीला : त्या बिचाऱ्यांना मोठेपणाच्या दुःखांची कल्पना कशी असणार ? मोठेपणाची एकांगी बडेजावी पाहून त्या अजाण अर्भकांना तसें वाटलें तर त्यांत काय नवल ? पण लहानपण आणि मोठेपण या दोहींचा अनुभव घेतलेल्या लोकांना पुन्हां मागें जाण्याची परवानगी मिळाली, तर एका क्षणांत सारी सृष्टि बालकांनींच गजबजून जाईल !

कमलाकर : लीलावती, ही तुझी केवळ कल्पना आहे ! डोंगर चढतांना आपण एक टप्पा चढून गेल्यावर जर मागें नजर टाकिली तर मागच्या वाटेवर नुसत्या झाडांची कोवळी हिरवळच दिसते; तिच्यांतून पसार होतांना पायांला रुतणारे खडे आणि अंगाला ओचकारे भरणारीं कांटेरी झुडपें दूरपणामुळें त्या हिरवळीखालीं दडून बसतात; हीच रमणीयता पुढच्या वाटेवरही पसर-लेली दिसते; पण उलटपक्षीं, पायांखालच्या वाटेवरचा मात्र वाईटपणाच जाणवतो. आणि त्याला शोभविणारी हिरवळ आपल्या डोक्याच्या वर—कल्पनेच्या आटोक्याबाहेर असते. लीले, हीच गोष्ट आयुष्याच्या प्रवासाची ! भूतकालाची रमणीयता वाटते ती याचमुळें; आणखी याचमुळें भविष्याची आशा सुटत नाहीं ! वर्तमानाचा वाईटपणा दूर लोटून द्यावयाची ताकद आपण अंगीं आणली पाहिजे.

लीला : तुमच्याच दृष्टान्ताप्रमाणें पाहिलें तरी बाळपणाचें मोठेपण तिळमात्र कमी होत नाहीं. प्रवासाचे सारे टप्पे सारखेच त्रासदायक असले तरी सुर-वातीच्या हुषारीमुळें बाळपणाचा टप्पा तितका अवघड वाटत नाहीं; शिवाय त्यावरून खालीं पडलें तरी फार लागण्याचें भय नाहीं. वाढत्या वयाच्या

प्रवासाबरोबर पडण्याची भीतीही उंचावत जाते. बाळपणीं सुखदुःखाचें चक्र सारखें फिरतें खरें, पण त्याच कारणामुळें त्याची तीव्रताही क्षणिकच भासते. तीं मुलं पहा; आजच्या सुखदुःखांच्या त्यांच्या कल्पना रात्रीं झोंपेंत थकव्या- बरोबर विरून जातील; उद्यांचें जग निराळें; उद्यांच्या आशानिराशा निराळ्या! वाऱ्याच्या प्रत्येक लहरीसरशीं—सृष्टिदेवीच्या प्रत्येक श्वास- निश्वासासरशीं—बालमनाच्या सुखदुःखाची हालचाल बदलते! तेंच आपलें मन पहा! एकेक विचाराचें ओझें अगदीं जन्मभर वागवावें लागतें! कमलाकर, हीं मुलें—आपल्याच लहानपणाच्या खेळगड्यांचीं हीं हालचाल करणारीं, हुबेहुब त्यांच्यासारखींच दिसणारीं चित्रें—सारखें पहात बसलें म्हणजे आपल्या बाळ- पणाचाच काळ अजून चालला आहे—सृष्टि सर्वकाळ एकरूपच आहे असें वाटायला लागतें. कमलाकर, सृष्टीच्या या कायमच्या चित्रपटावर, आपलीं—नाहीं! तुमचीही जमा आमच्यांतच कशाला करूं? देव तुमचा तरी संसार यशस्वी करो—पण कमलाकर, आमचीं चित्रें ठेविल्यावांचूनच आम्ही—मी म्हणा, जयंत म्हणा, सुशीलाताई म्हणा—सारखीं काळाच्या ओघांत वाहात चाललों आहों! अहाहा! एकेकदां मनांत येतें कीं, बाळपणाचाच सारखा ध्यास करून मनानें—तसेंच शरीरानें पण बालरूप व्हावें, आणि या मुलांत मिसळून आमच्या पुसलेल्या प्रतिमा कायमच्या कालपटावर पुन्हां लिहून काढाव्या! कमलाकर, तुम्हांला नाहीं असें वाटत?

कमलाकर : मुळींच नाहीं. लीलावती, तारुण्यांत तुझी, तुम्हां सर्वांचीच निराशा झाली—झाली कसची? पापपुण्याच्या नसत्या कल्पनेनें तुम्हींच करून घेतली! म्हणून या वयांतल्या सुखोपभोगाला लागणारा वेळ तें सुख नसल्यामुळें तुम्हांला जड झाला आहे; आणि या रिकामटेकड्या वेळांत तुम्ही बाळपणाच्या वेड्यावांकड्या मूर्खपणाला सुख मानूं लागला! लीले, तारुण्याच्या सुखाची तुला कल्पनाही नाहीं. लहानपणीं तूं चांगली दिसत होतीस, त्या वेळीं मीं तुला हजारदां पाहिली; पण आजच्या दृष्टीनें तुझ्याकडे पाहण्याची शक्ति त्या कोवळ्या कमलाकराच्या अंगीं नव्हती. लीलावती, पापपुण्याच्या, देवाधर्माच्या कल्पना—लीले, हा पहा तुझा हात धरून तुला सुखाच्या मंदिरांत नेऊन सोडतों. (तिचा एकदम हात धरतो.) हं, लीलावती, एकदम ओरडूं नकोस, मी तुझा गुलाम आहें; लीले, तुझी पायधरणी करण्याऐवजीं एकदम हात धरिला त्याची क्षमा—असा हात सोडवूं नकोस!

लीला : कमलाकर—

कमलाकर : तुझा हात सोडून हे पहा तुझे पाय धरितों. ( तिचे पाय धरितो. ) तुझ्या तोंडांतून मोठ्यानें एक शब्द निघाल्याबरोबर सारीं माणसें जमून मी रसातळाला जाईन हें मला माहीत आहे. पण तुझ्यावर विश्वास ठेवून मीं आपले प्राण तुझ्या हातीं दिले आहेत. लीले, मला तारणार किंवा मारणार तूंच आहेस ! लावण्यलतिके, विचार कर, दूर गेलेल्या सूर्याच्याच वैभवानें रंगलेल्या या सोनेरी ढगांकडे पहा, या नुकत्या उगवणाऱ्या चांदण्यांकडे पहा, पूर्वेकडे तोंड काढणाऱ्या त्या चंद्राकडे पहा ! ही संध्या आपल्या मृत पतीच्या वैभवाची, या ढगांच्या आणि तारांच्या सोन्यामोत्यांची रास पसरून त्या चंद्राला भुलविण्यासाठीं नटून बसली आहे ! लीले, सृष्टीला पापपुण्याच्या कल्पना मान्य नाहींत ! दर महिन्याला सत्तावीस तारांचीं घरें धुंडाळणाऱ्या चंद्राची साक्ष घे ! सारी सृष्टि हेंच सांगते. लीले, नसत्या नीतीच्या कल्पनेनें माझा तिरस्कार—

लीला : तुझा तिरस्कार – तुझ्या छायेचा – तुझ्याबद्दलच्या कल्पनेचा सुद्धां तिरस्कार येईल ! ऊठ, सोड माझे पाय ! नाहीं सोडीत पाय ? ओरडूं मोठ्यानें ?

कमलाकर : नको; झाली ही आगळीक केवळ चुकून; अगदीं क्षणिक आवेशा-मुळें ! लीले, तुझ्या उदारतेची, तुझ्या पवित्रतेची तेजस्विता क्षणभर कामांध झालेल्या या माझ्या पापी डोळ्यांना दिसली नाहीं म्हणूनच तुझा असा उपमर्द माझ्या हातून झाला ! पण लीले, माझे प्राण तुझ्या हातीं आहेत. माझ्या हातून चुकून झालेल्या या भयंकर अपराधाचा कोणाजवळ उच्चार करणार नाहीं असें मला आश्वासन दे; त्याखेरीज मी तुझे पाय सोडणार नाहीं ! तुझ्या विलक्षण तेजानें मी दिङ्मूढ झालों आहें !

लीला : उठा ! या गोष्टीचा कुठेंही बभ्रा न करण्याचें हें घ्या मी तुम्हांला वचन देतें.

कमलाकर : नको; तुझ्या हाताला पुन्हां स्पर्श करण्याची माझी योग्यता नाहीं ! तुझ्या नुसत्या शब्दावर माझा विश्वास आहे. तुझे पाय धरण्याचीच माझी योग्यता आहे !

लीला : उठा, या अमृतेश्वराची शपथ घेऊन सांगतें कीं, यावज्जन्म ही गोष्ट मी कोणाजवळ बोलणार नाहीं !

कमलाकर : अहाहा ! लीले, धन्य आहे तुझी ! पापांत पडणाऱ्या माझ्या आत्म्याचा आज तूं उद्धार केलास ! माझ्या आयुष्याला आज तूं नवीन

दिशा दाखवलीस ! कमलाकराचा आज नवीन जन्म झाला ! तूंच हा नवा जन्म देणारी माता ! लीले, या चुकलेल्या लेंकराला नीट मार्गाला लाव !

**लीला :** यांत मीं काय केलें ? कमलाकर, याबद्दल त्या अमृतेश्वराचे उपकार माना ! त्याच्याजवळ चांगली बुद्धि मागा ! तुमच्या मधांच्या घाणेरड्या कल्पना —

**कमलाकर :** तुझ्या स्पर्शानें पावन झालेल्या देहांत कशा राहतील ? लीले, देवाबद्दल माझे विचार अशा तऱ्हेचे व्हावयाला आधीं तूंच कारण झालीस ! आणि आज माझा उद्धार व्हावयाला कारणही तूंच झालीस ! लहानपणीं तूं आणि जयंत एकमनानें ज्या ज्या गोष्टी करीत आलां त्या त्या गोष्टींचा मी तिरस्कार करायला शिकत आलों ! तुम्हीं मला नेहमीं एकीकडे टाकीत होतां म्हणूनच मी असा पतित झालों ! तुमची देवाबद्दलची निष्ठा वाढत गेली तसा माझा तिरस्कार वाढत गेला ! पण आज तूं मला देवाची साक्ष पटवून दिलीस ! ज्या देवाच्या कृपेनें तुझ्या अंगीं इतकें प्रखर तेज आलें, तो देव— लीले, मला सुमार्गाला लावणाऱ्या देवतेचा देव—मला पूज्य कसा नसेल ?

**लीला :** कमलाकर, चला, झालें तें झालें. आजपर्यंत जयंतांच्या कृतीचा तुम्हीं तिरस्कार केला, आतां तिचें अनुकरण करा ! त्यांचा मनोनिग्रह, त्यांची उदार पुण्यशीलता, त्यांची उदार विचारशीलता डोळ्यांसमोर ठेवून यापुढें वागत चला !

**कमलाकर :** ( तुळशीवृंदावनांतल्या महादेवावर हात ठेवून ) या कैलासनाथाची शपथ घेऊन सांगतों कीं, तुझी आज्ञा मला शिरसामान्य आहे. लीले, जा तूं आतां. आजपर्यंत मनांत आलेल्या नास्तिक कल्पनांचें, आतांच्या अमंगळ पापविचारांचें, क्षालन करण्यासाठीं मी आज मोकळ्या मनानें त्या भगवंता-जवळ प्रथमच क्षमा मागणार आहें ! घटकाभर हृदय मोकळें करून मला या मूर्तीला अश्रूंचा अभिषेक करूं दे ! लीलावती, या पाषाणहृदयांतून वाहणाऱ्या अश्रूंच्या गंगेंत ही पाषाणमूर्ति सुद्धां विरघळून टाकल्याखेरीज मी इथून हालणार नाहीं!

[ एकाग्र दृष्टीनें देवाकडे पाहात राहतो. लीला जाते. ]

**कमलाकर :** ( एकदम उठून ) उठा, कैलासनाथ, या नदीच्या तळांतल्या गाळांत बुडी मारून खरोखरीच कैलासवासी व्हा ! ( देव नदींत भिरकावतो. ) माझा, माझ्या छायेचा, माझ्याबद्दलच्या कल्पनेचा सुद्धां तिरस्कार आं ! आकाशांतल्या दिवट्यांनो ! पाहिलांत आजचा हा नाटकी प्रकार ? लौकरच या

नाटकाचा शेवटचा अंक तुम्हांला दिसेल! जयंताचा मनोनिग्रह, त्याची पुण्य-शीलता—लीले, तुम्हां सर्वांची पुण्यशीलता मला चांगली समजते! जयंतासाठीं रात्रंदिवस झुरणाऱ्या या छत्रकडीनें मला नीतिपाठ शिकवावे काय? इतका मी मूर्ख नाहीं! नीतीचे फाजील डावपेंच मी ओळखून आहें! ठीक आहे, तुमची नीतिमत्ता पायाखालीं तुडवून तुमच्या चोरट्या सुखाची राखरांगोळी करीन तरच नांवाचा कमलाकर! मनोरमेचा जयंताला शह लावून त्याला सळो का पळोसें केलें म्हणजे आपोआप तो या पोरीच्या पायाशीं लोळण घेईल; हळूहळू यांच्या पापाला पाय फुटून तें चारचौघांत रांगूं लागलें म्हणजे लीले, तुला एखाद्या बाजारबसवीच्या पायरीवर नेऊन बसवायला कितीसा उशीर लागणार? इकडे मनोरमेला, केवळ ती जयंताची लग्नाची बायको, एवढ्यासाठींच फसवून तिचे धिंडवडे काढतों आणि जयंताच्या तोंडाला काळें फासतों. आणि नंतर सुशीलेचा समाचार! खवळलेल्या पद्मा-करानें सुशीलेला घरांतून दरवडा घालून पळविण्याचा घाट घातला आहे आणि त्या बाबतींत माझ्या साह्याबद्दल त्यानें दहा हजार रुपये देऊं केलेच आहेत! ठीक आहे. दहा हजारांला सुशीलेच्या पातिव्रत्याचा सौदा कांहीं वावगा नाहीं! लीले, या दुखवलेल्या सापाचा डाव किती भयंकर असतो याची तुला लौकरच ओळख पटेल!

[जातो.]

## अंक पहिला समाप्त

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

[ सुशीला निजली आहे; विद्याधर भीत भीत प्रवेश करितो. ]

विद्याधर : परमेश्वरा, या साहसांत मला यश देऊं नकोस ! माझ्या या साहसी हेतूला ही वेळ आणि त्याचा विषय किती तरी प्रतिकूल आहेत. बाहेर शीतरश्मि निशापतीनें आपल्या अमृतवर्षी कोमल किरणांनीं या भूतलावर चंद्रिकेचा पाऊस पाडून अंतराळाला दुग्धवर्णाची शोभा आणिली आहे ! या उरफाट्या दुग्धसमुद्राच्या नीलवर्ण तळाशीं मंदतेजोमय तारकामौक्तिकें विरल पसरलीं आहेत ! या पुण्यस्नानानें आनंदलेली भूदेवी मंदवायूच्या रूपानें वाहणाऱ्या समाधानाच्या निश्वासाबरोबर गगनमंडलांत पुष्पपराग उधळीत आहे. पुण्यवंताच्या निकट सहवासानें पापवृत्ति सुद्धां पुष्कळशी मावळून जाते, त्याप्रमाणें छायारूपानें वृक्षाखालीं दडून बसलेल्या मूळच्या काळ्याकुट्ट अंधाराला सुद्धां या चांदण्याच्या निकटवर्ती प्रभावानें किती तरी उजाळा आला आहे ! सारें निर्दोष, प्रेमवृत्ति जग निद्रावश होऊन चोंहीकडे शांतता दिसत आहे ! सजीव सृष्टीच्या शांतवृत्तीमुळें चंद्रिकेंत हा सौम्य, शांत, स्पष्ट दृग्गोचर होणारा शहराचा भाग पहात असतांना, सृष्टीच्या सत्यतेचा विसर पडून, दुर्बिणींतून एखाद्या चित्रांतला देखावा मी पहात आहें असें वाटतें ! आणि चंद्रिका म्हणजे रवितेजाचें चित्रांत उतरलेलें, मंद आणि दृष्टिसुसह रूपच नाहीं तर काय ? या देखाव्यांत पुण्यशील सुशीला तर मूर्तिमंत शांतिदेवीच शोभते आहे. अहाहा ! किती अलौकिक शोभा, मनोहर लावण्य, तेजोमय पवित्रता, गंभीर वृत्ति ही ! या शांत, पवित्र आणि रम्य चित्राकडे पाहून मला काश्मीरची, त्या रमणीय झेलम नदीची, आणि तिच्या भोंवतालच्या गुलाबाच्या ताटव्यांची आठवण होते ! हिंदुस्थानच्या नंदनवनांतल्या त्या मंदाकिनीच्या—

झेलम नदीच्या—दुतर्फा पसरलेल्या त्या गुलाबी गालिच्यावर, जर ही शांति-सुंदरी निजवली तर वेडावलेल्या कवींना तरी शारदादर्शनाचा भास होईल आणि झेलम नदीचा रमणीय प्रवाह कवितेचा मूर्तिमंत ओघच वाटेल. अहाहा! हें दर्शनसुख चिरकाल लाभेल काय? जगदीश्वरा, कधीं काळीं सृष्टीचा लय करण्याचा तुझा खरोखरच हेतु असेल तर तो आतांच, या स्थितींत, कर, आणि माझी दृष्टीची शक्ति मात्र जिवंत ठेव. अथवा ही पूर्वेकडची खिडकी उघडतों म्हणजे चंद्राला हिच्या मुखमंडलाचें पूर्ण दर्शन मिळून मोहानें तो येथेंच थांबेल आणि ही सुखमय रात्र अशीच चालू राहील. पण नको; अशा रीतीनें काळाला फसविण्याच्या प्रयत्नापेक्षां अधिक सुख देणाऱ्या या सुख-मूर्तीलाच मोह पाडण्याचा प्रयत्न करावा. हिला स्पर्श करूं का? नको, माझ्या नुसत्या उष्ण निश्वासानें सुद्धां ही शांतिदेवता जागी होईल. सुशीले—

[ सुशीला उठून उभी राहते. ]

सुशीला : कोण विद्याधर?

विद्याधर : सुशीलाबाई, अशा अकल्पित स्थितींत मला पाहून तुम्ही भ्यालां नाही किंवा ओरडलां नाहीं, यावरून आतांच मीं तुम्हांला शांतिदेवता म्हटलें त्याची तुम्हीं सार्थकता केलीत; आणि त्यावरून माझ्या विनंतीचा विचार सुद्धां तुम्ही शांत मनानें कराल अशी मला आशा वाटूं लागली आहे!

सुशीला : एकंदर प्रकारावरून मला तुमचा हेतु अर्धामुर्धा कळून चुकून, तुमच्याबद्दल तिरस्कार मात्र वाटतो! पण यांत भिण्याचें किंवा ओरडण्याचें कारणच नाहीं! आत्मविश्वास हेंच संरक्षणाचें साधन आहे! उत्कट पातिव्रत्याच्या अलोट शक्तीवर माझा फारच भरंवसा आहे. पापांचें पारिपत्य करण्यासाठीं अणुरेणूंत भरून उरलेला परमेश्वर, पतिव्रतेचा पाठिराखा असतो! शिवाय, त्यांचा आत्मा—या निशिगंधाच्या सुवासांत मिसळून चंद्रकिरणांवर तरंगणारा माझ्या नाथांचा अदृश्य आत्मा—माझ्याभोंवतीं नेहमीं पहारा करीत असतो! तेव्हां मला भिण्याचें कारणच नाहीं! तसेंच, अगदीं बिकट प्रसंग आल्याखेरीज चारचौघांना जमवून बाजार भरविण्याचाही मला कंटाळा आहे! बरें, तुमची कोणती विनंती आहे?

विद्याधर : पण आधीं हें सांगा, कीं तुमच्याशीं बोलत बसायला कांहीं भय नाहीं ना?

सुशीला : भय, संशय हीं सारीं पापाचीं भावंडें आहेत! माझ्या शीलाबद्दल सर्वांची चांगली खात्री आहे. बोला लौकर काय बोलायचें आहे तें.

विद्याधर : सुशीले, कालपर्यंत माझ्या आयुष्याचें गलबत शून्य हेतूच्या समुद्रांत वाटेल तिकडे संचरत होतें, पण तुझ्या या तेजस्वी नेत्रदीपकाच्या खुणेनें माझ्या विश्रांतीचें स्थान मला दाखविलें! सुशीले, तुझ्याशीं पुनर्विवाह करून सदैव या दिव्य दीपकाच्या प्रकाशांत राहण्याची माझी उत्कट इच्छा आहे! तूं माझा स्वीकार करशील का?

सुशीला : समुद्रांतले जसे खुणेचे दिवे खालीं खडक आहे असे दाखवीत असतात, त्याप्रमाणें माझ्या या डोळ्यांची उभारणी सुद्धां माझ्या अभेद्य पाषाणहृदयावर झालेली आहे! तेव्हां तुमच्यासारख्या धाडशी खलाश्यानें त्यापासून आपलें गलबत दूर ठेवावें हेंच बरें. विद्याधर, कालच्या वाटाघाटी-नंतर आजच्या प्रश्नाचें कारणच नाहीं. आणि त्यांतून तुमच्या आतांच्या हिडिस धाडसानें तर तुमच्याशीं पुनर्विवाह करण्याची कल्पना सुद्धां मनाला सहन होत नाहीं!

विद्याधर : सुशीले, लोकापवादाच्या भीतीनें कदाचित् उघड पुनर्विवाहाला तुझी तयारी नसली तर—

सुशीला : (रागानें) तर काय?—विद्याधर, तुम्ही शुद्धीवर नाहीं वाटतें?

विद्याधर : सुशीले, दया कर, माझी निराशा करूं नकोस! तुझ्या सहवासा-वांचून सारें जग मला शून्य होईल! पुनर्विवाह नको तर निदान गुप्तपणें तरी माझा स्वीकार कर!

सुशीला : तुमच्या प्रत्येक शब्दानें तिरस्काराची परमावधि होते आहे विद्याधर, कालचा तुमचा विनय, ज्ञान, लज्जा हीं काय झालीं?

विद्याधर : सुशीले, मी वेडा झालों आहें. बाहेर चंद्राच्या प्रकाशानें चोहींकडे उजेड पसरला आहे; पण तुझ्या मुखचंद्राच्या प्रकाशानें माझ्या हृदयांत अंधार पडून मला पापमार्गच स्पष्ट दिसत आहे; त्याच्या तेजानें माझे डोळे दिपून पापपुण्याचा भेद मला दिसत नाहीं! आश्चर्यानें भांबावल्यामुळें माझी विचारशक्ति नष्ट झाली आहे! सुशीले, प्राणेश्वरी, माझा तिरस्कार करूं नकोस. तुझ्यापायीं माझे प्राण, आणि प्राणांपेक्षांही अमूल्य असें माझें सच्छील अर्पण करावयास मी तयार आहें!

सुशीला : सच्छील अर्पण करणार! तुमचें सच्छील तुमच्याजवळ आहे कोठें? तुम्ही चोरासारखे आंत शिरतांना शील बाहेरच राहिलें आहे! सच्छील पर-स्त्रीच्या खोलींत कधींच शिरणार नाहीं!

विद्याधर : रात्रीच्या पडद्याआड चोरट्या प्रेमाला झांकून ठेवलें तर—

सुशीला : माझ्या बालपतिराजाच्या हक्काचा अभिलाष करणाऱ्या राक्षसा, चल नीघ येथून! इतकेंच नाहीं, तर सूर्योदय झाल्याबरोबर या घरांतूनहि काळें कर! तूं दृष्टीआड झाल्याखेरीज मी अन्न ग्रहण करणार नाहीं!

विद्याधर : अशी प्रतिज्ञा तरी करूं नकोस. निदान माझ्या दृष्टिसुखाच्या तरी आड येऊं नकोस! चातक मेघमालेच्या नुसत्या दर्शनानें जिवंत राहतो तसें तुझ्या दृष्टीच्या अमृतवर्षावानेंच माझ्या दग्ध प्रेमाचें पुनर्जीवन होईल! तुझ्या पतीच्या वैभवाचा उपभोग मिळाला नाहीं, तर त्याचें नुसतें चित्र पहाण्यांत मी समाधान मानीन! कैलासनाथाप्रमाणें शशिकला प्रत्यक्ष मस्तकीं धारण करतां आली नाहीं तरी तिच्या चंद्रिकेच्या प्रभेवरच चकोर आपली तृषा भागवितो! सुशीले, माझा स्वीकार केला नाहींस हेंच माझें मोठें दुर्दैव! तशांत मला हद्दपार करून माझ्या दुर्दैवाच्याही सीमेपलीकडे मला लोटूं नकोस!

सुशीला : यानंतर तुम्हांला या घरांत राहूं देणें फार भयंकर नाहीं का?

विद्याधर : सुशीले, या घरांतून बाहेर पडतांच मी या जगालाही मुकेन. नको, प्रेमानें विचारशून्य झालेल्या या तुझ्या वेड्या भक्ताची हत्या करूं नकोस!

सुशीला : मला तुमची दया तर येते, पण तुमच्या राहण्यानें स्वतः मला भय नसलें तरी लीला, वीणा किंवा द्रुमन यांच्यासाठीं तरी मला तुमचा बंदोबस्त केला पाहिजे! दैवी रूपाखालीं लपून बसलेल्या तुमच्या राक्षसी कृतीचा त्यांच्या अल्लड मनाला मोह पडून—

विद्याधर : ही तुझी भीति निराधार आहे! लीला जशी तुझी बहीण तशीच माझीही. तुझ्याखेरीज सर्व स्त्रिया मातेसमान आहेत! शिवाय परमेश्वराची माझ्यावर कृपादृष्टि झाली तर मागेंपुढें तुझें माझ्याबद्दलचें इतकें वाईट मत एक क्षणांत बदलून टाकीन अशी मला आशा आहे!

सुशीला : एका क्षणांत दुसऱ्याचें आपल्याबद्दलचें मत अजिबात बदलून टाकण्याची अद्भुत शक्ति तुमच्यांत आहे, याबद्दल वाईट अनुभवानें का होईना माझी खात्री झालेली आहे. बरें, तुम्हांला या घरांत राहण्याची मी परवानगी देतें; पण ज्या दिवशीं मला तुमचें वर्तन वाईट दिसेल—

विद्याधर : त्या दिवशीं, त्या क्षणीं, हें घर सोडावयास माझी तयारी आहे. पण तोंपर्यंत माझ्या आजच्या अपराधाची क्षमा करून त्याबद्दल कोठें उच्चार करूं नकोस.

सुशीला : ठीक आहे. जा आतां आपल्या ठिकाणीं! परमेश्वर तुम्हांला तुमच्या

पापाची क्षमा करो !

विद्याधर : उदार सुशीले, शाबास तुझ्या मोठेपणाची ! आजचा हा अपराध विसरून यापुढें मला तुझी भक्ति करण्याची आज्ञा दे ! आज ना उद्यां माझ्या तपश्चर्येचें फळ मला मिळाल्यावांचून राहणार नाहीं. तोंपर्यंत मात्र अशाच उदारपणानें माझ्या या धाडसाच्या प्रवेशावर विस्मृतीचा पडदा टाकून हा देखावा दृष्टीआड कर, एवढीच, देवी, तुझ्या पायांजवळ याचना आहे.

[ पडदा पडतो. ]

## प्रवेश दुसरा

[ तात्यासाहेब व कमलाकर फांशांनीं सोंगट्या खेळत आहेत.
धाईनें गोकुळ प्रवेश करितो. ]

गोकुळ : ( स्वगत ) जी दुर्वार्ता तात्यासाहेबांना सांगण्यासाठीं मी इतका धांवत आलों, जी ऐकल्यापासून माझ्या मनांत तिच्याखेरीज दुसरा विषय घोळत नाहीं, ती कोणती ? इतक्या महत्त्वाची बातमी विसरलों म्हणावें तर तेंही शक्य नाहीं. का गडबडींत ती बातमी ऐकून घेण्यापूर्वी ती सांगण्यासाठीं मी पळत सुटलों ? काय बरें असावी ती ? [ विचार करीत उभा राहतो. ]

तात्यासाहेब : कायरे गोकुळ, असा सचिंत कां ? कांहीं मला आणलेला एखादा निरोप विसरला आहेस काय ?

गोकुळ : छे: छे: तसें कांहीं नाहीं ! सहज उभा आहें आपला. ( स्वगत ) कोणती गोष्ट ती ?

तात्या : ( कमलाकरास ) किती पडले ? पोबारा ! मग पळालीच ती ! आतां हातीं लागत नाहीं.

गोकुळ : ( स्वगत ) हां ! दुमन पळून गेली हीच बातमी. ( प्रकट ) तात्यासाहेब, एक मोठी चमत्कारिक बातमी सांगायची आहे आपल्याला ! हो; विसरेन म्हणून टांचण सुद्धां करून ठेवलें आहे. हा घ्या वाचा कागद.

[ एक कागद तात्यासाहेबांस देतो. ]

तात्या० : ( आश्चर्यानें ) काय, दुमन नाहींशी झाली ? सांग पाहूं, काय काय

झालें तें ? केव्हां गेली, कुठें गेली, कोणाबरोबर ?

गोकुळ : त्याचा कांहीं मागमूस सुद्धां नाहीं ! काल रात्रीपासून तिचा पत्ता नाहीं; वसंतराव सारखा तपास करीत आहेत; पण कुठें थांग लागत नाहीं.

तात्या० : फारच आश्चर्य म्हणावयाचें ! का हो कमलाकर, तुम्हांला कांहींच आश्चर्य वाटत नाहीं यांत ?

कमलाकर : ( स्वगत ) द्रुमन पळाली हें ऐकून यांना आश्चर्य वाटतें; पण मला हें ऐकून आश्चर्य कां वाटत नाहीं हें यांना कळलें तर मात्र हे आश्चर्यानें वेडे होतील ! ( प्रकट ) मला यांत मुळींच आश्चर्य वाटत नाहीं ! तिच्याबद्दल अलीकडे माझ्या कानीं थोडी कुजबूजही आली होती !

गोकुळ : कानीं थोडी कुजबूज ? आमची ही तर माझ्या कानीं कर्णाळीं सारखी ओरडत होती रोज ! हा सारा स्त्रीस्वातंत्र्याचा परिणाम ! सोडा म्हणावें बायकांना आणखी मोकळ्या ! आतां परत नाहीं आणतां येत कुठें ? सुधारणा, सुधारणा बरें ही कमलाकर !

तात्या० : फारच आश्चर्य आहे म्हणायचें ! बरें, जा, वीणेला आधीं इकडे पाठीव ! विसरूं नकोस !

गोकुळ : ( स्मरणवहीवर टिपतो. ) वीणेला आधीं इकडे पाठीव. [ जातो. ]

तात्या० : काय बोलाफुलाला गांठ पडली पहा ! त्या दिवशीं बाबासाहेबांजवळ बोलल्याप्रमाणें वागण्याचा प्रसंग इतक्या लवकर येईल असें वाटलें नव्हतें.

कमलाकर : म्हणजे ? स्त्रीस्वातंत्र्याच्या विरुद्ध खरेंच जायचा विचार आहे आपला ?

तात्या० : विचार नाहीं, निश्चय आहे ! पण ही पहा आलीच वीणा ! ( वीणा व गोकुळ येतात. ) वीणे, ऐकली ना ही विलक्षण बातमी ?

वीणा : हो बाबा, आणि म्हणून तिकडेच जायला निघालें आहें मी !

तात्या० : वीणे, वसंतरावाकडे जायचें कारण नाहीं.

वीणा : बाबा, अशा वेळीं सुद्धां जाऊं नको म्हणतां ?

तात्या० : अशा वेळीं नाहीं, पण इथून पुढें केव्हांही त्यांच्याकडे जाण्याची मी तुला मनाई करितों आहें !

वीणा : मनाई ? स्त्रियांच्या स्वतंत्रतेला तुम्ही स्वतांच निर्बंध घालणार ?

तात्या० : हो. स्त्रीपुरुषांच्या स्वैर संचारापासून अनिष्ट परिणाम होतील असें मला वाटतें.

वीणा : म्हणजे द्रुमनच्या चुकीबद्दल मला शासन ?

तात्या० : तुलाच काय ? सुशीला, लीला यांना सुद्धां मी बंदी करणार ! आजपासून पुरुषांची बैठक निराळी, आणखी स्त्रियांची निराळी ! कारणावाचून कोणी कोणाशीं संबंध ठेवायचा नाहीं. गोकुळ, सर्वांना माझ्या दिवाणखान्यांत घेऊन ये. ( गोकुळ जातो. ) आणखी वीणे, वसंतरावाशीं यापुढें तुझा कोणताही संबंध असतां कामा नये ! मीच त्याला आपल्या इथें न येण्याची ताकीद करणार आहें !

कमलाकर : काय, वसंताला इथें येण्याची बंदी ? त्याचा काय अपराध आहे यांत ?

तात्या० : असें करणें थोडेंसें निर्दयपणाचें आहे खरें, पण प्रत्यक्ष त्याच्या बहिणीनेंच असा विपरीत प्रकार केल्यानंतर आतां त्याला घरीं येऊं देणें म्हणजे शुद्ध वेडेपणाचें होईल. चर्चाविषय झालेल्या मनुष्याच्या आसपासच्या माणसांवर सुद्धां कुटाळांची निंदाव्यंजक दृष्टि फिरते ! एखादा अंधुक तारा दाखविण्यासाठीं लोक आधीं शेजारच्या ठळक ताऱ्यांकडे बोट करितात.

वीणा : बाबा, माझें त्यांच्यावर प्रेम आहे हें विसरतां तुम्ही !

तात्या० : आणखी आतां तुलाही तें विसरलें पाहिजे !

वीणा : पण तुम्हींच आधीं मला त्यांच्यावर प्रेम करायला सांगितलें !

तात्या० : तसेंच आतां न करायला सांगतों ! वीणे, याबद्दल अधिक वाटाघाट करण्याचें कारण नाहीं, माझी आज्ञा तुला ऐकलीच पाहिजे.

वीणा : ऐकली पाहिजे म्हणजे ? मी नाहीं ऐकणार ! स्त्रियांना वाटेल त्याच्यावर प्रेम करायला अधिकार आहे ! प्रेमाच्या बाबतींत कांहीं मी तुमची बांधलेली नाहीं ! माझ्या मनाप्रमाणें वागायला मी माझी मुखत्यार आहें.

कमलाकर : ( स्वगत ) उच्छृंखल मनाला मोकळें सोडण्याचा हा परिणाम !

तात्या० : वीणे, जसें मीं तुला पूर्वी स्वातंत्र्य दिलें तसेंच आज परत घेणार !

वीणा : घेणार म्हणजे ? ही गोष्ट कांहीं तुमच्या हातची नाहीं. पक्ष्याला पिंजऱ्यांतून मोकळें सोडणें सोपें, पण पुन्हां कोंडणें कठीण !

गोकुळ : ( स्वगत ) ऐका हीं मुक्ताफळें ! आमच्या इकडे असले चोचले मुळींच उपयोगी नाहींत. मला तर स्त्रीपुरुषांच्या तसबिरा सुद्धां एकत्र ठेवण्याची भीति वाटते ! ( पाहून – प्रकट ) तात्यासाहेब, ते पहा वसंतरावच इकडे येत आहेत. सांगूं का त्यांना आपली आज्ञा ?

वीणा : थांबा, थांबा, आतांच असा निष्ठुरपणा करूं नका ! मला त्यांची शेवटची भेट तरी घेऊं द्या !

तात्या० : ठीक आहे; मी वर जातों. मला त्यांची भेट घ्यावयाची इच्छा नाहीं; तूं पण लौकरच ये! फार वेळ बोलत बसू नकोस.

[ वीणेखेरीज सर्व मंडळी जातात. ]

वीणा : विलायतेंत असा अंधार खास नसेल! काय बाबांची लहर ही! हें ऐकून बिचाऱ्या वसंतरावांना काय वाटेल? माझें मस्तक अगदीं फिरून गेलें आहे. वसंतरावांनाच यावर तोड विचारली पाहिजे! ( वसंतराव येतो. ) या. कळली सारी हकीकत मला! पण प्रिया, त्या बातमीपेक्षांही विलक्षण आणखी दुःखकारक बातमी तुम्हांला ऐकावयाची आहे. तुमच्याशीं न बोलण्याबद्दल बाबांनीं मला ताकीद केली आहे आणि तुम्हांलाही आमच्या घरीं येण्याची बंदी होणार आहे. काय उपाय करावा आतां?

वसंत : हा निवळ जुल्म आहे. विलायतेंत एखाद्या मुलीवर असा प्रसंग आला तर ती खुशाल आपल्या वल्लभाबरोबर निघून जाते!

वीणा : होय ना? मग मी पण तसेंच करणार! झाली याबद्दल बाबांची नाचक्की तर मी काय करणार? त्यांची चूक झाली म्हणूनच मी तरी चूक करणार. पर्वतावर चिखल झाला म्हणजे नदीचा प्रवाह गढूळ व्हायचाच!

वसंत : पण पळून गेली यांत दुमननें काय वाईट केलें? माझ्या प्राणा, विलायतेंत असे प्रकार दररोज शेंकडों होतात! मला दुमनबद्दल कांहींच वाटत नाहीं. ती तरी आपल्या वल्लभाबरोबरच निघून गेली असेल! तुझी आहे ना तयारी?

वीणा : अगदीं या घटकेला! चला आंत; विशेष कांहीं होण्यापूर्वी सर्व बेत ठरवून टाकूं.

[ गोकुळ येतो. ]

गोकुळ : ( स्वगत ) थकलों बुवा ही धावपळ करून. दुमन पळून गेली पण तिला माझ्या इतकें कांहीं पळावें लागलें नसेल! ( प्रकट ) वसंतराव, हें घ्या पत्र!

वसंत : ( पत्र वाचून ) यांत तात्यासाहेबांनीं मला येथें येण्याची बंदी केली आहे. गोकुळ, त्यांना सांग तुमची आज्ञा मला मान्य आहे म्हणून!

[ गोकुळ जातो. ]

वसंत : चल लाडके, पुढचा एकंदर बेत ठरवून टाकूं.

[ जातात. ]

[ भूतमहाल – द्रुमन व कमलाकर ]

**द्रुमन :** एकूण मी कुठें आहें याचा कुणालाही संशय आला नाहीं ?

**कमलाकर :** मुळींच नाहीं ! मी तुला सांगतच होतों ! अपराधाच्या जागेपासून प्रथम फार दूर जाण्याचा प्रयत्न कधींच करूं नये ! दूरच्या प्रवासाच्या आटाआटींत पकडणाराला सुगावा मात्र लागायचा ! मीं पसरून दिलेल्या बातम्यांमुळें त्यांचे भलभलत्या रीतीनें तपास चालले आहेत.

**द्रुमन :** तुम्ही येईपर्यंत माझ्या जिवांत जीव नसतो अगदीं. सारखी तुमच्या वाटेकडे नजर लावून बसतें.

**कमलाकर :** पण कोणाच्या नजरेस पडत नाहींस ना ?

**द्रुमन :** मुळींच नाहीं. या घराची भुताटकीबद्दल बोलवा असल्यामुळें या रस्त्यानें सुद्धां कोणी फारसें जात येत नाहीं ! पण प्रिया, असा बंदिवास आणखी किती दिवस काढावा लागणार ? अज्ञातवासाचे हे दिवस संपवून लग्नाच्या बंधनानें कायमची मोकळी होऊन, एकदोन महिन्यांनीं अवतार घेणाऱ्या आपल्या कुलदीपकाला घेऊन राजरोस चारचौघांत केव्हां हिंडेन असें झालें आहे मला ! कधीं निघणार आतां ?

**कमलाकर :** लाडके, थोडा धीर धर ! आजच मी इथून निघालों तर उगीच संशयाला कारण होईल ! एकदोन दिवसांत तात्यासाहेबांच्या कामासाठीं मला मुंबईसच जायचें आहे; तेव्हां सर्व व्यवस्था आपोआप होईल !

**द्रुमन :** मुंबईस कोणाला पत्ता लागणार नाहीं ना पण ?

**कमलाकर :** वेडी कुठली ! मुंबईसारख्या ठिकाणीं बिनचूक पत्ता माहीत झाला तरी नेमकें माणूस हुडकून काढितां येत नाहीं; मग मुद्दाम नापत्ता झालेल्या माणसाची गोष्टच नको ! पण माझी ओळख फार असल्यामुळें, मुंबईपर्यंतचा प्रवास माझ्यापासून दूर म्हणजे बायकांच्या डब्यांत बसून करावा लागेल.

**द्रुमन :** आपल्याबरोबर जन्माचा प्रवास करण्याच्या आशेवर हा एवढा प्रवास मी सहज पतकरीन ! पण प्रिया, मीं घर सोडण्याबद्दल फार तगादा लाविला होता त्याची क्षमा केली आहे ना ?

**कमलाकर :** अगदीं मनापासून ! बरें, तूं तुझ्याबरोबर आणलेला तो दागिन्यांचा डबा काढून ठेव ! आलोंच मी. ( द्रुमन जाते. ) सुधारक चिखलांत पडलेल्या

गाईचा उद्धार करण्याचा प्रयत्न करितात. पण अशा सवत्स धेनूचा उद्धार करण्याचा हा पहिलाच प्रयत्न आहे. काय मूर्ख पोर! माझ्या वाटेकडे नजर लावून बसते! ठीक आहे! तुला वाटेला लावल्याखेरीज माझी वाट मोकळी होणार नाहीं. आतां मुंबईस जाण्यापूर्वी बायकांच्या डब्यांत बसवून सोडून द्यावी झालें! मग जाईल नशीब फिरेल तिकडे.

[ जातो. पडदा पडतो. ]

## प्रवेश चवथा

[ गोकुळचें घर. गोकुळ विचार करीत उभा आहे. ]

गोकुळ : उपरण्याला गांठी मारून आठवण राहात नाहीं म्हणून स्मरणवही तयार केली, पण तिचाही उपयोग होत नाहीं; कित्येक गोष्टींचें टांचण करण्याची आठवण होत नाहीं; टांचून ठेवलेल्या गोष्टी पाहण्याची आठवण होत नाहीं; आणि आज तर स्मरणवही कुठें ठेवली हेंच स्मरत नाहीं. स्मरणवही सांपडती म्हणजे विद्याधरांच्या भेटीचा दिवस आजचाच ठरविला आहे कीं नाहीं याचा शहानिशा करून घेतां आला असता. मला वाटतें आज त्यांनीं यायचें आम्हीं ठरविलेलें नाहीं. नाहीं तर त्यांच्या नियमितपणावरून म्हणजे या वेळेस त्यांनीं यायलाच हवें! का कबूल केल्याप्रमाणें यायचा त्यांना विसर पडला? या लोकांना आठवण राहत नाहीं तर स्मरणवह्या कां ठेवीत नाहींत? त्यांच्या स्वागताची तयारी तर चोख झाली आहे. या देशमुखांकडच्या जुन्या खुर्च्या वगैरे किती उपयोगी पडल्या आज! (पडद्यांत–गोकुळ, अहो गोकुळ) आले वाटतें विद्याधर! (मोठ्यानें) या हो असेच नीट! (विद्याधर येतो.) या, बसा. मला वाटलें तुम्ही आतां येत नाहीं म्हणून.

विद्याधर : एकदां कबूल केल्यावर माझ्याकडून दिरंगाई व्हावयाची नाहीं.

गोकुळ : बरें, आतां आमचें कुटुंब गेलें आहे बाहेर, सोबतिणीकडे बसायला! आणखी आपल्याला तिच्याबद्दलच बोलायचें आहे; तेव्हां ती आली तर आपल्याला कळावें म्हणून एकदां सगळ्या दारांना कड्या आहेत कीं नाहींत तें पाहून येतों. मग बोलूं अगदीं मोकळ्या मनानें. [ जातो. ]

विद्याधर : मला इथें बसवून हा गृहस्थ बाहेर गेला खरा, पण परत यायची याला आठवण कशी होणार? मी गेलों असतों बरोबर तरी बरें झालें असतें. बरें हा महात्मा आतां काय बोलणार आहे याचा तर्क सुद्धां होत नाहीं. या आतांच्या प्रस्तावनेवरून त्याच्या बायकोबद्दल बोलणार आहेसें दिसतें! परस्त्रीबद्दल अशा वाटाघाटी करण्याचा हा प्रसंग जरासा बिकट तर खराच! ( गोकुळ येतो. ) या! आलांतच ताबडतोब! मला वाटलें पुन्हां यायचें विसरतां वाटतें!

गोकुळ : छेः; विसरतों कसचा! मी इतका विसराळू नाहीं; या लोकांनीं उगीच बभ्रा केला आहे झालें! मी हें तुम्हांला पूर्वींच सांगणार होतों; पण आठवणच राहिली नाहीं! बरें; विद्याधरपंत, तुम्हांला येथपर्यंत येण्याची तसदी देण्याचें कारण सांगतों आतां. दोनचार दिवसांच्या बोलण्यावरून तुम्हीं ताडलेंच असेल कीं, आमच्या खटल्याचा प्रकार थोडासा विचित्र आहे!

विद्याधर : तुमच्यावर खटला वगैरे —

गोकुळ : गैरसमज झाला तुमचा! खटलें म्हणजे कुटुंब! माझी बायको द्वाड, कजाग आणि भांडकुदळ आहे! तेव्हां तिला ताळ्यावर आणण्यासाठीं काय युक्ति करावी? तुमच्यासारख्या पोक्त विचाराच्या मनुष्याचा या बाबतींत सल्ला घ्यावा म्हणून तुम्हांला ही तसदी दिली आहे! सांगा पाहूं आतां एखादा उपाय!

विद्याधर : अशा बायकोला हळूहळू धाक दाखवून—

गोकुळ : धाक दाखविण्याचें दूरच राहिलें; अहो, तोंडावाटें ब्र काढायची चोरी! घरांत मला तोंड उघडायचा प्रसंग फक्त जेवतांनाच काय तो येतो. फार कशाला! गेल्या वर्षी वायूमुळें एकदां तिची दांतखिळी बसली तेव्हां वैद्यबुवांना तिच्या प्रकृतीचें मान मीं सांगितल्यामुळें ती माझ्यावर रागावली! दांतखिळी बसली होती तरी सुद्धां आपणच वैद्यबुवांना समजावून सांगावें अशी तिची इच्छा दिसली. शेवटीं त्याच संतापाच्या भरांत तिची दांतखिळी उघडली; आणि तिचा त्या वेळचा आवेश पाहून भीतीनें बिचाऱ्या वैद्यबुवांची मात्र दांतखिळी बसली! तिच्या तोंडाशीं तोंड देण्याची सोय नाहीं. तिच्या भांडखोरपणाची साक्ष ही सारी आळीच देईल! भुतांच्या भुताटकीनें एखादें दुसरें घरच ओसाड पडतें, पण या डाकिणीच्या तोंडामुळें ही आळी उठून गेली आहे. शेजारच्या घरांत तीन माणसांच्या कुटुंबाची वस्ती आहे; तिच्यावर आमच्या हिच्या तोंडाची मात्राच चालत नाहीं. कारण त्या

गृहस्थाला बोललेलें ऐकतां येत नाहीं, त्याच्या बायकोला ऐकलेलें बोलतां येत नाहीं, आणि मुलीला बोललेलें आणि ऐकलेलें दोन्ही कळत नाहींत.

विद्याधर : ही दांतखिळीची कथा म्हणजे खरोखरीच दंतकथा आहे झालें. मला वाटतें तुमचा स्वभाव जरा विनोदी आहे.

गोकुळ : यांत विनोद मुळींच नाहीं. नदीच्या पुरांत वाहून जात असतांना तिच्या वेगाला कसली उपमा द्यावी याचा विचार कोण करीत बसेल? खरें विचाराल तर मी आतां जिवाला सुद्धां कंटाळून गेलों आहें!

विद्याधर : अरेरे! मग तुम्ही काडी कां मोडून देत नाहीं?

गोकुळ : अहो, काडी मोडून द्यायला घरांत काडीवर तरी सत्ता चालली पाहिजे ना! विद्याधर, ब्रह्मांडांत मायेनें जसें ईश्वरालाही व्यापून टाकलें आहे, तसेंच आमच्या घरांत बायकोनें नवऱ्याला अगदीं ग्रासून टाकिलें आहे.

[ हळूच मथुरा येते व विद्याधराला गप्प बसण्याची खूण करते. ]

मथुरा : ( स्वगत ) माझीच निंदा चालली आहे वाटतें! ऐकलें पाहिजे सारें बोलणें.

गोकुळ : तिच्या रूपाचें वर्णन तर विचारूंच नका! दुसऱ्या कोणत्या प्राण्याशीं सादृश्य नाहीं एवढ्यासाठींच तिला मनुष्य म्हणायचें!

मथुरा : ( स्वगत ) आणि यांना तर मनुष्य म्हणायचेंही कारण नाहीं. परक्या माणसाला घरीं आणून त्याच्यासमोर माझी नालस्ती करीत आहेत काय?

गोकुळ : तिचा तो मर्दानी बांधा, पहाडी आवाज, भरदार अवयव, तेल्या रंग वगैरे लक्षांत आलीं म्हणजे शूर्पणखा, हिडिंबा यांचीं वर्णनें खरीं वाटूं लागतात. जुन्या कवींच्या ठराविक उपमांची अदलाबदल केली तर तिचें यथायोग्य वर्णन थोडक्यांत देतां येईल. कोकिळेचा आवाज आणि नागिणीची कांति यांचा विपर्यास होऊन, कोकिळेचा काळा कुळकुळीत वर्ण आणि नागिणीचें फांफावणें यांची ती धनीण झाली आहे. हत्तीची मंदगति आणि हरिणाचे विशाल नेत्र यांची अशीच दिशाभूल होऊन हत्तीचे बारीक डोळे आणि हरिणाची चंचल गति तिच्या वांटणीस आलीं आहेत. दांतांच्या बाबतींतही हत्तीचेंच तिच्यावर ऋण आहे. नाकाचा सरळपणा भिवयांकडे जाऊन त्यांच्या धनुष्याची कमान नाकावर वठली आहे. ओठांनीं केसांच्या काळेपणाचा पत्कर घेऊन त्यांच्यावर आपली गुलाबी छटा पसरून दिली आहे.

विद्याधर : मला वाटतें आतां हें वर्णन तुम्ही थांबवाल तर बरें.

गोकुळ : नाहीं हो; मला तिची इतकी ओकारी आली आहे कीं, तिच्या साऱ्या

गोष्टी कोणापाशीं केव्हां एकदां ओकून टाकीन असें झालें आहे. तिचा वर्ण इतका काळा आहे कीं, अमावास्येच्या काळोखांत सुद्धां ती स्पष्ट दिसते. मेरु आणि विंध्याद्रीप्रमाणें दोन गालांत उंच होण्याची स्पर्धा चालली आहे आणि नाकानें गालांच्या त्या खिंडींत बैठक मारली आहे. जिभेच्या सहवासाला भिऊन आळींतल्या लोकांप्रमाणें हनुवटीही नापत्ता झाली आहे. याप्रमाणें साऱ्या अवयवांचा ठळकपणा नाहींसा झाल्यामुळें चेहऱ्याचें सपाट मैदान झालें आहे!

विद्याधर : हें पहा, गोकुळ, तुम्ही स्वतःच त्यांचा असा डांगोरा पिटूं लागलां तर लोकांना बरेंच होईल. आपण आपला आब राखिला पाहिजे! मागें कोण काय बोलेल हें पाहिलें पाहिजे!

गोकुळ : पाठीमागें कोण काय बोलतें याची मी मुळींच पर्वा करीत नाहीं.

मथुरा : ( स्वगत ) आणि तोंडावर बोलूं लागलें तर तोंड देत नाहीं.

गोकुळ : विद्याधर, माझा असा वेरंग करूं नका! आजपर्यंत तिच्या निंदेचें सुख सुद्धां मिळालें नाहीं. ऐका पुढें! तिचे गाल मूळचे गुलाबी तर नाहींतच, पण काळ्या रंगाचें त्यांच्यावर इतकें तकतकीत रोगण चढलें आहे कीं, रागानें किंवा लज्जेनें लाली आलीच तर गालांवर करड्या रंगाची छटा दिसेल! परंतु दुर्दैवानें हें रंगीत काम अजून कोणालाही पहायला सांपडलें नाहीं! कारण रागानें लाल झाल्यावर तिच्या तोंडाकडे पहाण्याची कोणाची छाती नाहीं. आणि लज्जेनें म्हणाल तर, ती कोणाला लाजल्याचें मला कांहीं स्मरत नाहीं. कां, कशी आहे गालांची शोभा?

मथुरा : ( स्वगत ) माझ्या गालांना नांवें ठेवीत आहेत आणि यांचे गाल मात्र अगदीं गुलाबी असतील नाहीं? गुलाबाचा रंग तर नाहींच; पण भोंवतालच्या मिसाळ खुंटांनीं आणि त्या बुरखुंडांनीं कांट्यांचें रान मात्र माजलें आहे खरें!

विद्याधर : ( स्वगत ) या बाईच्या धुमसणाऱ्या आवेशावरून लौकरच याचे गाल मात्र लाल होण्याचा रंग दिसतो, आणि हा तर ऐकत नाहीं. (प्रकट) गोकुळ, स्त्रियांच्या सौंदर्यावर असें तोंड टाकणें चांगलें नाहीं.

गोकुळ : कां बरें, तिच्या गालावर तोंडसुख घेण्याचा माझा अधिकारच नाहीं का?

विद्याधर : पण त्यांत इतकी अतिशयोक्ति नसावी.

गोकुळ : अतिशयोक्ति? मुळींच नाहीं! तुम्ही तिला पाहिली तर तुमची खात्री होईल कीं, तिच्या कपोलवर्णनांत कपोलकल्पित असें कांहींच नाहीं!

विद्याधर : पण आतां हें वर्णन पुरें करा. एवढ्यावरून मला त्यांच्या रूपाची

सहज कल्पना होईल.

गोकुळ : कल्पना होईल ? निव्वळ कल्पना आहे ही ! तिच्या सर्व अवयवांचा सलोखा संभाळून तिच्या रूपाची एकरूप कल्पना करणें शक्यच नाहीं. इकडे काळ्या कुळकुळीत रंगावरून वाटतें कीं, ही आफ्रिकेची हुंडी गफलतीनें पत्ता चुकून हिंदुस्थानच्या पेढीवर आली असावी; तर तिकडे कांहीं अवयवांच्या फाजील वाढीमुळें आणि कांहींच्या फाजील कमीपणामुळें थबकट बनविलेल्या चेहऱ्याच्या तबकडीवरून, हें जपानी कलाकौशल्य असावें असें वाटतें. मग अशा लपंडावांत तिच्या रूपाची कशी कल्पना होणार तुम्हांला ?

विद्याधर : अहो, नुसती कल्पनाच नाहीं, पण त्यांची प्रत्यक्ष मूर्ति उभी आहे माझ्या पुढें !

गोकुळ : भ्रम आहे तुम्हांला ! तिचें तोंड तुम्हांला दिसलें तर तुम्ही तोंड तिकडे फिरवाल ! अहो, आमची आई प्रथम सुनमुख पाहतांच घाबरून रामरक्षा म्हणायला लागली ! याच घरांतली गोष्ट.

विद्याधर : ( स्वगत ) आतां विषय तरी बदलावा. ( प्रकट ) घर सुरेख आहे मोठें ! काय भाडें देतां याचें ?

गोकुळ : तें सारें तिला माहीत ! आमच्या हिशेबी कामाची निम्मेनिम वांटणी झाली आहे. खर्चाचें खातें तिच्या हातीं असून जमा माझ्या हस्तें व्हायची. साखरेच्या गोण्या तिच्या कामीं आणि मी नुस्ता ओझ्याचा बैल !

मथुरा : ( स्वगत ) हें मात्र अगदीं खरें ! म्हणून तर ऋषिपंचमीच्या दिवशीं मला खणखणीत उपास पडतो !

विद्याधर : ( स्वगत ) मी मुद्दाम विषय बदलतों आणि हा पूर्वपदावर येतो. ( प्रकट ) का हो, एवढ्या घरांत सोबतीवांचून तुम्हांला भीति वाटत नाहीं ?

गोकुळ : एकटा असलों तर नाहीं वाटत भीति ! पण ती जन्माची सोबतीण जवळ असली तर मात्र भीति वाटते !

विद्याधर : तुम्ही तुमच्या कुटुंबाला फार भितां असें दाखवितां, पण तुमच्या बोलण्यावरून तसें दिसत नाहीं !

गोकुळ : दिसत नाहीं ? ती इथें असती तर दाखविलें असतें कसं काय आहे तें ! अहो, ती इथें नाहीं म्हणून तर मी हें बोलतों आहें. मागें एकदां अशीच ती बाहेर गेलेली पाहून मीं जयंतांना घरीं आणलें आणि असाच या बाबतीचा खल करीत बसलों ! अगदीं असाच प्रसंग ! पण मागें तिनें चोरून उभें राहून सारें बोलणें ऐकून घेतलें आणि मग कोण गहजब माझ्यावर ! माहेरीं जायला



एच-२७३

काय तयार झाली ! बाकी ती हजारदां ही भीति घालते, पण खरोखरी कांहीं कधीं जात नाहीं ! ती माहेरीं गेली तर तिच्याऐवजीं माझा तरी सासुरवास चुकेल खास !

**विद्याधर :** बरें, त्या अशा मागें उभ्या आहेत हें तुम्हांला कसें कळलें ?

**गोकुळ :** त्यांत कांहीं विशेष नाहीं ! तिला पाहून जयंतांनीं मला विचारिलें कीं, हें बोलणें चोरून ऐकून तुझ्या बायकोनें तुझ्यावर तोंड टाकिलें तर काय करशील ? मीही जोरानें म्हणालों, कीं तिनें तोंड टाकलें तर मी अस्सें इकडचें तोंड तिकडे करून टाकीन ! असें म्हणून असा झटक्यानें मागें पाहतों—

**मथुरा :** तों मी ही अशीच मागें उभी ! असेंच ना ? बोला ! आतां कां वाचा बसली ?

**गोकुळ :** भीमरूपी महारुद्रा वज्र हनुमान मारुती !

**मथुरा :** आतां हें सोंग करितां काय ! म्हणे गालावर रोगण बसलें आहे ! करूं कां आपल्या गालावर रोषणाई ? मी आफ्रिकेची हुंडी, जपानी कलाकौशल्य ! मला लाज नाहीं ! होय ना ? बोला, आतां कां गप्प !

**गोकुळ :** मी तुझ्या पायां पडतों ! माझी चूक झाली ! एवढा अपराध पदरांत घे !

**मथुरा :** कशाला एवढें पण ! तुम्हांला माझा सासुरवास होतो नाहीं ? आणि जन्माची सोबतीण नको नाहीं का ? ही मी जातें माहेरीं ! म्हणे ती खरोखरच जात नाहीं ! आतां पहा डोळे फाडून ! माझा अडला आहे खेटर या घरांत—

**गोकुळ :** हवीं तितकीं खेटरें मला दे ! पण पाहुण्यांच्या देखत तरी नको !

**मथुरा :** आणि तुम्हीं मात्र पाहुण्यांजवळ माझी नाहीं नाहीं ती नालस्ती करावी ! पण पाहुण्यांचें मला काय भय ! पाहुणे तुमचे ! त्यांना नाहीं लाज वाटली परक्या बायकोबद्दल वाटाघाटी करितांना ?

**गोकुळ :** ( एकीकडे ) विद्याधर, आतां पळा, त्या खिडकींतून, धुराड्यांतून, जिथून सांपडेल तिथून रस्ता गांठा आणि जीव वांचवा ! आमची ओळख ठेवा ! पळा !

**मथुरा :** माझे कान कांहीं फुटले नाहींत ! त्यांना कशाला जायला सांगता ? मीच जात्यें आपल्या माहेरीं ! [ रागानें जाते. ]

**गोकुळ :** आज आपल्या दोघांचा पुनर्जन्म झाला ! माझ्या अशा यमपुरीच्या वेशीपर्यंत कैक फेऱ्या झाल्या आहेत म्हणा ! पण तुम्हांला हा प्रसंग जरा नवीनच आहे ! मघांशीं दार लावलेलें पहावयाला गेलों खरा; पण पहायचें विसरलों त्याचा हा परिणाम !

विद्याधर : पण याचा परिणाम काय होणार पुढें ?
गोकुळ : आज ती खास माहेरीं जाणार ! आतां काय करावें ?
विद्याधर : बरें, यांचे वडील तरी चांगले सुखी आहेत का ?
गोकुळ : सुखी आहे साधारण ! पण तो इला फार दिवस राहूं देणार नाहीं ! पक्का चिक्कू आहे तो ! दसऱ्याचें सोनें सुद्धां त्याच्या हातून सुटत नाहीं ! कोणी निरोप एखादा सांगितला तर त्यांतले देखील चार शब्द दलालीदाखल ठेवून घेईल !
विद्याधर : मग आतां असें करूं ? तात्यासाहेब वगैरे त्याच्या ओळखीच्या मोठ्या माणसांच्या सहीचें तुमच्या सासऱ्याला पत्र पाठवूं ? त्यांत सर्व हकीकत कळवून तुमच्या कुटुंबाला थारा देऊन चढवून ठेवूं नये असें लिहूं ? म्हणजे तो समजूतदार असला तर आपणच तिला येथें आणून पोंचती करील ! अशा निराधार स्थितीचा अनुभव आला म्हणजे त्यांचा वरचढपणा आपोआप नाहींसा होईल !
गोकुळ : आली ती; जरा थांबा !

[मथुरा येते.]

मथुरा : चला जरा आंत ! मला त्या भिंतीच्या लगीवरून माझी पेटी काढायची आहे म्हणून भिंतीखालीं या खुर्च्यांची उतरंड लावायची आहे. ओढा त्या खुर्च्या ! ( विद्याधरास ) तुम्हीही उचला एक ! तुमचेंही अंग आहेच या चारगटपणांत; तेव्हां तुम्हांलाही शिक्षा पाहिजेच ! चला, बघतां काय ? माझी गाडी चुकेल ! मी याच गाडीनें जाणार बाबांकडे !
गोकुळ : विद्याधर, चला; उचला तें मेज; कांहीं इलाज नाहीं !

[खुर्च्या ओढीत सर्व जातात.]

## प्रवेश पांचवा

[घराच्या मागील बाजूचा बाग. एका बांकावर बसून लीला व जयंत बोलत आहेत.]

जयंत : लीले, तात्यासाहेबांनीं तुझ्याशीं बोलण्याची बंदी केल्यामुळेंच आपल्याला या रमणीय वेळीं चोरून भेट घेण्याची बुद्धि उत्पन्न झाली. काय मनुष्य-

स्वभाव आहे पहा! आजपर्यंत कित्येकदां तरी दिवसच्या दिवस आपण एकमेकांशीं बोलल्यावांचून काढिले असतील; पण स्वाधीनच्या गोष्टीमुळें त्याचें आपल्याला कांहींच वाटलें नाहीं! तेंच आतां पहा! ही बंदी केल्याबरोबर कारण नसतांही आपल्याला एकमेकांच्या सहवासावांचून एक क्षणभरही रहावेनासें झालें आहे! आणि अगदीं निर्दोष भेटीसाठीं सुद्धां अशी पहाटेची चोरटी वेळ ठरवून ठेवणें भाग पडलें आहे!

लीला : जयंत, लहाणपणीं थट्टेंत आपलें लग्न ठरल्यामुळें म्हणा, किंवा कशा-मुळें तरी म्हणा, काय असेल तें असो; निष्पाप बुद्धीनें तुमच्याशीं चार शब्द बोलत बसून मनाचें दुःख हलकें करण्याइतकें समाधान मला दुसऱ्या कशानेंही वाटत नाहीं!

जयंत : लीले, हा उषःकाल किती रमणीय आहे. पश्चिमेचें पटांगण बहुतेक ओलांडून, चंद्रमा मार्गश्रमानें खिन्न झाल्यामुळें, पल्किडच्या गोलार्धाकडे वळण्यापूर्वीं अस्ताचलावर थोडा वेळ विसांवा घेत आहे आणि म्हणूनच त्याची प्रभा थोडी मंद झाली आहे! तिकडे उदयाचलावर भगवान् चंड-किरणाच्या रथावर तांबड्या यशोध्वजाचा एखादा दुसरा पदर दिसूं लागला आहे! पूर्वेकडे तारका कमी कमी होत चालल्या आहेत; जणूं काय रथवेगानें उद्धवलेल्या ध्वजपटाच्या वाऱ्यानें हीं आकाशांतील फुलें उडून जात आहेत।

लीला : या तारका मंदतेज झाल्या तरी त्यांची चमक अजून तशीच कायम आहे! या मंद चंद्रिकेच्या वृष्टीवरून असा भास होतो कीं, सृष्टिदेवता दिवसाच्या श्रमासाठीं आपल्या बालकांना या दुग्धपानानें ताजीतवानीं करीत आहे!

जयंत : (स्वगत) मातृपदाला मुकलेल्या लीलेची ही प्रेमळ कल्पना किती हृदयभेदक आहे! (प्रकट) लीले, अनन्तकालापासून तारका या पापी पृथ्वीला शिवल्या नाहींत म्हणूनच त्यांचें तेज चिरकाल चमकत आहे! आपल्या पदापासून ढळणारा उल्का पृथ्वीच्या पापी वातावरणांत शिरतांच जळूं लागून तिचा स्पर्श होण्यापूर्वीं भस्म होऊन जातो.

लीला : आकाश आणि भूमि यांच्यांत किती तरी विरोध हा! तिकडे आकाशांतील फुलें सूर्यप्रकाशाच्या दूरदर्शनानेंच कोमेजून जाताहेत आणि खालीं आपल्या चिमुकल्या बागेंतलीं फुलें उमलत आहेत!

जयंत : या हिरव्याचार तृणशय्येवर पडलेल्या दंवाच्या थेंबांतून मावळत्या चंद्राचीं किरणें चमकत असल्यामुळें मखमालीच्या गालिच्यावर जरतारीचें काम

केलें आहे असें वाटतें! हीं सुंदर फुलें तारकांच्या प्रतिबिंबासारखीं शोभत आहेत! तो पहा, लीले, जगन्नाथाच्या या उपवनांत खेळविण्यासाठीं आकाश-गंगेचा पाट काढिला आहे! ही शीतल चंद्रिका तिच्या अमृतजलाची तुषारवृष्टि तर नसेल ना?

लीला : जयंत, आपल्या फुलांप्रमाणेंच तारकांना—जगदीशाच्या बागेंतील या तेजस्वी फुलांना सुद्धां सुवास असेल का?

जयंत : (हंसून) किती स्वैर आणि मनोहर कल्पना ही! लीले, या प्रश्नाचें उत्तर देणें शक्य नाहीं. आपल्या पापक्षालनासाठीं अनन्त यातना भोगल्या-नंतर कालान्तरानें आपण ज्या वेळीं गगनमंडलांत तारकारूपानें चमकूं लागूं त्या वेळीं अनुभवानेंच आपल्या तेजोमय आत्म्याला या प्रश्नाचें उत्तर सांपडणार आहे! तोंपर्यंत अनुमानानेंच समाधान मानून घेतलें पाहिजे!

लीला : पुण्यवंतांचे आत्मे आकाशांत तारे होऊन रहातात! तेव्हां त्यांच्या पुण्याईच्या तेजाप्रमाणें त्यांच्या कीर्तीचा सुवासही खास पसरत असेल, पण पृथ्वीच्या पापगंधानें त्याचा नाश होत असेल, एवढेंच.

जयंत : लीले, लहानपणीं एक एकदा मला असें वाटे कीं, या चांदण्या म्हणजे मृतांच्या प्राणांनीं स्वर्गांत जाण्यासाठीं केलेले मार्ग असावेत आणि या आका-शाच्या चाळणींतून त्याच्या पलिकडचा स्वर्गाचा तेजोमय प्रदेश आम्हांला दिसत असावा! आईच्या मरणानंतर मी दररोज एका ठळक ताऱ्याकडे किती तरी आशेनें आणि उत्कंठेनें पहात असे!

लीला : अगदीं लहानपणीं त्यांच्या मांडीवर बसून आपण मोठमोठाल्या चांदण्या आळीपाळीनें वांटून घेत होतों आणि वेळोवेळीं अगणित ईश्वरी संपत्तीच्या वांटणीसाठीं भांडत होतों; आठवतें का तुम्हांला?

जयंत : हो! एकदां तर आईनें तुझी कागाळी ऐकून तुला सांगितलें होतें कीं, या चांदण्यांसाठीं एवढी भांडतेस कां? त्यांची लक्ष–माळा अखेर जयंताच्याच गळ्यांत घालणार ना? लीले, अगदीं कालच्या या गोष्टी! सुखाच्या त्या प्रत्येक क्षणाचें आज दुःखमय प्रेत मात्र राहिलें आहे! हा सारा आठवणीचा प्रभाव! मनुष्याला जर स्मृति नसती तर किती तरी दुःखांचा नाश झाला असता! अरेरे! त्या वेळच्या त्याच या तारका आम्हांला आज अशा स्थितींत पाहून काय म्हणत असतील? आमचे मनोरथ ऐकून क्रूर काळपुरुषाचे हे दिव्य डोळे त्या वेळीं असेच लुकलुकत होते! हे अनन्तयुगसाक्षी तारकांनों, आमच्यासारखीं अल्लड अर्भकें आशेनें आमच्याप्रमाणें भविष्य-

कालाचीं सुखदायक चित्रें काढतांना कधीं तुमच्या दृष्टीस पडलीं तर आमच्याप्रमाणेंच त्यांच्याकडे पाहून निर्दयपणानें डोळे मिचकावून हंसूं नका. तुमच्या त्रिकालदर्शी किरणांच्या प्रकाशांत भविष्याचे भयानक खेळ दाखवून त्यांना वेळींच सावध करा. ( दचकून ) हा पहा माझ्या अंगावर दंवाचा थेंब पडला! आमची ही करुणस्थिति पाहून द्रवलेल्या माझ्या मातेच्या ताऱ्याचा हा अश्रुबिंदु तर नसेल ना ?

लीला : जयंत, मागच्या आठवणी कशाला काढतां ? या वेळीं त्यांनीं आजचा अल्प आनंद मात्र नाहींसा होत आहे ! या सरत्या रात्रीच्या शोभेनें जिकडे तिकडे आनंदवृष्टि चालविली आहे! हा आनंद पाहून नेहमीं दुसऱ्याला दुःख देण्यांत आनंद मानणारा विधाता आज मेला असावा असेंच वाटत नाहीं का ?

जयंत : लीले, तुझी करुणमूर्ति पुढें असतांना तो निर्दय विधाता मेला असावा असें माझ्या मनाला कसें वाटेल ? या सरत्या रात्रीप्रमाणेंच तुझी शोभा सुद्धां उदासपणाची आहे ! तुझी मूळची आरक्तगौर कांति या निर्जीव चांदण्याप्रमाणें फिकट झालेली आहे; पूर्वेकडे नुकत्याच दिसूं लागणाऱ्या संध्यारागाप्रमाणें तुझ्या गालावर कोमेजलेल्या गुलाबाची छाया मात्र राहिली आहे ! या निस्तेज ताऱ्याप्रमाणें तुझ्या डोळ्यांची चमक क्षणोक्षणीं कमी होत आहे ! हा मंद वात तुझ्या निराशेच्या श्वासाप्रमाणेंच नाही का ? आणखी नुकत्याच पुसून टाकिलेल्या कुंकवाचा तुझ्या कपाळावर अजून राहिलेला हा पांढरा वण या फटफटीत चंद्राची साक्ष पटवीत आहे ! अरेरे ! लीले, आणखी किती दिवस तूं अशी दुःखांत राहणार ? या रात्रीचा आणखी घटकेनें रम्य, आनंदमय अशा प्रभातकाळांत शेवट होईल; पण तुझ्या आयुष्याची अघोरी रात्र मात्र शेवटपर्यंत अशीच राहणार ना ? तुला या करुणस्थितींतून सोडविण्याला मृत्यूखेरीज—हरहर, निराशेनें आलेल्या भयाण मृत्यूची आणि तुझ्यासारख्या नाजूक बालिकेची सांगड कल्पनेला सुद्धां सहन होत नाहीं !

लीला : जयंत, वेड्या मनाची फसवणूक करण्यासाठीं जरी भविष्य आपण आपल्यापुढें कधींहि येऊं दिलें नाहीं, तरी अज्ञानें तें खरोखरीच चुकणार आहे का ? अनाथ विधवेला दुःखमुक्त होण्यासाठीं समाजानें मरणाखेरीज एक तरी मार्ग मोकळा ठेविला आहे का ?

जयंत : लीले, या निर्जीव नेभळ्या समाजाची का तूं पर्वा करीत बसणार ? प्रत्येक घटकाला जिथें निःपक्षपातानें न्याय मिळतो तिथेंच समाज या नांवाची

सार्थकता होते. पण आमच्या एकदृष्टि, एकहाती, जुलमी समाजाच्या आज्ञा आस्थेनें कोण पाळणार ? विधवांच्या माना मुरगळण्यांत पुरुषार्थ मानणारा, शिक्षणापासून स्त्रियांना दूर ठेवून केवळ पशुवृत्तीनें त्यांची पायमल्ली करणारा समाज वंदनीय कसा होणार ? अरेरे ! एकाच धर्माच्या छायेखालीं विसांवा घेणाऱ्या स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या आचारबंधनांत किती भयंकर विसंगतपणा ! संसारांतली जोडी फुटली तर विधवेच्या मस्तकावरचा केशकलाप नाहींसा होतो आणि विधुराच्या मस्तकाला बाशिंग बांधण्यांत येतें ! गुडघ्याएवढ्या पोरीशीं लग्न लावण्यासाठीं उतावळेपणानें गुडघ्याला बाशिंग बांधणाऱ्या विधुराला अगदीं वृद्धपणीं सुद्धां नवरामुलगा बनून आपल्या पोरकटपणाची वरात चंद्रज्योतीच्या प्रकाशामध्यें मिरविण्याचा परवाना मिळतो; आणि गुडघ्यांत मान घालून बसलेल्या बिचाऱ्या बालविधवेला अंधारकोठडींत जुलमानें बाळपणीं संन्यासदीक्षेची शिक्षा भोगावी लागते ! एकाच घरांत एखादा थेरडा नवरदेव इकडे मंगलवाद्यांच्या कडकडाटामध्यें एखाद्या अजाण अर्भकाची विवाहमोहांत आहुति टाकितो, आणि तिकडे त्या अमंगल मंगलकार्यांत आपल्या विद्रूप दुर्दैवाचा अपशकून होऊं नये म्हणून कोपऱ्यांत तोंड घालून बसलेली बालविधवा आपल्या अंतःकरणाच्या होमांत स्वतःची आहुति देत असते ! बालवधूचें गतायुष्य वृद्ध वराच्या शेषायुष्याइतकें असलें तरी त्या विवाहाला परवानगी मिळते; इतकेंच नाहीं तर तो थेरडा मेला तर त्या बालिकेचे काळे केस जाऊन कपाळ पांढरें फटफटीत व्हायची भीति; आणि ती वधू मेली तर त्या थेरड्याला मात्र पुन्हां दुसऱ्या बालिकेला फसविण्यासाठीं पांढऱ्या केसांना काळा कलप लावण्याची मुभा ! विधवेला स्वतांच्या दाराबाहेर पडण्याची चोरी, तर विधुराला परदारागमनापर्यंत आणि विश्वदारागमनापर्यंत मोकळीक ! जिवंतपणीं जिवलग मित्रांचे सुद्धां केंसानें गळे कापणाऱ्या नीचाला मेल्यावर आपल्या स्त्रीच्या वेणीच्या पिळदार पेडाच्या दोरखंडानें स्वर्गाच्या किल्ल्यावर चढून, आपल्या पापाची पताका फडकविण्याची धार्मिक सवलत, आणि पवित्र आचरणाच्या त्याच्या अनाथ विधवेला जिवंतपणींच अपमानाच्या नरकयातना भोगण्याचा देहदंड ! लीले, अशा प्रकारच्या दुहेरी अन्यायांत गढून गेलेल्या समाजाची पर्वा कोण करील ?

**लीला :** पण अशा भयंकर अन्यायाचें सुद्धां प्राचीन ऋषींच्या वचनांचे आधार दाखवून आजचे शास्त्री समर्थन तर करतात ना ?

**जयन्त :** वर्षाकाळाच्या मेघगर्जनेनंतरची ही नुसती बेडकांची ओरड आहे.

यथाकाळीं वृष्टि करून परोपकारानें पृथ्वीवर समाधान पसरणाऱ्या त्या वर्षामेघांची ती गंभीर गर्जना कोणीकडे – आणि त्यांच्यानंतर, त्यांच्या चार थेंबांनीं रंग बदलून पिंवळ्या शालजोड्या पांघरणाऱ्या, ज्ञानगंगेच्या तळ्यांतल्या चिखलांत रुतून बसलेल्या, या बेडकांची ओरड कोणीकडे! शापानें दग्ध करून उश्शापाच्या सामर्थ्यानें ब्रह्मांडाला पुनः चिरंजीव करणारे ते प्राचीन ऋषि, आजच्या या शिव्याशापांच्या धन्यांना, आपल्या जागीं बसून आपल्या त्या काळीं लिहिलेल्या, त्या वेळच्या बालसमाजाला योग्य असलेल्या, धर्मसूत्रांचा गळफांस आजच्या वाढत्या समाजाच्या गळ्यांत अडकवितांना पाहून काय म्हणत असतील! लीले, धर्मशास्त्र प्राणिमात्राच्या कल्याणासाठीं आहे. आजचा आमचा धर्म पूर्वीच्या ऋषिप्रणीत मृत धर्माचें केवळ पिशाच आहे; आणि या पिशाचाची भीति घालून धर्ममार्तंड म्हणविणारे हे पोटभरू जादुगार बायकापोरांच्या डोळ्यांत धूळ टाकीत आहेत! लीले, तूं धाडस करून पुनः विवाहाला तयार हो!

लीला : पण पुनर्विवाहाच्या प्रसंगीं तुमचाच हात द्याल का?

जयंत : म्हणजे?

लीला : या प्रश्नाचें उत्तर द्यायलाच पाहिजे का? जयंत, सुशीलताईचा पति परलोकीं गेल्यामुळें तरी तिला दुःख भोगावें लागतें; पण माझ्या प्रेमाचे पति–माझ्या जिवाचा विसांवा—

जयंत : कोण! अजून मीच?

लीला : नाहीं तर दुसरें कोण? जयंत, बाळपणींच्या भोळ्या मनानें बांधलेल्या खूणगांठी सोडविणें मोठें कठीण आहे! पुनर्विवाहाबद्दल मी कधीं फारशी उत्कंठा दाखवीत नाहीं याचें कारण हेंच; दुसऱ्या कोणाबद्दल माझ्या मनांत प्रेमाचा उद्भव होणें कालत्रयींही शक्य नाहीं! केवळ तुमच्या मूर्तीवर माझें अढळ प्रेम—

जयंत : आणि मनोरमेची तितकीच अढळ सत्ता आहे हें विसरूं नकोस. लीले, लहानपणच्या गोड कल्पना आपण वस्तुस्थितीला बळी दिल्या पाहिजेत! भोळ्याभाबड्या भूतकाळाला त्याच्या विरोधी वर्तमानकाळाखालीं झांकून भयानक भविष्याशीं टक्कर द्यायला आपली तयारी असली पाहिजे! मनोरमेला—माझ्या लग्नाच्या स्त्रीला सोडून—

लीला : नको, नको, ती कल्पना सुद्धां नको! विवाहित स्त्रीचा तुमच्या हातून असा अनादर झाला तर मला सुद्धां तुमच्याबद्दल अनादरच वाटेल! त्यापेक्षां

आपण समदुःखित्वानें अशीच जीवयात्रा संपवून परमेश्वराजवळ जाऊं आणि त्याच्या पायाजवळ दाद मागूं!

जयंत : लीले, अशा दुःखांतही बालप्रेमाची तूं अजून जोपासना करीत असशील आणि त्यामुळें आपलें दुःख द्विगुणित करून घेत असशील अशी माझी मुळींच कल्पना नव्हती!

लीला : जयंत, दुःखतापाची प्रखरता अगदीं असह्य असली तरी तिनें हृदयांतला प्रेमाचा समुद्र कसा आटणार? क्षणोक्षणीं दिसणाऱ्या आपल्या मुखचंद्राच्या दर्शनानें भरती येऊन त्याच्या अमर्याद लाटा अश्रुरूपानें कितीदां तरी, या पहा, अशा उचंबळून बाहेर येतात. जयंत, माझ्या दुर्दैवाला सीमा आहे का? काळ्या रात्रीच्या अंधारांत चक्रवाकीला प्रियवियोगाचा भास व्हावयाला कमळाचें पान तरी आड यावें लागतें; पण या सामाजिक अन्यायाच्या अंधारांत तुमच्या माझ्यामध्यें कांहीं देखील अंतर नसून तुम्ही मला अंतरला आहां, हाताजवळ असून हातीं लागत नाहीं, अगदीं जवळ असल्यामुळें विरहाची वृद्धि करीत आहां—

जयंत : लीले, रडूं नकोस! ही पहा, उषःकाल आणि प्रभात यांच्यामध्यें अल्पकालीन कालिमा पसरली आहे, तशी माझ्या आणि तुझ्यामध्यें मनोरम उभी आहे! मनोरमेच्या लग्नाच्या शृंखलेनें चतुर्भुज झाल्यामुळें हातपाय जखडले गेले नसते तर लीले, लाडके लीले, या हातानें तुला अशी प्रेमानें जवळ ओढली असती, (तिचा हात आपल्या हातांत धरितो.) आणि अर्ध्या घटकेनें प्रभात होण्यापूर्वींच तुझ्यावर प्रभातसृष्टीची शोभा पसरून दिली असती. रक्तवर्ण बालरवीप्रमाणें सौभाग्यसूर्याचा कुंकमतिलक या भव्य निटिलाकाशावर लावतांच हीं नेत्रकमलें प्रफुल्लित झालीं असतीं; आनंदाश्रूंच्या दंवानें धुतलेल्या या गुलाबाच्या शोभेनें संध्यारागाची रक्तिमा लाजली असती! स्मितहास्यामुळें दृग्गोचर होणाऱ्या दंतावलीनें कुंदपुष्पांचें तोंड बंद केलें असतें, आणि या तुझ्या द्विजपंक्तीच्या मंजुळ हास्यध्वनीनें द्विजगणाच्या अस्फुट संगीताला कर्णकठोर ठरविलें असतें! पण लीले, एका विवाहबंधनामुळें माझा नाइलाज झाला आहे!

लीला : ही सकाळची वेळ मोठी पापी आहे आणि मन मोठें स्वार्थी आहे. दशदिशांत दरवळणाऱ्या या सुवासाशीं एकजीव झालेल्या आणि हिमतुषारांत स्नान केल्यामुळें शीतस्पर्शी झालेल्या या सकाळच्या वाऱ्यानें गारठलेल्या या माझ्या देहाला आपल्या उष्ण श्वासाचा विसावा सोडावासा वाटत नाहीं!

मनोरमावहिनीच्या हक्काची चोरी करतांना थरथर कांपणाऱ्या पायांचा आधार या शरीराला अपुरता असल्यामुळें या हाताचा आधार सोडवत नाहीं !

जयंत : ( हात सोडवून ) दूर हो, लीले, दूर हो, मन पापी आहे तसेंच तें अनावरही आहे ! अशा स्थितींत शुद्ध भगिनीप्रेमाचा लोप झाल्यावांचून कसा राहील ? हा निर्मल बंधुप्रेमाचा ओघ आहे असें मी माझ्या मनाला सांगण्याचा प्रयत्न करीत आहें; पण त्याची साक्ष अगदीं निराळी पडते आहे ! लीले, लीले, दूर हो ! माझ्या कोंडलेल्या कंठांतून कसाबसा बाहेर येणारा हा कंपित स्वर ऐकून तरी दूर हो ! अविचाराच्या अमावास्येमुळें खळबळणाऱ्या हृदयसमुद्रांतल्या प्रेमजलाच्या लटांचा हा घडघडाट तुला ऐकूं येत नाहीं का ? या उष्णनिश्वासानें–दग्ध होत चाललेल्या विवेकाच्या या धुरानें तुझी कोमल काया करपून जाणार नाहीं का ? चोरट्या पापस्पर्शानें रंध्रारंध्रांतून आंत शिरूं पाहणाऱ्या या अस्थानीं आनंदाला बाहेरच्या बाहेर थांबवून माझ्या शरीराच्या किल्ल्याच्या रक्षणासाठीं प्रतिरंध्राजवळ पुलकांच्या बुरुजावर उठून उभी राहिलेली ही रोमांचसेना तुला मागें लोटीत नाहीं का ? दूर हो, लाडके लीलावति, संमोहानें अर्धवट मिटलेल्या आपल्या डोळ्यांची शक्ति अजून थोडी तरी कायम आहे तोंच विवेकाचा मार्ग शोधून काढूं ! नाहीं तर एका क्षणांत या कसोटीच्या कड्यावरून लटलटणाऱ्या शरीराचा तोल चुकून आपण दोघेही पापाच्या समुद्रांत पडूं !

लीला : जयंत, दया करा; हा कठोरपणा एक क्षणभर आवरून धरा ! अशा निर्दयपणानें आपल्या अनाथ भगिनीला—पण नको, खोटें कशाला बोलूं ?—आपल्या मनोमन साक्षी पत्नीला, या लहानपणच्या लाडक्या लीलेला लोटूं नका ! आजपर्यंत दुःखाच्या आगींत करपणाऱ्या, पुढेंही त्यांतच भाजून निघणाऱ्या, या सुकलेल्या जीवाला एक क्षणभर तरी जिव्हाळ्याचा ओलावा मिळूं द्या ! संसाराच्या अरण्यांत भ्रमिष्टासारखें भटकणाऱ्या या तापसीला, तिच्या एक वेळच्या या हक्काच्या हृदयमंदिरांत, पण आजच्या केवळ धर्मशाळेंत एक क्षणाचा तरी विसावा घेऊं द्या ! माझ्या पापस्पर्शानें आपली पवित्र काया भ्रष्ट झाली तर अलोट अश्रूंच्या मंगलस्नानानें तिला अशी धुऊन काढीन !

जयंत : नको, नको ! लीले, हा अश्रूंचा पूर आवरून धर ! चवदा रत्नांपेक्षांही अमूल्य अशा या अश्रूंची, अदृश्य प्रेमसूत्रांत गुंफलेली ही मोहनमाळ या अभाग्याच्या गळ्यांत कशाला घालतेस ? हें पापी वैभव परमेश्वराला

आवडणार नाहीं.

लीला : गतसुखांच्या देवांनीं आणि चालत्या दुःखाच्या दानवांनीं आंतड्यांच्या पिळानें आंवळलेल्या मनाच्या मेरूनें हृदयसागराचें मंथन करून बाहेर काढिलेल्या या अश्रुमय रत्नांची वैजयंती, या माझ्या वैकुंठेश्वराखेरीज दुसऱ्या कोणाच्या गळ्यांत घालूं ? प्राणजीवन, आपणच माझ्या दैवाचे देव, प्रेमाचे परमेश्वर, भाग्याचे भगवंत, विश्वासाचे वैकुंठेश्वर आहां. देवा, आजवर खोल हृदयसागरांत दाबून ठेवलेलीं हीं प्रेममौक्तिकें ज्या मनकवड्या पाणबुड्यानें बाहेर काढिलीं त्यालाच तीं दिलीं नाहींत तर तूं सुद्धां मला क्षमा करणार नाहींस ! (त्याला आलिंगन द्यावयास पुढें जाते; तो तिचे दोन्ही हात धरितो.)

[कमलाकर येतो.]

कमलाकर : (स्वगत) वा ! – हरवलेल्या वीणेच्या ऐवजीं ही जोडी सांपडली ! ठीक ! आवाजाच्या धोरणानें इकडे आलों तें वाजवीपेक्षां फाजील सफळ झालें ! आतां तात्यासाहेबांच्या लांबलचक कानांत अगदीं खुबीनें यांचा आवाज घुमवायला किती वेळ लागणार ! आंधळ्या जयंता, मात्र आणखी एक क्षणभर असाच रहा ! [जातो.]

जयंत : परमेश्वरा, सर्वहृदयसाक्षी परमेश्वरा, क्षणोक्षणीं खचत चाललेल्या माझ्या दुबळ्या हृदयाला या वेळीं मेरुमांदारांचें स्थैर्य देऊन या कसोटीच्या प्रसंगांतून मला पार पाड ! लीले, लीले, लज्जाललिते लीले, दूर हो ! आपल्यावरची जबाबदारी ओळखून दूर हो ! आपल्या प्रत्येक आचाराबद्दल, उच्चाराबद्दल, प्रत्येक विचाराबद्दल—अगदीं स्वप्नांतल्या स्वप्नांत येणाऱ्या तरळत्या कल्पनेबद्दल सुद्धां आपण आपल्या समाजाला, देवी मानवतेला, आपल्या हृदयस्थ परमेश्वराला जबाबदार आहों ! पापविचाराच्या नुसत्या छायेनेंही दूषित झालेल्या हृदयाच्या सिंहासनावर विश्वसाम्राज्याचा पवित्र प्रभु एक क्षणभर सुद्धां विसांवणार नाहीं ! ती पहा, राक्षसी रूढीशीं जिवापाड झगडून मोठ्या कष्टानें आमच्या समाजांत एकेक पुढतें पाऊल टाकणारी देवी सुधारणा, आमची मूढवृत्ति पाहून खिळल्यासारखी जागच्या जागींच थबकून उभी राहिली आहे ! आमच्या उद्धारासाठीं, लोकनिंदेला न जुमानतां स्त्रीपुरुषांवर अमृताची समवृष्टि करणारी श्रीविद्यादेवी, आमच्या आचरणाकडे पाहून थरथर कांपावयाला लागली आहे ! तशीच ती पहा, केवळ परमपावित्र्याच्या दिव्यामृताचेंच पान करून अखिल मानवकोटीच्या कल्याणसर्वस्वासाठीं हृदयाच्या मंगल ब्रह्माण्डांत

भराऱ्या मारणारी, तुझ्या हृदयांचे शुद्ध संदेश एकमेकांना सांगणारी श्रीकवितादेवी -- आपली आवडती कवितादेवी ! आपल्या पापनिश्वासांच्या वातावरणांत तिचे कोमल पंख करपून शिथिल होऊन, ती गगनदेवता मातींत मिसळून मातीमोल होऊन जाईल ! आणखी या सर्वांच्याही वरच्या विश्वांत तरंगणारी तेजोमय देहधारिणी, देवींची देवी श्रीनीतिदेवी आमच्याकडे पाहून काळवंडून जाईल ! नको, नको, लीले, या ईश्वरमय देवतांच्या शापापासून दूर हो ! आपला क्षणिक प्रमाद या सर्वांच्या उज्ज्वल मुखमंडलाला काळें फांसल्यावांचून राहणार नाहीं ! तो पहा, पूर्वेकडे मनोमय महन्मंगलानें आपला सर्वसाक्षी नेत्र उघडला आहे ! आमच्याकडे पाहून तो रागानें किती लाल झालेला आहे ! भगिनी, पवित्रप्रेमपूर्ण भगिनी, आपल्या बंधूचा हात धर ! चल, इहलोकच्या सर्व आशा, प्रेमकल्पना, हृदयवृत्ति या सर्वांच्या, ईश्वरी महायज्ञांतल्या या उषेच्या निर्मल वेदिकेंत आहुति देऊन टाकूं, आणि शुद्ध प्रेमानें एकमेकांचे हात धरून उष्ण अश्रूंच्या अर्घ्यानें या उगवत्या भगवंताला प्रसन्न करून घेऊं ! त्याची करुणा भाकूं ! म्हणजे पुढच्या जन्मीं तरी आमच्या अंतर्दग्ध आशा पुन्हां सजीव होतील ! प्रीतीच्या साम्राज्यात जेवढें दिव्य, मंगल, पवित्र असेल तेवढ्याचाच काय तो समावेश होतो !

[ दोघेंही गुडघे टेंकून व डोळे मिटून सूर्यासन्मुख होतात. तात्यासाहेब, कमलाकर, मनोरमा व गोकुळ येतात. ]

**तात्यासाहेब :** काय पहातों हें मी ! एकाएकीं वीणा नाहींशी झाली. तिच्या तपासासाठीं घरभर फिरतांना, बागेंत बोलण्याचा आवाज ऐकून इकडे आलों. तो हा अघटित प्रकार !

**मनोरमा :** ( स्वगत ) अगबाई ! दिवासाढवळ्या असा अंधार ! एकमेकांच्या हातांत हात ! सूर्यनारायणा, तूंच साक्षी आहेस रे !

**गोकुळ :** ( स्वगत ) स्त्रीशिक्षण ! स्त्रीस्वातंत्र्य ! पुनर्विवाह ! घ्या साऱ्या सुधारणा एकदम !

**तात्यासाहेब :** जयंत, लीले, पुरे झाला हा फाजीलपणा ! ( दोघे दूर सरतात. ) फार चांगलें आरंभिलें आहे हें ! इष्ट सुधारणेला अशीं अनिष्ट फळें येतील असें मला वाटलें असतें तर तिचा रोपटा उगवण्यापूर्वीच मीं तिचा बीमोड केला असता ! तिकडे वीणेचा पत्ता नाहीं, इकडे तुमचा हा रोजगार ! तोंड काळें करण्याची वेळ आणलीत अगदीं !

जयंत : मामा, क्षमा करा; अगदीं स्वतःचा विसर पडून तुमची आज्ञा—

तात्यासाहेब : चूक झाली माझी. आतां तिचीं फळें मला भोगलींच पाहिजेत. जयंत, मी काय म्हणतों तें नीट ऐकून घे. आजपासून लीलेशीं बोलावयाचें नाहीं, तिच्याकडे पहावयाचें सुद्धां नाहीं. अगदीं योग्य कारणाशिवाय आपल्या खोलींतून घरांत फिरकावयाचें नाहीं. हें जर कबूल असेल तर याउपर माझ्या घरांत तुला आश्रय मिळेल; नाहीं तर चारी दिशा तुला मोकळ्या आहेत! सुधारणेचा आला तो अनुभव पुरा झाला! जर पाश्चिमात्य सुधारणा इष्टच असतील तर त्यांची पेरणी अगदीं सावकाश व्हावयाला पाहिजे. व्यक्तीप्रमाणें समाजावरही आनुवंशिक संस्कार होत असतात. स्त्रियांना पुरुषांत मिसळण्याची मनाई करण्याचें कारण व्यभिचारभय; आणि हाडींमासीं खिळलेल्या या रूढीचें बीज, दुरून एकमेकांकडे पाहणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या मनांत सदैव वागत असल्यामुळें थोडीशी मोकळीक मिळतांच आधीं तेंच डोळ्यांपुढें येऊन उभें राहतें! हा संस्कार जाण्याला कालावधि पाहिजे.

कमलाकर : भिन्न पायांवर उभारलेल्या समाजाच्या रूढि एकदम एकमेकांवर लादण्याचा प्रयत्न केला तर हेमाडपंती देवळावर मंगलोरी कौलांचें छप्पर घातल्यासारखें विसंगत होईल! [ सुशीला घाईनें येते. ]

सुशीला : काका, वीणेच्या खोलींत हें पहा तुमच्या नांवाचें पत्र सांपडलें. त्यांत ती म्हणते कीं, मी वसंतरावांबरोबर निघून गेलें; माझा त्यांच्याशीं लग्न करण्याचा निर्धार झालेला आहे! लग्न झाल्यावर आम्ही आमचा पत्ता कळवूं; तोंपर्यंत तपास करण्यांत अर्थ नाहीं!

तात्यासाहेब : वसंतरावाबरोबर कारटी गेली ना?

कमलाकर : मग तीं दोघें मुंबईसच गेलीं असतील! कारण त्या विलायती वेड्याला विलायतेचे चार करावयाला थोडीशी सवड फक्त मुंबईसच मिळण्याजोगी आहे.

तात्यासाहेब : तुमचा तर्क बरोबर आहे. कमलाकर, आतांच्या आतां जी गाडी सांपडेल तिनें मुंबईस जाऊन बारकाईनें तपास करा. चला, एक क्षणही घालवूं नका. जयंत, मीं मघांशीं सांगितलें त्याचा नीट विचार कर. लीले, चल पुढें. [ तात्यासाहेब, कमलाकर, लीला, व सुशीला जातात. ]

गोकुळ : ( स्वगत ) बायकांना पाय फुटण्याचा हा हंगाम दिसतो! ब्रुमन् गेली, वीणाताई गेली, लीलाताई गेल्यासारखीच आहे. आमच्या घरांतली सुद्धां गेली; तेव्हां आतां सुशीलाताईच्या पाळतीवर असलें पाहिजे! अजून

विद्याधर रिकामा आहे ! या समवयस्क जोडप्यांचा भरंवसा धरवत नाहीं ! मी तर प्रत्यक्ष तात्यासाहेब आणि स्वयंपाकीण आजीबाई या दुकलीवरही आपली दुरून टेहळणी ठेवणार ! [ जातो. ]

जयंत : ( स्वगत ) परमेश्वरा, आमच्या शुद्धत्वाचा साक्षी तूं आहेस ! मामांच्या या नसत्या गैरसमजाचें निराकरण तुझ्यावांचून दुसरें कोण करणार !

मनोरमा : कां आतां उघडले का डोळे ?

जयंत : कोण, तूं का ? दुःखावर तिरस्काराचा कळस पाहिजेच होता !

मनोरमा : बघितलें, घरच्या बायकोला टाकून तिसरीच्या पायांवर लोळण घातली म्हणजे चारचौघांत अश्शा लाथा बसतात ! आतां तरी ठिकाणावर या !

जयंत : नागिणी, मामांच्या वाग्बाणांनीं झालेल्या जखमांवर हें विष कशाला ओततेस ?

मनोरमा : अगबाई, अजून हेंच बोलणें ! इतकी फजिती झाली तरी अजून लाज नाहीं ना ?

जयंत : मनोरमे, जा. माझ्या सहनशीलतेचा अंत पाहूं नकोस.

मनोरमा : अहाहा, वाटतें का कांहीं बोलायला ? फार दिवस ऐकून घेतलें हो ! आज आपल्याला चांगलें राजरोस पकडलें आहे !

जयंत : मनोरमे, मनोरमे, जा; आपलें तोंड काळें कर.

मनोरमा : आपलेंच तोंड काळें झालें आहे बरें ! चला, आतां कान धरून नेतें आणि घरांत अडकवून ठेवतें, समजलां !

जयंत : त्या घरावर अशी लाथ मारून चालता होतों; समजलीस !

[ रागानें निघून जातो. ]

मनोरमा : ( रडत ) देवा, मेल्या तुझे डोळे फुटले का आहेत ?

[ कमलाकर प्रवेश करितो. ]

कमलाकर : ( स्वगत ) मनोरमेला घरांतून काढावयाला हीच संधि आहे ! हिचा हा राग शांत झाला नाहीं, तोंच आजच्या आज माझ्याबरोबर माहेरीं जाण्याची कल्पना तिच्या डोक्यांत भरवून दिली पाहिजे ! घरांतून पाऊल टाकलें कीं पुरी ताब्यांत आली. ( प्रकट ) मनोरमाबाई, उठा, रडूं नका अशा !

मनोरमा : कमलाकर, आज अगदीं अखेर झाली हो ! मला अगदीं लाथेनें तुडविलें !

**मनोरमा :** प्रत्यक्ष नाहीं हो! पण घरावर अशी लाथ मारतो म्हणून निघून गेले! आतां घर म्हणजे मीच नाहीं का? शहाण्याला शब्दाचा मार नि मूर्खाला टोणप्याचा मार!

**कमलाकर :** अरेरे, सुधारणेचीं सारीं फळें बरें हीं! पण असें रडून काय होणार? चला घरांत!

**मनोरमा :** कमलाकर, आतां मी घरांत पाऊल सुद्धां टाकणार नाहीं! अशी विहिरीचा रस्ता धरणार!

**कमलाकर :** तुम्ही आईबापांच्या इतक्या आवडत्या, तुमच्या आईला काय वाटेल?

**मनोरमा :** आईला, बाबांना, तुम्हीच सांगा सारें आतां.

**कमलाकर :** तुमच्या वडिलांनीं हा प्रकार पहिला असता तर आकाशपाताळ एक करून सोडलें असतें!

**मनोरमा :** त्यांच्या हातीं काय आहे बिचाऱ्यांच्या?

**कमलाकर :** काय आहे? मला वाटतें त्यांनीं जयंतावर फिर्याद ठोकली असती!

**मनोरमा :** नवराबायकोच्या कज्जांत कायद्याची कांस धरून काय उपयोग?

**कमलाकर :** कां बरें, दिवाणींत दावा केला तर सरकार उडाणटप्पू नवऱ्याला सक्तीनें त्याच्या बायकोच्या ताब्यांत देतें!

**मनोरमा :** होय का? मग मला पोचवा बाबांकडे! माझें म्हणणें ते खास ऐकतील.

**कमलाकर :** पण मी कसा पोंचविणार? मला आतांच्या गाडीनें जावयाचें आहे

**मनोरमा :** मग मी सुद्धां आतांच्या गाडीनें येतें! ही अशी निघतें!

**कमलाकर :** वाः! तात्यासाहेबांना विचारलें पाहिजे! असें करें जातां येईल तुम्हांला? हा सारा प्रकार प्रथम त्यांनीं जयंताला मोकळीक दिल्यामुळें जरी झाला असला तरी ते तुम्हांला जावयाला परवानगी खास देतील.

**मनोरमा :** भलतेंच कांहीं तरी! तुम्ही फारच भोळे! अहो, त्यांची नाहीं का यांत फजिती व्हायची? ते कशाला देतात परवानगी आणि मी विचारतें तरी कशाला? तेंच या साऱ्या अनर्थाला कारण!

**कमलाकर :** पण तुम्हांला माहेरीं नेऊन पोंचविल्याबद्दल ते माझ्यावर रागावल्या-खेरीज कसे राहतील?

**मनोरमा :** अहो, त्यांना कांहींच कळवायचें नाहीं यांतलें. मी मुकाट्यानें निघतें तुमच्याबरोबर म्हणजे झालें.

**कमलाकर :** मग माझी कांहीं हरकत नाहीं; पण मी आतां पहिल्या गाडीनें दिवसा—

**मनोरमा :** आतां कांहीं अडचणी काढूं नका ! कसेंही करून मला बाबांच्या घरीं नेऊन पोंचवा, नाहीं तर मी कांहीं जीव ठेवणार नाहीं !

**कमलाकर :** बरें असें करूं. मी आतांच्या गाडीनें जातों म्हणून घरांतून बाहेर पडतां आणि रात्रीं बरोबर साडेनऊ वाजतां तांगा घेऊन आपल्या मागल्या रस्त्यावर उभा राहतों. साडे नवाची तोफ झाल्याबरोबर तुम्ही घरांतून निघून या म्हणजे झालें. चालेल असें केलें तर ?

**मनोरमा :** चालेल. कसें तरी करून मला माहेरीं पोंचवा म्हणजे झालें ! पण कोणाजवळ याबद्दल अगदीं चकार—

**कमलाकर :** वा: ! इतका का मी मूर्ख आहें ? चला, तो पहा विद्याधर इकडे येत आहे. ठरल्याप्रमाणें यावयाला मात्र चुकूं नका ! [ मनोरमा जाते. ]

**कमलाकर :** ( स्वगत ) मानी मनोरमे, शेवटीं सांपडलीस माझ्या जाळ्यांत ! आज रात्रीच्या गाडीनें द्रुमनला आणि मनोरमेला एकमेकींच्या नकळत निरनिराळ्या डब्यांत बसवून मनोरमेसह मध्येंच उतरून पडतों म्हणजे झालें ! सकाळच्या गाडीनें जावयाचा बहाणा केला म्हणजे मनोरमेबद्दल मागें जी ओरड होईल तिच्यांत माझें नांव मुळींच निघणार नाहीं. पण ही पीडा कशाला मध्येंच आली ? [ जातो. विद्याधर येतो. ]

**विद्याधर :** झालेला प्रकार फार गैर झाला ! खरेंखोटें केल्यावांचून तात्यासाहेबांनीं जयंताला एकदम कडक शासन केलें ! एकट्याला एका बाजूला नेऊन नीट विचारलें असतें तर फार चांगलें झालें असतें ! त्याला गांठून तसाच थोपवून धरिला पाहिजे. नाहीं तर या रागाच्या भरांत तो आत्महत्या करावयाचा ! जयंत जरी उतावळा आणि आत्यंतिक मनोवृत्तीचा आहे तरी अगदीं खुल्या दिलाचा, नीतिमान् आणि कांटेतोल सरळ चालीचा आहे ! त्याच्याकडून रेपामात्र बांकडें पाऊल पडणार नाहीं अशी माझी बालंबाल खात्री आहे. परिस्थितीचा परिणाम अशा माणसावर फारच लौकर होतो. लौकर जाऊन त्याला थांबविला नाहीं तर भलताच प्रकार झाल्यावांचून राहणार नाहीं.

[ जातो. ]

[ घाटांतील पुलावर गाडी उभी राहिली आहे. कमलाकर व मनोरमा एका डब्यांत. ]

मनोरमा : मेल्या मांगा, एका भोळ्या भाबड्या गाईला अशी एकटी गांठून तिचा गळा कापतोस ? परमेश्वरापुढें याचा काय जाब देशील ?

कमलाकर : परमेश्वरासमोर उभें राहण्याचा माझा मुळींच विचार नाहीं ! मनोहर मनोरमे, आतां आरडाओरड करण्यांत काय हंशील आहे ? घाट संपण्यापूर्वींच माझा मनोरथ---

मनोरमा : मेल्या, तुझी जीभ झडून जावो ! आतां अशी उलट गाडीनें जाऊन तुझ्या काळ्या कर्माचा जगभर डांगोरा गाजवितें.

कमलाकर : मूर्ख मनोरमे, तुझ्या घरांतून बाहेर पडण्याच्या चोरट्या चालीकडे लक्ष देऊन मग या पोरखेळाच्या गोष्टी सांग ! आपण होऊन माझ्यामागें निघून आलीस असें मीं सांगितलें तर तुझी काय वाट होईल ? बायकांची बदनामी करण्यांत आनंद मानणारे आमचे लोक तुझ्या कडू सत्यापेक्षां माझ्या गोड असत्यालाच उचलून धरतील ! मग अशा साहसानें निर्दोषपणा-बरही पापाचा शिक्का मारण्यापेक्षां पापावरच निर्दोषपणाचा मुलामा कां लावीत नाहींस ?

मनोरमा : राक्षसा, तात्यासाहेबमामंजींच्या पायावर लोळण घेईन, तिकडच्या मनाची खात्री करून देईन, आणि तुला त्यांच्याकडून तुझ्या पापाचें शासन देवबीन !

कमलाकर : ते काय शासन करणार ? फार झालें तर त्यांच्या घरचा आश्रय तुटेल ! पण लहानपणाइतकी मलाही त्यांच्या आश्रयाची आतां जरूर नाहीं. पंख फुटलेल्या पक्ष्याच्या पिलाला घरट्याचा आधार देणाऱ्या फांदीची काय परवा ? ती फांदी कडाडली तरी ती मोडून पडण्यापूर्वींच त्याला दुसऱ्या झाडावर झेंप टाकतां येते. पण काय मी मूर्ख ! उगीच बोलून वेळ घालवीत आहें. मानी मनोरमे, जितक्या उतावळेपणानें घरांतून माझा हात धरून बाहेर निघालीस तितक्याच उतावळेपणानें अस्सा तुझा हात धरून ( तिचा हात धरावयास जातो. )

मनोरमा : पण त्यापेक्षांही उतावळेपणानें मी जगाबाहेर निघून जातें ! देवा,

घे मला पदरांत !

[ डब्यांतून खालीं पुलावर उडी टाकते. पण पुलाच्या तारांतच् अडकून मूर्च्छित पडते. ]

**कमलाकर :** मूर्ख मनोरमे, गेलीस ! प्राणाचें मोल देऊन शील संभाळलेंस ! दोन पर्वतांच्या विशाल ओठांवरून आणि पुलाच्या दंतपंक्तींतून काळाच्या या खोल दरीच्या जबड्यांत गडप झालीस ! अरे, क्षणभर थांबलेली गाडीही चालू झाली ! कांहीं हरकत नाहीं. उद्यां सकाळीं, घारीगिधाडांना मनोरमेच्या दगडांवर पडलेल्या मांसखंडांची मेजवानी दिल्याचें समाधान कांहीं थोडें-थोडकें नव्हे !

[ गाडी निघून जाते. पडदा पडतो. ]

*अंक दुसरा समाप्त*

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

[ दवाखान्यांतील एक खोली. दुमन वळकटीवर बसली आहे. जवळ बाबासाहेब व शिपाई उभे आहेत. दुमननें तोंडावरून पदर घेतला आहे. ]

**बाबासाहेब :** बाई, आतां शेजारच्या खोलींतल्या रोग्यांनीं अशी खबर दिली आहे कीं, पहांटेस तुमच्या खोलींत मुलाच्या रडण्याचा आवाज ऐकूं आला! पुढें एक तशाच आवाजाची किंकाळी ऐकूं आली आणि नंतर रडण्याचा आवाज बंद झाला! बाई, त्यामुळें दवाखान्याचा अधिकारी या नात्यानें मजवर तुमच्या खोलीची झडती घेण्याचा वाईट प्रसंग आला आहे! (शिपायांस) हं, पहा रे नीट खोली तपासून. (शिपाई खोली तपासतात.) बाई, तुम्ही कोण आहां? कुठल्या राहणाऱ्या? कां? बोलत का नाहीं? आज चार दिवस मी येथें नव्हतों, त्यामुळें मला तुमची माहिती मिळाली नाहीं. नाहीं तर प्रत्येक रोग्याची मी स्वतः वास्तपूस करीत असतों!

**शिपाई :** बाई, जरा बिछान्यावरून उठा!

[ दुमन एकदम वळकटींतून मृत बालक काढते. ]

**दुमन :** देवा! अखेर हें केलेंस ना! कशाला उठा? बाबासाहेब, हें पहा माझें पाप आणि ही मी!

**बाबासाहेब :** कोण दुमन! राक्षसिणी, हें काय केलेंस?

**दुमन :** कोण राक्षसी? मी कशाची राक्षसी? मी या बाळाची आई आहें.

**बाबासाहेब :** पण हें अघोर कर्म करायला तुझा हात कसा वहावला!

**दुमन :** तें राक्षसी रूढीला विचारा, राक्षसी समाजाला विचारा, राक्षसी धर्माला, त्या धर्मानें पावणाऱ्या तुमच्या राक्षसी देवाला विचारा! बाबासाहेब, मी

प्रत्यक्ष याची आई--आई आपखुषीनें पोटच्या गोळ्याच्या मानेला नख कसें हो देईल? मातृप्रेमाची कल्पना करा! आईच्या आंतड्यांचा गळफांस बाळाच्या गळ्याभोंवतीं कसा हो बसेल? मी पातकी, पतित आणि दुराचारी तर खरीच; पण माझ्या सोनुल्याच्या मानेला नख देतांना पाण्यानें डबडबलेल्या डोळ्यांनीं त्याला पुरतासा पाहिला सुद्धां नाहीं हो! पहा, पहा, कोळशाच्या खाणींतून निघाला म्हणून हिऱ्याची चमक कमी होते का? पहा, अगदीं चित्रासारखा नाहीं का? पण हाय, हाय! एका घटकेपूर्वी सारख्या चमकणाऱ्या या हिरकण्या अगदीं चित्राच्या कांचेच्या डोळ्यांसारख्या थिजल्या आहेत!

**बाबासाहेब :** अरेरे! द्रुमन, कोणत्या अधमानें—

**द्रुमन :** नका, नका, त्या करटी विश्वासघातकी राक्षसाचें नांव तोंडावाटे उच्चारण्याचा प्रसंग माझ्यावर आणूं नका! मी फसलें. बाबासाहेब, पुनर्विवाहाच्या नुसत्या आशेनें मी पापाच्या पंकांत बुडालें! सुखाचा मोह मला आवरला नाहीं. ज्या कामजालांत वृद्ध वयाचे, पोक्त विचाराचे, अनुभवाचे, मोठमोठाले महात्मे, तपस्वी, तेजस्वी ऋषि, प्रत्यक्ष देवदानव सुद्धां अडकून पडले त्यांतून माझ्यासारखी अबला कशी सुटेल? वाघसिंहांना गुरफटून टाकणारें जाळें एखाद्या बालमृगीला कसें तोडितां येईल!

**बाबासाहेब :** पोरवय, भोंवताली सुखाची सृष्टि, स्वतःच्या सुखाची पूर्ण निराशा, आणि मानवी स्वभावाचा कमकुवतपणा, अशा परिस्थितींत अल्लड विधवेचें पाऊल वांकडें पडलें तर त्यांत तिला दोष कसा द्यावा? पण द्रुमन, तूं तुझें संकट कोणाला सांगितलें असतेंस तर—

**द्रुमन :** कोणाला सांगणार! संकटांत सांपडलेल्या, निस्सहाय, फसलेल्या विधवेचें दुःख कोण ऐकून घेणार! सुखावलेल्या मनुष्याला दुःखीकष्टी माणसाच्या अंतःकरणाची जाणीव कोठून होणार! शास्त्रीमंडळींच्या आरडाओरडीचा पोकळ नगारा वाजत असतां विधवेच्या आंतड्यांच्या तारांचा करुणारव कोणाला ऐकूं येणार? अनाथ गाय चुकून पाय घसरून पापाच्या चिखलांत रुतली तर तिच्या भोंवतीं गुप्त कृष्णकर्मांच्या काळिमेनें काळवंडलेल्या कावळ्यांची कावकाव मात्र सुरू होते. तिच्या दीन दशेचा मोठ्या मनानें विचार करून, तिच्या पापाकडे मनुष्यस्वभावाच्या जाणिवेनें पाहून उदार बुद्धीनें तिच्यावर आपल्या पंखांची छाया पसरणारा राजहंस कुठं तरी आढळेल का? मनुष्याला परदुःखाची कल्पना आत्मदुःखासारखी होत असती, तर आज,

पापाच्या पडद्याआड झांकलेल्या माझ्या या छबकड्याला, धुक्याआड झांकलेल्या या चंद्राला, कृष्णमेघाच्या आड लोपलेल्या या माझ्या सूर्यनारायणाला मीं नाहींसा केला असता का ? समाजनिंदेच्या भीतीनें हृदयाच्या चिंधड्या झाल्या नसत्या तर माझ्या लाडक्याला या हृदयांत सुद्धां लपवून ठेवला असता ! पण चहूंकडून कोंडमारा झाल्यामुळें केवळ पिंजऱ्यांत सांपडलेल्या वाघिणीच्या क्रूरपणानें मीं या पोटच्या गोळ्याचा घांस घेतला ! बाळा, जा ! देवाच्या पायांजवळ जाऊन त्याची करुणा भाक. तो दीनांचा दयाळू, अनाथांचा नाथ, पतितांचा पिता, पाप्यांचा पाठिराखा, पातक्यांचाही पालनहार, अगदीं अधमाधमांचा सुद्धां आधार, तुझ्या केविलवाण्या तोंडाकडे पाहून तुझी करुणेची किंकाळी ऐकून द्रवेल, आणि तुझ्या या पातकी भांबावल्या आईलाही लवकरच पायांजवळ आणील.

**बाबासाहेब :** अरेरे ! धिक्कार असो अशा या धर्माला, अशा समाजाला आणि अशा रूढीला ! भूतदया हाच साऱ्या धर्मांचा धर्म. भूतदयेला थारा देत नाहीं, पतितांचें समाधान करीत नाहीं, दुःखितांचें दुःख जाणत नाहीं तो धर्म कशाचा ? विकारवश मनुष्याच्या अंगीं जुल्माच्या टाकीचे घाव घालून असाध्य देवकळा आणण्याच्या नसत्या नादीं पडून मानवी मनोवृत्तींना राक्षसी रूप मात्र देण्यापेक्षां मध्यम दर्जाचा मनुष्यपणाच राखिलेला काय वाईट ? संसाराचा गाडा मोडून पडल्यावर परलोकचा पल्ला एकदम गांठण्यासाठीं विधवेला वैराग्याचे विमान मिळालें तर सर्वोत्तम, यांत शंकाच नाहीं. पण त्याला लोकोत्तर विवेकपाशाची बळकटी पाहिजे. अल्लड, विकारवश, अविचारी, अदूरदृष्टि, सुखासक्त किंवा पोरवयाच्या साऱ्याच विधवांना अशा धोक्यांत घातलें तर त्यांचा सर्वस्वीं नाश होण्याचेंच फार भय ! तेव्हां त्यांच्यासाठीं पुनर्विवाहाची पाऊलवाटच पडायला हवी. द्रुमन, त्यापेक्षां तुझा पुनर्विवाह झाला असता तर किती चांगलें झालें असतें ! पण लोकलज्जेला चुकविण्यासाठीं या अघोर साहसांत पडतांना उलट तूं कायद्याच्या कचींत मात्र सांपडलीस !

**द्रुमन :** बाबासाहेब, मी तुमची धर्माची कन्या आहें. माझें रक्षण करा आणखी सरकारच्या तावडींत देऊन माझे जगापुढें धिंडवडे काढूं नका. वणव्यांत होरपळणाऱ्या हरिणीवर अश्रूंची वृष्टि करा. बाबासाहेब, माझें रक्षण करा, या संकटांतून वांचवा, मी भांबावून गेलें आहें.

**बाबासाहेब :** ऊठ, द्रुमन, ऊठ – मी मनुष्य आहें. मला अंतःकरण आहे.

परमेश्वरा ! अनाथ प्राण्याच्या रक्षणासाठीं एवढें असत्याचरण करितों याची क्षमा कर. ( शिपायांस ) अरे, या मुलाची व्यवस्था लावा आणि कोणा-जवळ याबद्दल बोलूं नका.

**शिपाई :** छे ! छे ! रावसाहेब, आम्ही का पांढरपेशे आहों ? का ब्राह्मण आहों ? आमचा दिल अगदीं फाटून गेला ! मूल जिवंत उपजलें पण थोड्या वेळानें आटोपलें असें सांगूं म्हणजे झालें.

**बाबासाहेब :** द्रुमन, मी सर्व व्यवस्था नीट करितों. तूं घाबरूं नकोस. आतांच्या गाडीनेंच मला पांचसहा दिवसांकरितां परगांवीं जावें लागणार आहे. तोंपर्यंत तूं हुषारीनें रहा. चला रे. [ जातात. ]

**द्रुमन :** ( मुलाच्या प्रेताकडे पाहून ) बाळ ! काय रे तुझ्या जन्माची कथा ही ! लाडक्या, पुन्हां जन्म घेण्याचा तुझ्यावर प्रसंग आला तर देवाजवळ हट्ट घेऊन बैस आणि एखाद्या हलक्या जातींत जन्म घे ! म्हणजे शास्त्राची कोरडी बडबड, उंचपणाचा नीच अभिमान, यांचा त्रास चुकून तुला शुद्र, सरळ, भाबड्या मनुष्याच्या प्रेमाचा तरी अनुभव मिळेल. [ मनोरमा येते. ] कोण मनोरमाबाई ? देवा, असा हात धुऊन कां रे मागें लागला आहेस सारखा ?

**मनोरमा :** द्रुमनताई, घाबरूं नका. तुमची दशा पाहून माझ्या जिवाचें पाणी पाणी झालें आहे. तेव्हां तुम्हांला त्रास मी कशी देईन ? वेड्यावांकड्या प्रसंगांत अडलेल्या बाईबापडीच्या पुरुषजात कुटाळक्या करील; पण आम्हां बायकांचें तसें नाहीं ! द्रुमनताई, असला प्रसंग पाहून एखाद्या मेल्या धोंड्याचें सुद्धां पाणी होईल ! मग बायकांचें मन कसें विरघळणार नाहीं ? देवा रे देवा, या नाडलेल्या गाईवर कायरे ही वेळ आणलीस ?

**द्रुमन :** मनोरमाबाई, पुढच्या प्रसंगाच्या कल्पनेनेंच माझ्या काळजानें ठाव सोडला आहे ! बायकांनींच बायकांचा कड घेतला पाहिजे ! तुम्ही नाहीं ना माझा घात करणार ?

**मनोरमा :** सख्ख्या बहिणीप्रमाणें माझ्यावर भरंवसा ठेवून असा ! आम्हां बायकांना असले प्रकार पाहायला मिळत नाहींत म्हणूनच हीं धर्माचीं ढोंगें चालतात. यापेक्षां तुमच्यासारख्यांनीं पुन्हां लग्नें केलेलीं काय वाईट ? बरें पण तें राहूं द्या तूर्त ! तुम्ही येथें कशा आलां ?

**द्रुमन :** कशी आलें ? मनोरमाबाई, ज्या मेल्यानें मला पुनर्विवाहाची आशा लावून पापमार्गाला लावलें त्यानेंच आलेला हा प्रसंग टाळण्यासाठीं आणि पुनर्विवाह लावण्यासाठीं मला घरांतून बाहेर पडायची बुद्धि दिली.

आपल्याबरोबर नेण्याचें आमिष दाखवून मेल्या मांगानें विश्वासघात करून, मला एकटीलाच गाडींत बसवून दिली आणि आपण तोंड काळें करून निघून गेला. अखेर गाडींतच माझ्या पापाची घटका भरत आल्यामुळें नाइलाजानें मी या घाटपायथ्याच्या दवाखान्यांत आलें! पुढचा सारा प्रकार तुम्हांला दिसतोच आहे. पण तुम्ही येथें कशा आलां?

**मनोरमा :** अशाच फसगतीनें! तिकडच्यांवर रागावून मी जीव द्यायला निघालें तों अशाच एका राक्षसानें मला माहेरीं पोंचविण्याचें कबूल केलें; रागाच्या भरांत मी तशीच कोणाला न कळत त्याच्याबरोबर निघालें; पण गाडी घाटांत आल्यावर त्या मेल्याची पापवासना माझ्या लक्षांत आली आणि पातिव्रत्याचें रक्षण करण्यासाठीं मीं एकदम पुलावरून खालीं उडी टाकिली!

**दुमन :** उडी टाकिली! अहाहा! मनोरमाबाई, धन्य तुमची! बरें पुढें?

**मनोरमा :** पुढें मी पुलावरून खालीं न पडतां पुलाच्या तारांतच अडकून राहिलें. थोड्या वेळानें कामावरचे लोक येऊन त्यांनीं मला या दवाखान्यांत टाकिलें. पण इथें पहातें तों बाबासाहेबमामंजी! आज चार दिवस ते इथें नव्हते म्हणून वेळ निभावली; पण आतां कसें होणार?

**दुमन :** त्याची नका तुम्ही काळजी करूं! ते आज पुन्हां बाहेरगांवीं जाणार! त्यांची बदली झाल्याचें ठरल्यासारखें आहे! तेव्हां ते फारसे पुन्हां इथें रहाणार नाहींत. तितक्या वेळांत तुम्ही साफ बऱ्या होऊन आपल्या माहेरीं जाल! पण हो, तुम्हांला फसविणारा कोण हें नाहीं सांगितलें तुम्हीं! कोणत्या राक्षसानें—

**मनोरमा :** कमलाकरानें!

**दुमन :** कमलाकरानें! अरे मांगा! मनोरमाबाई, त्यानेंच माझा आणखी माझ्या बाळाचा असा गळा कापला हो! मनोरमाबाई, आतां माझा संताप अनावर झाला आहे! माझ्या अब्रूची मला मुळींच चाड वाटत नाहीं. अशी मी जातें आणि त्या मांगाची कसाबकरणी साऱ्या जगाला कळवितें! तुमच्या नांवावरचा नसता कलंक तरी उडून जाईल!

**मनोरमा :** पण त्याचें सारें कृत्य लोकांच्या नजरेस आणल्याखेरीज मी जिवंत आहें असें त्याला कळूं देऊं नका, नाहीं तर तो मेला मांग माझ्या नांवाच्या नसत्या कंड्या पिकवीत बसेल!

[ शिपाई येऊन मूल उचलतात.]

**दुमन :** हाय! बाळा, हेंच तुझें शेवटचें दर्शन! देवा, माझ्या बाळराजाला

प्रवेश दुसरा

[ वसंत व वीणा. दुर्वास चहा घेऊन प्रवेश करितो. ]

दुर्वास : चहा आणला आहे साहेब !

वसंत : अगदीं हिंदु ! दुर्वास, कोणत्या वेळीं काय आणावयाचें हें तुम्हांला अजून कळत नाहीं ना ! अगदीं हिंदु आहां. विलायतेंतले खाणावळवाले किती हुषार असतात ! दुर्वास, हा माझा आतांचा पोषाख चहा पिण्याचा नाहीं.

दुर्वास : मग कोणत्या वेळचा आहे, साहेब !

वसंत : हा कॉफी पिण्याच्या वेळचा आहे ! विलायतेंत या पोषाखाकडे फार लक्ष द्यावें लागतें ! चहा पिण्याचा पोषाख निराळा, कॉफीचा निराळा, विडी ओढण्याचा निराळा. अहो, कांहीं दिवसांनीं तर जांभई देण्याचा पोषाख निराळा आणि शिंक देण्याचा पोषाख निराळा, इतकी सुधारणा होईल तिकडे ! जा; कॉफी आणा. [ तो जातो. ]

वीणा : अहाहा ! इतकी सुधारणा आहे ना तिकडे ! नाहीं तर आमचा समाज !

वसंत : आमचा समाज ! छि : ! हिंदु, अगदीं हिंदु ! वीणे, या अजागळ समाजांत तूं किती उत्कृष्ट मनोधैर्य दाखविलें आहेस ! माझ्याबरोबर पळून येऊन तूं प्रीतिविवाहाच्या सुधारणेची साक्षात् विजयपताकाच झाली आहेस !

वीणा : प्रिया, द्रुमनताई घरांतून निघून गेली एवढ्यावरून बाबांनीं काय गहजब केला हो ! बाबा सुद्धां अगदींच हिंदु, नाहीं ? ज्या चर्चेच्या नुसत्या सहवासाला ते भीत होते तिचा आतां स्वतःच अनुभव घेत असतील !

वसंत : वीणे, विलायती सुधारणेची खरी किंमत तुला कळली. प्रणयाचें रहस्य तूंच ताडिलेंस ! अशा हजारों तरुण मुली जेव्हां प्रेमासाठीं भडाभड पळत सुटतील तेव्हांच आम्ही इंग्रजी शिकल्याचें चीज होईल !

वीणा : अहाहा ! साऱ्या कुमारिकांचीं लग्नें अशीं चोरून, आणि साऱ्या विधवांचीं लग्नें राजरोस होताहेत असा सोन्याचा दिवस आमच्या अज्ञानी समाजांत कधीं तरी उगवेल काय ?

**वसंत** : लाडके, खात्रीनें उगवेल! तुझ्यासारख्या देवी घरोघर पळूं लागून मनोधैर्य दाखवूं लागल्या तर काय नाहीं होणार? लवकरच असा दिवस उगवेल कीं, झाडून साऱ्या कुमारिका वल्लभांबरोबर पळून जाऊं लागल्यामुळें उपवर मुलींचे बाप बेफिकीर होतील आणि म्हाताऱ्या आजींचा पुनर्विवाह जमविण्यासाठीं त्यांचे नातू वरशोधनाच्या फिकिरींत पडतील!

**वीणा** : त्या वेळीं पुढच्या पिढीला आजच्या विधवांची कल्पना होण्याकरितां प्रदर्शनांतून विधवांचीं चित्रें ठेवावीं लागतील आणि पोरींच्या लग्नाबद्दल काळजी करीत असलेल्या नटीसूत्रधारांचा संवाद असंभवनीय ठरेल!

**वसंत** : अज्ञानानें घोरत पडलेल्या समाजाचे डोळे कधीं उघडतील ते उघडोत! अजून आमच्या बायकांचें लाजणें सुद्धां पुरें झालें नाहीं!

**वीणा** : हें कांहीं खोटें नाहीं! आमची आई आतां पोक्त झाली, पण अजून बाबांना लाजते! कधीं त्यांच्या गळ्यांत हात घालते का त्यांचें मोकळ्या मनानें चुंबन घेऊन आम्हां पोरींना धडा घालून देते; नांव नाहीं! विलायतेंत असें नसेल, नाहीं?

**वसंत** : छट्, तिकडे बायका परक्यांचीं सुद्धां चुंबनें घेतात! उगीच सुधारणा झाली आहे इतकी? फुकट नाहीं राज्य करीत ते आमच्यावर! नाहीं तर तुझी आई! अजून लाजतात ना? हिंदु, अगदीं हिंदु! गचाळ!

**वीणा** : आईवरून आठवण झाली. प्रिया, आतां लग्नाचा विचार कधीं करायचा?

**वसंत** : करायचा खरा! मला सुद्धां तुझा असा अपुर्ता सहवास असह्य वाटतो. पण, सध्यां पैशाची टंचाई पडली आहे, त्या विवंचनेंत मी आहें! वकिली करीन तर उघडकीस यावें लागतें; उघडकीस यावें म्हटलें तर तुझा वियोग होणार.

**वीणा** : तो कसा? मी मुळींच बाबांचें ऐकणार नाहीं!

**वसंत** : नाहीं खरी; पण कायदा त्यांच्या बाजूला आहे ना? कायद्यानें तूं अजून अज्ञान ठरशील. काय करावें हेंच कळत नाहीं. [ मथुरा येते. ]

**मथुरा** : ( स्वगत ) तें विचित्र जोडपें कधीं पाहीनसें झालें आहे! (पाहून, प्रकट) हा मेल्यांनों, या तर वीणाताई आणि हे वसंतराव!

**वसंत** : कोण ही – अगदीं हिंदु! वर्दी दिल्यावांचून कशी आंत आलीस? विलायतेंत या आगळी––

**वीणा** : थांबा, असे तिच्यावर रागावूं नका! अहो, ही आपल्या गोकुळची मथुरा. मथुराताई, तुम्ही इकडे कुणीकडे? आमच्यासारखाच कांहीं प्रकार

झाला आहे का ?

मथुरा : नाहीं, नाहीं; तुमच्या अगदींच उलट – तुम्ही बापाच्या घरून नवऱ्याकडे पळून आलां आणि मी नवऱ्याच्या घरून बापाकडे पळून आलें आहें.

वसंत : असें; हे दुर्वास तुमचे वडील एकूण !

मथुरा : तर काय ! बाबांच्या शांतिसदनाबद्दल मी रोज सांगत नव्हतें तुम्हांला ? मला माहीत नव्हतें, तुम्हीच आमच्या खाणावळींत आहां म्हणून ! आज चार दिवस बाबा तुमच्या गोष्टी सांगतात, म्हणून म्हटलें पहावें तरी असें कोण आहे तें ! पण तुमची बाबांना ताकीद, कीं कोणाला आंत सोडूं नका म्हणून. आज अखेर त्यांचा डोळा चुकवून आलें आंत आणि पाहतें तों तुम्ही !

वसंत : आम्ही येथें गुप्तपणानें राहिलों आहोंत म्हणून आंत येऊं देत नाहीं.

वीणा : आतां तुम्ही तरी कोणाजवळ बोलूं नका ! नाहीं तर, आम्हांला आणखी दुसरा गांव पहावा लागेल.

मथुरा : मी कशाला बोलतें ! तुम्ही खाणावळ सोडून गेलां तर बाबांचें नुकसान नाहीं का ?

वीणा : आणि घरीं गेल्यावर गोकुळाजवळ सुद्धां बोलूं नका !

मथुरा : त्यांच्याजवळ बोलायला मी घरीं जातें आहें कशाला ! माझा अडला आहे आतां खेटर सासरीं जायला—

[ हातांत एक पत्र घेऊन दुर्वास येतो. ]

दुर्वास : असें काय ? पाहतों कशी जात नाहींस ती ! अग कारटे, इतकी मस्त झालीस काय ?

मथुरा : इतकं रागवायला काय झालें बाबा ?

दुर्वास : हें बघितलेंस तुझ्या नवऱ्याकडून आलेलें पत्र ! त्याचा असा नेहमीं पाणउतारा करतेस नाहीं ? नवऱ्यावर तुझा तोरा ! कारटे, आमच्या घराण्यांत असा प्रकार कोणीं केला नाहीं !

वसंत : ( स्वगत ) खाणावळ काढणाऱ्या बहाद्दराचें घराणें मोठें तर खरेंच !

मथुरा : अहो बाबा, खोटें तें सारें ! त्यांना काय, कांहीं तरी भरकटलें झालें !

दुर्वास : कांहीं तरी भरकटलें काय ? थोरामोठ्यांच्या सह्या आहेत पत्रावर ! काय म्हणे, त्यांनीं माझे हाल केले ! मला खरें वाटलें सारें ! पण खरा प्रकार निराळाच ! चल, आतांच्या आतां आपल्या नवऱ्याच्या घरीं जा, त्यांच्या पायां पड, त्यांच्यापुढें नाक घांस आणि तेथें रहा !

वसंत : अहो दुर्वास, हा जुलूम काय कामाचा! मथुराबाईची खुषी नसेल—
दुर्वास : माफ करा, साहेब, या बाबतींत माझें मला चांगलें कळतें आहे.
मथुरा : अहो बाबा, असें बोलूं नका, ते विलायतेला जाऊन आले आहेत—
दुर्वास : विलायतेचा काय येथें संबंध! मला एवढें कळतें, बायकोनें नवऱ्याच्या आज्ञेंत रहावें, त्याच्या लाथा खाव्या, वाटेल तें करावें, पण त्याच्या बाहेर जातां कामा नये. नवऱ्याला मुठींत ठेवावयाचा तो गोडीगुलाबीनें. गरिबाच्या अंगीं गरिबीच पाहिजे.
वसंत : अहो, ' यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः! '
दुर्वास : देवता रमतात पण देव उपाशीं मरतात. चल, पोरी, कर तयारी, ऊठ.
वसंत : हिंदु, अगदीं हिंदु! या हिंदु लोकांच्या अंगांत हिंदुपणा कसा अगदीं खिळून राहिला आहे! अहो दुर्वास, बापाची मुलीवर किती सत्ता असते ठाऊक आहे का?
दुर्वास : मी आहें खंबीर त्याचा विचार करायला! आम्हां गरिबांना हे विलायती विचार नकोत! म्हणे हिंदूंत हिंदुपणा खिळला आहे! नाहीं तर काय विलायती थेर शिरणार? चल, अजून उभीच?
मथुरा : पण बाबा, मी एवढ्या ह्यानें घरांतून निघालें आणखी आतां अशी नाक मुठींत धरून गेलें तर लोक काय म्हणतील?
दुर्वास : लोक तारीफ करितील तुझी आणि माझी सुद्धां! तेंच तुला जड वाटतें आहे! पण बायकोच्या जातीला इतका ताठा पाहिजे कशाला? चल.
वीणा : मथुराबाई, तिकडे आमच्याबद्दल बोलणार नाहीं ना?

[ तीं जाऊं लागतात. ]

मथुरा : नाहीं, मुळींच बोलायची नाहीं. तुम्ही बिनघोर रहा!

[ दुर्वास व मथुरा जातात. ]

वसंत : अरेरे, अगदीं हिंदु जिकडे तिकडे! आणखी हजार वर्षे हिंदुस्थानांत सुधारणा होत नाहीं! चल लाडके, आपणही हा तमाशा पाहूं.

[ जातात. पडदा पडतो. ]

[ भतमहाल. द्रुमन व कमलाकर ]

**कमलाकर :** द्रुमन, हें वेड डोक्यांतून काढून टाक ! नीट दूरवर पहा.

**द्रुमन :** मला आतां कांहीं मुद्दां परवा नाहीं; मी रागानें अगदीं आंधळी झालें आहें---

**कमलाकर :** हें मात्र खरें; नाहीं तर दुसऱ्यांदा फसून माझ्या जाळ्यांत सांपडली नसतीस. द्रुमन, माझा सूड घेण्याची कल्पना सोडून दे !

**द्रुमन :** कशाला, दुसऱ्या भोळ्याभाबड्या पोरींचे गळे कापायला ? अशी जाऊन साऱ्या जगांत तुझ्या नांवाचा डांगोरा पिटतें ! तुझी प्रतिष्ठा मातीला मिळवितें ! तुला मरेपर्यंत कैदेंत कोंडून तुझ्या पापाचें पुरें पुरें प्रायश्चित्त तुला देतें !

**कमलाकर :** मूर्ख पोरी, येथें आल्याबरोबर जर तूं प्रथम माझ्या दृष्टीस पडली नसतीस तर मात्र कदाचित् हें सारें झालें असतें; पण तडजोडीच्या गोड गोष्टींनीं फसून तूं पुन्हां येथें आलीस ! आतां तूं मला कैदेंत घालण्याऐवजीं मीं मात्र तुला कैद केलें आहे ! द्रुमन, आतां मरेपर्यंत तूं माझ्या ताब्यांत आहेस !

**द्रुमन :** मेल्या राक्षसा, किती पापें करशील अशीं ? तुझ्या पापांचा पर्वत उंच होतां होतां अखेर तुझ्यावरच कोसळून पडेल ! कर, हवा तसा माझा छळ कर; पण माझा प्राण जाईपर्यंत मी तुझ्या नांवानें ओरडत राहणार !

**कमलाकर :** वा, अशानें तुझी अब्रू फारच वाढेल !

**द्रुमन :** माझी नाहीं तर नाहीं -- जी अब्रू मूळची खोटी तिची कशाला परवा करूं ? पण बिचाऱ्या मनोरमेवर आलेला खोटा कलंक तरी दूर करीन !

**कमलाकर :** काय ? मनोरमेची हकीगत तुला ठाऊक आहे ?

**द्रुमन :** हो, हो ! तिनें स्वतःच मला हें सारें सांगितलें; आणि म्हणूनच खवळून मी येथें आलें.

**कमलाकर :** अस्सं ! -- तर मग तूं मनोरमेचें कल्याण करणार ! द्रुमन, फळाला टोंचणाऱ्या पक्ष्याला अविचारानें दगड मारिला तर त्यानें पक्ष्याला तर कांहीं होत नाहींच, पण फळ मात्र उगीच तुटून पडतें आणि एखादे वेळीं दगड उलटून आपलाच नाश होतो. कदाचित् तुझी मला दया आली असती, पण आतां मनोरमेचा बंदोबस्त करून--

द्रुमन : मेल्या, त्यांचा कसला बंदोबस्त करणार ? ती बिचारी माऊली केव्हांच जग सोडून गेली. तूंच तिला मारलीस !

कमलाकर : ती आपल्या हेक्यानें मेली !

द्रुमन : आणखी माझें बाळ–किती गोजिरवाणें आणि किती सुंदर होतें ! मेल्या, त्याला चांगल्या मार्गाला लावीन, त्याची जोपासना करोन, असें गोड बोलून मला कशी भुरळ पाडलीस; पण राक्षसा, शेवटीं तुझ्या कपटामुळें माझ्या हातानें मला त्याची मान मुरगळावी लागली !

कमलाकर : ( हंसत ) वा, स्वर्गाच्या मार्गापेक्षां आणखी कोणता चांगला मार्ग काढावयाचा ! आपल्या धाडसाला शोभण्याजोगा छावा खरा ! इतरांना आयुष्य किती तरी वर्षें कंठीत बसावें लागतें ! पण त्या हिंमतवान् बहाद्दरानें क्षणमात्रांत आयुष्याच्या एका टोंकावरून दुसऱ्या टोंकावर उडी टाकली ! निधड्या छातीचा खरा ! जगता वांचता तर बापाला सुद्धां बाप न म्हणता !

द्रुमन : मेल्या, आणखी हें विष कशाला ओततोस ? तुला दया माया कांहींच का नाहीं ? त्या पोराचा जीव घेऊन तुझी तृप्ति झाली नाहीं म्हणून आतां माझा जीव घ्यायला पाहतोस !

कमलाकर : मुळींच नाहीं ! तुझा जीव घेण्याचें काय कारण ? मनोरमा, तूं, यांसारख्या माणसांचा मी फार भुकेला आहें.

द्रुमन : राक्षसासारखा !

कमलाकर : अगदीं बरोबर ! आपल्या छकडीला पेटींत कोंडून फिरणाऱ्या राक्षसासारखा मी सुद्धां तुला या घरांत कोंडून ठेवून तुझ्या सौंदर्याची—

द्रुमन : मेल्या, तुझी जीभ झडून जावो ? कल्पान्तापर्यंत रौरवनरकांत कुजत पडशील ! यमदूत तुझ्यावर आगीची वृष्टि करतील ! तुझ्या पापानें भरलेल्या शरीराचे तुकडे तुकडे—

कमलाकर : द्रुमन, वाफेची शक्ति मोठी असली म्हणून तोंडाच्या वाफेनें काय होणार ? या शिक्षा भयंकर असतील; पण त्यांच्या वर्णनानें काय होणार ? या माझ्या अटीप्रमाणें राहण्याला तूं तयार नाहींस ?

द्रुमन : चंडाळा, तुझे शब्द सुद्धां ऐकायला नकोत !

कमलाकर : तर मग अन्नपाण्यावांचून या घरांत कोंडून पडावें लागेल आणि शेवटीं कुत्र्याच्या मोतीनें मरावें लागेल !

द्रुमन : येथें अशी ओरडून तुझें पाप साऱ्या जगाला सांगेन !

कमलाकर : तुझ्या ओरडण्यानें काय होणार ? या घराच्या भुताटकीबद्दल

लोकांत ओलवा आहे, ती तुझ्या आरडाओरडीनें दृढ होईल. कोण तुझ्याकडे लक्ष देणार! तितक्यांतून वेळ आलीच तर चांदीच्या किल्लीनें कोणाच्या तोंडाला कुलूप बसणार नाहीं ? सोनेरी सलामानें कोण खूष होणार नाहीं ?

**द्रुमन :** मेल्या, मनुष्यांनीं माझी हांक ऐकली नाहीं तर निदान देव कोणाच्या तरी मुखीं उभा राहील! सर्व मनुष्यांना निर्माण करणारा तो परमेश्वर तर तुझ्या चांदीसोन्याला भाळणार नाहीं ना ?

**कमलाकर :** परमेश्वर ! द्रुमन, परमेश्वरानें मनुष्य निर्माण केला नाहीं; मनुष्यांनींच परमेश्वर निर्माण केला आहे. कमी शक्तीच्या पण जास्त बुद्धीच्या धूर्तांनीं, आपल्यापेक्षां जास्त शक्तीच्या पण अज्ञान लोकांपासून त्रास होऊं नये म्हणून त्यांना बिचकविण्यासाठीं ईश्वर हें एक बुजगावणें करून ठेवलें आहे ! मला ईश्वराची मुळींच भीति वाटत नाहीं !

**द्रुमन :** तर काय, माझाही तूं जीव घेणार ?

**कमलाकर :** अलबत् ! भोंवतालीं पसरलेल्या विश्वाचा मध्य पाहणारा स्वतःच असतो ! तूं जर माझ्या अब्रूवर उठूं लागलीस तर तुलाही मनोरमेच्या मागोमाग पाठवायाला काय हरकत आहे ? पहा, नीट विचार कर ! आज थोडेसें तरी अन्न ठेविलें आहे; पण उद्यांपासून तेंही मिळणार नाहीं ! असें कुत्र्याच्या मोतीनें मरावें लागेल ! नाहीं तर मी सांगेन तेथें दूरदेशीं रहावयाला तयार हो ! उद्यां;याच वेळीं किंवा रात्रीं येईन तोंपर्यंत आपला कायम विचार करून ठेव !

[ दार बंद करून बाहेरून कुलूप लावतो. पडदा पडतो. ]

## प्रवेश चवथा

[ तात्यासाहेबांचें घर. तोंड झांकून घेतलेले कांहीं दरोडेखोर ]

**पहिला दरोडेखोर :** तात्यासाहेबांच्या घरांत हे दोन चार घोटाळे झाले नसते तर कमलाकराचा हा बेत यापूर्वीच पार पडला असता.सुशीलेला घरांतून पळवून तिला भ्रष्ट करण्यासाठीं कमलाकर अगदीं फारच उतावीळ झाले आहेत ! ( वरून एक दोर सुटतो. ) हा पहा, कमलाकरानें दोर तर सोडलाच ! पण आतां पुढें कोण होणार ?

दुसरा : कमलाकर आल्याखेरीज वर चढून जाणें धोक्याचें आहे! आंतला प्रकार काय आहे हें नीट समजलें पाहिजे. घरांत कोणी जागें असलें तर पंचाईत व्हावयाची!

तिसरा : पंचाईत कशाची त्यांत? सुशीलेच्या तोंडांत एखादा बोळा कोंबला आणि हातपाय चांगले बांधून टाकिले कीं तिची धडपड बंद झालीच! तिला फुलासारखी उचलून नेऊं! त्यांतून दुसरें कोणी आलेंच तर त्याचाही समाचार घ्यायला कितीसा वेळ लागणार? [कमलाकर येतो.]

कमलाकर : हं, लागा आतां कामाला! अगदीं वेळ घालवूं नका! दोन दिवस घरांत सारख्या भानगडी होत असल्यामुळें सुशीलेनें आपल्या खोलीला आंतून कडी लावून घेतली आहे! म्हणून तिसऱ्या मजल्यावरून तिच्या खिडकीच्या बाजूनें हा दोर सोडावा लागला! आतां एकानें दोरानें वर चढून खोलीची कडी काढावी आणि बाकीच्यांनीं घरांतून वर जाऊन खोलींत शिरावें!

दुसरा दरोडेखोर : पण वर कोण चढून जाणार? आपली छाती होत नाहीं!

तिसरा दरोडेखोर : हट् नामर्दा, हा पहा मी जातों! चला तुम्ही आंतून!

[दोरानें चढून जातो.]

कमलाकर : शाबास, अगदीं आवाज करूं नकोस! कडी अगदीं सावकाश काढ. चला आतां बाकीचे माझ्याबरोबर आंत! किती झटपट आणि बिनबोभाट काम कराल म्हणतां! याच दारानें परत यायचें. (दोर हालवून) दोर ओढून घे! हं, चला आतां! अगदीं भिऊं नका!

[ते सर्व आंत शिरतात. शेजारच्या खिडकींतून विद्याधर तोंड काढितो.]

विद्याधर : (स्वगत) कांहीं तरी घोंटाळा चालला आहे खास! आतां येथें कुजबुजणें ऐकूं आलें. हा कांहीं झोपेंतला भास नाहीं! कांहीं का असेना आपण सावध असावें हें ठीक; अथवा तसेंही नको! तात्यासाहेब वगैरे मंडळींना जागें करावें हेंच श्रेयस्कर! अशा विलक्षण प्रसंगीं एकटेंच राहणें धोक्याचें आहे! कदाचित् सारें लचांड आपल्यावर यावयाचें! हळूच सर्व मंडळींना जमवून आणावें हेंच उत्तम.

[जातो; इकडून सुशीलेला बांधलेली अशी घेऊन दरोडेखोर येतात.]

पहिला दरोडेखोर : चला, चला, लवकर चला! वेळ घालवूं नका! सुशीला भीतीनें अगदीं बेशुद्ध झाली आहे.

दुसरा दरोडेखोर : माझे हातपाय लटपट कापूं लागले आहेत!

तिसरा दरोडेखोर : मितोस कां असा? हा पाहिलास सोटा? चला लौकर.

[ विद्याधर, तात्यासाहेब वगैरे मंडळी खिडकीजवळ येतात. विद्याधर खिडकींतून उडी टाकून बाहेर येतो. ]

विद्याधर : कोण आहे? हरामखोरांनो, थांबा एकदम तेथेंच!

तात्या० : हं, हं, विद्याधर, एकदम पुढें जाऊं नका!

[ बाहेर येतात. मागाहून कमलाकर, गोकुळ वगैरे येतात. ]

दुसरा दरोडेखोर : अरे बापरे, पळा पळा, टाका तिला!

विद्याधर : तिला? कोण आहे ती? गोकुळ, धांवा, दिवा आणा लौकर!

( गोकुळ जातो; विद्याधर दरोडेखोरांवर चालून जातो. त्यांची झटापट होते. )

विद्याधर : सोडा, सोडा तिला; नाहीं तर प्राणाला मुकाल!

[ सुशीलेला सोडवितो; गोकुळ दिवा आणतो; दरोडेखोर पळूं लागतात. ]

तिसरा दरोडेखोर : पण आधीं तुझी व्यवस्था करितों!

[ विद्याधराला सोटा मारतो. ]

विद्याधर ( पडतां पडतां ) तात्यासाहेब, पहा कोण आहे ती?

तात्या० : ( पाहून ) कोण? विद्याधर, सुशीलाबाई ही!

विद्याधर : अहाहा! परमेश्वरा, धन्य आहेस तूं! तात्यासाहेब, चला लौकर, त्या हरामखोरांना पकडूं! नाहीं तर ते निसटून जातील!

गोकुळ : मला वाटतें जाऊं द्यावें त्यांना! कदाचित्—

विद्याधर : नाहीं हो – चला लौकर!

तात्या० : नका, नका. विद्याधर, तुम्हांला जबर लागलें आहे. तुम्ही येथें सुशीलेला संभाळा! आम्ही जातों त्या हरामखोरांच्या मागें!

[ विद्याधर व सुशीलेखेरीज सर्व जातात. ]

विद्याधर : ( सुशीलेला सावध करून ) उठा, सुशीलाबाई, परमेश्वरानें तुमचें संकट नाहींसें केलें आहे! चला.

[ तिला उठवूं लागतो. सुशीला एकदम उभी रहाते. ]

सुशीला : नका, नका, विद्याधर, तुमच्या हातांचा मला स्पर्श सुद्धां करूं नका! मी चांगली सावध आहें! व्हा दूर!

विद्याधर : काय? अजून मी दूर होऊं? सुशीले, त्या चांडाळांच्या हातांतून ज्या हातानें तुला सोडविलें त्या हातांचा स्पर्श नको म्हणतेस? त्या हातापेक्षां हा हात अधिक पापी आहे काय?

सुशीला : त्या हातांचें पाप अज्ञात तरी आहे! पण या हातांचें पाप मला

चांगलें माहीत झालें आहे!

**विद्याधर :** वा! चांगली कृतज्ञता ही! तुमच्यासाठीं आपले प्राणही संकटांत घालणाराला या कठोर शब्दांचें बक्षीस!

**सुशीला :** तसा प्रसंग आला तर तुमच्या प्राणासाठीं मी माझेही प्राण आनंदानें देईन! पण प्राणांच्या मोबदल्यांत माझ्या पातिव्रत्याची अपेक्षा करितां? भलत्या बक्षिसाच्या मागणीनें तुमचा हा परोपकार नुसता स्वार्थी दिसून येत आहे!

**विद्याधर :** काय? प्राणांच्या मोलानें केलेला हा परोपकार स्वार्थी?

**सुशीला :** हो, हो! दुष्ट पार्श्वभूमीवर सुंदर चित्र सुद्धां भेसूरच दिसतें! तुमची मागची वर्तणूक आजच्या परोपकाराची किंमत कवडीमोल ठरविते! हा निव्वळ स्वार्थ आहे!

**विद्याधर :** सुशीले, चंद्राच्या शुभ्र बिंबावर एकच कलंक त्याची शोभा वाढवितो; त्याप्रमाणें माझा त्या वेळचा एकच अपराध इतर निष्कलंक वर्तनामुळें चांगलाच कां बरें वाटूं नये?

**सुशीला :** तुमचा मागचा अपराध शुभ्र बिंबावरचा कलंक नाहीं, पण आतांचा परोपकार मात्र काळ्याकुट्ट मेघपटलावरचा विजेचा भयानक चकचकाट आहे. तुमचें काळेंकुट्ट अंतःकरण मात्र त्यानें चांगलें दिसून येतें! पण हें बोलत बसण्याची ही वेळ नाहीं. या आजच्या उपकाराबद्दल योग्य रीतीनें उतराई होण्यासाठीं, तुमच्या पापवृत्तीची तुम्हांस क्षमा करण्याबद्दल मी देवाची विनवणी करीन! परमेश्वर तुमचें मन शुद्ध करो! नको, मला तुमचें साह्य आतां नको आहे. जातें मी. [ जाते. ]

**विद्याधर :** ( स्वगत ) शाबास! सुशीले, शाबास! अशा प्रसंगीं सुद्धां आपल्या कर्तव्याला तूं विसरत नाहींस! माझ्या साहसाला तूं स्वार्थ म्हणालीस! पण अशा अमोल बक्षिसाची हक्काची आशा असल्यावर यापेक्षाही भयंकर साहस कोण करणार नाहीं? ( जयंत येतो. ) कोण, जयंत! बाकीची मंडळी कुठें आहे?

**जयंत :** विद्याधर, माझ्यासारखा दुर्दैवी मीच. सर्व मंडळींची गडबड ऐकून मी जागा झालों आणि त्या चोरांचा तपास करण्यासाठीं, मंडळींच्या मागोमाग धांवत गेलों! पण तेथेंही त्या जगनिंदकानें आपला डाव साधला!

**विद्याधर :** कोणीं?

**जयंत :** माझी खात्रीची समजूत आहे कीं, कमलाकरानें! मला यायला थोडासा



एच २७३
९८

वेळ झालेला पाहून त्यानें संशयाच्या स्वरानें तात्यासाहेबांना विचारलें कीं, सर्व मंडळी तर इथेंच दिसतात, मग तो दोर आधीं कोणीं सोडला असावा? आणि इतकें बोलून त्या सापानें आपली विषारी नजर माझ्याकडे फिरविली! हलक्या कानांच्या तात्यासाहेबांनाही—

विद्याधर : तसाच संशय आला काय ?

जयंत : पण त्यांनीं तो बोलून दाखविला नाहीं. रागाच्या स्वरानें मला तात्यासाहेबांनीं मागेंच रहायला सांगितलें हें काय थोडें झालें? विद्याधर, या कमलाकरानें माझ्याबद्दल मामांचें मन अगदीं गढूळ केलें आहे? करूं का एकदां मामांची चांगली कानउघाडणी ?

विद्याधर : छे,छे, कानउघाडणीची ही वेळ नव्हे! हलक्या कानांचा मनुष्य एकदां एक बाजूनें वाहवूं लागला म्हणजे दुसऱ्या बाजूकडे त्याची दृष्टि शुद्ध भावाची रहात नाहीं. काळ हाच अशा प्रसंगीं खरा प्रकार कळवितो! आज तुमचें निकराचें बोलणें त्यांना ढोंगाचें वाटेल!

जयंत : तर काय या निंदकाचे वाग्बाण असेच सहन करीत बसावें ?

विद्याधर : त्याला उपायच नाहीं! आपण खवळून आपल्या निंदेचें उत्तर देऊं लागलों तर रागानें निघालेल्या आपल्या शब्दांवर जग विश्वास तर ठेवीत नाहींच; पण त्यांचा फायदा त्या निंदकाला मात्र मिळतो. आपल्या रागाच्या एका शब्दावर निंदकाला शंभर शब्दांची इमारत उभारतां येते. रागाच्या भरांत आपल्याला आपल्या वर्तनांतल्या बारीकसारीक गोष्टींचें समर्थन करण्याचें भान रहात नाहीं; आणि कदाचित् राहिलेंच तरी अनेक बाबतींचें एका वेळींच केलेलें समर्थन लोकांना हजरजबाबीपणाचें आणि कादंबरीसारखें वाटतें! उलट निंदक त्या त्या गोष्टींना योग्य वेळींच आपल्या मनाचा रंग लावीत असतो आणि त्याच्या शांतवृत्तीमुळें लोकांचा त्या नजरबंदीवर भरंवसाही बसतो.

जयंत : पण लोकांनीं अशा बातम्यांची चौकशी कां करूं नये ?

विद्याधर : जो तो आपल्या भानगडींत दंग] असल्यामुळें दुसऱ्याची इतकी चौकशी कोण करीत बसतो? तमासगीर जग केवळ ठळक गोष्टींकडे चालतां चालतां पहात असतें. आपणच संशयाला जागा न देणें हा एकच सुरक्षित मार्ग आहे!

जयंत : अरेरे, तुमच्या या साऱ्या कडू सत्याचा मला अक्षरशः अनुभव येत आहे! लीलेच्या बातमीनें माझ्या दुर्लौकिकाचा पाया घातला, मनोरमेनें

काळें करून त्यावर इमारत उभारली; आणि आतां ही सुशीलेची बाबत त्यावर कळस चढविणार !

**विद्याधर :** जयंत, लीलेच्या तुमच्या बाबतींत लोकांनीं तुमचा संशय कां घेऊं नये ? अशा बाबतींत शुद्ध प्रकारांवर सुद्धां लोक हेतूची स्थापना करितात. मनोरमेबद्दलच्या तुमच्या तिरस्कारानें या अफवेला दुजोरा मिळतो ! कांहीं कारण दिसत नसतांना तुम्हांला मनोरमेचा तिटकारा आला तर लोकांना तो खरा कसा वाटेल ?

**जयंत :** विद्याधर, त्या तिटकाऱ्याचें कारण लोकांपुढें चवाठ्यावर मांडावें कसें ? आणि लोकांना तें खरें वाटावें कसें ? विद्याधर, लहानपणापासून स्त्रीबद्दल मीं एक मनोरथाचें सुंदर चित्र काढून ठेविलें होतें ! मी मनोवृत्तीचा गुलाम असल्यामुळें म्हणा, किंवा प्रेमसाम्राज्याचीं काल्पनिक वर्णनें वाचल्यामुळें म्हणा, माझ्या कल्पनेंतली माझी भावी स्त्री एखाद्या कादंबरींतल्या नायिके-सारखी होती ! पण मनोरमेच्या एका क्षणाच्या अनुभवानें त्या सुंदर चित्राचे तुकडे तुकडे केले ! तिचें पहिलेंच बोलणें माझ्या मनाला विषासारखें वाटून मला तिचा वीट आला ! तें बोलणें कशा प्रकारचें होतें तें स्त्रीपुरुषांच्या रहस्याच्या किल्ल्यांत आहे !

**विद्याधर :** अरेरे ! तुमच्यासारख्या आत्यंतिक वृत्तीच्या माणसावर मनो-भंगाचा असा भयंकर परिणाम व्हावा हें साहजिक आहे ! पण जयंत, लोक-मर्यादेसाठीं तरी तुम्हीं तुमचा तिटकारा झांकून ठेवला पाहिजे होता !

**जयंत :** विद्याधर, आंत एक, बाहेर एक असा लपंडाव मला मुळींच साधत नाहीं ! एक वेळ जो मनोभंग झाला तो झाला ! पुढें मनोरमेच्या अफाट बोलण्यामुळें माझा तिरस्कार प्रतिक्षणीं वाढत जाऊन तिच्या सौंदर्याचीही उत्तरोत्तर मला किळस येऊं लागली ! विद्याधर, क्षमा करा ! तुम्हांला मी वडील भाऊ समजून मोकळ्या मनानें बोलतों. संसार म्हणजे स्त्रीसुखावर उभारायचा; आणि स्त्रीसुख म्हणजे केवळ पशुवृत्ति नव्हे ! लहानपणापासून उराशीं बाळगलेली काव्यमय कल्पना ऐन फलप्राप्तीच्या वेळीं अशी समूळ नाश पावल्यामुळें मी संसारविषयीं अगदीं उदास झालों ! वाटेल तशा तोंडाळ स्त्रीला वागवून घेण्याची साधुवृत्ति माझ्यांत नाहीं हें माझें मलाच कळतें आहे ! आणि या घटकेला तर त्याची इतकी ओकारी आली आहे कीं, उद्यांच्या उद्यां मी देशत्याग करणार !, नको हा लोकापवाद आतां !

**विद्याधर :** छे, छे, असें कांहीं अविचारानें करूं नका ! लोकापवाद आपोआप

निवळेपर्यंत त्याला धैर्यानें पाट दिलीच पाहिजे! तुम्हीं निघून गेलांत तर तुमच्या निंदकांना चांगलेंच फावेल!

**जयंत :** निदान या घरांत राहणें तर शक्यच नाहीं!

**विद्याधर :** ठीक आहे! उद्यां परवां दुसरीकडे कुठें तरी जागा पहा! पण एकदम असे त्रागा करून लोकांच्या संशयाला जागा करून देऊं नका! घर सुद्धा एकदम सोडूं नका! मला मात्र उद्यांच्या उद्यां या घराचा आश्रय सोडिलाच पाहिजे. घरांत एकामागून एक घोटाळे चालत असतांना माझ्यासारख्या तिऱ्हाइतानें इथें राहणें कोणालाच हितकर व्हायचें नाहीं. मला कमलाकरानें जागा पाहून देण्याचें वचन मागेंच दिलें आहे!

**जयंत :** तुम्ही सुद्धां जाणार तर! मग मी एकटा या सापाच्या—

**विद्याधर :** जयंत, तुम्ही हा उतावळा स्वभाव हळूहळू सोडीत चला! तोच तुमचा नाश करतो!

**जयंत :** आणखी काय नाश करणार आतां! एकवार बिचाऱ्या लीलेची भेट घेऊन तिचें शेवटचें समाधान करितों आणि या शहराचा कायमचा निरोप घेतों! पण चला, आपल्याला या बाबतीबद्दल बोलतांना कोणीं ऐकलें तर आणखी तुमची बेअब्रू व्हावयाची!

**विद्याधर :** शाबास! अशीच सावधगिरी प्रत्येक बाबतींत ठेवा म्हणजे झालें. चला.

## प्रवेश पांचवा

[ भूतमहाल. कमलाकर प्रवेश करितो. ]

**कमलाकर :** अहाहा! या वर्षाकालीन संध्यासमयाची किती भीषण रमणीय शोभा ही! गगनमार्गे चालण्याच्या श्रमानें उरीं फुटल्यामुळें सूर्यानें रक्ताची गुळणी टाकून नुकताच प्राण सोडिला आहे; रक्तानें भरलेल्या या त्याच्या मृत्युशय्येवर हा सोसाट्याचा वारा ढगाचा शेणगोळा फिरवीत आहे! इकडे मरतां मरतां सूर्यानें मारलेल्या हृदयभेदक भाल्यांनीं झालेली इंद्रधनुष्याची जखम अजून पुरतीशी भरून आली नाहीं म्हणून हे कृष्णमेघ थोडे अश्रु गाळीत आहेत. दक्षिणेकडे एकटाच चमकणारा हा अगस्तीचा तारा मृतशय्ये-

जवळच्या दक्षिणमुखी समईची साक्ष पटवीत आहे! आणि भिजण्याच्या भीतीनें घरस्यांकडे धांवणारे हे पक्षी मित्राच्या स्मशानयात्रेनंतर स्नान करून ओलेत्यानें त्या दिव्याचें दर्शन घेऊन घरोघर जात आहेत असें वाटतें! रात्रीं माजणाऱ्या पापाच्या चिखलाची हा पायाखालचा चिखल प्रस्तावनाच करीत आहे! अशा वेळीं मनुष्याची स्वभावसिद्ध पापवासना अनावर होऊन बाहेर येऊं पाहते यांत नवल तें काय? वाहवा, झालें! दिवसाची तोंडमिळवणी करितांना तात्पुरती आणलेली लज्जेची लाली नाहींशी करून रात्रीनें आपलें खरें कृष्णस्वरूप दाखवावयास सुरुवात केली आहे! अंधार! भयाण अंधार! या भयाण पार्श्वभूमीवर भयानक मृत्यूचें उग्र चित्रच खेळावयास पाहिजे! या प्रसंगीं या भूतमहालाजवळ फिरकण्याची साक्षात् भुतांची मुद्धां छाती होणार नाहीं! बिचारी द्रुमन आंत भयानें अगदीं मेल्यापेक्षां मेली होऊन गेली असेल! चला, आतां आंत जावें म्हणजे मृत्यूच्या चित्राबद्दल माझी कल्पना थोडी तरी खरी झालेली पहावयाला मिळेल! पण हा चोरकंदील काढून मग दरवाजा उघडावा! खवळलेल्या वाघिणीच्या पिंजऱ्यांत एकदम उडी घालून उपयोगी नाहीं!

[ चोरकंदील काढून त्याच्या प्रकाशांत दरवाजाचें कुलूप काढितो व दार उघडतो. तोंच दरवाजांत टांगलेलं द्रुमनचं प्रेत दृष्टीस पडतें. कमलाकर दारांतून त्यावर सारखा प्रकाश पाडून पाहतो. ]

**कमलाकर :** ( मोठ्यानें हंसून स्वगत ) वाहवा! माझ्या लाडकीनें माझी कल्पना अक्षरशः खरी केली म्हणावयाची! द्रुमन, अखेर अशा रीतीनें मेलीस ना! किती सुंदर आणि भयानक चित्र हें! या भयानक सौंदर्याला आलिंगन देण्यासाठीं हे बाहु कसे पुढें धांव घेतात! पण हिच्या प्रेताच्या आणखी जवळ गेलों तर बिनवारशी गालांच्या चुंबनाचा मोह आवरणार नाहीं; आणि इतक्यांतच अशा रीतीनें मृत्यूशीं तोंडओळख करून घ्यावयाची माझी तयारी नाहीं! पण असें दूर राहून काय उपयोग! पुढच्या तजविजीचा विचार केलाच पाहिजे! ( तिच्या तोंडाजवळ दिवा नेतो. ) चेहऱ्यावर किती भयंकर निराशा पसरली आहे ही! हं, समजलों! जन्मभर सारखा ज्याचा ध्यास केला तो परमेश्वर खरोखरीच नाहीं, अशी मरणानंतर खात्री झाल्यामुळें ही आत्म्याची अंतकाळची निराशा तर प्रेतावर पसरली नसेल ना? बोल, द्रुमन, बोल, खरोखरीच ईश्वर नाहीं ना? बोल, या भेसूर तोंडानें, काळ्या पडलेल्या, पथ्थर झालेल्या जिभेनें नास्तिकपणाचा एक तरी शब्द बोल! का तुझ्या

सौंदर्याचा अनादर करितों म्हणून रागावलीस ? खरेंच द्रुमन, गळफांसामु सांकळलेल्या रक्तानें हे एक वेळचे गुलाबी गाल असे काळे पडले नसते त त्यांच्या चुंबनाचा सन्मान मीं खात्रीनें केला असता ! पण हें काय ? य तारवटलेल्या डोळ्यांकडे माझी दृष्टि सारखी कां ओढें लागत आहे ? बोल द्रुमन, या थिजलेल्या डोळ्यांच्या कांचांतून, मरतांना तुझ्या मस्तकांत भिन लेली कृतान्ताच्या क्रूरतेचीं चित्रें दाखवून मला कांहीं अमानुष विचा शिकविणार आहेस का ? अहाहा ! असें असेल तर हा पहा सारखा तुझ्य डोळ्यांकडे टक लावून पाहतों ! ( कांहीं वेळ तटस्थ उभा राहतो. ) आहे डोळ्यांत राक्षसी जादू आहे खास ! हें पहा, भयंकर विचारांनीं माझ्य डोक्यांत थैमान चालविलें आहे ! बस्स, ठरलें, असेंच करणार ! या लांकडं प्रेताचे तुकडे तुकडे करून आणि हा तोंडाचा पडदा न ओळखतां येण्याजोग छिन्नविच्छिन्न करून पेटींत भरतो ! ती पेटी तात्यासाहेबांच्या घरीं मागल्या बागेंतल्या विहिरीजवळ ठेवदितों. लीलेची शेवटची भेट घेण्यासाठीं धडपड- णाऱ्या जयंताला गफलतीनें उद्यां रात्रीं त्याच वेळीं नेमका तेथें आणतों आणि देतों जाऊन सरकारी शिपायांना वर्दी, म्हणजे झालें ! लीलेच्या नांवाचें खोटें पत्र जयंताला देण्यासाठीं गोकुळची योजना केली म्हणजे घोटाळ्याला तोटा नाहीं. मनोरमेची डब्यांत राहिलेली ही पेटी कोणाला पत्ता लागूं नये म्हणून येथें आणिली, तिचाच या कामीं उपयोग करावा आणि भरतीला तिचे कांहीं डागिने टाकावे म्हणजे भरपूर पुरावा झाला ! याशिवाय जयंताच्या बायकोबद्दलच्या तिटकाऱ्याचीही हवी तितकी मदत होईल. मनोरमा मेली हेंही कोणाला ठाऊक नाहीं आणि द्रुमन मेली हेंही कोणाला ठाऊक नाहीं. त्यामुळें हां हां म्हणतां जयंतानें मनोरमेला मारिली याबद्दल सर्वांची खात्री होईल ! आतां या प्रेताचे तुकडे मनोरमेच्या पेटींत भरले, कीं झालें काम ! विद्याधरावर वार करणारा तो पद्माकराचा दरवडेखोर, अगदीं उरफाट्या काळजाचा आहे, त्याचा ही पेटी नेण्यांत चांगलाच उपयोग होईल ! आज ही व्यवस्था करून उद्यांच जयंताला लीलेच्या नांवाचें एक पत्र पोंचवितों. या जगांत मूर्खपणाचे मासले असे विलक्षण घडून येतात कीं, आपल्याला पायापासून उभारणी करीत बसण्याचें कारणच नाहीं ! आपोआप घडत जाणाऱ्या गोष्टींच्या परिणामाचा ओघ आपल्या हिताकडे वळविला म्हणजे झालें ! चल द्रुमन, तुझ्या मूर्खपणाचा मी कसा फायदा घेतों पहा ? पण हें तुझ्या हातांत काय ? पत्र कशाचें बुवा हें ( वाचून पाहतो. ) वा ! मनोरमेची

आणि आपली सारी हकीकत लिहिली आहे यांत! शाबास! दुमन, ही तुझी सावधगिरी अशी जगाच्या दृष्टीआड लपवून टाकितों!

[ पत्र पैशाच्या पाकिटांत ठेवितों. दार आंतून लावून घेतो. ]

[ पडदा पडतो. ]

## प्रवेश सहावा

[ विद्याधर व गोकुळ बोलत येतात ]

गोकुळ : हें पहा प्रत्यक्ष बाबासाहेबांचें पत्र! यांत त्यांनीं लीलाताई आणि सुशीलाताई यांना मनास वाटल्यास खुशाल पुनर्विवाह करण्याची स्पष्ट परवानगी दिलेली आहे. विद्याधर, एका यःकश्चित् बालविधवेनें आपलें पोर मारिलें हें पाहून बाबासाहेबांसारख्या पोक्त मनुष्यानें आपलें मत बदलावें ही केवढी नामोशीची गोष्ट आहे!

विद्याधर : मग यांत गैर काय झालें? असा हृदयद्रावक देखावा पाहून कोणाचें मन बदलणार नाहीं?

गोकुळ : असें म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं! अहो, पूर्वीच्या ऋषींनीं असा प्रकार पाहिला असता तर त्यांनीं आपलें मत बदललें असतें का?

विद्याधर : त्यांचें मत उलट दृढ झालें असतें!

गोकुळ : हं, तेंच मी म्हणतों —

विद्याधर : नाहीं, तुम्ही भलतेंच म्हणत आहां! गोकुळ, पूर्वीचे ऋषि खरो-खरीच पुनर्लग्नाला संमति देऊन गेले आहेत. आपल्या ऋषिप्रणीत आर्यधर्मानें विधवांना अशी आडकाठी मुळींच ठेवलेली नव्हती. त्यांच्या तेजोमय उदारतेवर ही सारी रूढीची राखुंडी जमली आहे. अशा राक्षसी रूढीला मान देणें म्हणजे जुन्या मतांचा अस्थानीं अभिमान केल्यासारखें होईल.

गोकुळ : वा! रूढीला मान द्यावयाचा नाहीं तर काय एखाद्या चवचाल माणसाच्या लहरीला मान द्यावयाचा? सुधारणा म्हणजे साहेबी चार करण्याचा परवाना! शिकलेल्या पण बहकलेल्या माणसाच्या मोकाट कल्पनेची लहर! रूढी समाजाचा जीव आहे!

विद्याधर : छेः छेः, मी तर उलट म्हणतों कीं, रूढि म्हणजे समाजाचा

निर्जीवपणा आहे ! परिस्थिति बदलली, कीं समाजबंधनांत सुधारणा ही झालीच पाहिजे. मनुष्याला पूर्णत्वाचा पल्ला गांठण्यासाठीं नेहमीं पुढें चाल करीतच गेलें पाहिजे. सर्वतोंपरी रूढीच्या बंधनांनीं चालणारा – चालणारा कसला जखडलेला – समाज मृतवतच समजला पाहिजे.

**गोकुळ :** छेः छेः छेः ! आम्हांला कोणत्याही सुधारणेची गरज नाहीं. मी तर आजकालच्या एकापेक्षां पूर्वीच्या पूज्याची किंमत जास्त समजतों. सुधारणा करण्याचा आव घालणें म्हणजे पूर्वजांना मूर्ख म्हणण्यापलीकडे कांहीं नाहीं.

**विद्याधर :** प्रगमनशील पूर्वजांना मूर्ख म्हणण्याइतकें पातक दुसरें कोणतेंच नाहीं.

**गोकुळ :** झालें तर; मग त्यांनीं पाडून दिलेल्या प्रघाताला नांवें ठेवणें म्हणजे त्यांना मूर्ख म्हणण्यासारखेंच नाहीं का ?

**विद्याधर :** मुळींच नाहीं. त्यांचे ते प्रघात त्यांच्या काळाला अनुरूप होते; पण आपण त्यांच्यापुढें जावयाला नको का ? प्रतिक्षणीं पुढें पाऊल टाकीत आल्या-मुळेंच आमच्या पूर्वजांना भटक्या राहणीला सोडून, सुस्थिर समाजाची स्थापना करिता आली ना ! त्यांना पूर्वज नव्हते का ? गोकुळ, अशा सुधारणाप्रिय पूर्वजांचें खरें अनुकरण त्यांच्याप्रमाणें सारखी पुढें चाल करीत गेल्यानें होणार, कीं ठराविक आणि अयोग्य रूढींना शेंकडों वर्षें मिठी मारून बसल्यानें होणार ?

**गोकुळ :** हें म्हणणें दिसावयाला सयुक्तिक आहे; पण याचें खंडण सहज करतां येईल. काल्च मीं "हिंदुधर्म आणि सुधारणा" हें पुस्तक वाचलें; त्यांत स्पष्ट म्हटलें आहे कीं—मला आतां आठवत नाहीं; आणि तें म्हणणें इथें तितकें लागू पण होणार नाहीं. शिवाय, आपण वादाच्या मुख्य मुद्द्यापासून बरेंच घसरलों आहों ! मूळ बोलणें कशावरून निघालें बरें ? तुम्हांला आठवतें का ?

**विद्याधर :** बाबासाहेबांवरून.

**गोकुळ :** हो खरेंच; आतां आठवलें सारें; काय बरें केलें त्यांनीं ?

**विद्याधर :** तात्यासाहेबांना पत्र पाठविलें—

**गोकुळ :** खरेंच कीं हो; आणि हें पत्र सुद्धां माझ्या हातांत, तरी विसर पडला त्याचा ! बाकी हें विसरभोळेपणामुळें नाहीं झालें ! मी आठवीत होतों दोन्ही गोष्टी एकदम ! त्या पुस्तकांतलें म्हणणें आणि आपल्या वादाचा विषय ! तेव्हां कसें समजणार तें ? हो, दोन दोन डोळे असून एका वेळीं माणसाला कांहीं दोन निराळ्या गोष्टी पाहतां येत नाहींत; मग एका स्मरणशक्तीनें दोन हरप-लेल्या गोष्टींचा पाठलाग कसा होणार ?

**विद्याधर :** बरें, हें पत्र घेऊन चाललां होतां कुठें त्याची तरी आठवण आहे ना ?

गोकुळ : वा ! म्हणजे काय झालें ! इतका मी विसरभोळा आहें वाटतें ? हें पत्र लीलाताईजवळ नेऊन द्यायला–पण नाहीं–मला वाटतें हें दुसरें जयंताचें पत्र लीलाताईना द्यायचें आणि हें बाबासाहेबांचें पत्र कमलाकरांना–अंहं–न...सें न...नव्हे. कमलाकरांचें पत्र जयंतांना द्यायचें—पण कमलाकरांचें पत्र आहे कुठें आधीं–हें लीलाताईनीं जयंताला लिहिलेलें पत्र कमलाकरांनीं जयंताजवळ देण्यासाठीं मजजवळ दिलें–पण हेंच त्यांनीं दिलें, का तात्यासाहेबांना आलेलें हें पत्र लीलाताईना देण्यासाठीं त्यांनीं–काय बरें ?

विद्याधर : गोकुळ, आतां हा विचार राहूं द्या जरा ! डोकें स्थिर असतांना तुम्हांला एखादी सरळ गोष्ट सुद्धां आठवत नाहीं आणि आतां तर तुमचें डोकें या वादानें तापलेलें; तशांतून बाबत कांहीं सरळ नाहीं. दोन तीन पत्रें आणि पांच सहा नांवें एवढ्यांच्या चक्रव्यूहांतून तुम्ही कसले बाहेर पडतां !

गोकुळ : चला, कमलाकरांनाच भेटून त्याचा निकाल करून घेऊं !

विद्याधर : कमलाकरांनाच विचारावयाचें हें तरी नीट लक्षांत ठेवा. नाहीं तर, पुन्हां मी दृष्टीस पडलों तर माझ्यावरच चौकशीचा मारा सुरू कराल !

गोकुळ : भलतेंच; इतकी साधी गोष्ट सुद्धां विसरतों कीं काय ? चला.

[ जातात. ]

## प्रवेश सातवा

[ डोक्यावर पेटी घेऊन दरोडेखोर व मागाहून हातांत दुमनचें डोकें घेऊन कमलाकर भीतभीत प्रवेश करितात. तात्यासाहेबांच्या घरामागील बाग. ]

कमलाकर : हं ठेव ती पेटी विहिरीजवळ ! अस्सें ! आतां जाऊन सांगितल्या-प्रमाणें शिपायांना कोणाकडून तरी सावध करीव ! हं, ही घे तुझी मजुरी ! एवढ्याशा कामगिरीबद्दल ही शंभर रुपयांची नोट ! आतां ही गोष्ट कोठें फुटणार नाहीं ना ? [ पाकिटांतून घाईनें त्याला कागद देतो. ]

दरोडेखोर : छे: छे: रावसाहेब ! आपल्यासारख्यांच्या जिवावर आमच्या साऱ्या उड्या ! ही गोष्ट आतां यापुढें माझी मला सुद्धां समजणार नाहीं. पण शंभरांचीच नोट आहे ना ? नाहीं तर दहाविहांची असेल—

कमलाकर : जा, जा, शंभरांचीच आहे; मी दुसऱ्या नोटा बाळगीतच नाहीं !

चल, पळ, आपल्या कामाला लाग. ( एकीकडून दरवडेखोर जातो. दुसरीकडून जयंत येतो. ) सावज तर ठरल्याप्रमाणें आलें; आतां कांहीं वेळानें हा दगड विहिरींत टाकून आपण दूर व्हावें म्हणजे आपोआप स्वारी इकडे येईल!

[ पेटीवर दुमनचें डोकें ठेवितो. ]

**जयंत :** ( स्वगत ) वर मेघांचा गडगडाट चालला आहे; मधून एखादा दुसरा विजेचा चमकारा होतो आहे, क्षणिक उजेडाच्या लकाकीनें काळोख दुणावतो आहे; पण या विमनस्क स्थितींत मला या सर्व प्रकारांचें कांहींच वाटत नाहीं! लीलेनें बोलाविल्याप्रमाणें आलों तर खरा! आतां एकदां तिचे शेवटचें समाधान करितों आणि घेतों या कंटाळवाण्या संसाराची रजा! झाला हा संसाराचा अनुभव पुरे झाला! पण अजून लीला कां येत नाहीं? ( कमलाकर विहिरींत दगड टाकून निघून जातो; जयंत दचकतो. ) पावलें वाजून कसला बरें विहिरीकडे आवाज झाला? घाईनें येतांना अंधारामुळें लीला चुकून विहिरींत तर पडली नाहीं ना? ( विहिरीजवळ जातो. ) अंधारामुळें कांहींच दिसत नाहीं; पण ही पेटी कसली? आणि तिच्यावर हें काय? हाताला केंस कसले लागताहेत?

[ दुमनचें डोकें उचलतो. शिपाई येऊन त्याला पकडतात. ]

**शिपाई :** धांवा, धांवा, रावसाहेब! घरांत चोर शिरला आहे! धांवा!

**जयंत :** कोण आहे? अरे, मी चोर नाहीं!

[ घराच्या खिडक्या उघडतात. ]

**शिपाई :** चोर नाहीं तर कोण चोराचा बाप!

[ मंडळी आंतून पाहतात. लीला, सुशीला वगैरे; तोंच वीज चमकते. ]

**जयंत :** अरे बापरे! हें काय माझ्या हातांत?

**शिपाई :** अरे बापरे! हा तर खून!

**जयंत :** पण केला कोणी?

**शिपाई :** तूंच!

**जयंत :** काय मीं? हा दुर्दैवा!

[ वीज चमकते. पडदा पडतो. ]

*अंक तिसरा समाप्त*

# अंक चवथा

## प्रवेश पहिला

[ स्थळ—भूतमहाल ]

विद्याधर : कमलाकरानें जागा पाहून दिली खरी, पण ती गांवापासून इतकी दूर, कीं एखाद्या निकडीच्या कामासाठीं लौकर गांवांत जाऊन येईन म्हटलें तर सोय नाहीं ! आणि या जयंताच्या खटल्यामुळें सारखें गांवांत जावें यावें लागतें ! बाकी आजपर्यंत झालेल्या जबान्यांवरून आणि साक्षींवरून खटल्याचा निकाल काय होणार हें उघड उघड दिसून येतच आहे ! कोणी कपटानें पसरून ठेविलेल्या जाळ्यांत बिचारा जयंत अचूक सांपडला आहे ! अशा जिवलग आणि उदार मित्रासाठीं काय वाटेल तें करण्याची माझी तयारी आहे ! पण उपयोग काय ? फिर्यादी पक्षाचा पुरावा इतका भरपूर आहे कीं, जयंतानें मनोरमेचा खून केला असा निकाल पंचांना एकमतानें द्यावाच लागेल ! मनोरमेच्या प्रेताचे तुकडे पेटींत भरून ती विहिरींत टाकण्यासाठीं रात्रीं जयंत आला कसा हें मोठें नवल आहे ! नाहीं म्हणावें तर तिचें डोकें त्याच्या हातांत ! प्रेत मनोरमेचें नाहीं म्हणावें तर पेटींत तिचे दागिने, पत्रें वगैरे पुराव्याला हजर ! आतां खटला बहुतेक संपल्यासारखाच झाला आहे ! येऊन जाऊन त्या पत्राबद्दल आमच्या बाजूनें गोकुळची तेवढी साक्ष व्हावयाची राहिली आहे ! पण तिचा काय उपयोग ? ती होऊन न होऊन सारखीच ! अरेरे ! गरीब बिचारा जयंत फुकट प्राणाला मुकणार ! पण या उलाढाली कोणी केल्या ? परमेश्वरा, मानवी मतीला कुंठित करणारें हें कोडें सोडवायला तूंच अकल्पित दैवी साहाय्य पाठविशील तरच बिचारा निरपराधी जयंत सुटणार आहे !

[ दरोडेखोर येतो. ]

दरोडेखोर : राम राम, रावसाहेब ! आज इतके दिवस हेलपाटे घालतों आहें,

तेव्हां आज आपली गांठ पडते आहे!

**विद्याधर :** कोणरे बाबा तूं?

**दरोडेखोर :** मी आपला मानकाप्या दरवडेखोर नव्हे का?

**विद्याधर :** ( स्वगत ) हरहर, परमेश्वरा, निवळ थट्टा मांडली आहेस आमची! मी साह्याची अपेक्षा करितांच हें उत्तर पाठविलेंस?

**दरोडेखोर :** कां, रावसाहेब, अंधारांतली ओळख उजेडांत पटत नाहीं वाटतें? आपणच नाहीं का त्या दिवशीं रात्रीं ती पेटी मला न्यावयाला सांगितली?

**विद्याधर :** (स्वगत) पेटी? खास कमलाकराचें कांहीं कुलंगडें असावें हें! (प्रकट) पेटी? हां हां, ती पेटी म्हणतोस? आलें लक्ष्यांत. बरें मग, तिचें काय म्हणतोस आतां?

**दरोडेखोर :** त्या वेळीं आपण मला शंभर रुपयांची नोट दिली—

**विद्याधर :** दिली. मग–पुढें काय?

**दरोडेखोर :** अहो, ती नोट नाहीं! हा पहा चुकून आपण भलताच कागद मला दिला! हा घ्या आपला कागद आणि— [ विद्याधरास कागद देतो. ]

**विद्याधर :** ( कागद पाहून चपापतो. स्वगत ) काय? मनोरमा अजून जिवंत! परमेश्वरा, तुला दोष दिला त्याची क्षमा कर!

**दरोडेखोर :** आहे ना आपलाच कागद?

**विद्याधर :** शंकाच नाहीं! मी आज किती दिवस त्याच्याच तपासांत होतों; शाबास, तूं मोठेंच काम केलेंस.

**दरोडेखोर :** मग आतां मला नोट मिळावी एवढाच अर्ज आहे!

**विद्याधर :** ( नोट देऊन ) या घे एक सोडून दोन! ही एक शंभराची तुझ्या पहिल्या कामाबद्दल; आणि ही दुसरी, हा कागद परत आणून दिल्याबद्दल.

**दरोडेखोर :** वाहवा! रावसाहेब, आपणच आमच्यासारख्या गरिबांचे पोशिंदे!

**विद्याधर :** पण माझें अजून तुझ्याशीं बरेंच काम आहे!

**दरोडेखोर :** आपला गुलामच आहें मी, साहेब!

**विद्याधर :** कोठला आहेस तूं?

**दरोडेखोर :** मूळचा राहणारा होय? चोरांच्या आळंदीचा.

**विद्याधर :** नाहीं; नाहीं. येथें राहतोस कोठें? तुझा पत्ता पाहिजे!

**दरोडेखोर :** असें म्हणतां? मी राहतों वेताळ पेठेंत, मोठ्या म्हसोबाच्या समोर आणि खुन्या मुरलीधराच्या उजव्या हाताला! [ विद्याधर पत्ता टिपून घेतो. ]

**विद्याधर :** नेहमीं तुझ्याशीं काम पडतें; तेव्हां पत्ता उतरून घेतला! नांव काय

म्हणालास तुझें ?

दरोडेखोर : तंट्या मानकाप्या. दिवसा हंमेश घरीं सांपडावयाचा मी.

विद्याधर : बरें जा तूं आतां ! सध्यां मी फार कामांत आहें !

दरोडेखोर : ठीक आहे – आपली गरिबाची ओळख असूं द्या एवढेंच मागणें आहे.

विद्याधर : वा ! हें काय विचारतोस ? तुझ्यावर तर सारी आमची मदार !

[ दरोडेखोर जातो. ]

विद्याधर : ( स्वगत ) अहाहा ! परमेश्वरा, निरपराध्यांचा तूं खरा खरा साह्यकारी आहेस ! हा कागद म्हणजे जिवलग मित्राचा प्राण वांचविणारी साक्षात् संजीवनीच ! याच्या साह्यानें जयंत एका क्षणांत दोषमुक्त होईल ! मुळीं खूनच झाला नाहीं तर अपराध कोठला रहाणार ? द्रुमननें आत्महत्या केली, तिचें प्रेत कमलाकरानें पेटींत भरून त्या विहिरीवर नेलें, लीलेला भेटण्यासाठीं आलेला जयंत आयताच या हरामखोराच्या जाळ्यांत सांपडला, आणि मनोरमा घांटपायथ्याच्या दवाखान्यांत पडली आहे. द्रुमननें स्पष्ट स्पष्ट लिहून ठेविलें आहे सारें ! द्रुमन, मरतां मरतां केवढा परोपकार करून गेलीस ! कमला-कराबरोबर कशा फसगतीनें गेली याचा सुद्धां साफ उलगडा या पत्रांत केला आहे ! चला, आतां कामाला लागलें पाहिजे. नुसत्या या पत्रानें काम भागा-वयाचें नाहीं ! मरणोन्मुख झालेली मनोरमा कदाचित् मेली तर पुन्हां पंचाईत व्हावयाची ! गाडीची वेळ झाली आहे, याच गाडीनें निघतां. ती कोणत्या दवाखान्यांत आहे हें नक्की कळलें असतें तर बरें झालें असतें. घांटपायथ्याला जातां आणि तिचा तपास करितों ! निदान ती मेली असल्यास तिच्या मरणाच्या खऱ्या प्रकाराचा तेथील अधिकाऱ्यांचा दाखला आणतों ! गांवांत जाऊन ही हकीगत सांगावयाला सुद्धां वेळ नाहीं; वेळ तर घालवून उपयोगी नाहीं ! घांटपायथ्यावरूनच तात्यासाहेबांना तार करून खटल्याची मुदत वाढविण्याचा अर्ज करायला सांगतों ! परमेश्वरा, मी जाईपर्यंत मनोरमेला मात्र जिवंत ठेव म्हणजे झालें.

[ जातो. पडदा पडतो. ]

प्रवेश दुसरा

[ हातांत कागद घेऊन गोकुळ प्रवेश करितो. ]

गोकुळ : ( कागदांकडे पहात कांहीं वाक्यें पुटपुटून ) छेः बुवा ! या जयंताच्या खटल्यानें जीव जेरीस आणला अगदीं ! आज इतके दिवस ही साक्ष सारखा पाठ करीत आहें; पण चार प्रश्नोत्तरांपलीकडे मजल जात नाहीं, आणि या वकिलांचा म्हणजे साक्षीदारांवर मोठा कटाक्ष ! भारतीय युद्धांतल्या सेनापतींची आणि या वकिलांची लढण्याची एक रीत आहे अगदीं ! म्हणजे मुख्य मालक धर्म-दुर्योधनांप्रमाणें रहावयाचे बाजूला आणि खटल्यांतल्या या सेनापतींचा साक्षीदारांच्या फौजेवर सारखा हल्ला ! फेरतपासणीच्या चक्रव्यूहांत एखादा प्रतिपक्षाचा वीर सांपडला, कीं मारे त्याच्यावर दरखास्त, सुनावणी, कैफियत, हुकूमनामा या वाग्बाणांचा मारा सुरू व्हावयाचा ! काय हे शब्द ! दरखास्त, जातमुचलका, फैसला ! बोलतांना कसें अवसान भरतें अंगांत ! मला वाटतें या साऱ्या शब्दांना एकच अर्थ असावा किंवा एकाही शब्दाला कोठलाच अर्थ नसावा. आज पंधरा दिवस या शब्दांनीं अगदीं भंडावून सोडिलें आहे ! स्वप्नांत सुद्धां मोठमोठाल्या अक्षरांनीं लिहिलेले हेच शब्द दिसतात ! वकिलांचें नेहमीं कसें होत असेल कोणास ठाऊक ? आमच्या समोरच्या वकिलानें जर माझ्यावर या शब्दांचा मारा केला तर मीही पण उलट मारा करणार ! त्यानें म्हटलें ' दरखास्त ' कीं आपण म्हणावें ' कैफियत ' ! आणि मला सतावून सोडण्यासाठीं तो खात्रीनें हें विचारणार. वकिलाच्या अंगांत पक्षकार संचरला, कीं तो अगदीं बेफाम होतो. परकायाप्रवेशाच्या विद्येवर ज्याचा भरंवसा नसेल त्यानें वकिलाकडे पहावें ! पानी तेरा रंग कैसा ? जिसमें मिलावे वैसा ! छेः ! पण पाण्याचा रंग दुसरा पदार्थ त्यांत असेपर्यंत तरी कायम राहतो ! वकील खटला संपण्याचीही वाट पहात नाहीं ! आतां एकमेकांच्या मानगुटीस बसणारे वकील घटकेनें एकमेकांच्या गळ्यांत गळा घालून बसतील ! वकिलाला फक्त एका परिसाची उरफाटी उपमा शोभेल. परिसाचा स्पर्श होतांच लोखंडाचें सोनें होतें आणि वकिलांच्या स्पर्शानें सोन्याचें लोखंड होतें ! वकिलानें पक्षकाराला एकदां हातीं धरलें, कीं बिचाऱ्याच्या हातांतल्या सोन्याच्या सलकड्यांच्या लोखंडी बेड्या बनावयाच्या ! वकिलांचा धंदाच असा ! हजारों पक्षकारांचीं घरें बसवावयाचीं आणि आपलें घर उभारावयाचें ! लोकांनीं बेअब्रू केली,

कीं यांची अब्रू वाढली ! मग का पैशाच्या देवघेवीच्या खटल्यांत पैसे काढून जसे हे पैसेवाले बनतात, तसे अब्रूनुकसानीच्या खटल्यांतून प्रतिवादीनें घेतलेली वादीची अब्रू परत भरून देववितांना मध्यें अब्रूची दलाली काढून अब्रूदार होतात कोणास ठाऊक ! बरें इतक्या तंट्याबखेड्यांच्या घालमेलींत जन्म घाल-विला तरी वकील स्वतः त्यांत कधीं पडावयाचा नाहीं ! न्यायाच्या बाजारांतला हा दलाल स्वतः कज्जेदलाल कधीं नसावयाचा ! संसारांत राहून संसारापासून अलिप्त राहिल्याबद्दल तुकाराम प्रौढी मिरवितो; पण या वकिलांत असे हजारों संसर्गरहित तुकाराम दाखवितां येतील ! पण जाऊं द्या ! या खटल्याच्या दगदगीनें मी सुद्धां अर्धामुर्धा वकीलच झालों आहें, तेव्हां पर्यायानें स्वतःचीच नालस्ती करण्यांत काय अर्थ ? ही साक्ष उद्यांना पाठ झालीच पाहिजे ! काय करावें ? नुसते सवालजबाब आपल्याशीं म्हणून उपयोगी नाहीं. प्रश्न कोणी तरी विचारा-वयाला पाहिजे होते; म्हणजे उत्तरें द्यावयास ठीक पडलें असतें ! पण कोण मिळणार असें ? ती जर या वेळीं असती तर किती उपयोगी पडली असती ! पण ती कोठली यावयाला येथें या वेळीं !

[ मथुरा येऊन एकदम त्याचे पाय धरते. ]

**गोकुळ :** अरे बापरे ! कोण ? मथुरा ? दरखास्त ! कैफियत !

**मथुरा :** हो मीच ! मी चुकलें ! मला क्षमा करा !

**गोकुळ :** ( स्वगत ) पत्राचा परिणाम झाल्यासारखा दिसतो. ( प्रकट ) मला नाहीं खरें वाटत ! मथुरे, तूं क्षमा मागणार ? छेः, ही भुताटकी असली पाहिजे !

**मथुरा :** आतां माझा अंत पाहूं नका ! मी आजपासून आपल्या आज्ञेबाहेर कधीं वागणार नाहीं ! हें पहा बाबांनीं पत्र दिलें आहे ! [ पत्र देते. ]

**गोकुळ :** ( पत्र वाचून ) अस्सें ! ऊठ, तुझ्या क्षमेचा अर्ज आहे एकूण ! मला वाटलें कीं, माझे पाय धरून तूं माझा कबजा करून घेणार ! ऊठ !

**मथुरा :** मला क्षमा केल्याखेरीज मी हे पाय सोडणार नाहीं.

**गोकुळ :** हा क्षमेचा अर्ज आहे ! मथुरे, याचा निकाल कायद्याबरहुकूम केला पाहिजे ! ऊठ; रहा अर्जदारासारखी समोर उभी ! अर्जाची सुनावणी ही झालीच पाहिजे ! ऊठ ! [ मथुरा उठून दूर उभी रहाते. ]

**मथुरा :** कां बरें उगीच छळ असा हा ? क्षमा करावयाची एकदां लौकर.

**गोकुळ :** छेः छेः छेः ! अशी कायद्याच्या कामांत धांदल उपयोगी नाहीं ! त्यांतून हा तर घरांतला ताबा मिळविण्याचा दिवाणींतला दावा ! यांत तर तारखा पुढें

सारख्या टाकीतच गेलें पाहिजे ! दिवाणीच्या दाव्यांत दिरंगाईखेरीज शोभा नाहीं ! एकदां एका गृहस्थानें बायको ताब्यांत मिळण्यासाठीं दिवाणींत दावा केला; तेव्हां, तो खटला त्या गृहस्थाच्या हयातीपर्यंत चालून अखेर त्याच्या मुलाच्या नांवानें हुकूमनामा झाला !

**मथुरा :** पुरे ही थट्टा ! करायची ना क्षमा ?

**गोकुळ :** ही नुसती खटल्याची सुनावणी झाली ! अजून इंगा तर पुढेंच आहे ! दरखास्त न् कैफियत न् मुकदमा ! बरें, तुझ्यातर्फे वकील कोणता ?

**मथुरा :** माझे वकील, माझे न्यायाधीश, सारे आपणच.

**गोकुळ :** वेडी रे वेडी ! न्यायाधीशाला कधीं वकील होतां येईल का ? बरें, एक तर्फी निवाडा देऊं ! ऐक आतां निकाल. अर्जदार मथुरा कोम गोकुळ–अं हं–कोम हलक्या जातीसाठीं वापरावयाचा–ब्राह्मणासाठीं काय बरें शब्द आहे ?

[ आठवण करीत बसतो. ]

**मथुरा :** बाई, बाई, शर्थ झाली आतां !

**गोकुळ :** ठीक आहे; चूकभूल द्यावी घ्यावी. शब्द आठवला म्हणजे कळवूं ! हं, अर्जदार मथुरा कोम गोकुळ, तूं अर्जांत मागितल्याप्रमाणें तुझ्या नांवें क्षमेचा हुकूमनामा देण्यांत येऊन सरकारांत ताबेगहाण पडलेल्या घराचा हक्क तुझ्या नांवें नोंदविण्यांत येत आहे; परंतु एक महिनाभर सरकाराकडे ही मिळकत नजरगहाण राहून तुझ्या वागण्याकडे सरकार सारखें लक्ष देईल ! वर्तन कम-जास्त दिसलें, कीं मिळकतीवरचा हक्क उडवून तुला माहेरीं राहण्याची शिक्षा होईल ! आहे कबूल ?

**मथुरा :** आहे कबूल ! आहे कबूल ! पण हें काय भलतेंच वेड ?

**गोकुळ :** हं, कोर्टाचा अपमान होत आहे हा ! वेडे, या जयंताच्या खटल्यासाठीं कोर्टांत बसून बसून ही किफायत केली आहे. समजलीस ? फौजदारी खटल्याची तोंडाला मिठी बसली कीं, चव बदलण्यासाठीं दिवाणीकडे धांव घ्यायची.

**मथुरा :** बिचाऱ्या जयंतावर नसतें संकट आलें हें !

**गोकुळ :** बरी आठवण केलीस ! माझी उद्यां साक्ष आहे ! तेवढी पाठ म्हणून घे पाहूं. मीं आतांच तुझी आठवण केली ! आतां तूं कोर्ट हो. बैस या खुर्चीवर. हं, लाजूं नकोस ! ही सारी रंगाची तालीम झालीच पाहिजे ! घे हा कागद ! चल बैस लौकर.

**मथुरा :** इश्श, हें काय भलतेंच !

**गोकुळ :** बैस लौकर. हं, बसते आहेस का पाठवूं माहेरीं पुन्हां कोर्टाला ?

मथुरा : हं, ही घ्या बसलें !

गोकुळ : अस्सें; लकडीशिवाय मकडी वळत नाहीं ! या कागदांतला एकेक प्रश्न विचार आतां !

मथुरा : ( कागद वाचून ) ईश्वरसाक्ष खरें सांगेन, खोटें सांगणार नाहीं.

गोकुळ : ईश्वरसाक्ष खरें सांगेन, खोटें सांगणार नाहीं. अं: ! हा कांहीं प्रश्न नाहीं ! नुसतं म्हणा, मम आत्मनः श्रुतिस्मृति यांतला हा प्रकार आहे ! हं, पुढें.

मथुरा : तुमचें नांव काय ?

गोकुळ : गोकुळ.

मथुरा : बापाचें नांव ?

गोकुळ : वृंदावन.

मथुरा : आडनांव ?

गोकुळ : विसरभोळे.

मथुरा : तुमचें वय काय ?

गोकुळ : वय काय बरें ठरविलें आहे ? छे:, नाहीं येत लक्षांत ! एक अक्षर सांग पाहूं !

मथुरा : पं—

गोकुळ : पंधरा !

मथुरा : भलतंच कांहीं तरी ! खरें तरी वाटेल कोणाला ?

गोकुळ : अरे हो, पंचवीस ! ( घोकतो. ) छे: ! हें वय दगा देणार ! आंकडा लक्षांत ठेवणें मोठें कठीण ! आण पाहूं तो कागद. [ कागद घेऊन घोकतो. ]

मथुरा : कांहीं तरी खूण बसवून ठेवावी त्या आंकड्याची.

गोकुळ : हो, हो, हा प्रश्न आहे पांचवा; तेव्हां पांचा पांचा पंचवीस ! प्रश्नसंख्येचा वर्ग केला, कीं झालें काम ! पंचवीस !

मथुरा : आणि वकिलानें चवथ्यांदाच हा प्रश्न विचारला तर ?

गोकुळ : अरेच्या, खरेंच ! फट्दिशीं चारचोक सोळा होऊन नऊ वर्षांची खोट बसायची ! काय करावें बरें ?

मथुरा : खरेंच मोठी पंचाईत आहे ही ! [ हंसते ]

गोकुळ : हां, पंच असतात पांच ! तेव्हां पांच पंचांत हातापायांचीं बोटें मिळविलीं कीं झाले पंचवीस.

मथुरा : पण भीतीनें घाबरून हातपायच गळाले तर बोटें कोठलीं आणणार ?

**गोकुळ :** आणि डोळ्यांपुढें अंधेरी आली तर पंच तरी कोठून दिसणार ! इक-ड्रनही अडचण आहे ! ( कागदाकडे पाहून ) हां हां, आठवली अगदीं सोपी युक्ति !

**मथुरा :** कोणती ती ?

**गोकुळ :** गोकुळ वृंदावन विसरभोळे ! माझ्या नांवांत अक्षरें आहेत बारा ! तेव्हां स्वतांच्या नांवांतल्या अक्षरांना दोन्ही बाजूंच्या दोन वकिलांनीं गुणून त्यांत एक न्यायाधीश मिळवला, कीं झाले बारादुणे चोवीस आणि एक पंचवीस !

**मथुरा :** पण न्यायाधीशांकडे पहावयाचा होईल का धीर ?

**गोकुळ :** अं ! न्यायाधीश नाहीं तर आरोपी मिळवला ! नगास नग असला म्हणजे झालें ! बरें, पुढें, सहावा प्रश्न [ कागद तिला देतो. ]

**मथुरा :** तुमचा धंदा काय ?

**गोकुळ :** अरे, धंदा कोणता सांगावा ? हं ! धंदा–वाटेल ती गोष्ट विसरण्याचा !

**मथुरा :** आणि जेवणखाण्याची सोय ?

**गोकुळ :** तेंही विसरलों ! पण नाहीं, हा प्रश्न तुझा आहे ! मी फिरून उत्तर देतों कीं, मी उत्तर देण्याचें नाकारितों ! या प्रश्नाला माझी हरकत आहे ! अशी सावधगिरी ठेवावी लागते बघितलीस !

**मथुरा :** बरें, ही इतकी सावधगिरी ठेवण्यासारखी साक्ष तरी महत्त्वाची आहे का ?

**गोकुळ :** महत्त्वाची ? अग, माझ्या साक्षीवर तर सारी भिस्त आहे आमची ! नाहीं तर जयंताला चार वेळां फांशीं जाण्याइतका पुरावा आहे ! पण माझ्या शब्दासाठीं त्याची सुटका होणार आहे ! या खटल्याचा चालक, याचा सूत्रधार, तर मीच आहें ! उगीच नाहीं साक्षीसाठीं जिवाचा आटापेटा चालविला इतका ! घरांत ती कायद्यांच्या पुस्तकांची रास पाहिलीस ? वकिलावर ताण झाली आहे माझी !

**मथुरा :** एका खटल्यांतल्या साक्षीनें वकिलीपर्यंत मजल गेली, मग चार खट-ल्यांच्या भानगडीनें आपण न्यायाधीशच व्हाल ! आतां आपल्या बाजूला कांहीं वकिलाची जरूर राहिली नसेल ?

**गोकुळ :** अरेरे, अगदीं विसरलों ! आमच्या तर्फेचा विद्याधर वकील काल्पासून कोठें गडप झाला आहे, पत्ता नाहीं; आजपर्यंत खटल्यांतले आरोपी फरारी होत असत; पण वकीलच परागंदा झाल्याचा हा पहिला खटला आहे ! त्यामुळें तात्यासाहेब मोठ्या फिकिरींत पडले आहेत आणि सारखे वकिलाच्या

शोधांत आहेत. मी दोन चार वकिलांकडे नन्नाचा पाढा ऐकून आलो, तें तात्यासाहेबांना सांगावयाचें राहिलें आहे! वकील कोणी नाहीं.

मथुरा : मग आपले वसंतराव नाहीं का चालावयाचे? ते वकीलच आहेत ना!

गोकुळ : पण त्यांचा पत्ता आहे कोठें? ते वीणाताईबरोबर कधींच फरारी झाले आहेत.

मथुरा : हात्तीच्या. एवढेंच ना? त्यांचा पत्ता मी सांगतें. तीं दोघेंही आमच्या बाबांच्या शांतिसदनांत आहेत.

गोकुळ : काय म्हणतेस? मग आतांच्या आतां हें तात्यासाहेबांना कळविलें पाहिजे. म्हणजे तारेनें बोलावल्याबरोबर उद्यांच वसंतराव येथें येतील! जा, तूं घरांतलें पहा आतां! मी जाऊन येतों. ( ती जाते. ) वसंतरावाचा पत्ता सांगितला हें फार नामी झालें! आणि मथुरा ताळ्यावर आली हेंही नामी झालें! आतां आपला मूळचा विसराळू स्वभाव विसरला पाहिजे. आणि तेवढेंच जरा कठीण आहे. एखादी गोष्ट विसरण्याची अडचण मला जन्मांत प्रथम भासते काय ती याच वेळीं! हिला अगदीं कह्यांत ठेविलें पाहिजे सारखें! हं, याच त्या खुर्च्या! आम्हांला तिनं ओढावयाला लावल्या, नाहीं का? आतां घेतों सूड! अग ए, मथुरे, आलीस का? दरखास्त! कैफियत! ( मथुरा येते. ) त्या दिवशींच्या या खुर्च्या, ने पाहूं ओढून आंत! चलाव, मुकदमा, हुकूमनामा? काय जोर आहे या शब्दांत! ( मथुरा खुर्ची नेते. ) आपण तर पुढें मागें पोरांचीं नांवें सुद्धां हींच ठेवणार! दरखास्त, कैफियत, जसी हीं मुलींचीं नांवें; आणि मुकद्दमा, हुकूमनामा, फैसला हीं मर्दानी नांवें मुलांना! आणि स्वतः मुकत्यार वकील होणार! बस्स, ठरला हा कायम बेत!

[ जातो. पडदा पडतो. ]

## प्रवेश तिसरा

[ कमलाकर प्रवेश करितो. ]

कमलाकर : काय चमत्कार आहे! जयंताच्या गळ्याभोंवती फास बसायची वेळ आली तरी या मूर्ख पोरीच्या त्याच्या गळ्याभोंवतालच्या मिठ्या सुटत नाहींत. अजून एका दृष्टीनें भाग्यवानच म्हणायचा! एकंदर जगांत हाच प्रकार

दिसून येतो ! ज्याला जें नको तेंच त्याला मिळावयाचें ! तात्यासाहेब तरी या जयंताला सोडविण्याची खटपट कां करीत आहेत कोणाला ठाऊक ? विद्याधर मात्र मनुष्य खरा ! जयंताच्या वशिल्यानें घरांत नाचावयाचा यापुढें संभव नाहीं असें पाहून त्या राजश्रींनीं पळता पाय काढला ! त्याची या पोरीवर खरोखरीच नजर होती, कीं नुसता हा माझा तर्क आहे ? उंटाची उपजत पाठीची कमान पाहून मांजराला उंट रागावल्याची शंका यावी तशांतला माझ्या मनाचा संशय तर नसेल ? या वसंतानें जयंताचें वकीलपत्र घेतलें हें ठीक झालें ! या विलायती वेड्याच्या हातून काय होणार ?

[ तारवाला येतो. ]

**कमळाकर** : काय रे ? कांहीं तार आहे काय ?

**तारवाला** : होय भाऊसाहेब, तात्यासाहेबांच्या नांवाची तार आहे.

**कमलाकर** : मग मीं सही करून दिली तर चालेल ना ?

**तारवाला** : न चालायला काय झालें ? नेहमीं तर तुम्ही त्यांचीं तारा-पत्रें घेतां; ही घ्या. [ तार देतो. कमलाकर सही करून देतो. ]

**तारवाला** : रामराम साहेब. [ तारवाला जातो; कमलाकर वाचतो. ]

**कमलाकर** : ( आश्चर्यानें ) विद्याधराची तार ही ! खटल्याची तहकुबी मागावी म्हणून तात्यासाहेबांना सांगतो आहे हा ! कां बरें ? याला कांहीं पत्ता लागला आहे कीं काय ? आठ दहा दिवस यावयाला सांपडत नाहीं; जरूरीचें काम आहे म्हणतो. ठीक आहे ! तार माझ्याच हातीं आली हें नशीब म्हणायचें ! ही तार आतां चालली काळाच्या कबजांत ! इतकेंच नाहीं, पण आतां टपालावर सातआठ दिवस विशेष नजर ठेवली पाहिजे ! चला, खटला चालावयाची वेळ झाली ! आज खटल्याचा निकाल, बहुधा जयंताचाच निकाल लागणार !

[ जातो. पडदा पडतो. ]

## प्रवेश चवथा

[ विद्याधर, डॉक्टर, फौजदार. मनोरमा मरणोन्मुख निजली आहे. ]

**मनोरमा** : विद्याधरपंत, माझ्या अविचारानें मीं त्यांना इतक्या संकटांत पाडिलें आणि आतां स्वतः तर घटकेची सोबतीण होऊन बसलें आहें.

**विद्याधर :** मनोरमाबाई, झाल्या गोष्टीला इलाज नाहीं. अरेरे! तुम्हीं घांट पायथ्याच्या दवाखान्यांत राहिलां असतां तर मला तुमचा पत्ता लौकरच लागून जयंताची आणि तुमची दृष्टिभेट तरी झाली असती.

**मनोरमा :** हें काळें तोंड घेऊन त्याच दवाखान्यांत कसें राहतां आलें असतें? बाबासाहेबमामंजी दोन दिवसांतच परत दवाखान्यांत येणार होते, म्हणून द्रुमनताई गेल्याबरोबर मी पण तेथून निघून या दवाखान्यांत आलें. आतां माझ्यानें जास्त बोलवत नाहीं.

**विद्याधर :** मग काय, डॉक्टरसाहेब, यांना आतां येथून हलविणें शक्य नाहीं म्हणतां ?

**डॉक्टर :** ( हळूच ) हा प्रश्न विचारण्याचें कारणच नाहीं. आज पांच सहा दिवस बाईची प्रकृति सारखी बिघडत चालली आहे. आज तर आतां घटकेचा भरंवसा नाहीं; बहुतेक अर्ध्या तासाच्या आंतच—

**मनोरमा :** डॉक्टरसाहेब, आतां हळू कशाला बोलतां? मरायला मी भीत का आहें?

**विद्याधर :** मग फौजदारसाहेब, आपण यांची ही स्थिति पाहिलीच आहे; त्याबरहुकूम एक दाखला मला लिहून द्या, कीं जिचा खून झाला ती बाई येथें आहे म्हणून!

**मनोरमा :** आतां आहे म्हणून कशाला हवें! विद्याधर, त्यांचें पाप पुरें झालें. त्याबद्दल त्यांनीं भोगावयाच्या त्या यातना भोगल्या! त्यासाठींच देवानें मला जन्माला घातली! माझ्यासाठीं त्यांच्याजवळ क्षमा मागा! झालें! माझ्यानें आतां बोलवत नाहीं. जयंत, क्षमा करा–देवा आलें–आतां मला—

[ मरते. ]

**विद्याधर :** अरेरे, किती भयानक शेवट हा! हा सारा आततायी वृत्तीचा परिणाम!

**फौजदार :** जाऊं द्या; ही खेद करीत बसण्याची वेळ नाहीं. खटल्याची तुम्हीं जरी दहा दिवस तहकुबी मागितली आहे तरी तुम्हीं लवकर जावें हें बरें. आमच्याकडला आणि डॉक्टरसाहेबांकडला दाखला घेऊन तुम्ही आतांच्या गाडीनेंच येथून निघा. खरें कीं नाहीं डॉक्टरसाहेब?

**डॉक्टर :** रास्त आहे आपलें म्हणणें! त्याचप्रमाणें विशेष पुराव्यासाठीं हें प्रेत आम्ही असेंच ठेवतां.

**फौजदार :** प्रेत ठेवण्याची कांहीं जरुरी नाहीं. येथील चार वजनदार लोकांसमक्ष

पंचनामा केला म्हणजे झालें !

**विद्याधर :** हो, तसें करावें तेंच बरें. चला, आतां त्याच खटपटीला लागूं.

## प्रवेश पांचवा

[ स्थळ :—कारागृह ]

**जयंत :** ( हातांतील पत्राकडे पाहून एक गोष्ट – लीले – केवळ एकच गोष्ट समजण्यासाठीं मी आज इतके दिवस तुझी विनवणी करीत असतांना आज या पत्राच्या रूपानें माझें समाधान करीत आहेस ! मी अपराधी आहें असें सर्वांचें एकमत झालें तरी लीले, तुझ्या आश्वासनाच्या एका शब्दासरसा मी स्वतांला धन्य समजेन ! लीलेची प्राप्ति करून घेण्यासाठीं मी मनोरमेला मारीन काय ? मग यापूर्वीच दुसरें लग्न करून घ्यावयाला मला कोणाची हरकत होती ? पुरुषांच्याच सुखासाठीं अवतरलेल्या आमच्या समाजानें दुसऱ्या लग्नाच्या वेळीं माझ्यावर पहिल्याइतक्याच उत्साहानें आनंदाच्या अक्षता उधळल्या असत्या; आणखी तिसरें लग्न केलें असतें–चौथें केलें असतें – अगदीं वेश्यागमन केलें असतें तरी सुद्धां समाजानें माझें तोंडापुरतें अभिनंदन केलें असतें – मला कृष्णस्वरूप समजूनही माझी अवतारी पुरुषांत सुद्धां गणना केली असती ! पण लीले, असल्या अन्यायी सवलतीचा फायदा घ्यावयाची कल्पना माझ्या मनाला तरी शिवली होती का ? या एकतर्फी सुटकेनें मी कदाचित् सुखी–तुझ्याशीं पुनर्विवाह करून खात्रीनें सुखी झालों असतों. पण, लीले, माझ्या दुसऱ्या लग्नाच्या समारंभाचें चित्र डोळ्यांसमोर उभें राहतांच मनोरमेची मूर्ति माझ्यासमोर उभी रहात असे. त्या स्थितींतल्या तिच्या मनाची कल्पना करितांना माझें मन विरघळून जात असे. माझ्या सुखाची हानि झाली तशी तिच्याही सुखाची हानि झाली आहे, या विचारानें मी भांबावून जात असें, तोच मी, लीले, बाबासाहेबांनीं तुला पुनर्विवाहाची मोकळीक देतांच तिचा जीव घेईन !—छेः छेः! असा नुसता उडता विचार माझ्या डोक्यांत आला असता तर मीं आपल्या हातानें माझें डोकें उडवून टाकलें असतें ! माझें हृदय कसें आहे याची पुरेपूर साक्ष तुला पटली असूनही, लीले, मी निर्दोष आहें कीं नाहीं हें मला कळविण्यासाठीं तूं हा पत्राचा रस्ता शोधून काढिलास ! या

पत्रांत कदाचित् अनिष्ट मत असेल या भीतीमुळें अजून मला तें उघडून पाहण्याचा धीर होत नाहीं. उद्यां न्यायाधीशाच्या तोंडचे निकालाचे शब्द ऐकण्यापेक्षां या पत्रांतल्या शब्दांभोंवतींच आत्मा घुटमळत राहिला आहे. पण नाहीं; मीं आतां मनाचा पक्का धडा केला आहे. पत्राच्या आरंभींच जर भलत्या कल्पनेचा पूर्वरंग दिसूं लागला तर अश्रूंनीं पत्राचा पुढचा भाग साफ धुऊन टाकीन, आणि संशयमग्न चित्तानें लीले, तुझा कठोर निवाडा पुरतेपणीं ऐकून घेतल्यावांचून उद्यां प्राण सोडीन! (पत्र फोडून पाहतो.) काय पाहतों हें मी? अगदीं कोरें पत्र! लीले, माझ्या हृदयाप्रमाणेंच शून्यवृत्ति झालेल्या या कोऱ्या पत्रावरून मी काय समजूं? का कारागृहांतल्या या अंधारामुळें हीं पुसटलेलीं अक्षरें दिसत नाहींत? (नीट पाहून) छेः छेः! आतां या पत्राचा अर्थ पुरता लक्षांत आला! या पत्रावर नुसता अश्रूंचा पाऊस पाडून ठेविला आहे. कारागृहांतला काळोख कितीहि काळाकुट्ट असला तरी हृदयांत असा लख्ख प्रकाश-प्रेमाचा प्रकाश-पडल्यावर हीं प्रेमाक्षरें कुठें लपून राहतील? अहाहा! मी निरपराध आहें, अशीच लीले, तुझी खात्री आहे ना? पण आतां असल्या शंकेचें कारणच नाहीं! तुझें माझ्याबद्दल वाईट मत असतें तर तें दाखविण्यासाठीं हा अश्रूंचा पूर धांवत आलाच नसता. पत्र पुढें ठेवून कोणत्या शब्दांनीं आपल्या हृदयाचें प्रतिबिंब त्यावर उमटवावें या विचारानें तूं क्षणभर गोंधळली असशील, इतक्यांत हृदयांतल्या या अश्रूंनीं पत्रावर उडी टाकून तुला नकळत त्याचें हें निर्मल चित्र रेखाटलें असेल. लीले, आजपर्यंत चित्रकारांनीं मनुष्याच्या बाह्यांगाचें चित्र काढलें असेल, महाकवींनीं त्यांच्या जरा पुढें जाऊन मनुष्याच्या हृदयाचें केवळ कल्पनेंतलें चित्र वेड्यावांकड्या शब्दांनीं चिताडलें असेल; पण लीले, मर्यादित अर्थाला उजेडांत आणण्यासाठीं अवतरलेल्या आणि अनुचित उपयोगानें भ्रष्ट झालेल्या शब्दांना दूर झुगारून प्रेमपूर्ण हृदयांतून निघालेल्या शुद्ध अश्रूंनीं आज तूं मात्र हें खरेंखुरें हृदयचित्र काढिलें आहेस. होऊं दे, लीले, माझ्यावर याहूनही काळ्याकुट्ट आरोपाचा वर्षाव होऊं दे! डोळे मिटून घेऊन, बाहेरच्या जगाला विसरून, या चित्तचित्रावरचीं हीं अश्रूंचीं अक्षरें, ही मनाची मिताक्षरी, हृदयाच्या डोळ्यांनीं वाचीत असतांना, जगाची कर्कश कोल्हेकुई कोण ऐकत बसणार! आनंदामुळें द्विगुणित जोरानें धडधडणारें हें हृदय जणुं काय या प्रेमशब्दांचा प्रतिध्वनीच करीत आहे! परमेश्वरा, उद्यां माझ्या आयुष्याचा जर शेवट व्हावयाचा असेल तर हें चराचर जग, हें शरीर सुद्धां मी मोठ्या आनंदानें

इथेंच टाकीन, पण हा एवढा हृदयलेख–दुःखाच्या दाबाखालीं हृदयाचें फूल पिळून काढून निर्मिलेल्या अश्रूंच्या अत्तरानें सुवासिक केलेली ही प्रेमपत्रिका मात्र वर नेण्याची मला आज्ञा दे, म्हणजे लीला, स्वर्गांत येईपर्यंत आत्मानंदानें मी या हृदयवेदाचीं सारखीं पारायणें करीत राहीन! अरेरे! इतकें प्रेमळ, इतकें शुद्ध हृदय, हृदयापासून हातावर असतांना–पण नको, याच विचारामुळें आज या स्थितींत येऊन पडलों आहें! देवा, पवित्र प्रेमाचें असें अपुरतेंच चित्र काढून कां बरें थांबलास? परमेश्वरा, पुढचा जन्म जर असाच असेल, आमच्या धर्मशास्त्राप्रमाणें खरोखरीच आत्म्याचीं लग्नें लागत असतील आणि त्याप्रमाणें पुढल्या जन्मींही पुन्हां मला मनोरमेचीच जोड मिळायची असेल तर मात्र लीलेला माझ्या आणखी जवळ आण. असें दोन्ही प्रकारचें प्रेम अर्धवट दाखविण्यापेक्षां आम्हां दोघांना एकाच मातेच्या उदरांत जन्म दे. सख्ख्या बहीणभावंडांच्या प्रेमाचा तरी आम्हांला पुरता अनुभव दे आणि एकाच जागीं जन्म आणि एकाच जागीं मरणही देऊन एका शुद्ध प्रेमाचाच आस्वाद घेऊं दे! अशा कोणत्याही शुद्ध, पवित्र आणि निकट प्रेमानें आमचीं अंतःकरणें जोडून टाक, कीं ज्यापासून ऐहिक सुखाच्या कल्पनेचा सुद्धां उद्‌भव होणार नाहीं.

## प्रवेश सहावा

[कचेरीचा देखावा. सर्व मंडळी. साक्षीच्या पिंजऱ्यांत गोकुळ.]

**शिरस्तेदार :** ईश्वरसाक्ष खरें बोलेन. खोटें बोलणार नाहीं.

**गोकुळ :** ईश्वरसाक्ष खरें बोलेन खोटें बोलणार नाहीं.

**शिरस्तेदार :** तुमचें नांव काय?

**गोकुळ :** गोकुळ.

**शिरस्तेदार :** बापाचें नांव काय?

**गोकुळ :** वृंदावन.

**शिरस्तेदार :** आडनांव?

**गोकुळ :** विसरभोळे.

**वकील :** बरें, आतां सांगा पाहूं, तुमचें वय काय?

गोकुळ : ( स्वगत ) हं; तोच प्रश्न ! आतां काय करायचें ? नांवांतल्या अक्षरांना दोन्ही वकिलांनीं गुणून त्यांत न्यायाधीश मिळवावयाचा ? हो, असेंच ! नाहीं पण, मला वाटतें अक्षरांना न्यायाधिशानें गुणून दोन वकील मिळवावयाचे असें असावें ! हं, हेंच बरोबर आहे ! बारा एके बारा न् दोन चवदा. (प्रकट) चवदा वर्षें !

वकील : चवदा वर्षें ? तुम्ही शुद्धीवर आहां का ?

गोकुळ : (स्वगत) चुकलों; वकिलांनींच गुणावयाचें ! बारा दुणे चोवीस न् एक पंचवीस ( प्रकट ) पंचवीस.

वकील : पहिल्यानें चवदा कशीं सांगितलीं ?

गोकुळ : पहिल्यानें फुकट गेलेलीं वर्षें जमेस धरलीं नव्हतीं.

वकील : वा ! या हिरोबानें पहिल्यानें शून्यच उत्तर द्यायला हवें होतें. तुम्ही घाबरलां काय ?

गोकुळ : मी घाबरलों ? तो काय म्हणून ? मीं कांहीं माझ्या बायकोचा खून केला नाहीं !

वकील : तुम्ही आरोपीला ओळखतां का ?

गोकुळ : तुम्ही आपल्या बंधूंना ओळखतां का ? न्यायाधीशसाहेब या शिरस्तेदारांना ओळखतात का !

वकील : माझ्या प्रश्नाचें नीट उत्तर द्या. तुम्ही आरोपीला ओळखतां का ?

गोकुळ : हो; त्यांना ओळखतों आणि आपल्याला पण चांगला ओळखून आहें बरें मी !

वकील : जयंताला सोडविण्यासाठीं तुम्ही एखादी खोटी शपथ घ्याल का ?

गोकुळ : अलबत्, कां नाहीं ? एक सोडून हजार घेईन ! प्रत्यक्ष श्रीकृष्णांनीं सुद्धां सांगितलें—

वकील : तें राहूं द्या ! हें पत्र माहीत आहे का तुम्हांला ?

गोकुळ : हो ! माहीत आहे ! लीलाताईनीं जयंतांना पाठविलेलें पत्र हें !

वकील : किती वेळा पाहिलें आहे तुम्हीं हें ?

गोकुळ : एक वेळा !

वकील : जयंताचें बायकोशीं पटत नाहीं हें खरें आहे कीं नाहीं ?

गोकुळ : हें खरें आहे ! जयंत बायकोचा अत्यंत तिरस्कार करीत असत.

वकील : तुमची बायको तुम्हांला वागवून घेतां येत नाहीं हें खरें आहे ना ?

गोकुळ : त्याच्याशीं तुम्हांला काय करावयाचें आहे ? तुम्ही आपली बायको

संभाळा—

**न्यायाधीश :** गप्प बसा; ते विचारताहेत त्याचें उत्तर द्या.

**गोकुळ :** न्यायमूर्तींना माझी एक विनंती आहे. माझ्या मतें आमचीं घरगुती मांडणें न्यायासनासमोर आणण्याचें कांहीं कारण नाहीं; आपल्या प्रश्नांचीं उत्तरें आम्ही देणार नाहीं! नाहीं तर आम्ही मुळीं साक्षच द्यायला तयार नाहीं!

**न्यायाधीश :** असें कसें चालेल? साक्ष दिलीच पाहिजे! न्यायाला मदत ही प्रत्येकानें केलीच पाहिजे!

**गोकुळ :** हा चांगला न्याय आहे! यांनीं आमच्या बायकांच्या वाटेल तशा चौकशा कराव्या आणि आम्ही यांच्या बायकोचें नांव काढिलें, कीं आपण आम्हांला गप्प बसा म्हणून म्हणतां! मी जरा तोंडाचा फटकळ आहें— आपण आणि हे वकील लोक नेहमीं एके ठिकाणीं कामें करितां तेव्हां आपला त्यांच्याकडे थोडासा ओढा असणें स्वाभाविक आहे. त्याला कोण गैर म्हणेल? (लोक हंसतात.) हं साहेब, हंशावारी बाबत घालवूं नका! आपण न्यायाधीश आहां, असा पक्षपात आपल्याला शोभत नाहीं! आपल्याला वकील आणि साक्षीदार सारखेच! मीही थोडाबहुत कायदा जाणतों! चार पुस्तकें पाहिलीं—

**न्यायाधीश :** (हंसून) काय वेडगळ मनुष्य! (वकिलास) चालू द्या तुमचे सवाल!

**वकील :** तुमचा स्वभाव थोडासा विसराळू आहे कीं नाहीं?

**गोकुळ :** असेल, तुम्हांला काय त्याचें? तुम्ही आपले प्रश्न विचारा; उत्तर मिळालें नाहीं, मग बोला! आमच्या वकिलांनीं पढविलेले सारे जबाब सवालावांचून पाठ म्हणून घ्या हवे तर.

**वसंत :** अरे गोकुळ, मीं कधीं तुला पढवून ठेविला आहे रे?

**गोकुळ :** असें कां बरें वसंतराव? मी नाहीं प्रतिज्ञेवर खोटें बोलावयाचा!

**वसंत :** (स्वगत) चांगली सोय! आणि हा आमच्यातर्फेचा साक्षीदार!

**वकील :** काय हो, हें पत्र तुम्हीं किती वेळा पाहिलें आहे?

**गोकुळ :** काय हो, हा प्रश्न तुम्ही किती वेळा विचारणार?

**वकील :** तुम्ही उत्तर द्या आधीं.

**गोकुळ :** दोन वेळां.

**वकील :** मघाशीं एक वेळा पाहिलें म्हणालां, आतां दोन वेळां पाहिलें म्हणतां हें काय?

गोकुळ : मघांशीं विचारलें त्यापूर्वी एक वेळां पाहिलें होतें, आतांच्या विचारण्याला मघांशीं पाहिलें ती वेळ हिशेबी धरिली पाहिजे! पूर्वीची एक व मघांची एक मिळून दोन!

वकील : वसंतराव, झालेल्या प्रश्नोत्तरांवरून तुमच्या साक्षीदाराची नालायकी दिसून येत आहे. या मनुष्याला व्यवहारज्ञान नाहीं, हा विसरभोळा आहे; त्याची आणखी फेरतपासणी केली तर तुमचें नुकसान होणार! तेव्हां तुमची इच्छा असल्यास याची साक्ष काढून घेण्याची मी संधि देतों.

वसंत : या संधीबद्दल मी आपला आभारी आहें! न्यायमूर्तींनीं असें करण्याचा हुकूम द्यावा.

न्यायाधीश : गोकुळ, तुझ्या नालायकीमुळें तुझी साक्ष काढून टाकण्यांत येत आहे. तुला बाहेर येण्याची परवानगी आहे.

गोकुळ : इतकेंही करून मी नालायक! शहाण्यानें कोर्टाची पायरी चढूं नये म्हणून वाडवडील म्हणत आले तें कांहीं खोटें नाहीं! [पिंजऱ्यांतून बाहेर येतो.]

वकील : ही साक्ष होण्यापूर्वी जो पुरावा आला त्यावरून मला काय सांगावयाचें तें मीं मघांशीं सांगितलें आहे! अधिक बोलण्याची माझी इच्छा नाहीं.

वसंत : त्याचप्रमाणें मलाही कांहीं बोलावयाचें नाहीं. फक्त न्यायमूर्तींनीं व पंचांनीं आरोपीच्या स्थितीकडे लक्ष द्यावें एवढीच माझी विनंती आहे.

न्यायाधीश : पंचांतील सद्‌गृहस्थ हो, आपल्याला आंत जावयाचें आहे काय?

प्रमुख पंच : नाहीं.

न्यायाधीश : मग आपलें मत काय आहे?

प्रमुख पंच : दोषी!

न्यायाधीश : आपल्या सर्वांचें एकमत आहे?

प्रमुख पंच : होय, सर्वांचें एकमत आहे.

न्यायाधीश : आरोपी जयंत, आमच्यापुढें आलेल्या पुराव्यावरून तुझ्यावर खुनाचा आरोप शाबीत होत आहे! पंचांचा निकालही तुझ्याविरुद्ध आहे! तुझ्या बायकोबद्दल तुला अत्यंत तिटकारा होता. ती नापत्ता झाल्यानंतर तीन चार दिवसांनीं तिच्या प्रेताचे तुकडे विहिरींत टाकतांना तुला पुराव्यानिशीं शिपायांनीं पकडलें आहे! पेटींतील दागिन्यांवरून व पत्रावरून आणि लीला व सुशीला यांच्या साक्षींवरून तें प्रेत मनोरमेचेंच होतें असें सिद्ध होतें. तुझी बायको नापत्ता होण्यापूर्वी, लीला व तूं यांना अयोग्य रीतीनें बोलतांना सर्वांनीं पाहिल्यावर त्यावरून, तुझा व मनोरमेचा मोठा तंटा झाला असें कमलाकराच्या

साक्षीवरुन सिद्ध झालें आहे. तुझा आणि लीलेचा पत्रव्यवहार होत असे हेंही सिद्ध झालें आहे. बाबासाहेबांनी लीलेला पुनर्विवाहाची परवानगी दिलेली ऐकल्यापासून तुझ्या मनाची चलबिचल होऊं लागली असेंही ठरलेंच आहे. त्या अर्थी हा खून तूं बुद्धिपुरस्सर केलास, याबद्दल मुळींच संशय उरत नाहीं. अशा अमानुष रीतीनें खून करणारावर दया करणें म्हणजे दयेचा दुरुपयोग करण्यासारखें आहे. तुझ्या शिक्षेबद्दल तूंच जबाबदार आहेस. ह्याची जबाबदारी परमेश्वराकडे नाहीं; राजाकडे नाहीं; मनुष्याकडे नाहीं! सबब आपली बायको मनोरमा हिचा बुद्धिपुरस्सर खून केल्याचा आरोप तुझ्यावर पूर्णपणें शाबीत होत असल्यामुळें तुला मरेपर्यंत फांशावर लटकविण्याची शिक्षा देण्यांत येत आहे.

जयंत : हा दुर्दैवा!

[ न्यायाधीश सही करतात, व टाक मोडून टाकितात. पडदा पडतो. ]

**अंक चवथा समाप्त**

# अंक पांचवा

## प्रवेश पहिला

[ फांशीचा देखावा. सर्व मंडळी. ]

जयंत : जगावर शेवटची दृष्टि टाकतांना आज त्यांतली अपूर्व शोभाच दृष्टीस पडत आहे, लीले! पुन्हां हा देखावा मला कधींच पहायला मिळणार नाहीं ना ?

लीला : अशीच त्या दीनदयाळू परमेश्वराची इच्छा दिसते; स्वर्गांत तरी तो तुम्हांला सुखांत ठेवो!

जयंत : लीले, स्वर्गाबद्दलची माझी कल्पना क्षणोक्षणीं ढासळत चालली आहे. स्वर्गाची प्रत्यक्ष साक्ष अजून कोणाला पटली आहे का? त्यापेक्षां परिचयानें प्रिय झालेली ही पृथ्वी किती तरी हवीशी वाटत आहे. खरोखरीच स्वर्ग असेल का? परमेश्वर असेल का? ही देखतांडोळ्या-दृष्टीआड होणारी प्रेमाची सृष्टि पुन्हां कल्पनातीत काळीं तरी लाभेल का? एक ना दोन, हजारों तर्कांनीं आत्मा व्याकुळ झाला आहे; स्वर्गांत अप्सरा असतील; पण अशी बाळपणाची सोबतीण, संस्कारजन्य प्रेमाची खाण, अशी लीला असेल काय? स्वाभाविक रीतीनें मरण येतांना मनुष्य बेशुद्ध होतो हें त्याचें केवढें भाग्य! पण अगदीं जागीवपणानें जगाचा निरोप घेतांना संशयाच्या भोवऱ्यांत सांपडून माझी काय स्थिति झाली ही!

सुशीला : बाळा जयंता, धीर धर, ही केवळ ईश्वरश्रद्धेची कसोटी आहे. दृढभावाचा भुकेला भगवान् कोणालाही अंतर देत नाहीं. त्याच्यावर दृढ विश्वास मात्र ठेव.

जयंत : अहाहा! सुशीले, बोल बोल; तुझ्या अमृतवाणीचा या कानास शेवटचा लाभ होऊं दे. यापुढें मानवी शब्दांचा नाद त्यांना पारखा होणार. मृत्यूच्या

राज्यांतल्या अज्ञात प्रदेशांत माझें समाधान कोणती सुशीला करणार ? पहा, लीले, अशीच प्रेमदृष्टीनें पहा. काळा, कांहीं वेळ आपली गति थांबवून माझी भरत आलेली मृत्यूची घटका थोडी तरी लांबणीवर टाक. पण लीले, अशी रडूं नकोस, माझें हृदय आतां बायकांच्या हृदयापेक्षांही कोमल झालें आहे. तुझ्या डोळ्यांतलें पाणी पाहून, हे पहा, माझेही डोळे पाण्यानें भरून येतात आणि त्यामुळें माझा पुढचा मार्ग मला स्पष्ट दिसत नाहीं. मृत्यूची वेळ दूर असली म्हणजे तात्कालिक निर्भयतेमुळें स्वर्गाच्या गोष्टीवर सहज विश्वास बसतो; पण जसजशी, ती सगळ्या जगाच्या ज्ञानाच्या कसोटीची वेळ जवळ येते तसतसा विश्वास डळमळूं लागतो. नको, लीले, रडूं नको ! ते अमोलिक अश्रू जपून ठेव. या अभाग्यासाठीं असे उधळूं नकोस.

**लीला :** रडूं नको तर काय करूं ? आतां या जगांत मला कोणाचा हो आधार ? माझें समाधान कोण हो करील ? ही आपली लाडकी लीला दुःखानें गांजली म्हणजे यापुढें अशी कोणाच्या हो गळ्यांत पडणार ?

[ त्याच्या गळ्याला मिठी मारते. ]

**जयंत :** इहलोकाचा संबंध सुटल्यावर त्याची लाज तरी कशाला धरूं आणि या अखेरच्या वेळीं लीले, तुला दूर तरी कशाला लोटून देऊं ? आतां स्वर्गांत हें सुख लाभेल काय ? अप्सरांच्या डोळ्यांतून दिव्य तेज लकाकत असेल पण या डोळ्यांच्या आरशांप्रमाणें त्यांच्यांत बाळपणाचीं हजारों चित्रें दिसतील काय ? नंदनवनांतल्या वायूला या श्वासासारखी हुषारी आणितां येईल काय ? या तनुलतेसारखें स्पर्शसुख स्वर्गांतली ती कल्पलता कुठून देणार ? आणि या एकएक अश्रूची संजीवनशक्ति तर अमृताच्या सागरांत सुद्धां सांपडणार नाहीं.

**शिपाई :** बाई दूर व्हा; अगदीं काळाच्या दाढेंत सांपडलेल्या माणसाचा लोभ धरून काय कामाचा !

**सुशीला :** बाबा रे, अगदीं प्रेताला वारा लागूं नये म्हणून त्याच्यावर सुद्धां पांघरूण घालण्याची माया जेथें आवरत नाहीं तेथें जिवंत माणसाचा लोभ कसा सुटणार ?

**जयंत :** लौकर, फारच लौकर, हें सुख सोडावें लागत आहे. आजपर्यंत लोकलज्जेमुळें, पापाच्या ऐहिक कल्पनेमुळें, या सुखाचा कधींच अनुभव घेतां आला नाहीं. आतां या बाईच्या एका क्षणांत साऱ्या आयुष्याचें सुख एकदम कसें अनुभवतां येणार ? दृढ आलिंगनानें या कायेचा चुराडा होईल; हपापलेल्या सुखाच्या श्वासानें हे ओंठ करपून जातील आणि तीव्र प्रेमाच्या दृष्टीनें हा देह

छिन्नविच्छिन्न होईल !

लीला : सावध व्हा, जयंत, सावध व्हा; मी आतां तुमची बाळपणची अल्लड लीला नाहीं; पण समाजानें मानसिक संन्यास दिलेली, प्रेमाच्या शिवेपलीकडे लोटलेली, अशुभमूर्ति बालविधवा आहें ! [ त्याच्यापासून दूर होऊं लागते. ]

कमलाकर : (स्वगत) या हतभाग्याचें हें शेवटचें सुख पाहून सुद्धां अंगाची आग होते आहे. ( उघड ) तात्यासाहेब, हें कधींच आटोपणार नाहीं. आपणच पुढें व्हा. सरकारी माणसांची खोटी करणें गुन्हा होईल.

तात्यासाहेब : तेंही खरेंच ! जयंता, बाळा चल; सावध हो.

जयंत : हो; खरेंच; आतां सावध झालेंच पाहिजे. लीले, दूर हो ! त्या दिवशीं एक क्षणभर नसत्या कल्पनेला मनांत थारा दिला त्याचें हें प्रायश्चित्त भोगतों आहें ! आतां मरतां मरतां कशाला हवा हा मोह ! लीले, आजन्म तुझ्याशीं केवळ बंधुप्रेमानें वागत आलों त्याची आठवण करून आतांच्या माझ्या या पवित्र निर्दयतेची क्षमा कर; हा पहा मी तुला शुद्धत्वाच्या कठोरतेनें अस्सा दूर लोटून या स्वर्गाच्या मार्गाला लागतों. [ फांसावर चढून जातो. ]

लीला : ताई, हा प्रसंग कसा ग पाहूं ? नुसत्या कल्पनेनेंच मला घेरी येऊं लागत आहे; सारें शरीर लटपट कांपत आहे.

सुशीला : त्यापेक्षां मन दगडासारखें घट्ट करून तूं घरीं जा. इथें उभें राहून तरी आपल्याच्यानें काय होणार आहे ? जा, तिकडे आपली गाडी आहे; गाडीवाल्याला सांग म्हणजे तो तुला घरीं घेऊन जाईल. जा.

[ लीला रडत रडत जाते. ]

जयंत : जा, लीले, जा; आतां कायमचे डोळे झांकतांना अंगावर अजून शहारे येत आहेत. ( डोळे अर्धवट मिटून पुन्हां उघडतो. ) छेः, पृथ्वीमातेकडे, भोंवतालच्या प्रियजनांकडे पाहण्याचा मोह पुन्हां अनावर होत आहे. आजन्मचरित्र एकदम डोळ्यांपुढें येऊन उभें रहातें. बस्स; पुरे हा मोह. आतां झांकलेले डोळे उघडल्यानंतर काय दृष्टीस पडेल त्याची कल्पना, परमेश्वरा, फक्त तुलाच !

[ डोळे मिटून घेतो. घाईनें विद्याधर प्रवेश करितो. ]

विद्याधर : ( न्यायाधीशास ) थांबा, थांबा, अन्यायानें निरपराध्याला ठार मारू नका. न्यायमूर्तींनीं हे दोन दाखले पाहण्याची कृपा करावी. आरोपी जयंत याच्यावर कोणताच आरोप नाहीं, अशी या दाखल्यांवरून आपली खात्री होईल. मित्रा जयंता, खालीं ये तूं. [ दाखले देतो. ]

कमलाकर : ( स्वगत ) हा काय घोटाळा आहे आणखी ? असें आड उभें राहून

पहावें काय आहे तें ! आणि प्रसंग पाहून पुढें कसें वागावयाचें हें ठरवावें.

[ जातो. ]

**न्यायाधीश :** तात्यासाहेब, आपल्याला सांगावयाला मोटा आनंद वाटतो कीं, जयंत हे अगदीं निर्दोष आहेत. मनोरमाबाई काल एका भलत्याच गांवीं दवाखान्यांत वारल्या. ( शिपायांस ) अरे त्यांना उतरवा खालीं !

[ जयंत खालीं उतरतो. ]

**तात्यासाहेब :** मग तें प्रेत कोणाचें ?

**विद्याधर :** तें द्रुमनचें ! तिनें आत्महत्त्या केली; आणि ती मात्र कमलाकराच्या अधमपणामुळें.

**तात्यासाहेब :** म्हणजे हा सर्वच प्रकार विलक्षण आहे !

**विद्याधर :** ( पत्र देऊन ) हें पत्र पहा, द्रुमननें मरतांना लिहून ठेविलेलें पत्र ! यांत एकंदर प्रकार खुलासेवार लिहिला आहे. ( न्यायाधीशास ) मला वाटतें आतां खटला पुन्हां चालवीपर्यंत आरोपीला जामिनावर सोडतां येईलच !

**न्यायाधीश :** ही गोष्ट सरन्यायाधीशांच्या अधिकारांतली आहे. चला, जयंतांना घेऊन आपण कचेरींतच जाऊं.

**तात्यासाहेब :** काय उरफाट्या काळजाचा राक्षस ! कमलाकर ! अरे, इतक्यांत हा येथें होता आणि गेला कुठें ?

**विद्याधर :** तो येथें कशाला राहतो ?

**तात्यासाहेब :** हें पत्र तुमच्या हातीं कसें लागलें ?

**विद्याधर :** कमलाकराच्याच एका रामोशानें चुकून मला दिलें आणि त्यावरून मला सारा पत्ता लागत गेला. ती एकंदर हकीकत फार मोठी आहे. पण तात्यासाहेब, खटल्याची मजल येथपर्यंत आली कशी ? तहकुबी मागण्यासाठीं मीं आपल्याला तार केली होती ना ?

**तात्यासाहेब :** मला तार केली होती ? मला तर नाहीं मिळाली—

**विद्याधर :** ती सुद्धां त्या हरामखोरानें नापत्ता केली असेल. चला, त्याचाही तपास केला पाहिजे. तात्यासाहेब, आपण न्यायाधीशसाहेबांबरोबर कचेरीकडे चला; मी त्या रामोशाला घेऊन येतों आणि साधल्यास तारेबद्दलही चौकशी करितों.

**तात्यासाहेब :** ठीक आहे. चला. [ सर्व जातात. सुशीला जाऊं लागते. ]

**विद्याधर :** सुशीले, सुशीले, जरा थांब; आज मी तुला आणखी पुनर्विवाहाबद्दल विनंती करणार आहें !

**सुशीला :** काय ? या वेळीं ?

विद्याधर : हो, या वेळीं आणि याच जागीं ! जी जागा जयंताची अमंगल मृत्युभूमि म्हणून आपल्या स्मरणांत रहाणार होती तीच आतां आपली विवाहभूमि म्हणून लक्षांत रहावी अशी माझी इच्छा आहे.

सुशीला : या भलत्या विषयाची अशा गडबडीच्या वेळीं—

विद्याधर : आतां गडबडीची वेळ कसली ? संकट नाहींसें झाल्यावरही तें फार भयंकर होतें म्हणून भिण्यांत काय अर्थ ? भयंकर स्वप्नाचें जागेपणीं भय बाळगणें हें खंबीर मनाचें लक्षण नाहीं. शिवाय कैदेंतून मुक्त झालेल्या जयंताला आपण दोघें विवाहपाशांत बद्ध झालेलीं दिसलीं पाहिजे, असा माझा कृतनिश्चय झालेला आहे ! सुशीले, अजून तुला माझी दया येत नाहीं काय ? किती दिवस मला तूं अशी अलोट दुःखांत ठेवणार ?

सुशीला : विद्याधर, मला असा आग्रह करूं नका ! तुमच्या विनवणीच्या प्रत्येक शब्दानें मी अधिक अधिक संकटांत पडत आहें. त्या दिवशीं तुम्हीं त्या मांगाच्या हातून मला सोडविलें त्या वेळीं माझें मन बेभान झालें होतें म्हणून रागाच्या आवेशांत मी तुम्हांला भलतेच शब्द बोलून गेलें; त्याची मला क्षमा करा ! आणखी मोठ्या मनानें हा पुनर्विवाहाचा हेतु सोडून द्या !

विद्याधर : सुशीले, मी तुझ्या गुणाला योग्य नाहीं का ? का एकदां तुझा उपमर्द केला म्हणून अजून तूं माझा तिरस्कार करीत आहेस ?

सुशीला : नाहीं, मी तुमचा तिरस्कार करीत नाहीं ! माझ्या खोलींत तुम्हीं पाऊल टाकिलें तेवढ्या गोष्टीचा चांगला उलगडा करा, म्हणजे जी स्त्री तुमच्याशीं लग्न करील तिला मी जन्माची धन्य समजेन !

विद्याधर : पण माझा तर तुझ्याबरोबरच जन्म काढण्याचा संकल्प आहे.

सुशीला : तो संकल्प कधींच पुरा व्हावयाचा नाहीं ! तुम्हीं त्या मांगाच्या हातून मला सोडविलें, जयंताला जवळजवळ तुम्हींच जीवदान दिलें. तुमचे आम्हां सर्वांवर अगणित उपकार आहेत. पण विद्याधर, तुमच्या पायां पडतें. त्या उपकाराच्या मोबदल्यांत या देहाची मागणी करूं नका ! त्याच्यावर माझ्या पतीची सत्ता आहे.

विद्याधर : सुशीले, किती दिवस त्या पतीची सत्ता चालणार ? पतीच्या लहानशा मूर्तीच्या आठवणीवर सारा जन्म घालविणार काय ?

सुशीला : विद्याधर, मोठमोठ्या साध्वींचीं चरित्रें असेंच करायला सांगत नाहींत का ? गिरिधरलालच्या बालमूर्तीच्या चिंतनांत मिरादेवीनें सारा जन्म घालविला ना ?



एच-२७३

**विद्याधर :** दंतकथेच्या राज्यांतल्या या गोष्टी ! सुशीले, गिरिधरलालनें भक्तीसाठीं मिरादेवीच्या पदरांत उडी टाकली तसा तुझा पति स्वर्गांतून तुझ्यासाठीं उडी टाकील का ?

**सुशीला :** या हतभागिनीसाठीं त्या कोमळ बालमूर्तीला इतके श्रम ? विद्याधर, माझा एवढा अधिकार नाहीं. त्यांच्या बाललीलांचें चिंतन करावयाचें, कल्पनेच्या वातावरणांत वाढणाऱ्या त्यांच्या बालमूर्तीचें प्रेमानें संगोपन करावयाचें एवढाच या त्यांच्या दासीचा अधिकार ! त्या सुखाआड येऊं नका !

**विद्याधर :** पण अशा नुसत्या चिंतनांत सारा जन्म गेल्यावर या तुझ्या दैवी रूपाचा, लोकोत्तर गुणांचा काय उपयोग ? ईश्वरदत्त देणगीचा हा दुरुपयोग नाहीं का ? हें सारें एकदां गेलें कीं कायमचें गेलें !

**सुशीला :** एका जन्मानेंच झालें का ? विद्याधर, माझ्या यत्किंचित् रूपगुणांचें तर राहूं द्या; पण जगांत स्वैर पसरलेल्या साऱ्या सुंदरतेचा एवढ्यापुरताच का अवतार आहे ? अतुल सामर्थ्य खर्च करून ईश्वरानें एवढा सुंदर वस्तूंचा पसारा निर्माण केला तो काय क्षणिक वृत्तीनें नाश पावण्यासाठीं ? पुष्पांचा सुवास एकदां वाऱ्यावर वहात दिगंतराला जातो एवढीच त्याची कामगिरी ? आकाशांतल्या तारका नुसत्या चमकतात हाच त्यांचा उपयोग ? पवित्र प्रेमाचीं भाषणें, निर्दोष हास्याचे मंजुळ ध्वनि, अजाण बालकांचा उत्कट आनंद—आजपर्यंत जें जें क्षणिक, सुंदरतेचें सर्वस्व क्षणमात्र चमकून नाहींसें झालें तें काय कायमचें ? या जगांत त्यांचा जो तात्पुरता खेळ झाला तेवढ्यासाठींच ईश्वरानें अनन्त श्रमानें त्यांना निर्माण केलें का ? विद्याधर, आपलें जग म्हणजे सुखदुःख निर्माण करण्याचा ईश्वराचा प्रचंड कारखाना आहे. इथें जें जें चांगलें निर्माण होतें तें तें एका जागीं सांठवून परमेश्वर त्याचा स्वर्ग तयार करितो आणि जें वाईट त्याची रौरवाकडे रवानगी होते. या जगाच्या कारखान्यांत खेळणारा आत्मा म्हणजे ईश्वराची इच्छाशक्ति. तुम्हांला नाहीं का असें वाटत ? आपण आपल्या पुण्याईनें स्वर्गाला गेलों तर या सर्वांचा कायमचा उपभोग घेऊं. अनंत कालाच्या हिशेबांत या क्षणमात्र आयुष्याची काय कथा !

**विद्याधर :** सुशीले, ही सारी तुझ्या कल्पनेची भरारी आहे. वस्तुस्थिति कदाचित् याहून फार निराळी असेल. हें वेड आहे, हें सोडून दे !

**सुशीला :** असेल, हें वेड असेल; तरी मला तें फार सुखकारक आहे ! तें काढून टाकण्याची माझी इच्छा नाहीं.

**विद्याधर :** शाबास, गुणिले, शाबास !

सुशीला : ( चपापून ) काय म्हणालांत; काय नांव घेतलें आतां आपण ?
विद्याधर : गुणिला ! कां बरें, इतकी चपापलीस तूं ?
सुशीला : गुणिला हें नांव माझ्या पतींनीं लग्नाच्या गडबडींत मला सांगितलें; घाबरत घाबरत चटकन् माझ्या अगदीं कानांत सांगितलें; त्यांनीं मोठ्या आवडीनें माझें हें गुजराथी नांव ठेविलें. माझ्या पतीखेरीज हें नांव दुसऱ्या कोणालाही ठाऊक नव्हतें !
विद्याधर : गुणिले, तूं म्हणतेस तें अगदीं अक्षरशः खरें आहे !
सुशीला : म्हणजे ? ( त्याच्याकडे सारखी पहात उभी रहाते. )
विद्याधर : वाढूं दे, तुझी कल्पना स्वैर वाढूं दे, आणि कल्पनेच्या राज्यांतली तुझ्या पतीची बालमूर्ति पण वाढूं दे ! हं, आतां नीट पहा, त्या वाढलेल्या कल्पनाचित्रांत आणि माझ्यांत कांहीं तरी फरक आहे का ? अशी आश्चर्यानें दृष्टि तरळूं देऊं नकोस, हा पहा हातावरचा डाग. लाजाहोमांत मी आहुति टाकतांना चोरट्या दृष्टीनें तूं सारखी त्याच्याकडे पहात होतीस ना ?
सुशीला : मला नसती आशा लावून विद्याधर--
विद्याधर : विद्याधराचा अवतार मघांशींच संपला; गुणिले, अजून या गुणाकराला ओळखलें नाहींस ? [ सुशीला त्याला आलिंगन देते. ]
सुशीला : ओळखलें, चांगलें ओळखलें. पण हें सारें खरें का हा भ्रम ?
विद्याधर : हें खरें आहे हें तुला पूर्वींच समजायला पाहिजे होतें ! मीं जरी खरोखरी स्वर्गात असतों तरी सुद्धां भूलोकीं या स्वर्गसुखासाठीं उडी टाकिली असती ! सुशीला, तुझ्या पातिव्रत्याच्या शक्तीची तुला कल्पना नाहीं. मी जर परपुरुष असतों तर, पतिव्रते, त्या दिवशीं तुझ्या खोलींत पाऊल टाकतांच जळून भस्म झालों असतों !
सुशीला : मग ती दुष्ट बातमी—
विद्याधर : अगदीं खोटी ! आपल्या लग्नानंतर मी जातांना, आमच्या लहानशा जहागिरीच्या आशेनें काकांनीं मला समुद्रांत ढकलून दिलें खरें, पण बंदरावर होड्यांची गडबड असल्यामुळें एका नावाड्याच्या मदतीनें मला आपला जीव वांचवितां आला ! पुढें ही सारी हकीकत मीं गुप्तपणानें तेथल्या अधिकारीसाहेबांस कळविली. काकांचा स्वभाव दीर्घद्वेषी आणि पाताळयंत्री, त्यामुळें लहानपणीं मला त्यांचें भय वाटलें आणि दुसरें एखादें संकट टाळावें म्हणून नांव बदलून साहेबांच्या संमतीनें उत्तर हिंदुस्थानांत गेलों ! साहेबांनीं ही सारी गोष्ट गुप्त ठेवून आमच्या उत्पन्नांतून मला विद्याभ्यासाचा खर्च मिळण्याची

व्यवस्था करून बाकीचें उत्पन्न मी कायद्यांत येईपर्यंत सरकारजमा ठेविलें! पुढें काकाही वारले. माझा विद्याभ्यास संपला आणि मी इथें आलों!

**सुशीला :** आणि इतके दिवस मला फसविलें ना?

**विद्याधर :** त्याची मात्र मला क्षमा कर! तुमच्या घरीं चालणाऱ्या फाजील सुधारणेचा तुझ्यावर किती परिणाम झाला आहे त्याची परीक्षा पाहिल्या-वांचून–लाडके क्षमा कर–मला स्वीकार करवेना.

**सुशीला :** पण आतां तरी स्वीकार—

**विद्याधर :** आतां तूंच माझा स्वीकार कर! चल, हें सारें वर्तमान तात्यासाहे-बांना कळवूं आणि जयंताच्या आणि लीलेच्या पुनर्विवाहाचा आनंद द्विगुणित करूं. हो, पण आधीं एवढें सांग कीं, तुझें माझ्याबद्दलचें मत एका क्षणांत तुला बदलावयाला लावीन असें मीं म्हटलें होतें तें खरें झालें ना?

**सुशीला :** विद्याधरावरचा माझा राग कांहीं कमी व्हायचा नाहीं.

[ जातात. ]

## प्रवेश दुसरा

[ तात्यासाहेबांचें घर. लीला ]

**लीला :** माझें आतां या जगांत काय उरलें आहे? जयंतांचा दिव्य आत्मा त्यांच्या नश्वर शरीराला सोडून स्वर्गाला जाऊन खास पोंचला असेल. इतके दिवस पुनर्विवाहाची आशा–पापावर उभारलेली, मनोरमावहिनींच्या मर-णाच्या इच्छेवर उभारलेली पुनर्विवाहाची आशा–अगदीं हृदयाच्या हृदयांत, कल्पनेच्या पलीकडे, शक्यतेच्या शेवटच्या टोंकावर तरी, तर्काच्या डोळ्यांनीं दिसत होती! पण तीही गेली! त्यांच्या आत्म्यावांचून जसें त्यांचें शरीर, तसें त्यांच्यावांचून सारें जग मला झालें आहे! माझ्या जगाचा आत्मा आज निघून गेला! गळ्याला फांस बसून आत्म्याचा अखेरचा कोंडमारा होतांना त्यांचे हाल पाहूं नयेत म्हणून डोळे फाटून बाहेर आले असतील, त्यांनीं रक्ताचे अश्रु ढाळले असतील, त्यांचें दुःख सांगण्यासाठीं जीभ हातभर बाहेर आली असेल. अनाथ विधवांच्या सुखकल्पनांप्रमाणें त्यांच्या हातापायांनीं तिथल्यातिथेंच निर्वाणीची धडपड केली असेल, आणि अखेर आत्मतेज

निघून जातांच सर्व शरीर काळेंठिक्कर पडलें असेल. त्यांचें त्या काळचें भेसूर रूप माझ्यापुढें सारखें उभें रहात आहे. पण नको ग बाई, जगानें आपल्या हातीं सांपडलेल्या त्यांच्या मूर्तीचे जसे हाल केले तसे मी माझ्या कल्पना-सृष्टींतल्या त्यांच्या मूर्तीचे एक क्षणभरही करणार नाहीं. डोळे फोडून टाकीन, पण ती करुणमूर्ति पहाणार नाहीं! त्यापेक्षां त्यांच्याबरोबर–मागोमाग जाऊन वर स्वर्गांत माझ्या दिव्य जयंतांचें अखंड दर्शन घेत बसेन! पण कोणत्या मार्गानें अगदीं लवकर मृत्यु आणितां येईल? मंडळी घरीं येण्याच्या पूर्वीच त्यांच्या मागोमाग या जगांतून धाव ठोकली पाहिजे! स्वर्गांतल्या एखाद्या अप्सरेनें त्यांना भुरळ पाडण्यापूर्वीच–पण छे, माझे जयंत इतक्या क्षुद्र मनाचे का आहेत? देवा, प्रणयी जनांना इच्छामरण कां बरें दिलें नाहींस? उत्कट इच्छेनें हेतु पूर्ण होतात असें म्हणतात; मग माझी इच्छा कां बरें पूर्ण होत नाहीं? अहाहा! ते इतके उदार आहेत कीं, मला इथें टाकून स्वर्गांत सुद्धां जाणार नाहींत! शरीराच्या कैदेंतून सुटलेला त्यांचा आत्मा या हवेंतच माझ्या भोंवतीं घोंटाळत असेल! मग या श्वासासरशीं या साऱ्या वाऱ्याचें हृदयांत सांठवण करून ठेवूं का? देवा, किती अनुदार तूं! मला मरणाची सुद्धां शिक्षा देत नाहींस ना? पण ही पहा, अशी मी इच्छेच्या एकाग्रतेनें प्राण सोडणार. [ स्तब्ध उभी राहते; कमलाकर घाईनें येतो. ]

कमलाकर : ( स्वगत ) अंतःकरणांत पेट घेऊन आंतल्या आंत भडकणाऱ्या सूडाच्या निश्वासांनीं या वातावरणाला अजून आग कशी लागत नाहीं? द्वेषानें भरलेल्या या दृष्टिपातानें ही भूमि फाटून अगदीं दुभंग कां होत नाहीं? आणि आकाश तुटून खालीं कां कोसळत नाहीं? माझ्या पराभवाची सारखी परमावधि होत आहे. त्या दिवशीं रात्रीं चुकून तें द्रुमनचें पत्र त्या रामोशाच्या हातीं पडलें आणि त्याच्या हातून विद्याधराला मिळून सारा घोंटाळा झाला! विद्याधराला ती जागा दिली आणि तिथें तो दरवडेखोर तें पत्र बदलण्यासाठीं येऊन असा प्रकार झाला असावा! जयंत दोषमुक्त झाला, मनोरमा मेली. आतां लीलेचा आणि जयंताचा पुनर्विवाह होणार आणि तो आजन्म सुख भोगणार! विद्याधर हाच सुशीलेचा पति ठरला! सारे सुखी होणार! पण हें सारें मला कसें सहन होणार! ज्याच्या डोळ्यांना चंद्रिकेचा प्रकाश पाहवत नाहीं, टवटवीत फुलें पाहवत नाहींत, ज्याला कोणाच्याही सुखाची कल्पना सहन होत नाहीं, त्यानें स्वतःच्या भयाण निराशेवर उभारलेलें, आपल्या लहानपणापासूनच्या वैऱ्याचें सुख कसें पहावें? मी तेथून इतक्या वेगानें

धांवत आलों – पण मार्गावर तरंगणाऱ्या अणुरेणूहो, माझ्या हृदयांतल्या श्वासाशीं तुमची मिळणी झाल्यामुळें तुम्ही साक्ष आहां कीं, मी केवळ प्राणाच्या भयानें पळालों नाहीं, तर अजून जयंताचा सूड घेण्यासाठीं पळालों आहें. हा सूड घेतला नाहीं तर मेल्यावरही माझा प्राण जाणार नाहीं. भूतयोनि अजून उत्पन्न झाली नसली तर यापुढें माझ्या जीवशक्तीच्या चिकाटीमुळें तरी खास होईल. ( पाहून ) काय ? लीला ? ही इथें एकटी कशी ? करूं हिला अशीच ठार ? म्हणजे झालें जयंताच्या सुखाचें मातेरें ! मग मी फांशीं गेलों तरी वेहेत्तर ! बस्स, हाच बेत ठरला ! घरांतलीं माणसें अजून आपल्या आनंदांत मग्न आहेत तोंच हें फूल चिरडून टाकावें ! (प्रकट) लीले, लीलावती !

**लीला :** कोण ? कमलाकर ? गेलाना हो जयंतांचा आत्मा आपल्याला सोडून ?

**कमलाकर :** ( स्वगत ) अस्सें ! जयंत मेला अशी हिची कल्पना आहे काय ? ठीक ! पण हा काय चमत्कार ? ही अजून मरत कशी नाहीं ? नुसत्या माझ्या विषारी श्वासानें फुलें कोमेजून जातील, ज्वालामय दृष्टीनें तारका जळून त्यांचा काळोखाचा कोळसा होईल, ही कल्पना खोटी ठरूं पहाते !

**लीला :** कमलाकर, कां हो बोलत नाहीं ? आतां कशाला कचरतां ? वाटेल ती कठोर बातमी ऐकायला मी आतां तयार आहें ! बोला, झाला ना त्यांचा शेवट ? नका सांगूं, तुमच्या तोंडावर ती वार्ता स्पष्ट लिहिलेली दिसते.

**कमलाकर :** लीलाताई, काय सांगूं ? अखेर जयंत आपल्याला सोडून गेलेच.

**लीला :** त्यांत विशेष काय आहे ? कमलाकर, माझा सुद्धां निश्चय ठरलेला आहे ! ज्या जगांत जयंतांचा वास नाहीं त्यांत राहून मला काय करावयाचें आहे ? मी पण माझ्या आयुष्याचा शेवट करणार !

**कमलाकर :** अहाहा ! लीले, धन्य आहे तुझ्या प्रेमाची ! खऱ्या प्रणयिनी-प्रमाणें बोललीस तूं ! असे तीव्र प्रेमाचे उद्गार या भरतभूमींत पूर्वी एकदां मात्र ऐकूं येत होते. प्रियजनांच्या मृत्यूनंतर मागें रहातें तें कशाचें प्रेमळ हृदय ?

**लीला :** होय ना ? मला सुद्धां असेंच वाटतें. आत्महत्येचा माझा विचार तुम्हांला आवडला ना ?

**कमलाकर :** नुसता आवडला ? माझ्या विचाराशीं पुरेपूर जमला !

**लीला :** म्हणजे तुम्हीही आत्महत्या करणार कीं काय ?

**कमलाकर :** यांत काय शंका ? एवढ्यासाठीं तर सर्वांच्या आधीं धांवत आलों. मोहांत गुरफटलेली आप्तमंडळी आपल्याला अडथळा करील, आणि मग

जयंतासारखा मित्र गेल्यावर या शून्य जगांत आपल्याला रहावें लागणार, म्हणून तर मी सर्वांची नजर चुकवून इकडे आलों.

लीला : अहाहा ! कमलाकर, धन्य आहे तुमची !

कमलाकर : यांत धन्य कशाची ? जयंतासाठीं कोण मरणार नाहीं ? हें पहा, मी तेवढ्यासाठीं जालीम विष सुद्धां आणून ठेविलें आहे. हें इतकें जालीम आहे कीं, एकदां पोटांत गेलें म्हणजे कोणताही उतारा त्यावर चालत नाहीं.

लीला : तर मग कमलाकर, तुमच्या पायां पडतें. तें विष – त्यांची भेट घडविणारें तें अमृत – मला द्या.

कमलाकर : काय तुम्हाला हें विष देऊं ? आणि मी ?

लीला : तुम्ही पुरुष आहां, तुम्हांला पुन्हां मिळवितां येईल. द्या हो, घालाच एवढी भिक्षा.

कमलाकर : तुमची विनवणी ऐकून यमाला सुद्धां दया येईल, मग मी तर काय मनुष्यच आहें ! घ्या हें. मी दुसरें मिळवीन.

लीला : ( विष हातीं घेऊन ) नेईल ना हें मला जयंतांच्या पायांजवळ ? अहाहा, धन्य धन्य मी ! [ विष घेते. ]

कमलाकर : ( स्वगत ) अहाहा ! झालें माझें कर्तव्य. आतां सुटलों तरी चालेल किंवा सांपडलों तरी चालेल. ( प्रकट ) सगळें घेतलेंस ?

लीला : हो; आतां होईल ना माझें काम ?

कमलाकर : निखालस ! अविचारी लीले, ऐक ! जयंत जिवंत आहे, त्याच्यावरचा आरोप दूर झाला, अर्ध्या घटकेंत तो येथें येईल. तिकडे मनोरमा मेली. तुमच्या दोघांच्या पुनर्विवाहाला आतां कोणतीच आडकाठी नव्हती. पण तशी ईश्वराची – नाहीं, तशी माझी इच्छा नव्हती ! म्हणून तुमच्या प्रेमामृतांत मीं हें प्रत्यक्ष विष कालविलें आहे. बोल, लीले, बोल. पण आतां तूं कशाची बोलतेस ? तुझे डोळे या विषाच्या प्रभावानें तारवटत चालले आहेत. लीले, अशा भयाण सौंदर्याकडे पहाण्याची मला संवय आहे ! लीले, सूड—हा सारा बाळपणापासून तुंबलेला माझा सूड आहे !

लीला : पण आतां तरी घेतलास ना पुरता सूड ? मग उगीच कां उभा आहेस माझ्यापुढें आपलें तोंड घेऊन ?

कमलाकर : तुझ्या सौंदर्याचें मरण पहावयाला ! क्षणोक्षणीं तुझें सौंदर्य भयंकर निराशेंत सारखें विरत चाललें आहे. शुक्लाष्टमीची रम्य चंद्रिका रात्रींच्या ऐन भरांत चंद्राच्या मृत्यूमुळें काळ्याकुट्ट काळोखांत विरघळून जात असते,

त्याप्रमाणें तुझ्या आत्म्याची चंद्रिका—शरीरावर पसरलेली ही जिवंत शोभा आत्म्याचा लय होतांना हां हां म्हणतां मृत्यूच्या काळोखांत-प्रेताच्या भयाणपणांत विरून जाईल! आणि मग या हातानें, नीट ऐक—द्रुमनच्या काळवंडलेल्या रक्तानें रंगलेल्या हातानें, मनोरमेच्या संसाराची होळी करतांना तिच्या शिव्याशापांच्या आगीनें करपून कोळसा झालेल्या या हातानें, द्रुमनच्या पोराच्या मुक्या किंकाळ्यांच्या प्रतिध्वनीनें दुमदुमलेल्या या हातानें, तुझ्या या जिवंत प्रेताला असें धरून तुझ्या ओंठावर उरलेल्या विषाचा—त्या अधरविषाचा आस्वाद घेईन, आणि मग येथून, या जगांतूनही बाहेर जाईन! लीले, द्रुमन अशीच आत्महत्या करून मेली आणि तिच्या प्रेताकडे पाहतांना मला अशीच मेलेल्या चुंबनाची इच्छा झाली होती; पण त्या वेळीं तिचे ओंठ सांकळलेल्या रक्तानें काळे पडले होते आणि माझे ओंठ आशेच्या जिवंतपणानें स्फुरत होते. पण आज तुझे ओंठ जसे विषानें काळे पडत आहेत तसे माझे ओंठहि क्रूरपणाच्या काळिम्यानें रंगले आहेत. त्यांची विषारी चुंबनाची आशा आज पूर्ण करीन. लवकरच जयंत येथें येईल आणि तुझ्या ओंठाजवळ आपल्या ओंठांनीं मेलेल्या प्रेमाचीं मुकीं गाणीं गाईल; त्या वेळीं त्याच्यासाठीं तुझ्या ओंठावरच्या विषांत माझ्या सुडाची भर घालून ठेवून नंतर तो नेत्रोत्सव पाहतां पाहतां मोठ्या आनंदानें मी आपले डोळे मिटीन!

**लीला :** कमलाकर, आतां उगाच कशाला बोलतां? माझ्या मनावर या बोलण्याचा परिणाम होण्याची वेळ निघून गेली आहे! इहलोकच्या सुखाची मी मुळींच पर्वा करीत नाहीं! हें सुख किती झालें तरी चंचल; आज जरी मिळालें असतें तरी उद्यां खास नाहींसें झालें असतें! माझी दृष्टि, माझी आशा आतां स्वर्गांतल्या सुखाकडे लागली आहे! आज ना उद्यां जयंत तिथेंच येतील आणि मग आम्ही जगन्नाथाच्या कृपादृष्टीच्या अक्षय्य किरणांत अनन्त सुखाचा उपभोग घेऊं! तिथें तर तुमचें विष बाधणार नाहीं ना?

**कमलाकर :** लीले, कालनिद्रेंतलें हें तुला स्वप्न पडायला लागलें आहे! अहाहा! हा पहा जयंत पण आलाच! (हातांत फुलांची माळ घेऊन जयंत येतो.) त्याला तरी माझा सूड चांगलाच मानवेल! लीले, बाळपणीं तुम्ही दोघें ज्या दृष्टीनें माझ्याकडे पहात होतां त्या दृष्टीनें मी आज तुमच्याकडे पहाणार आहें.

**जयंत :** आनंदी आनंद गडे! इकडे तिकडे चहूंकडे!!

**लीला :** अहाहा! आनंदी आनंद गडे! इकडे तिकडे चहूंकडे!!

**कमलाकर :** खरोखर, आनंदी आनंद गडे! इकडे तिकडे चहूंकडे!!

जयंत : लीले, आपल्या **बालकवींच्या 'आनंदी आनंदाचें'** खरें रहस्य मला आज कळत आहे! मी आज ब्रह्मानंदांत आहे! लीले, जें सुख कायमचें नाहींसें झालें म्हणून वाटत होतें त्याचा खराखुरा आरंभ मात्र झाला आहे! लीले, माझ्यावरचा नसता अपराध दूर झाला! सुशीलाताईचें भाग्य पुन्हां उदयाला आलें! विद्याधर हेच गुणाकर! त्यांचा अन्त मुळीं झालाच नव्हता आणखी, लीले, आपल्या पुनर्विवाहाला बाबासाहेब सहानुभूति देत आहेत!

कमलाकर : पुनर्विवाह आतां पुनर्जन्मीं!

जयंत : कोण कमलाकर? जा; इथून लौकर बाहेर निघून जा. सरकारचे शिपाई तुला धरण्यासाठीं तपासांत आहेत! पण मी ब्रह्मानंदांत बुडालों आहें आणि माझ्या उत्कट आनंदाच्या वेळीं दुसऱ्याला दुःख व्हावें ही कल्पना सुद्धां मला सहन होत नाहीं! जा. पळ, कमलाकर आपले प्राण वांचीव! माझ्या आनंदाचा उत्कट प्रकाश, लीलेची लावण्यचंद्रिका आणि तुझ्या कृष्णकर्माचा दाट काळोख हीं सारीं एकाच जागीं, एकाच वेळीं शोभत नाहींत! लीले, या कमलाकराचे अपराध तुला माहीत नाहींत; पण ते कळण्यापूर्वीच तूं त्याला क्षमा कर! हा पहा सुंदर फुलांचा झेला! याच्याच वासानें मी वेडा झालों आहें! हा मी तुला अर्पण करणार आहें. याच्या वासानें – पुन्हां फुललेल्या प्रेमाच्या या वासानें तूं गुंग होशील, माझ्यासारखी वेडी होशील! पण लीले, तूं बोलत कां नाहींस?

कमलाकर : ती काय बोलणार! जयंता, असा बेफाम होऊं नकोस! माझ्यासारखा जिवलग मित्र जिवंत असतांना तो तुला आनंदाचें वेड कसें लागूं देईल? दुःखाचा तुला चांगलाच अनुभव आहे आणि तोच मीं यापुढें तुझ्या कपाळीं कायमचा लिहून ठेविला आहे.

जयंत : अरेरे! मला तुझी दया येते! पण बोल, कमलाकर, तुला वाटेल तें बोल. मी जसा प्रेमाच्या ब्रह्मानंदांत वेडा झालों आहें तसें तुला तरी निराशेच्या तीव्रतेनें वेड लागल्यावांचून कसें राहील? तुझ्या बोलण्याचें मला कांहींच वाटत नाहीं.

कमलाकर : अरेरे! जयंत, माझें योगसाधन अजून पूर्ण झालें नाहीं त्याला माझा नाइलाज आहे! माझ्या कृतीची शक्ति अजून माझ्या वाणींत, माझ्या दृष्टींत भिनली नाहीं! अजून माझ्या नुसत्या रागानें तुझें हृदय फाटून जात नाहीं! दृष्टीनें तुझ्या हातांतलीं फुलें कोमेजून जात नाहींत; पण कृतीनें मात्र तुझ्या हृदयांतलें नाजूक फूल – तुझी – लीला – अगदीं करपून, पार जाळून

टाकिली आहे ! तुझ्या मरणाची बातमी कानीं पडूं नये म्हणून घाईनें लीला इकडे निघून आली, नंतर मी इथें आलों; लीलेच्या गैरसमजाचा फायदा घेऊन मीं तिला हें विष घातलें आहे; या विषावर कसलाहि उतारा चालत नाहीं ! ऐकलेंस हें ? आतां सोड आपल्या आनंदाचें वेड !

**जयंत :** लीले, काय ऐकतों हें मी ?

**लीला :** अगदीं सत्य; विषापेक्षांही कडू सत्य !

**जयंत :** हाय ! लीले ! काय केलेंस हें ? कमलाकर, तुझ्या राक्षसी वृत्तीचा अपमान केला त्याची क्षमा कर ! तुझ्या वाणीनें खरोखरीच माझें हृदय फाटून गेलें आहे. तुझ्या दृष्टीनें हीं फुलें खरोखर एका क्षणांत करपून गेलीं आहेत. त्यांच्यांत आतां फूलपण राहिलें आहे कुठें ? लीले, लीले, लाडके लीले, काय केलेंस हें ? [ तिच्या गळ्याला मिठी मारतो. ]

**कमलाकर :** बस्स ! झालें माझें काम ! आतां माझा पराक्रम सुशीलेला – त्या दुसऱ्या मानी पोरीला – कळवितों ! आणि मग – मग काय होईल तें होवो.

[ जातो. वसंत घाईनें प्रवेश करतो. ]

**जयंत :** वसंता, घात ! सर्वस्वीं घात झाला रे ! धांव, आधीं बाबासाहेबांना घेऊन ये ! लीलेनें हें भयंकर विष घेतलें आहे !

**वसंत :** ( पुडीचा कागद पाहून ) आणि तेंही हें विष !

**जयंत :** जा तूं आधीं ! बाबासाहेबांना घेऊन ये ! धांव. [ वसंत जातो. ]

**लीला :** जयंत, काय हें ? यांत रडण्याचें काय बरें कारण आहे ! इहलोकच्या कृत्रिम ताटातुटीनें हृदयाचा प्रेममय ऋणानुबंध कायमचा का तुटणार आहे ? दोन दिवस धीर धरा ! क्षणिक सुख गेलें म्हणून काय झालें ? ही पहा विषाच्या जोरानें आंतल्या आंत माझी दृष्टि ओढत चालली आहे, दृश्यसृष्टि आकुंचित दिसून अदृश्य सृष्टीचें वैभव दिसावयाला लागलें आहे ! उठा, अनंत सुख, अनंत प्रेम, अनंत ऐक्य, मिळवायची आशा धरा.

**जयंत :** प्रणयसृष्टि, माझी प्रणयसृष्टि जळून खाक झाली ! लीले, भेट, मला कडकडून भेट; इतकी कडकडून भेट, कीं देहाच्या स्पर्शाबरोबर त्यांतल्या विषाच्या लहरी माझ्याही देहांत भिनूं लागतील ! लीले, माझें सारें शरीर जड झालें आहे. शरीरांतले अणुरेणु जागच्याजागीं खिळून एकाची वृत्ति दुसऱ्याला कळत नाहीं. परमेश्वरा, राक्षसी प्ररमेश्वरा, सुखदुःखाचा काय खेळ मांडला आहेस हा ! चल, लीले, चल, मी पण तुझ्याबरोबर येतों ! या पापी जगाचा संग सोडून आपण केवळ प्रेमाचे देह धारण करून एखाद्या कळीच्या हृदयांत

लपून बसूं; प्रेममय काव्यबंधानें तिचें तोंड कायमचें बंद करून टाकूं; आणि अनंत काळपर्यंत त्या कलिकेच्या गर्भातल्या परागरेणूंच्या सृष्टींत, या रेणूवरून त्या रेणूवर सारखा प्रेमाचा लपंडाव खेळत बसूं! लीले, त्या कलिकेच्या सुगंधी ब्रह्मांडांत घटकेंत एका रेणूच्या आडपडद्यानें सुखमय विरहाचें सुख भोगूं. त्या स्थितींत या बाहेरच्या जगांत खेळणारा वारा सुद्धां आंत येतांना कलिकेच्या कोमलपणांतून गाळून शुद्ध करून घेतां येईल!

लीला : पण या ब्रह्मांडाच्या कळींतच हें सुख मिळत नाहीं असें थोडेंच आहे! प्रेममय परमेश्वर —

जयंत : नाहीं, लीले, परमेश्वर प्रेममय नाहीं! नको, त्याच्या सृष्टींतली कलिका नको, त्याचा स्वर्गलोकही नको! लीले, मघाशीं फांसावर चढतांना मी मरणाला भीत होतों; पण आतां मला प्रेमाचें विलक्षण धैर्य चढलें आहे. मी पण विष घेतों आणि दोघें बरोबरच मरून प्रणयाची निराळी सृष्टि निर्माण करूं. ही भूमि नको, तें आकाश नको. तारांचा रस पिळून त्यानें मेघ-मंडळांतल्या गारांचा वाडा बांधू आणि चिरकाल त्यांतच राहूं; पण या परमेश्वराचें आतां नांव सुद्धां नको! पूर्वसंचितामुळें तुझ्यासारख्या नाजुक फुलाला सुद्धां जो कोमेजून टाकतो, तिचे अपराध – मग ते किती का असेनात, ज्याला माफ करतां येत नाहींत, तो परमेश्वर निर्विकार आहे असें कोणीं म्हणावें? लीले, मनुष्याला एखादें फूल निर्माण करितां आलें तर तो त्याला नुसतें हातावर झेलील आणि आजन्म त्याचे पोवाडे गात बसेल! पण परमेश्वर दररोज हजारों फुलें फुलवितो आणि दुसरे दिवशीं निर्दयपणानें तीं सारीं चिरडून टाकितो. एखाद्या कवीनें तुझ्यासारखी नायिका निर्माण करून तिचा असा निर्दय शेवट करण्याचें मनांत आणलें असतें तर तें भयंकर शब्दचित्र रेखाटतांना त्याची लेखणी बंद पडली असती आणि त्याच्याच अश्रूंच्या ओघांत तीं कठोर अक्षरें पार वाहून गेलीं असतीं. पण अमानुष परमेश्वर हे सारे खेळ सहज करीत असतो! लीले, हा ईश्वरी कोप मी कसा सहन करूं?

लीला : नका, जयंत, परमेश्वराला दोष देऊं नका! परमेश्वराची कृति सुद्धां अजून बाल्यावस्थेंत आहे! ही ब्रह्मांडाची कळी अजून उमलायची आहे! ब्रह्मांडाचें फूल कायमचें फुलविण्यासाठीं परमेश्वर दररोज हजारों फुलें निर्माण करण्याचा अभ्यास करीत आहे! बालपरमेश्वर आकाशाच्या पाठीवर विजेच्या वेड्यावांकड्या रेघोट्याच ओढीत आहे; त्याचा हा सृष्टीचा अभ्यास

पुरा झाला, अक्षयतारुण्य प्राणिमात्राला देतां आलें, सूयप्रकाशांत चंद्रिकेची शीतलता आणितां आली, फुलें कायमचीं फुलवितां आलीं, म्हणजे प्रेममय परमात्मा या ब्रह्मांडकलिकेचा अक्षय्य विकास करील आणि आज या गोलकलिकेंत अटकलेल्या तारका—मृतांच्या आत्म्यांचे हे परागरेणु, विश्वाचें पुष्प उमलतांच अमर्याद अनंतांत चहूंकडे उधळूं लागतील! तोंपर्यंत खऱ्या सुखासाठीं आपण धीर धरिला पाहिजे!

जयंत : लीले, या आशीर्वादानें मला धीर कसा येईल? लीले, लीले, मला आज्ञा दे, मी पण आत्महत्या करून तुझ्या पाठोपाठ येतों; या लीलाशून्य जगांत मी कसा राहूं?

लीला : मरणकाळच्या शब्दांइतकें सत्य दुसऱ्या कशांतही नसतें. जयंत, तुम्हाला माझी शपथ आहे, तुम्ही आत्महत्या करूं नका! तुमचें कार्य अजून झालें नाहीं! माझी करुणकथा सर्व जगाला सांगा. माझ्यासारख्या हजारों बालविधवा हृदयांत मेलेल्या आशेच्या समाधीवर अश्रूंचीं फुलें वाहत असतील त्यांचा उद्धार करा. कठोर समाजाचें पाषाणहृदय भेदून त्यांतून शुद्ध प्रेमाचे पाट वहावयाला मार्ग मोकळा करून द्या आणि मग कालावधीनें परमेश्वराजवळ या, म्हणजे आपण अक्षय्य सुख भोगीत बसूं!

जयंत : लीले, या जडवृत्ति, निर्जीव प्रेताच्या हातून हें काम कसें होणार? कोणत्या संजीवनीच्या सामर्थ्यानें मला हालचाल करण्याची शक्ति मिळेल?

लीला : असे निराश होऊं नका! माझी इच्छा, माझी आज्ञा, मूर्तिमंत प्रेमाचे उद्गार समजून तरी माझ्या शब्दांना मान द्या!

जयंत : ठीक आहे, तुझी आज्ञा मला शिरसावंद्य आहे! पण तूं मात्र मला असा अनाथासारखा भूलोकावर टाकून स्वर्गांत जाऊं नकोस! तेजोमय तारका होऊन आकाशांत सारखी चमकत रहा म्हणजे मला नेहमीं धीर मिळत जाईल! लीले, लीले, मनांत होतें काय, आणि हें झालें काय?

[ सुशीला, गोकुळ, विद्याधर वगैरे मंडळी येतात. ]

गोकुळ : लीलाताई, काय हो केलें हें? आतां या तुमच्या गोकुळाला वेळोवेळीं संभाळून कोण हो घेईल? भाऊबिजेच्या दिवशीं या दरिद्री भावाची आसवांची ओंवाळणी आनंदानें घ्यावयाला माझी कोणती लीलाताई पुढें येईल?

सुशीला : लीलाताई, काय ही तुझी दशा! पहा ग या तुझ्या सुशीलेकडे, तुझ्या त्या तेजस्वी डोळ्यांनीं एकदां तरी पहा! लहानपणीं तुझ्या गजऱ्यांतलीं

फुलें एखादे वेळीं कोमेजून जात आणि तूं रडूं लागलीस म्हणजे मी माझ्या गजऱ्यांतलीं फुलें तुला देत होतें; पण आज तुझ्या डोळ्यांचीं हीं फुलें कोमेजून जाताहेत तेथें कोणतीं फुलें बसवूं ? या माझ्या डोळ्यांचीं कीं माझ्या जिवाचीं ?

[ लीला जयंत व सुशीला यांच्या अंगावर पडते. ]

लीला : [ हंसत ] गोकुळ, सुशीलाताई, काय हा मोह ! ताई, तूं मला नेहमी धीर देत होतीस आणि आज हें काय मांडिलें आहेस ? आज ना उद्यां आपल्या भेटी होणार खास ! विद्याधर, तुम्ही तरी साऱ्यांना धीर द्या ! हो, पण तुम्ही तर माझ्या ताईचे गुणाकर ! गुणाकर, ताईला, जयंतांना, गोकुळला नीट संभाळा.

सुशीला : लीले, लीले, तूं नाजुक कळी, तुझ्या अंगीं हें धैर्य कुठून ग आलें ? नको, अशी हंसूं नकोस; माझ्या हृदयाचें कसें पाणी पाणी होतें आहे ! तुला होतें आहे तरी काय ? ही कठोरता कोठून आणलीस ? या तुझ्या स्थितीला म्हणूं तरी काय ?

लीला : काय म्हणूं ? केशवसुतांचें तें गाणें आठवतें ना तुला ? अहाहा !

हर्षखेद ते मावळले ! हास्य निमालें, अश्रु पळाले ।
कंटकशल्यें बोथटलीं । मखमालीची लव वठली ।
कांहीं न दिसे दृष्टीला । प्रकाश गेला, तिमिर हरपला ।
काय म्हणावें या स्थितिला । झपूर्झा गडे झपूर्झा ॥

ताई, हाच बरें झपूर्झा ! ताई, येते मी आतां ! जयंत, माझी विनंति लक्षांत ठेवा ! अहाहा ! झपूर्झा, गडे झपूर्झा ! [ निश्चेष्ट मरते. ]

जयंत : गेली, गेली, शापभ्रष्ट देवी, माझ्या हृदयाची देवी, या जगांतून निघून गेली ! लीला, हाय हाय, लीला ! लीलालास्य हृदया ! आतां तुझ्या उघड्या बंद ठेव ! लीला अखेर काय बरें म्हणाली ? झपूर्झा गडे झपूर्झा ! हेंच खरें ! हीच स्थिति आतां मलाही स्वीकारली पाहिजे. तुटला—जगाचा आणि जयंताचा पार संबंध तुटला ! लीले, आतां फक्त एक तुझी आज्ञा हीच माझ्या हृदयाची गीता ! दुसरें कांहीं नको ! या जगांतलें आपलें जीवन संपलें; आपला अवतार संपला ! [ उठून उभा राहतो. ]

जल् गइ है दिलसे ये जहां, अब् क्या रहा है यहां ।
ऐ कलिया दिले चमनकी, अब् फूल फिरसे और कहां ।
न फ़िक्र है बागे जहांकी, न उसके कुल्मुखत्यारकी ।

हैं तुटगईं कडियां कडियां, अब् जंजिरे प्यारकी ॥

[ फुलांची माळ तोडून फुलें लीलेच्या प्रेतावर पसरितो. पडदा पडतो. ]

## प्रवेश तिसरा

[ बाबासाहेब प्रवेश करितात. ]

**बाबासाहेब :** अरेरे, कोण भयंकर स्थिति ही ! साऱ्या आनंदाचा कळस झाला ! लीले, काय केलेंस हें ! असे किती तरी प्रेममय जीव समाजाच्या राक्षसी पावलांखालीं चिरडून जात असतील याची आम्हांला कल्पना तरी आहे काय ? अरेरे ! बदललेल्या परिस्थितीमुळें तरुणांच्या मनाची स्थिति काय होत चालली आहे हें लक्षांत घ्यावयाचें नाहीं; हजारों वर्षांच्या वहिवाटी-प्रमाणें लग्न करतांना वधूवरांचीं हृदयें कशीं आहेत हें पहायचें नाहीं; आजन्म सुख ज्यावर अवलंबून रहावयाचें तो एकदां बिनसला कीं कायमचा – असा लग्नविधि निव्वळ आंधळेपणानें घडवून आणावयाचा; एकदां लग्नाची घडी मोडल्यावर ती कोणत्याही मार्गानें पुन्हां नीट बसवावयाची नाहीं; अनाथ विधवांच्या अश्रुजलांत त्यांच्या हृदयाचें प्रतिबिंब दिसूं लागलें की जुनाट श्रुति-स्मृतींचीं फाटकीं पानें डोळ्यांपुढें धरावयाचीं ! हरहर ! राक्षसी समाजा ! किती दिवस तूं असे भयानक खेळ करणार ? जुनेपणाच्या नसत्या अभिमानांत किती दिवस डोळे झांकून पडणार ? राक्षसी पण निर्जीव रूढीला आणखी किती कोमल आणि जिवंत हृदयांचे बळी देणार ? लीले, काय भयंकर जागृति करून गेलीस ही ! [ गोकुळ येतो. ]

**गोकुळ :** बाबासाहेब, चला लौकर ! तिकडे मंडळी वाट पहात आहेत.

**बाबासाहेब :** चल; संकटाला तोंड हें दिलेंच पाहिजे. [ जातात. ]

[ भूतमहाल. कमलाकर प्रवेश करतो. ]

कमलाकर : त्या दरोडेखोराला इतक्या तांतडीनें यायला सांगितलें तरी अजून कां बरें आला नाहीं ? त्या रामोशाच्या तोंडांत एकदां चांदीसोन्याचा बोळा कोंबून त्याला कायमचा मुका केला म्हणजे माझ्याविरुद्ध प्रत्यक्ष पुराव्यानिशीं ओरडायला दुसरें कोणतें तोंड उरणार ? एवढा साक्षीदार नाहींसा केला म्हणजे माझ्यावर कायद्याची कुरघोडी करण्याची कोणाची छाती होणार आहे हेंच मला पहावयाचें आहे ! अजून माझ्या कर्तबगारीनें मी या बावळ्या जगाला या हातावर खेळवीन ! या दुनियेच्या बाजारांत अशी एकही चीज नाहीं कीं, जिचें मोल ठरलें नाहीं — कीं जी पैशानें विकत घेतां येत नाहीं ! माझा सारा विश्वास माझ्या कसलेल्या कर्तबगारीवर आहे ! माझी कर्तबगारी, माझी एवढी कर्तबगारी — पण कमलाकर, तुझी कर्तबगारी तरी काय किमतीची ठरली ? तुझ्या मनाची आशा, तुझ्या कर्तव्याचें कर्तव्य, लीलाजयंतांवर दुःखाचा वर्षाव करून त्यांचीं मनें मारून टाकायचा तुझा हेतु खरोखरीच साधला आहे का ? नाहीं, नाहीं, माझ्या मनाच्या तळांतून या प्रश्नाचें 'नाहीं, नाहीं,' हेंच उत्तर निघत आहे. लीलाजयंतांवर मीं संकटें आणिलीं खरीं; पण त्यांना दुःख मात्र मनासारखें मुळींच झालें नाहीं ! त्यांचें दुःख सुद्धां सुखाचें, लीलेचें मरण शांतवृत्तीच्या सुखाचें, आणि जयंताचा उद्वेग सुद्धां सुखमय प्रेमकल्पनांत गुरफटलेला ! ही पहा मीं कोंडून ठेविली असतां आत्महत्या करून सुटून गेलेली दुमन, माझ्या हाताला झटका देऊन गाडींतून उडी टाकतांना तिरस्कारानें माझ्याकडे पाहणारी मनोरमा, ही चढत्या विषाच्या अमलांत सुद्धां मला तुच्छ समजणारी लीला, तिघी विजयी मुद्रेनें माझ्याकडे पाहून हंसून माझा उपहास करीत आहेत ! मग मीं त्यांना खरेंखुरें दुःखी तें काय केलें ? छेः छेः ! ही नुसती माझ्या कर्तबगारीची थट्टा झाली ! उलट त्यामुळें माझ्या मनाला आग लागून राहिली आहे ! नाहीं; झालें एवढ्यानें माझें समाधान व्हावयाचें नाहीं. अजून जयंत जिवंत आहे, सुशील आहे, माझा दोन वेळां घात करणारा तो विद्याधर आहे, या सर्वांना अजून माझ्या सूडाची जाणीव करून देईन, तेव्हांच मरायला तयार होईन. तोंपर्यंत, यम खरोखरीच असला, आणि प्रत्यक्ष त्यानें जरी 'कमलाकर, कमलाकर' म्हणून सारख्या

हांका मारल्या— [ पड्यांत ' कमलाकर, अहो कमलाकर—' ]

**कमलाकर :** ( दचकून; नंतर हंसून ) कमलाकर, काय हें ? यमाच्या प्रत्यक्ष कृतीची हंसून थट्टा करणारा तूं, आतां नुसत्या त्याच्या कल्पनेनें दचकलास ! हा तो दरोडेखोर ! मनुष्यरूपानें वावरणाऱ्या या यमदूताची भीति मला काय म्हणून वाटावी ? ( दरोडेखोर येतो. ) ये, जरा उशीरसा केलास ?

**दरोडेखोर :** अरेच्चा, ही काय चुकामूक आहे ? कमलाकर कोण ? तुम्ही का मी त्या दिवशीं ज्यांना कागद दिला ते ? आणि मला बोलाविलें कुणीं ?

**कमलाकर :** तुला बोलाविलें मींच. कमलाकर मींच. पण तूं ज्याला पत्र दिलेंस तो मात्र निराळा ! अणि त्या तुझ्या चुकीमुळेंच मोटा घोंटाळा झाला आहे !

**दरोडेखोर :** तो कसा काय ?

**कमलाकर :** ती भानगड सांगायला फार वेळ लागेल, आणि मी तर अगदीं डोळ्यांच्या पापण्यांची उघडझांप मोजावयाच्या बेतास आलों आहें. त्या दिवशीं त्या पेटीची जी भानगड केली ती आतां जिवावर येऊन बेतली आहे. तिच्यामुळें मी सांपडणार आहें एका खटल्यांत. तुलाही त्यांत बराच शेक लागणार आहे. माझा साथीदार म्हणून माझ्याविरुद्ध खरा साक्षीदार तूं एकटाच आहेस, तुझ्या साक्षीमुळें तूं आणखी मी दोघेही गोत्यांत येणार आहोंत; म्हणून त्या भानगडीची मिटवामिटव करण्यासाठीं मीं तुला बोलाविलें आहे.

**दरोडेखोर :** कशी काय मिटवामिटव करणार सांगा पाहूं ?

**कमलाकर :** त्यांत कांहीं विशेष नाहीं. हे पांचशें रुपये तूं घे आणि आणि कोठें तरी दूर देशीं निघून जा. तूं निघून गेल्यावर मला शहाजोग पकडण्याची कोणाची छाती नाहीं. आणि यामुळें तुझ्या मागचा जंजाळ चुकेल. समज, या साक्षीसाठीं तूं सरकारी लोकांच्या एकदां नजरेस आलास म्हणजे तुझ्या धंद्याच्या बाबतींत तुला पहिल्यासारखा मोकळेपणा मिळेल का ? अरे वेड्या, कदाचित् या बाबतींत तूं सुद्धां खोड्यांत पडशील ! त्यापेक्षां आपलें ठाणेंच इथून हलविलेंस तर आपण दोघेही सुखी होणार नाहीं का ? पहा ! फार विचार करीत बसण्याची ही वेळ नाहीं. हे पांचशें रुपये; आणखी लागले तर मागून घे आणि इथून आपला पाय काढ ! काय पसंत आहे का हा विचार ?

**दरोडेखोर :** पसंत आहे. द्या ते रुपये. ( रुपये घेतो. ) ठरला माझा विचार कायम ! आतां तुम्हांला युक्ति सांगतों. जरा जवळ या; कान करा इकडे !

[ कमलाकर जवळ येतो. दरोडेखोर त्याच्या मानेवर हात देतो. ]

कमळाकर : अरे, हें काय ? माझ्यावर कां—

दरोडेखोर : गप्प, रावसाहेब, अगदीं गप्प. आरडाओरड करून कांहीं उपयोग नाहीं. नीट मुकाट्यानें उभे रहा. माझ्या कामांत कोणीं अडथळा आणलेला मला खपायचा नाहीं.

कमलाकर : म्हणजे तूं माझा जीव घेणार कीं काय ?

दरोडेखोर : अगदीं सहज ! तुमच्यासारखा उगीच विचार करीत बसणारा हा गडी नव्हे !

कमलाकर : अरे पण, असा संथपणानें माझा प्राण घ्यायला तयार झालास त्याला कारण तरी काय ?

दरोडेखोर : हें बघा रावसाहेब, तुम्हां पांढरपेशा लोकांशीं भागीदारीनें एकदां धंदा केला कीं त्यांत हीं कुलंगडीं निघायचीं ! समजा, आज एक मी पळून गेलों; पण पुढें तुम्हांला पकडलें; आणि तुम्हीं माझें नांव घेतलें म्हणजे पुन्हां येरे माझ्या मागल्या ! आणि अशी भागूबाई वाटेल त्याचें नांव घ्यावयाची ! तेव्हां ही तुमची शिकलेली अकल आम्हांला नको ! सरकार तरी तुम्हांला पकडून शिक्षाच करणार ना ? मग मींच तें काम केलं तर काय वाईट ! मग तर झालों ना मी मोकळा ?

कमलाकर : काय राक्षस आहेस रे ! तुला कांहीं अंतःकरण – विचार—

दरोडेखोर : रावसाहेब, बस्स करा हें चऱ्हाट ! दयामाया तुम्हांला दाखवायची ? अहो, घरच्या बायकांना तुम्ही बाहेर विकणारे ! आणि मला हें विचारतां ? रावसाहेब, देवाला पण डोळे असतात ! देव नेहमीं कांट्यानें कांटा काढतो ! अहो, पापच पापाला गिळतें. बिचारीं भलीं माणसें का आपलीं कामें सोडून तुमच्या आमच्या मागें धांवत येणार आहेत ? तुम्ही आम्ही एकमेकाच्या उरावर बसायचे ! आज तुमच्या गळ्यावर आमचा हात; उद्यां आमच्या गळ्यावर आणखी तिसऱ्याचा हात ! ( त्याला खालीं पाडून त्याचा गळा दाबतो. ) हं, रावसाहेब, ताकद ओळखून मग अशी धडपड करा ! उगीच कां मरतांना अशी मेहनत करितां ?

कमलाकर : अरेरे, अखेर हेंच तत्त्व खरें कीं—

कलजुग नहीं करजुग है, तूं दिनको और रात ले ।
क्या खूब सवदा नग्द है, इस हाथ दे इस हाथ ले ॥

[ दरोडेखोर त्याचा गळा दाबून प्राण घेतो. पडदा पडतो. ]

## प्रवेश पाचवा

[ लीलेची चिता जळत आहे. संन्यासवेष घेतलेला जयंत व इतर मंडळी. ]

जयंत : हर्षखेद ते मावळले । हास्य निमालें, अश्रु पळाले ॥
कंटकशल्यें बोथटलीं । मखमालीची लव वठली ॥
कांहीं न दिसे दृष्टीला । प्रकाश गेला, तिमिर हरपला ॥
काय म्हणावें या स्थितिला । झपूर्झा गडे झपूर्झा ॥

अहाहा! विद्याधर, ही पहा माझ्या हृदयाची होळी! या पहा आशेच्या ज्वाळा आणि हा पहा माझ्या मनोरथाचा धूर! प्रीतीचें प्रेत जाळण्यासाठीं आणखी किती कठोर व्हावयाला पाहिजे? स्मशानांत अदृश्यरूपानें वावरणाऱ्या पिशाचांनों, भूतांनों, संभाळा, या पवित्र होळीची जागा कल्पान्तापर्यंत नीट संभाळा! तुमच्यापेक्षां भयंकर, क्रूर अशा मनुष्यांचें—दयामाया यांचें स्मशान झालेल्या जगांतल्या मानवी भूतांचें—या पवित्र प्रणयसमाधीवर पाऊल सुद्धां फिरकूं देऊं नका. हें लीलाभक्षक अग्निनारायणा, मनुष्यांच्या श्वासानें पापी झालेला वारा जर या चितेंत शिरूं लागला तर त्याला जाळून दिव्य करून मग लीलेजवळ येऊं दे! आणखी तुझ्या तेजानें जसा या रात्रीच्या वेळीं हा स्मशानांतला काळोख नाहींसा केला आहेस तसा आमच्या समाजांतल्या अंधारावर या लीलाललित ज्वाळा पसरून चोहींकडे प्रकाश पाड! अहाहा! माझ्या लीलेच्या पवित्र देहाच्या अंशाअंशासाठीं पंचमहाभूतांची कोण धडपड चालली आहे ही! हा अग्नि तिच्या जडदेहाला आपल्या ज्वाळांशीं एकजीव करीत आहे; भूदेवी आपल्या प्रेमळ बालिकेची रक्षा मातृप्रेमानें ओढीत आहे; सोसाट्याचा वारा तिच्या रक्षेचा एखाद-दुसरा कण मिळाला तेवढाच घेऊन दिगंतराला पळून जात आहे! लीलेचा आत्माच आपल्याला मिळणार म्हणून हें आकाश आनंदानें तारकारूपी नेत्र मिचकावीत आहे, आणि ही जलदेवता तर राखेंत मिळून एकरूप होण्यासाठीं अश्रूंच्या पवित्र रूपानें माझ्या डोळ्यांतून सारखी धांवत आहे! आणखी लीलेसाठीं असें कोण होणार नाहीं? तरी पण हे पवना, तूं असा निर्दय होऊन सारेच रक्षाकण उडवून नेऊं नकोस! हिच्या प्रेमासाठीं खरा-खुरा संन्यास घेण्यासाठीं थोडीशी रक्षा तरी राहूं दे; म्हणजे ती प्रेमाची राख माझ्या अश्रूंत भिजवून या माझ्या शरीराला मी लावीन!

विद्याधर : जयंत, झालें तें झालें; आतां शोक करून काय फळ ?

जयंत : विद्याधर, हा तुम्ही शोक समजतां ? नाहीं, हा शोक नाहीं; माझें हृदय, माझें प्रेम, माझा जीव, माझें सर्वस्व मीं या होळींत टाकिलें आहे. लीलेची आज्ञा पाळण्यासाठीं मी एक दगडाचा पुतळा झालों आहें. आणि लीलेच्या प्रेताला स्वाहा करणाऱ्या अग्नीच्या या ज्वालारूपी हजारों जिभांतून धडधड निघणारे निराशेचे उद्गार माझ्या पाषाणहृदयावर आदळून तोंडावाटें हा त्यांचा प्रतिध्वनि मात्र बाहेर पडत आहे. मला जर शोक करावयाचा असता तर सारें ब्रह्मांड हालवून सोडिलें असतें. माझ्या करुणारवानें पाषाणाच्या हृदयाचा भेद केला असता, आणि अश्रूंच्या ओघानें ही धडधडणारी चिता एका क्षणांत विझवून टाकली असती ! पण मी तसें करणार नाहीं. अग्निनारायणा, तुझा भयानक खेळ चालू दे. तुझ्या ज्वालांच्या पंखांनीं माझ्या लीलेच्या आत्म्याला स्वर्गांत उडून जाऊं दे ! अहाहा ! विद्याधर, पहा, पहा, बोलतां बोलतां आकाशांत कशी गर्दी होत चालली आहे ती ! पण या तारका, तुमच्या नेहमींच्या निर्दय तारका – सुखांत रमलेल्या किंवा दुःखांत करपलेल्या जीवांकडे फत्तराप्रमाणें सारख्याच दृष्टीनें डोळे मिचकाविणाऱ्या, भविष्यांत होरपळून काढणाऱ्या पण चालत्या काळीं खऱ्या वाटणाऱ्या, आशेच्या समुद्रावर शेवटीं बुडण्यासाठीं आपण होऊन तरंगणाऱ्या अल्लड बालकांच्या हृदयभेदक मनोरथांना हंसणाऱ्या – नेहमींच्या तारका नाहींत बरें ! या माझ्या लीलेच्या प्रेमतारका ! तिच्या कोंडलेल्या मनांत उरलेल्या प्रेमाचा एक एक बोल या आगीच्या लाटांत मंगलस्नान करून दिव्यरूपानें वर जात आहे – लीलेच्या प्राणज्योतीबरोबर या चितेच्या ठिणग्या पावन होऊन तारकापदाला पोहोंचत आहेत ! आणि विद्याधर, उद्यांच्या या नव्या तारामंडळांत, या ताराक्षरांनीं खचिलेल्या प्रेमस्वस्तिकांत माझ्या लीलेचा आत्मा कौस्तुभासारखा चमकतांना दिसेल ! तो देदीप्यमान प्रणयतारा आजच्या हतभागी पण उद्यांच्या भाग्यशाली जयंतावर स्वर्गीय, तेजोमय प्रेमस्वर्गाची वृष्टि करील ! काय, विद्याधर, तुम्हांला हें खरें वाटत नाहीं ? छेः, माझी लीला मला तसें वचनच देऊन गेली आहे ! आणि तिनें एकदां शब्द काढला कीं तो कायमचा ! लहानपणीं तिनें मला प्रेमाचें वचन दिलें, आणि—पण तिचें प्रेम तुम्हांला कसें कळणार ! विद्याधर, तुमची आमची लीला साक्षात् देवता होती बरें ! आतां उद्यां तुम्हांला कळेल, उद्यां आकाशांत चमकणाऱ्या तारामंडळांतून माझ्यावर जेव्हां प्रेमाश्रूंचा पाऊस पडेल,

लीलेच्या ताराकिरणांशीं माझ्या डोळ्यांचीं किरणें प्रेमप्रलाप बोलूं लागतील तेव्हां तुमची खात्री होईल! विद्याधर, तिनें मरतांना असेंच ठरविलें आहे! अरे, पण, किती वेडा मी! [ चितेकडे जाऊं लागतो. ]

**विद्याधर :** ( त्याला थांबवून ) जयंत, काय हें – चाललां कुठें त्या आगींत?

**जयंत :** आगींत? अहो तुम्हांला ती आग वाटते; पण माझ्या आत्म्याची ती चंद्रिका आहे बरें! लीला जिथें आहे तिथें आगीचें सुद्धां चांदणें होईल! सोडा हो, एकदां तिच्या ओंठाला ओंठ लावून एवढेंच विचारून घेतों कीं, माझा उद्धार केव्हां करशील म्हणून? तें विचारायचें राहिलें आहे! एकच चुंबन! सोडा हो – किती निर्दय आहां हो तुम्ही! नाहीं जाऊं देत? नशीब माझें! लीले! जा, तूं बिनदिक्कत जा. तुझी आज्ञा मी अक्षरशः पाळीन. ईश्वरानें निर्मिलेल्या सुंदर आणि भेसूर, साऱ्याच वस्तूंत तुझ्या चितेचेंच चित्र पाहीन; साऱ्या नादब्रह्मांत या चितेचा धडधड आवाजच ऐकत राहीन, आणि केवळ तुझ्या आज्ञेचा उच्चार करण्यासाठींच तोंडातून शब्द काढीन. अहाहा! काय ही चिता भडकली आहे! जितकी भीषण तितकी सुंदर! पहा, पहा; विद्याधर, पहा ही भयाण शोभा! ही चिता समाजाच्या चिखलांतून निघालेल्या कमलपुष्पासारखी रमणीय दिसत नाहीं का? आणि या चिता-रूपी कमळाच्या ज्वालामय दळांच्या आड माझी लीला, माझी प्रणयलक्ष्मी, साक्षात् लक्ष्मीप्रमाणेंच निजली असेल नाहीं? सुंदरता भयानक वस्तूवर सुद्धां आपली छाप बसविते, हेंच या चितेंत तुम्हांला दिसत नाहीं काय?

**विद्याधर :** हरहर! जयंत, काय उत्तर देऊं तुम्हांला? एकीकडे सुशीलेची प्राप्ति आणि एकीकडे जिवलग मित्राचा असा घात, यामुळें मी अगदीं दिङ्मूढ झालों आहें! एकाच काळीं जलवृष्टि आणि विद्युत्पात यांचा अनुभव घेणाऱ्या वृक्षाप्रमाणें माझी स्थिति झाली आहे!

**जयंत :** विद्याधर, असें भांबावून जाऊं नका; हृदयाच्या पडद्यावर आंतल्या आंत गिळलेल्या अश्रूंनीं या चित्तभेदक चितेचें चित्र चांगलें रंगवून ठेवा! उद्यां या राखेच्या ढिगांत कणाकणागणिक, जळलेल्या आशा, मेलेले मनोरथ, प्रेमाचे प्रेतप्राय प्रलाप, करपलेल्या कल्पना, मुक्या मनाच्या मातींत मिसळलेल्या महत्त्वाकांक्षा सांपडतील त्या मोजून ठेवा! आणि ईश्वराच्या कृपेनें उद्यां तुमचं घर गोजिरवाण्या लीला-जयंतांनीं गजबजून गेलें म्हणजे स्मृतीच्या तीव्र डोळ्यांनीं हृदयांतल्या त्या चिताचित्राकडे पहा, आणि मग त्यांच्या आयुष्यांच्या दिशा ठरवा! कोमल हृदयांत ताबडतोब रुजून फोंफाव-

णाऱ्या प्रेमवृक्षाचे अंकुर दिसतात न दिसतात तोंच त्यांचें निर्बीज करून, तुमच्या लीलाजयंतांना समाधानाचे धडे शिकवा! जें आहे तें आपलें आणि नाहीं तें नको हेंच तत्त्व त्यांच्या मनांत लहानपणींच बिंबवून द्या; बाळपणीं वाढत्या प्रेमाकडे, आवडीनावडीकडे दुर्लक्ष करून त्यांना वाढूं दिल्यावर तारुण्याच्या जोमांत त्यांना अवेळीं समूळ उपटून टाकूं नका! बाळपणीं बीजारोपण झाल्यामुळें तारुण्यांत हृदयाच्या तळापर्यंत दूरवर मुळें पसरणारा प्रेमवृक्ष एकदम समूळ उपटतांना हृदयाच्या चिंधड्या होतात हें लक्षांत ठेवा! विवाह-संबंध घडवून आणतांना डोळ्यांत या चितेंतल्या राखेचें चांगलें अंजन घाला. विवाहसंबंधानें एकतर स्वर्ग तरी हातीं येतो नाहीं तर पाताळांत तरी पडावें लागतें, हाच अनुभव यापुढें बदलत्या परिस्थितीमुळें येत जाणार आहे! कां, मी म्हणतों हें खरें आहे ना!

विद्याधर : अगदीं अक्षरशः खरें!

जयंत : कडू अनुभवाचे औषध पाजणाऱ्या ईश्वराचे खेळ अगाध आहेत!

विद्याधर : हे लीलालाघवी जगत्सूत्रधारा, या तुझ्या संसारनाटकाला म्हणावें तरी काय?

जयंत : प्रेमसंन्यास! प्रेमसंन्यास! विद्याधर, या सामाजिक खेळाचें नांव प्रेमसंन्यास!

“ ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।
ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥ ”

—श्रीभगवद्गीतोपनिषत्सु श्रीभगवान् ।

समाप्त

# पुण्यप्रभाव

# पुण्यप्रभाव

## मंगलाचरण

[ सरस सीस मुगुट भार० ]

प्रभु त्दास नमित दास मंगलमात्रास्पदा वरदा सदवनि लव
यदवलंब विलंब न करि हरि दुरिता सौख्य वितरि ॥ ध्रु० ॥
सारस्वतचरणकमल- । दर्शि विरहत कविमंडल । दुर्लभ
तें दिव्य स्थळ । पंकनिरत । राम रमत । धन्य तरी ॥ १ ॥

## अंक पहिला

### प्रवेश पहिला

[ स्थळ : अरुंधतीनगरांतील शिवालय. ईश्वर प्रवेश करितो. ]

ईश्वर : ( स्वगत ) माझ्या प्रेमसंन्यासानें मला हा पुण्यप्रभावाचा मार्ग अचूक दाखविला नसता, तर अजूनही मन त्या वेड्यांच्या बाजारांत व रमत राहिलें असतें. परमेश्वरा, या हातानें स्वीकारलेलें हें सत्कृत्य नीटपणें घडवून आण. माझ्या क्षणोक्षणीं बदलत्या बुद्धीला तुझ्या थोरथोर भक्तांच्या एकनिष्ठेचें, तन्मयतेचें आणि स्वयंपूर्णतेचें सामर्थ्य देऊन आंखलेल्या मार्गांपासून तिला केसभरही चळूं देऊं नकोस. भाग्यशाली भूपाल, वसुंधरेच्या प्राप्तीमुळें तुला मिळणाऱ्या तुझ्या संसारसुखाची हा संन्यासी ईश्वर स्वप्नांतही अपेक्षा करणार नाही. पण या हृदयाची गडबड अजून शांत होत नाहीं. या शिवालयाच्या दरवाज्याबाहेर

वसुंधरेच्या येण्याची वाट पाहत मी उभा राहिलों खरा, पण वाऱ्याच्या नुसत्या झुळुकीमुळें उद्भवलेल्या झाडपानांच्या तरळत्या हालचालीसरशीं, वाटेल त्या बाजूनें वसुंधरा आल्याचा भास होऊन मी वेड्यासारखा स्वतांभोवतीं गिरक्या खात आहें तो कशानें ? माझें मन इतकें चंचल झालें आहे तें आज इतक्या वर्षांनीं वसुंधरा पुनः भेटणार म्हणून उत्सुकतेमुळें, कीं तिच्याविषयींच्या ज्या माझ्या मनोवृत्ति पार मावळून गेल्या म्हणून मी अभिमान वाहत आहें त्यांच्याच खळबळाटामुळें ? अजून या बाबतीबद्दल माझ्या मनानें एक उत्तर मिळत नाहीं. दुसऱ्याला फसवितांना मनुष्याचें मन जी सावधगिरी वापरीत असतें तीपेक्षां स्वतांचीच फसवणूक करण्यासाठीं केलेले मनाचे डावपेंच कितीतरी खोल असतात ! पण या विचारांना आतां आंवरून धरिलें पाहिजे; ही पहा वसुंधरा देवळांतून बाहेर येत आहे. अहाहा, हिच्याकडे पाहतांच सारी चेतनाशक्ति डोळ्यांत एकवटून मनांतले विचारसुद्धां जागच्या जागीं थबकून राहतात.

[ वसुंधरा व मागाहून मुलाला कडेवर घेऊन दामिनी येतात. ]

वसुंधरा : दामिनि, दीनाराला घेऊन येतांना त्या पायऱ्यांवरून अशी घाईनें उतरत जाऊं नकोस म्हणून तुला एक हजारदां सांगितलें असेल, पण तुला कांहीं राहवत नाहीं. तुझ्या चंचलपणाबद्दल सुदाम इतकें बोलतात तें एका परीनें खरेंच म्हणायचें !

दामिनी : बाईसाहेब, तुमचा स्वभावच भारी भित्रा ! तुम्ही अगदीं काळजी करीत जाऊं नका. तुमचा दीनार तुम्हांला नुसता दीनारच आहे, पण आम्हां साऱ्या चाकरमाणसांच्या हृदयाचा हा हिरा आहे, समजलां !

वसुंधरा : आणखी ती पहा, सरकविलीस त्याची झूल एकीकडे ! कातरवेळेला एखाद्याची नजर गेली तर माझ्या सोनुल्याला तेव्हांच दृष्ट लागायची ! साऱ्यांच्याच नजरा कांहीं सारख्या नसतात हो !

दामिनी : अष्टौप्रहर माझ्या जिवाभावाचें निंबलोण उतरून मी त्यांची दृष्ट काढीत असल्यावर कशी कोणाची दृष्ट लागणार ? आणखी, असल्या भित्र्या गोष्टींचा आमच्या धाकट्या धनीसाहेबांना मोठा राग आहे हो ! बाईसाहेब, तुम्हीं दृष्टीचें नांव काढतांच, पहा,/आमच्या खांद्यावरच्या स्वाऱ्यांनीं एकेक डोळा केवढाला केला आहे तो ! अगबाई, आम्हां बायाबापड्यांकडे बाळंत्यांतल्या बहाद्दरांनीं असें रागावून पाहूं नये गडे ! मला कसें कांपरें भरलें आहे सारखें, नी बाईसाहेब म्हणतात स्वारीला दृष्ट लागेल म्हणून ! आणि दृष्ट लागेल

म्हणून असलें रत्न झांकून कां ठेवावयाचें ? या साऱ्या योगायोगाच्या गोष्टी ! सुंदर नक्षत्रांचा एवढा पसारा देवानें आभाळांत उघड्यावरच नाहीं का टाकिला आहे तो !

**वसुंधरा :** अग, नक्षत्रांवरसुद्धां दृष्ट पडत नाहीं का ? चांगल्या चमकत्या चांदण्या देखतांदेखत आभाळांतून निखळून पडतात त्या का कोणाची पापी नजर फिरल्यावांचून पडतात ? होत्यावेळी नाहीं तें होतें.

[ नजरा नहि आंदावे० ]

नच संभव ज्या कांहीं। होत अकारण तेंही। कालहि त्या
नाहीं ॥ धृ० ॥ कलिका नाहीं खुल्ली, करपत तों अकालीं ॥
हरपत मोहर कां वनिं बाई ॥ १ ॥

**दामिनी :** अगबाई, तो कोण मेला एका नजरेनें—

**वसुंधरा :** दामिनि, वेड्यावांकड्या शब्दांखेरीज तुला बोलतांच येत नाहीं वाटतं ?

**दामिनी :** असें बोलायचें नाहीं तर काय करायचें ? अजून सारख्या नजरेनें पाहत आहे पहा कसा ! या मेल्या धटिंगणांना दोन्ही डोळ्यांची मुरवत कशी ती मुळींच नसते. चला, बाईसाहेब, नका पाहूं तिकडे !

[ वसुंधरा ईश्वराकडे वळून पाहते. ]

**दामिनी :** ए मेल्या, असा नजरेला नजर देऊन मोठ्या दिमाखानें—

**वसुंधरा :** दामिनि, ऐक पाहूं तूं जरा. कोण, ईश्वर !

**ईश्वर :** होय, तोच मी एकवेळचा तुझा भक्त ईश्वर.

**वसुंधरा :** तुम्हांला एकदम ओळखिलें नाहीं त्याची क्षमा करा. पण तुमच्यांत बदलच तसा झालेला आहे.

**ईश्वर :** तूं म्हणतेस तें अगदीं खरें आहे. पण हा फरक केवळ बाह्यांगापुरताच झालेला नाहीं; वसुंधरे, मी आतां अंतर्बाह्य सारखा बदलून गेलों आहें.

**वसुंधरा :** तुमच्यांत असा बदल होण्याचें कारण विचारिलें तर उगीच देखल्या देवा दंडवत केल्यासारखें कांहींतरी विचारलें, असें नाहीं ना तुम्ही म्हणणार ?

**ईश्वर :** बरळणाऱ्या मत्सराला ज्याचा संशयसुद्धां येणार नाहीं तें प्रेमाला–क्षमा कर–मृतप्रेमाला कसें म्हणतां येईल ? पण एका शून्यजीवन कर्महताची कहाणी ऐकून तुझ्या आनंदी मनाला कदाचित् त्रास होईल अशी—

**वसुंधरा :** ईश्वर, ज्या स्थितीचा तुम्ही सारखा अनुभव घेत आहां, तिची नुसती हकीकत ऐकून मनाला वाईट वाटेल म्हणून माणुसकीला दूर लोटण्याइतकी का मी निर्दय आहें ? यापूर्वीच तुमच्याबद्दल विचारपूस करण्याचें माझ्या मनांत

आलें होतें; पण आम्हांला सांगोवांगी कळलें, कीं नांव मिळविण्यासाठीं ईश्वर दूरदेशीं निघून गेले म्हणून.

**ईश्वर :** वेडी लोकवार्ता ! संसाराच्या सामान्य राहणीला सोडून एखाद्यानें जरा निराळ्या मार्गानें जाण्याचा विचार केला म्हणजे लोकवार्ता आपल्या दृष्टीनें त्याच्याबद्दल ब-याबाईट कल्पना काढीत असते. मात्र, अशा वेळीं श्रीमंतांच्या स्वैरवृत्तीला नांवलौकिकाचा आधार मिळतो आणि गांजलेल्या गरिबांकडे वाइटाचा वांटा येतो. बाकी माझ्या बाबतींत एका अर्थी नांव मिळविण्याबद्दलची लोककल्पना खरीच आहे म्हणावयाची; कारण नांव बदलून हिंडण्यासाठीं मला आधीं खरोखरींच दुसरें नांव मिळवावें लागलें. फरक इतकाच, कीं मला नांव मिळविण्यासाठीं प्रवास करावा लागला नसून, प्रवास करण्यासाठीं मात्र नांव मिळवावें लागलें !

**वसुंधरा :** तुमच्या करुण कथेची भावी कल्पना मनाभोंवतीं सारखी तरंगत असल्यामुळें माझ्यानें तुमच्या या मौजेच्या बोलण्याचें सुद्धां कौतुक करवत नाहीं. बरें, तुमचें बोलणें मध्यंतरींच थांबलें ?

**ईश्वर :** अतिपरिचयामुळें मला माझ्या दुःस्थितीचें आतां कांहींच वाटेनासें झालें आहे. ऐक माझी हकीकत; पण मला ती नीट जुळून मात्र सांगतां येणार नाहीं. आज इतकीं वर्षें दुस-याशीं बोलण्याची माझी संवय इतकी मावळून गेली आहे, कीं एखाद्याशीं बोलतांना आवाज किती लहानमोठा करावा लागतो याचासुद्धां मला अंदाज राहिलेला नाहीं. मग संगतवार एखादी गोष्ट सांगण्याची गोष्टच सांगावयाला नको. तुझा लग्नदिवस तुझ्या लक्षांत असेलच ?

**वसुंधरा :** लग्नदिवसाचा कोणाला कधीं विसर पडेल काय ?

**ईश्वर :** खरेंच; आयुष्यांतल्या आदिमध्यांतांच्या तीन अत्यंत महत्त्वाच्या दिवसांपैकीं, जन्ममरणांच्या टोंकांवरच्या दिवसांची कमकुवत मनुष्यबुद्धीला आठवण नसते; पहिल्या वेळीं आठवणीचा जन्म झालेला नसतो आणि मरणकाळापूर्वीच आठवणीचें मरण घडून येतें; आणि म्हणून, लग्नदिवसाची आठवण मात्र तिप्पट ताकदीनें जीव धरून राहते. वसुंधरे, तुझ्या लग्नदिवसानें माझ्या जन्मदिवसाला निष्फळ ठरवून मला मरणदिवसाची अपेक्षा करावयाला लाविलें. त्या दिवशीं तुझ्या ख-याखु-या सुखाचा जन्म झाला आणि माझें जन्माचें सुख नाहींसें झालें; ज्या मुहूर्तावर तूं आपल्या घरांत पहिलें पाऊल टाकिलेंस त्याच मुहूर्तावर मीं माझ्या घरांतून शेवटचें बाहेर पाऊल टाकिलें.

**वसुंधरा :** बाबासाहेबांनीं तुम्हां दोघांच्या मागण्या नाकारून मला या स्थळीं दिली;

वृंदावनांना कमी दर्जाच्या कुळांतले म्हणून नाहीं म्हटलें आणि तुम्हांला—

**ईश्वर :** आणि मला योग्यतेमुळें तुझ्या अयोग्य ठरविलें; आतां त्याबद्दल बोलतांना वाईट वाटूं देण्याचें कांहीं कारण नाहीं. माझ्या नशिबाचा जोरच तितका!

**वसुंधरा :** ईश्वर, त्याबद्दल तुम्ही मला दोष देत नाहीं ना?

**ईश्वर :** भलतेंच! बाबासाहेबांच्या दृष्टीनें त्यांचें म्हणणें खोटें नव्हतेंच; आणि कदाचित् असलें तरी त्याबद्दल मीं तुला काय म्हणून दोष देऊं? विश्ववैभवाची वैजयंती लक्ष्मीवल्लभासारख्या लोकैकपुरुषाच्या कंठीं पडली तर तिच्याकडे आशेनें पाहणाऱ्या भणंगानें आपल्या भिकारी भाग्यदेवतेला बोल लावावा; यांत वैजयंतीचा काय दोष? आकाशांतून उतरलेल्या हिमवंतीनें फुलत्या फुलाच्या हृदयांत ठाव घेतल्याबद्दल, जमिनीशीं जखडलेल्या दगडानें दुर्दैवाला दोष देत बसावें! तिच्याकडे पाहत राहिल्यानें तिच्यावर हक्क कसा पोंचणार? केवळ तिच्या वाढत्या वैभवाकडे पाहण्यांत त्याच्या सुदैवाची सीमा संपते.

**वसुंधरा :** ईश्वर, क्षमा करा, पण आतां तरी तुमच्या मनांत—

**ईश्वर :** तुझ्याबद्दल भलत्या कल्पनेची छायाही सांपडणार नाहीं. त्या क्षणींच मीं आपलें हृदय दगडाप्रमाणें घट्ट आणि निर्विकार करून टाकण्याचा निश्चय केला; माझ्या हृदयाच्या दगडफुलानें तुझ्या नाजूक प्रतिमेची पूजा करीत बसण्याइतका अविचारी मी खास नाहीं. तुझ्या लग्नांतल्या मंत्रांनीच माझ्या आशेच्या उत्तरक्रिया उरकून घेऊन आणि विवाहहोमांत माझें हृदय होमून, आतां मी संसाराच्या सुतकांतून सर्वस्वीं सुटलों आहें.

**वसुंधरा :** तुमच्या तीव्र उदासीनतेमुळें माझ्या मनाला किती वाईट वाटतें म्हणून सांगूं?

[ नृपकुलीं जनन चिर० ]

शिशुपणाहूनि परिचित जनांसि बघुनि दुःखिं हो ससुख
असुखमय कटुतर वाटे। मोदहि विषसम ॥ ध्रु० ॥ मंद सदा
आनंद विषादें । हृदयिं विरति खर वसवि निजधाम ॥ १ ॥

ईश्वर, यापेक्षां तुम्ही अजून मनासारखी एखादी स्त्री पाहून विवाहसुखांत संसारी आयुष्य घालविण्याचा विचार कां करीत नाहीं?

**ईश्वर :** ज्या सुखाची लहानपणापासून आशा केली तें मिळण्याची आतां आशा नाहीं म्हणून. वसुंधरे, यापेक्षां स्पष्ट बोललों तर त्याची पापांत जमा होईल.

**वसुंधरा :** समजलें; पण आपल्या साऱ्या कल्पना खऱ्या होतात असें थोडेंच

आहे! जितकें सुख मिळेल तें आपलें समजून समाधानानें राहण्यांतच देवाच्या मर्जीला मान दिल्यासारखें होतें.

**ईश्वर :** खऱ्या सुखाच्या निराशेनंतर हें कशाचें सुख आणि कशाचें समाधान! गजान्तलक्ष्मीच्या राजवैभवांत मिरवणूक काढण्यासाठीं आणलेल्या हत्तीच्या मढ्यावर हस्तिदंती सामानाचें दुकान काढण्याचा प्रसंग आला तर त्यांत समाधान कोण मानील? पिकास आलेल्या क्षेत्रभागावर तरंगणाऱ्या मेघापासून कृषीवलानें जीवनाची आशा करावी आणि शेवटीं वृष्टि केल्यावांचून मेघ निघून गेल्यावर, निदान त्याच्यापासून क्षणभर छाया मिळाली म्हणून समाधान मानावें तशांतलाच हा प्रकार नाहीं का? वसू, तुझ्यासारख्या त्रिभुवनदेवतेला सावधिक संसाराच्या साम्राज्यांत राणी केल्यानंतर, या उपमर्दाबद्दल तिच्या दिव्यपदाची भरपाई करून देण्यासाठीं उत्साहानें लहानपणापासून कमावीत आणलेली बुद्धिमत्ता, मानसशक्ति आणि बाहुबल आतां एखाद्या सजीव बाहुलीला सजविण्यासाठीं खर्च करीत बसूं आणि त्यांत सर्वस्वाचें सार्थक मानूं? वसुंधरे, अमर्याद इच्छा करणाऱ्या निराश मनाला मर्यादित सुखप्राप्तीपेक्षां सर्वस्वाच्या सत्यानाशानेंच अधिक समाधान वाटतें!

**वसुंधरा :** लहानपणीं आपण एका जागीं वाढलों, खेळलों, म्हणून बोलावेंसें वाटतें. ईश्वर, रागावूं नका; पण अमर्याद सुखाची आशा धरून बसणें आणि तें मिळालें नाहीं म्हणजे डोक्यांत अशी राख घालणें हें जरासें गैरच नाहीं का?

**ईश्वर :** वसुंधरे, माझी आशा असंभवाच्या कोटींतली मुळींच नव्हती. वस्तुस्थितीचा पुरता विचार करूनच मी तिची जोपासना करीत आलों होतों. माझीच काय, पण आपणां सर्वांच्याच पहिल्या आशा शक्यतेला फारशा सोडून नसतात. आपलीं बाळपणचीं आशेचीं कल्पनाचित्रें जरा भडक रंगांत रंगविलेलीं मात्र असतात; तीं व्यवहारांत वठावयाला ज्या मानानें कमीज्यास्त वेळ लागतो त्या मानानें त्यांच्यावरचे रंग उडून जाऊन तीं थोडींबहुत फिकट होतात एवढेंच! बाकी बहुतेकांचीं इच्छाचित्रें बहुतांशीं वस्तुस्थितींत उतरलेलीं दिसतात. असें होत नसतें तर संसाराचा विस्तार इतका न पसरतां, जग ह्मणजे वैतागलेल्या बैराग्यांची एक मोठी थोरली धर्मशाळाच झाली असती; किंबहुना मानवतेची वाढ खुंटून सारी पृथ्वी पशुपक्ष्यांच्या ताब्यांत गेली असती. माझ्यासारखीं जीं कांहीं उलट बाजूचीं उदाहरणें सांपडतात त्यांचें कारण, मानवी इच्छेशीं कधीं कधीं ईश्वरी इच्छेचा विरोध होतो हेंच! परिस्थितीच्या पटांग-

णांत मानवी मनोरथांना कल्पनेच्या वेगानें फिरवितांना आम्ही विश्वाचें नियंमन करणाऱ्या अदृश्य शक्तीला जमेस धरीत नाहीं म्हणूनच आमच्या स्वैरसंचाराला वेळोवेळीं आघातांचे अडथळे होतात. या शक्तीचा वेग आम्हांला विरोधी झाला म्हणजे आमचे मनोरथ कधीं तात्पुरते अगतिक होतात आणि कधीं आडमार्गी उलथून कायमचे मोडून जातात. या दैवी इच्छेनेंच माझ्या दुर्दैवाच्या रेषांना अशा वांकड्या वळणावर ओढून नेलें आहे ! जाऊं देत, वसुंधरे, या गोष्टीचा विचार करण्यांत अर्थ नाहीं. कर्तृत्वाच्या अभावीं आजपर्यंत सारें आयुष्य विचार करण्यांतच घालविल्यामुळें, कोणत्याही विषयासंबंधीं माझें बोलणें इतकें पाल्हाळाचें होऊन बसलें आहे, कीं ऐकणाराला त्याचा कंटाळा आल्याबांचून राहत नाहीं. बहुभाषित्वाला मूर्खपणाइतकेंच दुर्दैवाचेंही निदर्शक म्हणतां येईल ! माझ्या दुर्दैवाचा परिणाम तुला याहून अधिक जाणविण्याची माझी इच्छा नाहीं ! त्याची ओरड तुझ्या कानींकपाळीं कशाला ?

वसुंधरा : तुमच्या अशा बोलण्यानें मन कसें दुभंगून जातें अगदीं ! ईश्वर, तुम्हांला पुन्हां सांगतें–नीट विचार करा–आपले वृंदावन–तुमच्याप्रमाणेंच बाबांनीं त्यांचीही मागणी नाकारिली, त्यांनाही कांहीं दिवस वाईट वाटलें; पण पुढें त्यांनीं लग्न केलें––

ईश्वर : काय, वृंदावनानें लग्न केलें ? मग तो तुला खरोखरीच योग्य नव्हता ! वृंदावनानें लग्न केलें आणि योग्य स्त्री मिळून आतां तो सुखांत आहे हेंच तूं मला सांगणार ना ?

वसुंधरा : कालिंदीबाईच्या माहेरची–आणि सासरचीहि,तशी मला फारशी माहिती नाहीं; पण वृंदावन हल्लीं पूर्ण सुखांत असलेले दिसतात एवढें मात्र खास ! ते आज इतकीं वर्षें आमच्या अरुंधतींतच राहत आहेत. आमच्या मंडळींचा आणि त्यांचा मोठा जिवाभावाचा घरोबा आहे. त्यांचें पथक आमच्याच तैनातीला असतें. आज अरुंधतीच्या चांगल्या नांवाजलेल्या सरदारांत त्यांची जमा होते; झालें म्हटलें तर, त्यांना माझ्या दीनाराच्या बरोबरीचा मुलगाही आहे. दामिनि, दीनार आणि केतन सारख्याच दिवसांचे असतील नाहीं ?

दामिनी–होय, बाईसाहेब; अगदीं एकाच शीणेचे. दोघांनाही अजून पुरतें वर्ष कांहीं उलटलें नाहीं.

ईश्वर : हा तुझा चिमुरडा वाटतें ? काय याचें नांव, दीनार नाहीं का ? गुलाम अगदीं मातृमुखी आहे ! आणि वृत्तिही तुझीच ! तोंडाकडे पाहण्याची

खोटी, लागला गुलाम हंसायला. दीनारा, लबाडा, ही कुठल्या जन्मींची ओळख रे ? गालांना या नखाएवढाल्या खळ्या! वसू, तुझे वडील आज जीवंत असते तर तुम्हां दोघांच्या तोंडाकडे एकदम पाहून, त्यांना तेव्हांच्या आणि आतांच्या, दोन्ही काळच्या जीवनसुखांचा एका काळीं उपभोग घेण्याचा लाभ झाला असता. किती तुम्हां दोघांचें साम्य हें! तुझें मूल पाहण्याची त्यांची मोठी इच्छा!

वसुंधरा : झाल्यागेल्या गोष्टी! बाबासाहेबांचा तुमच्यावरसुद्धां मोठा जीव होता. तुम्हांला त्यांनीं असेंच कटिखांदा खेळविलें आहे. आज दीनाराला असा पाहून त्यांना जितका आनंद झाला असता तितकाच तुम्हांला असें पाहून त्यांना खेदही झाला असता.

ईश्वर : ( स्वगत ) या मुलाकडे पाहतांच माझ्या मनांत विलक्षण असंबद्ध कल्पनांचें काहूर उद्भवल्यामुळें मी इतका भांबावून गेलों आहें, कीं याला जवळ घेतला तर हा हातांतून खालीं पडेल. ( उघड ) वृंदावनाबद्दल तुझें बोलणें पुढें तितकेंच राहिलें.

वसुंधरा : मला बोलावयाचेंही तितकेंच होतें. बरें, पुढें तुम्हीं काय करावयाचें योजिलें आहे ?

ईश्वर : ठीक विचारिलेंस. या प्रश्नाच्या उत्तरांतच तुझ्या भेटीचें कारणही तुला कळणार आहे. वसुंधरे, चालू प्रवासाच्या प्रारंभीं, कांहीं दिवस जगांतल्या नव्याच्या नवाईचें नवल वाटून मन निरनिराळे प्रदेश पाहण्यांत रमून जात असे; परंतु अलीकडे अतिशयामुळें सृष्टिसौंदर्यात माझ्या मनाचें आकर्षण करण्याची शक्ति राहिनाशी झाली आहे. गगनाशीं गोष्टी सांगणारे पर्वत माझ्या घराच्या उंबरठ्याप्रमाणें मला दुर्लंघ्य झाले; मोठालीं रमणीय अरण्यें घरापेक्षांही शून्य वाटूं लागलीं; स्मशानांतही आमच्या दिवाणखान्यांतलीच भीषणता दिसूं लागली. विषण्ण अर्थाचा एकान्तांतला कल्कलाट नुसत्या नादानें भरलेल्या गर्दीतल्या गडबडीपेक्षां हजारपटीच्या कडवटपणानें कानठाळ्या बसवूं लागतो. हेतुशून्य मनाच्या एकवृत्तीच्या यातना चुकविण्यासाठीं थारेपालट हा एकच उपाय असतो; आणि म्हणून मी या स्थळीं आलों आहें.

वसुंधरा : बायकांनीं असें बोलूं नये खरें–पण तुम्ही माझे लहानपणचे सोबती, म्हणून जरा मोकळ्या मनानें विचारितें–अशी थारेपालट करण्यासाठीं आमच्या गांवींच येण्यांत तुमची थोडीशी चूक झाली नाहीं का ? माझ्यामुळें उत्पन्न झालेली तुमची विषण्ण वृत्ति माझ्यासमोर राहून उणी होणार कीं

दुणावणार ? तुमच्या हृद्रोगाला माझी तर आठवणसुद्धां अगदीं कुपथ्यांतलें कुपथ्य !

**ईश्वर :** मी या गोष्टीकडे तिन्हाईत नजरेनें नुसतें वरवर पाहिलें नसून स्वार्थाच्या कळकळीनें तिचा विचार केलेला आहे. वसुंधरे, आपल्या दुसऱ्याविषयींच्या भावना स्थल, काल आणि दशा यांनींच बहुतांशीं आंखलेल्या असतात. आजपर्यंतच्या माझ्या मनांतल्या विचारांत वावरणारी तुझी मूर्ति एका कुमारिकेची होती आणि कुमारिकेबद्दलच्या निर्दोष अभिलाषदृष्टीनेंच मी तिच्याकडे पाहत आलों. तिच्या हानीबद्दलचे माझे निश्वासही याच कारणामुळें क्षम्य होते; आज इथें आल्याबरोबर तुझ्या ठिकाणीं नाममात्रानेंही अचिंत्य अशी परस्त्री दिसत आहे. तुझ्या बदललेल्या स्थितीची कल्पना एकदां नीट ठसली म्हणजे कुमारिकेबद्दलच्या शुद्ध प्रीतीचें पत्नीपदारूढ झालेल्या पतिव्रतेविषयींच्या उज्ज्वल भक्तींत संक्रमण होईल. ही निर्लोभ दृष्टि एकदां झाली म्हणजे झालें ! उच्चपदीं विराजणाऱ्या सौंदर्याबद्दल दुर्लभतेमुळें अभिलाषबुद्धीऐवजीं आदरभाव उत्पन्न होतो; हाताल्गतचीं फुललेलीं फुलें खुडून घेण्याची इच्छा होते, पण आकाशांत बसून हंसणाऱ्या तेजस्वी फुलांकडे आपण विस्मयपूर्ण आदरदृष्टीनें पाहत असतों. त्यांतून, तुझ्या अलौकिक गुणांचा, अढळ व्रताचा, तेजस्वी सौंदर्याचा आणि देदीप्यमान दृष्टीचा सारखा साक्षात्कार होत राहिल्यावर भलत्या भावनांचें नांव सुद्धां काढावयाला नको ! दिव्य सौंदर्याच्या सांनिध्यानें मनोवृत्ति निवळतील कीं गढूळ होतील ? आणखी एका क्षणानें मी तुझ्याजवळ एक मागणें मागणार आहें म्हणून आधीं तुझी स्तुति करितों आहें असें नाहीं. वसुंधरे, पापदृष्टीला दर्शनमात्रानें पुण्यवृत्ति करणारें तुझें पवित्र सौंदर्य, पुरुषांनासुद्धां अलंकृत करणारी तुझी विद्याप्राप्ति, पंडितांनाही लाजविणारी तुझी प्रगल्भ बुद्धि, कसलेल्या सेनापतींनींही सादर आशेनें पाहण्याजोगें तुझें मनोधैर्य–जाऊं देत; आत्मस्तुति ऐकण्याचा प्रसंग आल्यामुळें ओशाळूं नकोस; मीच हा विषय सोडून माझ्या मागण्याबद्दल गोष्ट काढितों.

**वसुंधरा :** तुमची इच्छा अशीच स्वच्छ असणार, कीं ती ऐकण्यापूर्वीच मी ती पुरी करण्याचें तुम्हांला मोठ्या आनंदानें अभिवचन देतें.

**ईश्वर :** माझें म्हणणें इतकेंच, कीं कधींमधीं मला तुझें दर्शन घेण्याला प्रत्यवाय नसावा. माझ्या दुर्दैवी दर्शनानें मी तुला वारंवार विषाद देणार नाहीं हें मी आधींच सांगून ठेवितों. तुझ्या आयुष्याच्या नाटकांतल्या पहिल्या प्रवेशांत मला जितकें काम मिळालें तितकें पुढें कधींच मिळावयाचें नाहीं हें मी पुरतेपणीं

जाणून आहें. माझ्या भेटण्यानें तुला किंवा तुझ्या पतीला—

**वसुंधरा :** भलतेंच ! माझी पातिव्रत्याबद्दलची कल्पना इतकी हास्यास्पद नाहीं. परपुरुषाकडे पाहण्यानें किंवा प्रसंगीं त्याच्याशीं बोलण्यानें चूर होऊन जाण्या-इतका नकली नाजूकपणा माझ्या पातिव्रत्यांत मुळींच नाहीं. माझ्या पतीखेरीज-पुरुषमात्राला मी बंधूसमान मानितें; आणि माझ्या कोणत्याही बंधूचें मोकळ्या मनानें प्रेमाचें स्वागत करण्यांत मला तिळमात्र संकोच वाटावयाचा नाहीं. माझे पतिही असे अनुदार मनाचे नाहींत. त्यांची उदारता तर इतकी विशाल आहे कीं ते तुम्हांला आमच्याच इथें राहण्याचा आग्रह करितील.

**ईश्वर :** माझी विनंती मान्य केलीस हेच तुझे मोठे उपकार झाले; तुझ्या घरीं राहण्याची माझी इच्छा नाहीं. होतां होईल तों जिवंतपणींच अगदीं नामशेष-नाहीं, नांवासकट नाहींसें होण्याचा माझा संकल्प आहे. तुम्हा थोरा-मोठ्यांच्या घरांत अशा विचित्र वेषानें राहिलें तर कारणावांचून प्रसिद्धि वाढत जावयाची. तुझ्या पतीचा इथें फारच मानाचा अधिकार आहे ना ?

**वसुंधरा :** तुम्हांला माहीत असेलच–आमच्या मृत्युंजयमहाराजांना पहिल्यानें पुत्र नसल्यामुळें, अरुंधतीच्या राज्याचा वारसा इंद्रनाथ आणि आम्ही, असा दोन घरीं जाणार होता. माझे पति महाराजांचे सर्वांत निकटचे आप्त; पुढें वृद्धपणीं महाराजांना पुत्ररत्नाची प्राप्ति झाली आणि म्हणून–खरें म्हटलें तर कांहींच कारण नव्हतें–महाराजांनीं मुद्दाम, सर्व मांडलिकांवर अधिकार चाल-विण्याची ' मंडलेश्वर ' ही पदवी आम्हांला दिली. महाराजांचा आमच्यावर अत्यंत लोभ–राणीसाहेबांच्या पश्चात् बाल्युवराजांचें संगोपन करण्याची कामगिरी महाराजांनीं मोठ्या विश्वासानें आमच्यावर टाकिली !

[ राजपुत्र इंद्रायुध व कंकण येतात. ]

**कंकण :** धाकटे सरकार दर्शनाला येताहेत.

**वसुंधरा :** युवराज, तुम्हांला शंभर वर्षांचें दीर्घायुष्य आहे; आतांच तुमची आठवण केली.

**युवराज :** वहिनीसाहेब, आटवण केली हें माझें सद्भाग्य !

[ वसुंधरेला प्रणाम करितो. ]

**वसुंधरा :** देव तुम्हांला शतायुषी करो !

**ईश्वर :** वः ! बालवय असून किती प्रौढ बुद्धि ही ! यांच्या चेहऱ्याकडे पाहतांच यांची विशाल बुद्धि अगदीं निर्बुद्ध आंधळ्यासही दिसून येईल ! बोलणें किती चाणाक्षपणाचें !

वसुंधरा : तें कांहीं विचारूं नका! आमच्या अरुंधतीची पुण्याई मोठी म्हणून आम्हांला या कौस्तुभरत्नाचा लाभ झाला आहे. वय इतकें लहान पण पोरपणाचें नांव नाहीं. बोलणेंचालणें, आचारविचार, मोठे प्रौढ; मन प्रेमळ आणि निर्मळ.

युवराज : मंडलेश्वर दरबारांत मुख्य सचिवाचा अधिकार बजावीत आहेत आणि वहिनीसाहेब आमच्या नर्मसचिवाची उणीव भरून काढीत आहेत; मी तर स्तुतिपाठक बंदिजनच म्हणणार होतों, पण —

वसुंधरा : मग थांबलांत कां? तुम्ही आपल्या गुणबंधानें आम्हांला बांधूनच ठेविलें आहे.

[ इंद्रायुध ईश्वराला प्रणाम करितो. ]

ईश्वर : आयुष्मान् व्हा. महाराज, माझ्या वेषावरून माझा पेशा ओळखूं येण्यासारखा नाहीं; माझ्या आशीर्वादांत दुसऱ्याच्या सुदैवाची घटना करण्याचें सामर्थ्य नसून मी स्वतःच दुर्दैवानें अगतिक झालों आहें. आपण मला प्रणाम करण्याइतकी माझी योग्यता नाहीं.

युवराज : या वेषांत असलेल्या प्रत्येकाला मी ईश्वर समजून प्रणाम करितों.

ईश्वर : मग मी नांवापुरता तरी या प्रणामाचा अधिकारी आहें खरा!

युवराज : तुमचें नांव ईश्वर तर? वहिनीसाहेबांना तुमच्याबद्दल बोलतांना मी पुष्कळदां ऐकिलें आहे. बरें, वहिनीसाहेबांनीं आतांच सांगितलें, कीं माझ्यांत पोरपण नाहीं म्हणून; पण अगदीं लहान मुलाच्या चंचलपणानें मी आपला निरोप घेतों. पुढें केव्हांही आपल्या दर्शनाला मी कृपाप्रसाद समजेन. वहिनीसाहेब, राजदर्शनाला जाण्यासाठीं मंडलेश्वर आपली वाट पाहात आहेत.

वसुंधरा : आणि हें सांगण्यासाठीं स्वतः तुम्ही आलांत?

युवराज : केवळ आपल्या आशीर्वादाच्या आशेनें! या पुण्यपदांचें दर्शन दिवसांतून कितीही वेळां घेतलें तरी समाधान होत नाहीं. आपलें माझ्यावरचें प्रेम मातृप्रेमापेक्षांही अधिक आहे. आपल्या दीनारालासुद्धां तें आपल्याकडे वळवून घेतां आलें नाहीं. या लब्राडाला झोंप लागली आहे वाटतें? स्वारीचें देवदर्शन डोळे मिटूनच झालें म्हणायचें! [ त्याच्याकडे पाहतो. ]

कंकण : ( स्वगत ) धन्य आहे या कंकणाची! बायकांना बेहोष करण्याकरितांच या कंकणाचा अवतार आहे असें मी नेहमीं म्हणतों तें कांहीं खोटें नाहीं. बिचाऱ्या दामिनीचे डोळे माझ्याकडे सारखे लागावेत यांत काय नवल? वसुंधराबाई पतिव्रता म्हणून गाजलेल्या ना! पण इतक्यांत तीन चार वेळां तरी



एच-२७३
११

त्यांनीं माझ्याकडे पाहिलें असेल! पण मीं कांहीं नजरेला नजर भिडूं दिली नाहीं अजून! हो, इतक्या स्वस्त्या भावानें विकून घेतल्यावर मग खरा रंगेलपणा कुठें राहिला! आपल्याकडे पाहणाऱ्या बायकांकडे पाठ फिरवून पळत्या सावजाच्या पाठीस लागलें तरच इष्काची खरी शिकार! बाकी या बायकांची तरी काय कसूर? तसा जवान समोर दिसला, कीं नजर फिरावयाचीच!

[ इकडे तिकडे पाहून उगाच हातवारे करितो. ]

वसुंधरा : कंकणा, रथ सिद्धनाथ मंदिरासमोर घेऊन यायला सांग.

कंकण : जशी आज्ञा! ( स्वगत ) मला वाटलेंच होतें, कीं कांहीं तरी निमित्त काढून बाईसाहेब माझ्याशीं बोलणार म्हणून! नाहींतर इकडची गाडी तिकडे कशाला न्यायला हवी होती?

वसुंधरा : ईश्वर मी जातें आतां! तुम्हांला वाटेल त्या वेळीं मला भेटत जा! युवराज, सिद्धनाथ मंदिराचें दर्शन घ्यायचें राहिलें आहे! दामिनी, हो पाहूं पुढें! ( जरा पुढें जाऊन व मागें वळून ) कंकणा, तूं अजून इथेंच? मोठा गैदी माणूस आहेस!

कंकण : चुकीची माफी असावी, बाईसाहेब! ( जातां जातां स्वगत ) पुन्हां तर्क बरोबर! जातांना मुद्दाम वळून पाहिलेंच! आणि हें रागाचें अवसान तर नुसतें जाळीदार! पलीकडचा चोरटा रंग छटान् छटा निरखून बघून घ्यावा.

[ ईश्वराखेरीज सर्व जातात. ईश्वर वसुंधरेकडे पाहत राहतो. एकीकडून नूपुर येतो. ]

नूपुर : ( स्वगत ) कुठल्याशा भाषापंडिताला म्हणे आपल्या सूत्रांतली एक मात्रा कमी करतां आली म्हणजे एक पुत्र झाल्याचा आनंद होत असे; पण माझ्या-सारख्या व्यवहारपंडिताला लोकांच्या सुताड्यागोताड्याबद्दल आपल्या माहितींत एक अक्षराची भर पडली म्हणजे एक पितर स्वर्गास गेल्यासारखें वाटतें! निदान दुसऱ्याचा एखादा पितर नरकांत पडल्याबद्दल तरी खातरजमा होते! त्यांतल्या त्यांत चोरट्या रागरंगाचें रहस्य कळलें म्हणजे तर बोलावयालाच नको–किंवा त्यांबद्दल सारखेंच बोलत राहावयाला पाहिजे! आजचा हा राग-रंग असाच अंधेरांतला आहेसा दिसतो! आडून बोलणें जरा ऐकायला यायला हवें होतें! ( ईश्वराच्या खांद्यावर हात मारून, उघड ) काय अवधूतमहाराज! आतां ही समाधि कधीं उतरणार? कोणत्या निर्गुण मूर्तीचें हें ध्यान चाललें आहे? तें मोठ्या घरचें जडावाचें जोखीम, कीं तो गरिबींतला मुलाम्याचा डाग?

ईश्वर : ( चपापून ) कोण तुम्ही? धाडसी बेशरमपणाची कमाल झाली!

नूपुर : होय! मग ब्रह्मर्षिमहाराज, देवाच्या साक्षीनें या गार्गीमैत्रेयींबरोबर कांहीं वेदान्ताची वाटाघाट करीत होतां वाटतें?

ईश्वर : अशा अनोळखी आचरटपणानें आतां एक शब्द अधिक बोलाल तर मला तुमची फाजील जीभ कापून बेताची करावी लागेल!

नूपुर : ( हंसून ) अखेर बरेच रागावलां कीं बैरागीबुवा! मला वाटलेंच होतें, कीं एकदोन फुंकरा मारल्याबरोबर तुमच्या अंगावरून ही वरवरची राख उडून जाईल आणि आंतला अंगार भडकून निघेल म्हणून! तुम्हांला राग येतो खरा, पण मग, या वेषानें त्या बायकांशीं कशाला बोलत राहिलां? अहो, असा चोरटा संबंध एकदां उघडकीस आला म्हणजे सारा गांव त्यासंबंधीं कायकरें करावयाला लागतो.

ईश्वर : तुम्ही बोलतां याला कांहीं प्रमाण आहे का?

नूपुर : त्याला कशाला पाहिजे आहे प्रमाण? लग्नाच्या जोडप्याखेरीज कोण-तींही स्त्रीपुरुषं कुठंही आणि कांहींही बोलतांना आढळलीं तर तेथें कांहीं तरी दगलबाजी असावयाचीच हें लोकशास्त्रांतलें महावाक्य!

ईश्वर : कोण पाजीपणाची कल्पना ही! हें पहा, ज्या स्त्रीशीं आतां मी बोलत होतों तीं मला माझ्या सख्ख्या बहिणीप्रमाणें आहे, समजलांत?

नूपुर : या बंधुप्रेमाची सारी भिस्त, आपण सर्व एकाच ईश्वराचीं लेंकरें आहों, या ऐसपैस नात्याच्या जोरावरच असेल ना? ठीक आहे, असा त्रागा केल्यानें जर लबाड्या लपल्या तर आणखी काय हवें होतें! हां हां म्हणतां, तुमचीं सारीं कुलंगडीं हुडकून काढून चवाठ्यावर आणतों. ( स्वगत ) आधीं तिकडे, त्या बायका कोणीकडे जातात त्याचा तलास काढावा आणि मग या गोसा-वड्याच्या मठीचा मार्ग काढावा! हा कांहीं वेळ इथेंच घोटाळत राहणारसें दिसतें. [ जातो. ]

ईश्वर : काय मनाचा नमुना आहे पहा!

[ त्याच्याकडे पाहात राहतो. इकडे घाटाच्या कठड्यामागून सुदाम उठून उभा राहतो व पुढें येतो. ]

सुदाम : ( स्वगत ) स्त्रीजात तेवढी निमकहराम! ज्योतिषी लोकांना अनंत योजनांवर रात्रीच्या काळोखांतून भटकणाऱ्या, आकाशांतल्या चांदण्यांच्या गति इथूनच बिनचूक ठरवून टाकितां आल्या; पण दिवसाढवळ्या, इथल्या-इथेंच उडणाऱ्या चटकचांदण्यांच्या हालचाली त्रिकालज्ञ ऋषींनाही समजण्या-सारख्या नाहींत. थोड्याशा आंकडेमोडीनें तारांचे वेध चटकन् घेतां येतात,

पण यांचें कोणाला, आणि यांना कोणाचे वेध लागतील हें कालत्रयींही कळावयाचें नाहीं. स्त्रियांचा भरंवसा धरणारा अगदीं मूर्खांतला मूर्ख! दामिनीला काय हंसायचें, ती माझ्यासारख्या सामान्य माणसाची बायको! पण ही वसुंधरा, एवढी थोरामोठ्याची स्त्री, पण वेमुर्वत या गोसावड्याशीं चकाट्या पिटीत बसली. तें कांहीं नाहीं; हा खेळ आणखी कांहीं वेळ असाच चालू राहिला तर बघतां बघतां, सुदाम आणि दामिनी हें जोडपें म्हणजे लोकांना हंसवायाचें साधन होऊन बसेल. हा राखेंतला रंगला घटकाभरं निरूपण कथीत बसलाच होता! तों गांवगुंड तर पाळतीवरच असल्यासारखा दिसतो! आतां आधीं या कानफाट्याचे चांगले कान उपटतों आणि मग त्या उठवळ बिजलीला नीट बांधून टाकितों. ( उघड ) अहो परमहंस, तुमचें उनाड पांखरूं मघांच उडून गेलें; आतां कशासाठीं देवाच्या दारीं धरणें धरिलें आहे हें!

ईश्वर : ( स्वगत ) हा तिसरा इब्लिस दिसतो; आणि याची ही वेडाची लहर अगदीं भडकलेली आहेशी वाटते. [ त्याच्याकडे पाहतो. ]

सुदाम : असा पाहतोस काय माझ्याकडे सुंभासारखा! कांहीं लाजलज्जा आहे का शिल्लक? का संसाराबरोबर तिचीही राखरांगोळी केली आहेस? हें बघ रे, ए गोसावड्या, तुम्ही बैरागीलोक मोठे बदमाष असतां! स्वतांचें घर एकदां सोडलें म्हणजे दुनियाचीं घरें तुम्हांला आपलींशीं होतात; आपल्या नुसत्या अंगाला भस्म चोपडतां पण दुसऱ्याचा सारा संसार भस्म करून टाकितां; आपल्या नांवावर पाणी सोडतांच लोकांचीं नांवें बुडवायला मोकळे! इकडे हातांतल्या चिमट्यानें चिलमीवर निखारे ठेवण्याचा जरा सराव होतो न होतो तोंच दुरून दुसऱ्याच्या अंतःकरणाला चिमटे घेऊन त्यावर अंगार ठेवण्याची तयारी! बैराग्याच्या एकेक माळेगणिक लग्नाची किमानपक्षीं हजार हजार माळ तरी तुटत असेल! वाल्या कोळ्यानें खड्यांनीं रांजण भरून आपण उडविलेली शिरगणती ठेवली होती, तशी मला वाटतें, बैराग्याची स्मरणी म्हणजे त्याच्या बदफैलीची मोजदादच असावी. ए राखुंडींतल्या रामोशा! पहा, मी इतकें बोलतों आहें, पण बेरड एक शब्द तरी बोलतो आहे का? नुसता तोंडाकडे पाहत सुद्धां नाही. ( ईश्वर हंसतो. ) तुझें हंसणें रास्त आहे; जाऊं दे, तुझ्यासारख्या तिऱ्हाइताला बोलण्यांत काय अर्थ! आपलाच दाम खोटा! छेः छेः, याचा बंदोबस्त केलाच पाहिजे. ( स्वगत ) या जगांत एखादें खरें तत्त्व असेल तर तें हेंच, कीं स्त्रीजात तेवढी निमकहराम!

विधात्या, कशाला या सुंदर जगांत ही हरामखोर जात पैदा केलीस ?

**ईश्वर :** ( स्वगत ) आतां आणखी कांहीं वेळ या जागींच थांबलों तर मला खात्रीनें वेड लागेल. कुठल्याशा देवस्थानाभोंवतीं भुताखेतांनीं पछाडलेल्या झाडांचें जंगलच्या जंगल जमत असतें अशी त्याची ख्याती आहे; त्याचप्रमाणें, बायकांच्या बाबतींत बहकलेल्या बेवकूफांची यात्रा जमण्याचें हें ठिकाण आहेसें दिसतें. काय एकेकाच्या स्त्रियांविषयीं भावना आहेत ! एकानें आल्या-गेल्या बाईकडे पाहून माकडासारखे चाळे करावे; दुसऱ्यानें त्या माकडचेष्टांवरच रामावांचून रामायण रचून काढावें आणि तिसऱ्यानें त्या तसल्या रामायणा-बरहुकूम, आपल्या सीतेसारख्या साध्वीला घरांतल्या घरांत वनवास भोगा-यला लावावा ! पण यांच्याकडे तरी काय दोष ? चांगल्या चांगल्या प्रतिष्ठितांना सुद्धां असल्या कुटाळक्या करण्यांत आणि बायकांबद्दलच्या वाटेल त्या गोष्टीवर बिनदिक्कत भरंवसा ठेवण्यांत जिथें लाज वाटत नाहीं तिथें हलक्या मनाच्या लोकांच्या कल्पना अशा असावयाच्याच ! सगुणमूर्तीची कल्पना करण्यासाठीं पशुपक्ष्यांत–अगदीं पाषाणांतसुद्धां प्रत्यक्ष परमेश्वराची प्राणप्रतिष्ठा करण्याइतकी उदार अशी आमची आर्यदृष्टि, आमच्या मुलींकडे, भगिनींकडे, अर्धांगींकडे आणि मातांकडे वळतांच अनुदारवृत्तीनें संकोच पावते आणि स्त्रियांमध्यें तिला साधी माणुसकीसुद्धां दिसेनाशी होते ! या असल्या पतितांचे विचार, नागर मनाला त्रासदायक तर खरेंच; पण एकेकदां मनःक्षोभ इतका आवेगाचा होतो, कीं अशा विचारांपैकीं साधारण प्रकारचे नमुने तरी लोकांसमोर मांडा-वेत आणि चारचौघांकडून या चारगटांचा उपहास करवावा ! पण जाऊं द्या हा विचार ! या दुःखदायक विचाराची लांबण तितक्याच प्रमाणानें मनाला संताप मात्र देईल. आपल्या साऱ्या सोयी अजून जमावयाच्या आहेत. [जातो.]

**सुदाम :** ( स्वगत ) मूर्खा सुदामा, भोग आपल्या लग्नाचीं फळं ! ( पाहून ) हा तो गांवगुंड आला वाटतें ? याच्या थोडें पोटांत शिरलें पाहिजे.

[ नूपुर येतो. ]

**नूपुर :** ( स्वगत ) हा कोण घुटमळतो आहे इथें ? स्वारीला घेरलें पाहिजे !

**सुदाम :** काय हो, आपलें नांव सांगाल का ?

**नूपुर :** माझ्या बारशाच्या पूर्वींच माझे आईबाप मेले, तेव्हां मला नांव ठेवण्याचें तसेंच राहिलें आहे. बरें, आपलें नांव ?

**सुदाम :** ( स्वगत ) अरे चोरा, मी तुझें बारसें जेवून बसलों आहें म्हणावें. ( उघड ) माझाही जरा असाच घोटाळा झालेला आहे. मला लोक रोजच्या

रोज इतकीं नांवें ठेवितात, कीं त्यांतून वेळेवर कोणतें सांगावें हेंच कळत नाहीं.

नूपुर : हरकत नाहीं, फिटंफाट झाली. आतां आपण एकमेकांना तात्पुरतीं नांवें ठेवूं या म्हणजे बोलायला चालायला सोयीचें पडेल. चला, आम्हीं ठेवलें तुमचें नांव सुदाम!

सुदाम : ( दचकून ) सुदाम !

नूपुर : काय चपापलां हो ? तुमचें खरें नांव एखाद्या अनोळखी माणसानें नेमकें सांगितलें असतें तरीसुद्धां तुम्ही इतके दचकलां नसतां !

सुदाम : तुम्ही पाहतांच आहां, कीं मी आहें जरा फाटक्या अंगाचा आणि तुम्ही म्हणालां मला सुदाम; तेव्हां सहजच वाटलें, कीं मला हिणविण्यासाठीं तुम्हीं असें नांव काढलें मुद्दाम.

नूपुर : अंः, तसें कांहीं नाहीं; त्याचें कारण वेगळेंच आहे. सांगूं तुम्हांला तसा मोका जुळून आला म्हणजे.

सुदाम : बरें, तें राहूं द्या; तुम्ही आतां बराच वेळ एवढ्यांतच फिरत होतां; एखादें रंगीबेरंगी पांखरूं जातांना दिसलें का इथून ?

नूपुर : छट्, चिटपांखरूं सुद्धां नाहीं.

सुदाम : काय बेगुमान थापा मारतां हो ! मी चांगला पाहतों आहें, तब्बल अर्धा घंटा तुम्ही इथून देहळणी ठेवून होतां त्या—

नूपुर : असें असें ! आतांच्या गंमतीबद्दल बोलतां होय तुम्ही ? आतां तुमच्या जवळ म्हणून बोलायला हरकत नाहीं, पण तें पांखरू म्हणजे एक अजब चीज आहे.

सुदाम : ( स्वगत ) अजब चीज ! स्त्रीजात तेवढी निमकहराम ! ( उघड ) दोघीं-तलें कोणतें पण तें ? वसुंधरा कीं तिची ती दासी ?

नूपुर : भले ! तुम्हांला तर नांवेंही पाठ आहेत; उगीच नाहीं लोक तुम्हांला नांवें ठेवीत ! अहो, वसुंधरेबद्दल बोलायला कशाला पाहिजे ? मोठ्या नदींत बारमहा पाणी असायचेंच ! मी त्या गांवगंगेबद्दल म्हणत होतों. पोरसवदाच आहे, पण अशी बाजिंदी बायको आहे ! छटेल तर इतकी आहे म्हणतां, गहिरी नजर आशाळभूतपणानें नुसती हरिणासारखी कावरीबावरी फिरकत होती इकडून तिकडे !

सुदाम : ( स्वगत ) बाजिंदी ! छटेल ! आमच्या पतिव्रतेनें कमाई तर खूप करून ठेविली आहे !

नूपुर : कां हो, अगदीं विचारांतसे पडलां ? कोणाला वाटेल, कीं तुमच्या

बायकोचीच तुमच्यापुढें नालस्ती चाललेली आहे !

सुदाम : ( स्वगत ) हा हरामखोर अगदीं वर्मी डाग देत आहे. ( उघड ) मलतेंच, तसा तिचा माझा कांहीं संबंध नाहीं; मी सहज विचारितों आहें. हो, आपलें माहीत असावें !

नूपुर : एवढेंच असेल तर फिकीर नाहीं; नाहींतर आमची मासलेवाईक मजा व्हायची ! बाकी मीसुद्धां तुमच्यासारखा नुसतीच माहिती मिळवीत आहें हो ! बोलण्यासारखी गोष्ट नाहीं, पण तुमच्याजवळ म्हणून सांगायला हरकत नाहीं. कान करा इकडे–बोलूं नका कुठें–हें पहा, बायकांच्या फंदांत कधीं पडूं नये; बायकांची जात बडी हरामखोर !

सुदाम : ( स्वगत ) स्त्रीजात तेवढी निमकहराम ! ( उघड ) तुमचें म्हणणें खरें आहे अगदीं अक्षरशः !

नूपुर : आतां हेंच पहा कीं चित्र ! गरिबींतल्या गरिबींत जिवाला हौस केवढी आहे ! तेवढ्यांतच लुगडें गंगाजमनी होतें ! दरिद्री छानछोक गरिबी-बरोबरच मनाचा उथळपणाही दाखविते ! कण्हेरीच्या कंगाल वासाकडे तिच्या रंगाच्या भिकारड्या भपक्यानेंच लक्ष जातें.

सुदाम : हां, कपड्यालत्त्यांत असा रंगेलपणा उपयोगाचा नाहीं हें खरेंच !

नूपुर : मुळींच उपयोगाचा नाहीं. तुमच्याजवळ म्हणून सांगून ठेवितों, नीट लक्षांत ठेवा–कपड्यालत्त्यांत छानछोकी, बोलण्यांत एवढासा मोकळेपणा, नजरेंत एवढीशी लोभी फिरकी–जराशी हसऱ्या डोळ्यांची आणि दाबलेल्या ओंठाची, निलाजरा लाजाळूपणा हीं दिसलीं, कीं हजार हिश्शांनीं तिथें लग्नीन-गांठ सैल आहे अशी खूणगांठ बांधून ठेवा !

सुदाम : इतक्या खाणाखुणा तरी कशाला हव्या ? नुसतें चालणें एकदां पाहिलें, कीं बाकी चाल चटकन् लक्षांत येते. तें शब्दांनीं सांगतां येत नाहीं नीटसें, पण एका पावलावरून परीक्षेला पटतें !

नूपुर : बस्, अगदीं अनुभवाचें बोललां; पटलें !

सुदाम : ( स्वगत ) हा बिलंदर मुद्दाम वेचक बोलतो आहे कीं काय ! ( उघड ) नशीब त्या बिचाऱ्या नवऱ्याचें !

नूपुर : तो अगदींच गलथान आहे म्हणतात. तुमच्यासारखाच फाटक्या अंगाचा आहे. मघांशीं मी तुम्हांला सुदाम म्हणून नांव दिलें तेंच त्याचें नांव ! मला तें आतांच समजलें, तेव्हां डोक्यांत ठसण्यासाठीं तुमच्या माथीं मारलें. या बाईचा नवरा सुदाम. हिच्या जपणीस बसण्यासाठीं स्वारी घरींच बेकार बसून

असते; आणि तरी हिचीं गांवांत देवदर्शनें चाललींच आहेत. तेव्हां आतां तो बेवकूब म्हणावयाचा कीं हिची शहामत म्हणायची ? आतां तुम्हीआम्ही जुटीनें या भानगडीच्या खनपटीस बसूं या! अगदीं बित्तंबातमी लागेपर्यंत थांबायचें म्हणून नाहीं.

सुदाम : पसंत आहे. एवढेंसें कांहीं समजलें, कीं एकमेकांना खबर द्यायची. आहे कबूल ?

नूपुर : कबूल ! तो नवरा हातीं सांपडायला पाहिजे होता हो ! म्हणजे खूप रंग आला असता तुम्हीही त्या बैलोबाच्या तपासांत असाच. चला. [ दोघेही जातात. ]

[ पडदा पडतो. ]

## प्रवेश दुसरा

[ स्थळ : वृंदावनाचा दिवाणखाना. कालिंदी केतनाला पाळण्यांत निजवीत आहे. ]

कालिंदी : वाजिवरे बाळा । वेल्हाळा । रुमझुम् घुंगुरवाळा ॥
अस्फुट विश्वाचें । प्रेमाचें । गाणें आनंदाचें ॥
वदलों जें नादीं । संवादीं । तुझिया जन्माआधीं ॥
पहिल्या प्रीतीचे । गमतीचे । कांहींसे भीतीचे ॥
बाळा ते बोल । तूं बोल । आज मनीं जे खोल ॥
रात्रीच्या काळीं । जों बसली । ब्रह्मानंदीं टाळी ॥
मनिं तेव्हां बाणे । जें गाणें । अस्फुट मंजुळवाणें ॥
धीर न परि हृदया । उघडाया । उघडपणें तें गाया ॥
हृदयीं खळबळलें । दरवळलें । विना ऐकिल्या कळलें ॥
गाणें मंजुळ तें । झुळझुळतें । तुझिया वाळ्यामधलें ॥
वाळा हालूं दे । बोलूं दे । आनंदें बोलूं दे ॥
एकच पायाचा । वाळ्याचा । नाच गोड बाळाचा ॥
ऐकुनि आनंदें । त्या छंदें । घर सगळें नाचूं दे ॥

( स्वगत ) वेडी तर नाहीं मी ! केतनाला निजविण्यासाठीं म्हणून गाणें म्हणतें आणि त्यांत त्याला घुंगरवाळा वाजविण्याचा आग्रह करितें ! त्यानें आतां करावें तरी काय ? बाकी अशा अचपळपणांत माझा केतन माझ्या इतक्या अर्ध्या वचनांत असावयाचा, कीं मीं घरांत एकाच पायाचा नाच करायला सांगितलें

तर ल्बाडाला दोन्ही पायांनीं घुंगुरवाळा वाजवितांना ब्रह्मांड अपुरें होईल. झाली, चांगले डोळे उघडून, माझ्याकडे पाहून हंसायला सुद्धां सुरवात झाली ! बाळ, पुरे झाला हा डोळ्यांचा नाच बरें ! निजा आतां ! वः, लगेच घेतले डोळे मिटून ! जसें कांहीं समजलें अगदीं बोललेलें ! गुणी बाळ, असे गुण केल्यामुळें माझ्या बाळबृहस्पतीला एखाद्याची दृष्ट लागली तर कसें बरें होईल ? हंः, यानें डोळे मिटून घेतांच माझ्या डोळ्यांपुढें वेड्यावांकड्या हजार गोष्टी उभ्या राहतात;या कोवळ्या देहाकडे पाहतांना उगीच कठोर विचार मनांत येतात; याला झोंप लागतांच माझी कल्पना जागी होते. कां बरें मला नेहमीं असें व्हावें ?

[ गोकुलमां लइ चालो० ]

व्याकुल हें मन होई कां । सतत कां त्यास छळ हा ॥ ध्रु० ॥
जगतिं न रंगे । विचारीं परी तरंगे । नच त्या कांहिं
विसावा हा ! ॥ १ ॥ अनलज्वाला । जाळिते अशी जिवाला ।
पसरी अंतरिं या दाहा ॥ २ ॥

इतक्या सुखाच्या सागरांत पडलें आहे तरीपण कांहीं तरी चुकल्यासारखें वाटतें ! जगाच्या खरेपणाबद्दल कांहींच खात्री वाटत नाहीं. माझ्याभोंवतीं हें सुखस्वप्न पसरलें असून दैवाच्या कसल्या तरी अकल्पित आघातानें मी एकदम जागी होईन आणि या सुखाला अंतरेन अशी अंतःकरणांत सारखी हुरहूर वाटते ! या सुखाच्या स्वप्नापेक्षां अगदीं स्वप्नाचें सुखसुद्धां किती तरी खरेपणाचें भासतें ! अतिसुखामुळें तर असें होत नसेल ? बाळा केतना, इतकी का मी पूर्वजन्मींची पापीण आहें, कीं तुझ्यासारखें रत्न मला–अगबाई, भलतेंच कांहींतरी मनांत यायला लागलें ! आज अजून कां बरें येणें झालें नाहीं ? समाधान तेवढें काय तें त्या मूर्तीच्या दर्शनानें ! पण त्यांच्याकडे पाहतांना तरी डोळ्यांची भीति कुठें मोडते आहे ? आतां डोळ्यांसमोर ती मूर्ति उभी करून वाटेल तितका वेळ पाहत बसेन; पण जर खरोखरींच येणें झालें तर–अगबाई, खरोखरींच येणें झालें !

[ उठून उभी राहते; वृंदावन येतो. ]

**वृंदावन :** ( स्वगत ) हिच्याकडे पाहिलें म्हणजे पूर्वजन्मावर विश्वास ठेवासा वाटूं लागतो; एरवीं, या जन्मीं या दुर्दैवी जीवानें असें कोणतें पाप केलें आहे, कीं त्याबद्दल अष्टौप्रहर असा मनाचा मुका मार सहन करावा लागावा ! वृंदावन आणि कालिंदी ! लग्नाचें सोंग करून मीं हिला उगाच दुःखांत पाडिली आहे. मी हिच्याशीं मोकळेपणानें वागत नाहीं हें हिच्या पुरतेपणीं लक्षांत आलें

आहेसें दिसतें; आणि मी तरी हें सोंग यथासांग किती दिवस करीत बसूं ? या नाटकाचा मला आतां इतका वीट आला आहे, कीं—पण आतां कुरकुर करून काय उपयोग ? माझ्या लौकिकासाठीं मला हें सारें केलेंच पाहिजे. ( उघड ) प्रखर सूर्याच्या प्रकाशांत कोमेजणारी नाजूक कुमुदिनी चंद्राच्या कोवळ्या किरणांनीं तरी खुलते; आठ महिने गप्प बसलेल्या कोकिळेला वसंतऋतूंत तरी कंठ फुटतो; पण इथें तर कधीं कळी उमलायची नाहीं आणि तोंडांतून शब्द निघायचा नाहीं. कालिंदी, सुंदर स्त्रियांना खुलविणारा एखादा दिव्य मंत्र पुरुषांना जर सांपडला तर त्याचा विधि समाधीपेक्षांही अवघड असला तरी पुरुष त्याचा अष्टौप्रहर जप करीत बसतील.

कालिंदी : मग तसें नाहीं कुठें ! पुरुषांनीं नुसता कानमंत्र सांगतांनासुद्धां जरी इकडे तिकडे केलें तरी बायकांच्या गालावरच्या गुलाबाची तेव्हांच खुलावट होते ना ? विधि नको आणि मंत्राचा जप नको ! अगदीं मुक्यानेंच एवढेंच होतें.

वृंदावन : हं, बोल, बोल, स्पष्ट भ्याल्यावांचून बोल पाहूं ! कालिंदी, काय तुझें मन हें ? एवढे शब्द बोलतांना तुला दम लागला: ओंठ सुकून गेले; कावरीबावरी नजर छपविण्यासाठीं डोळे खालीं वळले! वेडे, तुझी छातीसुद्धां धडधड करायला लागली आहे! बोलूं लागलीस म्हणजे इतकें चांगलें बोलतेस,कीं मनाचे कान आणि जिवाचें भान करून तें ऐकत रहावें ! पण मोकळ्या मनाचीं मौजेचीं भाषणें बोलताना तूं नवशिक्या गुन्हेगारापेक्षांही जास्त भेदरून जातेस ! आणखी किती दिवस तूं मला भिणार? आरंभींच्या अनोळखी अल्लडपणाला भीति साजून गेली ! पण आतां —मूल झाल्यावरसुद्धां—आतां आपला केतन चांगला आठदहा महिन्यांचा झाला असेल —अजून भित्रेपणाच ! नवाईच्या नव्हाळीची ही मनाची मुकी माया मनोहर तर खरीच; पण मुका मुलगा कधींतरी चालत्या बोलत्या रंगरूपाला आल्यावांचून स्त्रीत्वाचें सार्थक होत नाहीं ! कालिंदी, आतां तूं आपण होऊन बोलली नाहींस तर यापुढें मी एक अक्षरही बोलणार नाहीं ! ( कांहीं वेळ थांबून ) या केतनाशीं चार चार घटका सारखी बोलत असतेस आणि मी एका शब्दालाही महाग झालों ? तें कांहीं नाहीं ! कालिंदी, तुला माझी शपथ आहे, माझ्या प्रश्नाचें अगदीं मोकळ्या मनानें उत्तर दे पाहूं ! तुझें आयुष्य अगदीं सुखांत जात आहे का ? (कालिंदी वृंदावनाकडे पाहते.) हें पहा; माझ्या मनाचा कल ओळखण्यासाठीं तूं अनिश्चयाच्या शोधक दृष्टीनें माझ्याकडे पाहूं लागलीस ! कालिंदी, मीं अनुकूल उत्तराच्या अपेक्षेनें हा

प्रश्न टाकला नाहीं ! आपल्या संसारांत तूं पूर्ण सुखी आहेस का ?

कालिंदी : सर्वेश्वरा, आपण सुखी आहां का ?

वृंदावन : मी अगदीं पूर्ण सुखांत आहें.

कालिंदी : मग मीहि पूर्ण सुखांतच आहें ! जीवितेश्वरा, मला आपल्याहून निराळें जीवित आहे का ? या देहाची मी छाया; छायेची हालचाल देहाच्या जीवनशक्तीनें होते ! तिला भिन्न इच्छा, भिन्न जीवन कुठून असणार ? आपल्या श्वासोच्छ्वासानेंच माझा जीवनप्रवाह चालत असतो. कालिंदीच्या हृदयाचे व्यापार तिथें विराजणारी वृंदावनांची मूर्तिच करिते !

वृंदावन : कालिंदी ! माझी शपथ घातली तरी सुद्धां तूं खोटें सांगितलेंस ! तुझी जीवनवृत्ति खरोखरींच छायेप्रमाणें निर्जीव आहे ! तुझें समाधान हताश हृदयापेक्षांही शून्यवृत्तीचें वाटतें ! अल्लड वयांतल्या विविध विकारांचें ठाणें उठल्यामुळें तुझ्या चेहऱ्यावर उजाड वस्तीच्या गांवठाणाचा ओसाडपणा पसरलेला दिसतो ! ( तिचे हात आपल्या हातांत घेतो. ) कालिंदी, माझ्याजवळ खोटें कां बरें बोलतेस ? तू दुःखीकष्टी आहेस याचा मला मुळींच संशय नाहीं; मग त्याच्या कारणाविषयींच मला संशयांत कां ठेवितेस ?

कालिंदी : ( त्याच्या गळ्याला मिठी मारून ) असें आपल्याला कशावरून वाटतें ?

वृंदावन : पुष्कळ दिवसांच्या सूक्ष्म अनुभवानें मीं हें ओळखलें आहे. तुझी आणि माझी अजून पुरती दिलजमाई झाली नाहीं ! तूं आपण होऊन मला कधीं आलिंगन दिलें नाहींस ! पण मी तुझे हात माझ्या मानेजवळ आणतांच त्यांचा विळखा इतका जोराचा बसतो, कीं प्रीतीच्या भरतीची उसळणारी उत्कंठा थोपवून ठेविल्याचें ताबडतोब लक्षांत येतें. माझी नजर चुकवून माझ्याकडे पाहतांना, माझ्या चेहऱ्यावरून कांहींतरी हुडकून काढण्याचा तुझा प्रयत्न चाललेला असतो ! हातांत हात घालून माझीं बोटें दाबतांना सभय उत्सुकता दिसून येते ! विनोदप्रसंगीं माझ्या हंसण्याबरोबर ताबडतोब आपलें हंसूंही थांबविण्यासाठीं, हंसण्याच्या उत्कट भरांतसुद्धां माझ्याकडे पाहण्याच्या सावधगिरीचा तुला विसर पडत नाहीं. बोलतांना शेवटीं एक शब्द ओंठावरच घुटमळून पुन्हां हृदयांत जाऊन दडून बसतो ! कालिंदी, तो शब्द आपल्या दिलजमीचा आडपडदा आहे ! कुठल्या तरी दुःखी संशयाचा कृष्णमेघ तुझ्या हृदयांत सारखा घुटमळत राहिलेला असतो. हें पहा, तुझ्या डोळ्यांत पाणी तरंगूं लागलें, ही त्याच मेघाची वृष्टि ! हां; ते अश्रु पुसूं नकोस, तुझ्या हृदयाला, त्यांतल्या दुःखदायक रहस्याला बाहेर येऊं दे. कालिंदी, माझ्यापासून आपलें

दुःख लपवूं नकोस !

कालिंदी : हृदयसंपुटांत सांठवून ठेविलेल्या या प्राणजीवनापासून मी काय लपवून ठेवणार ? प्राणेश्वरा, क्षमा करा; मीं आपल्याला फसविलें खरें ! पण तें केवळ आपल्या मनाला त्रास होऊं नये म्हणून !

वृंदावन : वेडी ! वेडी आणखी हट्टी ! चटदिशीं आपलें मनोगत मला सांगून दुःखमुक्त हो ! अशी रडूं नकोस. इतक्यांत हंसत होतीस, आतां रडूं लागलीस ! मुलाच्या मनाप्रमाणें तुझें मन सुखदुःखांच्या ऊनसांवलींत माझ्याशीं लपंडाव खेळत आहे. मला वाटतें, पोर झालें म्हणजे त्याच्या सहवासानें बायकांचें मनसुद्धां पोरकट होत जातें ! हं, सांगतेस ना तुझ्या दुःखाचें कारण ?

कालिंदी : माझें दुःख मीं आपल्याला सांगितलें तर आपण माझ्याबद्दल म्हटलें तेंच मी आपणांबद्दल म्हणतें असें नाहींना आपण म्हणणार ? माझें रहस्य सांगणें म्हणजे मीं आपलें रहस्य ऐकणें असें आपल्याला वाटलें तर आपण माझ्यावर रागावणार नाहीं ना ? आपल्या प्रश्नाचें उत्तर माझ्या प्रश्नानें दिलें तर चालेल का ?

वृंदावन : तुझा प्रश्न ? माझें रहस्य ? कालिंदी, तूं काय म्हणतेस हेंच मला कळत नाहीं. कोणतें माझें रहस्य ?

कालिंदी : ( एकदम हुंदका देऊन व त्याला मिठी मारून ) आपल्याला राग आला ? मला आपल्या या मुद्रेचें भय—प्राणेश्वरा, मी नावडती आहें म्हणून का हा राग ? जीवितेश्वरा, मला संभाळा, मी आपल्यालाच भ्यालें आहें, मला संभाळणारही आपणच !

वृंदावन : ( स्वगत ) हिला धीर दिला नाहीं तर हिचे भीतीनें प्राण जातील ! ( उघड ) कालिंदी ! काय हें ? वर पहा ! ( ती वर पाहते. स्वगत ) काय हे हिचे डोळे ! शिकारी कुत्र्यांच्या भेसूर हाकाटीनें भेदरून एखाद्या झुडपाखालीं दबा धरून बसलेल्या भेकड सशाचे डोळेसुद्धां इतक्या शून्य वृत्तीनें, इतक्या साशंक भीतीनें आणि इतक्या तीव्र शोधकतेनें स्थिरावत नसतील. ( उघड ) कालिंदी, भिऊं नकोस; तूं मला नावडती आहेस असें तुला कां वाटतें ?

कालिंदी : आपल्या उग्र मुद्रेची मला अजून भीति वाटते ! प्राणांपलीकडे लपविलेल्या शंकेचे शब्द बाहेर काढितांना प्राणही कंठाशीं येऊन अगदीं कोंडल्यासारखें झालें आहे.

वृंदावन : माझी मुद्रा तुला उग्र वाटते ? वेडे, अशी भलतीच जन्माची समजूत करून घेतलीस तर मला कायमची भीत राहशील. कदाचित् माझा तिटकाराही

करूं लागशील !

कालिंदी : नाहीं, नाहीं; आपली मुद्रा जात्या उग्र नाहीं; आपला मूळचा चेहरा इतका सोज्वळ आहे, कीं स्त्रीदृष्टीला त्याचा मोह सोडावासा वाटणार नाहीं; आपलें विशाल अंतःकरण पुरतेपणीं दाखविण्याजोग्या या डोळ्यांत प्रतिबिंब-रूपानें शिरून, त्या अंतःकरणांत प्रीतिभावानें स्थिर होण्यासाठीं कोणती स्त्री झटणार नाहीं ? आपल्या मांसल आणि मृदु कराचा आधार मिळतांच संसार-यात्रेंतून स्वर्गापर्यंत निभावून जाण्याची कोणत्या स्त्रीला खात्री पटणार नाहीं ? ( पाहून ) नका, नका, असे निश्वास टाकूं नका ! आपल्या वर्णनांत स्तुतीचा संशय येऊन तिला आपण अपात्र आहां अशी मनोमन साक्ष पटल्यामुळें आपण ओशाळलेल्या नजरेनें माझ्याकडे पाहूं लागलां म्हणजे माझा धीर तुटून मी भांबावल्यासारखी होतें ! आपल्या हृदयाबद्दल मी माझ्या मनाची ग्वाही देतें ! हें काय ? आपण जास्तच खिन्न होत आहां ! आपल्याला आत्मविश्वासानें ही स्तुति खरी कां बरें वाटत नाहीं ? कोणत्या गोष्टीच्या आठ-वणीनें आपण—पण वेडीवांकडी कल्पना आपल्या मनांत कशी येणार ? मग माझ्याशीं अशी प्रतारणा—( रडत ) याच गोष्टीमुळें, मी आपल्याला आवडत नाहीं असें मला वाटूं लागतें.

वृंदावन : पण न आवडण्याचें कांहीं कारण आहे का ?

कालिंदी : आपल्या उदार दृष्टीला कदाचित् दिसलीं नाहींत म्हणून माझीं मला सुद्धां तीं कारणें दिसल्यावांचून कशीं राहतील ? आपल्या-माझ्यांतलें अंतर थोडें का आहे ? आपल्यासारख्या बावन्न बिरुदांच्या धन्याला शिलेदारी शिरपेचांची शोभाच साजून दिसायची ! माझी आपली सांवळ्या तुळशीची साधीभोळी मंजुळा ! प्रीतीची पूजा बांधायला नुसतीं तुळशीपत्रें कशीं पुरणार ? पुरुष आधीं रूपाकडे पाहतात; आणि तसेंच सौंदर्य माझ्या कपाळीं मुळीं नाहीं ! माझें कपाळ अगदींच बारीक नाहीं का ?

वृंदावन : सुखाप्रमाणेंच सौंदर्यालाही रहावयाला फार जागा लागत नाहीं ! तुझ्या लहान कपाळावर माझ्या जीविताच्या आणि तुझ्या सौभाग्याच्या या कुंकुमाकृति राजमुद्रेला अक्षय राहण्याइतकी जागा मिळाली म्हणजे आपल्या सुखाप्रमाणेंच आपण दोघेही चिरंजीव होऊं !

कालिंदी : अगबाई, आपल्या आशीर्वादांतून आपल्या केतनाला कां बरें वगळायचें झालें ?

वृंदावन : लाडके, त्याची आपल्या सुखांतच जमा झाली ! केतन आपल्या

सुखाचा भागीदार नसून भाग मात्र आहे ! पण तुझीं कारणें तशींच राहिलीं ?

कालिंदी : आपण थट्टेवारीं नेत आहां; मी आपली खऱ्या भावानें सांगून टाकतें.

वृंदावन : काय ही कल्पना ! माझ्या वर्तनांत तुला कधीं संशयाला जागा मिळाली आहे का ?

कालिंदी : आतांपर्यंतच्या आपल्या बोलण्यानें मला इतका धीर आलेला आहे कीं आपल्याजवळ सारें बोलून टाकायचा मीं आज निधडा निश्चय केला आहे. मी वेडी आहें, भावडी आहें पण आपली आहें ! मी माझ्या सुखासाठीं बोलत नाहीं; माझ्यामुळें आपल्याला त्रास होतो अशी माझी खात्री झाली तर आपल्या पुण्यमय सुखाच्या मार्गातून मी क्षणमात्रांत दूर होईन. मला राहून राहून असें वाटण्याचें कारण सांगितलें तर आपण माझ्यावर रागावूं मात्र नका. कधीं कधीं आपण सुखाच्या पूर्ण भरांत असतांना मध्येंच विमनस्क होतां; बोलण्याच्या ओघांत क्षणभर – अगदीं अर्धा क्षणच पण—एकदम थांबतां; वस्तुमात्राकडे नेहमीं शोधक वृत्तीनें पाहणारी आपली दृष्टि एकाएकींच शून्यवृत्ति होते; चालत्या विषयाच्या भर मध्यांत प्रारंभींच्या सामान्य संबंधानें सुरवात करितां; सवाल समजून घेतल्यावांचून जबाब देतां; डोळ्यांनीं जगाला पाहत नाहीं आणि दिसत नाहीं ! त्यावेळीं आपल्या डोळ्यांत एकलेपणानें माझी बाहुली बसविण्याची मला भीति वाटते; आपल्या जीवनक्रमाच्या सर्व प्रयत्नांत अतृप्त इच्छेची आतुर तीव्रता दिसून येते ! नाथ, अशा वेळीं माझ्या मनांत काळवाकाळव उत्पन्न होते. नाथ, क्षमा करा. आपल्या ठिकाणीं वाइटाची कल्पनासुद्धां करण्याची माझी योग्यता नाहीं. पण भांबावलेल्या बुद्धीला दारुण शंका – प्राणेश्वरा, या चुकलेल्या दासीला संभाळून घ्या – आपल्या ठिकाणीं भलती भावना संभवत नाहीं अशा कल्पनेनें मी विचार करूं लागलें म्हणजे मी आपल्याला नावडती आहें, माझ्यामुळें आपण असंतुष्ट आहांत असेंच मला वाटावयाला लागतें; मला याच दृष्टीनें पहावेंसें वाटतें ! सर्वेश्वरा, मी आणखी बोलणार आहें. माझा हा अपराध शेवटचा आहे. मी बोलूं का ? माझ्या जिवाच्या परमेश्वरा, रात्रीं बोलतां बोलतां अखेर आपण शांत होतों त्या वेळीं आपल्या रहस्याच्या विचारानें आपल्याला झोंप येत नाहीं. आपण जागे असल्यामुळें मला झोंप येत नाहीं. त्या निश्चेष्ट स्थितींत आपण आपल्या रहस्याचा शेवट शोधून काढण्यासाठीं झटत असतां; मी त्या रहस्याचा आरंभ हुडकून काढण्याचा यत्न करीत असतें ! नाइलाजानें पिळलेल्या आपल्या जीवाचे जड निश्वास वाऱ्यावर

तरंगूं लागले म्हणजे त्या काळोखाच्या पडद्यावर मी कल्पनेनें आपल्या रहस्यांतल्या स्त्रीची प्रतिमा रेखाटण्यासाठीं—नाथ, आपण केवढ्यानें दचकलांत ?

[ उठून दूर उभी राहते; वृंदावन तिजकडे पाहतो. ]

**वृंदावन :** माझ्या रहस्यांतली स्त्री ? कशावरून ? स्त्रीचा त्यांत काय संबंध ?

**कालिंदी :** माझी पुरी खात्री आहे, कीं आपलें रहस्य स्त्रीविषयक आहे ! हें मीं कसें ओळखलें हें सांगणें फारसें कठीण नाहीं ! पण आतांच्या आपल्या दचकण्यानें मला पुन्हां भीति वाटते ! आपल्याला नकोशी असलेली गोष्ट माझ्याकडून बोलण्यांत निघाली का ?

**वृंदावन :** माझें रहस्य स्त्रीविषयक आहे हें कशावरून ओळखलेंस सांग पाहूं ?

**कालिंदी :** हें ओळखण्यांत अवघड तें काय असायचें आहे ! तरुण अंगांना परस्परांचा स्पर्शसहवास होतांच बुद्धीला बधिरता येते, कांपणाऱ्या अंगाबरोबर विचार तरळूं लागतात; पुरुषाला त्या स्थितींत स्त्रीखेरीज दुसऱ्या गोष्टीबद्दल विचार करितां येत नाहीं; पण आपण अशा स्थितींतही कशाचें तरी एकाग्रतेनें चिंतन करितां; त्या वेळीं स्त्रीखेरीज दुसरा विषय असायचा नाहीं आणि ती स्त्री मी तर खास नाहीं; कारण माझ्या निकट सहवासांत, माझ्याबद्दल तटस्थपणानें चिंतन करण्याचें कारण नाहीं ! म्हणून आपल्या रहस्यांत, माझ्याखेरीज दुसऱ्या कुठल्या तरी स्त्रीशीं संबंध असावा असा मीं सरळ सरळ तर्क केला !

**वृंदावन :** कालिंदी, तुझ्या चातुर्याची, बुद्धिमत्तेची आणि अवलोकनशक्तीची कशी स्तुति करावी हेंच कळत नाहीं ! तुझी अलौकिक बुद्धिमत्ता पाहून मी आज चकित झालों आहें !

**कालिंदी :** ही बुद्धिमत्ता नाहीं; स्वहिताच्या कळकळीनें आणि दक्षतेनें एकाच गोष्टीकडे सारखें लक्ष देत बसलें म्हणजे सामान्य बुद्धीलासुद्धां तितक्यापुरतीं लोकोत्तर बुद्धिमत्तेचीं कार्यें करितां येतात. ज्या रहस्याशीं माझ्या जीवनाचा सर्वस्वीं संबंध, त्याबद्दल इतकीशी कल्पना अधिक का होते ? आपलें रहस्य मला मुळींच कळलें नाहीं म्हणून तर मी अशी दुःखांत आहें ! प्राणेश्वरा, तें रहस्य मला सांगायला कांहीं हरकत आहे का ?

**वृंदावन :** तें समजून घेऊन तुला काय करायचें आहे ? यद्यपि त्यांत एका स्त्रीचा खरोखरीच संबंध असला [तरी तो तुझ्या सुखाच्या आड येत नाहीं ! माझ्यावर तुझा भरंवसा आहे ना ?

**कालिंदी :** माझ्या प्राणांवर माझा भरंवसा कसा नसेल ! आपल्या त्या कार्यांत आपल्याला यश येण्यासाठीं देवाजवळ प्रसाद मागतां यावा म्हणूनच तें

जाणण्याची माझी इच्छा आहे. प्रियजनांच्या प्रेमळ आशीर्वादानें आपल्या प्रयत्नाला परमेश्वराचें बळ येतें. मग माझ्याजवळून तें रहस्य कां बरें आड ठेवायचें ? माझा आपल्यावर पूर्ण विश्वास; आणि आपला मात्र माझ्यावर कां बरें नसावा ?

वृंदावन : ( स्वगत ) ही नसती पीडा गळ्यांत बांधून मी निष्कारण फसल्यासारखा झालों आहें ! माझ्या मनांतून आपल्याबद्दलच्या कल्पना पार निघून गेल्या असें वसुंधरेला भासविण्यासाठीं बाह्यात्कारी हें बायकोचें बाव्हलें पुढें ठेवण्याच्या धांदलींत, ही हत्या मीं आपल्यामागें लावून घेतली ! इतक्या विश्वासपूर्ण, निष्कपट आणि सरळ हृदयाजवळ खोटें तरी काय बोलायचें ? ( उघड ) कालिंदी, क्षमा कर; एवढ्या एका रहस्याखेरीज आपल्या दोघांत कसलाही आडपडदा नाहीं; नाइलाजामुळें तें मात्र मला आज सांगतां येत नाहीं. हं, अशी निराश होऊं नकोस, खिन्न होऊं नकोस; त्याचा तुझ्या सुखाशीं कांहींएक संबंध नाहीं. तुझ्या संसाराच्या सीमेच्या तें सर्वस्वीं बाहेर आहे ! माझ्या मानहानीची भरपाई करून घेण्यासाठींच माझा हा सारा खटाटोप आहे. त्याचा संबंध माझ्या पराक्रमाशीं---( स्वगत ) सत्याच्या आणखी जवळ गेलें पाहिजे--( उघड ) माझ्या पुरुषार्थाशीं आहे !

कालिंदी : मग त्या भावी पराक्रमाची, पुरुषार्थाची कथा मला ऐकायला काय बरें आडकाठी आहे ?

वृंदावन : विचारी पुरुषानें आपल्या भावी पराक्रमाची कल्पना कोणालाच होऊं देऊं नये ! त्यांतून नवऱ्यानें बायकोजवळ तर आपल्या पुरुषार्थाच्या कर्तबगारीच्या रहस्याचा उल्लेख फारच जपून करायला पाहिजे. नवऱ्याच्या नांवाचा मोठेपणा चारचौघांत केव्हां गाजवीन असें तिला होऊन जातें. पतीच्या पुरुषार्थासंबंधानें रहस्यांतलें रहस्यसुद्धां स्त्रीजवळ ठराविक मुदतीबाहेर ठरत नाहीं ! या गोष्टीची केतनासारखीं पाळण्यांतलीं पोरेंसुद्धां साक्ष देतील !

कालिंदी : मला नाहीं, पण आपल्या चिमुकल्या केतनाला तरी आपल्या पराक्रमी पुण्याईचे पोवाडे ऐकवायचे होते ! भगवंताच्या तोंडून चक्रव्यूहभेदाचें वर्णन गर्भांतच ऐकल्यामुळें अभिमन्युकुमारांनीं केवढा पराक्रम केला बरें ?

वृंदावन : लोकोत्तर पुरुषांच्या जीवनांतल्या सुखशांतीच्या प्रसंगांकडेच आपली आशाळभूत दृष्टि नेहमीं पाहत असते; तुझा केतन अभिमन्यूसारखा पराक्रमी व्हावला पाहिजे ना ? पण सौभद्राप्रमाणें सोळाव्या वर्षीच समरभूमीवर त्याला मरण---

[ कालिंदी वृंदावनाच्या तोंडावर हात ठेविते. ]

कालिंदी : अगबाई, हें काय भलतेंच बोलणें! काळवेळेची शकुनवंती मोठी वाईट असते हो. वेळ कांहीं सांगून येत नाहीं.

वृंदावन : माझ्या तोंडावर हात ठेवलास, पण सर्वभक्षी काळाच्या तोंडाला हात देतां येणार आहे का?

कालिंदी : माझ्या गळ्याची शपथ आहे! असलें भलतें बोलूं नये. या निर्दय विनोदानें माझें हृदय दुभंगून जाईलसें वाटतें! आपलें रहस्य मला समजूं नये अशीच आपली इच्छा दिसते; मी तरी ती मोडण्याचा हेका कशाला धरूं! आपण सांगितलें तेवढ्यानेंच माझें समाधान होईल! एकदां शेवटचे शब्द सांगून माझे हेतु पुरविणार ना? आपल्या मनांत माझ्याबद्दल विकल्प नाहीं ना?

वृंदावन : प्रेमळ, विश्रब्ध जीवा! नाहीं, नाहीं, नाहीं! माझें तुझ्यावर पूर्ण प्रेम आहे! वृंदावन सर्वस्वीं तुझाच आहे. या रहस्यापुरता एक कोंपरा सोडून माझें सारें हृदय तुझेंच आहे! या हृदयावर विश्वासानें मस्तक ठेवून अशीच कल्पांतापर्यंत विसावा घे! ( कालिंदी त्याच्या हृदयावर मस्तक ठेविते. ) हां, आधीं एवढें कबूल कर, कीं आजपासून आपण होऊन तूं मला आलिंगन देशील आणि आपल्या प्रेमसंवादांत पहिला शब्द तुझा असेल! दे पाहूं मला असें वचन!

कालिंदी : आज नवीन वचनच कशाला हवें? देवांच्या, जीवाजीवांच्या साक्षीनें हातांत हात दिला त्याच वेळीं मीं माझ्या सर्वस्वाचें वचन दिलेलें आहे! या आनंदाश्रूंनीं आज त्याच्यावर उदक मात्र सोडतें!

वृंदावन : ( स्वगत ) या नाजूक नादांत बहकून मी कांहींच्या कांहींच बरळत चाललों आहें! वसुंधरेला भ्रष्ट करण्याचा माझा निश्चय हृदयाचे धागे तुटून सारखा ढळत चालला आहे! सत्य, सौंदर्य आणि बुद्धिमत्ता यांच्या त्रिवेणी-संगमांत न्हाणाऱ्या माझ्या हृदयांतून क्रूर कल्पनासुद्धां धवळून निघत आहेत! एकदां वाटतें, सूडाच्या कल्पना सोडून, मनाची अढी मोडून, मनमोकळेपणानें हिला सर्व सांगून टाकावें; त्या उत्कटतेच्या भरांत हिचे डोळे पाण्यानें भरून आले म्हणजे त्या प्रेमाश्रूंच्या पुष्करणींत प्रतिबिंबरूपानें मंगलस्नान करून पावन व्हावें! हे कोमल मना, तसें करायला कोणती हरकत आहे? ही सुखाची सृष्टि सोडून सूडाच्या वणव्यांत होरपळत पडण्यांत काय अर्थ आहे? जें मन वसुंधरेच्या प्रखर गुणांनीं दिपलें नाहीं, भूपालाच्या शुद्ध स्नेहरसांत विरलें नाहीं, तें मन या प्रेमकरुण मुखाच्या स्पर्शानें निवळून जाऊं देणार

नाहीं हा अभिमान कशाला हवा? ( तिच्या तोंडावरून हात फिरवितो. )

**कालिंदी :** अहाहा! नाथ, जें पाहिजे होतें तें मिळालें! मला हा आपल्या खऱ्याखुऱ्या प्रेमाचा हात आज लाभत आहे! प्रीतीनें प्रीतीला ओळखलें! हृदयाला हृदयाची साक्ष पटली! प्राणेश्वरा, आतां मात्र मी धन्य, धन्य, त्रिवार धन्य झालें! माझ्या जीविताची इच्छा तृप्त झाली! मला अक्षय समाधानाची जोड मिळाली! हें प्रेम, हें हृदय आतां मात्र या भाग्यशाली कालिंदीला कायमचें लाभलें! हे प्रेमस्वरूप परमेश्वरा, तुझ्या लपल्या स्वरूपाची ही पहिली भेट आयुष्याच्या अखेरीपर्यंत या मिटलेल्या डोळ्यांसमोर अशीच अखंड ठेव! [ त्याच्या हृदयावर डोळे मिटून मस्तक ठेवते. ]

**वृंदावन :** ( स्वगत ) हिनें आपले डोळे मिटून घेतांच माझे डोळे खाडकन् उघडले! घटकेच्या गोड बोलण्यानें माझें मन नादान होऊन मी उभ्या आयुष्याच्या एकाच इच्छेला झुगारून देत होतों! हा प्रसंग आवरता घेतला पाहिजे! आणि पुन्हां कधींही न घडूं दिला पाहिजे. कोमल चंद्रिकेनें कठीण चंद्रकांत पाझरतो; झुळझुळत्या झऱ्याच्या नाजूक झरणीनें काळ्याकभिन्न कड्यालाहि कंगोरा पडतो! त्याप्रमाणें हिच्या अश्रूंच्या झिरपणीनें माझ्या हृदयाचेंही पाणी होऊन जाईल. हिच्या प्रेमळ जीवाच्या हलक्या हातांनीं सूडाचीं दोरखंडें तुटून बांधलेला जीव मोकळा होईल खरा; पण मग त्याला माझ्या हृदयाच्या बाहेरच हिंडावें लागेल! मेलेल्या सुडाच्या प्रेतविचाराची हृदयांत त्याला भीति वाटेल! वस्तुलाभ आणि सुख यांच्यांत जमीनअस्मानाचें अंतर आहे! हें वाटेवरचें प्रेम मिळवून मी काय करूं? मला जें पाहिजे तेंच मी मिळवीन! स्पर्धेत पायदळीं पडलेली माझी प्रतिष्ठा भूपालाला मस्तकीं धारण करावयाला लावीन. नाहींतर दुर्लभतेच्या विजयोत्साहानें वसुंधरेच्या डोळ्यांनीं माझ्याकडे पाहिल्यानंतर कालिंदीच्या प्रेमांध डोळ्यांत मला काय दिसणार आहे? हें प्रेमाचें सोंग पुरें झालें! वसुंधरेचा हार स्वीकारण्यासाठीं ही गळ्यांतली घोरपड हळूहळू दूर केलीच पाहिजे! ( उघड ) लाडके, तूं बोलत कां नाहींस?

**कालिंदी :** प्रणयचंद्रा, तृप्ति बोलत नाहीं! इच्छा प्रयत्नांनीं धडपडत असते. आशा डोळ्यांत एकवटून पाहत असते; पण तृप्ति समाधानाच्या समाधींत डोळे मिटून बसते आणि मुकी असते! अंग अंगाशीं, हृदय हृदयाशीं, जीव जीवाशीं मुक्या बोलांनीं बोलत असतां नादब्रह्माचा विलय होतो!

**वृंदावन :** ( स्वगत ) ही प्रेमाच्या कल्पनेंत पार गुंगून गेली आहे! याच

स्थितींत मान दाबून हिला मारून टाकूं का? म्हणजे कायमचा मोकळा झालों!

कालिंदी : प्राणेश्वरा, माणसाला मागितलें मरण कां बरें मिळूं नये? अगबाई, आपण पुन्हां चपापलां? आणि तें सुद्धां केवढ्यानें!

वृंदावन : तू मरणाची गोष्ट काढण्यापूर्वी माझ्याही मनांत मरणाबद्दलचाच विचार आला होता! आपल्या विचारांचा विलक्षण योग पाहून मी एकदम चकित झालों!

कालिंदी : हृदयाशीं हृदय समरस झाल्यावर एकच विचार दोन्ही ठिकाणीं वावरत असल्यास नवल नाहीं! हृदयाची एकाच शब्दाची धडधडणारी भाषा अनेक शब्दांच्या कल्लोळांत आपण विसरल्यामुळें आपल्याला हृदयाचे खेळ कळत नाहींत! आकाशांत गडगडणारा देवाचा एकाच शब्दाचा संदेश आपल्याला कळत नसल्यामुळें देवाची सहजलीला आपणांला गूढ स्वरूपाची वाटूं लागते! पण नाथ, मरणाच्या विचारांत असें दचकण्यासारखें काय आहे तें?

वृंदावन : प्रेमामृताचें पान करीत असतांना मरणाची कल्पना विसंगत वाटत नाहीं का? सुखसागरांत पोहत असतांना चिरजीवनाची इच्छा कोण करणार नाहीं!

कालिंदी : छेः छेः नाथ, चिरजीवनांत सुख नाहीं; मृत्यूनेंच जगाला मनोहर केलें आहे! मरणामुळेंच माणसाला मोल येतें. प्रेमाला मरणाचें भय नसेल तर त्याबद्दल सभय उत्कंठा कधींच वाटणार नाहीं! नाशाच्या भीतीमुळें सुखाबद्दल सारखी गोड हुरहुर वाटत असते; संसाराची सारी गोडी नश्वरतेंत–अगदीं अविश्वासी क्षणभंगुरतेंतच आहे! प्रेमांत अमृतासारखें नीरस, एकरूप चिरजीवन असेल तर त्याच्या स्पर्शानें हृदयाची भित्री धडधड एकदम बंद पडेल; दृष्टींतून करुण मुद्रेची आशा नाहींशी होईल! प्रेम अमृतमय नाहीं! मदिरेच्या बेफाम धुंदींत अफूची गुंगी आणि भांगेची थरारणारी तल्लीनता मिसळून परमेश्वरानें प्रेमाचा प्याला निर्माण केला आहे! प्रेमाच्या निशेंत गुंगलेल्या जीवाला सुखाच्या सागरांत पोहण्याइतकी जाणीव नसते! सुखसागरांत बुडून जीव कोंडून मरण्यांतच प्रेमाचा शेवट व्हायला पाहिजे! प्रेमाच्या जहरी निशेनें बेभान, बेहोष, होऊन, चढत्या लहरींनीं सर्वांग थरारून निघत असतांना डोळ्यांवर धुंदीची झापड पडली असतांना, अगदीं श्वासोच्छ्वास करण्याचाही विसर पडून हा जीव ठायींच्या ठायीं विरून गेला

तर आणखी काय पाहिजे ? या प्रेमसौभाग्याच्या भर बहारींत आपल्या वक्षःस्थलावर असें मंगल मरण आलें तर माझ्या भाग्याची उजरी होईल. अशीं भाग्याचीं मरणें मिळूं लागलीं तर जीविताचे कष्ट जन्मोजन्मीं वहावयाला कोण तयार होणार नाहीं ! प्राणवल्लभा ! या वेळीं, या स्थितींत तें मोलाचें मरण मला तुमच्याच हातांनीं द्या ! नाथ, प्रेमाच्या भरांत मी वाटेल तें बरळूं लागलें आहें ! प्रेमाच्या धुंदींत माझा तोल संभाळून मला सांवरून धरा !

[ त्याच्या खांद्यावर मान टाकून पडते. ]

**वृंदावन :** ( स्वगत ) या निर्जीव पुतळीला मारून टाकण्यांत तरी काय पुरुषार्थ आहे ? हा नाटकी देखावा आतां बस्स झाला ! ( उघड ) कालिंदी, किती वेळ अशी वेड्यासारखी उभी रहाणार ? या कोमल तनूला बांधल्यासारखें होणार नाहीं का ?

**कालिंदी :** जीवींच्या जिवलगा, आपण प्रेमाच्या जीवंत जादूनें जिवाला भारून टाकिल्यामुळें शरीराला अवघडल्यासारखें मुळींच वाटत नाहीं ! जगदीश्वरा, माझ्या प्रेमसमाधींतच माझा लय करून टाक.

**वृंदावन :** ( स्वगत ) आतां या पिंजऱ्यांतून माझी सुटका होणार तरी कशी ? कंकणाला बाहेर थांबावयाला सांगितलें आहे, तो तरी आडदांडपणानें आंत येईल तर काय बहार होईल ! माझ्या शहाणपणापेक्षां त्याच्या मूर्खपणाच्याच तूर्त मला जास्त उपयोग होण्यासारखा आहे !

**कालिंदी :** अगबाई, केतन जागा झाला वाटतें ! आतां घुंगुरवाळा वाजला, का झोंपेंत सुद्धां माझा चिमुकला माझी आशा पाळीत आहे ! किंकिणी, जरा इकडे ये पाहूं ! ( किंकिणी येते. ) केतनाला आंत नेऊन निजीव बरें ! वाऱ्याच्या झोतानें त्याची झोंपमोड होतेशी दिसते.

**वृंदावन :** आणखी हें पहा, किंकिणी, बाहेर कंकण आला असेल त्याला आंत पाठवून दे ! कालिंदी–लाडके, मला कंकणाशीं दोन शब्द बोलायचे आहेत ! ( किंकिणी केतनाला घेऊन जाते. ) म्हणून तूंसुद्धां जरा आंतल्या दिवाणखान्यांत जातेस का ?

[ कंकण येतो. ]

**कालिंदी :** आतां मी इथें राहिलें तर काय हरकत आहे बरें ? त्या एका रहस्या-खेरीज —

**वृंदावन :** त्याच रहस्याबद्दल मला कंकणाशीं बोलावयाचें आहे.

**कालिंदी :** एकजीव झालेल्या जीवांत बिघाड करणारीं हीं रहस्यें कशाला हवींत

कुणाला ठाऊक ? जगांत गुप्त रहस्यें मुळींच नसलीं तर चालणार नाहीं का ?

**वृंदावन :** रहस्यावांचून जग कसें चालेल ? आपला आतांचाच प्रणयसंवाद लोकांनीं ऐकिलेला तुला आवडेल का ?

**कालिंदी :** घरोघरीं त्याचींच पारायणें होत असल्यामुळें तो ऐकण्याची सवड कोणाला मिळणार ? या रहस्याच्या नादांत आज आपण वेतनाचा मुका मुद्धां घेतला नाहीं.

**वृंदावन :** हं, रागावूं नकोस; हा घे आणि त्याला नेऊन दे !

**कालिंदी :** भलतेंच ! प्रेमाच्या बाजारांतली देवघेव दलालामार्फत होत नाहीं.

**वृंदावन :** प्रेमाच्या व्यवहारशून्य जगांत तर दोन जीवांचा एकजीव झाल्यावरच चुंबनांची देवघेव दलालामार्फत करावी लागते ! बरें, माझी विनंती मान्य करणार ना ? (कालिंदी जाते. तिच्याकडे पहात स्वगत ) हिच्या बोलण्याचा कोंवळा परिणाम दूर करावयाला कंकणाची कर्कश भाषाच आतां हवी आहे !

**कंकण :** ( स्वगत ) धनीसाहेब बोलण्यांत पटाईत असतील कदाचित्; पण इष्काच्या बाबतींतले पांचपेंच त्यांना बिलकुल समजत नाहींत; कालिंदीबाई-साहेब आपलें रहस्य ऐकण्यासाठीं उभ्या राहताहेत असें धनीसाहेबांना वाटत आहे; पण बाईसाहेबांचें रहस्य काय आहे हें त्यांचें त्यांना ठाऊक कीं एक मला ठाऊक ! खास त्या माझ्यावर खुष असल्या पाहिजेत ! आजचा मिशांचा हा रुबाब अगदींच फुकट गेला नाहीं म्हणायचा !

**वृंदावन :** कंकणा, आज मी तुला फारच महत्त्वाचें काम सांगणार आहें ! तूं आपल्या स्थितीचा नीट विचार केला आहेस का ?

**कंकण :** काय संबंध विचाराचा ! एकदां ठरवून टाकिलेल्या गोष्टींखेरीज मी कसलाच विचार करीत नाहीं ! वरिष्ठांचे पाय धरावेत, कनिष्ठांना पायाखालीं तुडवावें; लढाईत शत्रूच्या मानेवर हात, एरवीं सुंदर स्त्रियांच्या गळ्यांत हात ! शत्रूंचे तलवारीनें आणि मित्रांचे केसानें गळे कापायचे ! खऱ्याखोट्याची शहानिशा करायची फक्त तनख्याचे दाम मोजून घेतांना ! तलवारीनें होण्या-सारखें काम असेल तिथें उगीच वटवट करायची नाहीं ! कामगिरी असली तर कसूरीचें नांव नाहीं; रिकामा वेळ बायकांची चौकशी करण्यांत घालवितों ! असा सीधा रस्ता आहे माझा ! मनुष्याला उभ्या जन्मांत विचार करण्याचा प्रसंगच येतो कुठें मुळीं !

**वृंदावन :** शाबास ! या तुझ्या सरळपणामुळेंच माझा तुझ्यावर मोठा विश्वास बसला आहे ! तुझ्या स्थितीबद्दल विचार करायचा म्हणजे असा, कीं तुला

मोठ्या अधिकाराची इच्छा आहे का? तुला द्रव्याची अडचण आहे का?

**कंकण :** असें म्हणतां होय? लढाईतल्या लुटालुटीवर द्रव्याची अडचण निभावून नेतां कशीबशी! पण अधिकाराचा कमीपणा आहे तो कबूल केलाच पाहिजे!

**वृंदावन :** मी आतां तुला जें काम सांगणार आहें तें चोख बजाविलेंस तर तुला कल्पनेबाहेर मोठा अधिकार मिळवून देण्याचें मी वचन देतों. मात्र या गोष्टींतील एक अक्षरही कोणाला समजतां कामा नये!

**कंकण :** मी कोणत्या रीतीनें आपली खात्री करून देऊं? एखादा लफंगा माझ्याजागीं असता तर त्यानें ताडदिशीं शपथ वाहिली असती आणि आपल्या शब्दाची आपल्याला प्राणांपेक्षांही ज्यास्त चाड आहे अशी थाप मारून तो मोकळा झाला असता! मी आहें सच्चा माणूस! मला स्वतांच्या शब्दाची दुसऱ्याच्या प्राणांइतकीच किंमत वाटते!

**वृंन्दावन :** ठीक आहे; तुला माझा स्वभाव माहीत आहेच; माझ्या सांगण्यांतलें एक अक्षर बाहेर फुटलें तर तुला आपल्या प्राणाला मुकावें लागेल!

**कंकण :** आपण मला आज इतकीं वर्षें पोटच्या मुलाप्रमाणें पाळिलें त्याचा मोबदला मी अशा रीतीनें देईन काय?

**वृंदावन :** बरें, या कामांत पापपुण्याचा प्रश्न आला तर?

**कंकण :** त्याबद्दल आपण बेफिकीर असा! पापपुण्यांत मुळींच तफावत नाहीं अशी माझी समजूत आहे! सत्यासाठीं हरिश्चंद्रानें तारामतीलासुद्धां विकलें; पण तेवढ्यामुळें त्याच्या गळ्याभोंवतीं गांवच्या बायकांचा गराडा पडला असें कांहीं झालें नाहीं! धर्माच्या नादानें पांडवांनीं सत्याखातर रानावनांत दिवस काढले, त्यांनासुद्धां कांहीं नगास एकेक द्रौपदी लाभली नाहीं! बरें, उलट सोळा हजार एकशें आठ नारींपैकीं–गोपी नकाच धरूं जमेला–एकीनेंसुद्धां कृष्णानें चोऱ्यामाऱ्या केल्याबद्दल नाखुषी दाखविली नाहीं! तेव्हां पुण्याईनें कुणीं काय मिळविलें आहे सांगा! आपण पापपुण्याची बिलकुल जिकीर करीत नाहीं! आपला जो हुकूम असेल तो खुशाल सांगा!

**वृंदावन :** इकडे कर कान तुझा! (कंकणाच्या कानांत कांहीं सांगतो.) समजलास नीट?

**कंकण–बस!** हेंच काय तें काम? नुसतें मारेकऱ्याचे सोंग आणायचें; थोडेसें खोटें बोलायचें; शेवटीं महाराजांचे पाय धरायचे आणि भरपूर रडायचें! आणि एवढ्याबद्दल आपण मला अधिकाराची जागा देणार?

**वृंदावन :** हो; शिवाय, अधिकारसुद्धां लहानसहान नाहीं, माझीच जागा तुला

देणार आहें ! अगदीं जन्माची नेमणूक !

**कंकण :** काय म्हणतां ! एक दिवस हें काम करण्याबद्दल एवढ्या अधिकाराची जन्मभर जोड ! मी तर एका दिवसापुरतां आपला अधिकार मिळविण्यासाठीं जन्मभर अशीं कामें करीत रहावयालसुद्धां तयार होईन ! धनीसाहेब, केवढा उदारपणा आपला हा ! अरेरे, असल्या उदार पुरुषाच्या ठिकाणींसुद्धां त्याच्या बायकोची निष्ठा अढळ राहूं नये ही केवढी नामुष्कीची गोष्ट आहे !

**वृंदावन :** काय म्हणालास, कंकणा ? कालिंदीची निष्ठा अढळ नाहीं ?

**कंकण :** कसूर माफ करा धनीसाहेब ! त्यांची निष्ठा आपल्या या एकनिष्ठ सेवकाच्या ठिकाणीं जरा चळली आहे खरी !

**वृंदावन :** काय मूर्ख आहे ! तुझ्या ठिकाणीं ? [ हंसतो. ]

**कंकण :** धनीसाहेब, ह्यांत हंसण्यसारखें कांहींच नाहीं ! चाकरांच्या वाट्याला धन्याचीं जुनींपानीं वस्त्रें, अंगवस्त्रें, अर्धा—

**वृंदावन :** बेवकुफ ! तुझी जीभ फारच लांब व्हायला लागली !

**कंकण :** धनीसाहेब, माफ करा, पण धनीनोकरांमध्यें बोलण्याची फाजील लगट जिथें होते तिथें नोकराची जीभ लांबत नसून, बहुतकरून धन्याचे कानच लांब झालेले असतात, असें मीं ऐकलें आहे !

**वृंदावन :** ( स्वगत ) माझ्यापेक्षां उंच दर्जाच्या भूपालाला याच्या हातानें खालीं लोटण्यासाठीं थोडावेळ तरी याला असें डोक्यावर बसवून घेणें भाग आहे.

**कंकण :** धनीसाहेब, माझ्या बोलण्याचा राग येऊन आपण आपला बेत बदलीत तर नाहींना ?

**वृंदावन :** एक वेळ तुला क्षमा करतां ! हं, एवढें लक्षांत मात्र ठेव, कीं तुला तुझें बक्षिस मात्र ताबडतोब देतां येणार नाहीं ! कांहीं दिवस थांबावें लागेल !

**कंकण :** मोठ्या आनंदानें थांबेन ! खरें म्हटलें तर आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्याला सुद्धां ह्या जागेसाठीं आपल्या मरणापर्यंतच थांबायला हवें; मग मी तर किती कमी दर्जाचा मनुष्य ! मला थोडेंसें थांबायला काय हरकत आहे ? बरें हा थाट कधीं घडवून आणायचा हें नाहीं सांगितलें अजून ?

**वृंदावन :** तें अजून ठरलेलं नाहीं. आयत्या वेळीं सांगेन तुला !

**कंकण :** जरा आधीं कळलें तर थोडें बरें होईल म्हणतों !

**वृंदावन :** कां ?

**कंकण :** म्हणजे आम्हां मर्दांची लढाईतली कापाकापीची करामत बायकांना डोळ्यांनीं पहावयाला कांहीं कधीं सांपडत नाहीं; त्यामुळें त्यांच्याजवळ आमचा

असावा तसा बोज असत नाहीं; आतां ही घरबैटी संधि आली आहे; तेव्हां म्हटलें, युवराजांना मारतेवेळीं माझ्या ओळखीच्या चार दोन बायकांना–नको, दोन चार नकोत–निदान आपल्या किंकिणीला तरी पहावयाला बोलवावी!

**वृंदावन :** अगदीं मूर्ख आहेस! इतक्यांत दोन चुक्या केल्यास! एक तिथें कोणाला मारावयाचें नाहीं हें विसरलास आणि तसेंच, ही गोष्ट अगदीं गुप्त ठेवायची आहे हेंही लक्ष्यांत ठेवलें नाहींस! विचार केल्यावांचून वरळलास खरा!

**कंकण :** मीं आधींच सांगितलें आहे, कीं मी भलत्या बाबतींत कधीं विचारच करीत नाहीं म्हणून!

**वृंदावन :** बरें, सध्यां तूं जा; संध्याकाळीं तुला पुन्हां नीट समजावून सांगेन. मात्र एखाद्या दोस्ताजवळ हें बडबडूं नकोस!

**कंकण :** आधीं मला फारसे दोस्त नाहींत; एक तेवढा सुदाम काय तो माझा मित्र! पण आम्ही बायकांखेरीज दुसऱ्या बाबतींत बोलतच नाहीं कधीं! मी परक्यांच्या बायकांकडे नेहमीं वाईट नजरेनें पाहणारा आणि तो स्वतांच्याच बायकोकडे वाईट नजरेनें पाहणारा! शिवाय, तोसुद्धां मोठा इमानी मनुष्य आहे.

**वृंदावन :** असें का? थांब मग! सुदाम हा दामिनीचा नवरा, नव्हे का? आपलें काम तडीस गेलें तर त्याचीही आपल्याला जरूर लागेल. भूपालाच्या वाड्यावर पहारा करायला तो कबूल झाला तर पहा; शिवाय तळघरांत वसुंधरेच्या दिमतीसाठीं दामिनीची जरूर आहेच! त्याला नीट सावधगिरीनें सांगून पहा!

**कंकण :** ठीक आहे.

**वृंदावन :** पण त्याच्याजवळसुद्धां उगीच फाजील बोलूं नकोस! जा तूं आतां.

[ कंकण जातो. ]

**वृंदावन :** ( स्वगत ) कालिंदीबद्दल भलतेच शब्द ऐकल्याबरोबर माझ्या मनाला इतका धक्का कां बरें बसावा? जें मनापासून नको त्याच्या शुभाशुभानें मत्सर वाटणें हा मनुष्याचा मनोधर्मच नाहीं! खास, तिच्याविषयीं माझ्या मनांत कांहींतरी भावना निःसंशय उत्पन्न झाली असलीच पाहिजे! ती भावना आपले-पणाची–सहवासपरिचयाची–प्रेमाची तर नसेल्ना? कदाचित् मृदु हृदयाची निंदा–सौंदर्याची हेटाळणी–असल्या पातकी तोंडांतून ऐकल्यामुळें रसिक मनाचा हा स्वाभाविक रागही असेल! स्त्रियांबद्दल पाजीपणाच्या कल्पना बाळग-णाऱ्या या पापी कंकणाचे–कंकण पापी–नुसत्या मूर्ख कल्पनांमुळे तो पापी, आणि

मग मी कोण ? सूडाच्या समाधानासाठीं–करारी मनाची राक्षसी वासना पुरविण्याकरितां, निर्दोष मित्राला–निस्सीम पतिव्रतेला–छेः ! हा विचारच काढून टाकिला पाहिजे! ठरवून टाकिलेल्या गोष्टींखेरीज इतरांचा विचार कसा तो करावयाचा नाहीं, हा कंकणाचा गुरुमंत्रच मला घेतला पाहिजे ! ज्याला दुष्ट व्हायचें असेल, कल्पनातीत पातकें करावयाचीं असतील त्यानें विचाराला थारा देऊन चालायचें नाहीं! निढावलेल्या पातक्यांना विसांव्याच्या वेळीं मादक व्यसनांची जरूरी वाटते ती एवढ्याचमुळें असावी ! कालिंदीच्या कोमल सहवासानें हृदयाला तद्रूप करण्यापेक्षां त्याला कंकणासारख्याच्या फरसबंदी दिलाचीच सोबत दिली पाहिजे ! भूपालाचा कपाळमोक्ष करायला कंकणासारखा शुद्ध फत्तर हातीं आला हाच या कार्याला शुभ शकुन ! ठरलें, कायमचें ठरलें, कीं इतःपर कोणत्याही गोष्टीचा विचार म्हणून करायचा नाहीं ! [ जातो. ]

## प्रवेश तिसरा

[ किंकिणी प्रविष्ट ]

**किंकिणी** :–( स्वगत ) कालिंदीबाईसाहेबांप्रमाणें वागायचें, व्हायचें–मेला शंभर वेळां मनाचा निर्धार केला असेल तरी अजून कांहीं साधत नाहीं ! चारचौघी बायकांत त्यांचें आपलें नेहमीं चांगलें नांव निघतें! हें मेलें माझ्या लग्नाचें अजून जमत नाहीं, त्यामुळें मला जिथें तिथें खालीं मान घालावी लागते ! चांगलेंसें स्थळच मिळत नाहीं एखादें ! कुठें कांहीं, कुठें कांहीं, आपला कांहीं तरी उणा पक्ष निघतोच ! काय करावें, कांहीं सुचेनासें झालें आहे !

[ पिया सोते अटारिया० ]

दशा आतां अशापरी अजूनि जाईना [ उपाय कांहिं ना ।
मना तें साहिना ॥ ध्रु० ॥ प्रयात्न हा करि महा । योग तरी
न पहा । तिळभरि मान कसा तो राहिना ॥ १ ॥

[ नूपुर प्रवेश करितो. ]

**किंकिणी** : अगबाई, नूपुर, वर्दीवांचून असें येऊं नये आंत तडक. कालिंदीबाईना भेटाल का असे एकदम ?

**नूपुर** : किंकिणी, कालिंदीबाईचें अनुकरण करण्याचें हें वेड सोडून दे

आतां एकदां !

**किंकिणी :** अनुकरण म्हणजे वेडच वाटतें ?

[ उपचार मुजे० ]

अनुकार जना ने हा कालांतरिं थोर पदा। छळि विहास
हा असला आर्धी त्या सदा ॥ ध्रु० ॥ हा निश्चय कधिं
न ढळे। प्राणान्तहि आला जरि। न मन तिळमात्र चळे।
ये त्याप्रति यश तोंवरि। करिन यत्ना परि। कल्पांत घडला तरि
ही तापवीन तनु ॥

**नूपुर :** असें कोणतें यश मिळवावयाचें राहिलें आहे तें ?

**किंकिणी :** कोणतें म्हणून नव्यानेंच विचारतां अगदीं ! अहो, कालिंदीबाईनीं सांगितल्याप्रमाणें अगदीं निर्दोष नवरा मिळवायचा हें ! त्यांच्यासारखेंच माझेंही नशीब पटदिशीं उघडायचें आहे ! कुठें लग्नाचें कुणाशीं जमत नाहीं म्हणून तर सारी आपदा ही !

**नूपुर :** ती आपदा टाळण्यासाठीं तर मी असा फेऱ्या मारतों आहें तुझ्या घरीं। माझ्याशीं लग्न करण्याबद्दल काय ठरविलें आहेस तूं अखेर ?

**किंकिणी :** तुमच्याशीं ? तुमच्याशीं माझें तर मुळींच पटायचें नाहीं !

**नूपुर :** अग, आतां नाहीं पटणार कदाचित्; चार दिवसांनीं आपोआप पटत जाईल ! तरुणपणीं ज्यांचें नीटसें पटत नाहीं तींच माणसें पोक्तवयांत चांगल्या सलोख्यानें वागतात; तीन आणि सहांचे निर्जीव आंकडेसुद्धां ऐन छत्तिशीच्या भरांत एकमेकांचीं तोंडें पहात नाहींत, पण तेच साठी उचलून गेल्यावर परस्परांचे पक्के स्नेही झालेले दृष्टीस पडतात. माझ्यांत असा कोणता दुर्गुण दिसला तुला, सांग पाहूं ?

**किंकिणी :** बरें, तसा म्हणण्यासारखा सद्गुण तरी कोणता आहे तुमच्यांत ? तुमच्यापेक्षां आतां कंकण येणार आहेत त्यांच्याशींच–

**नूपुर :** कंकणाचे तरी असे कोणते गुण वायां चालले आहेत कळूं देत ?

**किंकिणी :** त्यांचा मुख्य गुण म्हणजे त्यांचें शौर्य ! त्यांच्यासारखा तलवारबहाद्दर पाहूं जातां सांपडावयाचा नाहीं !

**नूपुर :** कसलें आलें आहे शौर्य ? आमच्या घराण्यांत सुद्धां शौर्य कांहीं कमी नाहीं ! मी अजून एखाद्या लढाईवर गेलों नाहीं म्हणून ! ही बघितलीस तरवार ? दाखवूं दोन पट्ट्याचे हात करून ?

**किंकिणी :** तलवारीचे हात शत्रूला करून दाखवायचे असतात; बायकांना नाहीं !

आतां कंकण आले म्हणजे त्यांनाच दाखवा बघूं तलवार तुमची !

नूपुर : येऊं देत, कंकणाला येऊं देत! या तलवारीनें त्याला उभा चिरून त्याच्या अगडबंब देहाचे शतखंड तुकडे करून टाकतों ! जमीनदोस्त करितों ! स्वर्गात रवानगी करितो ! या वेळीं कंकण यायला मात्र पाहिजे; तलवार कशी तळपते आहे ! कंकणा, कंकणा, खरा मर्द असशील तर ये पुढें !

[ कंकण एकदम पुढें येतो. ]

कंकण : हा पहा कंकण पुढें उभा आहे !

नूपुर : अरे बापरे ! ( किंकिणीच्या मागें जाऊन उभा राहतो. )

कंकण : जमीनदोस्त ! स्वर्गात रवानगी ! शतखंड तुकडे ! किंकिणी, या भेकड चोराची यांपैकीं कोणती दशा करूं सांग. हा वीर तुझ्या नुसत्या हुकमाची वाट पाहत आहे !

नूपुर : तूं वीर ! तुला धर्मयुद्धाचे ढोबळ नियमसुद्धां माहीत नाहींत. तूं शास्त्रसिद्ध मार्गानें जाणारा धर्मयोद्धा नसून माजलेला गळेकापू आहेस ! बायकांच्या पाठीमागें दडलेल्या वीरावर हत्यार चालवितोस ? धिक्कार असो तुला ! राणी-वशांत लपलेल्या दशरथावर भार्गवरामानें परशु चालविला नाहीं; अरे, शिखंडीच्यासुद्धां आड झालेल्या अर्जुनाला भीष्माचे बाण शिवले नाहींत, आणि तूं माझ्यावर तलवार उपसतोस ?

कंकण : मग असा पुढें ये; मी तयार आहें !

नूपुर : प्रेमासाठीं प्रतिस्पर्धा म्हणजे तुझ्यासारख्या रेड्याबरोबर साठमारी नव्हे. नाहींतर तुझ्या या दाढीमिशीच्या जंगलाला तेव्हांच वणवा लावून दिला असता ! पण मी भिऊन पळालेला वीर आहें ! माझ्यावर शस्त्र चालविण्याचा तुला काय अधिकार आहे ?

कंकण : किंकिणीवर माझें प्रेम आहे; तिच्याजवळ लगट करणारावर मी अलबत तलवार चालविणार !

नूपुर : माझंही तिच्यावर प्रेम आहे ! तिचें तुझ्याशीं कांहीं लग्न नाहीं लागलेलें अजून ! माळावरची माती कोणींही उपसावी ! हा प्रेमाचा सामना आहे ! चल, आपापले गुणावगुण किंकिणीला सांगूं; तिच्या पसंतीवर ही गोष्ट आहे. प्रेमांत आणि युद्धांत सर्व कांहीं क्षम्य आहे; किंकिणी, या नंदीबैलाला नीट थोपटून धर !

किंकिणी : कंकण, हे नूपुर म्हणतात तें खरें आहे ! कालिंदीबाईसाहेबसुद्धां नेहमीं असंच म्हणतात. तुम्हीं यांच्यावर तलवार चालवून भागायचं नाहीं.

कंकण : पण हा जर—

नूपुर : मूर्खा, अजून पणच ! सुंदर स्त्रियांची आज्ञा त्यांच्या वल्लभांनीं मानिलीच पाहिजे, हा प्रेमशास्त्रांतला पहिला सिद्धान्त आहे.

कंकण : किंकिणी, तुझी आज्ञा मला प्रमाण आहे ! ही मी माझी तलवार ठेवून देतों.

[ नूपुर पुढें येतो. ]

नूपुर : ( स्वगत ) दैवानें खैर केली ! त्या सैतनाला समोर पाहतांच पुरी त्रेधा उडाली होती माझी ! सर्वांगाला दरदरून घाम सुटून तोंडाचें पाणी पळालें आणि जीभ कोरडी पडली ! शरीर खिळल्यासारखें होऊन डोकें फिरावयाला लागलें ! ( उघड ) आतां ये असा मैदानांत आणि कर आपल्या गुणांचें आणि प्रेमाचें वर्णन पाहूं !

कंकण : किंकिणी, मी पिढीजाद लढवय्या आहें ! माझ्या एकाही पूर्वजानें लढाईत प्राण देतांना मागेंपुढें पाहिलें नाहीं हें तुला लक्षांत ठेविलें पाहिजे !

नूपुर : तुझ्या एकाही पूर्वजाशीं आपल्याला लग्न लावायचें नाहीं हेंही तिनें लक्षांत ठेविलें पाहिजे. पूर्वजांच्या लौकिकाप्रमाणें मुलगा निपजतोच असें कांहीं नाहीं. दरोबस्त बापासारखा बेटा निपजूं लागला तर जगाच्या इतिहासांत नांवें बदलण्यापलीकडे कांहींच फेरफार करण्याची जरूर राहणार नाहीं !

कंकण : मीसुद्धां त्यांना शोभण्यासारखाच आहें ! लाथ मारीन तिथें पाणी काढीन अशी धमक आहे माझ्या अंगांत !

नूपुर : पुढें पुढें या प्रतिज्ञेचा शेवट, घरांतल्या घरांत बायकोला लाथ मारून तिच्या डोळ्यांतून पाणी काढण्यांतच होत जातो.

कंकण : असें कां म्हणतोस ? माझी कर्तबगारी जगांत मशहूर आहे ! किंकिणीनें डोळ्यांनीं पाहिलीं नसतील इतकीं डोकीं रणांगणांवर मीं उडविलेलीं आहेत !

नूपुर : ही केवळ कसाबकरणी आहे; लग्नप्रसंगीं त्या मुंडक्यांची मुंडावळ बांधून तिला कालिकेची कळा आणावयाची आहे वाटतें ? एरवीं तुझ्यासारख्या भेसूर काळभैरवाला कशी शोभून दिसणार ती ?

कंकण : मी भेसूर काळभैरव ! मग मी जातांना मागें बेहोष बायकांचे मुडदे पडतात ते उगाच वाटतें ! ही किंकिणीच काय ती अशी भेटली, आणि म्हणून तर तिला खूप करून घेण्याचा मी अट्टाहास करितां आहें इतका !

नूपुर : ते बायकांचे मुडदे भेदरल्यामुळें पडले असतील ! असा काळारोम झोटिंग पाहून कोण भिणार नाहीं !

कंकण : नखरेबाज नाजूकपणाला पुरुषाचें सौंदर्य समजत नाहींत; मी तर सौंद-

यालासुद्धां पुरुषाचा गुण म्हणत नाहीं. मर्दाचा चेहरा रुबाबदार पाहिजे; त्याला दाढीमिशीची वेलबुट्टी पाहिजे !

नूपुर : तुझ्या तोंडांतून निघणाऱ्या उडाणटप्पू शब्दांना कोंडून ठेवण्यासाठीं हें केसांचें कांटेरी कुंपण देवानें केलेलें आहे तोंडाभोंवतीं ! काय केंसाळ तोंड हें ! किंकिणी, चुंबनासाठीं या बोकडासारख्या दाढीमिशीच्या जंगलांत तोंड घालणें म्हणजे पुरा वनवासच म्हणायचा !

कंकण : हें बोकडाचें दाढीमिशीचें जंगल नसून, ही नरसिंहाची आयाळ आहे, समजलास ? ही पुरुषाला फार शोभा देते !

नूपुर : हो, तोंडाच्या विद्रूपपणावर हें केंसांचें पांघरूण पडल्यामुळें एका अर्थी तें शोभादायक तर खरेंच ! गढूळ पाण्याच्या डबक्यासारखे ते मोठाले तांबूस डोळे झांकून टाकल्यामुळें या लोंबत्या भोंवयांनीं खरोखरीच तुझ्यावर उपकार केलेला आहे ! बाबरओंठांना पोटाशीं धरणाऱ्या या मिश्या आपल्या उठावानें, नाकपुड्यांवरही झांकण टाकून दुहेरी हित साधीत आहेत ! नाहींतर त्या मोठाल्या नाकपुड्यांतून, तुझ्या डोक्यांत कांहीं नाहीं हें लांबून पाहणाऱ्याच्या सुद्धां लक्षांत आलें असतें !

किंकिणी : हें पहा, नूपुर, तुम्ही असे यांचेच दुर्गुण सांगत सुटाल तर मला कांहीं खपायचें नाहीं ! दुसऱ्याचे दुर्गुण सांगून तुमचे गुण कांहीं वाढत नाहींत

नूपुर : ठीक आहे; आम्ही दोघेही आपापलें प्रेम तुझ्यावर किती आहे हें सांगूं ! कंकणा, आहेस तयार तूं ? सर्व कांहीं प्रेमशास्त्रोक्त झालें पाहिजे !

कंकण : नाहीं बुवा; तें प्रेमशास्त्र आपल्याला मुळींच कळत नाहीं !

नूपुर : मग काय उपयोग ? किंकिणी, कुलकन्यकेप्रमाणें प्रेमाची आराधना कशी करून घेणार तूं ? तुझ्या मोठेपणाला याच्या गांवठी वागण्यानें जरूर बाध येणार.

किंकिणी : खरेंच, कंकण, हे म्हणतात तसें तर झालेंच पाहिजे ! हें प्रेमशास्त्र तुम्हांला शिकायला हवें.

कंकण : काय करावें, मोठी आफत येऊन पडली ! बरें, मला दोन दिवसांची सवड तरी दे म्हणजे करितों कांहीं तजवीज !

किंकिणी : ठीक आहे ! परवांदिवशीं तुम्ही दोघेही या म्हणजे झालें !

कंकण : पण दरम्यान या नूपुरानें तुझ्याजवळ माझी नालस्ती करितां कामा नये !

किंकिणी : बरें; तुम्हीही मध्यंतरीं माझी भेट घेऊं नका !

कंकण : जातों तर मी आतां. [ जातो. ]

नूपुर : याच्या बोलण्यांत बायकांबद्दल काय आलें तें ध्यानांत आहे ना ? या बाबतींत हा तुझी आज्ञा खास मोडणार ! तूं याच्याजवळून कबूल करूनच घ्यायला हवें होतें, कीं प्रत्येक गोष्टींत तुझें म्हणणें ऐकेन म्हणून ! नाहींतर हा राकट राक्षस तुझ्या कोवळ्या मनाला तेव्हांच दुखवील.

किंकिणी : कांहीं म्हणा; पण तुमचें मघांचें भेदरणें बायकीच ! मी होतें म्हणून तुम्ही सुटलां !

नूपुर : पण युक्ति कोणीं काढिली ? प्रत्येकाचें बळ निराळ्या प्रकारचें असतें. सापाच्या डोक्यांत विष असतें, तर विंचवाच्या शेपटाला नांगी असते ! ह्याला लढवय्याचा हात आहे; मला मुत्सद्दीगिरीचें डोकें आहे ! कसा एका शब्दासरशीं तुझ्या त्या जंगली जिवलगाला, त्या केंसाळ जनावराला–[ कंकण येतो. ]

कंकण : अरेच्या, पुन्हां माझी बदनामी ? [ तरवार उपसतो. ]

नूपुर : ( कंकणासमोर गुडघे टेकून ) शरणागताला अभय असो ! कंकण, हा वीर आतां धर्मयुद्धाच्या दुसऱ्या नियमाबरहुकूम तुझ्याशीं लढत आहे ! नामर्द, शरण आलेल्याला मरण देतोस ? घाल ती तरवार म्यानांत !

कंकण : ( तरवार म्यानांत घालून ) या धर्मयुद्धानें सतावून सोडलें बुवा अगदीं ! हें बघ, वारा वाहील तशी पाठ देणें हें कांहीं वीराचें लक्षण नाहीं.

नूपुर : पण वाऱ्याशीं भांडत सुटणें हें शहाणपणाचें लक्षण नाहीं.

किंकिणी : तुम्ही परतलां कां, सांगा पाहूं ?

कंकण : ( स्वगत ) हिला आपल्या वाढणाऱ्या वैभवाची नुसती वरवर खबर द्यावी ! ( उघड ) मला तुझ्याजवळ एकांतांत कांहीं सांगावयाचें आहे.

नूपुर : हां ! प्रेमाच्या धर्मयुद्धाला हा एकांत मंजूर नाहीं !

किंकिणी : प्रेमांत आणि युद्धांत सर्व कांहीं क्षम्य असतें ! कंकण, चला तुम्ही. नूपुर, तुम्ही असें वाईट वाटूं देऊं नका. प्रीति ही अशीच आहे.

[ हम वारिया० ]

बहु तापना । वाटे जरी प्रीति रम्य ही मना ।
नवतरंगीं विविध रंगीं दे यातना ॥
भ्रांतिप्रदा होति भावना । शांतिस्थिरा वृत्ति होत ना ॥ध्रु०॥
संशयविवशा । हृदयिं दुराशा ।
शंकास्पदा सर्व कामना । फिरवितसे जनिं ।
अंधाचे करुनि । अंतीं हरी तेविं जीवना ॥१॥

[ कंकण व किंकिणी जातात. ]

नूपुर : ( स्वगत ) हा हिच्याजवळ काय बोलणार आहे तें कळण्यासाठीं मी हिच्या प्रेमावरही पाणी सोडायला तयार आहें ! काय करावें ? यांच्या मागोमाग जावें म्हटलें तर हा काळ एकदम स्वर्गाच्या वाटेलाच लावायचा ! असो; आतां त्या दामिनीकडे जाऊन त्या वैराग्याबद्दल बोलणें काढावें ! बळेंच गळ्यांत पडलें म्हणजे खरें असेल तर चटकन् कळून येईल. [ जातो. ]

## प्रवेश चवथा,

[ राजा, भूपाल, वृंदावन प्रवेश करितात. ]

राजा : भूपाल, तुमच्यासारख्या लोकोत्तर पुरुषाची माझ्या राज्याला जोड लाभल्यामुळेंच आजच्या महत्त्वाच्या बाबतीचासुद्धां भर रस्त्यावर मोठ्यानें खल करायला मी तयार झालों आहें. कोणत्याही गोष्टीचा तुम्ही वृद्धाच्या नीरस पोक्तपणानें विचार करितां, तरुणाच्या उसळत्या रक्तानें ती घडवून आणितां आणि बालकाच्या चंचलवृत्तीनें तिच्या फलद्रूप धन्यवादाबद्दल बेफिकीर होतां !

भूपाल : महाराज, आपल्या प्रेमाला माझ्या ठिकाणीं कोणते गुण दिसत नाहींत ? आपणच घडलेल्या दगडाच्या मूर्तींत भाविक दृष्टीला देवपणा दिसतो; तशांतला हा प्रकार आहे !

राजा : केवळ असेंच कां म्हणतां ? भूपाल, युवराजाच्या जन्मामुळें तुमचा राज्यावरचा वारसा उडाल्यानंतरही वाढत्या उत्साहानेंच दिसून येणारी तुमची आमच्याबद्दलची निष्ठा डोळ्यांपुढून कधींही हलत नाहीं; आणि आपल्या आठवणीनें कृतज्ञतेचा आनंदाश्रूंत शेवट करिते. एवढ्या राज्यहानीबद्दल तुम्हीं क्षणभरही विषाद मानिला नाहीं आणि उलट युवराजांवर पुत्रप्रेमच करीत आलां, हें तुमचें अलौकिक औदार्य नेहमीं प्रसंगावांचूनही बोलून दाखवावेंसें वाटतें ! त्यांतून आज ज्या महत्त्वाच्या कामासाठीं तुम्हांला बोलावून आणिलें त्याच्यामुळें तर तुमच्या उदारवृत्तीचें द्विगुणित ऋण वाटत आहे ! भूपाल, सरहद्दीवरच्या भागांत इंद्रनाथानें पुन्हां बंडाळी सुरू केली आहे आणि या खेपेला त्याचा युवराजांच्या प्राणावर घाला घालण्याचा विचार आहे, अशी आतांच बातमी आली आहे. युवराजांना तुमच्यासारखे संरक्षक नसते तर ही बातमी मनाला हालवून सोडण्याजोगी होती नाहीं ! काय चमत्कार आहे; एकाच

घराण्यांत तुम्हां दोघांचा जन्म; दोघांचाही राज्यावर सारखा हक्क आणि दोघांचीही युवराजांच्या जन्मानें राज्यप्राप्तीविषयीं सारखीच निराशा झालेली! पण भूपाल, इंद्रनाथानें युवराजांचे प्राण हरण करण्यासाठीं झटावें आणि तुम्हीं त्यांच्या रक्षणाकरितां आपले प्राण धोक्यांत घालावयास नेहमीं तयार असावें हा किती विलक्षण विरोध आहे!

**वृंदावन :** ईश्वराची लीला अत्यंत गूढ स्वरूपाची असते तिचें हें प्रत्यंतर!

**राजा :** भूपाल, इंद्रनाथाच्या या बंडाळीचा बंदोबस्त करण्यासाठीं उद्यां तुम्हांला मोहिमेवर जावें लागणार आहे! दुसऱ्या कोणाला पाठविलें तरी चालण्यासारखें आहे; परंतु तुम्हांलाच पाठवून इंद्रनाथाचा कायमचा बंदोबस्त करून टाकण्याचा माझा बेत आहे. तुम्हांला कसा काय वाटतो हा विचार?

**भूपाल :** आपल्याला अतिशय आश्चर्य वाटेल, कदाचित् रागही येईल; परंतु सध्यां मोहिमेवर जाण्याची माझ्या मनाची तयारी नाहीं!

**राजा :** तुम्ही अपुऱ्या विचारानें बोलल्याचें किंवा योग्य कारणाशिवाय माझ्या मर्जीविरुद्ध गेल्याचें पूर्वीं एखादें उदाहरण जरी घडलेलें असतें तरीसुद्धां मला आश्चर्य वाटलें नसतें, राग तर खात्रीनें आला नसता!

**भूपाल :** माझी मनोवृत्ति अशा प्रकारची होण्याचें कांहीं विशेषसें कारण आहे असें नाहीं! तितका उत्साह वाटत नाहीं एवढेंच! निदान मनाची तयारी करण्यासाठीं महाराजांनीं मला थोडासा अवधि तरी द्यावा एवढी विनंती आहे!

**राजा :** तसा अवधि देण्याला कांहींच प्रत्यवाय नाहीं.

**भूपाल :** मग मी आज्ञा घेऊं तर? युवराज माझी वाट पाहत उभे आहेत.

**राजा :** ठीक आहे! (भूपाल राजाला प्रणाम करून जातो.) वृंदावन, मंडलेश्वर एक दोन दिवसांत मोहिमेवर जावयाला तयार झाले नाहींत तर तुम्हांला जावें लागेल!

**वृंदावन :** मंडलेश्वर इथें राहिले तर, महाराज, मलाही निकडीनें इथेंच रहावें लागेल!

**राजा :** म्हणजे, हा अवज्ञेचा काळ सुरू झाला कीं काय?

[वृंदावन एकदम राजाचे पाय धरतो.]

**वृंदावन :** क्षमा करा, महाराज, मी विचारानें आपला अतिशय अपराधी आहें.

**राजा :** विचारानें अपराधी? वृंदावन, हा काय प्रकार आहे?

**वृंदावन :** माझ्या अपराधाबद्दल मला पूर्ण अभयवचन मिळाल्याखेरीज त्याचा

उच्चार करण्याचा मला धीर होणार नाहीं.

**राजा :** तुमचा अपराध नुसत्या विचाराचाच आहे त्यामुळें क्षमा करणें फारसें अवघड होणार नाहीं!

**वृंदावन :** महाराज, मला ही न्यायनिष्ठुरता नको; मी आपल्या चरणांजवळ केवळ दयेची याचना करीत आहे! इतकेंच नाहीं तर या अपराधांत मजहून अधिक अपराधी मनुष्यालाही देहान्त शासन न करण्याचें महाराजांनीं मला आधीं वचन दिलें पाहिजे!

**राजा :** हं, हें घ्या वचन! सांगा पाहूं तुमचा अपराध कोणता तो?

**वृंदावन :** आमचा अपराध इतका भयंकर आणि गुप्त आहे, कीं तो महाराजांच्या कानांतच सांगण्याची परवानगी असावी.

**राजा :** तुमच्या वर्तनानें मला आश्चर्याचें वेड लागेल असें वाटूं लागलें आहे! सांगा लौकर काय असेल तें! (वृंदावन राजाच्या कानांत सांगतो.) काय सांगतां तुम्ही हें?

**वृंदावन :** आपल्या चरणांपाशीं असत्य किंवा गैरमाहितीनें बोलण्याचें धाडस कोण करील? माझ्या सांगण्यांतलें एक अक्षर खोटें ठरेल तर मी देहान्तशिक्षा भोगीन!

**राजा :** तुमचें म्हणणें कदाचित् खरेंही असेल! लोभ पापाचा परमेश्वर आहे! राजपुत्र इंद्रायुधाचा असा गुप्त वध केला तर भूपालाला पुन्हां राजपदाचा हक्क मिळेल; तेव्हां भूपालाला असें नीच कर्म करण्याची बुद्धि होणें स्वाभाविक आहे! वृंदावन, मी जातों आतां; प्रत्यक्ष पाहिल्याखेरीज अशा गोष्टीबद्दल विचार करतां येत नाहीं! योग्य वेळीं मला सूचना देण्याकरितां या.

[राजा जातो.]

**वृंदावन :** (स्वगत) आजच्या माझ्या चरित्राचें सिंहावलोकन करूं लागलों, तर सिंहाच्या नजरेंतला रानटी क्रूरपणाच माझ्या नजरेंत दिसून येईल! पण ही नजर उपयोगी नाहीं; रात्रीं ऐन वेळीं युवराजाच्या शयनमंदिराकडे फसवून नेण्यासाठीं भूपालाला हांक मारतेवेळीं काळोखांत हे डोळे त्याला दिसले, तर तें भेकड सावज नुसत्या नजरेच्या निखाऱ्यानेंच होरपळून निघायचें!

[जातो.]

***अंक पहिला समाप्त***

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

[ स्थळ : सुदामांचें घर. दामिनी प्रविष्ट. ]

दामिनी : ( स्वगत ) या मेल्या जोगड्यांना किमया करितां येत नाहीं, मग हे घरंदारें सोडतात तरी कशाच्या जिवावर ? आजवर खंडीभर सोळभोक भेटले, पण सारे फुकट ! कुणी देवाचें नांव आळवतो तर कुणी समाधींतच डोलत बसतो. उगीच मेल्यांच्या खस्ता खाल्ल्या, अंगोरधुतारे केले, आवशी-पहाटें वडापिंपळाभोंवतीं घिरट्या घातल्या; तिकडच्या मनांत वेडेंवांकडें आलें तरी तशीच आपली निगरगट्टपणानें नेमधर्म करीत राहिलें; जवळचें किडूक-मिडूकसुद्धां मेल्यांच्या भरीला घातलें. सारें सारें व्यर्थ गेलें ! म्हटलें एखाद्या तरी ठिकाणीं मनमागतें मिळालें तर अंगाखांद्यांवर एकदां सगळा साज—अगदीं बावनकशी सोन्याचा आणि करवंदांएवढाल्या मोत्यांचा सगळा साज घालून चारचौघींना दाखवून येईन ! खोटे दागदागिने केले तर वेळेवर भलतेंच हंसें व्हायचें ! वसुंधराबाईजवळ मागेन म्हटलें तर पोरीबाळीसुद्धां हिणवून पुरेंसें करतील, कीं या गांवगौरीला हें भिकेचें वाण कुणीं वाहिलें म्हणून ! बरें, तिकडून मिळविण्याचें तर नांवच नको ! चाकरीसाठीं सुद्धां घराबाहेर पडायचें होत नाहीं संशयी स्वभावामुळें ! कालचे ते ईश्वर मोठे साधु असावेत; नाहीं तर बाईसाहेब कुठल्या आल्यागेल्याशीं बोलत बसायला ? त्यांचे पाय धरावेत झालें ! म्हणेन, सारी पुण्याई खर्च करा, पण मला एकदांचा सगळा साज मिळवून द्या ! दार वाजलें आणि कडीही वाजली. स्वारी आली वाटतें ? ( नुपूर येतो. ) आंत जाऊन बसावें—नाहींतर आपलें—अगबाई, तुम्ही कोण ?

नूपुर : दामिनीबाई, भिऊं नका ! मी तुमच्याकडे एक निरोप घेऊन आलों आहें !

दामिनी : आमच्या घरांतला निरोप वाटतें ?

नूपुर : तुमच्या घरांतला निरोप पुन्हां घरांतच कशाला घेऊन येऊं मी ? या निरोपाच्या धन्याला घरदार कांहींच नाहीं !

दामिनी : अगबाई, म्हणजे ? मला नाहीं कुणाचा निरोपबिरोप यायचा ! तुम्ही घर चुकलां; नाहींतर आलां असाल–हो ! निघा, व्हा पाहूं घराबाहेर आधीं ! आमच्या घरांत असें मुळींच खपायचें नाहीं ! हें बघितलें तर सारा गांव जमवावयाचें होईल ! निघा तुम्ही !

नूपुर : पहा बरें, गेलों असाच बाहेर तर मात्र जन्मभर ओरडत बसाल ! एका महासाधूचा निरोप आहे हा.

दामिनी : साधु ? कुठले साधु ? त्यांची एखादी खूण सांगा बघूं !

नूपुर : काल जातां जातां ज्यांनीं तुम्हांला खूण केली ते ! पटली नीट खूण ?

दामिनी : पटली बरें ! आतां बऱ्या बोलानें तोंड काळें करतां कीं नाहीं ?

नूपुर : माझें बोलणें ऐकून तर घ्या आधीं ! ते साधु अंतर्ज्ञानी असून त्यांनीं तुमचें मनोगत ओळखलें आहे ! ते म्हणाले मजजवळ–मी त्यांचा पट्टशिष्या आहें, पुढें त्यांची गादी माझ्याकडे येणार आहे–ते म्हणाले, बाई मोठी भाविक आहे, हिच्या देहाचें सार्थक व्हावें अशी–(दरवाजावर थाप ऐकूं येते.)

दामिनी : अगबाई, तिकडून येणें झालें वाटतें ? आतां तुमच्या देहाचें मात्र सार्थक होईल चांगलें ! [ दरवाजावर थाप ]

नूपुर : तुमचा नवरा आला वाटतें ? अरे बापरे !

दामिनी : केलांत शेवटीं माझा घात ? आतां त्यांनीं तुम्हांला पाहिलें इथें म्हणजे घर घेतील डोक्यावर आणि डोकें उडवितील एकेकाचें !

[ दरवाजावर थाप ]

नूपुर : मग आतां करायचें काय ?

दामिनी : आतां मला विचारतां ? चोरासारखे आलां कसे अगोदर घरांत ?

नुपूर : घरांत आलों कसा हा प्रश्न नाहीं आतां ! घरांतून बाहेर जाऊं कसा तें सांगा ! [ दरवाजावर थाप ]

दामिनी : दम खा आतां ! असें करा, त्या मोठ्या पेटाऱ्यांत बसा दडून ! मी त्यांना कडी उघडून पलीकडच्या खोलींतून तशीच स्वयंपाकघरांत जातें. ते माझ्या मागोमागच येतील; आणि तुम्ही चोरट्या पावलीं तडक निघून जा !

[ दरवाजावर थाप; नूपुर पेटारा उघडून आंत बसतो. ]

दामिनी : ( स्वगत ) देहाचें सार्थक म्हणजे आलें लक्षांत माझ्या ! दागिन्यांचा साज मिळाला म्हणजे शरीराला शोभा येणारच ! तेंच देहाचें सार्थक ! साधुमहाराज अंतर्ज्ञानी तर खरे ! उद्यां जाऊन त्यांचे पाय धरतें. हूं, बसली ही

स्वारी पेटाऱ्यांत! आतां जाऊन दार उघडावें! [ जाते. कांहीं वेळानंतर पेटाऱ्याचें झांकण उघडतें व त्यांतून नूपुर आणि सुदाम उठून उभे राहतात. कांहीं वेळ तसेच राहून शेवटीं बाहेर येतात. ]

सुदाम : बदमाष! हरामखोर! बेरड! रामोशी!

नूपुर : याचको याचकं दृष्ट्वा श्वानवद् गुर्गुरायते!

सुदाम : निर्लज्ज, पाजी! कसा आलास या घरांत?

नूपुर : तुमच्यासारखाच! नुसत्या घरांतच नाहीं, पण पेटाऱ्यांतसुद्धां तुमच्या-प्रमाणेंच आलों! आमची चाहूल ऐकून तुम्हीं पेटी गांठली आणि त्या नवऱ्याच्या आरोळीनें आम्ही तुमच्या मागोमाग आलों! आपल्या ठरलेल्या संकेताप्रमाणें तुम्हीं आघाडी मारिली खरी!

सुदाम : बेशरम! बदमाष!

नूपुर : तुमचा मत्सर विलक्षण आहे बुवा! अर्ध्या घटकेची वडीलकी इतकी गाजवूं देणार नाहीं मी! शिवाय तो तिचा नवरा आला आहे. तेव्हां मुका-ट्यानें बाहेर चला आधीं!

सुदाम : पाजी मनुष्या, मीच हिचा नवरा आहें समजलास!

नूपुर : अस्सें! मग पति हा स्त्रीचा अलंकार म्हणतात म्हणून तिनें तुम्हांला पेटींत जपून ठेविलें होतें वाटतें? मी अशा नकली मालानें फसणारा इसम नाहीं! वः! काल संध्याकाळीं तिची तुमची पुरती ओळखदेखही नव्हती आणि आज अगदीं नवराबायकोचें नातें जोडून पार!

सुदाम : ( स्वगत ) या चोराला फसविलें पाहिजे! रागाच्या भरांत मी खरें उघडकीस आणीत होतों तें ठीक नव्हतें. याचा उपयोग करून घेण्यासाठीं याचा पहिला समजच कायम ठेविला पाहिजे. ( हंसून उघड ) पाहिलें, म्हटलें फसता कीं काय? बरें, सध्यां तुम्हीं बाहेर चला; अगदीं अवेळीं आलांत हो!

नूपुर : तुम्हीं तशी सूचना द्यायची होती आधीं मला!

सुदाम : अहो, अजून तरी चला! तुम्ही काढता पाय घ्या आणि मला जरा संधि द्या! पहिल्या जागीं भेटतोंच तुम्हांला. मात्र यापैकीं कशाचाही हिला थांग लागूं देऊं नका!

नूपुर : ती धास्तीच सोडा; मी मुळींच ताकास तूर लागूं देत नाहीं. भाग्यशाली आहांत बुवा! बरें, मी जातों आतां! वेळेवर वाट पहात बसतों.

[ जातो ].

सुदाम : ( स्वगत ) भाग्यशाली! भाग्यशाली अं? स्त्रीजात तेवढी निमकहराम—

[ पसुपत गिरिजा० ]

फसवित पुरुषाप्रति स्त्री खनि कपटाची ॥ध्रु०॥ दोषमात्र-

पूर्णगात्र । विश्वासा कधिं न पात्र । मोहपाश वागुराचि ॥ १ ॥

दामिनीला झाल्या गोष्टीची ओळख देऊन सावध करण्यांत हंशील नाहीं. तिच्याकडे पाहिल्यामुळेंच लोकांना अशा बुद्धया सुचतात. बस; अबघडी दामिनीला बुरखा घ्यायला लावतों. ( उघड ) दामिनी ! दामिनी, इकडे ये पाहूं.

[ दामिनी येते. ]

**दामिनी :** हं, ही आलें. कशाला हांक मारायचें झालें ?

**सुदाम :** आजपासुन डोक्यापासून पायापर्यंत चांगला जाडाभरडा बुरखा पांघरून वावरावें लागेल ! घरीं, दारीं, देवळीं, चारचौघांत, एकांतांत, केव्हांही, कुठेंही, तीन्ही त्रिकाळ, अष्टौप्रहर अगदीं सांगोपांग, नखशिखांत बुरखा हा अंगावर असलाच पाहिजे !

**दामिनी :** अगबाई, हें काय सोंग घेतलें आज ?

**सुदाम :** हें तुझें सोंग बाहेर पडूं नये म्हणून ! उगीच वायफळ वाच्यता व्हायला नको आहे या गोष्टीची ! बुरखा घे म्हटलें, बुरखा घेतला !

**दामिनी :** असें झालें काय भूत भरायला अंगांत ?

**सुदाम :** दामिनी, हा पतिव्रताधर्म नाहीं; सीतेनें रामाला असें म्हटलें नाहीं; अहिल्या गौतमाच्या विद्रूप दाढ्यामिश्या आणि जटा पाहूनही असें बडबडली नाहीं; सुग्रीवासारख्या माकडाचीसुद्धां तारेनें अशी हेटाळणी केली नाहीं; रावणाची दहा तोंडांची प्रभावळ पाहूनसुद्धां मंदोदरीला कांहीं भुताटकीची शंका आली नाहीं; पांच पांडवांच्या पंचकडींत पडूनसुद्धां द्रौपदीनें भुताखेता-बद्दल अवाक्षर काढिलें नाहीं; तुम्हां आजकालच्या हुच्च बायकांपेक्षां त्या बिचारींवर तर पातिव्रत्याची पांचपट जबाबदारी होती. पण ती माउली तसल्या जोखमीच्या अडचणींतून सहीसलामत बाहेर पडली आणि तुला एक नवऱ्या-बद्दल पातिव्रत्य संभाळायचें तर लागलीच तीन तेरा करते आहेस !

**दामिनी :** त्या मेल्या बोलण्याला कांहीं धरबंद तरी असायचा होता !

**सुदाम :** ( स्वगत ) खरेंच; द्रौपदीचा दृष्टांत जरा चकला खरा. सीता सहा महिने परघरीं राहिलेली, तारेला दोन नवरे, अहिल्येच्या बाबतींत इंद्राचा पाजीपणा ! छेः, ही पतिव्रतांची यादी एखाद्या बदफैली राणीनें कुणा पंडिताला पैसे चारून करून घेतल्यासारखी वाटते ! पुन्हां करायची म्हटलें तर वसुंधरा–छट्–नाहींच तें ! स्त्रीजात तेवढी निमकहराम ! ( उघड ) तें कांहीं असो; तुला बुरखा हा

घेतलाच पाहिजे !

दामिनी : पण झालें काय पाप असें माझ्या हातून ?

सुदाम : काय झालेंन् काय नाहीं त्याची कशाला हवी उजळणी पुन्हां ?

दामिनी : मेला स्वभावच भारी संशयी ! आव्याचा रावा करायची खोड आहे म्हणून तर नाहीं नाहीं तें मनांत येतें तुमच्या ! परवां असेंच; माझ्या माहेरचा तो हा भेटला, त्याच्याशींच लगलींच हुमरीतुमरीवर आलां; त्यानें आपला माझ्याकडे पाहून कानाडोळा केला एवढें बरें झालें, नाहींतर—

सुदाम : एवढें बरें झालें नाहीं, पण एवढेंच वाईट झालें; जो तो तुझ्याकडे पाहून असा कानाडोळा करितो म्हणून तर ही आटाआट एवढी ! तूं कशाला बोलत बसली होतीस त्याच्याशीं ? चांगली भरचवाठ्यावर त्याच्या नांवानें हांका मारीत सुटलीस ती !

दामिनी : बाई, बाई, बाई ! आतां माहेरच्या माणसाचें नांव काढायचीसुद्धां चोरीच वाटतें ?

सुदाम : अलबत ! धर्मशास्त्रच तसें आहे मुळीं. माहेरचा माणूस नाहीं आणि सासरचा नाहीं; कुठल्याही परपुरुषाचें तर काय, पण प्रत्यक्ष नवऱ्याचें सुद्धां नांव स्त्रीनें घ्यायला धर्माची आडकाठी आहे ! बायकांना देवाचें नांव सुद्धां वर्ज्य आहे.

[ सुखकर दुखहर० ]

प्रभुसम पतिपद अबलांना । देव न दैवत लोकीं तयांना ।
शुभगति पति प्राणा ॥ ध्रु० ॥ निजपतिवांचुनि इतर जनांशीं
दर्शनभाषण सुकृतासि नाशी । ईशपदिं रतिहि पापचि त्यांसी ।
भयदखरविषसमाना ॥ १ ॥

कुणाशीं बोलणें, कुणाकडे पाहणें, चट्सारें विषासमान आहे स्त्रीला !

दामिनी : पुरें पापच उभें राहिलें बायकांचें ! देवदर्शनसुद्धां बंदच व्हायचें अशा अकरताळ्या स्वभावामुळें !

सुदाम : देवदर्शन तर अजीबात बंद झालें पाहिजे ! हे देवदर्शन करणारे लोक पुण्यसंपादनाऐवजीं पापाचा मात्र वाढावा करून ठेवितात. उभ्या दिवसांत घडलें नसेल त्याच्या दसपट पाप अर्ध्या घटकेंत पदरीं पाडून घेतात ! देवळांच्या पटांगणांत बायका देवाभोंवतीं आणि हे पाजी लोक बायकांभोंवतीं घिरट्या घालतात. देवदर्शनाच्या वेळाच पहा मुळीं कशा निवडल्या आहेत त्या ! पहाटेची कांकडआरती तर मध्यान्हीस शेजारती ! कथाकीर्तनेंसुद्धां रात्रीं !

छट्, नकोच तें! तुला रात्रीसारखाच काळाभोर बुरखा पाहिजे; कुणाला तुझ्याकडे पाहतांच येऊं नये मुळीं!

दामिनी : माझ्यासारख्या लंकेच्या पार्वतीकडे पहात बसलें आहे कोण एवढें? अंगावर ना गुंजभर सोनें ना फुटका मणि! अशी बरी तरी दिसतें का मी?

सुदाम : बरी असतेस तेव्हां बरी दिसतेस, पण बरी दिसतेंस तेव्हां बरी असतेस असें मात्र म्हणतां यायचें नाहीं! दागिन्यांचें बायकांना–निदान तुला तरी कांहीं प्रयोजन नाहीं. येऊन जाऊन बरें दिसायचें काय तें नवऱ्याला! त्या मला तर दागिन्यावांचूनच बरी दिसतेस तूं! झालें, संपला कारभार! या मिरवणुकी हव्याच कशाला मुळीं! तेवढ्यासाठीं तर हा बुरख्याचा बंदोबस्त करायचा! कळेल कसें कुणाला कीं बुरख्यांत ही सोन्याची सीता सजली आहे का लंकेची पार्वती वणवणते आहे तें!

दामिनी : बायकांना वागवायची मुलखावेगळीच तऱ्हा ही! अशानें नाहीं बायकोचें मन रिझायचें! सवाशेर सोन्यानें मढवून काढली कीं बायको सोन्यासारखी! बायकोच्या तोंडावर घोंसदार मोत्यांची नथ टाकली, कीं तिच्या तोंडाचीं मुक्ताफळें पडायचीं बंद झालींच! रेशमी लुगडीं नेसायला मिळालीं म्हणजे बायको रेशमासारखी मऊ आलीच म्हणून समजावें; अशा भरड सुताड्यांनीं बायकोशीं सूत जमेल ही आशा या सोडून! बुरखे न फिरखे हवेत कशाला हे?

सुदाम : दामिनी, पातिव्रत्याचा भंग होतो आहे या बडबडण्यानें! सीतेनें नुसत्या वल्कलांवर दिवस काढले; फक्त नेसत्या लुगड्यानिशींच द्रौपदी पांडवांच्यामागें रानावनांत रखडली; दमयंतीनें तर अर्धें लुगडेंसुद्धां फाडून नळाला नेसायला दिलें—

दामिनी : तुम्हीं तेवढीं माझीं लुगडीं नेसायचेंच ठेवलें आहे बाकी! या घरबशा कर्तबगारीला आणि तिस्मारखानी बकव्याला चांगलीं शोभतील माझीं लुगडीं!

सुदाम : तुझ्या या पातिव्रत्यभंगानें आज माझ्या बेचाळीस पिढ्या रौरवांत पडणार अशी मला भीति वाटते! एकदम तोंड बंद कर आणि हा बुरखा घे. काल्व करवूनसुद्धां आणिला आहे. (बुरखा देतो; कंकण येतो.) हं, घे अंगावर. हा कंकण आला! घे अंगावर बुरखा, नाहींतर नरडें दाबून जीव घेतों एकदम! मेलीस तरी बेहेत्तर पण ही बेअब्रू नको! घे बुरखा. [ती बुरखा घेते.]

कंकण : सुदामा, आहे काय गडबड ही? माझ्यासारख्या दोस्ताच्या देखत

कशाला हवा बुरखा ?

सुदाम : दोस्त कसला या बाबतींत !

दामिनी : हें बघितलेंत कंकणभावोजी–

सुदाम : मसणांत गेला तुझा कंकणभावोजी !

कंकण : हं; सुदामा !

सुदाम : दम खा; रागावूं नकोस ! दामिनी, तूं आंत जा पाहूं ! [ दामिनी जाते. ]

कंकण : काय दंगा मांडला आहेस हा कळत नाहीं ! केलें काय यांनीं असें ?

सुदाम : स्त्रीजात तेवढी निमकहराम ! हा दंगा नाहीं; ही आर्यांची संस्कृति आहे; ही आम्हां आर्यांची सात्त्विक मनोवृत्ति आहे ! स्त्रियांचा मुळींच भरंवसा देववत नाहीं. ' न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ' हें नीट ध्यानांत ठेव !

कंकण : अरे, चांगली नक्षत्रासारखी बायको मिळाली आहे तरी–

सुदाम : तिच्या पायावर नक्षत्र पडलें आहे खरें ! वेदान्त बायकांबद्दल काय म्हणतो ऐक !—' स्त्रीणां द्विगुण आहारो लज्जा चापि चतुर्गुणा । साहसं षड्गुणं चैव कामश्चाष्टगुणः स्मृतः ॥ ' स्त्री म्हटली, कीं ती खराब चालीची असावयाचीच !

कंकण : सरसकट वाटेल त्यांवर बायका भाळतील असें नाहीं मला वाटत; चांगल्या गलमुच्छावाल्या रुबाबदार चेहऱ्याबद्दल म्हण वाटेल तर !

सुदाम : अरे बाबा, स्त्रियांना भेदाभेद पाहण्याची दृष्टीच नाहीं; त्या जात्याच धटफैली असतात ! ' विरूपं रूपवन्तं वा पुमानित्येव भुञ्जते । '

कंकण : मग तुझ्या हिशेबीं साऱ्याच बायका सारख्या म्हणायच्या ! पतिव्रता कुणी नाहींच ?

सुदाम : अगदीं ! ' स्थानं नास्ति क्षणं नास्ति नास्ति प्रार्थयिता नरः । तेन नारद नारीणां सतीत्वमुपजायते । ' आणि म्हणूनच बायकांना सारखें जपलें पाहिजे ! परपुरुषाचें वारेंसुद्धां लागूं देतां कामा नये ! माझी बायको आरशांतल्या माझ्या प्रतिबिंबाशेजारीं फाजील सलगीनें उभी राहिली तरीसुद्धां मला दुजाभाव वाटतोच. अरे बाबा, देवादिकांनींसुद्धां ही खबरदारी वापरलेली आहे ! सप्तर्षींच्या तांड्यामध्यें उघड्या आकाशांत वयोवृद्ध वसिष्ठानें आपल्या बुद्दुक सोवतिणीला दाटीवाटीनें जवळ बसवून घेण्याचें दुसरें काय कारण असणार ? नळराजानें वनवासांत दमयंतीची वरात कशाला काढिली असावी ? वृद्ध कुंतीला विदुराच्या घरींच ठेवून तरण्याताठ्या द्रौपदीला मात्र बरोबर वागविण्यांत पांडवांचा हाच हेतु होता ! श्रीरामानें सीतेला रानावनांत नेली, आणखी तिथेंसुद्धां अशा जरबेंत ठेविली, कीं लक्ष्मणासारख्या सख्ख्या भावाला तिच्या

नुसत्या दागिन्यांचीही ओळख नीटशी असूं नये ! थांब, नीट ऐकून घे ! पुढेंमागें संसारांत पडलास तर हे दाखले तुला उपयोगीं पडतील ! विष्णूनें लक्ष्मीसारख्या चंचल बायकोला अष्टौप्रहर पाय चेपीत बसवून ठेविली आहे; बिछाइतीच्या निमित्तानें शेषासारख्या जातिवंत नागाचा पहारा ठेविला आहे आणि भंवतालीं लांब शेंडीचा नारद, चार तोंडांचा ब्रह्मदेव, अणकुचीदार चोंचीचा गरुड किंवा घोडमुखाचा तुंबर यांसारख्या विद्रूप सोंगांचाच गराडा घातलेला आहे. अरे, भोळा शंकर तर शेजार टाळण्यासाठीं मसणांतच जाऊन बसला ! तसबिरींतून देवादिकांची बायकांना वामांकीं खिळवून बसविण्याची हौससुद्धां शृंगारवृत्तीची नसून सावधपणाचीच असावी ! आपल्या आर्य-पूर्वजांना सौंदर्याची मुळींच चाड नव्हती !

कंकण : या तर्कटानें तुझें डोकें फिरलें आहे असेंच वाटायला लागलें आहे मला आतां ! अरे, चांगली सुंदर बायको कोणाला नकोशी वाटणार ?

सुदाम : ' भार्या रूपवती शत्रुः ! ' बायको सुंदर असली, कीं तिच्याकडे लोकांची नजर वळलीच म्हणून समजावें !

कंकण : आणि वेडीविद्री असली तर आपल्यालाच बघवायचें नाहीं तिच्याकडे ! त्यापेक्षां सुंदर बायको मिळून सारा गांव तिच्याकडे पाहत राहिला तरी चालेल !

सुदाम : बाबारे, कनक आणि कांता, या संसारांतल्या दोन अंगांपैकीं पहिल्याचें चारचौघांत प्रदर्शन करून दुसरें नेहमीं लोकांच्या नजरेआड ठेवण्याचीच शहाण्या लोकांची इच्छा असते ! कृपण लोकांनीं द्रव्य जमिनींत पुरण्याऐवजीं बायकांनाच जिवंतपणीं सुरक्षित गाडून ठेवण्याची एखादी युक्ति शोधून काढिली असती तर साऱ्या जगानें त्यांना धन्यवाद दिला असता !

कंकण : मग तुझी बायको चांगलीच देखणी असल्यामुळें तूं स्वतांला अगदीं फुटक्या नशिबाचा समजत असशील ?

सुदाम : ( निश्वास टाकून ) ती नुसती रूपवतीच नाहीं, पण तिच्यांत नटवेपणा-सुद्धां हवा तितका आहे ! साडीचोळी नेहमीं नीटनेटकी, जरा दागिन्यांची आवड, हीं पतिव्रतेचीं लक्षणेंच नव्हत !

कंकण : एवढ्यानेंसुद्धां चांगुलपणाला धोका पोंचतो का ?

सुदाम : जरूर; नटवेपणा तर नकोच पण नुसत्या नीटनेटकेपणानें, एव-ढ्यशा व्यवस्थितपणानेंसुद्धां पातिव्रत्याचा नाश होतो. व्यवस्थित पोषाख केलेल्या सुंदर स्त्रीला पाहून ज्याला एकदम पातिव्रत्यभंगाचा संशय येत नाहीं तो अस्सल आर्यच नव्हे; त्याला आर्यांची संस्कृतीच उमजली नाहीं ! मग

नखरेबाजपणाबद्दल बोलायचें तर कारणच नाहीं !

**कंकण :** हो, नखरा तर केव्हांही वाईटच !

**सुदाम :** वाईट म्हणून काय म्हणतोस ! बायकोनें केसाला जरा सुवासिक तेल लावलें, कीं नवऱ्यानें डोळ्यांत तेल घालून जपणीस बसलेंच पाहिजे ! कुंकवाचें क्षेत्रफळ कोरून कमी करण्याबरोबर नवऱ्याच्या राज्याचा विस्तारही आटोपशीर होत जातो. कंजुषपणानें रेखून काजळ लावण्यामुळें शिल्कींत पडलेली बचत नवऱ्याच्या तोंडाला फांसलीच म्हणून समजावें ! वाकडा भांग म्हणजे वांकड्या मार्गाच्या अंदाजाची आंखणीच ! बायकोच्या नजरेंत जराशी चलबिचल दिसली, कीं तिच्याकडे नवऱ्यानें सारखी नजर ठेवायलाच हवी ! दामिनीच्या ठिकाणीं या साऱ्या गोष्टी मूर्तिमंत हजर आहेत असा माझा पूर्ण तर्क आहे

**कंकण :** असें असेल तर त्यांच्या भोळेपणाबद्दलचा माझा तर्क चुकला म्हणायचा ! मला वाटलें कीं तुझी बायको तुझ्या अगदीं मुठींत आहे म्हणून !

**सुदाम :** अरे बाबा, झांकली मूठ सवालाखाची ! एवढ्यानेंच माझें दुर्दैव कुठें संपलें आहे ? तिला चांगलें गातांही येतें या अवलक्षणांच्या भरतीला ! आणि गोड गळा म्हणजे पातिव्रत्याची गळचेपीच. 'क्वचित् गानी पतिव्रता !' पाखरांत-सुद्धां गोड आवाजाची कोकिळा आपलीं पिलें दुसऱ्याच्या घरट्यांत निरवून सुरेल उनाडक्या करीत फिरते !

**कंकण :** अरे, अरे, अरे, मग तूं अशा बायकोशीं एकदम काडी कां मोडून देत नाहींस ?

**सुदाम :** आपल्या धर्माप्रमाणें संसाराच्या समुद्रांत बुडत्याला काडीचासुद्धां आधार मिळण्याची आशा नाहीं ! आणि म्हणूनच तर हा एवढा कडेकोट बंदोबस्त करीत बसलों आहें ! पहात आहेसच तूं, मीं काय काय खटाटोप केला आहे तो ! घर मुद्दाम शहराच्या अगदीं एका बाजूला घेतलें आहे; त्याच्या सभोंवार छोटासा खंदक खणून, आंतून दगडाचा भुईकोट उभारून दिला आहे. त्यावर कांऱ्याकुत्र्यांच्या शिबंदीची रचई ! आणि भुताखेतांच्या बातम्या पसरून मेलेल्या माणसांचा जागता पाहरा खडा केला आहे !

**कंकण :** इतका आटोकाट विभु केल्यावर मग ही बुरख्याची बंदिस्ती आणखी कशाला हवी आहे ?

**सुदाम :** असावी; घराचा कोटकिल्ला झुंजतां झुंजतां पडला तर बुरख्याचा बाले-किल्ला लढवायला हरकत नाहीं ! शिवाय, मी तर घराला एक भुयार आणखी छपरावरून एक चोरदारही पाडून ठेवणार आहे; भुयार तर होतसुद्धां आलें !

कंकण : मला राहून राहून तुझें सारें बोलणें आठवतें आहे. इतकें कसें कळतें तुला ?

सुदाम : अरे, या एकाच विषयाची मीं इतकी छाननी केली आहे, कीं पुसायची सोय नाहीं. रात्रंदिवस शास्त्रीपंडितांत बसून पोथ्यापुस्तकांचीं सारखीं पारायणें केलीं तेव्हां कळूं लागलें इतकें !

कंकण : हें झालें हें ठीकच झालें. बाकी मी तुला बायकोची परीक्षा करण्याचा अगदीं सोपा आणि अचूक इलाज सांगितला असता ! आमचा पडताळा अगदीं उघडउघड आहे !

सुदाम : तो कोणता ?

कंकण : हें बघ, माझ्याकडे पाहून मलासुद्धां जी बाई बघणार नाहीं ती पतिव्रता म्हणून खुशाल समजावें ! कधीं चूक व्हायची नाहीं ! लाख आडाखे जमलेले आहेत असे !

सुदाम : असें म्हणतोस ?

कंकण : थोराघरचे दाखले आहेत. अरे हो, बरें ओघासच आलें; तुला मी एक कामगिरी सांगणार आहें. तेवढ्याकरितां तर मी तुझ्याकडे आलों आहें !

सुदाम : काय कामगिरी आहे बुवा ?

कंकण : ती फार जोखमीची आणि गुप्त कामगिरी आहे; कान कर तुझा इकडे. (त्याच्या कानांत सांगतो. ) कबूल आहे तुला ही पहाऱ्याची नोकरी ? पहा, दामिनी तळघरांत आणि तूं बाहेर पहाऱ्यावर ! घरांत जपणीला बसतोस तसें तिथें बसायचें !

सुदाम : कबूल आहे अशी कामगिरी ! पण तळघरांतसुद्धां माझी बायको बुरखा काढणार नाहीं !

कंकण : कांहीं हरकत नाहीं. ठरलें तर मग हें ?

सुदाम : ठरलें, पण कंकणा, दामिनीसाठीं तर हा सारा चक्रव्यूह नाहींना रचीत वृंदावन ?

कंकण : भलतेंच, फारच संशयी तूं ! तूं आहेसना तिथेंच पहाऱ्याला ?

सुदाम : बरें; पाहूं तर खरें ! नोकरी आहे पाहिजे तशीच ! हो, तुझें मघाचें तें कसोटीचें बोलणें तसेंच राहिलें ! मला वाटतें–आमच्या घरची करितोस का परीक्षा एकदां ?

कंकण : काय हरकत आहे ? तूं घराबाहेर जा आणि मी काढतों बोलणें दामिनीबाईजवळ ! तेव्हांच त्यांच्या मनाचा ठाव लागेल !

सुदाम : दोनचार दिवसांत ठरवून टाकूं या हा घाट ! मात्र माझा तुझ्यावर सख्ख्या भावाचा विश्वास—

कंकण : काय बोलणें आहे हें ! तूं माझा दोस्त, भाऊ, कलिजा ! तुझ्याशीं दगलबाजी ?

सुदाम : तसा तुझा मला पुरा भरंवसा आहे ! एकदां हें किल्मिष मनांतून कायमचें जाण्याजोगें असलें तर त्या शास्त्रीपंडितांशीं उरस्फोड करायची टळेल.

कंकण : छान आठवण झाली. सुदामा, या शास्त्रीपंडितांकडून प्रेमाचें शास्त्र शिकण्याचा कांहीं रस्ता आहे कारे ? किंकिणीजवळ उद्यांपरवां मला कायशी प्रेमयाचना करायची आहे ! तेव्हां काय बोलायचें तें कळेल का त्या शास्त्रीपंडितांकडून ?

सुदाम : वः सहज ! असा एक विद्वान् पंडित गांठून देतों तुला, कीं बालक प्रेमशास्त्रांत अज्ञान आहेस तो सज्ञान होऊन तूं बृहस्पतिवत् भाषणें करूं लागशील !

कंकण : अस्सें ? मग चल आतांच ! काय असेल तें शिकून घेतों ! चल; ऊठ !

सुदाम : चल ! [ दोघेही जातात. ]

## प्रवेश दुसरा.

[ स्थळ : भूपालाची बाग. रात्रीचा दुसरा प्रहर. भूपाल व वसुंधरा. जवळच निजलेला दीनार ]

भूपाल : पण आजपर्यंत कोणती गोष्ट मीं तुला सांगितली नाहीं, तर ही मोहिमेचीच तेवढी मनांत ठेवायची होती ?

वसुंधरा : मोहिमेच्यासारख्या राजरहस्याचा बायकांजवळ खल करणें कांहीं मुत्सद्दीगिरीला शोभत नाहीं !

भूपाल : पण स्वतांशीं तरी त्याचा विचार करायला हवा ना ? आणि माझ्याजवळ, तुला अज्ञात असा हृदयाचा अणुरेणूसुद्धां राहिलेला नाहीं. एखाद्या नाटकांत माझें चित्र जर कोणीं रेखाटलें तर नाटकी नियमांना झुगारून देऊन माझीं स्वगत भाषणेंसुद्धां तुला ऐकूं येतील अशी त्या नाटक-

कराला तरतूद करावी लागेल! नुसत्या रहस्याचीच गोष्ट कशाला? मी युद्धाच्या गर्दीत प्राणांवरच्या संकटांतून अनेक वेळां सुरक्षित बाहेर पडल्यामुळें माझ्या शौर्याची आणि युद्धचातुर्याची स्तुति करणाऱ्या लोकांचेंसुद्धां मला हंसू येतें; माझे प्राण तुझ्याजवळ असतात हें त्या बिचाऱ्यांना काय ठाउक!

**वसुंधरा :** विश्रांतीचा हा शांत अवकाश तरी आपल्याला निश्चित घालवितां यावा म्हणूनच मी आपल्या बोलण्याच्या आड आलें! किती शांत-रमणीय वेळ आहे ही!

[ डोलत मेंडे० ]

हालत वातें मृदु शांति। ही। भासे हांसे कीं चंद्रालोकें
तनुलकांति ॥ ध्रु० ॥ दशदिशा पुष्पपरागें दरवळुनि हंसत
जणुं असती ॥ १ ॥

**भूपाल :** खरेंच! हा शांत वायु, आपल्या बागेंतलें हें शांत पुष्पसौंदर्य, चतुर्थीच्या पूर्णकल्प चंद्राची ही किंचित् शांत चंद्रिका, हीं सारीं एकाकारानें अनुभवीत असतांना, विधात्याच्या विश्वकाव्यांतला शांतरसाचा सर्ग दृग्गोचर होत आहे असें वाटतें! अहाहा! काय ही शोभा!

[वारी तिमिरासी०]

दावी निजकांति। नियतीं। शीतलमाया शांत निशापति ॥ध्रु०॥
शांतवैभवा कोमलकिरणा। वितरि तरलतर धवलाचरणा।
दाहि दिशाप्रांतीं ॥ १ ॥ विविध विरोधी भावांवरतीं।
पसरी जणुं हा मुनि एकांतीं। ज्ञानमया शांति ॥ २ ॥

चंद्राच्या चांदण्याच्या नाजूक झोतानेंच नभांची तारांची बरसात कितीतरी कमी झाली आहे पहा!

**वसुंधरा :** या कृष्णपक्षांतला हा तारकालोप पाहिला म्हणजे मला नेहमीं एकच कल्पना आठवते!

[ आनपरी दरबार० ]

नाचत ना गगनांत। नाथा। तारांची बरसात ॥ ध्रु० ॥
आणित होती। माणिक मोतीं। वरतुनि राजस रात ॥॥१॥
नाव उलटली। माव हरपली। चंदेरी दरियांत ॥ २ ॥
ती ही। वरची। देवाघरची दौलत लोक पहात ॥ ३ ॥

**भूपाल :** सृष्टिसौंदर्याकडे केव्हांही पाहिलें तरी देवाघरच्या दौलतीची खैरात त्याच्या उदारपणाची ग्वाही देत असते! आजची आपली परिस्थिति म्हणजे

संसारसुखाची सीमाच वाटते !

वसुंधरा : चतुर्थीच्या किंचित अपुऱ्या चंद्राचें हें चांदणें चहूंकडे पसरून, भरयौवनाचा पहिला प्रहर उलटल्यामुळें अंमळ मंदावलेल्या प्रेमाच्या प्रशांत प्रभेप्रमाणें शोभत आहे ! पूर्णविकच पुष्पांची सुगंधवृष्टि त्यांत एकजीवानें मिसळल्यामुळें अपत्यवत्सल हृदयाच्या प्रौढप्रेमांत समाधानवृत्तीची भर पडल्याची साक्ष पटत आहे; चांदण्याच्या भरांत झाडाझुडांखालीं दडून बसलेल्या या फिकट सावल्यासुद्धां, सुखकालच्या संभाषणांतल्या गतदुःखांच्या आठवणींप्रमाणें आनंदत देत आहेत; शांतस्वरूप वृक्षलतांवरून सृष्टीच्या वायुमय जीवनलहरी अगदीं नाजूक जोरानें वाहून नुसत्या कोंवळ्या अंकुरांनाच नाचवीत असल्यामुळें, निजलेल्या बाळाला झोंप लागली कीं नाहीं हें पाहण्यासाठीं आईनें पावलाची चाहूल न होऊं देतां त्याच्या जवळ जावें, ममतेच्या मोहानें खिळलेल्या नजरेनें त्याला निरखीत राहावें उष्ण निश्वासाच्या स्पर्शानें त्याची झोंपमोड होऊं नये म्हणून जीवनक्रियाही जपून करावी, आणि त्या मंदनिश्वासाच्या न कळण्याजोग्या लहरींनीं, त्या चिमुकल्याच्या तोंडावर रुळणारा एखाददुसरा केंसच भुरभुरत राहावा अशा मनोहर प्रसंगाचें चित्र डोळ्यांसमोर सारखें तरळत आहे !

भूपाल : या शोभेपेक्षां, तिनें प्रसन्न झालेल्या तुझ्या मनःसौंदर्यानेंच मला विशेष आल्हाद होत आहे ! हृदयदेवि, या सुखोपभोगाच्या साक्षात्कारामुळें असें खात्रीनें वाटतें, कीं कविकल्पना स्वर्गाच्या निर्माणांत चुकली नसली तरी अभिलापांत मात्र खास चुकली आहे ! अशा स्थितींत भूलोकाचा स्वर्गाशीं विनिमय करायला कोण प्रवृत्त होईल ? आपल्या प्रीतीचा साक्षीदार समोर खेळत आहे; तुझ्या मुखसौंदर्याचा अधरावर स्फुरणारा अमृतनिस्यंद संतुष्ट नेत्रांचा उन्माद वाढवीत आहे. या कारंज्याच्या शीतस्पर्श तुषारांनीं गारठल्यामुळें या वयांतलीं अंगांचीं शिथिल संधिबंधनें संकोच पावून, आमच्या वृत्त आलिंगनांतही पहिल्या आतुरतेची उत्कट दृढता उत्पन्न होत आहे; देहस्थितीच्या एकतानतेनें मनही बालचपल वृत्तींत तरंगत आहे; पुन्हां लाभलेल्या या अल्लडपणाच्या आनंदी भरांत, माझ्याकडून नकळत झालेल्या एखाद्या विभ्रमप्रमादाबद्दल तुझी परिचयप्रगल्भतेमुळेंच सलज्ज झालेली स्मितदृष्टि अपराधी मनाच्या ओशाळलेल्या शोधक वृत्तीला मात्र दिसण्याइतक्या सूक्ष्म भ्रूभंगानें माझा निषेध करीत आहे; त्या त्या विलासांच्या प्रथम प्रसंगांचीं स्मृतिचित्रें पाहण्यासाठीं दोघेंही क्षणैक डोळे मिटून घेत आहों. लाडके, ते डोळे उघडून आतां उद्यांच्या स्वर्गचित्राकडे पाहा ! नंदनवनांत

माझ्या एकाच अंजलीनें अमृतपान करून, अमर कायेनें आपण आजच्या प्रसंगाबद्दल आठवणीनें बोलत असतांना, या सुखासाठीं स्वर्गातूनही खालीं यावेंसें वाटणार नाहीं का? दिव्य पारिजाताचें एखादें फूल अंगावर पडून आपला प्रणयसमाधि मोडतांच आपल्याला या चिमुकल्या निशिगंधाची तावडतोब आठवण होईल. तें पहा, आपल्या दीनाराच्या जन्मदिवशीं लावलेल्या निशिगंधाच्या रोपाचें तें पहिलें फूल आतां पुरतेपणीं उमललें आहे! थांब, आजच्या भाग्यप्रसंगाची स्मृति स्वर्गात त्याशीं संलग्न होण्यासाठीं त्या फुलानें—

[उठून जाऊं लागतो.]

वसुंधरा : (त्याचा हात धरून) नाथ, तिथूनच त्याची शोभा दिसत नाहीं का? कौतुक करण्यासाठींसुद्धां कोणीं दीनाराला माझ्या मांडीवरून उचलून घेतला तरी मला मनापासून राग येतो! वस्तुनाशावांचून तिच्या सौंदर्याचा उपभोग मनुष्यबुद्धीला कां बरें घेतां येऊं नये?

[निहाले मानहि०]

विनाश कां सहगामीच सदा भोगसुखाला ॥ ध्रु० ॥
सुवास वाहत राही। नाश तदा पुष्पाचा।
विचार हा करि आनंदकालिं खिन्न मनाला ॥ १ ॥

भूपाल : हें निशिगंध पुष्प, आपल्या जन्मकालानें दीनाराशीं आणि आकार-सादृश्यानें तुझ्याशीं संबंध असल्यामुळे मला द्विगुणित प्रिय झालेलें आहे! स्त्रीजातीची पुष्पसृष्टीनें गणना करावयाची झाली तर तुझी तुलना मी निशिगंधानें करीन. त्याचा पांढरा शुभ्र साधेपणा तुझ्या ज्ञानगंभीर गौर अंगाशीं आणि दरवळणारा नाजूक सुगंध तुझ्या कोमल प्रेमपूराशीं सदृश आहे! (त्या फुलाचा दोघेंही वास घेतात.) याच्या मनमुराद वासानें हृदय उचंबळून आलें आणि बुद्धि धुंदकारल्यासारखी झाली म्हणजे गोड भ्रमांत मला वाटायला लागतं, कीं तुझ्या जन्मदिवशीं उमलावयाचीं निशिगंधाचीं फुलं निर्माण करून नंतर त्याच हातानें विधात्यानें तुझ्या धवलगंभीर मूर्तीची मूस ओतली असावी!

वसुंधरा : आपण फुलांचा वास घेत आहों आणि आपला चिमुकला आकाशां-तल्या तारांकडे टक लावून पाहत आहे!

भूपाल : नुकतेंच देवाजवळून आलेल्या निष्पाप बालकाचे स्वभावतःच वरतीं पाहणारे डोळे आल्या वरच्या ओळखीनें तारांकडे पाहतात. पुढें पृथ्वीवर रमलेल्या तरुणांची दृष्टि समांतर असलेल्या पुष्पांशीं प्रणयालाप करिते, आणि

वांकलेल्या वृद्धांची दृष्टि पातकाच्या परिचयानें ओशाळून खालीं दगडाकडे वळते; याप्रमाणें मनुष्याच्या जन्म, जीवित, आणि मरण या तीन अवस्थांचीं तारा, पुष्प, आणि पाषाण हीं तीन जडस्वरूप निदर्शनेंच आहेत!

**वसुंधरा :** या एवढ्याशा मुलाला तारांकडे पाहून काय वाटत असेल बरें?

**भूपाल :** तारांच्या अज्ञेय अंतरामुळें त्यांच्याकडे पाहतांना मुलांत आणि मोठ्या मनुष्यांत विशेष भेद असत नाहीं; दोघेही सारख्याच प्रमाणानें भांबावून जातात! हीं नक्षत्रें म्हणजे आकाशाच्या उघड्या माळावर तत्त्वज्ञानाचीं बीजेंच परमेश्वरानें पेरून ठेविलीं आहेत. मानवजातीच्या आदिपितरांना पहिल्या अमावास्येच्या रात्रीं, या चिमुकल्या टिकल्यांनीं तेजस्वी आधार दिला असेल! यांच्याच प्रकाशामुळें पहिल्या विचारशील पुरुषाच्या कल्पनेला ऐहिकाला सोडून अपरोक्षाच्या अंधुक प्रदेशांत पाऊल टाकण्याचा धीर आला असेल! काळ्या अंधाराच्या पोटीं यांना चमकतांना पाहिलें म्हणजे माझ्या मनांत भीतीच्या भावना उत्पन्न होतात आणि चंद्रिकेच्या रसांत तारांमागून तारा विरघळतांना पाहून मनाला खेद वाटतो; काय असेल तें असो, चांदण्याच्या फिकट तेजानें माझ्या मनांत करुणखिन्न कल्पनांचें काहूर जमायला लागतें!

**वसुंधरा :** वस्तुमात्राचा पहिल्यांदा हृदयावर दृढ संस्कार होतो त्या काळीं जी मनोवृत्ति प्रबळ असते तिचीच छाया पुढें त्या त्या वस्तूशीं आजन्म संलग्न होऊन बसते! आपल्या वडिलांच्या अंतकाळीं आकाशांत पसरलेल्या संध्यारागाशीं त्यांच्या मरणनष्ट रक्ताची माझ्या कल्पनेनें कायमची मिळणी करून ठेविली आहे. संध्यारागांतील सूर्याची शेवटची प्रभा आपल्या वडिलांच्या अंतिम आशीर्वादांतील दयेप्रमाणें मला नेहमीं करुणमिश्रित वाटते.

**भूपाल :** अंतरिक्षांतील कोणतीही वस्तु मनुष्यबुद्धीला कुंठित केल्यावांचून रहात नाहीं.

[वैभवें नटल्या० ]

गौरवा प्रसरी प्रभूच्या भव्य पट हा नभाचा । जीवकोटि प्रचुर
भू करि कुंठिता तेविं वाचा ।। ध्रु० ।। भ्रमति अवकाशांत अणु
हे अलक्ष्यस्वरूपें ।। पवन त्यांतुनि शीघ्र फिरतां नाद चाले
तयाचा ।। १ ।। विस्मयाकुल मनुजमतिला तदा भास होई ।।
हुंकृतिध्वनि कोशवासी विश्व करि हाच साचा ।। २ ।।

प्रतिरात्रीं काळाच्या अजस्र कारखान्यांत संध्या आणि उषा यांच्या जरिपदरानें झळकणाऱ्या अंबरपटाच्या बुट्टेदार चंद्रकळा परमेश्वर विसाव्यावांचून कशाकरितां

बरें काढीत असेल !

वसुंधरा : ज्या महासाध्वींनीं पतीच्या देहाबरोबर अग्निशय्येची अखेरशेज रचिली असेल त्यांच्याखेरीज हीं निर्वाणीचीं लेणीं दुसऱ्या कोणाला पचणार ?

भूपाल : पतिव्रतांतील पतिव्रता, परमपुरुषाच्या इच्छेप्रमाणें वागणारी प्रकृतिदेवीच, या अनंत वस्त्रांची स्वामिनी आहे. आपल्या दोघांच्या कल्पनेंत किती अंतर आहे पहा ! मातृपदाला पोहोंचल्याबरोबर स्त्री प्रौढगंभीर होते असें म्हणतात तें खोटें नाहीं ! माझ्या चंद्रकलेच्या कल्पनेनें तुझ्या डोळ्यांसमोर सतीचें उदात्त कल्पनाचित्र दिसूं लागलें; आणि त्याच वेळीं, वस्त्रांच्या उल्लेखावरून मला निराळाच विचार आठवत आहे. त्या पलीकडच्या डोंगरावर पांढऱ्या ढगाच्या पातळ पट्ट्याशीं चंद्राचीं किरणें खेळतांना पाहून आपल्या हलक्या हातांनीं चंद्रमा भूदेवीच्या स्तनावरील हें सूक्ष्म धवल वस्त्र बाजूला सरकवीत आहे असें मला वाटलें. या विशाल वस्तूंच्या अनंत संसाराकडे लक्ष्य दिलें म्हणजे त्यांच्या उदरांत वावरणाऱ्या आम्हां क्षुद्र प्राण्यांचें जीवन, आमच्या हृदयांत भावमात्रानें तरंगणाऱ्या विचारांच्या हालचालींइतकेंच अमूर्त आकाराचें भासूं लागतें. संसाराची ही क्षणभंगुरता समाधानकाळींसुद्धां कष्टदायिनी होते. सुखाच्या प्राप्तीनें इच्छेची तृप्ति होते पण त्या सुखाच्या अक्षयतेसाठीं पुन्हां नवी इच्छा भविष्यत्कालाकडे केविलवाण्या आशेनें पाहूं लागते. तृप्तीला इच्छेच्या उत्तर-क्रियेचें अमंगल रूप मिळतें ! एका इच्छेच्या मरणांतून दुसरीचें जनन होऊन त्यांची परंपरा आजन्म चालू राहते ! म्हणून, वंध्या तृप्तीच्या निराश सुखा-साठीं—निःश्रेयसासाठीं आमच्या अगाध ज्ञानसागरांची, जीवात्म्याच्या जाणीवे-वांचून परमात्मस्वरूपांत विलय करून टाकण्याची कल्पना साध्य नसली किंवा सत्यही नसली तरी कल्पना—शक्य मात्र वाटते !

वसुंधरा : प्रीतीनें दोन भिन्न जीवांचा एकमय जीव झालेला पाहून, भक्तीच्याही उत्कर्षाची ही सीमा, सत्य—आणखी साध्य तरी कां वाटूं नये ?

भूपाल : बुद्धीला प्रीतीचें प्रत्यंतर पटतें, तशी ईश्वरप्रत्यक्षाची प्रचीति मिळत नाहीं म्हणून ! वाढत्या विचाराच्या हातघाईत, निर्दय बुद्धिवादाच्या आघा-तांनीं प्रेमळ श्रद्धेच्या हृदयाचीं शतशः शकलें होतात ! अज्ञेयाच्या भव्य महाद्वाराशीं आथडणारी कल्पना, हताश वृत्तीनें कपाळमोक्ष करून घ्यावयालाही तयार होते. एकएकदां जिज्ञासाबुद्धि इतक्या आतुर तीव्रतेनें बळावते, कीं मला आत्महत्या करण्याची अनावर प्रवृत्ति होते ! ज्ञानपूर्तीविरहित जीवन जड वाटून मरणाबद्दल अनिवार उत्कंठा वाटते !

**वसुंधरा :** अगबाई, काय हें भलतेंच बोलणें ? सुखविचारांतून काय अभद्र विचार निघाले हे ?

**भूपाल :** चेतनापूर्ण जीवनाचें उदात्त मरणांत पर्यवसान होतें त्याप्रमाणें सुख-विचारांचा शेवटही करुणनिराश विषादांत झाल्यास तें सरळच आहे.

**वसुंधरा :** आपल्याला असे विचार मी मुळींच करूं द्यायची नाहीं; आपल्या दीनाराची शपथ आहे, आपल्या जीवितावर आपल्यापेक्षां माझा हक्क अधिक आहेना ?

**भूपाल :** ज्या नाजूक बंधानें तूं मला बांधूं पाहतेस त्यानेंच मी उलट धर्म-बंधनांतून मोकळा होत आहें ! पुत्ररूपानें पुन्हां अवतरतांच, पितरांप्रमाणें पत्नीच्याही ऋणांतून मनुष्याची मुक्तता होते ! दीनाराच्या जीवावर माझ्या जीवाचा नाश करायला मला पुरी मोकळीक नाहीं का ? शिवाय, मरणा-बद्दलच्या माझ्या आवडत्या कल्पनेंत माझ्या अर्धांगीला मीं वगळलेली नाहीं ! गूढार्शी झगडून थकलेल्या कल्पनेला वाऱ्यावर मोकळी सोडतांच, मरणाच्या एका कल्पनाचित्राकडे मी नेहमीं आशाळभूतपणानें पाहूं लागतों ! पहा तें चित्र ! संध्याकाळ नुक्ताच अतीत झालेला आहे; एखाद्या खाडीच्या काळ्याभोर पाणभुईत, चतुर्दशीच्या चंद्राच्या किरणांचा वावभर रुंदीचा पट्टा तरंगत आहे; अज्ञानजन्य विषादाची शेवटची साक्ष पटविण्यासाठीं, चंद्राच्या जरा कलत्या बाजूस, एकच काळसर ढगाचा तुकडा हलत्या नजरेसमोर झुलत आहे ! आशेपेक्षांही मनोहर चांदणें, मोडत्या लाटांवर नाचत आहे. आम्ही दोघे एकाच लहानशा होडींत जवळजवळ बसलों आहों; मानवी प्रयत्नावांचून, नुसत्या वाऱ्याच्या स्वच्छंद हेलकाव्यानें आमची होडी त्या चंद्रमार्गावरून जात आहे; दुतर्फा लहान टेंकड्यांच्या ओळींवर पसरलेल्या हिरव्या रानवटी, आंतल्या काळोखानें आणि भोंवतालच्या चांदण्यानें अस्पष्ट दिसताहेत; तुझ्या अधरामृतानें पावन झालेल्या द्राक्षासवाच्या एकाच पेल्यांतला अवशेष पिऊन—

**वसुंधरा :** द्राक्षासव ? म्हणजे मद्य पिऊन ?—

**भूपाल :** ऐहिक मोहकतेला भुलून मनाला जगाशीं चिकटवणारी जाणीव विस-रण्यासाठीं द्राक्षासवाचा घोट घेतलाच पाहिजे ! महाकवीच्या यक्षाच्या दिव्य हाताचा माझ्या मद्याच्या पेल्याला आधार आहे ! असल्या उन्मादाखेरीज जगाचा जाणीवपणानें निरोप घ्यायला धीर होणार नाहीं ! त्या निशेच्या गोड धुंदींत, हृदय उसळत्या रक्ताच्या खळखळाटांत बुद्धीला बुडवीत असल्यामुळें, तिची बडबड होडीच्या दोहों बाजूस मोडत्या लाटांवर चाललेल्या जलतरंगांच्या

मर्मरध्वनीप्रमाणें मधुर वाटत आहे; किंचित् बेसावधपणानें माझा हात गळ्यांत पडतांना तुझा पदर जरासा अस्ताव्यस्त झालेला आहे; पदर तेवढासा सरकल्याची सुद्धां तुला अंधुक जाणीव आहे, पण बादशाही कैफाच्या अंमली आळसामुळें तो सांवरून घेण्याइतकी तत्परता नाहीं; डोळ्यांच्या पडद्यावर गारवा वाढत जाऊन नकळत पापणीला पापणी लागत आहे ! अशा स्थितींत सागरसंगमाच्या सीमारेषेजवळ आपली नौका डळमळत आहे ! आणि ही साधी गोष्ट सांगण्यासाठींसुद्धां मी नादानें तुझ्या कानाजवळ तोंड आणीत आहें; सुखस्पर्शाच्या उष्ण चेतनेनें तुझ्या देहावर रोमांच थरारून तूं आपला केशपाश माझें तोंड चुकविण्यासाठीं आपल्या गालावर ठेविला आहेस, त्याच्या भिरभिरत्या रुळतीनें, माझ्या सर्वांगाला नखशिखान्त गोड झिणझिण्या महिरून टाकीत आहेत; अखेरच्या हालचालीनें मीं आपले ओंठ तुझ्या ओंठांशीं आणिले आहेत; आपल्या शेवटच्या चुंबनाच्या मुहूर्तावर, सागर नदीमुखाचें पहिलें चुंबन घेत आहे; आणि त्या प्रणयतंद्रींत आम्ही डोळे मिटून घेत असतां, समुद्राच्या लाटेच्या ओंठाची मोठी मुरड पडून आमची होडी तिच्या पोटीं गडप होऊन जावी. थंड पाण्याच्या स्नानानें बुद्धीचे कण एकामागून एक सावध होत असतांना, शरीराचे अणु भराभर विरत जावे ! त्या वेळीं होडी अथांग सागराच्या तळाशीं जाण्यापूर्वीच्या आम्ही अज्ञेयाच्या मुळाशीं जाऊन पोहोंचूं आणि मरणाच्या मोलानें मिळविलेल्या पूर्ण ज्ञानांत रंगून जाऊं ! वसुंधरे, यापेक्षां मोहक मरण दुसऱ्या कोणत्याही स्थितींत मिळेल का ? निदान मला मरण यायचेंच असेल–( पिंगळा ओरडतो. )

**वसुधरा :** इडापिडा टळो आणि अमंगळ पळो ! मघांपासून घाबरल्यासारखें होऊन माझ्या तोंडावर कृष्णनाम घोटाळत होतें; या पलीकडच्या झाडावर पिंगळ्यांची नेहमीं किलबिल चाललेली असते ! आपण आतां असें कांहीं वेडेंवांकडें बोलूं नये. माणसानें आपलें कसें शुभ बोलत असावें ! वेळेवेळेचा गुण वेगळाच असतो हो !

**भूपाल :** इतकावेळचें पांडित्य मावळलें वाटतें ? तुझ्या स्त्रीस्वभावानें अखेर वेळ साधलीच !

**वसुधरा :** असेंच म्हणून कसें चालेल ? काळवेळेचे आणि शकुनाचे पडताळे थोडे का पटतात ?

**भूपाल :** नुसत्या शुभ बोलण्यानें–नामोच्चारानें–इच्छित दैवघटना करितां येण्यासारखी असती तर कल्पवृक्षाच्या कल्पनेंत अलौकिक असें कांहींच राहिलें

नसतें ! पक्ष्यांच्या शब्दांनीं सूचित संकटें तशाच पोपटपंचीनें पळतात, याचें कारण त्या संकटांचा अभाव हेंच होय ! देवाभोंवतीं फेऱ्या घातल्यानें दैवाच्या फेऱ्यांतून सुटका कशी होणार ? भविष्याचें अज्ञान हेंच सृष्टीच्या संसाराचें सार्वत्रिक सूत्र आहे ! मागें गेला तो भूतकाळ, अशी उरफाटी व्याख्या करून मागून येणाऱ्या भविष्यत्कालाला पाहण्यासाठीं आपण पुढें दृष्टि लावून असतों; पण भविष्यत्काल पाहतां येऊं नये म्हणून परमेश्वरानें मनुष्याच्या पाठीला डोळे दिले नाहींत. भावि संसाररचना करण्याचे विधात्याचे हक्क आपल्याकडे घेऊन, आम्ही सदिच्छेनें आणि भाबड्या आशेनें जेव्हां शक्यतेच्या भुसभुशीत वाळूवर मनाचे मनोरे उभारूं लागतों तेव्हां काळपुरुष आमच्या पाठीमागें उभा राहून निर्दय विनोदानें हंसत असतो ! काळ मृदु हृदयाचा गालीचा तुडवीत येत नसता तर आम्हांला त्याच्या पावलांची चाहूल लागली असती ! हृदयांतलें कल्पनागीत ऐकण्यासाठीं कान अंतर्मुख झाल्यामुळे त्याच्या हंसण्याचा भेसूर आवाज आम्हांला ऐकूं येत नाहीं ! काळाचे हे हजारों डोळे कोणत्या अर्थानें लुकलुकत असतात हें आम्हांला कळेल तर कितीतरी निराशा आधींच टळतील! आमच्या भावि संकटांच्या विचारानेंच तर काळ असे डोळे मिचकावीत नसेल ना ? ताऱ्यांच्या या चमकीचा अर्थ काय बरें असावा ?

**वसुंधरा :** अनंत अंतरांवरील तारकांची तरल दृष्टि तर दूरच राहिली, पण हाताशेजारीं उभ्या राहिलेल्या वृंदावनांच्या नजरेची चमक काय अर्थाची आहे ती तरी आपल्या भोळ्या मनाला कुठें कळते आहे ?

**भूपाल :** इतक्या वर्षांच्या सहवासानंतरसुद्धां वृंदावनाबद्दल तुला शंका यावी हें तारकांच्या दृष्टीपेक्षांही अधिक गूढ आहे. तुझ्या लहानपणापासून तूं त्याला पाहत आहेस, पण त्याचें वर्तन कधीं वावगें दिसलें आहे का ? नांवाजण्याजोग्या गोष्टींना नांवें ठेवल्याखेरीज त्याच्या निंदकांना गत्यंतर नाहीं !

**वसुंधरा :** मी त्यांची निंदा कशाला करूं ? त्यांचे गुण कुणालाही दिसण्यासारखे आहेत. पण काय असेल तें असो; जुनाट किल्ल्याच्या दारांत उभे राहणाऱ्याला, वरच्या चौकटींतल्या एखाद्या निखळलेल्या दगडाची भीति डोक्यावर सारखी अधांत्रीं हेलकावत राहते; वृंदावनांकडे पाहतांना माझी स्थिति अशीच होत असते ! कधीं कधीं दीनाराला घेतांना त्यांच्या तोंडावर इतकी व्यवहारदक्ष सावधगिरी दिसून येते, कीं त्यांच्या त्या खेळवण्यांत कौतुकाची छायासुद्धां भासत नाहीं ! अशा वेळीं त्यांच्या डोळ्यांशीं डोळा भिडविला म्हणजे ते इतक्या तीव्र दृष्टीनें पाहूं लागतात, कीं त्यांच्या डोळ्यांचीं किरणें खालीं पाहिलें तरी

सर्वांगाला सुईसारखीं टोंचतात आणि वर पाहिल्यावांचून त्यांच्या चेहऱ्यावरचा कपटी सावधपणा दिसूं लागतो.

भूपाल : त्या बिचाऱ्या एकनिष्ठ सेवकाला-अकृत्रिम मित्राला-माझ्या निर्व्याज बंधूला तुझ्याकडून मोठें योग्यच बक्षिस मिळत आहे म्हणायचें! वस्, हा तुझा दुराग्रह दूर होऊन कधींतरी तुला आपल्या संशयवृत्तीमुळे ओशाळल्यासारखें होईल! अहाहा, तो पहा केवढा मोठा तारा खळकन् तुटून-

[ वसुंधरा भूपालाचे डोळे झांकते व स्वतःचे डोळे मिटून घेते. ]

वसुंधरा : तारा पडतांना त्याकडे पाहूं नये म्हणतात; पाहणाराचें आयुष्य कमी होतें! माझ्या उरांत, कां कुणास ठाऊक, एकाएकींच धडकी भरली आहे!

[ भूपाल व वसुंधरा डोळे उघडतात. वृंदावन येतो. ]

भूपाल : वेडी आहेस झालें! कोण वृंदावन? वः! वेळेवर आलास! वसुंधरे, या उल्कापातांतूनच हा माझा प्राण घेण्यासाठीं खालीं आला आहे असें सांगितलें तर तेंसुद्धां तुला खरें वाटेल!

वृंदावन : तूर्त प्रश्न तुझ्या प्राणांचा नसून युवराजांच्या प्राणांचा आहे! एकांताची अमर्यादा केल्याबद्दल मला क्षमा कर! या घटकेला युवराज प्राणसंकटांत आहेत!

भूपाल : काय म्हणतोस?

वृंदावन : माझ्या शब्दांची पुनरुक्ति करण्यालाही अवकाश नाहीं. आपण एकदम गेलों नाहीं तर युवराज एका अकल्पित कारस्थानाला बळी पडतील!

भूपाल : हें कारस्थान बहुतकरून इंद्रनाथानेंच आरंभिलेलें असावें!

वृंदावन : त्या कारस्थानाच्या आरंभापेक्षा, शेवट करण्यासाठीं मी घाई करीत आहें!

भूपाल : चल, चल मग लौकर! [ भूपाल व वृंदावन जाऊं लागतात. ]

वसुंधरा : नाथ, मी या सर्व गोष्टींनीं इतकी भ्याली आहे कीं-

भूपाल : आपला चिमुकला शिपाई तुझें संरक्षण करील. [ जातात. ]

## प्रवेश तिसरा

[ स्थळ : राजमंदिर. कंकण प्रवेश करितो. ]

कंकण : वेळांत वेळ काढून त्या दोन्ही धड्यांची उजळणी केली पाहिजे. एक वृंदावनांनीं सांगितलेलें महाराजांजवळचें रडगाणें आणि दुसरा किंकिणीला ऐकविण्यासाठीं त्या पंडितानें पढविलेला प्रेमपाठ! दोन्ही वेळीं गुडघे मोडायचे आहेत; पवित्रे मात्र जरा निराळे आहेत! हं, हा महाराजांपुढें. दोन्ही गुडघे मोडून, हे प्राणेश्वरी का हे प्राणदात्या? या दोन्ही प्रकारांतल्या सारखेपणामुळें थोडा घोटाळा होणारसें दिसतें! हे प्राणेश्वरी, हा किंकिणीचा कितान दिसतो, आणि महाराज, हे प्राणदात्या!–पुन्हां म्हणावें एकदा! दोन्ही गुडघे मोडून आणि दोन्ही हात जोडून, हे प्राणेश्वरी किंवा हे प्राणदात्या, माझ्या घोर प्रेमा-मुळें माझ्या तोंडांतून शब्दही निघत नाहीं! या अपराधानें मी रात्रंदिवस विरहव्याकुल होऊन आपली करुणा भाकितों! पुन्हां असें अघोर प्रेम केलें तर, राजाधिराज, मला आपल्या हृदयमंदिरांत स्थळ दे! छे; कांहीं इकडची मंडळी तिकडे घुसल्यासारखी दिसते! हृदयमंदिर वगैरे किंकिणीचे वऱ्हाडी! प्रेमपाठच म्हणून पहावा बरें! एक गुडघा मोडून, एक हात छातीला लावून, दुसरा समोर नाचवून, हे प्राणेश्वरी किंवा हे प्राणदात्या, पैकीं कोणी तरी! छट्! हें जमेलसें दिसत नाहीं! जिवाचा करावा धडा आणि वेळेवर सुचेल तें द्यावें दडपून! प्रसंग हिंमत देतोच आहे मर्दाला!

[ जातो. ]

## प्रवेश चवथा

[ स्थळ : युवराजांचें शयनमंदिर. युवराजाच्या पलंगामागें मच्छरदाणीच्या आड राजा उभा आहे; एका बाजूनें भूपाल तलवार उपसून प्रवेश करितो. ]

भूपाल : ( स्वगत ) वृंदावनाचा शोध तंतोतंत खरा आहे! मच्छरदाणीच्या आड अस्पष्ट मनुष्याकृति दिसत आहे ती मारेकऱ्याखेरीज कोणाची अस-णार? इतक्या दुरून पुढें होऊन भागणार नाहीं! हा मारेकरी कदाचित् स्वतः इंद्रनाथच असला तर जिवावर उदार होऊन तो आधीं युवराजावर वार

कराल ! पलीकडच्या बाजूनें पलंगाखालीं शिरून एकदम त्यावर वार करावा !

[ जातो व शेवटच्या पडद्यांतून निघून सरपटत पलंगाखालीं शिरतो; नंतर बाहेर येऊन एकदम युवराजाच्या अंगावरून तलवार पलंगामागील आकृतीवर उगारतो. ]

राजा : थांब ! चांडाळा ! एकदम थांब !

[ युवराज जागा होतो. ]

युवराज : कोण भूपाल ? मंडलेश्वर ! [ उठून त्याला मुजरा करूं लागतो. ]

भूपाल : कोण प्रत्यक्ष महाराज ?

[ राजा पुढें होतो व वृंदावन प्रवेश करितो. ]

वृंदावन : कंकणाला मीं बाहेरच थोपवून ठेविला आहे ! आणि आज्ञा असेल तर त्याला समोर आणतों.

राजा : त्याची कांहीं जरूर नाहीं ! भूपालाची कृति इतकी उघड स्वरूपाची आहे, कीं त्याच्या अपराधासाठीं कोणाच्या साक्षीची आवश्यकताच नाहीं !

भूपाल : माझा अपराध ? वृंदावन ! हा काय प्रकार आहे ?

वृंदावन : मित्रप्रीतीपेक्षां, स्वार्थापेक्षांही राजभक्तीच अधिक प्रिय वाटल्यामुळें, मीं महाराजांच्या पायांजवळ आपलें सारें कारस्थान सांगून टाकिलें आहे.

भूपाल : कसलें कारस्थान ? वृंदावन, हा काय अर्थाचा अनर्थ होत आहे ?

राजा : अनर्थ होत नाहीं; व्हायचा मात्र टळला ! तुझ्या भयंकर कारस्थानाची माहिती आम्हां सवानाच झालेली आहे ! तुझ्यासारख्या अघोर, विश्वास घातकी राक्षसापेक्षां, इंद्रनाथाचें उघडें वैर कितीतरी उदारपणाचें वाटतें ! माझ्या लाडक्या बाळाचा घात करून राजपद मिळविण्याची इच्छा ! त्याच्या जन्मानें झालेली हानि त्याच्या मरणानें भरून काढायची कल्पना ! भूपाल, तुम्हां सामान्य लोकांचीं वस्त्रें अंगावर बेततात, पण राजवस्त्रें कधीं कधीं जिवावर बेततात हें तुझ्या एका क्षणांत प्रत्ययाला येईल !

वृंदावन : [ राजाचे पाय धरून ] महाराजांच्या पायांजवळ माझ्या मित्रासाठीं मी दयेची याचना करीत आहे !

राजा : त्याची गतसेवा या घोर अपराधामुळें कृत्रिम ठरून अधिकच भयंकर वाटली नसती तर तिच्याकडे पाहून तरी याच्यावर थोडी दया करितां आली असती—आणि याच्यावर दया तरी काय करायची ? याचा अपराध इतका अमानुष आहे, कीं त्याच्या दृष्टीनें केलेली दयासुद्धां अत्यंत भयंकर शिक्षे-इतकी उग्रच असणार !

वृंदावन : रागाच्या भरांत महाराजांनीं मला दिलेलें वचन विसरूं नये अशी

माझी प्रार्थना आहे.

भूपाळ : या अकल्पित प्रकारानें माझें मस्तक इतकें सुन्न होऊन गेलें आहे, कीं कोणत्या शब्दांनीं सत्य आपल्यापुढें मांडावें हेंच सुचत नाहीं.

राजा : अपरोक्ष घडलेली गोष्ट सांगण्यासाठीं शब्दांची जरूर असते. प्रत्यक्ष कृति समोर असल्यावर बोलण्याचें कारणच पडत नाहीं.

युवराज : महाराज, माझा बोलण्याचा अधिकार नाहीं, पण मी खात्रीनें सांगतों, कीं या प्रकारांत कांहींतरी दगलबाजी आहे. भूपालांच्या सरळ हृदयाची साक्ष मी देतों; माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवा.

राजा : आणि वृंदावनाच्या बोलण्यावर कां ठेवूं नको ? भूपालाच्या कृतीची साक्ष कां घेऊं नको ? हालचाल करण्यापूर्वीं सापालासुद्धां सरळ राहतां येतें !

युवराज : वृंदावनांनींच हें विष आपल्या कानांत ओतलें असेल तर आपलें म्हणणें त्यांनाच लागू करीन.

राजा : गळ्यांत गळा घालून फिरणाऱ्या मित्राचा सुखासुखीं गळा कापण्याचें वृंदावनांना कांहींच कारण नव्हतें. त्यांचा परस्परांशीं निकट सहवास लक्षांत घ्या.

युवराज : नुसत्या निकट सहवासानें शुद्धभावाची मित्रता सिद्ध होत नाहीं. चंदनाभोंवतीं सर्पांचा कायमचा विळखा असतो हें त्यांच्या मैत्रीचेंच लक्षण म्हणतां येईल का ? महाराज, विचार करा, माझी खात्री आहे, कीं हें सारें कारस्थान या वृंदावनाचेंच आहे ! याच्या बोलण्यावर विश्वास ठेवूं नका !

[ मन वरीतसे नृपराया० ]

भुलुनियां खलजनालापा । जरि दिला ताप निष्पापा ॥
तरि निरयनिरति न दुरापा ॥ ध्रु० ॥ या सदर्पा ।
बघुनि सर्पा । तनु सकंपा जातकोपा ॥ नय कुजनिं
उचित जरि घडत न तरि मलिन करि सत्प्रतापा ॥ १ ॥

राजा : युवराज, आपल्या उपकारकाची नसती निंदा आणि आपल्या वडिलांचा उपमर्द करून तुम्ही बालवृत्तीचें उल्लंघन करीत आहांत !

भूपाल : युवराज, निष्कारण महाराजांच्या रोषाला पात्र होऊं नका ! दुःखाचा कडेलोट झाला असतांही तुमच्या या तरफदारीमुळें मला नेहमीं समाधान वाटत जाईल. सर्वसाक्षी परमेश्वराच्या खालोखाल मी तुम्हांलाच मान देत जाईन. मृत्युंजयमहाराज, आपण मात्र माझ्या जीविताचें चांगलें सार्थक केलें ! देवा, आत्मश्लाघेच्या अपराधाची मला क्षमा कर ! राजा मृत्युंजया,

अरुंधतीच्या राजपदासाठी मला कपटाचा आश्रय करण्याचें काय कारण होतें ? वनशंकरीच्या शिकारींत, चवताळलेल्या वाघिणीनें युवराजांवर अचानक झडप घातली, त्या वेळीं त्यांच्यापुढें होऊन जंगलच्या राणीच्या तोंडांत मस्तक द्यायला तयार झालों, तो माझ्या मस्तकावर तुझा राजमुकुट बसण्यासारखा नव्हता म्हणून नाहीं ? वीरावतीच्या रणकंदनांत पहिली हौस पुरविण्यासाठीं आलेल्या युवराजाच्या रोखानें जेव्हां इंद्रनाथाच्या लोकांनीं चाल केली तेव्हां त्यांना पाठीशीं घालून मीं आपल्या देहाच्या चिंधड्या करून घेतल्या ! तुझीं जीवावर बेतणारीं राजवस्त्रें या देहावर बेताचीं बसण्याजोगीं नव्हतीं एवढ्यासाठी त्याची तशी दैना करून घेतली का ? त्या वेळीं तळपणारी ही तलवार आज युवराजाच्या रक्तासाठीं हपापून का बाहेर पडली आहे ?

राजा : नीचा, या वाचाळपणानें आपल्या कृतकर्मावर पांघरूण घालूं पाहतोस ! तुझी ती दगलबाज तलवार पायांखालीं मोडून तिचे तुकडे—

भूपाल : हे शब्द उच्चारणाऱ्या दुसऱ्या जिभेचे—हे शब्द पुन्हां उच्चारशील तर राजा, तुझ्या जिभेचे सुद्धां तुकडे झाल्यावांचून रहायचे नाहींत ! एखाद्या मूर्खाच्या जिभेप्रमाणें वाटेल त्या वेळीं वळवळण्यासाठीं ही तलवार कधींही म्यानाबाहेर आली नाहीं ! युवराज, तुमच्या आमच्या पूर्वजांची ही रणदेवता आज मी तुम्हांला देतों. यापुढें मला तिची कधींच जरूर पडणार नाहीं ! आजच्या माझ्या बदलौकिकामुळें मला कोणी विश्वासानें जवळ करणार नाहीं आणि कृतसेवेचे हे धिंडवडे झालेले पाहून मलाही पुढें कोणाजवळ सेवा करावीशी वाटणार नाहीं ! हिचें नीट जतन करा. [ तलवार देतो. ]

युवराज : तुमचा हा शेवटचा कृपाप्रसाद मी मस्तकीं धारण करितों.

[ ना छेडो गारि ० ]

दुर्दैवें हेतु झाला तुम्हां द्याया ताप हा ॥ ध्रु० ॥
उपकार आजवरि केला । तो अकालिं विलया गेला ।
अपकारमात्रें याला । स्मरावें आतां पहा ॥ १ ॥

राजा : इंद्रायुधा, हा अधिक प्रसंग होत आहे. या कृपाप्रसादानेंच तुझें मस्तक धडावेगळें होणार होतें. वृंदावन, या कृतघ्नाला इथून घेऊन चला; नाहींतर याच्या अमर्याद शब्दांनीं खवळल्यामुळें माझ्या हातून तुम्हांला दिलेल्या वचनाचा भंग होईल ! याला नीट बंदोबस्तानें ठेवा ! भूपाल, तळघरांत कोंडून ठेवण्यानेंच तुझ्यावर मोठी दया केल्यासारखें होणार आहे. अशा निराधार स्थितींत तूं जर बाहेर पडलास तर तुझ्या हाताखालच्या लोकांकडूनच तुझा

अपमान होईल. पर्वताच्या माथ्यापासून ढकललेल्या कड्याचा मातीला मिळण्यापूर्वीच खालच्या कडेकपारींवर आदळून पार चुराडा होऊन जातो.

भूपाल : माझें वैभव मीं दुसऱ्याला गैरवाजवी जाणविलें नसल्यामुळें माझ्या आपत्तीची दुसऱ्याकडून मला जाणीव होईल ही भीति मला मुळींच वाटत नाहीं! पण एका अर्थीं आपण म्हणतां त्याप्रमाणें तळघरांतला अंधार मला खरोखरीच उपकारी होणार आहे: जिथें स्वतांचें बोट डोळ्यांत घातलें तरी दिसावयाचें नाहीं तिथें दुसऱ्यांनीं आपल्याकडे पाहून बोटें केल्याचें कुठून कळणार?

राजा : वृंदावन, याच्या घरादाराची तुम्हांला वाटेल ती व्यवस्था करा! इतक्या कपटी आणि कृतघ्न मनुष्याला फारच बंदोबस्तानें संभाळावयाला विसरूं नका! युवराज, चला पुढें!

युवराज : मंडलेश्वर, मी कोणत्या तोंडानें आपला निरोप घेऊं!

[ वरल्लालकि शाब० ]

अंतरिं खेद भरे दीनवदन बोलेना। शून्य आलोक, शून्य जग,
शून्य हृदय डोलेना ॥ शुभ दर्शन चरणावें, नच आतां म्हणुनि।
देह हा जड जाहला शोकविकल हालेना ॥ १ ॥ व्यर्थ जीवित
यावरी, वज्र पडेना कां शिरीं। हें अपयश आजि या श्रोत्रांनिं
हत आलेना ॥ २ ॥

[ भूपालाला वंदन करतो. राजा व युवराज जातात. ]

वृंदावन : भूपाल, राजाज्ञा ऐकलीस ना? चल आतां माझ्याबरोबर!

भूपाल : हरहर, साऱ्या मानवी पातकांत मी ज्या कृतघ्नतेला अत्यंत घोर समजत आलों, तिचाच आज माझ्यावर आरोप आला; आणि तोसुद्धां माझ्या मित्राच्या कृतघ्नतेमुळेंच! परमेश्वरा, माझ्यावरचा नसता कलंक दूर करण्याची मनःस्फूर्ति होईपर्यंत या वृंदावनाला दीर्घायुष्य द्या आणि–

[ पापी दादुरवा० ]

करा करुणामया क्षमा। विषमा जरि गमे कृति हतकामा
तरि सुखधामा सुपरिणामा ॥ध्रु०॥ क्षणचि हृदय भरतां
विकारीं मोदभरें तव कृति न स्वीकरिं। विसरुनि तें;
अघ हें सहाया दे या शमा ॥ १ ॥

[ जातात. ]

**अंक दुसरा समाप्त**

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

[ स्थळ : तळघर. भूपाल प्रविष्ट. ]

भूपाल : ( स्वगत ) काय भयंकर काळोख हा !

[ मग जैयां हो० ]

प्रलयाची जी हतदशा । आली ती का आतां ॥ ध्रु० ॥
रविकिरणां वाटे भय याया । बघुनियां ऐशा या एकान्ता ॥ १ ॥

या तळघराच्या कैदखान्यांत शरीराला त्यांत मर्यादिलेल्या जीवात्म्याप्रमाणेंच कोंडल्यासारखें वाटत आहे. किती भेसूर स्तब्धता ही ! उबलेल्या पाकोळ्यांनीं वाऱ्याच्या चुकून आलेल्या झुळकीचा गारवा लागतांच पंख फडफडविले म्हणजे माझ्या स्वगत विचारांच्या हालचालीनेंसुद्धां रागावलेली स्तब्धताच मला गप्प रहायला सांगत आहेशी वाटतें. कोपऱ्याकोपऱ्यांत कोंदाटलेला काळोख जणूं काय एवढ्याशा जागेंत कसाबसा सामावण्याचा प्रयत्न करीत आहे. या झरोक्याच्या फटींतून दिसणारी एकच तारका काय ती तेजाची साक्ष देत आहे. खरें म्हटलें तर, जीवकोटीच्या हिशेबांत एक जीवाच्या-वाट्यांला एक तारा थोडी झाली का ! पण तीसुद्धां डोळे मिचकावून माझ्या अगतिक स्थितीचा उपहास करीत आहे ! तेजस्वी बाले, चार भिंतींच्या कोंडवाड्याबाहेर मला जातां येत नाहीं म्हणून का मला हंसत आहेस ? वेडे, अवाढव्य आकाशाच्या मैदानांतही तुला तरी आंखलेल्या रेषामात्र मार्गा-पासून जरासें इकडे तिकडे सरकतां येतें आहे का ! मग हसायचें कारण कुठें उरलें ! टीचभर जागेंत कोंबलेला भूपाल काय आणि अनंत अंतराळांत खिळलेली तारका काय–पूर्वसंचितानें दोघांनाही सारखेंच जखडून ठेविलेलें आहे !

[ आज अंजन दियो० ]

भारसंचय महा नियमि चंचलपदा ॥ जातमात्रास या
कर्मबंधापदा ॥ ध्रु० ॥ शकटभर जड यथा महोक्षहि
वाहतां ॥ सुटत ना कष्टतां । चक्रपद्धति कदा ॥१॥ पूर्वकृत
सांचिता । जीव हा ओढितां ॥ नियतिरेखांकिता । मात्र
गति तापदा ॥ २ ॥

अरेरे, माझ्या कर्मगतीचा रोख कोणीकडे आहे हें मला कळेल का? डोळे फाडून या काळोखाकडे कल्पांतापर्यंत पहात बसलें तरी भविष्यत्कालाचीं पुसट सुद्धां पावलें दिसण्याचा संभव नाहीं. बुद्धीचे बंध तोडून जीवापासून सोडविलेल्या नुसत्या विल्म डोळ्यांनीं असेंच पहात बसणें भाग आहे. [ वृंदावन प्रवेश करितो. ]

वृंदावन : ( स्वगत ) पापाबरोबर भित्रेपणाही वाढत जातो ! तळघरांतल्या अंधुक उजेडांतसुद्धां भूपालाला तोंड दाखवायची शरम वाटल्यामुळें ही संध्या-काळची वेळ साधावी लागली ! त्याच्या निर्दोष हृदयाचा तळतळाट कल्पनेनें आठवला म्हणजे माझी राक्षसी इच्छा शब्दांनीं त्याच्यापुढें उभी रहावयाला धजत नाहीं; आणि त्याला सांगितल्याखेरीज तर इलाज नाहीं ! दीनाराचा घात करण्याची भीति घातली तर वसुंधरा कदाचित् गांगरणार नाहीं ! अखेरीस भूपालाचा प्राणनाश करण्याचें साधनच पुढें करावें लागेल ! आजच ही गोष्ट याला कळली म्हणजे पहिल्या धक्क्यानें उसळलेलें रक्त विचारानें थंडावून याचें तत्त्व-ज्ञानी हृदय प्राणांचें मोल ठरविण्याच्या नादाला लागेल ! पण माझी ही इच्छा इतकी पापपूर्ण नसली तर चालणार नाहीं का? वसुंधरेनें माझ्या गळ्यांत नुसता हार घातला तर माझें समाधान कां होऊं नये ? भूपालाची जागा एक क्षणभर मिळाली तर संकेतानें माझी सूडाची कल्पना खात्रीनें शांत होईल ! पण खात्रीनें होईल का ? चाललों मी पुन्हा विचाराच्या पुरत्या पकडींत ! बस्, आतांचा हा संकल्प वावगा तर नाहींच, पण अवश्य आहे ! त्याच्या मृदुपणामुळें मला भूपालाशीं बोलण्याचा धीर येत आहे ! ( उघड ) भूपाल !

भूपाल : कोण, वृंदावन ? सांग, वृंदावन, सांग लौकर, कोणत्या लाभाच्या आशेनें तूं स्वतांचा असा सत्यानाश करून घेत आहेस ?

[ उदतन दतन० ]

अघटित कृतिसि करिसि कां ॥ ध्रु० ॥ या पापातें कवण
अशि महती आशा वद करवि जाळि अंतरंग जें तदुपरि
आत्मनाश चिरंतनाचि करि सुकृतलव नुरवि ॥ १ ॥

वृंदावन ( स्वगत ) शब्दाला शब्द वाढवीत बसून उपयोगीं नाहीं !

भूपाल : वृंदावन, बोलत कां नाहींस ? अशी कोणती वस्तु तुला दुर्मिळ वाटली, कीं जिच्यासाठीं कपटाचा आश्रय करून, जिवलग मित्राशीं विश्वासघात करावा लागला ?

वृंदावन : अशी वस्तु एकही नसेल का ? प्रथम तूं आपल्या मित्रभावांत स्वार्थ-वृत्तीनें वागलास ! भूपाल, माझ्या मित्रस्नेहांत कुठें तरी अंतर पडलें होतें का ? रात्रीचा दिवस करून तुझ्या सुखासाठीं झटतांना मीं मागें पुढें पाहिलें का ?

भूपाल : म्हणून आतां माझ्याभोंवतीं अशी दिवसाची रात्र करितांना मागेंपुढें पाहत नाहींस वांटतें ! तुझ्या निस्सीम स्नेहाशीं मीं कधीं द्रोह केला ? माझ्या सुखदुःखांचा वांटेकरी तूं कोणत्या वेळीं नव्हतास ? माझ्या हृदयाच्या सिंहासनावर तुला बसविलें नव्हतें का ?

वृंदावन : त्या हृदयांत मला जागा मिळाल्यामुळेंच मला कळलें, कीं मला आपल्या सुखदुःखांचा खराखुरा वांटेकरी तूं मुळींच समजत नाहींस. रणांगणांत तुझ्या दुःखांचा वांटाच मला देऊन, आपल्या सुखाची वस्तु मात्र तूं हृदयांत दडवून ठेविलीस ! त्या हृदयस्थ वस्तूच्या सुखापासून तूं मला दूर ठेविलेंस !

भूपाल : अशी कोणती वस्तु ती ? सांग. या क्षणीं ती तुला देऊन टाकतों !

वृंदावन : तुझ्या हृदयांतली वसुंधरेची मूर्ति ! ती मला पाहिजे, समजलास ?

भूपाल : वृंदावन, काय बोललास हें ! त्या दिव्यमूर्तीसह माझ्या हृदयाचा पार चुराडा केलास ! माझ्या शरीराचे सांधेही निखळून, मोडून टाकिलेस !

वृंदावन : तुझ्या हृदयाचा चुराडा झाला हें ठीक झालें ! माझ्या पुढच्या सांगण्यानें त्याला अधिक धक्का बसण्याची आतां भीति नाहीं !

भूपाल : कोणत्या अघोर निर्लज्जपणानें हें बोलण्याचा तुला आतां धीर होत आहे ? कपटी राक्षसा, मित्रपत्नी म्हणजे साक्षात् मातेसारखी आणि–

वृंदावन : ( एकदम खवळून) कोण कुणाचा मित्र ! वसुंधरेच्या बापाचे ते शब्द ऐकूनही, माझें तिच्या नवऱ्याशीं मित्रभावानें वागणें तिच्या लहानशा पोरालसुद्धां खरें वाटणार नाहीं ! त्या उन्मत्त थेरड्यानें प्रत्यक्ष माझ्या मातेबद्दल—त्या शब्दांचा मी आज उच्चार करीत नाहीं, अजून केला नाहीं—भ्रष्ट झालेल्या वसुंधरेच्या वर्णनाच्या वेळीं ते मीं वापरणार आहे. तेवढ्यासाठीं मीं तुझ्याशीं स्नेह केला ! माझें आतांचें आचरण कपटाचें नसून मागची मित्रता मात्र कपटाची होती ! सावजावर झडप घालण्यापूर्वीं अचूक टिपण साधण्यासाठीं संधि पाहणाऱ्या वाघाची ती क्रूर समाधि होती !

भूपाल : तुझ्या पातकाच्या काळ्याकुट्ट राशीमुळें, तुलनेनें हा काळोख धवळून, तुझें भयंकर स्वरूप मला स्पष्टपणें दिसत आहे !

वृंदावन : थांब, त्यापेक्षांही भयंकर भविष्य तुझ्याकडे धावून येत आहे त्याकडे पहा !

भूपाल : आतां भविष्य नको आणि कांहीं नको ! वृंदावन, माझ्या मनोवृत्ति महिरून, मरून गेल्या ! पत्नी आणि मित्र हींच संसारांतील मुख्य जीवबंधनें ! त्यांपैकीं एक आपण तुटून दुसऱ्याला तोडीत आहे ! वृंदावन, माझ्यावर एक अनुग्रह कर.

[ नेवर बाजोरे० ]

घे प्राण हा क्षणीं । या क्षणीं । स्मरुनि स्नेहभावा उरत न तो जरि ।
क्षण गत एक तरी । स्मरणीं आणीं ॥ ध्रु० ॥
मरण अजि मज प्राणदानसें । विश्व सकल हें फिरलें भासें ।
ताप हृदयांतरींचा शतविध पीडितसे ॥ मानी ॥ १ ॥

यावेळीं माझा प्राण घेशील तर मी तुझे उपकार आमरण विसरणार नाहीं !

वृंदावन : वः, उपकाराची पूर्णता होण्यापूर्वींच तुझी कृतज्ञता नाहींशी होणार ! ठीक आहे; तुझ्या विनंतीचा मी अमानुषपणानें अनादर करीत नाहीं. उद्यां वसुंधरेनें माझ्या गळ्यांत—माझ्या—माझ्या सांगण्याचा धिक्कार केला तर आधीं दीनाराचा बळी घेईन ! तेवढयानें तिचे डोळे उघडले नाहींत तर तुला आपले डोळे मिटण्याचा प्रसंग येणार आहे ! तिच्या पातिव्रत्याचा किंवा तुझ्या प्राणाचा तरी नाश केल्यावांचून मी राहणार नाहीं ! तिनें माझी विनंती अमान्य केली म्हणजे मी तुझी आतांची विनंती मान्य करीन ! आजची रात्र चांगली झोंप घे. उद्यां शांत मनानें या गोष्टीचा नीट विचार करून ठेव ! चार दिवसांचा तुला विचारासाठीं अवधि ठेवितों !

भूपाल : झोप घेऊन तरी आतां काय विश्रांति मिळणार ? झोपेंत याच गोष्टीचीं, पण वेताल स्वप्नें पडून मनःस्थिति अधिकच व्याकुळ होईल ! त्यापेक्षां सत्य-सृष्टीच्या यातनाच काय वाईट ? आणि चार दिवसांनीं तरी काय होणार ? क्रियाभेद नाहींसा झाल्यामुळें या काळोखाप्रमाणें काळाला अघोर एकरूपता आली आहे. तीच एकरूपता माझ्या विचारांचीही ! जा ! माझ्या विचार-शक्तीला तुझ्या शब्दांकडे कधींही पाहवणार नाहीं. हेंच माझें एकरूप उत्तर !

[ पडदा पडतो. ]

[ नूपुर प्रवेश करितो. ]

नूपुर : ( स्वगत ) हा तर्क चुकणें संभवतच नाहीं मुळीं! सुदामानें सांगितलेली हकीकत किंकिणीला आपल्या तर्कासह जरा चढवून सांगावी, म्हणजे कंकणाचा त्या गोष्टीशीं संबंध असल्यामुळें तिच्या मनांत त्याच्याविषयीं किल्मिष उत्पन्न झाल्याखेरीज राहणार नाहीं! सुदामानें सहजगत्या म्हणून सांगितलेली भानगड माझ्या इतक्या जिव्हाळ्याची आहे हें त्याला मुळींच ठाऊक नाहीं! महाराजांचा एवढा राग झाला तरी वृंदावनांनीं भूपालांचे प्राण वांचविण्यासाठीं रदबदली केली; त्यांना आपल्या ताब्यांत घेऊन तळघरांत कांडलें; शिवाय, वसुंधरेलाही दुसऱ्या तळघरांत कोंबलें; सुदामानें सांगितलेलें हें गुपित खरें असलें—आहेच बहुतेक—तर या सर्व गोष्टींपासून एकच सिद्धांत निघतो, कीं वृंदावनाची वसुंधरेबद्दल खटपट चाललेली आहे. नाहीं तर, वृंदावनानें भूपालाचा जीव वांचवीत बसण्याचा कशाशींही नीट संदर्भ जुळत नाहीं मुळीं! वसुंधरेवर छाप बसविण्याकरितांच वृंदावनाचा हा सारा खटाटोप असला पाहिजे. कंकण या कारस्थानांत आहे हें ठीक झालें. असल्या बदमाषपणांत कंकण वावरत असल्याचें किंकिणीला खुलवून सांगितलें, कीं त्याच्याबद्दल तिच्या मनांत खास नावड वाटायला लागेल. शिवाय, आतां प्रेमयाचनेंतही कंकणाची दरीच त्रेधा उडणार आहे? या शास्त्रोक्त प्रकारांत रूपवर्णन करण्यासाठीं पंडिताकडून त्यानें काव्यसामग्री जमविली आहे, आणि निरनिराळ्या अंगांना देण्याच्या उपमा ओळीनें आठवण्यासाठीं चित्रांचे कपटे अनुक्रमानें जुळवून आणिले आहेत, ही खबरही सुदामानें दिली म्हणून बरें झालें! येतां येतां त्याला गांठून तीं चित्रें पाहतांना गफलतीनें त्याच्या अनुक्रमांत गडबड करून ठेवल्यामुळें तो नखापासून केंसापर्यंत किंकिणीचें वर्णन करूं लागतांच खूप घोंटाळा उडेल आणि त्याचा मूर्खपणा तिच्या ध्यानांत येईल! इथपर्यंत खासें यश येत चाललें आहे! दामिनीची आणि त्या संन्याशी सत्पुरुषाची काय भानगड आहे हें अजून नीटसें कळत नाहीं! तिनें दोनचारदां त्याच्या गांठीं घेतल्याचें समजलें; पण त्या कशासाठीं? तसेंच, हा सुदाम तिचा कोणी नातलग आहे कीं काय? का नवराच आहे तिचा? थट्टेनें मीं त्याला सुदाम म्हणतां म्हणतां खराच सुदाम ठरायचा हा एखादे वेळीं! तूर्त तर्कवितर्क करायला वेळ नाहीं!

कंकण किंकिणीकडे आधीं जाऊन पोंचावयाचा नाहीं तर ! हा समारंभ एकदा उरकला म्हणजे तिला तेवढें वृंदावनाचें रहस्य एकटीला सांगितलें पाहिजे !

[ जातो. ]

## प्रवेश तिसरा

[ स्थळ : किंकिणीचें घर. वीणा घेऊन बसलेली किंकिणी प्रविष्ट ]

**किंकिणी :** ( स्वगत ) अशी वीणा घेऊन सरस्वतीसारखी बसलेलीच बरी क चित्रांतल्या कौसल्येसारखी मनगटावर पोपट घेऊन बसूं ? पण आयत्या वेळीं पोपट कुठला मिळायला ? मग राजासारखी वीरासन घालून नुसतें फूलच घेऊं असें हातांत ? तें मेलें जरा आडदांडासारखें दिसेल ! अशी पडून, पंख्यानें वारा घेत राहिलें तर ? पण अशा थाटाला पंखा वारायला ऋद्धिसिद्धीसारख्या दोन बाजूला दोन दासी हव्या ! वृंदावन बघायला आले तेव्हां कालिंदीबाई-साहेब कशा बसल्या असतील कुणास ठाऊक ! अलीकडे तर नेहमीं मूल मांडीवर घेऊनच बसलेल्या असतात; आतां लग्नाआधीं मी कुठलें आणूं मूल ? बरी आहे ही वीणाच झालें ! साजसोंगामध्यें कांहीं तीळ उणा नाहीं; कालिंदी-बाईसारखा हा गालावर तीळ नव्हता तो सुद्धां रेखाटला ! अगबाई, हे दोघेही आले दोन्ही बाजूंनीं ! आतां काय करूं ? वीणा वाजवितांही येत नाहीं ! तारा जमविण्याचें सोंग करावें झालें आतां !

[ कंकण व नूपुर येतात. ]

**कंकण :** ( स्वगत ) येतांना लगबगींत हा एक कपटा खालीं पडला; हा वरचा कीं तळचा ? जुळणी थोडी मोडणारसें वाटतें ! फिकीर नाहीं, वरच ठेवावा झालें ! आधीं तिच्या रूपाचें वर्णन करायचें आणि मग त्या रूपानें आपण कसे बेदिल झालों आहों हें सांगावयाचें, झालें ! रूपवर्णनाला सुरवात नखा-पासून करायची !

**नूपुर :** त्या वीण्यापेक्षां गोड आवाजाचा एकादा शब्द ऐकायला मिळेल का ?

**कंकण :** हां, असा लघळपणा करायचा नाहीं आतां !

**नूपुर :** हें बेताल गाणें नको होतें मला ! असा आग लागल्यासारखा काय ओरडतोस ?

किंकिणी : असें आरडूओरडू नका बाई ! कालिंदीबाई म्हणतात प्रेमाच्या नुसत्या कानगोष्टी असाव्यात; अन् तुमच्या तर या डंकानौबती झडताहेत !

[ तोसे लागी नजरिया० ]

कधिं वदे प्रणय का । कठोर विकटहि वचना ।
रुचतसे तया मृदुरचना ॥ ध्वनि तिथें कलह तो माना ॥ ध्रु० ॥
कळे न वळे न कुणासि जें । वच असेंहि वदतां लाजे ।
कुलीन त्याप्रति जग समजे । पतित इतर जन मनीं गणाना ॥ १ ॥

नूपुर : बरें, एकदम कार्याला सुरवात करूं ! कंकणा, वडिलकीचा मान तुझा, हो पुढें आणि आपलें प्रेम प्रकट कर.

कंकण : किंकिणी, ऐक आतां ! हे प्राणेश्वरी, तुझ्या रूपाचें वर्णन कोणाला करितां येईल ? हजार जिभांचा ब्रह्मदेव, चार तोंडांचा शेष–( जरा आठवून ) आणखी एक कोणसा, हे सारे थकून जातील !

नूपुर : लागली शिदोरी सुटायला !

कंकण : हे सुंदरी, तुझीं नखें भुंग्यासारखीं आहेत !

किंकिणी : म्हणजे काळीं कीं काय ?

नूपुर : पद्कमलांभोवतीं ही भ्रमरांची गर्दी असावयाचीच !

कंकण : तुझे चरण पोंवळ्याप्रमाणें आहेत; ऊरू कमलाप्रमाणें–

नूपुर : हे ऊरू कोण ?

कंकण : ऊरू म्हणजे ऊर ! आतां मध्यें बडबडूं नकोस ! ऊरू कमलाप्रमाणें आहेत; तुझी गति कदलीस्तंभाप्रमाणें आहे !

नूपुर : म्हणजे एका जागीं खिळलेली ! पुढें ?

कंकण : तुझी कंबर हत्तीसारखी आहे ! तुझी छाती सिंहासारखी शोभते आहे !

नूपुर : आज सुंदर स्त्रीला शृंगाराऐवजीं वीररसांतच बुचकळून काढण्याची तुझी तयारी दिसते !

किंकिणी : तुम्ही मध्यें थांबवूं नका त्यांना.

कंकण : तुझे हात घटासारखे आहेत !

नूपुर : हें अगदी रास्त आहे ! हातांचा घागरीशीं संबंध काव्यांत मान्य नसला तरी व्यवहारांत तंतोतंत पटलाच पाहिजे ! ( स्वगत ) हा एकच अनुक्रम चुकल्यासारखा दिसतो; मीं घोंटाळा केला होता त्याचें काय झालें ? (उघड) हं, हात घागरीसारखे—

कंकण : घटासारखे ! तुझा कंठ कमलनालप्रमाणें—



च २७३

किंकिणी : म्हणजे कमळाच्या देंठाप्रमाणें ?

नूपूर : हं; पुढें. मुखकमळाला या देंठाचा आधार लागणारच ! कंकणा, चालूं दे; कंठानंतर आवाज ! स्वर !

कंकण : तुझा आवाज शंखासारखा आहे; ओंठांची शोभा कोकिळेप्रमाणें आहे!

किंकेणी : (हंसून) अगदीं काळेकुळकुळीत ना ?

नूपूर : ओंठांच्या कोकिळा झाल्या म्हणजे त्यांची या दाढीमिशीच्या जंगलांत घरटीं बांधायची मुबलक सोय झाली !

कंकण : दंतांची मजा धनुष्याप्रमाणें; नाक गुलाबासारखे; गाल कुंदकळ्यांसारखे; तुझे डोळे पिकलेल्या तोंडल्यासारखे आहेत ! तुझं कपाळ हरिणासारखें आहे !

नूपूर : शिंगांसकट ? कीं शिंगें तुझ्या डोक्यावर जायचीं ? (स्वगत) आणि कपाळाचा अर्धचंद्र आतां केसांना मिळणार कीं काय ? लग्न ठरण्याच्या गडबडींत या वैधव्याच्या अलंकाराचा हा शुभ्र आहेरच म्हणावयाचा ! (उघड) कंकणा, आतां पुरे ! तिच्या रूपाचें वर्णन झालें ! आतां पुढें काय म्हणणें आहे ?

कंकण : मला हिणवूं नकोस असा ! किंकिणी, मी आहे आपला शिपाईगडी ! बोलण्यांत मी तितका वाकबगार नाहीं ! माझें तुझ्यावर प्रेम आहे खरें ! तुझ्या रूपाच्या शिकारखान्यांतलीं जनावरें हिकडचीं तिकडे झालीं असतील किंवा बगीच्यांतल्या वेलींची नीट मांडणी झाली नसेल तर त्याबद्दल मला माफ कर ! जिभेचा पट्टा चालवून तुझें हृदय कसें जिंकावें हें मला माहीत नाहीं ! तेंच त्याच्यावर तलवारीचे पट्टे फिरवायला सांग, तूं हूं म्हणण्यापूर्वीं तुझ्या हृदयाचे राईराईएवढे तुकडे करून देतों !

नूपर : किंकिणी, हो म्हण; प्रेमाच्या हृद्रोगावर हें राईचें रोगण ठीक आहे !

किंकिणी : नुपूर, त्यांच्याबद्दल नका बोलूं तुम्ही ! तुमच्याबद्दल काय सांगायचें असेल तें सांगा पाहूं !

नूपुर : ठीक आहे ! हे चारुगात्री, तुझ्या ललित–ललित–मधु–मधुर–रूप–सौंदर्यानें या दासानुदासाचें मृदु–मृदुल–हृदयांदोलन होऊन कोमलसरसलीला–विलासांनीं जगदरविंद सुगंधमकरंदरसनिमग्न झालें आहे ! हे कंबुकंठि, ललना–ललामभूतलतिकावलि–मृदुलदलदलितहृदये, मला प्रेमानें ब्रह्मांड आठवतो, ब्रह्मांड प्रेमसोल्लसितहसित–वृत्तिशून्य झालें, प्रेमाचें ब्रह्मांड विलसून ब्रह्मांडाचें प्रेम झालें !

किंकिणी : ब्रह्म–घोटाळा म्हणतात तो हाच वाटतें ?

कंकण : आपल्याला एक अक्षर सुद्धां उमगलें असेल तर शपथ !

नूपुर : दोस्त, मी सुद्धां आपल्यावर प्रेम करीत असेन तर शपथ

किंकिणी : मला तरी कुठें कळलें काय बोललां तें ?

नूपुर : हे चंद्रिकाधवलतनुलतिके, हें काव्य आहे; काव्याचा अर्थ कळल्यावर कवीची काय मातब्बरी राहिली बरें ? महाकवींनीं वापरलेले कोवळे कोवळे संस्कृत शब्द, योजनयोजन लांबीचे समास एकमेकांत कालवले, की झालें काव्य ! हा कविसांप्रदाय आहे ! आणि काव्याच्या पोटींच प्रेम असतें ! तात्पर्य, असलें संस्कृत, प्रौढ प्रेम आहे माझें !

किंकिणी : मला नको हा भारदस्त भडिमार ! त्यापेक्षां कंकणांचें चुकलेंमाकलें प्रेमच पुरवलें ! कंकण, प्राणेश्वरा, माझें तुमच्यावर एका क्षणांत अनिवार प्रेम बसूं पाहत आहे; जीवितेश्वरा, या दासीला संभाळून घ्या !

[छांडो छांडोजी ]

सदा हृदयीं या रंगे । तरंगे । प्रसन्नअंतरगें । कदा न भाव
भंगे ।। ध्रु० ।। मूर्तिसुंदरा । मदनमदहरा । गुणां । नटवि
नरवरा । कुणी । भुलवि न मधुरा । प्रणयरागें ।। १ ।। प्रेम-
विव्हला । हतबल अबला । प्रियां । शरण पदतला । प्रिया ।
हृदयिं या स्थला । न तरि भागे ।। २ ।।

कंकण, तुमच्याशीं लग्न करायचें—

नूपुर : हां किंकिणी, मला दूर कर वाटेल तर, पण त्याला इतक्यांत वचन देऊन फसूं नकोस ! तुला निर्दोष नवरा पाहिजे ना ? मला नुक्तीच त्याच्याबद्दल एक बातमी लागली आहे ! तुझी खात्री करून देतों, कीं हा चांगला माणूस नाहीं म्हणून. याला जायला सांग, म्हणजे सांगतों एकटीजवळ. मग तुलाच वाटेल कीं, याच्याशीं दोन हातांचे चार हात करण्यापेक्षां याच्यापासुन दोन हात दूर राहिलेलेंच बरें !

किंकिणी : असें का ? मग कंकण, तुम्ही मला उद्यां भेटा; हे काय सांगतात तें ऐकून घेतें आणि मग तुम्हांला काय सांगायचें तें सांगेन ! हं, आतां थांबू नका ! माझी प्रत्येक आज्ञा मान्य करणार ना तुम्ही ?

कंकण : ठीक आहे, हा चाल्लों !

किंकिणी : चला नूपुर, आपण आंत जाऊं. [ सर्व जातात. ]

प्रवेश चवथा.

[ ईश्वर प्रवेश करितो. ]

ईश्वर : स्वगत ) वृंदावनाच्या तीव्र मनोवृत्ति शेवटीं अशा रीतीनें उचंबळून बाहेर आल्या ! याच वेळीं मला इथें आणण्यांत देवाचा कांहीं तरी हेतु आहे असें आतां म्हणावेंसें वाटतें ! दामिनीनें किमयेची भलतीच कल्पना चालवून माझ्यावर देवाइतका विश्वास टाकल्यामुळें माझ्या विचाराला एकदम खोटें म्हणतां येण्यासारखें नाहीं. नाहीं तर दामिनीचा माझ्यावरचा विश्वास, सुदामाच्या तिच्यावरील अविश्वासापेक्षांही निष्कारण आहे ! कांहीं असो; चालू भानगडीचा शेवट होईपर्यंत मला दामिनीच्या सहाय्याची अपेक्षा लागेल. या निर्दोष असत्याचरणाच्या प्रायश्चित्तादाखल तिच्या मनाप्रमाणें तिला दागिन्यांचा एक साज दिला म्हणजे झालें !

[ जातो. ]

प्रवेश पांचवा.

[ स्थळ : वृंदावनाचा दिवाणखाना. कालिंदी प्रविष्ट. ]

कालिंदी : ( स्वगत )

[ सुखविति कितीo ]

अतिशय छळी दीन मनासि कां । तापद असा हा विचार ॥ ध्रु० ॥
विषमय गमे कां हृदयाहि या संतत सुखाचा विहार ॥ १ ॥

किंकिणीनें सांगितलेलें खरें असेल का ? छे:, असें भलतेंच कसें होईल माणसाच्या बोलण्यांत आणि वागण्यांत इतकें अंतर असेलसें वाटत नाहीं ! त्यांच्याबद्दल सांगीवांगीवरून असा विकल्प बाळगणें सुद्धां पापच आहे ! समक्षा-समक्ष विचारून पाहूं का तिकडे ? इतका होईल माझा धीर ? पण अशा वेळीं धिटाईनें वागायचें नाहीं, तर मग वागायचें तरी केव्हां ? माझ्या विचारण्यानें तिकडे राग आला तर ? आणि कांहीं असलें तरी तिकडे माझें विचारणें खचित रुचणार नाहीं ! खरें असलें तरी–खोटें असलें तरी–देवा, या वेळीं मला कोण

बुद्धि देणार ? [ वृंदावन येतो. ]

कालिंदी : ( उठून दूर जाऊन उभी राहते. स्वगत ) या हंसतमुखावर संशयाला मुळीं सुद्धां जागा राहत नाहीं !

वृंदावन : त्या दिवशीं मनमोकळेपणानें बोलण्याचें वचन दिल्यावरही आज अबोलाच पुन्हां ? आज मी पहिल्या शब्दाची वाट पाहणार आहें ! पुरुषांना बायकांसारखा हट्ट करणें कांहीं कठीण नाहीं ( कांहीं वेळ थांबून ) माझ्या इतक्या शब्दांचें एका शब्दाइतकेंही मोल नाहीं वाटतें ? कालिंदी, चराचर सृष्टि स्त्रियांच्या कृपाप्रसादासाठीं तपश्चर्या करीत असते; पण स्त्रियामात्र कटाक्षा-कटाक्षाची किंमत वसूल करून घेण्याइतक्या दुराराध्य असतात. पुरुषांची गोष्ट दूरच राहो, पण अचेतन जगावर सुद्धां स्त्रियांची सत्ता चालते; नंदनवनां-तल्या पारिजातावर स्त्रियांनीं चूळ टाकिली म्हणजे तात्बडतोब त्याची कळी उमलते; बिचारा अशोक तर नुसत्या लत्ताप्रहारानेंही फुलून जातो; मग मला आपला हट्ट सोडून बोलावें लागतें यांत काय नवल ? कारण—

कालिंदी : कारण नको तें. एखाद्याला बोलायला शिकायचें असेल तर आमच्या इथें येऊन बसावें त्यानें ! किती चांगलें बोलायचें झालें आतां !—

[ रंग उडवतले० ]

रंग अहा भरला । सुबक भला । नाचत चंचल हा वरवरला ॥ ध्रु० ॥
भुलवुनि खुलवुनि हांसत खेळत । भारुनि केलें गुंग जिवाला ॥ १ ॥
हंसवी फसवी नटवी माया । शोभत बाई ज्याची त्याला ॥ २ ॥
बांधुनि नजरा जादूगारा । दाखवितां हा खेळ कुणाला ॥ ३ ॥

वृंदावन : तुम्हां हरिणाक्षींच्या सौंदर्यसिद्धीसाठीं निर्दोष मृगबाळकांना मारणाऱ्या विधात्याच्या हाताला लागलेल्या रक्तरंगाप्रमाणें, त्याच्या डोळ्यांतली वधकर्माची क्रूरताही तुमच्या डोळ्यांत उतरते असें मला वाटतें !

कालिंदी : तें कांहींही असेल मेलें; पण डोळे मृगाचे असतात एवढें बरीक खरें; एरवीं पुरुषांच्या गोड बोलण्याच्या मृगजळानें बायका फसल्या नसत्या ! आतां असल्या साखरबोलांनीं मला आणखी भुरळ पाडूं नये !

[ जो पिया आयेना० ॥

चतुरा चातुरी । तुमची न्यारी । भुलावणी खरीखुरी ॥
परि मारी । जिव्हारीं । दुधारी । सुरी ॥ ध्रु० ॥
भोळा भाव भुलाया टाकुनियां फांसा । केला डाव असा
अवचित कां हो खासा । हा देव पावला आज कुणाच्या

नवसा । रुसला कान्हा काय जिवाच्या रासा ॥ तुटली
सारी । का दिलदारी । इतक्यावारी ॥ १ ॥

वृंदावन : बरें, माझा गुन्हा काय झाला हें मला सांग तरी !

कालिंदी : बोलण्यांत बोलणें नाहीं तिथें काय बोलायचें माणसानें ! आपण आपल्या वचनाला उणें आणिलेंत.

वृंदावन : वः ! वचन तूं मोडलेंस कीं मीं ? आपण होऊन मला आलिंगन देण्याचें, पहिला शब्द बोलण्याचें, वचन विसरलीस वाटतें ?

कालिंदी : माझें वचन मी पुरें करूं लागलें तर आपण माघार घेणार नाहीं ना ?

वृंदावन : उलट मी आपण होऊन असा पुढें मात्र येईन.

कालिंदी : ( त्याच्या गळ्यांत हात घालून ) नाथ, माझी मिठी आपण सोडवणार नाहीं ना ? मी ठेवीन तितका वेळ ही कायम राहील का ?

वृंदावन : दोघांच्या गळ्यांत काळाची मगरमिठी पडेपर्यंत ही कायम राहील.

कालिंदी : माझ्या मनांत बोलायचें आहे; पण माझ्या बोलण्यानें राग आल्यामुळें माझा पहिला शब्दच शेवटचा होणार नाहीं ना ?

वृंदावन : त्या क्षणींच मला मरण येणार असेल तरच तो शेवटचा शब्द होईल ! काय बोलायचें असेल तें मोकळ्या मनानें बोल !

कालिंदी : आपण म्हणे एका पतिव्रतेचा छळ करण्यासाठीं तिला—

वृंदावन : ( तिला एकदम दूर लोटून देऊन ) एवढ्यासाठींच हें लडिवाळ लवलपणाचें सोंग आणिलें होतें वाटतें ? हात कलम करून टाकीन; जीभ मुळापासून उपटून काढीन !

[ कालिंदी तशीच पडून राहते. शेवटी हुंदका देऊन एकदम रडते.

वृंदावन : ( स्वगत ) रागाच्या झपाट्यांत मी भलतेंच बोलून गेलों ! गोड शब्दांनीं हिचें समाधान केलें पाहिजे; नाहींतर रडक्या मुद्रेची ही ब्रह्महत्या डोळ्यांपुढून हलायची नाहीं ! ( तिचे हात धरून तिला उभी करितो व उघड ) लाडके, तूं अशी भलतीच शंका घेतल्यामुळें मला राग कां येणार नाहीं बरें ?

कालिंदी : पण माझी शंका अगदीं खोटी आहेना ? तसें असेल तर आपल्या पवित्र रागानें या देहाची वाटेल ती दशा करून टाका; आपली पुण्याई अढळ असल्यावर माझ्या हत्येचें पाप आपल्याला कुठून लागणार ? माझी शंका खोटी ना ?

वृंदावन : जितकी दारुण तितकीच खोटी ! तुला वाहिलेल्या या हृदयाची साक्ष

घेऊन पाहा! (स्वगत) आतां मला वाटेल तितकें खोटें बोलण्याची हिंमत येत चालली आहे! या अशा गोष्टी हिला कोण सांगतें याची नीट चौकशी केली पाहिजे! बाकी मला एवढ्या सावधगिरीनं हें रहस्य संभाळण्याची कांहीं जरूर नाहीं! दाही दिशाभर या गोष्टीची कोणी दवंडी पिटवीत बसलें तरी काय हरकत आहे? महाराजांचा माझ्यावर आतां इतका विश्वास बसला आहे, कीं अगदीं त्यांच्या मानेवर मीं तलवार ठेविली तर तें सुद्धां त्यांना आपल्यां हिताचेंच वाटेल. प्रसंग पडला तर सर्वांचेच मुडदे पाडायला किती वेळ लागणार? (उघड) लाडके, अजून तुझी खात्री होत नसेल तर प्रत्यक्ष परमेश्वराची, आपल्या प्रेमाची, प्रेम आणि परमेश्वर यांच्या एकरूप मूर्तीची– चल, आपल्या केतनाची शपथ घेऊन तुझी खात्री करून देतों. [ जातात ]

प्रवेश सहावा,

[ स्थळ : सुदामाचें घर. नूपुर प्रवेश करितो. रात्रीची वेळ ]

नूपुर : काय गुलामानें बंदोबस्त करून ठेविला आहे! त्या खंदकांत पाय निसटून आंगभर चिखल झाला! रात्रीं अपरात्रीं भटकतांना जरा पाय घसरला तर अंगावर शितोडे उडतात असें म्हणतात तें खोटें नाहीं अगदीं! हा सुदाम वस्ताद खरा! इतके दिवस मला ताकास तूर लागूं देईना! या दामिनीचीं त्या गोसावड्याशीं काय काय खलबतें चालतात तीं शोधून काढून सुदामाच्या कानावर घातलीं पाहिजेत. आतां दरवाज्याबाहेरून खुणामागून खुणा करीत सुटावें; त्या कानफाट्यानें दामिनीशीं ठरविलेली एखादी खूण जमली तर ती अचूक बाहेर येईल!

[ दरवाजावर खडे मारतो; नंतर खाकरतो; नंतर टिचक्या वाजवितो; टाळी वाजवितो. शेवटी शीळ घालीत उभा राहतो, छपरावरून सुदाम उतरून त्याच्याजवळ जाऊन त्याची मान धरितो. ]

नूपुर : भूत! भूत!

सुदाम : अरे चोरा! चांगला सांपडलास!

नूपुर : दूर हो, तूं जसा भूत नाहींस तसा मी पण चोर नाहीं; चोर असतो तर निदान अंग चोरून तरी पळालों नसतों का?

सुदाम : मग कोण आहेस तूं ? कशाला आलास या वेळीं इथें ?
नूपुर : माझें वांसरूं चुकलें आहे तें हुडकायला आलों आहें !
सुदाम : वः, खंदक ओलांडून इकडे कशाला येईल तुझें वांसरूं ?
नूपुर : आमच्या गांवजोश्यानें हरवलेली वस्तु उत्तर दिशेकडे आहे म्हणून सांगितलें.
सुदाम : हा कोंडवाडा आहे वाटतें हरवलेलीं जनावरें ठेवण्याचा ?
नूपुर : एकानें मला सांगितलें, कीं इथें एका गरीब गाईचा कोंडवाडा केला आहे म्हणून !
सुदाम : अस्सें काय ? बरें, दरवाज्यावर खडे मारिलेस ते कशाला ?
नूपुर : आपला खडा टाकून पाहिला वांसरूं आहे का म्हणून !
सुदाम : आणि आधीं खांकरलास, दारावर टिचक्या मारल्यास, शेवटीं टाळी वाजविलीस, तें कां ?
नूपुर : माझ्या खांकरल्याचा आवाज ओळखून चुटकीसरसें वांसरूं येतें कीं काय हें बघितलें; आणि टाळी वाजविली तेव्हां आस्तिकाचा सर्पमंत्र म्हणत होतों !
सुदाम : मोठा विलंदर आहेस ! तुझें नांव कायरे ?
नूपुर : माझें नांव चकोर !
सुदाम : हें नांव खोटें तर नाहींना ?
नूपुर : खोटें ? हें नांव खोटें ठरलें तर नांव बदलून देईन ?
सुदाम : तें आपोआपच होईल. तसें नको; मी घरांतून दिवा आणून तुझी चेहरेपट्टी पाहून ठेवितों नीट; आणि उद्यां चांगली शहानिशा करून घेतां; पण दरम्यान तूं पोबारा केलास तर ? तसेंही नको; तुझी एखादी उपजत खूण सांग पाहूं अंगाची ?
नूपुर : मी पायाळू आहें ! उपजतच आहे खूण ही !
सुदाम : तिचा आतां काय उपयोग ? हल्लीं अंगावर असलेली एखादी टळकशी खूण सांग.
नूपुर : माझ्या हातापायांला मिळून एकवीस बोटें आहेत.
सुदाम : दम खा, मी मोजून पाहतों; पांच नी पांच दहा; आणि पायाचीं हीं पांच, पंधरा, आणि या पायाला हीं–अरे, पायाला हीं हाताची करंगळी कशीरे ?

[ नूपुर पायाला करंगळी जोडतो. ]

नूपुर : देवाची करणी आणि नारळांत पाणी म्हणतात तें असें; एकवीस बोटें असल्याचें नवल नाहीं; पण पायाला हाताची करंगळी उगवली हें विशेष आहे !

सुदाम : आतां मात्र इतका काळोख असूनही लख्ख प्रकाश पडला! तूं नूपुर नव्हेस का?

नूपुर : म्हणजे, तुम्हीं अजून ओळखलेंच नव्हतें वाटतें? अगदींच चकलां म्हणायचे! बरें; मी मुद्दाम तुम्हांला एक जरूरीची सूचना देण्यासाठीं आलों आहें. तुम्ही कोण काय सारें कळलें आहे मला! तुमच्या कुटुंबाला तुम्हीं या भलत्या भानगडींत कशाला गुंतविलें आहे? पहा बुवा, कनकाच्या लोभानें कांताच गमावून बसाल झालें!

सुदाम : (घाबरून) कां, कशावरून हो?

नूपुर : कांहीं विशेष कारण नाहीं तसें; पण एकंदरींत थोरांचा आश्रय कांहीं फारसा बरा नाहीं. थोरांच्या डोळ्यांवर संपत्तीचा धूर आला म्हणजे त्यांच्या आश्रितांच्या डोळ्यांतून पाणी येतें! आणि त्यांतून या वृंदावनाचा आश्रय तर फारच वाईट; केवळ कळकाच्या झाडाची सांवली! त्याची बायकांबद्दल नीट नजर नाहीं!

सुदाम : वसुंधराबाईच्या दिमतीला ती आहे आज फार दिवस; म्हणून तिला मी नाहीं म्हणत नाहीं!

नूपुर : पण वृंदावन सध्यां बायका बिघडविण्याच्या फंद्रांत पडला आहे; तेव्हां असा ओळा पडलेला कांहीं ठीक नाहीं.

सुदाम : त्या कंकणाला एकदा परीक्षा पाहावयाला सांगतोंच लौकर; म्हणजें जीव जरा खालीं पडेल. एकदा वाटतें, परीक्षेनें सोक्षमोक्ष करून टाकावा; पुन्हां मनांत येतें, कीं विषाची परीक्षा पाहणें कांहीं चांगलें नाहीं.

नूपुर : आज संध्याकाळीं वृंदावनानें सगळ्या नौकरमाणसांवर जरा करडी नजर ठेवण्याचें ठरविलें आहे अशी बोलवा आहे. पाहा बुवा!

सुदाम : चला, आतां सकाळींच कंकणाला सांगतों, कीं करून टाक एकदा परीक्षा! मग होय तशी जाय! चला. [दोघेही जातात.]

## प्रवेश सातवा.

[स्थळ—तळघर. वसुंधरा; दीनार निजलेला. जवळ बुरखा पांघरलेली दामिनी कामांत]

वसुंधरा : (दीनाराला उद्देशून) बाळा दीनारा, इतक्यांत तुला झोप लागली? तूं

असा निजूं लागलास तर मला एकटेपणानें हुरहुरल्यासारखं वाटेल ? नको गडे, असे डोळे मिटून घेऊं नकोस !

[ कान्हा मुखसे० ]

आतां न करी हा चाळा । टाकि छंद बाळा ॥ ध्रु० ॥
शांतिसुखाची झोप कशाची । भीति मजसि ही जाची । घाली आला ॥ १ ॥
धीर मला दे मंजुळ नादें ।
हांसं परतवी वीरा । निर्दय काळा ॥ २ ॥

तिकडून तुला माझें रक्षण करायचें सांगणें झालें आहे तें विसरलास वाटतें ? बाळ, आपलें नातें आतां बदललेलें आहे ! जागत्या डोळ्यांनीं आतां तूं माझ्याभोंवतीं पाहरा करायचा ! अस्सें; असेच डोळे उघडे ठेव ! आतां कसा बरें मला धीर आला ! त्यांचें नेहमीं म्हणणें असायचें, कीं काळोख्या रात्रीं, चांदण्या देवाच्या तेजाची साक्ष पटवितात; तसेंच या तळघराच्या काळोखांत माझ्याभोंवतीं तळपणारी त्यांच्या तेजाची जागती ज्योत या तुझ्या चिमुकल्या चांदण्यावांचून मला दुसरीकडे कुठें दिसणार सांग बरें ! बाळ, वृंदावन आपल्या राक्षसी मनानें माझा आणि तुझा अंत पाहूं—बाळ, मला बोलवत नाहीं रे कळलें ना तुला सारें ? देशील ना मला त्या वेळीं धीर ? राधेसाठीं गोकुळींचा कान्हा लहानाचा मोठा आणि मोठ्याचा लहान झाला; द्रौपदीसाठीं त्यानें अदृश्यरूपानें उभें राहून तिची लाज राखिली ! बाळा, त्या भिन्न प्रेमांची आज एका मातृप्रेमांत मिळवणी करून कृष्णासारखा माझ्या धांवण्या धांवशील ना ? या वेळीं तूंच माझा कृष्ण !

[ बोल मोरे राजारे० ]

बोल ब्रिजलालारे कांहीं हसुनी बोल ॥ म्यालें जनाला ।
म्यालें मनाला । सुटला माझा तोल ॥ बोल० ॥
करि उरिं धडधड रहा मनिंच तूं ।
हांसुनि भिरभिर वद नयनांनीं ।
नवलाखाचा बोल ॥ बोल० ॥ १ ॥

अहाहा, अशी मूठ वळविलीस ! एकाएकीं देवानें का तुझ्या मनांत ही प्रेरणा केली ? भरसभेंत दुःशासनानें पदर ओढल्याबरोबर, भीमसेनांनीं दशसहस्र नागांच्या बळानें वळविलेल्या वज्रमुष्टीकडे पाहून, द्रौपदीदेवीला वाटला नसेल, इतका धीर तुझ्या गोजिरवाण्या बाळमुठीनें माझ्या हृदयांत थरारला आहे ! आतां मात्र माझा दीनार मंडलेश्वर भूपालांचा वीरपुत्र—

अगबाई, हंसायला काय झालें असें? चुकून तिकडचें नांव माझ्या तोंडून निघालें म्हणून हें हंसें? या गोष्टी सुद्धां कळायला लागल्या वाटतें? वः, मला तुझी चोरी आहे का त्यांचें नांव घ्यायला? मला नाहीं खपायचें असें हो! चांगलें मोठ्यानें नांव घेऊन हांक मारतें, आणि बोलावून विचारतें! भूपालमहाराज!— [ वृंदावन प्रवेश करितो. ]

वृंदावन : वसुंधरे, तूं कोणाला हांक मारलीस? [ दामिनी जाते. ]

वसुंधरा : मीं माझ्या परमेश्वराला हांक मारली!

वृंदावन : तुझा परमेश्वर इतका दूर आहे, कीं कल्पान्तापर्यंत त्याच्या नांवानें तुला सारख्या हांका माराव्या लागतील! या प्रलयसंकटानें हिंमत खचून तुझा परमेश्वर मेल्यापेक्षांही मेलेला झाला आहे!

वसुंधरा : प्रळयानंतरची ही पाहा त्यांची अंगुष्ठमूर्ति! माझा बाळ मला त्यांची साक्ष देईल!

वृंदावन : त्याचीच व्यवस्था करण्यासाठीं मी आतां आलों आहें! वसुंधरे, आज तीन चार दिवस मी तुला सारखा विनवून सांगत आहें; माझ्या विनंतीचा विचार केलास का?

वसुंधरा : वृंदावन, आर्य पतिव्रतेला ज्या पातकी शब्दांचा कोणीं उच्चार केलेला कानांनीं ऐकूंच येत नाहीं, त्यांचा विचार कसा करितां येईल? असल्या नीच शब्दांना कोणती आर्या आपल्या हृदयांत जागा देईल? माझ्या पातिव्रत्या-बद्दल भलती कल्पना! वृंदावन, तशी कल्पना मनांत घोळवूं लागलां तर साक्षात् परमेश्वर सुद्धां उभा जळून जाईल!

वृंदावन : वसुंधरे, तुला भ्रष्ट केल्याशिवाय माझा सूड थांबणार नाहीं! नुसता माझ्या गळ्यांत हार घालण्यानें सुद्धां माझें समाधान होईल!

वसुंधरा : अभद्र कल्पनेनें परपुरुषाकडे नुसतें पाहिलें तरी सुद्धां आर्यस्त्रीचे डोळे फुटून जातील! वृंदावन, तुम्हांला काय वाटेल तें करा; पण मला हे भलते शब्द ऐकवूं नका!

वृंदावन : वसुंधरे, माझा कठोर निर्धार तुला कळवूं का? ऐक, नीट लक्ष देऊन ऐक; मी उगीच कांहींतरी सांगत नाहीं!

वसुंधरा : ( स्वगत ) आज चार दिवस पाहतें आहे, वृंदावन बोलतांना मधून मधून माझ्याकडे पाहण्याचें कां बरें टाळतात? बोलतांना मध्येंच अडखळतात कां? हें सारें उसनें अवसान तर नाहीं? ( उघड ) तुम्हांला बोलायचा धीर होत नाहीं वाटतें?

वृंदावन : जें करायला तयार झालों आहें तें बोलून दाखवायला कसला धीर लागणार? वसुंधरे, उद्यां रात्रीं याच वेळीं मी पुन्हां तुझ्याकडे येईन. माझ्या म्हणण्याला रुकार दिला नाहींस तर तुझ्या दीनाराचा तुझ्या डोळ्यां-देखत प्राण घेईन. तुझ्या दानानें ज्या माझ्या मातेची नीच शब्दांनीं अवहेलना-केली, तिच्या चरणांना स्मरून शपथेवर पुन्हां सांगतों, कीं उद्यां माझ्या विनं-तीचा अपमान झाला तर मी दीनाराचा बळी घेतल्यावांचून राहणार नाहीं! काळाच्या डोळ्यांची एक उघडझांप होण्याच्या अवधींत तुझे डोळे उघडले तर ठीक आहे, नाहींतर दीनार मेलाच म्हणून समज!

वसुंधरा : प्रत्यक्ष काळ तुमच्या रूपानें डोळे फाडून पाहूं लागला तरी मला कांहीं वाटणार नाहीं! उद्यांची मुदत कशाला हवी? वृंदावन, तुम्हाला आतांच सांगून टाकतें, कीं दीनार तुमच्यापुढें पडला आहे! तुम्हांला काय वाटेल तें करा!

वृंदावन : माझें बोलणें तुला अजून विश्वासाचें वाटत नाहीं; पण उद्यां या वेळीं दीनार मेलेला दिसेल!

वसुंधरा : देवाची दया तशी असेल तर तसेंही होईल! भूपालांच्या वीरपुत्रा, ऐकलेंस हें नीट?

[ दिलदार दिलारा० ]

रणवीरकुमारा विकट निकट रण हो क्षणिं सिद्ध तया।
यदपि वय न तव उघडिं नयन निज हरुनि भया मज दे अभया ॥ ध्रु० ॥
प्रसंग घोर पाहुनियां भीत माता।
तुझाच एक धीर तिला आतां।
तींत तुझे त्यजुनि मला दूर जातां।
प्रभुस्वरूप तूंच जगीं, तूंच त्राता ॥ १ ॥

[ वृंदावन जातो. ]

## अंक तिसरा समाप्त

# अंक चवथा

## प्रवेश पहिला

[ स्थळ—वृंदावनाचा महाल; वृंदावन निजला आहे. कालिंदी प्रवेश करिते. ]

कालिंदी : ( स्वगत ) नाथांनीं शपथेवर सांगितलें, पण माझ्या मनांतली कसकस अजून हटत नाहीं ! त्यांच्या मनाची आज दोन दिवस अशी दारुण दशा झालेली दिसते, कीं त्यांनीं कुठल्या तरी घोर विचाराचा निश्चय केलेला असावासें वाटतें ! माझ्याशीं घाईत एखाददुसरा शब्द बोलून ते माझ्यापासून दूर होतात ! किंकिणीनें पुन्हा आतांच सांगितलें, कीं दीनाराचा घात करण्याची नाथांनीं शपथ घेतली आहे म्हणून ! असें अघटित पातक त्यांच्या हातून झालें तर कल्पान्तापर्यंत तरी त्यांच्यावर देवाची कृपा होईल का ? मनाचा धडा करून, साता जन्माची पुण्याई एकवटून, मीं त्यांना या पातकापासून परत फिरविण्याचा पुर्ता संकल्प केला आहे ! ( पाहून ) नाथांना झोप लागल्यासारखी दिसते; अगबाई, पण ही कसली झोप ? तोंड किती भेसूर दिसतें आहे ! या पाप-विचारांनीं मनांत खळबळ उडविल्यामुळें झोपेंतही यांच्या निर्मल मनाला अशा यातना भोगाव्या लागत आहेत ! देवाधिदेवा, पांचा बोटांनीं तुला कधीं मनो-भावें पुजलें असेल तर आज मला प्रसाद दे ! मला आज बोलण्याचें बळ दे !

वृंदावन : ( झोपेंत भोव्यानें ) वसुंधरे, अजून तरी हा हार माझ्या कंठांत घाल; दीनाराचे प्राण आतां कंठाशीं आले आहेत ! एकदा ही कट्यार दीनाराच्या पोटांत शिरली म्हणजे तिला सुखानें बाहेर काढणें काळाच्याही हातीं राहणार नाहीं ! नाहीं ऐकत तूं ? डोळे फाडून नीट पाहा, ही कट्यार एकदम–( दचकून ) कोण तूं ? कालिंदी ? कालिंदी, दीनाराच्या आणि माझ्यामध्यें येऊं नकोस ! दीनाराला मारण्याबद्दल मीं माझ्या मातेची शपथ घेतली आहे ! दूर हो, दूर हो; काय म्हणतेस ? हा दीनार नाहीं, आपला केतन आहे ! या वेळी

मला तुझ्या केतनाची काय किंमत! लाथेनें त्याला असा वाटेंतून उडवून टाकीन. ( कालिंदी त्याच्या जवळ येते. ) आणि तुझा असा हात धरून ( हात पुढें करितो व कालिंदीचा हात धरितो. एकदम दचकून जागा होतो. ) काय ? खरोखरीच कालिंदीचा हात माझ्या हातांत ?

कालिंदी : लग्नाच्या वेळेपासून, देवापितरांच्या शपथेनें हा हात आपण जन्माचा हातांत घेतला आहे ! नाथ, नाथ, आपण हें काय मांडिलें आहे ! केवढें भयंकर पातक हें ! झोपेंतलें आपलें बोलणें ऐकून मला आपली अघोर इच्छा पुरती कळली आहे !

वृंदावन : जाग्रदवस्थेंत जिंकलेल्या मनोवृत्तींनीं स्वप्नसृष्टींत अखेर माझा पुरा, पुरा पाडाव केला !

कालिंदी : नाथ, असे खिन्न होऊं नका. माझ्यापासून आतां कांहीं एक लपवूं नका.

वृंदावन : चल, दूर हो ! आतां कोणापासून कांहींच लपवायचें नाहीं ! माझा विचार कायमचा ठरलेला आहे.

कालिंदी : प्राणेश्वरा, हा कसला विचार ? हा अविचारांतला अविचार आहे ! काल केतनाच्या शपथेनें आपण वचनाला गुंतला आहां, बोलल्; बोल खोटा करून ब्रीदाला बोल लावून घेऊं नका; परस्त्रीच्या पापी अभिलाषानें अघोर पापें करून नीतीला पायांखालीं तुडवूं नका ! नीतीचा नाश झाला तर जीवाचा सत्यानाश होईल !

वृंदावन : नीति ! कसली नीति ? देवाच्या कल्पनेनें भकलेल्या भेकडांनीं, शास्त्रें शिकलेल्या शिळपटांनीं, थकलेल्या थेरड्यांनीं निर्मिलेल्या नीतीच्या बंधनांनीं माझ्या मनाच्या मर्दुमकीला बांधून ठेवूं ?

कालिंदी : ही असली मर्दुमकी ! हा दुष्टपणा—हा भेकडपणा आहे ! अनाथ अबलेचा छळ करायचा, अजाण अर्भकावर कट्यार चालवायची, ही मर्दुमकी ! हाच तुमचा पुरुषार्थ, हाच सारा पराक्रम ! पतिराज, पुरुषाचा पराक्रम अबलांच्या रक्षणासाठीं असतो !

[ नेक नजर मोरा० ]

धिक् जगतिं शतधा शुभयशा । त्या वीरकर्मा यापरि जरि
नरवर कति करिति अधमाधमा ॥ ध्रु० ॥ अनाथ अबला-
जनालागिं छळितें जें । शिशुवरि शस्त्रा धरुनि जें । हृदयिं
लवहि न लाजे । तरि त्या धिक् ॥ १ ॥

वृंदावन : कालिंदी, या बडबडण्यानें काय होणार! मला जें करायचें तें मी करणारच!

कालिंदी : मी नाहीं करूं द्यायची! आपल्याप्रमाणें माझाहि निश्चय झालेला आहे!

वृंदावन : संबंध काय तुझा माझा? तूं कोण आणि मी कोण?

कालिंदी : मी आपली धर्मपत्नी! आपण माझ्या जिवाचे धनी! मी आपल्या सर्वस्वाची स्वामिनी! आपल्या भविष्याची भाग्यदेवी!

वृंदावन : मग त्या स्त्रीधर्मानें वाग म्हणजे झालें! नसत्या उठाठेवी करीत बसूं नकोस! नदीचें पाणी मूळचें गोडें असलें तरी समुद्राला मिळतांच तिचें–त्याचें एकजीवन होतें हें लक्ष्यांत ठेव! पतीच्या इच्छेशीं विरोध करणें हा आर्य-स्त्रीचा धर्म नव्हे!

कालिंदी : परस्त्रीचा छळ करण्यासाठीं बायकोची बेअदबी करणें हेंहि आर्यपुरुषाचें लक्षण नाहीं. आपली इच्छा चांगली असली तर मी आपली केवळ छाया! आपण पुण्यमार्गानें चालूं लागलां म्हणजे आपल्या कोमल चरणांपुढें मी आपल्या हृदयाचा गालिचा पसरून ठेवीन, पण आपण आडमार्गानें निघालां म्हणजे लग्नाच्या नाजूक बंधनांनीं मी आपल्याला जखडून टाकीन! बायको म्हणजे नवऱ्याच्या पुण्यदृष्टीला मनोहर सुखदात्री चंद्रिका, पण परस्त्रीकडे पाहणाऱ्या पतीच्या पापदृष्टीला कडाडून दिपवून टाकणारी वीज आहे!

वृंदावन : बायकोची वडेजावी माझ्याजवळ मुळींच चालणार नाहीं! माझ्या मनाच्या मनांतली इच्छा पुरी होण्याच्या रंगांत आली असतां मी या बोलक्या बाहुलीची बडबड ऐकत बसूं? या चालत्या चित्राच्या चेहऱ्याकडे पाहून भिऊन जाऊं? नाहीं! कालिंदी, बायको म्हणजे केवळ सुखाची एक वस्तु! विसाव्याच्या वेळीं मनाची करमणूक करण्यासाठीं घराच्या पिंजऱ्यांत कोंडलेली मंजुळ मैना! बायको नेहमीं नवऱ्याच्या मुठींतच असली पाहिजे!

कालिंदी : नवऱ्याच्या मुठींत असणें म्हणजे हा तिचा बहुमान झाला! बायको म्हणजे पायांची दासी!

वृंदावन : मग तिनें बाहेरच्या घडामोडी करण्याचें कांहीं कारण नाहीं; पायां-पुरतें पाहिलें म्हणजे झालें!

कालिंदी : आणि म्हणूनच हें पाऊल मी वांकडें कधींही पडूं देणार नाहीं! अशी मिठी घालून बसेन! या पायांवर माझी सत्ता आहे ना?

वृंदावन : लाथेच्या एका झपाट्यानें त्या पायांपासून तुला कायमची अशी दूर

झुगारून देईन ! ( तिला लाथेनें दूर लोटतो. )

कालिंदी : इथून टाहो फोडून सारखी आपल्या जीवाची आळवणी करीन.

वृंदावन : मनाची मर्जी मोडणाऱ्या या मंजुळ मैनेची मान मुरगाळून तिचें तोंड बंद करायला मला किती वेळ लागणार ? काल्च बजाविलें आहे, कीं जीभ मुळापासून उपटून टाकीन म्हणून, तें विसरूं नकोस !

कालिंदी : अशानें भिऊन तोंड बंद ठेविलें तर परमेश्वर मला शापून भस्म करील ! आपणच माझ्या मुक्या मनाला तोंड दिलें ! माझ्या वाणीचा उपयोग आतां करूं नको तर केव्हां करूं ? बायको चुकत असली तर नवऱ्यानें तिला संभाळावी, नवऱ्याचा तोल चुकत असेल तर बायकोनें त्याला संभाळावें, म्हणून त्यांनीं एकमेकांच्या हातांत हात दिलेले असतात, एवढाच पतिपत्नीधर्म मला समजतो ! माझा अपराध होण्याचा आपल्याला नुसता संशय आला असता तर आपण आकाशपाताळ एक करून सोडलें असतें; आणि आपण प्रत्यक्ष रौरवाचें अक्षय साधन करून घेत असतांनाही मला ओरडायला नको का ? स्त्रीजातीनें असें कोणतें पातक केलें आहे, कीं नवऱ्याच्या हितासाठीं—त्याच्या जिवाचा अधःपात टाळण्यासाठीं सुद्धां—तिनें त्याच्यापुढें बोलूं नये ? पतीवर तिची इतकी सुद्धां सत्ता कां नसावी ? आपल्या हातून असें पातक घडलें तर देवाला तरी आपला उद्धार करिता येईल का ? धडधडीत आपला अधःपात होत असतां, मी डोळे झांकून कशी बसूं ? नाथ, उघड्या डोळ्यांनीं प्राण जात नाहींत हो ! आपण माझें तोंड बंद केलें तर पंचप्राण डोळ्यांत एकवटून आपल्याशीं बोलूं लागतील.

वृंदावन : डोळ्यांच्या खांचा करून तुझ्या पंचप्राणांना त्यांत गाडून टाकीन ! तुझें माझें खऱ्या जिवाचें कांहींएक नातें नाहीं ! वसुंधरेला आधीं संशय येऊं नये म्हणून तिला चकविण्यासाठीं मीं तुझ्याशीं नुसतें नांवापुरतें लग्न केलें, समजलीस ? माझ्या इच्छेच्या आड आलीस तर एका क्षणांत तुझा प्राण घेऊन मोकळा होईन !

कालिंदी : माझे प्राण खुशाल घ्या ! आपल्या इच्छेपुढें त्यांची काय किंमत ? मी माझ्या सुखासाठी मुळींच बोलत नाहीं ! कोणत्या आर्य पतिव्रतेनें स्वतांच्या सुखाची कधीं आशा ठेविली आहे ? पतीच्या सुखासाठींच प्रत्येक आर्य-स्त्रीचा अवतार असतो. मोठ्या आनंदानें माझे प्राण घ्या ! आपल्या मना-जोगत्या स्त्रीशीं विवाह करून पुण्यसुखाचा आजन्म उपभोग घ्या ! पण नाथ, हा पापमार्ग सोडून द्या ! एवढें अभयवचन मला द्या आणि त्याच हातांनीं

माझी मान मुरगाळून टाका ! पण पतिव्रतेचा छळ करून तिचा शाप ओढून घेऊं नका ! आपल्या सुखासाठीं, आपल्या पायांजवळ, आपल्या हातांनीं, असें सौभाग्याचें मरण लाभलें तर माझ्या भाग्याला पारावार नाहीं ! साजन्या हातांनीं कुंकूं लुटीत मी वैकुंठाला जाईन; आपल्या नव्या संसाराचा पुण्यावतार संपवून पवित्र देहानें आपण स्वर्गांत येईपर्यंत आपल्या सहस्र-नामांची ओंवणी जपत बसेन; स्वर्गप्रवेशाच्या वेळीं अप्सरा आपल्यावर कल्पवृक्षाचीं फुलें उधळतील, त्या वेळीं चोरट्यासारखी बाजूला उभी राहून ही भाग्यशाली कालिंदी आपल्यावरून जिवाचीं फुलें ओंवाळून टाकील ! पण नाथ, या अघोर पापाची कल्पना नका हो नका करूं ! पतिव्रतेला दुभागून जीवकुडींची तुटी घालूं नका ! मी पापाच्या मार्गापासून परावृत्त होईन एवढें वचन मला द्या आणि मग खुशाल त्या वचनाच्या एकेक शब्दासाठीं माझ्या प्राणाप्राणाचें मोल घ्या ! एवढीच आपल्या दासीची विनंती आहे.

वृंदावन : एका दीडदमडीच्या रां—तुझ्या प्राणांशीं माझ्या शब्दांचा मोबदला देऊन माझ्या एकाच इच्छेला तिलांजली देऊं काय ? कालिंदी, तुला अखेरचें बजावून सांगतों, कीं माझा निश्चय अटळ आहे !

कालिंदी : अशा अभद्र शब्दानें पतिव्रतेच्या नांवाची अमर्यादा करितां ?

[ तव मति चळली० ]

अनुचित वचनें ऐशीं । सतीतें व्यर्थ वदुनि अवगणुनि तिस
ओढितसां कां यापरि पातक्याशि ॥ ध्रु० ॥ पतिव्रतेच्या
मंगलधामा । पतिव्रतेच्या शुभनामा ।
अभद्रवचनीं विषसम विषमा । विटंबितां कां ओढुनिया पापाशीं ॥ १ ॥

पतिराज, मी पण आपलीच अर्धांगी आहे ! वेडाच्या रूपानें मी आपल्याला अवतार दिलेला आहे ! मी पण आपणांला बजावून सांगतें, कीं माझाही निश्चय आपल्याइतकाच अटळ आहे ! आपल्या हातून हें पाप मी होऊं देणार नाहीं ! कंठरवानें ओरडून ब्रह्मांडाला जागें करीन. अशी महाराजांजवळ जाऊन दाद मागेन. त्यांनीं आपल्याला बंदिवासांत घातलें तरी चालेल ! मोकळेपणानें अशीं पातकें करण्यापेक्षां आपण निर्दोष बंधांत राहिलां तर आपला अधःपात तरी होणार नाहीं !

वृंदावन : तुझ्या अमर्यादपणाची मजल इथपर्यंत आली आहे काय ? अशा स्वच्छंद वृत्तीनें मी तुला वागूं देणार नाहीं ! कंकणा, इकडे ये. [ कंकण येतो. ] संसारांतली सुरेल सतार मांडीवर बसवली, छातीवर उचलिली, हृदयाशीं हेंग-

विली तरी तिच्या जिवाच्या तारा पिळून काढल्यावांचून मनासारखे सूर निघत नाहींत ते नाहींतच ! कंकणा, या बेमुर्वत बायकोला पकड आणि बागेंतल्या बंगल्यांत कोंडून ठेव आणि चहूंकडे जाऊन सांग, कीं बायको बदचालीची दिसल्यामुळें वृंदावनानें तिला कोंडून ठेविली आहे !

कंकण : धनीसाहेब, अशानें–

वृंदावन : अधिक बोलूं नकोस आतां; माझ्यापुढून तिला घेऊन चल ! लग्नाची बेडी तुटतांना इतका खळखळाट हा व्हायचाच !

[ सर्व जातात ]

## प्रवेश दुसरा

[ स्थळ सुदामाचें घर—सुदाम प्रविष्ट. ]

सुदाम : काय नशिबाचा तारा आहे पाहा. ' कंकणाला आज बोलावून परीक्षा पहायला सांगावें म्हणुन विचार केला तर वृंदावनांनीं त्याला कालिंदीबाई-भोंवतीं पाहरा करण्यासाठीं खुंटवून ठेविला ! आणि तेवढ्यासाठीं त्याच्या जागीं मी जाईन तेव्हां तो निघणार, असा आडवा डाव झाला ! माझ्या मनानें, परीक्षेच्या वेळीं मी पण भुयारांतून ऐकत बसलों असतों म्हणजे ठीक झालें असतें. कंकणावर भरंवसा ठेवायला तशी हरकत नाहीं म्हणा, दोस्तीच्या पोटीं तो दगलबाजी करायचा नाहीं, पण मनाला तेवढी रुखरुख राहिली ! बरें आहे; त्याला इथून परतायला जर विलंब लागला तर आपण त्याची जागा सोडून तडक इकडे निघून यावें झालें; कालिंदीबाईच्या कोठडीला कुलूप ठोकलें तरी भागेल. (उघड) दामिनी, अंमळ अशी ये बघूं ! हं, बुरखा राहूं दे तोंडावर ! (दामिनी येते.) हें पाहा, मला जरा निकडीनें जायचें आहे बाहेर, आणि त्या पंडिताकडून पोथ्या घेऊन त्याचा माणूस इतक्यांत इथें येईल; तेव्हां तूं जरा घरांतच बसून रहा. बुरखा काढूं नकोस आणि जागची हलूं नकोस ! समजलीस ?

दामिनी : बरें ! ( सुदाम जातो. ) ( स्वगत ) हा मेला बुरख्याचा नसता त्रास झाला आहे ! उद्यां त्या ईश्वरांनीं दागिने दिले तर घालायचे तरी कसे अंगावर ? मी तिकडे हट्ट घेऊन बसणार, कीं एक दिवस तरी बुरख्याशिवाय मी हिंडून

येणार ! अन् इतक्या उपर नाहींच म्हटलें तर बुरख्यावरून घालीन सारे दागिने ! हंसेना कोणी ! हंसतील त्यांचे दांत दिसतील ! कोण ? किंकिणी ?

[ घाईघाईनें किंकिणी येते. ]

किंकिणी : दामिनी, मोठा घात झाला बाई ! कालिंदीबाईना काल रात्रीं धरून कोंडून ठेविलें आहे धनीसाहेबांनीं; आणि कंकणांना ठेविलें आहे पाहऱ्यावर; एखाद्याशीं लग्नाचें ठरलें तर तें कसें सांगायचें म्हणून मघांशीं त्यांना विचारायला गेलें, तों कंकणांनीं मला सुद्धां बंदी केली !

दामिनी : अग असेल त्यांचें तसेंच कांहीं कारण; त्यांत तुझा कसला घात झाला एवढा ?

किंकिणी : कारण कसलें कपाळाचें ? तुझ्या घरांतलीच परवड !

दामिनी : काय ग, त्यांच्या अंगाखांद्यावरचें सारें उतरून ठेवलें असेल नाहीं वृंदावनांनीं ? बापडीवर वेळ कठीण तर खरीच !

किंकिणी : तुम्हां गरिबांना दागिन्यांची भारी हांव ! कालिंदीबाई कधीं नाहीं अशा हपापल्यावाणी करीत ! पुढें ऐक; आतां त्यांच्या सोडवणुकीचा उपाय सांग एखादा ! कोंडून ठेवलें आहे त्यांना पण कोंडमारा झाला आहे माझा ! कुण्या वेळीं कसें वागायचें हें कुणाजवळ शिकूं मी आतां ? म्हणून म्हणतें, कीं कसेंही कर आणि त्यांची सुटका करण्याचा रस्ता शोधून काढ !

दामिनी : अशा गोष्टींत मी तरी काय सांगणार बाई ?

किंकिणी : असा माझा हिरमोड नको करूं गडे ! मी एवढ्या आशेनें तुझ्याकडे आलें; तूं गरीब दासी, तुझ्या सुद्धां पायां पडतें वाटेल तर, पण कांहीं उपाय सांग !

दामिनी : माझे गुरु ते ईश्वर आहेत ना, ते बरीक सांगतील कांहीं उपाय.

किंकिणी : मग ऊठ, याच पावलीं त्यांच्याकडे जा ! इथेंच कुठेंसे राहतातना ते ?

दामिनी : ( जरा थांबून ) पण मला इथेंच बसून राहायला सांगून आणें झाले आहे; तो कोणसा पोथ्या घेऊन येणार आहे. त्या वेळीं मी नव्हतें असें कळलें तर लगेच कांहींच्या कांहींच व्हायचें मेलें !

किंकिणी : मला आतां रडें कोसळायच्या बेतांत आलें आहे !

दामिनी : दम खा, आतां असें कर, तो दुसरा बुरखा पांघरून तूं बैस माझ्या जागीं; तो माणूस आला म्हणजे तेवढ्या पोथ्या घेऊन ठेव ! मी अशीच येतें. बसतेस का ?

किंकिणी : बसतें, पण तूं जा कशी आधीं ! ( दामिनी जाते; किंकिणी बुरखा

पांघरून बसते.) देव करो आणि हिच्या गुरूला तरी कांहीं इलाज सांपडो म्हणजे झालें ! माझा जीव कसा उडून गेला आहे अगदीं ! कालिंदीबाईशीं बोलायला मिळालें म्हणजे त्यांच्या शिकवणीनें कंकणांना सांगतें लग्न ठरल्याचें ! कंकण आपले सरळमार्गी आहेत एवढेंच, नूपुर म्हणतात तसे वाईट कांहीं नाहींत ते ! पाऊल कुणाचें वाजलें बरें ? तो माणूस आला वाटतें ? (कंकण येतो.) अगबाई, हे तर कंकण ! हे कां इथें आले आहेत या गरीब दासीच्या घरीं ? [ उठून उमी राहते. ]

कंकण : दामिनी, तुझा नवरा घरांत नाहीं अशी संधि साधून मी मुद्दाम आलों आहें; मला आतां वेळ नाहीं; पण थोडक्यांत सांगतों; सुंदरी, तुझ्यामुळें मी बेहोष झालों आहें; माझें तुझ्यावर अलोट प्रेम आहे !

किंकिणी : पण तुमचें किंकिणीवर प्रेम आहे ना ?

कंकण : भलतेंच ! मी तिच्याशीं लग्न करणार आहें !

किंकिणी : आणि प्रेम मुळींच नाहीं तिच्यावर ?

कंकण : लग्नाच्या बायकोवर पुरुषाचें कधीं प्रेम ऐकलें आहे कुणीं ? प्रेम असें चुलीपाशीं बसायचें नाहीं; तें वारा खात, बाहेर तरंगत फिरतें !

किंकिणी : आणि किंकिणीला हें कळलें तर ?

कंकण : तिला कोण कळवायला बसलें आहे ? ती थोडीच हें ऐकायला बसली आहे !

किंकिणी : ( स्वगत ) कालिंदीबाईनीं इतकें ऐकून मुळींच धीर धरिला नसता ! ( बुरखा काढून, उघड ) तीच ऐकते आहे बरें हें सारें ! चांगला गळा कापणार होतां माझा हो !

कंकण : तूं कशी इथें ? सुदामानें मात्र माझा गळा कापला खरा ! किंकिणी, खरोखर मी हें खरें बोलत नव्हतों ! दामिनीची परीक्षा पाहण्यासाठीं म्हणून मीं तें सोंग आणिलें होतें.

किंकिणी : तर तर ! आतां नाहीं मी फसायची ! मी नाहीं तुमच्याशीं लग्न करायची कधीं ! तुमचें माझ्यावर खरें प्रेमच नाहीं ! मघांशीं तुम्ही मला बाई-साहेबांनाच भेटूं दिलें नाहीं !

कंकण : हें काय भलतेंच होऊन बसलें ? किंकिणी, खरें खरें सांगतों, माझें तुझ्यावर प्रेम आहे; पायां पडतों; माझी परीक्षा पाहा ! कसलेंही काम सांग, पाहा मी करितों कीं नाहीं तें ! वाटेल तसें अवघड काम सांग ! पण मला झिडकारून टाकूं नकोस ! [ दामिनी येते. ]

किंकिणी : थांबा जरा आतां ! काय झालें, दामिनी ?

दामिनी : ( किंकिणीस एकीकडे ) ईश्वर म्हणतात, मला कालिंदीबाईची भेट घ्यायला मिळाली तर कांहीं प्रयत्न करून पाहतां येईल ! पण तसें कुठलें जमायला ?

किंकिणी ( कंकणास ) कंकण, बोलफुलालाच गांठ पडली अगदीं ! मीं सांगितलेलें वाटेल तें काम करणार ना तुम्हीं ?

कंकण : नुसतें सांगून पाहा; उगीच विचारूं नकोस आतां !

किंकिणी : बरें तर, ते ईश्वर म्हणतात ते साधु आहेतना, त्यांना एकदा कालिंदीबाईची भेट घेऊं द्याल का ? पाहा, नाहींतर माझें प्रेम—

कंकण : अग, तुझ्यासाठीं ईश्वरालाच काय, पण पिशाच्चाला सुद्धां सोडीन कालिंदीबाईना भेटायला ! पण एका अटीवर ! हें कुणाला कळतां कामा नये; आणि कालिंदीबाईना बाहेर मात्र येऊं देणार नाहीं !

किंकिणी : कांहीं हरकत नाहीं. दामिनी, चल, राहूं दे तें तुझें काम ! कंकण, तुम्ही व्हा पुढें ! आम्ही त्यांना घेऊन येतों तिकडे. ( कंकण जातो. ) दामिनी, आतां नाहीं म्हणूं नकोस; मरूं दे त्या पोथ्या ! चल एकदम कशी ! पण एकदम नको गडे ! दुःखांत नेहमीं कालिंदीबाई अगदीं हळू पावलें टाकतात !

[ वदवे न मला० ]

जडताच गडे शोभते असा प्रसंग ये तदा ।
त्वरा रुचे न तापदा । कुलीनतेसि ती कदा ॥ ध्रु० ॥
मंद पडत पद तरी । ओढ जिवा फार जरी ।
जडपदांहिं थोर पाहिं दाविती विषादा ॥ १ ॥

[ दोघी जातात. दुसऱ्या बाजूनें नूपुर प्रवेश करतो. ]

नूपुर : ( स्वगत ) हा सुदाम शुद्ध गाढव आहे ! एवढीं भुयारें खणतो; किल्ले रचितो, पण व्यर्थ ! याच्या घरीं वाटेल त्यानें यावें ! कंकण, किंकिणी आणि दामिनी यांचीं काय खलबतें झालीं कुणास कळे ! आडून ऐकण्यांत हाच तर मोठा तोटा आहे; कधीं कधीं मुळींच ऐकूं येत नाहीं कांहीं ! तसेंच, त्या गोसावड्याचें कोडें कांहीं अजून उकलत नाहीं ! आतां करावी गंमत; दामिनीचा हा बुरखा घेऊन आपणच बसावें ! तिचा एखादा चोरटा दोस्त एवढ्यांत आला तर अशी बहार उडेल ! [ बुरखा पांघरतो. भुयारांतून बुरख्यानिशीं सुदाम बाहेर येतो. ]

नूपुर : ( स्वगत ) अशांत तो गोसावडाच आला तर नशीब उघडलेंच म्हणायचें !

सुदाम : ( स्वगत ) पुन्हा नशिबानें गल्लत केलीच ! किंकिणी मध्येंच आल्या-

मुळें आपल्याला तसेंच परतावें लागलें म्हणून कंकणानें सांगितलें ! ( पाहून ) दामिनी इमानानें बसली आहे मात्र खरी ! आतां आपणच एक डाव खेळून पाहावा ! ( स्वर बदलून उघड ) दामिनी, ए दामिनी !

नूपुर : ( बायकी आवाजानें ) कोण आलें आहे तें बुरखा घेऊन ?

सुदाम : मोठ्यानें बोलूं नकोस ! मी ईश्वर आलों आहें ठरल्याप्रमाणें !

नूपुर : ईश्वर, तुम्ही असे नेहमीं येतां; पण कोणाला दिसत तर नाहींना ?

सुदाम : ( स्वगत ) नेहमीं येतां ! स्त्रीजात तेवढी निमकहराम ! ( उघड ) कोणाच्याच कधीं दृष्टीस पडलों नाहीं अजून ! पण सुंदरी, मी आलिंगनाला अगदीं उत्सुक झालों आहें !

नूपुर : मग माझी का ना आहे ?

[ दोघेही जवळ येऊन एकमेकांचे बुरखे सरकवितात. ]

सुदाम : अग सटवे !

नूपुरः अरे गोसावड्या ! ( दोघेही एकमेकांस पाहतात. )

सुदाम : तुमची माझ्याबद्दलची कळकळ पाहून मला आनंद वाटतो ! पण हा घोटाळा झाला कसा ? दामिनी आहे कुठें ?

नूपुर : दामिनीबाई, कंकणाच्या मागें आणि किंकिणीबरोबर !

सुदाम :( स्वगत ) मग कांहीं हरकत नाहीं ! कंकणानें सांगितलें तें खरें तर मग ! ( उघड ) चला आपण जाऊं आणि कंकणाला भेटून नीट खुलासा करून घेऊं.

नूपुर : मलाही तुम्हांला कांहीं सांगायचें आहे, चला. [ दोघेही जातात. ]

## प्रवेश तिसरा.

[ स्थळ : बागेंतील बंगला. कालिंदी व ईश्वर प्रविष्ट. ]

कालिंदी : त्या वेळीं माझ्या केतनासह तिथें जायला मिळेल तर मी खात्रीनें दीनाराला वांचवीन ! जातां येईल का मला तिथें ?

ईश्वर : रात्रीं वसुंधरेच्या दिमतीला दामिनी असते; तेव्हां तिच्या ऐवजीं तुम्हांला जाऊन बसतां येण्यासारखें आहे.

कालिंदी : पण दामिनीच्याबद्दल मला आंत कसें जातां येईल ? केतनाला

बरोबर कसें घेऊन जातां येईल ? शिवाय, मला तिथें त्यांनीं किंवा वसुंधराबाईंनीं ओळखलें—म्हणजे आधींच ओळखलें तर कसें होईल ?

ईश्वर : कालिंदीबाई, तुमचा माझ्यावर विश्वास आहे का ?

कालिंदी : हं !

ईश्वर : मग दामिनीला दागिने मिळवून देण्याचें कबूल करून तुमच्या या खोलींत आणून ठेवितां येईल; या खोलींत आज रात्रीं एक महापुरुष प्रकट होऊन दागिन्यांचा सर्व संग्रह येथें टाकणार आहे असें तिला सांगितलें म्हणजे झालें ! सुदामाच्या आशेवरून दामिनी अष्टौप्रहर बुरख्यांतच वावरते, तेव्हां कोणी ओळखण्याची धास्ती नाहीं. तसेंच केतनालाही बुरख्याखालीं झांकून नेला म्हणजे झालें ! तुम्ही या वेताला अनुकूल असाल तर संध्याकाळीं दामिनीला इथें आणितों आणि तो बुरखा पांघरून तुम्ही माझ्याबरोबर चला म्हणजे झालें. किंकिणीनें सांगितलें म्हणजे मला आणि दामिनीला कंकण केव्हांही आंत सोडील ! इंथून निघाल्यावर प्रहर रात्र पडेपर्यंत माझ्या आश्रमांत राहतां येईल !

कालिंदी : तुमची योजना मला मान्य आहे. हें पाहा, थोडीशी अफू मात्र आणून ठेवा !

ईश्वर : ती कशाला ?

कालिंदी : तिथें गेल्यावर केतनानें रडूं नये म्हणून त्याला अफूची बाळगोळी दिली पाहिजे ! थोडीशी गुंगी आली म्हणजे सोईचें होईल ?

ईश्वर : बरें आहे. मग मी ठरल्याप्रमाणें व्यवस्था करूं तर ?

कालिंदी : देव तुम्हांला यश देईलच असें वाटतें ! [ ईश्वर जातो ]

कालिंदी : ( केतनाला मांडीवर घेऊन, स्वगत ) बाळा केतना, माझी अघोर इच्छा कळली ना तुला ? लाडक्या, तुला माझा राग नाहीं ना आला ? का हें तुलाच विचारतें म्हणून रागावला आहेस ? एकदां हसून मला धीर दे पाहूं ! तुझ्याखेरीज मनांतलें हितगुज मी कोणाशीं बोलूं बरें ? या अफाट जगांत एवढी दीड वितीची दौलतच काय ती माझी आहे ना ? मग माझ्या जीवाच्या धन्यासाठीं ही जिवाची जहागीर देवाला वहावयाला नको का ? बाळ, सतीचें वाण घेऊन निघाल्यावर दुःखाच्या आगींत उडी टाकण्यासाठीं तुझ्या कोंवळ्या कायेची धर्मशिळा करायला मी तयार झालें म्हणून रागावूं नकोस ! हा सतीचा खडतर मार्ग आहे ! तुझ्या पित्याच्या उद्धारासाठींच ना तुझा जन्म ? वसुंधराबाई भूपालांच्या नांवासाठीं दीनाराच्या जीवावर उदार झाल्या; मग तुझ्या वडिलांचा सर्वस्वीं अधःपात होत असतांनाही

दीनाराच्या जागीं तुला उभें राहायला नको का ? तिकडच्या स्वभावरूनच मला ही कल्पना आठवली. शिवाय पतिहृदयाशीं माझें हृदय एकरूप करण्याची त्यांनीं मला आज्ञा केलेली आहे, म्हणूनच मी अशी पाषाणहृदयी झालें आहे. बाळा, क्षमा कर ! पण—

[ कान्हा रहे अपने पास० ]

मार्ग दुजा नच जगांत । अतुल पातक ना तरि आतां ।
वडवित पितरा निरयपात ॥ ध्रु० ॥
थोर कुलीं जन्म ज्यास । सौख्यलेश नाहिं त्यास ।
कष्टदशा त्याला । अशिच नशिबाला ।
नातरि कुल तें विलया जात ॥ १ ॥

[ पडदा पडतो. ]

प्रवेश चवथा

[ ईश्वर प्रवेश करितो. ]

ईश्वर : (स्वगत) दामिनी अजून कशी येत नाहीं ? परमेश्वरा, या सत्कार्याच्या सिद्धीसाठीं असत्याचरण करीत आहें त्याची क्षमा कर! ज्या वैराग्यवृत्तीला परहित हाच आचारधर्म आहे तिच्या अवश्यकर्मासाठीं परब्रह्मस्वरूप सत्याचाही क्षणभर संन्यास केल्यावांचून चालणार नाहीं! कालिंदी, तुझी कल्पना माझ्या पूर्णपणें लक्षांत आली ! ती जितकी पवित्र आहे तितकीच दुःख-दायक आहे ! दीनाराच्या ऐवजीं केतनाचा तूं बळी देणार ? शाबास तुझ्या पतिभक्तीची ! ( दामिनी येते. ) ये, दामिनी, जरासा वेळ केलास. दीनाराला आणलें आहेस ना ?

दामिनी : हो ! पण त्या खोलींत आज रात्रीं तुम्ही म्हणतां तसा महापुरुष प्रगट झालाच नाहीं तर ?

ईश्वर : असें कधींच व्हायचें नाहीं ! तूं मात्र रात्रभर जागी राहा ! तो महापुरुष तुला दिसणार नाहीं; तेवढें दागिन्यांचें गांठोडें मात्र तुझ्यापुढें पडेल ! पण ही हकीकत कोणाला कळल्याबरोबर साऱ्या सोन्याची राख होईल एकदम !

दामिनी : मग आज रात्रीं हा सोन्याचा दिवस खचित उगवणार म्हणतां ? पण

गुरुमहाराज, पाटल्या तोडीच्या असतील का आपल्या पुरणाच्याच ?

ईश्वर : तें आतां सांगतां येणार नाहीं ! आतां वेळ घालविण्यांत अर्थ नाहीं; चल लौकर. [ जातात. ]

## प्रवेश पांचवा

( स्थळ : तळघर. वसुंधरा व बुरखा घेतलेली कालिंदी )

वसुंधरा : ( स्वगत ) मधांपासून दीनाराला एकदा जवळ घेऊन डोळे भरून, निरखून पाहावा असें मनांत येत आहे; पण नको हा मोह ! नाहीं तर माझी पवित्र निर्दयता एखादे वेळीं वितळून जाईल ! ( उघड ) दामिनी, बाई, तूं आज अशी अगदींच कोमेजल्यासारखी कां झालीस ?

कालिंदी : ( रडत ) बाईसाहेब, हातावांग्यावर झेललेलें हें लेणें आज असें उतरून ठेवायचें—

[ रडूं लागते. ]

वसुंधरा : दामिनी, रडूं नकोस अशी ! त्यांत मनाला इतकें अवघड तें काय वाटतें ? होणारासारखें व्हायचें टळत नाहीं; रडणें कधींतरी नशिबीं ठेवलेलेंच असतें ! मी प्रत्यक्ष याची आई, मग माझं काय व्हायला पाहिजे आतां ? माझ्या गळ्याची शपथ आहे; तूं रडूं लागलीस म्हणजे माझ्या जिवांत कालवाकालव होऊं लागते; तूं मला धीर द्यायला नको का ? धीरानें डोळे पूस आणि मनाचा अगदीं दगड कर ! रोज दीनाराला निजविण्यासाठीं गाणें म्हणतेस तसें आजही एखादें चांगलेंसें म्हण पाहूं ! आपला दीनार आज काळझोप घेणार आणि आपण चांगलें मंगल गीत म्हणायचें सोडून असें मुळूमुळू रडत बसायचें ? तें अभिमन्यूचें गाणें येतें ना तुला ? तेंच म्हण !

कालिंदी : मला मधलीं मधलीं कडवीं येतात; सगळें आतां आठवत नाहीं !

वसुंधरा : म्हण चुकतमाकत जेवढें येईल तेवढें ! अगदीं हुंदका देऊं नकोस !]

कालिंदी : ( स्वगत ) बाळा केतना, माझें हें अखेरचें गाणें कसेंतरी गोड करून घे. (उघड)

"सकाळीं उठूनी धर्मानीं काय केलें । अभिमन्यूसी बोलाविलें ।

संसप्तकीं अर्जुनासी नेलें । मग कौरवसैन्य सिद्ध झालें ।

मग द्रोणांनीं काय पण केला । धरूनी देऊं धर्माला ।
चक्रव्यूहाची युक्ति आहे तुजला । जातें बाळा युद्धाला ।
गेला अभिमन्यू-मन्यू वीर रणीं । चक्रव्यूह केला द्रोणांनीं ।
गेला अभिमन्यू ॥ ''

पुढें काय बरें आहे ?

**वसुंधरा :** पुढें धर्माला नमस्कार करून सारथ्याला रथ आणायला सांगितला. तें जाऊं देत; पुढें म्हण !

**कालिंदी :**

'' रणीं मिसळला सुभद्रेचा सूत । सैन्य पाडिलें असंख्यात ।
शरांनीं शिरें किती उडवीत । राजे झाले भयाभीत ।
सोळा वर्षांचें वय दिसे लहान । युद्ध केलें निर्वाण ॥
गेला अभिमन्यू-मन्यू वीर रणीं । चक्रव्यूह केला द्रोणांनीं ॥ ''

पुढें मग द्रोणांनीं येऊन— [ वृंदावन येतो. ]

**वसुंधरा :** थांब जरा आतां. वृंदावन आले !

**वृन्दावन :** वसुंधरे, तुझा काय विचार ठरला ?

**वसुंधरा :** माझा विचार मीं काल्च तुम्हांला सांगितला ! कालपासून मी पुन्हां दीनाराकडे पाहिलें सुद्धां नाहीं ! भूपालांच्या वज्रदेही नांवावरून ओवाळून टाकिलेला हा उतारा काळासाठीं काढून ठेविला आहे ! भूपालांच्या नांवासाठीं मीं अपत्यस्नेहाचा संन्यास केला आहे !

**वृंदावन :** वसुंधरे, अजून ऐक ! हा हार काय तो माझ्या गळ्यांत घालायचा ! एवढ्यासाठीं प्रत्यक्ष पोटच्या पोराला काळाच्या तोंडांत लोटतेस ?

**वसुंधरा :** माझ्या पातिव्रत्यासाठीं साऱ्या जगावर, स्वर्गातल्या तेहतीस कोटी देवांवर सुद्धां मी उदक सोडीन ! मग दीनाराची काय कथा ! पितरांच्या उद्धारा-साठींच पुत्राचा जन्म असतो ! अशा वेळीं या वीरपुत्रानें उडी टाकायची नाहीं तर काय करायचें ? वृंदावन, भूपालाच्या नांवासाठीं—वसुंधरेच्या पातिव्रत्यासाठीं—आर्यपतिव्रतांच्या पुण्यपरंपरेसाठीं—माझा दीनार अशा वीरमरणाला तयार आहे !

**वृंदावन :** अस्सें काय ? दामिनी, तो दिवा दूर नेऊन ठेव आणि दीनाराला इकडे आण ! [ कालिंदी दिवा नेऊन ठेविते. ]

**वृंदावन :** वसुंधरे, अजून, अजून विचार कर ! सुटलेला तीर पुन्हां सांपडणार नाहीं !

वसुंधरा : वृंदावन, तुम्हांला वीरगजेनेनें शेवटचें सांगतें, पातिव्रत्याचें रक्षण करण्यासाठीं दुःखाचे डोंगर पोटांत गिळायला मी तयार आहें! माझ्या पातिव्रत्यापुढें मला कशाचीही किंमत नाहीं.

वृंदावन : दामिनी, आण दीनाराला इकडे! वसुंधरे, अजून तुला थोडा वेळ आहे!

कालिंदी : (स्वगत) देवा, या वेळीं मला धीर द्या! बाळा केतना, आल्या प्रसंगाला तयार हो! [ केतनाला घेऊन वृंदावनाजवळ जाते. ]

वृंदावन : वसुंधरे, कसला विचार करिते आहेस तूं?

वसुंधरा : माझ्या बाबांच्या मरणकाळीं आजोबा शिवलीलामृतांतल्या रुद्राध्यायाचा पाठ करीत होते; तो अकरावा अध्याय मी आठवतें आहें!

वृंदावन : वसुंधरे, या राक्षसी हट्टानें दीनार फुकट मरत आहे! या कट्यारीनें त्याच्या पोटांत ठाव घेतल्याबरोबर चहूंकडे रक्ताचीं कारंजीं सुरू होतील—

वसुंधरा : भूपालांचें नांव त्या कारंजांखालीं न्हाऊन पावन होऊन जाईल! वृंदावन, या शब्दांनीं मला हिणविण्याचा का प्रयत्न करितां आहां? कां तुमच्या पुरुषार्थाला थरकांप सुटला आहे? तुम्हांला माझें सत्त्वच पाहायचें असेल, तुमच्या कपटी कट्यारीला माझ्या दीनाराला मारण्याची लाज वाटत असेल तर मला सांगा—भूपालांची ही वीरपत्नी आपल्या हातानें दीनाराचा नाश करील!

वृंदावन : दामिनी, नीट उभी राहा! वसुंधरे, नीट पहा, माझी लाजलेली कट्यार दीनाराच्या पोटांत तोंड खुपसून लपून बसत आहे!

[ कट्यार बाहेर काढतो. ]

वसुंधरा :

" अश्वशाळा गजशाळा संपूर्ण। सर्व संपत्तीसहित गृहदान।
महानंदेनें स्नान करून। भस्म अंगीं चर्चिलें॥ रुद्राक्ष आंगीं लेवून।
हृदयीं चिंतिलें शिवध्यान। हर हर शिव म्हणोन। उडी निःशंक घातली॥ "

देवा, वृंदावनांना क्षमा कर!

[ वृंदावन तोंड बाजूला करून उजव्या हातानें कट्यार खुपसतो व डाव्या हातानें डोळे पुसतो.]

वसुंधरा : (स्वगत) वृंदावन डोळे कां पुसताहेत? अहाहा, देवा, असाच असाच मला धीर दे! (उघड) दामिनी, दीनाराला पाळण्यांत नेऊन ठेव!

वृंदावन : (स्वगत) या अंधकारानें केवढा उपकार केला हा! निर्दोष दीनाराच्या वधामुळें ही कट्यार रक्ताचे अश्रु ढाळीत आहे ते मला दिसत

नाहींत आगी माझे अश्रु वसुंधरेला दिसत नाहींत! [ कट्यार ठेवतो. ]

**कालिंदी :** ( केतनालों पाळण्यांत ठेवून, स्वगत ) बाळा, नीज आतां; कल्पन्तापर्यंत नीज! आकाशाची झालरमोत्यांची झूल घालून उद्यां माझ्या हातीं तुला झांकून ठेवीन!

**वृंदावन :** वसुंधरे, आतां यापुढें दुसरा प्रश्न! उद्यां या वेळीं असाच प्रसंग भूपालावर येणार आहे! तुझें पातिव्रत्य किंवा तुझ्या पतीचा प्राण यांपैकीं एकाचा तरी उद्यां नाश होईल! ऐकलेंस नीट? आतां तरी तुझ्या हृदयाला पाझर फुटेल ना?

**वसुंधरा :** माझ्या हृदयाच्या रक्ताचा पाझर दीनाराच्या हृदयांतून वाहत आहे! पाळण्यांतल्या दीनाराला माझ्या हृदयाची साक्ष विचारा!

**वृंदावन :** ठीक आहे! भूपालाची सुद्धां प्राणनाशाला तयारी आहे का म्हणून विचारतां! स्वतःचा प्रश्न असल्यामुळें त्याचे डोळे खास उघडतील!

**वसुंधरा :** माझ्या पतीचें धैर्य हिमालयासारखें अढळ आहे!

**वृंदावन :** उन्हाळ्याच्या तापानें हिमालयाच्या सुद्धां गंगायमुना वाहूं लागतात. अचेतन सृष्टीला सुद्धां प्राणांचा मोह आवरत नाहीं! ऐन दुपारच्या उन्हाचे चटके बसूं लागतांच निर्जीव छाया सुद्धां माणसाच्या पायांचा आश्रय घेते! दामिनी, या गोष्टींपैकीं एक अक्षर बाहेर आलें तर तुझेही प्राण जातील हें लक्षांत ठेव! [ जातो. ]

**कालिंदी :** बाईसाहेब, किती तुमचें उदार हृदय! तुम्ही त्यांना शाप द्याल असें वाटलें होतें मला!

**वसुंधरा :** दुष्टांचें परिपत्य करण्यापेक्षां, सज्जनांना सुख देण्याबद्दलच नेहमीं देवाजवळ भीक मागावी असें मला वाटतें! पण दामिनी, तुझें गाणें म्हण पुन्हा! तुझ्या गोड गाण्याच्या गुंगींतच माझ्या बाळाचा जीव काळझोपेंत विरून जाऊं देत!

**कालिंदी :** ( पाळणा हलवीत ) कुठवर बरें आलें होतें? हं;—

> " मग द्रोणांनीं तोडिलें धनुष्य। फाडिलें अंगींचें कवच।
> मोडिला रथ केला विरथ। धावुनि आले षड्रथ॥
> दुःशासनपुत्रें गदाप्रहार केला। अभिमन्यू रणीं पडला।
> पडला अभिमन्यू—मन्यू वीर रणीं। शोक बहु केला पांडवांनीं॥ "

**वसुंधरा :** नको हें रडगाणें! पांडवांनीं शोक केला असेल, मला करायचा नाहीं! दीनाराच्या वीरमरणाला शोभण्याजोगें गाणें म्हण एखादें.

**कालिंदी :** ( पाळणा हलवीत )

[ अजि अक्रुर हा नेतो० ]

निज बाळा रे गाणें गातें आई । करि आतां जोजो गाई ॥ ध्रु० ॥

तुज जन्म दिला बाळा त्यांची स्वारी । लाखांत शिपाई मारी ।

बघ गरदी ही बुरुजांची तुजभवतीं । दगडाची त्यांची छाती ॥

कळिकाळाशीं झगडणार खंबीर ॥ हे तुझेच हिरवे वीर ॥

॥ चाल ॥ जीवांच्या जळत्या ज्योती ।

आकाशीं तारा होती ।

मोलाचीं माणिकमोतीं ।

त्या डोळ्यांनीं देवराय तुज पाही । करि आतां जो जो गाई ॥ १ ॥

दों दिवसांची ही दुनियेची वसती । सारखीच असती नसती ॥

तुजऐसा हा बाळ नऊ नवसाचा । हातचा फिरे जायाचा ॥

ऋणानुबंधाच्यां तुटल्या आतां गांठीं ॥ मग कुठल्या भेटी गांठी ॥

॥ चाल ॥ हें देवाघरचें लेणें ।

नशिबानें देणें घेणें ।

कुणितरी कुणास्तव रडणें ।

तीं रडणारीं रडतिल धाईधाई ॥ करि आतां जोजो गाई ॥ २ ॥

[ पडदा पडतो. ]

**अंक चवथा समाप्त**

## अंक पांचवा.

### प्रवेश पहिला.

[ सुदाम व नूपुर प्रवेश करितात. ]

सुदाम : स्नेहधर्माला जागून तुम्ही चांगलीच चूक माझ्या पदरांत घातली म्हणायची ! दामिनी रात्रभर बाहेर होती म्हणतां ?

नूपुर : सगळी रात्रभर ! इतकेंच नाहीं पण कंकणाचेंही अंग आहे या कारस्थानांत ! माझी तर खात्री झालेली आहे, कीं कंकणाची तुमच्या घराकडे सोज्वळ दृष्टि कांहीं नाहीं ! तसाच तो गोसावी ! अगदीं खटपटींत असल्यासारखा दिसतो ! मग गुलामाचें काय खलबत आहे नकळे ! तुम्हांला हीं येणींजाणीं नीट कळत नाहींत. अहो, एरवीं कंकण तुमच्या घरीं वरच्यावर कशाला येत बसेल ? हं बघा, नवऱ्याशीं दोस्ती करणारांपैकीं पुष्कळांची नजर निराळीकडेच लागलेली असते !

सुदाम : दामिनी रात्रभर बाहेर राहिली असेल तर मोठा अनर्थापातच म्हणायचा ! आतां जातो आणि बारकाईनें चौकशी करितों ! ( स्वगत ) हा म्हणतो हें खरें असेल तर आतांच्या आतां कांहीं तरी युक्ति योजून दामिनी जगावेगळी केली पाहिजे. नाहींतर बिघडलेल्या बायकोच्या नवऱ्याइतका दुर्दैवी प्राणी जगांत नसतो असें म्हणतात त्याचा मलाच अनुभव यायचा कदाचित् ! [ जातो. ]

नूपुर : ( स्वगत ) आतां किंकिणीला जाऊन सांगावें, कीं कंकण दामिनीच्या नादीं लागला आहे आणि कंकणालाही देतां सांगून, कीं किंकिणीचें सुदामाशीं सूत आहे म्हणून ! आणि हें सुद्धां कांहीं अगदींच खोटें नाहीं ! काल किंकिणी जी सुदामाच्या घरीं आली ती कांहीं दामिनीला भेटण्याला नव्हे ! एवढ्या कारणावरून त्या दोघांचें जमलेलें लग्न पुन्हा मोडून काढितां येईल अजून ! हो, असेंच करावें झालें. [ जातो. ]

[ स्थळ : तळवर–भूपाल प्रविष्ट. ]

भूपाल : ( स्वगत ) पत्नीचें पातिव्रत्य आणि स्वतांचे प्राण ! या दोहोंपैकीं
कोणाचा त्याग करूं ? रणांगणांत वाद्यांच्या दणदणाटानें बुद्धीची चेतना बंद
झाल्यामुळें विचारमूढ आवेशस्थितींत मी कैक वेळां प्राणांवर उदार होऊन
लढलों; रक्ताच्या उसळत्या लहरींचे बुद्धीला हेलकावे बसल्यामुळें तशा स्थितींत
तिला विचार करण्याइतकी स्थिरता मिळत नाहीं. पण शांत रक्तानें सुखासुखाचे
हिशेबी आंकडे टाकून गणितबुद्धीनें या प्राणांचा मोह सोडणें कोणाला तरी साध्य
आहे का ? पातिव्रत्य कीं प्राण ? प्राणत्यागाला तयार होऊं का ? पण प्राण-
हानीचे परिणाम बुद्धिगम्य आहेत ! प्राणांच्या अभावीं सचेतन देहाला प्रेतकळा
·येत असल्यामुळें प्राणांचें द्रव्यत्व तर्कांच्या कसोटीला पटण्यासारखें आहे !
तसें पातिव्रत्याचें आहे का ? पवित्र आर्यसंस्कारांनीं भरलेल्या वातावरणाला
माझ्या विचारांचे श्वास विखारून टाकतील कीं काय, अशी भीति वाटते. पण
पातिव्रत्याविरहित स्त्रीदेहाचें अस्तित्व असंभवनीयच आहे का ? नाहीं, ही
केवळ संस्कारहानि आहे ! जगाच्या विशाल पृष्ठभागावर अशा राष्ट्रसंस्कृति
कितीतरी आहेत, कीं ज्यांच्या पातिव्रत्याविषयींच्या कल्पना आमच्याहून
शिथिल आहेत ! इतकेंच नाहीं, पण पातिव्रत्याशीं विपर्यस्त कल्पना ज्यांच्यांत
प्रचलित आहेत अशींही राष्ट्रें सांपडतील ! प्राणांच्याबद्दल कल्पनेची अशी
अनेकविधता आहे का ? संस्कारजन्य पातिव्रत्यासाठीं प्रत्यक्षगम्य प्राणांचा
विनिमय करणें ·विचारवादाला सोडून आहे ? कोण या प्रश्नांचें उत्तर मला
देईल ? प्राण कीं पातिव्रत्य ? बुद्धीला प्रमाण मानूं, कीं हृदयाचें समाधान
करूं ? विचार आणि विकार यांतून कोणाला प्रधानपदावर बसवूं ?

[ वृंदावन येतो. ]

वृंदावन : भूपाल, माझ्या प्रश्नाचें उत्तर मागावयाला मी आलों आहें !

भूपाल : थांब वृंदावन, वसुंधरेची आणि माझी भेट घालून दे ! हा प्रश्न आम्हां
दोघांचा आहे ! तिची भेट मला घेतां येईल का ?

वृंदावन : वसुंधरेची व तुझी भेट व्हायला माझी मुळीच हरकत नाहीं; पण तुमचा
निर्णय मात्र मला लौकर कळला पाहिजे ! ही संधि मी कालक्षेपाकरितां देत
नाहीं हें लक्षांत ठेव ! चल माझ्याबरोबर !

भूपाल : चल! हरहर, कोणत्याही मनुष्यावर असें चमत्कारिक संकट आलेलें नसेल! [ जातात. ]

## प्रवेश तिसरा.

[ स्थळ : सुदामाच्या घरासमोरील आंगण. पात्रें : सुदाम व दामिनी. समोर अग्निकुंड पेटत आहे. ]

सुदाम : हं, हो अशी पुढें! आतां मागेंपुढें करूं नकोस! [ तिचा हात धरून ओढतो. ]

दामिनी : आणखी काय करूं म्हणतां?

सुदाम : मुकाट्यानें या अग्निकुंडांत उडी टाक!

दामिनी : अगबाई, म्हणजे!

सुदाम : म्हणजे काय? आज गौरीसारखी सजून बसली आहेस आणि इतके दिवस लंकेची पार्वती होतीस; काल रात्रभर घराबाहेर राहून रामाविरहित लंकेंतली सीता झालीस. तेव्हां लंकेहून परत आलेल्या सीतेप्रमाणें तुलाहि दिव्य करावें लागेल!

दामिनी : आगींत उडी टाकून दिव्य? आणि कां म्हणून?

सुदाम : त्याचें कारण काल रात्रभर तूं परगृहीं राहिलीस; परगृहीं वास केलेल्या स्त्रीचा पुन्हा स्वीकार करण्यापूर्वी नवऱ्यानें तिला अग्नींत दिव्य करायला लावावें असें शास्त्रवचन आहे! स्त्रीचें पातिव्रत्य जर कायम असेल तर ती तशा आगींतहि कायम राहील! नष्ट झालें असेल तर तीहि नष्ट होईल! हं, चल, टाक उडी!

दामिनी : भलतेंच कांहीं तरी. हें काय असें वेड्यासारखें करायचें? लोक काय म्हणतील याचा कांहीं विचार?

सुदाम : लोकांना काय कळतें यांत? हा साराच प्रकार अलौकिक आहे! श्रीरामचंद्रासारख्या लोकोत्तर पुरुषानें रावणाच्या घरीं सहा महिने राहिल्या-बद्दल संशय असल्यामुळें सीतादेवीसारख्या लोकोत्तर पतिव्रतेला याच लोकोत्तर मार्गानें पुन्हा घरांत घेतलें. श्रीरामचंद्राना वेड लागलें होतें का? सारी लंका त्यांची वाहवा करीत होती. लंकेंत लोक नव्हते वाटतें?

दामिनी : लंकेंत सोन्याच्या विटा असतील; इथें काय त्याचें ? रामाकाळच्या गोष्टी त्या ! आतां कशा खऱ्या होतील ? तुम्ही राहाल बाजूला आणि माझ्या अंगाचा होईल भडका !

सुदाम : माझ्या अंगाचा भडका केलास तेव्हां नाहीं केलास हा विचार ? अन् भडका झाला तर तुझें काय वाईट होणार आहे त्यांत ? माझ्या हातून ज्ळून मेलीस तर सोनें झालें ! नवऱ्याच्या हातून मरण मिळावें म्हणून बायका जीव टाकीत असतात जीव ! बरें, पुन्हा जिवंत निघालीस तर सोन्याहून पिवळें झालें ! आपलें चौदा चौकड्यांचें राज्य आहेच; मी राजा आणि तूं राणी !

दामिनी : आग लागो तुमच्या चौदा चौकड्यांना अन् त्या राज्याला !

सुदाम : ही तर तुझी नवऱ्याबद्दल आस्था ! म्हणूनच तुला एकदां आगींत लोटलें पाहिजे ! चल, आटप लवकर ! रामचंद्रांनीं उडी टाक म्हटल्यावर सीतामाई चघळपणानें चौकशी करीत बसल्या नाहींत. माझी आतां खात्री होत चालली आहे कीं, तूं कांहीं सीतेसारखी साध्वी नाहींस !

दामिनी : अन् तुम्ही तरी कुठें आहां रामचंद्रासारखे ? सीतामाईनीं मृगाच्या कांचोळीचा हट्ट घेण्याची खोटी; रामचंद्र लागलीच धनुष्यबाण घेऊन रानोरान फिरत सुटले ! आणि आज कपाळाला बाशिंग बांधल्या दिवसापासून मी कपाळीं कटकट करतें आहें सारखी; पण तुमच्या जीवाला दिक्क नाहीं त्याची !

सुदाम : चूक केली रामानें ती ! राम गेले ऐट दाखवायला आणि इकडे रावणानें सीतेला दाखविली लंका ! रामानें ही चूक केली म्हणून लोकांनीं तिचा एवढा ग्रंथ केला. भलत्या गोष्टींत रामाप्रमाणें वागायला मला लागलें नाहीं वेड !

दामिनी : हां ! तेवढें वेड कसें लागेल तुम्हांला ? हें असें घालवेड तेव्हांच पांघराल ! बायकोला जिवंत जाळायला रामाच्या तीन हात पुढें, नि राम एकपत्नी होते म्हटलें कीं रामाचें नांव ! हें ताकापुरतें रामायण पुरे करा ! चांगली सोन्यासारखी बायको—

सुदाम : सोन्यासारखी बायको आहे म्हणूनच तिला अशी भट्टींत भाजून, तावून-सुलाखून घ्यावी लागते, म्हणजे ती चांगली कसोटीस उतरते.

दामिनी : बावनकशी सोन्याची पुतळीसुद्धां तुमच्यासारख्या फत्तराच्या कसोटीला उतरायची नाहीं !

सुदाम : हं, बरोब्बर ताडलेंस ! फत्तराच्या कसोटीला चांगलीशी उतरत नाहीं एवढ्यासाठीं तर या शास्त्रोक्त शेगडींत शेकून घेतली पाहिजे. चल, तुझ्या अंगावरचें हें चोरटें सोनें कसाला लाविलेंच पाहिजे. चल, टाक लौकर उडी.

तुझ्या या सुवर्णभस्माखेरीज माझा हा हृद्रोग बरा व्हायचा नाहीं! दामिनी, मी तुझा नवरा आहें. नवऱ्याची आज्ञा स्त्रीला मान्य असलीच पाहिजे! चल टाक उडी. एक अक्षरसुद्धां बोलूं नकोस आतां!

[ तिला ओढून अग्निकुंडाजवळ नेतो, कंकण येतो. ]

**दामिनी :** धावा हो धावा! आग–आग—

**कंकण :** ए पागल, सोड तिला! त्या बापडीवर कां उगीच अशी आग पाखडतोस? मी मघांपासून ऐकतों आहें,—मला वाटलें ही थट्टा आहे सारी म्हणून! श्रीरामाच्या करणीची ही निव्वळ माकड-चेष्टा आहे! आणि ती मात्र इतक्या सफाईनें करीत आहेस कीं, तशी सीतेचें दिव्य प्रत्यक्ष पाहणाऱ्या रामसेनेंतल्या जातिवंत माकडांनासुद्धां साधली नसती!

**सुदाम :** ( एकीकडे ) हं, कंकणा, बायकांच्यादेखत बेअदबी होत आहे. तोंडांतून वेजबाब काढूं नकोस! नवऱ्याला शेरास सव्वाशेर भेटला म्हणजे बायकोजवळ त्याचें वजन चट्‌दिशीं कमी होतें! सध्यां हिच्यादेखत माझी माफी माग! मग मी तुझी भरपाई करून देईन! ( पुन्हा दामिनाची मान धरतो. )

**कंकण :** वेवकूब, कसली रे तुझी माफी मागायची? निव्वळ गाढव आहेस तूं. असली हिरकणीसारखी बायको मिळाली आहे तिचे असे हाल करतोस? सोड तिची मान, नाहीं तर तुझी मान उतरून टाकीन!

**सुदाम :** बाबा, अशी हिरकणी पचविणें फार कठीण. ती खोटी असली तरीसुद्धां अशी फट्‌दिशीं प्राणाशीं गांठ पडायचा प्रसंग येतो!

[ एका बाजूनें नूपुर व किंकिणी येतात. ]

**नूपुर :** ( एकीकडे किंकिणीस ) काय सांगितलें मीं तुला? सांपडला ना कंकण अचूक याच घरांत? आतां जरा इथेंच थांब. सुदाम बहुतकरून याच बाबतींत त्याला बोलत आहेसें दिसतें!

**कंकण :** असें आहे नाहीं का? मग किंकिणीसंबंधानें तुझी नजर साफ नाहीं अशी मला खरीखुरी खबर लागली आहे. चल, टाक उडी तूं पण या कुंडांत आणि दे करून माझी खात्री!

**सुदाम :** भलतेंच! किंकिणी कांहीं अजून तुझी लग्नाची बायको झाली नाहीं; तेव्हां तुला मुळीं संशय घ्यायचाच हक्क नाहीं!

**दामिनी :** किंकिणी नसेल त्यांची लग्नाची बायको, पण मी आहें ना तुमची लग्नाची बायको? मला तर आहे ना अधिकार? माझा संशय दूर करा पाहूं आतां! हं, घ्या उडी माझ्याबरोबर!

**कंकण** : पण मला अधिकार कां नाहीं ? किंकिणीशीं माझा धर्मविवाह झाला नसला तरी गांधर्वविवाह झालेला आहे ! आम्हीं दोघांनीं मनांनीं एकमेकांना वरिलेलें आहे ! तेव्हां मलाहि अधिकार आहेच ! चल, टाकतोस कीं नाहीं उडी ? या आगीच्या सोनेरी कोंदणांत या हिरकणीपेक्षां तुझ्यासारखा हिराच नीट बेताचा बसेल ! चल, टाकतोस कीं नाहीं उडी ? या गरीब गाईला छळणाऱ्या तुझ्यासारख्या कसाबाला ठिकाणावर आणण्यासाठीं देवानें माझ्यासारखे हरीचे लाल तयार केलेले असतात, समजलास ?

**सुदाम** : तिलाहि अधिकार नाहीं, नी तुलाहि अधिकार नाहीं. तुझा अधिकार तर अगदीं ओढून ताणून आणलेला आहे !

**कंकण** : हरकत नाहीं. तुलाहि तसाच अगदीं ओढून ताणून आणतां या आगीच्या कोंदणांत ! त्या गरीब गाईला छळीत होतास नाहीं का ? तुलाहि आणण्यासाठीं देवानें माझ्यासारखे हरीचे लाल निर्माण केले आहेत ! हं, आतां लटपट नाहीं उपयोगी ! मी नाहीं आतां माझा शब्द पडूं देणार ! मीसुद्धां रामासारखा एकवचनी आहें !

[ नूपुर, किंकिणी पुढें येतात. ]

**नूपुर** : हं, किंकिणी, हो आतां पुढें आणि पकड या एकवचनी रामाला ! हा हरीचा लाल त्या हिऱ्याच्या जोडीला ठीक शोभेल ! लाग आतां बोलायला ! लाजूं नकोस अगदीं !

**किंकिणी** : मला बाई लाज वाटते असें बोलायला. कालिंदीबाई नेहमीं वृंदावनांच्या सभोंर लाजतात.

**नूपुर** : लाज नाहीं वाटत असें बोलायला ? लाजूं नकोस आतां. कर हिय्या एकदां !

**कंकण** : हें काय कुलंगडें आहे ?

**किंकिणी** : हें आपलें दोघांचें प्रेम ! तुम्हांला या दामिनीचा आतां नाद लागला आहे तो माझ्या कानीं आला. या नूपुरांनीं मला बऱ्याच गोष्टी सांगितल्या आहेत; मला तुमचा संशय आला आहे; तेव्हां तुम्हीसुद्धां टाका उडी या आगींत ! मला नाहीं हें असें खपायचें !

**कंकण** : चल, हो दूर; खपायचें नाहीं तर दे माझा नाद सोडून ! तुझ्यासाठीं मी मरूं कीं काय ? संबंध काय तुझा माझा ? अजून लग्नाला नाहीं ठिकाण आणि—

**सुदाम** : हं, कंकणा, एकवचनी रामाचा अवतार संपला वाटतें ?

किंकिणी : मी संपूं देईन तेव्हां ना ! त्यांचा माझा धर्मविवाह झाला नसला तरी गांधर्वविवाह झालेला आहे. आम्हीं दोघांनीं मनांनीं एकमेकांना वरिलें आहे, तेव्हां मलाहि अधिकार आहेच.

नूपुर : अल्बत; बायकापुरुषांना एकच न्याय ! कंकण, व्हां पुढें आतां; तुमच्या एकाहि पूर्वजानें आगींत उडी टाकतांना मागेंपुढें पाहिलें नाहीं हें आठवतें ना ?

कंकण : ( स्वगत ) मोठ्या बिडतीची वेळ आली आहे ! आतां मागें पाऊल टाकलें तर चालण्यासारखें नाहीं ! या वेळीं आपणच अवसान धरून सर्वांनाच यांत गुंतवावें झालें ! यांच्यापैकीं एकांतसुद्धां आगींत उडी टाकण्याचें पाणी दिसत नाहीं ! मींच ओढून चंद्रबळ आणलें म्हणजे ताबडतोब यांची तारांबळ उडेल !

नूपुर : कंकण, आतां कसला करितां विचार ? किंकिणी, तूं पुन्हा लाजलीस वाटतें ? धर पदर तुझ्या भावी आणि चोरट्या नवऱ्याचा !

कंकण : माझा पदर धरतेस कशाला ? तुझ्या पदराशीं ह्याची गांठ दे म्हणजे झालें. या हिऱ्याच्या जोडीला हिरकणी आहे, आणि या लालाच्या जोडीला ही लाजाळू लालडी नको का ? तुझी आणि या सुदामाची नजरानजर झाल्याचें माझ्याहि नजरेस आलें आहे !

किंकिणी : खोटें आहे हें ! तुमची कांहीं तरी नजरचूक झाली आहे ! दुसरें कोणी असेल ! कोणीं सांगितलें असें ?

कंकण : या नूपुरानेंच ! आणि तें खोटें असलें तरी काय झालें ? खऱ्या-खोट्याचा निकाल लावण्यासाठीं तर ही आगटी पेटली आहे. मुकाट्यानें हो पुढें !

नूपुर : वाः ! छान चौकडा झाला आतां ! ( कंकण किंकिणीस ओढतो. ) ( स्वगत ) आतां इथून अंग चोरावें; नाहीं तर हें जडावाचें काम आपल्याहि अंगावर यायचें कदाचित् ! [ जाऊं लागतो. ]

कंकण : ए बदमाश, चाललास कुठें चोरासारखा न विचारतां ?

[ त्याला धरून आणतो. ]

नूपुर : अरे, असें काय करतोस ? कोणी जायला निघालें तर त्याला विचारूं नये " कुठें जातोस ? " म्हणून ! जाणाराचें काम होत नाहीं !

कंकण : पण तूं जातोसच कशाला ? मीच करतों ना तुझें काम. या कोंदणाच्या चौकांत तुझ्यासारखें झांकलें माणिक तर जरूर पाहिजे ! ज्याच्या त्याच्या कानाशीं लागून तूंच तर या भानगडी केल्यास ! चल तूं पण आमच्याबरोबर !

नूपुर : पण माझा काय संबंध ?

सुदाम : मी सांगतों संबंध ! दामिनीच्या मागें मागें हिंडतांना तुला पाहिलें आहे कीं नाहीं मीं !

कंकण : आणि किंकिणीशीं तर हजारदां बोलतांना मीं पकडलें आहे याला; या दुहेरी पकडींतून कसा सुटणार तूं ?

नूपुर : हात्तिच्या ! हेंच ना ? मला बायकांत बोलत बसण्याची मुळीं लहानपणापासून संवय आहे ! पोरीबाळींत वाढलों मी. नाहीं मला कधीं कधीं करमत, तेव्हां बसतों बोलत कुणाशीं तरी !

सुदाम : असें काय ? घेतोस का शपथ, कीं दामिनी मला मातेसमान आहे म्हणून ?

नूपुर : आतां दामिनी मला मातेसमान आहे !

कंकण : आणि किंकिणी ?

नूपुर : किंकिणी अजून कुमारिका आहे ! तिला मातेच्या पदवीला बसविणें म्हणजे तिची कुचेष्टा केल्यासारखी होईल.

कंकण : अरे चोरा, या चेष्टा चालायच्या नाहींत आतां ! हं, चला आतां; कोण पहिल्यानें उडी टाकणार ?

नूपुर : क्रमाक्रमानें स्वारी काढावी ! प्रथम दामिनीचा मेणा, मग सुदामाची शिबंदी, नंतर किंकिणीची पालखी, मरीला हा गलेलठ्ठ हत्ती, आणि साहेबी नौबतीला मी !

दामिनी : मी नाहीं यांच्या आधीं जायची ! माझ्या माहेरीं सती जाण्याची चाल आहे ! आधीं हे, मागून मी ! मी कां उगीच थोड्यासाठीं सतीचें वाण हातचें घालवूं ?

कंकण : ठीक आहे ! हें कांहीं वावगें नाहीं.

किंकिणी : मलाहि सतीच जायचें आहे !

कंकण : छट्, आपण शिपाई माणसें ! आपलें घराणें रजपूत घाटाचें ! रजपूत जिवावर उदार झाला कीं त्याच्या बायकोनें त्याच्या डोळ्यांदेखत जोहार करावा लागतो ! मी झालोंच आहें जीव द्यायला तयार, तेव्हां माझ्यादेखत तूं जोहार कर ! राहतां राहिला नूपुर ! तुझा काय बेत आहे ?

नूपुर : खरें म्हणाल तर मला सध्यां मरतांच येत नाहीं ! कारण मीं केलें आहे सोळा सोमवारांचें व्रत ! त्याचें उद्यापन केल्याखेरीज मध्येंच कसें मरतां येईल ? शंकराचें दैवत मोठें कडक ! आधीं व्रत करूं नये, नी केलें तर मध्यें सोडूं नये !

दामिनी : नूपुरांनीं हीं आम्हां बायकांसारखीं व्रतें-उद्यापनें कुठून आणलीं ?

नूपुर : मीं आधींच सांगितलें आहे, माझें बायकांत बसणें-उठणें बरेंच असतें म्हणून !

कंकण : हें पहा, या अडचणी बस करा आतां ! तुझ्या समातींत या व्रताची समाप्ति आलीच !

नूपुर : तसें असलें तरी तूर्त या दक्षिणायनांत मरायला माझी कांहीं तयारी नाहीं ! संक्रान्त उलटेपर्यंत सारीं भीष्माचार्यांप्रमाणें शरपंजरीं पडून राहूं या !

दामिनी : ही संक्रान्त उलटते ती थोडी झाली का ?

नूपुर : तुम्हांला थट्टा वाटतें दामिनीबाई !

कंकण : कुठल्या जुन्यापुराण्या कहाण्या सांगत बसला आहेस ! रामकाळच्या गोष्टी ! कुणास ठाऊक खऱ्या होत्या कीं खोट्या ?

सुदाम : तसें म्हटलें तर ही आपली दिव्य करण्याची गोष्ट तर अगदींच रामकाळची ! कुणास ठाऊक खरी कीं खोटी ?

दामिनी : (स्वगत) आमच्या स्वारीचा सेतु खचल्यासारखा दिसतो ! (उघड) आतां कां कुणास ठाऊक ? सगळ्यांना ठाऊक आहे कीं ही गोष्ट खरी आहे म्हणून !

सुदाम : तेव्हां खरी असली तरी चालू अवतारांत तिचा खरेपणा कशावरून धरायचा ?अवतार बदलल्यावर मग भलत्या गोष्टींबद्दल हांकाटी करीत बसायचें कारण नाहीं ! अहो, प्रत्यक्ष रामाचीच गोष्ट घ्या ना ! त्या अवतारीं रामाचें नांव काढण्याची एखाद्या बाईची प्राज्ञा नव्हती, तेंच रामनाम आज पोरीबाळींच्या हातीं सांपडलें आहे ना ?

कंकण : आतां पुराणें बंद ! व्हा तयार सारींजणें ! सर्व एकदमच जाऊं या ! उगीच मागेंपुढें नको ! रहा एका दावणींत अशीं ! उडी टाकण्यापूर्वीं म्हणण्यासाठीं मी एखादें कवित आठवून ठेवतों. [ पुढें होतो. ]

दामिनी : कवित कशाला हवें ? आपली रामरक्षा म्हणा झालें !

किंकिणी : रामामुळें तर सर्वांची रक्षा व्हायची पाळी आली आहे ! आतां निराळी रामरक्षा नको आहे !

कंकण : मी करतों त्याची व्यवस्था ! तुम्ही आहां ना सर्वजण तयार ?

सर्वजण : आम्ही आहोंत तयार !

नूपुर : (स्वगत) ही स्वारी जरा मुळमुळ करायला लागली आहेसें दिसतें !

सुदाम : (दामिनीस एकीकडे) माझा तुझ्याबद्दलचा संशय पार नाहींसा झाला

आहे ! तुला आहे का माझ्याबद्दल संशय ? आपसांत तुटण्यासारखें आहे ! पहा, उगीच वादंग नको ! तडजोडींत गोडी असते !

दामिनी : ( सुदामास एकीकडे ) आतां कां ? आतां नाहीं मी तडजोडीला कबूल ! मधाशीं घर—

सुदाम : ( दामिनीस एकीकडे ) अग, जरा हळू बोल ! तो काळ ऐकेल ना !

कंकण : हं, आतां कोणी कुजबुज करायची नाहीं ! सुदाम, काय गडबड आहे तिकडे ?

सुदाम : कांहीं नाहीं; आमची घरगुती बाबत आहे थोडी ! कांहीं मागें निरवानिरव करण्याबद्दल तिला सांगत होतों ! जरा पसारा मोठा आहे !

कंकण : अरे, पण तीहि तुझ्याबरोबरच येणार ना वर ?

सुदाम : मला भानच नाहीं राहिलें त्याचें !

कंकण : आतां कोणी बेभान होऊं नका ! आणि खाजगी खटलीं पण काढूं नका ! अरे नूपुर, हें रे काय करतोस ?

नूपुर : बरी वेळेवर आठवण झाली ! तुम्हांला कवित पाहिजे ना ? माझ्या वडिलांनीं मरते वेळेस मला मरते वेळीं म्हणण्यासाठीं द्रौपदीचा धावा उतरून दिला आहे !

सुदाम : वडिलांनीं द्रौपदीचा धावा दिला ! त्यांचेंहि बायकांत असणें होतें वाटतें ?

नूपुर : वर गेल्यावर त्यांनाच विचारतों बरें का हो ! आपल्या हातानें त्यांनीं धावा उतरून दिला आहे ! अक्षर असें मोत्यासारखें आहे म्हणतां ! बघायचें आहे का तुम्हांला ? डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच धेऊन येतों धरून !

कंकण : हें तरवारीचें पातें दाखवूं का ? या हिऱ्यामाणकांच्या गर्दींत कशाला हवी तुझी वडिलार्जित मोत्यांची माळ ?

नूपुर : बरें, थोडासा म्हणून दाखवितों. ऐका तर खरें ! मला नुसतें तोंडच येतें आहे त्याचें; कडव्याला सुरुवात होण्यापूर्वी नुसतें पालुपदच पांच सहा वेळां घोळून म्हणायचें आहे ! बाकी मला गळ्यावर म्हणतां येणार नाहीं ! सुरा-इतक्या उंच आवाजांत म्हणतों. प्रसंग आहे मोठा बहारीचा ! पांडव लाक्षा-गृहांत असतांना द्रौपदीनें आपलें कंकण सोडलें; तेव्हां भीमाच्या अंगाची आग होऊन त्यानें लाक्षागृहाला आग लावून सर्वांची राखरांगोळी करण्याचें भय घातलें आहे ! तेव्हां खड्या सुरांत द्रौपदीनें टाहो फोडला आहे कीं, धावा

हो धावा, या कंकणामुळें आज सर्वांची आगींत राखरांगोळी होते आहे! धावा हो धावा! [ कंकण धावून येतो. ]

कंकण : आलों हा धावून! अरे चोरा, आतां असा कांगावा करून गर्दी जमवितोस काय? भेकड, मरणाला इतका भितोस?

नूपुर : मरणाला काय भ्यायचें आहे! बोलून चालून ही धर्मशाळेची वस्ती! जन्माला आला तो मेलाच आहे! मरण हा मिथ्याभास आहे! लक्षचौऱ्यायशींचा फेरा मारून —

कंकण : वेळ मारून न्यायची ही कुसराई आहे वाटतें? घाल पाहूं तोंडाला एकदां कुलूप!

सुदाम : त्याची किल्ली आहेच तुझ्याजवळ. दाखीव एकदां तरवार त्याला!

कंकण : ( पुढें होत होत ) आतां अखेरचें बजावून सांगतों कीं कोणी गडबड करूं नका! मला अजून कवित आठवलें नाहीं! ( पुढें झाल्यावर स्वगत ) मामला अगदीं बिघडण्याच्या वेतांत आला आहे. अजून यांच्यापैकीं कोणीच निर्वाणीची धडपड करीत नाहीं; त्यामुळें मला माघार घेतां येत नाहीं! हां—आतां कांहीं तरी आडमाप बोलून यांना भेदरून सोडावें म्हणजे कोणी तरी हाय खाईलच. ( उघड ) हं, आठवलें मला एक कवित! तुम्ही सगळे ओळीनें उभे रहा आणि डोळे घ्या झांकून! मी कवित मनांत म्हणून मोठ्यानें ' कालिकामाता की जय ' म्हटल्याबरोबर एकदम उड्या टाका! डोळे बिलकुल उघडूं नका! आतां तुम्हांला भीति वाटणें साहजिक आहे! कारण आगींत उडी टाकणें हें नवशिक्यांना अगदीं प्राणसंकट आहे! आगीचा सर्वांगाला चटका बसतांना कानाला दडे बसून धडड धडड असा हलकल्लोळाचा धूमधडाका आदळून भेरीदुंदुभिरवांनीं चंडभैरव कडे कडड कडड कोसळून अखिल ब्रह्मांडकोटींत तागडधोम तागडधोम असा तांडव तडाका सुरू होतो. समजलास का सुदाम? भिऊं नका बाकी!

सुदाम : आलें लक्षांत! ( स्वगत ) स्वारी खात्रीनें खचलेली दिसते.

कंकण : पुढें दुसऱ्या चटक्याला आग लावून धाडधाड ठिणग्या तडाडून आकाशपाताळ एकदम कडिकडाड धप्प! नूपुर, भ्यालांत वाटतें?

नूपुर : छट्, मेलें कोचरें आगीला भीत नाहीं! ( स्वगत ) अरे चोरा, थोबाडाच्या आखाड्यांत हे आडदांड शब्द अशा पंजाबी पवित्र्यांत उभे करून आम्हांला चीत करणार वाटतें! मग कथ्थकाच्या नाचाचा एखादा तोडा कां म्हणून दाखवीत नाहींस? धा तिरकिट धा—

कंकण : नंतर लागलीच चंडदंड उदंड कमंडलु खंडखंड खांडोळी भिंमड बंडाळी मंडुक पंडित शिखंडी तांडव शुंडादंड कंडु वितंडवाद —
नूपुर : कवित केलें वाटतें सुरू ?
कंकण : छेः ! हें नुसतें आगीचें वर्णन आहे ! इतक्यांत भ्यालां वाटतें ?
नूपुर : मुळींच नाहीं ! आम्ही ठाण मांडून उभे आहोंत !
सुदाम : बाकी तूंसुद्धां आमच्यासाठीं हे कष्ट घेऊं नकोस ! आमच्या भीतीची कल्पना दे सोडून आणि चल लाग म्हणायला तुझें कवित !
कंकण : हं, म्हणतों ! मला तुमच्याबद्दल फार वाईट वाटतें !
नूपुर : हं, विवेकानें मन आवरलें पाहिजे !
कंकण : बस्स ! बोलणें बंद, हालचाल बंद, डोळे बंद. आतां डोळे मिटून घेतले कीं मग कायमची मिटण्याची वेळ आली तरी उघडायचे नाहींत. कोणीं जरा उघडझांप केली तरी मी तिकडे डोळेझांक करायचा नाहीं ! कोणीं मागें पाय घेतला ऐन वेळीं तर मुंडी छाटून टाकीन ! मिटा डोळे ! कवित म्हणायला सुरुवात करितों ! ( सर्व डोळे मिटून स्तब्ध उभीं राहतात. ) हं, कालिकामाता की जय ! (सर्व पाय आपटतात.)
सुदाम : आई ! आग ! आई ग !
कंकण : सुदाम, ओरडतोस कां असा ?
सुदाम : अरे बाप रे, पायाला पहिला चटका बसून पेटायला लागलों आहें म्हणून ओरडलों ! तूं नाहीं कुठें ओरडलास ?
कंकण : मी शिपाईगडी आहें ! हूं का चूं केल्यावांचून मरणाला मी तयार असायचा ! पण तो भेकड नूपुर कसा ओरडत नाहीं ?
नूपुर : मी कसा ओरडणार ? तोंडघशीं पडून मी तोंडाकडून पेटत चाललों आहें; एव्हांना जीभ जळून खाक झाली आहे ! मला कसें बोलतां व ओरडतां येणार ?
कंकण : अरे चोरा, मग हें कसें बोलतो आहेस रे ?
नूपुर : हें आंतल्या आवाजांत पडजिभेनें बोलत आहें !

[ सर्व हळूहळू डोळे उघडतात. ]

कंकण : फारच लांबल्यासारखी दिसते तुझी पडजीभ. डोळे उघडून बघून घेऊं या ! अरे हरामखोरा, तूं कां डोळे उघडलेस ?
नूपुर : आगींतून तुम्हांला माझी पडजीभ दिसते की नाही हें पाहण्यासाठी !
कंकण : अस्सें काय ! सुदामा, डोळे कां उघडे ?
सुदाम : माझे डोळे मघांशींच उघडले आहेत. पण तू आपले डोळे फाडून

पाहूं लागलास तेव्हां मीं मुद्दाम डोळेझांक केली !

कंकण : ( स्वगत ) सारेच भ्याले आहेत; आतां जरा नेट धरला पाहिजे. ( उघड ) मला वाटलेंच होतें, तुम्ही असा अवसानघात कराल म्हणून ! पण माझ्याजवळ अशी लटपट चालायची नाहीं ! मिटतां कीं नाहीं डोळे पुन्हा, कीं काढूं तरवार ? आतां फिरून डोळे उघडण्यापूर्वी आधीं माझ्या तरवारीकडे पहा आणि मग डोळे उघडा ! हं, मिटा डोळे !

[ पुन्हा पहिल्यासारखे उभे राहतात; ईश्वर येतो. ]

ईश्वर : ए मूर्खांनो, उघडा पाहूं डोळे ! चांगले असून असे कां आंधळ्यासारखे आडरानांत शिरतां ? [ सर्व डोळे उघडतात. ]

नूपुर : ( ईश्वराचे पाय धरून ) मला पुरेपूर पश्चात्ताप झाला आहे !

ईश्वर : चला, दूर न्या हें आपलें सोंग ! सुदाम, काय म्हणावें तुम्हांला ? आज पडत्या प्रहरीं आपलें या बाबतींत खातरजमेचें बोलणें झाल्यावरसुद्धां असा प्रकार करितांना तुम्हांला लाज वाटायला हवी होती ! कंकण, इथेंच तुमच्या मर्दुमकीच्या मिरवणुकीला मोकळें मैदान मिळावें ही मोठ्या नामुष्कीची गोष्ट आहे !

कंकण : अहो, या सुदामानें, आणलें हें कड्याळ ! आमचा दिल पहिल्यापासून पाक आहे !

ईश्वर : काय एकेक जमले पहा ! एकाला आपल्या स्त्रीचा अष्टौप्रहर संशय, तर दुसऱ्याला सारी स्त्रीजात आपल्यावर फिदा असल्याची खात्री ! आणि तिसरा साऱ्या स्त्री-पुरुषांना पाजी ठरवणार ! तुमच्यासारख्या कच्च्या कानाच्या, मळक्या मनाच्या, आणि हिडीस हृदयाच्या लोकांना उपदेश तरी कसला करायचा ! बायकांबद्दल बाष्कळपणानें बडबडणाऱ्या बेशरम बेवकुबांना बाजाराच्या चव्हाट्यांवर चाबकाने चोपून काढलें तरच तुमची ठीक सरबराई केल्यासारखी होईल. संसाराच्या सिंहासनावर ज्या मंगलमय देवतेला बसवायची तिच्याबद्दल अमंगल अंतरंगाच्या किडक्या कल्पना बाळगून तिला एखाद्या नाठाळ जनावरासारखें वागवायचें हा केवढा अधर्म आहे ! सुदाम, तुमची खातरजमा करून देण्याचें कबूल केल्यावर हा पोरखेळ करण्याचें कारण नव्हतें !

सुदाम : अहो, हे नूपुरासारखे लोक त्याच्यावर क्षणभरसुद्धां विश्वास ठेवणार नाहींत !

ईश्वर : असल्या लोकांकडे मुळींच लक्ष देऊं नये. असल्या लोकांचीं वाटेल तीं

बोलणीं ऐकायला आपली तयारी असावी हें उत्तम.

नूपुर : सुदाम, यांच्या बोलण्यांतल्या बऱ्याच गोष्टी घेण्यासारख्या आहेत म्हणे!

कंकण : किंकिणी, पाहिलेंस का एकेकाचें बोलणें किती भारदस्त असतें तें!

ईश्वर : मित्रहो, जरा कडक बोललों याची माफी करा!

कंकण : भलतेंच! रास्त बोलायला कोणाची चोरी आहे काय? जर कोणी तुम्हांला दोष देऊं लागला तर मला सांगा, बोल बोल म्हणतां त्याची जीभ उतरून ठेवतों!

ईश्वर : ठीक आहे. सुदाम, चला. तुमच्याशीं मला पुष्कळ गोष्टी बोलायच्या आहेत!

सुदाम : मित्रहो, आपण आतां पुन्हा केव्हां तरी भेटूं! चला.

[ ईश्वराशिवाय सर्व जातात. ]

ईश्वर : ( स्वगत ) या सुदामाला दामिनीच्याबद्दल खरी हकीकत सांगून आपलासा करून घेतला तर फारच चांगलें होईल; भूपालांच्या शृंगारमंदिरावर आणि तळघरावर याचा आणि कंकणाचा आळीपाळीनें पहारा असतो! कंकण किंकिणीमुळें माझ्या म्हणण्याप्रमाणें वागतोच, आणि हाहि साध्य झाला म्हणजे वाटेल त्या ठिकाणीं वाटेल तिथें प्रवेश सुगम होईल!

## प्रवेश चवथा

[ ईश्वर प्रवेश करितो ]

ईश्वर : ( स्वगत ) दामिनी रात्रभर बाहेर राहिली आणि तिला दागिन्यांचा साज मिळाला, यामुळें संशयी सुदाम इतका खवळून जाऊन त्यानें असें अनन्वित अकांडतांडव करावें हें त्याच्या स्वभावाला साजेसेंच झालें! सर्व गोष्टींचा नीटपणें खुलासा करण्याचें अभिवचन देऊन त्याची समजूत घालतांना मला पुरेसें झालें! किंकिणीमुळें कंकण आणि या गोष्टीमुळें सुदाम आतां पूर्णपणें माझ्या कह्यांत आलेले आहेत; भूपालाच्या वाड्यावर त्या दोघांचाच आळीपाळीनें पाहरा असल्यामुळें आतां प्रसंग पडलाच तर वाड्यांत केव्हांही प्रवेश करणें अगदीं सुगम झालें आहे! आतां भूपालाला वृंदावनानें वसुंधरेच्या तळघराकडे कां नेलें त्याचा तपास करावा! [ जातो. ]

[ स्थळ : तळघर; वसुंधरा दीनाराच्या रिकाम्या पाळण्याला झोंके देत आहे. ]

**वसुंधरा :**

[ नीज सुखें विश्रांतिसि० ]

नीज गुणी बाळ क्षणीं शांत यावरी।
गाउं किती कुंठितं मति नीज झंडकरी ॥ १ ॥
हृदयाचा केला हा पाळणा नवा।
बांधाया ममतेचा पाश मग हवा।
हृत्तरंग हलवि तया करुनि मृदुरवा।
ब्रह्मसगुण बाळरूप रमत अंतरीं ॥ १ ॥

( स्वगत ) दामिनीला तें गाणें म्हणूं नकोस म्हणून मीं सांगितलें; पण माझ्या मनांत तें सारखें नाचत आहे! त्यांतली शब्दांची 'शोभा नको; अर्थाकडे लक्ष लागत नाहीं; नुसतें गाणें म्हणत राहावेंसें मात्र वाटतें! एकेकदा वाटतें, कीं हृदयांतून उचंबळून निघणाऱ्या त्या गाण्याच्या सुरांबरोबर अश्रूंचा पूर ओतून हा रिता पाळणा वत्सलरसानें तुडुंब भरून काढावा! देवा, मी काय करूं?

[ पियाके मिलनकी० ]

जिवास बसुनि हा घाय। दयाघना। घडिघडि छळित कसा
अजुनी रुजत ना। हृदय करिल हें काय ॥ ध्रु० ॥ निकटिं
न तान्हा। फुटला स्तनिं पान्हा। आतां होई निरुपाय।
नावरे मना ॥ १ ॥

पण अशानें स्वीकारिलेल्या कठोर व्रताचा भंग होईल! त्या गाण्यांत एवढी काय जादू आहे कुणाला ठाऊक! अभिमन्युकुमार रणांगणीं पडले. "कृष्ण अर्जुन आले शिबिरांत!" त्यांना पाहतांच सगळ्यांना ब्रह्मांड कोसळल्यासारखें वाटलें! "राजे बसले अधोमुख." एवढे मोठे बळिवंत भीमसेन! अर्जुनानें विचारल्याबरोबर बिचाऱ्याला मोठ्यानें बोलवेना. "पुसे भीमाला बाळ कुठें गेला?"

[ भूपाल मागें येऊन उभा राहतो. ]

**भूपाल :** वसुंधरे, आपला बाळ कुठें गेला?

**वसुंधरा :** "हळूच सांगे बाळ रणीं पडला." असा प्रसंग वैऱ्यावर सुद्धां येऊं नये!

भूपाल : ( मोठ्यानें ) वसुंधरे, आपला दीनार कुठें आहे ?

वसुंधरा : ( उठून; पाहून स्वगत ) कोण ? माझे अर्जुन ! या एवढ्याच प्रसंगाला मी भीत होतें ! देवा, या वेळीं मला यमाची निष्ठुरता दे ! अश्रूंनो, आतां माझा घात करूं नका !

भूपाल : आर्ये, आपला दीनार कुठें आहे ?

वसुंधरा : नाथ, कोणाचा दीनार ? दीनार आपला नव्हता ! दीनार माझा नव्हता; दीनार तुमचा नव्हता; दीनार देवाचा होता !

भूपाल : आपल्या पहिल्या प्रीतीचा साक्षीदार—

वसुंधरा : आपल्या प्रेमाची, माझ्या उज्ज्वल शीलाची साक्ष देण्यासाठीं—तुमच्या नांवाची द्वाही फिरविण्यासाठीं देवाच्या दरबारीं निघून गेला ! आईच्या अब्रूसाठीं आपला चिमणा शिपाई लढतां लढतां गारद झाला ! संसाराच्या सारीपटांतला प्रेमाचा पहिला डाव देवगजाननाला दिला ! देवाचें देणें देवाघरीं पावतें झालें ! देवाचा आत्मस्वरूप दीनार देवाशीं एकजीव झाला ! जड जगाचा देहमात्र दीनार मेला ! आपला प्रेमस्वरूप दीनार या पाळण्यांत खेळत आहे !

भूपाल : वसुंधरे, या रिकाम्या पाळण्यांत मला दीनार कसा दिसणार ?

वसुंधरा : मग या रिकाम्या जगांत आपल्याला परमेश्वर तरी कसा दिसणार ? नाथ, असे मायावश होऊं नका ! इहलोकीं क्षणमात्र संलग्न होणें एवढाच खरा संबंध असतो !

[ सावरियाने जियरा० ]

क्षणैकमात्र जरि हे संलग्न जीव झाले । तुटे परी प्रसंगीं
संबंध अचिरकालें ॥ ध्रु० ॥ वसतिस्थळ एक तरी असति
दशा विविध तयां । भिन्नकार्यं जीवजात भिन्नगतिहि
जगतीं या । खिन्नता न उचित विरहिं, दुर्जय जरि माया ।
फसवीत मोहजालें ॥ १ ॥

पतिव्रतेची जबाबदारी जाहीर करण्यासाठीं देवानें दीनाराला जन्माला घातलें; त्याची वेळ आल्याबरोबर आपलें कार्य आटोपून, देवाचा निरोप कळवून त्याला जावें लागलें ! जगाच्या जामदारखान्यांत एक रत्न कायमचें जमा झालें ! दीनाराच्या इथल्या वसतीपुरतें तें जोखमीचें जवाहीर देवानें आपल्या विश्वासावर टाकिलें हेंच आपलें महाभाग्य ! देवांच्या कार्यासाठीं स्वर्गांतून पाताळाकडे अमृतकुंभ नेतांना गरुडानें यमुनातटींच्या कदंबावर क्षणमात्र विसांवा घेतला आणि त्या अमृतकुंभाच्या स्पर्शमात्रानें कदंबवृक्ष अमर झाला;

त्याप्रमाणें दीनाराच्या नामस्पर्शानें आपण अजरामर होऊं! लोकांत मुलाला आशेनें 'चिरंजीव' म्हणतात, पण आपल्या मुलानें आपल्याला खरोखरींच चिरंजीव केलें! एवढ्यानेंच आपण धन्य झालों! स्मरणमात्रापुरताच दीनार खराखुरा आपला! हें भाग्य सुंदर नाहीं का?

भूपाल : आर्ये, पुत्रशोकाच्या भ्रमानें का तूं हें बोलत आहेस? साक्षात् काल-कन्या रात्र सुद्धां दिवसाच्या उदयकालीं आपली तेजस्वी बाळें पटापट मरतांना पाहून दळदळा दंवाचीं आंसवें ढाळते! आणि तुझ्या डोळ्यांतून अश्रूंचा एक बिंदु सुद्धां का पडत नाहीं!

वसुंधरा : एवढ्यामुळेंच रात्रीला 'निशा' असें म्हणतात. नाथ, मी कां रडूं? दीनाराचें एखाद्या रोगराईनें बरेंवाईट झालें असतें तर मात्र आपल्या मातेच्या यौवनाचा नाश करून पित्याच्या दृष्टिसुखाआड येणाऱ्या त्या क्षुद्र कीटकाचा माझ्या पोटीं जन्म झाला म्हणून धाईधाई रडत बसलें असतें. पण आतां मी कां रडूं? दीनार क्षात्रमरणानें वीरांच्या सद्गतीला गेला, ऐंशी वर्षें कुजत पडून राहणारालाही दुर्मिळ यश आठ महिन्यांच्या चिमण्या आयुष्यांत मिळवून माझा बाळ हसत चालता झाला, आणि मी रडत बसूं? नाथ, मला रड-ण्याचा अधिकार नाहीं! मी कोणत्या नात्यानें रडूं? एकदां एका अनाथ पति-व्रतेच्या लज्जारक्षणासाठीं बाबांनीं पन्नास आडदांड बेशरमांच्या हत्यारबंद टोळींत एकट्यांनीं उडी टाकून कपाळावर जखम करून घेतली! पुढें वीरसभेंत बसतांना त्या जखमेचा वण झांकून जाऊं नये म्हणून मंदिलाचा मोत्यांचा शिरपेंच बाबा नेहमीं काढून टाकीत; नाथ, त्या वीरपुरुषाची मी वीरकन्या! एकदा आपण शक्तिसेनाबरोबर त्यांच्या दिवाणखान्यांत बोलत असतांना एक फाटक्या कप-ड्यांची भिकारीण तिथें आली. आपल्याला पाहून छातीवरचा फाटका पदर नीट सांवरण्यासाठीं तिनें ओढला तोंच दुसऱ्या फाटक्या भागामुळे तिची गरीब लाज बाहेर पडली आणि हें पाहून शक्तिसेन हसले! स्त्रीजातीच्या एवढ्याशा उपमर्दामुळें खवळून आपण शक्तिसेनासारख्या बलाढ्य सरदाराचा तिथल्या तिथें शिरच्छेद केला! नाथ, आपणांसारख्या स्त्रीजातीच्या अभिमानी वीर-सिंहाची मी वीरपत्नी! आठ महिन्यांच्या अल्पावधींतच माझा दीनार आईची लाज राखण्यासाठीं क्षात्रमरणानें देहाचें सार्थक करून, अलोट पुण्याई संपादून देवलोकीं गेला! नाथ, दीनारासारख्या वीरबालाची मी वीरमाता! वीरकन्या, वीरपत्नी, वीरमाता,—सांगा, नाथ, सांगा—मी कोणत्या नात्यानें रडूं? माझें जिन्हाळ्याचें जग पुत्राच्या मंगल महोत्सवानें मला

हंसायला सांगत नाहीं का? शिवाय मीं जर आंसवें गाळलीं तर त्या उदकामुळें जें देवाचं देणें होतें त्याला दानाचें रूप येईल! दीनाराला मारणारा देव आपला लागणेकरी होता, आपल्या दारचा भिक्षेकरी नव्हता! मग दीनारासाठीं रडण्याचं काय कारण आहे बरें? नाथ, एका दीनाराची काय कथा, पण केसागणिक दीनारांचासुद्धां आपल्या नांवासाठीं बळी देतांना मी रडलें नसतें!

भूपाल : देवि, आज तुझ्या जिभेवर ही कोणाची रसवंती नाचत आहे? तुझ्या मातृप्रेमपूर्ण कोमल हृदयांत हा राक्षसी क्रूरपणा कुठून आला!

वसुंधरा : हा क्रूरपणा दीनाराच्या आईचा नाहीं, पण भूपालांच्या पतिव्रतेचा आहे! हा कर्तव्याचा पवित्र क्रूरपणा आहे! संसारधर्माच्या कर्तव्यासाठीं– अवश्य कर्मासाठीं प्रियतम सुखाचा हा संन्यास आहे! हा सर्वस्वाचा त्याग आहे! हा जर राक्षसी तर तुमच्या वीरधर्माच्या शौर्यालासुद्धां 'राक्षसी कसाबकरणी' म्हणावें लागेल! ज्या कर्तव्याच्या नांवावर रणांगणांत वीरांचे बळी घेतां येतात त्याच कर्तव्यासाठीं आपल्या जिवलग जिवावरहि उदार व्हायला नको का?

भूपाल : अहाहा! आर्ये, देवि,

[ पूर्वी अधरोष्ठावरि० ]

पुण्यमय तव मूर्ति पहातां खनि जी केवल तेजाची।
इंद्रहि झांकिल नेत्रिसहस्रा काय कथा मग इतरांची।
देवी त्रिपुरेश्वरी प्रतिष्ठा करि का देहीं या रुचीं।
दर्शनमात्रें जाळुनि टाकी विश्वें सारीं पापाचीं॥ ॥

धन्य माझें भाग्य, कीं या पवित्र देहाच्या आलिंगनानें मला माझ्या जन्मजन्मान्तरींचीं पातकें जाळून टाकितां येत आहेत! दशार्णकलावतींच्या आलिंगनाचा चमत्कार आज मृत्युलोकाच्या पुन्हा दृष्टीस पडेल!

[ तिला आलिंगन घालयास जातो. ]

वसुंधरा : नाथ, क्षमा करा, मी व्रतस्थ आहें! दीनाराच्या देहानें या अघोर व्रताचें उद्यापन झालें कीं नाहीं तें अजून मला पहायचं आहे! देवाची अजून माझ्यावर पूर्ण कृपा झाली नाहीं!

भूपाल : ईश्वरी इच्छेच्या महामंत्राचा पुरुष नुसता जप करितात, पण त्याचा विधि करणें मात्र आमच्या या गृहदेवतांनाच शक्य आहे! वसुंधरे, असा कोणता परमेश्वर आहे, कीं जो तुझ्याकडे अजून कृपादृष्टीनें पाहात नाहीं!

[ वृंदावन पुढें येतो. ]

वृन्दावन : भूपाल, माझ्या प्रश्नाचें उत्तर मिळायला वेळ होत आहे ! तुझे प्राण कीं वसुंधरेचें पातिव्रत्य ? कशाचा बळी देणार ? सांग !

भूपाल : वृंदावन, हे पहा माझे प्राण तुझ्या स्वाधीन आहेत !

वृंदावन : ( स्वगत ) शाबास मंडलेश्वर ! माझा हात धरून, मला धीर देऊन रणांगणांत नेणारा माझा सेनापती—चुकून तुला मुजरा केला असता तर—वसुंधरेच्या बापाचा निर्णय बरोबर होता. हीच मान वसुंधरेच्या हाराला योग्य आहे. (उघड) कोण, मघांचा विचारी भूपालच बोलतो आहे का हें ?

भूपाल : मघांचा पंचप्राणांचा लोभी धनी नाहीं, तर या पतिव्रतेच्या महापूजेचा अधिकारी परमेश्वर ! या क्षुद्र जीवाचा लोभ धरला तर मी या महापूजेला अपात्र ठरेन ! या देवीनें आपल्या हृदयाच्या सिंहासनावर पंचप्राणांच्या प्रभावळींत बसविल्यामुळें मला आज परमेश्वराची योग्यता आली आहे.

वृंदावन : मघांच्या तुझ्या बोलण्याचा तुला विसर पडला वाटतें ? प्राणांचें महत्त्व इतकें क्षुल्लक आहे का ? प्रत्यक्ष प्राणनाशाला तयार होत आहेस ?

भूपाल : त्या विचाराची आतां आठवणसुद्धां नको !

[ घोर घोर गरजत० ]

प्राणनाश नच परि जन्म नवा ।
या मरणें मिळवी मिरवी तेविं जन दिव्य पुण्यप्रभांवा ॥ ध्रु० ॥
हतलाभाहुनि त्याग सुखाचा शतपट बरवा ॥ १ ॥

या योगिनीचा पुण्यप्रभाव काय करणार नाहीं ? वृंदावन, पतिव्रताच्या प्रभावामुळें पुरुषार्थाचा परमेश्वर जागृत होतो ! आतांच या देवतेनें काय सांगितलें ? गृहस्थधर्माच्यां अवश्य कार्यासाठीं मला प्राणांचाहि त्याग करायला नको का ? शुष्क बुद्धिवादानें जग चालणार नाहीं ! भावनांच्या रसरंगांत बुद्धीचें तेज मिसळलें तरच हृदयाचें समाधान होतें ! तेजाला रसाची जोड देण्यासाठीं मानवी करामतीनें कारंजाच्या जलधारांतून दीपकिरणें खेळविलीं आहेत ! बुद्धितेजाचा हृदयरसाशीं प्रीतिसंगम पाहण्याची हौस पुरविण्यासाठीं मानवी कल्पनेनें तेजोमय चंद्रकान्ताला शीतळ पाझर फोडिलेले आहेत ! वृंदावन, आतां उशीर करूं नकोस ! ही पहा माझी मान ! उपस आपली तरवार; मात्र अशा सफाईनें हात फिरवशील कीं, माझें तुटलेलें मस्तक नेमकें वसुंधरेच्या पायाशीं जाऊन पडेल ! देवि, तूं आपली पुण्यदृष्टि माझ्याकडे लाव; म्हणजे मरतांना शेवटीं डोळ्यांत एकवटलेल्या जीवाच्या तेजस्वी तारा

तुटतां तुटतां तुझ्या दृष्टीच्या किरणांशीं एकरूप होतील !

वृंदावन : वसुंधरे, तुझ्या अविचारी-नवऱ्याचा हा निश्चय तुला कबूल आहे का ? तुझीसुद्धां या प्रकाराला संमति असेल तर मात्र परमेश्वराचें नांव घेण्याची नाटकी संधि दिल्यावांचून मी याचें मस्तक उडवून टाकीन !

वसुंधरा : ( स्वगत ) देवा, आतां मी काय करूं ? पतीचे प्राण किंवा पतिभक्ति ? बांधलेली पूजा मोडूं कीं देवाची मूर्ति फोडूं ? काय करूं ? देवा, सर्वसाक्षी देवा, आतां मात्र माझा धीर खचला !

भूपाल : नको, नको, पतिव्रते, या नश्वर रक्तामांसाच्या लोभानें आतां भलता विचार मनांतही आणूं नकोस ! माझी एक विनंती मात्र मान्य कर ! आर्ये, देवि,—नाहीं, अपरिचित शब्दानें तुला संबोधल्याबद्दल मला पुरुषजातीनें दोष दिला तरी चालेल; दश पुत्रांना जन्म देणाऱ्या पत्नीला पतीनें मातृपदानें संबोधून तिचा सत्कार करावा अशी धर्माज्ञा आहे; पण एकाच पुत्राला योग्य मरण दिल्यामुळें मी तुला त्या पदीं बसवीत आहें; अनसूयेनें पातिव्रत्याच्या पुण्याईनें ब्रह्माविष्णुमहेश्वरांना बाळरूपानें मांडीवर खेळविलें. हा पहा पुरुषार्थाचा भलता अभिमान सोडून दिला. आर्ये,.माते, माते, माझ्या मस्तकावर हात ठेवून मला आनंदानें निरोप दे ! ( तिला वंदन करितो—वृंदावन तोंड फिरवितो. )

वसुंधरा : (स्वगत) काय पाहिलें मीं हें ! डोळ्यांत तरंगणारा अश्रुबिंदु लपविण्यासाठीं वृंदावनांनीं तोंड फिरविलें ! खास, वृंदावनांचें अंतःकरण अजून पुरतें मेलेलें नाहीं ! त्यांची ही राक्षसवृत्ति वरवरची आहे ! ते माझ्याकडे किंवा माझ्या पतींच्या तोंडाकडे पाहात नाहींत. क्रूर निश्चयाचे शब्द उच्चारतांना ते घुटक्या गिळतात, त्यांच्या पापण्या जलदीनें उघडझांप करितात; मघाशीं नाथांच्या आवेशाकडे ते दचकून सादर दृष्टीनें पाहत होते; आणि आतां नाथांनीं मला वंदन करितांच त्यांच्या डोळ्यांत पाणी आलें ! वृंदावन, या एकाच अश्रूंत तुमच्या अन्यायांच्या कोटि उजळून निघतील !

वृंदावन : वसुंधरे, तुला काय बोलायचें तें लौकर बोल !

वसुंधरा : वृंदावन, माझ्या पतींचे प्राण घेऊं नका ! तुम्ही सांगाल त्या वेळीं तुमची भेट घेण्याला मी तयार आहें !

भूपाल : आर्ये, काय बोलतेस हें !

[ आइलो कालि घया० ]

हृदया कंपितसे तापद वच व्यापि तसें विष जिवासि ॥ ध्रु० ॥

देवि, उदार मनें दे आज्ञा या जनासि ॥ १ ॥

वसुंधरा : नाथ, तुम्हांला माझी शपथ आहे, तुम्ही अगदीं निर्धास्त असा!

[कान्हा मुरली वाजे०]

नाथ भय न राही । तिळहि कांहीं ।।
दुरित हरिल तो हरि त्वरलाहीं ।। ध्रु० ।।
साक्ष तदीय पटुनि शर्णि अंतरिं ।
जरि संकट घन धीर ये तरिहि ।। १ ।।

अंतरींच्या आणभाकेला गुंतलेला भगवान् मला अंतर देणार नाहीं! त्याची मनोमन साक्ष मला पटली! ज्या जगदीश्वरानें हें संकट आणिलें त्यानेंच तें दूर केलें पाहिजे; नाहींतर आपल्यावर विश्वासून बसलेल्या पतिव्रतेची विटंबना पाहण्याचें पा 'देवाच्या दुर्दैवीं येईल! वृंदावन, तुमचा संकेत मला मान्य आहे!

वृंदावन : वसुंधरे, आज रात्रीं तुमच्या शृंगारमंदिरांत तुला माझ्या गळ्यांत हार घालावा लागेल! भूपाल, तोंपर्यंत तुला माझ्या ताब्यांत रहावें लागेल!

वसुंधरा : नाथ, या दासीला एकदां आपला आशीर्वाद तेवढा द्या म्हणजे मी कळिकाळालाही भिणार नाहीं. (त्याच्या पायांवर मस्तक ठेविते.)

भूपाल : आपल्या कुलपूर्वजांची पुण्याई तुझें रक्षण करो!

वसुंधरा : वृंदावन, तुमच्या रूपानें ईश्वर साक्षी आहे, कीं माझ्या पतींनीं मला आशीर्वाद दिलेला आहे!

[पडदा पडतो.]

### अंक पांचवा समाप्त

# अंक सहावा

## प्रवेश पहिला

[ नूपुर प्रवेश करितो. ]

नूपुर : ( स्वगत ) जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाहीं म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं ! या बाईच्या बाबतीचा मोह कांहीं सुटत नाहीं ! एवढ्या रात्रीं ही बाई एकटी या स्मशानांत कां जात आहे ? कांहींतरी कुलंगडें आहे खास ! बाईबरोबर बारदानही बरेंच दिसलें ! मग का जडजोखीम आहे, कीं उताराधुतारा आहे, कीं मेलेलें मूलबीलच आहे ? मोठी चुटपुट लागली आहे मनाला ! काळोख पण कसा मी म्हणतो आहे; म्हणून एकट्याला जायची छाती होत नाहीं ! त्यांतून आज अमावास्या म्हणजे भुताखेतांची पुरी चांदरात ! आज सारी भुतावळ उजळमाथ्यानें मिरवायला निघायची ! [ राजा येतो. ] अरे बापरे, हें कोण ? का नांव घेतल्याबरोबर भूत दत्त म्हणून पुढें उभें ? बाकी मी दत्त म्हणून उभा राहिलों तर तें नाहींसेंही होईल ! तूर्त दबा धरून बसावें हेंच उत्तम !

राजा : ( स्वगत ) भूपालासारख्या अगदीं निकटच्या आतानेंच दगलबाजी केल्या दिवसापासून मनाची जी चलबिचल उडाली आहे, तिच्यामुळें अशा रीतीनें वेषांतर करून लोकांत रात्रीं अपरात्रीं वावरण्याचा हा नवीनच छंद्रोग मला जडू पहात आहे.

नूपुर : ( स्वगत ) हां, आतां आठवली युक्ति ! ( उघड ) अहो, रामराम !

राजा : ( चपापून स्वगत ) हा एवढ्या रात्रीं असा अनोळखी रामराम कुणाचा ?

नूपुर : ( स्वगत ) बापरे, हा तर खांबासारखा निश्चल उभा आहे ! आतां मलाच राम म्हणावा लागतो कीं काय ? ( उघड ) अहो, रामराम म्हटलें ना ?

राजा : ( स्वगत ) हा खरा जुल्माचा रामराम. ( उघड ) रामराम !

नूपुर : ( स्वगत ) भूत खास नाहीं. ( उघड ) कोण आहे तें ?

राजा : तुम्ही कोण आहां तेंच सांगा ना ?

नूपुर : मी गस्तवाला आहें ! हा प्रश्न माझ्या अधिकारांतला आहे ! कोण आहां तुम्ही ?

राजा : रयत !

नूपुर : रयत ! कोणाची रयत ? कुठली रयत ?

राजा : राजाची रयत ! परगांवचा आहें मी.

नूपुर : राजाची रयत ! अस्सें काय ! राजाची रयत कशाला अशा रात्रीं निघाली आहे मसणांत जायला ! अरे चोरा, संकेत बोल पाहूं ?

राजा : रस्त्यावर कसला आला आहे संकेत ? हा राजवाडा आहे का ? मी खात्रीनें सांगतों तूं गस्तवाला नाहींस ! गस्तवाला असतास तर आधीं असा दडून बसला नसतास, मग मला रामराम केला नसतास आणि अखेरीस असें वेड्यासारखें विचारलेंही नसतेंस !

नूपुर : भल्या मनुष्य, बरोबर ओळखलेंस तूं ! मी खरेंच गस्तवाला नाहीं ! मी या नगरचा राजा असून सध्यां वेषांतर करून नगरसंचारार्थ फिरत आहें. मला नेहमीं राजवाड्याची संवय म्हणून संकेत विचारला.

राजा : राजवाड्यांत तरी राजा संकेत विचारतो वाटतें ? आणि मी परगांवचा असलों तरी आपल्या महाराजांना चारसहा वेळां पाहिलें आहे.

नूपुर : वेषांतर केलें आहे ना मीं ?

राजा : वेषांतरानें फार झालें तर तरुणाला वृद्धाचें सोंग आणितां येईल; पण वृद्धाला असें तरतरीत तरुण कसें होतां येईल ? तूं राजाचें नांव चोरतो आहेस !

नूपुर : शाबास, तुला आपल्या महाराजांचा मोठा अभिमान आहे ! तुला खरें सांगायला हरकत नाहीं ! मी राजाच्या विश्वासांतला राजवल्लभ आहें.

राजा : माझा नाहीं आतां विश्वास बसत या बोलण्यावर !

नूपुर : तुझा कशावरच विश्वास बसत नाहीं तर ती बाबतच सोडून दे ! तूर्त मी तुला निराळीच गोष्ट सांगतों. कान कर तुझा इकडे पाहूं. ( कानांत सांगतो. )

राजा : ( स्वगत ) हा म्हणतो तें खरें असेल तर जाऊन पाहिलेंच पाहिजे. ( उघड ) हें तरी खरें आहे का ?

नूपुर : चल प्रत्यक्षच पहा ! ( दोघेही जातात. )

[ स्थळ–स्मशान; कालिंदी ' अभिमन्यु ' हें गाणें पुटपुटत कुदळीनें खळगा खणीत आहे; जवळच मुलाचें प्रेत. शेजारीं अर्धवट जळत असलेली चिता. ]

कालिंदी : ( थांबून ) पांडव चांगले पुरुषासारखे पुरुष असून त्यांनीं अभिमन्युबाळासाठीं कां बरें असें रडावें ? अर्जुनासारख्या नामवंतानेंसुद्धां त्या वेळीं टाहो फोडला ! " अरेरे भीमा मोठा घात झाला । हिरा पदरिंचा गळुनि पडला । पुत्रवियोगें देह विपरीत झाला । येउनी कृष्णांनींच धरिला. " प्रत्यक्ष भगवंतांच्या तोंडून अठरा अध्याय गीता ऐकूनसुद्धां अर्जुनाची ही दशा झाली, मग स्त्रीजातीच्या सुभद्रामाईनें फार आकांत केला यांत काय नवल ! " माझा सौभद्र मजवरि कां रुसला । स्तनीं माझ्या पान्हा आला । बाळ लहान रणीं कुणीं नेला । काय पाहूं उत्तरेला ! " धन्य आमच्या वसुंधराबाईची ! देखतांडोळां एवढा अनर्थ झाला पण माउलीनें डोळ्याला पाणी येऊं दिलें नाहीं ! उलट मलाच तिनें रडूं नकोस म्हणून धीर दिला ! बुरख्याबाहेरच्या दामिनीला ती आज्ञा ऐकावी लागली, पण बुरख्याच्या आंतल्या कालिंदीच्या जिवाचें मात्र आंतल्याआंत पाणी झालें. पण त्या वेळीं आंतल्याआंत गिळिलेले अश्रु–हे पहा आलेच ! देवि वसुंधरे, क्षमा कर ! आतां माझ्यानें धीर धरवत नाहीं ! नका, हे अनंतयुगसाक्षी तारांनो, या अभागिनीकडे अशा वसुंधरेच्या रागानें पाहूं नका ! तुम्ही तीनकाळच्या साक्षिणी आहां ! सत्त्वधीर हरिश्चंद्राची तारा राणी, राजबिंड्या रोहिदासाचें अशाच रात्रीच्या वेळीं सरण रचतांना, ढळढळां रडलेली तुम्हीं पाहिली आहेना ? चिमुकल्या चिलयाला चिरतांना त्याच्या रक्ताच्या ओघांत, यतिवेषी कैलासनाथानें आज्ञा करण्याच्या आधींतरी, चांगुणेनें आपल्या अश्रूंचा ओघ मिळविल्याचें तुम्हीं ऐकलें आहेना ? झालें तर मग, मोठमोठ्या मायमाउलींना असें झालें; मग या अजाण पोरीचा अंतरंगींचा उमाळा असा उचंबळून अनावर झाला तर तिला कां बरें दोष देतां ? हृदयाचेंच पाणीपाणी झाल्यावर त्याचा उचंबळा कसा आवरणार !

[ राजा व नूपुर येतात. ]

राजा : ( नूपुरास एकीकडे ) असे एकीकडे उभे राहून या अर्धवट उजेडांत आधीं नीट पाहूं या.

कालिंदी : उगीच रडून काय होणार ? सुभद्रेची पुण्याई सबळ; तिची किंकाळी

ऐकतांच, नरनारायणांनीं उठून, चंद्रज्योतीच्या उजेडांत सारें रणांगण पायां-खालीं घातलें आणि अभिमन्युबाळाला हुडकून काढिलें! आणि इथें ही एवढी अर्धवट जळती चिता काय ती माझ्या बाळावर आपला उजेड पाडीत आहे; पण ही जीवज्योति असल्यावर त्या नुसत्या चंद्रज्योति घेऊन काय करावयाचें आहे? हे जळत्या जीवराजा, या असहाय अबलेवर या वेळीं केवढा उपकार केलास; तिचा दुबळा आशीर्वाद तुला स्वर्गलोकापर्यंत सोबत करील.

नूपुर : ( राजास एकीकडे ) अहो, मला वाटतें एकदम पुढें होऊन करावा सुरू चौकशीचा मारा!

राजा : ( नूपुरास एकीकडे ) थांबाहो, तुम्हांला काळवेळ कांहीं कळते कीं नाहीं?

नूपुर : ( राजास एकीकडे ) तुमच्यासारखा जख्खड बरोबर असल्यावर तरुणांना काळवेळेचें काय भय! अहो राजे, तुम्हांला स्मशानवैराग्य प्राप्त झाल्या-सारखें दिसतें!

कालिंदी : झाला हा खळगा तयार! आतां चार धोंडे जमविले पाहिजेत! ( इकडे तिकडे पाहून ) अगबाई, हा शेजारींच कोरडा पडलेला चिमणासा झरा आहे वाटतें? सरित्पतीच्या हितासाठीं धावतांना, एखाद्या नदीनें तर आपलें हें अर्भक कडेवरून टाकलें नसेलना? अहाहा, या स्मशानांतलें हें बालनिर्झराचें प्रेत माझ्या बाळाला अक्षयींची खाशी सोबत करील! बाळा केतना, हा पाहिलास तुझा नवा खेळगडी! अगबाई, माझ्या राजसानें असें तोंड कां बरें वाईट केलें? जिवंत झऱ्याची सोबत पाहिजे वाटतें माझ्या लबाडाला? हो, हसला गुलाम! केतना, असें करायला अवघड का आहे? अंतरंगीं तळ-मळणाऱ्या माझ्या अश्रूंच्या ओघानें या इवल्याशा झऱ्याला कायमचा अलोट पूर आणीन! पण या निर्झराला अक्षयजीवन देण्यासाठीं, हृदय फोडून माझ्या अखंड अश्रूंचा झरा मी आटवूं लागलें तर माझ्या करुण किंकाळीनें आकाश फाटून त्यांतून अमृताची झरणी लागेल, तिच्या स्पर्शानें तुझी कोंवळी काया पुन्हा थै थै नाचूं लागेल आणि असें झालें म्हणजे पुत्रदेवा, माझी पतिदेवतेची पूजा मोडेल! देवाला वाहिलेलें फूल पुन्हा वेलीच्या अंगीं लागत नाहीं. या पहा, या स्मशानलतिका तुझ्याभोंवतीं उभ्या आहेत, यांनाच विचार. अनोळखी प्रेताच्या राखेवर केलेली फुलांची पांखरण त्या कधीं परत घेतात का? अशानें हातीं येत चाललेला पुण्यप्रभाव ढासळणार नाहीं का? ( मोठ्यानें ) अहाहा, हे स्मशानांतल्या वेलींनो, धन्य तुमच्या परोपकाराची! मागें राहिलेल्या आप्तांचे निराश विरहाचे कढ श्वास

मृतांच्या रक्षेभोंवतीं घुटमळूं लागले म्हणजे तुमच्या फुलत्या सुगंधी श्वासांनीं तुम्ही त्यांना मधुर करितां; विझालेल्या चितेंतून तळमळणाऱ्या आगीची अखेरची धग पसरूं लागली म्हणजे तुमच्या मकरंदाच्या जिवंत रसवंतीनें तिला निवद्रून, रक्षेंतल्या रूक्ष जीवितांत तुम्ही जिव्हाळ्याचा ओलवा आणतां! वनदेवीच्या मुलींनो, माझ्या हृदयींचें राजसरूप बाळदैवत मीं आतां तुमच्याच ओटींत निरविलें आहे! या अभागिनीची आठवण ठेवून या अनाथ देहाची मायममतेनें जोपासना करा! इथून पुढें तुम्हीच त्याला माझ्या जागीं व्हा एवढीच तुमच्याजवळ याचना आहे!

राजा : ( स्वगत ) अहाहा, हा करुणविलाप ऐकून या वेली खचित फुलांचे अश्रु ढाळीत असतील! हरहर, काय बापडीवर प्रसंग कोसळला आहे! माझ्या राजकर्तृत्वाला शतधा धिक्कार असो!

नूपुर : ( एकीकडे राजास ) कायहो, आतां तरी व्हायचें का पुढें? बघा, हातचें सावज निसटतें आहे. एकदा तिनें मुद्देमाल जमिनींत गाडून नापत्ता केला म्हणजे शाबिती करणें थोडें आटाआटीचें होईल! चल, मी होतों पुन्हा गस्त-वाला आणि देऊं या धोशा उडवून झालें!

राजा : ( एकीकडे नूपुरास ) आपल्या महाराजांच्या अमदानींत असा अंधार चालायचा नाहीं! त्यांची कदर जरा ध्यानांत घ्या!

नूपुर : ( एकीकडे राजास ) महाराज गेले मसणांत! या स्मशानांतल्या अंधारांत आपला अंधार सहज झांकून जाईल. तुम्हांला वाटत असेल त्यांचा बाऊ. मला महाराजांची मुळींच दरकार वाटत नाहीं! एकदा तर बोलबोल म्हणत महाराजांना मीं असें खड्ड्यांत घातलें होतें म्हणतां! उगीच महाराजांच्या ऐकीव गोष्टी नका सांगूं मला!

राजा : ( एकीकडे नूपुरास ) जरा कृपा करून तुमचें तोंड बंद ठेवा आतां!

कालिंदी : आतां उगीच वेळ वाढवून काय उपयोग? बाळा केतना, चल, हो तयार आतां! तुमचाआमचा ऋणानुबंध सरता झाला! कुठें आहेस तूं? ( प्रेत उचलते. ) अहाहा, ' बाळ धरणीवरी लोळे। चाचरे केश रक्तानें भरले ॥ " ( त्याचें चुंबन घेते. ) " धरी पोटाशीं चुंबन दे त्याला। वदनचंद्र धुळीनें भरला। शिरिं पाहे तो गदेचा टोला। ( स्फुंदत ) गहिंवर देवाला आला। " देवा! सुभद्रामाईच्या अभिमन्यूला पाहून तुम्हांला गहिंवर आला, आणि मज अभागिनीच्या अनाथ बाळाला पाहून मात्र तुम्हांला कांहींच का वाटत नाहीं!

देता, असा पक्षपात तुमच्या ठायीं कां बरें असावा? रणांगणीं पडलेल्या अभिमन्युबाळानें कृष्णनामाचा मंजुळ पाठ चालविला होता आणि माझें बाळ तुमचें नांव घेत नाहीं म्हणून का त्याच्यावर इतका राग? पण सर्वसाक्षी देवा, माझ्या राजसाला कांहींतरी कळतें आहे का? अभिमन्युकुमार सोळा वर्षांचे होते अणि माझें बाळ सोळा महिन्यांचें सुद्धां नाहीं! स्तनपान करायलासुद्धां त्याला अजून शिकवावें लागतें! देवा, क्षमा करा, पण तुम्ही निष्ठुर आहां; निर्दय आहां; अगदीं माझ्या पतिराजांसारखे निर्दय निष्ठुर—अगबाई, काय हें बोलतें मी? त्यांची निंदा आणि देवाची निंदा! देवानारायणा, क्षमा कर, क्षमा कर. दुःखानें भांबावलेल्या या वेड्या पोरीला क्षमा कर! तुझ्याकडे तरी काय दोष? माझें भोक्तृत्व असेल तें भोगल्याखेरीज सुटका नाहीं! पूर्वजन्मींचीं पापें या जन्मीं दुःखांच्या रूपानें छळल्याखेरीज कशीं राहतील? ऊठ कालिंदी, ऊठ! हें कठीण काम कसेंतरी आटोपलेंच पाहिजे!

[ हमारे नभी आज० ]

अभागी जिवा शोक आतां पुरे हा ॥ ध्रु० ॥ नशिबीं आलें।
त्यापरि झालें । मन कां वृथा हें मनाशीं झुरे ॥ १ ॥
रडणें हसणें । एकच जाणे । नातें न आतां जगाशीं उरे ॥ २ ॥

बाळा केतना, यापुढें या मातीच्या पाळण्यांतच तुला निजावें लागणार! नको, आतां अखेरच्या वेळीं असा रागानून पाहूं नकोस! मी आनंदानें का तुला माझ्या हातानें या खांचेंत लोटीत आहें? हे वनदेवींनों, हे गगनदेवतांनों, तुमच्या फुलांच्या आणि ताऱ्यांच्या डोळ्यांनीं तुम्ही सर्वकांहीं पाहात आहां, —तुम्ही साक्षी आहांत, कीं माझ्या पतिदेवतेच्या उद्धारासाठींच मी हें अघोर कर्म करीत आहें! आई, आकाशांतून माझ्याकडे पाहून रागावूं नकोस! तुझ्याकडून शिकलेला मायममतेचा धडा मी विसरलें नाहीं; पण पतिव्रतेच्या निर्दयपणानें मातृप्रेमाला असें खाईत लोटावें लागत आहे त्याला मी तरी काय करूं? बाळा केतना, माझ्या मातृप्रेमाबद्दल तुला संशय येत असेल, तर देवाच्या घरीं जाऊन तुझ्या वडिलांना सद्बुद्धि देण्यासाठीं त्याच्या पायांजवळ आळा घेऊन बैस आणि मग पुन्हा या अभागिनीच्या उदरीं जन्म घे म्हणजे माझें प्रेम किती अखंड आहे याची तुला साक्ष पटवून देईन! पण हो, स्वर्गातल्या अमृतस्नानानें ही गालबोटाची खूण मात्र धुऊन टाकूं नकोस हं! (त्याच्या गालावर डोळ्यांतल्या काजळाचें गालबोट ओढते.) असा या खुणेसकट माझ्या पोटीं ये म्हणजे तुझ्या पुढच्या अवताराची मला ओळख पटेल! पण तुझ्या

जन्मदात्यांची सेवा तुझ्या हातून होईपर्यंत मात्र या खांचेंत असाच पडून रहा! ( त्याला खांचेंत ठेवते. ) तुझें पुनर्दर्शन होईपर्यंत, माझ्या हृदयाच्या पायघड्या पसरून त्यांवर वठविलेल्या तुझ्या देवपावलांची मी अष्टौप्रहर मानसपूजा करीत राहीन! झालें, आतां हा दगड घ्यावा आणखी—( खांचेंत दगड टाकणार तोंच मोठ्यानें ओरडून दगड खालीं टाकते. ) अगबाई, काय करितें हें मी? माझ्या केतनाच्या कोमल देहावर हा कठीण धोंडा टाकून—! देवारे देवा! काय हा प्रसंग आणिलास माझ्यावर? प्रत्यक्ष आईच्या हातांनीं बाळाच्या देहावर दगड टाकायचा!

नूपुर : ( एकीकडे राजास ) अहो महाराज, आतां तरी होणार का पुढें? मूल मेल्याबद्दलचा दाखला मागण्यापासून सुरुवात करूं म्हणजे झालें!

राजा : ( नूपुरास एकीकडे ) आणि मेलेलें मूल पुढें आहे तें?

नूपुर : ( एकीकडे राजास ) तुम्हांला चौकशीचे पांचपेंच कळत नाहींत! अहो, दाखला नसला म्हणजे नुसत्या मुडद्यावरूनच मनुष्य मेल्याची खात्री करून घेऊन भागत नाहीं! दुसरीं दाखला हा पाहिजेच! चलतां ना पुढें? नाहींतर मी होतों पुढें एकटाच!

राजा : ( नूपुरास एकीकडे ) माझ्या कमरेला तलवार आहे हें लक्षांत आहेना?

नूपुर : ( राजास एकीकडे ) स्मशानवैराग्य मावळून आतां तुमच्यांत स्मशानांतल्या एखाद्या समंधाचा संचार झाल्यासारखा वाटतो! थांबा, हेंही वारें जाऊं द्या जरा.

कालिंदी : रजनि, आपले चिमुकले डोळे झांकून घे; नाहींतर माझें हें अघोर-कर्म पाहून हे तुझे तेजस्वी डोळे भीतीनें काळवंडून काळेठिक्कर पडतील आणि मग या अमावास्येच्या काळोखांत, स्वर्गाच्या मार्गावर माझ्या बाळाला वाट दाखविण्यासाठीं एकही अक्षयदीप रहाणार नाहीं! सांग, माते रजनि, जगाच्या आरंभापासून तूं आपल्या सर्वसाक्षी डोळ्यांनीं भूलोकावरचे सारे खेळ पाहत आहेस; पण आईनें मुलाच्या अंगावर दगड टाकण्यासारख्या देखाव्याचा भयानक खेळ तूं कधीं पाहिला आहेस का? सांगा, स्मशानलतिकांनो, तुम्हीं या स्मशानांत लक्षावधि हृदयभेदक प्रकार पाहिले असतील, पण माझ्या पुण्यप्रभावासारखा देखावा पूर्वी कधीं पाहिला होता का? पण हें मी तुम्हांला काय विचारितें? तुम्ही जितक्या नाजूक आहां तितक्याच धीराच्या आहां! प्रत्यहीं कोमेजून पडलेल्या फुलांच्या—मरून पडलेल्या तुमच्या मुलांच्या नाजूक निर्माल्यप्रेतांवर पिवळ्या पानांची समाधि बांधून आणि आपल्या

अंगाची सांवली करून केवळ ईश्वरी इच्छेखातर तुम्ही समाधानाचे सुगंधी श्वास पसरीत सुखानें आयुष्य कंठितां! तुमच्या पुण्यप्रभावापुढें माझी काय कथा! द्या, वनदेवींनो, तुमचें तें फुलांचें नाजूक धैर्य घटकाभर मला द्या! बाळा केतना, अखेरवेळ आली बरें!

[ सबसे राममजन० ]

निरोप घावा आतां! बाळा! टाकुनि जाते माता ॥ ध्रु० ॥
माझें माझें म्हणुनि आजवर जें लेखें त्यालें।
बाळ गुणाचें हाय कुणाचें आज परी तें झालें ॥ १ ॥
हे तारांनो, उचंबळूं द्या करुणारसरंगा।
अखंड वाहो नवतेजाच्या पुण्याईची गंगा ॥ २ ॥
घटकेचा संसार संपला, लटका ठात्रठिकाणा।
वनदेवींनो, पदरीं घ्या हा माझा राजसराणा ॥ ३ ॥
अनाथ दुबळा देह पडे हा, आई नाहीं त्याला।
फुलल्या फुलवंतीची यावर मायापांखर घाला ॥ ४ ॥
भुतें जागतां उठतां दचकुनि हृदयींचा हा ठेवा।
काळ्या रातीं जित्या फुलांचा खडा पहारा ठेवा ॥ ५ ॥
कळतें तुम्हां सारें कांहीं, अहां फुलांच्या माता।
लोभ असूं द्या इथून पुढतीं, बोलत नाहीं आतां ॥ ६ ॥

**राजा :** (एकीकडे नूपुरास) चल आतां पुढें.

**कालिंदी :** आला आतां मला पुरता धीर! बाळा केतना, या दगडाची भीति मुळींसुद्धां धरूं नकोस! हा जरी दगड असला तरी स्मशानांतला दगड आहे! आजवरच्या इथल्या करुणालापांनीं याचें अंतःकरण फुलापेक्षांही मृदु झालें असेल! आणि अजूनही याच्यांत कठीणपणा असलाच, तरी दररोज माझ्या अश्रूंच्या अभिषेकाचें सिंचन करून या फत्तरालाही फुलें आणीन आणि त्या फुलांनीं–माझ्या बाळाच्या जिवाभावाच्या फुलांनीं—परमेश्वराची पूजा करून त्याच्याकडून तुझ्या वडिलांचा पापापासून उद्धार करीन! बाळा केतना, हो आतां सावध! (दगड उचलून टाकणार तोंच राजा मागें येऊन हात धरितो.)

**कालिंदी :** कोण माझा हात धरीत आहे? माझ्या पवित्र धाडसाच्या आड येऊं नका; कोण आहे तें—ईश्वर?

**राजा :** नाहीं. ईश्वराचा पृथ्वीवरचा प्रतिनिधि! बाई, माझ्याकडे नीट पहा; मी या शहरचा राजा तुझ्या साहाय्यासाठीं आलों आहें! ऊठ.

कालिंदी : ( स्वगत ) अगबाई, खरेंच, महाराजच हे !

राजा : बाई, भिऊं नकोस ! तुझें नांव काय ?

कालिंदी : माझें नांव कालिंदी; मी–

राजा : मुली, लाजूं नकोस, प्रसंगाला तोंड हें दिलेंच पाहिजे ! काय तुझ्या नवऱ्याचें नांव ?

कालिंदी : वृंदावन.

राजा : काय, वृंदावनाची कालिंदी तूं ? मग तुझ्यावर हें संकट कसें आलें ?

कालिंदी : तें सांगायला फार वेळ लागेल. पण महाराज, माझ्या या संकटांत मला साहाय्य करण्यापेक्षां, माझ्यावरच्या दुसऱ्या मोठ्या संकटाचें निवारण करा !

राजा : दुसरें कोणतें संकट ?

कालिंदी : माझे पति एका पतिव्रतेचा–वसुंधरेचा, मंडलेश्वरांच्या वसुंधरेचा छळ करीत आहेत; म्हणून महाराजांनीं आधीं तिची सुटका, आणि माझ्या पतींची पापापासून सुटका केली तर माझ्यावर अगणित उपकार होतील.

राजा : चल, आतांच्या आतां माझ्याबरोबर चल. वाटेनें मला आपली सर्व हकीकत सांग. अहो, तुमचें नांव काय ?

नूपुर : माझें नांव नूपुर ! महाराज, माझा अपराध इतका मोठा आहे, कीं मला या खड्डयांतच जिवंत गाडला तरी–

राजा : तें राहूं द्या ! नूपुर, हें मूल घेऊन चौकीवर चला आणि पुढें मी सांगतों त्याप्रमाणें व्यवस्था करा ! कालिंदी, चल ! [ सर्व जातात. ]

## प्रवेश तिसरा

[ कंकण प्रवेश करितो. ]

कंकण : ( स्वगत ) त्या हरामखोर नूपुराला किंकिणीबरोबर हिंडतांना एवढ्यांत पाहिलें तर खरें ! आतां इथेंच दबा धरून बसावें आणि गनीम आला कीं घालावा छापा. तसेंच किंकिणीच्या मर्जीची जिकीर करण्यांत आतां कांहीं हशील नाहीं. आज तिला धरावें तलवारीच्या धारेवर ! ही मनधरणी त्रस झाली. इतकी तकलीफ घेतली असती तर राजाची राणीसुद्धां घरीं चालत आली असती. आलाच तो बदमाष ! [ नूपुर व किंकिणी येतात. ]

नूपुर : किंकिणी, काय सांगूं, आज मला कळलेल्या गोष्टी तुला जर रसाळपणानें सांगत बसलों तर आपला सारा जन्म सुखांत जाईल.

कंकण : ( मागाहून येऊन ) एवढ्या रात्रीं तिला कोठें घेऊन चाललास रे ?

नूपुर : ( तिरस्कारानें ) महाराजांनीं हिला आपल्यापर्यंत घेऊन यायला मला सांगितलेलें आहे. आतां मला राजाज्ञेचा आधार आहे.

कंकण : आतां राजाज्ञा राहील बाजूला आणि देवाज्ञा मात्र होईल तुला ! राहूं दे तिला इथें. मी घेऊन येईन तिला महाराजांकडे. किंकिणी, थांब तूं. हं, नूपुर, आपल्या वाटेल लाग ! पण थांब, हा हार कशाला आणला होतास ? आणि इकडे तो हार ! तुझ्या हारानें किंकिणीशीं लग्न लावतों. शत्रूच्या लुटीवरच गुजारा करणें हा खरा लष्करी पेशा आहे.

नूपुर : असा आडदांडपणा प्रेमशास्त्राला संमत नाहीं.

कंकण : चल, जा ! तुझें प्रेमशास्त्र आतां कत्तल झालें ! चल, निघ इथून आधीं.

[ नूपुर जातो. ]

किंकिणी : कंकण, हें काय मांडिलें आहे तुम्हीं ?

कंकण : हं, जो लष्करी कायदा नूपुराला, तोच तुला पण ! आतां युद्धकांडाला सुरुवात झाली आहे. हा बघ हार आणि ही बघ तरवार ! हा माझ्या गळ्यांत घाल, नाहींतर ही तरवार तुझ्या गळ्यांत पडेल !

किंकिणी : आणि माझें प्रेम जर तुमच्यावर नसेल तर ?

कंकण : आतां मला प्रेम नको आहे, तूं पाहिजे आहेस ! हें बघ प्रेम करायला लावतों. ( तरवार उगारून ) प्रेम करतेस कीं उडवूं गर्दन ? आहे कीं नाहीं प्रेम ?

किंकिणी : कंकण, किती सरळ स्वभाव तुमचा ? तुम्हांला छळलें त्याची क्षमा करा. माझें तुमच्यावर पहिल्यापासून प्रेम आहे ! आणा तो हार. कालिंदीबाईच्या वागण्याची शपथ घेऊन हा हार तुमच्या गळ्यांत घालितें.

[ त्याच्या गळ्यांत हार घालते. ]

कंकण : कालिकामाताकी जय !

किंकिणी : ( स्वगत ) आतां शेवटीं गर्हिवरून क्षमा मागावी झालें. (उघड) कंकण, प्राणनाथ, मला क्षमा करा.

[ भले आये कुंवर तोरे॰ ]

घडे नाथा प्रमाद जरी आतां क्षमाच तरी हो तया । झुरे देह म्हणुनियां ।
तुरे धीरच हृदया । हा जीव शरण चरणिं या ।
भ्रमुनियां । दमुनियां । श्रमुनियां ॥ ध्रु॰ ॥

हा सतत असो प्रेमभर असा । शुभ आनंदलाभ तसा हा ।
दासी सदाची करी याचना । प्राण पहा वाही ।
अचल करुनि मति पदिं सदया । तरिं दया । करुनियां ॥ १ ॥

[ जातात. ]

## प्रवेश चवथा.

[ स्थळ : भूपालाचें शृंगारमंदिर. वसुंधरा उभी आहे. वृंदावन प्रवेश करितो. ]

वृंदावन : ( स्वगत ) या वेळेला राक्षसवेळा असें म्हणतात! अजूनपर्यंत आली नसेल तर निदान आज तरी मी या रात्रीच्या नांवाला सार्थकता आणणार!

वसुंधरा : ( स्वगत ) देवाधिदेवा, आतां माझी लाज–माझी तरी कसची, देवा, तुझी लाज तुलाच! या वेळीं माझ्या हांकेला जागला नाहींस, तर अनाथ-नाथा, तुझ्या ब्रीदाला बोल लागून तुझ्या कपाळीं कायमचा कलंक राहील! नारायणा, द्रौपदीसाठीं जसे धावत आलां तसेंच या वेळीं माझ्यासाठीं धावत या! तुझ्या नांवाच्या तारणावरच या वेळीं माझ्या पतीचे प्राण राखण्यासाठीं मी या संकटांत येऊन पडलें आहे.

वृंदावन : वसुंधरे, या राक्षसवेळीं दिव्य तेजालासुद्धां राक्षसी रंग चढून बाहेर काळोखाचें ब्रह्मांड पसरलें आहे! अंतरिक्षाच्या उदरांत चहूंकडे काळोखाच्या काळ्यानिळ्या राई माजून त्यांच्यावर धुरक्या ढगांची पालवी पसरल्यामुळें विश्ववनाच्या माथ्यावरचीं तारापुष्पें, पृथ्वीतलावरच्या प्रवाशयाच्या नजरेच्या टापूबाहेर गेलीं आहेत! तुझ्या अघोर दिव्यव्रताचें हें उद्यापन उरकून घेण्याला अमावास्येच्या मध्यरात्रीसारखी पर्वणी पाहिजेच होती नाहीं?

वसुंधरा : वृंदावन, अजून तुमचा अघोर निश्चय कायम आहे का? मला मोठी आशा होती, कीं इतका वेळ तुम्ही आलां नाहीं तेव्हां भर उलटून रात्र निवळत चालल्यामुळें तुमचें मनही निवळलें असेल!

वृंदावन : वसु, बाहेर पडलेल्या अंधकाराची तुला कल्पना असती तर ही वेडगळ कल्पना तुला आठवलीच नसती. वरून मेघांच्या पावलाखालीं दडपून गेल्यामुळें आजरात्रीच्या काळोखाचा गोठून काळा खडक होण्याइतकी त्याची अंतराळांत दाटणी झाली आहे. अशा काळोखावर सारखा नजर ठरवून

माझ्या शरीराच्या अणुरेणूंशीं मीं त्याची इतकी एकजीव मिळणी करून घेतली आहे, कीं इच्छेच्या एकाग्रतेनें तुझ्याकडे सारखा पाहूं लागलों तर माझ्या डोळ्यांतून निघणाऱ्या काळ्या किरणांनीं तुझें सुंदर शरीर काळवंडून तुझ्या पातिव्रत्याचा नाश होण्यापूर्वीच तूं काळी ठिकर पडशील! काळोखाचा रस गिळून अशी तामसी तपश्चर्या करितांना तारांच्या तेजोदर्शनानें माझ्या कृष्णसमाधीचा भंग होऊं नये म्हणून मीं एकदासुद्धां वर पाहिलें नाहीं! पूर्वरात्रीच्या या अपूर्व तपोबळानें माझ्या निश्चयाला एकवृत्तीची बळकटी मिळाली आहे! आतां माझ्या मनांत बदल होण्याचें नांवही काढूं नकोस! पण वसुंधरे, काल हेक्यानें आपल्या पोटच्या पोराचा बळी देऊन आज अखेरीस अशा रीतीनें इथें येणाऱ्या तुझ्या मनांत मात्र बदल झाला आहे खरा. नवऱ्याचा बळी देतांना तुझा हेका लटपटला वाटतें?

**वसुंधरा :** नाहीं, वृंदावन, आज मी माझ्या ईश्वराचा बळी देण्याकरितां आलें आहे!

**वृंदावन :** मी नाहीं समजलों तुझ्या म्हणण्याचा अर्थ?

**वसुंधरा :** वृंदावन, माझा परमेश्वरावर पूर्ण भरंवसा आहे; त्याच्या सर्वसाक्षी शक्तीवर विश्वास ठेवूनच मीं या घरांत पाऊल टाकलें आहे. आज माझ्या साह्याला ईश्वर धावून आला नाहीं तर माझ्या अंतःकरणांतल्या ईश्वराबद्दलच्या साऱ्या कल्पना जाळून पोळून टाकीन.

**वृंदावन :** एकूण आज तूं ईश्वराचा अंत पाहणार तर?

**वसुंधरा :** असेंच का म्हणाना! वृंदावन, परमेश्वर पतिव्रतांचा पाठीराखा असतो हेंच आजपर्यंत सारे पुण्यपुरुष सांगत आले आहेत! गतकालच्या महापतिव्रतांना याच सत्याचा अनुभव येत गेला आहे! पुण्यश्लोकांची वागीश्वरी खोटी व्हायला आणि पतिव्रतांची पुण्याई पोरखेळांत जमा व्हावयाला आजच पृथ्वीनें कांहीं पापानें पाय धुतले नाहींत! पतिरूपानें पूजलेला परमेश्वर पतिव्रतांचा पाठीराखा असतो. माझ्या पतिपूजेंत–परमेश्वरपूजेंत या क्षणापर्यंत कायेनें, वाचेनें, मनानें, बेसावध स्वप्नांतल्या तरळत्या हालचालींनेंसुद्धां मीं रेषामात्र अंतर पडूं दिलें नाहीं! कृतकर्मांचा उच्चार करूं नये म्हणतात–पण वृंदावन, हविर्भाग अर्पण करितांना मोठमोठ्या संयमी महात्म्यांच्या डोळ्यांतून, होमधूमामुळें तरी पाणी येतें; पण माझ्या पूजायज्ञांत, माझ्या परमपुरुषाच्या नांवानें, प्रत्यक्ष पोटच्या गोळ्याची आहुति देतांना मीं तेंही येऊं दिलें नाहीं! मग या वेळीं मला अंतर देण्याचा परमेश्वराला तरी काय अधिकार? परमेश्वर झाला म्हणून

त्याला तरी बंधनें आहेतच ना? कर्मसूत्रानें आम्हां मनुष्यांना बांधणारा परमेश्वर स्वतांही भावभक्तीच्या बंधनांनीं जखडलेला असतो! अजस्र-देही हत्तीला रुतून बसायला कोंवळ्या कमलनालांची तरी जरूर असते; पण विश्वस्वरूप विराट्‌पुरुष भक्तांच्या आशातंतूंच्या नुसत्या अदृश्य सूत्रांच्या जाळ्यांतच सांपडलेला असतो. ( भूपालाच्या तसबिरीकडे बोट दाखवून ) वृंदावन, ही पहा माझ्या पतींची प्रतिमा! पतीला परमेश्वराची प्रतिमा समजून मी आजपर्यंत दररोज भक्तिभावानें या प्रतिमेला असा हार घालीत आलें; आज परमेश्वरानें मला ऐन संकटांत साहाय्य केलें नाहीं तर पृथ्वीवरचें परमेश्वराचें प्रभुत्व संपून तिच्यावर कलिपुरुषाची सत्ता सुरू झाली असें समजेन. तुम्हांला कलिपुरुषाची प्रतिमा कल्पून या हारानें तुमची पूजा करीन, आणि साऱ्या स्त्रीसृष्टींत पापाची ग्वाही फिरवून अट्टाहासानें ओरडून सांगेन, कीं जगांत ईश्वराचें अस्तित्व नाहीं आणि पातिव्रत्य ही चुकलेल्या मूर्खांची बाष्कळ बडबड आहे! वृंदावन, करा पाहूं आपली मान पुढें!

**वृंदावन :** ( स्वगत ) अटीला पेटलेल्या शत्रूनें अगदीं तलवारीवर ठेवण्यासाठीं मान पुढें करायला इतक्या निकरानें सांगितलें असतें तर मीं खात्रीनें माघार घेतली नसती! पण या एका अबलेनें हार घालण्यासाठीं मान पुढें करायला सांगितली असतां माझ्याकडून अगदीं नकळत, आणि क्षणमात्राचाच का होईना, पण विलंब कां बरें व्हावा? हिच्या विस्तीर्ण ललाटप्रदेशाकडे, निश्च-याच्या करारी नजरेकडे, आत्मविश्वासाच्या बेसुरवत चेहऱ्याकडे आणि वैभव-शाली वाणीकडे लक्ष जातांच हिच्या बोलण्यांत तथ्य नसलें तरी निदान तें ऐकावेंसें वाटण्याची इच्छा व्हावी हा मोठा चमत्कार आहे! ( उघड ) वसुंधरे, तुझ्यासारख्या एका वाटेल त्या स्त्रीसाठीं अमावास्येच्या अशा काळोखांतून अंतराळ ओलांडून इथें यायला परमेश्वर खरोखरींच त्याच्या भोळ्या भाविक भक्तांपेक्षांही वेडा असला पाहिजे! तुम्हां बायकांच्या किंमतीला कांहीं मिति आहेचना?

**वसुंधरा** वृंदावन, बायकांची किंमत तुम्ही काय समजतां?

**वृंदावन :** पुरुषांच्या सुखासाठीं पसरलेल्या जगाच्या बाजारांतल्या, पैशापासरीं विकल्या जिनसेपेक्षां मी स्त्रीचें महत्त्व जास्त समजत नाहीं!

**वसुंधरा :** नाहीं, वृंदावन, नाहीं; मातृरूपानें तुम्हांला जन्म देणाऱ्या, पत्नीरूपानें तुमची जन्माची सोबतीण होणाऱ्या, कन्यारूपानें तुमच्या उदरीं जन्म घेणाऱ्या— तुमच्या आयुष्यांतल्या तीन्ही अवस्थांत तुम्हांला कोंवळ्या प्रेमाची साक्ष

पटवून पुत्र, पति आणि पिता या चढत्या पदवींना नेणाऱ्या स्त्रीजातीची किंमत इतकी कमी समजूं नका! विश्वांतल्या प्रेमाच्या, मांगल्याच्या, कोमलतेच्या, सौंदर्याच्या आणि पावित्र्याच्या सारभूत सर्वस्वाची स्त्री ही एकरूप विजयपताका आहे! स्त्रीच्या प्रभावाची साक्ष जगांतली प्रत्येक गोष्ट देईल! स्त्रीच्या एका दृष्टिपाताबरोबर वैराण वाळवंटावर रमणीय उद्यानाची वसति झाली आहे. स्त्रीच्या नांवाच्या आधारानें नद्यांच्या खळखळाटाला वेदघोषाची पवित्रता आली आहे! स्त्रीनें तेजाला कोमलतेची जोड दिली आहे आणि स्त्रीनेंच सत्यावर सौंदर्याचा साज चढविला आहे! स्त्रीहृदयांत उचंबळणाऱ्या प्रीतीच्या पुराबरोबरच महाकवींच्या प्रतिभेचे प्रवाह वाहिले आहेत आणि स्त्रीसौंदर्याच्या रंगच्छटा नुसत्या छायारूपानें रेखाटण्यासाठीं कुशल चित्रकारांचीं कलमें आपापल्या रंगांत गुंगून गेलीं आहेत! सुंदर इमारतींच्या गाभाऱ्यांत स्त्रियांच्याच देवतामूर्ति बसल्या आहेत आणि तलवारींच्या धारेवर जीवांचा नाच करणाऱ्या महावीरांच्या शस्त्रांना स्त्रियांच्याच डोळ्यांत खेळणारें पाणी दिलेलें असतें! स्त्रियांसाठीं पर्वत समुद्राच्या पाठीवर नाचले आहेत, साक्षात् परमेश्वरानें स्त्रियांसाठीं स्त्रीरूप घेतलें आहे! वृंदावन, पुरुषाच्या आणि परमेश्वराच्या–भक्तभगवंतांच्या उच्चतम भावनांचा स्त्रीच्या ठायीं प्रीतिसंगम झालेला आहे! पुरुषाच्या परमपावित्र्याची सीमा साधुत्वाच्या भक्तींत होते! निष्कामबुद्धीनें भगवंताची भक्ति करणाऱ्या सत्पुरुषांना पुरुषकोटींत परमोच्च पदवीवर बसवितात; आणि असे साधु तुम्हां पुरुषांत, लाखांत एकसुद्धां सांपडत नाहींत. पण आत्मयज्ञांत आपल्या इच्छेच्या आहुति टाकून पतिमय परमेश्वराची केवळ त्याच्या इच्छेखातर निर्व्याज सेवा करणाऱ्या साध्वी आम्हां बायकांत घरोघरीं आढळून येतील! त्याचप्रमाणें, प्राणिमात्रावर परमेश्वर जें सहज प्रेम करून त्याची जोपासना करितो त्या निष्काम अपत्यस्नेहाची–ईश्वरी प्रेमाची–मुलाचें संगोपन करणारी माता भूलोकावर साक्ष पटविते! याप्रमाणें एका स्त्रीदेहांत पुरुष आणि परमेश्वर आपापल्या उत्कट गुणांच्या एकरूपानें वास करितात! आपल्या करामतीचा कळस म्हणून म्हटलेल्या पुरुषाच्या संगोपनाची विश्वासाची जबाबदारी संभाळण्यासाठीं ईश्वरानें स्त्री निर्माण केली आहे! पुरुषाची परंपरा चालविण्यासाठीं ईश्वरानें हा स्त्रीमय प्रेमळ अवतार घेतला आहे! पुरुष परमेश्वराची कीर्ति आहे पण स्त्री परमेश्वराची मूर्ति आहे! आणि म्हणूनच, वृंदावन, मनुष्यापेक्षां अधिक कौतुकाची नवीन सृष्टि निर्माण करण्याच्या कल्पनेंत समाधिस्थ झाला असला तरीही पतिव्रतेची हांक ऐकतांच

परमेश्वराला धावून यावें लागेल ! वृंदावन, पहा माझ्या म्हणण्याचा प्रत्यय ! हा पहा माझ्या हातांतला हार ! करा पाहूं आपली मान पुढें !

वृंदावन : ( स्वगत ) शाबास, वसुंधरे, तुझ्या वडिलांनीं तुला पुरुषाप्रमाणें प्रगल्भ विद्या शिकविली तिचें तूं सार्थक केलेंस ! या वेळीं हिच्या मूर्तींत विरोधी गुणांचें अगदीं एकजीव मिश्रण झालेलें आहे ! फुलांच्या नाजुकपणाभोंवतीं हिमालयाची गंभीरता पहावयाची असेल, त्यानें या वेळीं हिच्या देहाकडे पहावें ! हिच्या वाणींतून सतारीच्या सुरेल गोडीवर रणवाद्यांची भीषणता ऐकूं येत आहे ! डोळ्यांतल्या पाण्यावर तरंगणाऱ्या निश्चयी तेजामुळें, तला-वांच्या पाणभुईवर अग्निरसाचा तवंग पसरल्यासारखा वाटत आहे ! कालिंदी, अशी जिवंत वाग्देवी जर तुझ्या जिभेवर नाचत असती तर तूं या वृंदावनालाही आपल्या भोंवतीं नाचावयाला लावलें असतेंस ! पण या विचारानें माझ्या निश्चयाला थरकांप सुटून तोही नाचावयाच्या बेतांत येऊं पाहात आहे ! वृंदावन, केवळ एका बोलभांड बायकोच्या बडबडण्यानें जर तुझें हृदय खळ-बळूं लागलें तर–( हसून ) तर नकोच; अशक्य गोष्ट मला तरी कुठून समजणार ? (प्रकट) वसुंधरे, स्त्रियांच्या पक्षपाती कानांना या तुझ्या शब्दांत श्रुतीचें सर्वस्व ऐकल्यासारखें वाटलें असतें; पण वस्तुमात्राच्या केवळ स्वार्थतत्त्वाच्या कसोटीनें विचार करणाऱ्या माझ्या मनाला एखादी जोरकस शब्दांची घोडदौड झाल्याचा मात्र भास झाला ! बायकांबद्दलच्या या तुझ्या बेफाम बरळण्यानें माझ्या मनावर छाप बसविण्याची तुझी कल्पना असेल तर ती मात्र या सर्व कल्पनांपेक्षां अद्‌भुतरम्य आहे खास ! वेडे वसुंधरे, ईश्वर तुझ्या मदतीला यायचा असता तर काल तो तुझ्या दीनाराचा अंत असा आंधळ्या डोळ्यांनीं कां पाहात राहिला असता ?

वसुंधरा : काल ईश्वर आंधळ्या डोळ्यांनीं माझ्या दीनाराचा अंत पाहात नव्हता पण अगदीं जागत्या डोळ्यांनीं माझ्या श्रद्धेचा अंत पाहात असला पाहिजे ! वृंदावन, श्रद्धेच्या कसोटीला उतरल्याखेरीज ईश्वर कधींच पावत नाहीं ! पातिव्रत्य ही आम्हां बायकांजवळ ईश्वरी अंशाची ठेव आहे ! काल दीना-राच्या लोभानें हें वैकुंठीचें ठेवणें लाथाडलें असतें तर मात्र आज मी देवाच्या दयेला अपात्र ठरलें असतें ! पण या घटकेपर्यंत माझ्या जिवाभावाच्या सर्व-स्वानें मीं त्याचा विश्वास संभाळला ! या वेळीं माझा सर्वस्वीं निरुपाय झाला आहे आणि तो त्याला स्पष्ट दिसतही आहे ! आतां आपली ठेव संभाळण्याची सारी लाज त्याची त्याला ! अशा असहाय स्थितींत एका अनाथ अबलेचा

निष्ठुरपणानें अंत पाहात बसला तर देवाच्या उज्ज्वल ब्रीदाला कायमचा कलंक लागेल! आणि मग देवा, तुझ्या पायांचा मरंवसा कोण धरील? सज्जन आपल्या पवित्र वाणीनें तुझ्या नांवाचा उच्चारही करणार नाहींत! तुझ्या पाषाणमूर्तीची दृष्ट लागूं नये म्हणून देवळावरून जातांना बायका आपल्या तान्हुल्यांना पदराखालीं झांकून घेतील! श्रद्धेच्या माहेराचें मूळ तुटून भक्तीची सोयरीक तुटेल आणि संतांचा संसार मोडेल!

**वृंदावन :** वसुंधरे, काय हा वेडेपणा! कोणता परमेश्वर ही तुझी दीन वाणी ऐकणार? भाविकांनीं आपल्या हृदयांतून हांकलून हद्दपार केलेला, देवळांत दडविलेला, दगडाखालीं दडपलेला, देव का हें ऐकणार? वेडे, अजून कोणीं कधीं पाहिला तरी आहे का तो देव कसा आणि केठें आहे तो?

**वसुंधरा :** वृंदावन, परमेश्वर कोणत्या रीतीनें आणि कोणत्या रूपानें माझी लाज राखील त्याची तुम्हाला कल्पनाही होणार नाहीं!

**वृंदावन :** असें काय? मला न समजण्याजोग्या मार्गांनीं येणाऱ्या दैवी सहाय्याच्या नाटकी आशांना हृदयांतून काढून टाक! वसुंधरें, आजच्या प्रसंगाची मी साऱ्या जन्मभर वाट पाहात होतों आणि सारा जन्म या प्रसंगाशीं भिडण्याची तयारी करण्यांतच मीं घालविला आहे! आकाशांत भिरभिरणाऱ्या घारीला नुसत्या नजरेच्या जरबेनें माझ्या मनगटावर मैनेप्रमाणें खिळून बसण्यांत मी तरबेज झालों आहें! एका क्षणांत आकाशपाताळ एक करणारी विजली कडकडून कोसळतांना, तिच्याकडे डोळ्याचें पातें हलविल्यावांचून, अगदीं बांधलेल्या नजरेनें पाहण्याचा मीं अभ्यास केला आहे! परस्परांच्या अंगांना विळखा घालून अधरामृतपानांत गढलेल्या जहरी जोडींतून, ओढून काढलेल्या नागाचे चाबकाप्रमाणें फटकारे मारून खवळल्यामुळें फोफावणारी नागीण मुठींत धरून, तुझ्या हातांतल्या हाराप्रमाणें मनगटाभोंवतीं खेळविण्याचा मीं चांगला सराव केलेला आहे. छाव्याचा मुडदा अंगावर फेकल्यामुळें जागी होऊन चवताळलेली वाघीण, हातानें पालथी पाडून पायांनीं जमीनदोस्त जखडून टाकण्यांत मी अगदीं तयार झालों आहें! माझा कर्मयोग–दुष्कर्मयोग इतका दांडगा आहे आणि त्याला आज रात्रीच्या काळ्या तपःसामर्थ्याची जाड करून दिली आहे आणि म्हणून कपटाच्या जाळ्यांत पकडून या घरांत कोंडलेली ही अरुंधतीची वाघीण—नवऱ्याच्या नाशाच्या मंत्रानें, अशी उभी डांबून ठेवलेली ही इंद्रावतीची नागीण—कितीही ओरडली, कितीही फोंफावली तरी तिच्यासमोर मी अगदीं बेदरकार उभा राहीन! वसुंधरे, गगनांत गिरक्या

घेणाऱ्या तुझ्या कल्पनाशक्तीनें किंवा डोळ्यांत नाचणाऱ्या निश्चयाच्या निखाऱ्यानें फार झालें तर लपवून आणलेल्या एखाद्या हत्यारानें किंवा छपवून बसविलेल्या एखाद्या मारेकऱ्यानें जर तुझ्या मदतीसाठीं ईश्वराचें सोंग घेण्याचा प्रयत्न केला तर हा वृंदावन एका क्षणांत त्या नटव्या ईश्वराला नश्वर करून टाकील ! सांग पाहूं, यांपैकीं तुझ्या दगलबाज देवाचें रूप कोणतें आहे तें ?

वसुंधरा : तुमच्या या साऱ्या अघोर अभ्यासाचा या वेळीं कांहींच उपयोग होण्यासारखा नाहीं ! माझ्यांत नागिणीचें विषही नाहीं किंवा वाघिणीची क्रूरताही नाहीं. कोमलतेच्या चांदण्यासमोर क्रूरपणाचा काळोख क्षणमात्रांत विरून जातो ! वृंदावन, मीं कल्पनेनेंसुद्धां तुमचें अनिष्टचिंतन केलें नाहीं ! आणि केलें तर अशा हिंसक हांकेला परमेश्वर जागणारही नाहीं ! पवित्र, निर्मल आणि निर्दोष कल्पनांनाच परमेश्वराच्या पायांजवळ चिरंजीव सृष्टीचें स्वरूप मिळतें ! परहिताला न दुखविणाऱ्या आपल्या हितबुद्धीलाच ईश्वराच्या आशीर्वादाचें बळ मिळतें ! वृंदावन, तुमच्या जीवाला अपाय करून आपलें रक्षण करण्याची कल्पना माझ्या मनाला कधींच शिवली नाहीं ! माझी सारी शक्ति म्हणजे माझी निर्बलता ! माझें खरें साहाय्य करणारी माझी केवळ निःसहाय स्थिति ! स्त्रियांच्या दुबळेपणांतच त्यांचें खरेंखुरें बळ असतें ! दुबळ्या, अनाथ, निस्सहाय स्त्रीला संकटांत पडलेली पाहून, पुरुषाच्या अंगीं दिव्य पुरुषार्थाची प्रेरणा होतें आणि तिच्या साहाय्यासाठीं साक्षात् ईश्वर अवतार घेतो !

वृंदावन : कोणत्या रूपानें ईश्वर इथें येणार ? या वाड्याभोंवतीं असा नेटाचा बंदोबस्त केला आहे, कीं तुझ्या ईश्वराला वाऱ्यावर वाहून येण्याचीसुद्धां सवड सांपडणार नाहीं !

वसुंधरा : बाहेरचा ईश्वर कशाला यायला पाहिजे ? ईश्वर सर्व ठिकाणीं आहे.

वृंदावन : इथल्या प्रत्येक वस्तूवर मीं माझ्या विचारांची इतकी एकजीवाची छाप बसविली आहे, कीं कुत्र्याच्या विषानें अंग भणभणलें म्हणजे मनुष्य कुत्र्याप्रमाणें भुंकतो किंवा सर्पाच्या विषाच्या लहरी अंगांत भिनल्यावर सर्पाप्रमाणें फूत्कार टाकितो त्याप्रमाणें इथल्या प्रत्येक वस्तूंतून वृंदावनाचेच विचार बाहेर पडतील ! रागानें या फरसबंदीच्या फत्तरावर पाय आपटून पहा–तुला वृंदावनाच्या हृदयाची साक्ष पटेल ! या धगधगणाऱ्या दीपज्योतीकडे नजर टाक–तुला वृंदावनाच्या नजरेंतला अंगार दिसून येईल ! हलवून पहा हा लोखंडी जंजीर–तो वृंदावनाची भाषा बोलायला लागेल ! चल, मार लाथ या खांबावर ! नारसिंहाच्या रूपानें त्यांतून ईश्वर बाहेर आला तर नजरेच्या एकाच फेकीनें

दबवून त्याला माझ्या पायांवर कुत्र्यासारखें लोळायला लावीन! वसुंधरे, माझ्या शक्तीची तुला कल्पनाही नाहीं! अशी बावरल्यासारखी इकडे तिकडे कां पहातेस? वसुंधरे, सांग कोणत्या वस्तूंतून ईश्वर तुझ्या साहाय्याला येणार आहे तो? ज्या वस्तूचें नांव घेशील ती वस्तु तुझ्यादेखत पायांखालीं तुडवून टाकतों! सांग, कोणता ईश्वर इथें येणार?

वसुंधरा : कोणता ईश्वर? वृंदावन, तुमच्या हृदयांतला ईश्वर!

वृंदावन ( दचकून स्वगत ) हां, हृदया, वृंदावनाच्या हृदया, असें चरकूं नकोस! भीतीनें असें दचकून कांपूं नकोस! पण मला ही भीति तरी कसली वाटली? ईश्वराची–वसुंधरेच्या ईश्वराची–वृंदावनाच्या हृदयांतल्या ईश्वराची–माझ्याही हृदयांत ईश्वर आहेच का? हृदयांत डोकावून पाहण्यासाठीं आंत वळण्याचा डोळ्यांना धीरच होत नाहीं! पण न होऊं दे–वृंदावन नुसत्या शब्दांनीं गांगरला असें कधींही होणार नाहीं! ( उघड ) माझ्या हृदयांतला ईश्वर! वसुंधरे, वृंदावनाच्या हृदयांत वृंदावनाखेरीज कांहींच नाहीं! या देहाच्या प्रत्येक रोमांत, रक्ताच्या प्रत्येक लहरींत, श्वासाच्या प्रत्येक कंपनांत एक वृंदावन, वृंदावन आणि वृंदावनच भरून उरला आहे!

वसुंधरा : आणि त्या वृंदावनांनाच मी ईश्वर म्हणते. वृंदावन, तुमची सारी शक्ति, सारी निर्दयता, या दुबळ्या, अनाथ पण सात्त्विक वसुंधरेपुढें, या वेळीं तिचा छळ करण्यासाठीं एक क्षणभरही उभी राहणार नाहीं! उलट तिचें रक्षणच करील. तें पहा, तुमचे हात जागच्या जागीं चळवळत आहेत. काय करावें आणि काय नाहीं याचा ते जणू काय विचारच करीत आहेत. माझ्या अंगाला शिवण्याची त्यांना अग्निस्पर्शासारखी भीति वाटून त्यांच्यांतून घामाच्या धारा वाहतील; पण माझ्या शीलरक्षणासाठीं मात्र ते आपखुषीनें काळाच्या दाढेंतही उडी टाकतील!

वृंदावन : ( स्वगत ) पुरुषांचा पराक्रम अबलांच्या रक्षणासाठीं असतो, हे कालिंदीचे शब्द माझ्या कानांभोंवतीं नाचायला लागले आहेत; पतिव्रतांच्या प्रभावामुळें पुरुषार्थाचा परमेश्वर जागा होतो, या भूपालाच्या शब्दांनीं भोंवतालीं सारखा सारखा गोंधळ मांडिला आहे! नाहीं, मी ते शब्द ऐकणार नाहीं– ( कानावर हात ठेवितो. ) अजून तेच शब्द! हृदयांतसुद्धां त्या शब्दांनीं सारखें थैमान मांडलें आहे! त्यांच्या मिश्र कोलाहलांतून "वृंदावन, वसुंधरेचें रक्षण कर; वृंदावन, वसुंधरेचें रक्षण कर" असा आक्रोश निघत आहे! हा आक्रोश कोणाचा? त्या त्या वेळीं मनांतल्या मनांत मारून टाकिलेल्या त्या शब्दांचीं

भुतें आज जागीं झालीं आहेत, कीं वृंदावनाच्या हृदयांतला ईश्वरच जागा— नाहीं ! कानांवर हात ठेवून उपयोगी नाहीं ! माझ्या मनाची चलबिचल माझ्या शरीराच्या अनिश्चित हालचालीमुळें वसुंधरेच्या लक्षांत येईल. ( उघड ) नाहीं, वसुंधरे; या हातांचा भरंवसा धरूं नकोस ! हा पहा वृंदावनाचा इमानी हात ! त्याच्या जीविताची ही शीर तोडलीस तर आजच्या करणीसाठीं उत्साहानें उकळणाऱ्या त्यांतल्या रक्ताचा रंगसुद्धां माझ्या विचाराप्रमाणेंच काळाकुट्ट आहे असें तुला दिसेल !

**वसुंधरा :** मुळींच नाहीं ! माझ्या निर्मल आणि करुण दृष्टीशीं त्याची दृष्टि मिळतांच आपल्या अघोरपणामुळें ओशाळून त्या काळ्या रक्तावर ताबडतोब लज्जेची लाली चढेल ! आतां विलंब करूं नका. वृंदावन, तुम्हांला दोनदा सांगितलें–तुम्हांला लाजविण्यासाठीं–तुमच्या दिव्य पुरुषार्थाला आपली ओळख पटवून देण्यासाठीं–तुमच्या पराक्रमशक्तीला तिची खरी योग्यता कळविण्यासाठीं–तुमच्या हृदयांतल्या परमेश्वराला हांक मारण्यासाठीं–पुन्हा तिसऱ्यांदा सांगतें, माझ्या हातांतला हार तुम्ही मान पुढें करण्याची वाट पाहात आहे. चला, वृंदावन, पतिव्रतेच्या पावित्र्याचा हार स्वीकारण्यासाठीं आपली मान पुढें वांकवा ! पराक्रमी नरसिंहा, या निःसहाय, अनाथ निर्बल हरिणीच्या कोमल हृदयाच्या चिंधड्या करून आपल्या पुरुषार्थाला सार्थकी लावा ! उठा, बंधुराज, पापवासनेनें आपल्या भगिनीचा हात धरा ! चला, वृंदावनस्वरूपी परमेश्वरा, आपल्या सैतानी पावलांखालीं माझ्या सात्त्विक पुण्याईला तुडवून टाका !

**वृंदावन :** ( स्वगत ) वीरावतीच्या रणसंग्रामांत, उभयपक्षांचे वीर वैराच्या भरानें एकमेकांना आलिंगनें देत असतांना, हाताच्या अंतरावर नाचणाऱ्या तलवारीच्या आणि भाल्यांच्या टोंकांपुढें छाती करितांना मीं मागेंपुढें पाहिलें नाहीं; पण वसुंधरेचा प्रत्येक शब्द आदळतांच हें हृदय हबकून मागें हटत आहे ! यापुढें एक शब्दसुद्धां बोलूं नकोस म्हणून सांगण्याचा मी विचार करीत आहें; पण माझ्याच तोंडांतून एक शब्दही निघेनासा झाला आहे ! माझ्या मनाचा साऱ्या शरीरावरचाच ताबा पार उडून गेला आहे !

**वसुंधरा :** वृंदावन, इतका वेळ तुमच्या हातून क्रिया होत नव्हती; आतां तुमची वाणीसुद्धां बंद झाली ! या हारांतली कळीन् कळी आतां पुरी उमलली आहे ! पहा, तुमचें तोंड मिटलेलें पाहून हे वनस्पतींचे तेजस्वी डोळेसुद्धां हसून तुमचा उपहास करूं लागले आहेत ! तुमच्या त्या बांधलेल्या नजरेनें

त्यांच्याकडे एकदा पहा तरी !

**वृंदावन :** त्यांचा पूर्ण विकास झाला आहेना ? आतां माझ्या स्पर्शानें त्यांना कोमेजवून, करपवून टाकायला कांहीं हरकत नाहीं ! वसुंधरे, मी तर त्यांच्याकडे पाहीनच, पण तुझ्या नवऱ्यालासुद्धां या प्रसंगीं येथें उभा करून हा देखावा दाखविण्याचा माझा विचार होता.

**वसुंधरा :** मग तो कां नाहीं सिद्धीस नेलांत ?

**वृंदावन :** स्वतां भूपालनें मला कधींच दुखविलें नसल्यामुळें त्याला असें दुःख देतांना मला त्याची दया आली.

**वसुंधरा :** त्यांची दया आली नाहीं पण तुमची तुम्हांला लाज वाटली ! तुमच्या पापी डोळ्यांना त्यांच्या निर्दोष तेजाची भीति वाटली. वृंदावन, कबूल करा अगर नका करूं, तुमच्या हृदयांतला ईश्वर आतां जागा झाला आहे.

**वृंदावन :** जागा झाला असला तरी त्याला पायांखालीं तुडवून जमीनदोस्त करून टाकीन.

**वसुंधरा :** आपलें हृदय आपल्या स्वतांच्याच पायांनीं केव्हांही तुडवितां येत नाहीं. भोंवतालीं पसरलेल्या वस्तुमात्रांतला ईश्वर एखाद्या पतितानें पायाखालीं तुडवून टाकला तरी निदान त्याच्या हृदयांतला ईश्वर जिवंत रहावा म्हणून विधात्यानें हृदयाची उभारणी पायांच्या वर केली आहे.

**वृंदावन :** माझ्या हृदयांतल्या ईश्वराला पायांनीं तुडवीत बसण्याचें कारणच उरलें नाहीं. आजवर हृदयांत पेटलेल्या सूडाच्या रखरखीत निखाऱ्याखालीं ईश्वराची जळून राखरांगोळी झाली आहे.

**वसुंधरा :** तुमचे शब्दच इतके निर्जीव वाटतात, कीं तुमचा स्वतांचासुद्धां त्यांच्यावर विश्वास बसणार नाहीं. अगदीं पातकी मनुष्याच्या आयुष्यांतसुद्धां असा प्रसंग एकदा तरी येतोच येतो, कीं ज्या वेळीं त्याच्या पापाची परमावधि होऊन अगदीं क्षुल्लक कारणामुळें त्याची पुण्यमार्गाकडे प्रवृत्ति होते.. वृंदावन, तुमच्या आयुष्यांतला तो प्रसंग या वेळीं, या घटकेला–असे कावरेबावरे होऊं नका–या क्षणाला, आतांच चाललेला आहे. तुमच्या पापाची सीमा संपली. तुमच्या शरीराची हालचाल, तुमच्या मनाची चलबिचल—पलीकडच्या आरशांत पहा, तुमच्या पळून जाणाऱ्या पापाची ही भेदरलेली हालचाल पाहून तुमची तुम्हांलासुद्धां भीति वाटेल–तुमची ही दशा अट्टाहासानें ओरडून सांगत आहे, कीं माझ्या पतींना इथें न आणण्याची तुम्हांला सल्ला देणारी तुमची विवेकशक्ति या वेळीं तुमच्या शरीरांतल्या प्रत्येक अणुरेणूंत स्फुरण

करूं लागली आहे.

वृंदावन : ( स्वगत ) माझ्या शब्दांत जोर नाहीं, हें वसुंधरेचें म्हणणें खरें आहेसें वाटूं लागलें आहे. माझी स्थिति खरोखरींच चमत्कारिक झाली आहे. एक विचार अर्धामुर्धा होतो न होतो तोंच दुसऱ्याचा आरंभ होतो. डोळे फाडून पाहिलें तरी समोर असलेली वस्तु दिसत नाहीं; मनांतल्या मनांत उच्चारलेले शब्द खोल विहिरींतून निघालेल्या आवाजाप्रमाणें भेसूर घुमत आहेत. स्मशानांत अंधाऱ्या रात्रीं वावरणाऱ्या भेकड मनुष्याला तिथलीं झाडेंसुद्धां वाऱ्यानें किंचित् हाऌतांच आपल्याकडे पाहून कुजबुजताहेत, जमिनीला खिळलेले फत्तर आपल्याकडे सभय मुद्रेनें टवकारून पाहण्यासाठीं उठून उभे रहात आहेत, प्रत्येक पाऊल पुढें टाकतांच मागें मागें सरणारा दाट काळोखसुद्धां आपल्याला त्या भयाण जागीं एकटें टाकण्यासाठींच पळून जात आहे असे वाटतें, त्याप्रमाणेंच माझ्या भोंवतालच्या वस्तूंकडे पाहतांच मलाही नसते भास होऊं लागले आहेत. तुझ्या नजरेचा आमच्यावरचा अंमल पार उडून गेला आहे असें बजावून सांगण्यासाठीं साऱ्या वस्तु माझ्याकडे स्वतंत्र दृष्टीनें पहात आहेत. त्यांचा आकारसुद्धां उपहासाचा दिसत आहे. त्यांना कोणतें प्रत्युत्तर देऊं ? आणि वसुंधरेला तरी काय प्रत्युत्तर देऊं ? ( उघड ) वसुंधरे, माझ्या शरीरांतल्या अणुरेणूंत परमेश्वराचा संचार झाला असेल तर त्याचे सारे अणुरेणु दाही दिशांत उधळून टाकून, नुसता मनोमय वृंदावन आपला हेतु तडीस नेईल.

वसुंधरा : मग माघार कां घेतां ? शब्दांच्या रूपानें वाऱ्यावर वाहवणारी जीवनशक्ति कृतीच्या आकारांत कशी येणार ? माझ्या हातांतला हार मघांपासून तुमच्यासाठीं तिष्ठत आहे. हा पुष्पस्वरूप परमेश्वर तुमच्या पापांची कसोटी पाहून कंटाळून गेला आहे. तुमच्या पापाची त्याच्यावर कृपादृष्टि होऊं द्या.

वृंदावन : ( स्वगत ) स्वप्नांतल्या देखाव्यांत नुसत्या आकृतिच आपल्याला नकळत बदलत असतात, पण माझ्या भोंवतालच्या या पदार्थांचे तर गुणधर्मसुद्धां बदलूं लागले आहेत. इंद्रियांचें विषयाशीं नातें बदलून, प्रत्येक वस्तूची जाणीव अगदीं निराळ्या रूपानें होऊं पाहात आहे. स्वतः वसुंधरेकडे पहाण्याची गोष्ट नकोच, पण तिच्या हातांतल्या हाराकडेसुद्धां पहाण्याची हिंमत होत नाहीं; फुलांतलें सुगंधिसौंदर्य डोळ्यांना दिसेनासें होऊन, मनाला त्यांच्यांतली निष्ठुर क्षणभंगुरता मात्र जाणवत आहे. त्यांचा शुभ्रपणा काळवंडून या हाराला कृष्णसर्पाचें भयंकर रूप आलें आहे. माझ्या डोळ्यांतला काळेपणा या फुलांवर वठला, कीं या जादुगारणीनेंच या हाराचा काळा सर्प करून टाकला आहे ?

या सर्पानें माझ्या गळ्यांत मिठी मारली तर—छेः, सुगंधि श्वासाच्या ऐवजीं याच्यांतून निघणाऱ्या विषारी वाफांनींच मी नखशिखांत करपून निघत आहें. हा दिवासुद्धां अगदीं बदलून गेला आहे; या दिव्यांतलें तेज मावळून त्याची दाहकता उत्कट होत आहे; आपल्या तेजानें भोंवतालचे पदार्थ नीट दाखविण्याऐवजीं याची दाहकता माझ्या डोळ्यांना दुरूनसुद्धां जाळीत आहे. या दगलबाज दिव्याला फुंकून टाकलें म्हणजे याचें हें दाहक तेज, आणि या कृष्णसर्पाचा हा विषारी काळेपणा या दोषांचाही लोप होऊन जाईल— ( दिवा फुंकावयास जाऊं लागतो. )

वसुंधरा : नामर्द ! हा दिवा मालवून काय होणार ? हृदयांत प्रदीप्त झालेली ईश्वरी तेजाची जिवंत ज्योति हा दिवा मालवून विझेल काय ? वृंदावन, तुमच्या पापाची सीमा संपली; तुमच्या भेकड मनाच्यानें पापाच्या क्रूरपणाकडे आतां पाहवणार नाहीं. आज रात्रीं तुम्हांला तेजस्वी तारांकडे पाहवेना; माझ्या पतींना इथें आणण्याचा तुम्हांला धीर झाला नाहीं; तुम्हांला माझ्याकडे पाहवत नाहीं; या हाराकडे पाहवत नाहीं; या दिव्यानें तुमची दृष्टि दिपून जात आहे; तुमचें पाप इतकें भितरें आहे ! तुमच्या उद्धाराची वेळ हीच आहे; आणि वृंदावन—तुमच्याशीं आतां अनाथ वसुंधरा बोलत नाहीं, दीनाराची दुःखी आई बोलत नाहीं, तुमच्या ताब्यांत सांपडलेली दुर्दैवी पतिव्रता बोलत नाहीं, पण माझ्या शरीरांतल्या अणुरेणूंत संचरलेला, स्त्रीजातीचा पक्षपाती, पतिव्रतांचा पाठिराखा, स्त्रीस्वरूप परमात्मा, आपल्या पावित्र्याच्या अभिमानानें, स्वयंस्फूर्तीच्या उत्साहानें तुम्हांला निर्वाणीचे शब्द सांगत आहे, कीं हाच वृंदावनाचा उद्धारकाल. आणि वसुंधरा हीच वृंदावनाची उद्धार करणारी देवता ! माझ्या हातूनच तुमचा उद्धार होणार आहे !

वृंदावन : वसुंधरे, या बोलण्यानें माझ्यावर कांहीं परिणाम होणार नाहीं. हा पहा, माझ्या हातानें तुझा हात धरून या हाराचा स्वीकार करितों.

वसुंधरा : वृंदावन, या क्षणींच तें धाडस करा. व्हा पुढें. माझ्या कोंवळ्या दीनाराला कापून काढण्यासाठीं कट्यार उगारणारा तुमचा हात या वेळीं भीतीनें लटलटूं देऊं नका. आणखी वृंदावन, मी आतां अगदी अधीर झालें आहे; एक क्षणाचाही विलंब लावूं नका. तुम्हांला परमेश्वराची—तुमच्या पातकांची शपथ आहे, करा पुढें आपला हात !

वृंदावन : ( स्वगत ) आतां हिय्या केलाच पाहिजे. वृंदावन, हीच तुझ्या कर्तबगारीच्या कसोटीची वेळ आसे. ( उघड ) वसुंधरे, हा पहा मी तुझा हात

धरून तुझ्या पातिव्रत्याला पायाखालीं तुडवून टाकतों.

**वसुंधरा :** दीनाराचा बळी घेणाऱ्या परमेश्वरा, आतां तुझी लाज तुलाच!

( डोळे झांकून घेते. वृंदावन आवेशानें जातो व एकदम तिचे पाय धरितो. )

**वृंदावन :** वसुंधरे, तुझा दीनार मेला नाहीं, तो अजून जिवंत आहे.

**वसुंधरा :** ( डोळे उघडून ) कुठें आहे माझा दीनार ?

**वृंदावन :** ( उठून उभा राहतो. ) हा पहा–अशी दृष्टि तरळू देऊं नकोस. नाहीं तर वयानें वाढल्यामुळें तुझ्या दीनाराची तुला ओळख पटणार नाहीं! मेला तो वृंदावन, आणि हाच तुझा दीनार! नको, अशी संशयाच्या, रागाच्या, तिरस्काराच्या किंवा अनोळखीच्या दृष्टीनें आतां माझ्याकडे पाहूं नकोस! मीं तुझा हात धरिला असतां तर दोघांचा अधःपात झाला असता आणि तुझे पाय धरिले तर दोघांचाही उद्धार होईल!

[ तिचे पाय धरावयास जातो; ती हातानें त्याला थांबवूं लागते. ]

**वसुंधरा :** वृंदावन–

**वृंदावन :** वसुंधरे, वृंदावनाचा अवतार मघाशींच संपला! देवि, माझ्या उद्धाराच्या आड येऊं नकोस. ( तिचे पाय धरितो. ) माते, त्या दीनारावर तूं दुग्धामृताची वृष्टि केलीस, आतां या दीनारावर आपल्या मंगल अश्रूंचा अभिषेक कर! त्या भाग्यशाली बाळकाला हातावर झेललेंस; माते, या तुझ्या पातकी बाळाला तुझ्या पवित्र पायांचीच जोड दे! माते, मला दूर लोटूं नकोस!

( तिच्या पायांवर डोकें ठेवितो. )

**वसुंधरा :** उठा, वृंदावन, काय हें ?

**वृंदावन :** काय हें ? पतिव्रते, हा तुझा पुण्यप्रभाव! पतिव्रतांची पुण्याई पातकी पुरुषालाही परमेश्वराच्या पदवीला पोंचविते आणि नरपशूला नारायणस्वरूप करिते! पतिव्रतेच्या पुण्याईपुढें पाप पांगळें पडून तिच्या पायांशीं अशी लोळण घेतें!

**वसुंधरा :** वृंदावन, तुमच्या उद्धाराबद्दल तुम्ही त्या पतितपावन परमेश्वराचे पाय धरा!

**वृंदावन :** नाहीं, माझा परमेश्वर तुझ्या पायांशींच आहे! माझा उद्धार व्हाव याला कारण तुझा पुण्यप्रभाव!

[ राजा, भूपाल, कालिंदी, व मागाहून युवराज, सुदाम, दामिनी, कंकण, नूपुर व किंकिणी प्रवेश करितात. एकीकडून ईश्वर बाहेर येतो. ]

**राजा :** आणि तुमच्या कालिंदीचाही पुण्यप्रभाव! वृंदावन, कालिंदीच्या तोंडून

आणि आतां इथें राहून ऐकिलेल्या गोष्टींवरून तुमच्या अपराधाची तीव्रता बरीच कमी झाली नसती तर तुमचें तोंडसुद्धां पाहण्याचा मीं तिरस्कार केला असता.

**वृंदावन :** आणि, महाराज, या दिव्यपदांचा आधार मिळाला नसता तर मला-सुद्धां आपल्याला तोंड दाखविण्याचा धीर झाला नसता. आज ईश्वरानेंच मला ही सद्बुद्धि दिली.

**राजा :** कालिंदी, तुझी हकीकत ऐकण्याच्या भरांत, तुला साहाय्य करणाऱ्या त्या ईश्वरांना बोलाविण्याचें तसेंच विसरून राहिलें. कोण आहे—

**ईश्वर :** महाराज, आपण नामोच्चार केल्यामुळें धन्य झालेला हा ईश्वर प्रणाम करीत आहे.

**राजा** उठा, ईश्वर, तुम्हीं या पतिव्रतेला खरोखरींच मोठें साहाय्य केलें आहे. आतां सर्वांना साद्यंत वृत्तांत ऐकण्याची जिज्ञासा झाली आहे ती तृप्त करणें तुमच्याकडे आहे.

**ईश्वर :** वृंदावन, एका कठोर कार्यांत तुमच्या मनाविरुद्ध कालिंदीबाईंना साहाय्य केल्याबद्दल मला क्षमा करा. महाराज, यांनीं दीनाराला मारण्याची शपथ घेतल्यामुळें आम्हांला कपटमार्गानें जाण्याखेरीज गत्यंतर नव्हतें; म्हणून ऐनवेळीं दामिनीचा बुरखा पांघरून कालिंदीबाई तळघरांत हजर राहिल्या; आणि वसू, आतां वृंदावनांनीं म्हटल्याप्रमाणें तुझा दीनार खरोखरीच जिवंत आहे. दामिनी, इकडे ये पाहूं. (दामिनीजवळून दीनाराला घेऊन वसुंधेरजवळ देतो.) वसुंधरे, हा घे तुझा दीनार !

**वसुंधरा :** देवा, तुझ्या करणीला कठोर मानिलें त्याची क्षमा कर! नाथ, हा आपला दीनार !

**वृंदावन :** मग त्या वेळीं माझ्या हातून—(एकदम) कालिंदी, आपला केतन कुठें आहे?

**कालिंदी :** नाथ, क्षमा करा. या सूर्यदर्शनानें इतर तारका नाहींशा होत असतील; पण तारकापदाला पोंचलेला आपला बाळ हा भाग्यशाली प्रसंग पाहण्यासाठीं अजून आकाशांत घुटमळत असेल. नाथ, आपण ज्याचा वध केला तो दीनार नव्हता—आपला केतन होता; आणि त्या क्रूर कृत्यांत दामिनीनें आपणांला साहाय्य केलेलें नसून आपल्या या अपराधी सहधर्मचारिणीनेंच तें केलें. नाथ, आपण बोलत कां नाहीं? या अपराधाची मला क्षमा होईल ना?

**ईश्वर :** कालिंदीबाई, हा शोक आवरून धरा. आणखी एक गोड कपट मला करावें लागलें. तुम्हीं बाळगोळी मागितल्यामुळें तुमच्या बेताची खरी कल्पना

मला झाली. पुढें केतनाला घेऊन संध्याकाळीं तुम्ही माझ्या आश्रमांत आलां त्या वेळीं तुमची नजर चुकवून तुमच्या केतनाच्या जागीं त्याच दिवशीं मेलेलें एक मूल आणून ठेविलें. त्या मुलाला घेऊन नंतर आपण तळघरांत गेलों. वृंदावनांनीं निर्जीव हत्या केली आणि कालिंदीबाई—(दामिनीजवळून केतनाला घेऊन) हा घ्या तुमचा केतन!

कालिंदी : बाळ, माझ्याशींसुद्धां असें कपट केलेंस? नाथ, या लबाडाला कांहीं शिक्षा करायची होती. अगबाई, आपलें तोंड असें गोरेंमोरें कां? आपल्या कृपादृष्टीनें माझ्याकडे एकदा पहायचें होतें!

वृंदावन : पापाला वर पाहण्याचा धीर होत नाहीं आणि पश्चात्तापाची नजर खालीं वळलेली असते. देवी, दिव्यदर्शनानेंही न दिपून जाणारे डोळे मी कुठून आणूं?

कालिंदी : नाथ, दयेचे डोळे पाण्यानें डबडबलेले असतात आणि क्षमा तर आंधळीच असते.

वृंदावन : महाराज, मी आपल्याजवळ कोणत्या तोंडानें क्षमा मागूं?

राजा : आणि मी तरी तुम्हांला कोणत्या तोंडानें क्षमा करणार? मी स्वतःच क्षमेची याचना करणारा आहें. आपण दोघांनींही आधीं भूपालांची क्षमा मागितली पाहिजे. भूपाल, वृंदावनांचा जाणता आणि माझा नेणता अपराध अगदीं अक्षम्य असले तरी—

भूपाल : महाराज, अक्षम्य असा अपराध कोणताच नाहीं. दुसऱ्याला क्षमा न करतां येणें हाच एक क्षमा न करतां येण्याजोगा अपराध आहे. महाराज, माझी क्षमा मागण्याऐवजीं आपण सर्वांनीं या परोपकारी पाहुण्यांना आधीं धन्यवाद दिले पाहिजेत.

ईश्वर : मंडलेश्वर, माझ्या जागीं दुसरा कोणताही मनुष्य असता तरी त्यानें असेंच केलें असतें; यांत माझे धन्यवाद कसचे?

वसुंधरा : ईश्वर, त्या दिवशीं केलेली विनंती मी तुम्हांला आज पुन्हां करितें; या आनंदाच्या प्रसंगीं, पुनः संसारांत पडण्याचें तुम्ही आम्हांला वचन द्याल का? तुमच्या सुखानें आम्हां सर्वांचें सुख द्विगुणित होईल.

ईश्वर : वसू, क्षमा कर; सर्वांना सुखी व्हावयाला या जगामध्यें वाव नाहीं. (दोन्ही मुलें जवळ घेऊन) जगाच्या बागेंतल्या वृक्षलतांचे कोंवळे अंकुर खांद्यावर खेळविण्यासाठीं वठलेल्या वृक्षांचीही जरूरी असतेच. झालेल्या प्रकारांतच मी खरा आनंद मानितों.

इंद्रायुध : मंडलेश्वर, आज महाराजांच्या अनुज्ञेनें मी आपणाला पुनः वंदन करितों.

राजा : भूपाल, वृंदावन, वसुंधरा आणि कालिंदी यांच्यासारख्या देवी जर वारंवार अवतरूं लागतील, आम्हां पुरुषांच्या निर्बूज नजरेला त्यांची नाजूक योग्यता दिसूं लागेल, या देवींच्या तेजाचा घरोघरीं अवसर मिळूं लागेल तर आम्हां आर्यांचें आर्यावर्त, देवांचें देवावर्त होईल ! भूपाल, परमेश्वरानें यापेक्षां आपलें कोणतें प्रिय करावें ?

भूपाल : आनंदातिशयामुळें परमेश्वराजवळ काय मागणें मागावें हेंच सुचत नाहीं. तथापि त्याच्या चरणांपाशीं एवढीच विनंती आहे कीं–

[ जो नटवर भवहर० ]

हे प्रभुवर धृतिबल वितरीं लोकीं त्यागास्तव खरतर । सुखि
तरि विहित-शुभ समया ॥ ध्रु० ॥ आर्यावर्ती आर्या । मान्या
गणाया । दे नयपर सुमति पुरुषां । विनवित सविनय ॥ १ ॥

राजा : तथास्तु !

***अंक सहावा समाप्त***

# राजसंन्यास

# राजसंन्यास

## अंक पहिला

### प्रवेश पहिला

**पांच देवींचा पाळणा**

गुणि बाळ असा जागसि कां रे वायां ।
नीज रे नीज शिवराया ॥ ध्रु० ॥
अपरात्रीचा प्रहर लोटला बाई ।
तरि डोळा लागत नाहीं ॥
हा चालतसे चाळा एकच असला ।
तिळ उसंत नाहिं जिवाला ॥
निजवायाचा हरला सर्व उपाय ।
जागाच तरी शिवराय ।
चालेल जागता चटका ।
हा असाच घटका घटका ।
कुरवाळा किंवा हटका ।
कां कष्टविशी तुझी सांवळी काया ।
नीज रे नीज शिवराया ॥ १ ॥

ही शांत निजे बारा मावळ थेट ।
शिवनेरी जुन्नरपेठ ॥
त्या निजल्या ना तशाच घाटाखालीं ।
कोंकणच्या चवदा ताली ॥
ये भिवबाया बागुल तो बघ बाळा ।
किति बाई काळा काळा ॥
इकडे तो सिद्धि–जमान
तो तिकडे अफजुलखान ।
पलिकडे मुलुखमैदान ।
हे आले रे तुजला बाळ धराया ।
नीज रे नीज शिवराया ॥ २ ॥

[ स्थळ : मालवणचा पाणकोट सिंधुदुर्ग. काळ : संध्याकाळ. पात्रें : गडाच्या बुरुजावर श्रीसंभाजीमहाराज, सिंधुदुर्गचा किल्लेदार दौलतराव शिरके ( दर्यासागर ), सिंधुदुर्गचे गडकरी, रायाजी मालुसरे ( सेनासागर ) वगैरे. खालीं घाटावर तुळशी, मंजुळा, घाटाजवळ होडी. तिच्यांत उतरण्यासाठीं तुळशी एक पाय टाकीत आहे; मंजुळा तिचा हात धरीत आहे. शेजारीं संभाजीमहाराजांचें जहाज तयार आहे. ]

मंजुळा : बाईसाहेब, माझ्या गळ्याची शपथ आहे. समुद्र इतका खवळलेला आणि अशांत तुम्ही होडी टाकणार ?

तुळशी : मंजुळे, सोड माझा हात ! ही तुळशी मिळमिळीत मनाची नाहीं.

मंजुळा : बाईसाहेब, नांवाजलेल्या नाखव्याची अक्कलसुद्धां अशा वेळीं पाण्यांत पडून जिवाचें पाणी व्हायचें; अशांत उगीच जिवावर पाणी सोडायचें ?

तुळशी : बेफाम दरिया पुळणी ओलांडून भेटायला आला, ओरडत्या लाटांनीं आळवूं लागला, तुफानी फेसानें हंसायला लागला आणि अशा वेळीं घरगौरीची पूजा बांधून बसायचें ?

मंजुळा : बाईसाहेब, दर्यासागर अशानें रागास येणार नाहींत का ? मी आपली सांगेन, माझा हात झिडकारून बाईसाहेब पुढें झाल्या.

तुळशी : दर्यासागर दौलतराव रागास येतील ! लग्नाची माळ मला अशी जखडणार नाहीं ! बाशिंग इतकें डोईजड मी होऊं देणार नाहीं ! तुझा हात झिडकारून — दौलतरावाचा हात तोच तुझा हात ! अग, लाखांत एखादा हात खरा असतो. जगाच्या बाजारपेंठत माणसांचीं बाहुलींच फार विकायला येतात.

त्या बाहुल्यांतल्या बायका–पुरुषांचे हात सारखेच ! बांगड्यांनीं बायकी हाताला खूण बांधून होत नाहीं !

मंजुळा : बाईसाहेब, असें करें बोलावें ! जनरीति बघायला नको का ? घरांत सुख थोडें का आहे ?

तुळशी : सुखाला बाहेरचा वारा सोसत नाहीं वाटतें ? घराच्या कोंडवाड्यांत जीव श्रमी करून घ्यायचा हेंच बायकांचें सुख वाटतें ? इथें बसूं नकोस, असें हसूं नकोस, तिथें जाऊं नकोस, तसें गाऊं नकोस, इकडे पाहूं नकोस, तिकडे राहूं नकोस ! इतक्या आडवाटेनें सुखाचा पल्ला गांठायचा ! मी अशी सांगितल्या बुद्धीची नाहीं. पांख मोडल्यावर मैना कसली ! गळा दाबल्यावर कोयळ कसली ! दांत पाडल्यावर नागीण नाहीं ! डोळे फोडल्यावर वाघीण नाहीं ! जा; सोड माझा हात. [ होडी चालू करते. ]

संभाजी : दर्यासागर दौलतराव ! तुमच्या छत्रपतींला भीति घालतांना तुम्हांला भीति वाटत नाहीं ? समुद्र जरासा खेळायला लागला म्हणून तुम्हांला धास्ती वाटते ?

दौलतराव : राजे, हा समुद्राचा खेळ नाहीं, पण कळिकाळाचा खेळ आहे ! मोडत्या लाटेचा जबडा उघडून दर पळास बुरजाचा घांस घेण्यासाठीं — जमिनीला गिळण्यासाठीं समुद्र बेगुमान बळानें धडपडतांना दिसत आहे. चौदा रत्नांची चोरी हुडकण्यासाठीं उभ्याआडव्या अंगानें आकाशपाताळ धुंडाळीत आहे. अशा वेळीं प्रत्यक्ष छत्रपतींना — रायगडच्या कोंदणांतल्या या रत्नाला — उघड्या-वर टाकून चालायचें नाहीं. अशा प्रळयांत समुद्रांत गलबत टाकणें हिशेबी नाहीं.

संभाजी : मग अंगणांत फिरविण्यासाठीं गलबतें केलीं आहेत वाटतें ? दर्यासागर दौलतराव, अशा बेहिमतीनें रायगडच्या रियासतीची आरमारी अब्रू तुम्ही कशी संभाळणार ? ही जलवंती म्हणजे सिंधुदुर्गाच्या जनानखान्यांत अडविलेली रायगडची राणी आहे ! जलवंतीच्या जोबनाचा लाटेचा पदर वारा वाहील तसा उघडूं लागला, तर आपल्या जिवाच्या जरबेनें तिच्या जनानी जोराला दडपून टाकिलें पाहिजे !

दौलतराव : सरकार, कारणावांचून धोक्यांत उडी टाकणें बऱ्या बुद्धीचें लक्षण नाहीं. गडावर आज गेलें काय आणि उद्यां गेलें काय, सारखेंच ! ही कांहीं घटका मोजण्याची वेळा नव्हे. तुफान दरिया डोळ्यांसमोर नाचूं लागला म्हणजे नजरेचा भोंवरा गरगरायला लागून जिवाला घेरी येते; जीव जाण्यापूर्वीं मरण येण्याचा हा प्रसंग ! बिनासबब जिवाची खैरात करण्यांत काय हंशील ?

संभाजी : कारण पडेल तेव्हां नामर्दाचासुद्धां मर्द होतो; पण जातिवंताचा जीव हरघडी जातीला हुडकीत असतो. देवाची दांडगी दुनिया अशा रीतीनें आभाळांत तेजाच्या चमकीनें नाचूं लागली, गडगडून वादली बडबड करूं लागली म्हणजे कच्च्या जिवाच्या जनावरांच्या माना मोडतात, जिभा जखडतात, जीव जडावतात; पण त्या वेळीं जंगलशाहीच्या बादशहाची सिंहगर्जना सुरू होऊन वरच्या अस्मानी सवालाला जमिनीचा जबाब मिळतो ! धरणीमातेचें हृदय या तुफान दरियाच्या अवतारानें उचंबळून आलें म्हणजे तिच्या अस्सल बाळाचा — मैदानमाप छातीच्या मर्दाचा — दिलाचा दरिया बेकदर नाचायला लागतो ! तुम्हांला नुसत्या ऐकिवानें जाणवायचें नाहीं! राया, तूं सिंहगडच्या सुभेदारांचा — तानाजी मालुसऱ्यांचा — बच्चा आहेस, मराठ्यांचा सेनासागर आहेस. तुला वाटतें ना माझ्यासारखेंच ? बेडर जीवानें तूं टाकशील का उडी या भेसूर मौजेंत ?

रायाजी : बेशक ! पण केवळ माझ्या शिवांगीसाठीं ! माझी हरवलेली शिवांगी या दरियानें गिळिली आहे अशी कुणीं माझी खातरजमा करून दिली, तर या खवळलेल्या दरियाचा एका ओंजळीनें उपसा करीन; अलम देशदुनिया नजरेच्या टापूंत आणून देण्याइतकी एखादी लाट उभी चढली तर माझ्या शिवांगीला न्याहाळण्यासाठीं त्या ताडमाड लाटेच्या कळसाला जाईन ! शिवांगी ! शुभांगी ! शिवगंगा ! तिच्यासाठीं वाटेल तें करीन ! तिच्यावांचून मात्र मन रमत नाहीं, जीव जमत नाहीं !

संभाजी : राया, इष्काचा शिपाई तुझ्यासारखा बेदर्दच असतो. जिवाशीं जडविलेल्या जिवासाठीं अंतकाळाला लाभकाळ समजावें लागतें !

[पडद्यांत : मंजुळा : धावा हो धावा ! होडी उलटली ! धावा हो धावा ! बाईसाहेब दिसेनाशा झाल्या. ]

कोणाची आरोळी ही ?

किल्लेदार : ही मंजुळेची आरोळी. बाईसाहेबांची होडी उलटली वाटतें !

संभाजी : बाईसाहेब म्हणजे दर्यासागरची तुळशीच ना ? दौलती, अजागळासारखा आ करून कां उभा राहिला आहेस ? तुला प्रसंग पाहिजे होता ना ?

दौलत० : बेताल जिवाची धडपड म्हणजे प्रसंग नाहीं. तिला आज राखली तर तीं उद्यां मरेल. अष्टौप्रहर काळाच्या कडेवर खेळणाऱ्या या बेमुरवत बायकोसाठीं जिवाचें मोल ठरविण्याइतका मी मूर्ख नाहीं. वाऱ्याच्या लहरींनीं दरिया नाचायला लागला, मनाच्या लहरीनें या वेळीं तुळशी नाचायला लागली ! असें बेताल नाचतांना एखादें पाऊल मृत्युलोकाच्या हद्दीबाहेर पडायचेंच !

रायाजी : ( स्वगत ) नशिबाचा शिकंदर पण करणीचा कमकुवत! इक्काच्या शिपायाला अशी मोलाची मोहीम लाभायला या दौलतीसारखें संगीन भाग्य असावें लागतं. माझ्या शिवांगीची बुडती आरोळी अशी माझ्या कानावर येईल तर शेषाच्या लांबणीनें हा हात काळाच्या असा तोंडांत घालून त्याच्या आंतड्यांसकट शुभांगीला बाहेर काढिली असती !

संभाजी : दौलतराव, साबाजी शिरक्याच्या पोटीं तुझा जन्म झाला — बेअब्रूला वेहेत्तर करील, पण या वेळीं तुला असा पाहिला तर साबाजी आपली अवलाद नाकबूल करील ! तुळशीचा तूं नवरा आहेस. हिरोजी फरजंदानें आपल्या गोठ्यांतील गाय तुझ्या राखणीला घातली असें का तुला वाटतें ? साबाजी मेल्यावर त्याची तल्वार त्याच्या शवाच्या कमरेलाच बांधली पाहिजे. तुझ्या-सारख्या मेल्या माणसापेक्षां त्या जित्या मुडद्याची सोबत तिला मानाची वाटेल.

[ पडद्यांत–मंजुळा : धावा हो धावा ! ]

नवऱ्याचें नांव सांगणाऱ्या नामर्दा, देवाखातर तरी उडी टाक.

दौलत० : राजे, माझ्या मनाची मुखत्यारी तुमच्याकडे नाहीं !

संभाजी : नवऱ्यानें बायको बुडविली तरी राजानें प्रजा तारली पाहिजे. राया, तुळशीच्या बांगड्यांची बेडी करून या नामर्दाला कैद कर. ती तोडण्याची याच्या अंगांत ताकद नाहीं. दौलतराव, हिंमतमर्दा तो मदत खुदा. तुळशीच्या मर्दानी हिंमतीला हात देण्यासाठीं, हा पाहा, रायगडचा परमेश्वर समुद्रांत उडी टाकतो आहे !

[ उडी टाकतो. ]

रायाजी : दौलतराव, मराठीशाहीच्या दर्यासागराची नालायकी दाखवून तूं मोकळा झालास. किल्लेदार, गलबत घेऊन राजांच्या मागोमाग चला.

किल्लेदार : सेनासागर, दौलतरावांनीं राजांना सांगितलें तेंच मी पुन्हा तुम्हांला—

रायाजी : या सिंधुदुर्गावरचीं सारींच माणसें मृतमुखी दिसतात. किल्लेदार, गलबत टाक म्हटलें म्हणजे टाक ! सागर खवळला तरी मर्यादेंत राहील; पण हा सेनासागर खवळला तर सीमा सुटतील !

दौलत० : जाऊं देत किल्लेदार, नाखव्याला म्हणावें नांगर सोड–( एकीकडे ) खुशाल यांच्या घरादारावरून फिरूं देत.

[ तुळशीला हातावर घेतलेली असा संभाजी दृष्टीस पडतो. ]

संभाजी : तुळशी, घाबरूं नकोस; डोळे उघडून नीट पाहा.

तुळशी : कोणीं मला हात दिला ? तुळशीचें यश कुणीं हिरावून नेलें ?

संभाजी : रायगडच्या रणमर्दानें ! ( तुळशी डोळे उघडून पाहते. ) तुळशी, अजून भेदरल्यासारखी कां दिसतेस ?

तुळशी : तुळशी कधीं भ्याली नाहीं ! त्रिखंड धुंडाळून मला भीति सांपडली नाहीं, म्हणून तिला पाहण्यासाठीं आज या दरियाच्या तळाचा ठाव मी पाहात होतें.

संभाजी : तुळशी, जिभेचा भरंवसा कुणीं धरावा ? माणसाला जीभ खोटें बोलण्यासाठीं मिळाली आहे; जिवाची खरी भाषा अवघ्या अंगांनीं बडबडते. तूं भ्याली नाहींस, मग हें काय आहे ? नुसत्या फॅंसाचा मारा चुकविण्यासाठीं भित्री नजर पापणीच्या पडद्याआड होते आहे; उसळत्या पाण्यानें गालां-ओठांवरली गुलाबी शोभा धुऊन गेली आहे. छातीच्या धरणीकंपानें जोबन-शाहीच्या किल्लेकोटांना चळ भरल्यामुळें भ्यालेल्या जिवानें साऱ्या देहावर ही कांटेरी शिबंदी उभारली आहे. ही भीति नाहीं का ?

तुळशी : नाहीं; एकदा नाहीं; लाखदा नाहीं. चतुरा, आपण चुकलां. या चपळ पाणभुईवर आपली नजर न टरल्यामुळें आपल्या डोळ्यांना प्रीतीचें पहिलें रूप भीतीसारखें दिसलें. इतकें का हें पाणी चंचळ आहे ? मला अजून भीतीप्रमाणेंच प्रीतीचीसुद्धां — वीरा, नेटकी नजर रोखून असें निरखून पाहूं नका. माझ्या पहिल्या बोलण्याची — मर्दुमकीची शेखी केल्याची रायगडच्या रणमर्दा, नारीजातीला क्षमा करा. ही तुळशी आज भ्याली आहे.

[ मान खालीं घालते. ]

संभाजी : साजणी, आपण काय बोलतां हें ! पाणी चंचल आहे, पण मन पाण्याहून चंचळ आहे. माझ्या मनाची उडी आपल्या बोलांच्या पलीकडे जाते आहे का ? साजणी, तुमच्या जिवाखातर समुद्राचा ठाव काढण्यासाठीं मी झटलों; पण तुमच्या मनाचा ठाव—

तुळशी : देवा, आतां तेही कष्ट घेऊं नका आणि हेही कष्ट घेऊं नका. मानसींच्या राजहंसा, माझ्या मनीं उडी घेऊं नका. जें कधीं काळीं घडायचें नाहीं त्यासाठीं रडायचें कशाला ? आजवर कोणत्याही पुरुषाच्या डोळ्याला डोळा भिडवितांना तुळशीची नजर चळली नाहीं, पापणी ढळली नाहीं. नवख्या नजरेचा नेम चुकविण्यासाठीं कधीं पदर सांवरला नाहीं, कधीं जीव बावरला नाहीं. आज तुळशीचा अभिमान उतरला. रायगडच्या राजाला पाहण्यासाठीं डोळ्यांत जिवाची प्रभा दाटली, ताजिमीसाठीं देहावर कांटेरीसभा थाटली, नजरेच्या एकाच फिरतीनें डोळ्यांत रूपरेखेची सांटवण झाली, तुळशीला पदराची

आठवण झाली. पुन्हां आपल्याकडे पाहतांना नजरेची ज्योत पापणीनें मालवली — उरींची लाज पदरानें पालवली. आज जवानमर्दीच्या बादशहानें माझ्या जोबनवंतीला कांटेरी भूषणें बहाल केलीं. आपल्या देहाच्या स्पर्शानें माझा देह नटला, पण जीव हटला. महाराज! तुळशीच्या हटलेल्या जीवासाठीं या दांडग्या दरियाशीं झगडून देह कष्टवूं नका. आतां जीव नकोसा वाटतो.

संभाजी : रायगडच्या रणमर्दाला यांत कष्ट होणार? साजणी, उचंबळती लाट डोक्यावरून निघून गेल्यावर, घाबरल्या हातांनीं तोंडावरचे केस मागें सारतांना चुकार केसांचा एखादा गोफ तसाच गालावर खेळत आहे! लाटेच्या माराला भिऊन झिरझिरीत पदर आपल्या उराशीं लपत आहे! उघडत्या पापणीवरच्या तुषारांमुळें डोळ्यांची धांदलीनें उघडझांक होते आहे; आपल्या मस्तकीं बसल्यानंतर पुन्हा पाताळपाणी पाहावें लागणार म्हणून एकेक पाण्याचा थेंब आपल्या केशपाशावरून सावकाश दिलगिरीनें सुटत आहे! गर्दीनें उघडत्या झांकत्या डोळ्यांवरून पळणाऱ्या एखाद्या थेंबांतून मावळता सूर्यनारायण आपल्या तिरप्या तीरांनीं सोनेरी नेम साधून तुमच्या डोळ्यांना दिपवीत आहे! नजरबंदीनें क्षणभर घाबरल्यामुळें आपली माझ्या अंगाभोंवतींची मिठी किंचित् जोराची होऊन मला माझ्या बळाचं सार्थक वाटत आहे. अशा वेळीं कष्टाचा कोण केवा! सौंदर्याची नाजूक सेवा करितांना पराक्रमाला कौतुकांची कोंवळीक लाभते! सुंदर साजणी, या वेळीं माझ्या रंगलेल्या मनाला दिलगिरीचे बोल ऐकवूं नका. लाटांचे बोल आदळून देह कष्टत नाहीं; पण उदासवाणी बोल ऐकून माझ्या जिवाला मात्र कष्ट होतात. जगाचा — जिवाचा — असा कंटाळा करायचें काय कारण आहे?

तुळशी : जगाचा — जिवाचा कंटाळा? दुबळ्या संगतींत स्वर्गाचा, देवांचासुद्धां कंटाळा येईल. आतां रायगडच्या रणमर्दानें काया शृंगारल्यानंतर — आतां दौलतरावासाठीं जीव जगवायचा! जातीच्या जिवाशीं ओळख पटल्यावर कमजिवाशीं खेळायचें? रामाशीं मन रमल्यावर माकडाशीं मिठ्या मारायच्या! काळ्या मातीच्या मोलानें कस्तुरीची किंमत करणाऱ्या दौलतरावाचा भातुकलीचा संसार थाटण्यासाठीं रायगडच्या देवाला अशा कष्टांत पाडायचें! देवा, पुन्हा या मर्दुमकीच्या छातीवर मान विसांवून डोळे झांकून पडूं द्या; माझा जीव अशा सुखाच्या सागरांत बुडाला असतांना माझा देह या सागरांत बुडवून टाका! ज्या हातानें मला जीवदान दिलें, त्याच हातावर माझ्या देहाचें दान करण्यासाठीं मीं या उदंड दरियाचें पाणी सोडलें आहे. आतां मला वांचवूं

नका. जोबनशाहीच्या बादशहा, आपल्या स्पर्शानें या देहावर चढविलेलीं हीं सोळा शिणगारांचीं कांटेरी लेणीं आतां उतरूं नका. अशा थाटांत मला मरणाच्या दारीं पोंचवा. सह्याद्रीच्या राजसिंहा, सिंधुदुर्गाच्या वाघिणीची अशी गाय करून तिला चार भिंताडांच्या कोंडवाड्यांत गुजरूं नका. दुबळ्या दौलतरावाच्या पलंगाच्या पाळण्यांतल्या प्रेमाच्या पोरखे—(एकदम लाजून) रणमर्द, दौलतरावाला नाहीं — उभ्या जगाला नाहीं — तुळशी तुम्हांला लाजली आहे.

**संभाजी :** आपली मर्जी आम्हांला हुकमतीनें वांकवील. साजणी, याच पावलीं रायगडावर चला. भगीरथ प्रयत्नानें लाभलेली ही शृंगाराची रसगंगा रायगडच्या शंभुदेवाला तिन्ही त्रिकाल शिरसावंद्य होईल. दुबळ्या दौलतरावाची तुळशी दरियांत बुडून मेली! रायगडच्या रणमर्दानें पाताळांतून एक नागकन्या बाहेर आणिली.

**तुळशी :** दिलदार, इतका आपला धीर होईल का? लग्नाच्या बेडीनें आपले जीव निरनिराळ्या जिवांशीं जखडले आहेत.

**संभाजी :** दिलवर, गालावर सांडलेली ही गुलाबी शराब पाजून या जीवाला धुंद करा, म्हणजे मातीच्या मोलांनीं घडलेल्या लग्नाच्या दुबळ्या बेड्या ती तुफान ताकदीनें तडातड तोडून टाकील! अशा वेळीं मृत्युलोकींच्या पामर नियमांची काय पर्वा आहे! एकाच क्षणाच्या आरंभीं, हेलकाव्यानें पातळापर्यंत खालावून आपल्या डोळ्यांचीं किरणें शेषाच्या फणींतल्या मण्यांच्या किरणांशीं खेळत आहेत, तर त्याच क्षणाच्या शेवटीं डोंगरलाटेसरशीं आम्ही आभाळाला भिडून आमचे डोळे चांदण्यांशीं गोष्टी सांगत आहेत. अशा रीतीनें क्षणमात्रांत आकाशपाताळ एक होतांना मृत्युलोकावर नजर कशी ठरणार! प्यारी, मानवलोकींचीं लग्नं रद्द करून, रायगडचा राजा आज तुझ्याशीं पुन्हा लग्न करीत आहे; मस्तकावरून सुटणाऱ्या या थेंबांची — सौंदर्याच्या या मोत्यांची — बिनसरांची मुंडावळ तुझ्या कपाळीं शोभते आहे! समोर संध्याकाळचा होम पेटला आहे! तुफान दरियांत मरणाचा नेम नसल्यामुळें काळाचा एकच पाश आपल्या दोघांच्या कंठांत आहे; त्याचीच लगीनमाळ करून डोंगरलाटेच्या बोहल्यावर, मावळत्या देवाच्या साक्षीनें, मरणाचा मुहूर्त साधून रायगडचा राजा मनाच्या मुक्या मंत्रानें, तुळशी, तुझ्याशीं लग्न लावीत आहे.

[ तिचें चुंबन घेऊं लागतो. पडदा पडतो. ]

[ स्थळ : रायगड, जिवाजीचें घर. पात्र : जिवाजीपंत कलमदाने लेखणी करीत आहे. ]

जिवाजीपंत : [ लेखणीचा टाक तोडून–स्वगत ] वारुळांतली दोन जिभांची पिवळी नागीण चावली तर एकाच पिढीचा घात होतो; पण कारकुनी कानावरची ही दोन जिभांची काळी नागीण डसली तर सात पिढ्यांचा सत्यानाश करिते. काय लेखणी झाली आहे पण ! आम्हां कलमदान्यांच्या घराण्यामध्यें लेखणी करण्यांत हा जिवाजी म्हणजे केवळ शिवाजीसारखा शकर्ता पुरुष निपजलेला पाहून माझ्या वाडवडिलांना इतका आनंद झाला असेल कीं, अखेरवहीवर त्या आनंदाची जमा करितांना चित्रगुप्ताच्या कैक लेखण्या बोथट झाल्या असतील ! वडिलांच्या पुण्याईनें आस्तेआस्ते मी असाच लौकिक बदलून ठेवणार आहें, कीं भवानीच्या जोरावर शिवाजीनें रायगडची दौलत मिळविली, पण या कलमेश्वरीच्या करामतीवर जिवाजीनें ती सारी आपल्या घरीं पळविली ! अशी लेखणी हातीं आल्यावर वाटेल त्याच्या हातचें वळण काढून दाखविणें म्हणजे या शाईभरल्या हातचा मळ आहे नुसता ! गाईच्या एका देहांत तेहतीस कोटी देवांचे देह सामावतात; तद्वत् या जिवाजीच्या एकाच लेखणींत उभ्या दक्षिण देशाचा दस्तुरखुद्द एकवटलेला आहे ! चिटणिशी वळण पाहिजे तर चिटणिशी वळण ! राजांच्या हातचें कलम म्हटलें, कीं राजांच्या हातचें कलम ! जसें कांहीं त्यांच्या हातचें कलम करून माझ्या देहाला लाविलें आहे ! या कलुशा कबजीचें कनोजी कसब म्हणजे खरें म्हटलें तर परदेशी वळण; पण तेही वळणीवर आणलें अखेर ! अक्षरांच्या तऱ्हा अगदीं हुकमी ! गिचमिड अक्षरें काढलीं तर वडारणीचे केस उकलतां येतील, पण तीं अक्षरें उकलायचीं नाहींत ! मोकळ्या लिपींत दोन दोन अक्षरांत एकेका गांवठाणाची ओसाडी सोडायची ! एका अक्षरावरून दुसऱ्यावर नजर टाकण्यासाठीं वाचणाराला घोडदौडीनेंच मैदान कापावें लागायचें ! बरें, आपल्या स्वतांच्या अक्षरांत एका लिखाणाचें दुसऱ्या लिखाणाशीं सगोत्र वाटायचें नाहीं. एकांत नवशिक्या पोरीनें केलेल्या तिळगुळाचे ओबडधोबड दाणे तर दुसऱ्यांत नुसते मोत्यांचे दाणे ! एक अक्षर अगदीं आंधळ्यानें वाचावें, तर दुसरें डोळसाची आंधळ्यासारखी दिशाभूल करणारें ! पण अक्षर बदललें तरी

मजकुराच्या धोरणांत मात्र सर्रास कारकुनी कावेबाजी ! लिपी बाळबोध असो कीं मोडी असो, मजकूर एकजात नागमोडी चालीचा ! आतां इतकें केल्यासारखें आमचा भावार्थ सिद्धीस जातो कीं नाहीं बघायचें. नाहीं तर ललाटींच्या रेषाही नागमोडीच असायच्या ! नाहीं; पण, संभाजीराजांनीं या कलुशाला प्रधान केल्यापासून आमच्या सद्दीचा जोर असा बळावत चालला आहे, कीं नशिबाच्या रेषा कपाळावर सांखळींनें आंखलेल्या गंधागत नीटस वटलेल्या आहेत असेंच वाटतें ! ही असामी मात्र खरी नागमोडी मनाची आहे ! अगदीं इरसाल असामी ! इतका नीच माणूस इतक्या उंच जागीं बसलेला कधीं कुणीं पाहिला नसेल ! कुठून कनोजी उंची अत्तरें विकायला आला काय आणि मराठेशाहीचा प्रधान झाला काय ! त्याच्या अत्तराच्या पेटीचें नवखें नशीब थेट सिंहासनाच्या पायऱ्या चढत चाललें आणि आमची कलमेश्वरी मात्र तशीच कानावर अढळपद भोगीत राहिली ! अत्तराच्या फायाबरोबर एखादा कानमंत्र फुंकून तर यानें राजांना भारून टाकिलें नसेल ? कांहीं का असेना, तूर्त त्यांच्या कानावरच आमच्या कलमानें कुरघोडी केल्यामुळें राजांचे कानसुद्धां आमच्यापर्यंत लांबले आहेत, हें काय थोडें झालें ? येसूबाईसाहेबांकडे जरा असेंच बस्तान बसलें तर चांदणीकडे नीट बघतां येईल ! तिच्या जिवाभावाचा मैत्र तो पहिलवान पोऱ्या आमच्या खाजगी खात्याकडे गुंतवून घेतला हें बेष झालें ! हा देहू दसरी अगदीं पुरा आपलासा करून टाकला पाहिजे; म्हणजे चांदणी हातीं लागलीच म्हणायची ! आलीच ही आडमाप स्वारी ! ( प्रगट ) ये देहू, तुला अगदीं शंभर वर्षें आयुष्य आहे ! ( देहू दसरी पहिल्वानि थाटांत प्रवेश करतो. ) बाकी, असें तालिमबाजीचें निकोप शरीर असल्यावर शंभर सोडून दोनशें वर्षें जगायला तरी काय मरण आहे ?

[ देहू एकदम उडी मारून दोन बैठका काढतो व पवित्र्यांत उभा राहतो. ]

देहू : बजरंगबलीकी जय !

जिवाजी : अरे, असा आडव्यातिडव्या उड्या काय मारतोस ?

देहू : या उड्या नाहींत ! जिवबा, या उड्या नीट यायला दंगलींत दिवस घालवावे लागतात !

जिवाजी : दंगल म्हणजे ? धिंगामस्ती ?

देहू : अहो, दंगल म्हणजे आखाडा ! आतां मीं उड्या मारिल्या नाहींत, दोन बैठका मारिल्या !

जिवाजी : या बैटका मारायला शिकण्यांत आजवर वेळ घालविलास म्हणून तर

तुझ्या नशिबानें ही अशी बैठक मारिली आहे! तांबड्या मातींत लोळपटणीं घेऊन सारा जन्म मातीला मिळवलास!

देहू : अहो, ह्या तांबड्या मातीला मुल्तान माती म्हणतात!

जिवाजी : मुल्तान माती म्हण नाहीं तर सुल्तान माती म्हण. अशानें मातीला मोल येतें वाटतें? वांकड्यातिकड्या उड्या काय मारतोस, ही मुंडेछाट पेहरण काय घालितोस, असें पचंगी धोतर काय नेसतोस! कायरे हें? तसेंच, गुद्दयाच्या मारानें मुरडलेल्या कानांचीं शुद्ध धिरडीं झाल्यामुळें तुझी कानउघाडणी करणें रामदासालासुद्धां साधलें नसतें! अरे, तूं चांगला पांढरपेशा ना?

देहू : आमचा पांढरापेशा या मुल्तान मातीखालीं पार दडून गेला आहे आतां! मुल्तान मातीचीं पुटांवर पुटें चढून बजरंगबलीच्या रंगांत मी इतका बुडालों आहें, कीं माझ्या पुढच्या सात पिढ्या उपजत तांबड्या निपजतील! अहो, फुकट होत नाहीं देहाची तयारी! अशी मेहनत करावी लागते!

जिवाजी : तुझ्या देहाच्या तयारीसाठीं तुझ्या जातभाईंना मात्र खरी मेहनत पडेल! तुझें मरण म्हणजे तुझ्या गोतावळ्यावर प्राणसंकटच म्हणावयाचें! आणि तसेंच, जाळायला उभ्या गांवांतल्या वांसे-तुळया पुरायच्या नाहींत, कीं पुरायला खासें गांवठाण पुरायचें नाहीं! तुझ्या अंगाचें हें धटिंगण धूड पाहिलें म्हणजे पहिल्यानें एवढेंच मनांत येतें, कीं हा पुरुष अंतकाळीं बाभुळबनाच्या वणव्यांत सांपडून मरावा! खरें सांगतों तुला, मरतांना जिवाबरोबर शरीरालाही न्यायची देवानें वहिवाट घातली असती, तर तुझ्या बाबतींत यमदूतांना आपला बोजा खास झेंपला नसता आणि तूं चिरंजीव झाला असतास! काय अवीट अंग रे हें!

देहू : वाः! जिवबा, मग शरीर कमावणें वाईट आहे वाटतें?

जिवाजी : वाईट नाहीं तर काय? शरीर कमावून बसायचें पण अक्कल गमावून बसायचें! हें अवलक्षण शुद्ध बेवकुफाखेरीज तिसऱ्याच्या मनीं येणें नाहीं कधीं! हें कसलें शरीर कमावणें?

देहू : कसलें शरीर कमावणें? अहो, नाक उडवायची बात नाहीं ही. आज या देहांत बारा रेड्यांची ताकद खेळते आहे! उगीच नाहीं!

जिवाजी : त्या ताकदीबरोबर बारा रेड्यांचा रंगेल मूर्खपणा पण सामावला आहे तुझ्या देहांत! कशाला रे हवी एवढी ताकद?

देहू : ताकदीवांचून मुलखांत पुंडाई करतां येते वाटतें?

जिवाजी : पुंडाई करायची? म्हणजे पुंडाई करण्यासाठीं हा इतक्या मांसाचा

असा अवाढव्य अवतार आहे का ? पुंडाई का करायची ?

देहू : पुंडाई कां करायची ? पंत, जिवाची गोष्ट सांगूं तुम्हांला ? जरा हेरून पाहा बरें, मी पुंडाई कां करणार आहें ती ! कां ? बुद्धीला ठाव लागत नाहीं ?

जिवाजी : नाहीं बुवा. आपली मति हरली !

देहू : हरली; अगदीं चीत ! बजरंगबलीकी ! शिवाजी सोळा वर्षांचा झाला नाहीं तोंच त्यानें आडदांड लोकांची संगत धरून मुलखांत पुंडाई आरंभिली !

जिवाजी : बरें मग ? असें अवसान भरल्यासारखें काय करितोस ? कां आखाड्यांतला एखादा शेंदरा सैतान संचारला आहे तुझ्या अंगांत ?

देहू : शेंदरा सैतान नाहीं–शिवनेरीचा शिवाजी संचारला आहे ! सही थोरल्या राजासारखी पुंडाई करून हा देहू शिवाजीराजा होणार ! बजरंगबलीकी जय !

[ भरामर करेल फिरवितो. ]

जिवाजी : ए, ती करेल ठेव खालीं ! तें भीमसेनी लाटणें फिरवून विराटघरींच्या पोळ्या लाटायच्या आहेत वाटतें ?

देहू : नाहीं. आल्यागेल्याची कणीक तिंबून दिल्लीची दौलत लाटावयाची आहे ! मला शिवाजी व्हायचें आहे !

जिवाजी : तें कसें काय व्हायचें ?

देहू : राजांच्या पावलांवर पाऊल टाकून ! आडदांड लोकांची संगत करून ठेविली आहे; पुंडाई चालू आहेच; हमरस्त्यांत मारामारीशिवाय पाऊल टाकीत नाहीं पुढें ! आतां चार गड घ्यायचे, कुठें तरी कुणाच्या अटकेंत गवसायचें, बुरडी पेटाऱ्यांतून पसार व्हायचें, नांवाचीं नाणीं ठोकायचीं अन् सोन्याचा पुतळा लुटवायचा, कीं एकदम बजरंगबलीकी ! अहो, धिमेधिमे मी थेट थोरल्या राजांची छबीसुद्धां बठवून देतों बघा ! रोज सकाळीं ओढओढून नाकाला गरुडाच्या चोंचीसारखी अणकुची आणतों; खरें म्हटलें तर आमची पहिल्वानपेशाची शेंडी म्हणजे शिवराईएवढी असायची ! पण राजांसारखी केंसाळ ऐट साधण्यासाठीं हा डोकीभर संजाब ठेवून दिला आहे असा ! जिरेटोपाला जोड देण्यासाठीं वडिलांच्या पागोट्याच्या दीडशें हातांच्या चाकांतून तेवढी कोकीच काढून डोकीवर चढवायची आहे ! वाघनखें नाहींत म्हणून तूर्तास मी मांजरीच्या नख्यांवरच भागवून नेत आहें !

जिवाजी : ( स्वगत ) असें ! या रक्तामांसाच्या चालत्या किल्ल्याची गनिमी मान्याची ही जागा आहे तर ! देवाघरची योजना चहूंकडे सारखी असते खरी ! चढत्या ताकदीचा असो, कीं चढत्या अकलेचा असो; असा म्हणून

एकही सिंहगड सांपडायचा नाहीं, कीं ज्यावर घोरपड लावायला द्रोणागिरीचा कडा नाहीं ! या स्वारीला या जाळ्यांत गुरफटलेंच पाहिजे ! (उघड ) शाबास ! मग तूं हुबेहूब शिवाजी होणार तर ?

देहू : यांत काय शक ? अहो, मरतांना गुडघा मोडून घ्यायलासुद्धां मी एका पायावर तयार आहें. जनमकाळीं तेवढी गोष्ट हातची गेली ! अगदीं कळत नव्हतें इतक्या लहानपणीं माझा जन्म झाला म्हणून फसलें हो; जरा समजूत असती किनाही त्या वेळीं, म्हणजे शिवनेरीवरच जन्मास आलों असतों मी ! पंत, आतां आलें का घोरणांत, मीं कशासाटीं शरीर कमावलें एवढें तें ?

जिवाजी : पण कायरे, नुसत्या अंगबळानें तूं कसा होणार छत्रपती ?

देहू : अंगबळानें नाहीं, तर हत्तीघोडे लागतात का छत्रपती व्हायला ? जरा अंगींपिंडीं भरला गडी कीं झाला शिवाजी !

जिवाजी : अगदीं वेडा आहेस ! बेटा देहू ! नुसत्या ताकदीनें नाहींत होत असलीं कामें; त्याला श्रीकलमेश्वराची कृपा असावी लागते !

देहू : हा कलमेश्वर कोण ?

जिवाजी : आम्हां कलमदान्यांचा कुळस्वामी ! आमच्या परसांतल्या बोरूच्या बेटांतला एक दगड आणून आमच्या वडिलांनीं त्याला देव्हाऱ्यांत पुजला आणि त्याचा श्रीकलमेश्वर केला.

देहू : पंत, कसला तुमचा कलमेश्वर आणि काय वसुलाची त्याची कृपा ! हो म्हटल्या दगडाचा देव होतो का कुठं ?

जिवाजी : कां होऊं नव्हे रे त्यानें देव ! अरे, प्रयागजी अनंताला यवताच्या म्हणजे कळकाच्या बेटांत एक स्वयंभू शिवलिंग सांपडलें, त्याचा नाहीं का त्यानें यवतेश्वर केला ? अरे, अशा कळकट कंकराचा जर शंकर होतो, तर मग आमच्या कलमेश्वरावर तरी कां धोंड यावी ? ( लेखणी दाखवून ) हा पाहिलास आमच्या कलमेश्वराचा त्रिशूळ ? छत्रपती व्हायला या कलमाचें बळ असावें लागतें. नुसत्या अंगमस्तीनें नाहीं भागत !

देहू : हा बोरूचा तासलेला तुकडा म्हणजे तुमच्या कलमेश्वराचा त्रिशूळ का ? अहो, माझ्या निम्म्या शिणेचा गडीसुद्धां तुमचें हें बोरूचें पेरें करंगळीच्या पेरानें पिचून टाकील !

जिवाजी : तसें होण्यापूर्वीं हाडांचीं काडें पिचून निघतील वेड्या ! अरे, या कलमाचें म्हणजे सामान्य महत्त्व नाहीं बरें ! या कलमाच्या करामतीनें होत्याचें नव्हतें आणि नव्हत्याचें होतें करून दाखवितां येतें ! जादुगाराच्या

नळकांड्याप्रमाणें या टीचभर कल्मामध्यें काय काय इल्मा खेंचून भरल्या आहेत, त्याची तुला कल्पना नाहीं! जादुगिरी नजरबंदीनें दृष्टि फसते, पण कारकुनी कल्मबंदीनें सृष्टि फसते! दीन दुनिया तुमच्याबद्दल कुरकुर करायला लगली तरी बेफिकीर राहतां येईल; पण कारकुनी कलमाची घडीभराची कुरकुर जन्मभर भोंवल्यावांचून राहायची नाहीं! दोस्तांच्या दगलबाजीनें तुमच्या नांवावार काळे डाग पाडिले तर ते एक वेळ धुऊन काढणें सोपें आहे; पण कारकुनाच्या लेखणीनें तुमचें नांव खरडतांना त्याभोंवतीं सहज चार शिंतोडे उडवून ठेवले तर ते मात्र कल्पान्तापर्यंत कायमचे! तल्वारबहाद्दरांचा तांडा अंगावर चालून येत असला, तर घोडदौडीच्या दणदणाटानें इशारत मिळून तुम्हांला दडी मारून बसायला तरी अवसर मिळतो; पण कल्मबहाद्दर तुमच्या घरादारावरून आपले कागदी घोडे नाचवायला लागला, तर टापांची चाहूल लागूं द्यावयाचा नाहीं!

देहू : पंत, खरेंच का इवल्याशा नळकांडींत इतकी ताकद असते?

जिवाजी : आस्ते कदम, आस्ते कदम! बेटा देहू, वेड्यावांकड्या बोलांनीं ही कानावरची नागीण छेडूं नकोस! अष्टौप्रहर कानावर बसून कानीं पडेल तें ही नागीण ऐकून घेते आणि मग प्रसंग सांपडतांच शाईच्या विषानें तें ओकायला लागते! आणि एकदा बहकली कीं बेसुमार! वारा प्यालेलें वांसरूं आवरतां येईल, पण शाई प्यालेलें कल्म कळिकाळाला आवरायचें नाहीं! शाईची निशा कारकुनी मनाच्याच काय ती पचनीं पडेल! ही शाई म्हणजे साक्षात् कालकूट विषाची कन्या आहे! अन्नाचा कोळसा करून शिरें बनवायचें आणि तेजाच्या काळोखीचें काजळ त्यांत मिसळायचें, अशी अनन्वित शाईची पैदास्त आहे! आणि तिखट पात्याच्या धारेच्या पोटीं लेखणीचा जन्म! वेड्या मुला, कारकुनाला बिथरवणें भल्याचें काम नाहीं! शाईचा सोमरस आणि लेखणीची समिधा करून एखाद्याची आहुती घेण्यासाठीं कारकुनानें एक ओळ खरडली कीं ती वेदवाक्य! ल्लाटींचें ब्रह्मलिखित ढळेल; पण आमचीं लिखितें अढळ!

देहू : पंत, तुम्ही तुमच्या कल्माचें एवढें महत्त्व सांगतां पण चारचौघांत कांहीं तसें पटत नाहीं! शिवाजीराजांनीं तर कधीं कलम हातीं धरिल्यावांचूनच एवढा ग्रंथ केला!

जिवाजी : काय, काय ग्रंथ केला रे त्या शिवाजीनें? मी म्हणतों, तसें म्हटलें तर शिवाजीनें असें केलें आहे तरी काय?

देहू : त्रिखंडत्रिभुवन सांगेल राजांनीं काय केलें तें! एवढी हिंदुपदपाच्छाई

उठवली आणि त्यांना तुम्ही नुसता हुंकार करितां ? पंत, हें देवाघरीं रुजूं होणें मुष्कील नाहीं !

जिवाजी : आतां उघड मार पदरांत घालूं लागलों तर म्हणशील, कीं पंत, आडमाप बोलतां म्हणून ! अरे शिवाजी म्हणजे मूठ दाबल्या हातीं साडेतीन हात उंचीचा, नाकींडोळीं नीटस, काळगेल्या रंगाचा, रांकटलेल्या अंगाचा, हरहुन्नरी ढंगाचा, लिहिणें पुसणें बेतास बात, गुडघ्यांत अंमळ अधू, असा एक इसम होऊन गेला ! त्याची काय बरी मातब्बरी सांगतोस एवढी ? म्हणे हिंदुपदपाच्छाई उठवली ! काय रे, मोगलाई मोडलीन् मराठेशाही झाली म्हणून इकडची दुनिया तिकडे झाली वाटते ? शिवाजीच्या राज्यांत लिंबोणीला आंबे लागले, का शेळीनें आपली पोर वाघाच्या पेव्याला दिली, का कणसांतून माणसें उपजलीं ? अरे, केलें काय शिवाजीनें असें ? मोगलाईत हुकमती केसांची टोळी दाढीखालीं लोंबत होती ती मराठेशाहींत कवटीवर चढली एवढाच लाभ ! शिवाजी नशिबाचा म्हणून नांव झालें इतकेंच ! त्यांतून तुला खरें सांगूं ? अरे, खरा मोठेपणा अशा आरडाओरडीवर नसतो ! शिवाजीची खरी लायकी चारचौघांना पुढें कळणार आहे ! त्या माणसांत कांहीं जीव नाहीं रे !

देहू : तें कांहीं का असेना, माझा तुम्हांला एकच सवाल आहे. तुमच्या कलमाच्या मदतीवांचून राजांनीं आपल्या नांवाचा एवढा ग्रंथ कसा केला तें सांगा.

जिवाजी : सांगूं तुला देहू ? कलमाच्या मदतीवांचून कुठल्याही ग्रंथाचें पान हलायेंच नाहीं बघ ! अरे, शिवाजी नुसता नांवाला पुढें झाला; पण खरी करणी त्या रामदासाची आहे ! त्यानें आपला दासबोध ग्रंथ लिहिला नसता, तर शिवबाचा एवढा ग्रंथ कदाकाळीं होताच ना ! आणि दासबोध ग्रंथ कशानें लिहिला सांग बघूं ? शिवाजीच्या भवानी तलवारीनें ? नाहीं ! तुझ्या आडदांड करेलीनें ? नाहीं ! दासबोध लिहिणाऱ्या लेखणीनें ! हो, वेण्यासारखी गोष्ट काय कीं, नुसत्या भवानी तलवारीच्या नाचानें मराठेशाहीला रंग चढला नाहीं; तर दासबोध लिहिणारें कलम त्या सगळ्या भानगडीच्या मुळाशीं होतें ! आतां तूंच सांग बघूं भवानीचे हातवारे करणारा शिवाजी थोर का कलमानें दासबोध रेखाटणारा रामदास थोर ?

देहू : समर्थांची ऐपतच भारी वाटते बुवा !

जिवाजी : बरोबर बोललास ! अरे, शिवाजी किस चिडीयाका नाम है ! शिवबानें जो एवढा ग्रंथ केला त्याचीं एकूणएक पानें समर्थांनीं खरडलीं होतीं ! अरे,

माझा तर असाच होरा वाहतो कीं, शिवाजीच्या नांवांत रामदासाइतका कांहीं राम नाहीं! आतां तुला व्हायचें आहे शिवाजी! पण एखाद्या रामदासावांचून तूं कसा होणार शिवाजी? बेटा देहू, बच्चा, बोल आतां तुझा रामदास कोण तें?

देहू : (शिवाजीच्या पायांवर डोकें ठेवून) बजरंगबली की, जय जय रघुवीर समर्थ—

शिवाजी : समर्थाघरींचें श्वान, त्यास सर्वही देती मान! बेटा देहू, अखिल त्रैलोक्य तुझ्यासारख्या कुत्र्याला मान देईल!

देहू : पंत, आज माझे डोळे उघडले! पण पंत, तुम्ही समर्थासारखे कसे, तें एकदा नीट पढवा मला. तें बाळब्रह्मचारी आणि तुम्ही तर असे कुटुंबवत्सल!

शिवाजी : अरे, बालपणीं म्हणजे सुमारे सात-आठ वर्षेपर्यंत मी सुद्धां बाळब्रह्मचारीच होतों. पुढें मात्र शेजारीपाजारी—

[ काबेबाजपणानें हसतो. ]

देहू : पंत, आतां हसण्यावारी नेऊं नका! मला शिवाजी करण्यासाठीं तुम्ही समर्थ कसे होणार? समर्थांना तर लहानपणींच लग्नाचा तिटकारा येऊन ते सावधान होऊन पळत सुटले!

शिवाजी : बेटा देहू, या जगांत खऱ्याकडे कोणी खोल नजरेनें बघत नाहीं! ऐन मुहूर्तावर नारायण कुलकर्णी "सावधान" ऐकून सावध झाला आणि संसार सोडून श्रीसमर्थ रामदास झाला एवढेंच काय तें लोक बघतात! पण नारायण पळाला कां याचा कुणी नीट विचार करीत नाहीं! त्याला सांगून आलेली मुलगी काय चेहऱ्यामोहऱ्याची, कुळशीलाची होती याचा कुणीं विचार केला का आजवर? अरे, बाबत अगदीं साधी आहे! समर्थांच्या गळ्यांत बांधण्यासाठीं आणलेल्या त्या लग्नाच्या घोरपडींत कांहींतरी मोठी गोम होती! आंवत्याभंवत्यांनीं नवऱ्यामुलाला खूप चिडविलें असेल म्हणून आयत्या वेळीं पोराच्या जातीनें पळ काढिला आणि दुसरें काय? सावधान कसलें नि समर्थ कसलें? पुढें अशा फकिरी बाण्यानें अंगाला राख चोपडून नारायणाचा रामदास झाला, झालें. बाकी खरें म्हणशील तर समर्थांला तर संसाराची मनापासून आवड होती! कां म्हणून नाहीं विचारलेंस? तर त्यांनीं स्पष्ट म्हटलेंच आहे कीं, आधीं प्रपंच नेटका करावा आणि मग म्हातारपणीं परमार्थ पाहावा म्हणून! आणि एवढ्यासाठींच अटकळीचा मनुष्य आधीं प्रपंचाचा पसारा फैलावून सोडतो! शिवाजीनें सहा बायका कां केल्या? नेटका प्रपंच साधावा म्हणून!

देहू : पंत, नेटका प्रपंच कसा करावा हेंच ठीक पढवा आधीं मला !

जिवाजी : नेटका प्रपंच शिकणें फुकाचें काम नाहीं बावा ! त्याला रुका पाहिजे त्याला रोकड पाहिजे ! तसा शिकायला तयार हो. प्रापंचिकांच्या उद्धारासाठीं समर्थांनीं जसा दासबोध लिहिला, तसा तुझ्यासाठीं मी 'कलमबोध' लिहून टाकीन ! श्रीकमलबोध ! दासबोधाचीं वीस दसकें तर कमलबोधाचीं हीं वीस पेरें ! कबूल ?

देहू : मग त्याला पैसा कशाला हवा ?

जिवाजी : दाम करी काम ! दाम घेतल्यावांचून केल्या कामाचें मोल राहात नाहीं. दाम घेतल्याविना काम करणाराला नेटक्या प्रपंचाची खूण कळली असें कोण म्हणेल ? कलमबोध उपदेशायला तो कसला अधिकारी पुरुष ? कारकुनी गादीचा कोपरा म्हणजे बारमहा पिकणारें पैशाचें शेत ! तिथें पैसा पेरावा, कामाचें पीक घ्यावें !

देहू : पण माझें काम करण्यासाठींसुद्धां पैसा खाणार ?

जिवाजी : शिवाजीजवळून समर्थांनीं साऱ्या राज्याच्या सनदा काढून घेतल्या आणि त्याला भगवीं वस्त्रें धारण करायला लावलीं ! तूं कोण ? नाणीं मोजलीं नाहींस तर तूं कोण ? अरे, वडिलांनीं सरकारी कामांत पैसे नापत्ता केल्याचें पहिल्यानें जेव्हां लक्षांत आलें — त्या वेळीं म्हणजे नुसता आठ वर्षांचा चिमखडा होतों—

देहू : वडील पण पैसे खात होते का ?

जिवाजी : आम्हां कलमदान्यांत हा वडिलोपार्जित गुण आहे ! आमच्या घराण्यांतले पुरुषन् पुरुष एकाचढी एक पिढीजाद धोरणाचे होऊन गेले ! राम जसा एकबाणी — तसे आम्ही एकटांकी, म्हणजे लिहितांना टांक एकजात ! राम एकवचनी —– तर आम्ही एकचाकी, सारे एका चकारीनें रस्ता काढणारे ! तिकडे राम एकपत्नी तर आम्ही एकराखी ! किमानपक्ष एकेकाला एकेक राख ही असायचीच !

देहू : राख म्हणजे ?

जिवाजी : राख म्हणजे बायको नसलेली बायको — नाकापेक्षां जड मोतीं ! बेटा देहू, तूं अजाण बच्चा आहेस ! कलमदाने म्हटला कीं तो एकटांकी, एकचाकी आणि एकराखी ठरलेला ! बरें, पुढें वडिलांची ही खादाड खुबी पहिल्यानें ध्यानांत आल्याबरोबर त्यांना धाक घातला, तिच्याबद्दल भरदरबारांत होळीपुनव गाजवायचा ! त्यासरशीं वडिलांनीं माथ्यांत राख घालून घरींच फाल्गुन उरकून

घेतला! अखेर, त्यांच्याकडून दुप्पट रकमेचा रोखा लिहून घेतला तेव्हां घरांतली अन्न परांत ठेविली! वडिलांशीं हें वागणं; मग तुझें काय उरलें? अरे, कारकुनी कसबाला प्रेताच्या टाळूवरचं लोणी खाणारें डोकं लागतं! थोरल्या राणीसाहेब — सईबाईसाहेब जेव्हां मेल्या — आपलें वारल्या, तेव्हां तर या जिवाजीची तारीफच करायला हवी होती. खाजगी खात्यांतून सवा खंडी चंदनाचा हुकूम झाला; पण सवा शेर चंदनाच्या उटीनें सवा खंडी बाभळीचें बेभी हळदीकुंकू आटोपलें आणि पंधरा मोहोरांची बचत केली! गडावर धूम बोलबा, कीं सवा खंडी चंदनानें मातोश्रींना मुक्ति दिली म्हणून; पण खरी गोष्ट एक देवाला ठाऊक, त्या जळल्या जिवाला ठाऊक, कीं एक या जिवाला ठाऊक!

देहू : पंत, भलतंच काय सांगतां? इतक्या हलक्या मनानें तुम्हीं पंधरा मोहरांची मिळकत केली असं कुणालासुद्धां खरं वाटायचं नाहीं!

जिवाजी : नाहीं वाटायचं; साध्याभोळ्यांना नाहीं खरं वाटायचं! "तुका म्हणे येथें पाहिजे जातीचें!" जातीच्या इरसालांना माझं म्हणणं बेचूक पटेल.

देहू : मग हें सारं खरं म्हणतां?

जिवाजी : खरं म्हणजे? अरे, मग नेटका प्रपंच कशाला म्हटलं आहे? अमक्या कामांत पैसे खायचे व तमक्यांत खायचे नाहींत, असा पंक्तिप्रपंच मुळीं प्रपंचांत चालतच नाहीं! प्रपंचांत म्हणजे सुतळीच्या तोड्यापासून जपावें लागतं! आतां सांगूं तुला आणखी? वडील वारले तेव्हां त्यांची तयारी चालली होती आणि आमच्या मातोश्रींनीं मंगळसूत्र तोडून टाकिलें — आमची बाळबुद्धीच; पण दूरदृष्टीची पोंच केवढी — मंगळसूत्रांतला टीचभरच दोरा, पण बायकोसाठीं काढून ठेवला? अरे, डाव्याउजव्या हातांनीं इंद्रजाळ करीत नाहीं त्यानें लेखणी टाकून नांगर धरावा आणि आपल्या मानेवरच जोखड ठेवावें.

देहू : पण पंत, इंद्रजाळाच्या अशा नजरबंदींत खोडा पडून केव्हांतरी पायबंदी व्हायची नाहीं का?

जिवाजी : पायबंदी होईल कशी? या गोष्टीची कुठें वाच्यता करायची नसते! कारकुनाच्या लेखणीप्रमाणें, दांडा कापून जिभेचाही टांक तोडावा लागतो! तुला म्हणून या अंतर्यामींच्या खुणा सांगितल्या! जिभेचें कलम करायचं आणि कलमानें दस्तुर कुठें गुंतवायचा नाहीं! जमा रकमेची पोंच म्हणून हातचा लेख कुणाला देणं नाहीं. कालपरवांची गंमतच ऐक; सालमजकूरची पट्टी भरण्यासाठीं एक कुळ आलें होतं! भरणा जमा झाल्यावर कुळानें

पावतीचा हट्ट घेतला. तेव्हां हल्लीं पट्टीची पावती म्हणून त्याला जें चिठोरें खरडून दिलें तें पेस्तरपट्टी थकल्याबद्दल वित्तविषय जप्तीचें ताकीदपत्र ! आणि दस्तुर ठोकला सरकारकुनांचा ! कुत्ता जाने, चमडा जाने !

**देहू :** सरकारकुनाचें अक्षर तुम्हांला कसें हो काढतां आलें ?

**जिवाजी :** काशीची गंगा राजापुरीं कशी रे उपटते ? अरे, देवास करणें न् दुसरें काय !

**देहू :** बरें पंत, सगळ्यांच्या जवळून पैसे खातां खरें; पण हाताखालच्या माणसाजवळ हातचलाखी करणें धोक्याचें नाहीं का ?

**जिवाजी :** अरे, माझ्या हाताखालच्या माणसाची तर गोष्टच सोड. नंदीच्या शिंगांनीं शंकराचें अंग खरचटत नाहीं; पण मी ज्याच्या हाताखालचा कारकून आहें त्यालासुद्धां हात दाखवीन. तुझ्या देखतच कलुशा कबजाला कबजांत घेऊन दाखवितों बघ ! मग तर म्हणशीलना, कीं आहे !

**देहू :** पंत, ते पाहा कबजीबाबाच येताहेत.

**जिवाजी :** ( स्वगत ) अरे बापरे, ही परदेशी पीडा आमच्या घराकडे कां वळली ? देवाच्या कळसाला जाऊन भिडला तरी उंबरठे झिजवायची खोड जात नाहीं ! ( प्रकट ) देहू, जरा हुशारीनें राहा ! यावें; यावें; आज— ( कबजी येतो. ) धन्यांनीं गरिबाच्या घरीं पायधूळ झाडली ! घर पावन झालें ! वेचाळिशीनें मुक्काम गांठला ! अभाग्याच्या घरीं बाबा कामधेनु आली ! ( स्वगत ) लागला नंदीबैल झुलायला !

**कबजी :** जिवबा, तुमच्या घरीं यायला आम्हांला कसला संकोच आहे ? आम्ही तुम्हांला नकर भाऊपणानें लेखतों ! जरा निकडीचें काम निघालें म्हणून तांतडीनें तुमच्याकडे स्वतांच आलों झालें. अहो, जिवाजी म्हणजे या कलुशाचा उजवा हात !

**जिवाजी :** ( स्वगत ) कलुशाचाच काय, पण ज्याला म्हणून लिहितां येतें त्या हरएकाचाच उजवा हात ! (प्रकट) पायांच्या चाकराला असें हातांशीं धरणें हा धन्यांचा मोठेपणा आहे ! ( एकीकडे देहूस ) बेटा देहू, आज या कारकुनाच्या घरीं कोण आलें आहे ? काय बोलतें आहे ? कसें बोलतें आहे ?

**देहू :** ( जिवाजीस एकीकडे ) बजरंगबलीकी जय !

**जिवाजी :** ( देहूस एकीकडे ) कलमेश्वरीकी जय ! स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते ! ( उघड ) धन्यांना घर कसें सांपडलें पण ?

**कबजी :** कां बरें ? घर माहीत होतें ! आम्ही अव्वल अत्तरें विकण्याकरितां

गडावर फेरी घाल्तांना तुमच्या घरीं एकदा नव्हतों का आलों ? आमच्या पेटींतली अत्तराची एक कुपी खरेदीवांचून खपली ती याच घरांत !

**जिवाजी :** त्या कुपींतलें अत्तर उडून गेलें; पण धन्यांच्या डोक्यांतून ती गोष्ट अजून उडून गेली नाहीं ! काय तारीफ आहे ! बरें, कामाचें राहतें आहे तसेंच !

**कबजी :** काम जरा नाजूक आहे; आपलेपणानें करायचें आहे. राजश्रींनीं आज सिंधुदुर्गावर दौलतराव शिरक्याच्या तुळशीला आणली आहे !

**जिवाजी :** आलें लक्ष्यांत ! तेव्हां ती खाजगी खात्याकडे जमेस घालायची, तिची तैनात तरकीब राखायची. खलास ! हेंच ना काम ?

**देहू :** ( जिवाजीस एकीकडे ) तुळशीबाईना आणलें कसें हो पंत ?

**जिवाजी :** ( देहूस एकीकडे ) बेटा देहू , ती सरकारी सफाई आहे; हा दरबारी दरवडा आहे; हें रंगेल राजकारण आहे ! कलमबोधांत तुझ्यासाठीं या खुबीचा खुलासा करीनच मी.

**कबजी :** ( कांहीं कागद देऊन ) आणि जिवबा, हे त्या प्रकरणीं सरकारी शिक्क्याचे कागद ! पंत, या गोष्टीकडे नीट ध्यान पोंचवा. येसूबाईसाहेबांची आपल्यावर ठीक कदर नाहीं; तेव्हां गोषांत अशी दुफळीची गडबड उडाली तर एका फळीच्या आधारावर या तुफानांतून आपल्याला सलामत तरून जातां येईल. दरबारांत अजून आपल्याविरुद्ध थोडी आग धुमसते आहे. तो साबाजी शिरके, हिरोजी फरजंद, हीं माणसें आपल्या बऱ्यावर नाहींत ! तो बेवकूब रायाजीसुद्धां जरा बांकूनच असतो. त्याच्या प्रेमाच्या वेडाबद्दल राजश्रींकडे एकदा बोलणें काढून त्याला कामावरून काढण्याचा माझा मनसुबा आहे. सेनासागराच्या जागेसाठीं चांगलासा मनुष्य हेरून ठेवा ! हो, वेळेवर अडचण नसावी !

**जिवाजी :** ठीक आहे; ऐसा खासा जवान आणून देतों, कीं ज्याचें नांव तें !

**कबजी :** बरें तर, मी जातों आतां. राज्याचा बंदोबस्त नीट ठेवा ! [ कबजी जातो. ]

**जिवाजी :** ठीक आहे ! बेटा देहू , हो पुढें आतां. आज मराठ्यांचा सेनासागर, रायगडचा सेनापति कोण आहे ? तूं आहेस ? नाहीं ! सुभेदार तानाजी मालुसऱ्यांचा रायाजी आहे ? आहे. उद्या मराठ्यांचा सेनासागर कोण ? रायाजी ? नाहीं ! तूं आहेस ? हो ! कोणाचें नांव उद्यां पुढें करणार मी ? बोल, बेटा देहू , बोल !

**देहू :** बोल बजरंगबलीकी जय ! [ कलेल भराभर फिरवितो. ]

**जिवाजी :** एका दिवसांत उनाड पोऱ्याचा सेनासागर कसा होतो हें श्रीकलमेश्वराच्या कृपेनें तूं पाहिलेंस ! आतां उद्यांची बात उद्यां ! देहूचा रायाजी, रायाजीचा शिवाजी ! देहू, हें कलम काय करीत नाहीं ? पहिलवानी करून

काय होणार ? तुम्हीं पहिल्वानांनीं रोजीं हजार बैठका मारण्याचा सराव केला, तरी कारकुनापुढें तुम्हांला उठून उभें राहणें भाग आहे ! तुमचे कान नापत्ता झाले असले तरी कारकून त्यांना उपटून ठिकाणावर आणल्याखेरीज सोडायचा नाहीं. तुमचें गर्दन रुंदावलें तर कारकुनाला तुमच्या मानगुटीस बसणें सोईचें पडतें. तुमची शेंडी अगदीं शिवराईएवढी करा, कीं तिचें हवें तर दुसऱ्याच्या डोक्यावर कलम लावा, ती नेहमीं कारकुनाच्याच हातीं राहणार !

देहू : पंत, तुमच्या कलमाची करामत पाहून आमचा नक्षा उतरला ! पंत, मी तुम्हांला सर्वस्वीं शरण आहें ! मला तुमचा गुरूपदेश करा !

जिवाजी : त्या सलकड्यांच्या सनदा काढून माझ्या झोळींत टाक ! गुरुकृपा फुकाची नाहीं !

देहू : ( सलकडीं जिवाजीस देतो. ) सद्‌गुरूच्या चरणीं अर्पण असो !

जिवाजी : चरणीं नाहीं–हातीं ! बेटा देहू, भाषा हमेष बेतशुद्ध असावी ! आज तुला आमच्या धर्माची दीक्षा देतों ! आजपासून माझ्या संध्येची तूं व्यवस्था ठेवीत जा !

देहू : बस् ? एवढेंच काम ? संध्येसाठीं पळीपंचपात्री आणून ठेवायची ?

जिवाजी : धीरे, धीरे, जरा धीरे ! बेटा देहू, मी शक्तीचा उपासक आहें ! माझी संध्या साधीसुधी नाहीं ! आम्ही दारूच्या पाण्यानें आचमन करतों आणि स्मरणीचे मणी ओढण्याऐवजीं गोमुखींत—कान कर इकडे ! अरेरे, तुला चांगलेसे कानसुद्धां नाहींत; तुझ्याशीं कानगोष्ट करायची तरी कशी ?—गोमुखींत सागोतीचे कबाब ठेवायचे असतात ! ही उपासना कोणाला सांगितलीस तर तुझ्या मुल्तान मातीसकट तुझ्या अंगाची राखरांगोळी करीन ! सेवेला उतरलास तर शिवाजी होतोच आहेस ! बोल, आहे कबूल ?

देहू : मी आतां सर्वस्वीं आपला शिष्या आहें ! पंत, माझं आणखी एक काम मात्र आहे !

जिवाजी : आम्ही ओळखतों; अगदीं मनांतलें ओळखतों; चांदणी नांवाच्या पोरीसंबंधानें बोलणार आहेस ना तूं ?

देहू : सत्य आहे ! पंत हें कसें ताडलें तुम्हीं ?

जिवाजी : तें राहूं दे ! ही कलमेश्वराची कृपा आहे ! चांदणीच्याबद्दल मी तुझ्यासाठीं खटपट करीन. बरें, चल आतां. संध्येबद्दल नीट व्यवस्था ठेवणार ना तूं ? तसेंच उद्यां रायाजीच्या जागीं उभा राहणार ना तूं ?

देहू : बजरंगबलीकी जय !

[ दोघे जातात, पडदा पडतो. ]

[ स्थळ : साबाजी शिरक्याचें घर. पात्रें : ज्ञानेश्वरी वाचीत असलेला साबाजी; हुक्का तयार करीत असलेला हिरोजी फर्जंद. ]

**साबाजी :** ( एकेक अक्षर लावून. ) " माझा मराठाचि बोल निकें । परी अमृतातेंहि पैजा जिंके । ऐसीं एकेक अक्षरें रसिकें । मेळवीन. " वाहवा ! अमृतातेंहि पैजा जिंके, ऐसीं अक्षरें मेळवीन ! काय एकेकाचा हातगुण असतो. ज्ञानोबारायांनीं भल्तीशी पैजहोड घातली आणि अक्षरान् अक्षरांशीं खरेपणाची मिळणी केली. हिरोजी, ऐक हें : " माझा मराठाचि० "

**हिरोजी :** साबाजी, असलें एकेक अक्षर मेळवायला त्यांना वेळ लागला नसेल तितका तुला तें लावायला वेळ लागतो आहे. ज्ञानोबारायांना रेड्याकडून वेद वदवायला इतका सायास खचित पडला नसेल.

**साबाजी :** हिरोजी, भाग्यवंताच्या घरच्या गोष्टी, तुम्ही आम्ही बोलायच्या आतां ! आळंदीच्या विधात्यानें रेंद्रीच्या रानमाळांतल्या मराठी दगडांनीं देवपूजा रचिली; शिवनेरीच्या शिवशंकरानें मावळच्या माकडांना अमृताला लाथाडणारें देवरूप दिलें ! अमृताशीं आळी करणारी एकाची वाणी, तर अमृताला औषध चारणारी दुसऱ्याची करणी ! ज्ञानोबाची मराठी वाणी, शिवबाची मराठी करणी — दिगंत उजळून दोघांनीं ऐन मराठी हांकेनें भूमंडळ गाजविलें. मराठी मोहनीनें जीवकोटीला भारून टाकलें. आज आठ वर्षें झालीं; अजून राजांच्या नांवाची निशा उतरत नाहीं !

**हिरोजी :** बरें, पुराणिकबुवा ! आतां गुडगुडीची गोड गंमत घ्या कीं जरा. हं, ही घे.

**साबाजी :** जरा थांब. सोवळ्यानें गुडगुडी ओढणें पाप आहे.

( अपूर्ण )

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

[ तुळशीच्या पहिल्या रुकाराचें स्वतांशीं स्मरण करीत असतांना. ]

संभाजी :

[ चाल–जरि नाहिं कमल तें करीं० ]

तो एकच प्यारा बोल । मनीं या खोल । जाउनी बसला । १
हृदयावर कायम ठसला ॥

लाखाचें ज्याचें मोल । असा तो बोल । बोलल्या काळा । २
शोभलीस राजसबाळा ॥

तो डावा डोळा–अहा । पुन्हा हा पहा । झांकला अरधा । ३
करि जिवास मोहनबाधा ॥

भिंवईची तिरपी तऱ्हा । मुरडुनी जरा । त्यावरी ढळली । ४
टोंकाशीं कांहीं चळली ॥

हसतांना थोडें कुठें । गाल तो उठे । आणि त्या भोंरे । ५
निपजली मजा परभारे ॥

त्या रेषा चिमण्या भल्या । तोंच उमटल्या । तीन कीं दोन ६
डोळ्याचा साधुनि कोन ॥

तों भरून आला ऊर । रंगरसपूर । चालला श्वासें । ७
ओंठावर अडलें हासें ॥

भयमीत नवा आनंद; । पदर बेबंद । कंप कटिचा । ८
जिव झाला अरधा अरधा ॥

नवतीची राजस लाज । गुलाबी साज ।-और तो कांहीं । ९
गालांवर चढवी दोहीं ॥



अंक तिसरा–प्रवेश तिसरा

थरथरत्या ओंठावरी । प्रीत बावरी । बोऊ तो टाकी ।
नजरेचा पडदा झांकी ॥ १०
तो एकच प्यारा बोल । जिवाचें मोल । घेउनी फिरुनी ॥
एकदा ऐकवा कानीं ॥ ११

## *अंक तिसरा समाप्त*

# अंक पांचवा

## प्रवेश पहिला.

[ सोन्याच्या सांखळ्या हातांत घेऊन उभी असलेली येसूबाई व लोखंडाची बेडी हातांत घेऊन उभी असलेली तुळशी. दोघी एकमेकींकडे पाहात आहेत. आसपास नोकर वगैरे. ]

[ पडद्यांत ]

" मोऱ्यांनीं मात केली ! राजाला गिरफदार केलें !

" मोऱ्यांनीं शर्थ केली ! संभाजीला कैद केलें ! "

येसूबाई सोन्याच्या सांखळ्या व तुळशी बेडी एकमेकींकडे टाकून देतात. ]

येसूबाई : ऐकायचें नव्हतें तें ऐकिलें !

तुळशी : ऐकायचें होतें तें ऐकिलें ! ( पदरचा दगड काढिते. ) दर्यासागर दौलतराव, तुमच्या अर्धांगीनें आपली प्रतिज्ञा पूर्ण केली ! केवळ कवजी-सारख्यांच्या मसलतीनें आणि मोऱ्यांसारख्यांच्या मदतीनें सुताचा साप आणि सुईचा सूळ करून, या तुळशीनें केला करार पुरा केला ! त्या दिवशीं तुमच्या बापानें तुमच्या देहाची दैना केली तेव्हां, तुमच्या जित्या रक्तानें रंगलेला हा दगड, तुमच्या जात्या जिवाच्या साक्षीनें, या तुमच्या धर्मपत्नीनें, तुमच्या क्रियाकर्मासाठीं जीवखडा म्हणून उचलून घेतला. दर्यासागर ! तुळशीभोंवतीं घिरट्या घालणाऱ्या आपल्या जिवाचा कान करून ऐका ! त्या वेळचे माझे बोल आज पुन्हा आठवा. या दगडाला उरापोटाशीं धरून, याच्या संगतीनें छातीचा दगड करीन; तुमच्या प्रेताच्या काळ्या भेसूरपणाच्या शपथेनें जिवाचा वेतळा करीन; दख्खनी दुनियेचें दारूकाम बनवून त्याच्या आतषबाजीनें तुमच्या सर-णाचा भडाग्नि चेतवीन; भोसलेशाहीच्या मानकऱ्यांना या होळीचे होळकर करीन; मराठेशाहीची माती करून तिनें तुमच्या जिवाला मूठमाती देईन; संभाजीच्या बायकोला—मराठ्यांच्या महाराणीला गाय करून, तुमच्या नांवानें मोगलांच्या

हातांवर तिचें गोप्रदान सोडीन! बोला, दौलतराव, दिल्या कोलांतला बोलन् बोल खरा केला ना? कोण आहे तिकडे? धरा या राणीला आणि सव्वाशेर सोन्याच्या साखळ्यांच्या जागीं तो सव्वा मणाचा लोखंडी लंगर तिच्या पायांत अडकवा.

[दोघेतिघे नोकर पुढं येतात; एकदम दुसऱ्या बाजूनें हिरोजी व शाहूमहाराज येतात.]

**हिरोजी** : हां, खबरदार; पुढें पाऊल टाकाल तर पावलापावलासाठीं प्राण गहाण ठेवावा लागेल! मासाहेबांच्या अंगाला हात लागला तर त्या हाताचें कलम करून टाकीन; मासाहेबांकडे वांकड्या नजरेनें पाहिलें तर तापल्या सळईनें डोळे काढून खेळायला देईन! [नोकर थबकतात.]

**तुळशी** : काय मर्दाची जात आहे पाहा! अरे, चांगले पुरुषासारखे पुरुष होऊन या एका थेरड्याच्या तोंडाकडे पाहून हाय खातां? त्या वेळीं माझा घात केलास; आज बाजी बदलली आहे! आज तुझ्यासारख्या हलक्या हुजऱ्याची ही पोरगी राजावांचून राणी झाली आहे आणि ही तुझी राणी मोऱ्यांची बटीक झाली आहे! आतां मान वर करून असा पाहूं लागलास तर तुझ्या पांढऱ्या केसांचाच तिला गळफांस बसेल!

**शाहू** : (तलवार अर्धी उपसून) मासाहेब, हिच्या बेफाम जिभेचे या तलवारीनें तुकडे तुकडे करून —

**येसूबाई** : (त्याला थांबवून) भलतेंच! वाटेल त्या बोलभांड बायकोच्या जिभेबरोबर तुमच्या तलवारीला नाचवायची आहे का? धाकटे महाराज, थोरल्या आबासाहेबांच्या श्रीभवानी तलवारीच्या नमुन्याची ही बाळभवानी मुहूर्तावर स्वतां खाशांनीं तुमच्या कमरेला बांधिली ती एवढ्यासाठीं वाटतें? हिनें मराठे-शाहीची एकछत्री इभ्रत राखायची आहे; बायकांच्या जिभेसारखें वळवळायचें नाहीं. बायकांच्या बडबडण्यानें उद्यांच्या छत्रपतीचें मन ढळत नाहीं!

**तुळशी** : येसूबाई, बायकांच्या बडबडण्यानें पडलेला फांसाही चळत नाहीं! तुझ्या चढेल मोठेपणाला पायमाल करायला आतां कितीसा वेळ लागणार? (नोकरास) अरे, आणा त्या सांखळ्या इकडे! पुन्हा त्या म्हाताऱ्याकडे पाहतां? मोऱ्यांनीं ही नामर्दाची पैदास कोठून जमा केली? ही पाहा दर्यासागर दौलतरावाची मर्दानी विधवा मराठेशाहीचें हें अहेव लेणें आपल्या पायांनीं तुडवून टाकीत आहे.

[सांखळ्या पायांत घालूं लागते.]

**हिरोजी** : तुळशी, कारटे, काय केलेंस हें? पिंडीला पाय लागला तर पायबंदीच

होईल अशी साधी सजा एकट्या राजांनाच फर्माविली होती; पण दुसऱ्य देहाला मात्र या आई भवानीच्या भंडाराला असा पाय लागला तर जिवा निशीं जायबंदी व्हावें लागेल. या फरजंदाच्या घराण्यांत, रक्तमांसाच्या जिभेनें जें बोलावें तें पोलादी जिभेनें करावें असा कुळाचार आहे. [ कमरेची तलवार काढितो. ] ( स्वगत ) तुळशी, कमरेची मिठी सोड ! राजांनीं भवानी आईच्या साक्षीनें श्रीभवानी तलवार उचलली, त्याच मुहूर्तावर साबाजीनें बिजली आणि हिरोजीनें ही तुळशी उचलली. बेइमान दौलतरावाच्या गळ्यांत पडतांना साबाजीची बिजली इमानाला जागली ! बेटा तुळशी, आजवर तुला कडेवर खेळविली, आज इमानाला जागी हो ! तुझी नांवरस सांगून तुझ्या नांवाला बट्टा लावणाऱ्या फरजंदांच्या या कमअस्सल अवलादीला, केवड्याच्या बनांतल्या या सुंदर नागिणीला, एक–घाय उभी चिरून टाक ! ( उघड ) मासाहेब, ती पाहा, दिवसाढवळ्या केवढी चांदणी तुटून पडली !

[ तुळशीच्या विरुद्ध दिशेकडे बोट दाखवितो. येसूबाई वगैरे तिकडे पाहतात. हिरोजी तुळशीला वार करतो. ती पडते. ]

**येसूबाई :** कुठें पडली चांदणी ?

**हिरोजी :** [ तुळशीकडे बोट दाखवून ] ही पाहा !

**तुळशी :** करायचें तें केल्यावर मरण आलें तरी बेहत्तर आहे ! हिरोजी, पोटच्या पोरीवर घाव घालतांना तुझ्या डोळ्याला पाणी आलें नाहीं ! जिव्हारीं घाव जाऊन बसला तरी तुळशी रडणार नाहीं ! दर्यासागर दौलतराव, लग्नानें तुमच्या नांवाशीं जखडलेली तुळशी तुमच्या ऋणांतून मोकळी झाली [ दगडाव बांगड्या फोडून ] दुबळ्या दौलतीच्या नांवानें भरलेला वज्रचुडा त्याच्याच नीव-खड्यावर फोडून टाकून साता जन्मांच्या संसाराच्या साखळदंडांतून ही तुळशी आज सुटून जात आहे ! देवा, पुढल्या जन्मीं मला मराठेशाहीच्या जवान-मर्दाची—रायगडच्या रणमर्दाची—माझ्या छत्रपति संभाजीमहाराजांची शृंगारदासी कर ! छत्रपति संभाजीमहाराज, या जन्मीं, आपल्याला पाहिलें, आतां पुढल्या जन्मीं, शृंगारदेवा,—तुळशीच्या परमेश्वरा, मला पदरांत घ्या ! कुणीतरी छत्रपतींना माझा शेवटचा निरोप सांगा कीं, तुळशीनें मरतांना देवाचें नांव घेतलें नाहीं; पण तिचा मरता बोल “ छत्रपति संभाजीमहाराज ”—[ मरते. ]

**येसूबाई :** हिरोजी, काय केलेंत हें !

**हिरोजी :** मासाहेब, हे ऋणानुबंधाचे लागेबांधे आहेत ! साबाजीच्या पोटीं दौलती आला; त्यानंतर एका वर्षाच्या आंत ही माझ्या पोटीं आली.

सावाबीच्या हातून दौलती मेला; त्या एकाच वर्षाच्या मुदतींत ही माझ्या हातून मेली. या तुळशीला आजवर परक्या रक्तानें पोसली, तिच्या अंगांत माझें जातिवंत रक्त खेळत होतें; आज या तुळशीची माझें रक्त पिण्याची हौस फेडून टाकिली.

[ पडद्यांत–कोणत्या हरामखोरानें तुळशीच्या अंगाला हात लावला ? ]

**हिरोजी :** मासाहेब, जरा आडबाजूला व्हा ! देवळांतल्या देवाला दगलबाजीनें विटाळणारा हाच तो हरामजादा मोरे !

[ मोरे प्रवेश करतो. ]

**मोरे :** कोणीं तुळशीच्या अंगावर वार केला ? तुळशीच्या रक्ताच्या थेंबागणिक त्या गुन्हेगार देहाचे तुकडे केल्याखेरीज मोऱ्यांची तलवार विसांवणार नाहीं. कोणीं केला खून हा ! [ नोकर हिरोजीकडे बोट दाखवितात. ] हिरोजीनें ? म्हातारचळाच्या नादांत तुझ्या तलवारीची तहान बेसुमार वाढल्यासारखी दिसते. कोणाचें रक्त तुझ्या तलवारीला लागलें आहे हें ?

**हिरोजी :** हें माझें रक्त आहे—हिरोजी फरजंदाचें इमानी रक्त आहे हें !

**मोरे :** थेरड्या, मग तुळशी कशी मेली ?

**हिरोजी :** देवास कळे ! माझें जातीचें रक्त तेवढें मीं काढून घेतलें ! तिच्या बाकीच्या बेइमान रक्तामध्यें जिंतेपणाचा जिव्हाळा नव्हता. नुसत्या मुर्दाड मांसानें माणूस जगत नाहीं !

**मोरे :** हा पाहा, तुझ्या जिवंत मांसाला मातींत मिसळून तुझा बोल खोटा करून टाकतो !

( तलवार उपसून धावतो )

**येसूबाई :** हां, छोटे छत्रपतीमहाराज, आतां खुशाल आपली तलवार उपसा आणि आपल्या इमानी नोकराच्या धावण्या धावा ! तुमच्या प्राणांची रया झाली तरी हरकत नाहीं; पण हिरोजींच्या थकलेल्या केसांना धक्का लागूं देऊं नका !

[ शाहूमहाराज हिरोजी व मोरे यांच्यामध्यें येतात. ]

**हिरोजी :** मासाहेब, काय हा अविचार ! धाकट्या राजांना मागें घ्या !

**शाहू :** पुढें पाऊल टाकिलें तें मागें घेण्यासाठीं नाहीं. वीरांचें तुटलेलें मस्तक मागें पडतें, पाऊल कधीं पडत नाहीं ! भोसल्यांच्या तीन पिढ्या तुम्हीं हातांवर वाढविल्या; तुमच्या सेवेची कसोटी आणखी किती पाहावयाची ? चला, मागें सरा; मी तुमचें संरक्षण करणार ! मासाहेब, पाहा बरें हिरुबाबा कसे ऐकत नाहींत ते ! हिरोजी, तुझा राजा तुला मागें होण्याचा

हुकूम करीत आहे! मराठेशाहीला हें दिसलेंच पाहिजे कीं, आपल्या इमानी नोकरांवरचा तलवारीचा ताप चुकविण्यासाठीं छत्रपति आपल्या अंगाचें छत्र करीत असतात!

**हिरोजी :** ( मोऱ्यांना उद्देशून ) जावळीच्या रानांतल्या जातीच्या दगडा, या बोलांनीं विरघळून तुझें पाणीरे कसें होत नाहीं? ( शाहूमहाराजांना उचलून त्यांचा मुका घेतो. ) आई, आई, आई, राजे, ही पोपटपंची कुणीं बरें पढविली आमच्या रायगडच्या चिमण्या राघूला! [ शाहूमहाराजास खालीं ठेवितो ] देवा, माझ्या बाळराजांना अठ्ठावीस युगांचें आयुर्दाव दे! मासाहेब, आमच्या जिवाच्या मीठ मोहऱ्या ओंवाळून यांची दृष्ट काढा! आनंदाच्या आंसवांनीं डोळे भरून आले नसते तर माझीच यांना नजर लागली असती! भोंसल्यांचे वंशांतला हा कुळदीपक पदराखालीं झांकून घ्या आणि जरा बाजूला व्हा!

**येसूबाई :** फरजंद, तुमच्यावर अशी काळाची कट्यार लटकत असतांना तुमच्या राजानें आपल्या अंगाची ढाल करायला नको का? तुम्हांला असें टाकून आम्हीं कुठें तोंड दडवावें?

**हिरोजी :** ( एकदम रागानें ) मुली, मोठेपणाला प्रसंगीं तरी कांहीं सीमा हवी ना? तुझ्या सासऱ्यानें माझा बोल खालीं पडूं दिला नसता, आणि तूं गुडघ्याएवढी पोर मला म्हाताऱ्याला गोष्टी सांगतेस! रायगडच्या राउळांतला हा नंदादीप आम्हांला आमच्या जिवांच्या ज्योतींनीं पाजळता ठेविलाच पाहिजे! हा जीव सलामत असला तर उद्यां मुडद्यांचीं माणसें करतां येतील. चल, घेऊन जा याला तिकडे? मुली, बोलूं नये तें बोलावयास लावतेस? म्हातारपणीं माझें मोल केलेंस? प्रसंग काय आणि तुझें बोलणें काय? पोरीच्या जातीला असा हट्ट शोभत नाहीं. चल एकदम पुढें!

[ येसूबाई शाहूमहाराजांसह जाऊं लागतात. ]

**हिरोजी :** ( गहिंवरून ) मासाहेब, जरा थांबा! अखेरवेळीं या थेरड्याची जिव्हा चळली; गुन्हा माफ करा! काळाची करणी कडू असते; पुन्हा गांठी पडणें केवळ दैवाधीन! तुम्हां दोघांना डोळे भरून एकदा पाहूं द्या; ओथंबलेल्या अंतःकरणाच्या आशीर्वादानें तोंड गोड करून घेऊन मग चला! [ कांहीं वेळ त्यांच्याकडे पाहतो ] हाय रे कर्मा! हीं देवमाणसें आतां देवाघरीं सुद्धां दिसायचीं नाहींत. मासाहेब, आजवर या तापल्या जीवाला आपल्या नजरेनें न्हाऊं घातलें; आज पुण्याई सरली; इथून आपलें दर्शन अंतरलें! मासाहेब, बाळ-

राजांना जिवापाड जपा; चला पुढें!

[ येसूबाई व शाहूमहाराज जाऊं लागतात. ]

मोरे : हां, येसूबाई, थांब! भोसल्यांच्या जनान्याचा गोषा-उडवून टाकण्याचा मोऱ्यांनीं विडा उचलला आहे! अरे, पकडा रे या बाईला आणि या पोराला!

हिरोजी : तो विडा चघळल्यावांचून, नुसतें तोंडच नाहीं, पण सारें अंग रंगून निघेल. मोरे, तुझ्या चांडाळ जिभेनें या देवतांचीं नांवें बाटवूं नकोस; या नामसंकीर्तनाचें पुण्यसुद्धां या वेळीं तुझ्या फळास येणार नाहीं. हिरोजीच्या तल्वारीला माणसाची मुरवत नाहीं, धरत्या हाताची हुकमत नाहीं! मासाहेबांना मुकाट्यानें जाऊं देत! मासाहेब, आतां थांबाल तर तुम्हांला थोरल्या राजांच्या पायांची आण आहे. [ येसूबाई व शाहूमहाराज जातात. ]

मोरे : हिरोजी, तुझ्या खिळखिळ्या हाडांचा खुळखुळा करून मोऱ्यांचीं मुलें-सुद्धां खेळत बसणार नाहींत! तुझ्या छातींत अशी एक लाथ मारून तुला वाटें-तून बारा गांव पलीकडे उडवीन!

हिरोजी : राजांच्या रायगडचा दगडी हाडांचा किल्लेकोट एक वेळ जागचा हलेल, पण हिरोजीच्या छातीचा कोट हटायचा नाहीं!

मोरे : ( नोकरांस ) चला रे, सारे एकदम या थेरड्यावर असे तुटून पडाल, कीं पहिल्या पळांत याचें डोकें तुटून पडेल! [ त्यांची झटापट होते. हिरोजी घाव लागून पडतो. माने घाई-घाईनें येतो. ]

माने : धनीसाहेब, तिकडे बांका बखत येऊन ठेपला आहे. सावध झालेल्या संभाजीनें बेफाम होऊन चार मुडदे जमीनदोस्त केले.

मोरे : अवल मुडदे होते म्हणून पडले! संभाजीनें उभे मुडदे आडवे केले असें कां सांगत नाहीं? चला, माने, आधीं तुळशीच्या देहाला डाग देण्याची व्यवस्था करा; [ नोकर तुळशीचें प्रेत नेतात. ] आणि मग खाशीं मोहऱ्याचीं माणसें बरोबर घेऊन येसूबाईला कबूज करा. येसूबाई गवसली नाहीं तर तुमचे प्राण हरपतील हें खूप ध्यानांत धरा! जावळीच्या गवळवाड्यांतल्या गाईच्या दावणींत, येसूबाईला तिच्या वेणीच्या पेडानें खुंटाला बांधल्याखेरीज मोऱ्यांच्या बेचाळिशीला सद्गत लाभणार नाहीं! या थेरड्याला असाच पडूं देत!

[ मोरे, माने व नोकर जातात. ]

हिरोजी : साबाजी, धाव रे धाव! साबाजी, धाव! धाव!

[ साबाजी, मागाहून रायाजी, येसूबाई, शाहूमहाराज, चिटणीस वगैरे प्रवेश करितात. साबाजी हिरोजीला उचलून धरितो. ]

साबाजी : साबाजीचा साडेतीन हात देह शाबूत असतांना हिरोजीच्या या प्राणाला धक्का कुणीं लाविला ! हिरोजी, भिऊं नकोस ! हिरू धारतावल्यासारखा असा आंखलेल्या आंखांनीं माझ्याकडे कां पाहतोस ? मी तुझा साऊ तुझ्याजवळ आहें !

हिरोजी : ( हसून ) साऊ, वेडा, मीं स्वतांसाठीं का तुला आरोळी घातली ? मासाहेब कुठें आहेत ? आतांच मोऱ्यांनीं धाकट्या राजांना आणि मासाहेबांना—तुला कोणत्या तोंडानें सांगूं ?—साऊ, त्यांना या पावलीं गडावर घेऊन जा माझ्या आशेला आतां गुंतूं नकोस; जखम थेट जिवाला जाऊन भिडली आहे. राजांनीं मला पुन्हा सेवेसाठीं बोलाविलें आहे. ती पाहा, साऊ–तुला दिसायचीं नाहींत—मरत्या डोळ्यांना दुसरी दुनिया दिसायला लागते—दक्षिणच्या देवाचीं देवपावलें दिसताहेत—साऊ, राजांनीं विचारिलें तर मासाहेबांची खुशाली काय सांगूं ?

साबाजी : राजांना सांग, तुमची पुण्याई अढळ आहे; राजांच्या नांवाची द्वाही मिरवीत धाकटे राजे खुशाल रायगडावर निघून जातील !

हिरोजी : राजांचें नांव–भोळा भाव–सिद्धीस जाव ! [मरतो.]

साबाजी : देवास पाव ! ( उठून उभा राहतो. ) मासाहेब, फरजंद देवरूप झाले ! उजू हातांनीं राजांच्या रुजवातीला निघून गेले.

येसूबाई : अगबाई, हिरोजी काय हो केलेंत हें ? अशी कशी हो माझी फसवणूक केलीत ? तुमचा शेवटचा बोल अजून माझ्या कानापर्यंत आला नसेल, आणि साबाजी, इतक्यांत कसं हो यांनीं असें केलें ? सांगून सवरून प्राण जावा आणि उघड्या डोळ्यांनीं खेळ पाहावा तशांतली गत झाली ! राजांपरी राजांना फसविलें—यांनीं तर असा गळाच कापला ! सासरमाहेर एकदम पारखें झालें ! सटीसंकटीं केव्हांहि मागें पाहिलें म्हणजे फरजंद एखाद्या डोंगरासारखे उभे असायचे ! हिरोजी मला कोणाच्या हातीं निरवून गेलांत हो ? मला दटावणीनें बोलायला आतां कोणी आहे का ? रागानें बोलायचें ना एकदा आपल्या वेड्या मुलीला ? सासुरवाशांत आपल्या देवसावलीनें माझें माहेरपण केलें आणि आज मला असें फसविलें ! हिरूबाबा, मी नाहीं जाऊं द्यायची तुम्हांला !

[ त्यांच्या पायांवर मस्तक ठेवितात. ]

साबाजी : (स्वगत) 'तरिच जन्मा यावें । दास ईश्वराचें व्हावें ॥' माझ्या हिरूची पुण्याई साधुसंतांच्या पलीकडे गेली. 'तरिच जन्मा यावें । ईश्वर ईश्वराचें व्हावें !' धन्यांनीं पायांवर मस्तक ठेवावें तर सेवाधर्म ! वारे वा ! काय नुसता दंडा-

सारखा पसरला आहे !

येसूबाई : (निरखून) अहो, पाहा हो, डोळ्यांची टक थोडी हलल्यासारखी वाटली; कसल्यातरी आशेंत जीव अजून गुंतून राहिला आहे हो.

साबाजी : आपली वेडी आशा भोळ्या डोळ्यांनीं पाहते ! हीं आशेचीं माणसें नव्हत ! अशा कडव्या तब्वेतीच्या माणसांना आशेचें वावडें असतें ! राजांच्या दरबारीं फरजंदांना निराशेचा गांव जहागीर होता ! उठा, मासाहेब, आतां हिरोजीसाठीं रडायची वेळ नाहीं ! देवानें अगदीं योजून वेळ आणिली ! तिकडे राजांना मोऱ्यांनीं गिरफदार केलें ! इकडे पायरीचा चिरा निखळला, पण तिकडे मंदिराचा कळस ढळला ! आधीं कलत्या कळसाला हात दिला पाहिजे ! ताकदीनें, हिंमतीनें, हिकमतीनें शंभुराजे म्हणजे थोरल्या राजांना-मुद्धां भारी ! " बडे बापका सवाई बेटा " म्हणून ख्यात केली; पण आज दैवानें पल्टा खाल्ली ! आज सह्याद्रीचा सवाई सरजा सुताच्या सरकगांठींत सांपडला ! आधीं आशा लावून राजांनीं तोंडघशीं पाडिलें ! भरल्या ताटावरून उपाशीपोटीं उठणें आलें.

येसूबाई : साबाजी, अजून घटका उलटली नसेल, पण इतक्यांतच, राजांच्या वांचून दाही दिशा कशा सामसूम, सुनसाट दिसतात. जिकडे तिकडे अंधारल्या-सारखें होऊन दिनदुनिया दीनासारखी दिसूं लागली ! आपल्या नजरेंतील आग जगाला लागते; आपल्या जिवाची छाया सर्वांघटीं पसरते ! महाराज, सगळ्यांनाच कसें हो वैतागपद बांधायला लाविलेंत ! दिवसाढवळ्या दगावांचून दिवसाचा देव दिसेनासा झाला, रात्रीच्या राजाची कळा हरपली !

[ पंच कल्याणी घोडा अबलख—लावणी ]

आडला रायगडीचा राणा । पडला आज शिपाईबाणा ।
ज्या राजवटी त्या रानवटी परि जाणा ।
जन अवघे उघडे, नाहीं ठावठिकाणा ॥ १ ॥
बारा मावळ एकच दैना । चवदा ताल कोंकणी *रैना ॥
गगनांत झांक्ति देवदेवता नैनां ।
रानांतहि प्याल्या शेंदुर राघु मैना ॥ २ ॥

साबाजी : (स्वगत) दगडावर शेंदूर थापून त्याला देवपणानें बोलायला लावण्याची हुकमत हरपून, आज स्वतांच शेंदूर पिऊन दगडासारखें व्हायचा वखत आला आहे !

---

* रैना = रात्र.

**रायाजी :** ( स्वगत ) शिवांगी ! माझी गरीब शिवांगी माझ्याविणें अशीच आगींत करपून निप्रत असेल ! शिवांगी, शुभांगी, शिवगंगा ! दिल्या मुदतीचा आज सरता दिवस ! आजचा सूर्य मावळतांना माझ्या शिवांगीचे पंचप्राण आपल्या सोनेरी किरणांनीं बांधून नेईल; उद्यां उगवत उजळली तरी माझ्या नजरेला अंधाराच्या काळ्या राईतच रखडावें लागेल !

**येसूबाई :** साबाजी, मी काय करूं हो ? मला भोंवतीं रान पेटल्यासारखें वाटतें ! मला सारखें भेदरल्यागत झालें आहे ! माझ्या भित्या जिवाला कसा हो धीर देऊं ?

**साबाजी :** आई, धीर धर; असें बोलून आम्हां मुलांना घाबरवूं नकोस. तूं आम्हां मराठ्यांची मायमाउली आहेस ! आई, तूं असे हातपाय गाळलेस तर आम्हां उपाशीं बच्च्याकच्च्यांना—तुझ्या लाख लेकरांना भरल्या हातानें दूधभात कुणीं भरवायचा ? आईवेगळ्या मराठी बाळांनीं आशेनें कुणाच्या तोंडाकडे बघायचें ? आई, तुझ्या लग्नाचे साडे झाले त्या वेळीं मातोश्री सईबाईसाहेबांनीं, माझ्या मुलीच्या पावलांनीं सप्तशृंगीची देवी रायगडावर रहिवासाला आली असें म्हणून आम्हांला तोंडभर साखर चारली ! तुझ्या आहेरासाटीं, सर्जेराजांनीं आम्हां मानकऱ्यांचा दरबार भरवला—शिवनेरीच्या त्या भवानीशंकराच्या भोळ्या दरबारांत आम्हां हुजऱ्यांचे सुद्धां मानकरी झाले—त्या दिवशीं—तुझ्या अंगाची लगीनहळद अजून पुरती निघाली नव्हती—तशा थाटांत विडासाखर वांटण्यासाठीं तुला हिंडतांना पाहून राजांनीं तुझें कौतुक केलें कीं, तुळजापूरच्या गाभाऱ्यांतल्या काळोख्या कोंडमाऱ्याला कंटाळलेली श्रीभवानी आई आमची चढती दौलत नजरेनें न्याहाळण्यासाठीं भांडाराचीं भूषणं लेवून या दरबारांत चरणचाली मिरवीत आहे ! ती वेळा आठवली म्हणजे आज ऊर भरून येतो. आम्हांला पोटाशीं धरून, डबडबलेल्या डोळ्यांतलीं हीं आठवणीचीं आंसवें मायाममतेच्या पदरानें पुसून टाकण्याचा, आई, तुझ्यावांचून कोणाचा अधिकार आहे ? सप्तशृंगीची देवी, भोंसले-शाहीची भवानी आई, महाराष्ट्राची महिषासुरमर्दिनी, दक्षिणची दुर्गेश्वरी, अशी आपल्या सिंहासनावरून उतरूं लागली तर आमचें दुर्घट कोण निवारील ? आमच्याकडे पाहा; हिंमत सोडूं नकोस. आई, आम्हां सर्वांचा हा लाखाचा जीव देवानें तुझ्या ओटींत निरवला आहे त्याची जोपासना करायला नको का ?

**येसूबाई :** साबाजी, हीं पाहा आलीं आंसवें पुन्हा गिळून टाकिलीं. राजांची

राणी, सर्जेराजांची सून यापुढें तुमच्याकडे कोरड्या डोळ्यांनीं पाहील.

साबाजी : मासाहेब, अशा नजरेनें आपण पाहिलें म्हणजे या साबाजीची थकलेली काया वज्राची होऊन, गेली गुजरी पुन्हा उभी करण्याची त्याला हिंमत येईल! ऐशीं वर्षांच्या उमरींत गोगलगाईच्या पावलांनीं आलेलें म्हातारपण हरणटप्प्यांनीं माघारें पळालें! आतां सेनासागर, तुम्ही असें करा—

रायाजी : अरे, मला कोणी प्रेमसागर कां म्हणत नाहीं?

साबाजी : अगदीं अफाट वेडा माणूस! कोणा माणसांवर काय प्रसंग आणि हा आपला—

रायाजी : साबाजी वेडा म्हणून हिणविल्यानें जातवेड जाईल का? प्रेम प्रसंगाला जुमानीत नाहीं, माणसाला मानीत नाहीं! प्रेमाच्या जगांत दोन जिवांपुरतीच जागा असते!

साबाजी : रायाजी, तूं मराठ्यांचा सेनासागर आहेस ना? वडिलांनीं केवढी कीर्त करून ठेविली! माझा तानाजी म्हणजे रणाचा रणशूर, मनाचा मनशूर, म्हणून स्वतः थोरल्या राजांनीं गुणांचे पवाडे गायले; सुभेदार मालुसऱ्यांनीं एकदा मनगटासारख्या मिश्यांना पीळ भरला म्हणजे मी, मी, म्हणणाऱ्या मर्दांनीं, पाहायला आणलेल्या पोरीची लाज उसनी घ्यावी! हातीं घेतल्या कामाची थेट जीवाला पकड बसायची! कोंढाण्यावर पट्ट्यानिशीं लढतांना, उदेभानानें हात उतरून टाकला तेव्हां देहापासून हात तुटला पण हातांतून पट्टा सुटला नाहीं! आल्या प्रसंगाला पुढें पाऊल, माघार माहीत नाहीं! त्यांचें नांव सांगून तें बुडवायला तुझ्यासारखा वेडापीर—

रायाजी : वेडापीर हें खरें ना? मग अशा बोलांनीं वेड्याला कां मारितां? प्रेमापुढें कीर्तीचा पवाड नाहीं, नांवाची चाड नाहीं! राखेच्या ढिगांतून अंगार भडकविण्यासाठीं फुंकर मारला तर डोळ्यांत राख उडेल एवढाच काय तो लाभ! साबाजी, तरण्या दिलची आग कुणाला सांगून कळत नाहीं. मी काय करूं हो? माझ्या मनाची उचलच मेली आहे. तुमचा दौलतराव प्रेमाचा शेवट झाला म्हणून मेला; हा रायाजी प्रेमाचा उगम गवसत नाहीं म्हणून मेल्यासारखा झाला आहे. दर्यासागर तसा मेला, सेनासागर असा मेला!

साबाजी : नादान मुला, मालुसऱ्यांच्या घराण्यांत जन्माला येऊन, आल्या कामाला अशी कुचराई करितोस! तुम्हां मालुसऱ्यांचा कुळधर्म मोठा कठीण आहे! लहानपणीं, तुझ्या लगीनमुहूर्तावर सर्जेराजांचं प्रमाण ऐकतांच,

तुला बांधल्या बाशिंगानें बोहल्यावर टाकून देऊन, उदेभानाच्या बाटग्या कस्पारीशीं निका लावण्यासाठीं, सुभेदार उमन्या घाईनें कोंढाण्याच्या बोहल्या-वर चढून गेले! सजराजांनीं त्यांचा दिवस केला तेव्हां दुखवट्याचें पागोटें तुझ्या डोकीला बांधून, त्याच हातांनीं तानाजीबावांची ही तलवार–सुभेदारांची ही राजेश्वरी तुझ्या कमरेला बांधिली; त्या वेळीं शंभुराजांच्या पावलावर पाऊल टाकण्याची भाक देऊन, बापाच्या नांवानें क्रिया केलीस; आणि आज राजांना मोऱ्यांनीं ठाणबंद केलें असून, तूं असा मोकाट सुटला आहेस! तुझ्याकडे पाहून, वरच्या दरबारांत, सुभेदारांचा सिंहाचा जबडा चिमणी-सारखा झाला असेल! अरेरे, क्रियानष्टा, देवकळा दवडून दगड होण्याची ही हौस तुला कुठून आठवली? बिरवाडीच्या बहाद्दराच्या बीजाला बाट लाविलास तर उद्यां तुझ्या नांवानें बायकापोरी कीं रे बोटें मोडतील! सारा जनलोक तोंडावर थुंकेल!

रायाजी : साऊबाबा, उगीच शीण करून घेऊं नकोस; तुझ्या हुकुमाची तामिल करण्यांत माझ्याकडून समजून कसूर होणार नाहीं; प्रेमाचें वेडें पाऊल कुठें चळलें तर मात्र मला माफी कर. सांग मी काय करूं तें!

साबाजी : शाबास, हें बोललास एवढ्यानेंच मराठेशाहीला मूठभर मांस चढलें! चल, आधीं आपल्या उधळलेल्या लोकांची जमात कर; अजून राजांना घेऊन मोरे निघाले नसतील त्यांना पायबंद घाल. म्हापशाच्या राण्यांना सत्तरी मोरे महाल धुंडाळून आपली बाजू बांधायला सांग. तुझ्या हातीं लागण्यापूर्वी मोरे मोगलांना मिळालेच तर, बादशहाच्या छावणींत बेगमसाहेबांची भेट घेण्या-साठीं मी तुळापुरीं जाऊन बसतों. राजे सुटले तर अजून एक हात ब्रह्मांडाला कव घालता येईल. चल, सुटल्या तीराच्या तडफेनें धाव घे; वेळेला आतां मोल नाहीं. माझा म्हाताऱ्याचा तुला आशीर्वाद आहे.

रायाजी : आई भवानी काय अब्रू राखील ती खरी.

[ येसूबाईस मुजरा करून जातो ]

साबाजी : एक झालें; मासाहेब, आपण धाकट्या धन्यांना घेऊन रायगडच्या रस्त्याला लागावें. आपल्या दिमतीला द्यायला या चिटणिसाखेरीज आज दुसरें कोणीहि नाहीं. चिटणीस, आज वेळ येऊन ठेपली आहे; खंडोबा, हे जिवाचें जोखीम तुला गडावर न्यायचें आहे. मराठेशाहीच्या सौभाग्याची ही केशरकस्तुरी जपून रायगडच्या करंड्यांत नेऊन ठेवण्याचें काम तुझ्याकडे आहे; तिच्या कुंकवाचा टिळा आणण्यासाठीं मी तुळापुरीं जातों. मासाहेब,

आपला निरोप घेऊन म्हणून मी जाणार आहें, बेगमसाहेबांना खूण पटण्यासाठीं आपला कुंकवाचा करंडा तेवढा मजजवळ देऊन ठेवा. चिटणीस, राजांच्या घरची अब्रू बरोबर घेऊन निघाला आहेस. तुला काय सांगूं? [ त्याला जवळ घेऊन व त्यांचा हात हातांत घेऊन ] अरेरे, भवानीश्वरा! कोण्या दैवाचा दिवस दाखविलास हा! मोहऱ्यांसारखे मोहरे हरपून आज मराठेशाहीची अब्रू या एवढ्याशा मुलाच्या बाळमुठींत ठेवावी लागत आहे. बाळ, मोऱ्यांचीं माणसें तुमच्या मागावर आलीं तर आल्या अडचणींतून, आपली ही एकवटलेली पुण्याई, मूर्तिमंत मराठेशाही, अहर्निशीं निभावून नेण्यासाठीं बृहस्पतीच्या बुद्धीनें आणि बारा हत्तींच्या बळानें नेहमीं सावध राहा! बाळ, मरता काळ ओढवला तरी विसरूं नकोस कीं, तुला बाळाजीबाबांचें नांव लावायचें आहे आणि बाजी देशपांड्यांची जात सांगायची आहे. कायस्थाच्या इमानापासून चळूं नकोस.

चिटणीस : झांकली मूठ सवा लाखाची; बोलून काय दाखवायचें! साउबाबा, मोऱ्याच्या माणसांना आमचा माग लागूं नये म्हणून, या श्रीभवानीचें उमटतें पाऊल धुऊन टाकण्यासाठीं, माझ्या रक्ताचें शिंपणें करीन; माझ्याबद्दल तुम्ही निर्धास्त असा.

साबाजी : मासाहेब, तोंडांतून बोल निघत नाहीं, पण आतां निरोप घ्यायचा! काळ येऊं नये तो आला—निभावून नेणार श्रीउमामहेश्वर समर्थ आहेत. पुण्याई सबळ असली तर साबाजी पुन्हा सेवेला चरणाशीं येईल; नाहींपेक्षां हीच अखेर भेट! मासाहेब, इतका वेळ अवसानानें बोललों, पण आतां उरीं फुटण्याची वेळ आली. मीं आपल्याला माझ्या वडिलकीनें धीर दिला; पण आतां मला धीर कोण देणार? शिरक्यांच्या या कुळदैवताच्या पायांची पुण्याई!--माझ्या बाळराजांची देवमूर्ति ( शाहूमहाराजांना साष्टांग नमस्कार घालतो. ) रायगडच्या देवा, या दुबळ्या देहाला आशीर्वाद द्या--या पायाच्या चाकरीची आठवण ठेवा--चुकल्या कामाची--उण्याअधिकाची साबाजीला माफी करा!

[ येसूबाई त्याला उठवितात. ]

येसूबाई : मामासाहेब, हें काय बरें असें भलतेंच? आजोबाला मांडीवर खेळवून नातवाच्या पायां पडायचें? ऐशीं वर्षांची तपश्चर्या करून आठ वर्षांच्या बाळाच्या पायांवर मस्तक ठेवायचें? बाळ, आजोबांच्या पायांवर डोकें ठेवून त्यांचा आशीर्वाद माग!

साबाजी : ऐशीं वर्षें आणि आठ वर्षें! आई, उमर फत्तराला असते, फुलाला

नसते. फुलाची नुसती जःत पाहायची असते. माझा म्हाताऱ्याचा बोऊ आपला ऐकून ठेव---तुझ्या पोटीं हा सर्जेराजांनीं नवा अवतार घेतला आहे. देवाघरचा जीव जपून ठेवायचा आहे. बरें, मासाहेब, वेळेनें वेळ वाढते. देवाचें नांव घेऊन शुभलक्षणीं पाऊल पुढें टाकायचें !

येसूबाई : आबासाहेबांच्या नांवाखेरीज दुसरें कोणत्या देवाचें नांव घ्यायचें ! आबासाहेब, आपल्या कुळीच्या कुळदीपकाला—आपल्या नांवकऱ्याला नीटपणें घरीं न्यायचें आपल्याकडेच आहे !

[ एकश्यारे मल्हारा यांवाचुनी–लावणी. ]

निघते घेउनि तुमच्या नावा ।
देवा शिवनेरीच्या शिवा ॥
जरि करि सोबत म्याल्या जिवा ।
पदराखालीं चिमुकला दिवा ॥
झड घाली तरी कसा वारा उजवा-डावा ।
घ्या सांभाळुनि; हा न्या आशेच्या गांवा ॥

मामासाहेब, [ हिरोजींच्या प्रेताकडे व साबाजींच्या पायां पडते. ] येऊं आतां ? लौकर पाय दाखवायचे; वडिलांच्या छत्रावांचून उघड्यासारखें वाटेल ! राजांना सांभाळा–स्वभाव थोडा–[ रडतात. ]

साबाजी : मुली, अखंड वज्रचुडेमंडित हो ! ( येसूबाई वगैरे सर्व जातात. ) झालें दगडाच्या दिलानें इतका वेळ धीर धरला आणि आल्या प्रसंगाशीं टक्कर दिली ! सारीं कामें निरवलीं; आतां हिरोजी, तुझ्यासाठीं रडायचें तेवढें राहिलें [ हिराजीच्या प्रेताकडे पाहतो. ] संसारांतल्या सफरींतला सच्चा सोबती–दिलाचा दोस्त–जिवाचा जोडीदार–( एकदम त्याला मिठी मारून आक्रोशानें ) हिरोजी, हिरू, बचन दिलेंस काय आणि हें केलेंस काय ? खांद्याला खांदा भिडवून लढलों, गळ्यांत गळा घालून रडलों, हातांत हात घालून देवलोकीं चढलों, असें दोघांनीं हसत राजांना सांगायचें. एका आईच्या पोटीं जन्म मिळाला नाहीं तरी धरित्री मातेच्या उदरीं एकठाय मरण मिळवायचें असें हातावर हात मारून वचन दिलेंस आणि आज असा बेमान होऊन हातोहात निघून गेलास ! राजांनीं नेहमीं नांवाजणी करावी, कीं माझा हिरूबाबा जिभेचा सच्चा, हिरूबाबा जिभेचा सच्चा म्हणून ! पण आबासाहेब, तुमच्या लाडक्या फरजंदांनीं आपल्या जीवाच्या सवंगड्याशीं अखेर अशी दगलबाजी केली ! मला एकट्याला मागें लोटून, आपल्या चाकरीच्या लोभानें हिरोजी

आपलपोटीपणानें निघून गेले! हिरू, आजवर जगाकडे चार डोळ्यांनीं पाहिलें, आज या माझ्या दोनच डोळयांना इकडे तिकडे पाहण्याची भीति वाटते. तुझ्याकडे पाहतांना तर ऊर दडपून जातो आहे! हिरू, राजांच्या पायांची तुला आण आहे, एकदा तरी डोळे उघडून पाहा रे! अरेरे! हिरकणी, तुझ्या रक्ताला माती कीं रे लागली ही! त्या मातीमोल मोन्यांनीं असा हिऱ्यासारखा हिरा मातीला मिळविला! शंभुराजे, तुम्हीं राजधर्म सोडला त्याचीं अशीं फळें मिळालीं; जीवाची जोड नसल्यामुळें हातापायांची पुण्याई नुसती धडपडीसारखी दिसते. मूळ पायाशुद्ध नसल्यावर विस्ताराचा पसारा फळाला येत नाहीं. बचनागाच्या बनांतून निघालेली गंगा बारामुलूख विखारीत जाळीत जाते! शंभुराजे, शंभुराजे, कडू बोलांची माफी करा—पण, तुमच्या राजवटीं हिरोजी अशा हलक्या मरणानें मेला! हिरू, काय करूं रे, शंभुदेवाला सोडविण्यासाठीं मला जायचें आहे! माझा हात रिकामा असता तर तुझ्याबद्दलचा सूड पुरतेपणीं घेतला असता! मोन्यांच्या मागच्या बेचाळिशीचे गाडलेले मुडदे उकरून, त्यांच्या हाडांच्या हिरक्यांनीं तुझें सरण रचिलें असतें; आजच्या मोन्यांच्या हाडांचीं काडें काढून तुझी तिरडी तयार केली असती; मोन्यांच्या पुढच्या बेचाळिशीच्या कोंवळ्या नाळवारांनीं तुझ्या ताटीसाठीं नाड्या केल्या असत्या; या मोन्यांचें मुंडकें छाटून त्याची रक्ताळलेली शिंकाळी या हातांत घेऊन, राजांच्या नांवानें गर्जतगाजत तुझ्या देहाच्या मिरवणुकीपुढें त्रिखंड नाचत सुटलों असतों! पण हिरोजी, माझा हात संभाजी महाराजांच्या मुजऱ्यांत गुंतला आहे. आपण रायगडच्या रियासतीचीं माणसें; आपल्या देहावर दौलतीचीसत्ता आहे! एवढ्यासाठींच तूं आपल्या सोबत्याला मागें टाकून देह सार्थकीं लावलास! राजांना सोडविण्यासाठीं मलासुद्धां इतक्या तांतडीनें जायचें आहे कीं तुझ्या तोंडांत असें तोंड घालून, मोकळ्या मनानें रडण्याचें भाग्य, हिरा, माझ्या कपाळीं नाहीं. हिरूबाळा, रागावूं नकोस; तुझ्या तोंडावरचें रक्त पुसून टाकून मग जाऊं म्हणतोस? देवा, तुमची दुनियादोरी परोपरीची आहे! आजवर, पित्या बाळाचा मुका घेतल्यामुळें आईच्या ओठाला तिचें दूध लागलें असेल; तरुणाचे ओठ तरुणीच्या चुंबनानें प्रेमाच्या कल्पनेमुळें अमृतानें न्हाऊन निघाले असतील; पण अशा म्हातारड्या मुक्यानें; आपल्या जिव्हाळ्याच्या रक्तानें आपले ओंठ अजून कुणीं रंगविले नसतील! (त्याचा मुका घेतो.) हिरकणी, हीच आपल्या स्नेहाची शेवटची सेवा! तुझ्या मूठमातीची काळजी मी कशाला करीत बसूं? सार्थकीं लागलेल्या जीवाची उत्तरक्रिया

देवांना करावी लागते. देवांच्या तेहतीस कोटी तुझ्या देहाच्या दिमतीला, जोडल्या हातीं उभ्या राहतील! भाई, आतां मला निरोप द्या! जीवाच्या जीवासाठींसुद्धां चाकरीला चोर होतां येत नाहीं. हिरोजी, साबाजी शंभु-राजांच्या सोडवणुकीसाठीं निघाला! पण आज मला तुझ्या धीराचा पाठिंबा नाहीं. हिरा, देवाच्या दरबारांत, तुम्हां जिवाशिवांच्या गांठी पडल्यावर, राजांजवळ भीड घालून त्यांना सांग, साबाजी अगदीं थकला, उतारवय झालें–आतां ही दगदग होत नाहीं; त्याला लौकर सोडवून घ्या ! हिरू, आतां पुन्हा भेट राजांच्या समोर ! हिरकणी, वरच्या वाटेनें जपून जा; वाटेंत तुला तुझ्या साऊची आतां सोबत नाहीं ! आतां ही एवढी एक –एक–एकच अखेरमिठी–आणि संबंध तुटला ! ( उठून उभा राहातो) संपला स्नेहाचा संसार ! फरजंद ! नोकरी पेशांतल्या साबाजी शिरक्यांचा, तुमच्या वीर देहाला हा शेवटचा रामराम !

[ त्याच्या पायांवर डोकें ठेवतो. पडदां पडतो. ]

## प्रवेश दुसरा

[ स्थळ —वाटमाध्यावरील रस्ता. चिटणीस व रायाजी प्रवेश करितात. ]

चिटणीस : अरेरे, दैवाची दिशाभूल झाली म्हणजे अशी फसगत होते.

रायाजी : मोऱ्यांनीं पलेदार मजला मारून राजांना तुळापुरीं बादशाही छावणींत नेऊन गुदरलें; मीं माझ्याकडून कांहीं कसूर केली नाहीं.

चिटणीस : सेनासागर, तुम्ही मोठीं माणसें; मन स्थावर नसलें तरी तुमच्या हातून भाग्याची करणीच होते. गंगा गढूळली म्हणजे समुद्र सोडून कांहीं डबक्यांत जाऊन जीव देत नाहीं. बरें पुढें काय ? साबाजींनीं तुम्हांला माघार घ्यायला सांगितलें ?

रायाजी : मोऱ्यांनीं मान्यांना पाठविलें इकडे धाकट्या राजांना आणि मा-साहेबांना धरण्यासाठीं–तेव्हां माणसाला माणूस वाढावें म्हणून साबाजींनीं मला इकडे पाठविलें आणि बेगमसाहेबांच्या भेटीसाठीं आपण तुळापुराकडे गेले.

चिटणीस : सेनासागर, आतां मान्यांचा मारा चुकविणें मुष्किलीचें झालें आहे.

माझ्या बाळबुद्धीचा बेत तुमच्या मनास येईल का ?

रायाजी : खंडोबा, तुला बाळबुद्धीचा कोण म्हणेल ? मोठमोठ्या पंडितांशीं, मांडीला मांडी लावून, बरोबरीनें बोलत बसण्याची तुझी लायकी आहे. काय तुझा बेत आहे सांग पाहूं.

चिटणीस : आपण असे एकमेळीं निघालों तर वेळेवर एक घाव दोन तुकडे व्हायचे; म्हणून माझा मनसुबा असा आहे कीं, आपण फुटून रायगडाकडे दोन वाटांनीं जावें; तुम्ही मासाहेबांना घेऊन तळकोंकणांतून चला; मी धाकट्या राजांच्या संगतीं वाईदेशावरून येतों. अशानें भीति दुभावून मृत्यूचें निदान अपमृत्यूवर तरी भागेल.

रायाजी : तुझा सल्ला पोक्तपणाचा आहे.

चिटणीस : चला तर मग. याच पावलीं मासाहेबांना हें कळवून मार्गाला लागूं.

[ दोघेहि जातात. पडदा पडतो. ]

## प्रवेश तिसरा

[ स्थळः—तुळापूर; बादशाही छावणी. बेगमसाहेबांचा शामियाना. जाळीदार पडद्यामागें बेगमसाहेब, दासी, पुढें साबाजी. ]

साबाजी : मी साबाजी शिरके बेगमसाहेबांच्या पायभेटीसाठीं आलों आहें.

बेगम : उठा, आमच्या येसूबाईसाहेब तुम्हाला वडीलपणानें लेखतात. साबाजी, ताईसाहेबांनीं या गरीब बहिणीची आठवण कां केली ?

साबाजी : हुजूर, ऐकावा त्यांचा निरोप. घरधनी आपल्या वडिलांच्या अटकेंत गुंतले आहेत; घरांत कर्तेपणानें बघायला कोणी नाहीं; आणि या करंड्यांतलें कुंकू वाढवायची वेळ आली आहे; तेव्हां आईसाहेबांनीं हा करंडा आपल्याकडून भरून — कुंकवानें भरून—मागितला आहे. हुजूर जाणतच आहेत कीं, हिंदूंच्या बायकांना कुंकू हेंच सौभाग्याचें लेणें आहे.

बेगम : हुशार हेजीब आपली अडचण माझ्या लक्षांत आली; पण हा नाइलाजाचा कमवखत आहे. आमच्या घरीं कुंकू लाभण्याची आशा नाहीं; पाक दीनाचे मुसल्मीन काळा अबीर बुक्का वापरतात.

साबाजी : मासाहेबांना आपली मोठी आशा आहे; निदान मला राजांशी

बोलायला मिळालें तर मी राजांच्या तोंडचीं चार सोन्याचीं अक्षरें मासाहेबांना ऐकण्यासाठीं घेऊन जाईन.

बेगम : ठीक आहे; पाठवा तो करंडा इकडे.

[ दासीबरोबर साबाजी करंडा पाठवितो. ]

साबाजी : [ स्वगत ] आई अंबाबाई, या वेळीं तूं बेगमसाहेबांच्या मनींमुखीं उभी रहा; या अवकाळीं करुणेचा विस्तार केला नाहींस तर माझ्या आशेचा सारा गांव ओसाड पडेल.

[ दासी करंडा परत आणून देते; साबाजी तो उघडून पाहतो. ]

साबाजी : साहेबा, हा तर खुद्द बादशाही शिक्याचा मोहरबंद परवाना आहे.

बेगम : हो; हा परवाना जवळ असल्यावर तुम्हांला बुरखा पांघरूनसुद्धां वाटेल तिथें, वाटेल त्या वेळीं वावरायला कोणाची अटक नाहीं.

साबाजी : पण यानें बेगमसाहेबांच्या जीवाला कांहीं त्रास होणार नाहीं ना ?

बेगम : या देहांतल्या रक्ताची लाली, मराठ्यांच्या महाराणीच्या मेहेरनजरेनेंच पाक राहिली आहे; साबाजी, ताईसाहेबांना बेफिकीर सांगा कीं, यामुळें प्रसंग ओढवलाच तर मुसलमानांच्या अबीराचें हिंदूकरितां लाल कुंकूं करण्यासाठीं, बेगमसाहेबा तें आपलें रक्त शिंपडायला तयार आहे. ताईसाहेबांना फारफार विचारलें म्हणून सांगा–धाकट्या शिवाजीराजांना माझा आशीर्वाद सांगा !

[ साबाजी कुर्निसात करितो; पडदा पडतो. ]

## प्रवेश पहिला

[ स्थळ:–घाटमाथ्यावरील आंबराई. रायाजी प्रवेश करितो. ]

रायाजी : ( स्वगत ) आतां अगदीं अखेर, अखेर होण्याची वेळ आली ! इच्छा बळावलेली आणि इलाज अगदीं पांगळा, अशी अवकळा जिवाला वेड लाविते. अधिऱ्या मनाला विरंगुळा पडावा म्हणून माथ्यावर कामगिरी घेऊन पाहिली, पण अनुभवानें उलट्या गोष्टी सांगितल्या. आज जिवाची बेचैनी बेहद्द वाढली आहे. बेकार बसा वा कारखानांत असा–प्रेमाच्या पेंचांतून जीव कोंहीं सुटत नाहीं. शिवगंगा, शुभांगी, शिवांगी ! प्यारी, आंतल्या आंत

तळमळ होऊन कांहीं सुचेनासें झालें आहे. एक विचार, एक अनुभव जीवाभोंवतीं घिरट्या घालून त्याला एकलेपणानें राहायला लावितो आणि दुसऱ्या गोष्टींना जवळ येऊं देत नाहीं. धडपडत्या मनानें सारखा विचार करूनहि, काय करावें याचा धागा लागत नाहीं. जिवा, जाऊं देत! दगडा-प्रमाणें जडावलेल्या डोक्याला घडीभर या दगडाच्या जातीची सोबत द्यावी म्हणजे झालें! शिवांगी, शुभांगी, शिवगंगा! नुसती तळमळ, आग चालली आहे!

[ दगडावर डोकें ठेवून पडतो, एका बाजूनें शिवांगी येते. ]

**शिवांगी :** ( स्वगत )

[ चाल—कुठवर पाहूं वाट माथ्यावर चंद्र—लावणी. ]

आजवरि पाहुनि वाट सुंदरा देह किरे झुरला। जिवलगा रे ॥
डोळ्यांत प्राण बघ उरला ॥
भरास आला खेळ—डाव हा कोणि तरी उकला ॥
माझाच डाव कां हुकला ॥
पुरती झाली सांज, कळप हा विसांवत बसला ॥
तो कीर ♣ कुणिकडे फसला ॥
घरिं घरिं चाले थाट देवावर फुलवरा चढला।
हा एक हार कां पडला ॥
बहरुनि आला बाग, चहुंकडे रंगरस झुकला।
माझाच मोगरा सुकला ॥
( चाल ) कां पाडिसि देवा, वज्रचुड्याला तडा।
कुणिकडे उडाला मुद्रिकेंतला खडा।
हरपला मणिच मग उदास नागिणफडा।
धरुनि भरंवसा जीव ज्यावरति आजवर ठरला।
जिवल्गा रे तो आज वायदा सरला ॥ १ ॥

राया, राजसा, हट्ट, हट्ट तरी किती करायचा? हा मुलखाविरहित रुसवा कधीं बरें सरायचा? राया, केलीस ती छळणा पुरेशी नाहीं का रे झाली? बायकांचा वेडा विश्वास; भोळ्या जीवानें दोन्ही डोळ्यांनीं पांखराखारखी भिरभिर वाट पाहिली; दिल्या मुदतीची पांच वर्षें–राया रे, एकेका प्राणानें एकेक वर्ष मोजलें; आज मुदत ढळून पांचवा दिवस! दिवसा-

♣ कीर = पोपट

दिवसाच्या श्वासानें प्राणामागून प्राण पळून, कठोरा, तुझ्या शिवांगीची आशा आज मरणार रे ! वेड्या जीवाला नादी लावलेंस; तुझ्या नांवासाठीं चारचौघांत बदनाम झालें, रानारानांतल्या राघूमैनांना तुझ्या नांवाची पढवणूक देत आलें; दगडादगडाला तुझा ठाव विचारला, फुलाफुलाला तुझा गांव विचारला ! कांट्याकुट्यांतून देहाची चाळण करून, तुझ्या पायधुळींत प्राणांची पेरणी करीत तुझ्यामागें देशोधडी केली ! आला दिवस गेला आन जीव भरंवशावर मेला ? राया, अशी वंचना कां रे केलीस ? अमृताच्या आळ्यांत वाढविलेल्या वेलीला विषाचीं कीं रे फळें आणिलीस ! राया, धाव धाव ! तुझ्याविना मी परदेशी झालें रे ! प्रेमानें पाहूं नकोस, रागानें पाहा– पण पुढें उभा राहा ! तुझ्या पावलांची उमटली साक्षी राखण्यासाटी कुडीची छाया धरीन; तुझ्या नजरेच्या मोहनीवरून जीवाची कुरवंडी करीन ! सख्या, जीवाचा धीर सुटला ! ( मोठ्यानें ) राया, राया, माझें भान सांडलें ! राया, आतां संभाळ रे संभाळ ! राया, राया, तुला कोणत्या डोळ्यांनीं पाहूं–तुला कोणत्या बोलांनीं बाहूं ? राया, संभाळ आतां ! [ ती बेभान पडूं लागते; रायाजी दचकून उठून तिला सांवरून धरितो. ]

**रायाजी :** कोण, माझी शिवांगी–माझी शिवगंगा ?

**शिवांगी :** ( खालीं पाहून ) तुझी–तुझी–साता जन्मांची तुझी शिवगंगा ! ( त्याच्याकडे निरखून पाहात ) राया–जिवलगा, ( एकदम जोरानें त्याला मिठी मारून ) निष्ठुरा, इतके दिवस कुठें रे होतास ? मला सांवरून धर ! नाहीं तर वेड्या आनंदानें ऊर कोंडून मी मरून जाईन ! मला टाकून जाऊं नकोस रे !

**रायाजी :** ( स्वगत ) अहाहा ! आनंदाचें आऊर*लोटलें ! आकाशांतून अमृताची झरणी लागून, काया कांटेफुलांनीं डंवरून निघाली ! चौऱ्यांशीं लक्ष जन्मांची तपश्चर्या फळाला आली ! पुंडलीका भेटी परब्रह्म आले गा ! माझी शिवांगी–साता जन्मांची माझी शिवगंगा, तानाजीबाबांच्या पुण्याईनें पुन्हा पाहिली ! बाबा, बाळपणीं माझ्या लग्नांत भाग्याचें विघ्न आल्यानें, सुनमुख पाहण्याची तुमची हौस पुरली नाहीं म्हणून सर्जेराजांनासुद्धां खंत वाटत होती. बाबा, आज दोघेजण मिळून, आम्हां बाळांवर अमृताचा अभिषेक धरा, नक्षत्रांच्या अक्षता उधळा आणि आनंदी आंसवांचा आहेर करा ! बाबा, आपल्या सुनेला डोळे भरून पाहून, तिला आपला आशीर्वाद द्या ! ( उघड ) शिवांगी, माझ्या बाबांच्या आंसवांच्या पावसांत आपण अशीच अखेरपर्यंत

* आऊर = पूर.

उभीं राहूं !

शिवांगी : राया, आतां मला टाकून जाणार नाहींस ना रे ?

रायाजी : आतां तुला टाकून जाणें ? माझा प्राण गेला तर प्राणेश्वरी, माझा मुडदा अशा मगरमिठीनें तुझ्या सेवेला सादर राहील !

[ नोकर धावत येतो. ]

नोकर : सेनासागर घात झाला ! मान्यांनीं आंवराईला चौफेर घेरा घातला ! आतां मासाहेबांचें कसें होणार ? सेनासागर, कसे हो असे आळसांत फसलांत ? मान्यांनीं अगदीं मोका साधिला !

रायाजी : मान्यांनीं अगदीं दुस्मानदावा साधला ! जा, मामासाहेबांना इकडे घेऊन ये.

नोकर : मामासाहेबांना इकडे घेऊन येऊं ? त्यांना कोणत्या जिभेनें असें—

रायाजी : तुला काय त्याचं ! हुकमाच्या ताबेदाराला स्वतःची जीभ नसते. जा ! [ नोकर जातो.

रायाजी : ( स्वगत ) वडील माणसांचा उपमर्द झाला तरी फिकीर नाहीं, पण आतां माझ्या शिवांगीच्या या मिटींतून माझी सुटका-सुटका-माझी सुटका-पण मासाहेबांची सुटका मग कशी करायची आणि कुणी करायची ? मासाहेबांच्या अब्रूला धक्का लागण्याची-मराठेशाहीच्या इज्जतीवर आकाश कोसळण्याची वेळ आली असतांही मी जर अशा मोहाच्या मिटींत मग्न राहिलों तर-तर..., तर दुभंगलेल्या आभाळाच्या फटींतून थोरले राजे धडधडणाऱ्या छातीनें माझ्यावर आशाळभूत-दैन्यवाणी आशाळभूत नजर टाकतील-मला प्रेमाच्या अशा मगरमिटींत गवसलेला पाहून, सर्जराजे उसासा टाकून माझ्या बाबांच्याकडे पाहतील-या कुलांगाराच्या लाजिरवाण्या करणीनें ओशाळून बाबा मान खालीं करतील ? सुभेदारांचा सिंहासारखा जबडा चिमणीसारखा होईल ! उद्यां वर गेल्यावर, सुभेदार सुनमुख पाहण्याचा कंटाळा करतील ! नाहीं, मला ही मिठी सोडविलीच पाहिजे. मासाहेबांची सुटका-पण ती कशी करायची ? बरोबर वीस तरी माणसें असतीं तर या रायाजीनें-या राजेश्वरीच्या रणरंगानें मान्यांच्या हजारांशीं हिंमतीनें हुजत घातली असती ! काय करावें ? कशा रीतीनें मासाहेबांना बाहेर न्यावें ? दुसऱ्या एखाद्या वेषानें मासाहेबांना—कीं, मासाहेबांच्या वेषानें दुसऱ्या एखादीलाच मान्यांच्या हातीं देऊन-हो मान्यांनीं अजून मासाहेबांना कधींच बघितलेलें नाहीं-सोन्याच्या साखळ्या जिच्या

पायांत दिसतील तिलाच माने ऐकिवानें मासाहेब म्हणतील-पण अशी बाई-सुद्धां कोणी नाहीं; कोणाच्या जीवावर असा उदार होऊं ? या रायाजीच्या रासवटी जीवाचा या वेळीं काय उपयोग ? मग या माझ्या नाजुक जीवावर-( तिला एकदम जोराची मिठी मारून ) अरेरे, माझी दीनदुबळी, कमनशीब शिवांगी ! मालुसऱ्यांचा कुलकर्म मोठा कठीण आहे. या माझ्या नाजूक जीवावर—या प्रेमाच्या पंचप्राणांवर पाणी सोडलेंच पाहिजे !

शिवांगी : राया, ही असली मिठी ! राया, तुझ्या मनांत कांहीं तरी पाप आलें ! तूं असा मुसळड कां ? अशा वेळीं तोंडाला येईल तें सारखा बोलत राहा. तुला वाटेल तें बोल— अगदीं वेड्यासारखें बोल ! पण कांहींतरी बोल ! मला आनंदाच्या उकळ्या फुटून येताहेत; तुझ्या बोलण्याकडे लक्ष लावण्यासाठीं धडपडणें उरलें नाहीं तर हा जीव आनंदाच्या गुंगींत बुडून मी मरून जाईन ! राया, मनांत असेल तें बोल-मनांत नसेल तें बोल ! वेड्या, किती परोपरीनें तुला आळवायचें बरें ? राया, राया-बोल ना रे राया ! असें काय बरें ?

" बोल मोरे राजारे नैनू अब मोसे बोल।
चाहे पिया जान । चाहे पिया रैन ।
दिलकी बाते बोल ॥ ध्रु० ॥
कबसे मैं थाडी थाडी, रहां तकत हूं ।
कबसे मैं थाडी तोपे अरज करेत ।
मुखसे मीठे बोल । बोल मोरे ॥ १ ॥

बोलणार ना ? ही मी अशी ऐकत राहतें बरें ? [त्याच्या खांद्यावर मान ठेविते.]

रायाजी : ( स्वगत ) जिभेवरचा बोल ओठांवर मरतो-डोळ्यांतला बोल आंसवांनीं झरतो ! सुभेदार तानाजी मालुसरे, उदेभानानें हात कलम केला तेव्हा देहापासून हात तुटला, पण हातापासून पट्टा सुटला नाहीं ! त्या तुमच्या पट्ट्याची करारी कुवत, आज आपल्या रायाच्या जिभेच्या पट्ट्याला द्या ! बोला, सेनासागर, कमरेच्या राजेश्वरीची जीभ करून तिनें बोला !

शिवांगी : बोल, राया, बोल रे, जीवाच्या राया, बोलबोलानें मला बेभान करून टाक !

रायाजी : ( स्वगत ) साऊबाबा, देवकळा दवडून दगड होऊं नकोस म्हणून सांगितलेस; पण आतां दगड होऊन अंगीं देवकळा आणायला नको का ?

शिवांगी : नाहीं बोलत तूं ? हट्टी राया, तुझ्या मनांत मग, मीं मरावें असें का आहे ?

रायाजी : हो !

शिवांगी : वेड्या, मग हें बोलायला का भ्यालास ? राया, माझ्या शिपाया-साठीं जिवाचें रान करायला शिवांगीनें नाहीं कधीं म्हटलें ? तुझ्यासाठीं जगा-यचं—तुझ्यासाठीं मरायचं ! माझा राया अगदीं अगदीं वेडा आहे.

[ त्याला मिठी मारावयास जाते: तो थांबवून तिचे हात धरितो. ]

रायाजी : शिवांगी, थांब; तुझा शिपाई तुला वाटतो तितका गरीब नाहीं; तुझा राया एखादा बेजबाबदार शिपाईप्यादा नाहीं !

शिवांगी : राया, राजेश्वरा, तुला गरीब कोण म्हणेल ? कुबेरभांडाराची सारी सारी संपदा माझ्या रायाच्या नांवावरून ओवाळून टाकावी ! माझ्या सांवळ्यासुरतीचा सरदार, माझ्या ऐन अमदानीचा अमीर, माझ्या उग-लत्या उमेदीचा उमराव, या नव्या नवतीचा नवरंग, माझ्या बढत्या बहारीचा बादशहा–तूं गरीब ? शिवांगीच्या शिलेदाराला गरीब कोण म्हणेल ?

रायाजी : प्रेमाच्या जीवा, तुझ्या मनानें म्हटलें तें जनालाही पटलें आहे ! तुझ्या ऐन अमदानीचा अमीर, मराठी अमदानीचा अमीर आहे; तुझ्या सांवळ्या सुरतीचा सरदार, सत्तावीस किल्ल्यांचा सरदार आहे; तुझ्या उम-लत्या उमेदीचा उमराव, उमराठ्याचा उमराव आहे; तुझ्या नव्या नवतीचा नवरंग, या राजेश्वरीचा रणरंग आहे; तुझ्या बढत्या बहारीचा बादशहा, त्रिखाडीच्या बहाद्दराचा बेटा आहे ! शिवांगीचा शिलेदार, संभाजीराजांचा सेनासागर आहे ! जिवा, सिंहगडच्या सिंहाचा छावा–सुभेदार तानाजी मालुसऱ्यांचा रायाजी म्हणून ज्याला म्हणतात तोच, शिवांगी, हा तुझा शिपाई.

शिवांगी : उमराठ्याचा उमराव, राजेश्वरीचा रणरंग, संभाजीराजांचा सेना-सागर ! ( एकदम हुंदका देऊन ) राया–राया, तूं मोठा खोटा आहेस रे ! सर्जेराजांच्या नांवासारखीं तुमचीं मोठालीं नावें ! आपलें मन माझ्यापासून चोरून ठेवून मला भलत्या भरीं पाडलेस ! देवा रे, तुझें पृथ्वीमोलाचें भाग्य या रंक पोरीला कसें रे धार्जिणें होणार ! राया, अजून मला आपली म्हणशील का ? राया, मला तुझें मोठेपण लाभेल का रे ?

रायाजी : मोठेपणाचा मार्ग मरणाच्या मैदानांतून जातो. माझ्या बाबांनीं मालु-सऱ्यांचें नांव सिंहगडावरून स्वर्गावर चढवून दिलें आहे. मालुसऱ्यांचें मोठें नांव मिळविण्यासाठीं, रायाची शिवगंगा त्या रस्त्यानें जाईल का ? शिवांगी, रायाचें नांव राखण्यासाठीं जीवाचा मोह तुला सुटेल का ? प्रेमानें माझी

झालीस—प्यार जिवा–माझ्या धर्मानें तशी माझी होशील का? शिवांगी, माझं मनोगत तुला सांगूं का?

शिवांगी : राया,

[ चाल : बा उभा ठेवुनि कर कटीं० ]

कां सख्या शिर्णविशी अशी । आपुली दासी ।
मन होत हिंपुटी*; तसा शीण जीवासी ।
तो तुझ्या मुखींचा बोल पडूं दे राया ।
पसरीन जिवाचें जाळें त्यासि झेलाया ॥ ध्रु० ॥
फुलवंती राजसबाळी । तिचा तूं माळी ।
जिवलगा तीनही काळीं ।
ही माळ धरा हृदयाशीं । वहा देवाशी ।
परवा न सख्या आम्हांसी ।
देहाची नाहीं माया । जिवाच्या राया ।
शिवगंगा तुमची छाया ।
करुनिया मनाचा रमणा । अहो भगवाना ।
लुटवा या पंचप्राणां ।
तो बोल एकदा बोल, वाहतें आणा ।
तूं सुखी तरी सुख मजला–हा एकच बाणा ॥ १ ॥

रायाजी : शिवांगी, आपल्या जीवाचा धडा करून ऐक! आतांच ऐकिलेंसना, कीं मान्यांनीं आंबराईला वेढा दिला म्हणून! मासाहेबांना रायगडावर नेण्याची कामगिरी माझ्याकडे आली आहे; संभाजीराजांची ही महाराणी, शिवाजीराजांची ही पुण्याई, मराठ्यांची अब्रू, या नापाक मान्यांच्या हातीं सांपडली तर एकजात मराठेशाहींत मालुसऱ्यांच्या कुळाची, तानाजीरावांच्या आठवणीची–शिवांगी, तुझ्या रायाच्या नांवाची–नुसती रेवण उडून जाईल! आतां निभावणीचा एकच रस्ता आहे. या मान्यांनीं अजून मासाहेबांना कधीं पाहिलेलें नाहीं. मासाहेबांच्या सोन्याच्या सांखळ्या पायांत घालून; त्यांचें नांव सांगून, त्यांच्या जागीं तुला उभें राहावें लागेल; भोसलेशाहीच्या सांखळ्यांची खूण पटून, माने तुलाच मासाहेब म्हणून मोऱ्यांसमोर घेऊन जातील आणि आम्ही रायगडावर जाऊं! पुढें मोऱ्यांनीं तुला ओळखल्यावर संतापाच्या भरांत सूड घेण्यासाठीं, त्यांनीं तुझ्या देहाची–तुझ्या रायाच्या प्रेमाची

* हिंपुटी = कष्टी.

-विटंबना करण्याकरितां आपला हात पुढें करितांच—

शिवांगी : शिवांगीच्या नशिबा, त्या वेळीं जिवाची सांडणूक कशी करायची एवढें एकदा सांग म्हणजे झालें ! सांग, कोणत्या उपायानें ?

रायाजी : शाबास, शाबास, दिलदार जिवा, देवाधर्मांच्या नांवानें ! शाबास ! हा पाहा निर्वाणीचा उपाय ! ही सर्जेराजांच्या नांवाची हिऱ्याची आंगठी—माझ्या बहाद्दर प्रेमा, त्या वेळीं पोटांत गिळायची ( आंगठी तिच्या बोटांत घालतो. ) प्रीतीच्या अफाट राज्यांत प्रेमळ वल्लभांनीं, आपल्या प्रेमाची जन्माची खूण राहावी म्हणून प्रियतमांना मुद्रिका दिल्या असतील; पण आपल्या प्रेमाची जन्माची खूण नाहींशी करण्यासाठीं अशी आंगठी आजवर कोणी कोणाला दिली नसेल ! शिवांगी, खरोखरीच माझ्या सांगण्याप्रमाणें तुझ्या हातून घडेल का ?

शिवांगी : मालिक, तुझ्या मनाची मोडणी करण्यासाठीं का शिवांगीनें तुझ्या नांवाशीं अशी सलगी केली आहे ? वेड्या, आम्हां बायकांना सासरचें नांव जोडायला माहेरच्या ममतेचें मूळ तोडावें लागतें. या हिऱ्याच्या तेजानें माझा रस्ता दिसल्यावांचून राहील का ? तुझ्या प्रेमासारखें या हिऱ्याचें तेज चमकतें आहे खरें ! पाहा बरें नीट !

रायाजी : हो, पाहिलें; नीट पाहिलें ! ( स्वगत ) हेंच पाहिलं कीं हिरा पचनीं पडणें कठीण आहे—दुर्दैवी संसारांत प्रेम पचनीं पडणें कठीण आहे !

शिवांगी : राया, आतां पुन्हा डोळेभेट कधीं घडायची ?

रायाजी : लाडक्या जीवा, आतां पुन्हा भेट ? पुढल्या जन्मीं !

शिवांगी : डोळ्यांत आंसू आन् तोंडावर हसूं ! लबाडा, लटकें हसून असें फसवूं नकोस ! आधींच आपलें तुला बजावून ठेवितें—राया, इतका धीर माझ्यानें मुळींच निघायचा नाहीं हो ! कुडींतून सुटका होतांच, शिवांगीचा अधिरा जीव, उडत्या पांखराच्या पंखांनीं तुझ्याभोंवतीं घिरट्या घालील; घडीपळानें म्हणून तुला विसंबायची नाहीं ! राया, दरबारी थाटांत तुझ्या शिरपेंचावरची शोभा होईन, मोकळ्या मनाच्या मिजलशींत तुझ्या शराबावरची लाली होईन; शिकारीच्या तळपत्या तापांत माझ्या रायाच्या डोक्यावरतीं धार होईन—ऐन रणाच्या गर्दींत माझ्या रणरंगाच्या राजेश्वरीची धार होईन ! पण राया, इतक्या वेळांत पहिल्यासारखा मला विसरणार तर नाहींस ना ?

रायाजी : तुला विसरेन ? एकेका प्राणावर तुझ्या नांवाचें अक्षर गोंदवून, पंचप्राणांच्या प्रभावळींत " श्रीशिवगंगा " जडवून ठेवीन !

शिवांगी : राया, माझ्या मरण्यानें तुला इतकें का सुख होणार ? किती रे मी दैवाची ?

रायाजी : मला एकट्यालाच सुख होईल ? अख्म मराठेशाही तुला आनंदानें दुवा देईल. उद्यांच्या लग्नांचीं तुझ्या माझ्या नांवांनीं देवकें बसतील; देवि शिवगंगे ! तुझ्या प्रेमळ जीवाच्या उबार आधारावर महाराष्ट्रांत गंगायमुना वाहतील ! तूं वर गेल्यावर, सुभेदार अभिमानी कौतुकानें तुला राजांसमोर नेतील; मातोश्री सईबाईसाहेब आंसवांच्या मोत्यांनीं तुझा भांग भरतील; सिंहगडीं, कल्याण दरवाजावर बाबांच्या हातून गतीस मिळालेल्या चंद्रावळी हत्तीवरून सर्जेराजे तुझी मिरवणूक काढतील; तुझा साजशिणगार हेरून माझी जानकीआका मोळ्या आनंदानें गदगदून हसेल; चंद्रावळीवरून माझ्या शिवांगीला मिरवितांना पाहून, ऐरावताची धनीन हेव्यानें ओशाळून खालीं पाहील; तेव्हां आपल्या श्रीजिजाऊसाहेब आपल्या हातीं तुझी दृष्ट काढतील; आणि बाबांचा पवाडा गाणारा तुळशीदास—मंडईच्या बाजारीं असलेला—फणी-आळीच्या फडांत देसाईदेशमुखांसमोर बसलेला—रघु सोनाराच्या घरीं बसलेला—आपला मराठेशाहीचा शाहीर—देवादिकांच्या देखत, गंधर्वांच्या तांड्यासमोर, डफतुणतुण्यांच्या तालासुरांत आणि मराठी बोलांच्या ऐन पुरांत--तुझ्या माझ्या अखेरभेटीचा, जिव्हाळ्याच्या जुन्या गाण्याला जितेपणाच्या जमानें, नव्या धाटणीचा कटिबंध जोडील आणि तुझ्या जिवाच्या पेरणीनें मराठी मनाच्या माळावर मोत्याचें पीक तोडील ! ( पाहून ) शिवांगी, त्या पाहा मासाहेब येताहेत; चल, या मराठमोळ्याच्या मायगंगेला प्रणाम करूं ! मात्र सोन्याच्या सांखळ्या आपल्या हातीं येईपर्यंत आपल्या आतांच्या बेताबद्दल आधीं त्यांच्यादेखत कांहीं बोलूं नकोस !

[ येसूबाई येतात. ]

रायाजी : मासाहेब, ही माझी--ही--ही आपली—

येसूबाई : नव्या जाऊबाई ना ? सेनासागर, जाऊबाईपेक्षां तुम्हीच जास्त लाजलां ! तुम्हांला असे लाजतांना पाहून राजे मनापासून हसले असते ! ( तीं दोघें येसूबाईस नमस्कार करतात. ) उदंड आयुष्मान् व्हा.

रायाजी : मासाहेब, वडिलांनीं कोरडा आशीर्वाद दिला म्हणजे मुलांचीं मनें विरस होतात. माझी शिवांगी मोठ्या हळव्या जीवाची आहे; माझ्या नव्या नवरीसाठीं मासाहेबांजवळ मी मूलपणानें एका अलंकाराची मागणी करणार आहें. आजवर शिवांगीच्या प्रेमाखेरीज मीं देवाजवळसुद्धां याचना केली

नाहीं. तानाजीबाबांचें शुभ झाल्याचें ऐकल्यावर, सर्जेराजांनीं माझ्या आईला सांगून पाठविलें कीं, जसा माझा शंभु, जसा राजाराम, तसाच तिसरा रायबा ! त्या दिवसापासून आजतागायत, रायगडच्या रणमर्दाच्या पावलामागें पाऊल टाकून, या राजेश्वरीच्या रणरंगानें जगाला रामलक्ष्मणांची मराठी जोडी दाखविली ! मासाहेब, केल्या कामाची चोरी नाहीं; आज मला माझा मुशाहिरा पाहिजे. तोंडांतून अवाक्षर काढल्यावांचून, मासाहेब माझा बाळहट्ट पुरवाल का ?

येसूबाई : सेनासागर, अखेर बोलून घालविलेत ! आधीं मागायचें तरी होतें ! काय पाहिजे तुमच्या नव्या नवरीला ?

रायाजी : मासाहेब, मी सांगेन त्याप्रमाणें वागण्याबद्दल माझ्या राजेश्वरीची आण वाहा पाहूं !

यसूबाई : ( रायाजीच्या तलवारीवर हात ठेवून ) भोंसल्यांच्या भाग्याच्या भंडारावर न्हाण्यासाठीं तळपणाऱ्या या तुमच्या नागिणीची--मालुसऱ्यांच्या पिढीजात राजेश्वरीची मला ग्वाही आहे.

रायाजी शिवांगी, आपण मिळविलें ! मासाहेब,आपल्या पायांतल्या सोन्याच्या सांखळ्या माझ्या शिवांगीसाठीं पाहिजेत !

येसूबाई : रायाजी, मी लोभानें म्हणत नाहीं--राजांचे चरण साक्ष आहेत--पण रायगडच्या राणीच्या या सांखळ्या, परक्या पायांना नागिणीचा विळखा घालून विखारी चावा घेतात; यांच्या स्पर्शामुळें, नवथर जीव, देहाची शींव सांडून, देशोधडी लागतो ! परवांपावेतों ही सांगायची गोष्ट होती; तुळशीच्या अनुभवानें आमच्या कुळींच्या या कडू कहाणीला खरेपणा आणला आहे.

रायाजी : मासाहेब, आपण राजेश्वरीच्या साक्षीनें बोल दिलेला आहे ! थोरांना एक गोष्ट दोन तऱ्हांनीं बोलतां येत नाहीं. आतां वेळ सरला होत आहे; मान्यांनीं राईला असा चौगर्द घेरा घातला आहे कीं, उडत्या पांखराला मुंग्यां पळवाट मिळायची नाहीं. माने इतक्यांत आपल्या तपासासाठीं इकडे येतील ! पण त्यांनीं अजून आपल्याला पाहिलेलें नाहीं; तवढ्यांत, आपल्या सांखळ्या घालून, औट घटकेसाठीं आपलें नांव लेवून, माझी शिवांगी आपल्या जागीं उभी टाकेल ! शिवांगीच्या जीवापुरत्या सुटकेसाठीं, राजांनीं बाबांना दिलेली हिऱ्याची आंगठी, मुहूर्तावर मीं मघांशींच तिच्या बोटीं घातली आहे ! शिवांगीची दुबळी दौलत घडीभर आपण स्वीकारून आमच्या नांवाला पावन करावें ! माने खुशाल शिवांगीला घेऊन जातील !

येसूबाई : सेवासागर, सेनासागर, निवळ मांगाची करणी केलीत! गोड बोलून माझा गळा गुंतविलात! बाई, काय ग तुझ्या संसाराची परवड ही!

शिवांगी : राया, मासाहेब रागावल्या वाटतें? आतां कसें बरें करायचें? थांब, मी घालतें त्यांची समजूत. बाई, माझ्या रायावर अशा रागावूं नका; मासाहेब, आईसारख्या ना तुम्ही मला? मग माझें कां बरें सांगणें मोडायचें? माझा राया अगदीं भोळा आहे हो!

[ येसूबाई शिवांगीला पोटाशीं धरितात. ]

रायाजी : मासाहेब, वचनाला बाध आला तर माझ्या राजेश्वरीच्या इज्जतीला बट्टा लागेल!

येसूबाई : ती राजेश्वरी नाहीं–पण खाटकाचा सुरा आहे. तिनेंच माझा गळा कापलांत–या भाबड्या, गरीब गाईचा गळा उतरलांत! आणखी असे निर्दयासारखे हसतां आहांत–शुद्ध कसाब, कसाब आहांत!

रायाजी : मासाहेब, सोईरसंबंधाच्या गोष्टी व्हायच्या त्या झाल्याच पाहिजेत! आई भवानीच्या साक्षीनें, पहिल्या पिढींत, भोंसल्यामालुसऱ्यांच्या सोयरिकी जमून, सर्जेराजांनीं ही आमची राजेश्वरी सेवाधर्मासाठीं पदरीं घेतली, त्याच वेळीं, या पोरीच्या आंदणासाठीं, मालुसऱ्यांचा औट हातांचा मळा भोंसल्यांच्या नांवें, जिवांच्या मिराशीपासून, कायमदायम तोडून दिला! भोंसल्यांच्या अमंगळाची इडापिडा, व्याहीभेटींत आमच्या भोगवट्याला आली! आमच्या आजच्या विहिणीच्या पायावर विरवल्या रेखाटण्यासाठीं, शिवांगीच्या रक्ताची सांडणूक व्हायलाच पाहिजे!

येसूबाई : अशा रक्ताभरल्या पावलीं गडावर गेलें तर रायगडाचा रेतीचूर होईल! मोठेपणाचा कर्मभोग मराठ्यांच्या छत्रपतींवर पावलोंपावलीं ओढवतो आहे! भोंसल्यांच्या खाशांना, ताटाला बसण्यासाठीं, इमानी सोयऱ्यांच्या प्राणाहुति घालून, त्यांच्या पिंडाच्या रगतभातानें आपला पिंड पोसावा लागतो! सेनासागर, तुम्हां सर्वांच्या उपकाराचे, आमच्या पांच पिढ्यांच्या पुण्याईनेंसुद्धां पांग फिटायचे नाहींत!

रायाजी : मासाहेब, माने अचानक येऊन थडकले तर मसलत फसेल! सीतामाईनीं लक्ष्मणाच्या बोलण्याचा अव्हेर केला तेव्हां जाऊं देत, अभद्राची उजळणी भलत्या वेळीं कशाला हवी? सोन्याच्या सांखळ्या लौकर काढून द्या! मासाहेब, आतां माझी, राजांची, धाकट्या राजांची, आण आहे!

[ येसूबाई सांखळ्या काढतात व शिवांगीला देतात. ]

**रायाजी :** ( उघड ) आधी राजेश्वरीची शपथ दिली म्हणूनच ही देवी नव-साला पावली ! ( स्वगत ) शिवांगी, घाल त्या सांखळ्या पायांत !

**शिवांगी :** मला नाहीं बाई जमायचें तें ! राया, तुझ्या प्रेमासाठीं, राजांच्या नांवासाठीं, आणखी एकदा मरायला सांग—पण या सांखळ्या आपल्या हातीं कशा लेतात हें नाहीं मला माहीत ! तूंच ये कसा ! पण तुला पुरुषाला तरी काय कळायचें आहे त्यांत ? बाई, आम्ही आपलीं रानचीं जनावरें आहोंत; तुमच्या नांवानें आम्हांला तरून जायचें आहे. माझ्या रायाच्या पुण्याईनें हीं भूषणें मला लाभलीं; एरवीं बघायलासुद्धां मिळायचीं नाहींत. तुम्हीच आपल्या हातीं घाला पाहूं या सांखळ्या माझ्या पायीं ! राया, बाई सांग बरें तूं एकदा ! येतांना बाई ? राया, बाई जरा हट्टीच आहेत कारे ?

**रायाजी :** ( हसून ) मासाहेब, माफ करा—माझ्या रानफुलाचा रंग जरा भडक आहे; पण वास नाजूक आहे. मनाची मोठी कोवळी जात आहे ही ! आपल्या चरणीं वाहिलें आहे; पूजा कशी तरी साजरी करून घ्या ! तोंडाचा रांगडी राक्षसगण आहे, पण दिल देवगणाचा आहे ! घाला त्या सांखळ्या पायांत !

**येसूबाई :** सेनासागर, शिळारसाच्या रतिबानें मन पोसून, तुम्ही बोलायला शिकलां आहांत ! मी काय बोलूं ? तुमच्या राजेश्वरीनें माझी जीभच कातलेली आहे ! बेटा, ये अशी; नशिबाचा छळवाद व्हायचा तितका झालाच पाहिजे.

[ येसूबाई सांखळ्या घेऊन पुढें होतात. ]

**शिवांगी :** राया, या मासाहेबांच्या सांखळ्या—या पायांत घालूं नयेत ना ? हें बघ या हातांतच घातल्या तर नाहीं का चालायचें ? हें पूजेचें निर्माल्य पायदळीं कसें पाडायचें ?

**रायाजी :** वेडी, माझी भाग्याची वेडी ! देवाचें नांव घे आणि खुशाल सांखळ्या पायांत घाल ! दामाजीवर संकट आलें तेव्हा भक्तासाठीं भगवंतांनीं भणंगाचा वेष घेतला; आज काळाची गंगा उलटी वहात आहे; देवाघरचें सांकडें दूर करण्यासाठीं आज भिकाऱ्यांनीं भाग्यवंताचें नांव घ्यायचें आहे. तीचें सांस घेतल्यावर, पाटावाची परवा ठेवून चालत नाहीं. मासाहेब, उगीच वेळ वाढतो आहे.

**शिवांगी :** खरेंच बाई, घाई करा गडे ! माझा राया इतकें सांगतो आहे—आपण जिवाभावाच्या मैत्रिणी—माझ्या भाग्याची उजरी वेळ—आणि तरी तुझा हात आपला अडन ! रायाला राग येईल बरें !

[ चाल : साजन होरे० ]

साजणि बाई । सजवी मजसि करि घाई ।
लगिनघडि जाई । वेळ आली मरा ।
देव आले घरा । करी चतुराई ॥ १ ॥
साजणि बाई । नटुनि थटुनि लवलाहीं ।
निघतें अगाई । राजराजेश्वरा ।
जवळि याहो जरा । बघिन मुख कांहीं ॥ २ ॥
साजणि बाई । चपळ पळत मन पाहीं ।
जवळ नच राही । मंगलाचे सडे ।
याकि चोंहींकडे । दावि नवलाई ॥ ३ ॥

[ सांखळ्या घालून होतात. ]

**येसूबाई** : सेनासागर, सांगा आणखी काय करायचें राहिलें आहे तें! पोरीचें एकेक बोलणें ऐकतांना, आंतड्याला पीळ बसवून जीव तटतटां तुटतो अगदीं! हं, मीच फिरवूं का सुरा हिच्या मानेवरून? सेनासागर, काय मांडलें आहे तुम्हीं हें?

**रायाजी** : मासाहेब, आज माणूसबळ खुंटलें म्हणून बाशिंगबळ तुटलें!

**शिवांगी** : राया, या सांखळ्या घातल्या खऱ्या; पण मी राजाच्या राणीसारखी शोभतें तरी का रे!

**रायाजी** : परिसाच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें झालें! शिवांगी, आपल्या प्रीतीचा प्रवाह गंगास्वरूप झाला; प्रेमाच्या पोरखेळांतली रायाजीची राणी, मरणाचें मोल देऊन, मराठ्यांची महाराणी झाली! माझी शिवगंगा-श्रीमहाराष्ट्रगंगा झाली!

**शिवांगी** : राया, मरतांना मला भीति वाटेल का रे? पण माझ्या राजेश्वरीच्या रणरंगाला मरणाचा कोण केवा! बाई, बायकांना मरतांना भीति वाटते काहो? अगबाई, तुमच्या डोळ्यांला पाणी आलें! तुम्हांला तरी मीं कशाला विचारलें कुणास ठाऊक! या आंगठीवर शिवरायांचें नांव आहे आणि रायाच्या जिवाचा भाव आहे; मला वेडीला एवढें कळलें नाहीं, कीं शिवरायांचें नांव तोंडीं असतांना, माझ्या रायाच्या प्रेमाची हिरकणी पोटीं असतांना, मला मरायची भीति ती काय वाटणार? [ नोकर धावत येतो. ]

**नोकर** : सेनासागर, माने आले-अगदीं जवळ आले!

**रायाजी** : खुशाल येऊं देत-- अगदीं जवळ येऊं देत! अरे, हें बघ, मासाहे-

बांना आतां शिवांगी म्हणावयाचें आणि या या आपल्या-वेड्या प्रेमा, आतां बोलतांना थांबूं नकोस. प्रेमाच्या वरळण्याला सगळ्या जगानेंच वेड्यांत काढिलें आहे! अरे, या आपल्या मासाहेब! येसूबाईसाहेब, क्षमा करा — माझ्या मरत्या प्रेमाचा हा अखेरचा उमाळा आहे! 'पुंडलिका भेटी परब्रह्म आलें बा!' पण, भक्तराज पुंडलिकानें, मातापितरांची सेवा साधण्यासाठीं, श्रीपांडुरंगस्वरूप परब्रह्माला अठ्ठावीस युगें विटेवर तिष्ठत ठेविलें; महाराष्ट्राच्या मातापितरांच्या नांवासाठीं, प्रेमस्वरूप परब्रह्मा, हा रायाजी तुला शेवटचा प्रणाम करीत आहे.

[ तिला दंडवत घालितो. नंतर नोकरांसह माने येतो. ]

माने : हं, हीच येसूबाई! सोन्याच्या साखळ्यांनींच अखेर हिला दगा दिला! काय रे, ही दुसरी कोण? तो वेडापीर रायाजी कुठें आहे? आणि तूं कोण आहेस?

रायाजी : ( तलवार उपसून ) तो वेडापीर रायाजी मेला; ही मासाहेबांची दासी शिवांगी; आणि मी कोण हें ही माझी तल—

माने : कंगाल, तुझी तलवार राहूं दे तुजजवळ; आम्हांला ही राजाची राणी हवी आहे! हं, चला रे हिला घेऊन!

[ नोकर शिवांगीला घेऊन जातात. ]

रायाजी : अहो, मासाहेबांच्या बरोबर एखादी दासी असूं द्या हो! या शिवांगीला तरी घेऊन चला!

माने : राणीचीच दासी करायला न्यायची आहे. तिथें ही शिवांगी कशाला न्यायची मरायला!

रायाजी : बेवकूब! शिवांगीच न्यायची आणि तीसुद्धां मरायलाच!

( रायाजी कांहीं वेळ शिवांगीकडे पाहात राहतो. [ तलवाराकडे पाहून ] राजेश्वरी, आपली शिवांगी गेली! आतां तुमची आमची जनमगांठ!

येसूबाई : रायाजी—

रायाजी : मासाहेब, आतांच सांगितलें--रक्तामांसाचा रायाजी मेला, समशेरी-पुरता सेनासागर काय तो आतां राहिला आहे! शिवांगीचे पंचप्राण, रायाजीचे दहा प्राण, वैराणांत दाही दिशा वेरून टाकिले! रायाजीच्या प्रेमाशीं पिढ्या तुटल्या; प्रेमाचीं दोन पांखरें वणव्यांत होरपळून मेलीं! मासाहेब, चला लौकर.

[ सर्व जातात पडदा पडतो. ]

[ स्थळ : तुळापूरची मोगल छावणी-तुरुंग. पात्र : मांडी घालून पायांवर हात टाकून बसलेले श्रीसंभाजी महाराज. भोंवतीं साधारण अंधार. ]

**संभाजी :** ( स्वगत ) मरणाचा कोणाला अनुभव नाहीं म्हणून; पण माझी ही स्थिति म्हणजेच मरण असेल का ? कांहीं दिसत नाहीं, कांहीं भासत नाहीं. विखारलेलें मस्तक सुन्न झाल्यामुळें कांहीं सुचत नाहीं, आठवत नाहीं, कळत नाहीं ! जीव जड झाला आहे आणि शरीर हलकें वारेमोल झालें आहे. मी जमिनीशीं खिळून बसलों आहें, कीं वाऱ्यावर वावरतों आहें हेंच उमजत नाहीं ! अरेरे, हें काय झालें ! मराठ्यांचा राजा मोऱ्यांचा कैदी झाला; वाघाची गरीब गाय झाली; मर्दाचा मातीमोल मुडदा झाला, होत्याचें नव्हतें झालें ! आतां काय व्हायचें राहिलें आहे ? हो, या जित्या मरणाची जाळती जाणीव अजून बाकी आहे ! मेल्या माणसांत आणि जीवन्मृतांत एवढी तफावत असते, कीं मेलेल्या माणसाला आपण जिवंत असूनही मेल्यासारखेच आहोंत अशी जहरी जाणीव मुळींच नसते. हें मरण नाहीं; ही, मरणाहून भयाण, अजून कोणाच्याही अनुभवाला आलेली नाहीं अशी–मरणाच्या नंतरची जीवदशा आहे ! मग सर्वस्वाचा विसर पाडणाऱ्या मरणानें, माझ्या जीविताचा सुखी शेवट व्हायचा चुकून तसाच राहिला का ? सुखाचें मरण तर नाहींच, पण मरणाचें सुखही या कमनशीब संभाजीला पारखें झालें का ? ( मोठ्यानें ) क्रूर, कठोर काळा ! ये, क्षणभर देवाहून दयाळू होऊन ये आणि माझ्या गळ्यांत आपला बळकट बाहुपाश घाल ! ( पाहून ) कोण आहे तें ?

[ साबाजी बुरखा पांघरून असा येतो व संभाजीराजांचे पाय धरितो. ]

**संभाजी :** कोण आहे ? खरोखरच काळपुरुष माझ्या गळ्यांत मगरमिठी मारण्यासाठीं धावून आला आहे काय ?

**साबाजी :** राजे, ही आपल्या गळ्याशीं काळाची मगरमिठी नाहीं, पण आपल्या पायाच्या चाकराची आपल्या पायाशीं प्रेमाची मिठी आहे.

**संभाजी :** कोण, साबाजी ? ऊठ ! साबाजी, तुझ्या तपोमूर्तीला या पामरासाठीं इतक्या कष्टांत कशाला पाडिलेंस ? या तुझ्या नीच धन्याची सेवा करण्याची हौस अजून फिटली नाहीं का ? माझी आज्ञा शिरसामान्य करण्यापेक्षां, माझा

शिरच्छेद करण्याइतका तिटकारा तुला अजून आला नाहीं का? साबाजी, चल, तुझ्या बिजलीच्या एकाच चमकीनें या संभाजीच्या निर्जीव देहाचा नायनाट करून टाक! दौलतरावाच्या बेईमानाला कंटस्नान घालून तुझ्या बिजलीनेंच पावन केलें. पोटच्या पोराच्या पापाबद्दलच पक्षापती होऊन मला परकेपणानें त्या पुण्याईपासून दूर लोटूं नकोस!

साबाजी : राजा, तुला मरण देण्यासाठीं मी तुझ्याकडे आलों नाहीं, पण मराठेशाहीसाठीं जीवन मागण्याकरितां आलों आहें. चल, हा बुरखा पांघर, हा परवाना घे-यावर बेगमसाहेबांचा शिक्का आहे. हा दाखविला म्हणजे कुठेंही मज्जाव नाहीं—हा घे आणि इथून बाहेर पड!

संभाजी : आणि तूं? हा तुरुंग म्हणजे बळी मिळण्यासाठीं काळानें उघडलेला जबडा आहे!

साबाजी : तुला इथें राहून जें करावें लागणार तें मी करीन. तुझें पडेल तें काम हट्टानें करण्याचा, या तुझ्या साबाजीचा हक्कच नाहीं का?

संभाजी : स्वर्गाला कंटाळलेले देव कारे तुमच्या मनींमानसीं वसतीला उतारा करितात? अमृताच्या चुळा टाकीत का तुमची रसवंती अवतरत असते? साबाजी, मेलेल्याला मारण्यांत काय मौज आहे बरें? तुझ्या मलाईनें मला किती खालीं पाहावयाला लावणार? तुला येथें काळाच्या तोंडांत लोटून मी चालता होऊं? तुझ्या पवित्र प्राणांच्या मोबदल्यानें या कवडीमोल शरीराचा सांभाळ करूं? अरे, अगदीं रौरवाचे रहिवाशीसुद्धां माझ्या शेजाराचा किळस करतील! साबाजी, संभाजीचें मस्तक अजून मोगलांनीं उडविलें नाहीं! तें ठिकाणीं आहे. अशा राक्षसी रीतीनें वांचण्यापेक्षां मला मरणाचें महत्त्व जास्त वाटतें.

साबाजी : लाख मरोत पण लाखांचा पोशिंदा न मरो! राजा, तुझ्या हुकमाच्या एकेका बोलाबरोबर मोहरलेल्या झाडांना साबाजी लागतील! खिडखोऱ्यांतल्या दगडांचे देव होतील! साबाजी आतां मेला काय आणि जगला काय! आधींच आंखडलेल्या नाड्यांनीं बांधलेलें हें शरीर वेडीनें जखडलें तर त्यांत काय नुकसान होणार? या हाडांच्या सांपळ्यांतून जिवाचें सावज सुटलें तर मुक्त होऊन जाईल! उलट, तुझ्या मूर्तीकडे सारी मराठेशाही डोळे लावून बसली आहे! तुझ्याविणे आईभवानीची पूजा थांबली आहे! या जित्या मुडद्याची पायरी करून तिच्या मंदिरांत पाऊल टाक; नाहीं म्हणशील तर या पांढऱ्या केसांची शपथ आहे.

संभाजी : साबाजी, अगदीं वेडा नव्हेस का? आईभवानीची पूजा बांधायला

तुझ्यासारखीं कल्पवृक्षाचीं फुलें टाकून माझ्यासारखे निर्जीव दगड का गोळा करायचे! साबाजी, असं बोलून आतां मला लाजवूं नकोस! या संभाजीच्या छातीनें एकदा दगडांशीं धडका दिल्या, पण आज नुसत्या बोलाफुलांनी माझा दिल फाटून जात आहे. माझ्या हातून आतां काय होणार? तो संभाजी मरणावांचून मेला, आणि हा संभाजी जिवावांचून जगत आहे. जिवांत जीवपण नाहीं, देहांत देहपण नाहीं, नुसतें संभाजी हें नांव राहिलें!

साबाजी : राजा, नको रे नको असें बोलूं! जें तुझ्या नुसत्या नांवीं आहे तें आमच्या गांवींसुद्धां नाहीं.

संभाजी : गांव वाहून गेलें, नांव राहून गेलें. माझ्या नांवाचा डंका वाजतो आहे तो थोडा झाला का? साबाजी, नेत्या पुरुषाची जबाबदारी मला न कळल्यामुळें, मीं मराठेशाही मातीला मिळविली; बाळाजी चिटणिसासारख्यांना हत्तीच्या पायांखालीं तुडविलें, आणि कबजीसारख्या कंगालाला डोक्यावर नाचविलें. माझें नांव ऐकल्याबरोबर जातीचा मराठा कानावर हात ठेवील.

साबाजी : तुझें नांव! रामनामानें नुसते डोंगर तरले; पण राजा, तुझ्या नांवानें, मराठेशाहीच्या छत्रपतीच्या नांवानें, नऊ खंड पृथ्वी उद्धरून जाईल. दुर्गादेवीच्या दुष्काळांत मेलेले जीव तुझ्या नांवाच्या संजीवनी मंत्रानें पुन्हा सजीव झाले असते; तुझ्या बिरुदावळींतल्या एकेका बोलाला वेदवाक्याची योग्यता आहे. तुझें नांव घेऊन मृत्युयोगावर बाहेर पडणाराला अमृताच्या वेळा लाभतील. ऐक, राजा तुझें नांव नीट ऐक. गोब्राह्मणप्रतिपालक हिंदुपदपादशहा श्रीमंत छत्रपति संभाजीमहाराज!

संभाजी : गोब्राह्मणप्रतिपालक हिंदुपदपादशहा श्रीमंत छत्रपति संभाजीमहाराज! नाहीं, साबाजी, ही माझी किताबत नाहीं! संभाजी हा म्हणजे केवळ रंडीबाज छकटा! काशीची गंगा आणि रामेश्वरचा सागर एकवटून छत्रपतींनीं बांधिलेल्या राष्ट्रतीर्थाची—श्रीगंगासागराची ज्यानें व्यभिचाराच्या दिवाणखान्यांतली मोरी बनवली तो हा संभाजी! वैराग्याच्या वेगानें फडफडणाऱ्या भगव्या झेंड्याला दारुबाजाचें तोंड पुसण्याचा दस्तरुमाल केला! महाराष्ट्रलक्ष्मीच्या वैभवाचा जरीपटका फाडून त्याची रांडेसाठीं काचोळी केली! साबाजी, माझ्या नऊ वर्षांच्या नांवलौकिकाची इमारत नीटपणें पाहा! चिटणिसाला हत्तीच्या पायाखालीं तुडवून तिचा पाया घातला. मातोश्री सोयराबाईसाहेबांना जितेपणीं भिंतींत चिणून तिच्या भिंती उभारल्या; ती पातकी इमारत उंचावतां उंचावतां कळसाला पोंचण्यापूर्वींच कोसळून तिच्याखालीं संभाजीचा चुराडा होऊन

गेला. साबाजी, मी बाहेर पडून लोकांना काय तोंड दाखवूं ? आपला राजा सुटला असें पाहतांच, माझी प्रजा आपखुषीनें देश सोडून हद्दपार होईल. साबाजी, या काळोखांतसुद्धां मला तोंड लपवावेंसें वाटतें. खालीं पाहीन तर हत्तीच्या पायांनीं पाताळापर्यंत गाडलेला बाळाजी पुन्हा जमिनींतून वर येईल अशी भीति वाटते. भोंवतालीं पाहिलें, तर कोपऱ्याकोपऱ्यांतून आई-साहेबांचे डोळे माझ्याकडे टवकारून पाहतील. वर पाहिलें तर शिरक्यांचीं उडविलेलीं शिरें आकाशांतून जयद्रथाच्या मस्तकाप्रमाणें येऊन माझ्या मस्तकावर आदळतील! साबाजी, मी आतां कोणीकडे पाहूं ? सह्याद्रीचा सिंह आतां अगदीं भयभीत झाला आहे.

साबाजी : राजा, धीर धर. कल्पनेच्या काहुरानें मराठेशाहीचा मोहरा-रायगडचा रणमर्द-भ्याला हें कोणाला कसें सांगायचें ?

संभाजी : रायगडावर उभा राहून साऱ्या मराठेशाहीला ओरडून सांग, कीं मराठेशाहीचा मोहरा नामोहरम झाला; रायगडचा रणमर्द मनाचा नामर्द ठरला. मातेला मरण दिलें; प्रजा म्हणजे पोटच्या पोरासारखी-कन्येशीं व्यभिचार केला. देवीसारख्या पत्नीचा राक्षसाप्रमाणें छळ केला. सर्वांना जाऊन माझा शेवटचा प्रणाम सांग. महाराष्ट्रांत, महाराष्ट्राच्या राजाला तोंड दाखवायला कुठेंही जागा नाहीं! आबासाहेबांच्या सर्व मराठे वीरांना या संभाजीचा शेवटचा प्रणाम सांग. आणि सरतेशेवटीं, महाराष्ट्रलक्ष्मीच्या मंगल मंदिराला-मराठेशाहीच्या माहेरघराला--दक्षिणच्या दुर्गदेवाला-राजांच्या रायबाला-त्या श्रीमान् रायगडाला माझा दंडवत सांग. त्याला हात जोडून सांग, कीं संभाजी मोकळा असता तर तुझा भ्रष्ट केलेला गंगासागर त्यानें आपल्या रक्तानें आणि आंसवांनीं भरून काढिला असता.

साबाजी : राजा, तुझ्या एका शब्दासरशीं ही मोकळीक तुला मिळणार आहे.

संभाजी : ही मोकळीक ! या मोकळिकीनें मी साताजन्मांचा बांधला जाईन.

साबाजी : महाराज, अशी माझी निराशा करूं नका ! तुमच्या पायांवर मस्तक ठेवून माझ्या पंचप्राणांची शपथ घालून—

संभाजी : साबाजी, असा अविचार मी तुला करूं देणार नाहीं. तूं मस्तक वांकवायचें तें माझ्यापुढें नाहीं, तर तुझ्यासारख्या सेवकांना खऱ्याखुऱ्या धनीपणानें साजून दिसणाऱ्या—साबाजी, ती पाहा ! शिवछत्रपतींची तसबीर ! तो पाहा एकेक अस्मानतारा तुटून त्यांच्या प्रभावळींत शोभूं लागला. तो पाहा बिरवाडीचा लढवय्या-तो हिरडस मावळचा हिरा--साबाजी, या वीरांच्या

तेजानें माझे डोळे दिपून जात आहेत. इकडे पाहूं का तिकडे पाहूं असें मला झालें आहे; आणि साबाजी, ही पाहा, माझ्या राक्षसी रागानें मारलेल्या माणसांची सारी भुतावळ जागी होऊन राजांजवळ दाद मागण्यासाठीं जमा झाली आहे. मेलेल्या जीवांनो, क्षमा करा. तुमच्या केविल्वाण्या नजरेनें माझीं पातकें राजांजवळ सांगूं नका ! साबाजी, ते पाहा, राजे रागानें माझ्याकडे पाहूं लागले ! गोब्राह्मणप्रतिपालक हिंदुपदपादशहा श्रीमंत छत्रपति शिवाजीमहाराज, या पातक्याला क्षमा करा. आबा, आपल्या चुकल्या बाळाला क्षमा करा. साबाजी, आबांच्या नजरेची मला भीति वाटते. साबाजी, मी कुणीकडे तोंड लपवूं ? साबाजी, मला सांभाळ रे !

साबाजी : बेटा, असा रडूं नकोस ! महाराष्ट्राच्या मूर्तिमंत पराक्रमा, तूं हिंमतीनें हसायला लाग; तुझ्याबरोबर सह्याद्रीवरच्या फत्तराफत्तराला फुलें येऊन तीं हसायला लागतील ! तुझ्या जुन्या नोकराच्या गळ्याची तुला शपथ आहे माझ्याकरितां एकदा तरी हांस पाहूं—

संभाजी : ( हसून ) विराट संसाराचें हसें झालें, तिथें काय हसायचें ?

साबाजी : राजा, काय भेसूर हें हसणें ! तुझ्या रडण्यापेक्षांहि हें भेसूर आहे ! या हसण्याकडे पाहिलें तर माझी म्हाताऱ्याचीच काय, पण साक्षात् रायगडचीसुद्धां कडेकोट कंबर खचून जाईल ! राजा, लहानपणींच्या मोकळ्या आनंदानें एकदा हांस ! तूं चार वर्षांचा बच्चा होतास -डोळे पाण्यानें भरून आल्यामुळें त्या वेळचें गोंडस बाळ आज डोळ्यांसमोर दिसत नाहीं— शिकारखान्यांतल्या एका वाघाच्या पिंजऱ्यासमोर तुला खेळवीत असतांना माझी नजर दुसरीकडे लागून तूं पिंजऱ्याच्या जवळ गेलास, त्यासरशीं वाघानें तुझ्या हातावर पंजा मारला. तूं जरासा मागें सरलास; तुझ्या चिमुकल्या हातांतून कोंवळ्या रक्ताचे ओघळ वाहात होते; पण तिकडे तुझें लक्षसुद्धां गेलें नाहीं ! मागें सरल्यामुळें किंचित् हलणारे कपाळावरचे ते कुरळे केस, विजयमुद्रेनें लकाकणारे ते चिमणे डोळे, तोंडावरची ती लबाड भीति, वाघाच्या गुरकावण्याला वेडावण्यासाठीं गोल वळविलेले ओठ, त्या वेळेस किती मनापासून हसलास ! बेटा, तसा एकदा हांस पाहूं ! तुला राजांच्या पायाची शपथ—

संभाजी : साबाजी, आबासाहेब अजून माझ्याकडे रागाच्या नजरेनें पाहात आहेत. त्या रागानें जळून जाईन अशी मला भीति वाटते. साबाजी, मला सांभाळून घे. साबाजी, आबांना पुन्हा आठवण करून दे, त्यांनींच तुला सांगितलें होतें ना--आबांना म्हणावें, शंभूबाळ अजून हूड आहे; त्याच्याकडे

असें रागानें पाहूं नका. आबासाहेब, आपण असें रागानें पाहूं लागलां म्हणजे आपल्या या लाडक्या शंभूबाळानें तोंड कुठें लपवावें? मी काय करूं? आबासाहेब, अजून तरी म झ्या बाळबुद्धीला रस्ता दाखवा. आपल्यासारख्या लोकोत्तर अवताराला सद्‌गुरु रामदासांचा उपदेश घ्यावासा वाटला, मग या चुकलेल्या बाळाला--साबाजी, ती पाहा श्रीसमर्थांची भव्य मूर्ति! साऱ्या राज्याच्या सनदा काढून आबांनीं समर्थांच्या झोळींत टाकल्या. राजानें बैराग्याला भीक घातली. साबाजी, खरा शिष्य, खरा सद्‌गुरु! हाच राजसंन्यास! एकाचा राजसंन्यास, दुसऱ्याचा योगसंन्यास! दोघांतून मोठा कोण? ( एकदम ) साबाजी, लहान तोंडीं मोठा घांस घेतला, आबासाहेब, आतां अजून रागाच्या नजरेनें पाहण्याचें कांहीं कारण नाहीं. अशा राजसंन्यासांत मला दर्शन देण्याचा आपला हेतु समजला. माझ्या अयोग्य मस्तकावर आपला जिरेटोप अजून आहे. त्याचा मीं अजून संन्यास केला नाहीं—थांबा, आबासाहेब, पाहा, संभाजीवर सूड घेण्यासाठीं तळमळणाऱ्या जीवात्म्यांनो, क्षणभर शांत व्हा. साबाजी, तुमच्या चरणीं प्रत्यक्ष शिवछत्रपतींनीं मस्तक ठेविलें आहे. श्रीसमर्थांच्या साक्षीनें आबासाहेबांच्या डोळ्यांदेखत मराठेशाहीचा हा जिरेटोप साबाजी छत्रपतींच्या मस्तक स्पर्शानें पवित्र झालेल्या तुमच्या तीर्थस्वरूप चरणीं अर्पण करीत आहें. हा नेऊन, माझ्या धाकट्या भावाच्या—सोयराबाईसाहेब, ऐका—आईसाहेबांच्या राजारामाच्या—उद्यांच्या तुमच्या श्रीराजाराममहाराजांच्या मस्तकावर ठेवा. शंभूदादाचा राजबाळाला आशीर्वाद सांगा. महाराष्ट्राच्या महाराजाला या कमनशीब मराठ्याचा रामराम सांगा उद्यांच्या उगवत्या सूर्याला या मावळत्या सूर्याचीं शेवटचीं किरणें नेऊन पोहोंचवा; आणि रायगडच्या जुन्या राजाची नव्या राजाला शेवटची एवढीच वाणी ऐकवा कीं, **राजा म्हणजे जगाचा उपभोगशून्य स्वामी! राज्य-उपभोग म्हणजे राजसंन्यास! ना विष्णुः पृथिवीपतिः!** [ जिरेटोप पायांवर ठेवतो. पडदा पडतो. ]

ब्रह्मार्पणं ब्रह्महविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् । ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥

श्रीगीतोपनिषत्सु-श्रीभगवान्

*अंक पांचवा समाप्त*

# एकच प्याला

श्रीशं वंदे

# संगीत

# एकच प्याला

## मंगलाचरण

(राग—भूप, ताल—झपताऊ. चाल—अमरवर नमित पद०)

शरण तें करुण तव निःश्वसन व्यसनीं घन ।
नंदनंदन ! जनां पापकामां ॥ हो ॥ ध्रु० ॥
कलहरत करि यदा मद्यमद यादवां ।
सकल कुल कलि तदा ने विरामा ॥
हानि ती पाहतां दृष्टि बाष्पाकुला ।
सृष्टि कष्टद तुला सौख्यधामा ! ॥ १ ॥
कर्मरेखाबलें धर्म नच मज कळे ।
न स्मरत मतिहि तव पुण्य नामा ॥
रक्षणीं मम तरिहि दक्ष राहुनि सदा ।
अक्षय स्वपदिं पद देइ रामा ॥ २ ॥

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

[स्थळ : सुधाकराचें घर. पात्रें : सुधाकर दूरध्वनिकं ( टेलिफोन ) यंत्राजवळ बसला आहे.]

सुधाकर : कोण तीनतीनदां घंटा देत आहे ? कोण ? ( ऐकून ) हो, मी सुधाकर आहें ! सुधाकर ! पण बोलतं आहे कोण ? रामलाल ! ( पुन्हा ऐकून ) हो. तिच्याकडून सर्व तयारी आहे. तूं लवकर चल. सिंधू, जरा इकडे ये पाहूं ! सिंधू !

सिंधू : हें काय भलतंच ? आपलं नांवानंच हांक मारीत सुटायचं ?

सुधाकर : तर काय तुझं नांव टाकूं ? मग तूंच उलटी माझ्या नांवानं हांका मारीत सुटशील ! हें पाहा, भाईसाहेबांनीं आतां विचारलं आहे त्याच्या निघण्याची सर्व तयारी आहे का म्हणून ? तो येईलच इतक्यांत.

सिंधू : तयारी सर्व आहे; पण भाई जाणार म्हणून कुठल्या कामाला उत्साह कसा तो वाटत नाहीं.

( राग : यमन; ताल : त्रिवट. चाल : येरी आली पिया बिन० )

लागे हृदयीं हुरहुर । आजि ।
सुखविषय गमति नच मज सुखकर ॥ ध्रु० ॥
कांहीं सुचेना । कांहीं रुचेना ।
राहि कुठें स्थिर मति नच पळभर ॥ १ ॥

सुधाकर : वृष्टीपूर्वीचीं अभ्रें जमूं लागलीं का ? सिंधू, असं म्हणून कसं चालेल ? ज्या जगांत आपण आलों आहों, तें इतकं चमत्कारिक आहे कीं, त्यांतल्या नुसत्या चांगल्या गोष्टींचीच अपेक्षा करायला निरंतर नुसत्या दुःखांत दिंवस काढावे लागतील !

( राग : छायानट; ताल : त्रिवट. चाल : नाचत धी धी० )

सुखचि सदा कधिं मिळत न कवणा । मिश्ररूप जग ।
सुखचि रिघे अध । दुःखांतुनि हो जन्म सुखांना ॥ ध्रु० ॥
हो जरि आशा मात्र सुखवशा । करित विधि तरी अंतीं निराशा ॥
रमत मतिहि नच प्राप्त सुखिंहि मग । करी अवमाना ॥ १ ॥

केव्हांहि उत्साह सोडून चालायचं नाहीं. शिवाय रामलालभाई जातो आहे तो केवढ्या महत्त्वाच्या कामासाठीं ! या प्रसंगीं आपण त्याला आपल्या निरुत्साहानं असं तद्रूप करायचं ! वाः, आपण तर उलट त्याचा उत्साह द्विगुणित केला पाहिजे.

सिंधू : भलतंच सोंग कसं आणतां येईल असं ? पुरुषांना पाषाणहृदयाचे म्हणून म्हणतात. तें असं एखादे वेळीं खरं वाटायला लागतं ! आपल्याला नाहीं वाईट वाटत ?

सुधाकर : माझ्या पाषाणहृदयावर रामलालच्या गत-उपकारांचे शिलालेखच तुला पाहायला मिळतील. तुझ्या माहेरच्या माणसांचा आणि भाईचा नुसता स्नेहसंबंधच असेल; पण मला तर तो वडिलांच्या ठिकाणीं आहे. रस्त्यानं चालतां चालतां रामलालचं नांव लक्ष्यांत आलं म्हणजे मला एक ब्रह्मांडच्या ब्रह्मांड आठवतं. मी सोळा वर्षांचा असेन नसेन, माझी प्रवेशपरीक्षा उतरण्याच्या आधींच बाबांनीं स्वर्गप्रवेश केला; आपला वृद्धापकाळ झाला असं पाहून आपल्या पश्चात् शरद्च्या संगोपनाची जबाबदारी माझ्यावर पडूं नये म्हणून बाबांनीं तिच्या आठव्या वर्षींच तिचं लग्न लावून दिलं. परंतु लग्नाच्या सोळाव्या दिवशींच तिचं दुर्दैव तिच्या पुढं उभं राहिलं; नवऱ्याच्या मूळावर आलेली मुलगी, म्हणून तिच्या सासऱ्यानं तिला आमच्या घरीं कायमची परत लावून दिली ! आईबापावेगळीं आम्ही दोन पोरकीं मुलं ! पैशाचं पाठबळ नाहीं आणि आप्तेष्टांचा आधार नाहीं ! त्या वेळीं रामलाल देवासारखा माझ्या पुढं उभा राहिला ! माझ्या मानी स्वभावामुळं माझ्या शिक्षणासाठीं मीं त्याची प्रत्यक्ष मदत कधीं घेतली नाहीं हें खरं; परंतु शरद्ला संभाळण्याची जबाबदारी मात्र त्यानं माझ्यावर फारशी पडूं दिली नाहीं; पुढं शिकवण्या वगैरे पत्करून माझ्या शिक्षणक्रमांतून शेवटपर्यंत मी यशस्वी रीतीनं पार पडलों; पुढं तुझ्या वडिलांना भाईनंच आग्रह करून आपला हा भाग्यशाली योग घडवून आणला. हे सोन्याचे दिवस आज आपण पाहतों आहों, याचं कारण एक रामलालची कृपा ! सिंधू, आज सकाळपासून ही

सारी गोष्ट हृदयांत सारखी उचंबळत आहे! कोणापाशीं बोलल्याखेरीज राहवेना, म्हणून तुला ती जणूं काय अगदीं नव्यानंच म्हणून विस्तारानं सांगत सुटलें! रामलाल जाणार म्हणून मला वाईट वाटल्याशिवाय कसं राहील? परंतु या संसारांत नेहमीं परिणामाकडे दृष्टि ठेवून चालावं लागतं! आपण अशीं दुर्मुखल्यासारखीं बसलें आणि समज, एकदम रामलाल आला—

[ रामलाल येतो ]

सिंधू : भाई, तुला शंभर वर्षांचं आयुष्य आहे!

सुधाकर : हें खरं ना? मग शांत मनानं त्याला जायला आनंदानं निरोप दे पाहूं! भाई, हिचं समाधान करतां करतां मला पुरेसं झालं आहे. मला वाटतं, यापुढं मला वकिलीची सनद सोडून देऊन हा एवढाच उद्योग करीत बसावं लागणार! बरं, भाई, इथून जायचं कधीं?

सिंधू : थांब, भाई, इथून जायचं कधीं, हें सांगण्यापेक्षां पुन्हा इथं यायचं कधीं, हें नक्की सांग पाहूं एकदां – खरं सांग हो अगदीं!

रामलाल : मग इतके दिवस सांगत आलें तें खोटंच का? ताई, मीं पुष्कळ म्हटलं कीं, अमुकच दिवशीं येईन म्हणून – दोन वर्षांनीं येईन म्हणून म्हणतों; पण संकल्प आणखी सिद्धि यांच्यामध्यें परमेश्वराची इच्छा उभी असते. कुणाला ठाऊक, दोन वर्षांनीं येईन कीं दोन महिन्यांनीं येईन! इतकं होऊन कदाचित् जाणारहि नाहीं, कदाचित् येणारहि नाहीं; कदाचित् ही आपण सर्वांची शेवटचीच भेट असेल.

( राग : भूप; ताल – एकताल. चाल – रतन रजक कनक० )

परम गहन ईशकाम। विश्वा जरी पुण्यधाम।
मनुजा तरी गूढ चरम। चिर अभेद्य सारें॥ ध्रु०॥
क्रीडा दैवी विराट। मनुजसृजन क्षुद्र त्यांत।
मानुषी मनीषा!। गणन काय त्यांचें?॥ १॥

सुधाकर : भाई, तूं अगदीं पढतमूर्ख आहेस. इकडच्या तिकडच्या गोष्टींचीं धरणं बांधून इतका वेळ मीं या गंगायमुना थोपवून धरल्या होत्या; तुझ्या आशीर्वादानं त्यांचा वाहता संसार मनासारखा सुरू झाला बघ! वेड्या, तुला माहीत नाहीं कीं, शास्त्रांची अटक झुगारून, सिंधू नदी अटकपार होणं हें एक वेळ सोपं आहे. बाष्पशक्तीच्या जोरावर महासागराच्या तोडीचे काळा समुद्र, पिवळा समुद्र किंवा तांबडा समुद्र ओलांडणं हें तर त्यापेक्षांहि सोपं आहे; पण मानससरोवरांत उत्पन्न झालेल्या, डोळ्यांतून बाहेर येणाऱ्या, आणि गालां-

वरच्या गुलाबी समुद्राला मिळणाऱ्या या टीचभर गंगायमुना तुडवून जाणं, हें अजून कोणाहि पुरुषाला साध्य झालं नाहीं !

( राग – मुल्तानी; ताल – त्रिवट. चाल – हमसे तुम रार० )

सरिता जनिं या प्रबला भारी ।
जरि दिसति शीर्ण नयनांतें अविकारी ॥ ध्रु०॥
उत्तान गमति दर्शनीं जरी । गमीर अति तरी ।
भवजलधीहुनि दुस्तर संसारीं ॥१ ॥

रामलाल : मनाची मलती फसवणूक कधींही करून घ्यायची नाहीं, हा माझा एक कृतसंकल्प आहे. सिंधुताई, या चंचल संसारांत असल्या कडू सत्यांची मनुष्यानं निदान तोंडओळख तरी करून ठेवलेली असावीच.

( राग – शंकरा; ताल – त्रिवट. चाल – सोजानी नारी० )

संसारिं विषारी । तीव्र सत्यें । अमृत होती । कृतिनें कान्त ॥ ध्रु० ॥
दिव्य रसायन । संकटातंकीं । सत्यपरिचयें । क्षणिं असुखान्त ॥ १ ॥

ईश्वराच्या दयेनं आपल्या दुर्दैवीं तीं अनुभवानं भोगण्याचा प्रसंग आलाच, तर त्यांच्या पहिल्या दर्शनानं अशा वेळीं आपण गांगरून तरी जात नाहीं.

सुधाकर : तुझा सुद्धां कंठ सद्गदित झाला आहे. मानलेला कां होईना, पण तिचा भाऊ शोभतोस खरा ! सिंधूताई, आतां तूं दादाच्या गळ्याला मिठी मार ! भाई, तुला जायचं असेल, तर Don't say such a silly nonsense; you are a regular messeah of nonsense ! अशानं होईल काय ? इतक्यांत शरद् येईल, तिच्या गंगायमुनांची जोडी चालायला लागेल. ती तळिरामाची गीता येईल—त्या भोळ्या जिवाला तर हंसण्यारडण्याला आपलं स्वतःचं सुद्धां सुखदुःख लागत नाहीं ! हां हां म्हणतां इथं एका भूगोलपत्रकाच्या भरतीइतक्या नद्या जमून आपल्या महाराष्ट्राला पंजाबी पवित्र्यांत उभं करतील ! अशानं तुझ्या प्रवासाला किती त्रास होईल याचा नीट विचार कर. दगदग आणखी त्रास चुकविण्यासाठीं पुरुष चातुर्मास टाळून प्रवासासाठीं हिंवाळा किंवा उन्हाळा योजून ठेवतात, पण ऐन प्रस्थानाच्या वेळीं बायका पावसाळा पुढें आणून उभा करतात ! तूं संसार सोडून भटकणारा बैरागी आहेस; म्हणून तुला माहीत नाहीं, कीं स्त्रीपुरुषांच्या संबंधांत ऋतुमान नियमानं सारखंच टिकून राहील असं नाहीं !

सिंधू : आमच्या इथं थट्टेला काळवेळ नाहीं आणि सुमारहि राहात नाहीं. एक गंगायमुना सांपडायची खोटी सर्वोसकट वाहून जायची तयारी !

सुधाकर : सिंधू, तुझ्या गंभीर उपदेशानं मला असा सतावून सोडूं नकोस. आणखी दोनचार महिन्यांनीं एकदां मूल झालं, म्हणजे त्याला काय सांगायचं तें सांग.

रामलाल : आणि मुलाला दटावण्याचेच तिला डोहाळे होत असले तर मग ?

सिंधू : भाई, तुलाहि असंच गमत राहायचं आहे वाटतं ? इकडचा स्वभाव तुला लहानपणापासून माहीत आहे ना ?

रामलाल : ताई, नीट बैस अशी. सुधा, तूं पण बैस. सुधा, तुझ्या देखत ताई, तुला दोन शब्द सांगायचे आहेत. आतां तूं म्हणालीस कीं, सुधाचा स्वभाव मला लहानपणापासून माहीत आहे, तें खरं आहे, आणि त्याबद्दलच तुला मला सांगायचं आहे. ताई, हा सुधाकर म्हणजे या जनसमुद्राच्या गरीब तळाशीं सांपडलेलं एक अमूल्य रत्न आहे. पण ताई, अशीं रत्नं लाभणं कठीण आणि लाभल्यावर त्यांना हातीं ठेवणं तर फारच कठीण. सुधाकर बुद्धिवान् आहे. फार काय सांगावं – खरोखरीच अलौकिक बुद्धिवान् आहे. तो जात्याच मानी आहे आणि केवळ स्वावलंबनानं नांवलौकिकाला चढल्यामुळं मूळचा मानीपणा हल्लीं इतका उग्र स्वरूपाचा झाला आहे कीं, तो त्याच्या चांगल्या मित्रांनासुद्धां असह्य होईल. त्यांतून व्यवहारी आयुष्याच्या सुरुवातीच्या अवस्थेंतून तो मार्गक्रमण करीत आहे. प्रतिस्पर्ध्यांच्या गर्दींतून आपल्या बुद्धिमत्तेला शोभण्याजोग्या स्थळीं त्याला अजून पोंचायचं आहे. एक गांवढळ उदाहरण घेऊन सांगतों; आपल्या कळपांतून बदकाचं पिलूं आपल्या जातिधर्माप्रमाणं पाण्यांत पोहणीला पडलं म्हणजे त्याच्याभोंवतीं असलेल्या आणि त्याबरोबरच वाढलेल्या कोंबडीच्या पिलांचा आश्चर्यानं आणि भीतीनं सारखा किलकिलाट सुरू होतो. जगाच्या व्यवहारांत, पशूंच्या उदाहरणांतल्या आश्चर्य आणखी भीति या विकारांऐवजीं केवळ मनुष्य-प्राण्यालाच मिळालेले द्वेष आणखी मत्सर हे विकार दिसून येतात. वकिलीच्या धंद्यांत सुधाकर हल्लीं या स्थितींत आहे. सर्वांनीं एकच परीक्षा दिली असल्याकारणानं त्याच्या जोडीच्या वकिलांना तो आपल्यापैकींच एक वाटत आहे. त्याच्या बुद्धिमत्तेच्या जोरानं हा सामान्य वर्गांतून पुढं जात असल्या-मुळं याच्या बरोबरीचे लोक द्वेषानं आणि मत्सरानं त्याला मागं ओढीत आहेत. धंद्यांत नामांकित म्हणून प्रस्थापित झालेले थोडेसे लोकहि नव्या उमेदवाराला आपल्या भाग्यशाली यशाचा सुखासुखी वांटेकरी होऊं देत नाहींत. तरुण बुद्धिमत्तेची आत्मविश्वासाची उग्रता या जुन्या लोकांना उर्मट-

पणाची आणखी अहंपणाची वाटून ते त्याचा उपमर्द आणखी तिरस्कार करीत असतात. मागच्याला मागं ढकलून बरोबरीच्याला बाजूला सारून आणि पुढच्यांना पुढं ढकलून सुधाकर या वेळीं जीवनकलहाच्या गर्दीतून रस्ता काढीत आहे. धंद्याच्या पटांगणांत त्याचं कौतुक करणारा, त्याला धीर देणारा, त्याचं समाधान करणारा, आणि रागाच्या ऐन भरांत त्याचा तोल संभाळणारा कोणी तरी जिव्हाळ्याचा मनुष्य सध्यां त्याच्या नेहमीं जवळ असणं अवश्य आहे. त्याच्या लहानपणापासून माझ्या पामरशक्तीप्रमाणं ही त्याची सेवा आजवर मी करीत आलों आहें. सिंधू, आज विलायतेला जाण्यापूर्वी – तसा तो तुझा प्राणच आहे – मी बोलून चालून एक परदेशी तिऱ्हाईत आहें— माझा पाठचा भाऊ आज मीं तुझ्या हवालीं केला आहे. सिंधू, त्याच्या अफाट बुद्धिमत्तेला पुरून उरण्याजोग्या कामगिरीमध्यें त्याला नेहमीं गुंतवून ठेव. कधींकाळीं त्याचा मनोभंग झाला तरच – चतुर मुली, तूं सर्वगुणसंपन्न आहेस. तुमच्यासारखीं अनुरूप वधूवरं संसाराच्या अशा सुखपूर्ण आरंभांत पाहून कोणताहि मनुष्य त्या सुखाचा चिरकाल लाभ व्हावा म्हणून तुमच्यासाठीं परमेश्वराजवळ आशीर्वाद मागेल – मग मला तर जवळ जवळ तुमचा अनुरूप योग घडवून आणण्याचा प्रत्यक्ष मानच मिळाला आहे—

सुधाकर : शाबास, रामलाल, तूं आपल्या डॉक्टराच्या जातीवर गेलास अखेर! माझ्या मनाला औषध काय चारायचं तें राहील तिच्या लक्षांत! असंच एकदां पथ्याचं सांगून टाक म्हणजे झालं! एकदां पढतमूर्ख म्हटल्यानं तुझं समाधान झालं नाहीं. भलतंच बोलून तिच्या मागं ही एक दुसरी काळजी उत्पन्न करून ठेवलीस? दोन वर्षांनीं तूं परत येईपर्यंत तुझ्याबद्दलची काळजी आणि माझ्याबद्दलची काळजी!

सिंधू : दोन वर्षं? इतके दिवस आणखी इतक्या लांब तूं दूरदेशीं जाऊन राहणार? आपलं म्हणायला ओळखीचं माणूससुद्धां कोणी नाहीं. त्यांतून तुझी प्रकृति अशी झालेली!

( राग : जिल्हा–मांड; ताल : दादरा. चाल : हे मनमोहन सावरो० )

या जाळी चिंता मना। तयासि शांति येइना ॥ ध्रु० ॥
विरहा न दया। भेदीत हृदया।
मानी मुळी नच। सांत्वनं मोहांना ॥ १ ॥

सुधाकर : आणि तो इथं राहिला, तर तूं काय त्याला चिरंजीव करशील?

रामलाल : सुधा, तुला मनुष्यस्वभावाची – त्यांतून स्त्रीस्वभावाची चांगलीशी

कल्पना नाहीं. आपल्या प्रियजनाचं आपल्या नजरेआड बरंवाईट झालं, म्हणजे परक्या माणसाच्या हलगर्जीपणामुळंच हें झालं असावं, अशी त्यांच्या मनांत शेवटपर्यंत रुखरुख राहते. बायकांच्याच अंगीं असलेल्या आपलेपणाच्या कळकळीनं बघायला कुणी असतं, तर हा प्रसंग टळला असता, असं प्रत्येक Fatal केसमध्यें त्यांना वाटत असतं.

( राग : तिलंग; ताल : पंजाबी. चाल : बसे किना बाट चलत० )

मृदुलताधाम जगिं ललनाहृदय । सकलशुभनिलय ।
धरित गुण ललित । मधुरता ॥ ध्रु० ॥
स्वार्थलव तया । कधिं नच ठावा ।
सतत अगणित परहिता ॥ १ ॥

सुधाकर : सर्वांचं सर्वतोपरी रक्षण करण्याची जबाबदारी सर्वसमर्थ परमेश्वरावर आहे. सिंधू, तो परमेश्वर अनुकूल असला म्हणजे हजारों कोसांवरच्या खवळलेल्या महासागरांत सुद्धां तुझ्या प्रयत्नांवांचून रामलाल सुरक्षित राहील आणि प्रभूची कृपा एकदां फिरली म्हणजे तुझ्या डोळ्यांदेखत, इथल्या इथं, तुझं अटोकाट प्रयत्न चालू असतां, महासागर नको, तलावसुद्धां नको, तो अतर्क्यसामर्थ्यवान् प्रभु मला एखाद्या लहानशा पेल्यांतसुद्धां बुडवून टाकील ! ( तळिराम येतो. ) काय रे ? फैटणी आणल्यास का ?

तळिराम : एव्हांपासून फैटणी कशाला ? जेवणं झाल्यावर इथल्याइथं आणतां येतील.

सुधाकर : (घड्याळ पाहून) वेळ थोडा उरला आहे अगदीं ! सिंधू, लौकर पाट मांडण्याची व्यवस्था कर ! तळिराम ! फैटणी दोनतीन आण ! आपण सगळींच माईला पोंचवायला जाणार आहोंत; सिंधू, जा लौकर. ( सिंधू व तळिराम जातात. ) माई, तूं असा सचिंत कां ?

रामलाल : वैद्यविद्येचा अभ्यास पुरा करण्यासाठीं मी आज हिंदुस्थानदेश सोडून युरोपांत जाणार आहें. सुधाकर ! मनुष्याच्या आयुष्यांत जेव्हां जेव्हां एखादं मोठं स्थित्यंतर होतं, तेव्हां तेव्हां गतकालाची स्मृति आणि भावी कालाची कल्पना यांच्या तर्कातीत संमिश्रणानं चित्तवृत्ति अगदीं व्याकुल होते. विद्यार्जनाचा समाप्तिकाल, विवाहाचा प्रसंग, रोजगाराची सुरुवात, जबाबदार वडील माणसांचा मृत्यु, या प्रसंगांनीं हीं स्थित्यंतरं प्रत्येकाच्या आयुष्यांत घडून येत असतात. मला या वेळीं आज नजरेपुढून जात असलेलं हिंदुस्थानचं दारिद्य आणि उद्यां दिसणारं इंग्लंडदेशाचं वैभव, दोन्ही दिसताहेत. अशा वेळीं मनांत कालवाकालव झाली, तर आश्चर्य तें कोणतं ?

उद्यां मी माझ्या जन्मभूमीला अंतरणार! बापाच्या मिळकतीचा वारसा मुलाकडे जातांना वडीलधाकट्याचा जसा विचार करतो, तसाच गुणांचा भेदाभेद करण्याची एकंदर जगाची प्रवृत्ति असते. लायकी-नालायकीचा प्रश्न फक्त जननी आणि जन्मभूमि यांच्या प्रेमाचा वारसा मिळवितांनाच काय तो पुढं येत नाहीं. एक पुत्र बेचाळीस कुळं उद्धरणारा असतो, आणि एक पुत्र बेचाळीस कुळं बुडविणारा असतो. पण जन्मदात्रीकडे बोट करून दोघांनाहि सारख्याच हक्कानं म्हणतां येतं कीं, ही माझी आई! तीच गोष्ट जन्मभूमीची आहे! आणि म्हणूनच म्हटलं आहे कीं, "जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी". माझी आई वारली त्या वेळीं मला जो तीव्र शोकावेग झाला, त्याचा आज मी पुन्हा अनुभव घेतों आहें—

( रागिणी : हंसकिंकिणी; ताल : झपताल. चाल : नैना सुराग सखि० )

माता वियोगिं मज । लोटी दुःखानें ॥ ध्रु० ॥

क्रीडन मधुर तदंकिं । लाभेल ना फिरुनि ।

शंका भेदोनि । सुखा ने ॥ १ ॥

या भूमीवर तुझा, माझा, त्याचा, याचा, कोणाचाहि प्रेमाचा हक्क अगदीं सारखा आहे. ऋषीश्वरांच्या यज्ञकर्मांची यागभूमि, शिबिगौतमांसारख्या महात्म्यांची त्यागभूमि, प्रतापशाली वीरांची जी कर्मभूमि, युधिष्ठिर-अशोक यांसारख्या पुण्यश्लोकांची जी धर्मभूमि, तीच आपली ही जन्मभूमि! तिच्याकडे पाहून श्रीशिवछत्रपतींनीं मागं जितक्या अधिकारानं म्हटलं असेल कीं, ही माझी जन्मभूमि – तिच्याकडे पाहून लोकमान्य टिळक जितक्या अधिकारानं आज म्हणत आहेत कीं, ही माझी जन्मभूमि – उद्यां इंग्लंडहून परत आल्यावर तिच्याकडे पाहून माझ्यासारख्या पामरालाही तितक्याच अधिकारानं म्हणतां येईल कीं, ही माझी जन्मभूमि! [ दोघे जातात. ]

## प्रवेश दुसरा

[ स्थळ : तळीरामाचें घर. पात्रें : तळीराम व भगीरथ ]

तळीराम : ( दोही पायांत बाटली धरून ओणव्यानें बूच काढीत आहे. ) म्हणे दारू सुटत नाहीं! एकदां घेतली म्हणजे सुटत नाहीं म्हणे! अन् तेवढ्यानं दारू

वाईट! सुटत नाहीं म्हणजे विशाद काय? घ्या! (दोघे पितात.) भगीरथ, दारूबद्दल बडबडणारांपैकीं पुष्कळांना दारू ही काय चीज आहे हेंच मुळीं माहीत नसतं! बरं, मी म्हणतों, सुटत नाहीं, असंच गृहीत धरून चाला कीं, खरंच दारू एकदां घेतली म्हणजे सुटत नाहीं! पण तेवढ्यानं दारू वाईट कशी ठरते? भगीरथ, तुम्ही विश्वविद्यालयाचे पदवीधर आहांत. चार दिवस परीक्षा देऊन एकदांच पदवी मिळवितां, आणि ती जन्माची चिकटते खरी! म्हणून कुणीं पदव्या घ्यायचं टाकलं आहे का? तशीच बायको! एकदां नुसती माळ घातल्यानं उभा जन्म बायकोचा लचेदा बिलगतो ना? म्हणून बायका करायचं टाकलं का आहे? पदवी वाईट नाहीं, बायको वाईट नाहीं, मग दारूच तेवढी वाईट कां?

**भगीरथ :** तळिराम, या तीन गोष्टींचं एवढं साम्य जमलं म्हणून सर्वांशीं तुल्ना कशी होईल? पदवी आणखी बायको यांचे परिणाम असे वाईट होतात का?

**तळिराम :** यांचे परिणाम दारूपेक्षांहि वाईट आहेत. असे कैक पदवीधर हात धरून मी दाखवून देईन कीं, पदवीचा नांवापुरता पोकळ आधार नसता, तर त्यांना आपला मूर्खपणा जगापुढं मांडण्याची छातीच झाली नसती. दारूबाजाचं बरळणं दुसऱ्याला उमजत नाहीं हें खरं; पण पदवीधराची बाष्कळ बडबड तर त्याची त्यालासुद्धां कळत नाहीं! इंग्रजी अम्मल सुरू झाल्यामुळं आमच्या हतभागी देशांत ज्या अनेक आपत्ति आल्या, त्यांत पदवी आणि प्रेम या अग्रगण्य आहेत. पाठशाळेंत पाऊल टाकून पदवीचा वेध लागण्याबरोबर मुलाला मतं आणखी मिशा फुटूं लागतात. मताच्या मंडपीवर मूर्खपणाला मनमोकळेपणानं मिरास मिळते आणखी मिशांचा मोर्चा आंकड्यांच्या वळणावळणानं पोरीबाळींच्या प्रेमाकडे वळतो.

**भगीरथ :** उदात्त प्रेमाची तुम्हीं विटंबनाच मांडली आहे म्हणायची!

**तळिराम :** भगीरथ, तुम्ही एक प्याला घ्या आणखी. म्हणजे तुमच्या जिभेवरून हे 'उदात्त' वगैरे शब्द धुऊन जातील. प्रेम हें हास्यास्पद नाहीं वाटतं? अहो, काव्यांत कमल, नाटकांत सूड, कादंबरींत भुयार, मासिक पुस्तकांत खास अंक, वर्तमानपत्रांत खास बातमीदार, संसारांत प्रेम, औद्योगिक चळवळींत सहकारिता, सुधारणेंत देशभक्तींत स्वार्थत्याग आणि वेदान्तात परब्रह्म यांचा धुमाकूळ माजला नसता, तर त्या त्या गोष्टींची थट्टा करायला जागाच उरली नसती.

**भगीरथ :** हें राहूं द्या. प्रेमाचे परिणाम दारूपेक्षां वाईट कसे होतात तें सांगा

पाहूं ? सुंदर स्त्रियांच्या प्रेमापुढं या मदिरेची काय किंमत आहे ?

तळिराम : हं, प्रेमांत काय जीव आहे ? प्रेमापेक्षां मदिरा प्रत्येक बाबतींत श्रेष्ठ आहे. पाहा, प्रेमांत राजासुद्धां अगदीं गुलाम होतो, पण मदिरेंत गुलामसुद्धां अगदीं राजासारखा स्वतंत्र होतो. प्रेम भीक मागायला शिकवतं, तर मदिरेच्या उदारतेला मर्यादा नसते. प्रेमाखातर प्रणयिनीच्या लाथा खाव्या लागतात, तर मदिरेच्या जोरावर सगळ्या जगाला लाथ मारतां येते. प्रेमामुळं कांहीं सुचेनासं होतं, तर मदिरेमुळं कल्पनाशक्ति अनिवार वाढते. फार कशाला ? प्रेमानं फार झालं तर एखादी मदिराक्षी मिळवितां येईल, पण दारू पिऊन डोळे लाल झाले म्हणजे स्वतःलाच मदिराक्ष बनतां येतं ! बोला —

भगीरथ : खरं आहे. या गोष्टी नव्हत्या माझ्या लक्षांत आल्या. आणखी प्रेमाच्या नादांत सांपडलं, म्हणजे रात्रीच्या रात्रीं झोंपेवाचून काढाव्या लागतात आणि मदिरेमुळं रात्रीच काय, पण दिवससुद्धां झोंपेंत जातात. बरं, मदिरेचा नीतिमत्तेशीं संबंध काय स्वरूपाचा वाटतो तुम्हांला ?

तळिराम : मद्यपान नीतिमत्तेला फार पोषक आहे. ऐका कसं तें. मद्यपी कधीं खोटं बोलत नाहीं ! कारण खोटं रचून त्याला कधीं सांगतांच येत नाहीं ! मद्यपी कधीं कुणाची कुणाजवळ चहाडी करीत नाहीं. कारण, मागं कोण काय बोलला याची त्याला आठवण नसते ! तो कधीं कुणाचा विश्वासघात करीत नाहीं, कारण, त्याच्यावर कुणीं विश्वासच ठेवीत नाहीं !

भगीरथ : बरं पुढं ?

तळिराम : चोरीच्या बाबतींत तर तो बेटा अगदीं अजाण असतो ! एखादी लहानशी गोष्टसुद्धां त्याला दुसऱ्याजवळून चोरून ठेवतां येत नाहीं – फट्दिशीं तो ती बोलून टाकतो.

भगीरथ : खरंच, चोरून प्यालेली दारूसुद्धां त्याला जिरवतां येत नाहीं.

तळिराम : अशी थट्टेवर गोष्ट नेऊं नका ! एकदां आमच्या मद्यपानाच्या बैठकींत आमच्या एका मित्राला चोरी करायची इच्छा झाली. तेव्हां त्यानं मोठ्या शर्थीनं माझ्या बोटांतली अंगठी पळविली; पण शेवटीं दारूच्या धुंदींत त्यानं ती पुन्हा माझ्याजवळच ठेवावयाला दिली. मात्र हा माल चोरीचा आहे, कोणाला दाखवूं नकोस, असं त्यानं मला गंभीरपणानं बजावलं !

भगीरथ : छान ! यांत दोघांनाहि समाधान ! फळ एकाला चोरी केल्याचं आणि दुसऱ्याला चोरी सांपडल्याचं !

तळिराम : तेंच तुमच्या प्रेमाच्या बाबतींत पाहा ! कुणी कुणाचं मन चोरतो, तर कुणी चोरून भेटी घेतात ! एकमेकांकडे पाहायचं तेंसुद्धां चोरून ! इथून तिथून सारा चोरांचा बाजार !

भगीरथ : प्रेमाचा पाशच तसा आहे. प्रेमानं दोन जीवांचा अगदीं एकजीव होतो.

तळिराम : दोन जीवांचा एकजीव होत नाहीं, पण एका जोडप्याच्या दोन जीवांपासून दहापंधरा जीवांचं लटांबर मात्र उत्पन्न होतं ! हिंदुस्थानच्या हवेंत अव्वल आर्यांचा वंशवृक्ष तेहतीस कोटी फळांनीं लदून निघाला, तो कांहीं त्याच्या मुळाशीं दारूचं शिंपणं झालं म्हणून नव्हे. प्रेमजलाच्या सिंचनानेंच तो फोंफावला आहे. तसं म्हणाल तर जीव कमी करण्याच्या बाबतींतसुद्धां मदिराच जास्त ठरेल. असं दोन जीवांचा एकजीव करण्यासारखं अर्धवट काम नाहीं करीत ती ! मदिरेनं आजपर्यंत असे कैक जीव अजिबात नाहींसे केले आहेत.

भगीरथ : मग प्रेमामुळं हल्लीं जो प्रीतिविवाहाचा प्रघात पडतो आहे, त्याला तुम्ही प्रतिकूलच असाल ?

तळिराम : रंगभूमीच्या आणखी प्रेक्षकांच्या मध्यें दिव्यांची एक धगधगीत अग्निरेषा असते. नाट्यसृष्टीची ही मर्यादा ओलांडून प्रीतिविवाह सत्यसृष्टींत उतरला, म्हणजे त्याचे पोरखेळ निम्मे दरानंसुद्धां पाहण्याच्या लायकीचे नसतात. लोक म्हणतात, नाटक हें संसाराचं चित्र आहे. पण मी म्हणतों कीं, हल्लीं संसार हें नाटकाचं चित्र बनत चाललं आहे ! प्रीतिविवाहाच्या पूर्वार्धाचा उत्तरार्धाशीं काडीइतकाहि संबंध नसतो; किंवा काडीइतकाच संबंध असतो. प्रीतिविवाह हा द्वंद्वसमास असून वकिलामार्फत त्याचा विग्रह करून घ्यावा लागतो. लग्नाच्यापूर्वीं प्रेमाचीं आधुकमाधुकं हातांत हात घालून भटकण्यासाठीं जीं तळमळत असतात, नुसती पायधूळ दृष्टीस पडण्यासाठीं ज्या उत्कंठेनं एकमेकांच्या वाटेकडे डोळे लावून बसतात, तींच पुढं एकमेकांच्या डोळ्यांत धूळ फेंकण्यासाठीं संधि पाहात असतात ! चुंबनासाठीं तोंडाला तोंड भिडवणारीं जोडपीं पुढं एकमेकांचीं तोंडं पाहतांच चावूं कीं गिळूं, असं करायला लागतात. आणि दुसऱ्याच्या अधराचं आपल्या दांतांनीं खंडण करण्याचं पर्यवसान आपल्याच ठिकाणीं दांतओंठ खाण्यांत होत जातं.

भगीरथ : मला वाटतं एकंदर सुधारणेच्या बाबतींत तुमचं मन बरंच कलुषित आहे. जुन्या थाटाच्या लग्नांना तुमचा तितका विरोध नसेल ?

तळिराम : अलीकडे त्यांहि गोष्टीच्या विरुद्ध माझं मन होत चाललं आहे. पुढले सात जन्म सलोख्यानं काढण्यासाटीं एकमेकांसमोर आणलेलीं वधुवरं अनुभवांतीं असं वाटायला लावतात कीं, मागल्या सात जन्मांचं वैर साधण्यासाठीं हीं एकमेकांच्या समोर आलेलीं आहेत. बाळबोध थाटाच्या लग्नाच्या बारशाला जशी भटाभिक्षुकांची जरुरी असते, तशी अलीकडे त्यांच्या उत्तरक्रियेला वकील-मुनसफांची जरूर भासूं लागली आहे. आम्ही अलीकडे नेहमीं पाहतों, नवराबायकोंच्या वेबनावाचे खटले प्रमाणाबाहेर वाढत चालले आहेत. बोहल्यावर नवराबायकोभोंवतीं भटाभिक्षुकांनीं गुंडाळलेल्या सुताच्या गुंतागुंतीसुद्धां दिवाणी दरबारांत उकलाव्या लागतात आणि धर्माच्या मंत्र्यांनीं केलेलीं पातकं कायद्याच्या कलमांनीं निस्तारावीं लागतात. एकंदरींतच बघा. स्वतःच्या बायकोकडे पाहण्याची नवऱ्याची नजर इतकी फिरली आहेशी दिसते कीं, आतां परस्त्रीकडेसुद्धां स्वतःच्या स्त्रीच्या दृष्टीनंच पाहणारालादेखील पुण्यश्लोक म्हणण्याची पाळी येत चालली आहे आणि परस्त्रीच्या ऐवजीं स्वस्त्रीच मातेसमान होत चालली आहे !

भगीरथ : तुम्ही केवळ थट्टेनंच बोलत आहांत म्हणून तुम्हांला तितक्या तीव्रतेनं उत्तर देण्याची जरुरी नाहीं. बाकी खरं म्हटलं तर तसल्या दुनियेंत ही जी हल्लीं बेदिली दिसून येऊं लागली आहे तिच्याबद्दल वाडवडिलांना जबाबदार धरलं पाहिजे. बदलत्या परिस्थितीचा लग्नसंबंधांतून मुळींच विचार न करण्याचा आमच्या वडील पिढीचा कृतनिश्चय दिसतो.

तळिराम : तें कांहीं म्हणा, बाकी लग्नाच्या बाबतींतला एकंदर बोजवारा पाहून शेवटीं असं वाटायला लागतं कीं, संसारमार्गावरच्या प्रवाशानं लग्नाची बोजड बेडी पायांत अडकवून घेण्यापेक्षां एखाद्या सार्वजनिक मार्गाला लागावं हें बरं.

भगीरथ : वः ! वेश्यागमनाइतकी अनीति दुसरी कोणती असेल असं मला वाटत नाहीं.

तळिराम : तुम्ही अजून अजाण आहांत. अहो, असल्या बाहेरख्याली संबंधांत पोराबाळाच्या खिल्लाराशीं नुसता नांवापुरतासुद्धां संबंध ठेवायचं कारण नाहीं. शिवाय बेइमानी दिसलीच तर बाहेरच्या रस्त्याकडे बोट करायला मोकळाच. मायबाप सरकारांनीं बाहेरच्या बायकांच्या पोटापाण्याकडे अजून आपली कायदेशीर कृपादृष्टि वळविली नाहीं. बदचाल दिसली तरी तिची हकालपट्टी करतांना पोटगी खर्चाचा तिला अहेर करण्याचं कारण नसतं.

भगीरथ : जाऊं द्या ! चार घटका मजेनं जमण्यासाठीं जमायचं, तिथं ही असली किळसवाणी कटकट कशाला हवी ? मी मद्यपानाच्या विरुद्ध बोलतों असं नाहीं. पण दारूमुळं मनुष्याची कर्तबगारी कमी होते, हें तर खरं आहे ना ?

तळिराम : हा प्रश्न साहेब लोकांना विचारा. कोट्यान्कोटी अस्सल आर्यांची कर्तबगारी कारकुनी पेशानं साहेबांच्या भेटीसाठीं बंगल्याबाहेर उभी आहे व बंगल्याच्या आंत पेल्यावर पेले घेण्याच्या कामामुळं सत्ताधारी साहेबांना बाहेर येण्याची फुरसत नाहीं ! भगीरथ, असले वेडेवांकडे प्रश्न विचारतां याचं कारण एवढंच कीं, मद्यापासून तुम्हीं हात राखून काम चालविलं आहे. तुम्ही आतां कांहीं तितके नवीन नाहीं. हें बघा, भगीरथ, या घरीं नवशिक्याला स्वतःच्या अब्रूबद्दल भिण्याचं कांहीं कारण नाहीं. नवीन घेणाऱ्याच्या अब्रूला आम्ही चारसहा महिने जपत असतों.

भगीरथ : आणि पुढं मग ?

तळिराम : पुढं मग ज्याचा त्यालाच अब्रूबद्दल विधिनिषेध वाटत नाहीं.

भगीरथ : तळिराम, अब्रू, कीर्ति यांसारख्या गोष्टींची मला मुळींच चाड नाहीं. ज्यानं साऱ्या जगाचा जितेपणींच कायमचा निरोप घेतला, त्याला या असल्या गोष्टींची काय पर्वा वाटणार ? भर चौकांत जाऊन पीत बसायला मला सांगितलं, तरीसुद्धां माझी तयारी आहे.

तळिराम : शाबास भगीरथ, तुमच्यासारखीं उत्साही माणसं मिळालीं पाहिजेत ही मोकळेपणानं खाण्यापिण्याची अडचण कायमची दूर करण्याकरतां आम्ही आतां लवकरच मद्यपानाची संस्था काढणार आहोंत. मद्यपान हें बहुतांशीं हलक्या लोकांच्या हातीं गेल्यामुळं संभावित समाजाकडून दारूची जी हेटाळणी होते, ती बंद व्हावी, मद्यपानाच्या व्यसनाला सभ्य स्वरूप यावं, हाच या मंडळीचा मुख्य उद्देश आहे. सर्व धर्मांचे, सर्व पंथांचे, सर्व जातींचे - पोटजातींचे दारू पिणारे लोक यांत सामील असल्यामुळं त्याला आम्हीं "आर्यमदिरामंडळ" हें नांव दिलं आहे. त्याचे सर्व उद्देश विस्तारानं प्रसिद्ध करून टोलेजंग पायावर लवकरच त्याची उभारणी करावयाची आहे. योग्य वेळीं मी तुम्हांला सांगेनच.

भगीरथ : बरं तळीराम, वेळ बराच झाला असं वाटतं, जातों मी आतां.

तळिराम : हें एवढं उरलं आहे, तेवढं उरकून टाका आणि मग चला.

भगीरथ : वाटेनं जातांना या वासानं कारणाशिवाय घोंटाळा होतो.

तळिराम : थांबा, एक मंत्र सांगून ठेवतों. अग ए, जरा बाहेर ये पाहूं.

[ गीता येते. ]

गीता : ( स्वगत ) आज माझ्या नांवानं 'गीते' म्हणून कांहीं हांक मारली नाहीं. अजून रागरंग नीटसा जमला नाहीं वाटतं !

तळिराम : गीते, यांना थोडी बडीशेप आणून दे पाहूं ? भगीरथ, तोंडाचा वास मारायला हें अगदीं रामबाण औषध आहे. ( गीता जाते. ) मग काय ? 'आर्य-मदिरामंडळा'ला तुम्ही पाठिंबा देणार ना ? आम्हांला सर्व लोकांची मदत पाहिजे आहे.

भगीरथ : या संसारांत मला पाशबंध असा राहिलाच नाहीं.

[ गीता येते; तळिराम तिजजवळून बडीशेप घेऊन भगीरथाला देतो; भगीरथ जातो. ]

गीता : आज रावसाहेबांच्याकडे गेलां होतां का ? बाईसाहेबांचे भाऊ ते पद्माकर-दादा त्यांना न्यायला आले आहेत माहेरीं. बाईसाहेबांच्या बरोबर शरदिनी-बाईहि जाणार आहेत.

तळिराम : त्या जाणार आहेत उद्यां, आणि आज कशाला उगीच गडबड ? बरं, उद्यांपरवां क्लबची स्थापना करायची आहे, त्यासाठीं शक्य तितकी वर्गणी मला भरायची आहे; तर घरांत कांहीं आहे का ?

गीता : घरांत आतां तुम्ही नी मी, दोघं बाकी आहों ! दागदागिने, सामान-सुमान मावत नव्हतं घरांत ! सोन्याच्या राशी रचून वडिलांनीं घराची सोन्याची लंका करून ठेविली होती; पण तुमच्या आशीर्वादानं सावकारांनीं भरल्या घरांत रामराज्य लुटलं ! तें मेलं असो, पण मी म्हणतें सगळं सगळं सामान कसं विकलंत ?

तळिराम : त्यांत काय अवघड होतं एवढं ! निम्मं सामान विकलं म्हणून गरीब होत चाललों, आणि पुढं गरीब होत चाललों म्हणून बाकीचं निम्मं सामान विकलं !

गीता : चांगला लिहायवाचायचा नाद होता; पण सारीं पुस्तकंसुद्धां विकलींत !

तळिराम : तुला दूरदर्शित्व नाहीं ! हल्लींचं युग विद्यादानाचं आहे, समजलीस ? दुष्काळाच्या दिवसांत दानशूर श्रीमंत बाजारभावानं दाणागोटा खरेदी करून गोरगरिबांना स्वस्त्या भावानं विकून टाकतात, त्याबद्दल नाहीं कुठं हाकाटी होत ? त्याचप्रमाणं भरकिंमतीला घेतलेलीं पुस्तकं गरजवंत वाचकांना पडत्या भावानं देणं, याला वाईट कोण म्हणेल ? विद्यार्थ्यांना निम्मे दरानं नाटकाला सोडण्यापेक्षां निम्मे दरानं पुस्तकं देणं हेंच पुण्याईचं आहे, समजलीस ?

गीता : तोंडावर तर सरस्वती बसली आहे तुमच्या ! तसबिरासुद्धां घरांत ठेवल्या नाहींत. अहो, जन्मदात्या वडिलांची तसबीर, पण तीसुद्धां चार आण्यांला विकलीत !

तळिराम : मग यांत वडिलांचा नांवलौकिक वाढला कीं कमी झाला ? अग, आजकाल बाजारांत शिवाजी बाजीरावांसारख्या महात्म्यांच्या, फार काय, देवादिकांच्यासुद्धां तसबिरा दोन आण्यांला मिळतात. त्यांच्यापेक्षां आमचे वडील जास्त होते वाटतं ?

गीता : माणसाच्या जन्माला आपले आले आहांत एवढंच ! सकाळीं उठून तुमचं तोंडसुद्धां बघूं नये कुणीं !

तळिराम : हां, तोंड जास्त चालायला लागलं बरं—

गीता : हो बरं ! पुष्कळ भीडमुर्वत धरली तुमची ! वाघ म्हटलं तरी खातोच आणि वाघोबा म्हटलं तरी खातोच ! अशी मी बोलणारच ! करून करून करणार तरी काय तुम्ही ?

तळिराम : काय करणार ? मजजवळ अशी उधारीची बात नाहीं ! तोंडाला तोंड दिलंस तर तिथल्यातिथं एका तोंडाचीं दोन तोंडं करून देऊन दाम-दुपटीनं उसनं फेडीन ! अवांतर वाटाघाट ठेव बाजूला आणि चुकूनमाकून एखादा दागिना राहिला असेल तो ठेव आणून पुढं—

गीता : हें एवढं एक मणिमंगळसूत्र राहिलं आहे !

तळिराम : मग तेंच दे इकडे. एकस्यादुकस्या दागिन्याची मिरवणूक काढली म्हणजे आपल्या गरिबीबरोबरच मनाचा हलकेपणाहि लोकांच्या नजरेला येतो. सर्वांग सजलेल्या श्रीमंतांच्या ठिकाणीं एखाद्या दागिनाची उणीव चंद्राच्या कलंकाप्रमाणं शोभिवंत दिसते. पण उघड्याबागड्या गरिबांना एकच दागिना घातला म्हणजे तो काळ्या कुळकुळीत अंगावरील पांढऱ्या कोडासारखा किळसवाणा दिसतो. हें लक्ष्मीचं असलं कोडकौतुक करण्यांत काय अर्थ आहे ? आण तें मंगळसूत्र इकडे.

गीता : अहो, चारचौघांची, देवाधर्मांची, कांहीं तरी चाड ठेवा ! तुमच्या नांवानं म्हणूनचना हें मंगळसूत्र गळ्याशीं बांधायचं तें ?

तळिराम : सौभाग्यचिन्हासाठीं सोन्याचे मणि कांहीं लागत नाहींत. पोत गळ्यांत असली म्हणजे झालं ! सौभाग्या, तुझ्या सौभाग्याला मी धक्का लावतों आहें ! पोत मागितली ? बरं दोरा मागितला ? तेवढे मणि कुरतडून नेतां म्हणजे झालं ! बायकांच्या मंगळसूत्राचा मणि म्हणजे कांहीं जानव्याची

ब्रह्मगांठ नव्हे कीं ती गळ्यांत असलीच पाहिजे अगदीं !

गीता : हो एवढं बरीक खरं. तितकं कुठं आहे बायकांचं दैव ! जानव्याची ब्रह्मगांठ दाखविली म्हणजे तुमच्यासारखे ब्रह्मराक्षस मानगूट सोडून पळत सुटतात.

तळीराम : हो, बरोबर आहे ! मंगळसूत्राचा सोन्याचा मणि दाखविला म्हणजे तोच ब्रह्मराक्षस अशी मानगूट धरतो.

[ तळीराम मान धरतो व मणि काढूं लागतो. ]

गीता : देवा ! धावरे धाव !

तळीराम : नवराबायकोच्या एकांतांत येण्याची देवाचीसुद्धां ताकद नाहीं !

[ मंगळसूत्र तोडून मणि काढूं लागतो, गीता रडूं लागते. ]

## प्रवेश तिसरा

[ स्थळ : सुधाकराचें घर. पात्रें : सुधाकर, पद्माकर, सिंधू आणि शरद. ]

सिंधू :

( राग—मांड-गर्मा; ताल—दादरा. चाल—गोकुलमा लई० )

मानस कां बधिरावें हें ? । बघतसे खिन्न जगता ॥ ध्रु० ॥

गृहशृंखला या । दृढ बद्ध पायां । बल ना भेद तया होतां ॥ १ ॥

पद्माकरदादा, अजून माझं मन निघायला घेत नाहीं.

पद्माकर : सिंधूताई, अगदीं नाइलाज झाल्यावांचून मीं तरी इतका आग्रह धरला असता का ? बाबांनीं—स्वतः श्रीमंतांनींसुद्धां, इंदिराबाईंना पुष्कळ सांगून पाहिलं; पण पोरीच्या आतीपुढं इलाज चालेना ! दादासाहेब, तुमच्या लग्नांत तुम्हीं पाहिलंच असेल, श्रीमंतांच्या आणखी आमच्या घराचा ऋणानुबंध किती आहे तो ! इंदिराबाई म्हणजे संस्थानिकांची मुलगी, त्यांतून एकुलती एक, पोरवय आणि नव्यानं सासरीं जायला निघालेली. आमची सिंधूताई म्हणजे तिची जिवाभावाची सोबतीण. तेव्हां घेतला हट्ट, कीं सिंधूताईच पाठराखणी पाहिजे म्हणून ! दादासाहेब, एक म्हण आहे, राजहट्ट, बालहट्ट आणि स्त्रीहट्ट, विधात्यालसुद्धां पुरवावे लागतात, मग यांचा तिहेरी जोर एकवटल्यावर आपल्यासारख्यांची त्रेधा उडाली तर नवल काय ? हां, सिंधूताईला लवकर परत पाठवावयाचं मात्र माझ्याकडे लागलं; शिवाय तिच्या वाढत्या जिवाची

दगदग सोसायला आमची श्रीमंती तरी कुठं वर आली आहे ? शरदिनीबाई, तुमचा ठरलाना विचार यावयाचा ?

**शरद्** : दादा-वहिनी काय ठरवतील तें खरं! दादा, जाऊं ना मी वहिनींच्याबरोबर ?

**सिंधू** : बन्संना एकट्यांना इथं ठेवून कसं चालेल ? घरांत बायकोमाणूस कुणी नाहीं. बरं, दिवसभर कोर्टांत असावं लागणार. शिवाय भाई म्हणावा तोही इथं नाहीं.

**सुधाकर** : शरद्ला न्यायलाच पाहिजे. पण भाऊसाहेब, अगदीं आजच निघालं पाहिजे का ?

**पद्माकर** : तुम्हीं राहा म्हणावं, आणि मी जातों म्हणावं, अशांतलं आपलं कांहीं नातं नाहीं. पण आम्ही गिरण्यांचे मालक म्हणजे लोकांना बाहेरून दिसायला सुखी असतों; पण खरं म्हटलं तर गिरणीचा मालक म्हणजे हजार यंत्रांतलं एक यंत्र असतो. ठरलेलीं चक्रं घेणं त्याला कधीं चुकत नाहीं. म्हणून म्हणतां मला आजच्या आज निरोप द्या.

**सुधाकर** : नाहीं, म्हटलं राहिलां असतां, तर तेवढेच चार दिवस बोलण्या-चालण्यांत गमतीनं गेले असते. भाई गेल्यापासून मोकळेपणानं चार शब्द बोलण्याचं समाधानच नाहींसं झालं आहे.

( राग—देस-खमाज; ताल—त्रिवट. चाल—हा समजपिया मान मोरे० )

हें हृदय सुख-विमुख होई । मन खिन्न सतत,
भ्रमणनिरत शांति नाहिं ॥ ध्रु० ॥
श्वसन मित्र जणु, दुरि तो होतां ।
देहिं कसें चैतन्य राहि ॥ १ ॥

**पद्माकर** : काय करावं ? अगदीं इलाज नाहीं. शिवाय आमच्याशीं बोलण्यानं तुम्हांला काय समाधान होणार ? दादासाहेब, केवळ भाईची कृपा म्हणून तुमच्यासारख्या विद्वद्रत्नाचा आम्हांला लाभ झाला. आमची सिंधूताई मोठी भाग्याची ! दादासाहेब, तुमच्याबद्दल चारचौघांना सांगतांना दुनिया अगदीं तुच्छ वाटते. तुमच्याशीं बरोबरीनं बोलायची आमच्यासारख्या सजलेल्या मजुरांची लायकी तरी आहे का ? खरं म्हणाल तर तुमच्याशीं बोलतांना माझा जीव अगदीं खालवर होत असतो. जरा चुकून एखादा शब्द पडला तर तुमच्या मनाला आमचा रांगडी धक्का लागेल अशी भीति वाटते. बिरबलानं वाघासमोर बांधलेल्या अजापुत्राप्रमाणं मी तुमच्यासमोर अगदीं धास्तावल्यासारखा बसलेला

असतों. म्हणून तुम्हांला आपलं हात जोडून सांगणं आहे, कीं आमची आजच रवानगी करा.

सुधाकर : बरं आहे ! सिंधू, गीता आहे ना घरांत? तिला सांग तळिरामाला बोलवयाला, म्हणजे तो करील व्यवस्था.

पद्माकर : तळिराम म्हणजे तुमचा तो कारकूनच का?

सुधाकर : मनुष्य मोठा चलाख, हुषार आणि जिवाला जीव देणारा आहे.

सिंधू : आणि गीताबाई तर घरच्या माणसाच्या पलीकडे !

पद्माकर : ताई, आतां असा बोलण्यांत वेळ गमवून कसं चालेल?

सुधाकर : खरंच, राणीसाहेबांच्या जवळून घराचा चार्ज अजून घ्यावयाचा आहे. एकदोन नाहीं, पण निदान चार महिने तरी मला या बदलीवर राहावं लागणार! कारण हक्काची रजा तुंबतां तुंबतां जितक्या दिवसांची, तितक्या महिन्यांची—

सिंधू : दादा येवो, बाबा येवोत, मूळस्वभाव जाईना !

सुधाकर : बरं चला—

सिंधू : हो, पण भाईनं सांगितलेलं लक्षांत आहे ना? माझ्या जिवाला नाहीं तर अगदीं टांगल्यासारखं होईल. इथं एकटं राहायचं—

सुधाकर : मग एखाद्या बोर्डिंगांत ठेवतेस मला? तो रामलाल आहे शहाणा आणि तू आहेस दीडशहाणी ! सिंधू, या जगांत तुझ्याखेरीज अशी एकही गोष्ट नाहीं कीं, जिचा म्हणून या सुधाकाराला मोह पडेल—

(राग–बेहाग; ताल–त्रिवट. चाल–टेर सुनीपाये० )

वेध तुझा लागे सतत मनीं । वसतिच केली नामें वदनीं ॥ ध्रु० ॥
जगत् सकळ सखि भासत तन्मय । मधुर रूप तव खेळे नयनीं ॥ १ ॥

[ सर्व जातात.

## प्रवेश चवथा

[ स्थळ : आर्यमंदिरामंडळ. पात्रें : शास्त्री, खुदाबक्ष, मन्याबापू मवाळ, जनुभाऊ जहाल, सोन्याबापू सुधारक, यल्लप्पा, मगन, रावसाहेब, दादासाहेब, भाऊसाहेब वगैरे मंडळी. तळिराम प्रवेश करतो. ]

शास्त्री : शाबास तळिराम, किती उशीर केलास यायला ? खरं म्हटलं म्हणजे,

तूं तर सर्वांच्या आधीं यायला पाहिजे होतंस. आज आपलं मंडळ स्थापन करण्याचा दिवस. तुझ्या हातून असा विलंब झाला तरी कसा ?

तळिराम : शास्त्रीबुवा, आज विलंब व्हायला तसंच कारण झालं; आज एक इतकी वाईट गोष्ट झाली कीं विचारूं नका !

खुदाबक्ष : मग विचारल्यावांचूनच सांग !

तळिराम : खुदाबक्ष, खरोखरीच ही थट्टेची गोष्ट नव्हे ! आज आमच्या दादासाहेबांची सनद मुन्सफांनीं सहा महिने रद्द केली.

शास्त्री : दादासाहेब म्हणजे आपले सुधाकरपंत ?

तळिराम : हो !

मन्याबापू : सुधाकर इतका शहाणा, सालस, असें असून असं त्याच्याकडून कारण कसं मिळालं ?

तळिराम : मन्याबापू, तसे दादासाहेब तुम्ही म्हणतां त्यापेक्षांही चांगलेच आहेत. पण त्यांचा स्वभाव फारच तापट आहे.

शास्त्री : तरण्या रक्ताला इतकी उसळी असायचीच.

तळिराम : तें खरंच; पण अलीकडे दादासाहेबांना शत्रूच फार होत चालले आहेत.

जनूभाऊ : कारण ?

तळिराम : अहो, एखाद्याचं नव्यानं नांव होऊं लागलं म्हणजे सारा गांव त्याच्या वाईटावर असतो. आमच्या दादासाहेबांचं बरं इथं कोणालाही बघवत नाहीं. चारचौघांनीं चहूंकडून चाव-चाव केल्यामुळं ते अगदीं चिडल्यासारखे झालेले.

जनूभाऊ : मग मुन्सफांनीं मुद्दाम असं केलं म्हणतोस ?

तळिराम : छे: छे: , मुन्सफांची तर मुळींच चूक नाहीं ! असं कोण कुणाचं बोलणं सहन करून घेणार ? झालं काय—कुठल्याशा मुद्द्यावर यांचं म्हणणं मुन्सफांना पटेना; दादासाहेबांनीं नीट समजावून द्यायला पाहिजे होतं; पण नव्या दमांत एवढा पोंच कुठून राहणार ? हे रागारागानं बोलूं लागले. चार-चौघांनीं हसून हेटाळणी करायला सुरुवात केली. झालं, दादासाहेबांचा सुमार सुटला, अन् मुन्सफाला होय नव्हे वाटेल तें बोलूं लागले. तेव्हां मुन्सफांना असं करणं भाग आलं. तरी बरं म्हातारा पुष्कळ पोक्त, म्हणून सहा महिन्यांच्या मुदतीपुरतीच त्यानं सनद रद्द केली; दुसरा कोणी—अहो, मी असतों तरीसुद्धां जन्माचं संसारांतून उठविलं असतं ! हा एवढा प्रकार झाल्यावर मग काय ? ज्यानं त्यानं दादासाहेबांची तोंडावर हेटाळणी करायला सुरुवात केली. त्या बिचाऱ्याला मरणापेक्षां अपेश खोटं असं होऊन गेलं ! शेवटीं कसं तरी घरीं

आणून पोचविलं त्यांना; आणखी तडक इकडे निघून आलों. म्हणून वेळ लागला.

शास्त्री : अरे अरे, फार वाईट गोष्ट झाली. बरं, आधींच उशीर झालेला आहे; आतां आणखी वेळ नको. करा कामाला सुरुवात. नांव काय ठेवायचं ?

खुदाबक्ष : हे बघा, कामाला आणखी बैठकीला एकदम सुरुवात होऊं द्या.

तळिराम : हीं मीं कांहीं टाचणं करून आणलीं आहेत. तीं वाचून दाखवितों म्हणजे झालं. या संस्थेचं नांव ' आर्यमदिरामंडळ ' असं ठेवावं.

भगीरथ : आर्यमदिरामंडळ ? ' आर्य ' शब्दाचा जरा दुरुपयोग नाहीं का हा ? दारूसारख्या निंद्य गोष्टीशीं एवढा प्रौढ शब्द जोडणं—

तळिराम : हीच समजूत घालविण्याकरितां ही संस्था काढायची आहे. मद्यपानाच्या व्यसनाला सभ्य स्वरूप यावं हाच आमचा खटाटोप आहे. इतर बाबतींमध्यें ज्या शब्दाचा उपयोग होतो, तेच शब्द दारूच्या बाबतींत रूळवून टाकले म्हणजे झालं.

भगीरथ : नुसत्या शब्दाशीं अशी सलगी केल्यानं मद्यपानाला महत्व कसं येणार ? मोठमोठाल्या पवित्र गोष्टींच्यासाठींच शोभणारे शब्द असल्या भलत्या गोष्टीत वापरल्यानं त्या गोष्टीची पवित्रता थोडीच कमी होणार आहे ! शिमग्यांतल्या शिव्यांनी थोरामोठ्यांची किंमत कमी होत नाहीं आणि चोरापोरांची किंमत वाढत नाही. बाजारबसव्यांनी साळसूदपणा पत्कारला म्हणून पतिव्रताची पुण्याई कधी ढळते का ?

तळिराम : भगिरथ, तुम्ही अगदी अजाण अहांत ! दारूकडेच इतका वाईट-पणा कां यावा हो ? आम्ही दारू पिणारांनींच आपण होऊन आमचा कमीपणा कबूल करायला सुरुवात केली आहे. विडीचा धूर सोडणाऱ्यांना कांहीं पातक नाहीं. भर सभेत रंगलेलं थोबाड कुणी रंगवून काढीत नाहीं; आणि एखाद्याच्या तोंडाला दारूचा वास आल्याबरोबर लोक लगलीच नाक मुरडा-यला लागतात. का हो असं ? तसा कोणीं नेटाचा प्रयत्नच केला नाही. साहेब-लोकांत आज काय चाल आहे ? समजा, हीच आपली भाऊसाहेब, बापूसाहेब यांसारखीं मोठालीं माणसं उद्यां मनमोकळ्या धिटाईनं, भरदिवसां दारू पिऊन व्याख्यानांतून किंवा सभांतून मिरवूं लागलीं, सरकारदरबारांतून वावरूं लागलीं, म्हणजे चोहोंकडे हाच शिरस्ता पडत जाईल. दिवसेंदिवस चहाप्रमाणं दारूचंही वाटेनासं होणार आहे ! म्हणून म्हणतां कीं, ' आर्यमदिरामंडळ ' हेंच नांव उत्तम आहे.

**खुदाबक्ष :** शाबास तळिराम, तूं एक और मनुष्य आहेस.

**शास्त्री :** हं, पुढें चला.

**तळिराम :** आतां मंडळाचे उद्देश थोडक्यांत म्हणजे असे कीं, मंडळाचा प्रत्येक सभासद रोज दारू पिणारा पाहिजे. आपण दारू पितों हें प्रत्येकानं चारचौघांत बोलून दाखविलं पाहिजे. अहोरात्र मंडळांत खाण्यापिण्याची सोय तयार ठेवायची. मांसाहाराला ही सभा उत्तेजन देत आहे.

**मगन :** पण देशी दारू प्यायला हरकत नाहीं ना ?

**खुदाबक्ष :** हा गुजराथी कंगाल मोठा कंजूष आहे.

**मन्याबापू :** खांसाहेब, असं कां म्हणतां ? सर्वांचीही सोय झाली पाहिजे.

**जनुभाऊ :** बरोबर आहे, गोरगरिबानं काय करावं ? दारिद्र्याच्या प्रसंगीं स्वदेशीकडे साहजिकच सर्वांचं लक्ष लागतं.

**तळिराम :** झालं, अवांतर कांहीं गोष्टी आहेत. साडेआठ एकदा वाजून गेले म्हणजे गरजवंताला स्टेशनावर रात्रीं अपरात्रीं धावावं लागतं.

**सोन्याबापू :** आणि तीसुद्धां सगळ्याच स्टेशनांवरून सोय असतेच असं नाहीं. शाळूच्या शेतांत तुरीची पेरणी करावी तशी मधूनमधून कांहीं स्टेशनं सोयीचीं आहेत. दारूची मेल प्रत्येक स्टेशनवर थांबत नाहीं.

**मगन :** आणि शिवाय मेलगाडीप्रमाणं दर भारी! अडल्या वेळीं भलत्या भावानं घ्यावी लागते.

**तळिराम :** म्हणून हें मंडळ सरकारला सारख्या विनवण्या करीत राहणार कीं, हा साडेआठांचा कायदा मोडून सरांस दुकानं अहोरात्र उघडीं ठेवावीं.

**शास्त्री :** तसंच मी म्हणतों, दुकानाला परवान्याची आडकाठी कां असावी ?

**भाऊसाहेब :** मंडळी, काय सांगावं! आम्ही तिकडे गोव्याला गेलों होतों, तियं वाण्याच्या दुकानीं, कापडवाल्याच्या दुकानीं हें खातं असायचंच.

**बापूसाहेब :** पोर्तुगीज सरकारचं एकंदरीनं धोरणच उदार!

**तळिराम :** हळूहळू मंडळ या साऱ्या गोष्टी घडवून आणणार. अहो, माझ्या डोक्यांत अजून फार कल्पना आहेत. आमच्या भगीरथांसारख्या नवशिक्यांना वासाचा मोठा बाऊ वाटतो. तेव्हां बिनधुराची लढाईची दारू निघाली आहे, तशी बिनवासाची प्यायची दारू शोधून काढण्यासाठीं मंडळातर्फे शिष्यवृत्त्या देऊन परदेशांत विद्यार्थीसुद्धां पाठवून द्यावयाचे म्हणतों मी. तसंच प्रत्येक सभासदानं नवीन सभासद मिळवून मद्यपानाचा प्रसार जारीनं सुरू केला पाहिजे.

**शास्त्री :** हो, हो, फारच महत्त्वाचं कलम आहे. कारण अलीकडे पाहावं तों

सगळ्या समाजांत, एकंदरीनंच व्यसन सोडण्याचं खूळ सुरू झालं आहे. अमका म्हणतो आजपासून चहा सोडला, तमक्यानं विडासुद्धां खायचा नाहीं असाच विडा उचलला; या प्रकाराला आपण आळा घातला पाहिजे.

तळिराम : आतां वेळ फार झाला आहे. म्हणून चिटणीस, खजीनदार वगैरे निवडणं पुढच्या बैठकीवर टाकू. आंत खाण्यापिण्याची तयारी झाली आहे. हो, खांसाहेब, तुमचा तो हुसेन मध्यारी आणणार होतांना तुम्ही ?

शास्त्री : खरं आहे बुवा! सूपशास्त्रांत असा सांप्रदायिक मनुष्यच पाहिजे. ' तुका म्हणे येथें पाहिजे जातीचे ! '

खुदाबक्ष : पुढच्या वेळेला त्याला आणतोंच.

तळिराम : ठीक आहे, सर्वांना ही योजना पसंत असल्यास हात वरती करावे.

[ सर्व हात वरती करतात. ]

शास्त्री : सर्व एका हातावर तयार आहेत.

तळिराम : सर्व ?

सगळेजण : सर्व !

[ पडदा पडतो. ]

## प्रवेश पांचवा

[ स्थळ : सुधाकराचें घर. पात्रें : सुधाकर व तळिराम. ]

सुधाकर : ( स्वगत ) चोवीस तास झाले, मस्तकावर नुसते घणाचे घाव बसताहेत ! कांहीं सुचत नाहीं, कांहीं नाहीं.

( राग–तिलंग; ताल–आडा-चौताल. चाल–रघुवरिके चरन० )

जड बधिर हृदय शिर, भयकर मतिसंकर ।
तनुदहनहि खर ॥ ध्रु० ॥
नारकहुताशन । दाह का घोर ।
जाळि वा प्रलयकर– । रविकिरणनिकर ॥ १ ॥

[ मेजावर डोकें ठेवून पडतो. ]

तळिराम : ( येऊन ) दादासाहेब !

सुधाकर : तळिराम, मला कांहीं सुचेनासं झालं आहे.

तळिराम : दादासाहेब, अशा आपत्ति या संसारांत यायच्याच !

सुधाकर : तळिराम, अशा आपत्तींची मी पर्वा करतों असं का तुला वाटतं ! मला ही अपमानाची आपत्ति सहन होत नाहीं ! हलकटांनीं हेटाळणी करावी, लब्ध-प्रतिष्ठितांनीं छीः थू करावी, आपल्या वैऱ्यांनीं समाधानानं हसावं ! तळिराम, मीं कुबेराची संपत्ति लाथेनं झुगारून दिली असती, आणखी पुन्हा हातानं ओढून आणली असती ! पण या अपमानाच्या जाचण्या सहन होत नाहींत.

तळिराम : उद्यां चार दिवसांनीं या गोष्टीचा विसर पडून—

सुधाकर : विसर ? ती गोष्टच विसर ! प्राण जाईपर्यंत या सर्पदंशाच्या वेदना चालू राहाणार ! नाहीं रे—नुसती आग भडकून तळमळ चालली आहे ! आत्महत्या ही नामर्दपणाची गोष्ट म्हणून म्हणतात—शिवाय आत्महत्येनं मी देहरूपानं सिंधूला अंतरेन—तिच्या त्या दुःखाची कल्पना तर—तळिराम शरीराचा नाश केल्यावांचून मरणाची जोड देणारं एखादं विष नाहीं का ?

तळिराम : असं विष नाहीं, पण असं एक अमृत मात्र आहे ! दादासाहेब, मी तेवढ्यासाठींच आलों आहें. तुम्ही चारचौघांच्या समजुती उराशीं धरून बसणारे नाहीं आहां—स्वतंत्र बाण्याचे आहां ! नुसत्या बोभाट्यानं तुम्ही भिणार नाहीं, म्हणून तुमच्याशीं बोलण्याचा मी धीर करतों. या तुमच्या दुःखाचा थोडा तरी विसर पडावा अशी तुमची इच्छा असेल तर त्याला इलाज आहे ! तुम्ही रागावणार नाहीं ? सांगूं मी तो इलाज ?

सुधाकर : सांग, काय वाटेल तो इलाज सांग !

तळिराम : तुम्हीं थोडी दारू घेऊन स्वस्थ पडून राहा.

सुधाकर : काय दारू ? तळिराम—

तळिराम : हो दारूचं ! इतकं दचकण्या कांहीं कारण नाहीं ! व्यसन म्हणून दारू अति भयंकर आणि निंद्य आहे हें मलाही कबूल आहे. पण आपणाला ती केवळ औषधाकरतां म्हणून घ्यायची आहे आणि तीसुद्धां अगदीं किती अगदीं थोडी ! एवढीशी घेतल्यानें संवय लागेल अशी नादानपणाची धास्ती आपल्याला वाटायचं कांहीं कारण नाहीं.

सुधाकर : छेः छेः, संवय वगैरेचा बागुलबोवा मला मुळींच वाटत नाहीं ! लौकिक-दृष्ट्यासुद्धां माझं सर्वसाक्षी मन मला साक्ष देत राहील कीं, हें कांहीं मी चैनीखातर करीत नाहीं. सिंधू, रामलाल, यांची समजूत—जाऊं देत—जरा आराम खात्रीनं वाटेल ना ?

तळिराम : अगदीं खात्रीनं.

सुधाकर : मग आण–मी कांहीं अशा दुबळ्या मनाचा नाहीं कीं, मला तिची संवय लागेल. सर्वांची समजूत मला घालतां येईल, पण माझी स्वतःची समजूत मला मात्र या वेळीं घालतां येत नाहीं. चल, आण कुठं आहे ती ? या यमयातना घडीभर तरी विसरण्यासाठीं मी वाटेल तें करायला तयार आहें.

तळिराम : मी घेऊनच आलों आहें बरोबर—ही घ्या.

[ पेला भरूं लागतो. ]

सुधाकर : अरे, उगीच जास्त मात्र भरूं नकोस.

तळिराम : छे छे, अगदीं थोडी ! ही एवढीच–फक्त–एकच प्याला !

[ सुधाकर पिऊं लागतो. पडदा पडतो. ]

## अंक पहिला समाप्त

# अंक दुसरा

## प्रवेश पहिला

[ स्थळ : सुधाकराचें घर. पात्रें : सिंधू व सुधाकर. ]

सिंधू : वन्सं गेल्या आहेत भाईसाहेबांच्याकडे आणि मला एकटीला घरांत जरा करमेनासं होतं; म्हणून म्हणतें कीं, अगदीं गेलंच पाहिजे का आतां बाहेर ?

सुधाकर : अग, जरूरीचं काम असल्याखेरीज का मी असा तांतडीनं जात असेन ? मला गेलंच पाहिजे आतां! आणखी संध्याकाळीं माझी फराळासाठीं वाट पाहूं नका.

सिंधू : मी आल्या दिवसापासून पाहतें आहें, नेहमीं रात्रीं फराळाला बाहेर असायचं; एक दोन का तीनच वेळां काय तें फराळाला घरीं राहायचं झालं तेवढं ! विचारू मी एक ? फार दिवस माहेरीं राहिलें म्हणून रागबीग तर नाहींना आला ? तसं असेल तर पदर पसरून भीक मागतें.

( राग–मांड-जिल्हा; ताल–दादरा. चाल–कहां मानले० )

स्थिरवा मना । दयाघना । विनतिसि या माना ।
होई पात्र न रोषा दीना । हृदयीं करुणा आणा ॥ ध्रु० ॥
जाहला दोष मम करीं चुकुनि कांहीं । प्रेमला, क्षमा
तरि त्या करा । विनतिसि यां माना ॥ १ ॥

सुधाकर : अग, या सनदेच्या कामासाठीं खटपट करायची असते चारचौघांकडे जाऊन, तेव्हां हिंडावं लागतं असं सारखं ! कुणाच्या तरी घरीं फराळाचा होतोच आग्रह. काम सोडून फराळासाठीं घरीं तर उठून यायचं नाहीं ! रात्रीं दोन दोन वाजेपर्यंत बसावं लागतं आतांशा ! तेवढ्यावरून तुझा रागच मला आला आहे हें कसं ठरविलंस ?

सिंधू : (रडत) मग बोलणं जरा असं त्रासिकपणाचं होतं, बाळाचं सुद्धां कोड-कौतुक पुरविणं होत नाहीं!

सुधाकर : तुझ्याशीं बोलणं मोठं पंचायतीचं काम आहे बुवा! किती वेळां सांगूं कीं, माझं तुझ्यावर अगदीं पहिल्यासारखं प्रेम आहे म्हणून! बाळाचं कोड-कौतुक मी मनापासून—पण हें सांगायला तरी कशाला हवं! तुझं तुला दिसून येत नाहीं? बरं, आतां रडूं नकोस! उद्यां मुदत संपून सनद मिळायची आहे—म्हणजे काम संपलंच म्हणायचं. जातों मी आतां. उगीच कांहींतरी तर्कवितर्क चालवायचे--त्यांत स्वतःलाही त्रास आणि दुसऱ्यालाही त्रास! (स्वगत) रामलालनं तार करून एकदम बोलावून आणल्यामुळं हिला नसती काळजी वाटायला लागली आहे! हा रामलाल चांगला इंग्लंडला गेलेला. पण ही लढाई मध्येंच मुळावर आल्यामुळं तसाच परतून आला. त्यामुळं ही नसती विवंचना माझ्यामागं लागली आहे. हा असा लपंडावच किती दिवस चालू ठेवायचा? [ जातो. ]

सिंधू : देवा, आतां माझी सारी काळजी तुलाच!

( राग--तिलककामोद, ताल--एकताल. चाल--अब तो लाज० )

प्रणतनाथ! रक्षिं कान्त। करिं तदीय असुख शांत ॥ ध्रु० ॥
अशुभा ज्या योजी दैव। पतिलागीं, त्यां सदैव।
परिणवीं मंगलांत ॥ १ ॥

[ रामलाल व शरद् येतात. ]

सिंधू : हें बघितलंस भाई? आतांच जाणं झालं. रोजचंच सांगणं--कामासाठीं जायचं आहे आणि फराळासाठीं वाट पाहूं नका!

रामलाल : काय चमत्कार आहे कळत नाहीं! सनद तूर्त रद्द झालेली आहे. हा पैशाबियशाच्या अडचणींत नाहीं ना? हो, कदाचित् मानी स्वभावामुळं उघड करून नाहीं बोलायचा कुणाजवळ!

शरद् : छे:, ती अडचण मुळींच नाहीं. दादाची सनद गेली एवढं कळलं मात्र, त्या घटकेपासून वहिनींच्या वडिलांनीं, दादा नको नको म्हणून लिही, तरी मोकळ्या मुठीनं पैसे पाठवायला सुरुवात केली आहे.

सिंधू : नाहींरे भाई; पैशाची कसली अडचण? कांहीं तरी वेडंवाकडं आहे—माझं मनच मला सांगतं आहे! भाई, आतां कसंरे करायचं?

[ रडूं लागते. ]

रामलाल : ताई, सिंधूताई, हें काय असं वेड्यासारखं? तूं चांगली शहाणी—

धीराची–अन् हें असं करायचं ? धीर धर—

( राग–भीमपलासी; ताल–त्रिवट. चाल–बिरजमें धूम मचाई० )

सुचतुरे, धैर्य सदा सुखधाम । विपदिं महा सकल पुरवी काम ।। ध्रु० ।।

निजभजकांच्या विघ्नभंजनी । जणु दुसरें प्रभुनाम ।। १ ।।

मी एक दोन दिवसांत बारकाईनं चौकशी करून खरं काय आहे तें शोधून काढतों. जा, ही शरद् बाळाला बाहेरून घेऊन आली आहे, त्याला नेऊन नीट निजीव; हं डोळे पूस ! अगदीं हसून खेळून राहिलं पाहिजे–नाहीं तर आपण नाहीं पडायचे या कामांत ! कशाला कांहीं पत्ता नाहीं आणि उगीच रडत सुटणं म्हणजे काय झालं ! जा त्याला घेऊन.

सिंधू : भाई, भाई, तूं कांहीं म्हण पण—

( राग—जिल्हा मांड, ताल—कवाली. चाल–पिया मनसे० )

दयाछाया घे निवारुनीयां, प्रभु मजवरी कोपला ।। ध्रु० ।।

जीवनासि मम आधार गुरु जो । तोहि कसा अजि लोपला ।। १ ।।

रामलाल : शरद्, शरदे, जा बेटा. ताईची जरा समजूत घाल जा ! तिला उगीच रडूं देऊं नकोस ! [ शरद् जाते. रामलाल जाऊं लागतो. ]

[ गीता येते. ]

गीता : भाईसाहेब—

रामलाल : कोण ? गीता, नव्हे ? मला हांक मारली तुम्ही ?

गीता : हो ! अगदीं निलाजरेपणानं हांक मारली ! शरदिनीबाईप्रमाणं मलाही आपली मुलगीच म्हणा ! भाईसाहेब, बाईसाहेबांचं आतांचं बोलणं मीं ऐकलं आणि जीव कळवळून आला. अगदीं बोलल्याखेरीज राहवेना म्हणून आपली धावत आलें बघा दादासाहेब काय करतात, कुठं जातात, कुणाबरोबर जातात, सारं मला माहीत आहे.

रामलाल : असं ! काय–काय–काय करतात सांगा पाहूं ?

गीता : काय सांगायचं कपाळ ! आतांशा त्यांनीं प्यायला सुरुवात केली आहे– ( हळूच ) दारू प्यायला !

रामलाल : काय, दारू ? ( निःश्वास टाकून ) रघुवीर ! श्रीहरी !—गीताबाई, तुम्ही खात्रीनं म्हणतां ?

गीता : अहो, खात्री कसली ? डोळ्यांदेखतच्या गोष्टीसारखी ही गोष्ट मला माहीत आहे ! आमच्या घरांतल्यांनींच दादासाहेबांना—

रामलाल : थांबा, इथं नका बोलूं ! सिंधूनं एखादा शब्द ऐकला तर ती आपल्या

जिवाचा अनर्थापात करील! तुम्ही जरा बाहेर चला, अंमळ पलीकडे. सगळं माहीत असेल तें मला सांगा—चला. ( स्वगत ) अरेरे, चांडाळा दुर्दैवा काय केलंस हें ?

( राग–बिलावल. ताल–त्रिवट. चाल–सुमरन कर० )

वसुधातलरमणीयसुधाकर । व्यसनघनतिमिरिं बुडाविसि कैसा ? ॥ ध्रु० ॥
सृजुनि जया परमेश सुखातें । नाशुनि ह्या, तुजसि मोद नृशंसा ! ॥ १ ॥

[ जातो. पडदा पडतो. ]

## प्रवेश दुसरा

[ स्थळ : रस्ता. पात्रें : भगीरथ व रामलाल. ]

भगीरथ : ( स्वगत ) दारूपासून सुख नाहीं हें खरं; पण दुःखी जीवाला दारू सुखाचं स्वप्न तरी दाखविते खास! या पापपूर्ण संसारांत कधीं कधीं दुःखाचा अर्क वाटेल त्या रीतीनं कोळून प्यावा लागतो, हेंच खरं! संसार-संसार! परमेश्वरा! संसाराचा माझ्याइतका कडु अनुभव यापुढं कोणत्याही तरुणाच्या कपाळीं लिहून ठेवूं नकोस आणि ठेवायचाच असला तर त्या दुर्दैवी जीवाला आंतल्या आंत जाळण्यासाठीं दीर्घायुष्य तरी देऊं नकोस !

( राग–खमाज; ताल--त्रिवट. चाल--कनक मुख त्रिनुत० )

प्रणय जरि भंगला । तरि नर जगता मुकला ॥ ध्रु ० ॥
घोर निरयसम । त्यासि विकट जग ।
दीर्घ जीवित शापचि खर तयाला ॥ १ ॥

[ रामलाल येतो. ]

रामलाल : ( स्वगत ) यांच्याशीं एकदम बोलायला सुरुवात केली आणि गीतेनं सांगितलेलं खरं नसलं तर--नाहीं पण--तिचं म्हणणं हजार हिश्श्यांनीं खोटं नाहींच! बाकी हें बोलायचं ठरल्यावर त्याला याच्याइतका योग्य मनुष्य मात्र गीतेनं सांगितलेल्या पांचसातजणांपैकीं एकही नाहीं! शिवाय याची माझी थोडीशी ओळखही आहेच! ( उघड ) नमस्कार भगीरथ!

भगीरथ : ओहो! कोण? डॉक्टरसाहेब? या! डॉक्टरसाहेब, तुम्ही परत आलांत एवढं कळलं, पण परतण्याचं कारण नाहीं कळलं !

रामलाल : तुम्हांला माहीत असेलच कीं, प्रथम इंग्लंडात कांहीं दिवस काढून शेवटच्या परीक्षेसाठीं जर्मनींत जाण्याचा माझा विचार होता. पुढें ही लढाईची वावटळ सुरू झाली, तेव्हां नाइलाजाने जर्मनींत जाण्याचा बेत रद्द केला ! चार सहा महिने इंग्लंडांत काढले आणि आलों परत झालं.

भगीरथ : काय एक एक अडचणी असतात पाहा !

रामलाल : बरं, तें राहूं द्या तूर्त ! भगीरथ, मी तुमच्याकडे आलों आहें एका कामासाठीं. हवापाण्याची प्रस्तावना केल्यावांचून एकदम सरळपणानं आणि मोकळ्या मनानं बोलायचं आहे तें बोलूं का ?

भगीरथ : अगदीं खुशाल बोला !

रामलाल : पाहा, मग छपवाछपवी करूं लागाल ! नाहीं ना ? बरं तर मग, आज संध्याकाळीं आम्हांलाही तुमच्या मंडळांत दाखल करून घ्या ! हूं, चकित होऊं नका ! मला सर्व कांहीं ठाऊक आहे ! तशी मला एकट्याला जायलासुद्धां हरकत नाहीं; पण माहितगारामार्फत शिरकाव झालेला बरा ! माझे एक-दोन मित्रही आहेत त्यांत; पण संकोचामुळं कोणी कबूल व्हायचं नाहीं ! तेव्हां सर्वांचीं विमानं वर चढल्यावरच गांठी पडलेल्या बऱ्या !

भगीरथ : डॉक्टरसाहेब, तुम्ही या पंथांतले आहांत ? मला नाहीं खरं वाटत !

रामलाल : पूर्वी नव्हतों; पण परदेशगमन करून ही विद्या शिकून आलों झालं ! तिकडच्या थंड प्रदेशांत या मानगडीवांचून चालतच नाहीं. इथं आल्यापासून मोकळेपणानं घेण्याची जरा पंचाईत पडूं लागली आहे; तेव्हां हा मार्ग हुडकून काढला ! कराल्ना एवढं काम ?

भगीरथ : माझी कांहीं हरकत नाहीं; पण तिथला एकंदर प्रकार कितपत रुचेल तुम्हांला—

रामलाल : न रुचायला काय झालं ? अहो, हा चोरटेपणाचा तरी त्रास टळेल ना, मी म्हणतों !

भगीरथ : ठीक आहे, चला मग आतांच !

रामलाल : अगदीं सुरुवातीपासूनच नको ! मंडळी रंगांत आली म्हणजे गेलेलं बरं ! म्हणजे दुसऱ्याला संकोच नाहीं, आपल्यालाही संकोच नाहीं !

भगीरथ : तसंच करूं या ! पण डॉक्टर, ही कल्पना नव्हती मला ! थोड्या नवलाची गोष्ट आहे !

रामलाल : वा:, नवल माझ्याबद्दल कीं तुमच्याबद्दल अधिक ? तसं म्हटलं तर तुम्ही अगदीं तरुण, शिवाय पदवीधर–पण तुम्ही—

भगीरथ : मी दुर्दैवाची दिशाभूल होऊन या आडवाटेला लागलों आहें ! संसाराच्या सुरुवातीलाच माझा प्रेमभंग झालेला आहे. ज्या मुलीवर माझं प्रेम होतं, तिचं दुसऱ्याशीं लग्न लागलं आणि संसाराला रामराम ठोकून मी असा फकीर बनलों ! पण जाऊं द्या. त्या कुळकथा सांगायला आपल्याला पुढं पुष्कळ वेळ सांपडणार आहे. तूर्त आपल्या रस्त्याला लागूं या !

रामलाल : चला. [ दोघेही जातात.

[ पडदा पडतो. ]

## प्रवेश तिसरा

[ स्थळ : आर्यमदिरामंडळ. पात्रें : सुधाकर, तळीराम, भाऊसाहेब, बापूसाहेब, रावसाहेब, सोन्याबापू, मन्याबापू , जनूभाऊ. शास्त्री, खुदाबक्ष, मगनभाई, वगैरे वगैरे. हुसेन सर्वांना पेले भरून देत आहे, मंडळीचें खाणें चाललें आहे. ]

हुसेन : सुधाकरसाहेब–[ पेला पुढें करतो. ]

सुधाकर : हुसेन, मला नको आतां !

शास्त्री : वाः, सुधाकर, नको म्हणजे काय गोष्ट आहे ? घेतला पाहिजे !

सुधाकर : पण मला अगदीं आटोकाट बेताची झाली आहे ! आतां पुरे !

खुदाबक्ष : नाहीं सुधाकर, मंडळीचा बेरंग होतो आहे !

बापूसाहेब : घ्याहो, सुधाकर ! उद्यां तुमची सनद तुम्हांला परत मिळणार आणि आज तुम्हीं असं चोरटं काम चालविलं आहे ?

रावसाहेब : तुम्ही आम्हांला पाठच्या भावासारखे–आणखी आमचं सांगणं मोडायचं ? वाः, मग झालंच म्हणायचं.

सुधाकर : हं, आण बाबा तो पेला ! आतां मात्र हा शेवटचा हं !

[ पितो. ]

शास्त्री : अहो, आम्ही तुमचे खरे मित्र आणि आमच्याबाहेर वागतां तुम्ही ? आम्ही तुमच्या आयत्यावेळीं उपयोगीं पडलों ! आणि तुमचे दोस्त म्हणविणारे तुमची सनद गेल्यामुळं तुमची कुचेष्टा करायला लागले आणि सनद गेल्यामुळं तुम्हीं दारू पिण्याला सुरुवात केली म्हणून गांवभर तुमची निंदा करीत सुटले.

खुदाबक्ष : आतां उद्यां सनद सुरू होतांच त्यांना जबाब द्या !

सुधाकर : नुसता बजाब द्या ! भरकचेरींत खेटरानं एकेकाची पूजा करतों- पाजी लोक !

तळिराम : नाहीं, नाहीं. दादासाहेब, उद्यां त्या लोकांच्या नाकावर टिचून दारू पिऊनच कचेरींत हजर व्हा ! घ्या खबर गुलामांची !

सुधाकर : हो, मी दारू पिऊन कचेरींत जाऊं शकतों ! उद्यां दारू पिऊन कचेरींत जातों आणि घेतों हातांत पायांतला ! हिंमत आहे माझी !

जनूभाऊ : शाबास, जरूर दारू पिऊन जा !

रावसाहेब : तुम्ही आम्हांला पाठच्या भावासारखे — तुमच्या जिवासाठीं जीव देऊं ! दारू पिऊनच कचेरींत जा ! मग सनद कायमची रद्द झाली तरी हरकत नाहीं ! तुम्हांला वाटेल तितक्या आम्ही नोकऱ्या देऊं ! हें घ्या वचन ! तुम्हांला गरज पडेल त्या वेळीं तुम्हाला वाटेल तेवढी मोठी नोकरी लावून देण्याचं मी तुम्हाला वचन देतों ! भाऊसाहेब, गपूसाहेब. आपणही त्यांना वचन द्या !

[ सर्व सुधाकराला वचन देतात. ]

शास्त्री : सुधाकर, आतां माघार घ्यायची नाहीं !

सुधाकर : माघार घ्यायची मला हिंमत नाहीं ! मी आतां कचेरींत जायला तयार आहें !

खुदाबक्ष : बस्स, बस्स, शास्त्रीबुवा ! आतां असंच करायचं, कीं सर्वांनीं उद्यां कचेरीची वेळ होईपर्यंत असं सारखं पीत राहायचं आणि सुधाकराला तसाच कचेरींत पोहोंचवायचा !

शास्त्री पसंत आहे ही कल्पना !

तळिराम हुसेन, दादासाहेबांना दे एक प्याला आणखी !

हुसेन : हां जी साहेब ! [ पेला देतो ]

सुधाकर : आतां नको. मी बेशुद्ध होईन !

जनूभाऊ : आम्ही जिवाला जीव देऊं तुमच्यासाठीं ! आम्ही पण बेशुद्ध होऊं !

सुधाकर : नको, आतां नको आहे. मला हिंमत आहे— मी पिऊं शकतों !

तळिराम : दादासाहेब, आतां हा खास शेवटचा—हं, हा एकच प्याला !

[ सुधाकर पितो व झुंगत पडतो. सर्वांचे पेले तयार होतात. इतक्यांत रामलाल व भगीरथ एका बाजूनें येतात. ]

रामलाल : ( भगीरथास एकीकडे ) हं भगीरथ, थोडा वेळ इथं बाजूला उभे

राहूं , आणि मंडळी जरा रंगांत आली, कीं आपणही होऊं सामील !

भगीरथ : ( रामलालास एकीकडे ) आपल्याला यायला फार वेळ झाला आज !

मन्याबापू ( मोठ्यानें रडायला लागतो ) जनूभाऊ, अरे इकडे ये ! ( जनूभाऊच्या गळ्याला मिठी मारून मोठ्यानें रडायला लागतो. )

जनूभाऊ : अरे, रडतोस कां मन्याबापू असा !

मन्याबापू : मला जास्त चढली आहे !

जनूभाऊ : मग काय करूं म्हणतोस ?

मन्याबापू : मला आणखी पाज !

जनूभाऊ : हूं ही घे. ( मन्याबाप पितो व पुन्हा रडूं लागतो. ) अरे, आतां कां रडतोस ?

मन्याबापू : मला जास्त चढत नाहीं !

जनूभाऊ : मग मर ! ( जनूभाऊ स्वतः पितो. )

रामलाल : ( भगीरथास एकीकडे ) भगीरथ, पाहा या एकमेकांच्या लीला ! आश्चर्यानें माझ्याकडे पाहतां भगीरथ ? एका कार्यासाठीं मघाशीं तुमच्या-जवळ खोटं बोललों त्याची मला क्षमा करा. मी मद्यपी नाहीं ! माझ्या एका मित्राला—जो या शहराची केवळ शोभा—त्याला—सुधाकराला इथून परत नेण्यासाठीं म्हणून मी तुमच्याबरोबर आलों. तुमची फसवणूक केली याबद्दल मला क्षमा करा.

मन्याबापू : दारू ही खराब चीज आहे ! दारू ही भिकार वस्तु आहे. दारू ही वाईट गोष्ट आहे !

जनूभाऊ : मन्या ! काय बडबडतो आहेस हें !

मन्याबापू : मी चळवळ करतों आहें ! मद्यपाननिषेध करीत आहें.

जनूभाऊ : निषेध करूं नकोस ! मद्यपान कर !

मन्याबापू : दारू ही खराब चीज आहे, दारू हें मद्यपान आहे, दारू हा निषेध आहे, दारू ही चळवळ आहे !

जनूभाऊ : मन्या, मन्या, संभाळ. भडकत चाललास !

मन्याबापू : दारू—आहे ! दारू अशुद्ध आहे !

जनूभाऊ : तीर्थोदकं च वन्हिश्च नान्यतः शुद्धिमर्हतः ! वहातं पाणी किंवा अग्नि हीं जात्या शुद्ध असतात. दारूचा प्रचंड ओघ चारी खंडांत वाहतो आहे आणि तिच्या पोटीं आग आहे. दारू दुहेरी शुद्ध आहे. हें धर्मवचनावरून सिद्ध होत आहे !

मन्याबापू : दारू अधर्म आहे. दारू धर्मबाह्य आहे !

जनूभाऊ : मद्यपानाला प्रायश्चित्तही आहे ! रात्रीं दारू पिऊन सकाळीं ब्राह्मणाला एक काशाचं भांडं दानं केलं म्हणजे पाप राहात नाहीं ! आतां जर तोंड बंद केलं नाहींस, तर तुला प्रायश्चित्त भोगावं लागेल.

मन्याबापू : दारूमुळं आपआपसांत कलह माजतात–तंटे माजतात.

जनूभाऊ : मन्या ! नरडं दाबून जीव घेईन आतां. दारूमुळें जन्माचीं वैरं बंद होतात, दारूच्या दरबारांत आग आणखी पाणी सलोख्यानं संसार करतात.

मन्याबापू : दारूमुळं मनुष्य असंबद्ध बडबडूं लागतो !

जनूभाऊ : साफ खोटं आहे हें ! मी मद्यांपासून असंबद्ध बडबडतों आहें.

जनूभऊ : तूं मुळींच असंबद्ध बडबडत नाहींस.

मन्याबापू : मी खरं बडबडतो आहें. दारू वाईट आहे, असं मी बडबडतों आहें !

जनूभाऊ : मुळींच नाहीं ! दारू चांगली आहे, असं तूं म्हणतो आहेस. दारू वाईट आहे, असं कबूल करतोस कीं नाहीं बोल ?

मन्याबापू : नाहीं म्हणायचा तसं. दारू चांगली आहे !

शास्त्री : अरे, बोलण्याच्या गडबडींत तुम्हीं आपल्या बाजू बदलून लढतां आहांत !

जनूभाऊ : असं का ? ठीक आहे ! चल मन्या, पुन्हा आपापल्या बाजू घेऊन पहिल्यापासून लढूं !

[ एकमेकांच्या गळ्यांत मिठया मारून थोडा वेळ दोघेही रडतात. ]

रामलाल : भगीरथ, प्रेमभंगाचा ताप चुकविण्यासाठीं, या गोठणीवर येऊन तुम्ही विसावा घेतां ? [ सोन्याबापू रडूं लागतो. ]

खुदाबक्ष : कां सोन्याबापू, तुम्ही कां रडायला लागलांत ?

सोन्याबापू : दारूच्या सद्‌गुणांचं केवढं उदात्त चित्र हें ! अरेरे, याचा फायदा घेऊन पुरुषांप्रमाणंच आमच्या स्त्रीवर्गाला आपली उन्नति करून घेतां येत नाहीं, हें केवढं दुर्भाग्य आहे !

जनूभाऊ : सोन्याला कंठ फुटला वाटतं हा ! या सुधारकांना प्रत्येक बाबतींत बायकांचे देव्हारे माजविण्याची मोठी हौस ! कसलारे कपाळाचा स्त्रीवर्ग ? यामुळंच या सुधारकांची चीड येते !

सोन्याबापू : खुदाबक्ष, अबलांचा अन्याय होतो आहे ! तुम्ही अविंध आहांत ! यवन आहांत ! मुसल्मान आहांत ! स्त्रीजातीचा कांहीं अभिमान धरा !

खुदाबक्ष : बायकांना आत्मा नसतो !

जनूभाऊ : भले शाबास ! खांसाहेब, खाशी खोड मोडलीत ! बायकांचे चोचले

माजविल्यामुळं या सुधारकांचा सारखा वीट येत चालला आहे! खरं कीं नाहीं शास्त्रीबुवा?

**शास्त्री** : नाहीं, माझा सुधारकांच्यावर कटाक्ष या मुद्द्यावर नाहीं! सुधारणेच्य नांवाखालीं सुधारकांनीं जो सावळागोंधळ मांडला आहे, धर्माचा जो उच्छेद मांडला आहे, तो आम्हांला नको आहे! सुधारणेचं नांव सांगून उद्यां तुम्ही जर अपेयपान करूं लागलांत, अभक्ष्य भक्षण करू लागलांत, सुधारक म्हणून मांसाहार करूं लागलांत—खुदाबक्ष, आज मटण शिजलं आहे चांगलं नाहीं!– तुम्ही जर खाण्यापिण्याचा ताळ सोडूं लागलांत, तर तें आम्हां जुन्या लोकांना कधीं खपायचं नाहीं. मांसाहार आम्हांला कधीं खपायचा नाहीं–अरे हुसेन, आणखी आण मटण... थोडं. आगरकरांचा तिटकारा येतो तो या कारणानं! टिळकांबद्दल आम्हांला आदर वाटतो तो या कारणामुळं!

**सोन्याबापू** : मग टिळकांच्या गीतारहस्याबद्दल एवढी आरडाओरड कां माजली आहे ती?

[ शास्त्री बुचकळ्यांत पडतो. ]

**खुदाबक्ष** : मी सांगतों त्याचं कारण. एरव्हीं टिळकांच्याबद्दल आम्हांला आदर आहे; पण गीतारहस्यांत टिळकांनीं श्रीमत् शंकराचार्यांना छेडलं आहे. त्यांनीं आर्यधर्माच्या ऐन गळ्याला हात घातला आहे! सनातनधर्माची ही हानि आहे, म्हणून--

**शास्त्री** : भले शाबास ( त्याच्या गळ्याला मिठी मारतो. ) खुदाबक्ष, आज तूं सनातन आर्यधर्माची बाजू राखलीस! आज मी मुसलमान झालों! अरे, कोणी शेंडी उपटून ती हनवटीखालीं चिकटवून मला दाढीदीक्षित करा! खुदाबक्ष, आज आपण पगडभाई झालों!

[ पगड्यांची अदलाबदल करूं लागतात. ]

**रामलाल** : अरेरे, भगीरथ, संस्कारानें पवित्र मानलेल्या आपापल्या धर्मासाठीं पूर्वींच्या हिंदु-मुसल्मानांचं वैरसुद्धां या नरपशूंच्या स्नेहापेक्षां जास्त आनंद-दायक वाटतं. कुठं पवित्र योग्यतेचा गीतारहस्य ग्रंथ, कुठं श्रीशंकराचार्य, कुठं सनातनधर्म आणि कुठं हे रौरवांतले कीटक! आगरकर आणखी टिळक या महात्म्यांचा परस्परविरोध म्हणजे आकाशांतल्या नक्षत्रांच्या शर्यती! तुमच्याआमच्यासारख्या पामरांनीं भूलोकावरूनच त्यांच्याकडे पाहावं, आणखी त्यांच्या तेजानं आपला मार्ग शोधून काढावा! शुचिर्भूत ब्राह्मणांनासुद्धां संध्येच्या चोवीस नांवांबरोबरच टिळक-आगरकर यांचीं नांवं भरतीला घालवीं, भगीरथ पाहा या कंगालांचा किळसवाणा प्रकार! भगीरथ, भगीरथ, पुरे झाला

हा प्रसंग !

भगीरथ : रोज सुरुवातीपासून यांच्याबरोबर पीत गेल्यामुळं हा सर्वस्वीं निंद्य प्रकार माझ्या कधींही लक्षांत आला नाहीं.

रामलाल : भगीरथ, पाहा या प्रेतांच्याकडे ! यांच्याबरोबर तुम्हीं दारू पिऊन बसतां ? हतभागी महाभागा, तूं ताज्या रक्ताचा तरुण आहेस, तीव्र बुद्धीचा आहेस, थोर अंतःकरणाचा आहेस, रोमारोमांत जिवंत आहेस आणि म्हणूनच तुझ्यासाठीं अंतरात्मा तळमळून मी बोलतों आहें. संसारांत प्रेमभंग झाला म्हणून तूं या दारूच्या व्यसनाकडे वळलास ? एकोणीसशें मैल लांबीचा आणि अठराशें मैल रुंदीचा, नाना प्रकारच्या आपदांनीं भरलेला, हजारों पीडांनीं हैराण झालेला, तुझा स्वदेश तेहतीस कोटी केविलवाण्या किंकाळ्यांनीं तुला हांका मारीत प्रेमभंगामुळं अनाठायीं पडलेलं जीवित सार्थर्दीं लावायला तुला दारूखेरीज दुसरा मार्गच सांपडला नाहीं का ? असल्या प्रेमभंगानं स्वार्थाच्या संसारांतून तुला मोकळं केल्याबद्दल, तुझ्या जन्मभूमीची अशा अवनतकालीं सेवा करायची तुला संधि दिल्याबद्दल भाग्यशाली भगीरथ, आनंदाच्या भरांत परमेश्वराचे आभार मानायच्या ऐवजीं तू वैतागानं दारू प्यायला लागलास, आणखी या नरपशूंच्याप्रमाणें पतित झालास ? पवित्र आणखी प्रियतम गोष्टींना संकटकालीं साहाय्य करण्याचं भाग्य पूर्वपुण्याई बळकट असल्याखेरीज प्राणिमात्रांना लाभत नाहीं. पतितांच्या उद्धारासाठीं, साधूंच्या परित्राणासाठीं वारंवार अवतार घेण्याचा मोह प्रत्यक्ष भगवंतालासुद्धां आवरत नाहीं. भगीरथ, दीन, हीन, पंगू, अनाथ, अशी ही आपली भारतमाता तुम्हां तरुणांच्या तोंडाकडे आशेनें पाहात आहे. पाणिग्रहणावांचून रिकामा असलेला तुझा हात—चुकलेल्या बाळा, जन्मदात्री स्त्रीजात गुलामगिरींत पडली आहे, लक्षावधि निरक्षर शूद्र ज्ञानप्राप्तीसाठीं तळमळत आहेत, साडेसहा कोटी माणसांसारखीं माणसं नुसत्या हस्तस्पर्शासाठी तळमळत आहेत, या बुडत्यां-पैकीं कोणाला तरी जाऊन हात दे---

(राग–अडाणा, ताल–त्रिवट, चाल–सुंदरी मोरी का.)

झणिं दे कर या दीनां । प्रेमजलातुर मृतशा दे जल तें या मीनां ।। ध्रु० ।।

वांछा तरी उपकारमधूच्या । या करि संतत पाना ।। १ ।।

भगीरथ : रामलाल, भगीरथाला पुनर्जन्म देणाऱ्या परमेश्वरा, मी अजाण आहें, रस्ता चुकलो आहें; यापुढं मला मार्गदर्शक व्हा. आजपासून हा भगीरथ भारतमातेचा दासानुदास झाला आहे.

शास्त्री : भगीरथ, काय गडबड आहे ? तळिराम, भगीरथाला दे ! ( ताळिराम पेला भरतो. )

भगीरथ : मित्रहो, माझ्याकरतां हे कष्ट घेऊं नका. आजपासून हा भगीरथ तुम्हांला आणि तुमच्या दारूला पारखा झाला.

तळिराम : भगीरथ, काय भलतंच मांडलं आहेस हें ? अरे मंडळीच्या आग्रहाखातर—फार नको फक्त एवढा एकच प्याला ! बस्स, एकच प्याला !

भगीरथ : ( पेला जमिनीवर पाडून ) एकच प्याला ! एकच प्याला !

## अंक दुसरा समाप्त

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

[ स्थळ–सुधाकराचें घर. पात्रें–सिंधू मुलाला गोकर्णानें दूध पाजीत आहे, जवळ शरद्. ]

सिंधू : हं काय हें असं ? दुधाशींसुद्धां दांडगाई अशी ? झालं, लाथाडलस गोकर्ण ! धरूं का चिमुकला कान एकदा ? थांब बाळ, गाणं म्हणून तुला घांस भरवतें हं ! ऐक नीट ! गडबड केलीस तर नाहीं म्हणायची बरं का ? आणखी घांसाबरोबर दुधाचा एकएक घोटही घ्यावा लागेल.

( चाल–विडा घ्या हो नारायणा. )

घांस घेरे तान्ह्या बाळा । गोविंदा गोपाळा ।
भरवी यशोदामाई । सांवळा नंदबाळ घेई ॥ ध्रु० ॥
घेई कोंडा-कणी त्रैलोक्याचा धणी ।
विदुरावरींचा । पहिलावहिला घांस ॥ १ ॥
पोहे मूठभरी । क्षीराब्धीच्या हरी ।
मैत्र सुदामजीचा । आला दुसरा घांस ॥ २ ॥
थाळी एक्या देठी । घ्यावी जगजेठी ।
द्रौपदीमाईचा । आला तिसरा घांस ॥ ३ ॥
उरल्या उष्टावळी । फळांच्या वनमाळी ।
शबरीभिल्लिणीचा । घ्या हो चवथा घांस ॥ ४ ॥
टाकू ओंवाळून । मुखचंद्रावरुन ।
गोविंदाव्रजाचा । उरलासुरला घांस ॥ ५ ॥

हं. चला, झालं बरं आतां ! झाली पुन्हा दांडगाईला सुरुवात ? वन्स, सांभाळा बाई तुमचं रत्न हें ! तुमचीं माणसंच भारी अचपळ ! नाहीं तर थांबा. हें बघा गीताबाई, बाळाला पाळण्यांत नेऊन निजवा बरं ! ( गीता येते )

हे, गीताबाईंना बघितल्याबरोबर लागला हंसायला! गीताबाईंच्याबरोबर भटकायला सांपडतांना इकडे तिकडे! (गीता मुलाला घेऊन जाते.) वन्सं, भाईला सकाळपासून दोनतीन बोलावणीं झालीं. येतो येतो म्हणून म्हणतो, अजून का बरं येईना? वन्सं, मला आपलं भलतंच स्वप्न पडायला लागलं आहे.

शरद् : वहिनी, तुम्ही उगीच काळजी करतां, झालं! कल्पनेला सुचतील त्या गोष्टी मनाला लावून घेत बसलं म्हणजे खाल्लेलं अन्नसुद्धां अंगीं लागायचं नाहीं.

(राग--भीमपलास, ताल-त्रिवट. चाल-रे बलमा बलमा ०)

छळिती या हृदया अदया। भ्रांत मनोरचना कालगुणा ॥ ध्रु० ॥

मातृजीवना शिजवुनि जगती। अंतीं घेति तयासह त्या निधना ॥ १ ॥

सिंधू : कांहीं म्हणा, कांहीं सांगा. माझ्या मनाचा आपला धीरच सुटल्यासारखा झाला आहे. भाईची तार मिळाल्या दिवसापासून उरांत धडकी बसून जिवाला काळजी लागली आहे–

(राग--काफी--जिल्हा, ताल--त्रिवट. चाल--इतना संदेश वा ०)

दहती बहु मना नाना कुशंका ॥ ध्रु० ॥
विपदा विकट घोर। निकटीं विलोकीं।
मन कं^र घेत। गणितें ना विवेका ॥ १ ॥

शरद् : पण अशी काळजी लावून घ्यायला तसं कांहीं झालं आहे का? नुसत्या तर्कानं तर्कच वाढवायचे का? सगळं जिथल्या तिथं आहे, मग उगीच कां असं आडरान घ्यायचं?

सिंधू : वन्सं, आपदा चंद्रासूर्यासारख्या वेळा सांगून का येत असतात. बरं व्हायचं तें जरातपानं होतं आणि वाईट मात्र झाल्यावर कळायला लागतं. फळ पिकण्यापूर्वी पाडानं रंगून जातं; पण पुरतेपणीं कुजल्याखेरीज त्याला कधीं घाण सुटली आहे का? एकेकांच्या गोष्टी ऐकल्या म्हणजे जिवाला अगदीं कसा चरका बसतो!

(राग–खमाज जिल्हा; ताल–पंजाबी; चाल–मैं तोसे नाहीं बोलेरे)

शंकाही नाहीं कालीं ज्या। दुर्गति जवें ये तदा ॥ ध्रु० ॥
धूर्त कपटी अरि। जैसा रण करी।
तोवें त्रिधा ही सदा ॥ १ ॥

शरद् : मन चिंती तें वैरी चिंतीना, तशांतलं चाललं आहे तुमचं! वहिनी हे पाहा भाईसाहेब आलेच! (रामलाल येतो.) भाईसाहेब, या पाहा, वहिनी

कशा एकसारख्या रडताहेत! त्यांना चार धीराच्या गोष्टी सांगून त्यांची समजूत करा पाहूं!

रामलाल : ( स्वगत ) काल रात्रीं पाहिलेला प्रकार सिंधूला आतां कोणत्या तोंडानें सांगूं? कितीही टाळाटाळ केली तरी हें मरण कांहीं मला टळत नाहीं!

सिंधू : भाई, कळलं नाहीं का तुला? कांहीं भिण्यासारखं नाहीं ना? असा मुकाट्यानं कां उभा आहेस? काय झालं? सांग लौकर मला!

रामलाल : ताई, अशी घाई करूं नकोस. लहान मुलं सांखळीचा एक खेळ खेळतात. तो तूं पाहिला आहेस ना? जसजसा खेळ वाढत जातो, तसतसा मुलाला मूल जोडून त्यांच्या सांखळीला जलदीची चाल करतां येत नाहीं. तसंच या संसाराचंही आहे. संसार वाढूं लागला म्हणजे अडचणींमागून अडचणी वाढून जबाबदारीमुळं मन जडावत जातं, आणि बालपणींचा चंचल-पणा टाकून देऊन मनुष्याला प्रत्येक बाबतींत धिम्या पावलानं चालावं लागतं.

सिंधू : भाई, असं कां बोलायला लागलास? माझ्या अदृष्टांत काय काय लिहिलं आहे, तें मला एकदम सांगून टाक.

रामलाल : सिंधूताई, उद्यां काय होणार आहे हें आज कळलं तर संसार नीरस होईल. म्हणून विधात्यानं प्राणिमात्राचं अदृष्ट डोळ्यांला न दिसणाऱ्या कपाळपट्टीवर लिहून ठेवलं आहे. सर्व विश्वाचा संहार ज्याला रुद्रशक्तीच्या जाणिवेनं करायचा आहे, त्या माहेश्वराला मात्र आपल्या ललाटींचा लेख वाचतां यावा, म्हणून कपाळावर असलेल्या तृतीय नेत्राचा लाभ झाला आहे. हा त्रिकालज्ञ तृतीय नेत्र आम्हां मर्त्य जीवांच्या कपाळीं नाहीं!

( राग–खमाज; ताल-पंजाबी; चाल-पिया तोरी० )

गमे सारी। शुभदा प्रभूची मज योजना ॥ ध्रु० ॥
हे मनुजा। जाणुनि तयाला।
गरल या न दिलें प्रभुनें ज्ञाना ॥ १ ॥

सिंधू : भाई, माझे प्राण आतां कंठाशीं आले आहेतरे! काय ऐकायचं असेल तें जितेपणीं मला ऐकून तरी घेऊं दे!

( राग-जिल्हा-पिलू; ताल-कवाली. चाल-कनैया खेले होरी० )

करि दया सांग वेगें। ससा ही पदीं लागे ॥ ध्रु० ॥
क्षण एक अतां। विलंबीं फुका जातां। दुर्बल हृदय हें भंगे ॥१॥

रामलाल : ताई, तुला काय सांगूं? आपल्या सुधाकराला एक व्यसन–एक फारच भयंकर व्यसन–( स्वगत ) निष्ठुर दैवा, काय सांगायचं हें माझ्या

कपाळीं आणलंस? दारू हा अमंगल शब्द या मंगलदेवतेपुढं मी कोणत्या तोंडानं उच्चारूं? व्यसनी चांडाळांनो, तुम्ही आपल्या जिवलग मित्रांना कसल्या संकटांत पाडतां, याची तुम्हांला कल्पना तरी आहे का? परमेश्वरा, दारूनं भिजलेला हा वाग्बाण हिच्या हृदयावर रोखण्यापेक्षां एखाद्या विषारी बाणानं हिचा एकदम हृदयभेद करण्याचं काम माझ्याकडे कां दिलं नाहींस? (उघड) सिंधू, सुधाकराला दारूचं व्यसन लागलं!

सिंधू : देवा, काय ऐकलं मीं हें?

[ बेभान पडूं लागते, शरद् व रामलाल तिला धरतात. ]

रामलाल : ताई, सिंधूताई, सावध हो!

सिंधू : भाई, भाई—— [ घाईघाईनें भगीरथ प्रवेश करतो. ]

भगीरथ : भाईसाहेब, अनर्थ झाला. सुधाकर मद्यपान करूनच कचेरींत गेला, वाटेल त्याला वाटेल तें बोलूं लागला व मुन्सफानं त्याची सनद कायमचीरद्द केली.

रामलाल : अनर्थांच्या परंपरेला आतां तुम्हीं तयार असलंच पाहिजे. ताई, सिंधूताई!— [ तळिराम सुधाकराला घेऊन येतो. ]

सुधाकर : काय रडारड आहे घरांत? सनद गेली म्हणून कोण रडतं आहे? नामर्द बायको आहे. तळिराम, एकेकाला लाथ मारून ही गर्दी मोडून टाक.

[ खालीं बसतो. ]

रामलाल : शरद्, तळिराम, सुधाकराला आंत नेऊन निजवा.

सुधाकर : सनद गेली तरी हरकत नाहीं. मी नामर्द नाहीं-हा रामलाल नामर्द आहे-सिंधू नामर्द आहे-सनद नामर्द आहे! [ ते त्याला घेऊन जातात. ]

रामलाल : ताई, अभागी मुली! चल. तुझं रडण्याचंसुद्धां समाधान येथून नाहींसं झालं (तिला जवळ घेऊन) बेटा, ही परमेश्वराची कृपा आहे. (तळिराम येतो) तळिराम, असाच्या असा चालता हो. इतःपर या घरांत पाऊल टाकशील तर खबरदार! सिंधूताई चल

(राग—ललत, ताल—त्रिवट. चाल—पिया पिया)

गमसि खरी हतभागिनी। जीवनमंगलहेतु तव जरी।
स्वकरिं लोटी तुज दुर्गतिदहनीं॥ ध्रु०॥
रोदन हेंचि जगीं हतभागां। विश्रांतिसि चित्तातें जागा।
तीरहि पति करी तव हृदंगा। मंदभाग्य तूं तुजसम भुवनीं

[ जातात.

प्रवेश दुसरा

[ स्थळ : तळिरामाचें घर. पात्रें : ताळिराम आणि गीता. ]

**तळिराम :** घरांत असेल तें सामान पुढं आण ! मंडळाची वर्गणी द्यायची आहे आज. काय जें असेल तें आण.

**गीता :** आणायला आहे काय घरांत कपाळ तुमचं ? झाडूनसारून घर स्वच्छ आरशासारखं करून ठेवलं आहे ! साऱ्या घरांत जिकडे पाहाल तिकडे तुमच्या रूपाची अवकळाच दिसेल.

**तळिराम :** खोटं बोलते आहेस तूं ! दागदागिना कांहीं कांहीं नाहीं अगदीं घरांत ?

**गीता :** अहो ! नाहीं, नाहीं, नाहीं ! आतां काय कपाळ फोडून घेऊं तुमच्यापुढं ?

**तळिराम :** पाहा, खोटं बोलूं नकोस. कांहीं नाहीं तुझ्याजवळ ?

**गीता :** हें एवढं कुंकूं कपाळावर तुमच्या नांवाचं बाकी राहिलं आहे. ( कुंकूं पुशीत ) हें एकदाचं घ्या–त्या कलालाच्या कपाळाला लावा, आणि घ्या शेवटचा घोट बायकोच्या आणखी संसाराच्या नांवानं ! म्हणजे तुम्ही सुटलांत आणि मी पण सुटलें !

**तळिराम :** काय बायकोची जात आहे पाहा ! गीते, माझी अमर्यादा होते आहे ही !

**गीता :** अहाहाहा ! मर्यादा ठेवायला काय गुणांचे दिग्विजयी लागून गेलांत ! स्वतःच्या संसाराचं वाटोळं केलंत, दुसऱ्याच्या संसाराचं वाटोळं केलंत ! घरांत चुलखंड थंडावलं आहे. तिथं माझीं हाडं लावूं कीं तुमचीं ?

**तळिराम :** काय बेमुर्वत बाजारबसवी आहे ! घेऊं का नरडं दाबून जीव ? मी दारू पितों म्हणून माझी अशी अमर्यादा करतेस ? थांब, अशी पालथी पाडून तुलाही दारू पाजतो. ! चल, दारू तरी पी, नाहीं तर घरांतून चालती तरी हो ! नाहीं तर जुन्या बाजारांत नेऊन लिलांव पुकारून आडगिऱ्हाइकाला फुंकून टाकीन !

**गीता :** हं ! तोंडाच्या गोष्टी असतील अगदीं ! वरूनच उतरले पाहिजेत तुमचे ! स्वतः खातेऱ्यांत लोळतां आहांत तें थोडं नाहीं का झालं ?

**तळिराम :** जातेस का पितेस ? दादासाहेबांच्या तिथं लावालावी करून मला त्यांच्या घरीं जायला बंदी करवलीस ? चल, घे हा दारूचा घोट का घेऊं नरडीचा घोट ? ( तिला धरतो. दोघांची झटापट होते, ती त्याला ढकलून देते. )

**गीता :** देवा, नकोरे नको या घरांत राहणं आतां ! [ जाते

तळिराम : बेहत्तर आहे गेलीस तर ! तुझ्या नांवानं आंघोळ करून मोकळा होईन ! आतां पुन्हा घरांत ये—जर उभी ठार केली नाही तर नांवाचा तळिरामच नव्हे. (जातो. पडदा पडतो.)

## प्रवेश तिसरा

[ स्थळ : रामलालचें घर. पात्रें : भगीरथ व शरद् ]

भगीरथ : अगदीं बरोबर आहे. हा लोकभ्रम निबंध, निबंधमालेंतील एक अत्युत्कृष्ट म्हणून मानलेला निबंध आहे. ऐक पुढं-- ( स्वगत ) वाचण्याच्या भरांत मी काय वाचतों आहे आणि कोणापुढं वाचतों आहें, याचं मला भानच नाहीं ! शास्त्रीबुवांचे कळकळीचे आणि प्रामाणिक हृदयाचे विधवांच्या स्थितीबद्दलचे हे करुणोद्गार मी वेड्यासारखा या बालविधवेपुढं वाचीत सुटलों आहें ! ( उघड ) शरद्, माईसाहेब परत येण्याची वेळ झाली. आज आपण फार वेळ वाचीत बसलों, नाहीं ? पुरें करावं नाहीं, मला वाटतं आतां ?

शरद् : ( किंचित् हंसून ) बरं, राहूं द्या आतां इतकंच आज.

भगीरथ : ( स्वगत ) हिनं हसून आम्हा पुरुषवर्गाचा चांगलाच उपहास केला म्हणायचा ! या चतुर आणखी प्रेमळ मुलीपुढं मनाचे डावपेंच मुळीं चालतच नाहींत ( उघड ) शरद्, तुझ्या हसण्याचा अर्थ मी समजलों. माझ्या मनांतले विचार तूं बरोबर ओळखलेस. शरद्, धर्मामुळं म्हण, रूढीमुळं म्हण, पुरुषांच्या स्वार्थबुद्धीमुळं म्हण, पण तुम्हां विधवांची हिंदु समाजांत मोठी विटंबना चालली आहे, असं कोणत्याही प्रामाणिक मनुष्याला कबूल करावं लागेल.

शरद् : भगीरथ, संसारहानीच्या दुःखाबरोबरच या अपशकुनासारख्या गोष्टींच्या अपमानाचंही तीव्र दुःख आम्हांला भोगावं लागतं—

( राग—बागेसरी; ताल—त्रिवट. चाल—गोरा गोरा मुख० )

मानभंग दाही । मृतशा हृदया ॥ ध्रु० ॥
दग्ध वल्ली जाळी चंचला अदया ॥ १ ॥
गतपतितांचें जीवन जगती वायां ॥ २ ॥

भगीरथ : अगदीं खरं आहे हें. आम्ही पुरुष विधवांच्या बाबतींत अगदीं विचारशून्य होऊन त्यांच्याबद्दलच्या वाटेल त्या गोष्टीवर विश्वास ठेवायला

तयार होतों, आणि तूं सांगितलेल्या त्यांच्या दुहेरी दुःखांत लोकनिंदेची आणखी भर घालतों. एखादी विधवा सदाचरणी आहे या अगदीं सहज रीतीनं शक्य असलेल्या गोष्टीवर विश्वास ठेवतांना आम्हांला आमच्यावर मोठं संकट पडल्यासारखं वाटतं. एखाद्या बालविधवेनं एखाद्याला नुसता रस्ता विचारला तर बघणाऱ्याला असंच वाटतं कीं, ती पापाचाच मार्ग विचारीत आहे! फार काय सांगावं, पाण्यांत बुडत असलेल्या बालविधवेला एखाद्यानं हात दिला तर तो तिला बाहेर काढण्याऐवजीं नरकांत ढकलीत आहे, इतकं मानण्याची आमच्या आर्य मनाची वृत्ति होऊन बसली आहे! आणि बालविधवांनीं जितेपणीं या नरकयातनांत तळमळत पडून आयुष्य कोणत्या सुखांत कंठीत राहावं म्हणून विचारलं, तर पोक्तबुद्धीचे हे धर्मसिंधू लागलीच गंभीरपणानं म्हणतील, कीं आप्तइष्टांचीं मुलं खेळवीत बसल्यानं विधवांना जें सात्त्विक समाधानं होतं, त्यापुढं वैधव्याच्या यातनांची काय प्रौढी आहे? असं जर असेल तर मी म्हणतों, या विवेकशाली महात्म्यांनीं, आपली द्रव्योपार्जनाची लालसा शेजाऱ्यांचे रुपये मोजून कां भागवूं नये? पोटाची खळी भागविण्यासाठीं पंचपक्वान्नांकडे धाव घेण्याचं सोडून परक्याच्या पोटांत चार घांस कोंबून आपलं समाधान हे कां करून घेत नाहींत?

( राग–काफी; ताल-त्रिवट; चाल-मारे नाटके प्रिया० )

सद्गुणां वधोनि हा ! । दंस विजय मिरवी महा ॥ ध्रु० ॥
मोहपाशभेदना । ज्यांसि अल्पही शक्ति ना ।
विरतींसि भोगी स्तविती । तेचि; काय विस्मय न हा ॥ १ ॥

शरद् : जाऊं द्या—भगीरथ, असल्या मनःक्षोभानं काय होणार? भगीरथ, आपला बरेच दिवसांचा परिचय आहे, म्हणून तुम्हांला मोकळ्या मनानं विचारते, आणि तेंसुद्धां अलीकडे दादाची स्थिति पाहून माझी आशा सुटत चालली आहे म्हणून विचारतें—या मद्यपानाचा मोह सुटणं शक्य असतं का?

भगीरथ : शरद्, या प्रश्नाचं अस्तिपक्षानं उत्तर देण्यासाठीं, स्वतः माझंच उदाहरण देतांना माझ्या मागच्या वर्तनामुळं जो मनाला ओशाळेपणा वाटतो, त्यापेक्षां आत्मस्तुतीच्या कल्पनेचा ओशाळेपणा जास्त वाटतो.

शरद् : तुम्हांला पुन्हा कधींही—संकोच कशाला ठेवूं?—मद्यपानाची पुन्हा आठवणसुद्धां झाली नाहीं?

भगीरथ : अगदीं चुकूनसुद्धां नाहीं! आणि होणार तरी केव्हा? हल्लीं माझा काळ इतका सुखांत जातो आहे—एकीकडे माईसाहेबांच्या सदुपदेशाचा दिन-

प्रकाश आणि एकीकडे तुझ्या सहवासाची शीतल चंद्रिका—

शरद् : शीतल चंद्रिका म्हणजे ? [ भगीरथ खालीं पाहतो. ]

भगीरथ : बोलण्याच्या भरांत मी एखादा शब्द—

शरद् : खरं बोलण्याची प्रतिज्ञेवर शपथ घेऊन माझ्यापुढं तुम्ही आरोपीच्या पिंजऱ्यांत उभे नाहीं आहांत ! मींसुद्धां सहज विचारलं, रागानं नव्हे—

[ रामलाल येतो. ]

रामलाल : शरद्, आतांशा दोनतीन दिवस सुधाकरानं तुमच्या घरांत मद्यपानाचा अड्डा घातला आहे, हें तूं मला सांगितलं नाहींस ? आतां गीता मला भेटली तिनं मला हा प्रकार सांगितला. याबद्दल सुधाकराजवळ गोष्ट काढायला मी गेलों, पण माझ्या सांगण्याचा कांहींएक परिणाम झाला नाहीं. भगीरथ, पद्माकराला आणि बाबासाहेबांना आतांच्या आतां एक तार कर कीं असाल तसे निघून या म्हणून. त्यांच्या सांगण्याचा तरी सुधाकरावर कांहीं परिणाम होऊन या भयंकर प्रकाराला आळा बसतो कीं काय, एवढीच आशा आतां उरली आहे. आणखी शरद् , याच पावलीं तूं घरीं जा आणि गीता तुमच्या घरीं गेली आहे, तिला आपल्या घरीं ठेवून घे ! तळिरामानं आपल्या घरांतून तिला हांकलून दिली आहे. तुमच्या इथं तिला राहायचं नसेल तर माझ्याकडे पाठवून दे ! जा बरं लवकर, ती बिचारी गरीब उगीच विवंचनेंत पडली असेल.

शरद् : हो, ही मी निघालेंच. [ जाते. ]

भगीरथ : तार आतांच करून येऊं का ?

रामलाल : इतकी कांहीं घाई नाहीं. आणखी थोड्या वेळानं केलीस तरी चालेल.

भगीरथ : मग भाईसाहेब, तितक्या वेळांत कालचा विषय पुरा करून टाकानात ? काल आपलं बोलणं मध्यंतरींच थांबलं. तेव्हांपासून माझ्या मनाला सारखी उत्कंठा लागून राहिली आहे. लोककल्याणाचा मार्ग कोणता तें सांगितलं नाहींत—

रामलाल : भगीरथ, लोककल्याणाचा एकच राजमार्ग म्हणून दाखविण्याइतकं हिंदुस्थानचं भावी सौख्य आज एकदेशीय नाहीं. एकीकडे राजकीय सुधारणा आहेत, एकीकडे सामाजिक सुधारणा आहेत. इकडे धर्म आहे, इकडे उद्योग आहे, इकडे शिक्षण आहे. इकडे स्त्रियांचा प्रश्न आहे. इकडे अस्पृश्यांची बाबत आहे, तर तिकडे जातिभेदाचा गोंधळ आहे. अशा या चमत्कारिक प्रसंगीं अमूक एकच मार्ग इतरांच्यापेक्षां चांगला आहे, असं सांगणं मोठं धाडसाचं आहे. परिस्थितीच्या अनुभवाप्रमाणं या विषयावर ज्याचे त्याचे विचार

अगदीं निरनिराळे झालेले आहेत. हजारों वर्षांच्या ओझ्याखालीं तेहतीस कोटी जीवांच्या जडपणानं खालावत चाललेल्या आमच्या भरतभूमीला उचलून धरण्यासाठीं जितक्या भिन्नभिन्न प्रकृतींच्या मूर्ति आम्हांला लाभतील तितक्या हव्याच आहेत. लोकहितांत पडूं पाहणाऱ्या विद्यार्थ्याला कायावाचामनसा आधीं हा धडा हस्तगत—नाहीं; अगदीं जिवाशीं—नेऊन भिडविला पाहिजे. आपल्याहून भिन्न रीतीनं लोकहिताचा प्रयत्न कोणी करीत असलं तर त्याच्याबद्दल सहानुभूति न दाखविणं, दुसऱ्याच्या प्रयत्नाबद्दल अनादर दाखविणं, देशहिताच्या बुद्धींतच स्पर्धा वाढवून एकमेकांना खालीं पाडणं, या कारणामुळं आज आमची जितकी अवनति होत आहे, तितकी दुसऱ्या कोणत्याहि कारणामुळं होत नसेल. भगीरथ, मी लोकोत्तरबुद्धीचा एखादा महात्मा नाहीं; पण शक्य तितक्या शांतपणानं आणि समतोल मनानं सरळ गोष्टी पाहात असल्यामुळं माझे विचार असे होऊं लागले आहेत. राजकीय सुधारणेचे पुरस्कर्ते आपल्या मार्गानं जातांना विधवांच्या दुबळ्या हृदयाच्या पायधळ्या तुडवीत जायला मागंपुढं पाहात नाहींत, केवळ सामाजिक सुधारणेचे पुरस्कर्ते विधवांच्या कपाळीं कुंकूं लावण्यांतच इतके रंगून गेलेले आहेत कीं, आपल्या भारतमातेच्या वैधव्याचा त्यांना विचारच करतां येत नाहीं ! आर्यधर्माचा भलता अभिमान धरणारे, आर्यधर्माची विजयपताका अधिकाधिक उंच दिसावी म्हणून धर्माभिमानाच्या भरांत तिच्या उभारणीसाठीं सहा कोटी महारामांगांच्या हाडांच्या सांगाड्यांची योजना करीत आहेत. नामशूद्रांचे आणि अतिशूद्रांचे वाली म्हणविणारे त्या वर्गाला उच्चपदीं नेण्याऐवजीं बिचाऱ्या ब्राह्मणवर्गाला रसातळीं गाडण्याचा अधम प्रयत्न करीत आहेत. व्यक्ति तितक्या प्रकृति, प्रकृति तितकीं मतं, आणखी मतं तितके मार्ग, असा प्रकार होऊन आज जबाबदार, आणि बेजबाबदार लोकांना सर्वांनाच बारा वाटा मोकळ्या होऊन बसल्या आहेत. "त्रिसप्तकोटिकंठकृतनिनादकराले जननि," इतक्या हांकाआरोळ्यांच्या कल्लोळांत तुझ्या नेमक्या हिताचा संदेश आम्हां पामर बाळांना कसा ऐकूं जाणार ? भगीरथ, व्यापक लोकशिक्षण, सार्वजनिक लोकशिक्षण हा तरी सध्यां असा एक मार्ग दिसतो आहे कीं, जो एकटाच आम्हांला आत्यंतिक हिताला नेऊन पोंचविणारा नसला, तरी इतर सर्व मार्गांवर आपला प्रकाश पाडणारा आहे खास. भगीरथ आर्यावर्ताच्या उदयोन्मुख भाग्याचा अचूक मार्ग सांगणारा मंत्रद्रष्टा महात्मा अजून अवतरावयाचा आहे. मनुष्यस्वभावाला शोभणाऱ्या आतुर आशेनं त्याच्या

आगमनाची वाट पाहात बसणं हेंच आज तुझ्या माझ्यासारख्या पतितांचं कर्तव्य आहे. सर्वच मार्ग स्वच्छ करून ठेवले म्हणजे त्या महात्म्याचा यांपैकीं वाटेल त्या मार्गानं होणारा प्रवास तितका तरी सुखकर होईल. भगीरथ, आज आपल्याला आपली खासगी कामं बरींच पडलीं आहेत. आणखी तीं जरुरीचीं आहेत. पुढं केव्हां तरी या सार्वजनिक शिक्षणाचा माझ्या दृष्टीनं जो व्यापकतम प्रयत्न वाटतो तो तुला यथाशक्त्या सांगेन. चल भगीरथ, सध्यां आपलं दुर्दैव सुधाकराच्या व्यसनाशीं संलग्न झालं आहे. मी लिहून देतों तेवढी तार पद्माकराला पाठीव. चल लवकर !

## प्रवेश चवथा

[ स्थळ : सुधाकराचें घर. पात्रें : तळिराम, सुधाकर, सिंधू, शरद. ]

तळिराम : असं आम्हीं बोलूं नये; पण दादासाहेब, आतां बोलायची वेळ आली ! अहो, या घरांत तुमची काय किंमत आहे ? तुम्ही कोण आहां ? अहो दादासाहेब—

सुधाकर : तळिराम, तूं मला अजून दादासाहेब म्हणतोस ? दोस्त, मी तुझा साहेब का ? अशा परकेपणानं मला कां हांका मारतोस ? मला सुधाकर म्हण – दादासाहेब म्हणूं नकोस – सुधा म्हण—

तळिराम : दादासाहेब, तुम्हांला सुधा म्हणणारीं माणसं निराळीं आहेत. आम्ही काय दरिद्री माणसं ! फार झालं तर तुमच्या जिवाला जीव देऊं एवढंच ! आम्हीं काय तुम्हांला सुधा म्हणावं ? तुमची लायकी आम्हांला कळते. तुम्हांला सुधा म्हणणारे थोर लोक निराळे आहेत.

सुधाकर : कोण आहेत ते थोर लोक ? मला सुधा म्हणणारा कोण आहे ? माझ्या घरांत मला अरेतुरे ? प्रत्यक्ष माझ्या घरांत ?

तळिराम : तुमचं घर ? दादासाहेब, हें घर तुमचं नाहीं. हें घर रामलालचं आहे !

सुधाकर : रामलालची काय किंमत आहे ?

तळिराम : किंमत आहे, म्हणून तर त्यानं मला घरांत यायची बंदी केली. आम्ही तुमचे जिवाचे दोस्त – आम्हांला घरांत यायची बंदी ! रामलालनं बंदी केली मला !

सुधाकर : मी रामलाल्ला बंदी करतों. घरांत पाऊल टाकूं नकोस म्हणून सांगतों. घर माझं आहे!

तळिराम : तुमचं ऐकतो कोण ? बाईसाहेब त्यांना अनुकूल, शरदिनीबाई त्यांना अनुकूल! सगळ्यांनीं संगनमत करून आज पद्माकराला तार केली आहे. तो येऊन तुमचा बंदोबस्त करणार! आतां आम्हांला धक्का मारून घराबाहेर घालविणार!

सुधाकर : सगळे पाजी, चोर, हरामखोर लोक आहेत! येऊं दे, पद्माकर येऊं दे, नाहीं तर त्याचा बाप येऊं दे! पद्माकर, त्याचा बाप, रामलाल, शरद्, सिंधू – एकेकाला लाथ मारून हांकलून देतों घराबाहेर!

तळिराम : ते लोक बरे जातील बाहेर ? पद्माकर तर आतां खर्च चालवितो तुमचा! तो कसा जाईल ? घर त्याचं आहे. पैसा त्याचा आणि घरहि त्याचं!

सुधाकर : मला कुणाची कवडी नको आहे! मी लाथ मारीन तिथं पाणी काढीन! मला कुणाचा पैसा नको आहे! मला थोडीशी दारू पाहिजे! आण थोडीशी!

तळिराम : या घरांत तुम्हांला घेतांना पाहिलं तर बाईसाहेब काय म्हणतील मला ?

सुधाकर : काढ पेला! सिंधूच्या, शरद्च्या देखत भरून दे! कुणी एक अक्षर बोललं तर पाहतों! सिंधू, शरद्, सिंधू, चलाव! सगळे इकडे या – चलाव! सिंधू, शरद्! तळिराम, भर पेला!

[ सिंधू व शरद येतात; तळिराम पेला भरूं लागतो. ]

सिंधू : तळिराम, तळिराम, काय करतां हें ?

सुधाकर : एक अक्षर बोलूं नकोस! मुकाट्यानं दोघी उभ्या राहा आणखी पाहा! तळिराम, आण इकडे तो पेला!

शरद् : तळिराम, तूं अगदीं नरपशू आहेस! दोन्ही डोळ्यांची भीडमुरवत लाजलज्जा कांहींतरी आहे का तुला ?

( राग–सोहनी; ताल–त्रिवट. चाल–काहे अब तुम० )

दुष्टमति सर्पा सदर्पा, कालकूटा वमसि भुवनासि अखिलाही तयें जाळितोसि ॥ध्रु०॥
पितृमातृरुधिरिं तृषित गमसि अति । कृतान्तासि भय निकट बघुनि तुजसि ॥१॥

तळिराम : दादासाहेब, तुमच्या बायका आम्हांला शिव्या देतात; ऐका! [ पितो. ]

सुधाकर : सिंधु, शरद्, लाथ मारीन एकेकीला!

तळिराम : माझ्या बायकोच्या गळ्यांतलं मीं मंगळसूत्रसुद्धां तोडलं! पण दादासाहेब, तुमच्या बायकांनीं आम्हांला खेटरं दिलीं, शिव्या दिल्या!

बायकोच्या गळ्यांतलं मंगळसूत्र तोडणारा मर्द मी !—

सुधाकर : सिंधूच्या गळ्यांतलं मंगळसूत्र तोड! ऊठ तळिराम, माझी तुला शपथ आहे! तूं माझा दोस्त आहेस! जिवाचा कलिजा आहेस! माझा भाऊ आहेस! बाप आहेस! माझा देव आहेस! ऊठ, सिंधूच्या गळ्यांतलं मंगळसूत्र तोड! शरद्च्या गळ्यांतलं असेल तें तोड! ऊठ, मंगळसूत्र तोड आणि मग माझं जानवंहि तोड!

[ तळिराम उठतो आणि सिंधू व शरद् यांच्याजवळ येऊन मंगळसूत्र ओढूं लागतो. ]

शरद् : दादा, दादा, काय हा अविचार? अरे, हें तूं—

सिंधू : देवा, भाई—

सुधाकर : हं, खबरदार, हलूं नका जागच्या; नाहींतर मान कापीन! भाईचं नांव घ्यायचं नाहीं! हलूं नका—तळिराम, बघतोस काय? तोड मंगळसूत्र!

[ तळिराम मंगळसूत्राला हात लावतो, तोंच रामलाल, पद्माकर व बाबासाहेब येतात. पद्माकर तळिरामाला लाथेनें उडवितो. तळिराम रडूं लागतो व पिऊं लागतो. ]

तळिराम : दादासाहेब, आम्हांला लाथ मारली! पद्माकरानं लाथ मारली! रामलाल आहे! आम्ही पीत बसतों!

पद्माकर : बेशरम, निर्लज्ज जनावरा, तुला उभा चिरून टाकतों!

रामलाल : सिंधूताई, हा तळिराम कसा आला घरांत?

सुधाकर : तूं कसा आलास घरांत? चल, माझ्या घरांतून चालता हो! पद्माकर, तूं पण चालता हो! त्या थेरड्याला एक लाथ मार! चले जाव! तळिराम, लगाव लाथ एकेकाला! पाजी लोक!

पद्माकर : दादासाहेब, आपण हें मांडलं आहे तरी काय?

सुधाकर : चल जाव! पद्माकर, रामलाल, आधीं तूं नीघ! सिंधूशीं संगनमत करतो माझ्या घरांत?

तळिराम : तुमची सनद गेली त्या वेळीं यानं बाईसाहेबांना मिठी मारली!

पद्माकर : हरामखोर! जिव्हा छाटून टाकीन एक अक्षर बोललास तर!

तळिराम : दादासाहेब,—म्हणून यानं मला परत घरांत यायची बंदी केली?

सुधाकर : रामलाल, माझ्यासमोर उभा राहूं नकोस! पद्माकर, आधीं घरांतून बाहेर नीघ! ए थेरड्या, चलाव!

पद्माकर : छेः, छेः, हा तर बेताल अनर्थ आहे! भाई, चल, इथं उभं राहण्यांत अर्थ नाहीं! सिंधूताई, चल, याउप्पर तूं या घरांत राहणं योग्य नाहीं. हा शुद्ध नरकवास आहे!

तळिराम : दादासाहेब, पैसा बोलतो आहे हा!

सुधाकर : चल जाव, सिंधू, तूं पण चालती हो! शरद्, तूं पण जा! मला कोणाची जरूर नाहीं!

पद्माकर : ठीक आहे. ऊठ सिंधू, या घरांत पाणी प्यायलसुद्धां राहूं नकोस! चल.

सिंधू : दादा, या घरांतून कुठं जाऊं म्हणतोस?

पद्माकर : कुठंहि! या नरकाबाहेर अगदीं कुठंहि!

सिंधू : हा नरक? हे पाय जिथं आहेत तिथं नरक? दादा, अरे, तूं चांगला शहाणा ना? वेड्या, हे पाय जिथं असतील तिथंच माझा स्वर्ग, तिथंच माझं वैकुंठ, आणि तिथंच माझा कैलास!

(राग–पहाडी–गझल; ताल–धुमाळी. चाल–दिल बेकरार तूने० )

कशि या त्यजूं पदांला । मम सुभगशुभपदांला ।
वसे पाद्युग जिथें हें । मम स्वर्ग तेथ राहे ।
स्वर्लोकि चरण हे नसती । तरि मजसि निरयवसती ती ॥
नरकही घोर सहकान्ता । हो स्वर्ग मला आतां ॥ १ ॥

या पावलांविरहित मात्र मला देवादारींसुद्धां नरकवास घडेल! तुमच्या चौदाचौकड्यांच्या राज्यांत राहून रौरवाची राणी होण्यापेक्षां दुर्दैवाची दासी होऊन दुःखांत दिवस कंठीत मी या पायांजवळ अशी अष्टौप्रहर बसून राहीन.

[सुधाकराच्या पायांवर मस्तक ठेवते; तो तिला लाथ मारतो.]

सुधाकर : अशी लाथ मारून तुला झुगारून देईन!

पद्माकर : पाहा, ताई, पाहा! अजून तरी या पायांचा मोह सोड!

सिंधू : दादा, मोह कां सोडूं? हेच पाय माझ्या कपाळीं आहेत. अरे, देवानं पाठ·पुरविली तर ज्या पायांच्या आश्रयानं उभं राहायचं, त्या पायांनी झुगारून दिलं तर कुठं जायचं? ( सुधाकराला ) कां मला दूर लोटणं झालं? वैकुंठेश्वरा, माझ्या कपाळींच्या कुंकवासाठीं या पायधुळींत मला राहायला नको का? आपल्या पायांपासुन – दैवाच्या दैवतापासुन – या दीन दासीला दूर लोटूं नका!

( राग—पहाडी— जिल्हा; ताल केरवा. चाल—मान नाहीं सैय्यां० )

लोटुं नका कान्ता । अशी दुरी कान्ता ।
केंवि जगे दीना मीना । जलव्हिरहिता ॥ ध्रु० ॥
हेचि चरण माझें । जीवन जगतीं ।
मृतचि गणा मज हे दुरी होतां ॥ १ ॥

सुधाकर : सिंधू, तुला इथं राहायचं असेल तर या हरामखोरांचं नांवसुद्धां घेऊं नकोस ! या चोरांच्या घरांतला एक पैसादेखील माझ्या घरांत आणायचा नाहीं. असं असेल तर या घरांत राहा !

तळिराम : शाबास, दादासाहेब ! अशी शपथ घ्यायला लावा आणि मग या घरांत राहायला परवानगी द्या ! शपथ घ्यायला लावा !

सुधाकर : सिंधू, कबूल आहे तुला हें ? नुसत्या तुझ्या गंगायमुना मला नकोत !

तळिराम : नुसतं कबूल नाहीं ! दादासाहेब, वाहत्या गंगेंत हात धुऊन घ्या ! शपथ घ्यायला लावा – हॅम्लेटच्या बापासारखा तुम्हांला इशारा देतों आहें ! बाईसाहेब, शपथ घ्या !

सुधाकर : ( मोठ्याने ओरडून ) ' त्रस्त समंधा, शांत राहा ! ' सिंधू, आतांच्या आतां शपथ घे, नाहीं तर घरांतून चालती हो ! कोणाचा पैसा, कोणाचं कांहीं कांहीं घरांत आणायचं नाहीं !

सिंधू : आपल्या पायांवर हात ठेवून सांगतें, आजन्म हाल सोशीन, काबाडकष्ट करीन, पण दुसऱ्याच्या कष्टाची कवडी म्हणून या घरांत येऊं देणार नाहीं ! आपल्या दोघांच्या कष्टाविरहित सगळ्या जगांतील धनदौलत आजपासून मला शिवनिर्माल्य आहे !

( राग – काफी – जिल्हा; ताल – कवाली. चाल – कल मुझे कर० )

सत्य वदें वचनाला । नाथा । स्मरुनि पदांला या सुरविमलां ॥ ध्रु० ॥

वित्त पराजित मानिं विषसम । स्पर्शिन ना कधीं मी त्यालां ॥ १ ॥

बाबासाहेब : सिंधू, काय भलतीच शपथ घेतलीस ही ?

पद्माकर : ताई, तूं शुद्धीवर तरी आहेस का? या रौरवांत राबून, अन्नाला मोताद होऊन, याच्या शिव्याशापांत जळून उभ्या आयुष्याची राखरांगोळी का करायची आहे तुला ?

सिंधू : राखरांगोळी काय म्हणून ? माझ्या देवसाठीं जळून गेलें तर माझी राखरांगोळी होईल ? देवाकारणीं मातीची लंका जळाली, तिचंसुद्धां सोनं झालं ! मग मी तर माणसारखी माणूस आहें ! दादा, बाबा, तुम्हांला वेड तर लागलीं नाहींत ? सुखाच्या संसारांतसुद्धां चार दिवस माहेरीं राहायचं आम्हां बायकांच्या जिवावर येतं आणि तुम्ही मला आतां घर सोडायला सांगतां ? इकडची अशी अवस्था झालेली, घरांत हा प्रकार; आतां तर डोळ्यांत तेलवात घालून मला बसायला पाहिजे ! मला कांहीं वेडंवांकडं झालं असतं, तर इकडून मला टाकणं झालं असतं का ? माझ्याकरतां आकाशपाताळ एक करायचं झालं

नसतं का ? मग मला इकडच्या जिवासाठीं पडतील ते काबाडकष्ट उपसायला नकोत का ? आमच्या गरिबीसाठीं मोलमजुरी करायला नको का ?

पद्माकर : ताई, काबाडकष्ट उपसायचे आणि तेसुद्धां या महारवाड्यांत राहून ?

बाबासाहेब : सिंधू, ज्या ठिकाणीं तुला पोटापाण्याची पंचाईत पडावी, तिथं टाकून—

पद्माकर : ताई, तुला झालं तरी काय ? तूं काबाडकष्ट करणार ? कुबेराला कर्ज देण्याइतका धनंतर हा तुझा बाप, कोसळत्या आकाशाला थोपवून धरणारा मी तुझा डोंगराएवढा भाऊ ! – आणि तूं एखाद्या दिवाण्या दारूबाजासाठीं—

सिंधू : हां ! दादा, या घरांत, या पायांसमोर – माझ्यासमोर असं अमंगल मी तुला बोलूं देणार नाहीं ! पतिव्रतेच्या कानांची ही अमर्यादा आहे ! जा – बाप, भाऊ, माझं या जगांत कोणी नाहीं ! पतिव्रतेला नातीं नसतात. ती बापाची मुलगी नसते, भावाची बहीण नसते, मुलाची आई नसते ! देवाब्राह्मणांनीं दिलेल्या नवऱ्याची ती बायको असते ! बाबा, ज्या दिवशीं माझं लग्न झालं त्याच दिवशीं तुमची मुलगी तुमच्या घराला मेली आणि नव्या नांवानं मी या घरांत जन्माला आलें. मुलीच्या लग्नाचा समारंभ आई-बापांना सुखदायक वाटतो; पण मुलीचं लग्न म्हणजे तिची उत्तरक्रिया हें त्या बापड्यांच्या ध्यानींमनींसुद्धां येत नाहीं. बाबा, कन्यादानासाठीं इकडच्या हातावर तुम्हीं जें उदक सोडलंत, त्यानंच माझ्या माहेरच्या नांवाला तिलांजलि दिलीत !

सुधाकर : सिंधू, हे हरामखोर इथं कशाला उभे राहिले आहेत ? तुला राहायचं असेल तर या सगळ्यांना हांकलून दे !

सिंधू : दादा, बाबा, भाई, ऐकलंत ना हें ? माझ्याबद्दलची माया-ममता सोडून आल्या पावलीं आतां बाहेर चला ! वन्सं, हात जोडून, पदर पसरून तुमच्या-जवळ मात्र एवढं मागणं आहे कीं, तुम्ही मात्र आतां या घरांत राहूं नका. नाहीं म्हणूं नका – माझ्या गळ्याची शपथ आहे तुम्हांला ! तुम्हांला इकडल्या-प्रमाणंच आपला भाई आहे ! घरांत असा प्रकार सुरू झाल्यावर तुमच्या-सारख्यांना अब्रूनं दिवस निभावून नेणं मोठं कठीण आहे !

शरद् : वहिनी, माझ्या अब्रूचं बोलतेस आणि तुझ्या अब्रूचं मात्र—

सिंधू : या पायांच्या छायेंत असलें, म्हणजे माझ्या अब्रूला कळिकाळाचीसुद्धां भीति नाहीं.

सुधाकर : सिंधू, अजून – खोटी शपथ घेतलीस तूं

सिंधू : आतां जर कुणी इथं थांबाल तर माझ्या गळ्याची शपथ आहे ! पंच-प्राणांच्या परमेश्वरा, मीं खोटी शपथ घेतली नाहीं. सिंधूचा सगळ्या जगाशीं संबंध सुटला ! आपल्या दोघांच्या कष्टाविरहितची एक कपर्दिकादेखील घरांत आणीन तर आपल्या पायांचीच शपथ आहे—

( राग—पिलू ; ताल—केरवा. चाल—डगमग हाले० )

सकल जगाचा । संसृतीचा । पाश तोडीं क्षणिं ॥ ध्रु० ॥
पदिं या सारा । वसत पसारा । त्रिभुवन संसाराचा ।
मम साचा ॥ १ ॥

[ त्याच्या पायांवर डोकें ठेवते. ]

सुधाकर : तळिराम, भर आतां पेला राजरोस आणि दे मला !

तळिराम : आतां कुठं आहे शिल्लक ? ( ओतून ) हा एवढा एकच प्याला !

सुधाकर : किती का असेना ? पण सिंधूच्या देखत घेणार ! बस्स झाला तेवढा एकच प्याला ! [ पेला पिऊं लागतो. पडदा पडतो. ]

## अंक *तिसरा समाप्त*

# अंक चवथा

## प्रवेश पहिला

[ स्थळ : रामलालचा आश्रम. पात्रें : शरद् व रामलाल. ]

शरद् : इतका वेळ बसून भगीरथांनीं बहुतेक सर्वच सर्ग समजावून दिला; पण या श्लोकावर ते थांबले ! मग खरंच काम होतं, का श्लोक अडला म्हणून ते चालते झाले, कुणास कळे !

रामलाल : कोणता श्लोक ?

शरद् : हा, " मरणं प्रकृतिः शरीरिणाम्— "

रामलाल : वः, फारच रमणीय श्लोक ! काव्याच्या ऐन उत्कर्षात भगवान् कालिदासांनीं इथं तत्त्वज्ञानाचा परमावधि साधलेला आहे ! दशावतारांतला श्रीकृष्णाचा आठवा अवतार आणि रघुवंशांतला हा आठवा सर्ग, मला नेहमीं समानस्वरूपाचे वाटतात. त्या अवताराचा पूर्वार्ध राधाकृष्णांच्या लीलाविलासांनीं परिपूर्ण, तर उत्तरार्धात योगेश्वर कृष्ण गीतेसारखीं उपनिषदं गात आहेत ! इकडे या सर्गाच्या प्रारंभीं भौतिकभाग्याची समृद्धि असून पुढं करुणरसांत उतरून परमवैराग्यांत शेवट झालेला आहे. भारतवर्षीय राजर्षींच्या सात्त्विक संसाराचं संपूर्ण चित्र या एकाच सर्गात कविकुलगुरूनं रेखाटलं आहे ! ऐक, तुझ्या श्लोकाचा अर्थ—' मरणं प्रकृतिः शरीरिणाम् '—मरण हा सदेह प्राणिमात्राचा स्वभावधर्म आहे; ' विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः '—जिवंत राहणं हें सुज्ञ लोकांना अपवादरूप वाटतं ! ' क्षणमप्यवतिष्ठते श्वसन् ' – आणि म्हणून क्षणभरच जरी जीवित लाभलं, तरी ' यदि जन्तुर्न तु लाभवानसौ '– तो प्राणी भाग्यशाली नाहीं काय ? जीवमात्राचा जन्म केवळ एकरूप आहे; परंतु मरणाला हजार वाटा आहेत. एवढ्यासाठींच या संसाराला मृत्युलोक म्हणतात ! परिस्थितीकडे विचारपूर्वक पाहिलं तर मरणाच्या इतक्या हजारों कारणांतून

आपण क्षणमात्र तरी कसे वांचतों, याचं प्रत्येकाला मोठं आश्चर्य वाटेल! आणि म्हणून इथं म्हटलं आहे कीं, पदरांत पडलेल्या पळापळाबद्दल आनंद मानून भावी कालाकडे आपण उदासीन दृष्टीनंच पाहिलं पाहिजे!

शरद् : श्वासमात्रानं जगण्याचा जो क्षण लाभेल त्याबद्दल आनंद मानावा, हें कवीचं म्हणणं तुम्हांला खरं वाटत असेल कदाचित! पण भाईसाहेब, असे दुःखीकष्टी जीव या जगांत किती तरी सांपडतील, कीं ज्यांना शंभर वर्षांचं दीर्घायुष्यसुद्धां शापासारखं वाटेल!

रामलाल : (स्वगत) हिंदुसमाजांतल्या बालविधवेच्या या प्रश्नाला कालिदासाच्या बुद्धिमत्तेनंसुद्धां उत्तर देणं शक्य नाहीं! (उघड) शरद्, सुदृढ आणि उदार विचारशक्तीनं ज्या वेळीं समाज सर्व कार्य करीत होता आणि धीर-गंभीर नीतिमत्ता ज्या वेळीं क्षुद्रवृत्ति झालेली नव्हती, त्या काळाला कालिदासाची ही उक्ति समर्पक होती! त्या वेळीं जीविताचा प्रत्येक क्षण सुखमय होता! हाच सर्ग पाहा! किती रमणीय सुखाचं वर्णन आहे यांत! यांतलं इंदुमतीचं मरणसुद्धां मनोहर आहे! दिव्य सौंदर्यालाच मुक्ति देण्यासाठीं या आर्य कवीनं स्वर्गांतल्या पारिजात पुष्पासारख्या कोमल शस्त्राची योजना केली आहे आणि आज राक्षसी रूढीच्या आहारासाठीं असलीं नाजूक फुलं तापल्या तव्यावर परतून घेण्याची नीतिमत्ता निर्माण झाली आहे! शरद्, तुझ्यासारखी सुंदर बालिका वैधव्याच्या यातना भोगतांना पाहिली म्हणजे आर्यावर्ताच्या अवनत इतिहासाची दीन मूर्तीच आपल्यापुढं उभी आहे, असं वाटायला लागतं! सौंदर्य कोणत्याहि स्थितींत आपली नाजूक शोभा सोडीत नाहीं! सौंदर्याला वैधव्याचा अलंकारसुद्धां करुण शोभाच देतो! शरद्, पुनर्विवाहाबद्दल आम्ही तुला सर्वजण आग्रह करीत असतांहि (तिच्या पाठीवरून हात फिरवीत) बेटा, अजून तुला—(स्वगत) हिच्या अंगाचा स्पर्श होतांच माझ्या हातावर असा खरखरीत कांटा कां बरं उभा राहिला? हा अनुभव अगदीं नवीन — पण नको हा अनुभव! माझा हात सारखा थरथर कांपत आहे! (तिच्या पाठीवरून हात काढतो. शरद् रामलालाकडे पाहते.) अशा चमत्कारिक दृष्टीनं कां पाहतेस माझ्याकडे? बेटा, तुझ्या बापानं तुझ्या पाठीवर असा हात ठेवला नसता का?

शरद् : असा हात ठेवला असता; पण असा चपापून काढून घेतला नसता! भाईसाहेब, तुम्हांला तुमच्या मनांत विकल्प आल्यासारखं वाटलं! असं कांहीं-तरी भलतंच तुम्हांला वाटलं! भाईसाहेब, खरं सांगा. कांहीं तरी वेडंविद्रं

मनांत आलं ना ? बोला हो—

**रामलाल :** तुझ्याजवळ खोटं मीं अजून कधीं सांगितलं नाहीं; माझ्या मनांत वेडंवांकडं कांहींएक आलं नाहीं ! मनाला जरासं असं मात्र वाटलं —

**शरद् :** कीं, जसं बापाला मुलीच्या पाठीवरून हात फिरवितांना वाटत नाहीं, किंवा भावाला बहिणीच्या पाठीवरून हात फिरवितांना वाटत नाहीं !

**रामलाल :** शरद्, शरद्, असं तीव्र भाषण करूं नकोस.

( राग– मालकंस; ताल–झपताल. चाल–त्याग वाटे सुलभ० )

सोडिं नच मजवरी वचनखरतशरां ।
दग्ध करिसी तयें हाय ! मम अंतरा ॥ ध्रु० ॥
स्मृति काय पूर्विची । लोपली आजची ।
केविं तव मति रची । कल्पना भयकरा ॥ १ ॥

ईश्वरसाक्ष सांगतों कीं, भलती भावना माझ्या मनांत मुळींच भाली नाहीं ! कां कुणाला ठाऊक ? मला जरा – अगदीं नाहींच म्हणेनास – जरा चोरट्या-सारखं मात्र झालं !

**शरद् :** आतां माझ्यापासून कांहीं चोरून – स्वतःपासून कांहीं चोरून ठेवूं नका !

( राग–जीवनपुरी; ताल – त्रिवट. चाल – पिहरवा जागो रे० )

खर विषा दाहाया हृदया या कां वर्षितां ॥ ध्रु० ॥
जें स्रवत सुधा । वदन हें सदा । हलाहला तें वमतें आतां ॥ १ ॥

भाईसाहेब, होऊं नये तें झालं ! आज माझा आधार तुटला ! माझे बाबा वारले तेव्हांपासून दादांनीं मला संभाळली ! त्या दिवशीं दादानं—माझं नशीबच फुटलं हो ! तिथून तुम्हीं मला संभाळलं ! आज देवानं माझ्यावर अशी वेळ आणली ! भाईसाहेब, इतके दिवस या जगांत तुम्ही माझ्याजवळ बापासारखे उभे होतां ! तुमच्या जिवावर मी निर्भयपणानं वागत होतें ! आणखी आज असं—भाईसाहेब, बाबा वारले त्या वेळीं मला कळत नव्हतं म्हणून मी रडलें नाहीं ! तेवढ्यासाठीं आज देवानं तें संकट माझ्यावर पुन्हा आणून मला जाणतेपणानं रडायला लावलं ! आज मी पोरकी झालें !

( राग--बेहागडा; ताल--त्रिवट. चाल -- चरावत गुंय्यां० )

जगीं हतभागां । सुखि चिर असुख ॥ ध्रु० ॥
जनकें त्यजितां । लाधे दुसरा ।
ये विनाश त्या । मातें जधिं विधि विमुख ॥ १ ॥

रामलाल : शरद्, काय हें वेड्यासारखं करतेस? नुसता माझा हात—तुझ्या मानलेल्या बापाचा—तुझ्या अंगाला लागतांच—

शरद् : नाहीं हो! रामलाल, हा बापाचा हात नाहीं! मुलीला बापाचा हात अगदीं आईच्या हातासारखाच—जरासा रांकट—देवाच्या पाषाण-मूर्तीच्या हाताइतका रांकट असतो! तुमचा हात बापाचा हात नव्हता! हा पुरुषाचा हात होता! मुलीच्या दृष्टीला बाप पुरुषासारखा दिसत नाहीं; तर देवासारखा निर्विकार दिसतो! बापासमोर मुलगी मोकळेपणानं वागते! आज माझा तो मोकळेपणा नाहींसा झाला! आज माझे वडील मला अंतरले! आज तुम्ही माझ्यासमोर तरुण पुरुष म्हणून उभे आहांत आणि मी तुमच्या-समोर तरुण स्त्री म्हणून उभी आहें! स्त्रीनं पुरुषासमोर वागतांना सावध-गिरीनं राहायला पाहिजे. भाईसाहेब, आजपर्यंत तुमच्या जिवावर जगांतल्या पुरुषांत मी सुरक्षितवृत्तीनं वावरत आलें! आज माझा संभाळ करण्याची जबाबदारी माझ्यावर येऊन पडली! भाईसाहेब, मी आतां विश्वासानं कुणाच्या तोंडाकडे पाहूं हो!

रामलाल : काय? एवढ्यानंमुद्धां तुझा माझ्यावरचा विश्वास उडाला!

( राग—वसंत; ताल त्रिवट. चाल—जपिये नाम जाकोजी० )

गणिसि काय खल मातें, अलंकार केवळ कुजनांतें।
न विश्वासलव योग्य जयातें ॥ ध्रु० ॥
वद का स्मरसी चिरसहवासीं।
घडली कृति अनुचित या हातें।
जनकधर्म कधीं त्यजि काय सुते ॥ १ ॥

शरद् : एका क्षणांत उभ्या जन्माचा विश्वास उडाला! भाईसाहेब, बालकांच्या मनांत धास्ती बसायला वेळ लागत नाहीं! पदराच्या वाऱ्यानंसुद्धां बालकांचं हृदय हादरायला लागतं!

( राग—गरुडध्वनि; ताल—त्रिवट. चाल—परब्रह्ममो गु० )

ललनामना नच अघलवशंका अणुहि सहते कदा ॥ ध्रु० ॥
सृजनिं त्याच्या विधि तरल घे विमल प्रकृतिसी पुण्य परम ॥ १ ॥

भाईसाहेब, जातें मी आतां. माझ्यानं तुमच्यासमोर उभं राहवत नाहीं!

रामलाल : थांब शरद्, आण तो 'रघु' इकडे! त्यांतले चार श्लोक वाच म्हणजे झालेल्या प्रकाराबद्दल तुझ्या मनाला अंमळ विसर पडेल!

शरद् : आतां वाचणं नको, कांहीं नको! कांहीं केल्या माझ्या मनांतली भीति

मोडायची नाहीं! तुमच्याकडे पाहायचासुद्धां मला धीर होत नाहीं! जातें मी आतां! देवा, काय रे केलेंस हें (जाऊं लागते.) हें पाहा, भगीरथाच्या बरोबर मी दादाच्या घरीं एकदा—

रामलाल : भगीरथ कशाला? मीसुद्धां–तुझी तशी इच्छा असेल तर तुला घेऊन जाईन तिकडे. पण थांब. शरद्, तुला एक विनंती करायची आहे.

शरद् : काय? सांगा लवकर.

रामलाल : ही हकीकत कुणाजवळ-भगीरथाजवळसुद्धां-बोलणार नाहींस ना?

शरद् : नाहीं. भगीरथांना नाहीं का ऐकून वाईट वाटणार? [ जाते. ]

रामलाल : माझ्या मनाची काय स्थिति झाली ती माझी मलाच कळत नाहीं! काय भलतंच झालं हें! शरद्, मी खरोखरीच अपराधी आहें किंवा नाहीं, हें नीट समजून घेतल्यावांचून तूं विनाकारण दोष दिलास – पण तिनं दोष कां देऊं नये? माझं मन खरंच चलित झालं आहे कीं– छेः, मला कांहींच सुचेनासं झालं आहे! परमेश्वरा, माझा मार्ग मला नीटपणं दाखवायला तुझ्याखेरीज दुसरा कोण समर्थ आहे? [ जातो. ]

## प्रवेश दुसरा

[ स्थळ : सुधाकराचें घर. पात्रें : सिंधू कागदाच्या घड्या घालीत आहे, मागें सुधाकर उभा आहे. इतक्यांत गीता येते. ]

सिंधू : या गीताबाई, बसा अंमळ, एवढे चार कागद मोडायचे राहिले आहेत. जरा वेळ झाला तर चालेल ना?

गीता : सावकाश होऊं द्या! मी लागूं कागद मोडायला?

सिंधू : नको. गीताबाई, माझी शपथ आहे! अगदीं नको!

गीता : बाईसाहेब, कां बरं नको म्हणतां? नेहमीं तुमचं असंच! मी जरा हात लावूं लागलें म्हणजे मोडता घालतां लगलींच!

सिंधू : गीताबाई, तिकडच्या पायांवर हात ठेवून मीं शपथ घेतली आहे ना, कीं, दुसऱ्याची काडी म्हणून घरांत घेणार नाहीं अशी? दुसऱ्याचे कष्ट आम्हांला अगदीं वर्ज्य आहेत!

गीता : बाईसाहेब, काय म्हणूं मी तुम्हांला? तुम्हीं असे कष्ट करायचे आणि

आम्हीं घोंड्यासारखं जवळ बसून ही डोळेफोड करायची! माझ्या जिवाला काय वाटत असेल बरं ?

सिंधू : गीताबाई, आमच्यासाठीं तुम्ही थोडं का करतां आहांत ? उभा गांव पायांखालीं घालून छापखान्यांतून हें कागद मोडायचं काम घेऊन येतां, हे तुमचे थोडे का उपकार आहेत ? असं कोण कुणासाठीं खपत असतं ?

( राग–पहाडी–गज़ल; ताल–धुमाळी. चाल–दिलके तु हान० )

मज जन्म देइ माता । परि पोशिलें तुम्हीं ॥
निजकन्यका गणोनी । न कांहीं केलं कमी ॥ ध्रु० ॥
उपकार जे जहाले । हिमाद्रितुंगसे ।
शत जन्म घेउनी ते । फेडीन काय मी ॥ १ ॥
सदया मनासि ठेवा । अपुल्या असें सदा ।
उपकारबद्ध तनया । तुमचीं पदें नमी ॥ २ ॥

गीताबाई, असं काम रोज कुठून आणलंत म्हणजे किती तुमचे डोंगराएवढे उपकार होतील आमच्यावर.

गीता : तें पण समाधान मेल्या देवानं ठेवलं नाहीं ! आज काम आणण्यासाठीं सारा गांव हिंडलें; पण कुठल्याच कारखान्यांत काम मिळालं नाहीं ! त्यांचा म्हणे लढाईमुळें कागदाचा तुटवडा पडला आहे, अन् म्हणून कामच निघत नाहीं मुळीं !

सिंधू : आतां कसं बरं करायचं पुढं ?

गीता : त्याच विवंचनेंत मी पडलें आहें कालपासून ? कुठं कुठं काम म्हणून कसं तें नाहीं ! देव अगदीं अंतच बघायला बसला आहे जसा !

सिंधू : गीताबाई, आपलं दैव खोटं; देवाला काय बोल लावायचं तिथं ? बरं, छापखान्यांतलं नसूं दे मेलं! दुसरं कसलं काम नाहीं का मिळण्यासारखं कांहीं ?

गीता : दुसरं कसलं बरं काम पाहावं ?

सिंधू : कुठलं कां असेना, आपलं घरांतल्या घरांत होण्याजोगं कांहीं काढा म्हणजे झालं ! काय बरं बघाल ? हो गडे, दळण नाहीं का कुणाकडचं मिळायचं ? तें आपलं बरं, घरच्या घरीं करायला—

गीता : अगबाई, दळण ? बाईसाहेब, भलतंच काय सांगितलंत हें ?

सिंधू : त्यांत काय झालं एवढं चपापायला ? असा कां बघतां आहां ?

सुधाकर : (स्वगत) सिंधू , सिंधू , कोणत्या देवानं तुला बोलायला शिकवलं हें ?

गीता : मोलानं दळण्याचं काम का तुमच्यासारख्यांनीं करायचं ? नवकोट-

नारायण तुमचे वडील, लक्षुमीशीं सारीपाट खेळण्यांत तुमचा जन्म गेला; आणखी आतां हें काम करायचं ?

सिंधू : हं ! अर्ध्या डावावरून लक्ष्मी उठून गेली आणि आपल्या हातीं कवड्या राहिल्या ! आपला हातगुण, त्याला कोण काय करणार ? दोनप्रहर टळायला तर पाहिजे ? ज्यांचे ते बघायला समर्थ का नव्हते ? पण देवघरीं चोरी केलेली; त्यानं असं मनीं योजलं ! एरवीं हौस का होती कुणाला ?

(राग–जोगी-मांड, ताल–दीपचंदी, चाल–पियाके मिलनेकी०)

कुणासि निंदुं मी काय । प्राक्तनीं जरी ।
घडिघडि रोदन माझ्या लिहीत विधाता ॥ ध्रु० ॥
संचितभागा । मनुजा भोगाया । ना टळतें कधिं हाय ॥ १ ॥

गीता : अहो, दळायचं सोपं का आहे तें ? कुळवाड्यांच्या बायका चांगल्या धडधाकड, पण त्या देखील उरीं फुटतात. अन् तुमच्यानं अर्धपोटीं कसं व्हावं तें ?

सिंधू : अहो, उरापोटी करीन कसं तरी झालं ! अर्धपोटीं, नाहीं अगदीं रित्यापोटी कंबर कसून आला तो दिवस साजरा करायला हवा ना ? माझं ऐका तुम्ही. खुशाल कुठं दळण मिळालं तर घेऊन या ! अहो, दुसऱ्यासाठीं का करायचं आहे हें ? बघाल ना कुठ ?

गीता : बघेन बापडी ! इलाजच हटला, मग काय करायचं ? बरं बाईसाहेब, आज दोन दिवस सांगेन सांगेन म्हणतें, पण मेली आठवणच भारी धड ! हें बघा, मी सांगेन तिथं याल का ?

सिंधू : कुठं यायचं ? सांगा ना तरी ?

गीता : अमृतेश्वरीं !

सिंधू : तिथं कशाला यायचं ?

गीता : तिथं आज चार दिवस लक्षभोजनं चाललीं आहेत ! चार दिवस तिकडे गेलांत तर गोडाधाडाचे दोन घांस तरी पोटभर मिळतील ! तुम्हांला उपासीतापाशीं पाहिलं म्हणजे माझ्या किनई पोटांत तटातट तुटतं अगदीं !

[ सिंधू तोंड फिरवते व पदरानें डोळ्यांतलीं आंसवें पुसते. ]

सुधाकर : ( स्वगत ) अरेरे, काय ऐकलं मीं हें ? या उदार मनाच्या पण गरीब कुळींच्या भोळ्या मुलीनं सहजासहजीं सिंधूच्या हृदयाला केवढी जबर जखम केली ही ! धनसंपन्नाची जी कन्या, ज्ञानसंपन्नाची जी पत्नी, तिच्या उपासमारीची दया येऊन या उदार मुलीनं तिला सदावर्ताचा उपदेश द्यावा !

सुधाकरा, काय हा तुझा संसार! धिक्कार असो तुझ्या व्यसनाला आणि पुरुषार्थाला!

गीता : अगबाई, तुमच्या डोळ्यांना पाणी आलं? माझ्या बोलण्यानं तुमच्या मनाला इतकं अवघड वाटलं? मला काय बरं ठाऊक? वाईसाहेब, मी आपली तुमची वेडीपिशी मुलगी आहें; चुकलेंमाकलें तर मनांत आणूं नका हो कांहीं! मी भोळ्या भावानं बोलून गेलें आपली! पण तुमच्या जिवाला तें लागलं!

सिंधू : (स्वगत) या बिचारीचं समाधान केलं पाहिजे. बापडी लागलीच गोरीमोरी झाली (उघड) गीताबाई, नाहीं बरं वाईट वाटलं मला!

गीता : अशी नाहीं फसायची मीं! मग डोळे भरून आले असे?

सिंधू : माझ्याहि मनांतून यायचं होतं. पण हें बघा, असं जुनेर आड करून चार लोकांत कसं बरं यायचं बाहेर? म्हणून मला वाईट वाटलं हो!

गीता : हात्तीच्या, एवढंच ना? मी आपली चरकलें! म्हटलं, कुठं बोलायला गेलें कुणाला ठाऊक! मग माझं पातळ आणून देऊं का?

सिंधू : वेड्या तर नाहीं तुम्ही, गीताबाई? तुमचं पातळ मला थिटं नाहीं का व्हायचं? हं बघा, तें राहूं द्या—त्याविणं कांहीं अडलं नाहीं. दळणाचं पाहाल ना कुठं जमलं तर?

सुधाकर : (स्वगत) शाबास, सिंधू, शाबास! फाटक्या लुगड्याचं निमित्त पुढें करून माझ्या दारूबाज अब्रूवर पांघरूण घातलंस!

सिंधू : गीताबाई, तुम्ही पुन्हा गप्प बसलां?

गीता : तुमच्या देवस्वभावाला काय म्हणावं, बाईसाहेब? साताजन्माच्या पुण्यवंतांनींसुद्धां तुमच्या चरणांचं तीर्थ घ्यावं; अन् आमच्या घरच्यासारख्यांनीं तुमच्याबद्दल दारूसारखंच अभद्र—तो देव मेला दडी मारून कुठं बसला आहे का दारूबिरूच प्यायला आहे?—एरव्हीं यांच्या जिभा झडून कशा जात नाहींत त्या?

सिंधू : हं, गीताबाई, आपण बायकांनीं असं बोलावं का? नवरा म्हणजे देवासारखा—

गीता : हे कसले हो असले देव! अहो, हे दारूबाज देव आज गटाराच्या गंगेंत वाहायचे तर उद्यां आणखी कुठं लोळायचे!

सिंधू : गीताबाई, गप्प बसा अगदीं! असं तोंडाला येईल तें बोलूं नये. देवाब्राह्मणांनीं दिलेला नवरा कसा का असेना—

( राग—पहाडी—गझल; ताल—कवाली. चाल—खडा कर० )

असे पति देवचि ललनांना । तयांसि अन्य भावना ना ॥
स्पर्शमणि वनितामन साचें । करित जें कांचन लोहाचें ॥
स्वपतिच्या अंगिंच्या दोषां । गणिति गुण मधुर आर्ययोषा ॥
तयासह नरकयातनांला । स्वर्गसुख मानिं समजति अबला ॥
असे जो प्रस्तर जननयनीं । गणीं त्या ईशाचि तद्रमणी ॥
वसुनि त्या या देवानिकटीं । ईशपद लभति सपति अंतीं ॥ १ ॥

**गीता :** देवानंच मुळीं आतांशा लाज सोडल्यासारखी दिसते ! बाईसाहेब, तुमचीं लुगडीं धुवायला सांगा—एकदा सोडून सात वेळां धुईन—पण एवढ्या गोष्टींत नका माझ्या तोंडाला हात देऊं ! असले नवरे जाळायचे का आहेत ? यांच्या अकला चुलींत का जातात ? मेल्या एकाऱ्या अंगीं वकूब नाहीं काडीचा अन् हे म्हणे देव ! या देवांची नित्यनेमानं खेटरांनीं पूजा करायला हवी ! तो देव हातीं सांपडता किनई तर तुमच्यापुढं उभा करून, चांगला कान पिळून त्याला हडसून खडसून विचारलं असतं, कीं या माउलीकडे नीट एकदांचा डोळे फोडून पाहा अन् मग सांग, कीं पोराबाळांनीं भरल्या घरांत अशी ओतायला का दारू केली आहेस ? बाईसाहेब, तुम्हांला येतो माझा राग; पण मी आहें आपली सरळ ! तुम्ही अशा सीतासावित्रीसारख्या, तुमची काय ओज ठेविली आहे हो दादासाहेबांनीं ? चांगले शिकले सवरलेले ! पण यांचं सारं शहाणपण बाटलींतून जन्माला यायचं, उकिरड्यावरच्या अमंगलानं यांचं उष्टावण व्हायचं आणि तिसऱ्या कुठल्या मसणवटींत—जाऊं दे मेलं, माझ्या तोंडाला नाहीं सुमार ! बाईसाहेब, तुमच्याकडे पाहिलं म्हणजे माझ्या जिभेला आपला फांटा फुटतो ! सांगा बघूं, काय केलं हो यांनीं तुमच्यासाठीं ? कधीं गोळाभर अन्न घातलं तुम्हांला वेळेवर, का बोटभर चिंधी आणली धडोतीसाठीं ? अष्टौप्रहर बाटलींत बुड्या मारूनच बसल्या ना यांच्या मोठाल्या बुद्ध्या ! हे हो कसले देव ? अहो हे शेंदूरकमी देव, निव्वळ दगडधोंडे ! आणि यांच्यावरचा शेंदूर पिऊन मुळूमुळू रडत बसायचं ! राणीचं राज्य झालं आहे ना म्हणतात आतांशा ? मग राणीच्या या राज्यांत बायकांचे कां असे धिंडवडे निघतात हे ? मला कुणीं राज्य दिलं तर मी साऱ्या बायकांना सांगून ठेवीन कीं, नवरा दारू पिऊन घरीं आला तर खुशाल त्याला दाव्यादोरखंडानं गोठ्यांत नेऊन बांधीत जा ! नवरा म्हणे देवासारखा ! अशानं तर नवरेपणाचे देव्हारे माजले ! दारू पितो तो कसला हो नवरा ? माणसांत देखील जिमा व्हायची नाहीं त्यांची !

सिंधू : गीताबाई, आपण कशाला जीभ विटाळून आपला धर्म सोडायचा! हें बघा, बाळ भुकेला झाला असेल; थोडं दूध-( मागें पाहून स्वगत. ) अगबाई! इथं उभं असायचं ? गीताबाईचं बोलणं सारं ऐकायचं झालं वाटतं ? ( उघड ) गीताबाई, जा बरं. दूध घेऊन येतां ना ?

[ तिला खूण करते. ]

गीता : ( पाहून ) अगबाई ! दादासाहेब इथंच होते वाटतं ? आणखी माझ्या जिभेची सारखी टकळी चालली होती !

सिंधू : ( हळूच ) चला आंत, भांडं देतं दुधाला अन् तेवढं दळणाचं विसराल बरं का ? चला.

[ त्या जातात. सुधाकर पुढें येतो. ]

सुधाकर : ( स्वगत ) सिंधू, इतक्या थोरपणानं, गीतेला बोलती बंद कां केलीस ? दारूच्या धुंदीनें बहिरून निजलेला माझा जीव तुझ्या नाजूक बोलफुलांनीं कसा जागा होणार ? त्याच्यावर गीतेच्या तोंडचा दगडधोंड्यांचा असा निष्ठुर माराच व्हायला पाहिजे ! गीतेचा एक एक बोल जिवाला चाबकाच्या फटकाऱ्याप्रमाणं लागत होता ! सिंधू, नवऱ्याच्या पोटांत दडी धरून बसलेल्या या दारूची तुम्हीं कदर केलीत म्हणून सांबाच्या पिंडीवर बसलेल्या विंचवाच्या नांगीप्रमाणें ती तुम्हां सर्वांना अजून छेडते आहे ! सुधाकरा, चांडाळा, दारूच्या दुष्ट नादानं केवळ पशु बनून या देवतेची काय विटंबना केलीस ही ! तुझं सारं शहाणपण गेलं कुठं ? ब्राह्मणजातीच्या उच्चत्वाला मीं लाथ मारली, विधवेची जबाबदारी झुगारून दिली आणि एखाद्या पतिताप्रमाणं मीं दारू प्यायला लागलों ! अरेरे ! ही पाहा सिंधू आली. ज्या तोंडानं मी दारू प्यालों तें हें तोंड या देवीला कसं दाखवूं ?

[ तोंड झांकून रडतो. सिंधू जवळ येऊन उभी राहते. ]

सिंधू : काय बरं असं ? गीताबाई आपल्या फटकळ तोंडाच्या आहेत ! त्यांचं बोलणं असं मनावर घेऊं नये !

सुधाकर : सिंधू, मीं आजपासून दारू पिणं सोडलं !

सिंधू : ( आनंदानं ) खरंच का हें ?

सुधाकर : खरं, अगदीं खरं ! आजपासून दारू पिणं सोडलं; कायमचं सोडलं !

सिंधू : अहाहा ! असं झालं तर देवच पावला !

( राग-भैरवी; ताल-केरवा. चाल-या मोरी ननदी. )

प्रभु अजि गमला मनीं तोषला ॥ ध्रु० ॥

कोपे बहु माझा । तो प्रभुराजा
आतां हांसलीं । मनीं तोषला ।
मृतचि हृदय होतें नाथ, हें पूर्ण झालें ।
परि वचनसुधेनें त्यासि जीवंत केलें ॥
अमृतमधुर शब्दा त्या पुन्हा ऐकण्यातें ।
श्रवणिं सकल माझी शक्ति एकत्र होते ॥ १ ॥

हें पाहा, आपल्या पायांवर मस्तक ठेवून मागणं मागतें कीं, शुभघडीचा हा निश्चय कधींकाळीं विसरूं नये.

[ त्याच्या पायां पडते. तो तिला उभी करतो. ]

**सुधाकर :** सिंधू, सिंधू, काय करतेस तूं हें ? माझ्या पायांवर मस्तक ठेवतेस ? या सुधाकराच्या ?—या दारूबाज सुधाकराच्या ?—ज्यानं आपल्या विद्येला, ज्ञानाला, नांवलौकिकाला, दारूच्या पेल्यांत बुडविलं, त्या सुधाकराच्या ? सिंधू, मीं दारूच्या व्यसनानं काय करायचं ठेवलं आहे ? वडिलांच्या पुण्याईला, ब्रह्मकुलींच्या पवित्रतेला, दारूनं तिलांजलि दिली ! तुझ्यासारख्या देवीची अशी विटंबना केली ! ज्या तुझ्या बापाच्या घरीं रोज सदावर्तं चालावीं त्या तुला घांसभर अन्नाला अशी महाग केली, कीं गीतेसारख्या मुलीनं तुझ्यावर दया करावी आणि तुला सहस्रभोजनाचा रस्ता दाखवावा ! लहानपणीं बहुला-बाहुलीच्या लग्नांत चिमुकला अंतरपाट धरण्यासाठीं तूं बेदरकारपणानं पैठणीच्या धांदोट्या केल्या असशील; त्या तुला आज फाटक्या कपड्यांमुळं बाहेर जाण्याची पंचाईत पडावी ! तुझ्या बापाच्या घरीं खेळतांखेळतां ओंजळीच्या वैरणीनं तूं जात्यांत मोतीं भरडले असतेस तरी कुणाला त्याचं कांहीं वाटलं नसतं; त्या तुझी मीं अशी दशा करून टाकली, कीं, पोटासाठीं आंसवांचीं मोतीं वेरून तुला मोलाचं दळण करणं भाग पडावं ! पंचपतिव्रतांनीं पुण्यसंपादनासाठीं प्रत्यहीं तुझी पूजा करावी अशी तुझी पवित्र योग्यता ! त्या तुझ्या अंगाला तळिरामासारख्या नरपशूनं स्पर्श केला ! ज्या दीनदुबळ्या परंतु पवित्र वैधव्याला पाहून देवांनींसुद्धां मार्गांतून बाजूला सरून मार्ग द्यावा, त्या वैधव्यांत पडलेल्या बिचाऱ्या शरद्चीहि मीं विटंबना करविली ! तोच हा पातक्यांतला पातकी सुधाकर ! त्या माझ्या पायांवर तूं मस्तक ठेवतेस ? त्यापेक्षां लायेसरशीं मला दूर नरकांत कां लोटून देत नाहींस ? सिंधू, गीतेनं खोटं काय सांगितलं ? भलत्या भावभक्तीनं माझ्यासारख्या दगडाची देवपूजा तूं कशाला करीत बसलीस ? तुझा नवरा होण्याला मी पात्र आहें का ? बाबा-

साहेब, आपण सर्वस्वीं फसून या रत्नाला दारूंत बुडविलं! पण आपणांला तरी आधीं काय ठाऊक, कीं ब्राह्मणकुलांतला हा विद्यासंपन्न सुधाकर, पुढं असा दारूबाज दिवटा निघणार आहे म्हणून! तक्षकाला मारण्यासाठीं अस्तिकानं त्याला पाठीशीं घालणाऱ्या इंद्रदेवतेलाहि आगींत उडी टाकण्याला आमंत्रण केलं, त्याप्रमाणं या दारूच्या व्यसनाला घराबाहेर घालविण्यासाठीं तुझ्यासारख्या साध्वींनींसुद्धां, या व्यसनाला पोटांत थारा देणाऱ्या पतिदेवतेला लाथेनं घराबाहेर हांकलल्लं तरच आजच्या संभावित समाजांतून हें दारूचं व्यसन हद्दपार होईल!

सिंधू : ऐकलं का? आतां मी नाहीं असं विडंविद्रं बोलूं द्यायची! सोडायची झाली ना आजपासून? मग आतां गेल्या गोष्टींनीं जीव कशाला कष्टी करून घ्यायचा? गेलं तें गंगेला मिळालं! एकदां मनाचा निग्रह करून टाकला तर आपल्याला काय बरं कमी आहे? अजून सारं सोन्यासारखं होईल. करायचा ना हा निश्चय कायम?

सुधाकर : कायम, कायम, अगदीं कायम! आपल्या बाळाची शपथ घेऊन सांगतों, कीं आजपासून दारू अगदीं वर्ज्य! वकिलीची सनद गेली तरी हरकत नाहीं; माझ्या चार वजनदार स्नेह्यांकडून कुठं नोकरीची सोय पाहतों. आतां हा सुधाकर तुझ्या एका शब्दाबाहेर जाणार नाहीं!

सिंधू : अहाहा! असं झालं तर अमृतेश्वराला लक्ष वाती लावून—लक्ष वाती-पशा काय—पण पंचप्राणांची पंचारती पाजळून ओवाळणी करीन! आपल्या एका शब्दासरशीं माझ्या आनंदाला त्रिभुवन थोडं झालं आहे आणि आकाश ठेंगणं झालं आहे! हीं सोन्याचीं अक्षरं कोणाला सांगूं आणि कोणाला नको असं मला झालं आहे! आधीं आपल्या बाळाच्या चिमुकल्या जीवालाच ही कानगोष्ट सांगतें! [ जाते. ]

सुधाकर : ( स्वगत ) चिरकालीन निराशेंत झालेला हा हिचा ब्रह्मानंद मला कोणता उत्साह देणार नाहीं?—

( राग–खमाज; ताल–त्रिवट. चाल–दखोरी गइ गइ० )

देतसे बहु उत्साह मना
विमल हिचा हर्षातिरेक नवचि जीवना ॥ ध्रु० ॥
निर्मल मंगल पावन पुण्यद। जें त्रिभुवनिं।
तद्भवन सतीमन। प्रसाद त्याचा जनिं करि न काय ॥ १ ॥

[ सिंधू मुलाला घेऊन येते. ]

सिंधू : बघितलं का या लब्बाडालासुद्धां हें ऐकून कसं हंसूं येतं आहे तें? बाळ, पुन्हा आपल्याला सोन्याचे दिवस लाभणार बरं!

(राग–पहाडी; ताल–कव्वाली. चाल–तारि विठ्ठेला०)

स्वस्थ कसा तूं? ऊठ गड्या। झणिं टाक उड्या ॥ ध्रु० ॥
नकळे का वर्षे। घन सुखेचा, छबड्या? ॥ १ ॥
सरले अजि सारे। कुदिन अपुले, बगड्या! ॥ २ ॥

बाळ, अजून तूं इतका लहान कां बरं राहिलास? ही आनंदाची गुढी घेऊन बाबांकडे, भाईकडे, तुला दुडदुडा धांवत जायला नको का? पुन्हा पुन्हा काय विचारतोस मलाच? तिकडे विचारीनास? ऐकलं का, याला एकदां आपल्याच तोंडानं सांगायचं बरं!

सुधाकर : बाळ, तुझी शपथ घेऊन सांगतों कीं, या सुधाकरानं आजपासून दारू कायमची सोडली, अगदीं कायमची सोडली!

[ दोघेंहि मुलाचा मुका घेऊं लागतात. पडदा पडतो. ]

## प्रवेश तिसरा

[ स्थळ–बंडगार्डन. पात्रें–सुधाकर व नंतर इतर मंडळी. ]

सुधाकर : काय चमत्कारिक माझी स्थिति झाली आहे! लहानपणापासून या बागेची शोभा माझ्या पुऱ्या ओळखीची; पण आज तिच्याकडे नव्यानं पाहिल्यासारखं वाटतं. सुंदर परंतु निर्दोष वस्तूकडे पतित मनाला ओशाळेपणामुळं उघड्या डोळ्यांनीं पाहण्याचा धीर होत नाहीं! अगदीं लहानपणीं एका इंग्रजी गोष्टींत वीस वर्षांच्या अखंड झोपेंतून जागा झालेल्या एका मनुष्याची प्रथम जगाकडे पाहतांना जी विचित्र मनःस्थिति वर्णिली आहे, तिचं आज मला अनुभवानं प्रत्यंतर पटत आहे. या बागेकडेच काय, पण एकंदर जगाकडेच पाहतांना माझ्या दृष्टींतला हा भितरा ओशाळेपणा कमी होत नाहीं. दारूसारख्या हलक्या वस्तूच्या नादानं ज्या सोज्वल समाजांतून, प्रतिष्ठित परिस्थितींतून, बरोबरीच्या माणसांतून—अगदीं माणसांतूनच—मी उठलों, त्या जगांत हें काळं तोंड पुन्हा घेऊन जातांना मला चोरट्यासारखं होतं आहे. या सुंदर जगांत माझी जागा मला पुन्हा मिळेल का? अजून तोंडाला

दारूची दुर्गंधी कायम असतांना माझ्या पूर्वाश्रमींच्या जिवलग बंधूंना माझी तोंडओळख तरी पटेल का? अजून दारूच्या धुंदीनं अंधुक असलेल्या माझ्या दृष्टीला माझी हरवलेली जागा हुडकून काढतां येईल का? हजारों शंकांनीं जीव कासावीस होऊन उदार सज्जनांच्या समोरसुद्धां आश्रयासाठीं जाण्याची माझ्या चोरट्या मनाला हिंमत होत नाहीं. फार दिवस परक्या ठिकाणीं राहून परत आलेल्या प्रवाश्याला आपल्या गांवांत हिंडतांना किंवा बिछान्यांत फार दिवस खितपत पडून आजारांतून उठलेल्या रोग्याला आपल्या घरांतच फिरतांना असाच अपुरा नवेपणा वाटत असतो खरा; पण पहिल्याला प्रियजनांच्या दर्शनाची उत्कंठा आणि दुसऱ्याला पुनर्जन्माच्या लाभाचा निर्दोष आनंद, जो पवित्र धीर देतो, तो घाणेरड्या व्यसनानें दुबळ्या झालेल्या पश्चात्तापाला कोठून मिळणार? आज अजून कोणीच कसं फिरकत नाहीं? (पाहून) अरेरे, हे लोक या वेळीं कशाला इथं आले? दारूच्या खाणाखुणा अजून अंगावर आहेत. अशा स्थितींत निर्व्यसनी जगांत जाववत नाहीं म्हणून मद्यपानाच्या स्नेहांतल्याच ज्या वजनदार लोकांनीं अडल्या वेळीं मला साहाय्य देण्याचीं वारंवार वचनें दिलीं, त्यांची भेट घेण्याच्या अपेक्षेनं मी इथं आलों तों माझ्या गतपातकांचीं हीं मूर्तिमंत पिशाचं माझ्यापुढें दत्त म्हणून उभीं राहिलीं!

[ शास्त्री व खुदाबक्ष येतात. ]

शास्त्री : शाबास, सुधाकर, चांगलाच गुंगारा दिलास! तुला हुडकून हुडकून थकलों! अखेर म्हटलं, मध्येंच तंद्री लागून कुठं समाधिस्थ झालास कीं काय कोण जाणे!

खुदाबक्ष : सगळ्या बैठका, आखाडे पायांखालीं घातले. चुकला फकीर मशिदींत सांपडायचा म्हणून सारे गुत्तेदेखील पालथे घातले!

शास्त्री : गुत्तेच पालथे घातले; त्यांतल्या बाटल्या नव्हेत!

खुदाबक्ष : अरे यार, साऱ्या गटारांचासुद्धां गाळ उपसला; पण तुझा कुठं पत्ता नाहीं!

शास्त्री : बरं खांसाहेब, आतां उगीच वेळ घालवूं नका. सुधाकर, तळिरामाचा आजार वाढत चालल्यामुळं त्याच्याभोंवतीं आळीपाळीनं पहाऱ्यासाठीं जागता सत्ता बसवायचा आहे. तेव्हां त्याचा कार्यक्रम ठरविण्यासाठीं आपल्या मंडळाची खास बैठक बसायची आहे, म्हणून लवकर क्लबांत चल.

सुधाकर : तळिरामाचा प्राण जात असला तरी आतां मला क्लबांत यायचं नाहीं!

खुदाबक्ष : असा वैतागलास कशानं? बैठक नुसतीच नाहीं!

सुधाकर : एकदा सांगितलं ना मी येणार नाहीं म्हणून ? आजच नाहीं, पण मी कधींच येणार नाहीं !

खुदाबक्ष : वः ! तूं नाहींस तर बैठकीला रंग नाहीं ! बर्फावांचून व्हिस्कीला तशी तुझ्यावांचून मजलशीला मजा नाहीं !

सुधाकर : काय, कसं सांगूं तुम्हांला ? मीं दारू पिणं सोडलं आहे !

दोघे : काय ? सोडलं आहे ? यानंतर ?

सुधाकर : हो, यानंतर !

शास्त्री : काय भलतंच बोलतोस हें ? दारूच्या धुंदींतसुद्धां तूं असं कधीं बरळला नाहींस ! मद्यपान सोडून करणार काय तूं ? अरे वेड्या, एकदां एक गोष्ट आपली म्हणून जवळ केल्यावर पुढं अशी बुद्धि ? अरे—" स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ! " काय खांसाहेब ?

खुदाबक्ष : बराबर बोलतांत ! अरे दोस्त, 'अपना सो अपना !' चल, हें वेड सोडून दे.

[ सुधाकर कांहींच बोलत नाहीं. ]

शास्त्री : चला, खांसाहेब, तापलेली काच आपोआप थंड पडूं द्यावी हें उत्तम ! निववण्यासाठीं पाणी घातलं कीं, ती एकदम तडकायचीच ! हा या घटके-पुरताच पश्चात्ताप आहे. स्मशानवैराग्यामुळं डोक्यांत घातलेली राख फार वेळ टिकायची नाहीं. जरा धीरानं घ्या, म्हणजे आपोआपच गाडं रस्त्याला लागेल. सुधाकरा, आम्ही तर जातोंच; पण तूं आपण होऊन क्लबांत आला नाहींस तर यज्ञोपवीत काढून ठेवीन, हें ब्रह्मवाक्य लक्षांत ठेव !

[ शास्त्री व खुदाबक्ष जातात. ]

सुधाकर : ( स्वगत ) दारूच्या गटारांत या पामर कीटकांच्या बरोबर आजपर्यंत मी वाहात आलों ना ? पण यांना दोष देण्यांत काय अर्थ आहे ? जळलेला उल्का मातींत मिसळून दगडाधोंड्यांच्या पंक्तींत बसतो याचा दोष त्याच्या स्वतःच्याच अधःपाताकडे आहे. जाऊं देत ! यांच्याबद्दल विचार करण्याइतकी सुद्धां–तसंहि नाहीं–या दोघांचीं सारीं विशेषणं माझीं मलाच लावून घेतलीं पाहिजेत—माझी अशी दशा व्हायला—अरेरे ! किती भयंकर दशा ! तिची कल्पनासुद्धां करवत नाहीं. बुद्धिमत्तेच्या तीव्र अभिमानामुळं बहुतांशीं बरोबरीच्या माणसांच्यासुद्धां हातांत हात मिळविण्याची ज्यानं कधीं कदर केली नाहीं, तो मी आज दारूच्या समुद्रांतून बाहेर निघण्याकरतां त्याच समुद्राच्या कांठावर बसलेल्या नालायक माणसांच्या पायांचा आधार मिळविण्यासाठीं आशेनं धडपडतों आहें. ( एक गृहस्थ येतो. ) सुधाकरा, या क्षुद्र मनुष्याला प्रसन्न

करून घेण्यासाठीं आशाळभूत दृष्टीनं तोंडावर गरिबीचं कंगाल हंसूं आणून कृत्रिमपणानं पदर पसरायला तयार हो! (त्याला नमस्कार करतो; तो गृहस्थ नमस्कार न घेतां निघून जातो—स्वगत) अरेरे! निर्दय दुर्दैवा, सुधाकराच्या स्वाभिमानाला ठार मारण्यासाठीं या बेपर्वाईच्या हत्याराखेरीज एखादा सौम्य उपाय तुझ्या संग्रहीं नव्हता का? आरंभीं या शेवटच्या शस्त्राची योजना कशाला केलीस?

[ दुसरा गृहस्थ येतो. ]

दुसरा गृहस्थ : (सुधाकराला पाहून स्वगत) काय पीडा आहे पाहा! हें अवलक्षण कशाला पुढं उभं राहिलं? या भिकारड्या दारूबाजाबरोबर उघडपणें बोलतांना जर कुणीं पाहिलं तर चारचौघांत अंगावर शिंतोडे उडायचे! आतां ही पीडा टाळायची कशी? मांजर आडवं आलं तर तीस पावलं मागं फिरावं, विधवा आडवी आली तर स्वस्थ बसावं, पोर आडवं आलं तर कापून काढावं, पण असं आपलंच पाप आडवं आलं तर कशी माघार घ्यावी याचा कुठल्याहि शास्त्रांत खुलासा केलेला नाहीं. चार शब्द बोलून वाटेंतला धोंडा दूर केला पाहिजे. (सुधाकर त्याला नमस्कार करतो. त्याला नमस्कार करून व कोरडे हसून) कोण सुधाकर? अरे वः! आनंद आहे! [ घाईनें जाऊं लागतो. ]

सुधाकर : रावसाहेब, आपल्याशीं जरा दोन शब्द—

दुसरा गृहस्थ : सध्यां मी जरा गडबडींत आहें—हे दादासाहेब गेले—

[ जातो. ]

सुधाकर : (स्वगत) याच्या पाजी संभावितपणापेक्षां पहिल्यानं केलेला उघड अपमान पुरवला. उभ्या जगानं प्रामाणिक हंसण्यानं माझा तिरस्कार केला असता तरीसुद्धां याच्या हरामखोर हसण्यानं माझ्या हृदयाला जसा घाव बसला तसा बसला नसता. (पाहून) हा तिसरा प्रसंग आहे. कांहीं हरकत नाहीं. एकीमागून एक अपमानाच्या या सर्व पायऱ्या चढून जाण्याचा मीं मनाशीं पुरता निर्धार केला आहे.

[ तिसरा गृहस्थ येतो. एकमेकांना नमस्कार करतात. ]

तिसरा गृहस्थ : कोण तुम्ही? काय नांव तुमचं? कुठं तरी पाहिल्यासारखं वाटतं—

सुधाकर : दादासाहेब, माझं नांव सुधाकर.

तिसरा गृहस्थ : सुधाकर!—नांवसुद्धां ऐकल्यासारखं वाटतं. काय म्हणालांत? सुधाकर नाहीं का?

सुधाकर : दादासाहेब, इतकं विचारांत पडण्यासारखं यांत कांहींच नाहीं.

आपल्या माझ्या अनेक वेळां गांठी पडल्या आहेत. आर्यमदिरामंडळाच्या बैठकींत आपण बंधुभावानं संकटकाळीं मला साहाय्य करण्याचीं कित्येकदां वचनं दिलीं आहेत. दादासाहेब, आज मी खरोखरी संकटांत आहें आणि म्हणूनच त्या वचनांची आठवण देण्यासाठीं —

तिसरा गृहस्थ : बेशरम मनुष्या, भलत्या गोष्टींची भलत्या ठिकाणीं आठवण करून द्यायची तुला लाज वाटत नाहीं? मूर्खा, पहिल्यानं मीं तुला न ओळखल्यासारखं केलं होतं तेवढयावरूनच तूं सावध व्हायला पाहिजे होतंस! दारूच्या बैठकींत दिलेलीं वचनं, केलेल्या ओळखी, हीं सारीं दारूच्या फुटलेल्या पेल्याप्रमाणं, खान्यांतल्या खरकट्याप्रमाणं, तिथल्या तिथं टाकून द्यायच्या असतात. काळोखांतली दारूबाज दोस्ती अशी उजेडांत उजळमाथ्यानं वावरूं लागली तर तुझ्याप्रमाणंच माझीहि बेअब्रू भरचवाठ्यावर नाचायला लागेल. दारूबाजीसारख्या हलक्या प्रकारांत आमच्या बरोबरीच्या लोकांची मदत मिळत नाहीं, एवढयासाठींच आम्हां थोरामोठ्यांना तेवढयापुरतंच तुझ्यासारख्या हलकटांत मिसळावं लागतं! पण तें अगदीं तेवढ्यापुरतं असतं. पायखान्यांतला पायपोस कोणी दिवाणखान्यांत मांडून ठेवीत नाहीं. थोरामोठ्यांच्या मैत्रीच्या आशेनं तुझ्यासारखे कंगाल दारूबाज मुद्दाम या व्यसनाशीं सलगी करतात, हें आम्हांला पहिल्यापासून ठाऊक असतं. चल जा. माझ्यासारखा आणखी कोणाला अशा संकटांत पाहूं नकोस. [जातो.]

सुधाकर : ( स्वगत ) दुर्दैवा, सुधाकराच्या निर्लज्जपणांत अजून थोडी धुगधुगी आहे. ( चवथा गृहस्थ येतो—नमस्कार होतात. ) रावसाहेब, मला आपल्याशीं दोन शब्द बोलायचे आहेत. माझं नांव सुधाकर! माझा चेहरा आपल्याला कुठं तरी पाहिल्यासारखा वाटत असेल, पण खरोखरी पाहतां तो आपल्या पूर्ण परिचयाचा आहे.

चौथा गृहस्थ : सुधाकर, असं तीव्रपणानं बोलायचं काय कारण आहे? तुम्ही आम्हांला पाठच्या भावासारखे आणि आम्हांला हें बोलणं!

सुधाकर : उतावेळपणानं आपल्या उदार मनाचा उपमर्द केला याची क्षमा करा. पण मला आतां मिळालेल्या अनुभवाच्या औषधाचा कडवटपणा अजून माझ्या तोंडांत घोळत आहे. प्रसंगांत सांपडलेल्या आपल्या जिवलग मित्राचं नांव आठवत नसलं म्हणजे आपल्या सोईसाठीं त्याला नांवं ठेवायला सुरुवात करावी, हा जगांतला राजमार्ग आहे. ओळखीचा चेहरा पटत नसला, म्हणजे इतका चिकित्सकपणा दाखवावा लागतो, कीं हुंडीवरची सही पटवून

घेतांना पेढीवरच्या कारकुनानंसुद्धां तो कित्त्यादाखल पुढं ठेवावा. पण जाऊं द्या. तुमच्यासारख्या सत्पुरुषाला हें एकविणं असभ्यपणाचं आहे. रावसाहेब, मी आज विलक्षण परिस्थितींत आहें. मला एखादी नोकरी पाहिजे! अतिशय काकुळतीनं आपणांजवळ एवढी भीक—रावसाहेब, अगदीं पदर पसरून भीक मागतों कीं, कुठं तरी एखादी नोकरी मला लावून द्या; म्हणजे तीन जीवांचा—

[ कंठ दाटून येतो. ]

चौथा गृहस्थ : तुम्हांला नोकरी–सुधाकर–तुम्हांला आम्हीं नोकरी काय पाहून द्यायची ? तुमची विद्वत्ता, तुमची हुशारी, तुमची लायकी—

सुधाकर : माझ्या लायकीबद्दल कशाला या थोर कल्पना ? माझी लायकी एखाद्या जनावरापेक्षांहि हलक्या दर्जाची आहे ! पट्टेवाल्याची, हमालाची, कुठली तरी नोकरी–रावसाहेब, तीन पोटांचा प्रश्न आहे म्हणून पंचाईत ! नाहीं तर एका पोटासाठीं गाढवाच्या रोजमुऱ्यावर कुंभाराचा उकिरडा वाहण्याची-सुद्धां आतां माझी तयारी आहे !

चौथा गृहस्थ : तुम्ही आम्हांला पाठच्या भावासारखे–आम्ही तुमच्यासाठीं काय नाहीं करणार ? आहे एक नोकरी–दरमहा पंधरापर्यंतची—

सुधाकर : फार झाले पंधरा–रावसाहेब—

चौथा गृहस्थ : पण ती आहे कंत्राटदाराकडे स्टोर संभाळण्याची. खोरीं, फावडीं, होय नव्हे–म्हणजे आज पांचपन्नासांचा जंगम माल तुमच्या हातीं खेळायचा आणि–राग मानूं नका. सुधाकर, तुम्ही आमच्या पाठच्या भावा-सारखे ! तुमच्याजवळ खोटी भाषा नाहीं व्हायची — त्या जागीं अगदीं लायक, सचोटीचा माणूस पाहिजे—हो, एखादा छंदीफंदी असला आणि त्यानं निशापाण्यासाठीं दोन डाग नेले कलालाकडे—निदान त्याला जामीन तरी हवाच !

सुधाकर : मग माझ्यासाठीं आपण जामिनकी पत्करायला—

चौथा गृहस्थ : आतां काय सांगावं ? सुधाकर, तुम्ही आमच्या पाठच्या भावा-सारखे ! तुमच्याजवळ आपलं स्पष्ट बोलायचं—हें बघा, तुम्ही बोलूनचालून व्यसनी, तुमची जामिनकी म्हणजे धोतरांत निखारा बांधूनच हिंडायचं—हो तुम्हीच सांगा—व्यसनी माणसांचा भरंवसा काय घ्या ? म्हणून माझं आपलं तुम्हांला हात जोडून सांगणं आहे कीं, मला या संकटांत–आमच्या पाठच्या भावासारखे तुम्ही–तुम्हांला नाहीं म्हणायचं जिवावर येतं अगदीं—पण तुम्हीच

दुसऱ्या कोणाला तरी—हो, तेंहि खरंच; दुसरं कोण मिळणार ? हो, जाणून-बुजून कांऱ्यावर पाय द्यायचा—मोठं कठीण कर्म आहे! जग म्हणजे एवढ्यासाठीं! तुम्ही आमच्या पाठच्या भावासारखे! तेव्हां तुम्हांला उपदेश करायचा आम्हांला अधिकारच आहे—तात्पर्य काय, कीं दारू पिणं चांगलं नाहीं. दारू म्हटली कीं, माणसाची पत गेली, नाचक्की झाली! दरवाज्यांत कुणी उभं करायचं नाहीं, खऱ्या कळवळ्याचं कुणी भेटायचं नाहीं—सगळे दादा बाबा म्हणून लांबून बोलतील—पाठचा भाऊ ओळख द्यायचाच—तुम्ही आमच्या पाठच्या भावासारखे म्हणून सांगायचं तुम्हांला—सुधाकर, तुम्ही दारू सोडा! बर, येऊं आतां ? वेळ झाला! [ जातो. ]

सुधाकर : ( स्वगत ) बस्स! दुर्दैवाचे दशावतार पाहण्याची आतां माझ्यांत ताकद नाहीं! रात्रीं प्यालेल्या दारूची घाण अजून ज्याच्या तोंडाभोंवतीं घोंटाळत आहे, त्यानं मला दारू सोडण्याचा उपदेश करावा ? जोड्याजवळ उभं राहण्याची ज्याची लायकी नाहीं त्यानं जोड्यानं माझं मोल करावं ? जिथं कवडी किमतीच्या कंगालांनीं माझी पैजारांनीं पायमल्ली केली, तिथं सद्‌गुणी मनुष्याची सहानुभूति मला कशी मिळणार ? दारूबाज दोस्तांनीं लाथाडलेलं हें थोबाड आतां कुणाला कसं दाखवूं ? माझं उपाशी बाळ, काबाडकष्ट उपसणारी सिंधू—यांच्यापुढं कोणत्या नात्यानं जाऊन उभा राहूं ? बेवकूब बाप—नालायक नवरा—मातीमोलाचा मनुष्य–दीडदमडीचा दारूबाज–देवा, देवा, कशाला या सुधाकराला जन्माला घातलंस, आणि जन्माला घालून अजून जिवंत ठेवलंस ? मी काय करूं ? कुठं जाऊं ?–या जगांतून बाहेर कसा जाऊं ? कोणत्या रूपानं मृत्यूच्या गळ्यांत मगरमिठी मारूं ? पण सुदृढ मनालासुद्धां आत्महत्येसाठीं मृत्यूच्या उग्र रूपाकडे पाहतांना भीति वाटते. मग दारूबाज दुबळ्या मनाला एवढं धैर्य कुठून येणार ? दारूबाजाच्या ओळखीचं मृत्यूचं एकच रूप म्हणजे दारू! तडफडणाऱ्या जीवाच्या जांचण्या बंद करण्याचा दारूखेरीज आतां मार्ग नाहीं! मुलासकट माणुसकीला, सिंधूसकट संसाराला, सद्‌गुणांसकट सुखाला, जगासकट जगदीश्वराला, सुधाकराचा हा निर्वाणीच्या निराशेंतला शेवटचा प्रणाम! आतां यापुढं एक दारू—प्राण जाईपर्यंत दारू—शेवटपर्यंत दारू!

[ जातो. पडदा पडतो. ]

स्थळ–तळिरामाचें घर. पात्रें–शास्त्रीबुवा, तळिराम आजारी, व त्याचे मित्र वगैरे.]

**खुदाबक्ष :** काय शास्त्रीबुवा, मिळाला का एखादा डॉक्टर-वैद्य ?

**शास्त्री :** मिळालाच म्हणायचा. पण फार श्रम पडले शोधायचे ! आधीं तळिराम डॉक्टरचं किंवा वैद्याचं नांवच काढूं देत नव्हता मुळीं; शेवटीं सर्वांनीं आग्रह केला, तेव्हां दारू पिणारा डॉक्टर किंवा वैद्य मिळाला तर आणा, म्हणून कबूल झाला ! पुढं दारू पिणारा डॉक्टर किंवा वैद्य हुडकण्यासाठीं आम्ही निघालों. सारा गांव डॉक्टरांनीं आणि वैद्यांनीं भरलेला, पण असा एखादा डॉक्टर वैद्य औषधापुरतासुद्धां मिळायची पंचाईत !

**खुदाबक्ष :** मग झालं काय शेवटीं ?

**शास्त्री :** दारू पिणारा डॉक्टर शोधून काढण्यासाठीं आपला सोन्याबापू अजून फिरतो आहे. गांवांत मला दारू पिणारा वैद्य कांहीं आढळला नाहीं; शेवटीं एक इसम मिळाला

**खुदाबक्ष :** वैद्य आहे ना पण तो ?

**शास्त्री :** वैद्य नाहीं ! एका वैद्याच्या घरीं औषधं खलायला नोकर होता हा पहिल्यानं ! पुढं त्यानंच स्वतःचा कारखाना काढला आहे आतां ! म्हटलं चला, अगदीं नाहीं त्यापेक्षां ठीक आहे झालं ! आतां एव्हांनाच त्यानं यायचं कबूल आहे—( सोन्याबापू व डॉक्टर येतात. ) काय सोन्याबापू, दारू पिणारे डॉक्टर मिळाले वाटतं हे ?

**सोन्याबापू :** नाहीं. डॉक्टर नाहींत हे, नुसते दारू पिणारेच आहेत. पण डॉक्टरीची थोडी माहिती आहे यांना. मीं आणलंच यांना आग्रहानं ! तुमचे ते वैद्य कांहीं आपल्याला पसंत नाहींत !

**शास्त्री :** काय असेल तें असो ! आपला आयुर्वेदावर अंमळ विश्वास विशेष आहे. वैद्याला कळत नाहीं—अन् डॉक्टरला कळतं—डॉक्टरसाहेब, क्षमा करा. हें माझं आपलं सरांस बोलणं आहे— असं का तुम्हांला वाटतं ?

**सोन्याबापू :** तसं नाहीं केवळ; पण या वैद्यांच्या जाहिरातींवरून मोठा वीट आला आहे ! जो भेटतो त्याचं एक बोलणं ! शास्त्रोक्त चिकित्सा, शास्त्रोक्त औषधं, अचूक गुणकारी औषधं, रामबाण औषधं, हटकून गुण, तीन दिवसांत



एच २७३
३९

गुण, गुण न आल्यास दुप्पट पैसे परत; अनुपानखर्डा सोबत, टपालखर्च निराळा--

डॉक्टर : शिवाय, सरतेशेवटीं आगगाडीच्या डब्यांतल्यासारखी धोक्याची सूचना !

सोन्याबापू : त्यामुळं खरा वैद्य आणखी खोटा वैद्य ओळखणं एखाद्या रोगाची परीक्षा करण्याइतकंच अवघड होऊन बसलं आहे ! वैद्याविषयीं आमचा अनादर नाहीं; आम्हांला एखादा कां होईना, पण खरा वैद्य पाहिजे--

[ वैद्य प्रवेश करतो. ]

वैद्य : आपली मनीषा पूर्ण झालीच म्हणून समजा. आपणांला एखादा खरा वैद्य पाहिजे ना ? मग हा पाहा तो आपल्यापुढं उभा आहे. आमचीं औषधं अगदीं शास्त्रोक्त असून रामबाण असतात; हटकून गुण, तीन दिवसांत गुण, गुण न आल्यास दुप्पट पैसे परत; अनुपानखर्डा सोबत, टपालखर्च निराळा--विशेष सूचना--

सोन्याबापू : म्हणजे आपली धोक्याची सूचना ! हें घ्या डॉक्टरसाहेब, ऐका आतां ! [ डॉक्टर मोठ्यानें हसतो. ]

वैद्य : काय हो, काय झालं असं एकदम हंसायला ?

डॉक्टर : ( हसत ) मूर्ख आहांत झालं !

वैद्य : अल्पपरिचयानं दुसऱ्याला एकदम मूर्ख म्हणणारा स्वतःच मूर्ख असतो !

डॉक्टर : पण अल्पपरिचयांतच आपला सारा मूर्खपणा स्पष्टपणानं दाखविणारा त्यापेक्षांहि मूर्ख असतो !

शास्त्री : तें राहूं द्या तूर्त ! तळिरामाला उठवायला कांहीं हरकत नाहीं ना ? तळिराम, अरे तळिराम, ऊठ बाबा ! हे वैद्य आणखी डॉक्टर आले आहेत.

[ तळिराम उठून बसतो. ]

डॉक्टर : काय हो सोन्याबापू, हे वैद्यबुवा इथं औषध देण्यासाठींच आले आहेत का ?

वैद्य : अहो, हा प्रश्न विचारण्याचा अधिकार माझा आहे. ( शास्त्रीबुवास ) काय हो शास्त्रीबुवा, मी असतांना आणखी यांना आणण्याची काय जरुरी होती ?

सोन्याबापू : हें पाहा वैद्यराज, तुम्हां दोघांचे पंथ अगदीं निरनिराळे आहेत. म्हणून आम्हीं मुद्दाम दोघांनाहि आणलं आहे ! हो, 'अधिकस्य अधिकं फलं' !

वैद्य : भलतंच कांहीं तरी ! नवऱ्या मुलीला एका नवऱ्याच्या ठिकाणीं दोन

नवरे, किंवा एखाद्याला एका बापाच्याऐवजीं दोन बाप—

मन्याबापू : वैद्यराज, असे एकेरीवर येऊं नका. आतां आलांच आहांत, तेव्हां दोघेहि सलोख्यानं तळिरामाला औषधं द्या म्हणजे झालं!

तळिराम : शास्त्रीबुवा, एकट्या वैद्यानं किंवा डॉक्टरानं मी मरण्यासारखा नव्हतों, म्हणून का तुम्हीं या दोघांनाहि आणलंत?

डॉक्टर : आपला असा समज या राजश्रींच्या औषधांमुळंच झालेला आहे! खरोखरीच यांच्या औषधांत कांहीं जीव नसतो!

तळिराम : औषधांत जीव नसेना का! रोग्याचा जीव घेण्याची शक्ति असली म्हणजे झालं!

वैद्य : नाहीं. आमचीं औषधं तशीं नाहींत! हें पाहा डोळ्यांचं औषध. एकाला दिसत नव्हतं त्याला हें दिलं; आतां त्याला अंधारांतसुद्धां दिसतं!

डॉक्टर : यांच्या तोंडाला कुलूप घालील अशी त्या औषधावरची कडी आहे आमच्याजवळ! आमचं डोळ्यांचं औषध एका जन्मांधाला दिलं; त्याला अंधारांत तर दिसतंच, पण डोळे मिटून घेतले तरीसुद्धां दिसतं!

तळिराम : (स्वगत) मला एकंदर सोळासतरा रोग आहेत. त्यांपैकीं जलोदर हा माझा जीव घेईल असं मला वाटत होतं; पण यांच्या या चढाओढीवरून या दोघांपैकींच कोणीतरी पैज जिंकणारसं वाटतं!

वैद्य : मग काय, काढूं मी आपलीं औषधं?

डॉक्टर : अहो राहूं द्या आपलं शहाणपण आपल्याजवळच! मी देणार आहें यांना औषध!

तळिराम : आहो वैद्यराज, डॉक्टरसाहेब, असें आपापसांत भांडून तुम्ही जर एकमेकांचा जीव घेऊं लागलांत, तर मग माझा जीव कोण घेईल? असे भांडूं नका, मी आपल्या मरणाचं अर्धे अर्धे श्रेय तुम्हां दोघांनाहि वांटून द्यायला तयार आहें! हं, काढा वैद्यराज, तुमचीं औषधं.

वैद्य : या पाहा मात्रा. याच पाहून तुमचा वैद्यांबद्दलचा सारा विकल्प दूर होईल.

जनूभाऊ : अबब! काय या मात्रा! एकाद्या नवशिक्या कवीच्या पदांतूनसुद्धां मात्रांचा इतका सुकाळ नसेल!

वैद्य : हीं पाहा चूर्णं, हीं सत्त्वं, हीं भस्मं! हें सुवर्णभस्म, हें मौक्तिकभस्म, हें लोहभस्म—

तळिराम : प्राण घेण्याच्या शास्त्रांतसुद्धां काय दगदग आहे ही! रोगाला निःसत्त्व करण्यासाठीं आधीं इतक्या पदार्थांचीं सत्त्वं काढायची तयारी!

एका देहाचं भस्म करण्यासाठीं इतकीं भस्मं करण्याची तालीम!

**जनूभाऊ :** एकूण वैद्याच्या हातीं सांपडलेला रोगी जिवंत सुटणं कठीणच! हो, प्रत्यक्ष लोखंडाचंहि भस्म करण्याची ज्याची तयारी, त्याच्यापुढं रोगी शरीराची काय कथा?

**वैद्य :** हं, या औषधांची अशी थट्टा करणं पाप आहे. प्राणापेक्षांहि अमूल्य आहेत हीं औषधं!

**जनूभाऊ :** तरीच, रोग्याचा प्राण घेऊन शिवाय पैसेहि घेतां औषधांबद्दल!

**वैद्य :** उगीच शब्दच्छल नका करूं असा. अशीं तशीं औषधं नाहींत हीं! खुशाल डोळे मिटून हीं औषधं घ्यावींत!

**तळिराम :** आणि औषध घेऊन पुन्हा डोळे मिटावेत!

**जनूभाऊ :** ते मात्र कायमचे! खरंच, राजासाठीं तयार केलेलीं पक्वान्नं स्वयंपाक्याला अगोदर खावीं लागतात, त्याप्रमाणं रोग्याबरोबर वैद्यांनंहि औषध घेण्याची वहिवाट असायला हवी होती! मग मात्र हा घातुक मालमसाला तयार करतांना वैद्यांनीं जरा विचार केला असता!

**तळिराम :** खरंच, काय ही औषधांची गर्दी! काय हो डॉक्टर, वैद्यांवर नाहीं का औषध?

**वैद्य :** असं म्हणूं नये. वैद्याबद्दल असा अविश्वास दाखवूं नये. वैद्य हाच रोग्याचा खरा जिवलग मित्र असतो.

**तळिराम :** रास्त आहे! एरवीं रोग्याच्या जिवाशीं इतकी लगट कोण करणार?

**डॉक्टर :** अहो सोन्याबापू, उगीच काय पोरखेळ मांडला आहे हा! वैद्याच्या औषधानं कुठं रोग बरे व्हायचे आहेत का? बापानं औषध घ्यावं तेव्हां मुलाच्या पिढीला गुण यायचा!

**वैद्य :** अस्तु. तरी पुष्कळ आहे. वैद्याच्या औषधानं मुलगा जिवंत तरी राहतो; डॉक्टरच्या बाबतींत मात्र बाप औषधानं मरायचा आणि मुलगा बिलाच्या हबक्यानं मरायचा!

**डॉक्टर :** कुचेष्टेनं सर्वत्र प्रतिष्ठा वाढतेच असं नाहीं, बरं का! देशी औषधांचा गुण सावकाशीनं येतो, हें तुमचे लोकच कबूल करतील. तेंच विलायती औषधांचं पाहा. औषध घेण्यापूर्वींच्या आणि औषध घेतल्यानंतरच्या रोग्याच्या स्थितींत तीन दिवसांत जमीन-अस्मानाचं अंतर!

**वैद्य :** सत्य आहे. म्हणजे जो रोगी जमिनीवर असायचा तो तीन दिवसांत अस्मानांत जायचा!

डॉक्टर : डॉक्टरी विद्येचा अपमान होतो आहे हा !

वैद्य : आणि आयुर्वेदाची आपण हेटाळणी केलीत तेव्हां ? मी आयुर्वेदाचा एक आधारस्तंभ आहें !

डॉक्टर : तूं आयुर्वेदाचा आधारस्तंभ ? अरे, औषधी कारखान्यांत रोजावर खल चालवायला मजूर म्हणून तूं होतास, एवढाच आयुर्वेदाच्या नांवाला तुझा विटाळ ! तूं एकादा वैद्य का आहेस ?

वैद्य : हात दाखवून अवलक्षण करून घेतलंस खरं ! मग तूं तरी डॉक्टर आहेस वाटतं ! खल्लांना देशी औषधं माझ्या हाताला तरी लागलीं होतीं. आणि तूं डॉक्टर तर नाहींसच; पण नुसता कंपाउंडरसुद्धां नाहींस. एका डॉक्टरच्या दवाखान्यांत थकलेलीं बिलं वसूल करण्याचं तुझं मूळचं काम ! इतक्या हलक्या वशिल्यानं डॉक्टरी विद्येशीं नातं जोडून आयुर्वेदाचा अपमान करीत आहेस !

मन्याबापू : अहो गृहस्थहो, तुमच्या बोलाचालींत आयुर्वेद, वैद्य, डॉक्टरी विद्या, डॉक्टर, असलीं मोठालीं नांवं कशाला हवींत ? तुम्हीं एकमेकांच्या नालस्त्या केल्यानं त्या मोठाल्या नांवांना कांहीं धक्का पोंचत नाहीं. तुम्हां नामधारकांचा त्या पवित्र नांवांशीं काय संबंध आहे ? वाऱ्यानं नकाशा फडफडला म्हणून कांहीं देशांत धरणीकंप होत नाहीं ! आतां आलांच आहांत, तेव्हां एकोप्यानं नीट तळिरामाची प्रकृति पाहा , आणि सुखाच्या पावलीं आपापल्या घरीं परत जा. हं, तळिराम, हो पुढं. वैद्यराज, डॉक्टर, आतां वादंग नको उगीच ! डॉक्टर, तुम्हीं याची उजवी बाजू तपासा आणि वैद्यबुवा, तुम्ही याची डावी बाजू संभाळा.

[ दोघे तळिरामाला तपासूं लागतात. ]

वैद्य : काय करावं, शास्त्रांत उजव्या हाताची नाडी पाहावी असं आहे. इथं आमच्या नाड्या आंखडल्या ! याच्या डाव्या बाजूलाहि नाडीपुरताच एक छोटासा उजवा हात असता तर काय बहार झाली असती !

डॉक्टर : नाडी झाली. आतां जीभ काढा पाहूं !

वैद्य : हं शास्त्रीबुवा; यांना आवरा ! जीभ कोणाची ? यांची का आमची ? जीभ कोणालाच बघतां यायची नाहीं. रोग्याला दोन तोंडं असतीं तर गोष्ट निराळी ! तूर्तास जीभ लढ्यांत पडली आहे ! नुसता हात पाहण्यावरच भागवलं पाहिजे !

तळिराम : ( स्वगत ) काय करूं ! चांगला असतों तर एकेकाला असा हात

दाखविला असता कीं, एका तोंडाचीं दोन तोंड झालीं असतीं !

डॉक्टर : नाडी फार मंद चालते !

वैद्य : नाडी फार जल्द चालते !

डॉक्टर : थंडीनं हातपाय गार पडले आहेत.

वैद्य : तापानं अंगाला हात लाववत नाहीं !

डॉक्टर : झोप लागत नाहीं !

वैद्य : सुस्ती उडत नाहीं !

डॉक्टर : रक्तसंचय कमी झाला आहे !

वैद्य : रक्तसंचय फाजील झाला आहे !

डॉक्टर : पौष्टिक पदार्थांनीं रक्ताचा पुरवठा केला पाहिजे ?

वैद्य : फासण्या टाकून रक्तस्राव करविला पाहिजे !

डॉक्टर : नाहीं तर क्षयावर जाईल !

वैद्य : नाहीं तर मेदवृद्धि होईल !

तळिराम : काय हो, ही परीक्षा आहे का थट्टा आहे ? दोघांच्या सांगण्यांत जमीनअस्मानाचं अंतर ! शास्त्रीबुवा, यांपैकीं एकट्यानं मी मरण्याजोगा नव्हतों म्हणून या दोघांनाहि आणलंत वाटतं ?

डॉक्टर : असं कसं म्हणतां ? शरीरांत डावंउजवं हें असायचंच ! अर्धशिशीच्या वेळीं नाहीं का अर्धच डोकं दुखत ? एकीकडे एक डोळा येतो तर एक डोळा जातो !

वैद्य : शिवाय, यांच्याआमच्या पद्धतींचा विरोध लक्षांत घेतला पाहिजे. यांच्या-आमच्या शास्त्रांत कुठं जमत असेल तर एकामेकांशीं न जमण्यांत ! त्या मानानं हा फरक असायचाच !

तळिराम : हं, मग ठीक आहे. आतां माझ्या शरीराची वाटेल तशी दुर्दशा करा. एक बाजू क्षयानं रोडावली असून दुसरी मेदानं फुगून दिसते, असं सांगितलंत तर पहिलवान बाजूच्या बतीनं काडीपहिलवान बाजूला मीं हसून दाखवितों ! इतकंच नाहीं तर एका बाजूनं मेलों असलों तर जित्या बाजूनं मेल्या बाजूला खांदा द्यायलासुद्धां माझी तयारी आहे ! चालू द्या परीक्षा पुढं !

डॉक्टर : तत्राप रोग प्रयत्नसाध्य आहे.

वैद्य : रोग अगदीं असाध्य आहे !

डॉक्टर : पथ्यपाणी केलं तर रोगी खडखडीत बरा होईल.

वैद्य : धन्वंतरी जरी कोळून पाजला तरी रोगी जगायचा नाहीं !

डॉक्टर : जीव गेला तरी रोगी मरायचा नाहीं !
वैद्य : तीन दिवसांत रोग्याचा मुडदा पाडून दाखवितों !
शास्त्री : अहो, ही तुमची पैजहोड नको आहे. औषध काय द्यायचं तें द्या.
डॉक्टर : ( स्वगत ) आतां या चोराला चांगलाच फसवितों. [ उघड ] ठीक आहे, माझ्याबरोबर मनुष्य द्या म्हणजे औषध पाठवितों. तें दिवसांतून तीन वेळां दारूंतून द्यायचं ! दारूचा सारखा मारा ठेवावा लागेल !
वैद्य : हें आमचं औषध. हें तीन दिवसांतून एकदां घ्यायचं, पथ्य दारू न पिण्याचं ! दारूच्या थेंबाचा स्पर्श यांना होतां कामा नये !
तळिराम : दारूचा स्पर्श नको ? असं काय ? शास्त्रीबुवा, उठवा या दोघांनाहि ! दारूचा स्पर्श नको काय ? हं चला, उठा ! डॉक्टर, तुमचं काय औषध आहे तें पाठवा आणि बाकीचा सारा दवाखाना त्या वैद्याला पाजा आणि वैद्यबुवा, तुम्ही आपला सारा आयुर्वेद या डॉक्टरच्या घशांत कोंबा ! चला निघा ! ( ते दोघे जातात. ) काय नशिबाचा खेळ आहे, पाहा ! औषधासाठीं दारू प्यायला सुरुवात केली तों दारूसाठीं औषध पिण्यावर मजल येऊन ठेपली ! खुदाबक्ष, काढा कांहीं शिल्लक असेल तर ! बस्स झाला हा पोरखेळ ! [ ते दारू आणतात; सर्वजण पिऊ लागतात. ]

[ सुधाकर येतो. ]

सुधाकर : थांबा, सगळी संपवूं नका. असेल नसेल तेवढी दारू आतां मला पाहिजे आहे.

[ एक खुर्ची, टेबल, दोन तीन शिसे वगैरे घेऊन पुढें येतो व पेला भरतो. ]

शास्त्री : कां, खुदाबक्ष ? आमचं म्हणणं खरं झालं कीं नाहीं ? सुधाकर, तुझ्या स्वभावाची परीक्षा बरोबर झाली होती ना ? तुझी प्रतिज्ञा फुकट गेली.
सुधाकर : ( पेला भरीत ) माझ्या जोडीदार मूर्खांनो, तुम्हांला माझ्या स्वभावाची परीक्षा झाली असें नाहीं. पण मला माझ्या दुर्दैवाची परीक्षा झाली नाहीं ! मित्रहो, बोलल्या न बोलल्याची एकदा मला माफी करा, पण या वेळीं मला छेडूं नका ! जखमी झालेल्या सिंहाचं विव्हळणं ऐकूनसुद्धां भेकड सावजांना दूर व्हावं लागतं ! मला हंसायचं आहे ? माझी कुचेष्टा करायची आहे ? करा, खुशाल करा. पण एका बाजूला जाऊन करा ! ( सर्वजण मागें जातात. यानंतरचा प्रवेश शेवटच्या पडद्यावर. ) सुधाकर ज्या रस्त्यानं जाणार आहे, तिथं संगतीसोबतीची त्याला जरुरी नाहीं. ये, मदिरे, ये. मदिरे, तूं देवता नाहींस, हें सांगायला जगांतल्या पंडितांचा तांडा कशाला हवा ? तुझ्या जुलमी जादूनं

जडावलेल्या जनावरालासुद्धां कळतं कीं, तूं एक राक्षसी आहेस ! तूं घातकी राक्षसी आहेस ! तूं क्रूर राक्षसी आहेस ! पण तूं प्रामाणिक राक्षसी आहेस ! गळा कापीन म्हणून म्हटल्यावर तूं गळाच कापीत आली आहेस ! घरादाराचा सत्यनाश करण्याचं वचन देऊन तूं कधीं अन्यथा कृति केली नाहींस ! मृत्यूच्या दरवाज्यापर्यंत सोबत करण्याचं कबूल केल्यावर तूं कधीं माघार घेत नाहींस ! सुंदर चेहऱ्याचं तुझ्यामुळं भेसूर सोंग झालं तरी त्या चेहऱ्याची तुला चटकन् ओळख पटते ! तूं एखाद्याचं नांव बुडविलंस तरी अनोळखी पाजीपणानं तूं त्याचं नांव टाकीत नाहींस ! चल, मदिरे ! आपल्या अघोर, घातुक शक्तीनं, सुधाकराच्या गळ्याला मगरमिठी मार ! मग या कंठालिंगनानं सुधाकराचे प्राण कंठाशीं आले तरी बेहत्तर ! ( भराभर पेले पितो. रामलाल येतो व सुधाकराच्या हातांतला पेला घ्यावयास जातो. ) बेअकली नादान ! दूर हो-खबरदार एक पाऊल पुढं टाकशील तर ! जा रामलाल, कोंवळ्या पाडसाचा अघोर घांस ओढून काढण्यासाठीं आधीं वाघाच्या उपाशी जबड्यांत हात घाल; गिळलेला मणि उगाळून घेण्यासाठीं दुखावलेल्या नागाच्या तोंडांत हात घाल; आणि मग माझ्या समोरचा हा प्याला उचलण्यासाठीं आपला तो हात पुढं कर !

रामलाल : अरेरे, सुधा, तुझ्या निश्चयाबद्दल सिंधूताईचा निरोप ऐकून मी मोठ्या आशेनं रे इथं आलों आणि तूं हा प्रकार दाखविलास ?

सुधाकर : त्यापेक्षांहि मोठ्या आशेनं मीं तो निश्चय केला होता; पण —

रामलाल : पण, पण-पण काय कपाळ ? सोड, सुधा, अजून तरी ही दारू सोड रे—

सुधाकर : आतां सोड ? इतके दिवस दारू प्याल्यावर-वेड्या, इतके दिवस कशाला ? एकदांच प्याल्यावर दारू सोड ? वेड्या, दारू ही अशीतशी गोष्ट नाहीं कीं, जी या कानानं ऐकून या कानानं सोडून देतां येईल ! दारू ही एखादी चैनीची चीज नव्हे, कीं शोकाखातर तिची संवय आज जोडतां येईल आणि उद्यां सोडतां येईल ! दारू हें एखादं खेळणं नव्हे, कीं खेळतां-खेळतां कंटाळून तें उशापायथ्याशीं टाकून देऊन बिनधोक झोंप घेत येईल ! अजाण मुला, दारू ही एक शक्ति आहे, दारू हें काळाच्या भात्यांतलं अस्त्र आहे. दारू ही जगाच्या चालत्या गाड्याला घातलेली खीळ आहे. दारू ही पोरखेळ करतां येण्यासारखी एखादी क्षुद्र, क्षुल्लक वस्तु असती, तर तिच्याबद्दल एवढा गवगवा जगांत केव्हांच झाला नसता !

हजारों परोपकारी पुरुषांनीं आपल्या देहांचीं धरणं बांधलीं तरीसुद्धां जिचा अखंड ओघ चारी खंडांत महापुरानं वाहात राहिला, वेदवेदांचीं पानं जिच्या ओघावर तरंगत गेलीं, कठोर शक्तीचे मोठाले राजदंड जिच्या गळ्यांत रुतून बसले, ती दारू म्हणजे कांहीं सामान्य वस्तु नव्हे! दारूची विनाशक शक्ति तुला माहीत नाहीं! मुसळधार कोसळणाऱ्या पावसांत टिकाव धरून राहणारी इमारत दारूच्या शिंतोड्यांनीं मातीला मिळेल! दारूगोळ्यांच्या तुफानी माऱ्यासमोर छाती धरणारे बुरूज, या दारूच्या स्पर्शानं गारद होऊन जमीनदोस्त पडतील! फार कशाला, पूर्वीचे जादुगार मंतरलेलं पाणी शिंपडून माणसाला कुत्र्यामांजराचीं रूपं देत असत. ही गोष्ट तुझ्यासारख्या शिकल्यासवरलेल्या आजच्या पंडिताला केवळ थट्टेची वाटेल; पण रामलाल, दारूची जादू तुला पाहायची असेल, तर तुला वाटेल तो बत्तीसलक्षणी आणि सर्व सद्‌गुणी पुरुष पुढं उभा कर आणि त्याच्यावर दारूचे चार थेंब टाक; डोळ्याचं पातं लवतं न लवतं तोंच तुला त्या मनुष्याचा अगदीं पशु झालेला दिसूं लागेल! अशी ही दारू आहे, समजलास?

रामलाल : तुझ्या मनोनिग्रहानं, तुझ्या विचारशक्तीनं,–सुधा, सुधा, तूं मनांत आणल्यावर तुला काय करतां येणार नाहीं? दारू कितीहि अचाट शक्तीची असली तरी तिच्या पकडींतून तुला खात्रीनं सुटतां येईल—आपल्या निश्चयाची नीट आठवण कर!

सुधाकर : कसला कपाळाचा तो निश्चय! दारूच्या बेशुद्धींत घोंगडीवर घरघरत पडलेल्या आसन्नमरणानं, शेवटच्या नजरेनं, एखाद्याला सावधपणानं ओळखल्यासारखं केलं, तर जीवनकलेच्या तशा तुटल्या आधारावर विवेकी पुरुषानं भरंवसा ठेवून भागत नाहीं. आजपर्यंत मलासुद्धां असंच वाटत होतं; पण भाई, आतां माझी पुरी खात्री झाली आहे कीं, दारूच्या पेचांतून मनुष्याची कधींहि सुटका व्हायची नाहीं! रामलाल, नदीच्या महापुरांत वाहतांना गारठ्यानं हातपाय आंखडल्यावर, नदींत खात्रीनं आपला जीव जाणार, अशी जाणीव झाली तर बुडत्याला त्या पांगळ्या हातापायांनीं ओघाच्या उलट पोहून नदींतून बाहेर येतां येईल का? भडकलेल्या गांवहोळीच्या फोफाट्यांत भाजून निघतांना, जीव जाण्याची धास्ती वाटली तरी जळत्याला त्या जात्या जिवाच्या शेवटच्या श्वासांचे फुंकर मारून ती भोंवतालची आग विझवितां येईल का? मग या दोन्ही महाभूतांच्या ओढत्या–जाळत्या शक्ति जिच्यांत एकवटल्या आहेत, त्या दारूच्या कबज्यांत गळ्यापर्यंत बुडाल्यावर

प्रत्यक्ष ईश्वरी शक्ति लाभली तरी मरत्याला बाहेर कसं येतां येईल ? रामलाल, दारूची संवय सुटण्याची एकच वेळ असते आणि ती वेळ म्हणजे प्रथम दारू पिण्यापूर्वीचीच ! पहिला एकच प्याला —मग तो कोणत्या का निमित्तानं असेना — ज्यानं एकदां घेतला तो दारूचा कायमचा गुलाम झाला ! निव्वळ हौसेनं जरी दारूशीं खेळून पाहिलं तरी दिवाळीचा दिवा भडकून होळीचा हलकल्लोळ भडकल्यावांचून राहायचा नाहीं ! रामलाल, दारूची कुळकथा एकदांच नीटपणानं ऐकून घे ! दम खा ! मला एकदां-( पेला भरून पितो. रामलाल तोंड खालीं करतो. ) बस्स, ऐक आतां नीट ! प्रत्येक व्यसनी मनुष्याच्या दारूबाज आयुष्याच्या संमोहावस्था, उन्मादावस्था व प्रलयावस्था अशा तीन अवस्था हटकून होतात. या प्रत्येक अवस्थेची क्रमाक्रमानं सुरुवात एकच प्याला नेहमीं करीत असतो. प्रत्येक दारूबाजाची दारूशीं पहिली ओळख नेहमीं एकच प्याल्यानं होत असते ! थकवा घालविण्यासाठीं, तंदुरुस्तीसाठीं, कुठल्याहि कारणामुळं कां होईना, शिष्टाचाराचा गुरुपदेश म्हणून म्हण किंवा दोस्तीच्या पोटीं आग्रह म्हणून म्हण, हा एकच प्याला नेहमीं नवशिक्याचा पहिला धडा असतो ! एखादा अक्षरशत्रु हमाल असो, किंवा कवींचा कवि, आणि संजीवनी विद्येचा धनी एखादा शुक्राचार्य असो; दोघांचाहि या शास्त्रांतला श्रीगणेशा एकच—हा एकच प्याला ! दारूच्या गुंगीनं मनाची विचारशक्ति धुंदकारल्यामुळं मनुष्याला मानसिक त्रासाची किंवा देहाच्या कष्टाची जाणीव तीव्रपणानं होत नाहीं, आणि म्हणून या अवस्थेंत दारूबाजाला दारू नेहमीं उपकारी वाटत असतें. जनलज्जेमुळं आणि धुंद उन्मादाच्या भीतीमुळं—समजत्याउमजत्या माणसाला घटकेपुरतीसुद्धां बेशुद्धपणाची कल्पना अजाणपणामुळं फारच भयंकर वाटत असते आणि म्हणून सुरुवातीला जनलज्जेइतकीच नवशिक्या दारूबाजाला गैरशुद्धीची भीति वाटत असते ! अशा दुहेरी भीतीमुळं या अवस्थेंत मनुष्य, दुष्परिणाम होण्याइतका अतिरेक तर करीत नाहींच; पण आपल्याला पाहिजे त्या बेताची गुंगी येईल इतक्या प्रमाणांतच नेहमीं दारू पीत असतो. आणि म्हणून संमोहावस्थेंत दारूबाजाला प्रमाणशीर घेतलेली दारू हितकारक आणि मोहकच वाटते ! दारूच्या दुसऱ्या आणखी तिसऱ्या परिस्थितींतले दुष्परिणाम त्याच्या इष्टमित्रांनीं या वेळीं दाखविले म्हणजे ते त्याला अजिबात खोटे, अतिशयोक्तीचे किंवा निदान दुसऱ्याच्या बाबतींत खरे असणारे, वाटूं लागतात. सुरुवातीच्या प्रमाणशीरपणामुळं स्वतःचं व्यसन

त्याला शहाण्या सावधपणाचं वाटतं आणि अवेळीं दाखविलेलीं हीं चित्र पाहून, आपले इष्टमित्र प्याले असतील किंवा आपल्याला फाजील भिवविण्यासाठीं तीं दाखविलीं जातात, अशी तरी स्वतःची मोहक फसवणूक करून घेऊन दारूबाज आपल्या उपदेशकांना मनांतून हसत असतो. याच अवस्थेंतून न कळत आणि नाइलाजानं पुढच्या अवस्था उत्पन्न झाल्यावांचून राहात नाहींत. हें दुर्दैवी सत्य या वेळीं मनुष्याला पटत नाहीं, आणि तो आपलं व्यसन चालू ठेवतो! परंतु मनुष्याच्या मनावर आणि शरीरावर संवयीचा असा एक परिणाम घडतो, कीं आज एका गोष्टीचा जितक्यामुळें जो परिणाम होतो तोच तितक्यामुळें उद्यां होत नाहीं आणि म्हणून दारूबाजाला रोजच्याइतकीच गुंगी आणण्यासाठीं कालच्यापेक्षां आज आणि आजच्यापेक्षां उद्यां अधिक दारू पिण्याचं प्रमाण अधिक वाढवीत न्यावं लागतं. या संमोहावस्थेच्या शेवटच्या दिवसांत तर हें प्रमाण वाढत वाढत इतक्या नाजूक मर्यादेवर जाऊन ठेपलेलं असतं, कीं बैठक संपल्यानंतर एकच प्याला अधिक घेतला तर तो अतिरेकाचा झाल्यावांचून राहूं नये! या सावधपणाच्या अवस्थेची मुख्य खूण हीच असते, कीं अगदीं झोंप लागण्याच्या वेळीं मनुष्य पूर्ण सावध असतो. निशेचा थोडासा तरी अंमल असेल अशा स्थितींत त्याला झोंप घेण्याचा धीर होत नाहीं. अशा स्थितींत एखाद्या दिवशीं कुठल्या तरी कारणामुळें विशेष रंग येऊन मित्रमंडळी एकमेकांना आग्रह करूं लागते. आपण होऊन आपल्या प्रमाणाच्या शुद्धींत राहण्याच्या कडेलोट सीमेवर जाऊन बसलेल्या दारूबाजाला त्या बैठकीचा शेवटचा म्हणून आणखी एकच प्याला देण्यांत येतो. संमोहावस्था संपून उन्मादावस्था पहिल्यानं सुरू करणारा असा हा एकच प्याला! बरळणं, तोल सोडणं, ताल सोडणं कुठं तरी पडणं, कांहींतरी करणं या गोष्टी या अतिरेकामुळं त्याच्याकडून घडूं लागतात. रामलाल, ही भाकडकथा ऐकून कंटाळूं नकोस. या पुढच्या अवस्थांत जितक्या जलदीनं दारू मनुष्याचं आख्यान आटोपतं घेत जाते, तितक्याच जलदीनं मी दारूचं आख्यान आटोपतं घेतों. या उन्मादावस्थेंत दररोज मनुष्याला भरपूर उन्माद येईपर्यंत दारू घेतल्याखेरीज चैन पडत नाहीं आणि समाधान वाटत नाहीं. इतक्या दिवसांच्या सरावामुळें शरीर आणि मन यांना जगण्यासाठीं दारू ही अन्नापेक्षां अधिक आवश्यक होऊन बसते. या उन्मादावस्थेंत निशेच्या अतिरेकामुळें वेळोवेळीं अनाचार आणि अत्याचार घडतात. सावधपणाच्या काळीं पश्चात्तापामुळें तो हजारों वेळां दारू सोडण्याची

प्रतिज्ञा करतो, आणि कमकुवत शरीराच्या गरजेमुळें तितक्याच वेळां त्या प्रतिज्ञा मोडतो. कंगाल गरिबी आणि जाहीर बेअब्रू यांच्या कैचींत सांपडून तो दारू सोडण्याचा प्रयत्न करतो आणि निर्जीव शरीर आणि दुबळें मन यांच्या पकडींत सांपडून तो अधिकाधिक पिऊं लागतो. पहिल्या अवस्थेंत मनुष्य दारूला सोडीत नाहीं; आणि या अवस्थेंत दारू मनुष्याला सोडीत नाहीं. मद्य-पानाचे भयंकर दुष्परिणाम भावी काळीं आपल्याहि ठिकाणीं शक्य आहेत अशी दूरदृष्टीनें भाग्यशाली जाणीव झाली तर एखादा नवशिका दारूबाज अतिशय करारीपणानं, पोलादी निश्चयानं आणि अनिवार विचारशक्तीनं पहिल्या अवस्थेंत असतांना एखादे वेळीं तरी दारूचं व्यसन सोडायला समर्थ होईल. पण या दुसऱ्या अवस्थेंत कांहीं दिवस घालविल्यानंतरहि दारूच्या पकडींतून अजिबात सुटणारा मनुष्य मात्र अवतारी ताकदीचा, ईश्वरी शक्तीचा, आणि लोकोत्तर निग्रहाचाच असला पाहिजे. उत्तरोत्तर अनाचार वाढत जातात आणि त्यानंतरचे पश्चात्तापाचे क्षण मनाला सहन होईनासे होतात. अशा वेळीं जगांत तोंड दाखवायला वाटणारी लाज कोळून पिण्यासाठीं निर्लज्जपणानं दारू कधींहि सुटणार नाहीं. आणि पश्चात्तापामुळें पिळून काढणारा सावधपणाचा एकहि क्षण आपल्याजवळ न येऊं देण्याच्या निश्चयानं अष्टौप्रहर आणखी अखंड गुंगींत पडून राहण्यासाठीं म्हणून तो एकच प्याला घेतो; दारू न पिण्याची प्रतिज्ञा मोडतो; आणि पुन्हा तशी प्रतिज्ञा करीत नाहीं. हा एकच प्याला म्हणजे तिसऱ्या प्रलयावस्थेची सुरुवात! भाई, आज सकाळीं सिंधूजवळ प्रतिज्ञा करतांना मला मूर्खाला कल्पनासुद्धां झाली नाहीं, कीं आजच्या दिवशींच माझ्या आयुष्याची प्रलयावस्था सुरू होणार आहे! सकाळची सिंधूची आनंदी मुद्रा, तो आनंदाश्रु, मिटत चाल-लेल्या माझ्या डोळ्यांतली अखेरच्या आशेची ती निस्तेज ललकी, वेड्या आशेच्या भरांत, आम्हीं दोघांनीं चुंबन घेतल्यामुळं बाळाच्या कोंवळ्या गाला-वर आलेली लाली—भाई, आमच्या चिमुकल्या जगांतला तो शेवटचा आनंद —तो आनंद—जाऊं दे या एकच प्याल्यांत! [ दारू पितो. ] वेड्या, आतां वाईट वाटून घेण्याचं कांहीं कारण नाहीं. इतका वेळ मीं ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगितल्या म्हणून अजाण जिवा, तुला थोडीशी आशा का वाटूं लागली आहे? माझं हें ब्रह्मज्ञान पश्चात्तापाचं नाहीं; तें विषारी निराशेचं आहे. माझ्या दारूबाज आयुष्यांतली ही तिसरी प्रलयावस्था आहे. पहिल्य अवस्थेंत मनुष्य दारूला सोडीत नाहीं, दुसऱ्या अवस्थेंत दारू मनुष्याला

सोडीत नाहीं, आणि तिसऱ्या अवस्थेंत दोघेंहि एकमेकांला सोडीत. नाहींत. या अवस्थेंत दारू आणि मनुष्य यांचा इतका एकजीव झालेला असतो कीं, जीव जाईपर्यंत त्यांचा वियोग होत नाहीं. अष्टौप्रहर दारूच्या धुंदींत पडला असतां त्या धुंदीच्या गुंगींतच एखादा रोग बळावल्यामुळं म्हण, एखाद्या मानसिक आघाता-मुळं म्हण किंवा आकस्मिक अपघातामुळं म्हण; त्याचा एकदांच निकाल लागतो. आणि तो निकाल जवळ आणण्यासाठीं अशी भराभर दारू घेत बसणं, एवढंच या जगांत माझं काम आहे. हा एक – आणखी एक – बस, आणखी एकच प्याला ! [ पुन्हा भराभर पितो. ]

रामलाल : सुधा, सुधा, काय करतो आहेस हें तूं ?

सुधाकर : काय करतों आहें मी ? ऐक, रामलाल ! तूं माझा जिवलग मित्र, निस्सीम हितकर्ता आहेस; पण तुझ्याहूनहि माझा एक अधिक निस्सीम हितकर्ता—माझाच नाहीं, एकंदर जगाचा—जीवमात्राचा एक जिवलग मित्र, निस्सीम हितकर्ता आहे. त्याच्या सन्मानाचा मी प्रयत्न करीत आहें. ज्याच्या-पुढं धन्वन्तरीनंसुद्धां हात टेंकले आहेत; अशा रोग्याच्या यातनांनीं तळमळ णाऱ्या जीवाला अखेर कोण हात देतो ? मृत्यु! दुष्काळाच्या उपासमारीमुळं तडफडून केविलवाण्या नाइलाजानं एकमेकांकडे पाहणाऱ्या मायलेकरांच्या दुःखाचा शेवट कशानं होतो ? मृत्यूनं ! आपल्या जुलमी जोरानं जीवकोटीला त्राहि त्राहि करून सोडणाऱ्या नराधमाच्या नाशासाठीं निराश मनुष्यजाती अखेर कोणाच्या तोंडाकडे पाहते ? मृत्यूच्या ! तो मृत्यु तुला आणि मला भेटण्यासाठीं यायचाच ! अशा परोपकारी काळपुरुषाला दोन पावलं आणा-यला गेलं तर त्यांत आपली माणुसकी दिसून येऊन त्याचे तेवढे कष्ट वांचतील. अशा रीतीनं यमाला सामोरा जाण्यासाठीं या दुबळ्या देहांत मी दारूनं तकवा आणीत आहें. रामलाल, दुसऱ्याचा नाश केल्यामुळं आप-ल्याला खून चढतो खरा; पण मी हीं आत्महत्या करीत आहें, तिचाच मला खून चढत चालला आहे ! भल्या मनुष्या, खुनी, इसमासमोर उभं राहणं धोक्याचं असतं ! [ पुन्हा पितो. ]

रामलाल : पण असा जिवाचा त्रागा करायचं काय कारण आहे ?

सुधाकर : काय कारण ? एकच कारण—आणि तेंहि हा एकच प्याला !

रामलाल : एकच प्याला–एकच प्याला–या एकच प्याल्यांत आहे तरी काय एवढं ?

सुधाकर : या एकच प्याल्यांत काय आहे म्हणून विचारतोस ? भाई, अगदीं

वेडा आहेस ! या एकच प्यालयांत काय काय नाहीं म्हणून तुला वाटतं ? ( प्याला भरून ) हा पाहा एकच प्याला ! हा भरलेला आहे खरा ? यांत काय दिसतं आहे तुला ! रामलाल, मनुष्याच्या आयुष्यांत निराशेचा शेवटचा असा काल येतो, कीं ज्या वेळीं जीविताची आठवण मोहानं त्याला फसवूं शकत नाहीं आणि मरण्याच्या खात्रीमुळं तो स्वतःच्या देहावर मृत्यूच्या दरबाराची सत्ता कबूल करायला लागतो – मृत्यूच्या भयानक स्वरूपाशीं मनुष्याची दृष्टि परिचयानं एकरूप होतांच, तो क्षणभंगुर जगाकडे काळाच्या क्रूरपणानं पाहूं लागतो. मनुष्यहृदयांतल्या सहज काव्यस्फूर्तीतहि हा दृष्टींतला क्रूरपणा खेळूं लागतो. अशा वेळीं तीव्र निराशेनं कडवटलेल्या मृत्यूच्या क्रूर काव्यदृष्टीनं पाहतांना सुंदर वस्तूंबद्दलसुद्धां भयाण कल्पना आठवतात. त्या दृष्टीनं पाहतांना, आईच्या मांडीवर समाधानानं स्तनपान करणारं मूल दिसलं, कीं तें तिथल्या तिथें मेलं तर त्या आईला काय दुःख होईल, असं चित्र अशा क्रूर कल्पनेपुढं उभं राहतं ! हळदीनं भरलेली नवी नवरी पाहतांच वपनानंतर ती कशी दिसेल याबद्दल कल्पना विचार करूं लागते ! रामलाल ! मीं हल्लीं त्या अवस्थेंत आहें आणि माझ्या कल्पनेला मद्य-पानाच्या ज्योतीची ज्वाला प्रदीप्त करीत आहे ! अशा वेळीं मी उच्चंबळून बोलत आहें ! आतां माझ्या दृष्टीनं या एकच प्याल्यांत काय भरलेलं आहे तें पाहा ! पृथ्वीनं आपल्या उदरींच्या रत्नांचा अभिलाष केल्यामुळें खवळलेल्या सप्तसमुद्रांनीं आपल्या अवाढव्य विस्तारानं पृथ्वीला पालाण घालण्याचा विचार केला; त्या जलप्रलयाच्या वेळीं कूर्मपृष्ठाच्या आधारावर पृथ्वीनं आपला उद्धार केला ! पुढें विश्वाला जळण्याच्या अभिमानानं आदित्यानं बारा डोळे उघडले ! त्या अग्निप्रलयांत एका वटपत्रावर चित्स्वरूप अलिप्त राहून त्यानं सारी सृष्टि पुन्हा शृंगारली ! उभयतांच्या या अपमानामुळं अग्नि आणि पाणी यांनीं आपापलं नैसर्गिक वैर विसरून सजीव सृष्टीच्या संहाराचा विचार केला ! परिक्षितीचा प्राण घेण्यासाठीं मत्सराच्या त्वेषानं तक्षकानं बोरांतल्या आळीचं रूप घेतलं, त्याप्रमाणं खवळलेले सप्तसमुद्र सूडाच्या बुद्धीनं या इवल्याशा टीचभर प्यालांत सामावून बसले; आणि आदित्यानं आपली जाळण्याची आग त्यांच्या मदतीला दिली ! मनुष्याच्या दृष्टीला भूल पाडणारा मोहकपणा आणण्यासाठीं, तरण्याताठ्या विधवांच्या कपाळाचं कुंकूं काल्वून या बुडत्या आगीला लाल तजेला आणला ! या एकाच प्याल्यांत इतकं कडू अवलादीची दारू भरली

आहे ! नीट बघितलीस ही दारू ? ( प्याला पितो. ) आतां या रिकाम्या प्याल्यांत काय दिसतं तुला ? कांहीं नाहीं ? नीट पाहा, म्हणजे श्रीकृष्णाच्या तोंडांत विश्वरूपदर्शनप्रसंगीं यशोदेला जे चमत्कार दिसले नसतील, ते या रिकाम्या प्याल्यांत तुझ्या दृष्टीला दिसतील! काबाडकष्ट उपसून आलेला थकवा घालविण्याच्या आशेनं दारू पिणाऱ्या मजुरांच्या या पाहा झोंपड्या ! निरुद्योगाचा वेळ घालविण्यासाठीं म्हणून दारू पिणाऱ्या श्रीमंतांच्या या हवेल्या ! केवळ प्रतिष्ठितपणाचं लक्षण म्हणून चोंचल्यानं दारू प्यायला शिकलेल्या, शिकलेल्या पढतमूर्खांचा हा तांडा ! अकलेच्या मार्गानं न साधणारी गोष्ट मजलशींत एखाद्याजवळून साधून घेण्यासाठीं धूर्ततेनं त्याच्याबरोबर म्हणून थोडीशी घ्यायला लागून पितां पितां शेवटीं स्वतःहि बुडालेल्या व्यवहारपंडितांची ही पागा ! उद्योगी गरीब, आळशी श्रीमंत, साक्षर पढतमूर्ख, निरक्षर व्यवहारी सर्वांना सरसकट जलसमाध देणारा हा पाहा एकच प्याला ! दारूबाज नवऱ्याच्या बायकांची हीं पाहा पांढरीफटफटीत कपाळं ! दारूबाजांच्या पोरक्या पोरांच्या या उपासमारीच्या किंकाळ्या कर्त्यासवरत्या मुलांच्या अकालीं मरणानं तळमळणाऱ्या वृद्ध मातापितरांचं विव्हळणं ! चोरीस गेलेल्या चौदा रत्नांच्या मोबदल्यासाठीं या एकच प्याल्यांत सामावलेल्या सप्तसमुद्रांनीं दारूच्या रूपानं भूमातेचीं कैक नररत्नं अकाळीं पचनीं पाडलीं ! स्त्रीजातीला नटविण्यासाठीं समुद्राच्या उदरांतून जितकीं मोतीं बाहेर निघालीं त्याच्या दसपट आंसवांचीं मोतीं दारूमुळं स्त्रीजातीनं या एकच प्याल्यांत टाकलीं आहेत ! बेवारशी बायकांची बेअब्रू, बेशरम बाजारबसव्यांची बदचाल, बेकार बेरडांची बदमाषी, बेचिराख बादशहाती, जिवलग मित्रांच्या मारामाऱ्या, दगलबाजी, खून—रामलाल, हा पाहा, जगावर अंमल चालविणारा बादशाहा शिकंदर, दारूच्या अमलाखालीं केवळ मारेकरी बनून आपल्या जिवलग मित्राचा खून करीत आहे ! तो पाहा, मेलेल्याला सजीव करणारा दैत्यगुरु शुक्राचार्य, आपल्या त्या संजीवनीसह या एकच प्याल्यांत स्वतःच मरून चूर झाला आहे ! जगाच्या उद्धारासाठीं अवतरलेल्या श्रीकृष्णपरमात्म्याचे हे पाहा छप्पन्न कोटी यादव वीर दारूच्या एकच प्याल्यांत बुडून अधःपात भोगीत आहेत ! ( पेल्यांत दारू भरूं लागतो; रामलाल त्याचा हात धरूं लागतो. ) हट्टी मूर्खा, अजून माझा हात धरतोस ! आतां माझा हात धरून काय फायदा होणार ? अजून तुला हा एकच प्याला थट्टेचा वाटतो का ? रामलाल, अनादिकालापासून समुद्रांत बुडालेलीं जहाजं; मनुष्यसंसाराचा

अफाट पसारा, हीं सारीं एकवटून लक्षांत आणलीं म्हणजे सामान्य मनुष्य-बुद्धीला त्या सर्वांनीं गजबजलेला समुद्राचा तळ भयानक वाटूं लागतो. भाई, तूं बुद्धिवान् आहेस आणि कल्पकहि आहेस. माझ्या हातांतला हा लहानसा एकच प्याला तुझ्या कल्पनेच्या विश्वांत इतका मोठा होऊं दे, कीं या सुंदर जगाचा जितका भाग त्या पेल्याच्या तळाशीं रुतून बसला आहे, तो तुझ्या डोळ्यांसमोर नाचूं लागेल. तुझी दृष्टि भेदरूं लागली, तरळूं लागली! रामलाल, हाच तो विराट्स्वरूप एकच प्याला! रामलाल , हें उग्र आणि भयानक चित्र नीट पाहून ठेव. माझ्या हातचा पेला काढून घेण्याच्या भलत्या भरीला पडूं नकोस. परोपकारी मनुष्या, इतका वेळ घसा फोडून तुझ्या कल्पनेपुढं हा विराट्स्वरूप एकच प्याला मूर्तिमंत उभा केला, तो या सुधाकरासाठीं नव्हे. जा, साऱ्या जगांत तुझ्या वैभवशाली वाणीनं हें मूर्तिमंत चित्र हा विराट्स्वरूप एकच प्याला—अशा उग्र स्वरूपांत प्राणिमात्राच्या डोळ्यांपुढं उभा कर ! चारचौघांच्या आग्रहानं, किंवा कुठल्याहि मोहानं फसलेला एखादा तरुण पहिला एकच प्याला ओंठाशीं लावतो आहे तोंच हा विराट्स्वरूप एकच प्याला त्याच्या डोळ्यांपुढं उभा राहून त्याच्या भेदरलेल्या हातांतून तो पहिला एकच प्याला गळून पडला आणि खालीं पडून असा खळकन् भंगून गेला, तरच या सुधाकराचा दारूंत बुडालेला जीव सप्त-पाताळाच्या खालीं असला तरी समाधानाचा एक निःश्वास टाकील ! रामलाल, यापुढं हें तुझं काम आणि हें माझं काम ! [ पितो. ]

रामलाल : सुधाकर, डोळ्यांनीं पाप पाहावत नाहीं म्हणतात, पण आतां यापुढं मात्र—

सुधाकर : प्रतिज्ञा पुढं बोलूंच नकोस; म्हणजे ती मोडल्याचं पाप लागणार नाहीं. भाई, माझं दारूचं व्यसन एक वेळ सुटेल, पण माझं व्यसन सोडविण्याचं वेड तुझ्या डोक्यांतून मात्र जाण्याचं कठीण दिसतं. रामलाल, एकच प्याला, एकच अनुभव—केवळ दारूपुरताच हा सिद्धांत मीं तुला सांगितला नाहीं. मोहाची जी जी वस्तु असेल, त्या प्रत्येकीच्या बाबतींत हाच सिद्धांत आहे. स्त्रियांची गोष्ट घे; एखाद्या स्त्रीकडे कित्येक वेळां पाहिलं—दयेनं पाहा, ममतेनं पाहा—जाऊं दे—रामलाल, तूं शहाणा आहेस, आणि शरद्—माझी ती बहीणच आहे—तूं तिला मनापासून मुलगी मानलीच आहेस. चांडा-ळाच्या मनांतसुद्धां इथं पापाची कल्पना येणार नाहीं ना? लाख वेळां तूं तिच्याकडे निर्दोष दृष्टीनं पाहिलं आहेस ना? —जा, बोलण्याच्या भरांत

बेसावधपणानं तिच्या अंगाला एकदां नुसता स्पर्श कर! भाई, एकच स्पर्श—पण तेवढ्यानं माणुसकीचं मातेरं होऊन, तूं जन्माचा पशु होशील!

रामलाल : (स्वगत) एकच प्याला! एकच स्पर्श! शब्दाचं शहाणपण शिकवायला म्हणून मी इथं आलों. आणि शहाणपणाचे शब्द शिकून परत चाललों! एकच प्याला! एकच स्पर्श! एकच कटाक्ष! मोहाच्या कोणच्याहि वस्तूचा पहिला प्रसंगच टाळला पाहिजे—नंतर सावधपणानं वागणं म्हणजे जन्माचा पशु! शरद्‌चा एकच स्पर्श! पशु! (उघड) सुधा, आधीं घरीं चल. [ जातात ]

## प्रवेश पांचवा

[ स्थळ—सुधाकराचें घर. पात्रें—सिंधू दीन वेशानें दळीत आहे. पाळण्यांत मूल. ]

सिंधू : चंद्र चवथिचा। रामाच्या ग बागेमधें चाफा नवतिचा ॥

(दोन चार वेळ म्हणते) (पाळण्यांत मूल रडूं लागतें.) अग बाई, बाळ उठला वाटतं! (उठून त्याला पाळण्यांतून बाहेर घेते.) आज चवथीची ही चिमुकली चंद्रकोर लवकर कां बरं उगवली? चतुर्थीचा उपास लागला वाटतं चिमण्या चंद्राला? भूक लागली का बाळाला? बाळ, थांब हं जरा. आतां गीताबाई येतील, त्यांना दूध आणायला सांगूं माझ्या बाळासाठीं बरं! आतां कां बरं काजळकांठ भिजवतोस असा? मघाशीं थोडं दूध पाजलं होतं तेवढ्यावरच थोडी वेळ काढायला नको का? असा हट्ट करूं नये! मागितल्या वेळीं दूध मिळायचे दिवस, राजसा, आतां आपले नाहींत रे! आपल्या लेखीं गोकुळींच्या गोठणी ओस पडल्या!

(राग–कालंगडा; ताल–दीपचंदी. चाल—छुपनापे रंग०)

बघुं नको मजकडे केविलवाणा, राजसबाळा ॥ ध्रु० ॥
ये देवा। अपुली ना करुणा
तोंवरी समजुनी। वर्ते अनुकाला ॥ १ ॥

गरिबींत लहान जीवालासुद्धां मोठ्या माणसाची समजूत यायला हवी बरं, बाळ! अस्सं, आतां कसा बरं हंसलास! असाच शहाणपणा शिकला पाहिजे आतां! गुणाचं मोठं गोजिरवाणं आहे माझं! दृष्टसुद्धां लागेल एखाद्याची अशा

गुणाच्या करणीनं ! झालं, लागलीच दृष्ट ! आली बाळगंगा डोळ्यांतून ! माझ्या डोळ्यांतून पाणी आलं म्हणून का वाईट वाटलं तुला ? बाळा, मी रडतें म्हणून तुंसुद्धां असा रडणारच का ? मी रडूं नको तर काय करूं ? आज वाटलं, देवाला दया आली म्हणून ! चांगली शपथ घेऊन सोडणं झालं होतं; पण आपलं दैव आड आलं ! आतांच माईनं सांगून पाठविलं, कीं क्लबांत जाऊन पुन्हा घ्यायला सुरुवात झाली म्हणून ! आतां बाळा, संसाराला तुझाच काय तो आधार ! बाळ, लौकर मोठे व्हा, आणि आपल्या गोजिऱ्या हातांनीं माझीं आंसवं पुसून टाका ! तोंवर या आंसवांच्या अखंड धारेनं तुझ्या आटलेल्या दुधाचा वाढावा करायला नको का ? ऐकतां ऐकतां डोळे मिटून ध्यान मांडलं का इतक्यांत ? हंसायला वेळ नाहीं, न् रडायला वेळ नाहीं ! नीज, मी गाणं म्हणतें हं ! ( त्याला मांडीवर निजवून पुन्हा दळूं लागते. इतक्यांत गीता प्रवेश करते. ) " चंद्र चौथिचा । रामाच्या ग बागेमध्यें चाफा नवतिचा ! " ( पुन्हा पुन्हा म्हणूं लागते. गीतेला पाहून ) अग बाई ! गीताबाई, अशा उभ्या कां ? बसा ना ? आज तळिरामांची तब्येत कशी आहे ? कांहीं उतार वाटतो आहे का ?

गीता : उतार नाहीं न् कांहीं नाहीं ! पण बाईसाहेब, काय तुमची दशा ही ? जात्याची घरघरसुद्धां अशा गाण्यानं गोड करून घेतां आहांत, तेव्हां धन्य म्हणायची तुमची !

सिंधू : म्हणतात ना, वासना तशीं फळं ! बाबांच्या घरीं माझ्या लहानपणीं आमची मोलकरीण रोज पहांटेची गोड गळ्यावर हें गाणं म्हणून दळीत असायची; मी नित्यनेमानं आपली अंथरुणावर पडल्या पडल्या तें ऐकायची. बाळपणची समजूत—एकदां आलं सहज मनांत, आपणहि असंच गाणं म्हणून दळावं असं; देव बापडा कुठं तेवढंच ऐकत होता; त्या वेळीं त्याला माझा बाळहट्ट नाहीं पुरवतां आला; आतां सटवीच्या फेऱ्यांत सांपडून पुन्हा बाळ-पण लाभलं आणि दळण्याची हौस फिटली ! त्या गोष्टीची आठवण होऊन गाणं म्हणत होतें झालं ! हो पण, काय हो गीताबाई, संध्याकाळीं हें दळण द्यायचें आहे, त्याचे किती पैसे मिळायचे आहेत ?

गीता : सहा !

सिंधू : मग ते आतां नाहीं का मिळायचे ?

गीता : कामाआधीं कसे मिळतील ?

सिंधू : अगदीं हातींपायीं पडलें तरी नाहीं का मिळायचे ?

गीता : त्या घरचीं माणसं मोठीं नतद्रष्ट आहेत मेलीं ! पाव मागितल्यानं द्यायचीं नाहींत कुणाला ! पण बाईसाहेब, आतांच कशाला हवे होते पैसे ?

सिंधू : ( स्वगत ) आतां काय सांगायचं या मुलीजवळ ? घरांत चिमणीच्या चाऱ्यापुरतासुद्धां आधार नाहीं, हें कसं सांगूं हिला ? देवा लक्ष्मीनारायणा, " कुबेर तुझा भांडारी, आम्हां फिरविशी दारोदारीं ! " यांत पुरुषार्थ—पण तुझ्याकडे काय दोष ? पूर्वजन्मीं केलं तें कपाळीं उमटलं, त्याला तूं काय करणार ? मागल्या जन्मीं ब्राह्मण ताटावरून उठवला असेल म्हणून आज अन्नासाठीं दाही दिशा पाहणं आलं; अतीत अभ्यागताला रित्याहातीं दवडलं असेल, म्हणून घरची लक्ष्मी पारखी झाली ! हिरव्या कुरणांतून गाईगुरांला हांकललं असेल, तेव्हां आज बाळाला दूध मिळत नसेल ! आमचं संचित खोटं, तिथं तुझ्याकडे काय बरं गाऱ्हाणं आणायचं ?

( राग—सावन; ताल—रूपक. चाल—पति हूं पियूं० )

कशि मी प्रभो निंदूं तुला । नच बघे तुझ्या दोषा ।

कोणावरी रोषें । अशुही धरीं न मी । दोषीं स्वभाला ! ॥ ध्रु० ॥

संचित छळिनें । माझें असें । भजनीं त्याच्या ।

नच बल्लव तुझ्या अमरा दयेला ॥ १ ॥

गीता : सांगितलं नाहीं तुम्हीं कशाला आतां हवेत पैसे ते ?

सिंधू : काय सांगायचं, गीताबाई ? आज किनई आमच्या घरांत अन्नपूर्णामाई अगदींच रुसून बसली आहे हो ! देवाच्या अक्षतांपुरतेसुद्धां तांदूळ नाहींत घरांत ! म्हणून म्हणत होतें—मूठभर भात उकडला म्हणजे मध्यान्ह टळेल कशी तरी ! माझ्यापाशीं हे एवढे दोन पैसे बाळाच्या दुधापुरते आहेत काय ते !

गीता : हात्तीच्या, अहो, मग माझ्या— ( स्वगत ) अगबाई, पण माझ्याजवळचे म्हटले तर या द्यायच्या नाहींत ! ( उघड ) बाईसाहेब, तसं आजवरनच मागितले तर त्यांच्याकडून—किती बरं ? ( पैसे मोजते. ) एक, दोन, तीन अन् ( उघड ) चार पैसे मिळतील ! नाहीं असं व्हायचंच नाहीं अगदीं ! येऊं का जाऊन ? अगदीं उभ्या उभ्या आलें हं—

सिंधू : अगदीं बसल्या बसल्यासुद्धां आणाल ! हं द्या, तसं नको, हे दोन पैसे घ्या आणि बाळासाठीं आधीं दूध आणा ! सकाळपासून तो भुकेनं कासावीस झाला आहे ! तंवर मी हें दळण आटोपतें सारंच ! मग तें घेऊन जा म्हणजे झालं !

गीता : बाईसाहेब, एक दहा वेळ तोंडावर आलं असेल, पण आतां टाकतेंच

बोलून! तुमच्या घराची अशी विटंबना झाली आणि तुम्ही तिकडच्या तब्येतीच्या चौकशी करतां! त्या दिवशीं कथेंत ऐकलं, त्या घटकेपासून माझ्या मनाला कसा चटका लागला आहे! घटोत्कचाला कर्णाची शक्ति लागली तेव्हां त्यानं विचार केला कीं, मागं पडलों तर पांडवांचींच माणसं चेंगरून मरतील, म्हणून तशांत पुढं झेंप घालून त्यानं एवढं मोठं कलेवर कौरवसेनेवर टाकलं! बघा! — एकेकांनीं मरतां मरतां आपल्या माणसांचीं हितं पाहिलीं आणि आमच्याकडून अगदीं अखेरीअखेरीला दादासाहेबांना ही दारूची संवय लावली, आणखी तुमच्या सोन्यासारख्या सोज्वळ संसारांत माती कालवली! होणं जाणं कुणाच्या हातचं नसतं, पण त्यापेक्षां आपलं आज-उद्यां व्हायचं तेंच चार वर्सं आधीं!—

सिंधू : हं गीताबाई, असं भलतं बोलावं का? जा, घरांतून तें भांडं घेऊन लौकर जाऊन या पाहूं आधीं! वेड्या नाहीं तर कुठल्या! आणखी हें बघा, बाळ मांडीवर निजला आहे, म्हणून दळतांना अवघडल्यासारखं होतं; त्याला तेवढा असाच त्या अंथरुणावर नेऊन ठेवा पाहूं जातां जातां! (गीता मुलाला घेऊन जाते) 'चंद्र चवथिचा—' (मूल रडूं लागतें.) अग बाई, जागा झाला वाटतं? आणा त्याला इकडे, गीताबाई! (गीता मुलाला परत आणून देते व जाते.) लौकर या बरं का? (मुलाला) बाळ, कां बरं झोंपमोड झाली तुमची? फार लागली का भूक? आत्माराम भुकेनं तळमळत असल्यावर डोळ्याला डोळा लागणार तरी कसा? बाळ, जरा थांब, आतां येतील हं गीताबाई! अग बाई, असा उपाशी आशेनं या पिठाकडे पाहायला लागलास? बाळ, अश्वत्थाम्याला त्याच्या आईनं पीठपाणी कालवून देऊन त्याची दुधाची तहान कशी तरी भागवली! पण बाळ, आपलीं नशिबं अगदींच पांगळीं आहेत; यांतल्या चिमूटभर पिठावरसुद्धां आपली सत्ता नाहीं! तें लोकांचं आहे! त्या पीठपाण्याचा ओघळ तुझ्या तोंडावर पाहिला, तर राजसा, तारामतीच्या रोहिदास तुला हंसून हिणवायचा नाहीं का?

(राग भैरवी; ताल–पंजाबी. चाल—बाबुल मोरा०)

गुणगंभीरा। त्यजिं न लव धीरा ॥ ध्रु० ॥

सत्त्वपरीक्षा महा। यदा परमेश्वर नियोजी।

अवसाद तेव्हां उचित का वीरा? ॥ १ ॥

नको रडवं तोंड करूं गडे! त्या पाहा आल्या हं गीताबाई दूधं घेऊन! (पाहून) अग बाई, येणं झालं वाटतं! पण हें कसलं येणं? देवा, काय पाहणं नशिबीं

आणलंस हें ? [ सुधाकर येतो–त्याचे पाय लटपटत आहेत. ]

सुधाकर : सिंधू, इकडे ये, मला आणखी प्यायची आहे ! फार नाहीं, फक्त एकच प्याला ! पैसे आण ! सिंधू, पैसे आण !

सिंधू : आतां कुठले बरं आणूं पैसे मी ? माझ्याजवळ कांहीं नाहीं अगदीं !

सुधाकर : खोटं बोलतेस ! आहेत ! चल आण ! आणतेस कीं नाहीं ? का जीव घेऊं ?

सिंधू : आपल्या पायांशपथ मजजवळ आतां कांहीं नाहीं. आतां दोन पैसे होते तेवढे बाळासाठीं दूध आणायला दिले तेवढेच ! अगदीं बाळाच्या गळ्यावर हात ठेवून सांगतें हवी तर !

सुधाकर : त्याचा गळा दाबून टाक ! कां दिलेस पैसे ?

सिंधू : बाळासाठीं नकोत का द्यायला ? असं काय करायचं हें ?

सुधाकर : चल जाव ! मला नाहींत आणि त्याला पैसे आहेत ? नवऱ्यापेक्षां तें कारटं जास्त आहे काय ? सिंधू, तूं पतिव्रता नाहींस ! हरामखोर ! तें कारटं त्या रामलालचं आहे ! माझं नाहीं !

सिंधू : शिव शिव ! काय बोलणं हें ?

सुधाकर : शिव शिव नाहीं, रामलालचें आहे ! आतां मारून टाकतों ! ( एक मोठी काठी घेऊन मुलाकडे जातो. )

सिंधू : (घाबरून ) अग बाई, आतां कसं करूं ? हांका मारून चारचौघांनां जमविलं तर तिकडून कांहीं तरी भलतंच व्हायचं ! देवा, काय रे करूं आतां ? माझ्या फाटक्या अंगाचं मायेचं पांघरूण कसं पुरणार माझ्या बाळाला आता ! [ सुधाकर काठी मारतो. सिंधू मध्यें येते; तिला काठी लागून खोंक पडून ती बेशुद्ध पडते. ]

सिंधू : देवा, सांभाळ रे माझ्या बाळाला !

सुधाकर : तूं मर ! आतां कारटं मर जाव ! ( काठी मारतो, मूल मरतें. ) ( पद्माकर येतो. )

पद्माकर : हरामखोरा, काय केलंस हें ?

सुधाकर : काहीं नाहीं; आणखी घ्यायची आहे—एकच प्याला !

[ पडदा पडतो. ]

*अंक चवथा समाप्त*

## अंक पांचवा

### प्रवेश पहिला

[ पात्रें—भगीरथ व शरद; शरद रडते आहे. ]

भगीरथ : ( स्वगत ) भाईसाहेबांचं माझ्याशीं असं तुटकपणाचं वागणं कां होतं याचं कारण आतां माझ्या लक्षांत आलं ! हा रोगांतला रोग, मनाला मारणारा, जीवाला जाळणारा, हा मत्सर आहे ! प्रेमाच्या स्पर्धेत निराश झालेल्या दीन जीवांचा हा निर्वाणीचा मत्सर आहे. कडू काळाचा कडवटपणाहि याच्यापुढं अमृतासारखा वाटेल ! या वयांत, अशा अपत्य-स्नेहाच्या भरांत, भाईसाहेबांसारख्या विवेकशाली पुरुषालासुद्धां प्रेमानं—हें प्रेम नाहीं; निराशेंत सात्विक प्रेम करुणावृत्तीचं रूप घेतं—या कामानं—कदाचित् ज्याचं त्याला कळल्यावांचूनहि असं होत असेल. या स्पर्धेची जाणीव रामलालांना पहिल्यापासूनच—नको हा विचार ! भाईसाहेबांच्या नांवाचा अगदीं अनुदार उल्लेख झाला आणि विचार तर अगदीं भलता झाला ! अरेरे ! परमेश्वरा, किती दुःखप्रद प्रसंगांत मला आणून ठेवलंस हें ! भाईसाहेबांच्या मनोवृत्तीविषयीं न्यायनिष्ठुर निर्णय देण्यासाठीं या हतभागी भगीरथानं विचार करावा ! त्यांनीं माझ्यावर केलेले उपकार आठवले म्हणजे माझ्या स्वतःचाहि मला विसर पडायला हवा ! दारूच्या नादानं जीवन्मृत झालेल्या भगीरथाला त्यांनीं पुनर्जन्म दिला आणि त्यांच्या वर्तनाकडे त्या मींच अशा टीकादृष्टीनं पाहायचं ? पित्याच्या पुण्यवृत्तीबद्दल संशय घ्यायचा, मातेच्या शुद्ध शीलाबद्दल नीचपणानं चौकशी करायची, प्रत्यक्ष परमेश्वराच्या अस्तित्वाबद्दल तर्कवितर्क लढवायचे, तशांतलंच हें अनन्वित पातक आहे ! भाईसाहेबांनीं आधींच आपल्या प्रेमाची रति-

मात्र तरी कल्पना मला दिली असती तर शरद्च्या स्नेहभावाला प्रेमाच्या पायरीवर चढविण्याऐवजीं मीं केवळ परिचयाच्या उदासीन पदावर बसविलं असतं ! पण त्यांनाच आधीं त्यांच्या मनाची वृत्ति कळली नसेल ! तें कांहीं असो; माझ्या जीविताची वाटेल ती वाट लागली तरी भाई-साहेबांच्या सुखाच्या वाटेंत मी कधींहि आड येणार नाहीं. भगीरथप्रयत्नांनीं शरद्च्या प्रेमाचा वेग भाईसाहेबांकडे वळविलाच पाहिजे. ( उघड ) शरद्, अशा हृदयभेदक स्थितींतहि तुझ्याशीं निष्ठुरपणानं बोलतों याची मला क्षमा कर. आतां तुझ्याशीं असं बोलतांना मला समाधान वाटत आहे असें मुळींच समजूं नकोस. या विषारी विचारानं माझं हृदय आंतल्या आंत सारखं जळतं आहे. अगदीं उपाय नाहीं म्हणूनच मला असं बोलावं लागतं आहे, त्याची क्षमा कर आणि माझ्या प्रश्नाचें उत्तर दे. शरद्, भगीरथाच्या सुखासाठीं वाटेल तें दुःख भोगायला तूं तयार आहेस का ? हं, अशी रडून मला निरुत्साह करूं नकोस ! संशयाच्या दीन दृष्टीनं पाहूं नकोस ! अशा प्रश्नाचं स्पष्ट शब्दांनीं उत्तर देणं कोणत्याहि बालिकेला, त्यांतून तुझ्यासारख्या कोमल मनाच्या आणि आजन्म दुःखाग्नींत करपून निघणाऱ्या बालविधवेला अगदींच मरणाहूनहि अधिक आहे, हें मी जाणून आहें ! पण आतांचा प्रसंगच असा चमत्कारिक आहे, कीं स्पष्ट बोलल्यावांचून गत्यंतर नाहीं. कुलीनतेची मर्यादा आणि प्रयोजकता यांनाहि आपण क्षणभर बाजूला ठेवलं पाहिजे. सांग शरद्, अगदीं मोकळ्या मनानं सांग. भगीरथाच्या सुखासाठीं तूं वाटेल तें दुःख भोगायला तयार होशील का ?

शरद् : तुमच्या प्रश्नाचं उत्तर देण्याचं कारणच नाहीं. जें तुमचं सुख तें माझं दुःख असं कधीं तरी घडेल का ?

भगीरथ : प्रेमाच्या सहवासांत राहतांना भिन्न जीवांना जी एकरूपता मिळते तीच विरहाच्या चिरनिराश सृष्टींतहि राखणें फार दुष्कर आहे.

शरद् : विरहाची सृष्टि ? विरहाची कल्पना आपण आतां—

भगीरथ : मनाचा धडा करून एकदांच, एकदम स्पष्टपणं काय तें बोलून टाकतों. शरद्, दुसऱ्या कशासाठीं जरी नाहीं, तरी केवळ या भगीरथाच्या सुखासाठीं—शरद्, क्षमा कर, हात जोडून हजार वेळां तुझी क्षमा मागतों—पण तुला भाईसाहेबांची विनंती मान्य करावी लागेल ! रामलालशींच तुला पुनर्विवाह करावा लागेल !

शरद् : भगीरथ, भगीरथ, काय हो बोललांत हें ? खरोखरींच तुमचं हृदय पार

जळून गेलं आहे का? अगदीं विषाचा – भगीरथ, हृदयदाहक प्राणघातक विषाचा – वर्षाव केलात हो माझ्यावर!

भगीरथ : भगीरथाच्या हृद्रोगावर हें विषच अमृतासारखं गुणकारी आहे! याच विषाच्या सेवनानं तुझ्या हृदयाच्याहि वृत्ति मरून जाऊं देत!

शरद : भगीरथ, तुमच्या चरणीं वाहिलेले हे प्राण आतां दुसऱ्याचे कसे हो होतील?

भगीरथ : रामलालच्या चरणांशीं माझे प्राण गहाण पडले आहेत. तुझ्या प्राणांच्या विनिमयानंच मला माझ्या प्राणांची पुन्हा प्राप्ति होणार आहे! शरद्, माझ्या या कर्तव्याच्या स्वार्थवृत्तीची मला क्षमा कर!

शरद् : नका हो नका असं बोलूं, भगीरथ! तुमच्या शब्दाशब्दानं माझ्या हृदयावर कसे विषारी घाव बसताहेत, याचा थोडा तरी विचार करा!

भगीरथ : कृतज्ञता विचारशील नसते! भाईसाहेबांचे आजवर माझ्यावर आणि तुझ्यावरहि किती उपकार झाले आहेत त्यांची नीट आठवण कर! त्या उपकारांची फेड आपल्याला करायला नको का? देवदैत्यांनीं समुद्रमंथन करून चौदा रत्नं बाहेर काढलीं; त्यांत स्पर्शमात्रानं जीवनाश करणारी सुरा आणि स्पर्शमात्रानं चिरंजीवन देणारी सुधा अशीं दोन परस्परविरोधी रत्नं सांपडलीं. पापपूर्ण पृथ्वीवर पहिल्याचा पूर्णावतार झाला आणि दुसरं स्त्रियांच्या अधरामृताच्या रूपानं मनुष्यजातीच्या वांटणीला आलं. एका रत्नाच्या यातनामय तावांतून ज्यांनीं माझी सुटका केली त्यांच्याच सुखासाठीं दुसऱ्या रत्नाच्या सुखाचाहि मला त्याग केला पाहिजे. संसारांत सुखदुःखांचं मिश्रण अभिन्नस्वरूपाचं आहे. काळोखाची एक रात्र काढून टाकली तर तिच्याबरोबरच प्रकाशपूर्ण दिवसाकडेहि डोळेझांक करायला पाहिजे. दुःखाचा एक अंश टाळण्यासाठीं त्याच्याशीं संलग्न असलेल्या सुखांशालाही दूर करावं लागतं, हा ईश्वराच्या घरचा निष्ठुर न्याय आहे.

शरद् : भगीरथ, असे निर्दय कसे हो झालांत?

( राग–जोगी; ताल–त्रिवट. चाल–दिलभर जानुते० )

कृति अशी भीषणा । अन्य ना ॥ ध्रु० ॥

चिरिल मना । परमेशाच्या । यातना ! ॥ १ ॥

कोमलतरा । वनिताचित्ता । जाळि ना ? ॥ २ ॥

भगीरथ : भगीरथाच्या जगांतली परमेश्वराची मूर्ति रामलालच्या रूपानं उभी आहे. आचार्यदेवो भव, मातृदेवो भव, पितृदेवो भव, या आपल्या आर्य-

धर्माच्या अनुल्लंघनीय आज्ञा आहेत. भाईसाहेबांनीं पित्याप्रमाणं मला पुनर्जन्म दिला. जगाच्या उपहासानं दुखावलेल्या माझ्या मनोवृत्तींची मातृप्रेमानं जोपासना केली; भावी आयुष्याचं सार्थक होण्यासाठीं महन्मान्य मार्गाचा मला गुरुपदेश केला; माता, पिता, गुरु, यांच्या या त्रिभुवनवंद्य त्रिमूर्तीला माझ्या दृष्टीनं परमेश्वराची पुण्यपदवी प्राप्त झाली आहे. या परमेश्वराच्या इच्छेसाठीं सर्वस्वीं आत्मयज्ञ करण्याला मला तत्पर व्हायला नको का? श्रीकृष्णपरमात्म्याच्या इच्छेसाठीं मयूरध्वजराजानं आपलं अर्धं अंग करवतीनं कापून दिलं, त्याप्रमाणं माझ्या परमेश्वराच्या सुखासाठीं माझ्या जीवापासून माझ्या भावी अर्धांगीला तोडणारी ही आकाशाची कुऱ्हाड—( स्वगत ) पण नको. अशा अनुचित उद्गारांनीं शरद्च्या मनांत भाईसाहेबाबद्दल अनादर उत्पन्न होईल. दातृबुद्धीच्या श्रद्धेप्रमाणंच दानवस्तूची पवित्रताहि त्यागाला आवश्यक आहे.

शरद् : बोलतां बोलतां मध्येंच थांबलांत! तुमची ही निष्ठुरता तुमच्या हृदयालाहि मान्य नाहीं. भगीरथ, दया करा, तुमच्या चरणीं शरण आलेल्या प्रेमळ जीवाला असं दूर लोटूं नका. शरद्च्या सुखासाठीं, तुमच्या स्वतःच्या सुखासाठीं, आपल्या दोघांच्या दुबळ्या प्रेमाला पायांखालीं तुडवूं नका.

( राग–भैरवी; ताल–त्रिवट. चाल–तुम जागो हा ० )

मजला वृथा । नाथा, कां देतां क्लेशां प्रखरां या ॥ ध्रु० ॥
चुरुनि प्रेमा । मम शुद्ध कामा ।
हृदयांतें कां दहतां उभयां ॥ १ ॥

भगीरथ : रामलालच्या सुखासाठीं अखिल ब्रह्मांडहि ब्रह्मार्पण करणं हा भगीरथाचा एकच धर्म आहे. रामलालचं सुख तेंच भगीरथाचं सुख, हें मी तुला सांगतों. आणि भगीरथाचं सुख तेंच शरद्चं सुख, हें तूं मला सांगितलंस. आपणां तिघांनाहि सुखी होण्याचा याखेरीज दुसरा मार्गच नाहीं. मी तुझ्याशीं विवाह केला तर ऐन सुखाच्या भरांतहि भाईसाहेबांच्या निराशमुद्रेची करुणादृष्टि अष्टौप्रहर आपल्याकडे पाहात राहील! असमाधानाच्या मोलानं असं दुर्दैवी सुख मिळविण्यांत काय अर्थ आहे? शरद्, आतां विचाराच्या दृष्टीनं आपल्या भाग्यशाली दुःस्थितीकडे पाहा. तुझ्या प्राप्तीमुळें भाईसाहेब सुखांत आहेत; त्यांच्या सुखाला साहाय्य केल्यामुळं माझी कृतज्ञता संतुष्ट झाली आहे; मला ऋणमुक्त करण्यासाठीं आपलं सर्वस्व अर्पण केल्यामुळें तुला समाधान वाटत आहे! शरद्, हा मनोहर मनोभंग सुदैवानं आपणांला लाभणार आहे. भाईसाहेबांच्या उपकारांची फेड

केल्यावांचून मिळविलेलं सुख केवळ अन्यायाचं होईल. शरद्, तुला निर्वाणीचं सांगतों, या आत्मत्यागाच्या ब्रह्मानंदापासून मला दूर केलंस तरीहि यावज्जीव मीं तुझ्याशीं पुनर्लग्न करणं शक्य नाहीं. पुन्हा सांगतों, माझ्या उपकारकर्त्याशीं कृतघ्नतेनं वागलों, तर तें अतिशय अन्यायाचं होईल.

**शरद्** : मनाचा कोंडमारा झाल्यामुळें अगदीं निर्भीडपणानं बोलतें—मी हिंदुसमाजांतली बालविधवा आहें. माझ्या निर्भीडपणाला जग अगदीं निर्लज्ज-पणासुद्धां म्हणेल, पण भगीरथ, उपकारकर्त्याशीं कृतघ्नपणानं वागणं हें अन्यायाचें आहे, तसंच प्रेमाशीं विश्वासघातानं वागणं हें तरी अन्यायाचं नाहीं का ?

**भगीरथ** : न्यायान्यायाचा त्रिकालाबाधित निर्णय त्रिकालज्ञ ऋषींनासुद्धां करतां आला नाहीं. आजची न्यायाची गोष्ट उद्यां अन्यायाची ठरेल; कालचा अन्याय आज न्याय ठरत असेल; न्यायान्यायाची सारासारविवेकबुद्धि देशकालानुरूप बदलत असते. त्यांतून पूर्वेचा पश्चिमेशीं जो एकजीव संयोग होत आहे त्या कालांत आपण जन्माला आलों आहोंत. भारतवर्षाचा विवेकसूर्य चालू कालीं संक्रमणावस्थेंत असल्यामुळें विचाराचे वारे नियमानं वाहात नाहींत. सुखाच्या तरुण इच्छा नव्या विचाराच्या आणि नव्या कल्पनांच्या एका पिढीच्या हृदयांत उत्पन्न होतात, आणि त्या सुखांचीं साधनं पुरविण्याचं अगदीं निराळ्या पिढीच्या हातीं असतं. भिन्नसंस्कृतीच्या या संक्रांति-कालांत आशेच्या पायावर उभारलेल्या आपल्या वाटेवरच्या इमारती ढांसळूं लागल्या तर तो कठोर काळाचा दोष आहे. वडिलांच्या मनाला न दुखविणारा त्यागधर्म आजच्या तरुण पिढीनं आचारांत आणायला पाहिजे. शरद्, प्रेमळ मुली, आपला आजपर्यंतचा प्रेमळ सहवास हेंच आपलं सुखसर्वस्व ! तुझ्या-माझ्या सुखावर ही संक्रांत बसली तरी तीळमात्राच्या प्राप्तीनंहि गोड बोलून आपण आजचा सण साजरा केला पाहिजे. शरद्, भगीरथाच्या सर्वस्वाची तुला शपथ आहे. मीं तुझा त्याग करणं कितीहि अन्यायाचं असलं तरी त्याला तूं आपली संमति दे. अशा अडचणीच्या प्रसंगीं या दोन अन्यायांतून एकाचा तरी मला अवलंब करावा लागणारच. कोणता तरी अन्याय करणं ज्या वेळीं आवश्यक होऊन बसतं, त्या वेळीं ज्या अन्यायामुळं अंतःकरणाची जाणिवेनं तळमळ होत नाहीं तोच मनुष्यमात्राला क्षम्य आहे. शरद्, याच पावलीं भाईसाहेबांकडे चल, माझ्या मृत प्रेमाची अखेरची इच्छा म्हणून तुला सांगतों कीं, भाईसाहेबांच्या विनंतीचा—आणि आतां ती माझीहि विनंती आहे—या विनंतीचा अनादर करूं नकोस. माझ्या जन्मदात्याला माझ्यामुळं दुःख

झालं तर यापुढं मी जगणं शक्य नाहीं. अजून रडतेस ? वेडे, रडणं हें संसारांत संकटाशीं लढण्याचं हत्यार नाहीं ! ( स्वगत ) हिच्या या रडण्यामुळं या त्यागाचा मला केवढा आनंद वाटत आहे ! माझ्या विनंतीला ही चुकून तरी मनापासून रुकार देईल कीं काय अशी मनाला सारखी भीति वाटते. हिच्या इच्छेविरुद्ध आणि केवळ माझ्या इच्छेमुळंच ही हा स्वार्थत्याग करीत आहे या कल्पनेंतच माझ्या आनंदाचं रहस्य आहे. ( उघड ) शरद्, चल माझ्याबरोबर आणि आतां यापुढं रडशील तर तुला माझ्या गळ्याची शपथ आहे. [ जातात. ]

## प्रवेश दुसरा

[ स्थळ—तळिरामाचें घर. पात्रें–बिछान्यावर पडलेला आसन्नमरण तळिराम, त्याच्या-भोंवतीं शास्त्री, खुदाबक्ष, डिसोझा, दादीशेठ दारूवाला, मन्याबापू मवाळ, जनूभाऊ जहाल, सोन्याबापू सुधारक, यल्लाप्पा वगैरे आर्यमदिरामंडळचे सभासद. ]

सोन्याबापू : शास्त्रीबुवा, कालची रात्र फारच जड गेली; वास्तविक काल रात्रींच तळिराम गार व्हायचा ! पण आजचा दिवस आणखी दारू पिण्याचं याचं सद्भाग्य होतं म्हणूनच हा वांचला !

खुदाबक्ष : तशीच रात्र लांबलचक तरी किती वाटली ! कांहीं केल्या संपेना ! तळिरामाच्या आयुष्यांत आणि तिच्यांत चेंगटपणाबद्दल जशी काय पैजच चालली होती !

सोन्याबापू : जितकी लांबलचक तितकीच भेसूर ! आम्हीं इतकी संध्या केलेली पण डोळ्याला डोळा लावून पळभरसुद्धां ध्यान करण्याचा कोणाला धीर झाला नाहीं.

मन्याबापू : खरंच आहे; घडीभराच्या ध्यानानं कायमचा प्राणायाम व्हायचा एखादे वेळीं ! यमदूतांच्या स्वाऱ्या येणार आहेत असं कळल्यावर झोपेनं मुडद्यासारखं पडायची कोण छाती करणार ? तळिरामाऐवजीं न जाणो ते आपल्यालाच चुकून न्यायचे ही प्रत्येकाला धास्ती वाटायचीच !

सोन्याबापू : तेवढी दिव्याची ज्योत काय ती संथपणानं तळिरामाची प्राणज्योति विझते कीं काय हें टक लावून पाहात होती !

विरूपाक्ष : ठीकच आहे. जन्ममरणाचा जिचा रोजचा रोजगार, तिला कसली भीति वाटणार ? बरं, दिव्याची ज्योत जरी संथ असली तरी तळिरामाची धडपड सारखी चालू असेल, नाहीं ?

मन्याबापू : मुळींच नाहीं ! आज ही जी तळिरामाच्या देहाची यमराजाच्या विरुद्ध निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ इतक्या हातघाईवर आलेली दिसते तिचा काल मागमूससुद्धां नव्हता ! काल सारी रात्रभर तळिरामानं फक्त सनदशीर चळवळच चालू ठेवलेली होती. शरीराचा स्वामी स्थानभ्रष्ट होऊं नये म्हणून इमानी अवयवांनीं इतकी जबाबदारी घेतली होती कीं डेकन सभेनेंसुद्धां तिच्यापुढं हात टेंकावेत! डोळ्यांत उरलेला प्राण तसाच निघून जाऊं नये म्हणून ती पापणीपासून दूर झाली नाहीं. त्याची झोंप नेहमीं म्हणजे इतकी जहाल असायची, पण काल रात्रीं तिच्यावर सभाबंदीच्या कायद्याची अंमलबजावणी झाल्यासारखं दिसत होतं ! नेहमीं वटवट करणारी जीभ आज अशी सरकारजमा कां झाली हें पाहण्यासाठीं एखादं कपोलकल्पित कारण सांपडेना म्हणून दोन्ही गाल एखाद्या विरक्त साधूप्रमाणं अंतर्मुख झाले आहेत. नाकानंसुद्धां पंचप्राणांना बाहेर जातां येऊं नये म्हणून विश्वासांतल्या वाऱ्यालासुद्धां येरझाऱ्या करतां येऊं नयेत अशी कडेकोट नाकेबंदी केली होती. सारी रात्रभर असा निपचित पडला होता, कीं विलायतेंतल्या कसलेल्या परीक्षकालासुद्धां छातीला हात लावून सांगतां आलं नसतं, कीं हा तळिराम असा बेशुद्ध पडला आहे तो मेल्यामुळं, झोपेमुळं, दारूमुळं—

सोन्याबापू : किंवा वैद्याच्या औषधामुळं म्हणून !

मन्याबापू : अरे खरंच, औषध देण्याची वेळ झाली ! जागा करावा आतां याला ! तळिराम, ऊठ. औषध घेतोस ना ?

तळिराम : मला नीट बशीव; आतां मला औषध नको आहे. माझं मरण अगदीं जवळ आलं आहे.

जनूभाऊ : तळिराम, असा धीर सोडतोस ? भिऊं नकोस ! आम्ही तुला मरूं देणार नाहीं; अरे, ती दारूची बाटली याच्यापुढं आणून ठेव. डोळ्यासमोर दारूची बाटली असल्यावर हा कायमचे डोळे मिटील ही भीतीच सोड ! जीव गेला तरी मरायचा नाहीं !

मन्याबापू : ऐका हो जनूभाऊ ! शास्त्रीबुवा, बघा हो यानं जरा डोळे पांढरे केले हो !

विरूपाक्ष : अरे, अरे, अरे ! अहो, कुणी गंगा इकडे घ्या बरं जरा ! आणि

तसंच तुळशीपत्रहि आणा ! तळिराम, तळिराम, सावध हो, बाबा ! वैद्याला, डॉक्टरला बोलावूं का ?

**तळिराम :** गंगा नको; तुळशीपत्र नको, कांहीं नको ! मला मरतांना थोडीशी दारू पाजा म्हणजे झालं ! तुळशीपत्राऐवजीं तोंडावर एक बूच ठेवा म्हणजे ठसका लागला तरी तोंडांतली दारू सांडणार नाहीं ! आणा थोडीशी !

**विरूपाक्ष :** अहाहा, याला म्हणावं खरा दारूचा अभिमानी ! पुढच्या जन्मीं तूं यापेक्षांहि मोठा दारूबाज होणार ! प्रत्यक्ष भगवंतांनींच गीतेंत म्हणून ठेवलं आहे, कीं

" यं यं वाऽपि स्मरन् भावं त्यजत्यंते कलेवरं ।
तं तमेवैति कौंतेय सदा तद्भावभावितः ॥ "

[ त्याला दारू पाजतो. ]

**तळिराम :** आणखी थोडी दे म्हणजे मला थोडासा तकवा येईल ! मला तुम्हांला माझी अखेरची इच्छा सांगायची आहे ! जरा आणखी दे पाहूं—

**मन्याबापू :** आणखी दारूला तूं सध्यां पात्र नाहींस !

**जनूभाऊ :** पिऊं दे रे त्याला; या वेळीं नाहीं म्हणूं नकोस !

[ त्याला दारू पाजतात. ]

**तळिराम :** अरेरे, मला दारूसुद्धां नीटशी पितां येत नाहीं ! शास्त्रीबुवा, खुदाबक्ष, मी आतां मरतों. माझं सांगणं लक्षांत ठेवा. आधीं त्या भगीरथाला सांगा, कीं तळिराम दारू पितां पितां मेला; अखेरपर्यंत प्रेमाच्या पकडींत सांपडला नाहीं. सांगाल ना ?

**विरूपाक्ष :** अगदीं बजावून सांगूं !

**तळिराम :** मी मेल्यावर, माझ्या घरांत दारूचाच गुत्ता काढा ! त्याचं नांव ' तळिराम मोफत मद्यालय ' असं ठेवा. तें सारी रात्रभर उघडं ठेवण्याबद्दल खटपट करून परवानगी काढा ! म्हणजे अडल्याविडल्याची अडचण होणार नाहीं ! त्या मद्यालयांत आल्यागेल्यांना, गोरगरिबांना, गोब्राह्मणांना फुकट दारू पाजा ! विद्यार्थ्यांना निम्मे दरानं दारू विका ! माझी खरी भिस्त तरुण पिढीवरच आहे ! माझ्या घरांतल्या रिकाम्या बाटल्या, ग्लासं एखाद्या कुटुंबवत्सल दारूबाजाला द्या ! माझ्या वर्षश्राद्धाच्या दिवशीं एखाद्या सत्पात्र ब्राह्मणाला सडकून दारू पाजा ! गोप्रदान करण्याऐवजीं बुचांचा एक तराफा माझ्या नांवानं नदींत सोडा म्हणजे मी त्याच्यावर बसून वैतरणीनदी उतरून स्वर्गांत जाईन ! माझी ही इच्छा पुरी कराल ना ? न केलीत तर माझी आशा दोस्त हो !

गुंतून मी भूत होईन; मला मुक्ति मिळणार नाहीं !

मन्याबापू : आम्ही सगळेजण वाटेल ती मेहनत करून तुझी इच्छा पूर्ण करूं ! तूं कांहीं काळजी करूं नकोस.

जनूभाऊ : तशांतून तूं भूत झालासच तरी तुझ्या भुताला आम्ही व्हिस्कीच्या बाटलींत भरून कोंडून ठेवूं ! आणखी कांहीं इच्छा आहे ?

तळिराम : आणखी कांहीं नाहीं; वाटेल त्याच्या नादीं लागून दारू सोडूं नका ! दारू न पिण्याची शपथ फार दिवस टिकत नाहीं; आपल्या आर्यमदिरा-मंडळाचा अभिमान धरा—कांहीं झालं तरी संस्था बुडवूं नका ! आई आई ग ! शास्त्रीबुवा, मला आणखी थोडी दारू द्या ! आणि तुम्ही सारेहि माझ्याबरोबर शेवटची घ्या ! माझी हेल्थ—भरपूर ड्रिंक करा ! ( त्याला दारू देतात व सर्वजण मोठाले पेले भरतात. ) स्वर्गांत मला दारू मिळेल का रे !

सोन्याबापू : तळिराम, टु युवर हेल्थ ! [ सर्व पितात ]

तळिराम : थोडी दारू ! आणखी एकच प्याला ! [ मरतो ]

सोन्याबापू : अरेरे, आटपला बाजार ! दारूच्या या जिवंत गुत्त्याचे एकदम साडेआठ वाजले !

शास्त्री : गेला, मदिरेचा खरा कैवारी गेला !

खुदाबक्ष : अभागी आर्यमदिरामंडळाचा खरा आर्य आधार तुटला !

जनूभाऊ : मदिरे, मदिरे, तुझी धुंदी उतरली ! तुझ्या यशाचा वांटा इथंच राहिला ! तुझ्या सौभाग्याच्या लाल तजेल्यावर प्रेतकळा आली ! तुझी अडखळती चाल इथं कायमची खुंटली ! तुझं बरळणं यापुढं बंद झालं !

शास्त्री : खरा खरा महात्मा दारूबाज आज आम्हांला सोडून गेला ! असा दारूबाज पुन्हा होणं नाहीं !

खुदाबक्ष : ती गोष्टच काढावयाला नको ! आपण सारेच पिणारे, पण तळिरामाची गोष्टच निराळी ! पितांना कधीं दिवस पाहिला नाहीं, कीं रात्र पहिली नाहीं !

शास्त्री : आज बारा वर्षें झालीं, केव्हांहि तळिरामाच्या तोंडाची दुरूनच घपकन् घाण आली नाहीं असं झालंच नाहीं ! असं खडतर व्रत एक पुरं तप चालविलं !

खुदाबक्ष : तपस्वीच तो ! बोले तैसा चाले, त्याचीं वंदावीं पाउलें ! बारा वर्षे अडखळत बोलला, आणि अडखळतच चालला !

जनूभाऊ : स्वार्थत्याग तरी केवढा ! दारूसाठीं बायको सोडली; मग दुसऱ्या आतांची काय कथा !

शास्त्री : दारू पिणारालाच त्यानं आप्त केलं! हा मन्याबापू जरा नेमस्तपणानं घेणारा, म्हणून नेहमीं त्याला आपल्या शेजारीं यानं आग्रहानं पाजावी, तसाच मगनभाई, जरा भित्रा, पण त्यालाहि—

मगन : ( एकदम मुक्तकंठानें रडून ) तळिराम, आतां मला आग्रहानं कोण रे दारू पाजील? काटकसरीनं निशा चढविण्यासाठीं, मिक्श्चर करण्याचा उपदेश कोण रे करील?

जनूभाऊ : शास्त्रीबुवा, अशा रडण्यानं या महात्म्याचा गौरव कसा होणार? याच्यासाठीं उघड्या मैदानांत एक जंगी जाहीरसभा जरूर भरविली पाहिजे.

मन्याबापू : बेजबाबदार जंगी जाहीरसभा मुळींच नको! सनदशीर पद्धतीनं इथंच एक सभेची बैठक उठवूं या आणि काय करायचं तें ठरवून टाकूं या. एक छोटंसं कार्यकारी मंडळहि नेमा पाहूं—

शास्त्री : तुमचं म्हणणं उक्त आहे. तुम्हीच कार्यकारी मंडळाचे चिट-णीस व्हा.

मन्याबापू : बरं, मग आधीं अध्यक्ष निवडा! कोण होतो अध्यक्ष?

खुदाबक्ष : तसं कोण सांगणार? सगळ्यांचीच योग्यता सारखी आहे.

जनूभाऊ : मग चिठ्या टाका!

यल्लाप्पा : दम खा! माझी अशी सूचना आहे, कीं मी अध्यक्ष होतों, तिला आपण सर्वांनीं अनुमोदन द्यावं! कारण, अध्यक्षाला सभा संपेपर्यंत स्वस्थ बसून राहणं एवढंच काम करायचं असतं आणि मला इतकी जास्त झाली आहे, कीं थोड्या वेळांत माझा अगदीं लोळागोळा होईल! तेव्हा सभेचं काम आटपेपर्यंत मी आपला प्रेत होऊन अध्यक्षांप्रमाणं पडून राहीन!

खुदाबक्ष : मग तळिरामाचं प्रेतच तुझ्यापेक्षां जास्त योग्य आहे.

जनूभाऊ : बरोबर आहे! शिवाय, हल्लीं सभांतून, कामाच्या दृष्टीनं थोर माणसांच्या तसबिरा अध्यक्षस्थानीं ठेवण्याची वहिवाट आहे. त्या दृष्टीनं तसबिरींपेक्षां प्रेत केव्हांहि अधिक लायक! सबब तळिरामाच्या प्रेतालाच अध्यक्षस्थानीं बसवावें!

खुदाबक्ष : अध्यक्षांची निवड झाल्यावर, मी आतां सभेपुढं जोरानं पहिला ठराव असा आणतों, कीं आधीं घरांतली सगळी दारू पिऊन मग पुढं कार्याला लागावं. ठराव पसार! कार्यकारी मंडळाच्या उत्साही चिटणिसांनीं सर्वांना पेले भरून द्यावेत अशी मी त्यांना जोरानं विनंती करतों.

शास्त्री : ज्याअर्थी सर्वांनाच चढत चालली आहे, त्याअर्थी यापुढं प्रत्येकानं

बसूनच बोलावं, असा दुसरा ठराव मी पुढं आणतों. माझे पाय लटपटताहेत— ठराव लवकर पसार करा !

मगन : ( त्याला सांवरून ) या ठरावाला मी टेंका देतों. ठराव पसार !

जनूभाऊ : तळिरामाच्या मरणानिमित्त शहरांतील सर्व दारूचीं दुकानं दिवसभर बंद ठेवण्याची मक्तेदारांना विनंती करावी, असं या सभेचं ठाम मत आहे.

शास्त्री, खुदाबक्ष वगैरे : शेम ! धिक्कार ! नो, नो !

मन्याबापू : सन्मान्य सभासद जनूभाऊ यांचा ठराव पुष्कळशा सभेला मान्य नाहीं. मिस्टर विरूपाक्षशास्त्री, राजश्री खुदाबक्ष, श्रीयुत मगनभाई, व श्रीयुत मी या ठरावाबद्दल जोरानं खेद करतों. मृतमहात्म्याच्या धोरणाकडे सभेचा कटाक्ष आहे. तळिरामाला दारूचीं दुकानं बंद झालेलीं खपत नसत; म्हणून संबंध दिवस दुकानं बंद ठेवण्याऐवजीं संबंध रात्रभर दुकानं उघडीं ठेवण्यासाठींच सभेनं खटपट करावी. ठराव पसार !

शास्त्री : सदरहू प्रेताची यात्रा वाजतगाजत काढावी !

मगन : दारूखेरीज अनाठायीं खर्च न करण्याकडे तळिरामाच धोरण होतं; म्हणून वाजंत्र्यांचा खर्च ही सभा करूं इच्छीत नाहीं ! त्याच्या हातापायांच्या काड्यांनींच पोटाचा नगारा वाजवावा, अशी माझी उपसूचना आहे. उपसूचना पसार ! प्रेतामागं भाडोत्री रडण्यासाठीं कांहीं गुजराथी बायका आणण्याची मी खटपट करतों.

जनूभाऊ : शेम् ! तळिरामाला बायकांच्या नांवाचासुद्धां तिटकारा होता; म्हणून रडण्यासाठीं, बायकांऐवजीं मन्याबापू यांनीं आपले कांहीं मवाळ मित्रच आणावे, अशी मी शिफारस करतों.

मन्याबापू : ही सभा या ठरावाचा निषेध करते आहे. मी असं विचारतों कीं, जोरानं विचारतों--कीं, मृताच्या अंत्यविधीच्या वेळीं, एक विशिष्ट ध्वनि करावा लागतो. त्यासाठीं आपल्या जहाल जिवलगांना आणायला जनूभाऊ तयार आहेत का ? मी स्पष्टच सांगतों, कीं नेमस्तांसाठीं जर पितरपाकाचा रडका पंधरवडा असेल तर जहालांसाठीं जोरकस तोंडसुखाचा फाल्गुनमास असतो !

खुदाबक्ष : दोस्तहो, असे भांडून सभेंत बखेडा घालूं नका ! ही काय देशांतल्या दोन्ही पक्षांतल्या विद्वानांची सभा आहे, म्हणून तुम्हीं असा धिंगाणा घालावा ? मी ठांसून सांगतों—कुत्सित कोटि मनांत आणून कोणीं हंसूं नये—मी म्हणून टाकतों कीं–मी दारू ठांसून सांगतों कीं, ही आम्हां दारूबाजांची सभा आहे. वर्षांतून तीन दिवस चढणारी ही देशभक्तीची निशा नाहीं; पण दिवसांतून

तीन वेळां पचनीं पाडलेली ही दारूची निशा आहे. तुम्ही देशभक्त आहांत का ? तुम्ही विद्वान् आहांत का ? नाहीं ! मग एकेरीवर येऊन सुरळीत सभा मोडण्याचा तुम्हांला काय अधिकार आहे ? अशी एकमेकांवर आग पाखडण्यांत काय अर्थ आहे ? काम पुढें चालवा.

शास्त्री : मी असा ठराव पुढें आणतों, कीं तळिरामाचं प्रेत व्हिस्कीच्या बाटल्यांभोंवतीं येणाऱ्या पेंढ्याच्या पिशव्यांनीं जाळावं.

खुदाबक्ष : आर्यधर्माच्या दृष्टीनं हा भडाग्नि होतो. हा धर्मबाह्य ठराव आहे. या ठरावाला मी तळिरामाच्या वतीनं हरकत घेतों.

भन्याबापू : दोघेहि श्रीयुत चुकताहेत ! तळिरामाचा दारू पिणं हा एकच धर्म होता. सबब धर्माच्या दृष्टीनं पाहतां तळिरामाला एखाद्या दारूच्या भट्टींत जाळावं, असा ठराव मी आणतों ! पसार !

जनूभाऊ : मी असा ठराव आणतों, कीं आपण सर्व अगदीं गाढव आहांत ! प्रेतयात्रा कशी न्यायची हें ठरविण्यापूर्वीं आपण जाळायला आरंभ केला ! मिरवणुकीच्या वेळीं गाडीचे घोडे सोडून, आपण गाडी ओढून तळिरामाचा सन्मान करावा, अशी मी सूचना करतों.

मगन : या ठरावाला माझा असा वांधा आहे, कीं घोडे सोडून आपण गाढव गाडी ओढीत बसलों तर तें उलट अपमानकारक आहे !

भन्याबापू : आतां फार महत्त्वाचा ठराव मी फारच जोरानं पुढं आणतों. तळिरामाचं कांहींतरी स्मारक करायला पाहिजे; त्यासाठीं 'तळिराम स्मारक फंड कमिटी' स्थापून तिच्यामार्फत फंड गोळा करण्याचं सभेनं ठरवावं ! वर्गण्यांचे आंकडे भराभर पडले पाहिजेत ! आणि याच बैठकींत पडले पाहिजेत. आंकडे मोठाले पण पाहिजेत ! किमानपक्ष एकेकानं हजाराचा आंकडा तरी घातलाच पाहिजे.

शास्त्री : लाखाची गोष्ट सांगितलीत ! आपले श्रीमंत शेट मगनभाई यांच्यापासूनच शेज धरावी ! शेटजींनीं तोंड वाईट करण्याचं कारण नाहीं ! हें आंकडे वसूल करण्यांत येतील अशी त्यांनीं मुळींच भीति बाळगूं नये ! आजवर कोणत्या स्मारकसभेनं आंकडे वसूल करून स्मारक केल्याचं कोणाच्या स्मरणांत आहे ? त्या वेळेपुरतेच पहिल्या उसळीच्या भरांत हे दर्शनी आंकडे टाकायचे असतात ! पुढं सर्वांनाच त्या आंकड्यांसकट स्मारकाचाहि विसर पडत जातो !

मगन : तत्राप मी लेखीं गुंतायचा नाहीं; म्हणून या ठरावाला मी जोरानं —

खुदाबक्ष : हां, मगनभाई —

मगन : या ठरावाला मी जोरानं--

खुदाबक्ष : हां—हां—

मगन : या ठरावाला मी जोरानं कांहींच करीत नाहीं !

शास्त्री : आतां मृताचं प्रेत बाहेर काढावं असा माझा शेवटचा ठराव आहे. उठा सर्वजण, आधीं प्रेत बाहेर नेऊन ठेवूं ! ( सर्वजण उठतात व धुंद झालेल्या यल्लाप्पाच्या हातापायांची ओढाताण करतात. )

यल्लाप्पा : मला कोण ओढत आहे, असं ही सभा जोरानं विचारीत आहे.

शास्त्री : मेलेला मनुष्य कांहीं विचारीत नाहीं, असं बहुमतानं सभेचं ठाम मत आहे.

यल्लाप्पा : मी मेलों नाहीं, असा एकमतानें ठराव मी मांडतों.

खुदाबक्ष : मग कोण मेला आहे ? कोणी तरी मेला आहे हें खास !

मन्याबापू : पुनः सभेंत दंगा सुरू झाला ! थांबा, खुदाबक्ष, शास्त्रीबुवा, सभेची जादा बैठक भरवा आणि कोण मेला आहे, हें शिस्तवार ठरवा !

खुदाबक्ष : ठीक आहे ! सभा अशी सूचना करीत आहे, कीं जो मेलेला असेल त्यानं हात वर करावा. ( कांहीं वेळ थांबून ) कोणीच हात वर करीत नाहीं त्याअर्थीं कोणीच मेलेलं नाहीं असं सभा प्रतिपादन करीत आहे ! तळिराम-सुद्धां मेला नाहीं, असं सभेचं ठाम मत आहे !

शास्त्री : याबद्दल सभेला फार आनंद होत आहे. या आनंदाच्या भरांत तळि-रामाच्या मृत आत्म्याला, तळिराम मुळींच मेला नाहीं, अशी स्वर्गांत अभि-नंदनपर तार पाठविण्याची ही सभा ठराव करीत आहे.

सोन्याबापू : अरेरे ! फुकाफुकीं सभेचा सारा समारंभ झाला म्हणावयाचा !

खुदाबक्ष : नाहीं. हा खटाटोप फुक्ट जाऊं द्यायचा नाहीं. या खटपटीचा उपयोग होण्याची वेळ येईपर्यंत, म्हणजे कोणीतरी मरेपर्यंत सर्वांनीं मुड्यां-प्रमाणं इथंच पडून राहावं असा ठराव मी पुढं आणतों. ठराव पसार !

[ सर्व अस्ताव्यस्त पडतात. पडदा पडतो. ]

[ स्थळ—रामलालचा आश्रम. रामलाल प्रवेश करतो. ]

रामलाल : ( स्वगत ) माझ्या मनाचं घाणेरडं चित्र आतां मला स्वच्छपणानं दिसायला लागलं! माझ्या अध:पाताला कांहीं तरी सीमा आहे का? पित्याच्या दृष्टीनं शरदकडे पाहतांना मानीव नात्याच्या मोठेपणानं रक्तामांसाचं अंगभूत तारुण्य डोळ्यांतून मुळींच नाहींसं झालं नाहीं. शरद्बद्दल मला जी सहानुभूति, भूतदया म्हणून वाटत होती, ती दुबळ्या मनाच्या हिंदुपुरुषाची पारावतवृत्ति कामुकता होती! गरीब गीतेला विद्यादान करतांना, अनाथाला कल्याणाचा मार्ग दाखविल्यामुळंच आपल्याला हें समाधान होत आहे अशी माझ्या मनाची मी फसवणूक करीत आलों; पण तें तशा उदारपणाचं नव्हतं! गीतेला शिकतांना पाहून, शरद्ला समाधान वाटत होतं, म्हणून मला त्या वेळीं उत्साह वाटे! तोसुद्धां प्रियाराधनाचाच एक मार्ग होता!

( राग-भैरव; ताल-त्रिवट. चाल—प्रभु दाता रे. )

मन पापी हें। करितें निजवंचन अनुघटिदिन ॥ ध्रु० ॥
उपशमपर मतिभेषज सेवुनि सुतियत्न करि, परि ते।
विफल अंतिं सुविवेकभिन्न ॥ १ ॥

उपकारांच्या कृतज्ञतेमुळें बिचारा भगीरथ थोड्याच काळांत माझ्याशीं खुल्या दिलानं बोलूंचालूं लागला. तेव्हां त्याचा मला कंटाळा वाटूं लागला. अधिकप्रसंगीं मनुष्याची ती फाजील सलगी वाटून आपल्याला भगीरथाचा तिटकारा येत असावा अशी मी स्वतःची समजूत करीत होतों; पण तें कंटाळण्याचं खरं कारण नव्हतं! भगीरथ आपल्याशीं मनमोकळेपणानं वागल्याचं शरद्नं वेळोवेळीं सांगितल्यामुळेंच, न कळत माझ्या मनांत जागृत झालेला मूढ मत्सर हेंच त्या कंटाळ्याचं कारण होतं! त्या तरुण जीवांचा परस्परांकडे ओढा दिसूं लागतांच माझ्या प्रौढ मनांत मत्सराची आग भडकली! तेव्हां — धिक्कार, शतशः धिक्कार असो मला! यत्किंचित् सुखाच्या क्षुद्र लोभानं पुत्राप्रमाणं मानलेल्या भगीरथाला दुखवून, कन्येप्रमाणं मानलेल्या शरद्च्या कोंवळ्या हृदयावर रसरशीत निखारे टाकून माझ्या वयाच्या वडीलपणावर, नात्याच्या जबाबदारीवर आणि विचाराच्या विवेकवृत्तीवरहि पाणी सोडायला मी तयार झालों, हा आमच्या आजच्या

दुर्दैवी परिस्थितीचा परिपाक आहे. पराक्रमी पुरुषार्थानं मिळवलेली सत्ता मोकळेपणाच्या उदारपणानं मर्यादित करण्याचा आम्हांला सराव नसल्यामुळं दैवयोगानं प्राप्त झालेली अल्प सत्ता दुबळ्या जीवांवर आम्ही सुल्तानी अरेरावीनं गाजवीत असतों. आज हजारों वर्षे मेलेल्या रूढींच्या ठराविक ओझ्याखालीं सांपडून आमचीं मनंहि मुर्दाड झाल्यामुळं आज आमच्यांत वस्तुमात्रांतील ईश्वरनिर्मित सौंदर्य शोधून काढण्याची रसिकता नाहीं. असं सौंदर्य मिळविण्याची पवित्र अभिलाषबुद्धि नाहीं. त्या अभिलाषाची पूर्णता करणारी पुरुषार्थाची पराक्रमशक्ति नाहीं. आणि खरं कारण मिळतांच जिव्हाळ सुखाचाहि त्याग करणारी उदार कर्तव्यनिष्ठा नाहीं! पूर्वजांनीं तोंडावर टाकलेल्या अर्थशून्य शब्दांची बिचारी वेदांताची वटवट क्षुद्र सुखाच्या आशेनंहि ताबडतोब बंद पडते. विद्येनं मनाला उंच वातावरणांत नेऊन ठेवलं तरी आमचीं मनं आकाशांत फिरणाऱ्या घारीगिधाडांप्रमाणं अगदीं क्षुद्र आमिषानंसुद्धां ताबडतोब मातीला मिळतात. पांच हजार वर्षांचं दीर्घायुष्य मोजणाऱ्या भारतवर्षरूप पुराणपुरुषा! तुझ्या विराट् देहासाठीं हिमाचलासारखं भव्य मस्तक निर्माण केल्यावर, गंगासिंधूंसारख्या पवित्र ललाटरेखांनींहि विधात्याला तुझ्या सुखाचा चिरकालीन लेख लिहितां येऊं नये का? सांग, हतभाग्या भारतवर्षा! भावी काळीं या रामलालासारखी कंगाल पैदास आपल्या पोटीं निपजणार, या कडू भीतीमुळं दक्षिणमहासागरांत जीव देण्यासाठीं कमरेइतका उतरल्यावर कोणत्या पापांचीं प्रायश्चित्तं देण्यासाठीं परमेश्वरानं तुला उचलून धरला? परमेश्वरा, माझ्या अपराधाची मला कधीं तरी क्षमा होईल का? भगीरथ आणि शरद् यांच्याजवळ कोणत्या तोंडानं मी क्षमा मागूं? नाहीं, मनाचा तीव्र आवेग आतां मरणाखेरीज दुसऱ्या कशानेंहि थांबणार नाहीं. (भगीरथ व शरद् येतात.) हतभागी रामलाल, कृतकर्मांचीं फळं भोगण्यासाठीं दगडाचं मन करून तयार हो, आणि या दुखावलेल्या जीवांची क्षमा माग.

भगीरथ : भाईसाहेब, लहान तोंडीं मोठा घांस घेतला तर तुमच्या लाडक्या भगीरथाला तुम्ही क्षमा कराल का? आपल्या पायांजवळ एक विनंती करण्यासाठीं मी आलों आहें.

रामलाल : भगीरथ, माझ्याशीं बोलतांना आजच इतकी औपचारिक वृत्ति कां वापरतोस?

भगीरथ : भाईसाहेब, लोकसेवा करण्याची विद्या शिकण्यासाठीं म्हणून मी

आपल्या आश्रयाला उभा राहिलों आहें; पूर्वी सर्व विद्याप्राप्ति करून गुरुगृह सोडून जातांना गुरुदक्षिणा देण्याची वहिवाट होती; पण हल्लींच्या काळांत दर महिन्याला अगोदर फी द्यावी लागते! भाईसाहेब, या नव्या पद्धतीला अनुसरून मी तुम्हांला गुरुदक्षिणा अर्पण करण्यासाठीं आलों आहें. तिचा स्वीकार करून या आपल्या बाळाला आशीर्वाद द्या!

रामलाल : कसली दक्षिणा देणार तूं?

भगीरथ : माझ्या स्वाधीन झालेल्या शरद्च्या प्राणांची! भाईसाहेब, आपल्या सांगण्याप्रमाणं आपलं सर्वस्व आपल्या चरणीं अर्पण करायला मी तयार आहें!

रामलाल : शरद्, भगीरथानं म्हटलं तें खरं का?

[ शरद् खालीं पाहते. ]

भगीरथ : संकोचवृत्तीमुळं या प्रसंगीं ती काय बोलणार?

रामलाल : ( स्वगत ) हो, खरंच! याच काय, पण कोणत्याहि प्रसंगीं बिचारी हिंदु बालविधवा काय बोलणार? गाईला आत्मा नाहीं, असं ख्रिस्ती धर्माचं तत्त्व नव्यानं ऐकतांच आम्ही आर्यधर्माभिमानी उपहासानं हंसलों, पण माझ्यासारख्या जुलमी जनावरांच्या पशुवृत्तीनं या गरीब गाईंना आत्मा तर नाहींच पण जीभसुद्धां ठेविली नाहीं!

भगीरथ : शरद्, भाईसाहेबांना माझं म्हणणं खरं वाटत नाहीं; माझ्या शब्दासाठीं तूं—

रामलाल : थांब, भगीरथ, शरद्चा त्याग तूं इतक्या सहजासहजीं करायला तयार झालास हें तुझ्या प्रेमाचंच लक्षण समजूं का? मला वाटतं, शरद्वर तुझं मनापासून प्रेम मुळींच नव्हतं!

भगीरथ : असं आपल्याला वाटतं! सर्वसाक्षी सर्वेश्वराला काय वाटतं, तें— भाईसाहेब, क्षमा करा, शरद्विषयीं माझ्या तोंडचे असले उद्गार तिच्या माझ्या नव्या नात्याला कमीपणा आणतील! आपल्या पदवीला पोहोंचल्या-मुळं शरद्बद्दल सलगीनं बोलण्याला मला अधिकार नाहीं!

रामलाल : ( स्वगत ) शाबास, भगीरथ, शाबास! तूं जितका थोर आहेस तितकाच हा रामलाल नीच आहे! माझ्या मनाच्या हलकेपणामुळें बिचाऱ्या शरद्च्या प्रेमाचे तुलामलाचे धिंडवडे निघाले. ( उघड ) अशा पवित्र प्रेमानं तिच्याशीं वचनबद्ध झाल्यावर तिचा त्याग करणं तुला उचित आहे का?

भगीरथ : एक वेळ नाहीं, पण हजार वेळ उचित आहे! ज्या कार्यासाठीं आपण मला जीवदान दिलं, त्या कार्यासाठीं मला हा मोह सोडायचा आहे!

शरद्च्या लोभांत मी सांपडलों, तर आपला उपदेश मला साधणार नाहीं आणि भावी आयुष्याचा सन्मार्ग मला सांपडणार नाहीं! समाजस्वरूप विराट्-पुरुषाची सेवा करण्यासाठीं, माझ्या देशाच्या कारणीं पडण्यासाठीं, आपल्या उपदेशासाठीं, संसारसुखाचा आणि प्रेमाचा पाशबंध हा भगीरथ ताड्कन तोडून टाकीत आहे! आपल्यासारख्या थोर पुरुषाचा उपदेश—

रामलाल : भगीरथ, उपदेश करणं हें इतकं सोपं काम आहे, कीं त्यामुळं मला थोर म्हणणं केवळ हास्यास्पद आहे! उपदेश करणारापेक्षांहि उपदेश ऐकून मोहाला झुगारून देणाराच नेहमीं श्रेष्ठ असतो. मोठ्या मनाच्या मुलांनो, त्यागधर्माच्या तेजोमय तत्त्वानं देदीप्यमान झालेल्या तुम्हां दोघांच्या मुख-मंडलांकडे तोंड वर करून उघड्या डोळ्यांनीं पाहण्याची या क्षुद्र मनाच्या रामलालची योग्यता नाहीं! क्षणमात्राच्या पातकी मोहावेगाची मला क्षमा करा! बेटा शरद्, माझ्या अभद्र शब्दांची, पामर मनाची आणि या शेवटच्या पाप-स्पर्शाची मला एकदांच क्षमा कर! भगीरथ, शिष्यानं गुरूला आधीं गुरुदक्षिणा द्यावी, हा जसा हल्लींचा परिपाठ आहे, त्याचप्रमाणं कुशाग्रबुद्धीच्या शिष्याला उत्तेजनासाठीं पारितोषिक द्यावं, असाहि नियम आहे. माझ्या उपदेशाचा पहिला धडा तूं इतक्या हुशारीनं शिकला आहेस कीं, तुझा गौरव करणं माझं कर्तव्य आहे! उदार बाळा, हें आपलं सुंदर चित्र घेऊन जन्माचा सुखी हो!

[ शरद्चा हात भगीरथाच्या हातांत देतो ]

( राग–देसकार; ताल–त्रिवट. चाल–अरे मन राम० )

स्वीकिरिं रम्य अमल चित्रा या । योग्य तुला प्रतिफल घ्याया ॥ ध्रु० ॥
छात्रा पटु गुणी । अभ्यसनीं । हें वितरित गुरुमाया ॥ १ ॥

भगीरथ, लोकसेवेचं खडतर व्रत आचरितांना कधीं कधीं पुढाऱ्याला लोका-पवादाला पात्र व्हावं लागतं, अशा वेळीं निंदकांच्या वाग्बाणांनीं दुभंगलेल्या हृदयाच्या जखमा बऱ्या करण्यासाठीं शरद्च्या प्रेमळ अश्रूंचीं तुला भविष्य-काळीं जरूर पडेल. रामलालचं हें रिकामं हृदय — ( गीता रडत येते; तिला पोटाशीं धरून ) ये बाळ, ये!– रामलालचं हें रिकामं हृदय तुझ्यासारख्या अनाथ जीवांसाठीं अर्पण केलं आहे! तळिरामाच्या अकालीं मृत्यूमुळं तुझ्या-वर जो अनर्थ गुदरला त्यांत तुला पैशाखेरीज कांहीं उपयोगीं पडणार नाहीं. माझ्या पोक्त वयांतलीं कांहीं वर्षे बाद करून स्वतः तरुण होण्याचा आणि त्यांची शरद्च्या कोंवळ्या आयुष्यांत बोजड भर टाकून तिला पोक्त करण्याचा नीच प्रयत्न करण्यापेक्षां तुझ्या वयांतलीं कांहीं वर्षे आपल्यासाठीं घेऊन

तुझ्यासारख्या कन्येशीं पितृधर्मानं वागण्यांतच या रामलालच्या वृद्धत्वाचं सार्थक होईल. माझ्या चुलत्याची मला मिळालेली सर्व संपत्ति मी तुला देत आहें ! तीच तुझ्या कामीं येईल ! तुझ्यासारख्या कुरूप विधवेबद्दल सहानुभूति वाटण्याइतकी व्यापक सुधारणा अजून आपल्या समाजांत जन्मली नाहीं ! भगीरथासारखं अपवादभूत रत्न एखादंच सांपडण्याचा संभव ! बाकी बहुतेक समाज रामलालसारख्या मनाचाच आहे ! माझ्या उदाहरणावरून मला वाटायला लागलं आहे कीं, आमची सुधारणेंत वरीचशी आत्मवंचना आहे ! अनाथ बालविधवेची दया येण्यालाहि आम्हांला चांगल्या चेहऱ्याचा आधार लागतो. आमची सुधारणा अद्याप डोळ्यांपुरतीच झालेली आहे ! आमची विद्या अजून जिभेवरच नाचत आहे. जिभेचा शेंडा कापून टाकला तर आमच्यांत संस्कृत व प्रौढ मानलेला सुशिक्षित कोणता आणि अप्रबुद्ध आणि विचारशून्य मानिलेला अशिक्षित कोणता हें देवालाहि कळायचं नाहीं ! इतका वेळ शरद्च्या प्रेमाला पात्र होत नव्हतों म्हणून मला खेद वाटत होता; पण प्रेमाला पात्र होणं हा मनुष्याचा धर्म असेल तर दया हा देवांचा गुण आहे ! [ पद्माकर येतो. ]

**पद्माकर** : भाई, सुधाकरानं आपल्या मुलाचा खून केला आहे आणि ताईला घातक जखम केली आहे ! त्याला फौजदाराच्या ताब्यांत देण्यासाठीं मी निघालों आहें—चल माझ्याबरोबर—

**रामलाल** : काय – म्हणतोस तरी काय हें ?

**पद्माकर** : वाटेनं सर्व सांगतों; पण आधीं लवकर चल; आणखी हेंहि सांगतों, कीं सुधाकराबद्दल या वेळीं रदबदली करूं नकोस. त्या नरपशूच्या मोहांतून सुटली तर माझी अनाथ ताई अन्नाला तरी लागेल ! चल, चल, लौकर !

**रामलाल** : अरे, पण असा अविचार—

**पद्माकर** : माझ्या ताईनं भोगलेल्या हालअपेष्टांची शपथ घेऊन सांगतों, कीं सुधाकराला सरकारी शासन देवविल्याखेरीज मी आतां थांबणार नाहीं ! याला अविचार म्हण, सूड म्हण, काय वाटेल तें म्हण ! चल लौकर !

**रामलाल** : भगीरथ, शरद् आणि गीता यांना घेऊन ये. सुधाकराकडे चल.

[ सर्व जातात. ]

प्रवेश चवथा

[ स्थळ–सुधाकराचें घर. पात्रें–आसन्नमरण सिंधू; जवळ सुधाकर, पद्माकर, रामलाल आणि फौजदार. ]

**पद्माकर :** दादासाहेब, हें पाहा मेलेलं मूल; हें या हरामखोरानं ठार मारलं ! ही पाहा माझी ताई ! या दीनदुबळ्या देहाची या दारूबाज दुष्टानंच प्राणांतिक दुर्दशा केली आहे ! असाच पकडा या नराधमाला—

**फौजदार :** भाऊसाहेब, असं रागावून काय होणार ? थांबा, आपण बाईंना नीट विचारून पंचनामा करूं.

**पद्माकर :** ताई, ताई, सिंधूताई—

**रामलाल :** भाऊ, थांब जरा; असा हातघाईवर येऊं नकोस ! तिला जरा ग्लानि आली आहे !

**पद्माकर :** ही ग्लानि—ही ताई—हें सारं सारं—या दारुड्या राक्षसाचं अघोर कर्म आहे ! दादासाहेब, काय वाटेल तें करा, पण या काळतोंड्याला—ताईच्या पंचप्राणांवर दरोडा घालणाऱ्या या दारुड्याला कांहीं तरी भयंकर शिक्षा भोगायला लावा !

**रामलाल :** भाऊ, व्हायचं तें झालं; आतां यांच्यावर राग धरून झाली गोष्ट पुन्हा येणार आहे का ?

**पद्माकर :** भाई, माझं शांतवन करण्याचा प्रयत्न करूं नकोस ! या चांडाळानं माझी सोन्यासारखी ताई अन्नावांचून झिजवून झिजवून मारली—काठ्या-दगडांनीं ठेंचून मारली—कोळ्यामाळ्यांच्या तोंडीं येणार नाहींत अशा शब्दांनीं या मात्रागमनी नीचानं तिच्या काळजाला घरें पाडून मारली ! दादासाहेब, तुमच्या पायां पडतों, कांहीं झालं तरी याला मोकळा सोडूं नका हो ! बुद्धि-पुरस्सर गुन्हा केला म्हणून तुरुंगांत नेऊन घाला किंवा दारूनं माथं फिरलं आहे म्हणून वेड्याच्या दवाखान्यांत नेऊन लोटा; अकलवान् गुन्हेगार म्हणा, किंवा निर्बुद्ध पशु म्हणा, पण याला कुठल्या तरी कोंडवाड्यांत घाला ! याच्या मोहाला गुंतूनच—माझी ताई म्हणजे देवी आहे हो—नवरा म्हणून ठरलेल्या या जनावराच्या नांवाचीं पंचप्राणांच्या पुष्पांनीं पूजा करण्यासाठीं ही इथं गुंतून राहिली आहे. देवमूर्ति म्हणून मानिलेला हा दगड एखाद्या नरककुंडांत रिचवून हिच्या नजरेआड केला म्हणजे हिला घरीं नेऊन हिच्या औषध-

पाण्याची तरी व्यवस्था करतां येईल हो!

फौजदार : भाऊसाहेब, जरा शांत व्हा. आपण असं बोलूं लागलां—

पद्माकर : दादासाहेब, माफ करा. दगडाचा पुतळा असतों तरीसुद्धां सव्वा हात जीभ बाहेर काढून बोलायला लागलों असतों! मग आतां तर चांगला रक्ता-मांसाचा—हिच्याच रक्तामांसाचा—तिचाच भाऊ आहें—काय सांगू हो, बोट करून दाखवायला तिच्या अंगावर रक्तमांससुद्धां राहिलं नाहीं,—तेंसुद्धां या राक्षसानं गिळून टाकलं—दारूच्या घोटाबरोबर हिच्या रक्ताचा घोट घेऊन जित्या अंगांतील मांसाचे लचके तोडून या पिशाच्च्यानं आहारून टाकले. चार गिरण्यांच्या मालकाची ही मुलगी, या शिकलेल्या दारूबाजानं आपल्य पोटाची खळगी भरण्याकरतां तिला जात्यावर दळायला लावलं. आमच्या घरीं कुत्र्यांच्या पिलांना जें दूध मिळतं—मिळतं कसलं, त्यांना पाजतांना हलगर्जीनं खालीं सांडतं तितकंसुद्धां या गोजिरवाण्या बाळाला कधीं लाभलं नाहीं! आमच्या घरीं मोलकरणीनं उष्टंखरकटं टाकलं असेल, तितकं अन्न कधीं हिला मिळालं नाहीं! याच्याकडे पाहिलं म्हणजे दयामाया पार जळून जातात! दगड असतों तर मनुष्य झालों असतों, आणि मनुष्य आहें, तरी दगड झालों आहें. याच्या गळ्याला फांस घालतांना, ताईच्या गळ्यांतील मंगळसूत्र तुटलं तरी चालेल! ताई, सिंधूताई, ऊठ बरं, बाळ!

[ तिला किंचित् उठवून बसवतो. ]

सिंधू : दादा, केव्हां आलास तूं? भाई, तूंहि आलास? तिकडे कुणीकडे असायचं? दादा, ऊठ बरं, चुलीवर थोडा भात आहे; दोन तांबे अंगावर घालून चार घांस खायला घाल! तिकडे कालपासून पोटांत कांहीं नाहीं!

पद्माकर : याच्या तोंडांत चार घांस घालण्यापेक्षां याच्या पिंडब्रह्मांडाचा एकच घांस करून काळाच्या पोटांत कोंबण्यासाठीं मी आलों आहें! ताई, हे पाहा फौजदारसाहेब तुझा जबाब घेण्यासाठीं आलेले आहेत. या खुनी दारूबाजानं काय काय केलं तें सगळं यांना नीटपणें सांग! दादासाहेब, विचारा तिला काय विचारायचं तें—

फौजदार : बाई, यांनीं काय काय केलं तें सांगा बरं?

सिंधू : यांनीं कांहीं केलं नाहीं—कुणीं सांगितलं आपल्याला हें?

फौजदार : मग मुलाला काय झालं? तुम्हांला हें कपाळावर लागलं कसं?

सिंधू : मी दोन दिवसांची उपाशी होतें. मला राहूनराहून भोंवळ येत होती. मुलाला घेऊन माळ्यावरून उतरतांना मला घेरी आली; पडल्यामुळं मला

कपाळावर खोंक पडली ! मूल माझ्या अंगाखालीं चेंगरलं ! इकडच्या कांहीं संबंध नाहीं त्यांत !

पद्माकर : ताई, अगदीं खोटं सांगितलंस ! मग या काठीला रक्त कसं लागलं ?

सिंधू : काठी टेंकीत रक्तभरल्या हातीं मी इथपर्यंत आलें. तिकडच्या कांहीं संबंध नाहीं त्यांत !

फौजदार : बाई, हें सारं खरं आहे का ?

सिंधू : खरं—अगदीं खरं आहे ! माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवा !

पद्माकर : नाहीं हो; दादासाहेब, उघड उघड हें खोटं आहे ! ताई, तुला माझी, बाबांची, तुझ्या नवऱ्याची शपथ आहे. खरं सांग.

सिंधू : दादा, असा कां अंत पाहतोस ? मीं सांगितलं तें खरं आहे अगदीं !

पद्माकर : दादासाहेब, हें खोटं आहे हो ! काय करावं आतां ?

फौजदार : भाऊसाहेब, कांहीं करतां येणार नाहीं आतां ! आपला राग कितीहि अनावर झाला, तरी यांच्या पुण्याईपुढं तुमचंआमचं काय चालणार ? न्यायाचं शस्त्र कितीहि तीक्ष्ण असलं तरी अशा पवित्र पतिव्रतेच्या पुण्याईची ढाल आड आल्यावर तें काय करणार ?

पद्माकर : दादासाहेब ! हिच्या खोट्या बोलण्यामुळं या हरामखोराला मोकळा सोडतां काय ?

फौजदार : भाऊसाहेब, प्रत्यक्ष गंगाप्रवाहांत पोहणारावर उगीच आग पाखडून काय होणार !

रामलाल : शाबास, सिंधूताई, शाबास ! भाऊसाहेब, देवाब्राह्मणांच्या सत्यतेपेक्षांहि अशा पुण्यरूप सतीच्या असत्यालाच परमेश्वराच्या आशीर्वादाचं अधिक बळ असतं ! भाऊ, जाऊं देत ! झालं तें झालं ! सिंधूताई, तूं मात्र धन्य आहेस ! तुझ्यासारख्या आर्या अजून आहेत, म्हणूनच या पुण्यभूमीला आर्यावर्त नांव शोभतं ! भारतवर्ष साध्वीसतींचं माहेरघर आहे ! सरकारनं सतीचा कायदा करून आमच्या साध्वींना सहगमनानं देह जाळून घेण्याची बंदी केली तर जितेपणींत आंतल्या आंत जळून नवऱ्याच्या नांवासाठीं या मंगलदेवता आत्मयज्ञ करीत आहेत ! भाऊसाहेब, सिंधूताईच्या इच्छेसाठीं तरी सुधाकरावरचा राग सोडून द्या !

सिंधू : दादा, इकडे ये, माझ्या शेजारीं बैस असा ! दादा, आपल्या माणसावर असा राग करून चालेल का ? माझी जातीघडी सरत आली ! बाबांच्याखेरीज आणि तुम्हां दोघांखेरीज तिकडे आपलं म्हणायला कोणी आहे का आतां ?

असं रत्न मी मागं टाकून जातें, ती तुझ्या धीरावर ना ? तूंच आतां त्यांच्या उन्हांत तापल्या जीवावर पदर घालायला नको का ? तुझ्या ताईचं सौभाग्य तूंच आतां जपून ठेवलं पाहिजेस. लहानपणीं माझ्या कुंकवाला तजेला यावा म्हणून तूं माझ्या करंड्यांत मृगाचीं इवलालीं पाखरं आणून ठेवीत होतास, आठवतं का ? मग आतांच ती माया कुठें गेली ? माझ्या सौभाग्याचं कुंकूं तुझ्याच ठेवणीला देऊन मी जात आहें !

पद्माकर : छाकट्या सैतान्या, ऐक, ऐक माझ्या लाडक्या ताईचा एक एक बोल ! पण तुझे डोळे कुठले उघडायला ? ताई, ताई, काय म्हणतेस हें तूं ?

रामलाल . भाऊ, फौजदारसाहेबांना जायला वेळ होत नाहीं का ?

फौजदार : चला, भाऊसाहेब—पण केव्हां तरी तेवढी फिर्याद काढून घ्या म्हणजे झालं !

[ फौजदारांना पोहोंचविण्यासाठीं रामलाल व पद्माकर जातात. ]

सुधाकर : ( स्वगत ) उघडले, भाऊसाहेब, माझे डोळे साफ उघडले ! मात्र माझे डोळे असे उघडले आहेत तोंवर या देवतेच्या जात्या जीवज्योतीच्या प्रकाशांत या क्षणींच स्वर्गाचा रस्ता एकदां नीट पाहून ठेवतों म्हणजे मग भोंवतीं काळाकुट्ट अंधार पडला आणि माझे डोळे कायमचे मिटले तरी दिशाभूल होण्याची भीतीच नको. ( इकडे तिकडे पाहून व औषध उघडून ) हं, हेंच तें विषारी औषध ! कुठं आहे ती जिवाला जाऊन भिडलेली साता जन्मांची वैरीण ?

[ एका पेल्यांत दारू व विष ओततो. ]

सिंधू : ऐकलं का ? जरा माझ्याजवळ यायचं होतं—

सुधाकर : तुझ्याजवळ येऊं ? ( तिच्याजवळ बसून ) काय काम आहे ?

सिंधू : माझं डोकं आपल्या मांडीवर ठेवावं ! आपला हात माझ्या हातांत द्यावा—

सुधाकर : ( तसें करून ) सिंधू, सिंधू, देवतास्वरूप सिंधू ! काय तुझी दुर्दशा झाली ही ! सिंधू, या दारूबाज नवऱ्याच्या पायीं तूं बुडालीस ! अपशब्दांनीं तुझा अपमान केला ! कधीं तुला गोळाभर अन्न मिळालं नाहीं ! पोटासाठीं तुला दळायला लावलं ! तुझे हालहाल केले ! तुझ्या पोटचा गोळा तुझ्या डोळ्यांदेखत चेंचून टाकला ! देवी, संसाराच्या बनवासांत फाटकं धोतर आड करून तुला वणवणायला लावलं ! सिंधू, सिंधू, उदारहृदये सिंधू, शापाच्या एका शब्दानं मला जिता जाळून टाक ! पदरींचं पुण्य खर्चून, खोटं बोलून

या सुधाकराला कशाला वांचवीत बसलीस ? तुझ्या पुण्याईनं स्वर्गाचा संसार सजवून साजरा करण्याची तुझी योग्यता; चौऱ्यांशीं लक्ष जन्मांचीं संचितं या जन्मीं उभीं राहिलीं आणि विधात्यानं 'सुधाकर' हें दारूनं ओथंबलेलं नांव तुझ्या फाटक्या कपाळीं कोरलं! सिंधू, देवी, मला क्षमा कर! या अनंत अपराधी पातक्याला क्षमा कर!

सिंधू : आपण असा जिवाला त्रास कां बरं करून घ्यायचा? मी फुटक्या कपाळाची कां म्हणून? भरल्याहातीं हळदीकुंकवानं, आपल्या मांडीवर मला मरणं आलं, याहून आणखी कोणतं भाग्य हवं मला? माझं मंगल झालं! आपण मनाला त्रास करून घेऊं नये. माझ्या गळ्याची शपथ आहे! आधींच प्रकृति अशी झालेली! उन्हाच्या वेळीं संतापानं डोकं तापलं तर सुंठ उगाळून द्यायलांसुद्धां कोणी नाहीं. आणखी माझं अखेरचं हात जोडून सांगणं आहे. आतां आपल्या जीवाला जपणारं कुणी नाहीं. लोकं सारीं ज्याचीं त्याला असतात. माझ्या कपाळीं आपली सेवा एवढीच लिहिली होती,—आपण आतां एकटे राहिलां—आतां पुढं तरी माझ्या रक्ताची शपथ आहे—आपण यापुढं कधीं घेऊं नये! ऐकायचं ना माझं एवढं? एका थेंबालासुद्धां शिवायचं नाहीं—

सुधाकर : नाहीं, सिंधू, उभा जन्म तुझी पवित्र आज्ञा मोडण्यांत घालविला! तुझी शेवटची आज्ञा तरी पाळण्याइतका हा पातकी सुधाकर भाग्यशाली नाहीं! हा शेवटचा एकच प्याला मला अजून घ्यायचा आहे. नको, दुर्दैवी जीवा, आतां माझ्याकडे पाहूं नकोस! या थिजत चाललेल्या डोळ्यांत अनाथ आशा अजून कशाला तळावते आहे सिंधू, सिंधू, काय— रामलाल, धांव!

सिंधू : नाथ, जिवाला संभाळा – सुधाकर! माझ्या सुधाकरांना, देवा—

[ सिंधू मरते. रामलाल येतो. सुधाकर पेला घेतो व उठून उभा राहतो. रामलाल सुधाकराच्या हातून पेला घ्यावयाला जातो, तोंच तो झटकन् विष पितो. ]

सुधाकर : चांडाळा, ऐन वेळीं असा घात करू नकोस!

रामलाल : सुधा, काय प्यालास हें?

सुधाकर : दारू! एकच प्याला!

रामलाल : अजून दारू? जिनं एवढा अनर्थ केला तीच दारू?

सुधाकर : होय, रामलाल, तीच दारू! जिनं माझ्या घरांत एवढा अनर्थ केला तीच दारू! जिनं चारी खंडांत अनर्थाचं साम्राज्य चालविलं आहे ती दारू! कुबेराला भीक मागायला लावते ती दारू! भीमासारख्या वज्रदेही शरीराला

बहात्तर रोगांचा दवाखाना बनविते ती दारू ! शिकलेल्या शहाण्याच्या थोबाडाला शिमग्यांतल्या शिव्याशेणांनीं शोभा आणते ती दारू ! महापतिव्रतांना नवऱ्याच्या हातानं बाजारांत आणून बसवते ती दारू ! जिवलग नात्याचे धागे कुजवून तडातड तोडते ती दारू ! बापाला मुलाकडून, मुलाला बापाकडून ठार मारविते ती दारू ! डुकराचं नांवसुद्धां न घेणाऱ्या पाक मुसलमानाला डुकरासारखं खातेऱ्यांत लोळविते ती दारू ! गायत्रीमंत्रानं पवित्र झालेल्या ब्राह्मणांच्या जिभेला गायत्रीच्या मांसाची चटक लावते ती दारू ! एखाद्या पशूप्रमाणं पुत्राला मात्रागमन्याप्रमाणं प्रत्यक्ष जन्मस्थानीं–अरेरे ! बोलूं नये तें बोलणं आलं ! पण सुधाकराच्या ज्या जिभेनं दारूचा विटाळ मानला नाहीं, त्या जिभेला एका किळसवाण्या शब्दानं काय वाट लागणार ! आणि समाजांत ठिकठिकाणीं शिकलेल्या संभावित गळ्यांतून जीं दारूचीं गटारं वाहताहेत त्यांत एका शब्दाची घाण वाहून जायला किती वेळ लागणार !— रामलाल, कान फोडून स्पष्ट ऐक – पुत्राला मात्रागमन्याप्रमाणं प्रत्यक्ष जन्मस्थानीं लघुशंका करायला लावते ती दारू! – ती दारू मीं प्यावी अं ! आतां तोंड वाईट करू नकोस ! रागावूं नकोस – तुला एकदां सांगितलं, आज शेवटचं सांगून ठेवतों, कीं दारूची संवय सुटण्याचा काळ ती लागण्यापूर्वी काय तो असतो ! पहिला एकच प्याला घेण्यापूर्वी भावी मद्यप्याचा हात धरला तरच फायदा होईल ! ज्यानं एकदां पहिला एकच प्याला घेतला त्याला हा शेवटचा असा एकच प्याला घ्यावाच लागतो ! दारूबाज दारूंतच मरायचा, हें ब्रह्मवाक्यच आहे ! आणि माझ्यासारख्या एखाद्याला पश्चात्ताप झाला तरी हा एकच प्याला कांहीं टळत नाहीं ! मात्र जळफळीत औषधाला मारण्यासाठीं त्यांत जसं पुष्कळसं पाणी ओतावं लागतं, त्याप्रमाणं हा अखेरचा एकच प्याला घेतांना, त्यांतली दारूची जलाल आग मारण्यासाठीं त्यांत रसकापरासारखं एखादं विष बरंच घालावं लागतं !

**रामलाल** : काय ? यांत रसकापूर ? आत्यंतिक घातक रसकापूर घातला आहेस ? भयंकर विष प्यालास ?

**सुधाकर** : विष पिऊं नको तर काय करूं ? ही पाहा – ही देवता मला सोडून गेल्यावर जगांत माझं काय राहिलं आहे ?

**रामलाल** : काय, ताई गेली ?

[ सिंधूजवळ जाऊन बसतो. ]

**सुधाकर** : हो, रामलाल, ती गेली ! माझी सिंधू गेली ! माझी पुण्याईची

सिंधू आटली! माझी दयेची सिंधु, करुणरसाची सिंधु, काळ-सागराला मिळाली – नाहीं, या पातकी सुधाकरानं निर्मिलेल्या दारूच्या समुद्राला मिळाली. या सुधाकराचं जग दारूच्या एकच प्याल्यांत बुडून गेलं !

( राग–भैरवी; ताल–दादरा. चाल—पिया सोने दे० )
त्यजीं देवी हतदैवा । जगीं राहि काय ॥ ध्रु० ॥
सिंधु सुखाचा । पुण्यांशाचा । सकळ आटे तापें मम ।
विशाल जरी हाय ॥ १ ॥

वामनअवतारीं देवाला त्रिभुवनाचं माप घेण्यासाठीं अवाढव्य त्रिविक्रमरूपानं तीन पावलं टाकावीं लागलीं, पण या सुधाकराचं उभं त्रिभुवन या देवीच्या दोन पावलांपुरतंच होतं ! त्याच पायांवर मस्तक ठेवलं असतां मला मरण यायला पाहिजे. या देवतेचे पाय धरून असा हिच्याबरोबर मी गेलों तरच हिच्या पुण्यबलानं माझीं पातकं जळून मला स्वर्गद्वारांत प्रवेश करतां येईल ! गेली! दिव्यतपस्विनी मंगलनिधान पुण्यमूर्ति सिंधू गेली! रामलाल, तुझी ताई गेली आणि माझी मानलेली आई गेली! रामलाल, रामलाल, हा सारा अनर्थपात होण्याचं कारण मीं पहिल्यानं घेतलेला दारूचा एकच प्याला! त्या दिवशीं केलेल्या पातकानं भ्रष्ट झालेलं तोंड या देवीच्या रक्तानं—या मूर्तिमंत अमृतानं धुऊन टाकतों. ( तिच्या रक्ताचें चुंबन घेतो. ) म्हणजे माझा पवित्र देह स्वर्गाला पात्र होईल ! रामलाल, असा भेदरून जाऊं नकोस. हा घे तो एकच प्याला ! हा एकच प्याला नीट चव्हाट्यावर मांडून साऱ्या जगाला दाखीव आणि आल्यागेल्याला, शिकलेल्याला-अडाण्याला, राजाला-रंकाला, ब्राह्मणाला-महाराला—म्हाताऱ्याला आणि मुलाला, तुझ्या जिवाभावाच्या दोस्ताला आणि सात जन्मांच्या दुस्मानाला, हात जोडून कळकळीनं सांग, कीं साऱ्या अनर्थांचं कारण हा दारूचा पहिला एकच प्याला असतो ! त्याच्यापासून दूर राहा ! जो जो भेटेल त्याला त्याला सांग – सिंधूच्या पवित्र रक्तानं तोंड धुऊन मी सांगतों आहें – मला मोठ्यानं ओरडवत नाहीं – तूं मुक्तकंठानं प्रत्येकाला सांग, कीं काय वाटेल तें पातक कर—पण दारू पिऊं नकोस !

[ सिंधूच्या पायांवर डोकें ठेवून मरतो. ]

रामलाल : अरेरे, काय हा अनर्थ ! एकदम तीन जीवांच्या तीन परी झाल्या ! मूल गेलं, सिंधू गेली, सुधाकर गेला ! घर बुडालं, नांव बुडालं आणि वंश

बुडाला! या जगांत सुधाकराचं आतां काय राहिलं आहे? सर्वस्वासह हे तीन जीव ज्याच्यांत बुडाले तो तेवढा दारूचा हा एकच प्याला!!!

ब्रह्मार्पणं ब्रह्महविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।
ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥

— श्रीगीतोपनिषत्सु श्रीभगवान् ।

अंक पांचवा समाप्त